५/९२२
१

भाषांतरमाला क्र. ६८

# युद्ध आणि शांती

टॉल्स्टॉयच्या War and Peace या जगप्रसिद्ध कादंबरीचा संक्षिप्त अनुवाद

अनुवादक
प्रा. आ. ना. पेडणेकर

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ
मुंबई

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
५/१२२
१
मंत्रालय

भाषांतरमाला क्र. ६८

57
B

# युद्ध आणि शांती

टॉल्स्टॉयच्या War and Peace या जगप्रसिद्ध कादंबरीचा संक्षिप्त अनुवाद

अनुवादक
प्रा. आ. ना. पेडणेकर

साहित्य आणि संस्कृति मंडळ
महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ
मुंबई

प्रथमावृत्ती :
जून १९७७

© प्रकाशकाधीन

सजावट :
सुभाष अवचट
पुणे

किंमत ४८ रुपये

प्रकाशक :
सचिव
महाराष्ट्र राज्य साहित्य - संस्कृति मंडळ
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ,
सचिवालय, मुंबई-३२.

## अनुवादकाचे निवेदन

महान रशियन लेखक काउंट लिओ टॉल्स्टॉय (१८२८-१९१०) याने १८६२-१८६९ या काळात लिहिलेली 'वॉर अँड पीस' ही कादंबरी जागतिक वाङ्मयात सर्वश्रेष्ठ मानली जाते. तिचे 'युद्ध आणि शांती' हे मराठी संक्षिप्त भाषांतर महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळाच्या कृपेने वाचकांस उपलब्ध होत आहे.

नेपोलिअनशी झालेल्या लढायांच्या पार्श्वभूमीवर रशियन समाजाचे चित्रण इथे आहे. सैनिकी अनुभव, तारुण्यातील प्रीती, नृत्यसमारंभांची झळाळी, शिकारीतील धुंदी, कौटुंबिक जिव्हाळा, विविध अनुभवांतून स्फुरलेले तत्त्वज्ञान, एकाच व्यक्तीतील परस्परभिन्न व्यक्तिमत्त्वे इ. चा आढळ या गद्यमहाकाव्यात होतो. ह्या कादंबरीत पाचशेहून अधिक व्यक्ती आहेत. महत्त्वाच्या व्यक्ती टॉल्स्टॉयने परिचितांतून घेतल्या आहेत. नताशाचे व्यक्तिचित्रण अविस्मरणीय समजले जाते. पीएर आणि प्रिन्स आन्द्रे लेखकाच्या स्वभावाचे भिन्न पैलू दाखवतात. पीएर, प्रिन्स आन्द्रे आणि कॅरटीव्ह निरपेक्ष प्रेमात जीवनाची सार्थकता शोधतात. त्या काळी तुर्गेन्यफ, दॉस्तॉएवस्की, फ्लोबेर, चेकॉव्ह इत्यादी लेखकांना कादंबरीतील टॉल्स्टॉयचा नेपोलिअनबाबतचा पूर्वग्रह, मनोवगाहनाचे अनेक बारीक-

सारीक तपशील, शिकारी, लढाया, समारंभ इत्यादींची पाल्हाळिक वर्णने, मधून-मधून येणारे तत्त्वज्ञान अशा गोष्टींबद्दल असमाधान वाटत असले तरी सर्वांनाच ती श्रेष्ठ कलाकृती म्हणून मान्य झाली होती.

टॉल्स्टॉयने विशेषतः उपसंहाराच्या दुसऱ्या भागामध्ये इतिहासाचे तत्त्वज्ञान मांडले आहे. तो ऐतिहासिक घटनांचे श्रेय इच्छास्वातंत्र्यास किंवा कुणा थोर व्यक्तीस देत नाही; घटनांमागे यदृच्छता, नियती आहे असे तो मानतो.

मंडळाकडे प्रथम संपूर्ण कादंबरीचे भाषांतर करून दिले. त्यानंतर रसास्वादास अडथळा येणार नाही आणि कादंबरीची बलस्थाने कायम राहतील अशा तऱ्हेने संक्षेप करावा असे ठरले. संपूर्ण मराठी भाषांतरही लवकर वाचकांस उपलब्ध होईल अशी आशा आहे. कॉन्स्टन्स गार्निट यांच्या इंग्रजी भाषांतराची आणि संक्षेपासाठी मॅन्युएल कॉमरॉफ् यांच्या पुस्तकाची मदत झाली. त्यांचा मी आभारी आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाने माझ्यावर भाषांतराची जबाबदारी टाकली. भाषांतरासाठी मुदत वाढवून दिली. एका थोर ग्रंथाच्या सहवासात चार वर्षे आनंदात घालवता आली म्हणून मी मंडळाचा अत्यंत कृतज्ञ आहे.

प्रा. ग. प्र. प्रधान यांचे सततचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले म्हणून मी हे काम पूर्ण करू शकलो. त्यांचे मनःपूर्वक आभार. प्रा. एम्. एफ्. विटाकर (युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ नॉर्थ वेल्स) आणि डॉ. अशोक रानडे यांनी वेळोवेळी शंकांचे निरसन केले. श्री. बा. रं. सुंठणकर यांनी प्रेमळ तगादा लावून व उत्तेजन देऊन काम पुरे करून घेतले. माझे मित्र प्रा. मा. ना. आचार्य आणि प्रा. रा. कृ. जेरे यांनी उपयुक्त सूचना केल्या. या सर्वांचे मी आभार मानीत आहे. कल्पना मुद्रणालयाच्या सहकार्याचाही साभार उल्लेख करायला हवा. भाषांतरातील मराठी वळण जपणे, शुद्धलेखन पाहणे, दोन मुद्रणप्रती तयार करणे आणि मुद्रिते तपासणे यांसाठी माझी पत्नी सौ. शरयू हिने खूप मदत केली. हे संक्षिप्त मराठी भाषांतर वाचकांनी मूळ कलाकृतीस पर्याय न मानता ती कलाकृती मुळातून वाचण्याचे आमंत्रण समजावे. मी माझ्यापरीने भाषांतर अचूक, सरस करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला आहे. माझा वेळ या कामात जसा विलक्षण आनंदात गेला तसाच वाचकांचा जाईल अशी उमेद वाटते.

बुद्धजयंती / ३ मे १९७७
अलिबाग

आ. ना. पेडणेकर

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| भाग पहिला | १८०५ | १ |
| भाग दुसरा | १८०५ | १२ |
| भाग तिसरा | १८०५ | ६९ |
| भाग चौथा | १८०६ | १३० |
| भाग पाचवा | १८०६ ते १८०७ | १७२ |
| भाग सहावा | १८०८ ते १८१० | २२२ |
| भाग सातवा | १८१० ते १८११ | २७२ |
| भाग आठवा | १८११ ते १८१२ | २९४ |
| भाग नववा | १८१२ | ३५१ |
| भाग दहावा | १८१२ | ३८८ |
| भाग अकरावा | १८१२ | ४७५ |
| भाग बारावा | १८१२ | ५५२ |
| भाग तेरावा | १८१२ | ५९१ |
| भाग चौदावा | १८१२ | ६०६ |
| भाग पंधरावा | १८१२ ते १८१३ | ६३३ |

# निवेदन

आधुनिक शास्त्रे, ज्ञानविज्ञाने, तंत्र आणि अभियांत्रिकी इत्यादी क्षेत्रांत त्याचप्रमाणे भारतीय प्राचीन संस्कृती, इतिहास, कला इत्यादी विषयांत मराठी भाषेला विद्यापीठाच्या स्तरावर ज्ञानदान करण्याचे सामर्थ्य यावे हा उद्देश लक्षात घेऊन साहित्य-संस्कृति मंडळाने वाङ्मयनिर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. मराठी विश्वकोश, मराठी भाषेचा महाकोश, मराठी वाङ्मयकोश, विज्ञानमाला, भाषांतरमाला, आंतरभारती-विश्वभारती, महाराष्ट्रेतिहास इत्यादी योजना या कार्यक्रमात अंतर्भूत केल्या आहेत.

मराठी भाषेला विद्यापीठीय भाषेचे प्रगत स्वरूप व दर्जा देण्याकरिता मराठीत विज्ञान, तत्त्वज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि तंत्रविज्ञान या विषयावरील संशोधनात्मक व अद्ययावत माहितीने युक्त अशा ग्रंथांची रचना मोठ्या प्रमाणावर होण्याची आवश्यकता आहे. शिक्षणाच्या प्रसाराने मराठी भाषेचा विकास होईल ही गोष्ट तर निर्विवादच आहे. पण मराठी भाषेचा विकास होण्यास आणखीही एक साधन आहे आणि ते साधन म्हणजे मराठी भाषेत निर्माण होणारे उत्कृष्ट वाङ्मय हे होय. जीवनाच्या भाषेतच ज्ञान व संस्कृती यांचे अधिष्ठान तयार व्हावे लागते. जोपर्यंत माणसे परकीय भाषेच्याच आश्रयाने शिक्षण घेतात, कामे करतात व विचार व्यक्त करतात, तोपर्यंत शिक्षण सकस बनत नाही, संशोधनाला परावलंबित्व राहते व विचाराला अस्सलपणा येत नाही, एवढेच नव्हे तर वेगाने वाढणाऱ्या ज्ञानविज्ञानापासून सर्वसामान्य माणसे वाचत राहतात.

संस्कृत व अन्य भारतीय भाषांतील आणि त्याचप्रमाणे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटीन इत्यादी पश्चिमी भाषांतील अभिजात ग्रंथांचे व उच्च साहित्यामधील विशेष निवडक पुस्तकांचे भाषांतर किंवा सारांश,

अनुवाद अथवा विशिष्ट विस्तृत ग्रंथांचा आवश्यक तेवढा परिचय करून देणे भाषांतरमालेचा उद्देश आहे.

भाषांतर योजनेतील पहिला कार्यक्रम मंडळाने आखून, ज्यांना अग्रक्रम दिला पाहिजे अशी पाश्चात्त्य व भारतीय भाषांतील सुमारे ३०० पुस्तके निवडली आहेत. होमर, व्हर्जिल्, एस्किलस्, ॲरिस्टोफेनीस्, युरिपिडिस्, प्लेटो, ॲरिस्टॉटल्, थॉमस ॲक्वाइनस्, न्यूटन, डार्विन, रूसो, कॉन्ट, हेगल, जॉन स्टुअर्ट मिल, गटे, शेक्सपीअर, टॉल्स्टॉय, दॉस्तॉएवस्की, कॉसेरेर्, गार्डन् व्ही., चाईल्ड इत्यादिकांचा या भाषांतरमालेत समावेश केला आहे. संस्कृतमधील वेद, उपनिषदे, महाभारत, रामायण, भरताचे नाट्यशास्त्र, संगीत रत्नाकर, ध्वन्यालोक, प्राकृतातील गाथासप्तशती, त्रिपीटकातील निवडक भाग इत्यादिकांचाही भाषांतरमालेत समावेश केला आहे.

भाषांतरयोजनेखाली मंडळाने आतापर्यन्त ५० च्यावर अभिजात ग्रंथांची भाषांतरे प्रकाशित केली आहेत. जॉन स्टुअर्ट मिलचे "On Liberty", रूसोचे "Social Contract", एम.एन. रॉयचे "Reason, Romanticism & Revolution" व "Letters from jell", स्तानिस्लावस्कीचे "An Actor Prepares" व "Building a character", तुर्गेनेव्हचे "Father & Sons", रायशेवाखचे "Rise of Scientific Philosophy", गन्नर मिरदालचे "Economic Theory & Underdeveloped", कै. पां. वा. काणे यांचे "History of Dharmashastra", कोपलँडचे "Music & Imagination", बर्ट्रान्ड रसेलचे "Religion & Science", तेरझगीचे "Theoretical Soil Mechanics", विशाखादत्तचे 'मुद्राराक्षसम्', भरतमुनींचे 'भरतनाट्यशास्त्र' (अध्याय ६ व ७ आणि अध्याय १८ व १९), निकोलाय मनुचीचे "Storia Do Mogor", ऑ. से. पिगु लिखित "Socialism Vs. Capitalism", इझाडोरा डंकनचे "My Life", स्ट्रॅविन्स्कीचे "Poetics of Music" इत्यादी ग्रंथांची भाषांतरे मंडळाने प्रकाशित केली आहेत.

प्रस्तुत ग्रंथ "युद्ध आणि शांती" हा टॉल्स्टॉयच्या "WAR AND PEACE" या जगप्रसिद्ध कादंबरीचा संक्षिप्त अनुवाद आहे. सदर अनुवाद मंडळाच्या वतीने प्रा. आ. ना. पेडणेकर यांनी केला असून तो मंडळाच्या भाषांतरमालेत प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे.

लक्ष्मणशास्त्री जोशी
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ.

२६ ज्येष्ठ, शके १८९९
दिनांक १६ जून, १९७७

# भाग पहिला

## १८०५

दाढी करून आणि पावडर लावून झाल्यावर बरोबर ठरलेल्या वेळी प्रिन्स निकोलायने भोजनदालनात प्रवेश केला. त्याच्या बरोबर भोजन घेणारी सून, प्रिन्सेस मार्या, बूरिअनबाई आणि प्रिन्सचा स्थापत्यविशारद ही सर्व मंडळी वाट पाहत बसलेली होती. सामाजिक प्रतिष्ठा नसलेल्या मामुली स्थापत्यविशारदास बरोबर भोजनासाठी घेण्याचा सन्मान केवळ प्रिन्सच्या विचित्र लहरीपोटी लाभला होता. सामाजिक दर्जाबाबत खरे तर प्रिन्स कडव्या शिस्तीचा होता. प्रांतातील महत्त्वाच्या अधिकाऱ्यांना देखील तो क्वचित आपल्या पंक्तीचा लाभ देत असे. सर्व माणसे समान आहेत हा आपला सिद्धान्त पटविण्यासाठी आणि मिहाइल इव्हानॉविच हा आपणा सर्वांसारखाच चांगला इसम आहे हे आपल्या मुलीच्या मनावर पुन्हा पुन्हा ठसवण्यासाठी प्रिन्सने नाक हातरुमालात धरून कोपऱ्यात शिंकणाऱ्या ह्या स्थापत्यविशारदाची एकाएकी कधीतरी निवड करून टाकली होती.

प्रिन्स उत्साहाने भरभर पावले टाकत आला. जणू तो जाणूनबुजून लवचिक हालचाली आणि घरातील दैनंदिन जीवनातील कडक शिस्त यांतील विरोध व्यक्त करत होता. तो आला आणि मोठ्या घड्याळाने दोनाचे टोले दिले. मग दिवाणखान्यातील दुसऱ्या घड्याळाने मंद प्रतिध्वनी दिल्यासारखे टोले दिले. प्रिन्स स्वस्थ उभा राहिला. प्रिन्सच्या झुपकेदार भुवयांखालील करारी उग्र चमकदार डोळे सर्वांगावर फिरले आणि छोट्या प्रिन्सेसवर स्थिर झाले. झारचे आगमन झाल्यावर दरबारी लोकांना काय वाटत असेल त्याची कल्पना प्रिन्सेसला आली. प्रिन्स निकोलायच्या भोवतालच्या सर्व माणसांच्या मनात भीतीची आणि आदराची भावना निर्माण होई. प्रिन्स निकोलायने छोट्या प्रिन्सेसचे डोके थोपटले. मग काहीशा संकोचाने तिची

मान थोपटली.

'तुझ्या भेटीने मला आनंद झालाय' तो म्हणाला. उत्सुकतेने तिच्या नजरेत नजर मिळवून तो दूर झाला आणि आपल्या जागी बसला. 'बसा सगळे. मिहाइल इव्हानोविच बसून घे.'

त्याने आपल्या सुनेला आपल्या जवळ बसायची खूण केली. सेवकाने तिच्यासाठी खुर्ची जरा मागे ओढली.

तिच्या टपोरलेल्या देहाकडे पाहून मोठ्याने हसत प्रिन्स म्हणाला, 'तू वेळ गमावलेला दिसत नाहीस. हे बरं नव्हे.' तो थंडपणे, रुक्षपणे हसला. ते तिला आवडले नाही. तो हसू लागला की त्याचे ओठ तेवढे हसत, डोळे हसत नसत. त्याप्रमाणे तो आताही हसला होता. 'तू शक्य तेवढा व्यायाम घ्यायला हवा... जास्तीत जास्त व्यायाम घ्यायला हवा... झेपेल तितका...'

छोट्या प्रिन्सेसने त्याच्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही. तिची इच्छा नव्हती. काही संबंध नसल्यागत ती स्तब्ध बसून राहिली, मग प्रिन्सने तिच्या वडिलांची चौकशी केली तशी तिने हसून उत्तरे दिली. प्रिन्स दोघांच्याही ओळखीच्या लोकांबद्दल चौकशी करू लागला तशी ती अधिकाधिक उत्साहाने बोलू लागली. अनेक लोकांनी प्रिन्सला प्रेमाने विचारल्याचे तिने सांगितले. आणि शहरात ऐकलेली एकेक अफवा ती त्याला सांगू लागली.

'बिचाऱ्या काउंटेस ॲप्रिक्सिनचा नवरा मरण पावला. तिचे डोळे रडून रडून सुजले आहेत.' छोट्या प्रिन्सेसच्या स्वरात वाढता उत्साह होता. त्याचबरोबर प्रिन्सची नजर अधिकाधिक करडी होत होती. मग जणू तिचे निरीक्षण करून तिच्याबद्दलची आपली कल्पना स्पष्ट करून घेतल्यासारखा तो एकदम मिहाइल इव्हानॉविचकडे वळून म्हणाला, 'मिहाइल इव्हानॉविच, एकंदरीत आपला दोस्त नेपोलियन याला कठीण दिवस आहेत. प्रिन्स आन्द्रेनं (तो नेहमीच आपल्या मुलाचा उल्लेख ह्या नावानेच करी) मला मघाशीच त्याच्या विरुद्ध फौजा कशा गोळा होताहेत ते सांगितलं. नेपोलियन क्षुल्लक असामी आहे असं आजपर्यंत तुला नि मला वाटलं होतं.'

'तुला नि मला?' नेपोलियनबद्दल आपण तरी अशा अर्थाचे उद्‌गार कधी काढल्याचे मिहाइल इव्हानॉविचला आठवेना. प्रिन्सला आपल्या आवडत्या विषयाला सुरुवात करण्यासाठी आपले निमित्त पाहिजे हे मग त्याच्या डोक्यात आले. पुढे काय होणार ते त्याला कळेना तो कुतूहलाने प्रिन्स आन्द्रेकडे पाहू लागला.

त्या स्थापत्यविशारदाकडे बोट करून प्रिन्स आपल्या मुलाला म्हणाला, 'हा मोठा दर्दी इसम आहे.' मग युद्ध, नेपोलियन, त्या वेळचे सेनापती आणि राजकारणी माणसे यांवर संभाषण सुरू झाले. वृद्ध प्रिन्सचे ठाम मत होते की, त्या काळचे सगळे नेते शेंबडी पोरे होते. त्यांना लष्करी आणि राजकीय प्रश्नांतील प्राथमिक गोष्टींचेही ज्ञान नव्हते; त्याच्या मते सुव्हॉरॉफसारख्या प्रतिस्पर्धी सेनापतीशी त्याची गाठ पडली नव्हती म्हणूनच तो विजयी होत होता.

युरोपातील राजकीय जीवन सुरळीत चालले आहे, युद्ध कुठे चाललेच नसून लढाई खेळल्याची बतावणी करणाऱ्या कळसूत्री बाहुल्यांचा नाच करताहेत याबद्दल वृद्ध प्रिन्सला संशय नव्हता. वृद्ध प्रिन्स नव्या पिढीची टर उडवीत होता आणि ती ऐकून प्रिन्स आन्द्रेची करमणूक होत होती.

'भूतकाळातील प्रत्येक कृत्य तुम्हाला चांगलंच वाटतं की काय न कळे. फ्रेंच सेनापती मॉरोने टाकलेल्या जाळ्यात स्वतः सुव्हॉरॉफ्ने उडी घेतली होती आणि त्यातून त्याला बाहेर पडता आलं नव्हतं; हे खरं नाही काय?' आन्द्रेने विचारले.

'कोणी सांगितलं तुला?' प्रिन्स ओरडला आणि त्याने थाळी भिरकावून दिली. ती थाळी तिहॉनने अलगद झेलली. 'सुव्हॉरॉफ्...प्रिन्स आन्द्रे विचार करून बोलत जा...ती दोन माणसं होती...फ्रेडरिक आणि सुव्हॉरॉफ्. सुव्हॉरॉफ् मोकळा असता तर मॉरो कैदेत पडला असता. सैतान योग्य जागी गेला असता. सुव्हॉरॉफ्ला त्याच्यावर विजय मिळवता आला नाही तिथे मिहाइल कुटूझॉफ्ची काय कथा? अरे बाबा, तुम्ही आणि तुमचे जनरल बोनापार्टचा पाडाव करू शकणार नाहीत. तुम्हाला फ्रेंच माणसांची मदत घ्यायला हवी. चोराला पकडायला चोरच पाठलागावर सोडला पाहिजे.'

'तुमची डोकी ठिकाणावर नसावीत अगर माझी बुद्धी अजून शाबूत असावी. पाहू काय होतं ते. बोनापार्ट त्याच्या लष्कराचा प्रमुख झाला आहे. कसचा प्रमुख आणि कसचं काय?'

'आमच्या सर्व योजना चांगल्या आहेत, असा माझा दावा नाही. बोनापार्टबद्दल तुमचं असं मत का व्हावं हे मला समजत नाही. तुम्ही हसलात तरी मी माझं मत सांगतो. काही झालं तरी बोनापार्ट हा फार थोर जनरल आहे.'

'मिहाइल इव्हानॉविच' वृद्ध प्रिन्स ओरडला. दोघेही आपणास विसरले असतील अशा समजुतीने इव्हानॉविच भाजलेल्या मांसाचा समाचार घेत होता तो दचकला. 'तुला मी सांगितलं नव्हतं का नेपोलियन बोनापार्ट युद्धतंत्रातला दर्दी आहे म्हणून! हाही तेच म्हणतो आहे.'

'अगदी बरोबर महाराज' स्थापत्यविशारदाने उत्तर दिले. तसे वृद्ध प्रिन्सने कोरडे हास्य केले.

'बोनापार्ट धनिक घराण्यात जन्माला आला. त्याच्याकडे चांगले सैनिक आहेत. प्रथम त्याने जर्मनांवर हल्ले केले हे खरं. कोणीही मूर्ख जर्मनांचा पाडाव करू शकेल. जगाच्या प्रारंभापासून प्रत्येकानं जर्मनांचा पाडाव केलेला आहे. त्यांनी मात्र कुणालाच पराभूत केलेलं नाही. ते एकमेकांना जिंकीत असतात. नेपोलियनने ख्याती मिळवली ती अशा जर्मनांविरुद्ध लढून.'

प्रिन्सच्या मते बोनापार्टने सर्व लढायांत आणि राजकारणातही घोडचुका केल्या होत्या, त्यांची तो सविस्तर चर्चा करू लागला. त्याचा मुलगा विरोध न करता सर्व काही मुकाट्याने ऐकून घेत होता. वृद्ध प्रिन्सने कसलीही मते मांडली तरी त्यावर तो आपले म्हणणे मांडत नव्हता, अगर आपले मत सोडण्याचीही त्याची तयारी नव्हती. आन्द्रे उत्तर देण्याचे टाळत

होता. कित्येक वर्षे एकाकी काढलेल्या आणि तीही खेड्यात घालवलेल्या ह्या वृद्ध माणसाला युरोपातील गेल्या काही वर्षांतील लष्करी आणि राजकीय जीवनाची खडानूखडा माहिती आणि तीही अचूक माहिती कशी झाली आणि त्याला आपले मत कसे बनवता आले हे प्रिन्स आन्द्रेला कळेना.

'तुला वाटत असेल, हा वृद्ध आहे आणि वस्तुस्थिती काय आहे हे ठाऊक असणं शक्य नाही. खरं सांगू ? ह्या गोष्टींनी मी पछाडून गेलो आहे. रात्रीची मला झोप येत नाही. मला सांग– ह्या तुझ्या श्रेष्ठ जनरलनं आपली श्रेष्ठता कुठं केव्हा सिद्ध केली ?'

'ती एक फार मोठी हकीकत होईल,' प्रिन्स आन्द्रे उत्तरला.

दुसऱ्या दिवशी रात्री प्रिन्स आन्द्रे निघण्याच्या तयारीला लागला. भोजन झाल्यावर वृद्ध प्रिन्सने आपला दैनंदिन कार्यक्रम न बदलता नित्याप्रमाणे आपल्या खोलीत प्रवेश केला. छोटी प्रिन्सेस आणि तिची भावजय एकत्र होत्या. प्रिन्स आन्द्रेने पोषाख बदलून आणि खांद्यावरच्या शोभेच्या फिती नसलेला प्रवासी कोट अंगावर चढवून दिलेल्या खोलीत हुजऱ्याच्या मदतीने सामानाची बांधाबांध केली. घोडागाडी जोडायला सांगितली. प्रिन्स आन्द्रे स्वतःबरोबर नेहमी ज्या वस्तू नेत होता त्या सोडल्या तर खोलीत आणखी काहीही राहिले नाही. प्रवासी बॅग, मद्यासाठी बनवलेली चांदीची पेटी, दोन टर्किश पिस्तुले, वडिलांनी भेट म्हणून दिलेली आणि ओटचेकॉफच्या नेतृत्वाखालील मोहिमेवर नेऊन आणलेली वाकदार तलवार ह्या वस्तू खोलीतच राहिल्या होत्या. आन्द्रेच्या प्रवासातील सामान नवीन, स्वच्छ होते. सर्व सामान कापडात बांधून वर चांगला दोरही बांधला होता. सगळे कसे सुव्यवस्थित होते. समोर पाहत, स्वप्नाळूपणे मान हालवीत, हात पाठीशी गुंतवून तो खोलीतल्या खोलीत जोराच्या येरझारा घालू लागला. बाहेरच्या खोलीतून पावलांचा आवाज ऐकू येताच त्याने घाईघाईने पाठीमागचे हात सोडवून घेतले. त्याच्या मुद्रेवर नित्याचा शांत व गूढ भाव पसरला. मधा वाजलेली पावले प्रिन्सेस मार्याची होती.

ती धावत आली होती. त्यामुळे धापा टाकीत बोलू लागली, 'तू घोडे जोडायला सांगितल्याचं कळलं. तुझ्या एकट्याबरोबर मला आणखी थोडं बोलायचं होतं. आता आपण किती काळ दूर असू देवाला ठाऊक. मी आले म्हणून तुला राग नाही ना आला ? आन्द्रुशा, तू...तुझ्यात खूपच बदल झालाय.' शेवटचे वाक्य जणू प्रश्नाचे स्पष्टीकरण करण्यासाठी होते.

स्मितानेच तिच्या प्रश्नाचे उत्तर देत त्याने विचारले, 'लिझ आली नाही ती ?'

'ती इतकी दमली होती की माझ्या खोलीतील सोफ्यावर झोपली. आन्द्रे, तुला सोन्यासारखी बायको मिळाली आहे.' त्याच्याकडे तोंड करून सोफ्यावर बसलेल्या प्रिन्सेस मार्याने म्हटले. 'तिच्यात आणि अगदी लहान मुलात काही कमी नाही. आनंदी, गोड मूलच. मला इतकी

आवडली.' प्रिन्स आन्द्रे काही बोलला नाही. पण त्याच्या मुद्रेवर उमटलेला उपरोध आणि तुच्छता प्रिन्सेसच्या नजरेतून निसटली होती.

'माणसात काहीना काही लहानसहान दोष असणारच. संपूर्ण निर्दोषी कुणीच नसतं. ती उच्चवर्गात लहानाची मोठी झाली आणि उच्चवर्गातच तिचं शिक्षण झालं, हे तू विसरू नकोस. तिची स्थिती काही सुखाची म्हणता येणार नाही. प्रत्येकानं दुसऱ्याच्या दृष्टिकोणातून विचार करायला हवा. समजून घेण्यातूनच क्षमेची भावना उपजते. आजवरचं तिचं जीवन वेगळं होतं. आता नवऱ्याला सोडून खेड्यात एकटं राहावं लागणार आहे—गरोदर असताना एकटं राहावं लागणार आहे. बिचारीची अवस्था काय झाली असेल याची कल्पनाही करवत नाही.'

वहिणीकडे पाहून प्रिन्स आन्द्रे हसला. जणू त्याला म्हणायचे होते 'बाई ग, अशानं मी फसायचा नाही.'

'तू खेड्यात राहतेस. तुला खेड्यातील जीवन इतकं भयंकर वाटतं का?'

'माझी गोष्ट सोड. मला मधेच गुंतवू नकोस. दुसऱ्या प्रकारच्या जीवनाची मला इच्छाच नाही. दुसऱ्या प्रकारचं जीवनच मला माहीत नसल्यानं मी तशी इच्छा तरी कशी करू शकणार? उच्चभ्रू समाजाची सवय असलेल्या तरुण मुलीला काय वाटेल याचा तू विचार तरी करून पाहा. तिला इथं खेड्यात ऐन तारुण्यात कोंडून पडावं लागेल. वडील नेहमीच कार्यमग्न असणार. उच्च समाजात वावरलेल्या स्त्रीला सोबत करील असा माझा आनंदी स्वभावही नाही, हे तुला ठाऊक आहे. राहता राहिली बूरिअनबाई...'

'तुझी ती बाई मला मुळीच आवडत नाही' प्रिन्स आन्द्रे म्हणाला.

'नाहीरे बाबा, ती फार सालस गोड मुलगी आहे. खरं तर तुला तिच्याबद्दल दया वाटली पाहिजे. तिला बिचारीला कोणी नातलग नाहीत. खरं म्हणजे तिचा मला उपयोग नाही; उलट त्रासच होतो. मला एकाकी जीवन आवडते, तुला ठाऊक आहे. आताशा तसं जीवन अधिकाधिक आवडू लागलं आहे. बाबांना ती खूप प्रिय आहे. तिच्यावर आणि मिहाइल इव्हानॉविचवर त्यांनी सतत उपकार केलेले आहेत म्हणून ते त्यांच्याशी नेहमी प्रेमानं आणि लोभानं वागत असतात. स्टर्ननं म्हटलं आहे, "लोकांनी आपलं भलं केलेलं असतं म्हणून आपण त्यांच्यावर जेवढं प्रेम करतो, त्याहून त्यांच्यावर अधिक प्रेम आपण त्यांचं भलं केलेलं असतं म्हणून आपण करीत असतो." बाबांनी रस्त्यावरून तिला अनाथ अर्भक अशा अवस्थेत घरी आणलं. ती बाई सुस्वभावी आहे. तिच्या वाचनाची तऱ्हाही बाबांना आवडते. रात्री वडिलांसाठी ती मोठ्यानं वाचन करते; ती फार चांगलं वाचन करते.'

'मार्या, आता मला खरंखुरं उत्तर दे. बाबांच्या स्वभावामुळं तुला पुष्कळदा फार त्रास होतो...अशी माझी कल्पना आहे. खरं ना हे?' प्रिन्स आन्द्रेने एकाएकी प्रश्न केला. त्या प्रश्नामुळे प्रिन्सेस मार्या प्रथम चकित झाली. नंतर भयभीत झाली.

'मला...मला...त्रास होतो म्हणालास?' ती म्हणाली.

' बाबा नेहमीच कडक वागत होते. मला वाटते आताशा ते फार वैताग आणतात. ' प्रिन्स आन्द्रे मुद्दामच वडिलांविषयी अनादराने बोलला. बहिणीला गोंधळात टाकावे अगर तिच्या मनातील खरी गोष्ट काढून घ्यावी हा त्याचा निश्चित हेतू होता.

' एरवी तू फार चांगला आहेस, आन्द्रे. पण तुला आपल्या बुद्धिमत्तेचा काहीसा गर्व झाला आहे. ' संभाषणातील मुख्य विषय बाजूला राहिला आणि प्रिन्स मार्या आपल्या विचारात गर्क होत बोलत होती. ' असा गर्व होणं हे मोठं पाप आहे. आपल्या वडिलांच्या वागण्यावर बरावाईट निर्णय देण्याचा आपणास हक्क नाही. तसं करणं योग्य असेल तर बाबांबद्दल अत्यादराशिवाय दुसरी कोणती भावना निर्माण होणार आहे? त्यांच्या सहवासात मी सुखी आणि समाधानी आहे. तुलासुद्धा तसंच सुख वाटावं एवढीच माझी इच्छा आहे. '

तिच्या भावाने अविश्वासाने मान हलवली.

' तुला खरं सांगू? मला एकाच गोष्टीचं दुःख होतं. बाबांच्या धार्मिक विचारांनी मला दुःख होतं. त्यांच्यासारख्या ( गाढ बुद्धिमान असलेल्या ) माणसाला सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट असलेली गोष्ट का दिसू नये आणि ते अशा प्रकारे का चुकावेत याचा मला बोध होत नाही. ह्या गोष्टीमुळे मात्र मी दुःखीकष्टी असते. पण ह्या गोष्टीत आताशा थोडी सुधारणा झालेली दिसते आहे. आताशा ते पूर्वीसारखी कठोर टवाळी करीत नाहीत. एका भिक्षूची भेट घेऊन त्याच्याशी ते खूप वेळ बोलत होते. '

' मार्या बेटा, तू आणि तुझा भिक्षू ह्या नेमबाजीत फुकट वेळ दवडता आहात. ' प्रिन्स आन्द्रे उपरोधाने पण प्रेमळपणे म्हणाला.

' परमेश्वर माझी प्रार्थना ऐकेल अशी माझी श्रद्धा आहे.' ती म्हणाली. काही मिनिटे स्तब्धतेत गेल्यावर ती भीत भीत भावाला म्हणाली, ' आन्द्रे, माझी एक विनंती आहे. ऐकशील का सांग?'

' काय करू सांग? '

' तू तिचा अव्हेर करणार नाहीस असं आधी वचन दे. त्यात तुला काही त्रास नाही; तुला त्यात कमीपणाही नाही. मात्र त्यामुळे मला आनंद वाटेल, समाधान वाटेल. आन्द्रुशा, वचन दे. हो म्हण. ' बोलत असताना तिने पिशवीत घातलेल्या हातात कसली तरी वस्तू धरली होती. त्या वस्तूसाठीच जणू ती विनंती करत होती. विनंती मान्य करण्याचे वचन मिळाल्याशिवाय ती वस्तू तिला बाहेर काढायची नव्हती. तिचे डोळे आन्द्रेकडे भीत भीत आणि अजीजीने पाहात होते.

' ती विनंती संकटात पाडणारी असली तरी...' आन्द्रे म्हणाला. ती वस्तू कोणती असावी याची त्याला कल्पना आली असावी.

' तू त्या वस्तूबद्दल वाटेल ते म्हण. मला माहीत आहे तू बाबांपेक्षा वेगळा नाहीस. तुला काही वाटलं तरी माझ्यासाठी एवढं कर. नाही म्हणू नको. आपल्या आजोबांनी नेहमीच प्रत्येक युद्धात वापरलेली ही...' अजूनही तिने हातात धरलेली वस्तू पिशवीच्या बाहेर काढली नव्हती.

' मला वचन देतोस ना? ' तिने विचारले.

' दिलं वचन. आता सांग. काय आहे ते? '

' तुझ्या कल्याणासाठी ही पवित्र प्रतिमा तुला देते आहे. ही साखळी गळ्यातून कधी काढणार नाही असं वचन दे.'

' ती टनभर वजनाची नसेल आणि मला खाली पाडणार नसेल तर...तुझ्या आनंदासाठी गळ्यात धारण करीन ' प्रिन्स आन्द्रे म्हणाला. त्याच क्षणी त्याला आपल्या चेष्टेमुळे बहीण दुःखीकष्टी झालेली दिसली आणि त्याला पश्चात्ताप झाला. तो म्हणाला, ' मला खूप आनंद झालाय—खूप आनंद झालाय.'

' तुझी इच्छा नसली तरीही तो तुझं रक्षण करील, तुझ्यावर कृपा करील, आणि तुला आपल्याकडे वळवील. कारण फक्त त्याच्यामध्येच सत्य आणि शांती यांची वस्ती आहे.' थरथरणाऱ्या भावपूर्ण स्वरात ती बोलत होती. नाजूक नक्षीकाम केलेल्या चांदीच्या बारीक साखळीला अडकवलेले चांदीचे अंडाकृती पदक आपल्या भावासमोर दोन्ही हातांनी धरले. त्या जुन्या पद्धतीच्या छोट्याशा पदकावर ख्रिस्ताचा चेहरा काळ्या रंगात कोरलेला होता.

तिने क्रूसाची खूण जुळवली. प्रतिमेचे चुंबन घेतले आणि साखळी भावाकडे दिली.

' आन्द्रे, माझ्यावर एवढी कृपा कर.'

तिच्या भयभीत टपोऱ्या डोळ्यांतून करुणेची पहाट उजाडली. तिचा कृश, रोगट चेहरा लावण्यमय झाला. ती पवित्र मूर्ती आन्द्रे घेणार तोच तिने त्याला थांबवले. आन्द्रेला आपली चूक उमगली. त्याने क्रूसाची खूण जुळवली आणि प्रतिमेचे चुंबन घेतले. तो हेलावून गेल्याने त्याची मुद्रा हळुवार आणि मिस्किल झाली.

' तुझ्यावर देवाची कृपा राहो ' तिने त्याच्या भालप्रदेशाचे चुंबन घेतले. आणि ती पुन्हा सोफ्यावर बसली. दोघेही स्तब्ध होती.

' आन्द्रे, तू पूर्वी किती उदार आणि दयाळू असायचास. तिच्याशी देखील तू तसाच वागायला पाहिजे. तिच्याबद्दल प्रतिकूल मत बनवू नकोस. ती इतकी गोड आहे, इतकी सुस्वभावी आहे. आणि आताशा तर तिची परिस्थिती किती बिकट आहे.'

' माशा, मला वाटते मी माझ्या पत्नीला दोष दिला नाही. अगर मला ती आवडत नाही असंही बोललो नाही. तू एवढं सारं कशासाठी सांगते आहेस?'

प्रिन्सेस मार्याच्या चेहऱ्यावर लाली उमटली. अपराधी चेहरा करून ती स्तब्ध राहिली. ' मी तुला काही बोलले नाही; पण तुला बोल लावला जातो त्याचं मला दुःख होतं.'

प्रिन्सेस मार्याच्या कपाळावरील, गळ्यावरील आणि गालावरील लाली आणखी गडद झाली. तिला काही बोलायचे होते, पण तोंडातून शब्दच उमटेना. तिच्या भावाने बरोबर ओळखले होते. त्याची पत्नी भोजनानंतर रडली होती. आपले बाळंतपण सुखरूप पार पडणार नाही अशी भीती तिने प्रकट केली होती. आपल्या दुर्दैवाला ती दोष देत होती. सासरा आणि नवरा यांच्याबद्दल तिने तक्रार केली होती. रडून रडून ती झोपी गेली होती. प्रिन्स आन्द्रेला आपल्या वहिणीची दया आली.

' माशा, एक गोष्ट खरी. मला माझ्या बायकोला कोणत्याही गोष्टीबद्दल दोष देता येत

नाही. मी कधी दिला नाही आणि पुढेही देणार नाही. तिच्या बाबतीतील कोणत्याही गोष्टीसाठी मी मलाही दोष देणार नाही. माझ्या कोणत्याही परिस्थितीत माझी हीच-भूमिका राहील. तुला सत्य जाणून घ्यायचं असेल तर सांगतो... 'तू सुखी आहेस का' असा तुझा मला प्रश्न असेल तर त्याचं उत्तर 'नाही'... 'ती सुखी आहे का?' 'नाही.' असं का? मला सांगता येणार नाही.'

असं बोलून त्याने बहिणीजवळ जाऊन तिच्या कपाळाचे चुंबन घेतले. त्याच्या सुरेख डोळ्यांत बुद्धिमत्तेचे आणि चांगुलपणाचे आगळेच तेज विलसू लागले. तो आपल्या बहिणीकडे पाहात नव्हता. तिच्या डोक्यावरून पलीकडे दिसणाऱ्या उघड्या दारातील अंधार पाहत होता.

'चल; आपण तिच्याकडे जाऊ या. मला तिचा निरोप घ्यायचा आहे. नाहीतर असं कर. तू जाऊन तिला उठव. तेवढ्यात मी आलोच.' मग प्रिन्स आन्द्रेने आपल्या हुजऱ्याला हाक मारली, 'पेट्रुश्का, ह्या वस्तू घेऊन जा. ही सीटखाली ठेव. ही उजव्या बाजूस राहू दे.'

प्रिन्सेस मार्या उठली. दाराकडे जाता जाता थांबून म्हणाली, 'आन्द्रे, तुझी परमेश्वरावर निष्ठा असती तर तू त्याच्याकडे तुझ्यात अभावानं असलेली प्रीतिभावना मागितली असतीस आणि परमेश्वरानं तुझी प्रार्थना ऐकली असती.'

'कदाचित ऐकलीही असती.' प्रिन्स आन्द्रे म्हणाला, 'माशा, तू जा. मी आलोच.'

तो बहिणीच्या खोलीकडे निघाला. तेव्हा त्याला आढळले की, छोटी प्रिन्सेस जागी झाली होती. तिने नाजूक आनंदी आवाजात भरभर उच्चारलेले शब्द उघड्या दारातून ऐकू येत होते. जणू बराच काळ बोलायला मिळाले नसल्यामुळे आता ती त्याची भरपाई करत होती आणि नेहमीप्रमाणे फ्रेंच भाषेत बोलत होती.

'मार्या कल्पना कर...ती काउंटेस झुबॉफ् कशी खोटे केस आणि नकली दात लावून वावरते...असं करून तिला वय का थांबवता येणार आहे?'

परक्या माणसांसमोर आपली बायको काउंटेस झुबॉफबद्दल ही वाक्ये उच्चारून हसल्याचे प्रिन्स आन्द्रेने कमीत कमी पाच वेळा तरी ऐकलेले होते. तो सावकाश खोलीत शिरला. आपले भरतकाम हातात घेऊन खुर्चीत बसलेली गुलाबी कांतीची स्थूलदेही छोटी प्रिन्सेस पीटर्सबर्गमधील आठवणी आणि शब्दप्रयोग ऐकवीत होती. प्रिन्स आन्द्रेने तिच्याकडे जाऊन तिला थोपटून विचारले, 'प्रवासाचा शीण गेला की नाही?' त्याला उत्तर देऊन ती बोलत राहिली.

सहा घोड्यांची गाडी पायरीशी थांबली. शरदऋतूतील गडद रात्र होती. गाडीवानाला गाडीची धुरा दिसत नव्हती. कंदील घेऊन नोकर पायऱ्यावरून ये-जा करीत होते. मोठमोठ्या खिडक्यांत प्रकाश असल्याने सर्व वाडाच उजळून निघाला होता. धाकट्या धन्याला निरोप देण्यासाठी घरातील नोकरमाणसे बाहेरच्या दालनात जमत होती. आतल्या मोठ्या दालनात कुटुंबातील माणसे मिहाइल इव्हानॉविच, बूरिअनबाई, प्रिन्सेस मार्या आणि छोटी प्रिन्सेस ही उभी होती.

प्रिन्स आन्द्रेला वडिलांनी अभ्यासिकेत बोलावून घेतले. त्यांना त्याचा एकट्यानेच निरोप घ्यायचा होता. तो बाहेर केव्हा येतो याची सर्व वाट पाहत होते. प्रिन्स आन्द्रे खोलीत शिरला तेव्हा वृद्ध प्रिन्सने जुना चष्मा लावला होता, शुभ्र गाऊन चढवला होता. अशा स्थितीत वृद्ध प्रिन्स मुलाखेरीज कुणालाही भेटत नसे. आन्द्रे आला तेव्हा तो टेबलाशी बसून लिहीत होता. त्याने वळून पाहिले.

' निघालास ? ' पुन्हा तो लिहू लागला.

' मी निरोप घ्यायला आलो आहे. '

' वृद्ध प्रिन्सने आपल्या गालाला स्पर्श करीत म्हटले—' इथं चुंबन घे. ' प्रिन्स आन्द्रेने चुंबन घेतल्यावर त्याने त्याचे आभार मानले.

' आभार कशासाठी ? '

' ठरलेल्या वेळेपेक्षा जास्त काळ रेंगाळत राहिला नाहीस म्हणून. बायकोच्या पेटिकोटामागे वेळ काढत राहिला नाहीस म्हणून. सर्व गोष्टीआधी कर्तव्य पार पाडलं पाहिजे. थँक्स् '. पुन्हा तो लिहू लागला, तशी लेखणीतून शाई बाहेर उडू लागली.

' तुला काही सांगायचं असेल तर सांग. मला एकावेळी अनेक गोष्टी करता येतात, ' तो म्हणाला.

' माझ्या पत्नीबद्दल...तिची काळजी घ्या असं तुम्हाला सांगायला संकोच वाटतो. '

' मूर्खासारखं बोलू नकोस. तुला काय हवं ते सरळ सांग. '

' तिच्या बाळंतपणासाठी मॉस्कोहून वैद्याला बोलवा.. तो इथे येऊ दे. '

म्हातारा थांबला. डोळे विस्फारून रागाने बघू लागला. जणू मुलाचे बोलणे त्याच्या डोक्यात शिरत नसावे.

' निसर्गानंच मदत नाकारली तर कुणाच्याही मदतीचा उपयोग होत नाही, याची मला जाणीव आहे. ' प्रिन्स आन्द्रे म्हणाला. तो गोंधळल्याचे स्पष्ट दिसत होते. ' लाखोंमधील एखादीच केस अपेशी होते हे मला ठाऊक आहे. पण तिच्या मनाने घेतलं आहे त्याला माझा इलाज नाही. तिला लोक नाना गोष्टी सांगत असतात. स्वप्न पडल्यानं ती घाबरून गेली आहे. '

' हं–हं ' लिहीत असताना वृद्ध प्रिन्स स्वतःशीच काहीतरी पुटपुटत होता. ' असं करायला हवं ' त्याने आपली सही खरडली. मग एकदम मुलाकडे वळून तो हसला.

' एकंदरीत ही कटकटीची बाब. '

' कशाबद्दल म्हणता ही कटकटीची बाब ? '

' बायको ! ' वृद्ध प्रिन्स एकच पण अर्थपूर्ण शब्द बोलला.

' माझ्या ध्यानात आलं नाही तुम्ही काय म्हणता ते ? '

' त्याला काही इलाज नाही, बाळ. सगळ्या स्त्रिया सारख्याच. एकदा लग्न केलं की त्यातून सुटका नाही. तुला याची जाणीव आहे. घाबरू नको. मी यातले एक अवाक्षरही कुणाला सांगत नाही. ' वृद्ध प्रिन्स म्हणाला.

मग त्याने आपल्या कृश, लहान आणि सडपातळ बोटांनी मुलाचा हात धरून हलवला. कुणाच्याही अंतःकरणाचा वेध घेते आहे अशी वाटणारी भेदक नजर त्याच्या नजरेला भिडवली आणि पुन्हा कोरडे हास्य केले.

मुलाने उसासा टाकून वडिलांनी आपणांस समजून घेतल्याचे मान्य केले. त्याचे वडील नेहमीच्या जलदीने पत्राची घडी घालण्यात आणि त्यावर सील उठवण्यात गर्क होते. मेण, सील आणि कागद उचलून ठेवले जात होते.

' काही उपाय नाही. ती सुंदर आहे. मी सारं काही ठीक करीन. तू काळजी करू नकोस. ' पत्र सील करताना थांबत थांबत वृद्ध प्रिन्स म्हणाला.

आन्द्रे स्तब्ध होता. वडिलांना आपल्या भावना कळल्यामुळे त्याला आनंद झाला होता आणि दुःखही. वडिलांनी उठून त्याला पत्र दिले.

हे बघ. तुझ्या बायकोची चिंता करू नकोस. शक्य त्या सगळ्या गोष्टी केल्या जातील. हे पत्र आठवणीनं मिहाइल इल्यारिऑनॉविचला दे. तुला फार काळ ॲड्ज्युटंट न ठेवता एखादं चांगलं काम देण्याबद्दल मी त्याला लिहिलं आहे. ॲड्ज्युटंटचं काम अगदी वाईट. मी त्याची प्रेमानं आठवण केल्याचं त्याला सांग. तो तुला कशी वागणूक देतो ते कळव. चांगल्या तऱ्हेनं वागला तर त्याची नोकरी कर. निकोलाय अँड्रीच वोलकॉन्स्कीच्या मुलानं कोणाच्या उपकाराखाली नोकरी करण्याची गरज नाही. '

तो इतक्या घाईने बोलत होता की अर्धे वाक्य पुरेच होत नव्हते. पण त्याच्या मुलाला त्याला काय म्हणायचे होते ते सवयीने कळत होते. त्याने मुलाला मोठ्या पेटीजवळ नेले. ती उघडून आतून एक ड्रॉवर बाहेर ओढला. त्यातून एक वही बाहेर काढली. त्याने त्यात मोठ्या टपोऱ्या अक्षरांत दाटीवाटीने लिहिले होते.

' तुझ्याआधी मला निश्चित मृत्यू येईल. ही टाचणं मी गेल्यावर सम्राटांना द्यायची. हे पैसे आणि पत्र. सुव्हॉरॉफ्च्या लढाईचा इतिहास लिहिणाऱ्याला बक्षीस म्हणून हे पैसे आहेत. अकादमीला पैसे पाठवून दे. इथं मी माझे विचार लिहिले आहेत. मी गेल्यावर वाच. तुला उपयोग होईल. '

' तुम्ही आणखी खूप वर्षं जगण्याचा संभव आहे.' असे आन्द्रेने वडिलांना म्हटले नाही. तसे म्हणण्याची गरज नाही असे त्याला वाटले.

' बाबा, मी तुम्ही सांगितल्याप्रमाणं सारं काही करीन. ' तो म्हणाला.

' ठीक आहे. आता निरोप घेऊ. ' त्याने चुंबनासाठी हात समोर धरला आणि मुलाला मिठीत घेतले. ' आन्द्रे, जर का तू लढाईत कामी आलास तर मला ह्या वार्धक्यात अत्यंत 'दुःख होईल...' तो थांबला आणि एकदम कर्कश आवाजात बोलू लागला. ' तू निकोलाय वोलकॉन्स्कीच्या मुलाला शोभणारं वर्तन केलं नाहीस असं माझ्या कानांवर आलं तर...तर मला शरम वाटेल. '

' बाबा, तुम्ही असे उद्‌गार माझ्याकडे काढायला नको होते.' स्मित करीत आन्द्रे म्हणाला.

वृद्ध प्रिन्स स्तब्ध होता.

प्रिन्स आन्द्रे बोलू लागला, ' तुम्हाला एक विनंती करायची आहे. मी युद्धात मारला गेलो तर आणि मला मुलगा झालेला असला तर त्याचा तुम्ही सांभाळ करा, दुसऱ्याच्या हाती सोपवू नका. '

' म्हणजे मुलाला तुझ्या बायकोच्या स्वाधीन करू नको, असंच ना ? ' असे विचारून वृद्ध प्रिन्स हसला.

ते एकमेकाकडे पाहत उभे राहिले. वृद्धाचे भेदक डोळे मुलाच्या डोळ्यांना भिडले होते. त्याच्या चेहऱ्याचा खालचा भाग थरथरला.

' आपण निरोप घेतलाच आहे. ये आता. ' तो एकदम बोलला. अभ्यासिकेचा दरवाजा उघडून तो रागाने आणि मोठ्याने ओरडला, ' नीघ आता. '

' काय झालं ? काय झालं ? ' प्रिन्स आन्द्रेला पाहून दोन्ही प्रिन्सेसनी चौकशी केली. वृद्ध प्रिन्सची पांढरा गाऊन घातलेली, केसाचा टोप नसलेली आणि चष्मा लावलेली मूर्ती त्यांनी ओझरती पाहिली होती आणि रागाने ओरडल्याचे ऐकले होते.

प्रिन्स आन्द्रे उसासा टाकून स्तब्ध राहिला.

मग तो आपल्या बायकोकडे वळून म्हणाला, ' मग निघू ? ' ते शब्द तुच्छतापूर्वक हास्या-सारखे वाटले. जणू त्याला म्हणायचे होते, ' तुझा छोटासा नाट्यप्रवेश आटपून घे. '

' आन्द्रे, आन्द्रे, ' असे बोलताना छोटी प्रिन्सेस पांढरीफटक पडली आणि हताश मुद्रेने नवऱ्याकडे पाहू लागली. त्याने तिला बाहुपाशात घेतले तशी ती ओरडून त्याच्या खांद्यावर रेलली आणि तिथेच तिची शुद्ध हरपली.

ती ज्या खांद्यावर पडली होती तो खांदा त्याने हलकेच दूर केला, तिचा चेहरा न्याहाळला आणि मोठ्या काळजीपूर्वक तिला आरामखुर्चीत बसवले.

' माशा, येतो ग मी, ' सौम्यपणे तो बहिणीला बोलला. त्या बहिणभावंडांनी एकमेकांच्या हाताचे चुंबन घेतले. मग तो भरभर खोलीच्या बाहेर पडला.

छोटी प्रिन्सेस आरामखुर्चीत पडली होती. बूरिअनबाई तिचे कपाळ दाबीत होती. प्रिन्सेस मार्याने भावजयीस सावरून धरले होते. अजूनही ती डबडबलेल्या डोळयांनी प्रिन्स आन्द्रे गेला त्या दाराकडे टक लावून पाहत राहिली आणि मग तिने त्या दिशेने क्रूसाची खूण जुळ-वली. अभ्यासिकेत वृद्ध प्रिन्स जोरजोराने संतापल्यासारखा नाक शिंकरत होता. त्याचा आवाज पिस्तुलातून गोळ्या सुटल्यासारखा वाटत होता. प्रिन्स आन्द्रे निघून जाताच अभ्यासिकेचा दरवाजा धाडकन उघडला गेला आणि वृद्ध प्रिन्सची पांढऱ्या गाऊनमधील करडी मूर्ती बाहेर डोकावून, शुद्ध हरपलेल्या प्रिन्सकडे जळजळीत दृष्टी टाकून म्हणाली. ' गेला ना एकदाचा ? चांगलं झालं. '

वृद्ध प्रिन्सने धिक्कारपूर्वक मान हलवीत धाड्दिशी दार लावून घेतले.

✣

# भाग दुसरा

## १८०५

१८०५ च्या ऑक्टोबरमध्ये रशियन सैन्य ऑस्ट्रियाच्या साम्राज्यातील शहरे आणि गावे व्यापू लागले. रशियातून सारखे सैन्य येत राहिले आणि ब्रॉनॉ ह्या लष्करी ठाण्याच्या भोवती तळ ठोकू लागले. तिथल्या रहिवाश्यांवर शिपायांच्या राहण्याजेवणाची सोय करण्याची जबाबदरी पडली. कमांडर-इन-चीफ् कुटूझॉफचे प्रमुख हेडक्वॉर्टर ब्रॉनॉ हेच होते.

११ ऑक्टोबर १८०५ रोजी पायदळाची एक तुकडी ब्रॉनॉ शहराबाहेर अर्ध्या मैलावर कमांडर-इन-चीफ्च्या तपासणीची वाट पाहत थांबली होती. पंचवीस मैल कूच करूनही सैनिक झोपी गेले नाहीत. त्यांनी सबंध रात्र आपले पोषाख, हत्यारे टाकठीक व स्वच्छ करण्यात घालविली. आदल्या दिवशी संध्याकाळी शेवटचा टप्पा गाठण्यासाठी रखडत बेशिस्तीने चाललेली ती माणसे आता दोन हजार माणसांचा सुसंघटित आणि प्रेक्षणीय असा गट दिसत होती. प्रत्येकाला आपली जबाबदारी कळत होती. प्रत्येकाची बटणे आणि पट्टे व्यवस्थित होते आणि चकाकत होते. फक्त एकाच बाबीबद्दल प्रत्येकजण अस्वस्थ होता, ती बाब म्हणजे सैनिकांचे बूट. निम्म्याहून अधिक सैनिकांच्या बुटांच्या तळव्यांना छिद्रे पडली होती. कमांडिंग ऑफिसरच्या दोषांमुळे ही उणीव राहिली होती असे मात्र नव्हे. त्याने पुन्हा पुन्हा मागणी करूनही ऑस्ट्रियन सरकारने बूट पुरविले नव्हते. आणि त्याच्या तुकडीने जवळ जवळ हजार मैल कूच केले होते.

रेजिमेंटचा कमांडर वृद्धत्वाकडे झुकलेला होता. तो आशावादी वाटत होता. त्याच्या मिश्या आणि भुवया सफेद झाल्या होत्या. त्याची प्रकृती धडधाकट होती. छातीपेक्षा त्याची कूसच अधिक रुंद भरीव होती. त्याने कोराकरकीत गणवेष चढवलेला होता, दुमडून ठेवलेल्या चुण्या

अजूनही दिसत होत्या. त्याच्या खांद्यावरील सन्मानदर्शक सोनेरी जाड फिती खाली पडून असण्याऐवजी ताठ उभ्या होत्या. जीवनातले एखादे पवित्र कर्तव्य पार पाडल्यागत जनरल वागत होता. सैन्यासमोरून जाताना तो प्रत्येक पावलाला पाठीला थोडा हिसका देऊन थरथरत चालत होता. आपल्या रेजिमेंटचे त्याला कौतुक होते. तो तीवर खूष होता यात शंका नव्हती.

'हे बघा, मिहाइल मित्रिच,' तो मेजरला म्हणाला. मेजर स्मित करीत समोर आला. दोघांच्याही मनोवृत्ती प्रसन्न होत्या.

'रात्रभर आपण कामात होतो. तरीही मला वाटतं सारं ठीक आहे. लोक समजतात तितकी रेजिमेंट वाईट नाही.'

त्याचा मिस्किल शेरा उमगून मेजर हसला.

'झारसाहेबांच्या तपासणीत देखील त्यांना डिच्चू मिळणार नाही.' कमांडरने उत्तरादाखल मान डोलावली.

तेवढ्यात त्यांना इषारा देणारे पहारेकरी जेथे नेमले होते तेथून शहराकडील रस्त्यावरून येणारे दोन घोडेस्वार दिसले. त्यांपैकी एक जण ॲड्ज्युटंट होता आणि त्याच्यामागून येणारा कोसॅक होता.

कमांडरला अगोदर मिळालेला हुकूम स्पष्ट नव्हता. तो निश्चित स्वरूपात देण्यासाठी कमांडर-इन-चीफने ॲड्ज्युटंटला पाठवले होते. रेजिमेंटचे सैनिक ज्या अवस्थेत आले होते त्याच (म्हणजे ओव्हरकोट घातलेल्या, सामान घेतलेल्या आणि कसलीही पूर्वतयारी नसलेल्या अशा) अवस्थेत त्यांची पाहणी कमांडर-इन-चीफ् करणार आहेत असा हुकूम ॲड्ज्युटंटने सांगितला.

व्हिएन्नाहून आलेला अधिकारी कुटूझॉफला आदल्या दिवशी भेटला होता. त्यानेच आर्चड्युक फर्डिनंड आणि मॅक यांच्या सैन्याला मिळण्यासाठी कुटूझॉफच्या सैन्याने त्वरित निघावे अशी सूचना केली होती. कुटूझॉफला सैन्य एकत्र करण्याची कल्पना पसंत पडली नव्हती. आपले मत पटवण्याचा एक मार्ग म्हणून त्याने ऑस्ट्रियन जनरलला रशियातून आपले सैन्य कोणत्या दयनीय स्थितीत आले ते दाखवण्याचे ठरवले. ह्या उद्देशानेच त्याने रेजिमेंटची पाहणी करण्याचे ठरवले होते. रेजिमेंटची अवस्था जितकी दयनीय असेल तितका कमांडर-इन-चीफ् खूष होणार होता. ॲड्ज्युटंटला काही तपशील ठाऊक नव्हते. तरीही त्याने रेजिमेंटच्या जनरलला आदेश कळवला. 'सैनिक ओव्हरकोट घातलेले आणि कूच करण्याच्या स्थितीतील असलेच पाहिजेत यावर कमांडर-इन-चीफचा कटाक्ष आहे. तसे ते आढळले नाहीत तर कमांडर-इन-चीफला बिलकूल आवडणार नाही.'

निरोप ऐकताच जनरल हताश झाला. त्याने खांदे उडवले आणि रागाने हात उडविले. मग काहीतरी ठरवून तो पुढे झाला. हुकुमाला सरावलेल्या आवाजात तो ओरडला, 'कंपनी कॅप्टन्स ! सार्जंट्स !' मग ज्याच्याविषयी बोलायचे होते त्याच्याबद्दलचा आदर व्यक्त करीत त्याने वळून ॲड्ज्युटंटला विचारले, 'हिज एक्सलन्सी ताबडतोब येणार आहेत काय ?'

'मला वाटतं तासाभरात येतील.'

'पोशाख बदलण्याएवढा वेळ मिळेल असं वाटतं?'

'मला सांगता येणार नाही.'

मग स्वतः जनरल सैन्यातून फिरू लागला. त्याने सैनिकांना पुन्हा ओव्हरकोट घालायला लावले. कंपन्या-कंपन्यांतून कॅप्टन फिरू लागले. सार्जंटांची धावपळ सुरू झाली (ओव्हरकोट चांगले नव्हते.) थोड्याच वेळात शिस्तबद्ध आणि शांत घोडेस्वार अस्ताव्यस्त पसरले आणि आपसात बोलू लागले. खांदे मागच्या बाजूस झुकवून वाकू लागले. आणि पिशव्या गळ्यातून बाहेर काढू लागले. त्यातून ओव्हरकोट बाहेर काढून त्यात आपले हात सारू लागले.

अर्ध्या तासानंतर पूर्वीप्रमाणे सुव्यवस्था आली. फक्त घोडेस्वारांच्या पथकांचा रंग आता काळा नव्हता, राखी झाला होता. आपल्या कापऱ्या चालीने जनरल रेजिमेंटसमोरून चालू लागला. आणि थोड्या अंतरावरून तिची पाहणी करू लागला. मध्येच थांबून तो ओरडला, 'हा काय प्रकार आहे? तुम्ही लवकरच सैनिकांना चड्डया चढवाल. काय चाललं आहे हे?' तिसऱ्या डिव्हिजनच्या रांगेत असलेल्या आणि इतरांहून निराळ्या रंगाचा ओव्हरकोट घातलेल्या सैनिकाकडे बोट करीत जनरल ओरडला, 'तुम्ही इतका वेळ कुठं होता? कमांडर-इन-चीफ यायचे आहेत. आणि तुम्ही आपल्या जागेवर नाही. तपासणीच्या वेळी आपल्या सैनिकांना झगे घालायला लावता त्याबद्दल तुम्हाला चांगलं बक्षीस दिलं पाहिजे.'

'तुम्ही बोलत का नाही? तो हंगेरियन माणसासारखा पोशाख केलेला प्राणी कोण?' जनरलने कडवट विनोद केला.

'महाराज, तो डोलोहॉव्ह आहे. शिक्षा होऊन खालच्या जागेवर आणलेला अधिकारी.'

'शिक्षा म्हणून त्याला फील्ड मार्शल नेमण्यात आलं की साधा सैनिक करण्यात आलं? तो सैनिक असला तर त्यानं इतरांसारखा गणवेश करायला पाहिजे.'

'महाराज, तुम्हीच त्याला कूच करताना परवानगी दिली होती.'

'मी परवानगी दिली होती? तुम्ही तरुण माणसं नेहमी अशीच वागता.' जनरलचा स्वर थोडा नरम झाला. 'मी परवानगी दिली? मी काही तुमच्याकडे बोललो की तुम्ही...' थांबून पुन्हा जनरल म्हणाला, 'मी तुमच्याकडे काही बोललो की तुम्ही...' पुन्हा जनरलची त्रस्तता वाढली.

डोलोहॉव्हजवळ जाऊन तो म्हणाला,

'तू निळा ओव्हरकोट का चढवला आहेस? काढून टाक. सार्जन्ट, याचा कोट बदला अगदी...'

त्याचे शब्द पुरे होण्यापूर्वीच डोलोहॉव्ह उद्‌गारला, 'जनरल, हुकूम पाळण्यासाठी मी इथे असलो तरी तुम्ही केलेला...'

'रांगेत असताना बोलू नकोस. एक शब्द बोलू नको.'

'तुम्ही केलेला अपमान सहन करणं माझ्यावर बंधनकारक नाही.' डोलोहॉव्हने स्पष्ट आणि खड्या आवाजात सुनावले. जनरलची नजर त्या सैनिकाच्या नजरेशी भिडली. जनरलने

थांबून आपल्या ताठर स्कार्फला रागारागाने हिसका दिला. जाताजाता तो म्हणाला, ' कृपा करून कोट बदल.'

' होशियाऽर येताहेत ' पहारेकऱ्याने त्या क्षणी आरोळी दिली. लालबुंद झालेला जनरल घोड्याकडे धावला. थरथरत्या हाताने रिकीब पकडून घोड्यावर स्वार झाला. खोगिरावर ठीक बसल्यावर त्याने तलवार बाहेर काढली आणि तो ओरडला, ' सायलेन्स ! '

घोडागाडीमागून जनरलचा परिवार आणि संरक्षक कोट सैनिक घोड्यावरून दौडत येत होते. कुटूझॉफच्या शेजारी बसलेला सफेद गणवेशातील ऑस्ट्रियन जनरल काळ्या गणवेशांच्या रशियन सैनिकांत वेगळा दिसत होता. रेजिमेंट जवळ आली तशी घोडागाडी थांबली. कुटूझॉफ व ऑस्ट्रियन जनरल गाडीतून उतरले.

हुकूम होताच वंदना देण्यासाठी उचललेल्या बंदुकीच्या खणखणाटाने पुन्हा एकदा रेजिमेंट थरथरली. त्या स्मशानशांततेत कमांडर-इन-चीफ्चा आवाज ऐकू येत होता. अवघ्या रेजिमेंटांनी उच्च स्वरात कमांडर-इन-चीफ्ला अभिवादन केले आणि पुन्हा स्तब्धता पसरली.

रेजिमेंटच्या हालचाली सुरू झाल्या. तेव्हा प्रारंभी कुटूझॉफ एका जागी उभा राहिला. मग तो रांगारांगांतून चालू लागला. त्याच्या जवळून जनरल चालत होता. त्याच्या मागून त्याचा परिवारही चालत होता.

रांगारांगांतून फेरफटका मारताना कुटूझॉफ मध्ये-मध्ये थांबत होता. तुर्कस्थानच्या लढाईत ज्याचा परिचय झाला होता त्या अधिकाऱ्यांशी कधी कधी इतर सैनिकांशीही आपुलकीने दोन-चार शब्द बोलत होता. सैनिकांच्या बुटाकडे पाहून कितीतरी वेळा निराशेने मान हलवून ऑस्ट्रियन जनरलचे लक्ष त्या गोष्टीकडे वळवताना सैनिकांचा यात काही दोष नाही पण ती दयनीय अवस्था नजरेआड करता येणे अशक्य आहे अशा अर्थाची मुद्रा तो करीत होता.

कमांडर-इन-चीफ्च्या मागून सर्वांत जवळून एक देखणा अड्ज्युटंट चालत होता. तो प्रिन्स वोलकॉन्स्की होता. त्याच्या सोबत त्याचा सहकारी नेस्विट्स्की होता. तो अंगाने फारच सुटलेला होता. त्याचा चेहरा सुस्वभावी, हसरा आणि देखणा होता. त्याच्या डोळ्यांत आपुलकी होती.

कुटूझॉफला पाहण्यासाठी हजारो डोळे खोबण्यातून गरगरत होते. त्यांच्या समोरून तो सावकाश आणि निर्जीवपणे चालत होता. तिसऱ्या कंपनीजवळ पोचताच तो एकदम थांबला. आता तिसऱ्या कंपनीनंतर पाहणी संपणार होती. कुटूझॉफचा चेहरा विचारमग्न झाला. तो काही-तरी आठवत असावा. प्रिन्स आन्द्रे जवळ आला आणि हळू आवाजात फ्रेंच भाषेत म्हणाला, ' या रेजिमेंटमध्ये असलेल्या शिक्षा झालेल्या डोलोहॉव्ह या सैनिकाची आठवण करून द्यायला तुम्ही मला सांगितलं होतं.'

' कुठं आहे डोलोहॉव्ह ? ' कुटूझॉफने विचारले.

खाजगी सैनिकाच्या राखी रंगाचा ओव्हरकोट घातलेल्या डोलोहॉव्हने बोलावण्याची वाट पाहिली नाही. सडसडीत बांध्याच्या, सुंदर केसांच्या आणि चमकदार निळ्या डोळ्यांच्या त्या सैनिकाने रांगेतून बाहेर पाऊल टाकले. कमांडर-इन-चीफ्समोर जाऊन त्याने सॅल्यूट केला.

'काही तक्रार आहे?' काहीशा रागाने कुटझॉफने विचारले.

'हा डोलोहॉव्ह समोर उभा आहे' प्रिन्स आन्द्रे उद्‌गारला.

'असं का? मला वाटतं यापासून पुरेसा बोध घेशील. आपलं काम ठीक तऱ्हेनं पार पाड. सम्राट दयाळू आहेत. तू पात्र ठरलास तर मीही तुला विसरणार नाही.' ते चमकदार निळे डोळे जनरलकडे ज्या उद्धटपणाने पाहत होते त्याच उद्धटपणाने कमांडर-इन-चीफ्कडे पाहू लागले. जणू ते कमांडर-इन-चीफ् आणि साधा सैनिक यामध्ये अंतर आहे असे मानणारा संकेतच जुमानीत नव्हते.

'महाराज, माझ्यावर एकच कृपा करा.' त्याने आपल्या संथ, सावध आणि निनादणाऱ्या आवाजात म्हटले. 'मला माझ्या अपराधाबद्दल प्रायश्चित्त घ्यायची संधी द्या. सम्राट आणि रशिया यांवरील माझी भक्ती सिद्ध करण्याची संधी द्या.'

कुटझॉफ वळला. कॅप्टन टिमॉहिन जवळून तो दूर सरकला. तेव्हाही अशीच हास्याची चमक त्याच्या डोळ्यांत उमटली होती. त्याच्या कपाळाला आठ्या पडल्या होत्या. त्याला सांगायचे होते-डोलोहॉव्हने जे सांगितले आणि जे सांगू शकला असता ते ते त्याने सारे केव्हाच ओळखले होते. त्या तशा निवेदनाचा अतिशय वीट आला होता आणि तशा निवेदनाची काहीही जरुरी नव्हती. तो तसाच वळून घोडागाडीकडे निघाला.

रेजिमेंटची छोट्या छोट्या कंपन्यांत विभागणी झाली आणि सैनिक ब्रॉनॉपासून जवळच असलेल्या निवासस्थानाकडे निघाले. तिथेच आपल्याला बूट आणि कपडे मिळतील आणि इतक्या खडतर चालीनंतर विश्रांती मिळेल अशी त्यांना आशा वाटत होती.

जनरलने तिसऱ्या कंपनीला मागे टाकले. आणि तिच्यासमोर चालणाऱ्या कॅप्टन टिमॉहिन-जवळ आपला घोडा नेऊन त्याला म्हटले, 'प्रॉहो इग्नॅटिक, तुला माझा राग नाही ना आला?' तपासणी यशस्वी झाल्यानं झालेला आनंद जनरलला लपवता आला नाही. झारच्या चाकरीत असं असतंच. त्याला इलाज नाही. एखादवेळी तपासणीच्या कामात थोडा कडवटपणा असतोच. मी प्रथम तुझी क्षमा मागतो...तू भावना ओळखतोस...त्याला खूप समाधान वाटले.' त्याने कॅप्टनसमोर आपला हात धरला.

'जनरल, मी मर्यादा ओलांडीत तर नाही?' कॅप्टन बोलला तेव्हा त्याच्या नाकाचा शेंडा आणखीन लाल झाला होता. तो हसला तेव्हा इस्माइल येथील लढाईत बंदुकीच्या संगिनीने पडलेल्या दोन दातांची निर्माण झालेली पोकळी दिसली.

'आणि डोलोहॉव्हला सांग, मी त्याला विसरणार नाही. त्याने आता निःशंक राहावे. तुला आणखीन एक विचारायचं होतं. आताशा त्याचं कसं चाललं आहे? त्याच्या वागण्यात कितपत सुधारणा झाली आहे?'

' महाराज, त्याला कामाच्या बाबतीत दोष देता येणार नाही इतका तो व्यवस्थित वागतो. पण तशी ती वल्लीच आहे. ' टिमॉहिन म्हणाला.

' कशावरून म्हणतोस तू ? ' जनरलने विचारले.

' महाराज, तो प्रत्येक दिवशी वेगळ्या तऱ्हेनं वागतो, कधी तो अगदी शहाण्या, शिकलेल्या सुसंस्कृत माणसाप्रमाणे असतो. मग एखाद्या दिवशी तो पिसाट जनावराप्रमाणे बनतो. तुम्हाला ठाऊक असेल, पोलंडमध्ये तो एका ज्यूला जवळ जवळ ठार मारणार होता. '

' काही असो. अडचणीत असलेल्या तरुणांबद्दल आपणास सहानुभूती वाटायला हवी. त्याचे अनेकांशी लागेबांधे आहेत हे लक्षात घेऊन...'

' ठीक आहे महाराज. ' ह्या बाबतीतील आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याची इच्छा समजली असे दाखविणारे स्मित करीत टिमॉहिन उत्तरला.

' ठीक आहे. मग हरकत नाही. '

जनरलने डोलोहॉव्हला त्याच्या रांगेत हेरले आणि त्याचा घोडा थांबवला. ' आता पहिल्या लढाईत तू आपल्या सन्मानदर्शक फिती जिंकशील. '

डोलोहॉव्हने वळून पाहिले, पण तो काही बोलला नाही. उपरोधाने हसणाऱ्या त्याच्या चेहऱ्यावरील एकही रेषा बदलली नाही.

' ठीक आहे, सारं व्यवस्थित पार पडलं.' जनरल बोलत राहिला. सगळ्या सैनिकांना ऐकू जावे म्हणून तो मोठ्याने ओरडून म्हणाला, ' प्रत्येकाला मी एक ग्लास ब्रॅन्डी भेट देणार आहे. तुम्ही सर्वांचे मी आभार मानतो. ही सारी परमेश्वराची कृपा आहे. '

कंपनीला वळसा घालून त्याने आपला घोडा दुसऱ्या कंपनीकडे पिटाळला.

तपासणीनंतर अधिकारी खुशीत होते. आणि सैनिकही खुशीत होते. कंपन्या आनंदाने निघाल्या होत्या. सर्व बाजूंना गप्पा मारणारे सैनिक दिसत होते.

' कुटूझॉफला एका डोळ्यानं दिसत नाही हे खरं का ? '

' खरं आहे. त्याला एका डोळ्यानं मुळीच दिसत नाही. '

' दोस्तहो, अगदी चूक आहे. आपणां सर्वांपेक्षा त्याची दृष्टी तीक्ष्ण आहे. त्यानं आपल्या पायांकडे आणि बुटांकडे कसं पाहिलं ते तर आठवून पाहा. '

' फेडेशो, लढाई केव्हा सुरू होणार याबद्दल तो काही बोलला का रे ? तू जास्त जवळ उभा होतास म्हणून विचारतो. स्वतः बोनापार्ट ब्रुनॉव्होमध्ये होता असं म्हणतात. '

' बोनापार्ट ? काय मूर्खासारखा बरळतो आहेस ? आता याही पुढल्या बातम्या सांगशील. '

' ते बघ व्यवस्था पाहणारे अधिकारी. लेकाचे एवढ्यात गावात पोचून पॉरिज शिजवूही लागले. आपण आजून तेथे पोचायचेच आहोत. '

वादकांना आघाडीला व्हायचा हुकूम मिळताच निरनिराळ्या रांगांतून वीसएक माणसे आघाडीला जाऊ लागली. ड्रम वाजवणारा त्यांचा पुढारी होता. तो वळून त्या वादकसमूहासमोर तोंड करून उभा राहिला. त्याने आपले हात उडवीत सैनिकगीत वाजवायला प्रारंभ

केला. सूर्य नुकताच कुठे उगवत होता. अशा अर्थाची त्याची सुरुवात होती. आणि ' चला दोस्तहो, आपण फादर कॅमेन्स्कीबरोबर वैभवाकडे कूच करू या ' असा शेवट होता.

आता वीस कंठांतून हे ध्रुपद गायिले जाऊ लागले. हत्यारांचे आणि पिशवीचे ओझे असतानाही कॅस्टनेट वाजवणारा चपळाईने पुढे उड्या मारत होता. आणि सैनिकांसमोर तोंड करून मागे मागे चालत होता. चालता चालता खांदे उडवीत हालवीत होता. कॅस्टनेट घेऊन एखाद्याच्या अंगावर आल्यासारखा हालचाल करीत होता.

कंपनीच्या मागून चाकांचा आणि घोड्यांच्या टापांचा आवाज येत होता.

कमांडर-इन-चीफने सैनिकांना मोकळेपणाने वागण्याचा इशारा केला. त्याला आणि त्याच्या परिवाराला गाणे ऐकून, नाचणारा सैनिक पाहून आणि आनंदाने कूच करणारी माणसे पाहून आनंद होत असल्याचे दिसत होते. गाडीतून जाणाऱ्या त्या माणसांना उजव्या बाजूच्या दुसऱ्या रांगेतील निळ्या डोळ्यांचा सैनिक डोलोहॉव्ह दिसल्यावाचून राहिला नाही.

गाण्याचा ताल धरून तो मोठ्या दिमाखाने आणि कौशल्याने पावले टाकीत चालला होता. घोडागाडीतून जाणाऱ्या माणसांकडे तो अशा मुद्रेने पाहात होता की, त्यातून त्या वेळी ती माणसे पावले टाकीत नसल्याबद्दलची कीव व्यक्त होत होती.

जनरलची मघा नक्कल करणारा घोडेस्वारदलाचा ज्युनियर ऑफिसर कुटूझॉफच्या परिवारात होता. त्याने गाडीबरोबर जाण्याऐवजी आपला घोडा डोलोहॉव्हकडे वळवला. हुझारांच्या (घोडेस्वारदलाच्या) ह्या ऑफिसरचे नाव झेर्कॉफ होते आणि तो पीटर्सबर्गमध्ये एका जुगारांच्या टोळक्यात होता. तेव्हा डोलोहॉव्ह त्या टोळक्याचा पुढारी होता. डोलोहॉव्ह साधा सैनिक असताना झेर्कॉफला तो परदेशात दिसला होता. परंतु झेर्कॉफला ओळख दाखवणे बरे वाटले नव्हते.

आता कुटूझॉफ त्या शिक्षा झालेल्या अधिकाऱ्याबरोबर बोलल्यानंतर झेर्कॉफने त्याला जुन्या मैत्रीने हाक मारली.

त्याने डोलोहॉव्हला म्हटले, ' प्रिय मित्रा, ठीक चाललं आहे ना ? '

' दिसतंच आहे तुला कसं चाललं आहे ते. ' डोलोहॉव्ह थंडपणे उत्तरला.

' तुझं अधिकाऱ्यांशी कितपत जमतं ? ' झेर्कॉफने विचारले.

' छान. फार चांगले दोस्त आहेत ते. तू स्टाफमध्ये कसा काय घुसलास बाबा ? '

' मला वरून नेमण्यात आलं. मी ड्यूटीवर आहे. '

दोघेही काही काळ स्तब्ध राहिले.

' ऑस्ट्रियन सैन्याचा पराभव झाला हे खरं काय ? ' डोलोहॉव्हने विचारले.

' देव जाणे. असं म्हणतात खरं. '

' बरं झालं. ' डोलोहॉव्हने म्हटले.

' एखाद्या संध्याकाळी ये ना आमच्याकडे. आपण फॅरो (पत्त्यांचा जुगार) खेळू या. ' झेर्कॉफ म्हणाला.

' तुम्हा लोकांकडे पैसा खूप झालेला दिसतोय ? '

‘ पण तू येच. ’

‘ मी येऊ शकणार नाही. मी न येण्याची शपथ घेतली आहे. मला प्रमोशन मिळेपर्यंत मी मद्यपान न करण्याचं आणि जुगार न खेळण्याचं ठरवलं आहे. ’

‘ तुला काही हवं असलं तर ये ना. स्टाफवर असलेला मनुष्य नेहमीच उपयोगी पडेल.’

डोलोहॉव्ह तुच्छतापूर्वक हसून म्हणाला, ‘ तू इतका त्रास घेऊ नकोस. मला काही हवं असलं तर मी कधी हात पसरत नाही. मी ते स्वतःच मिळवतो. ’

पाहणी संपवून आल्यानंतर कुटूझॉफ ऑस्ट्रियन जनरलला घेऊन आपल्या खोलीत गेला. त्याने ॲड्ज्युटंटला बोलावले आणि नुकत्याच येऊन पोचलेल्या सैन्याच्या माहितीची कागदपत्रे तसेच आघाडीवरील सैन्याचा प्रमुख आर्चडयूक फर्डिनंड याच्याकडून आलेली पत्रे घेऊन यायला सांगितले. प्रिन्स आन्द्रे बोलकॉन्सी कमांडर-इन-चीफने सांगितलेली सर्व कागदपत्रे घेऊन हजर झाला. कुटूझॉफ आणि ऑस्ट्रियन जनरल टेबलावर पसरलेला नकाशा पाहू लागले.

‘ मी एवढंच सांगू शकतो. माझ्या एकट्याच्या इच्छेवर अवलंबून असतं तर सम्राट फ्रान्सिसची इच्छा कधीच पुरी झाली असती. मी केव्हाच आर्चडयूकला मिळालो असतो. तुम्हाला मी खरं सांगतो आहे. अधिक अनुभवी अणि अधिक निष्णात जनरलांच्या हातात जर का सैन्याची सूत्रं दिली असती–ऑस्ट्रियात तर अशा जनरलांची वाण नाही. आणि ही सगळी कठीण जबाबदारी त्यांच्यावर टाकली असती तर व्यक्तिशः मला हायसं वाटलं असतं-पण परिस्थितीमुळे आम्हाला काही करता येत नाही. ’ असे म्हणून कुटूझॉफने स्मित केले.

त्याला जणू सुचवायचे होते, ‘ माझ्यावर विश्वास न ठेवायला तुझा तू मोकळा आहेस. तुझ्या विश्वास किंवा अविश्वासाची मला बिलकूल पर्वा नाही. ’

ऑस्ट्रियन जनरलचे समाधान झालेले दिसले नाही. कुटूझॉफच्याच स्वरात उत्तर देण्याखेरीज त्याला दुसरा मार्ग नव्हता.

‘ उलटपक्षी तुम्ही साध्या लढाईत भाग घेताहात म्हणून आमच्या महाराजांना कृतज्ञता वाटते आहे. ’ त्याचा तक्रारखोर आणि चिडका स्वर तो उच्चारीत असलेल्या स्तुतीच्या शब्दांना विसंवादी वाटत होता. ‘ विजयश्री मिळविण्याचा सराव असलेल्या रशियन सैन्याला आणि त्याच्या कमांडर-इन-चीफला आताशा चाललेल्या दिरंगाईने विजयश्री मिळत नाही याची आम्हाला जाणीव आहे. ’

कुटूझॉफने तसेच स्मित करून झुकून प्रणाम केला. आणि म्हटले, ‘ तरीही माझं म्हणणं मला बरोबर वाटतं. आर्चडयूक फर्डिनंड यांनी मला पत्र पाठवून माझा सन्मान केला आहे. त्या पत्रावरून मला असं वाटतं, जनरल मॅकसारख्या निष्णात नेत्याच्या ताब्यात असलेल्या ऑस्ट्रियन सैनिकांनी एव्हाना निर्णायक विजय मिळविला असेल. त्यांना आता आमच्या मद.

तीची गरजही पडणार नाही असं वाटतं. '

जनरलने कपाळाला आठ्या घातल्या. ऑस्ट्रियन सैन्याचा पराभव झाल्याची निश्चित बातमी नव्हती तरीही प्रतिकूल वार्तांना दुजोरा देणारी अशी परिस्थिती खासच होती. त्यामुळे कुटूझॉफची ऑस्ट्रियन सैन्याच्या विजयासंबंधीची अटकळ जनरलला चेष्टेसारखी वाटली. पण कुटूझॉफच्या चेहऱ्यावरील हास्य सौम्य होते. त्याची मुद्रा जणू सांगत होती त्याला असे समजण्याचा हक्क आहे. वस्तुतः जनरल मॅकच्या सैन्याकडून आलेल्या ताज्या पत्रात विजयाची वार्ता होती. आणि सैन्य अनुकूल अशा मोक्याच्या ठिकाणी असल्याचीही बातमी होती.

' महाराज, प्रतिकूल तेच घडेल असं समजून तयारीत राहावं हे बरं. ' ऑस्ट्रियन जनरल म्हणाला. त्याला आता थट्टामस्करी थांबवून कामाच्या गोष्टीकडे वळायचे होते. मागे वळून प्रिन्स आन्द्रेकडे पाहिल्याखेरीज त्याला राहवले नाही.

' माफ करा ' कुटूझॉफ मध्येच म्हणाला आणि आन्द्रेकडे वळून त्याला म्हणाला, ' हे बघ, आपल्या टेहळणीपथकाचे सगळे रिपोर्ट कॉझ्लॉव्स्कीकडून घे. ही काऊंट नॉस्टिटसकडून आलेली दोन पत्रे, हे आर्चड्यूक फर्डिनंडकडून आलेलं पत्र. आणखी हे एक पत्र, ह्या सर्वांचा उपयोग करून आपणास मिळालेली ऑस्ट्रियन सैन्याच्या हालचालीसंबंधीची सर्व माहिती फ्रेंचमध्ये तयार कर आणि मग ती ह्या साहेबांना दाखवायची. '

प्रिन्स आन्द्रेने झुकून प्रणाम केला. मग तो सगळी कागदपत्रे गोळा करून स्वागतदालनात गेला.

प्रिन्स आन्द्रेने रशिया सोडल्याला फार वेळ लोटला नव्हता. तरीही या अवधीत तो खूपच बदलला होता. आता त्याच्या मुद्रेवर, हावभावात आणि चालण्यात पूर्वीच्या अहंकाराचा, वैतागाचा आणि आळसाचा लवलेशही नव्हता. आपल्या आवडीच्या कामात गढून जाणाऱ्या आणि दुसऱ्यांच्या मनावर आपल्या वागणुकीचा काय परिणाम होतो आहे याचा विचार करायला फुरसद नसणाऱ्या माणसासारखा तो वाटत होता. भोवतालची माणसे आणि स्वतः यांवरच तो खूष होता. त्याचे स्मित आणि त्याची दृष्टी आनंदी आणि आकर्षक होती.

प्रिन्स आन्द्रेने कुटूझॉफला पोलंडमध्ये गाठले तेव्हाच कुटूझॉफने त्याचे मनापासून स्वागत केले होते. त्याची आठवण ठेवण्याचे वचन दिले होते. इतर अॅड्ज्युटंटमधून त्याला निवडून काढून व्हिएन्नाला नेले होते, आणि त्याच्यावर अधिक जबाबदारीची कामे सोपविली होती. व्हिएन्नाहून कुटूझॉफने आपल्या जुन्या मित्रास म्हणजेच आन्द्रेच्या वडिलांस पत्र लिहिले होते. ' तुझ्या मुलामध्ये ऑफिसर होण्यासाठी योग्य ते गुण आढळताहेत. चिकाटी, निश्चय आणि सद्बुद्धी यांमुळे तो नाव कमावील. त्याच्यासारखा मदतनीस मला मिळाला हे माझे भाग्य होय. '

कुटूझॉफचे मदतनीस, आन्द्रेचे सहकारी यांत आणि सर्वसाधारणपणे सैन्यात प्रिन्स आन्द्रेबद्दल पीटर्सबर्गच्या वरिष्ठ समाजात जशी होती तशीच दोन अतिशय भिन्न मतप्रवाह बाळगणारी माणसे होती. काही माणसे प्रिन्स आन्द्रेला आपल्याहून आणि इतर माणसांहून वेगळा मानीत. त्याने सांगितलेले ऐकत, त्याच्या स्तुतीत उत्साहाने भाग घेत आणि त्याचे अनुकरण करीत.

अशी माणसे थोडी होती. त्यांच्याशी आन्द्रे प्रेमाने आणि मोकळेपणाने वागत असे.

बहुसंख्य लोकांना मात्र आन्द्रे आवडत नसे. त्यांच्या मते तो कुढा, भावनाशून्य आणि तुसडा होता. अशा लोकांशी कसे वागावे हे प्रिन्स आन्द्रेला चांगले ठाऊक होते. त्यामुळे त्यांच्या मनात त्याच्याविषयी आदर आणि भीती होती.

कुटूझॉफच्या खोलीतून प्रिन्स आन्द्रे स्वागतदालनात आला त्या वेळी ड्यूटीवर असलेला ॲड्ज्युटंट खिडकीशी बसून पुस्तक वाचीत होता. कागदपत्रे घेऊन जवळ आलेल्या आन्द्रेला पाहून त्याने विचारले, ' कशासाठी बोलावलं होतं ? '

' आपण पुढे कूच का करीत नाही याचा शोध घ्यायला मला सांगितलं आहे. '

' खरंच आपण कूच का करीत नाही ? '

प्रिन्स आन्द्रेने उत्तरादाखल खांदे उडवले.

' मॅककडून काही कळलं काय ? '

' काही नाही. '

' त्याचा खरोखर पराभव झाला असता तर काही वार्ता कळली असती. '

' कदाचित कळलीही असती ' असे बोलून प्रिन्स आन्द्रे बाहेर पडण्यासाठी दरवाज्याकडे वळला. तेवढ्यातच धाडकन दार उघडून आत शिरलेला उंच माणूस वाटेत आला. हा आत आलेला माणूस दुसरा तिसरा कोणी नसून ऑस्ट्रियन जनरल होता. त्याने लांब कोट घातला होता, डोक्याभोवती काळा रुमाल गुंडाळला होता.

जागच्या जागी उभ्या राहिलेल्या प्रिन्स आन्द्रेला जनरलने घाईने विचारले,

' कमांडर-इन-चीफ् कुटूझॉफ आहेत काय ? ' मग त्याने दोन्ही बाजूंना पाहिले आणि न थांबता तो सरळ कुटूझॉफच्या खास खोलीकडे जाऊ लागला. घाईने त्या अनोळखी जनरलकडे जाऊन त्याचा दरवाज्याकडे जाण्याचा मार्ग अडवीत कॉझ्लॉव्स्की म्हणाला,

' कमांडर-इन-चीफ् कामात आहेत. त्यांना कोण भेटायला आले आहेत म्हणून सांगू ? '

जनरलचा चेहरा आक्रसला, त्याचे ओठ स्फुरू, कापू लागले, त्याने नोटबुक काढले. घाई-घाईने काहीतरी पेन्सिलीने खरडले. नोटबुकाचे पान फाडून कॉझ्लॉव्स्कीकडे दिले. जलद पावले टाकीत तो खिडकीजवळ गेला आणि तिथल्या खुर्चीत त्याने बसकन मारली.

' मी दुर्दैवी मॅक, ' तो फ्रेंचमध्ये थरथरत्या आवाजात म्हणाला. दारात उभ्या राहिलेल्या कुटूझॉफचा चेहरा कितीतरी काळ निर्विकार राहिला. त्याच्या कपाळावर आठ्या उभारल्या. पण त्या क्षणभरच. त्याने आदरपूर्वक झुकून आपले डोळे मिटून घेतले. काही न बोलता मॅकला आपल्या खोलीत नेले आणि दार लावून घेतले.

ऑस्ट्रियन सैन्याचा पराभव झाला आणि सगळ्या सैन्याने उल्म येथे शरणागती पत्करली अशा तऱ्हेची वार्ता पसरली होती ती खरी ठरली. अर्ध्या तासात निरनिराळ्या ठिकाणी हुकूम पोचविण्यासाठी ॲड्ज्युटंट रवाना झाले. आतापर्यंत स्वस्थ बसलेल्या रशियन सैनिकांची शत्रूशी गाठ घालून देण्याचे नियतीने ठरवले होते.

युद्धाची सर्व दिशांनी प्रगती व्हावी यासाठी आस्था बाळगणाऱ्या विरळ ऑफिसरांपैकी प्रिन्स आन्द्रे एक होता.

मॅकला पाहिल्यावर आणि त्याच्या पराभवाचा तपशील ऐकल्यावर आपली मोहीम अपयशी झाल्याची वस्तुस्थिती त्याला आकलन झाली. रशियन सैन्य किती संकटात आहे याची त्याला कल्पना झाली. आपल्या सैन्याची अवस्था कशी होईल आणि त्याच्यावर ओढवणाऱ्या प्रसंगात आपल्याला काय काय काम करावे लागेल याचे स्पष्ट चित्र त्याच्या डोळ्यांसमोर तरळू लागले.

आत्मविश्वास बाळगणाऱ्या ऑस्ट्रियाची मानखंडना झाली म्हणून तसेच सुव्हॉरॉफच्या काळानंतर प्रथमच होणाऱ्या रशियन-फ्रेंच सैन्याच्या लढाईत आपणास हजर राहता येईल आणि भाग घेता येईल ह्या विचाराने त्याला आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. तरीही नेपो-लियनची अलौकिक बुद्धिमत्ता सगळ्या रशियन सैन्याच्या शौर्यास पुरून उरेल ह्या विचाराने तो धास्तावून गेला. त्याच वेळी त्याला आपल्या आवडत्या वीरपुरुषावर कलंक यावा ही कल्पना असह्य होत होती.

नाना विचारांनी व्यग्र झालेला प्रिन्स आन्द्रे आपल्या वडिलांना नेहमीप्रमाणे पत्र लिहायला खोलीकडे वळला.

घोडेस्वारांची पावलोग्रॅडस्की रेजिमेंट ब्रॉनॉपासून दोन मैलांवर तळ देऊन होती. घोडेस्वारांच्या ज्या पथकात निकोलाय रोस्ताफ निशाणधारक म्हणून होता, ते पथक साल्झनेक या जर्मन खेड्यातील घरातून मुक्काम करून होते. पथकाचा कॅप्टन डेनिसॉव्ह याला त्या खेड्यातील सर्वांत चांगली जागा देण्यात आली होती. पोलंड येथे रेजिमेंटमध्ये दाखल झाल्यापासून एन्साइन ( निशाणधारक ) रोस्ताफ त्याच्याबरोबरच राहात असे.

मुख्य ठाण्यावर मॅकच्या पराभवाच्या वार्तेने आठ ऑक्टोबर रोजी खळबळ उडाली होती. मात्र त्याच दिवशी ह्या पथकातील अधिकाऱ्याचे दैनंदिन व्यवहार रोजच्यासारखे चालले होते. रसद मिळविण्याच्या कामगिरीवरून रोस्तॉफ पहाटे परत आला.

' गड्या बॉंदरेङ्को, याला जरा हिंडवून आण. ' घोड्याकडे जोराने धाव घेणाऱ्या सैनि-कास तो प्रेमळपणे म्हणाला.

' ठीक आहे महाराज, ' तो रशियन सैनिक म्हणाला.

' त्याला चांगल्या तऱ्हेने हिंडव बरे. '

दुसरा एक सैनिक घोड्याकडे धावला. पण त्यापूर्वीच बॉंदरेङ्कोने लगाम पकडलेला होता. रोस्तॉफ सढळ हाताने बक्षिसी द्यायचा हे उघड होते.

रोस्तॉफने घोड्याच्या मानेवर थोपटले. मग त्याच्या पुठ्यावर थोपटले आणि तो जरा वेळ

पायऱ्यांवर रेंगाळत राहिला.

' उत्तम ! फार चांगलं जनावर होणार आहे ! ' रोस्तॉफ स्वतःशी उद्‌गारला. आणि हसऱ्या चेहऱ्याने तलवार सावरीत पायऱ्या चढला.

डेनिसॉव्हचा नोकर लाव्रुश्का तिथे होता त्याला रोस्ताफने विचारले, ' तुझे मालक कुठे आहेत ? '

' साहेब, संध्याकाळपासून आलेले नाहीत. बहुधा त्यांची हार होत असावी. एवढ्यात जिंकले तर आपल्या नशिबाची बढाई मारण्यासाठी आता येतील. सकाळपर्यंत आले नाहीत तर ते हरले असं समजायला पाहिजे. हरल्यानंतर ते रागावून येतील. मी तुमच्यासाठी कॉफी आणू काय ?' लाव्रुश्काने विचारले.

' घेऊन ये. '

दहा मिनिटांनंतर लाव्रुश्काने कॉफी आणली.

' साहेब येताहेत ' तो म्हणाला.

रोस्तॉफने खिडकीतून पाहिले. डेनिसॉव्ह घरी येत होता.

' अरे तू तर आधीच उठला आहेस. ' खोलीत प्रवेश करता करता डेनिसॉव्ह म्हणाला.

' केव्हाच. मी घोड्यांना वैरण आणण्यासाठी गेलो होतो. '

' खरं म्हणतोस ? दोस्त, आम्ही आपले सारखे हरत होतो. ' डेनिसॉव्ह रडत बोलत होता. मी तर कमनशिबी. तू गेलास आणि माझे नशीब देखील मला सोडून गेले.

आपल्या आखूड बोटांनी तो आपले राठ केस विसकटू लागला.

' काय बुद्धी फिरली आणि मी त्या घुशीकडे गेलो. '

' नुसत्या बाया असायला हव्यात. इथं मद्यपान सोडलं तर दुसरा काही उद्योग नाही. निदान लवकर लढण्याची संधी तरी मिळायला हवी. '

जाड बुटांचा आणि त्यांना लावलेल्या खिळ्यांचा आवाज थांबल्याचे ऐकू आले. कुणी तरी दबून खोकल्याचे ऐकू आले. तेव्हा दाराकडे वळून डेनिसॉव्ह ओरडला.

' कोण आहे तिकडे ? '

' सार्जंट ' लाव्रुश्काने उत्तर दिले. डेनिसॉव्हचा चेहरा आणखीन आक्रसला.

सोन्याची नाणी असलेली पिशवी भिरकावून देत तो म्हणाला, ' काय शिंचा त्रास आहे ! दोस्त रोस्तॉफ, एक काम कर. या पिशवीत पैसे किती राहिलेत तेवढे मोज आणि उशीखाली पिशवी ठेवून दे. '

डेनिसॉव्ह सार्जंटकडे निघून गेल्यावर रोस्तॉफने पैसे घेतले. यांत्रिकपणे त्याने नवी आणि जुनी नाणी वेगळी केली. त्यांच्या चळती केल्या आणि मोजायला प्रारंभ केला.

' टेल्यानिन, गुडमॉर्निंग. अरे काल रात्री माझी चांगलीच दांडी उडाली ' त्याला पली-कडल्या खोलीत असलेल्या डेनिसॉव्हचे शब्द ऐकू आले.

' कुठं खेळत होतास ? वायकॉफकडे–त्या घुशीकडे ? मला ठाऊक होते. ' कुणाचा तरी

सौम्य आवाज ऐकू आला आणि त्यामागोमाग लेफ्टनंट टेल्यानिन आत आला. तो त्याच्याच तुकडीतील कनिष्ठ अधिकारी होता.

रोस्तॉफने पिशवी उशीखाली सारली. टेल्यानिनचा लहानखुरा दमट हात हातात घेऊन हस्तांदोलन केले. रेजिमेंटबाहेर पडण्यापूर्वी काही कारणांमुळे टेल्यानिनची संरक्षकदलातून बदली झाली होती. रेजिमेंटमध्ये टेल्यानिन चांगल्या तऱ्हेने वागत असे. पण तो अप्रिय झाला होता.

विशेषतः रोस्तॉफला तो डोळ्यांसमोर नको झाला होता. आणि त्याच्याविषयीचा अकारण तिटकारा तो लपवू शकत नव्हता.

'तरुण मित्रा, माझा रूक तुझी कशी काय सेवा करतो आहे?' (टेल्यानिनने रोस्तॉफला आपला घोडा विकला होता, त्या घोड्याचे नाव रूक होते.)

'फार चांगला घोडा आहे.' रोस्तॉफने उत्तर दिले.

खरे तर त्याने सातशे रुबल मोजले होते. पण अर्ध्या किंमतीच्या लायकीचेही ते जनावर नव्हते. पुढच्या डाव्या पायाने तो लंगडायला लागला आहे. रोस्तॉफने आणखी माहिती पुरवली.

'त्याचा खूर दुभंगला असेल. काही विशेष नाही. त्याचा बंदोबस्त कसा करायचा ते मी दाखवतो.'

'तसं केलंत तर कृपा होईल.'

'मी दाखवतोच तुम्हाला. ते काही मोठं रहस्य नाही. त्या घोड्यामुळे तुम्ही माझे नेहमीच ऋणी राहाल.'

'मग मी आताच घोड्याला आणायला सांगतो.' टेल्यानिन केव्हा एकदा जातो असे रोस्तॉफला झाले होते. घोड्याला घेऊन यायला सांगण्यासाठी तो बाहेर पडला.

कसला तरी रिपोर्ट देणाऱ्या सार्जंटकडे तोंड करून पाइप ओढत डेनिसॉव्ह बाहेरच्या खोलीच्या उंबरठ्यावर बसला होता.

डेनिसॉव्हने रोस्तॉफला पाहिले. डोळ्यांची हालचाल केली. जिथे टेल्यानिन बसला होता, त्या खोलीकडे आपल्या खांद्यावरून अंगठा दाखवून त्याने कपाळाला आठ्या घातल्या आणि वैतागाने डोके हालवले.

'मला हा माणूस आवडत नाही.' सार्जंट हजर असतानाही डेनिसॉव्हने हे शब्द उच्चारले.

'मलाही आवडत नाही, पण करणार काय?' अशा अर्थाने रोस्तॉफने आपले खांदे उडवले. घोडा आणण्याचा हुकूम दिल्यावर तो टेल्यानिनकडे वळला.

रोस्तॉफ मघाशी त्याला सोडून गेला त्याच आळसावलेल्या अवस्थेत टेल्यानिन आपले लहानसे गोरे हात घासत होता.

'तू घोडा आणायला सांगितलंस का?' उठून उभा राहात आणि भोवताली निष्काळजीपणे पाहात टेल्यानिनने विचारले.

'हो ना!'

'तूच चल तर मग.'

ते दोघेही पायऱ्या उतरून तबेल्यात शिरले. लेफ्टनंटने कोणता उपचार करायचा ते दाखवले. मग त्याने आपल्या निवासाचा रस्ता धरला.

रोस्तॉफ परत आला तेव्हा टेबलाशी बसून डेनिसॉव्ह लिहीत होता. आणि त्याच्या लेखणीचा कुरूकुरू आवाज होत होता. डेनिसॉव्हने उदासपणे रोस्तॉफकडे पाहिले.

'मी तिला पत्र लिहितो आहे.' तो म्हणाला. हातात पेन घेऊन कोपर टेबलावर टेकून तो रेलला. आपल्याला जे लिहायचं आहे ते तोंडाने सांगता येणार आहे ह्या शक्यतेमुळे त्याला अगदी आनंद झाला होता. त्याने रोस्तॉफला पत्रातील मजकूर ऐकवला.

'हे बघ दोस्त, जोपर्यंत आपण प्रेम करीत नाही तोपर्यंत आपण झोपेत असतो, तोपर्यंत आपण धूळ आणि राख यांतून निर्माण झालेले असतो...एकदा का आपण प्रेम करू लागलो की आपण देव बनतो, शुद्ध बनतो, मानवाचा जन्म झाला त्या निर्मितीच्या पहिल्या दिवसासारखे शुद्ध बनतो...पुन्हा कोण आला? जाऊ दे त्याला खड्डयात. मला आता वेळ नाही.' डेनिसॉव्ह लाव्रुश्काच्या अंगावर खेकसला. पण लाव्रुश्का मुळीच घाबरला नाही. तो डेनिसॉव्हजवळ गेला आणि म्हणाला, 'आणखी दुसरे कोण असणार? तुम्हीच तर त्यांना यायला सांगितलं होतं.'

'पैशासाठी सार्जंट आले आहेत.'

डेनिसॉव्हच्या कपाळाला आठ्या पडल्या.

'काय कटकट आहे' तो स्वतःशीच पुटपुटला. त्याने रोस्तॉफला विचारले, 'पिशवीत किती पैसे शिल्लक आहेत?'

'सात नवी नाणी आणि तीन जुनी सोन्याची नाणी.'

डेनिसॉव्ह उशीखालून पैसे काढून घेण्यासाठी पलंगाजवळ गेला.

'रोस्तॉफ, कुठं ठेवली होतीस पिशवी?'

'खालच्या उशीखाली.'

'पण ती तिथे नाही.' डेनिसॉव्हने दोन्ही उशा जमिनीवर भिरकावल्या.

पिशवी कुठंच नव्हती. 'चमत्कारच आहे. जरा थांब. आता तूच कुठंतरी टाकली असशील.'

रोस्तॉफने प्रत्येक वेळी एकेक उशी उचलून हालवून पाहिली. त्याने बिछान्यावरील चादर ओढून हालवून पाहिली. पिशवी कुठे सापडली नाही.

'मी इथंच ठेवली होती.' मग रोस्तॉफने लाव्रुश्काला विचारले,

'पिशवी कुठं आहे?'

'मी मुळी खोलीत आलोच आही; तुम्ही जिथं ठेवली होती, तिथंच ती असली पाहिजे.'

'पण ती तिथं नाही.'

'तुम्ही असंच नेहमी करता. वस्तू कुठंही टाकता आणि विसरता. आधी तुमचे खिसे तपासा.'

'ती कुठं ठेवली याची मला पक्की आठवण आहे.'

लाव्रुश्काने सगळा बिछाना धुंडाळला, त्याच्या खाली पाहिले, टेबलाखाली शोधले आणि

तो स्वस्थपणे खोलीच्या मध्यभागी उभा राहिला. डेनिसॉव्ह शांतपणे लाव्रुश्काच्या हालचाली पाहात होता. जेव्हा त्याने पिशवी कुठेच नाही हे दाखविण्यासाठी आश्चर्याने हात उडवले, तेव्हा डेनिसॉव्हने वळून रोस्तॉफकडे पाहिले.

'रोस्तॉफ, तुझी मस्करी पुरी झाली.'

डेनिसॉव्ह आपल्याकडे पाहात आहे हे जाणवताच रोस्तॉफने नजर वर उचलली आणि लागलीच खाली वळवली. आतापर्यंत जणू खाली कुठेतरी कोंडले गेलेले त्याचे सारे रक्त त्याच्या चेहऱ्याकडे, त्याच्या डोळ्यांकडे जोराने वाहू लागले. त्याला श्वास घेता येईना.

'तुम्ही आणि लेफ्टनंट यांच्याशिवाय खोलीत तिसरी व्यक्ती नव्हती. पिशवी इथंच कुठंतरी असली पाहिजे.' लाव्रुश्का म्हणाला.

'गाढवा, जरा हातपाय हालव आणि शोधायला लाग.' लालबुंद होऊन नोकराच्या अंगावर धावून जात डेनिसॉव्ह ओरडला. 'पिशवी सापडली पाहिजे, नाहीतर तुम्हा सर्वांना चाबकानं फोडून काढीन.'

डेनिसॉव्हची नजर चुकवीत रोस्तॉफने आपल्या जाकिटाची बटणं लावली, तलवार अडकवली, आणि साधी टोपी चढविली.

नोकराला खांदे हालवून आणि भिंतीशी लोटत नेत डेनिसॉव्ह ओरडला, 'पिशवी मिळाली पाहिजे हे लक्षात ठेव.'

'डेनिसॉव्ह, सोड त्याला. कोणी नेली ते मला ठाऊक आहे.'

नजर वर न उचलता दाराकडे जात रोस्तॉफ म्हणाला.

डेनिसॉव्ह थांबला. त्याने क्षणभर विचार केला, त्याला रोस्तॉफची सूचना समजली. तशी त्याने रोस्तॉफच्या हाताला धरीत म्हटले, 'मूर्ख आहेस तू!' तो एवढ्या जोराने ओरडला की त्याच्या मानेवरील आणि कपाळावरील शिरा दोरीसारख्या तटतटून फुगल्या होत्या. 'तुझं डोकं जाग्यावर नाही. मी तुझं काही ऐकणार नाही. पिशवी येथेच आहे. ह्या हरामखोराची कातडी लोळवली की ती येथेच येणार, जाणार कुठं?'

'कोणी नेली ते मला माहीत आहे' आपल्या थरथरत्या आवाजात रोस्तॉफने पुन्हा ते शब्द उच्चारले.

'मी तुला सांगतो. तसलं धाडस तू करता कामा नये.' डेनिसॉव्ह ओरडला. रोस्तॉफने ठामपणे डेनिसॉव्हकडे पाहिले.

'तू काय म्हणतो आहेस त्याचा अर्थ तुला कळतो आहे का?' रोस्तॉफ थरथरत्या आवाजात बोलत होता. माझ्याखेरीज खोलीत दुसरा कोणी नव्हता. 'तू म्हणतोस तसं नसलं तर...'

त्याला पुढे बोलवले नाही. तो खोलीच्या बाहेर पडला.

'मरा तुम्ही सगळे' रोस्तॉफच्या कानावर शेवटचे शब्द पडले. रोस्तॉफ टेल्यानिनच्या निवासाकडे गेला.

'मालक घरी नाहीत. ते ऑफिसात गेले आहेत' टेल्यानिनच्या नोकराने सांगितले.

अधिकाऱ्यांची निवासस्थाने साल्झेनेकपासून दोन अडीच मैलांवर होती. टेल्यानिन घरी सापडला नाही, तेव्हा रोस्तॉफ्ने आपला घोडा घेतला आणि तो घोड्यावरून अधिकाऱ्यांच्या निवासांकडे निघाला. गावात अधिकारी मुक्काम करून होते. तेथे एक हॉटेल होते, आणि त्या हॉटेलात अधिकारी वारंवार येत असत. हॉटेलाशी येताच रोस्तॉफ्ला टेल्यानिनचा घोडा प्रवेशद्वाराशीच दिसला.

दुसऱ्या खोलीत लेफ्टनंट बसलेला आढळला. त्याच्या टेबलावर मद्याची बाटली आणि सॉसेजची थाळी होती.

'ये दोस्ता, तू देखील इथंच आलास तर' टेल्यानिन स्मित करीत आणि वर पाहात म्हणाला.

'होय' रोस्तॉफ् बोलला आणि टेल्यानिनच्या अगदी जवळच्या टेबलाशी बसला.

दोघेही काही बोलले नाहीत. खोलीत दोन जर्मन आणि एक रशियन अधिकारी होते. प्रत्येकजण शांत होता. थाळीवरील सुऱ्या–काट्यांचा आणि लेफ्टनंटच्या खाण्याचा आवाज तेवढा ऐकू येत होता. जेवण झाल्यावर टेल्यानिनने आपल्या खिशातून तशीच दिसणारी पैशाची पिशवी काढली. टोकाशी जरा बाकदार असलेल्या आपल्या गोऱ्या बोटांनी पिशवीची कडी दूर सारली आणि आतून सोन्याची नाणी काढली. वर पाहात ती नोकराला दिली आणि म्हटले, 'वेळ घालवू नकोस.' सोन्याची नाणी नवी होती. रोस्तॉफ् उठला आणि टेल्यानिनकडे आला. ऐकू येईल न येईल इतक्या हळू आवाजात तो टेल्यानिनला म्हणाला, 'तुझी पिशवी जरा पाहू दे.'

भिरभिरत्या नजरेने पण उंचावलेल्या भुवया तशाच ठेवून टेल्यानिनने आपली पिशवी त्याला दिली.

'चांगली पिशवी आहे' असे बोलता बोलता तो एकदम पांढराफटक पडला. 'दोस्ता, बघून घे.'

रोस्तॉफ्ने पिशवी घेतली. ती न्याहाळली आणि आतील पैसेही पाहून घेतले. मग टेल्यानिनकडे पाहिले. लेफ्टनंट सवयीप्रमाणे इकडेतिकडे पाहू लागला. आणि मग एकाएकी त्याला चांगुलपणाचे भरते आले.

'आपण व्हिएन्नाला गेलो तर मला वाटतं सगळी रक्कम तिथं संपून जाईल. इथं भिकार गावात खर्च करायला जागाच नाही. दोस्त, दे आता ती पिशवी. मला जायचंय.'

रोस्तॉफ् काही बोलला नाही.

'आता काय करणार आहेस? जेवण घेणार आहेस का? इथं चांगलं जेवण मिळतं.' टेल्यानिन आपला बोलतच होता.

'पिशवी दे ना आता.'

टेल्यानिनने हात पुढे करून पिशवी पकडली. रोस्तॉफ्ने त्याला पिशवी घेऊ दिली. मग टेल्यानिन बेफिकिरीने पिशवी आपल्या विजारीच्या खिशात ठेवू लागला. तसे करताना त्याच्या भुवया बेफिकिरीने वर आल्या. जणू त्याला म्हणायचे होते, 'मी माझी पिशवी माझ्या खिशात ठेवतो आहे. अगदी साधी बाब आहे. दुसऱ्याला ह्या गोष्टीशी काय करायचं आहे?'

टेल्यानिनचा हात पकडून त्याला जवळ जवळ खिडकीशी ओढून नेले. ' हे बघ, ते डेनिसॉव्हचे पैसे आहेत. तू घेतले आहेस.' रोस्तॉफ् त्याच्या कानात कुजबुजला.

' काय ? कोण सांगतो ? तुला असं बोलायला धीर कसा झाला ? ' टेल्यानिन म्हणाला, पण त्याच्या शब्दांत दुःखाचा, निराशेचा सूर होता; क्षमायाचना होती.

त्याचा तो सूर ऐकताच रोस्तॉफ्च्या मनावरचा प्रचंड ताण दूर झाला. ' इथले लोक काय म्हणतील देव जाणे.' टेल्यानिन पुटपुटला.

आपली साधी टोपी हातात घेऊन तो छोट्या रिकाम्या खोलीकडे वळू लागला. ' तुला खुलासा करावा लागेल.'

टेल्यानिनच्या भीतीने पांढऱ्याफटक पडलेल्या चेहऱ्यावरील शीर न शीर उडत होती.

' काउंट, माझ्या तारुण्यात माझ्या आयुष्याचा नाश होईल असं काही कृपा करून करू नका. हे ते जीवघेणे पैसे घ्या. ' त्याने पिशवी टेबलावर फेकली. ' माझे वृद्ध वडील आणि आई यांचा विचार करायला हवा.'

टेल्यानिनकडे न पाहता रोस्तॉफ्ने पैसे घेतले. एक चकार शब्द न बोलता तो खोलीच्या बाहेर जायला निघाला. दारात थांबून मागे वळून म्हणाला, ' इतकी वाईट अशी गोष्ट तुझ्या हातून झाली तरी कशी ? '

' काउंट ' त्याच्या जवळ येत टेल्यानिन म्हणाला. तशी मागे सरत रोस्तॉफ म्हणाला, ' मला हात लावू नकोस. पैशाची गरज असली तर हे घेऊन जा.'

रोस्तॉफ्ने पिशवी त्याच्या अंगावर भिरकावली आणि हॉटेलच्या बाहेरचा रस्ता सुधारला.

त्याच रात्री डेनिसॉव्हच्या निवासस्थानी स्क्वॉड्रनचे काही अधिकारी जमले होते. आणि त्यांचे संभाषण रंगात आले होते. ' रोस्तॉफ, माझ्या मते तू कर्नलसाहेबांची क्षमा मागायला हवी. ' उंच बांध्याचा स्टाफ-ऑफिसर रोस्तॉफ्ला उद्देशून बोलत होता. रोस्तॉफ्चा चेहरा प्रक्षुब्ध मनःस्थितीमुळे लालबुंद झाला होता.

' मी खोटं बोलतो आहे असं मी कुणालाही बोलू देणार नाही. ' रोस्तॉफ् ओरडला ! मी खोटं बोलतो आहे असं कर्नलांनी सांगताच मी सांगितलं—' तुम्ही खोटं बोलता आहात. खरं तर इथंच हे प्रकरण संपायला हवं. कर्नल मला रोज ड्यूटी लावू शकतील. मी क्षमा मागावी अशी सक्ती माझ्यावर कोणीच करू शकणार नाही. '

' जरा माझं ऐकून तरी घे. ' शांतपणे आपल्या झुपकेदार मिश्या थोपटीत स्टाफ कॅप्टन हळू आवाजात बोलू लागला. ' तू इतर अधिकारी हजर असताना कर्नलसाहेबांना सांगितलंस की एका अधिकाऱ्याने चोरी केली. '

' इतर अधिकाऱ्यांच्या हजेरीत संभाषण झालं त्याचा दोष माझ्यावर नको. मी त्यांच्या

उपस्थितीत बोलायला नको होतं. पण मी काही मुत्सद्दी राजकारणी नाही. म्हणून तर मी हुसार (घोडेस्वार) झालो. इतक्या बारकाईनं विचार करावा असं मला वाटलं नाही. म्हणून काही मी खोटारडा ठरत नाही. कर्नलांनीच माझी माफी मागितली पाहिजे.' रोस्तॉफ् म्हणाला.

'ते सगळं ठीक आहे. तू भित्रा आहेस असं कुणीच म्हणत नाही. मुख्य मुद्दा तो नाही. डेनिसॉव्हचं मत विचार. तोही सांगेल. एका कनिष्ठ अधिकाऱ्यानं कर्नलकडून माफी मागावी ही गोष्ट घडणं शक्य आहे का?'

त्रस्त मनाने डेनिसॉव्ह संभाषण ऐकत होता. त्याला खरे तर संभाषणात भाग घ्यायची इच्छा नव्हती. त्याने कॅप्टनच्या प्रश्नाला मान हालवून नकारार्थी उत्तर दिले.

'तू क्षमा मागितली पाहिजेस.'

'काही झालं तरी मागणार नाही.' रोस्तॉफ् ओरडला.

'मी तुझ्याकडून ही अपेक्षा केली नव्हती' स्टाफ कॅप्टन गंभीरपणे आणि कडकपणे म्हणाला, 'तू क्षमा मागणार नाहीस. याचा अर्थ हा की तू त्याचा एकट्याचाच नव्हे तर आम्हा सर्वांचा - सगळ्या रेजिमेंटचा—अपराध केला आहेस. दोष तुझ्यावरच येणार आहे.'

'कर्नलनं काय करायला हवं होतं? त्या अधिकाऱ्याची चौकशी करायची आणि सगळ्या रेजिमेंटला बदनाम करायचं असं का तुला वाटतं? एका लबाड माणसाखातर सगळ्या रेजिमेंटनं शरमेनं मान खाली घालायला हवी होती का? त्यांनी असं करावं असं तुला वाटतं का?

'सगळ्या गोष्टींवर पडदा टाकायचा असताना तू मात्र उद्धटपणे वागतो आहेस. तुला माफी मागायची नाही. एका वृद्ध आणि माननीय अधिकाऱ्याची माफी मागितल्यानं तुझं काय बिघडणार आहे? बॉग्डेनिच एरवी कसेही असेनात ते माननीय आणि उदार असे वृद्ध कर्नल आहेत. आपला अपमान झाला असं तुला वाटतं. सगळ्या रेजिमेंटला बदनाम करताना मात्र तुला काहीच वाटत नाही.'

स्टाफ कॅप्टनचा आवाज कंप पावू लागला. 'तू आता नुकता या रेजिमेंटमध्ये दाखल झाला आहेस. आज इथं असलास तरी उद्या ॲड्ज्युटंट म्हणून कुठं दुसरीकडे नेमणूक होईल. 'पॉवलोग्रॅड रेजिमेंटमधल्या अधिकाऱ्यांत चोर आहेत.' असं लोकांनी तुला म्हटलं तर तुला काहीच वाटणार नाही. पण आमच्या मनाला लागून राहील. डेनिसॉव्ह, आम्हाला ते सहन होईल का?'

उडी मारून डेनिसॉव्ह म्हणाला, 'अगदी लाखातलं बोललात.' तशी रोस्तॉफ् लालबुंद होऊन त्यांच्याकडे पाहात म्हणाला, 'दोस्तहो, तुम्ही असं मानू नका. माझ्याबद्दल तसा विचार बाळगणं ही तुम्ही चूक करता आहात...मी...रेजिमेंटच्या प्रतिष्ठेसाठी मला मी...आता बोलूच कशाला... मी आता कृतीनेच सिद्ध करून देईन...मला ध्वजाची प्रतिष्ठा...ठीक आहे...जाऊ द्या सगळं. माझीच चूक होती...' त्याच्या डोळ्यांत अश्रू आले. 'काही झालं तरी माझीच चूक होती. होय माझीच चूक होती. आता काय करू सांगा?'

'काउंट, अगदी योग्य बोललास' स्टाफ कॅप्टनने वळून आपल्या थोराड हाताने त्याचा

खांदा थोपटीत म्हटले.

'त्याच्यासारखा भला मांणूस नाही' डेनिसॉव्ह ओरडला.

'फार चांगलं ठरवलंस, काउंट' रोस्तॉफ्ने दिलेल्या कबुलीमुळे त्याला कृतज्ञतापूर्वक संबोधून स्टाफ-कॅप्टनने मघाचेच वाक्य उच्चारले आणि त्याला कर्नलसाहेबाची क्षमा मागायला सांगितले.

'दोस्तहो,' रोस्तॉफच्या शब्दांत विरोध होता, तशी विनवणीही होती, 'आता अखेरचं सांगतो. मी दुसरं काहीही करीन पण क्षमा मागणार नाही. तुम्ही सांगता तसं माझ्याकडून होणार नाही. एखाद्या पोरासारखी मी कशी क्षमा मागू?'

डेनिसॉव्ह हसला.

'तुला वाटेल ते कर, बाबा' स्टाफ-कॅप्टन म्हणाला. त्याने डेनिसॉव्हला विचारले, 'रांडेच्यानं केली आहे तरी काय भानगड?'

'त्यानं आपण आजारी असल्याचा रिपोर्ट केला आहे. उद्या त्याला काढून टाकण्याचा हुकूम होणार आहे.' डेनिसॉव्ह म्हणाला.

'आजारीपणाला काही स्पष्टीकरण द्यायला नको?'

'आजारी असो वा नसो, त्यानं माझ्या मार्गात येता कामा नये' डेनिसॉव्ह ओरडला.

झेर्कॉफने खोलीत प्रवेश केला.

'तुम्ही येथे कसे शिरलात?' त्या नवागताला अधिकाऱ्याने ओरडून विचारले.

'दोस्तहो, आघाडीवर चला. मॅक आपल्या सर्व सैन्यानिशी शरण आला आहे.'

'काहीतरी बरळतोय' सर्वांनी आश्चर्योद्गार काढला.

रेजिमेंटचा ॲड्ज्युटंट आला आणि त्याने झेर्कॉफने आणलेली बातमी खरी असल्याचे सांगितले. दुसऱ्याच दिवशी कूच करायचा हुकूम होता.

'दोस्तहो, आघाडीवर चला.'

'परमेश्वराचे आभार मानू या. इथे आपण नाहक खूप काळ घालवला.'

कुटूझॉफने माघार घेतली आणि तो व्हिएन्नाला पोचला. तेवीस ऑक्टोबरला रशियन सैन्याने एन्स नदी ओलांडली. रशियन सामानवाहू गाड्या, तोफखाना आणि सैन्याच्या तुकड्या भर दुपारी एन्स गावामध्ये पुलाच्या दोन्ही बाजूंस लांबलचक रांगांनी चालल्या होत्या. हवा पावसाळी असली तरी गारठा नव्हता. पुलाचे रक्षण करण्यासाठी रशियन सैन्याचा तोफखाना जिथे होता त्या उंचीवरून दूरवरचे दृश्य दिसत होते.

खाली पाहिले की पांढुरकी घरे, लाल छपरे, छोटे प्रार्थनामंदिर आणि पूल यांनी बनलेले ते छोटे गाव दिसू लागे. त्या पुलाच्या दोन्ही बाजूंनी कितीतरी रशियन सैन्याच्या तुकड्या दाटी-

वाटीने चालल्या होत्या. डॅन्यूब नदीच्या वळणावर जहाजे, बेटे आणि बाग असलेला किल्ला दिसे. डॅन्यूब नदीला मिळणाऱ्या एन्स नदीच्या पाण्यात तो किल्ला उभा होता.

डॅन्यूबच्या डाव्या तीरावर निमुळता कडा होता. तो सगळा कडा पाईन अरण्याने झाकलेला होता. दूरवर पसरलेले झाडांचे हिरवे शेंडे आणि निळसर दऱ्या अद्‌भुत वाटत होत्या. पाईन वृक्षाच्या निर्जन अरण्यापलीकडे मठाचे मनोरे दिसत होते.

उंचीवर असलेल्या तोफांमधे राहून पिछाडीच्या पथकाचा जनरल आणि एक अधिकारी दुर्बिणीतून प्रदेशाची पाहणी करत होते. त्याच्या जरा मागे नेस्विट्स्की तोफेवर बसला होता. कमांडर-इन-चीफने त्याला पिछाडीच्या पथकाकडे धाडलेले होते.

बरोबर आलेल्या कोसॅकने नेस्विट्स्कीला त्याची पिशवी आणि मद्याची बाटली दिली. अधिकाऱ्यांना खायला प्यायला देऊन नेस्विट्स्की त्यांची करमणूक करीत होता. अधिकारी मोठ्या मजेत कोंडाळे करून बसले होते, कुणी गुडघ्यांवर, कुणी पाय एकावर एक टेवून ओल्या गवतावर बसले होते.

एका ऑफिसरला आणखी पाय् खायला आवडले असते पण त्याला शरम वाटत होती. म्हणून तो बाहेर निसर्गसौंदर्य बघण्याची बतावणी करू लागला. 'प्रिन्स, पाहिलंत का? आपलं पायदळ नुकतंच तिथं पोचलं आहे. तिथं खेड्याच्या मागं मैदानावर तिघेजण काहीतरी ओढून नेत आहेत. ते राजवाडा चांगल्या तऱ्हेनं स्वच्छ करतील.' आपली संमती असल्यागत तो बोलत होता.

'त्यात वाद नाही' देखण्या तोंडाचा नेस्विट्स्की पाय् खाता खाता म्हणाला, 'मला मात्र त्या ठिकाणी प्रवेश करणं आवडेल.' पर्वतावरील असलेल्या जोगिणींच्या मनोऱ्याचा मठ सहज दिसत होता. त्याकडे बोट दाखवून तो म्हणाला आणि डोळे मिचकावून हसला.

'खरंच दोस्तहो, अशा गोष्टीस तोड नाही.' अधिकाऱ्यांनी हसून साथ दिली.

'त्या जोगिणींना निदान थोडं घाबरवून तरी सोडायला हवं. त्यांच्यामध्ये काही इटालियन् पोरी आहेत असं म्हणतात. त्या मठात प्रवेश करण्यासाठी माझं आयुष्य पाच वर्षांनी कमी झालं तरी मी तयार आहे.'

'त्यांना देखील कंटाळा आलेला असेल.' काहीसा जादा धीट असलेला एक अधिकारी हसत हसत उद्‌गारला.

जनरलच्या बरोबरचा अधिकारी पुढे उभा होता. त्याने जनरलला काहीतरी सांगितले. जनरल दुर्बिणीतून पाहू लागला.

- 'होय, तू म्हणतोस तसंच आहे' डोळ्यांपासून दुर्बीण दूर करीत आणि आपले खांदे उडवीत जनरल रागारागाने म्हणाला. 'नदी ओलांडताना त्यांच्यावर गोळीबार करणार आहेत. पण अजून ते का रेंगाळत आहेत?' त्या दिशेला उघड्या डोळ्यांनाही शत्रूचे सैन्य आणि त्याचा तोफखाना दिसत होता. तेथून पांढऱ्या धुराचे लोट निघत होते. धुरामागोमाग दूरवर गोळीबाराचा आवाज ऐकू येत होता. रशियन सैन्य नदी ओलांडण्याच्या ठिकाणी जात होते

यात शंका नव्हती.

नेस्विट्स्की तोंडातून धूर काढीत उठला. स्मित करत जनरलकडे जाऊन म्हणाला, ' तुम्ही थोडं खाणार ना ? '

त्याला उत्तर न देताच जनरल म्हणाला, ' फार वाईट. आपली माणसं फार सावकाश जाताहेत. '

' मी घोड्यावरून जायला हवं का ? ' नेस्विट्स्कीने विचारले.

' जाशील तर बरं होईल ' आणि मग जनरलने पूर्वीचाच तपशीलवार दिलेला हुकूम ऐकवला. ' घोडदलातील सैनिकांना सांग . त्यांनी सगळ्यांच्या मागून नदी ओलांडायची आहे. आणि मागे हुकूम दिल्याप्रमाणे पूल जाळून टाकायचा आहे. पुलावरील जळणारं सामान पसरून विखरून टाकायचं आहे. '

' ठीक आहे ' नेस्विट्स्की म्हणाला. त्याने कोसॅकला आपला घोडा आणायला सांगितले. पिशवी आणि मद्याची बाटली वर धरायला सांगून सफाईने उडी मारून स्थूल देहाचा नेस्विट्स्की घोड्यावर बसला.

' काही झालं तरी मी त्या जोगिणींची भेट घेणार आहे. ' हसता हसता तो आपल्याकडे पाहत असलेल्या अधिकाऱ्यांना म्हणाला. आता त्याचा घोडा पर्वतातील वळणावळणाचा रस्ता उतरू लागला.

तोफखान्याच्या अधिकाऱ्याकडे वळून जनरल म्हणाला, ' कॅप्टन, ही तोफ किती दूरचा पल्ला गाठते ते पाहू या. जरा गम्मत करून वेळ घालवू. '

ऑफिसरने आपल्या सैनिकांना तोफ सुरू करण्यासाठी सज्ज राहायला हुकूम दिला. तोफखाना सुरू करणारे सैनिक शेकोटीजवळून मोठ्या आनंदाने उठले. त्यांनी तोफेत दारूगोळा भरण्यास प्रारंभ केला.

' नंबर एक ' हुकूम ऐकू आला. एक नंबरच्या सैनिकाने त्वरेने मागे उडी घेतली. तोफेने कानठळ्या बसवणारा आवाज केला. तो पर्वताच्या बाजूस असलेल्या रशियन सैनिकांच्या डोक्यावरून सुसाटत गेला. पुढच्या दिशेने गोळा उडाला. धुराच्या लोटामुळे शत्रूची जागा दिसत होती, त्याच्या अलीकडेच गोळा पडला आणि त्याचा स्फोट झाला.

आवाजासरशी अधिकाऱ्यांचे आणि सैनिकांचे चेहरे उजळले. प्रत्येकजण ताडकन उठला आणि खाली असलेले तळहातात मावेल असे वाटणारे आमचे सैन्य आणि पुढे पुढे घुसू पाहणाऱ्या शत्रु-सैन्याच्या हालचाली पाहण्यात गर्क झाला. त्याच वेळी सूर्य ढगाआडून बाहेर येऊन पूर्णपणे प्रकाशू लागला. त्या तोफेचा झालेला एकमेव आवाज आणि उजळ सूर्यप्रकाशाची झळाळी यांतून संजीवक आनंदाचा भाव निर्माण झाला.

पुलावर दोन वेळा शत्रूने गोळ्यांचा वर्षाव केला होता. आणि पूल खचून गेला होता. पुलाच्या मध्यावर नेस्विट्स्की उभा होता. तो घोड्यावरून उतरला होता, आणि त्याचा दांडगा देह कठड्यावर चिरडला जात होता.

प्रिन्स नेस्विट्स्की पुढे घुसायचा प्रयत्न करू लागला की समोरून येणाऱ्या सैनिकांच्या आणि मालवाहू गाड्यांच्या भाराने तो कठड्यावर रेटला जाई. हसण्याखेरीज दुसरे काही करता येत नव्हते.

प्रिन्स नेस्विट्स्कीने कठड्यावरून खाली पाहिले. एन्स नदीच्या प्रवाहात जोराने उठणाऱ्या, आवाज करणाऱ्या छोट्या लाटा पुलाच्या खांबाला वळसा घालताना भोवरे निर्माण करीत पुढे एकमेकींचा पाठलाग करीत प्रवाहाबरोबर वाहत होत्या. त्याने वळून पुलावर पाहिले. तेव्हा त्याला सैनिकांच्या जिवंत लाटा जाताना दिसल्या. तिथून रांगेने जाताना सगळे सारखेच दिसत होते.

कव्हर असलेल्या टोप्या, पिशव्या, बायोनेट, लांब पल्ल्याच्या रायफली, निर्जीव क्लांत नजरा आणि चिखलाने माखलेल्या पुलाच्या फळीवरून पडणारी पावले तिथून जाणाऱ्या ह्या गोष्टी एकसारख्या होत्या. कधी कधी एन्स नदीच्या लाटांवरील पांढऱ्या फेसाच्या तुऱ्यासारखा एखादा झगा घातलेला, सैनिकांच्या चेहऱ्यापेक्षा वेगळा चेहरा असलेला अधिकारी सैनिकांच्या लोंढ्यातून वाट काढीत जाई.

कधी पुलावरून जाणाऱ्या पायदळाच्या सैनिकांच्या लोंढ्यांतून प्रवाहात गरगरत जाणाऱ्या ढलप्याप्रमाणे घोड्यावरून उतरलेला सैनिक, ऑर्डर्ली किंवा त्या गावचा माणूस जाऊ लागे. कधी कधी बारदानाने खूप सामान रचलेली आणि कातडी कव्हराने झाकलेली गाडी पुलावरून सैनिकांच्या दरीतून कसाबसा मार्ग काढीत नदीत वाहत जाणाऱ्या ओंडक्यासारखी जाऊ लागे. असहायपणे थांबत कोसॅकने विचारले, ' दुथडी भरून जाणाऱ्या नदीच्या पुरासारखे हे चालले आहेत. आणखी सैनिक यायचे असतील ? '

' असे लाखो यायचे आहेत. '

' आता जर का त्याने ( त्याने म्हणजे शत्रूने ) पुलावर गोळ्या झाडल्या तर तू खाजवायचंही विसरून जाशील.'

' अरे गाढवा, पायाला बांधायच्या पट्ट्या कुठं ठेवल्यास ? '

' त्यानं उठून बंदुकीचा दस्ता दाताडांवर हाणला की नाही ? '

' खरोखर डुकराचं मांस रुचकर होतं. ' ते सगळे जवळून गेले परंतु नेस्विट्स्कीला कोणाच्या दातांना मार बसला आणि डुकराच्या मांसाचा त्याच्याशी संबंध काय ह्याचा पत्ता लागल नाही. मद्यप्राशन केलेले सैनिकही त्यांच्या जवळून गेले.

त्यानंतर पूर्वी गेलेल्या सर्व सामानवाहू गाड्यांहून वेगळी अशी गाडी आली. ती जर्मन पद्धतीची घोडागाडी होती. तिला दोन घोडे जोडलेले होते. बहुधा त्या गाडीत घरातले सर्व सामान भरलेले होते. एक जर्मन घोड्यांना धरून चालला होता. पट्टे पट्टे असलेली तपकिरी रंगाची आणि मोठाल्या आचळांची एक देखणी गाय गाडीच्या मागच्या बाजूस बांधलेली होती. रचून ठेवलेल्या पिसांच्या बिछान्यावर लहान मुलाला घेतलेली स्त्री, एक वृद्ध स्त्री आणि

गुलाबी गालाची एक मुलगी इतकी माणसे बसली होती. ती सगळी खेडयातील माणसे होती. खास परवानगीनेच त्यांना जाऊ देण्यात येत होते.

सगळ्या सैनिकांचे डोळे त्या स्त्रियांवर खिळले. पावलापावलाला थांबत गाडी चालली होती. त्या अवधीत ते सैनिक त्या दोन स्त्रियांसंबंधीच आपापसात बोलत होते. त्या स्त्रियांसंबंधी त्यांच्या मनात येणारे घाणेरडे विचार त्यांच्या चेहऱ्यावरही दिसत होते, हास्यातून व्यक्त होत होते.

'कसला माल घेऊन जातो आहेस रे ?'

'विकत देतोस का रे ?' खाली पाहत चाललेल्या, चिडलेल्या आणि भयभीत झालेल्या जर्मनाला उद्देशून एक सैनिक बोलला.

'तिचा पोषाख किती मारू आहे बघितलास ?'

'फिदॉतॉफ्, तुला त्याच्याकडे राहायला आवडेल की नाही ?'

'कुठं जाताहात ?' सफरचंद खात खात पायदळाच्या अधिकाऱ्याने विचारले. तो देखील त्या सुंदर पोरीकडे थोडेसे हसत रोखून पाहात होता. आपल्याला काही कळले नाही हे दाखवण्यासाठी त्या जर्मन माणसाने डोळे मिटले.

'तुला हवं तर घे ना' त्या मुलीला सफरचंद देऊ करीत अधिकारी म्हणाला.

तिने ते हसून घेतले.

मोठ्या शिकस्तीने तो आपल्या घोडयाकडे ओरडत पुढे पुढे जाऊ लागला. त्याला वाट देण्यासाठी सैनिक दाटीवाटीने एकत्र होऊ लागले. आणि पुन्हा त्याच्या अंगावर पडू लागले. त्याचा पाय चिरडला गेला. जवळ असलेल्या सैनिकांची काही चूक नव्हती. त्यांना मागे असलेल्यांकडून जोराने रेटले जात होते.

'साल्यांना वाट द्यायला सांग.' डेनिसॉव्ह ओरडला. तो खूपच भडकलेला होता. त्याचे चमकणारे काळेभोर डोळे गरगर फिरत होते. त्यांचा तांबरलेला पांढरा भाग दिसत होता. चेहऱ्याप्रमाणेच लालबुंद असलेल्या उघडया हातात म्यान केलेली तलवार घेऊन तो ती परजत होता.

'वास्का काय चालवलं आहेस ?' नेस्वित्स्कीला गंमत वाटत होती.

'स्क्वॉड्रन पुढे जाऊ शकत नाही !' आपले भेसूर शुभ्र दात दाखवीत डेनिसॉव्ह गरजला. त्याने आपल्या उत्तम जातीच्या देखण्या घोडयास टाच मारली. संगीन टोचल्यामुळे कानाची हालचाल करीत घोडा फुरफुरला आणि आपल्या जागेवरून तीरासारखा निघाला, तेव्हा पुलाच्या फळ्या निनादून उठल्या. मालकाची इच्छा असती तर घोडा आता कठडयावरून उडी टाकायला जणू सज्ज झाला होता.

'हटा, मेंढरे कुठली ! हटा...बाजूला हटा...तिकडे उभे राहा...तलवारीने सफा करीन.'

त्याने खरोखर आपली तलवार म्यानातून बाहेर काढली, आणि ती परजत तो गर्जू लागला. भयभीत झालेले सैनिक दाटीवाटीने उभे राहिले. डेनिसॉव्ह नेस्विट्स्कीजवळ येऊन पोहोचला.

नेस्विट्स्कीची दरारा बसवणारी मूर्ती, सोबतीस असलेला कोसॅक आणि तलवार फिरवीत जिवावर उदार झाल्यागत ओरडणारा निश्चयी डेनिसॉव्ह यांचा एवढा प्रभाव पडला की सगळे पायदळ थांबले आणि त्या दोघांना पुलाच्या दुसऱ्या टोकाला पोचता आले. नेस्विट्स्कीला प्रवेशद्वारापाशीच कर्नल भेटले. त्यांच्याकडे निरोप पोचता करून त्याने घोडा मागे पिटाळला.

उरलेल्या पायदळाच्या सैनिकांनी पुलाच्या प्रवेशद्वाराशी गर्दी केली तेव्हा तिचा आकार फनेलसारखा झाला. घाईघाईने त्याने पुलावरुन कूच केले एकदाच्या सर्व मालवाहू गाडया निघून गेल्या. आता फक्त डेनिसॉव्हच्या पथकाचे घोडेस्वार नदीच्या बाजूस शत्रूच्या समोर राहिले होते.

एकाएकी समोरील चढणीच्या रस्त्यावर निळे अंगरखे घातलेले, तोफखाना घेऊन येणारे सैनिक दिसू लागले. ते फ्रेंच सैनिक होते.

डेनिसॉव्हच्या स्क्वॉड्रनमधील अधिकारी आणि सैनिक इतर गोष्टींबद्दल बोलण्याचा आणि इतर ठिकाणी पाहण्याचा प्रयत्न करीत होते. पण त्यांच्या मनात टेकडीवर असलेल्या गोष्टीचाच विचार सारखा येत होता. क्षितिजावर दिसू लागलेले काळे पट्टे ते सारखे पाहू लागले. मधूनमधून टेकडीच्या दिशेने बिगुलाचा आवाज तसेच शत्रूच्या सैनिकांचे ओरडणे ऐकू येत होते. सुमारे सहाशे यार्डांचा माळ शत्रुसैन्यामध्ये आणि आमच्या सैनिकांमधे पसरलेला होता. यामुळे तर दोन्ही प्रतिस्पर्ध्यांना विभागणाऱ्या त्या दुर्गम दुष्प्राप्य सीमारेषेवरील धोका आणखी तीव्रतेने जाणवू लागला.

' जन्म-मृत्यूची ती सीमारेषा ओलांडलीत की अज्ञात वेदना आणि मृत्यू वाट्याला यायचा. त्या शेतापलीकडे, त्या झाडापलीकडे, सूर्यप्रकाशातील त्या छपरापलीकडे काय आहे ? ' कोण असेल तिथे ? ' कुणालाच ठाऊक नाही. ते जाणून घ्यायची प्रत्येकाची इच्छा असते. ती रेषा ओलांडायला प्रत्येकजण घाबरतो. तरी ती ओलांडण्याची इच्छाही बाळगतो. प्रत्येकाला ठाऊक आहे की ती रेषा प्रत्येकाला कधी ना कधी ओलांडावी लागणार आहे. मृत्यूच्या पलीकडे काय आहे हे पाहणे अटळ आहे. तसेच त्या रेषेच्या पलीकडे काय आहे हे शोधून काढणे प्रत्येकाला भाग आहे. प्रत्येकजण हे जाणून आहे. तरीही प्रत्येकजण बळ गमावीत नाही. आनंद गमावीत नाही. त्रस्त, अस्वस्थ झाला तरी उत्साह गमावीत नाही. त्याच्या भोवती देखील समर्थ तशीच बलवान माणसे अस्वस्थ पण उत्साही असतात. ' शत्रूला पाहून प्रत्येक माणूस असे विचार करीत नसला तरी त्याला असेच वाटत असते. शत्रुसैन्याने चढण व्यापली होती. तिथे गोळा सुटून धूर उठला. तो गोळा सुसाटत घोडेस्वाराच्या पथकाच्या डोक्यावरून निघाला. एकत्र उभे राहिलेले अधिकारी निरनिराळ्या दिशांना पांगले. सगळे सैनिक समोर असलेल्या शत्रूकडे पाहत

राहिले. पथकाचा कमांडर हुकूम केव्हा देतो याची वाट पाहत राहिले. एकामागून एक असे आणखी दोन गोळे त्यांच्या जवळून गेले. शत्रूचा रोख घोडेस्वारांवर होता यात शंका नव्हती. परंतु तोफेचे गोळे ठराविक तऱ्हेने आणि वेगाने डोक्यावरून उडून जात जमिनीवर आदळत होते.

घोडेस्वार मागे वळून पाहत नसत. मात्र प्रत्येक उडणाऱ्या गोळ्याचा आवाज होई आणि गोळा सुसाटत जाऊ लागे. तेव्हा ते सर्व रिकिबीतच पाय ठेवून उभे राहत आणि मग खाली कोसळत. त्या सर्वांत साम्य असे नव्हते. तरीही अशा वेळी त्यांच्या मुद्रा एकसारख्या होत. ते मागे वळून पाहत नसत, तरीही डोळ्यांच्या कोपऱ्यातून एकमेकांकडे पाहत. आपल्या सहकाऱ्यांवर काय परिणाम झाला हे जाणण्याची त्यांची जिज्ञासा असे. डेनिसॉव्हपासून बिगुल वाजवणाऱ्यापर्यंत सर्वांच्या चेहऱ्यावर संघर्ष, अस्वस्थता आणि प्रक्षुब्धता दाखवणाऱ्या रेषा उमटत होत्या.

डाव्या बाजूस रोस्तॉफ आपल्या रूक घोड्यावर स्वार झाला होता. शाळकरी मुलांच्या प्रसन्नवृत्तीनं तो वावरत होता. आपण तोफेच्या माऱ्यापुढेही किती निश्चिंत आहोत इकडे जणू सर्वांचे लक्ष वेधून घेण्यासाठी तो प्रत्येकाकडे शांत आणि उत्साही मुद्रेने पाहत होता. आपला दांडगा घोडा संथ धिम्या चालीने डेनिसॉव्हकडे वळवला.

'मला वाटतं लढाईची वेळच येणार नाही. पुन्हा एकदा माघार घ्यावी लागणार' तो डेनिसॉव्हला म्हणाला.

'साले काय करताहेत कुणास ठाऊक!' डेनिसॉव्ह गुरगरला. मग रोस्तॉफच्या उत्साही चेहऱ्याकडे लक्ष जाताच तो म्हणाला, 'काय रोस्तॉफ, तुला फार थांबावं लागलं नाही. होय ना?' मग त्याने सम्मतीदर्शक हास्य केले. रोस्तॉफला पाहून त्याला आनंद झाला होता यात शंका नव्हती. रोस्तॉफला कृतार्थ वाटले.

तेवढ्यात कर्नल पुलाजवळ आला. त्याच्याकडे डेनिसॉव्हने घोडा वळवला.

'महाराज, आपण हल्ला करू या. त्यांचा बंदोबस्त करून टाकू.'

'हल्ला करायचा म्हणतोस?'

वैतागलेल्या आवाजात कर्नल म्हणाला, 'तुम्ही इकडे थांबला आहात ते का म्हणून? सैन्य मागे जातं आहे हे पाहतो आहेस ना? सगळ्या स्क्वॉड्रनला मागे आण.'

स्क्वॉड्रनने पूल ओलांडला आणि एकही सैनिक गमावू न देता ते शत्रूच्या गोळीबाराच्या टप्प्यापलीकडे गेले. त्यामागून दुसरे पथक गेले. सर्वांच्या मागून घोडेस्वारांचे पथक गेले आणि शत्रूच्या बाजूची नदीकाठची जागा त्यांनी मोकळी सोडली.

पावलोग्रॅड रेजिमेंटच्या दोन्ही घोडेस्वार पथकांनी पूल ओलांडला आणि एकामागून एक अशी ती दोन्ही पथके टेकडीवर चढली. त्यांचा कर्नल कार्ल बॉग्डॅनिच शूबर्ट डेनिसॉव्हच्या

पथकाला मिळाला होता. रोस्तॉफपासून तो फारसा दूर नव्हता.

टेल्यानिन प्रकरण घडल्यापासून खरे तर पहिल्यांदाच त्या दोघांची गाठ पडली होती. पण रोस्तॉफकडे लक्ष न देता कर्नल आपला घोडा धिम्म्या चालीने नेत होता. आघाडीवर असलेल्या रोस्तॉफला आपण चुकल्याचे त्याने मनोमन कबूल केले. एकेकाळी व्यायामपटू असलेल्या कर्नलची पाठ, त्याचे पिंगट केस आणि त्याची लालबुंद मान यांवरून त्याची नजर दूर होत नव्हती. बॉग्डॅनिच मुद्दामच शक्तीचे प्रदर्शन करण्यासाठी आपल्या जवळून घोडा नेतो आहे अशी कल्पना त्याच्या डोक्यात आली. शत्रूचे पथक मुद्दामच आपल्याला शिक्षा करण्यासाठी परतवता न येणारा हल्ला करणार आहे असे त्याला वाटले. मग तो स्वप्न रेखाटू लागला... हल्ला झाला आहे ..आपण जखमी झालो आहोत...त्यांच्याकडे आपण गेलो आहोत—मोठ्या उदार मनाने आपण समेटासाठी हात पुढे करतो आहोत...पावलोग्रॅड रेजिमेंट सोडून नुकताच गेलेला आणि त्यामुळे घोडेस्वारांना परिचित असलेला उंच खांद्याचा झेर्कॉफ कर्नलकडे येऊन पोचला.

पिछाडीच्या संरक्षकदलाच्या कमांडरचा हुकूम घेऊन तो आपल्या जुन्या कर्नलकडे आला होता.

'कर्नल महाशय,' रोस्तॉफच्या शत्रूला उद्देशून आणि आपल्या सहकाऱ्यांकडे नजर टाकीत आपल्या नेहमीच्या उदास गंभीरपणाने तो म्हणाला, 'मागे जाऊन पूल जाळून टाका असा हुकूम आहे.'

'हुकूम? कोणाला आहे हुकूम?' कर्नलने दटावले.

'महाशय, कोणाला ते मला माहीत नाही.' तो अधिकारी गंभीरपणाने म्हणाला, 'मला प्रिन्स बॅग्रेशनने हुकूम दिला. घोडा पिटाळून कर्नलकडे जा आणि सांग, घोडेस्वारांना तातडीने मागे वळून पूल जाळायला सांगा.'

झेर्कॉफमागून दुसरा एक अधिकारी घोड्यावरून आला. त्याने तोच हुकूम पोचता केला. त्या अधिकाऱ्यानंतर कोसॅकच्या घोड्यावरून नेस्विट्स्कीची लठ्ठ मूर्ती येताना दिसली. त्याच्या घोड्याला दौड करताना कष्ट होत असल्याचे दिसत होते.

घोडा कर्नलच्या दिशेने पिटाळता पिटाळताच नेस्विट्स्की कर्नलला म्हणाला, 'कर्नल, मी तुम्हांला पूल जाळायला सांगितलं. आता कुणी घोटाळा केला कळत नाही. सगळ्यांची डोकी फिरली आहेत. कुणाला काही समजलेलं दिसत नाही.'

कर्नलने आरामात रेजिमेंट थांबवली, आणि तो नेस्विट्स्कीला म्हणाला, 'तुम्ही मला जाळण्याबद्दल बोलला होता. पण पूल जाळण्याबद्दल एक शब्दही उच्चारला नव्हता.

नेस्विट्स्की थांबला. त्याने आपली साधी टोपी काढून घेतली, आणि घामाने भिजलेल्या आपल्या केसांवरून गुबगुबीत हात फिरवीत तो म्हणाला, 'भल्या माणसा, जळत्या वस्तू पुलावर टाकल्यावर 'पूल जाळून टाका.' असं सांगण्याची काही जरुरी होती का?'

'मी काही तुमचा भला माणूस नव्हे! तुम्ही मला पूल जाळून टाकायचा हुकूम कधीच दिला

नव्हता. मी माझी जबाबदारी जाणतो. हुकुमाची तंतोतंत अंमलबजावणी करणं एवढंच मला ठाऊक आहे. पूल जळेल असं तुम्ही म्हणाला होता. पूल कोणी जाळायचा हे मला ठाऊक नव्हतं.'

' स्टाफ ऑफिसर, तुम्ही म्हणालात...' कर्नल बोलू पाहत होता. त्याचा स्वर दुखावलेला होता. तेवढ्यात दुसऱ्या खास अधिकाऱ्याने मधेच म्हटले, ' कर्नल, आता आपण त्वरा करणं आवश्यक आहे. नाहीतर शत्रू अगोदरच तोफा वर आणायचा.'

खास अधिकारी, लठ्ठ स्टाफ् ऑफिसर आणि झेर्कॉफ यांच्याकडे मुकाट्याने पाहत कर्नलने रोषाने आठ्या घातल्या.

' मी पूल जाळून टाकतो. ' कर्नलने शपथ घेतल्यागत गंभीर स्वरात शब्द उच्चारले. जणू त्याला म्हणायचे होते, ' तुम्ही मला कितीही प्रकारे त्रास दिलात तरी मी माझं कर्तव्य करणार आहे.'

कर्नलने आपले बळकट पाय घोड्यावर हाणले. जणू घोडाच सर्वस्वी दोषी होता. मग कर्नलने पुढे सरून डेनिसॉव्हच्या ताब्यात असलेल्या दुसऱ्या स्क्वॉड्रनला पुलाकडे परत जायचा हुकूम दिला. ह्याच स्क्वॉड्रनमध्ये रोस्तॉफ होता.

' खात्रीनं असंच असलं पाहिजे. ' रोस्तॉफच्या मनात आले. कर्नलला माझी परीक्षा घ्यायची आहे. त्याचे काळीज उडू लागले. रक्तप्रवाह जोराने मस्तकाकडे वाहू लागला, ' पाहू दे त्याला मी भित्रा आहे की नाही ते.'

रोस्तॉफ स्थिरपणे आपल्या शत्रूच्या कर्नलच्या तोंडाकडे पाहू लागला. कर्नलने मात्र एकदाही त्याच्याकडे पाहिले नाही. हुकूम दिला गेला. काय करायचे ते ठाऊक नव्हते तरी घोडेस्वार खाली उतरले. प्रत्येक सैनिकाने क्रूसची खूण केली. आता रोस्तॉफला कर्नलकडे पाहायला वेळ नव्हता. घोडेस्वारांनी मागे टाकल्यामुळे तो घाबरला, त्याचे काळीज गलबलले.

' स्ट्रेचर हवेत ' मागून कोणीतरी ओरडले. स्ट्रेचरच्या आवश्यकतेचा अर्थ रोस्तॉफच्या डोक्यात शिरलाच नाही. सगळ्याच्या पुढे राहण्यासाठी केवळ तो धावपळ करू लागला. त्याने खाली पाहिले नाही, त्यामुळे तो पुलापाशीच निसरड्या तुडवलेल्या चिखलात गेला. अडखळून पडताना त्याने हात टेकले. बाकीचे त्याला टाकून पुढे गेले.

' कॅप्टन, सैन्य दोन्ही बाजूंनी घ्या. ' कर्नल ओरडल्याचे त्याला ऐकू आले. कर्नलने घोडा पुढे नेऊन विजयी आणि आनंदी मुद्रेने पुलाजवळ खेचून धरला होता.

रोस्तॉफने आपल्या विजारीला चिखलाचे हात पुशीत शत्रूकडे पाहिले. आपण जितके पुढे जाऊ तितके ते चांगले होईल अशा कल्पनेने तो पुढे धावणार होता.

एवढ्या वेळात नेस्विट्स्की, झेर्कॉफ आणि तो खास अधिकारी शत्रूच्या माऱ्याच्या टप्प्याबाहेर राहून पिवळ्या टोप्या, बेडकाच्या आकृतीचे भरतकाम केलेली गडद हिरवी जाकिटे आणि निळ्या विजारी घातलेल्या माणसाचा लहानसा जमाव पुलावर गर्दी करत असलेला पाहत होते. नदीच्या पैलतीरावर दूरवरून निळ्या जाकिटांचे सैनिक आणि तोफांसारखे वाटणारे

घोडे घेऊन येणारी माणसे ते पाहत होते.

' ते पूल जाळणार आहेत की नाहीत ? प्रथम कोण पोचणार आहे ? ते धावत जाऊन पूल जाळतील का ? की त्या आधीच फ्रेंच सैन्याच्या गोळीबारात ठार होतील ? ' वरून पुलाकडे पाहणाऱ्या त्या प्रचंड सैन्यातील प्रत्येकजण धडधडत्या अंतःकरणाने हेच प्रश्न स्वतःलाच विचारीत होता. संध्याकाळचे लख्ख ऊन पडले होते. पुलाकडे, घोडेस्वारांकडे आणि दुसऱ्या बाजूने संगिनी आणि बंदुका रोखून वर चढणाऱ्या, निळी जाकिटे घातलेल्या सैनिकांकडे प्रत्येकजण टक लावून पाहत होता.

' अरेरे ! आता घोडेस्वार सापडतील. आता ते गोळ्यांच्या वर्षावाच्या टप्प्यात आले आहेत. '

' त्यानं इतकी माणसं नेली ही चूकच झाली. ' खास अधिकारी म्हणाला.

' अगदी खरं. त्यानं दोन धाडशी माणसं पाठवली असती तरी काम झालं असतं. ' नेस्विट्स्की म्हणाला.

' मला वाटतं आता गोळीबार सुरू होतो आहे ' खास अधिकारी म्हणाला. त्याने फ्रेंचांच्या तोफांच्या दिशेने बोट केले. गाड्यांतून केव्हाच बाहेर काढलेल्या तोफा घाईघाईने हलवल्या जात होत्या.

फ्रेंच सैन्याच्या बाजूने ज्याच्याकडे तोफा होत्या त्या त्या जमावातून धूर निघत होता. धुराचे लोट एकाच वेळी ठिकठिकाणाहून निघत होते. ज्या वेळी त्यांना पहिल्या तोफेचा आवाज ऐकू येई त्याच वेळी चौथ्या ठिकाणचा धुराचा लोट दिसे. एकामागोमाग दोनदा निनादणारे आवाज होत. मग तिसऱ्यांदा होई.

' अरेरे ! ' नेस्विट्स्की खास अधिकाऱ्याच्या हाताला घट्ट पकडून करुण स्वरात म्हणाला, ' बघा एकजण कोसळलाच, अरे देवा ! '

' मला वाटतं दोघेजण कोसळलेत. '

' मी झारच्या जागी असतो तर लढाईच केली नसती. ' तिथून फिरत नेस्विट्स्की म्हणाला.

पुन्हा फ्रेंचांच्या तोफांत दारूगोळा मोठ्या जलदीने ठासून भरण्यात आला. पायदळाचे निळ्या जाकिटातील सैनिक पुलाच्या दिशेने धावत होते. पुनः वेगवेगळ्या वेळी धुराचे लोट उठले आणि सणाणत आलेल्या गोळ्यांचा पुलावर ताडताड वर्षाव झाला.

पुलावर एक दाट धुराचा ढग उठला होता. पुलाला पेटवण्यात घोडेस्वारांना यश मिळाले होते. त्यांना थांबवण्यासाठी नव्हे तर तोफा वर आणल्या असल्याने कोणावर तरी गोळ्या सोडल्याच पाहिजेत म्हणून फ्रेंचांकडून गोळ्यांचा भडिमार सुरू झाला होता.

आपल्याला काय करायचे आहे हे त्याला ठाऊक नव्हते तरीही रोस्तॉफने पुलावर पाऊल टाकले. ज्याला तलवारीने कापून काढता येईल असे कोणीही पुलावर नव्हते. ( त्याने लढाईचे असले चित्र स्वतःशी रंगवलेले होते. ) पुलाला आग लावण्यासाठीही त्याचा काही उपयोग नव्हता. इतर सैनिकांप्रमाणे त्याने बरोबर गवत आणले नव्हते. तो उभा राहून भोवती पाहू

लागला. तेवढयात पुलावर असंख्य कठीण कवचांची फळे फेकल्यासारखा आवाज ऐकू आला. त्याच्या जवळच उभा असलेला घोडेस्वार कठडयावर पडून कण्हू लागला. इतरांप्रमाणे रोस्तॉफनेही त्याच्याकडे धाव घेतली. पुनः कुणी तरी ओरडले. 'स्ट्रेचर आणा.' चौघेजण त्या जखमी सैनिकाला स्ट्रेचरवर ठेवण्यासाठी उचलू लागले. तसा तो आक्रंदन करू लागला. 'ओय...ओय...असाच राहू द्या...दया करा...' तरीही त्यांनी त्याला उचलून स्ट्रेचरवर ठेवले. निकोलाय रोस्तॉफने तिथून नजर वळवली आणि तो काही शोधत असल्यासारखा दूरवर पाहू लागला. मग डॅन्यूब नदीच्या प्रवाहाकडे पाहू लागला, मग आकाशाकडे, मग सूर्याकडे... आकाश किती प्रसन्न होते...निळेभोर...शांत आणि अगाध. मावळता सूर्य किती उजळलेला होता, किती जयशाली वाटत होता.

दूरवर पसरलेल्या डॅन्यूबच्या प्रवाहावरील झळाळी किती विलोभनीय होती आणि त्याहूनही विलोभनीय होते डॅन्यूबच्या पलीकडील निळाईचे दर्शन घडवणारे दूरस्थ पर्वतराज, जोगिणींचा मठ, अद्‌भुतरम्य गिरिकंदर, धुक्यात पार बुडून गेलेली पाइन वृक्षांची अरण्ये...तेथे केवळ शांती आणि सौख्य यांची वस्ती होती. तिथे राहता येईल तर मला आणखी कशाचीही इच्छा उरणार नाही.

'आकाशस्थ परमेश्वरा, आमचे रक्षण कर, आम्हाला क्षमा कर, आमचे प्राण वाचव. रोस्तॉफ स्वतःशीच पुटपुटला.

घोडेस्वार आपल्या घोडयांकडे धावले. त्यांचे बोलणे मोठमोठयाने सुरू झाले, बोलण्यात अधिक आत्मविश्वास आला होता. आता स्ट्रेचर दिसेनासे झाले होते.

'सगळं संपलं आहे पण मी मात्र भित्रेपणानं वागलो. फारच भित्र्यासारखा वागलो.' रोस्तॉफच्या मनात आले.

त्याने एक दीर्घ उसासा टाकला आणि तो घोडयावर चढला. 'कोणाच्याच काही लक्षात आलेलं दिसत नाही असं वाटतं.' रोस्तॉफच्या मनात आले आणि खरोखरच कोणाच्याही लक्षात आलेले नव्हते.

'प्रिन्सला बातमी द्या. मी पूल पेटवून दिला म्हणून' आनंदी आणि विजयी स्वरात कर्नल म्हणाला.

'हानी किती झाली आहे असं विचारलं तर काय सांगू?'

'नाव घेण्याजोगी नाही.' कर्नलचे धीरगंभीर स्वर उमटले. 'दोन घोडेस्वार जखमी झाले, एक गोळी लागून जागच्या जागी गेला.'

बोनापार्टच्या नेतृत्वाखालील एक लक्ष फ्रेंच सैन्याने पाठलाग केला. स्थानिक लोकांनी वैरभावाने वागवले, दोस्त राष्ट्रांवरचा विश्वास उडाला. अन्नादी पुरवठ्याच्या कमतरतेमुळे हाल झाले आणि पस्तीस हजार रशियन सैनिकांना अकल्पित परिस्थितीला तोंड द्यावे लागले. कुटूझॉफच्या नेतृत्वाखाली असलेल्या रशियन सैन्याला अखेर पराभव स्वीकारून घाईघाईने डॅन्यूब नदीच्या काठावरील सखल प्रदेशाचा आश्रय घ्यावा लागला.

उल्म येथे शत्रूच्या तावडीतून निसटलेले आणि ब्रॉमा इथे कुटूझॉफच्या सैन्याला येऊन मिळालेले ऑस्ट्रियन सैन्य रशियन सैन्यास सोडून गेले. कुटूझॉफच्या दुर्बल आणि थबकलेल्या सैन्याला आता कोणाचाच आधार उरला नाही. व्हिएन्नाच्या रक्षणाचा विचार आता स्वप्नातही करायला नको.

कुटूझॉफपुढे आता एकच मार्ग उरला होता. उल्म येथे मॉकने जसे सैन्य गमावले तसे सैन्य न गमावता रशियाहून येणाऱ्या नव्या सैन्याला गाठणे.

२८ ऑक्टोबर रोजी कुटूझॉफचे सैन्य डॅन्यूब नदी ओलांडून डाव्या तीरावर गेले आणि शत्रूचे बरेचसे सैन्य नदीपलीकडे असतानाही त्याच्या सैन्याने प्रथमच मुक्काम ठोकला. तळ दिला.

तीस तारखेला कुटूझॉफने डॅन्यूबच्या डाव्या तीरावर असलेल्या मॉर्टिअरच्या एका विभागावर हल्ला करून त्याचा पराभव केला. ह्या लढाईत त्याने प्रथम निशाण, तोफा आणि शत्रुपक्षाचे दोन जनरल अशी विजयचिन्हे हस्तगत केली. पंधरवडाभर माघार घेतल्यावर पहिल्यांदाच रशियन सैन्याने मुक्काम ठोकला होता. लढाईचे क्षेत्र सोडले नव्हते. एवढेच नव्हे तर फ्रेंच सैनिकांना पार हुसकावून लावले होते. रशियन सैन्याला पुरेसे कपडे नव्हते. ते फार थकून गेले होते. एकतृतीयांश सैनिक जखमी झाल्याने वा मारले गेल्याने किंवा पराभूत झाल्याने सैन्य दुर्बल झाले होते, आणि जखमी सैनिकांना डॅन्यूबचा पलीकडच्या तीरावरच ठेवण्यात आले होते आणि 'तुमच्या मानवतेवर विसंबून तुमच्यावर त्यांना सोपवीत आहोत' अशा अर्थाचे कुटूझॉफने शत्रूला लिहिले होते.

अशा प्रतिकूल परिस्थितीत क्रेम्सच्या अलीकडे दिलेला तळ आणि मॉर्टिअरचा पराभव यामुळे सैन्यात चैतन्य आले होते. ऑस्ट्रियन सैनिकांनी कुठेतरी विजय मिळवला आहे आणि नेपोलियन घाबरून पळ काढीत आहे अशा तऱ्हेच्या उत्साही करणाऱ्या परंतु निराधार वावड्या सर्व सैनिकांतच नव्हे तर अधिकारीवर्गातही उठत होत्या.

प्रिन्स आन्द्रेची गाडी ब्रुन शहरात शिरली तेव्हा रात्र झाली होती.

परंतु राजवाड्याच्या मुख्य प्रवेशद्वाराशी भेटायला आलेल्या अधिकाऱ्याला प्रिन्स आन्द्रे खास निरोप घेऊन आल्याचे कळले तेव्हा त्याने प्रिन्स आन्द्रेला दुसऱ्या प्रवेशद्वारापाशी नेले.

कामावर असलेल्या ॲड्ज्युटंटने आन्द्रेची भेट होताच त्याला थांबायला सांगितले आणि तो युद्धमंत्र्यांच्या ऑफिसात शिरला. पाच मिनिटांत तो परत आला. लक्षात येईल अशा तऱ्हेने झुकून त्याने प्रिन्स आन्द्रेला आपल्या मागून यायची विनंती केली. कॉरिडॉरमधून त्याला

युद्धमंत्र्यांच्या खाजगी दालनात नेले.

युद्धमंत्र्यांच्या दालनाकडे जाता जाता प्रिन्स आन्द्रेची उत्साही वृत्ती कितीतरी मावळली. आपणास अनादराने वागवले जात आहे अशी त्याची भावना झाली आणि या भावनेतून त्याच्या नकळत अनावश्यक आणि अयोग्य अशा तिरस्काराच्या भावनेचा जन्म झाला. अॅड्ज्युटंट आणि युद्धमंत्री ह्या दोघांबद्दल आपणास तिरस्कार वाटतो ते योग्यच आहे अशा प्रकारचे मत त्याच्या तल्लख मेंदूत बनले. 'ज्यांनी दारुगोळा कधी पाहिलेला नाही, त्यांना विजय मिळवणे म्हणजे यःकश्चित गोष्ट वाटत असली पाहिजे' असे त्याला वाटू लागले. तिरस्काराने त्याने डोळे मिटून घेतले.

युद्धमंत्री कसलेतरी कागदपत्रे वाचून त्यावर पेन्सिलीने खुणा करीत होता. दरवाजा उघडला गेला आणि पावलाचा आवाज झाला तरीही नजर वर न उचलता तो आपला अखेरपर्यंत वाचतच राहिला.

'हे घेऊन त्याला दे' युद्धमंत्री आपल्या अॅड्ज्युटंटला कागदपत्रे देत म्हणाला. त्याने रशियन अॅड्ज्युटंटची दखलही घेतली नाही.

एकामागून एक येणाऱ्या अर्जदारांची भेट घेणाऱ्या माणसाच्या चेहऱ्यावर जसे मूर्खपणाचे हास्य असते– जे खोटे असते आणि खोटे असल्याचे लपून राहात नाही– तसे हास्य त्याच्या मुद्रेवर पसरले.

'जनरलकडून-फील्ड मार्शल कुटूझॉफकडून आलात होय ना? आशा आहे चांगली बातमी आणली असेल. मॉर्टिअरशी लढाई झाली की नाही? विजय मिळाला का?' तो चौकशी करू लागला. मग त्याने आपल्यासाठी असलेली कागदत्रे घेऊन ती कष्टी चेहऱ्याने वाचायला सुरुवात केली.

'अरे देवा! श्मिट गेला!' तो जर्मन भाषेत उद्गारला. 'मोठं संकट ओढवलं.' त्याने कागदपत्रे वरवर चाळली, मग ती टेबलावर ठेवून दिली. प्रिन्स आन्द्रेकडे पाहत तो कशाचा तरी विचार करीत राहिला.

'तुम्ही चांगली वार्ता आणली. आनंद वाटला. मी तुमचा आभारी आहे. तुम्हाला विश्रांतीची गरज असेल. उद्या सैन्याच्या पाहणीनंतर सम्राट लोकांना भेटतील तेव्हा तुम्ही उपस्थित राहा. सम्राटांना तुमची भेट घ्यावी असे निश्चित वाटेल.' असे बोलून त्याने प्रिन्स आन्द्रेचे पुन्हा आभार मानले आणि डोके झुकवून निरोप दिला.

प्रिन्स आन्द्रे ब्रुन शहरात वकिलातीत नोकरी करणाऱ्या बिलिबिन नावाच्या रशियनाकडे राहिला.

बिलिबिनने भेट होताच म्हटले, 'प्रिन्स आन्द्रे, आपल्या भेटीने मला अतिशय आनंद झाला

आहे.' मग बोलकॉन्स्कीला आत घेऊन येणाऱ्या नोकरास आपल्या झोपण्याच्या खोलीत त्याचे सामान नेऊन ठेवण्याची सूचना देऊन तो प्रिन्स आन्द्रेला म्हणाला, 'तुम्ही विजयाची वार्ता घेऊन आला असाल ? फार छान. मला आजारपणामुळे बाहेर पडता येत नाही.'

प्रिन्स आन्द्रेने तोंड धुतले, कपडे बदलले. मग तो परराष्ट्र वकिलाच्या सुखसोयींनी समृद्ध अशा अभ्यासिकेत बसला आणि त्याच्यासाठी बनविलेल्या भोजनास बसला. बिलिबिन शेगडी-जवळ शांतपणे बसून होता.

केवळ प्रवासामुळे नव्हे तर कूच करणाऱ्या सैनिकाबरोबर वेळ गेल्यामुळे प्रिन्स आन्द्रेला स्वच्छता आणि नीटनेटकेपणा यांवर पाणी सोडावे लागले होते. त्यामुळेच की काय बाळपणा-पासून सराव झालेल्या व सुखसोयींनी सज्ज असलेल्या अभ्यासिकेत येताच प्रिन्स आन्द्रेला विश्रांती सुखाची आणि हवीहवीशी वाटू लागली. सगळेजण फ्रेंचमध्ये बोलत असल्याने आन्द्रे-लाही रशियन भाषेत बोलायला मिळणार नव्हते.

पस्तीस वर्षांचा अविवाहित बिलिबिन प्रिन्स आन्द्रेच्या परिचितांतील होता. त्या दोघांची ओळख पीटर्सबर्ग येथे झाली होती. पण व्हिएन्ना येथे प्रिन्स आन्द्रे कुटूझॉफबरोबर राहिला होता तेव्हा त्यांची मैत्री जमली होती. प्रिन्स आन्द्रेसारखा तरुण सैनिकी पेशात खूप कर्तबगारी गाजवील असे वाटत होते. वकिलातीत बिलिबिन त्याहूनही कर्तृत्व दाखवील असे वाटत होते. बिलिबिन अद्याप तरुण असला तरी वकिलातीतील सोळा वर्षांच्या सेवेचा अनुभव त्याच्यापाशी होता. तो पॅरिस, कोपनहेगन येथे राहिला होता. आता तो व्हिएन्ना येथे महत्त्वाच्या जागेवर होता.

वकिलातीत ज्यांना कामाची समज आणि आवड असते अशा माणसांपैकी तो एक होता. स्वभावतः आळशी असूनही तो रात्र रात्र जागून लेखन करीत राही. कामाचे स्वरूप काहीही असले तरी तो ते मन लावून करी. 'का' या प्रश्नापेक्षा 'कसे' ह्या प्रश्नातच तो गुंतलेला असे. मुद्देसूद आणि सुरेख शब्दात आदेशपत्रे, परिपत्रके काढणे वा अहवाल तयार करणे असली कामे त्याला फार आवडत. वरिष्ठ गोटातील त्याचे वागणे बोलणे इतके सहज असे की त्यामुळे त्याच्या त्या गुणांची वाहवा होई.

साध्या सामान्य माणसानेही ऐकून बैठकीत पसरावीत अशी वाक्ये बिलिबिनच्या मनाच्या प्रयोगशाळेत मुद्दाम घडवली जात असावीत. व्हिएन्ना शहरातील बिलिबिनच्या ह्या निर्मितीचा शोध घेतला जाई. तथाकथित महान प्रसंगावर ह्या निर्मितीचा प्रभाव पडल्यावाचून राहात नसे.

'तुझ्या विजयाबद्दल काही सांग ना,' तो म्हणाला.

बोलकॉन्स्कीने अती नम्रपणे स्वतःचा उल्लेख न करता लढाईची हकिगत सांगितली. शेवटी युद्धमंत्र्याने आपले कसे स्वागत केले ते सांगून तो म्हणाला, 'गल्लीत चेंडूफेक करून बाटल्या पाडण्याचा खेळ खेळताना कुत्रा यावा तसं माझ्या बातमीनं झालं.'

बिलिबिन हसला तेव्हा त्याच्या चेहऱ्यावरील सुरकुत्या दिसेनाशा झाल्या. आपल्या बोटाची नखे दूर धरून त्याकडे पाहत तो म्हणाला, 'तुमच्या पवित्र रशियन सैन्याबद्दल मला आदर असला तरीही मित्रा, मला वाटतं तुमचा विजय खास विजय आहे असं नाही.'

तो फ्रेंचमध्ये बोलत राहिला. मात्र ज्या शब्दांना तुच्छतेचा स्वर त्याला द्यायचा होता ते शब्द त्याने रशियन भाषेत उच्चारले, ' तू कारण विचारशील तर सांगतो. एकच तुकडी असलेल्या बिचाऱ्या दुर्दैवी मॉर्टिअरवर तुमचे सगळेच्या सगळे सैन्य तुटून पडले आणि तरीही मॉर्टिअर तुमच्या हातावर तुरी देऊन निसटला. कुठे आहे विजय ? '

' खरं सांगायचं तर हा विजय उल्मपेक्षा अधिक चांगला आहे असं म्हटलं तर बढाई होऊ नये.' प्रिन्स आन्द्रे म्हणाला.

' पण तुम्ही निदान एक तरी मार्शल पकडून का आणला नाही ? '

' अपेक्षेप्रमाणे प्रत्येक गोष्ट कधीच होत नाही. परेडच्या नियमितपणाने काही घटना घडत नसतात. सकाळी सात वाजता शत्रूच्या पिछाडीवर हल्ला करू अशी अपेक्षा बाळगून होतो. पण आम्ही संध्याकाळी पाचपर्यंत पोहोचलोच नाही. '

' प्रश्न हा आहे की तुम्ही सकाळी सात वाजता का हल्ला केला नाही ? तुम्ही सकाळी सात वाजता पोचायला हवे होता.' बिलिबिन स्मित करीत म्हणाला.

बिलिबिन म्हणाला, ' शेगडीजवळील सोफ्यावर बसल्या बसल्या तुम्हाला वाटतं-मार्शलांना पकडणं फार सोपी गोष्ट आहे म्हणून. ते खरंही असेल. पण तुम्ही त्याला पकडलं का नाही ? युद्धमंत्र्याप्रमाणंच सम्राट आणि फ्रान्सिस राजे यांनाही तुमच्या विजयाने फार आनंद झाला नाही हे सांगितलं तर आश्चर्यचकित होऊ नका. रशियन वकिलातीतील माझ्यासारख्या साध्या सेक्रेटरीलाही आनंद साजरा करण्याची गरज वाटत नाही.'

मग बोलकॉन्सी बोलू लागला, ' आता मला स्पष्टीकरण विचारू द्या. मी आधीच कबूल करतो की माझ्या अल्पमतीला तुमच्या परराष्ट्रनीतीतील बारकावे कळत नाहीत. मॅकने सर्व सैन्य गमावले, आर्चड्यूक फर्निनंड आणि आर्चड्यूक कार्ल यांनी जिवंतपणाची लक्षणेही दाखवली नाहीत. ते एका मागून एक भयंकर चुका करीत राहिले. '

' तुमच्या विजयाशी आम्हाला-ऑस्ट्रियन सरकारला काय करायचं आहे ? '

' आर्चड्यूक कार्ल स्वस्थ आहे. आर्चड्यूक फर्निनंडला तोंड दाखवायला जागा नाही, तुम्ही व्हिएन्ना सोडून दिलं आहे, त्याचं संरक्षण करायचं नाही असा बेत केलेला आहे.'

' आमच्या आवडत्या जनरल श्मिटला तुम्ही तोफेच्या तोंडी दिलंत आणि तुमच्या विजया-बद्दल तुम्ही आमचं अभिनंदन करता आहात... तुम्ही आता आणलेल्या गोष्टीहून अधिक संतापजनक गोष्टीची कल्पनाही करणं शक्य नाही, हे तुम्हाला कबूल करावं लागेल. कदाचित यामागं काही हेतू असावा-ही गोष्ट जाणूनबुजून झाली असावी.'

' त्यापेक्षा आणखी गोष्टी घडताहेत. बोनापार्ट शॉंब्रेनला पोचला आहे. आमचे काऊंट त्याचे आदेश घेण्यासाठी त्याच्या भेटीस जाणार आहेत. '

' काऊंट लिक्टनफल्स आता सकाळी येथे येऊन गेले. त्यांनी मला व्हिएन्ना येथील फ्रेंच सैन्याचे तपशीलवार वर्णन करणारं पत्र दाखवलं. प्रिन्स म्युरा आणि इतर अधिकाऱ्यांचं वर्णन आहे. '

' पण व्हिएन्नाचा पाडाव कसा झाला ? तिथला पूल आणि संरक्षणाची भक्कम फळी असतान असं कसं घडलं ? प्रिन्स ऑउर्स्पर्ग व्हिएन्नाचा बचाव करणार असल्याच्या वार्ता होत्या.' प्रिन्स आन्द्रे म्हणाला.

' प्रिन्स ऑउर्स्पर्गचा ह्या बाजूला–आमच्या बाजूला मुक्काम आहे. दुबळेपणाने का होईन पण तो आमचे संरक्षण करतो आहे हे खरं. व्हिएन्ना शहर दुसऱ्या बाजूस-नदीच्या त्या तीरावर आहे.'

' तरीही याचा अर्थ मोहीम संपली असा काही होत नाही ' प्रिन्स आंद्रे म्हणाला.

' मला मात्र वाटते मोहीम संपली आहे. इथली सगळी बडी धेंडे असेच मानताहेत. त्यांना तसे उघड बोलायचे धैर्य नाही एवढेच.'

' तुला मी माझं मत सांगतो. ऑस्ट्रियाला अशा प्रकारे हास्यास्पद होण्याची कधी सवय नाही. ऑस्ट्रिया सूड घेतल्याखेरीज राहणार नाही. ऑस्ट्रियाच्या प्रदेशातून लूटमार होते आहे. (पवित्र रशियन सैन्य निर्दयपणे लुटालूट करत असल्याची बातमी आहे), ऑस्ट्रियाच्या सैन्याचा नाश झाला आहे, राजधानी शत्रूनं बळकावली आहे, मित्रा, तुला खाजगी मत सांगतो...मला मनोमन वाटत आहे की आमची फसवणूक होते आहे...फ्रान्सबरोबर वाटाघाटी करून शांततेचा मार्ग गुप्तपणे शोधला जाईल असं माझं मन सांगतं आहे.'

' अशक्य ! तसं झालं तर अधःपातच झाला असं म्हणावं लागेल.'

' ते काळच ठरवील.' बिलिबिन म्हणाला.

प्रिन्स आन्द्रे ऑस्ट्रियन अधिकाऱ्यांमध्ये नेमून दिलेल्या जागी उभा होता. सम्राट फ्रान्सिस उत्सुकतेने आंद्रेच्या चेहऱ्याकडे पाहत होता आणि आपले लांबट डोके हालवीत होता. हा स्वागताचा समारंभ आटोपल्यावर आदल्या रात्रीचा ॲड्ज्युटंट आंद्रेकडे आला आणि त्याने मोठ्या शिष्टाचारपूर्वक निरोप दिला–' सम्राटांनी तुम्हाला खास भेटीसाठी बोलावलं आहे.' सम्राट फ्रान्सिसने दालनाच्या मध्यभागी उभ्या उभ्या आंद्रेचे स्वागत केले, संभाषणाला प्रारंभ करण्यापूर्वी सम्राट फ्रान्सिस संकोचल्यासारखा वाटला. त्याला काय बोलायचं ते कळेना. तो लालबुंद झाला. ह्या गोष्टीचे प्रिन्स आंद्रेला आश्चर्य वाटले.

' मी ड्यूरेन्स्टिनला होतो त्या ठिकाणी संध्याकाळी सहा वाजता सैन्याने हल्ला करण्यास सुरुवात केली.' आता आपणास अचूक तपशीलवार वर्णन देता येईल, आपल्या डोक्यात सारे तयार आहे. आणि आपण स्वतःच त्या घटना पाहिल्या असल्याने चांगल्या तऱ्हेने सांगू.' असे विचार बोलकॉन्स्कीच्या मनात आले आणि तो संधीची वाट पाहू लागला.

परंतु सम्राटाने हसून त्याला नवीन प्रश्न विचारला.

' किती मैल अंतर आहे ?'

'कुठून कुठपर्यंत?'

'डयूरेन्स्टिन आणि क्रेम्स यांमधे.'

'साडेतीन मेल अंतर आहे महाराज.'

'फ्रेंच सैन्य डावे तीर सोडून गेले काय?'

'शेवटची तुकडी तराफ्याच्या मदतीनं रात्री पळाली अशी टेहळणी पथकाची बातमी आहे.'

'क्रेम्स येथे तुम्हाला पुरेशी सामग्री मिळाली होती काय?'

'असावी तेवढी नव्हती...'

पुन्हा मधेच सम्राटने नवीन प्रश्न विचारला, 'जनरल श्मिट किती वाजता मारले गेले?'

'मला वाटतं सात वाजता असावेत.'

'सात वाजता. फार वाईट झालं, फार वाईट!'

त्याने राजवाडयात मुक्काम केला नव्हता म्हणून आदल्या रात्री भेटलेल्याला ॲड्‌ज्युटंट त्यांच्यावर रागे भरत होता. प्रिन्स आन्द्रेला तिसऱ्या दर्जाचा 'ऑर्डर ऑफ मरिया थेरेसा' हा किताब सम्राटांनी देऊ केल्याबद्दल युद्धमंत्र्यांनी येऊन प्रिन्स आन्द्रेचे अभिनंदन केले. सम्राज्ञीच्या प्रमुख दासीने आन्द्रेला सम्राज्ञीने भेटीस बोलावले आहे असे सांगितले. राजघराण्यातील स्त्रियांनीही त्याला भेटण्याची इच्छा व्यक्त केली. कोणाला भेटायला जावे हे त्याला कळेना. काही काळ तो विचार करीत राहिला. रशियाच्या परराष्ट्र वकिलाने त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याला खिडकीजवळ नेले आणि त्याच्याशी संभाषण सुरू केले.

बोलकॉन्स्कीला सगळ्यांकडून निमंत्रणे येऊ लागली. ऑस्ट्रियन सरकारातील बडया बडया व्यक्तींना भेटण्यात त्याची सगळी सकाळ जाऊ लागली.

अशा प्रकारे भेटीगाठी संपवून एका संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास प्रिन्स आन्द्रे बिलिबिनकडे यायला निघाला असताना वडिलांना पत्रात लढाईबद्दल आणि ब्रुन येथील भेटीबद्दल काय काय लिहायचे याचा विचार करीत होता.

फान्झने कष्टाने प्रवासी ट्रंक गाडीत चढवीत म्हटले, 'महाराज, आपल्याला आता आणखी पुढं जायचं आहे. हरामखोर पुन्हा अगदी पाठीशी आले आहेत.'

'काय म्हणतोस तरी काय?'

बिलिबिन बोलकॉन्स्कीला भेटायला बाहेर आला. त्याचा एरवी शांत असलेला चेहरा अस्वस्थ झाला होता.

'तुला कबूल करावं लागेल. त्यांनी फारच छान गोष्ट केली. त्यांनी टॅबॉर पूल ओलांडला— जराही लढाई न करता ओलांडला.'

प्रिन्स आन्द्रेला कशाचाच अर्थबोध होईना.

'अरे, तू होतास तरी कुठं?' गावातल्या प्रत्येक गाडीवानाला जे माहीत आहे ते तुलाच कसं ठाऊक नाही?'

'सगळीकडे लोक पळण्याची तयारी करीत आहेत, तेही तुला दिसलं नाही?'

'मला काहीच दिसलं नाही...काय घडलं ते तर सांगशील?' प्रिन्स आन्द्रे ऐकण्याला उतावीळ झाला होता.

'काय घडलं? घडलं ते हे की ऑउर्सपर्ग ज्या पुलाचे रक्षण करत होता तो पूल फ्रेंच सैन्याने पार केला आहे आणि पुलाला काहीही धक्का लावलेला नाही. त्यामुळे आता ह्या क्षणी म्युरा ब्रुनकडे वेगाने यायला निघाला असेल. उद्या नाहीतर परवा त्याचे सैन्य इथे येऊन थडकेल.'

'पुलाखाली सुरुंग पेरलेले असताना पूल उडवला गेला नाही? हे कसं घडलं?'

'कसं घडलं ते मीच तुला विचारतो आहे. कुणालाच ते सांगता येणार नाही. बोनापार्टला देखील सांगता येणार नाही.'

वोलकॉन्स्कीने खांदे उडविले.

'जर त्यांनी पूल ओलांडला असेल तर सैन्य संपुष्टात येईल. त्यांचा मुख्य तळाशी असलेला संपर्क सुटून जाईल.'

'तोच महत्त्वाचा मुद्दा आहे,' बिलिबिन म्हणाला. 'मी काय सांगतो ऐक. फ्रेंच व्हिएन्नात आहेत. सर्व परिस्थिती समाधानकारक आहे. दुसऱ्या दिवशी म्हणजे कालच फ्रेंच मार्शल म्युरा लॅनिज आणि बेल्यर्ड घोड्यावर स्वार झाले आणि पुलाकडे आले. मग त्यातला एकजण म्हणाला, 'मित्रहो, आपण पूल जिंकला तर आपले सम्राट नेपोलियन खूष होतील. चला, आपण तिघेही जाऊन तो जिंकून घेऊ.' ते तिघेजण पुलाकडे गेले. त्यांनी आपले पांढरे हातरुमाल हालवले. आपण तिघे मार्शल असून प्रिन्स ऑउर्सपर्गबरोबर तहाची बोलणी करण्यासाठी आलो आहोत असे त्यांनी जाहीर केले. ड्यूटीवर असलेल्या अधिकाऱ्याने त्यांना पुलाच्या आणि शत्रुसैन्याच्या मध्ये असलेल्या संरक्षणफळीकडे येऊ दिले. त्या तिघांनी त्याला नाना बाता मारल्या. त्यांनी सांगितले 'युद्ध संपलं आहे, सम्राट फ्रान्सिसने बोनापार्टची भेट घ्यायची ठरवलं आहे, आमची प्रिन्स आउर्सपर्गना भेटण्याची इच्छा आहे.' त्या अधिकाऱ्याने आउर्सपर्गला बोलावणे पाठवले. मग ह्या तिघांनी अधिकाऱ्यांना प्रेमालिंगने दिली. थट्टामस्करी केली आणि ते तोफांवर देखील बसले.

तेवढ्या वेळात फ्रेंच सैनिकांची तुकडी लपतछपत पुलावर पोचली.

शेवटी लेफ्टनंट जनरल प्रिन्स आउर्सपर्ग येऊन दाखल झाले. हे तिघे पक्के गॅस्कन असल्याने त्याचे त्यांनी स्वागत करण्याला प्रारंभ केला. 'याबे प्रिन्स आउर्सपर्ग, शत्रूकडून तुमचे स्वागत होत आहे. सम्राट नेपोलियनचा जीव तुमच्याशी ओळख करून घेण्यासाठी किती तडफडतो आहे!' त्यांच्या या गोड गोड बोलण्याने प्रिन्स आउर्सपर्ग गोंधळून गेला. फ्रेंच मार्शलबरोबर इतक्या वेगाने झालेल्या मैत्रीने तो इतका शेफारून गेला, त्याच्या प्रेक्षणीय झग्यांनी आणि म्युराच्या शहामृगाच्या पिसांनी तो इतका दिपून गेला की, त्याच्यातील उत्साह त्याच्या डोळ्यांत शिरला आणि आपण शत्रूवर गोळ्या सोडल्या पाहिजेत हे तो विसरून गेला.

फ्रेंच सैनिकांनी संरक्षणफळीकडे धाव घेतली. तोफांमधे खिळे सारून त्या बाद केल्या आणि पूल काबीज केला. गोष्टीचा अप्रतिम भाग आता सुरू होतो आहे.—' बिलिबिन पुढे बोलू लागला.

' सुरुंग लावून पूल उडवून देण्याचा इशारा देणाऱ्या तोफेवर असलेल्या सार्जंटाने पुलाकडे धावणारे फ्रेंच सैनिक पाहिले तेव्हा तो तोफा डागणार होता. परंतु लॅनिजने त्याचा हात दूर लोटला. सार्जंट जनरलहून अधिक सावध नी हुशार असावा, तो तडक आउर्सूपर्गकडे जाऊन म्हणाला, ' प्रिन्स, हे तुम्हाला फसवताहेत. फ्रेंच आलेले आहेत. ' सार्जंटने सगळे सांगितले तर आपली सगळी मेहनत फुकट जाणार हे म्युराच्या लक्षात आले. आश्चर्य वाटल्यासारखे दाखवून तो आउर्सूपर्गला म्हणाला, ' सगळ्या जगात ज्या ऑस्ट्रियन सैन्याच्या शिस्तीची स्तुती होते, ती ही अशीच असते काय? तुम्ही कनिष्ठ अधिकाऱ्यांना अशा प्रकारे बोलू देता काय?' म्युराने प्रतिभेची चुणूक दाखवली होती. प्रिन्स आउर्सूपर्गला आपल्या स्वाभिमानाची जाणीव झाली. त्याने सार्जंटला कैद करण्याचा हुकूम दिला. काही असो टॅबॉर पुलाची ही कथा मोठी आकर्षक आहे हे तुला कबूल करावं लागेल. त्यात मूर्खपणा नव्हता...आणि भ्याडपणाही नव्हता...' कदाचित विश्वासघात होत असेल, ' प्रिन्स आंद्रे म्हणाला.

' तसंच काही नाही. ह्यामुळे सरकारची वाईट अवस्था होते. ' बिलिबिन आपले म्हणणे मांडत राहिला. ' त्याला विश्वासघात म्हणता येणार नाही, तो भ्याडपणाही नव्हता, मूर्खपणाही नव्हे, उल्मला जसं घडलं तसंच इथं घडलं. '

प्रिन्स आन्द्रे उठून आपल्या खोलीकडे जाऊ लागलेला पाहून बिलिबिनने त्याला एकदम प्रश्न केला, ' कुठे चाललास?'

' मला आता निघालंच पाहिजे. '

' पण कुठं?'

' सैन्याकडे. '

' पण तू आणखी दोन दिवस थांबणार होतास ना?'

' पण आता मी तावडतोब निघणार आहे. ' प्रिन्स आंद्रे आपल्या प्रवासाबद्दल थोडेफार बोलून आपल्या खोलीत गेला.

प्रिन्स आन्द्रेच्या खोलीत येऊन बिलिबिन म्हणाला, ' मित्रा, तुला कल्पना नसेल. मी तुझ्याबद्दलच विचार करीत असतो. तू कशासाठी चालला आहेस?' ह्या विषयावरील आपली मतं पक्की आहेत, हे दाखविण्यासाठी जणू त्याच्या कपाळावरील आठ्यांचे जाळे नाहीसे झाले.

प्रिन्स आन्द्रे चौकसपणे त्याच्याकडे पाहत राहिला आणि काही बोलला नाही.

' तू कशासाठी जातो आहेस? सैन्य संकटात असताना तेथे धावत जाणे हे आपलं कर्तव्य आहे असं तुला वाटतं आहे याची मला कल्पना आहे. मला तुझं शौर्य समजतं. घटनांकडे पाहायला शीक. मग आपली काळजी आपणच घेतली पाहिजे, हे तुला पटू लागेल. दुसऱ्या

कामासाठी जे लायक नाहीत, त्यांच्याकडे तुझं ते कर्तव्य सोपव. तेथपर्यंत आपण गाडीने मोठ्या आरामात प्रवास करू या.'

प्रिन्स आन्द्रे काही बोलला नाही.

'मी मित्र म्हणून मनापासून बोलतो आहे. तुला तेथे राहता येणं शक्य आहे. असं असताना तू कशासाठी आणि कुठं जातो आहेस? याचा विचार कर. तुझ्याकडे आता दोन पर्याय आहेत, 'शांतता प्रस्थापित होईपर्यंत तू काही सैन्यात पोचणार नाहीस अगर तुला कुटूझॉफच्या सर्व सैन्याबरोबर पराभव आणि नामुष्की पत्करावी लागेल.'

त्याच रात्री बोलकॉन्स्कीने युद्धमंत्र्यांचा निरोप घेतला. त्याला आपल्या सैन्याचा ठावठिकाणा माहीत नव्हता. क्रेम्सला जाताना वाटेत फ्रेंच सैनिक पकडतील हा धोका होता तरीही तो सैन्यात दाखल होण्यासाठी निघाला.

कोसॅकांच्या प्रमुख अधिकाऱ्याकडून प्रिन्स आन्द्रेने एक घोडा आणि एक कोसॅक मिळवला. त्याला आता भूक लागली होती, आणि थकवा आला होता. तरीदेखील तो मालवाहू गाड्यांमधून कशीबशी वाट काढत कमांडर-इन-चीफ् आणि आपले सामान शोधू लागला. सैन्याच्या अवस्थेसंबंधीच्या भयानक अफवा त्याला रस्त्यावरच ऐकू आल्या. बेशिस्तीने पळणारे सैन्य पाहिल्यावर त्याला त्या अफवांत तथ्य असावे असे वाटू लागले.

मरणाखेरीज दुसरा मार्गच उरला नाही तर? तसे असले तरी हरकत नाही. त्याला वाटले. रस्त्याच्या दोन्ही बाजूंस नाना दृश्ये दिसत होती. मरून पडलेले घोडे, कुठे कातडी सोलून टाकलेली घोड्यांची प्रेते, मोडून पडलेली गाडी, कशाची तरी वाट पाहत तिच्यावर बसलेला एकटा सैनिक, पथकातून पळालेल्या सैनिकांची आता अलग फिरणारी, जवळपासच्या खेड्यात शिरणारी, अगर खेड्यातून कोंबडी, मेंढरे, गवत किंवा असाच काही माल ओढत असणारी टोळकी. हे सर्व चालू असतानाच हातात बंदूक घट्ट धरून धडपडत गुडघाभर चिखलातून चालणारे शिपाई गाड्यांना पकडून राहण्याचा प्रयत्न करीत होते.

संरक्षकदलातील सैनिकांतील एखाद्याकडे कमांडर-इन-चीफ्ची चौकशी करावी म्हणून प्रिन्स आन्द्रेने त्यांच्याकडे घोडा वळवला. अगदी त्याच्या समोरून एक विचित्र गाडी जाताना दिसली. एकच घोडा ती गाडी ओढत होता. मिळेल त्या साधनानिशी त्या सैनिकांनी ती गाडी कशीबशी तयार केलेली दिसत होती. तिला गाडी ही संज्ञा देणे तसे अवघडच होते. गाडीच्या कातडी छपराखाली एक स्त्री बसली होती. तिने शाल लपेटून घेतली होती.

प्रिन्स आन्द्रे दिसताच तिने छपरातून बाहेर डोकावून आपले कृश हात शालीतून बाहेर काढून हालवले आणि ती ओरडली! 'ॲड्ज्युटंट...मला वाचवा...माझं रक्षण करा... सातव्या तुकडीच्या डॉक्टरची मी पत्नी...आमची माणसे सगळी मागे राहिली. आमची चुका-



४

मूक झाली आहे. . .ते आम्हाला जाऊ देत नाहीत. . .'

'मागे हो. नाहीतर सालडी काढीन. तुझ्या त्या पात्राला घेऊन जरा गाडी मागे ने.'

'महाराज, माझं रक्षण करा.' डॉक्टरची पत्नी किंचाळली.

'कृपा करून त्या गाडीला पुढे जाऊ द्या. आत असलेली स्त्री तुम्हाला दिसत नाही काय?' प्रिन्स आन्द्रेने अधिकाऱ्याजवळ घोडा नेत म्हटले.

अधिकाऱ्याने त्याच्याकडे केवळ पाहिले आणि काही उत्तर न देता त्याने पुन्हा सैनिकांकडे मोर्चा वळवळा. 'मागं हो ... मागं हो ... तुला दाखवतो मागं कसं जायचं ते. मी पुन्हा सांगतो गाडी पुढं जाऊ दे.' प्रिन्स आन्द्रेने म्हटले.

'तू कोण सांगणार?' पिऊन तर्र झालेला तो अधिकारी एकदम वळून रागारागाने म्हणाला, 'मी इथला कमांडिंग ऑफिसर आहे. तू नव्हेस. मागं हो, नाहीतर तुझी देखील चामडी लोळवीन.' शेवटचे वाक्य उच्चारण्यात त्याला समाधान वाटत होते असे दिसले.

त्या अधिकाऱ्याने शेवटचे शब्द उच्चारले असतील नसतील तोच रागाने बेभान झालेल्या वेड्यावाकड्या मुद्रेच्या प्रिन्स आन्द्रेने त्याच्यावर चाबूक उगारून म्हटले, 'त्यांना मुकाट्याने जाऊ दे.'

आपली हत्यारे परजीत त्या अधिकाऱ्याने घाईघाईने घोडा पिटाळला.

'ह्या स्टाफ ऑफिसरांमुळे अशी बेशिस्त माजते! बेटे मनाला येईल तसे वागतात.' तो चरफडत गेला.

कमांडर-इन-चीफ् ज्या खेड्यात असल्याचे त्याला कळले होते, त्या खेड्याकडे त्याने घोडा पिटाळला. खेड्यात शिरताच तो घोड्यावरून उतरला.

पहिल्याच घराच्या खिडकीजवळ आला तेव्हा कुणीतरी ओळखीच्या माणसाने त्याला हाक मारली. त्याने वळून पाहिले. देखणा नेस्विट्स्की खिडकीतून डोकावून पाहत होता. तो काहीतरी खात होता. त्याने त्याला खुणेनेच आत बोलावले.

घरात गेल्यावर प्रिन्स आन्द्रेला नेस्विट्स्की आणि त्याचा ॲड्ज्युटंट खात असताना आढळले. त्या दोघांनीही मोठ्या उत्सुकतेने त्याच्याकडे पाहिले. त्याने काही वार्ता आणली आहे काय? त्या दोन परिचित इसमांच्या चेहऱ्यांवर प्रिन्स आन्द्रेला विस्मय आणि अस्वस्थता दिसून आली.

'मी मॅकला हसायला नको होते. चुकलं माझं. त्याच्याहून वाईट परिस्थिती आमच्यापुढे वाढून ठेवली आहे. बसून काही खा तरी.' नेस्विट्स्की म्हणाला.

'तुमचं सामान इत्यादी कुठं सापडत नाही. मी मला हव्या असलेल्या वस्तू दोन घोड्यांवर लादून घेतल्या. त्यांनी पुरेशा वस्तू बांधून दिल्या. निदान बोहेमिअन पर्वताच्या प्रदेशात जाईपर्यंत तरी पुरतील.' नेस्विट्स्की म्हणाला.

'कमांडर-इन-चीफ् येथे कशासाठी थांबले आहेत?' त्याने विचारले.

'काही समजत नाही,' नेस्विट्स्की उत्तरला.

'मला एकच कळते आहे. हे सगळंच अत्यंत उद्वेजनक आहे.' प्रिन्स आन्द्रे म्हणाला.

मग तो कमांडर-इन-चीफ् उतरले होते त्या घराकडे गेला.

आतल्या दालनात प्रिन्स बॅग्रेशन आणि श्मिटच्या ऐवजी नव्याने नेमलेला ऑस्ट्रियन जनरल वीरॉदर याच्या बरोबर कुटूझॉफ बसला होता.

दरवाजा आपोआप उघडला आणि धारदार नाकाचा आणि गुबगुबीत चेहऱ्याचा कुटूझॉफ दारात उभा असलेला दिसला. प्रिन्स आन्द्रे कुटूझॉफच्या अगदी थेट समोर उभा होता. पण कुटूझॉफ एका बाजूस पाहत होता, त्यावरून स्पष्ट दिसत होते की विचारांनी आणि काळजीने त्याची दृष्टी जणू झाकली गेली होती. त्याने ॲड्ज्युटंटकडे टक लावून पाहिले. परंतु त्याला ओळखले नाही.

किरकोळ देहयष्टीचा, ठेंगणा, पोरगेलासा वाटणारा आणि निश्चयी आणि निर्विकार असा बॅग्रेशन कमांडर-इन-चीफ्च्या मागून बाहेर पडला.

'मी आपल्याकडे रिपोर्ट द्यायला आलो आहे.' कुटूझॉफला बंद लिफाफा देता देता प्रिन्स आन्द्रे दुसऱ्यांदा काहीशा मोठ्या आवाजात म्हणाला.

'ओहो! व्हिएन्नाहून का? छान, जरा थांबा.' कुटूझॉफ बॅग्रेशनला पायऱ्यापर्यंत पोचवायला गेला.

'प्रिन्स, या. देव तुझ्या पाठीशी राहो. माझ्या आशीर्वादानं तुला मोठा विजय मिळू दे.' एकाएकी कुटूझॉफचा चेहरा हळुवार झाला.

'महाराज, मला इथे उपयोगी पडता आले तर आवडेल. प्रिन्स बॅग्रेशनच्या खास तुकडीत राहायची मला परवानगी द्या.'

बोलकॉन्स्कीची अनिश्चिती पाहून कुटूझॉफ म्हणाला, 'आत बसा, मला देखील चांगल्या अधिकाऱ्याची जरुरी आहे.'

मग दोघेही गाडीत बसले. थोडा वेळ कुणीच बोलले नाही. गाडी चाललीच होती.

'अजून किती तरी गोष्टींना तोंड द्यायचं आहे.' बोलकॉन्स्कीचे मन जाणून जणू कुटूझॉफ एखाद्या वयोवृद्ध द्रष्ट्यासारखा बोलत होता. 'बॅग्रेशनच्या तुकडीतील दहा टक्के परत आले तरी देवाचे मी आभार मानीन.' कुटूझॉफ स्वतःशीच जणू बोलला.

प्रिन्स आन्द्रेने कुटूझॉफकडे पाहिले. नकळत त्याचे लक्ष कुटूझॉफच्या कपाळावरील काळजी-पूर्वक धुतलेल्या वणाकडे गेले. इस्माइलच्या लढाईत यार्डभर अंतरावरून आलेली गोळी त्याच्या डोक्यात आणि डोळ्याच्या रिकाम्या खोबणीत गेली होती. 'ह्या माणसांच्या मृत्यूबद्दल शांतपणे बोलण्याचा त्याला अधिकार आहे.' प्रिन्स आन्द्रेने मनोमन मान्य केले आणि उघड म्हटले, 'म्हणून तर मी तुम्हाला त्या तुकडीत मला पाठवायला सांगतो आहे.'

सम्राटाशी झालेल्या मुलाखतीचा तपशील क्रेम्स चकमकीबद्दल दरबारात व्यक्त झालेली मते आणि दोघांच्याही ओळखीच्या स्त्रिया यांबद्दल त्याने चौकशी केली; तीत सूक्ष्म उपरोध होता.

प्रिन्स आन्द्रे कुटूझॉफला सारखी विनंती करीत होता. तो संध्याकाळी चार वाजण्याच्या सुमारास ग्रान्टि येथे बॅग्रेशनच्या सैन्याला येऊन मिळाला.

बॅग्रेशनच्या सैनिकांना काय चालले आहे त्याचा पत्ता नव्हता. युद्ध थांबेल असं ते बोलत होते. पण तशी शक्यता त्यांना वाटत नव्हती. ते लढाईच्या गोष्टी बोलत होते, पण लढाई लवकर सुरू होईल असे मात्र त्यांना वाटत नव्हते.

प्रिन्स आन्द्रे कुटूझॉफच्या मर्जीतला आणि विश्वासातील ॲड्ज्युटंट होता, हे ठाऊक असल्याने बॅग्रेशनने त्याचे स्वागत मोठ्या इतमामाने आणि विनयाने केले. एकदोन दिवसांत लढाईला प्रारंभ होईल अशी माहिती त्याला दिली. प्रिन्स आन्द्रेने लढाई चालू असताना आपल्याबरोबर राहून कामे करावीत अगर पिछाडीच्या पथकात राहून शिस्तीने माघार घेतात का पाहावे (तेही फार महत्त्वाचे आहे). बॅग्रेशनने त्याला कोणतेही काम करायला पूर्ण स्वातंत्र्य दिले.

'मात्र आज बहुतकरून लढाई होणार नाही.' प्रिन्स आन्द्रेला धीर दिल्यागत बॅग्रेशन म्हणाला.

'सैन्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांत काही फाकड्र इसम असतात. त्यांपैकीच हा असेल आणि ह्याला क्रूस मिळवायचा असेल तर त्यानं पिछाडीच्या सैनिकांत राहावं हे चांगलं...तो शूर अधिकारी असला तर मला उपयोग होईल.' बॅग्रेशनने विचार केला.

प्रिन्स आन्द्रेने प्रिन्स बॅग्रेशनकडे घोड्यावरून सर्वत्र फिरण्याची परवानगी मागितली. प्रिन्स बॅग्रेशनने स्टाफ ऑफिसरला प्रिन्स आन्द्रेला सोबत करण्याची आज्ञा केली.

त्यांना सगळीकडे पुरेपूर भिजलेले उदास चेहऱ्याचे काहीतरी शोधणारे अधिकारी दिसले. खेड्यातून दारे, बाके आणि कुंपणाची लाकडे ओढत आणणारे सैनिक आढळले.

त्यांच्याकडे बोट दाखवीत स्टाफ्-ऑफिसर म्हणाला, 'ह्या लोकांना थांबवणं कठीण होऊन बसलं आहे. त्यांच्या कमांडराचाच आपल्या तुकड्यांवर ताबा राहिलेला नाही.' मग तो कॅन्टीनवाल्याच्या झोपडीकडे बोट करीत म्हणाला, 'हे सगळे इथं जमतात आणि बसून राहतात. सगळ्यांना मी आज सकाळीच हुसकावून लावले होते. पुन्हा कॅन्टीनमध्ये जमले आहेत. प्रिन्स जरा थांबता का? पुन्हा एकदा त्यांना तडकावून येतो.'

'आपण दोघंही बरोबर जाऊ. मला तिथं ब्रेड आणि चीज मिळेल.' प्रिन्स आन्द्रेने म्हटले. त्याला जेवायला वेळच मिळाला नव्हता.

'तुम्ही मघाशी का बोलला नाहीत? मी तुम्हाला काही दिलं असतं.'

'भल्या माणसांनो, हे काय चालवलं आहे तुम्ही?' पुन्हा तंबी देणाऱ्या माणसाच्या स्वरात तो बोलत होता. 'अशा प्रकारे तुम्ही पळून येता हे बरं नाही. प्रिन्स बॅग्रेशननी सक्त आज्ञा दिली आहे. कोणीही आपलं ठाणं सोडून जाता कामा नये.'

मातट रंगाचा आणि कृश अंगाचा तोफखान्याचा एक अधिकारी पायमोज्यातच उभा होता. कॅन्टीनवाल्याकडे हे दोघे येताच त्यांनी कृत्रिम हास्य केले. त्याची कानउघाडणी करीत म्हटले, 'कॅप्टन टुशिन, तुम्हाला शरम वाटायला पाहिजे. तोफखान्याचे अधिकारी म्हणून इतरांसमोर तुम्ही आदर्श ठेवाल असं मला वाटलं होतं. पण तुमच्याच पायांत बूट नाहीत!'

'अनवाणी चालणं अधिक सोपं असतं असं सैनिक म्हणतात.' संकोचून हसत टुशिन म्हणाला. आपली चमत्कारिक अवस्था थट्टेवारी न्यायचा त्याचा बेत असल्याचे उघड दिसत होते. तोंडातून शब्द आले न आले तोच असा विनोद योग्य दिसणार नाही याची त्याला जाणीव झाली आणि विनोद यशस्वी ठरला नाही म्हणून तो गोंधळल्यासारखा झाला.

'कृपा करून निघा इथून.' स्टाफ ऑफिसरने म्हटले.

स्टाफ अफिसर आणि प्रिन्स आन्द्रे घोड्यावर बजून तेथून निघाले. वाटेत निरनिराळ्या दर्जाच्या अधिकाऱ्यांना आणि सैनिकांना भेटत आणि मागे टाकीत ते खेड्याच्या बाहेर केव्हाच पडले होते. वाटेत उजव्या बाजूस माती उपसण्याचे काम सुरू असलेले त्यांना दिसले. नुकतीच खणून टाकलेली माती अजूनही लाल होती. थंड वाऱ्याची पर्वा न करता कित्येक तुकड्यांचे सैनिक बाह्या वर सारून खंदक खोदण्यासाठी वाळवीप्रमाणे राबत होते.

त्यांनी समोरच्या टेकडीवर घोडे पिटाळले. टेकडीवरून फ्रेंच सैन्य दिसत होते. प्रिन्स आन्द्रे काळजीपूर्वक समोरील दृश्य न्याहाळू लागला.

'इथंच आमचा तोफखाना आहे,' उंच जागेकडे बोट दाखवीत स्टाफ ऑफिसर म्हणाला. मघाशी बुटाशिवाय बसलेला तो चमत्कारिक माणूस इथला प्रमुख आहे. तिथून तुम्ही सर्व काही पाहू शकाल. चला तिकडे जाऊ या.'

'आभारी आहे आपला. मी एकटा जाईन. तुम्ही तसदी घेऊ नका,' प्रिन्स आन्द्रे म्हणाला. स्टाफ अफिसरने त्याला तिथे सोडले. एकटा प्रिन्स आन्द्रे घोड्यावरून तिकडे निघाला.

सर्व मैदानभर पसरलेले सैनिक लाकडाचे ओंडके आणि फांद्या आणून राहुट्या बनवीत होते. गप्पा मारीत होते. थट्टाविनोद करीत होते. शेकोट्यांभोवती उघड्या अंगाने बसून शर्ट आणि बूट वाळवीत होते. काहीजण कांजी शिजत होती तिच्या भोवती बसून बुटांवरून नाहीतर कपड्यांवरून ब्रश फिरवीत बसले होते. एका तुकडीचा स्वैपाक पुरा झाला होता, तेथले सैनिक आशाशी मुद्रेने भांड्यातून येणाऱ्या वाफांकडे पाहात होते. आपल्या राहुटीकडे तोंड करून बसलेल्या पुरवठा अधिकाऱ्याला लाकडाचा वाडगा भरून स्वैपाकाचा नमुना दिला जात होता. बाकीचे आपली पाळी केव्हा येते त्याची वाट पाहत होते. दुसरी एक तुकडी सुदैवी होती. तिच्याकडेच फक्त व्होडका होती. त्या तुकडीचे सैनिक रुंद खांद्याच्या आणि देवीचे वण असलेल्या सार्जंटसमोर गोळा झाले होते. एकामागून एक आपले भांडे पुढे करीत होता आणि सार्जंट छोटेसे पिंप तिरपे धरून व्होडका ओतीत होता.

प्रिन्स आन्द्रेने शामर रेजिमेंटजवळून घोडा नेला. तसाच तो किव्ह ग्रेनेडिअरांच्या तुकड्यांतून कर्नलच्या राहुटीकडे आला. मग तो ग्रेनेडिअरांच्या प्लॅटूनकडे आला. समोरच एक उघड्या अंगाचा माणूस होता. दोघा सैनिकांनी त्याला धरून ठेवले होते आणि दुसरे दोघे एकसारखे लवचिक डहाळ्यांनी त्याची उघडी पाठ झोडपीत होते.

उजव्या बाजूकडून डाव्या बाजूपर्यंत प्रिन्स आन्द्रेने सर्व सैन्याला वळसा घातला. मग तो तोफखान्याच्या विभागाकडे आला. स्टाफ ऑफिसरने त्याला या ठिकाणावरून लढाईची सर्व जागा नजरेच्या टप्प्यात येते असे सांगितले होते. इथे आल्यावर तो घोड्यावरून उतरला आणि लाकडी आधारावरून उतरून ठेवलेल्या चार तोफांपैकी एका तोफेच्या टोकाशी उभा राहिला.

तोफखान्याच्या जागेपासून सगळ्या रशियन सैन्याची रचना दिसत होती आणि बरेचसे शत्रुसैन्यही दिसत होते. त्याला राहुटीमधील अधिकाऱ्यांचे संभाषण ऐकू येत होते, पण त्यापासून त्याला काहीही अर्थबोध होत नव्हता.

एकाएकी कुणीतरी इतक्या अभिनिवेशाने राहुटीत बोलू लागला की, तो लक्ष देऊन संभाषण ऐकू लागला.

'हे बघ मित्रा,' आन्द्रेला तो प्रेमळ आवाज परिचितसा वाटला. 'मृत्यूनंतर काय होते हे जर माहीत असेल तर कोणालाही मृत्यूची भीती वाटणार नाही.'

मग कुण्या तरुण व्यक्तीचा आवाज ऐकू आला. 'तुम्हाला भीती वाटो वा न वाटो, मृत्यू-पासून कुणाचीच सुटका नाही.'

'कसली रे तुम्ही विद्वान माणसं! नेहमीच घाबरणारी.' आता तिसऱ्याच व्यक्तीचा-पुरुषाचा आवाज ऐकू आला, 'पण काही झालं तरी भीती वाटणारच.' प्रिन्स आन्द्रेला ओळखीचा आवाज ऐकू येऊ लागला. 'खरं म्हणजे अज्ञाताची भीती प्रत्येकालाच वाटत असते. आत्मा स्वर्गात जातो हे म्हणणं तसं छान आहे...पण आपणा सर्वांनाच माहीत आहे —स्वर्ग असा नाहीच...केवळ वातावरण आहे.'

पुन्हा त्या पुरुषी आवाजाने मधेच म्हटले, 'टुशिन, ब्रँडी थोडी दे.'

'देतो की ब्रँडी. मरणोत्तर जीवनाचा विचार केला की...' पण टुशिनचे वाक्य पुरे झाले नाही. त्याच क्षणी हवेत काही सुसाटत आल्याचा आवाज झाला आणि तो अधिकाधिक जवळ अधिकाधिक वेगाने येऊ लागला, अधिक स्पष्टपणे ऐकू येऊ लागला. सर्व काही सांगून झाले नाही म्हणून की काय तो तोफेचा गोळा मोठा आवाज करीत राहुटीच्या जवळच पडला. प्रचंड आघाताने जमीन उकरली गेली. त्या भीषण आघाताने जमीन कण्हत असल्याचे वाटू लागले. त्याच क्षणी राहुटीतून तोंडात छोटा पाईप ठेवलेला लहानखोर टुशिन सगळ्यांच्या अगोदर बाहेर पडला. कोटाची बटणे लावता लावता त्याने आपल्या तुकडीकडे धाव घेतली.

प्रिन्स आन्द्रे घोड्यावर स्वार झाला. पण त्याने घोडा पिटाळला नाही. त्याने सगळ्या विस्तृत मैदानावरून वेगाने नजर फिरवली. मधाशी स्वस्थ असलेले फ्रेंच सैनिक हालचाल करीत आहेत. ते डाव्या बाजूच्या तोफखान्याचे आहेत हे त्याला दिसले. दोन फ्रेंच घोडेस्वार-

ते निश्चितच अॅड्ज्युटंट असावेत-टेकडीवर जात होते. शत्रु-सैनिकांची छोटीशी रांग बहुधा आघाडीला खंबीर करण्यासाठी टेकडीवरून उतरत असताना स्पष्ट दिसत होती. पहिल्या गोळ्यांचा धूर अद्याप नाहीसा झाला नव्हता. तोच पुन्हा धुराचा लोट उठला आणि गोळा सुटला.

प्रिन्स बॅग्रेशनला भेटण्यासाठी प्रिन्स आन्द्रेने आपला घोडा मागे ग्रॅन्टीच्या दिशेने पिटाळला. सतत मोठ्याने गोळ्यांचे स्फोट ऐकू येतच होते. खाली जिथे दोन्ही सैन्ये अधिक जवळ आली होती तिथून बंदुकीच्या फैरी झडत असल्याचे ऐकू येत होते.

आपला रक्तप्रवाह वेगाने चालत असल्याची जाणीव प्रिन्स आन्द्रेला झाली. आता युद्धाला तोंड लागले आहे, एकदाची सुरुवात झाली आहे. प्रिन्स आन्द्रेने पहिले, पंधरा-वीस मिनिटां-पूर्वी पॉरिज खाण्यात आणि व्होडका पिण्यात मग्न झालेल्या सैनिकांचे आता रांगेत राहण्यासाठी आणि बंदुका घेण्यासाठी एकच धांदल उडाली होती. मातीचा बांध उभवला जात होता. तिकडे तो पोचवण्यापूर्वीच त्याला संधिप्रकाशात आपल्याकडे घोडेस्वार येत असताना दिसले. अगदी पुढे आलेल्या पांढऱ्या घोड्यावरील स्वाराने बिनबाह्याचा सैल झगा घातला होता. त्याच्या डोक्याला लोकरी टोपी होती. तो स्वार दुसरा तिसरा कोणी नसून प्रिन्स बॅग्रेशन होता. त्याच्यासाठी प्रिन्स आन्द्रे थांबला. बॅग्रेशनने घोडा थांबवला आणि प्रिन्स आन्द्रेला ओळखून मान हलवली. प्रिन्स आन्द्रे आपण काय पाहिले हे त्याला सांगत असताना बॅग्रेशन समोर पाहत राहिला होता.

त्याची मुद्रा जणू सांगत होती सगळे जे घडले आणि त्याने आता जे ऐकले त्याची त्याला केव्हाच अचूक कल्पना आलेली होती. ते सगळे टुशिनच्या तोफखान्याजवळ आले एवढ्यात त्यांच्यासमोरून एक गोळा जमिनीवर आदळला.

एकाएकी जोरात सूं-सूं आवाज झाला आणि थाडदिशी कसल्यातरी मऊ वस्तूवर आदळून एकाएकी थांबला. मागे काही अंतरावर असलेला कोसॅक घोड्यावरून खाली जमिनीवर कोसळला. झेरूकॉफ आणि स्टाफ ऑफिसर खोगिरावरच झुकून राहिले, आणि त्यांनी घोडे मागे पिटाळले. कोसॅक केव्हाच मरण पावला होता. त्याचा घोडा तडफडत होता.

प्रिन्स बॅग्रेशनने मागे नजर वळवली. विलंब लागण्याचे कारण त्याला कळले. तो तसाच बेफिकिरीने वळला. त्याला जणू विचारायचे होते—'असल्या क्षुल्लक गोष्टीकडे कशाला लक्ष द्यायचं?'

जिथून मघा प्रिन्स आन्द्रेने सगळे रणांगण डोळयांखालून घातले होते त्या तोफखान्याच्या जागेकडे त्याचे घोडे येऊन थडकले.

'कोणती तुकडी आहे?' दारूगोळ्याच्या साठ्याजवळ तोफखान्यातील एक सैनिक उभा होता, त्याला बॅग्रेशनने विचारले. त्या सैनिकांच्या ध्यानात तो अर्थ आला. 'कॅप्टन टुशिन यांची तुकडी आहे, महाराज.'

'ठीक आहे, ठीक आहे.' कसलातरी विचार करीत बॅग्रेशन म्हणाला आणि त्याने शेवटच्या

तोफेजवळ घोडा नेला. तोच तोफेने कानठळ्या बसणारा आवाज केला. एकाएकी उठलेल्या धुराच्या लोटातील तोफ पुन्हा जागच्या जागी ओढून बसवण्यासाठी धाव घेणारे सैनिक दिसले. भरदार छातीचा, धिप्पाड देहाचा आणि दाट अस्ताव्यस्त केसांचा क्रमांक एकचा सैनिक चाकांकडे धावत सुटला. आणि दोन्ही पाय फाकून चाकाला रेटून राहिला. दुसऱ्या क्रमांकाच्या सैनिकाने थरथरत्या हाताने तोफेच्या तोंडात दारूगोळा ठेचला. उतरत्या खांद्याचा लहानखोर शरीराचा अधिकारी टुशिन तोफेला अडखळत पुढे धावला. त्याने जनरलला पाहिलेच नाही. आपल्या लहान हाताने डोळ्यांना सावली करीत तो दूर पाहू लागला.

'आणखी थोडे वर न्या, मग ठीक होईल.' काहीशा कर्कश आवाजात तो ओरडला. मग शीळ घालत त्याने मेडव्हेडेव्हला सांगितले, 'हाण जोरानं.'

बॅग्रेशनने बोलावताच टुशिन जनरलकडे गेला. आपल्या टोपीच्या पुढच्या निमुळत्या टोकास त्याने आपली तीन बोटे अशी भित्रेपणाने आणि अव्यवस्थितपणे जुळवली होती की तो सॅल्यूट करणाऱ्या सैनिकांपेक्षा आशीर्वाद देणारा धर्मगुरूच अधिक दिसत होता. जरी टुशिनच्या तोफांनी दरीमध्ये गोळ्यांचा वर्षाव करायचा होता तरीही ज्या ठिकाणी खूप फ्रेंच सैनिकांच्या हालचाली होत होत्या त्या शॉङ्ग्रबेन खेड्यावर त्याचे गोळे पडत होते.

कोणत्या दिशेने, कशावर तोफा डागायच्या याबद्दलच्या सूचना टुशिनला मिळाल्या नव्हत्या. आपला सार्जंट झहार्केङ्को याबद्दल त्याला खूप आदर होता. त्याचा सल्ला घेऊन खेड्यावर तोफा डागल्या तर चांगले असे आपण ठरवल्याचे सांगताच बॅग्रेशन म्हणाला, 'फार छान.'

तो तोफखान्याकडून निघणार तोच डाव्या बाजूस जंगलात देखील गोळ्या सुटल्याचे ऐकू आले. डाव्या बाजूस अंतर खूप असल्याने स्वतः बॅग्रेशनला जाणे शक्य नव्हते. तेव्हा त्याने झेरकॉफमार्फत सीनिअर जनरलला संदेश पाठवला. ह्याच सीनिअर जनरलच्या रेजिमेन्टची पाहणी कुटूझॉफने ब्रॉनॉ येथे केलेली होती. उजव्या बाजूचे सैन्य जास्त काळ शत्रूला थोपवून धरू शकणार नसल्याने डाव्या बाजूस सैन्याने शक्य तेवढ्या तातडीने दरीच्या पलीकडे माघार घ्यावी असा निरोप पाठविला. टुशिन आणि तोफखान्याचं संरक्षण करणार होती ती बटालिअन यांचा विसर पडला. बॅग्रेशनने खरे तर एकही हुकूम दिला नव्हता. जे गरजेपोटी, योगायोगाने अथवा अधिकाऱ्यांच्या व्यक्तिगत हेतूमुळे घडत होते, ते आपल्या प्रत्यक्ष हुकमाने घडत नसले तरी आपल्या इच्छेनुसारच घडले आहे असे दाखविण्याची धडपड बॅग्रेशन सारखी करीत असल्याचे त्याच्या ध्यानात आले.

प्रिन्स बॅग्रेशनने आमच्या उजव्या बाजूस टेकडीवर जास्तीत जास्त उंचीचा घोडा नेला. तेथून तो खाली जाऊ लागला. बाजूला बंदुकांचा आवाज सतत चाललेला ऐकू येत होता. धुरामुळे काहीही दिसत नव्हते.

जसजसे ते नदीच्या जवळ येऊ लागले तसतसे त्यांना काही दिसेना. मात्र आपण रणांगणाच्या अगदी जवळ आल्याची जाणीव होऊ लागली. आता जखमी माणसे दिसू लागली. एका जखमी माणसाला दोन्ही बाजूंनी धरून दोन सैनिक ओढीत नेत होते. आणि तो सारखा खोकत थुंकत होता. गोळी त्याच्या तोंडात किंवा गळ्यात गेलेली होती. दुसरा एकजण त्याच्या दिशेने येताना दिसला, तो बंदुकीशिवाय मोठ्या शूरासारखा चालत होता आणि चालताना जोराने कण्हत होता.

रस्ता ओलांडून ते उतरण उतरू लागले. त्यांना उताराबर कित्येक माणसे पडलेली दिसली. त्यांना कित्येक सैनिक दिसले त्यांतील काही जखमी झालेले नव्हते. ते सगळे सैनिक घाईघाईने टेकडी चढून वर येत होते, मोठमोठ्याने बोलत होते.

बॅग्रेशनला पाहताच कमांडिंग ऑफिसर माघारी पळणाऱ्या सैनिकांच्या मागे धावला आणि त्यांना मागे बोलवू लागला. बॅग्रेशन रांगांजवळ गेला. आता तिथे कुठे ना कुठे बंदुकीच्या फैरी झडू लागल्या आणि त्या आवाजात सैनिकांचे बोलणे आणि अधिकाऱ्यांचे ओरडणे विरून गेले. सगळीकडे धूरच धूर पसरला.

सैनिकांच्या चेहऱ्यावर उत्साह ओसंडत होता. आणि चेहऱ्यावर बंदुकीतील दारूही बसली होती. काहीजण नळी बंदुकीत ढोशीत होते, काहीजण कमरेच्या पिशवीतून दारूगोळा काढीत होते, काहीजण गोळ्या झाडीत होते. वारा पडल्याने धूर अजून नाहीसा झाला नव्हता. त्यामुळे ते सैनिक त्या धुरातून कोणावर गोळ्या घालीत होते हे कळणे अशक्य होते.

अशक्त दिसणाऱ्या कृश वृद्ध कर्नलच्या चेहऱ्यावर प्रेमळ हास्य झळकले. त्याच्या पापण्यांमुळे त्याचे वार्धक्य जाणवत नव्हते. उलट शांत सौम्य स्वभाव जाणवत होता. घरात एखाद्या सन्माननीय पाहुण्याचे स्वागत करावे तसे प्रिन्स बॅग्रेशनचे स्वागत कर्नलने घोड्यावरून जाऊन केले.

खरे तर स्वतः कर्नलला आपल्या नेतृत्वाखाली असलेल्या तुकडीचे गेल्या अर्ध्या तासात काय झाले होते याची कल्पना नव्हती.

लढाईला प्रारंभ झाला तेव्हा सर्व रेजिमेन्टवर गोळ्यांचा वर्षाव होत होता आणि माणसे मरत होती. अशा वेळी कुणीतरी घोडदळाला हाक मारली आणि आपल्या लोकांनी गोळीबारास सुरुवात केली एवढेच त्याला माहीत होते.

घोडदळ दूर गेल्याने रशियन सैनिक आता दरीत येऊन वर गोळीबार करणाऱ्या फ्रेंचांच्या पायदळावर गोळीबार करू लागले.

बॅग्रेशनने अॅड्ज्युटंटकडे वळून त्याला टेकडीवर असलेल्या सहाव्या शॉसरच्या दोन बटालिअन घेऊन यायला सांगितले. त्या क्षणी बॅग्रेशनच्या चेहऱ्यावर झालेला बदल प्रिन्स आन्द्रेला तीव्रतेने जाणवला. आता त्याची नजर निस्तेज झोपाळू नव्हती; आता खोल चिंतनात गढल्याची वतावणी नव्हती.

प्रिन्स बॅग्रेशनने त्या धोक्याच्या जागेपासून मागे व्हावे म्हणून कर्नल त्याला पुढे यायला

विरोध करत होता. ' महाराज कृपा करून मागं जा. ' तो सारखी विनंती करीत होता.

परंतु बॅग्रेशनने काही लक्ष दिले नाही. त्याने फक्त गोळीबार थांबवून नवीन येणाऱ्या बटालिअनला जागा करून देण्यासाठी रचना करण्याचा हुकूम केला. तो बोलत असतानाच अदृश्य हातांनी दूर केल्यागत दरीवरील धुराचा ढग उचलला गेला आणि वाऱ्यामुळे उजव्या बाजूकडून डाव्या बाजूकडे वाहात गेला.

रांगेतील पुढचे सैनिक केव्हाच दरीत उतरू लागले होते. आता उतरणीच्या अगदी जवळ असलेल्या ठिकाणी चकमक उडेल.

सहाव्या शॉसरच्या बटालिअनची हल्ला चालू ठेवल्याने माघार घेणाऱ्या उजव्या बाजूला रक्षण मिळाले. मध्यभागावरील टुशिनच्या तोफखान्यास संरक्षण नव्हते. तरीही तो तोफखाना शॉङ्ग्रबेन खेड्याला आग लावण्यात आणि फ्रेंच सैनिकांना थोपवून धरण्यात यशस्वी झाला होता. वाऱ्याने आग भडकत होती, ती विझवण्यासाठी फ्रेंच सैनिकांना थांबावे लागले. त्यामुळे रशियन सैनिकांना माघार घेण्यास संधी मिळाली.

लॅनिसच्या नेतृत्वाखाली फ्रेंच सैन्याने एकाच वेळी डाव्या फळीस पुढून हल्ला करून वेढा दिला.

ब्रॉनॉला येण्यापूर्वी ज्या रेजिमेंटची पाहणी कुटूझॉफने केलेली होती आणि ज्या रेजिमेंटमध्ये नोकरीला होता त्या रेजिमेंटच्या जनरलच्या ताब्यात नोकरीतील ज्येष्ठतेमुळे डाव्या बाजूकडील सैन्य दिलेले होते. परंतु डाव्या बाजूच्या अगदी टोकाकडील सैन्य मात्र रोस्तॉफ ज्या पावलोग्रॅड घोडदळात नोकरीला होता त्या घोडदळाच्या कर्नलच्या ताब्यात दिलेले होते. त्यामुळे गैरसमज निर्माण झाले. दोघेही कमांडिंग ऑफिसर एकमेकांवर अतिशय भडकले होते. फ्रेंच सैन्याने डाव्या बाजूच्या दिशेने केव्हाच मोर्चा वळवला होता. अशा वेळी हे दोघे कमांडिंग ऑफिसर वादविवादात-वाटाघाटीत गढले होते. घोडदळ आणि पायदळ लढाईसाठी मुळीही तयार नव्हते. साध्या सैनिकांप्रमाणेच जनरललाही लढाई होईल याची कल्पना नव्हती. त्यामुळे सारेच जण साधी दैनंदिन कामे स्वस्थपणे आणि शांतपणे करत होते. कुणी घोड्यांना वैरण देत होते, कुणी लाकडे गोळा करीत होते.

परिस्थिती आणीबाणीची होती. तोफांतून आणि बंदुकांतून एकाच वेळी उजव्या बाजूवर आणि मध्य भागावर गोळे सुटत होते. लॅनिसच्या नेतृत्वाखाली फ्रेंच सैनिकांनी धरण केव्हाच ओलांडले होते, आणि धरणाच्या अलीकडच्या बाजूस ते जमत होते. ते बंदुकीच्या टप्प्याच्या फारसे बाहेर नव्हते.

' कर्नल पुन्हा सांगतो. रानामध्ये माझी अर्धी माणसं गमवायला मी तयार नाही. आहे त्या ठिकाणी राहून हल्ल्याला तोंड देण्याची तयारी करायला परवानगी द्या. पुन्हा पुन्हा विनंती करतो आहे. '

' आणि मीही विनंती करतो आहे—हे तुमचे काम नव्हे, त्यात ढवळाढवळ करू नका. ' कर्नल चिडून म्हणाला, ' जर तुम्ही घोडदळाचे ऑफिसर असता... '

' कर्नल, मी घोडदळाचा ऑफिसर नाही. पण मी रशियन जनरल आहे. जर तुम्हाला ही गोष्ट ठाऊक नसेल तर...'

' महाराज, ही गोष्ट मला चांगली ठाऊक आहे बरं.' कर्नल एकाएकी ओरडला. त्याचा चेहरा लालबुंद झाला. त्याने घोड्याला थोडेसे चाळवले. ' जर तुम्ही आघाडीवर यायची तसदी घ्याल तर तुम्हाला कळेल की इथं राहून निभाव लागणार नाही. तुमच्या समाधानासाठी मला माझ्या रेजिमेंटची कत्तल होऊ द्यायची नाही.'

कर्नलने केलेली सूचना आपल्या धैर्याला आव्हान आहे असे समजून जनरलने छाती फुगवली आणि चिडलेल्या चेहऱ्याने त्याच्या बरोबर घोड्यावरून आघाडीवर जायला निघाला. जणू त्या दोघांचे मतभेद शत्रूने केलेल्या गोळ्यांच्या वर्षावात निश्चितपणे मिटणार होते. ते आघाडीवर पोचले; कित्येक गोळ्या त्यांच्या जवळपास येऊन पडल्या. ते दोघेही काही न बोलता स्वस्थ उभे होते. आघाडीची पाहणी करूनही काही उपयोग नव्हता. झुडपामुळे आणि कोसळलेल्या दरडीमुळे घोडदळाला हल्ला करणे शक्य नव्हते. फ्रेंच सैनिकांनी डाव्या बाजूला वेढले होते.

घोडदळाला आणि पायदळालाही माघार घेता येईना. प्रदेश अनुकूल नव्हता तरी त्यांना बाहेर निसटण्यासाठी लढा द्यावा लागणार होता.

रोस्तॉफ जिथे कनिष्ठ अधिकारी होता त्या स्क्वॉड्रनमधील घोडेस्वारांना घोड्यावर चढायला अवकाश मिळाला नाही. शत्रूने त्यांना केव्हाच गाठले होते. एन्स पुलाप्रमाणे याही ठिकाणी स्क्वॉड्रन आणि शत्रू यांमधे कोणी नव्हता. होती ती फक्त अनिश्चितता आणि भीती यांची भयानक सीमारेषा. सर्वच सैनिकांना त्या सीमारेषेची जाणीव होती. ' आपण ती सीमारेषा ओलांडणार आहोत की नाही, ओलांडली तर कशा प्रकारे ओलांडणार आहोत ' या विचारांनी त्यांच्या मनात खळबळ उडाली होती.

तरीही कुणी हालचाल करीना. प्रत्यक्ष कमांडरांनाच काय करायचे ते ठाऊक नाही अशी कल्पना डाव्या बाजूच्या पायदळातील आणि घोडदळातील सैनिकांनी करून घेतली. कमांडरांच्या अनिश्चिततेची लागण सैनिकांतही झाली होती.

' त्यांनी आता घाई करायला पाहिजे. मुळीच विलंब लावता कामा नये.' रोस्तॉफ स्वतःशीच म्हणत होता.

' अजून वेगानं निघा ' हुकूम निनादला. घोडा पिटाळताना रोस्तॉफला पुढच्याच्या बाजूने रुक खाली बसत असल्याचे जाणवले. त्याला घोडदौडीच्या कल्पनेनेच उत्साह वाटू लागला. त्याला समोर एक एकाकी वृक्ष दिसला. प्रथम तो वृक्ष त्याच्या समोर पण भयानक वाटणाऱ्या आघाडीवर मध्यभागी होता. आता ते तो वृक्ष टाकून पुढे गेले होते. परंतु काही भयानक घडले नव्हते.

' आता शत्रू येऊ दे. कोणीही असू दे त्याचा समाचार घेतो.' रुकला टाच मारून इतरांना मागे टाकून घोडा भरधाव पिटाळताना तो स्वतःशी विचार करीत होता. आघाडीवर शत्रुसैन्य केव्हाच दिसू लागले.

वार करण्यासाठी रोस्तॉफने तलवार उचलली. रोस्तॉफला स्वप्नात असल्यागत वाटू लागले. 'कुणी दैवी शक्ती मोठ्या वेगाने आपणास नेते आहे आणि तरीही आपण जागच्या जागी आहोत.' आपणास जखम झाल्याचे आणि आपला घोडा ठार झाल्याचे त्याला कळून चुकले. रूकने पुढच्या पायावर उभे राहण्याची धडपड केली. पण तो खाली कोसळला, त्याच्या पाया-खाली त्याच्या मालकाचे पाय चिरडले गेले. घोड्याच्या डोक्यातून रक्त भळाभळा वाहात होते. रोस्तॉफने उठण्याचा प्रयत्न केला, पण तो देखील खाली कोसळला. आपली माणसे कुठे आहेत, फ्रेंच सैनिक कुठे आहेत, त्याला काहीही कळेना. त्याच्या जवळपास कुणीही नव्हते.

पाय सोडवून तो उठला, 'दोन्ही सैन्यांमधील अंतर स्पष्ट करणारा मधला पट्टा कुठं आहे ? कोणत्या बाजूला आहे' तो स्वतःला प्रश्न करीत होता, त्याला उत्तरे सापडत नव्हती. 'माझी मनःस्थिती तर बिघडलेली नाही ना ? माणसाची अशी स्थिती झाली की तिच्यावर उपाय काय ?' उठता उठता तो विचार करीत होता. त्याच वेळी आपल्या बधिर झालेल्या हाताला काही तरी अनावश्यक लोंबत राहिले आहे, मनगट हातापासून अलग झाले आहे असे त्याला वाटू लागले. आपल्या हातावर कुठे रक्त दिसते का तो बारकाईने पाहू लागला. काही माणसे आपल्या दिशेने धावत येताना पाहून तो आनंदित झाला. 'अरे वा ! इथं काही माणसं आहेत. ती मला मदत करतील.'

त्याच्या मागे सारख्या दिसणाऱ्या शाको टोप्या घातलेल्या सैनिकांमध्ये एक रशियन घोडे-स्वार होता. त्याचे हात त्यांनी धरून ठेवले होते.

'आमच्यापैकी कुणाला तरी त्यांनी कैद केलेलं असणार. मला देखील ते कैद करतील काय ? ही माणसं आहेत तरी कोण ? ही फ्रेंच माणसे असतील काय ?' रोस्तॉफ आपला तर्क करीत होता. त्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. पुढून येणाऱ्या फ्रेंच सैनिकां-कडे तो पाहतच राहिला.

'कोण ही माणसं ? कशासाठी धावताहेत ? मला पकडण्यासाठी तर धावत नसतील ? मी सगळ्यांना प्रिय असली तरीही मला मारतील ?' त्याला आपल्या आईची माया आठवली, आपल्या घरच्या इतर माणसांचे प्रेम आठवले, मित्रांचे प्रेम आठवले आणि त्यामुळे आपल्याला ठार करावं अशी शत्रूची इच्छा असणे शक्य नाही असे वाटू लागले. 'पण कदाचित ते मला मारतील.' काही क्षण तो तसाच काय करावे हे न सुचून निश्चल उभा राहिला.

गरुडासारखे नाक असलेला फ्रेंच सैनिक सर्वांत पुढे होता. आपल्या रोखाने धावणाऱ्या माणसाला पाहून रोस्तॉफ गर्भगळित झाला. त्याने कमरेचे पिस्तूल काढले, ते त्याच्यावर झाडण्याऐवजी त्याने त्याच्या दिशेने फेकले आणि जीव एकवटून झुडपाकडे धाव घेतली.

आपल्या तरुण, सुखी जीवनाचा त्याला नाश होऊ द्यायचा नव्हता. त्याच्या सर्वांगातून एकच एक भीती व्यापून राहिली. खेळत असताना ज्या चपळाईने तो उडी मारत असे त्याच चपळाईने त्याने कुंपणावरून उड्या मारून मैदानातून धूम ठोकली. तो प्रेमळ सुस्वभावीच

तरुण पोरगा अधूनमधून मागे वळून पाहत होता.

मागे वळून न पाहणे बरे असे त्याने मनाशी ठरवले, पण जेव्हा तो झुडपाजवळ गेला तेव्हा त्याने पुन्हा एक वार मागे वळून पाहिले. रोस्तॉफने मागे वळून पाहिले त्याच वेळी सर्वांत पुढे धावत असणारा माणूस धावत नव्हता आणि मागे वळून आपल्या सहकाऱ्यांना काहीतरी मोठ्या आवाजात सांगत होता. रोस्तॉफला वाटले आपली काहीतरी चूक होत असावी. मला मारण्याचा त्यांचा उद्देश नसेल. एवढ्या वेळात त्याचा हात कोणी शंभर पौंडांचे ओझे लटकावून ठेवल्यागत जड झाला. त्याला आणखी पुढे धावता येईना. तो फ्रेंच सैनिक थांबला आणि त्याने नेम धरला. एकामागून एक दोन गोळ्या सुइंसुइं करीत त्याच्या जवळून गेल्या. उजव्या हाताने डावा हात तोलीत तो झुडपाकडे धावला. झुडपामध्ये रशियन बरकंदाज होते.

रानात असलेल्या पायदळांवर अकस्मात हल्ला झाला होता, त्यामुळे पायदळाच्या सगळ्या कंपन्या गोंधळून वाटेत तशाच माघार घेत होत्या.

'वेढताहेत ! मधे घुसताहेत !' 'आता निभाव लागणार नाही' 'संपलोच आता.' ते धावताना ओरडत होते.

पाठीमागे चालू असलेला गोळीबार आणि आरोळ्या ऐकू आल्या तेव्हा कुठे जनरलला कळून चुकले- रेजिमेंटवर भीषण प्रसंग गुदरलेला आहे. कितीतरी वर्षे कसलीही चूक न करता नोकरी करणाऱ्या आपल्यासारख्या आदर्श अधिकाऱ्याला सैन्यातील बेशिस्तीसाठी वरिष्ठ अधिकारी बोल लावतील हा विचार त्याच्या मनात आला. आपण स्वतःचा प्राण धोक्यात घालीत आहोत याचीही त्याला जाणीव झाली नाही.

गोळ्यांच्या भडिमाराखाली असलेल्या रेजिमेंटकडे तो पोचला आणि सुदैव म्हणूनच त्याला गोळी लागली नाही.

फ्रेंचांच्या सैन्यामधून जखमी न होता तो रानाच्या मागच्या मैदानात गेला. त्या मैदानातूनच हुकूम न मानता आमचे सैनिक पळ काढत होते. आजवर सैनिकांवर ज्याची विलक्षण जरब होती तो कमांडर आता जिवाच्या आकांताने ओरडत होता, संतापाने त्याचा चेहरा लालबुंद झाला होता, ओळखता येऊ नये इतका वेडावाकडा झाला होता, तो तलवार परजीत होता, तरीही सर्व सैनिक हुकमाला दाद न देता एकमेकांशी बोलत पळत सुटले होते.

सर्वनाश झाल्यासारखा दिसत होता. पण त्याच वेळी मघापासून आमच्या सैनिकांवर चाल करीत येणारे फ्रेंच सैनिक काही कारण नसताना माघार घेऊ लागले. रानाच्या कडेवरून मागे जाऊ लागले. आणि आता रशियन बरकंदाज रानात दिसू लागले. हे सगळे टिमॉहिनच्या डिव्हिजनचे सैनिक होते. टिमॉहिनने जिवावर उदार होऊन आरोळी मारीत फ्रेंचांवर हल्ला केला होता. बेफाम झालेल्या दारुड्याप्रमाणे तो त्यांच्या अंगावर केवळ तलवारीनिशी घुसला. त्यामुळे

फ्रेंच सैनिकांनी हत्यारे टाकून पळ काढला. टिमॉहिनबरोबर धावणाऱ्या डोलोहॉव्हने जवळ भिडून एका फ्रेंच सैनिकाला गारद केले. शरण आलेल्या फ्रेंच ऑफिसरला मानगुटीला पकडणारा डोलोहाव्ह पहिलाच सैनिक होता. पळत सुटलेले रशियन सैनिक मागे वळले.

त्याच्या अंगात उंची निळा कोट होता. त्याच्या डोक्याला पट्टी बांधलेली होती. आणि खांद्याला एक फ्रेंच काडतुसाची पेटी लटकत होती. त्याच्या हातात ऑफिसरची तलवार होती.

'महाराज, ही युद्धातील दोन विजयचिन्हे ' फ्रेंच सैनिकाची तलवार आणि काडतुसाची पेटी दाखवीत डोलोहॉव्ह म्हणाला. 'मी एका ऑफिसरला कैद केले. मी कंपनीला थांबवले. सगळी कंपनी याला साक्षी आहे. कृपा करून माझी आठवण ठेवा.' डोलोहॉव्ह थांबून थांबून बोलत होता. थकल्यामुळे त्याला श्वास घ्यायला प्रयास पडत होते. त्याने बँडेज सोडून आपल्या कपाळावरील रक्त दाखवीत म्हटले, 'ही संगिनीची जखम आहे. तरी मी आघाडीवरून पळालो नाही. हे लक्षात असू द्या, महाराज.'

टुशिनच्या तोफखान्याची कुणालाच आठवण नव्हती. टुशिनच्या रक्षणासाठी असलेले सैन्य लढाईच्या मध्यालाच कुणाच्यातरी हुकमामुळे मागे आलेले होते. तरीही तोफखाना सारखा चालूच होता. थोड्याच वेळात टुशिनच्या सैनिकांनी शॉङ्ग्रबेन खेडे पेटवून टाकले. वाऱ्यामुळे आग पसरत भडकत चालली होती.

फ्रेंचांकडून एकदा दोन गोळे नंतर चार गोळे येऊन पडले. एका गोळ्याने दोन घोड्यांना लोळवले. आणि एका गोळ्याने एका गोलंदाजाच्या पायाच्या चिंधड्या केल्या तेव्हा कुठे गोलंदाजांना फ्रेंचांच्या तोफखान्याची जाणीव झाली.

टुशिन कधी गोळा कुठे पडेल याचा अंदाज घेत होता. कधी तोफांची दिशा बदलत होता. कधी मेलेले नाहीतर जखमी झालेले घोडे सोडवून बाजूला करीत होता आणि तो सारखा कर्कश आवाजात ओरडत होता.

आपण ठार होऊ, निदान भयंकर जखमी होऊ हा विचारही त्याच्या मनाला शिवला नाही. त्याचे सर्व गोष्टींवर अवधान होते. उत्कृष्ट अधिकाऱ्याने करावे ते सारे तो करीत होता, मात्र त्याची मनःस्थिती तापाने येणाऱ्या भ्रमासारखी किंवा मद्याने येणाऱ्या कैफासारखी झाली होती.

त्याच्या स्वतःच्याच तोफा कानठळ्या बसवणारे आवाज करीत होत्या. शत्रूकडून येणारे गोळे सुसाटत धडकत होते. घामाने भिजलेले, दचकणारे गोलंदाज तोफांजवळ वावरत होते. पलीकडे शत्रूच्या जागेतून धुराचे लोळ उठत होते. त्याच्या हिशेबी हे सगळे कुठेतरी कल्पनेत, स्वप्नात घडत होते. त्या सगळ्या दृश्याच्या दर्शनाने त्या वेळी त्याला विलक्षण आनंद होत होता. तोफांभोवती गोळा होणारे फ्रेंच सैनिक मुंग्यांसारखे दिसत होते.

आपली शक्ती प्रचंड आहे, आपला देहही प्रचंड आहे आणि आपण दोन्ही हातांनी फ्रेंच सैन्यावर तोफांचे गोळे फेकतो आहोत अशा कल्पनेत तो रंगला होता. एवढ्यात कुणीतरी अनोळखी उंच माणसाचा आवाज त्याला ऐकू आला. 'कॅप्टन टुशिन, कॅप्टन.'

दम न घेता तो टुशिनला ओरडून सांगत होता, 'अरे, तुझं डोकं फिरलं आहे काय?

तुला दोनदा परतण्याचा हुकूम दिलेला आहे तरीही...'

आपल्या टोपीच्या डोळ्यावर येणाऱ्या टोकाला दोन बोटे जुळवीत तो म्हणाला, 'मी... कुठं...काय...'

स्टाफ ऑफिसरने त्याला मनातले सगळे ऐकवले नाही. शत्रूकडून सुटलेला गोळा जवळून गेल्याने त्याने घोडा तस्साच माघारी वळवला, आणि पिटाळला.

'सगळ्यांनी मागे कूच करा. मागे कूच करा.' तो दूर अंतरावरून ओरडला.

सगळे सैनिक हसले. मिनिटाभरात तोच हुकूम घेऊन ॲड्ज्युटंट आला. तो प्रिन्स आन्द्रे होता. आता एकामागून एक तोफांचे गोळे पडू लागले आणि त्याचे शरीर भीतीने शहारून गेले. आपण भ्यालो आहोत ह्या विचारासरशी त्याने भीतीवर मात करण्याचे ठरवले. 'मी असा घाबरणार नाही.' तो जाणूनबुजून घोड्यावरून खाली उतरला आणि तोफांजवळ राहिला. हुकूम दिल्यानंतर तो तोफखाना सोडून गेला नाही.

'मघा आलेला ऑफिसर जितक्या वेगाने आला त्याहून जास्त वेगाने पळाला. तुमच्यासारखा थांबला नाही.' एक गोलंदाज प्रिन्स आन्द्रेला म्हणाला.

दोन तोफांची काही मोडतोड झाली नव्हती. त्या त्यांनी प्लॅटफॉर्मवर चढवल्या आणि टेकडीवरून खाली नेण्याची व्यवस्था केली. तेव्हा कुठे प्रिन्स आन्द्रेने टुशिनकडे जाऊन निरोपासाठी हात पुढे केला. 'पुन्हा भेटू.' टुशिनने मोठ्या प्रेमाने त्याचा निरोप घेतला. त्या वेळी कसल्यातरी अज्ञात कारणांमुळे टुशिनचे डोळे भरून आले होते.

वारा पडला होता. रणांगणावर काळे वादळी ढग ओथंबले होते. ते क्षितिजाशी विरळ झाले होते आणि त्यातच दारूगोळ्यांच्या धुराचे ढग मिसळत होते. अंधार पडला होता. तोफांचे आवाज जवळ जवळ थंडावले होते, परंतु पिछाडीला आणि उजव्या बाजूला गोळ्यांचा भडीमार अगदी जवळून आणि वारंवार ऐकू येत होता.

टुशिनने तोफा माऱ्याच्या टप्प्यातून बाहेर आणल्या. त्या घेऊन दरीत उतरत असताना त्याला अधिकारी भेटले. त्यामध्ये स्टाफ ऑफिसर होता आणि ज्याला दोनदा टुशिनच्या तोफखान्याकडे पाठवले होते पण जो एकदाही तिथे भीतीमुळे फिरकला नव्हता तो झेरकॉफदेखील होता. त्याला हुकूम देण्यात त्याने कसे आणि कुठे जावे हे सांगण्यात, त्याच्यावर टीका करण्यात त्यांची आपापसात स्पर्धाच लागली. जखमी सैनिकांना तिथेच सोडून येण्याचा हुकूम होता. तरीही कित्येकजण रखडत रखडत सैन्यामागून येत होते. आणि तोफखान्याच्या गाडीवर आपणास घेण्यासाठी विनवीत होते. लढाई सुरू होताना टुशिनच्या राहुटीतून पळत सुटलेल्या स्वतःवरच खूष असणाऱ्या पायदळाच्या ऑफिसरच्या पोटात गोळी घुसली होती. त्याला मेटव्येवना तोफेच्या गाडीवर ठेवण्यात आले. टेकडीच्या पायथ्याशी घोडदळातील पांढरा फटक

पडलेला इन्साइन आपला एक हात दुसऱ्या हातात धरून उभा होता.

कुणी आपले ऐकेल याची त्याला खात्री नव्हती तरीही केविलवाण्या स्वरात तो विनवणी करीतच होता. ' कृपा करा आणि त्यांना मला गाडीत घ्यायला सांगा. '

' घ्या त्याला, त्याच्या अंगाखाली कोट अंथरून ठेवा. ' टुशिनने आपल्या आवडत्या सैनिकाला सांगितले. ' आपला जखमी अधिकारी कुठे ? '

' मरण पावल्यामुळे गाडीत ठेवलं नाही. ' कुणीतरी उत्तरले. ' त्याला चढायला मदत करा. मित्रा, बसून घे. अॅन्टोनॉफ तिथे कोट अंथर. '

अंथरलेल्या कोटावर रक्त होते. रोस्तॉफची विजार आणि त्याचे हात रक्ताने माखले होते.

' अरे तुला कुठं झाली आहे जखम ? ' तोफेवर बसलेल्या रोस्तॉफजवळ जाऊन टुशिनने विचारले.

' हात मुरगळला आहे. ठणकतो आहे. '

' मग तुझ्या शरीरावर तर रक्त आहे. '

' मघाच्या ऑफिसरच्या रक्ताचे डाग आहेत. ' आपल्या कोटाच्या बाहीने रक्त पुसता पुसता तिथला गोलंदाज म्हणाला. जणू तोफ घाण झाली म्हणून तो क्षमा व्यक्त करीत होता.

खेड्यातील घरात दबा धरून बसलेल्या सैनिकांनी त्याला उत्तर दिले. सगळेजण बाहेर पडले, परंतु टुशिनच्या तोफा हालवता येईनात. टुशिन त्याचे गोलंदाज आणि एन्साइन एक-मेकांकडे पाहू लागले. नशिबात काय वाढून ठेवलं आहे ते कोणासच कळत नव्हते. दोन्ही बाजूंचा गोळीबार कमी होऊ लागला.

फ्रेंच सैन्याला अखेरीस पिटाळून लावण्यात आले होते. पुन्हा गडद अंधारातून टुशिनच्या तोफा पुढे जाऊ लागल्या. भोवताली पायदळाचे सैनिक हळू आवाजात बोलत चालत होते. त्यांना घोड्यांच्या टापांचा आवाज आणि चाकांचा खडखडाट साथ करीत होता. रात्रीच्या काळोखात सगळ्या कोलाहलात जखमी सैनिकांचे आर्त आक्रंदन अधिक स्पष्टपणे ऐकू येत होते.

लवाजम्यासह आलेल्या कुण्या पांढऱ्या घोड्यावरील स्वाराने जाता जाता म्हटले होते. थांबण्याचा हुकुम आला आहे अशी सगळीकडे अफवा पसरली. सगळेजण तिथे त्या चिख-लाच्या रस्त्यात थांबले.

शेकोट्या पेटवल्या गेल्या. लोक मोठ्याने बोलू लागले. कॅप्टन टुशिनने तोफखान्याच्या माणसांना सूचना दिल्या. एन्साईनसाठी अॅम्ब्युलन्स किंवा डॉक्टर आणण्यासाठी काही सैनि-कांना पाठवले. मग तो रस्त्याच्या कडेला सैनिकांनी पेटवलेल्या शेकोटीजवळ बसला. रोस्तॉफ देखील कसाबसा शेकोटीकडे आला. शारीरिक वेदना, सर्दी आणि दमट हवा यामुळे त्याला ताप भरून त्याचे सगळे शरीर थरथरत होते. हाताच्या तीव्र वेदनांमुळे त्याला झोपता येत नव्हते. हात सारखा ठणकत होता. कुठेही आराम वाटत नव्हता. तो आपले डोळे झाकून घेई. मग डोळे उघडले की त्याला दिपवून टाकणारी लाललाल आग दिसे. मग तो जवळ

बसलेल्या तुर्कांप्रमाणे कृश शरीराच्या टुशिनकडे पाहू लागे. त्याच्यावर टुशिनचे डोळे खिळलेले होते.

पायदळाचे सैनिक ये-जा करत होते, बोलत होते. आणि त्यांच्या भोवतालीच कुठेतरी मुक्काम करीत होते. त्यांचे बोलणे आणि त्यांची पावले ऐकू येत होती. त्यांचे आवाज, त्यांचे पदरव, चिखलातून जाणाऱ्या घोड्यांच्या टापा, जळणाऱ्या लाकडाचा होणारा आवाज— जवळपासचे आणि दूरचे सगळे आवाज कमी-जास्त होत राहणारा कोलाहल बनले होते.

पायदळातील एक सैनिक शेकोटीकडे आला. टाचांवर बसून त्याने विस्तवावर हात धरले आणि टुशिनकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहात तो म्हणाला, ' तुमची काही हरकत नाही ना, महाराज? माझी आणि माझ्या कंपनीची चुकामूक झाली आहे. मला स्वतःलाच मी कुठं आहे ते ठाऊक नाही. '

चेहऱ्यावर बँडेज असलेला पायदळाचा अधिकारी सैनिकाला बरोबर घेऊन शेकोटीकडे आला. पुरवठा नेणारी गाडी पलीकडे जावी म्हणून त्याने टुशिनला तोफ थोडी हालवून बाजूला नेण्याची विनंती केली. त्या अधिकाऱ्यांनंतर दोन सैनिक बुटासाठी हिसकाहिसकी करू लागले. मग एक पांढराफटफटीत पडलेला कृश सैनिक आला. त्याच्या मानेला रक्ताचे डाग पडलेला कपडा गुंडाळलेला होता. त्याने पाणी मागितले. मग एक सैनिक पायदळासाठी निखारे मागायला आला.

' पायदळासाठी थोडा विस्तव द्या बरं. तुम्ही विस्तव कर्जाऊ दिला म्हणून तुमचे आभार. कधीतरी सव्याज विस्तव परत करू. ' उजळणारे निखारे घेऊन तो अंधारात दिसेनासा झाला. ' मुकाट्याने चल बघू. ' मग ते चौघेही ओझे बरोबर घेऊन अंधारात दिसेनासे झाले.

' फार वेदना होताहेत काय? ' टुशिनने हळू आवाजात रोस्तॉफला विचारले.

' होय. '

' आपल्याला जनरलसाहेबांनी बोलावलं आहे, ते जवळच्याच झोपडीत आहेत. ' गोलंदाजाने टुशिनजवळ येऊन निरोप दिला.

' हा आलोच. ' टुशिन उठला. कोटाची बटणे लावीत आणि सरळ ताठ होत तो शेकोटीपासून दूर झाला.

वीस वर्षे निष्कलंक सेवा करणाऱ्या जनरलला एक ग्लास व्होडका आणि जेवणही चढले होते. राजमुद्रा असलेली अंगठी घातलेला स्टाफ ऑफिसर तिथे होता. झेरकॉफ सर्वांकडे अस्वस्थपणे पाहत होता. प्रिन्स आन्द्रेने आपले फिक्कट ओठ घट्ट मिटले होते आणि त्याचे डोळे अस्वस्थपणे चमकत होते. झोपडीच्या कोपऱ्यात हस्तगत करून आणलेला फ्रेंचांचा ध्वज ठेवलेला होता.

प्रिन्स बॅग्रेशनने कमांडिंग ऑफिसराचे आभार मानले. त्यांना लढाईचे तपशील विचारले, हानी किती झाली याची चौकशी केली. ज्याच्या रेजिमेंटची तपासणी ब्रॉनॉ इथे झाली होती, त्या जनरलने प्रिन्स बॅग्रेशनला आपण काय केले हे सांगितले. चकमकीला सुरुवात होताच

रानापासून तो दूर गेला आणि सरपण गोळा करणाऱ्यांना त्याने एकत्र केले. फ्रेंचांना जवळून जाऊ दिले आणि मग त्याच्या दोन्ही बटालिअननी बायोनेटनी हल्ला करून फ्रेंच सैनिकांना पिटाळून लावले.

' महाराज, पहिली बटालिअन गोंधळून गेलेली पाहिली आणि मी रस्त्यावर उभा राहिलो. आणि ठरवले, त्यांना येथून जाऊ द्यायचे आणि मग गोळ्या झाडायच्या. आणि मी तसेच केले. '

असे करण्याची जनरलला इतकी इच्छा होती, असे घडले नाही म्हणून त्याला इतके वाईट वाटत होते की, त्याला आता तसे घडलेच होते असे वाटू लागले. खरोखरच असे घडले नव्हते काय ? काय घडले आणि काय घडले नाही हे गोंधळामुळे कोणालाच समजणार नव्हते.

' महाराज, मी इथं पावलोग्रॅडच्या घोडदळानं केलेला हल्ला पाहिला. ' भोवताली अस्वस्थपणे पाहत झेरकॉफने तोंड घातले. खरे तर त्याने दिवसभर घोडदळ पाहिले नव्हते; त्याने पायदळाच्या अधिकाऱ्यांकडून घोडदळाबद्दल नुसते ऐकले होते. ' त्यांनी पायदळाच्या दोन तुकड्या पळवून लावल्या. '

झेरकॉफ बोलू लागला तेव्हा तो नेहमीप्रमाणे काहीतरी विनोद करील या अपेक्षेने कित्येक अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावर स्मित उमटले. आपल्या सैन्याच्या विजयाबद्दल तो बोलतो आहे हे दिसताच सर्वांनी मुद्रा गंभीर केल्या. तो बोलत होता ते खोटे होते, त्याला कशाचाही आधार नव्हता, हे सर्वांना ठाऊक होते.

प्रिन्स बॅग्रेशन वृद्ध कर्नलकडे वळून म्हणाला, ' दोस्तहो, मी तुम्हां सर्वांचे आभार मानतो. पायदळ, घोडदळ, तोफखाना– सर्वांनीच शौर्य गाजवलं आहे. दोन तोफा मध्यभागीच टाकून आलो याचा अर्थ काय ? ' कोणाला तरी एकाला शोधत त्याने विचारले. मग स्टाफ ऑफिसरला उद्देशून तो म्हणाला, ' मला वाटतं, मी तुम्हाला पाठवलं होतं. '

' एक अगोदरच निकामी झाली होती. दुसरीबद्दल मला सांगता येणार नाही. सूचना देत सारा वेळ मी तिथं होतो. मी तिथून निघालो नाही तोच...शत्रूचा भडिमार जोराचा झाला होता हेही खोटं नाही. ' मोठ्या नम्रपणे तो बोलला.

कुणीतरी माहिती पुरवली–टुशिन जवळच खेड्यात येऊन पोचला आहे, आणि त्याला बोलवण्यात आले आहे.

' तुम्ही सुद्धा गेला होता ना ? ' प्रिन्स आन्द्रेला उद्देशून प्रिन्स बॅग्रेशन म्हणाला.

' होय. खरं म्हणजे आम्हा दोघांचेही घोडे जवळजवळ एकाच वेळी तिथे गेले. ' प्रिन्स आन्द्रेकडे पाहात आर्जवी हास्य करीत स्टाफ ऑफिसर म्हणाला.

' तुम्हाला पाहिल्याचं मला आठवत नाही. ' प्रिन्स आन्द्रे थंडपणाने आणि तुटकपणे म्हणाला. तेव्हा सगळे शांत झाले.

कपाळाला आठ्या घालीत बॅग्रेशनने टुशिनला विचारले. ' एक तोफ टाकून तुम्ही कसे

आलात?'

'महाराज, खरं म्हणजे...माझ्याकडे माणसं नव्हती,' टुशिन म्हणाला.

'तुमच्या संरक्षणाला ठेवलेल्या बटालिअनमधून तुम्हाला माणसे घेता आली असती.'

तिथे बटालिअन नव्हत्या ही वस्तुस्थिती होती. पण टुशिन हे कारण सांगू शकला नाही. असे केल्याने दुसरा अधिकारी गोत्यात येईल अशी त्याला धास्ती पडली म्हणून तो काही न बोलता बॅग्रेशनच्या तोंडाकडे पाहत राहिला.

मग एकाएकी प्रिन्स आन्द्रे बोलू लागला, 'महाराज, तुम्ही मला टुशिनच्या तोफखान्याकडे पाठवलं होतं. मी तिथं गेलो तेव्हा मला निम्म्याहून अधिक माणसं आणि घोडे मरण पावलेले दिसले; दोन तोफा निकामी झाल्या होत्या आणि संरक्षण करायला जवळपास फौजा नव्हत्या.'

प्रिन्स आन्द्रे भावनेला आवर घालीत बोलू लागला तेव्हा बॅग्रेशन आणि टुशिन सारख्याच उत्सुकतेने त्याच्याकडे पाहू लागले. प्रिन्स बॅग्रेशनने टुशिनकडे पाहिले. प्रिन्स आन्द्रेने ऐनवेळी आपले मत दिले होते त्यावर अविश्वास व्यक्त करायला तो नाखूष होता. पण त्यावर पूर्णपणे विश्वास ठेवणेही त्याला शक्य नव्हते. त्याने टुशिनला जायला सांगितले. टुशिनच्या मागोमाग प्रिन्स आन्द्रेही बाहेर पडला.

'मित्रा, तुझा अत्यंत आभारी आहे.' टुशिन म्हणाला. प्रिन्स आन्द्रेने टुशिनकडे पाहिले. आणि काही न बोलता तो चालू लागला. त्याचे मन विषण्ण झाले, उद्विग्न झाले. काहीतरी विचित्र घडले होते. त्याने आशा केली होती त्याहून किती विपरीत वेगळे घडले होते.

'कोण माणसे आहेत ही? इथे का जमली आहेत? काय हवे आहे त्यांना? कधी संपणार आहे सारे?' समोरून वेगाने सरकणाऱ्या छायाकृती पाहत रोस्तॉफ् विचार करीत होता. हाताची वेदना असह्य होत होती. त्याला जोराची झोप येत होती आणि डोळ्यांसमोरून गडद लाल वर्तुळे गरगरत होती. निरनिराळ्या आवाजांची आणि चेहऱ्यांची जाणीव, एकाकीपणाचे दुःख ही त्याच्या वेदनेत मिसळत होती. जखमी झालेले आणि न झालेले सगळे सैनिक त्याला चिरडीत होते, त्याच्यावर पडत होते, त्याच्या शिरा पिरगाळून टाकत होते, त्याच्या ठणकणाऱ्या हाताखांद्याचे मास जाळीत पोळीत होते. त्यांच्यापासून सुटण्यासाठी त्याने डोळे मिटले.

क्षण दोन क्षण त्याचा डोळा लागला असेल, तेवढ्या अल्पकाळात त्याच्या स्वप्नात अनंत

गोष्टी येऊन गेल्या. त्याने स्वप्नात आईला पाहिले, तिचा गोरापान हातही त्याला दिसला. सोन्याचे कृश खांदे त्याने पाहिले. नताशाचे डोळे आणि हसणेही त्याला दिसले. डेनिसॉव्हचा आवाज ऐकू आला, त्याच्या मिश्या दिसल्या. टेल्यानिन आणि बॉग्डॅनिचबरोबर घडलेले प्रसंग दिसले. आणि मग कर्कश आवाजामधे ते सारे कसेतरी मिसळून गेले. ते प्रसंग आणि इथला सैनिक त्याला इतक्या निर्दयपणे ओढू लागले, चिरडू लागले, त्याचा हात एकाच दिशेने पिरगाळू लागले. त्याला भयंकर वेदना होऊ लागल्या. त्यांच्यापासून दूर होण्याची तो धडपड करीत होता पण ते त्याचा खांदा क्षणभरही सोडीत नव्हते. त्यांनी खांदा ओढण्याचे थांबवले तर तो ठणकणार नाही, बरा होईल; असे त्याला वाटले. पण त्यांच्यापासून सुटका कशी ती होत नव्हती.

'माझी कोणालाच पर्वा नाही, मला मदत करणारा कोणी नाही. माझ्यासाठी दुःखीकष्टी होईल असा कुणी नाही.' नकळतच तो कण्हू लागला.

'वेदना होताहेत का?' आपला सदरा बिस्तवावर झटकीत समोरच्या सैनिकाने विचारले. आणि उत्तराची वाट न पाहता तो पुढे म्हणाला, 'आज कितीतरी खलास झाले. फार भयंकर!'

रोस्तॉफला त्याचे बोलणे ऐकू आले नसावे. बिस्तवावर गरगरत पडणाऱ्या हिमतुषारांकडे पाहताना त्याला एकेक गोष्ट आठवू लागली. रशियातील हिवाळ्यात भरपूर प्रकाशित केलेले, उबदार ठेवणारे आपले घर; हवाहवासा वाटणारा लोकरीचा उबदार झगा, वेगाने पळणारी घसरगाडी, त्याची धडधाकट प्रकृती, घरच्या मंडळींची माया.

आपण कशासाठी या ठिकाणी आलो हे त्याला कळेना. दुसऱ्या दिवशी फ्रेंच सैन्याने पुन्हा हल्ला चढवला नाही. बॅग्रेशनचे उरलेसुरले सैन्य कुटूझॉफच्या सैन्याला जाऊन मिळाले.

■ ■

# भाग तिसरा

## १८०५

प्रिन्स व्हॅसिली हा काही आयुष्याची व्यवस्थित आखणी करून भविष्यकाळाचा विचार करणारा माणूस नव्हता. स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्याचे नुकसान करण्याचा विचार कधी प्रिन्स व्हॅसिलीच्या मनातही येत नसे. तो जगात यशस्वी झालेला व्यवहारी मनुष्य होता, तसे वागण्याची त्याला सवय झाली होती. परिस्थितीमुळे आणि भेटलेल्या माणसांमुळे त्याच्या डोक्यात सदैव अनेक योजना आणि आडाखे घोळत असत. दहा-बारा योजनांची मालिकाच त्याच्या डोक्यात एकाच वेळी असे. काही नुसता आकार घेऊ लागत, काही फलद्रूप होऊ लागत तर काही फुकट जात. अमका मनुष्य सत्तेवर आहे त्याची मैत्री संपादून मदत मिळवली पाहिजे असे त्याने म्हटले नाही किंवा पीएर श्रीमंत आहे, माझ्या मुलीशी लग्न करण्यासाठी त्याचे मन वळवले पाहिजे आणि मला हवे असलेले चाळीस हजार रूबल त्याच्याकडून मिळविले पाहिजेत असेही कधी त्याने म्हटले नाही.

पीएर आयताच मॉस्कोला आलेला होता. प्रिन्स व्हॅसिलीने त्याच्या दिमतीला राहावे असे ठरविले. व्हॅसिलीला जे स्थान मिळाले ते राज्याच्या कौन्सिलरच्या स्थानाहून खासच कमी मानाचे नव्हते. पीएरने आपल्याबरोबर पीटर्झबर्गपर्यंत प्रवास करावा आणि आपल्या घरी मुक्काम करावा असा प्रिन्स व्हॅसिलीने आग्रह केला. आपल्या मुलीचे लग्न पीएरशी व्हावे यासाठी व्हॅसिलीने हरतऱ्हेने प्रयत्न केले. त्यामागे तशी काही योजना नव्हती. तरीही आपण करतो ते योग्य आहे अशी त्याची ठाम श्रद्धा होती.

पीएर अनपेक्षितरीत्या श्रीमंत झाला होता, तो आता काउंट बेझुहॉव्ह झाला होता. त्याचे एकाकी बेफिकीर जीवन संपले होते. झोपण्याचा वेळ सोडला तर इतर वेळी त्याच्याभोवती

सारखी माणसे असत, तो कसल्या ना कसल्या कामात मग्न असे. त्याला आता कागदपत्रांवर सह्या कराव्या लागत, निश्चित कशासाठी कोण जाणे पण त्याला कोर्टकचेऱ्यांत हजर व्हावे लागे, आपल्या प्रमुख व्यवस्थापकाकडे चौकशी करावी लागे, मॉस्कोजवळील इस्टेटीला भेट द्यावी लागे. पूर्वी ज्यांनी कधी त्याच्या अस्तित्वाची दखल घेतली नव्हती असे अनेक लोक भेटीला येत आणि त्यांना अपमानित वाटू नये म्हणून तो त्यांच्या भेटीगाठी घेई.

व्यापारधंद्यातील माणसे, नातेवाईक, परिचित—सगळ्या प्रकारची माणसे ह्या तरुण वारसाशी मैत्रीने वागत, सगळ्यांचे त्याच्याबद्दल चांगले मत होते. पीएरच्या सद्गुणांची सर्वांना निश्चित खात्री पटलेली होती. त्याच्या कानांवर नेहमी स्तुतिवाचक शब्द पडू लागत, 'तुमच्यासारखा दयाळू कुणीच नसेल...तुमचं मन अतिशय सरळ आहे...तुमचं अंतःकरण इतकं निष्पाप आहे...अमकातमका तुमच्यासारखा हुषार असता तर...' हे सारे ऐकून चांगुलपणा आणि बुद्धिमत्ता हे दोन अलौकिक गुण आपल्या ठिकाणी आहेत असे त्याला खरोखरच वाटू लागले.

पूर्वी जे द्वेषाने वागत, उघड उघड शत्रुत्वाने वागत ते सगळे आता त्याच्याशी आपुलकीने आणि प्रेमाने वागू लागले. आतापर्यंत आकसाने वागणारी, बाहुलीसारखे केस सोडणारी थोरली प्रिन्सेस प्रेतयात्रा आटोपल्यानंतर पीएरच्या खोलीत गेली. नजर वर न करता शरमेने लाल होत ती म्हणाली, 'आपल्यामध्ये गैरसमज निर्माण झाले त्याचे मला फार वाईट वाटते.' हे घर मला अत्यंत प्रिय आहे, ह्या घरासाठी मी कितीतरी त्याग केला आहे, माझ्यावर मोठा आघात झाला आहे. मला काही आठवडे या घरात राहण्याची परवानगी द्या. खरं तर ही मागणी करण्याचाही मला हक्क नाही.' तिला आपले मन आवरता आले नाही, ती रडू लागली तेव्हा पीएर हेलावून गेला. तिचा हात आपल्या हातात घेऊन त्याने तिची क्षमा मागितली. आपण कशासाठी तिची क्षमा मागितली हे त्याला सांगता आले नसते. त्या दिवसापासून प्रिन्सेस पीएरसाठी पट्ट्यापट्ट्याचा एक स्वेटर विणू लागली. पीएरबद्दलची तिची अढी पूर्णपणे नाहीशी झाली होती.

'माझ्यासाठी एवढं कर, तिनं मृतासाठी खूप सोसलं होतं.' प्रिन्सेसचा फायदा व्हावा म्हणून कागदपत्र तयार करून व्हॅसिलीने ते पीएरसमोर सहीसाठी धरताना म्हटले. तीस हजारांचा तुकडा गरीब प्रिन्सेसच्या तोंडावर फेकला म्हणजे पोर्टफोलिओच्या संबंधात आपला काही भाग आहे असे ती बोलणार नाही असे प्रिन्स व्हॅसिलीला वाटले. पीएरने कागदपत्रावर सही केली. तेव्हापासून तर थोरली प्रिन्सेस पीएरबद्दल अधिक आस्था दाखवू लागली.

ह्या प्रारंभीच्या दिवसात कोणी नव्हे तो प्रिन्स व्हॅसिलीच पीएरच्या सर्व व्यवहारात लक्ष घालीत होता. पीएरवरही ताबा चालवीत होता. काउन्ट बेझुहॉव्हच्या मृत्यूच्या वेळी प्रिन्स व्हॅसिलीने पीएरवरील आपली पकड घट्ट केली. आपल्यावर कामाचे फार ओझे पडते आहे, आपण कंटाळून थकून गेलो आहोत तरीही सहानुभूतीपोटी आपण आपल्या मित्राच्या असहाय मुलाला सोडू शकत नाही, तो गडगंज इस्टेटीचा वारस असल्याने त्याला कोणी बदमाशांनी फसवू

नये याची आपणास काळजी घ्यावी लागत आहे, असे लोकांना वाटावे अशा तऱ्हेने व्हॅसिली वागू लागला.

काऊंट बेझुहॉव्ह मरण पावल्यानंतर व्हॅसिली काही दिवस मॉस्कोमधे राहिला. तेवढ्या काळात कधी तो पीएरला आपल्याकडे बोलावी, कधी तो स्वतः त्याच्याकडे जाई. आणि प्रत्येक वेळी तो पीएरने काय करावे याबद्दल सांगू लागे. थकलेल्या परंतु ठाम स्वरात जणू त्याला म्हणायचे असे 'माझ्यामागे अनेक व्याप आहेत हे तुला ठाऊकच आहे. केवळ उपकार म्हणून मी तुझ्या भवितव्याबद्दल आस्था बाळगतो आहे. दुसरं असं की मी जे सांगतो आहे त्याखेरीज अन्य काहीही व्यवहार्य नाही हे तुला ठाऊक आहे.'

एके दिवशी व्हॅसिली म्हणाला, 'बाळ, उद्या एकदाचे आपण निघायचे.' जणू आपण दोघांनी निघण्याचे ठरवले होते आणि आता त्यात काही बदल करणे शक्य नाही अशा सुरात व्हॅसिली म्हणाला होता.

'उद्या आपण निघतो आहोत. माझ्या गाडीत मी तुला जागा देईन. इथले सगळे महत्त्वाचे व्यवहार पुरे झाले आहेत. मी आता खुषीत आहे. खरे तर मी यापूर्वीच निघायला हवे होते. चॅन्सेलरकडून मला आलेले हे पत्र बघ. तुझ्यासाठी मी त्यांना शब्द टाकला होता. तुला त्यांनी परराष्ट्र वकिलातीत नेमण्याचे ठरवले आहे.'

'तुझी नेमणूक खाजगी विभागासाठी झाली आहे. आता परराष्ट्र खात्यात मुत्सद्दी होण्याची संधी तुला मिळणार आहे.' पीएरने प्रिन्स व्हॅसिलीला नाखुषी दाखवण्याचा प्रयत्न केला. पण प्रिन्स व्हॅसिलीने आपल्या धीरगंभीर आवाजाने त्याच्या बोलण्याला अवसरच मिळू दिला नाही.

मन वळवण्याचे सर्व उपाय हरले की व्हॅसिली शेवटचा उपाय म्हणून आपल्या धीरगंभीर आवाजात बोलू लागे.

'अरे बाबा, मी हे माझ्यासाठी केलं आहे; माझ्या विवेकबुद्धीसाठी केलं आहे. तू माझे आभार मानण्याची काही गरज नाही. आपल्यावर फार प्रेम केलं जात आहे अशी अजून कोणी तक्रार केलेली नाही. तरी पण तू तुला हवा तो निर्णय घ्यायला मोकळा आहेस. तू उद्याही नाकारू शकतोस. उद्या तू पीटर्सबर्गमधे गेल्यावर निर्णय घे. ह्या सगळ्या भयानक सोबत्यांना यापूर्वीच तू सोडायला हवे होतेस.' प्रिन्स व्हॅसिली उसासा टाकून पुढे म्हणाला,

'मग ठरलं तर. बेटा, तुझ्या गाडीत माझ्या नोकराला बसू दे. अरेच्या मी विसरलोच होतो. तुझ्या वडिलांचा आणि माझा देण्याघेण्याचा काही व्यवहार मिटवायचा राहिलाय. रॅझान इस्टेटीकडून मला काही रक्कम मिळाली आहे. ती मी माझ्याकडेच ठेवून घेतो. तुला नकोच असेल. आपण मग सगळे हिशेब पाहू.'

प्रिन्स व्हॅसिलीने उल्लेखिलेली रॅझान इस्टेटीकडून आलेली काही रक्कम थोडीथोडकी नव्हती. कित्येक हजार रूबल आलेले होते.

मॉस्कोप्रमाणेच पीटर्सबर्गमधेही पीएरला आस्थेचे आणि आपुलकीचे वातावरण आढळले. प्रिन्स व्हॅसिलीने मिळवलेल्या नोकरीला—खरे तर आयत्या मिळालेल्या उपाधीला नकार देणे

त्याला शक्य झाले नाही. अनेकांच्या ओळखी होऊ लागल्या.

अनेकांकडून आमंत्रणे येऊ लागली आणि अनेक ठिकाणी मिसळावे लागले त्यामुळे पीएर धावपळ करू लागला.

पीटर्झबर्गमधे त्याच्या जुन्या अविवाहित दोस्तांपैकी कुणी दिसले नाहीत. संरक्षकदलातील सैनिक युद्धावर गेले होते. डोलोहॉव्हची नियुक्ती खालच्या जागी करण्यात आली होती. अनातोल राजधानीपासून दूर ठिकाणी चाललेल्या युद्धात भाग घेत होता. प्रिन्स आन्द्रे परदेशी होता. त्यामुळे पीएरला पूर्वीप्रमाणे रात्री गमतीत घालवता येत नव्हत्या. आपल्याहून वडील असलेल्या आणि आदरणीय वाटणाऱ्या एखाद्या मित्राशी अंतःकरण मोकळे करावे असे वाटले तरी तसे करता येत नव्हते. भोजनसमारंभात, नाचगाण्यात नाहीतर प्रिन्स व्हॅसिलीच्या येथे जमलेल्या लठ्ठ प्रिन्सेस, प्रिन्स व्हॅसिलीची पत्नी आणि त्याची सुंदर मुलगी एलन यांच्या सहवासात त्याला सारा वेळ घालवावा लागत असे.

प्रतिष्ठितांची त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टी कशी बदलली आहे ते दाखवण्याचे काम इतरां-प्रमाणे ॲना पॉवलोवना शिअररही करीत होती.

पूर्वी ॲना पॉवलोवनाच्या उपस्थितीत पीएरला आपण उच्चारलेले शब्द अनुचित, अयोग्य, अनाठायी वाटायचे; मनातल्या मनात जुळवलेले चातुर्याचे बोल उच्चारल्याबरोबर मूर्खपणाचे वाटायचे; उलट इपॉलिटचे सामान्य बोलणेही शहाणपणाचे आणि आकर्षक वाटायचे. आता त्याचा प्रत्येक बोल 'सुरेख' वाटत होता. ॲना पॉवलोवना तसे बोलून दाखवीत नव्हती. पण तसे म्हणायची तिची इच्छा त्याला दिसत होती.

त्याच्या विनयशीलतेचा आदर राखावा म्हणून ती उघड बोलत नव्हती इतकेच.

१८०५ च्या हिवाळ्याच्या प्रारंभीच पीएरला ॲना पॉवलोवनाकडून एक निमंत्रणपत्रिका मिळाली. नेहमीप्रमाणे तिचा रंग गुलाबी होता. पत्रिकेत लिहिलेले होते. 'माझ्या घरी जिच्या दर्शनाचा कधीच कंटाळा येणार नाही अशा लावण्यमयी हेलनशी गाठ पडेल.'

पत्र वाचल्यावर पीएरला कळून चुकले. आपण आणि हेलन यांमध्ये एक अनामिक नाते निर्माण होते आहे आणि लोकांना ते ठाऊक झाले आहे. त्या कल्पनेने तो दबून गेला आणि त्याला आनंदही झाला.

ॲना पॉवलोवनाकडील रात्रीचा समारंभ पूर्वीसारखाच झाला. या वेळी पाहुण्यांना सादर करण्यात आलेली नवलाईची गोष्ट मार्टीमार्ट नव्हता. या वेळी बर्लिनहून आलेला परराष्ट्र वकिलातीतील मनुष्य प्रमुख आकर्षण होता. पॉटस्डॅम येथे मुक्काम करणाऱ्या सम्राट आलेक्झांडरांबद्दल आणि मानवजातीच्या शत्रूविरुद्ध लढण्यासाठी दोन जिवाभावाच्या दोस्तांनी केलेल्या अभेद्य एकजुटीबद्दल त्याने अद्ययावत बातमी आणली होती. काहीशा खिन्न-पणाने ॲना पॉवलोवनाने पीएरचे स्वागत केले.

काउंट बेझुव्हॉव्हच्या मृत्यूने झालेल्या हानीची जाणीव त्या खिन्नपणामागे होती यात संशय नव्हता.

ॲना पावलोवना जेव्हा जेव्हा सम्राज्ञी मार्या फ्यादोरोवनाचा उल्लेख होई तेव्हा तेव्हा मोठ्या आदबशीरपणे खिन्नता दाखवी. तशा प्रकारची खिन्नता तिने पीएरच्या बाबतीत दाखविली. आपल्या नेहमीच्या कौशल्याने ॲना पॉवलोवनाने दिवाणखान्यात वेगवेगळ्या गटांची बसण्याची व्यवस्था केली होती. जो सगळयात मोठा गट होता, त्यात प्रिन्स व्हॅसिली आणि जनरल होते. त्या गटालाच परराष्ट्र वकिलातीतील मनुष्याचा सहवास मिळणार होता. दुसरा गट चहाच्या टेबलाभोवती गोळा झाला होता. पीएरला पहिल्या गटात सामील व्हायचे होते.

पण ॲना पॉवलोवनाने पीएरच्या कोटाच्या बाहीवर बोट ठेवून त्याला म्हटले, ' थांब. तुझ्यासाठी आज रात्री मी खास कार्यक्रम ठरवलेला आहे. '

तिने वळून हेलनकडे पाहिले आणि हास्य केले. ' अग हेलन, माझ्या काकीवर थोडी दया कर. तुझ्यावर तिचे किती प्रेम आहे ? दहा मिनिटे तरी तिला सोबत कर ना. तुला अगदीच कंटाळवाणे वाटत नसेल तर हा आमचा तरुण काउंट आहे. तो तुझ्याबरोबर यायला निश्चित नाही म्हणणार नाही. '

ती सुंदर मुलगी वृद्ध काकीकडे जायला निघाली. पीएरशी आपले काहीतरी महत्त्वाचे आणि निर्वाणीचे काम असल्याचे दाखवीत ॲनाने त्याला थांबवून ठेवले.

' फार अप्रतिम आहे नाही ? ' दूर जाणाऱ्या त्या लावण्यमयीला उद्देशून ॲना पीएरला म्हणाली, ' तिची चाल किती सुंदर आहे ! ह्या तरुण मुलीचे वागणे, रीतभात—त्यात काही म्हटल्या काही उणे नाही. सारं कसं अंतःकरणातून स्फुरलेलं आहे. '

' तिचं अंतःकरण जिंकणारा पुरुष सुखी होईल खास. तिचा नवरा झाल्यावर साधा माणूस देखील प्रतिष्ठित समाजात मान्यता पावेल. तुझं काय मत ? ' ॲना पॉवलोवनाने पीएरला जाऊ दिलं.

' हेलनचे वागणे अत्युत्कृष्ट आहे ' असे जे उत्तर पीएरने दिले ते अगदी मनापासूनचे होते. जेव्हा जेव्हा तो हेलनचा विचार करी तेव्हा तेव्हा तो तिच्या सौंदर्याचा विचार करी. नाहीतर चारचौघांत ती शांतपणे आणि प्रतिष्ठेने कशी वागते ते त्याला आठवे.

कोपऱ्यातील वृद्धेने त्या दोघाही तरुणांचे स्वागत केले. हेलनबद्दल वाटणारे प्रेम व्यक्त न करण्याची आणि ॲना पॉवलोवनाबद्दल वाटणारी भीती दाखवण्याची धडपड जणू ती करीत होती. तुमचे स्वागत कसे करू असे जणू तिची नजर हेलनला विचारीत होती. ॲना पॉवलोवनाने पीएरला म्हटले, ' माझ्या येथे लोकांना कंटाळा येतो असे तुम्ही कधी म्हणणार नाही अशी आशा बाळगते. ' आणि मग तिने हेलनकडे पाहिले. हेलनने हसून सुचविले— ' मला भेटलेल्या व्यक्तींवर माझी छाप पडली नाही, मी मोहिनी घातली नाही असं कधीतरी होईल काय ? '

ती वृद्धा खोकली. तिने आतल्या आत कफाचा बेडका गिळला. तिने हेलनला पाहून आनंद झाला असे फ्रेंच भाषेत उद्गार काढले. रुक्षपणे संभाषण चालले होते. मधूनमधून हेलन इतरांकडे पाहून स्मित करीत होती. अशा स्मिताचा पीएरला सराव झालेला होता, त्या

स्मिताला त्या दृष्टीने काही अर्थ नव्हता, त्याचे त्या स्मिताकडे लक्षच गेले नाही. आता ती वृद्धा पीएरच्या वडिलांनी—काउंट बेझुहॉव्ह यांनी—गोळा केलेल्या तपकिरीच्या डब्यांबद्दल बोलू लागली होती. तिने तपकिरीची एक डबी त्याच्यासमोर धरली. वृद्धेच्या नवऱ्याचे चित्र तपकिरीच्या डबीवर होते. हेलनने ते पाहण्यास डबी मागितली.

' हे चित्र बहुधा व्हाईन्सनं काढलेलं असावं. ' पीएरने एका प्रसिद्ध चित्रकाराचा उल्लेख केला. ती डबी घेण्यासाठी पीएर टेबलावर झुकला. त्या वृद्धेने ती डबी हेलनच्या मागून पुढे केली. तशी हेलन पुढे वाकली आणि वळून हसली.

हेलनने त्या वेळच्या फॅशनप्रमाणे त्या रात्रीही पोषाख केलेला होता, पाठ आणि छाती बरीचशी अनावृत ठेवली होती. तिच्या डोक्याचा आणि छातीचा वरचा भाग पीएरला नेहमीच स्फटिकासारखा वाटत असे. त्याला दूरचे चांगले दिसत नव्हते, तरीही तो खूप जवळ असल्याने तिच्या मानेचे आणि स्कंधाचे झळझळीत लावण्य त्याला जाणवल्याखेरीज राहिले नाही. तो इतका जवळ होता की जरा झुकला असता तर त्याचे ओठ तिच्या ओठांवर टेकले असते. त्याला तिच्या शरीराची ऊब जाणवली, तिच्या अंगावरील अत्तराचा सुगंध आला आणि आतल्या वस्त्राची हालचाल ऐकू आली. गाउनसहित एकसंध असलेले स्फटिकसौंदर्य म्हणून ती त्याला दिसलीच नाही. केवळ वस्त्रावगुंठित अशा तिच्या शरीराच्या लावण्याखेरीज त्याला अन्य जाणवत नव्हते वा दिसत नव्हते.

हेलन जणू त्याला म्हणत होती, ' अजूनपर्यंत तुला माझं लावण्य दिसलंच नव्हतं का रे ? माझ्या स्त्रीत्वाची तुला ओळखच पटली नव्हती का ? मी स्त्री आहे, मी कुणाचीही होऊ शकते—तुझी देखील. ' तिच्या डोळ्यांतून असाच अर्थ प्रगट होत होता.

त्या क्षणी पीएरला वाटले— हेलन आपली पत्नी होण्याची शक्यता आहे, असं म्हणायलाच नको. ती पत्नी होणार हे आता ठरलेलंच आहे.

लग्नसमारंभात वराने मुकुट चढवल्यावर त्याला जितक्या निश्चितपणे वाटते तितक्या निश्चितपणे त्याला हेलन आपली पत्नी होणार असे त्या क्षणी वाटू लागले. लग्न होईल का ? केव्हा होईल ? त्याला सांगता आले नसते. लग्न झाले तर चांगले होईल का ? हेही त्याला सांगता आले नसते ( काही कारणांमुळे त्यातून चांगले निष्पन्न होणार नाही असे त्याला वाटत होते. ) मात्र लग्न होणार असे त्याला वाटू लागले. पीएरने नजर खाली वळवली, पुन्हा वर उचलली. कालपर्यंत ती सुंदरी आपल्यापासून दूर असल्यागत तो तिला पाहत असे. आताही तो तसेच पाहण्याचा प्रयत्न करू लागला. पण त्याला ते साधेना. माळरानावरील उंच गवत धुक्यामुळे एखाद्याला वृक्षासारखे वाटावे आणि एकदा ते वृक्ष नाहीत हे उमगल्यावर गवताच्या ठिकाणी पुन्हा वृक्ष दिसू नयेत तशी पीएरची स्थिती झाली. ती त्याच्या खूपच जवळ आली होती. तिने त्याच्यावर केव्हाच मोहिनी टाकली होती. तिच्यामधे आणि त्याच्यामधे त्याची ही इच्छाशक्ती सोडल्यास दुसऱ्या कशाचाही अडसर नव्हता.

' छान ! छान ! तुम्ही तिथेच कोपऱ्यात बसा. तुम्ही सुखात आहात असं दिसतं. ' ॲना

पॉवलोवनाचे शब्द ऐकू आले. पीएर एकदम दचकून गेला. कुणी बोलावे असे वर्तन आपल्या हातून घडले आहे काय? विचार करता करता पीएरच्या चेहऱ्यावर लाली चढली. आपल्याप्रमाणे इतरांनाही आपल्या मनात काय चालले आहे याचा पत्ता लागला असावा असे त्याला वाटू लागले.

थोड्या वेळाने तो मोठ्या गटाकडे गेला तेव्हा ॲना पॉवलोवना त्याला म्हणाली, 'तू पीटर्झबर्ग येथील घरात काही सुधारणा, बदल करतो आहेस असं ऐकलं ते खरं का? (गोष्ट खरीच होती; वास्तुशास्त्रज्ञाने त्याला सुधारणा करणे आवश्यक असल्याचे सांगितले होते. पीएरने पीटर्झबर्गमधील आपले प्रचंड घर सजवून घेण्यास प्रारंभ केला होता. आपण हे कशासाठी करीत आहोत हे त्याला सांगता आले नसते.)

'तू घर सजवून घेतो आहेस ही चांगली गोष्ट आहे. पण प्रिन्स व्हॅसिलीला सोडून जाऊ नकोस. त्याच्याकडेच राहा. त्याच्यासारखा दोस्त असणं चांगलं.' ती प्रिन्स व्हॅसिलीकडे पाहत स्मित करीत म्हणाली. 'अशा बाबतीत मीच तुला सल्ला द्यायला पात्र आहे, नाही का? खेरीज तू लहान आहेस, तुला उपदेशाची आवश्यकता आहे. मी माझ्या वयाचा फायदा घेते आहे, असं समजून रागावू नकोस बाबा.'

दुसऱ्याने काही मधे बोलावे अशा अपेक्षेने तिच्या वयाच्या स्त्रिया थांबतात तशी तीही थांबली.

'तू लग्न केलंस तर गोष्ट अलाहिदा.' पीएरने हेलनकडे पाहिले नाही, हेलननेही पीएरकडे पाहिले नाही. पण हेलन पीएरच्या अगदी जवळ होती.

पीएर काहीतरी पुटपुटला आणि लाजेने चूर झाला. पीएर घरी गेला. त्याला कितीतरी वेळ झोप येईना. सगळ्या घटनांवर तो विचार करीत राहिला. काय घडत आहे हे? कदाचित काहीच घडत नसेल. हेलनला त्याने लहानपणापासून पाहिले होते. कोणी तिच्या सौंदर्याची प्रशंसा केली की त्याने फारसा विचार न करता 'ती सुंदर आहे' असे म्हटले होते.

ती स्त्री आता आपली होईल हे सत्य त्याला पटू लागले. तो तिच्याबद्दल विचार करू लागला. 'ती मूर्ख अविचारी असल्याचे मी कितीदातरी म्हणालो असेन. तिच्यामुळे माझ्या मनात उद्भवणाऱ्या भावना काही चांगल्या नाहीत, त्यात काही तरी घाणेरडी, अयोग्य अशी भावना मनात येऊ लागते. अनातोलचे तिच्यावर प्रेम होते, त्याबद्दल कितीतरी दिवस प्रवाद होता आणि म्हणूनच त्याला दूर पाठवण्यात आले असे म्हणतात. इपॉलिट तिचा भाऊ. प्रिन्स व्हॅसिलीची ही मुलगी. चांगलं काहीच नाही.' अशा प्रकारे विचार करीत असतानाच आपण स्मित करतो आहोत आणि आता दुसऱ्या प्रकारचे विचार आपल्या मनात सुरू झाले आहेत हे त्याच्या लक्षात आले.

ती अगदी नालायक असल्याचे त्याला वाटू लागलेले असतानाच ती आपली पत्नी झाली आहे, आपल्यावर प्रेमाचा वर्षाव करते आहे, आणि ती पार बदलून गेली आहे, असा भास त्याला होऊ लागला. तिच्याबद्दल आपल्या मनात आलेले विचार आणि तिच्याबद्दल ऐकलेली

मते खोटी ठरतील असेही त्याला वाटू लागले.

आता त्याच्यासमोर प्रिन्स व्हॅसिलीची मुलगी दिसत नव्हती. त्याच्यासमोर एक संपूर्ण स्त्रीदेह होता तो फक्त राखी रंगाच्या वस्त्राने अवगुंठित होता एवढेच. ' ही कल्पना मला यापूर्वीच कधी का सुचली नाही. ' मग तो स्वतःलाच बजावू लागला. हे अशक्य आहे. त्याला वाटले ह्या लग्नात ओंगळ, अस्वाभाविक आणि दूषणीय असं काहीतरी आहे. त्याला तिचे शब्द आठवले, तिची नजर आठवली. ज्यांनी त्या दोघांना एकत्र पाहिले होते त्या लोकांचे शब्द आठवले, त्यांच्या नजराही आठवल्या. त्याच्या घराचा विषय काढणाऱ्या ॲना पॉवलोवनाचे शब्द आणि दृष्टिक्षेप त्याला आठवू लागले. प्रिन्स व्हॅसिली आणि इतर लोक यांच्या संभाषणातील सूचक उल्लेख त्याला आठवू लागले. करू नये अशी अयोग्य गोष्ट करायला आपण वचनबद्ध झालो आहोत अशा जाणिवेने तो धास्तावून गेला. त्याच्या एका मनात अशा प्रकारचे विचार येत असतानाच त्याच्या दुसऱ्या मनात तिची प्रतिमा तिच्या स्त्रीसुलभ लावण्यासह भरून राहिली होती.

१८०५ च्या नोव्हेंबरमधे प्रिन्स व्हॅसिलीला इन्स्पेक्शनसाठी चार प्रांतांतून हिंडावे लागले. फिरतीवर असतानाच आपल्या दुर्लक्षित राहिलेल्या स्थावरांना भेटी देता याव्यात अशा उद्देशाने व्हॅसिलीने अशा प्रकारची नोकरी मिळवली होती. वाटेतच अनातोलच्या रेजिमेंटचा मुक्काम होता. जाता जाता अनातोलला बरोबर घेण्याचे त्याने ठरवले. त्याला घेऊन तो निकोलाय आन्द्रेविच बोलकॉन्स्कीकडे जाणार होता. त्या श्रीमंत माणसाच्या मुलीचे स्थळ तो आपल्या मुलासाठी निश्चित करणार होता. ह्या नव्या कामाआधी त्याला हेलन–पीएर यांच्या लग्नाचे निश्चित करायचे होते. आताशा पीएर व्हॅसिलीच्या घरीच होता. प्रेमात पडलेल्या तरुण माणसाप्रमाणे तो हेलनच्या उपस्थितीत अस्वस्थ होऊन कसातरी वेडपटासारखा वागत होता. त्याने अद्याप हेलनला मागणी घातली नव्हती.

' एकदाच्या गोष्टी नक्की झाल्या म्हणजे सारं ठीक होईल.' उदास झालेल्या व्हॅसिलीने एका सकाळी उसासा टाकीत स्वतःशीच म्हटले. त्याने पीएरला तसे खूप उपकृत केले होते. पण पीएर अजून त्याबाबत योग्य ती हालचाल करीत नसल्याने तो उदास झाला होता. ' तरुण आहे...खुशालचेंडू आहे...परमेश्वर त्याचं रक्षण करो!' प्रिन्स व्हॅसिली आपल्या औदार्यावर आपणच खूष होत म्हणाला, ' एकदा निर्णय लागला की सारं ठीक होईल. परवाच तर हेलनचा वाढदिवस आहे. काही लोकांना आमंत्रणं द्यायला हवीत. काय करायचं ते पीएरला कळलं नाही तर शेवटी मलाच हातात सूत्रं घ्यायला हवीत. हेलन माझी मुलगी असल्यानं मलाच सारं करणं भाग आहे.'

ॲना पॉवलोवनाकडे समारंभ झाला त्या रात्री पीएर बेचैन होऊन झोपू शकला नाही.

हेलनबरोबर लग्न करून आपत्ती ओढवेल असे त्याच्या मनाने पक्के घेतले. तिला टाळण्यासाठी दूर राहण्याचा त्या रात्रीच त्याने निश्चय केला. ह्या निश्चयाला सहा आठवडे झाले तरीही पीएर व्हॅसिलीकडेच राहत होता.

त्याने आपल्या मनावर ताबा मिळवला असता पण दरदिवशी प्रिन्स व्हॅसिलीकडे भोजनसमारंभ असायचा. नेहमीच पाहुणे नसायचे. तरीही कुणाच्या समाधानात व्यत्यय येऊ नये म्हणून पीएरला हजर राहणे भाग पडे. प्रिन्स व्हॅसिली क्वचित घरी असला म्हणजे पीएरची गाठ पडली की 'उद्या भेटूच...रात्री भोजनसमारंभात भेटशीलच...तुझ्यासाठी मी घरीच राहणार आहे' अशासारखे काही बोलायचा. प्रिन्स व्हॅसिली कधी कधी घरी असे पण दिवसभर पीएरशी एकदोन शब्दही बोलत नसे. तरीही त्याची निराशा करावी असे पीएरला वाटत नसे.

दररोज तो स्वतःशी तेच तेच म्हणत राही, 'मी खरं म्हणजे तिला चांगल्या तऱ्हेनं समजून घ्यायला हवं.' पण त्याचा निश्चय होत नव्हता.

ती त्याला नेहमीच स्मिताने साद देत असे. त्या स्मितात आनंद असे, त्याच्यावरील विश्वास व्यक्त होई, चारचौघांत वागताना ती चेहऱ्यावर जे स्मित आणीत असे त्याहून अधिक अर्थ त्या स्मितात असे. आपण कधीतरी मागणी घालून परिचयाची रेषा ओलांडणार आहोत असे इतरांना जे वाटत आहे ते खरं असावं असं पीएरला वाटू लागे. आपण भयंकर निर्णय घेणार आहोत ह्या केवळ विचारानेच त्याच्या मनात भीती निर्माण झाली. त्या भीतीचे स्वरूप त्याला कळले नाही.

त्या सहा आठवड्यांत त्याला हजार वेळा आपण त्या भयानक गर्तेच्या अधिकाधिक जवळ खेचले जात आहोत असे वाटू लागले. तो स्वतःशी म्हणत राहिला—'असं काय होतं आहे? मला काहीतरी निर्णय घेतलाच पाहिजे. मला निर्णयच घेता येत नाही काय?'

हेलनच्या वाढदिवशी प्रिन्स व्हॅसिलीने छोट्याशा भोजनसमारंभाचा बेत आखला. त्याने निवडक लोकांना बोलावले. (त्याच्या पत्नीच्या मते मित्र आणि आप्तेष्ट म्हणजे निवडक लोक.) ह्या सर्वांना हेलनच्या जीवनात हा दिवस अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचे जाणवून देण्यात आले.

रात्रीच्या भोजनासाठी पाहुणे बसले. एकाकाळी सुंदर असलेली पण आता लठ्ठपणामुळे अस्तित्व जाणवून देणारी भारदस्त स्त्री प्रिन्सेस कुरॅगिन यजमानीणपदावर स्थानापन्न झाली होती. वृद्ध जनरल आणि त्याची पत्नी तसेच ॲना पॉवलोवना शिअरर हे सन्माननीय पाहुणे तिच्या दोन्ही बाजूंना बसले होते. टेबलाच्या दुसऱ्या टोकाशी लहान वयाची व सामान्य स्थानाची पाहुणे मंडळी होती. त्या मंडळीतच कुटुंबातील माणसे म्हणून पीएर आणि हेलन जवळ जवळ बसले होते.

प्रिन्स व्हॅसिली रात्रीचे जेवण घेत नसे. तो मोठ्या खुषीत पाहुण्यामंडळींतून फिरत होता; त्यांची विचारपूस करीत होता. आलटूनपालटून एकेका पाहुण्याजवळ बसत होता. प्रत्येकाशी

काहीना काही औपचारिक बोलत होता. मात्र हेलन आणि पीएर यांच्याकडे त्याचे लक्ष नसावे असे वाटत होते.

मेणबत्त्या लखखपणे टेबलावर तेवत होत्या. टेबलावर चांदीची आणि काचेची पात्रे चकाकत होती. स्त्रियांचे दागिने चकाकत होते. अधिकाऱ्याच्या युनिफॉर्मवरील सोन्याचांदीचे बिल्लेही लखलखत होते. लाल पोषाखाचे नोकर टेबलाभोवती सारखी धावपळ करीत होते. काट्या-चमच्यांचा, थाळ्यांचा, पेल्यांचा आवाज होत होता. त्यातच टेबलाभोवती गटागटाने बसलेल्या पाहुण्यांच्या संभाषणांचा आवाज मिसळत होता.

मध्यभागी असलेला प्रिन्स व्हॅसिली आपल्याकडे लक्ष वेधून घेत होता. गेल्या बुधवारी झालेल्या प्रिव्ही कौन्सिलच्या अधिवेशनाची माहिती तो जमलेल्या स्त्रियांना हसतमुखाने देत होता. त्या अधिवेशनात सेर्जे कुझमिच व्हॅझमिटिनॉव्ह याने सम्राटाचा फतवा वाचून दाखवला ते सांगत होता.

सगळेजण हसू लागले तेव्हा टेबलाच्या दुसऱ्या टोकास असलेल्या ॲना पॉवलोवनाने त्यांना दटावले, ' व्हॅझमिटिनॉव्ह चांगलाच माणूस आहे. त्याची थट्टा करू नका. '

टेबलाच्या त्या टोकाशी असलेले पाहुणे कोणत्या ना कोणत्या कारणाने खुषीत होते. टेबलाच्या दुसऱ्या टोकाला पीएर आणि हेलन मात्र स्वस्थ बसून होते. त्या दोघांचे चेहरे संयत स्मिताने उजळलेले होते. पण त्यांच्या स्मिताचा सेर्जे कुझमिचशी काही संबंध नव्हता. ते स्मित त्यांच्या संकोचातून उमटलेले होते. इतर माणसे मजेत हसत, बोलत, थट्टामस्करी करीत होती. तरीही मधूनमधून त्या दोघांकडे चोरटे दृष्टिक्षेप टाकीत होती. त्यावरून सेर्जे कुझमिचबद्दलच्या गोष्टी, हास्यविनोद अगर जेवणातील पदार्थ ह्या गोष्टी निमित्तमात्र होत्या आणि सर्वांचे लक्ष पीएर आणि हेलन ह्यांवरच खिळलेले असल्याचे जाणवत होते. प्रिन्स व्हॅसिली सेर्जे कुझमिचच्या तपकीर कोंबण्याची नक्कल करीत हसू लागला तेव्हा त्याची मुद्रा जणू म्हणत होती, ' छान ! छान ! छान चालले आहे ! आज सगळ्या गोष्टी ठरवून टाकतो बघ. ' सेर्जे कुझमिचला—भल्या माणसाला हसल्याबद्दल ॲना पॉवलोवना बोट हलवून प्रिन्स व्हॅसिलीला दटावत होती त्याच वेळी तिची नजर पीएरकडे वळलेली होती. त्या नजरेने ती भावी जावयाबद्दल आपले आणि सुखी जीवन लाभणार म्हणून आपल्या मुलीचे कौतुक करीत आहे हे प्रिन्स व्हॅसिलीला कळून चुकले. वृद्ध प्रिन्सेस कुरॅगिनने आपल्या शेजारच्या स्त्रीला मद्य देता देता गंभीरपणे उसासा टाकला, आपल्या मुलीकडे रागाने पाहिले. तिला जणू म्हणायचे होते, ' आता आपल्याला काही करायचं राहिलं नाही—केवळ मद्यपान तेवढं आपल्या हातात आहे. काही रीतभात न पाळता आताशा तरुण माणसं सुखाचा मार्ग शोधताहेत ! '

आता हास्यविनोद थंडावले. वार्तांमधे कोणाला रस उरला नाही. उत्साहाचे अवसान बळे बळे आणले गेले होते. पाहुण्यांना नव्हे तर नोकरांनाही तसेच वाटू लागले. तेही आपले काम विसरून गेले आणि सगळे हेलनच्या उजळलेल्या सुंदर मुखाकडे तसेच पीएरच्या लालबुंद, थोराड आणि अस्वस्थ चेहऱ्याकडे पाहू लागले.

सगळ्यांच्या नजरा आपल्यावर खिळल्याची जाणीव होताच पीएर सुखावला तसाच कोचलासुद्धा. कसल्यातरी कार्यात मग्न असलेल्या माणसासारखी त्याची अवस्था झाली होती. त्याला स्पष्टपणे काही दिसत नव्हते, ऐकू येत नव्हते, काही उमजत नव्हते. वास्तव जगाबद्दलच्या असंबद्ध कल्पना आणि जाणिवा मधूनमधून त्याच्या डोक्यात अनपेक्षित रीत्या शिरत होत्या एवढेच.

'सगळे संपले म्हणायचे! पण हे झाले तरी कसे? आणि ते इतक्या जलद घडले? हे असेच घडणे अटळ आहे—अपरिहार्य आहे. केवळ माझ्यासाठी नव्हे—केवळ तिच्यासाठी नव्हे—सर्वांसाठीच. हे असे घडणार याची सर्वांनीच अपेक्षा केली आहे, सर्वांनाच खात्री वाटते आहे. मी तरी ह्या सर्वांची निराशा करू शकणार नाही. काय होणार आहे? आता सारे अटळ आहे. काही केल्या चुकणार नाही.' डोळ्यांच्या अगदी जवळ असलेल्या हेलनच्या लखलखीत खांद्यावर नजर लावीत पीएर विचार करीत होता.

मग एकाएकी त्याला कशाची न कळे शरम वाटू लागली. 'आपण सगळ्यांचे एकमेव लक्ष्य होतो. सगळ्यांच्या दृष्टीने आपण सुखी माणूस होतो. हेलनच्या ताब्यात असलेल्या पॅरिस-सारखा कुरूप चेहरा घेऊन आपण होतो.' अशा विचाराने त्याला चक्रावून सोडले. मग तोच आपल्या मनाची समजूत घालू लागला. 'प्रिन्स व्हॅसिलीबरोबर मॉस्कोहून मी इथे आलो. त्यानंतर त्याच्या इथे न राहायला मला काही पुरेसे कारण होते का? तिच्याशी मी पत्ते खेळलो, तिची छोटी बॅग उचलली, तिच्या बरोबर स्केटिंगसाठी बाहेर पडलो. पण ह्या साऱ्याला प्रारंभ कधी झाला? केव्हापासून हे घडू लागले होते?'

आता तो तिच्याजवळ तिचा नियोजित वर म्हणून बसला होता. तिचे शब्द, तिचे रूप, तिचे सान्निध्य, तिचा श्वास, तिची हालचाल, तिचे सौंदर्य सारे सारे त्याला जाणवत होते.

एकाएकी त्याला परिचित आवाजातील हाक ऐकू आली. ही दुसरी हाक होती. प्रिन्स व्हॅसिलीने त्याला तिसऱ्यांदा विचारले, 'मी तुलाच विचारतो आहे. प्रिन्स आन्द्रेकडून अलीकडे खुशाली केव्हा कळली? तू फारच विसरभोळा आहेस बघ.' प्रिन्स व्हॅसिलीने स्मित केले. प्रत्येकजण आपल्याकडे आणि हेलनकडे पाहून स्मित करीत असल्याचे पीएरला दिसले. त्याने आणि हेलननेही सौम्य निरागस स्मित केले.

'तुला पत्र कधी मिळालं? ते ऑल्मुट्झ येथून आलं काय?' प्रिन्स व्हॅसिलीला वादग्रस्त मुद्दा निकालात काढण्यासाठी माहिती हवी होती.

'होय. ऑल्मुट्झ येथून' पीएर उत्तरला.

भोजन संपल्यानंतर हेलनला घेऊन पीएर दिवाणखान्यात आला. पाहुणे निरोप घेऊन निघाले. कित्येकांनी जाताना हेलनचा निरोप घेतला नाही. हेलनच्या महत्त्वाच्या कामात व्यत्यय आणायला ते नाखूष होते. कित्येकांनी क्षणभर तिच्याकडे पाहून घाईघाईने तिचा निरोप घेतला. त्यांनी तिला आपल्याबरोबर सोबत करू दिली नाही. पत्नीने पायाची चौकशी करताच वृद्ध जनरल गुरगुरला. 'काय मूर्ख म्हातारी आहे.' त्याला वाटले. 'ह्या हेलन

व्हॅसिलेवनाकडे पाहा. पन्नाशीला पोचली तरी ती सुंदरच राहील ! '

प्रिन्सेस कुरॅगिनचे प्रेमाने चुंबन घेता घेता ॲना पॉवलोवना कुजबुजली, ' तुझं अभिनंदन करायला हवं असं मला वाटतं. डोकेदुखी सुरू झाली नसती तर आज मी इथंच मुक्काम ठोकला असता. ' प्रिन्सेस उत्तरादाखल काही बोलली नाही. आपल्या मुलीच्या सौख्याचा मत्सर वाटून तिला यातना होत होत्या.

पाहुणे निरोप घेत होते त्या अवधीत पीएर आणि हेलन छोट्याशा दिवाणखान्यात एकत्र बसून होते. गेल्या सहा आठवड्यांत ती दोघे कितीदा तरी एकत्र असत पण पीएरने तिच्याकडे आपले प्रेम कधी व्यक्त केले नव्हते. आता प्रेम व्यक्त करणे अटळ आहे असे त्याला वाटले. ती शेवटची पायरी गाठण्याचा निश्चय त्याला करता येईना. त्याला शरम वाटू लागली. हेलनच्या शेजारी दुसऱ्या कोणा पुरुषाऐवजी आपण बसलो आहोत असे त्याला वाटू लागले. त्याचे अंतर्मन त्याला सांगू लागले, ' हे सौख्य तुझ्यासाठी नाही. तुझ्यामध्ये जे काही आहे ते ज्यांच्यामध्ये नाही त्यांच्यासाठी हे सौख्य आहे. ' पण तरीही त्याला संभाषण करणे भाग होते. त्याने तिला विचारले. ' आजची रात्र आनंदात गेली ना ? ' तिने आपल्या नित्याच्या सरळपणाने उत्तर दिले, ' आजचा हा वाढदिवस अत्यंत आनंदाच्या दिवसांपैकी एक वाटतो आहे. '

काही जवळचे नातेवाईक अजून रेंगाळत होते. ते मोठ्या दिवाणखान्यात बसले होते. प्रिन्स व्हॅसिली संथपणे पावले टाकीत पीएरजवळ आला तेव्हा पीएर उठून पुटपुटला, ' बराच उशीर झाला आहे.' प्रिन्स व्हॅसिलीने त्याच्याकडे रोखून पाहिले. पीएरने जे म्हटले ते इतके विचित्र होते की त्यावर विश्वास बसणे कठीण असा अर्थ त्याच्या नजरेत होता. प्रिन्स व्हॅसिलीच्या मुद्रेवरील कठोर भाव लागलीच नाहीसा झाला. त्याने पीएरला हाताशी धरून बसवले आणि प्रेमळ हास्य केले.

' काय हेलन, ठीक आहे ना ? ' लहानपणापासून आपल्या मुलांना प्रेमळपणाने वाढवणाऱ्या आईवडिलांच्या स्वर सवयीने सहज स्वाभाविक व प्रेमळ बनतो. त्या स्वरात त्याने आपल्या मुलीची चौकशी केली. खरे तर तो इतर मातापित्यांच्या अनुकरणाने तशा स्वरात बोलायला शिकला होता. मग काहीतरी पुटपुटून प्रिन्स व्हॅसिली तिथून बाहेर पडला. तो खजील झाल्याचे लक्षात येऊन पीएरला कसेसेच वाटले. त्याने वळून हेलनकडे पाहिले. तिचे डोळे आपल्याला दोष देताहेत असे त्याला वाटले.

' खरे तर मी पुढचे पाऊल उचलायला पाहिजे. पण मला ते जमत नाही—मुळीच जमत नाही,' पीएर स्वतःशी म्हणाला. मग त्याने अवांतर गोष्टींवर बोलणे सुरू केले. सेर्जे कुझ्मिचच्या गोष्टीतील गंमत त्याला कळली नव्हती. त्याने हेलनला त्याबद्दल विचारले. हेलनलाही ती ठाऊक नव्हती.

प्रिन्स व्हॅसिली दिवाणखान्यात आला त्या वेळी प्रिन्सेस हळू आवाजात एका प्रौढ स्त्रीजवळ पीएरसंबंधी बोलत होती.

‘ जोडा चांगलाच शोभतो यात वाद नाही. पण शेवटी सुखाचा प्रश्न आहेच.’

‘ बाई ग, परमेश्वर स्वर्गात लग्नं ठरवीत असतो. ’ ती प्रौढ स्त्री म्हणाली.

प्रिन्स व्हॅसिली अगदी दूरच्या कोपऱ्यात बसला. त्याने डोळे मिटून घेतले. त्याने जणू त्यांचे संभाषण ऐकलेच नव्हते. मग तो आपल्या पत्नीला म्हणाला, ‘ अलीन, ती दोघं काय करताहेत जाऊन बघ बरं. ’

प्रिन्सेसने दरवाजातून जाताना साभिप्राय मुद्रा केली. आपणास कुतूहल नसल्याचे दाखवून छोट्या दिवाणखान्यात डोकावले. पीएर आणि हेलन पूर्वीप्रमाणेच जवळजवळ बसून बोलत होती.

‘ तसंच चाललं आहे ’ प्रिन्सेसने नवऱ्याला माहिती पुरवली. प्रिन्स व्हॅसिलीच्या कपाळावर आठ्या पडल्या. त्याच्या चेहऱ्यावर नाखुषीचे आणि कठोर भाव उमटले. डोके किंचित मागे झुकवून कसलातरी निश्चय करून तो त्या स्त्रियांसमोरून त्या छोट्या दिवाणखान्यात गेला.

काहीशा जलदीने तो पीएरकडे गेला. त्याचा कधी नव्हे इतका गंभीर चेहरा पाहून पीएर दचकून उभा राहिला.

प्रिन्स व्हॅसिलीने पीएर आणि हेलन यांना आपल्याजवळ ओढून घेऊन म्हटले, ‘ देवाचा आभारी आहे मी. माझ्या पत्नीनं मला सारं काही सांगितलं. पीएर, हेलन...पोरांनो, मला खूप आनंद झालाय. ’ त्याच्या आवाजात कंप आला. ‘ पीएर, मला तुझे वडील खूप आवडायचे. हेलन तुझा संसार सुखाचा करील. देव तुमचं कल्याण करो. ’ त्याने हेलनला छातीशी धरले. पीएरचे चुंबन घेतले. त्याचे गाल आसवांनी ओले झाले.

त्याने अलीनला हाक मारली तशी त्याची पत्नी आत आली. तीदेखील रडू लागली. त्यांनी पीएरवर चुंबनांचा वर्षाव केला. पीएरने अनंत वेळा मोहक हेलनच्या हाताची चुंबने घेतली. थोड्या वेळानंतर ती दोघे पुन्हा एकत्र राहिली.

‘ हे सगळे असेच घडायचे होते. त्याला दुसरा पर्याय नव्हता. आता झाले ते बरे का वाईट याचा विचार करण्यात अर्थ नाही. ’ पीएर स्वतःलाच समजावीत होता. ‘ आता अनिश्चिततेला जागा नाही. तेव्हा चांगले घडले असेच म्हणायला हवे. आता पूर्वीचा जीवघेणा ताणही उरलेला नाही. ’ पीएरने आपल्या वाग्दत्त वधूचा हात न बोलता आपल्या हातात घेतला. तिच्या वरखाली होणाऱ्या वक्षस्थळावर त्याची नजर खिळून राहिली.

‘ हेलन. ’ त्याने मोठ्याने हाक मारली आणि तो गप्प बसला. ‘ अशा प्रसंगी काहीतरी खास उद्‌गार काढायचे असतात ’ त्याच्या मनात आले. अशा प्रसंगी कोणते उद्‌गार काढावेत ते त्याला सुचेना. तो तिच्या तोंडाकडे पाहत राहिला. ती त्याच्यासमोर अगदी जवळ येऊन झुकली तेव्हा तिचा चेहरा लाजेने गडद गुलाबी झाला होता.

त्याच्या चष्म्याकडे बोट करीत ती म्हणाली, ‘ तो दूर करा ना ’. पीएरने आपला चष्मा दूर केला. तो तिचे चुंबन घेणार होता तोच हेलनने धसमुसळेपणाने आपले ओठ त्याच्या ओठांवर दाबले.

'आता गोष्ट पक्की झाली आहे. तीत बदल होणे अशक्य आहे. खेरीज आता मला ती आवडू लागली आहे.' पीएरचे विचार सुरू झाले.

अशा प्रसंगी काहीतरी उचित म्हणायचे असते याची आठवण होऊन पीएर म्हणाला, 'मला तू आवडतेस.' त्याला आपले शब्द इतके निर्जीव वाटले की तो शरमून गेला.

दीड महिन्यानंतर त्यांचे लग्न झाले. लोक म्हणू लागले, 'पीएरचे भाग्य थोर म्हणून त्याला सुंदर पत्नी मिळाली आणि तो लाखांचा धनी झाला.'

पीटर्सबर्गमधील काउंट बेझुहॉव्हचा वाडा नुकताच सजवलेला होता. त्यात आता पीएर हेलनसह राहू लागला.

१८०५ च्या डिसेंबरात प्रिन्स निकोलाय आन्द्रेइच बोलकॉन्स्कीला प्रिन्स व्हॅसिलीचे पत्र मिळाले. 'मी माझ्या मुलासह भेटायला येत आहे' असे त्याने कळवले. त्याच्या पत्रातील महत्त्वाचा भाग पुढीलप्रमाणे होता. 'मी इन्स्पेक्शनसाठी फिरतीवर निघालो आहे. तुम्हाला भेटायचे म्हणजे साठसत्तर मैल वळसा घालावा लागेल. परंतु तुमच्यासारख्या उपकारकर्त्यांसाठी एवढे अंतर चार पावलांसारखे आहे. माझा मुलगा अनातोल सैन्याला मिळण्यासाठी माझ्याबरोबरच निघत आहे. आपल्या वडिलांप्रमाणे त्यालाही तुमच्याबद्दल आदर आहे. तरी त्याला प्रत्यक्ष येऊन तो आदर व्यक्त करण्याची अनुज्ञा असावी.'

'छान! आता मार्याला दाखवण्यासाठी बाहेर न्यायला नको. मागणी घालणारे आपण होऊन घरी येताहेत.' पत्र ऐकून धाकटी प्रिन्सेस तोंडाला येईल ते बडबडली. प्रिन्स निकोलायने कपाळाला आठ्या घातल्या, पण काही म्हटले नाही.

प्रिन्स व्हॅसिलीबद्दल थोरल्या बोलकॉन्स्कीचे मत कधीच चांगले नव्हते. पॉल आणि अलेक्झांडर यांच्या कारकीर्दीत प्रिन्स व्हॅसिलीला वरचे हुद्दे आणि मानसन्मान मिळत गेले तसतसे थोरल्या बोलकॉन्स्कीचे त्याच्याबद्दलचे मत अधिकाधिक वाईट होत गेले. त्याच्या पत्रावरून आणि धाकट्या प्रिन्सेसच्या उद्गारांवरून त्याला त्याच्या येण्याचा हेतू कळून चुकला. त्यामुळे त्याच्या मनात द्वेष आणि तिरस्कार उत्पन्न झाला. प्रिन्स व्हॅसिलीशी बोलताना तो रागाने फुरफुरू लागला.

प्रिन्स व्हॅसिली आला त्या दिवशी तर प्रिन्स निकोलाय चिडलेला होता, वैतागलेला होता. ठीक नऊ वाजता नेहमीप्रमाणे प्रिन्स निकोलाय फिरायला बाहेर निघाला. त्याने लोकरीची किनार असलेला, आखूड बाह्यांचा, सेबलची कॉलर असलेला मखमली झगा घातला होता. त्याच्या डोक्याला सेबलची कॅप होती. ज्या मार्गावरून तो आपल्या खास बागेकडे जात होता, त्या मार्गावरून रात्री पडलेले बर्फ दूर करण्यात आले होते.

'गाडी इथपर्यंत येऊ शकेल काय?' घरापर्यंत मोठ्या अदबीने सोबत करणाऱ्या

नोकराला प्रिन्स निकोलायने विचारले.

'महाराज, बर्फाचा थर खूप जाड आहे. मी रस्तेदेखील साफ करायला सांगितलं आहे.'

निकोलायने मान हलवली. तो घराच्या पायऱ्यांकडे निघाला. वादळ शांत झाले म्हणून नोकराने देवाचे आभार मानीत म्हटले, 'नाहीतर गाडी हाकणं मुश्किल झालं असतं. महाराज मिनिस्टरांची स्वारी आपल्या भेटीला येणार आहे असं ऐकलं...'

प्रिन्स निकोलायने नोकरावर रागाने डोळे वटारीत कर्कश स्वरात विचारले, 'मिनिस्टर? कुठला मिनिस्टर? कोणी सांगितलं तुला? माझ्या मुलीसाठी कधी रस्ते साफ करीत नाहीत. मिनिस्टरांसाठी मात्र रस्ते साफ करता? मी कुणा मिनिस्टराला ओळखीत नाही-'

'महाराज, मला वाटलं...'

'तुला वाटलं, काय वाटलं तुला?' प्रिन्स निकोलाय भरभर असंबद्ध बोलू लागला. 'हरामखोर...तुला धडा शिकवतो... म्हणजे चांगलं वाटेल तुला.' त्याने अल्पाटिचवर काठी उगारली. अल्पाटिचला मागे जायचे सुचले नसते तर काठीचा चांगलाच तडाखा त्याच्यावर बसणार होता. काठीचा मार चुकवून आपण मालकाशी उद्धटपणाने वागलो हे ध्यानात येताच अल्पाटिच दचकला. तो आपणहून प्रिन्स निकोलायसमोर गेला आणि त्याच्यासमोर आपले टक्कल पडलेले डोके झुकवून उभा राहिला. तरीही (किंवा त्यामुळेच असेल) निकोलायने पुन्हा काठी उगारली नाही. 'हरामखोर कुठले...पुन्हा बर्फानं रस्ते भरून टाका.' असे ओरडत तो आपल्या खोलीत शिरला.

प्रिन्सेस मार्या आणि बूरिअनबाई जेवणासाठी प्रिन्स निकोलायची वाट पाहत उभ्या होत्या. तो भडकलेला आहे याची दोघींनाही कल्पना होती. बूरिअनबाईचा चेहरा जणू म्हणत होता, 'मला काहीही ठाऊक नाही, मी नेहमीसारखीच आहे. माझ्यात काही बदल व्हायचा नाही— झालेला नाही.' भीतीने पांढरीफटक पडलेली प्रिन्सेस मार्या मात्र नजर खाली वळवून उभी होती. बूरिअनबाईप्रमाणे आपणही वागावे असे तिला मनोमन वाटे. पण तसे ती वागू शकत नसे. त्यामुळे तिची स्थिती अतिशय दुःसह होई. तिला वाटे—'मी आपले लक्षच नाही असे दाखवले तर मला आस्था नाही असे वडिलांना वाटायचे. निराश, दुःखी झाल्यागत वागले तर 'ही घुमी आहे' असा शेरा मारतील.'

आपल्या मुलीच्या भयभीत चेहऱ्याकडे पाहत प्रिन्स निकोलाय गुरगुरला, 'मूर्ख! नालायक!' प्रिन्सेस लिझ दिवाणखान्यात दिसली नाही तेव्हा त्याने विचारले, 'प्रिन्सेस लिझ कुठाय? लपून राहिली का?'

'तिला बरं वाटत नाही.' बूरिअनबाईने तोंडभर हसत उत्तर दिले. 'बरी नसल्यामुळे ती खाली येणार नाही.'

प्रिन्स निकोलाय गुरगुरत टेबलाशी खुर्चीत बसला. आपले ताट घाणेरडे आहे असे त्याला वाटले. त्याने ताटावरील डाग दाखवून ते भिरकावून दिले. तिहॉनने ते वरच्यावर झेलून नोकराकडे दिले.

धाकट्या प्रिन्सेसला काही झाले नव्हते. पण आपला सासरा चिडलेला आहे हे ऐकून ती भयभीत झाली होती आणि तिने अशा परिस्थितीत त्याच्यासमोर न येण्याचे ठरवले होते. ती बूरिअनबाईला म्हणाली होती, ' मला माझ्या मुलाची काळजी वाटते. ह्या भयंकर धास्तीचा परिणाम त्याच्यावर काहीही होईल. ' ब्लीक हिल्स येथे धाकटी प्रिन्सेस सासऱ्याला सतत घाबरून वावरत होती.

तिला बूरिअनबाईची ओढ लागली. तिच्या सहवासात ती वेळ घालवू लागे. तिच्या खोलीत झोपायला मिळावे म्हणून तिची आर्जवे करू लागे. तिच्याजवळ आपल्या सासऱ्याबद्दल बोले, प्रसंगी त्याच्यावर टीकाही करी.

आपल्या गुलाबी बोटांनी नॅपकीनची घडी उलगडीत बूरिअनबाईने प्रिन्स निकोलायला विचारले, ' पाहुणे मंडळी येणार आहे हे खरं का प्रिन्स हिज एक्सलन्सी प्रिन्स कुरॅगिन आपल्या मुलाला घेऊन येणार आहेत असं ऐकलं...'

' हिज एक्सलन्सी ? दांभिक माणूस आहे तो ! आणि त्याचा मुलगा कशासाठी येतो आहे ? मला सांगता येणार नाही. पण प्रिन्सेस लिझ आणि प्रिन्सेस मार्या त्यावर प्रकाश टाकू शकतील. मला त्या मुलाची ब्याद नको आहे. '

त्याने आपल्या मुलीकडे पाहिले. तिचा चेहरा लालबुंद झाला होता.

बूरिअनबाईने ज्या विषयाला सुरुवात केली होती त्यात फारशी प्रगती झाली नाही. पण तिने माघार घेतली नाही. ती उद्यानाबद्दल, नुकत्याच फुललेल्या फुलांबद्दल, त्यांच्या सौंदर्या-बद्दल बोलत राहिली.

जेवण झाल्यावर प्रिन्स निकोलाय अतिथिदालनात गेला. नजर खाली वळवून अल्पाटिच उभा होता.

' रस्त्यावर पुन्हा बर्फ टाकलंस की नाही ?'

' टाकलं महाराज. माझी घोडचूक झाली. क्षमा करा ' प्रिन्स निकोलायने कृत्रिम हास्य करून त्याचा निरोप घेतला. त्याने आपला हात समोर धरला. अल्पाटिचने त्या हाताचे चुंबन घेतल्यावर तो अभ्यासिकेत शिरला.

रात्री प्रिन्स व्हॅसिलीचे आगमन झाले. वाटेतच त्याला बोलकॉन्स्कीचे गाडीवान आणि नोकर भेटले. त्याच्या गाड्या मुद्दामच बर्फ टाकलेल्या रस्त्यावरून ओढून आणण्यास त्यांनी मदत केली.

प्रिन्स व्हॅसिली आणि अनातोल या प्रत्येकाला रहाण्यासाठी वेगवेगळी जागा देण्यात आली.

उठल्यावर नेहमीच्या सवयीनुसार अनातोलने अतिशय काळजीपूर्वक आणि सफाईने दाढी केली. सर्वांचे मन जिंकणाऱ्या आपल्या वैशिष्ट्यपूर्ण प्रसन्नवृत्तीने तो वडिलांच्या खोलीत मान ताठ ठेवून शिरला. त्यावेळी दोन नोकर प्रिन्स व्हॅसिलीला कपडे चढवायला मदत करीत होते. अनातोल आत आला तेव्हा प्रिन्स व्हॅसिलीने त्याचे मान हालवून स्वागत केले आणि म्हटले, ' छान. तू असाच दिसावास अशी माझी अपेक्षा होती. '

'बाबा, थट्टा राहू दे. ती खरोखरच का सामान्य आहे?' अनातोलने फ्रेंचमध्ये विचारले. प्रवासात पुष्कळदा चर्चा झालेला विषय त्याला पुन्हा उकरून काढायचा होता.

'वेडा आहेस. म्हाताऱ्या प्रिन्ससमोर अदबीनं आणि शहाणपणानं वागणं— निदान तसा प्रयत्न करणं तुझ्या दृष्टीनं महत्त्वाचं आहे हे विसरू नकोस.'

'जर तो वेडंवाकडं बोलला तर मीही गप्प बसणार नाही. मला ह्या म्हाताऱ्यांचं वागणं खपत नाही.'

'तुझ्या दृष्टीनं सगळ्या गोष्टी यावरच अवलंबून आहेत हे विसरू नकोस.'

प्रिन्सेस मार्या आपल्या खोलीत एकटीच बसून मनाशी म्हणत होती, 'त्यांनी पत्र का म्हणून लिहिलं? लिझनं मला त्याबद्दल का सांगितलं असेल?' आरशात पाहता पाहता ती विचार करू लागली 'आता मी दिवाणखान्यात जाणार तरी कशी? मला तो आवडला तरीही माझं वागणं आता सहज स्वाभाविक असणार नाही.' वडिलांच्या नजरेच्या केवळ आठवणी-नेच तिच्या काळजाचा थरकाप उडाला. माशा दासीकडून धाकटी प्रिन्सेस आणि बूरिअनबाई यांनी आवश्यक ती माहिती गोळा केली होती. गुलाबी गालांचा आणि काळ्याभोर भुवयांचा तो मिनिस्टरांचा मुलगा किती देखणा आहे, त्याचे वडील कष्टाने पाय ओढीत जिना कसा चढले, तो मात्र गरुडाची झेप घेत एका दमात तीन पायऱ्या कसा चढला इत्यादी इत्यादी माहिती त्यांनी मिळवली होती. ती देण्यासाठी उत्सुक झालेली धाकटी प्रिन्सेस आणि बूरिअनबाई या दोघींचे बोलणे कॉरिडॉरमधे ऐकू येत होते. त्या दोघीही प्रिन्सेस मार्याच्या खोलीत शिरल्या.

संथपणे डुलत डुलत येऊन आरामखुर्चीत धपकन बसत धाकटी प्रिन्सेस म्हणाली, 'मारी, मंडळी आल्याचं कळलं की नाही तुला?' धाकट्या प्रिन्सेसने सकाळच्या गाऊनऐवजी आता उत्तमपैकी पोषाख अंगावर चढवला होता. मोठ्या काळजीपूर्वक वेषभूषा केली होती. तिचा चेहरा उत्कंठेने डवरून गेला होता, परंतु त्यामागील निष्प्राण फिकट नजर लपत नव्हती. बूरिअनबाईनेही लक्षात येणार नाही अशा तऱ्हेने आपल्या वेषभूषेत आणि केशरचनेत सुधारणा केली होती. त्यामुळे तिचा सुंदर तरुण चेहरा आणखी आकर्षक दिसत होता.

'अग, तू आहेस तशीच का बसून राहणार आहेस? थोड्याच वेळात मंडळी दिवाण-खान्यात आल्याचा निरोप येईल. मग आपल्याला खाली जावं लागेल. तू पोषाखाकडे अजून लक्षच दिलेलं नाहीस." बूरिअनबाई म्हणाली.

धाकट्या प्रिन्सेसने दासीला बोलावून घेतले. प्रिन्सेस मार्याने कोणते कपडे घालावेत याची ती तत्परतेने योजना आखू लागली, आपल्या कल्पना प्रत्यक्षात आणू लागली.

प्रिन्सेस मार्याने त्यांच्या सूचनेप्रमाणे पोषाख करायला नकार दिला असता तर त्या दोघींनी तिला सारखे सतावले असते. सारखा आग्रह केला असता. प्रिन्सेस मार्या लाजेने लाल झाली, तिच्या सुंदर डोळ्यांत पाणी तरारले, नेहमीसारखी तिची मुद्रा दुखावलेली आणि कुरूप झाली. तिने बूरिअनबाई आणि लिझ या दोघींना आपले काय वाटेल ते करू द्यायचे ठरवले. त्या दोघी तिला वेषभूषेत मदत करू लागल्या.

' छे ग ! हा पोषाख नाही बरा वाटत. ' दूर राहून प्रिन्सेस मार्याकडे दोन्ही बाजूंनी पाहत लिझ उद्‌गारली. ' तिला तुझा अंजिरी मखमली पोषाख दे नाहीतर. कुणास ठाऊक कदाचित तो पोषाख तिच्या जीवनात क्रांती घडवून आणील. छे ! हा पोषाख फिक्या रंगाचा आहे. हा नाही शोभणार ! '

खरे तर पोषाखात दोष नव्हता. दोष होता तो प्रिन्सेस मार्याच्या चेहऱ्यात— तिच्या अवघ्या शरीरात. पण त्या दोघींच्या ते गावीही नव्हते.

तिच्या केसांना निळी फीत बांधली, निळा दुपट्टा अंजिरी पोषाखावर थोडा खाली घेतला, आणखी असेच काही केले म्हणजे ती ठीक दिसेल असे त्यांना अजूनही वाटत होते. प्रिन्सेस मार्याचा भयभीत चेहरा आणि शरीर बदलणे शक्य नव्हते. त्यांनी चेहरा सजवून कितीही प्रेक्षणीय केला तरीही तो केविलवाणा आणि कुरूप वाटल्याखेरीज राहणार नाही हे त्यांच्या ध्यानात येत नव्हते. त्यांनी दोनतीनदा बदल केला. प्रिन्सेस मार्या त्यांना हवे ते करू देत होती. त्या दोघींनी तिची केशभूषा नव्या तऱ्हेने केली. आपले डोके एकदा या बाजूला मग दुसऱ्या बाजूला कलते करून धाकट्या प्रिन्सेसने मार्याचे निरीक्षण केले. मग ती दोन्ही हात उडवीत म्हणाली, ' छे ! छे ! हा पोषाख नाही चालणार ! हा तुला अगदीच शोभत नाही. तू नेहमीच्या छोट्या करड्या फ्रॉकमधेच मला आपली छान दिसतेस. ' तिने दासीला करडा फ्रॉक आणायला सांगितला. दासी पोषाख घेऊन येईपर्यंत प्रिन्सेस मार्या आपला चेहरा आरशात पाहत राहिली होती. आपल्या डोळ्यांत अश्रू आले आहेत आणि आपल्या थरथरणाऱ्या ओठांतून हुंदके बाहेर पडणार आहेत असे तिला आरशात दिसले.

बूरिअनबाईने तिला समजावले. ' चल प्रिन्सेस, आपण एकदाच थोडासा प्रयत्न करू या.' दासीच्या हातून पोषाख घेऊन धाकटी प्रिन्सेस प्रिन्सेस मार्याजवळ गेली. ' आता आपण अगदी साधी पण मोहक वेषभूषा करण्याचा प्रयत्न करू. ' ती म्हणाली. पाखरांनी किलबिल करावी तशा त्या तिघीही हसू लागल्या.

' मला एकटीला राहू द्या. ' प्रिन्सेस मार्या म्हणाली. तिच्या आवाजात एवढे गांभीर्य आणि एवढी व्यथा होती की त्या पाखरांची किलबिल एकदम बंद झाली. तिचे सुंदर टपोरे डोळे पाण्याने भरले होते. ती विचारमग्न झाली होती. तिच्या दृष्टीत आर्जव होते. तिला आणखी आग्रह करून काही उपयोग होणार नाही उलट तो निर्दयपणा होईल हे त्यांच्या ध्यानात आले.

धाकटी प्रिन्सेस म्हणाली, ' निदान तुझी केशरचना तरी बदल. बूरिअनबाई, ही तुमची चूक. काही चेहऱ्यांना काही केशरचना शोभत नाहीत असं मी तुम्हाला म्हटलं होतं. ही केश-रचना तेवढी बदलून टाका बरं. '

' मला एकटीला राहू द्या. मला आता छळू नका. मला काही काही नको आहे. ' तिचे अश्रूच तिच्या आवाजापेक्षा प्रभावी ठरू लागले.

' तू केसांची रचना बदल. बदलशील ना ?' लिझने विचारले. प्रिन्सेस मार्याने उत्तर

दिले नाही तशी लिझ खोलीच्या बाहेर सटकली.

आता प्रिन्सेस मार्या एकटीच खोलीत होती. तिने लिझची इच्छा मानली नाही, तिने आपल्या केसांची रचना बदलू दिली नाही, तिने आरशातही पाहिले नाही. तिने असहायपणे पापण्या खाली झुकवल्या, हात सैल सोडले आणि ती स्वप्नात रंगून गेली...

तिला स्वप्नात आपला नवरा दिसला...दणकट शरीराचा अतिशय देखणा पुरुष...तो आपल्याला एका वेगळ्या जगात वेऊन जातो आहे ..आपलेच मूल आपल्या छातीला बिलगून आहे...आपला नवरा प्रेमळपणाने आपल्याकडे आणि मुलाकडे पाहत उभा आहे ..' छे ! छे ! असे कुठले व्हायला ? ' तिच्या मनात आले.

' लवकर चहाला या. प्रिन्स निकोलाय लवकर जाणार आहे. ' दारातून दासी बोलली. आतापर्यंत मनात आलेल्या विचारांची जाणीव होऊन प्रिन्सेस मार्या दचकली. खाली जाण्यापूर्वी मंदिरात ती छोट्या प्रार्थनामंदिरात शिरली.

ख्रिस्ताच्या मोठ्या मूर्तीच्या काळ्या बाह्यरेषेवर दृष्टी खिळवून, हात जुळवून ती कितीतरी वेळ समोर उभी राहिली.

प्रिन्सेस मार्या खोलीत आली त्या आधीच प्रिन्स व्हॅसिली आणि त्याचा मुलगा दिवाणखान्यात येऊन धाकटी प्रिन्सेस आणि बूरिअनबाई यांच्याशी गप्पागोष्टी करीत बसले होते. ती जड पावलांनी आत आली तेव्हा ते दोघे आणि बूरिअनबाई उभे राहिले. धाकट्या प्रिन्सेसने ओळख करून दिली ' ही प्रिन्सेस मार्या. '

प्रिन्सेस मार्याने त्यांना बारकाईने पाहून घेतले. आपल्याला पाहताच प्रिन्स व्हॅसिलीचा चेहरा क्षणार्धात गंभीर झाला होता आणि मग त्याने गडबडीने स्मित केले होते हे तिने हेरले होते. आपली छाप पाहुण्यांवर कशी पडते आहे हे जाणण्यासाठी त्यांच्या तोंडाकडे पाहणाऱ्या छोट्या प्रिन्सेसचा जिज्ञासू चेहराही तिच्या दृष्टीतून सुटला नव्हता. रिबन घातलेल्या सुंदर बूरिअनबाईने त्यांच्याकडे वळून पाहिले तेव्हा तिच्या चेहऱ्यावर अपूर्व उत्कंठा तिला आढळली होती. तिला मात्र अजून त्यांचे दर्शन झाले नव्हते. ती खोलीत शिरताना मोठाले, उजळ रंगाचे आणि सुंदर वाटणारे काहीतरी आपणासमोर येते आहे असा भास तिला झाला होता.

प्रथम प्रिन्स व्हॅसिली तिला सामोरा आला. तिच्या हाताचे चुंबन घेण्यासाठी तो झुकला तेव्हा तिने त्याच्या टकलाचे चुंबन घेतले. उत्तरादाखल तिने ' मला तुमची चांगली आठवण आहे ' असे सांगितले. मग अनातोल तिला सामोरा आला. तरीही तो तिला दिसला नाही. मऊ मऊ हाताने आपला हात घट्टपणे पकडला गेला आहे एवढे मात्र तिला जाणवले. पोमेडचा वास येणारे सुंदर केस असणाऱ्या अनातोलच्या गोऱ्या कपाळाला तिने आपल्या ओठांनी स्पर्श

केला. त्याला पाहताच त्याच्या देखणेपणाची छाप तिच्या मनावर पडली.

अनातोल हजरजबाबी नव्हता, त्याच्याकडे संभाषणचातुर्यही नव्हते. मात्र सामाजिक जीवनात मोलाची वाटणारी धिमी वृत्ती, तसेच आत्मविश्वास त्याच्या ठिकाणी होता. तो तसाच काही न बोलता कितीतरी वेळ राहील असे वाटू लागले. 'मी स्तब्ध राहिल्याने कोणाला विचित्र वाटत असेल तर त्याची मला पर्वा नाही. त्याने वाटल्यास बोलावे' असे त्याची मुद्रा सांगत होती.

अनातोलचे स्त्रियांशी वागणे अशा प्रकारचे असे की त्यामुळे त्यांच्या मनात त्याच्याविषयी हटकून कुतूहल, विस्मय, आदर एवढेच काय प्रीतीही निर्माण होत असे. स्त्रियांशी वागताना स्वतःच्या श्रेष्ठत्वाच्या जाणिवेतून येणारी तुच्छताही त्याच्या वागण्यात आढळे. त्याचे वागणे जणू स्त्रियांना बजावी, 'मी तुम्हाला चांगला ओळखतो. पण तुमच्याबद्दल मी माझ्या डोक्याला शीण का म्हणून देऊ? तुम्हाला खूष करण्यात माझ्याकडून कुचराई होणार नाही एवढे मात्र सांगतो.'

प्रिन्सेस मार्याला हे जाणवले होते. त्याचे लक्ष आपल्याकडे वेधून घेण्याची आपली इच्छा नाही असे दाखवण्यासाठी की काय ती आपल्या वडिलांकडे वळली. बोलणे सर्वसामान्य विषयांवरच चालले होते, पण ते धाकट्या प्रिन्सेसमुळे रंगले होते. गप्पिष्ट व उत्साही माणसे अपरिचित माणसांशीही किती खेळकरपणाने वागत बोलत असतात. धाकट्या प्रिन्सेसचा असला खेळकरपणा प्रिन्स व्हॅसिलीला किती लवकर आवडला. तिची अनातोलशी पूर्वीची ओळख नव्हती तरीही तिने त्याला संभाषणात भाग घ्यायला लावले. त्यांच्या आनंदात सहभागी होता आले म्हणून प्रिन्सेस मार्याही सुखावली.

'तुम्हाला आमची ॲनेट आठवत असेल?' धाकट्या प्रिन्सेसने प्रिन्स व्हॅसिलीला विचारले.

'हो ना. पण तिच्याप्रमाणं तूही राजकारणावर बोलू नकोस.'

'आणि आमचं चहाचं छोटं टेबल आठवतं का?'

'अलबत.'

धाकट्या प्रिन्सेनने अनातोलला विचारले, 'तुम्ही ॲनेटकडे कधीच कसे दिसला नाही?' मग डोळे मिचकावून तीच पुढे म्हणाली, 'मला सारं माहीत आहे. इपॉलिटनं– तुमच्या भावानं– मला तुमच्या सगळ्या कर्तृत्वाविषयी सांगितलं आहे.' त्याच्या दिशेने बोट हलवीत ती म्हणाली, 'तुमचे पॅरिसमधील पराक्रमदेखील मला ठाऊक आहेत.'

बूरिअनबाईने अनातोलला विचारले, 'तुम्हाला पॅरिस सोडून फार दिवस झाले असतील नाही? ते शहर तुम्हाला कितपत आवडलं?' अनातोलने लागलीच त्या फ्रेंच स्त्रीला उत्तर दिले. स्मित करीत, तिच्याकडे टक लावून पाहत तो तिच्या देशाबद्दल बोलू लागला. सुंदर बूरिअनबाईचे दर्शन पहिल्यांदा घडले त्याच वेळी अनातोलने 'ब्लीक हिल्समध्ये आपले दिवस वाटले होते तसे कंटाळवाणे जाणार नाहीत' याची खूणगाठ बांधली होती. तिच्याकडे पाहताना त्याच्या मनात आले, 'आपल्या सखीपेक्षा ही कितीतरी चांगली आहे.

लग्न झाल्यानंतर तिने हिला आपल्याबरोबर आणावं असं मला वाटतं. फार गोड पोरगी आहे ही!'

वृद्ध प्रिन्स निकोलाय मुद्दामच खोलीत पोषाख करण्यात वेळ घालवीत होता. काय करावे याचा विचार करताना त्याची मुद्रा त्रस्त झाली होती. ह्या पाहुण्यांच्या आगमनामुळे तो संतापला होता. 'प्रिन्स व्हॅसिली आणि त्याचा तो पोरगा यांचा आणि माझा संबंधच काय मुळी? प्रिन्स व्हॅसिली बढाईखोर मूर्ख आहे. त्याचा मुलगा तसाच निपजलेला नसला म्हणजे मिळवली!' तो स्वतःशीच गुरगुरला.

त्याने कित्येक दिवस ज्या प्रश्नाबाबत स्वतःची फसवणूक केलेली होती, जो प्रश्न सतत बाजूला सारला होता, जो प्रश्न अद्याप अनुत्तरित राहिला होता तोच प्रश्न पाहुण्यांच्या आगमनासरशी पुन्हा नव्याने समोर टाकला म्हणून वृद्ध निकोलाय संतापला होता. 'वृद्ध निकोलाय कधीकाळी आपल्या कन्येचे लग्न लावून देऊन तिला आपल्यापासून दूर करणार आहे का?' हा तो प्रश्न होता. त्याने स्वतःला हा प्रश्न कधीच सरळपणे विचारला नव्हता. तसे धाडस त्याला झाले नव्हते. त्याने तो प्रश्न विचारला असता तर त्याला न्याय्य उत्तर द्यावे लागले असते. ह्या बाबतीत न्यायापेक्षा भावनेला—जीवनमरणाला अधिक महत्त्व होते. वृद्ध निकोलाय दरकरणी आपल्या मुलीला काडीचेही महत्त्व देत नव्हता तरीही तिच्यावाचून त्याला आपल्या आयुष्याची कल्पनाच करता येत नाही.

तो विचार करू लागे, 'मार्या लग्न कशासाठी करणार आहे? शेवटी ती दुःखीच होणार आहे यात संशय नाही. लिझनं आंद्रेशी लग्न केलं. (आताशा त्याहून चांगला नवरा मिळेल असे मला वाटत नाही.) पण ती काही सुखात नाही. हिच्यावर प्रेम करून कोण लग्न करणार आहे? ही दिसायला तर अगदी सामान्य आहे. हिच्या संपत्तीकडे आणि नातेवाइकांकडे पाहून कोणी लग्न केलं तर करील. अविवाहित वृद्ध स्त्रियांचं काय वाईट होतं? त्या खरं तर किती सुखासमाधानात असतात!' कपडे चढवताना प्रिन्स निकोलायच्या मनात विचारचक्रे सुरूच होती. आजवर लांबणीवर टाकलेल्या प्रश्नासंबंधी आता निर्णय घेणे भाग होते. प्रिन्स व्हॅसिलीने आपल्या मुलाला बरोबर आणले होते ते मागणी घालण्यासाठी यात संशय नव्हता. कदाचित आजच नाहीतर उद्या तो त्याबद्दल होकार किंवा नकार विचारील. त्याचे घराणे, त्याचा हुद्दा यांचा विचार केला तर स्थळ अनुरूप आहे. प्रिन्स निकोलाय स्वतःशीच बोलत राहिला, 'मी काही तिच्या लग्नाविरुद्ध नाही. तो तिला अनुरूप असला की झालं. तेवढं पाहिलं पाहिजे. तेवढं पाहिलं पाहिजे.' शेवटचे वाक्य त्याने मोठ्याने उच्चारले.

मग नेहमीच्या सवयीने त्याने सावध उत्साही पावलांनी दिवाणखान्यात प्रवेश केला. एका जलद दृष्टिक्षेपात सगळ्यांना पाहून घेतले. धाकट्या प्रिन्सेसच्या पोषाखातील बदल, बूरिअनबाईची रिबन, मार्याची ओंगळ केशभूषा, बूरिअनबाई आणि अनातोल यांच्या चेहऱ्यावरील स्मित आणि कुणाशी न बोलता एकाकी बसलेली मार्या.. ह्या साऱ्या गोष्टी त्याच्या लक्षात आल्या. स्वतःला आचरटाप्रमाणे सजवणाऱ्या मुलीला त्याची नजर क्षमा करू शकत नव्हती.

' तिला काही लाजलज्जाच नाही. तो तर तिच्याकडे ढुंकूनही पाहत नाही.'

' तुमच्या येण्याने मला आनंद झाला.' वृद्ध निकोलायने प्रिन्स व्हॅसिलीचे स्वागत केले.

' जिवाभावाच्या दोस्तासाठी मैलांचे अंतर गळून पडते.' अशा अर्थाची रशियन म्हण प्रिन्स व्हॅसिलीने उच्चारली. त्याच्या स्वरात नेहमीची घाई, आत्मविश्वास आणि जवळीक होती. ' हा माझा दुसरा मुलगा. त्याला आशीर्वाद द्या.'

प्रिन्स निकोलायने अनातोलला न्याहाळले. ' चांगला गडी आहे. चांगला आहे.' असे म्हणून त्याने आपला गाल पुढे धरला. अनातोलने त्या वृद्धाचे चुंबन घेतले. आणि त्याच्याकडे कुतूहलाने पाहत वडिलांनी सांगितलेल्या चक्रमपणाची एखादी झलक दिसते का याची तो शांतपणे वाट पाहू लागला.

वृद्ध निकोलाय नेहमीप्रमाणे सोफ्याच्या टोकाशी बसला. प्रिन्स व्हॅसिलीला त्याने आराम-खुर्चीत बसायचा इशारा केला. मग त्याला राजकारण आणि इतर बातम्या यासंबंधी प्रश्न विचारू लागला. प्रिन्स व्हॅसिलीच्या सांगण्याकडे त्याचे लक्ष होते तरीही त्याची दृष्टी सतत प्रिन्सेस मार्यावर खिळलेली होती.

' आता ते पॉटसडॅम येथून पत्र पाठवताहेत तर!' प्रिन्स व्हॅसिलीच्या बोलण्यातले शेवटचे वाक्य उच्चारून तो एकदम उठला आणि आपल्या मुलीजवळ जाऊन उभा राहिला.

' पाहुण्यांसाठी तू अशा प्रकारची वेषभूषा केली आहेस तर! फारच छान. फारच छान. पाहुण्यांसाठी नव्या तऱ्हेची केशभूषा वाटल्यास कर. पण याद राख. यापुढं कधीही माझ्या परवानगीशिवाय पोषाख बदलून पाहुण्यांसमोर यायचं नाही.'

' अपराध माझ्याकडून घडला.' लाजून गेलेली धाकटी प्रिन्सेस कशीबशी बोलली.

सुनेसमोर वृद्ध निकोलायची स्थिती चमत्कारिक झाली. तो सुनेला म्हणाला, ' मनाला येईल तसं वागायला तू मोकळी आहेस. पण हिला आपलं रूप असं बिघडवायची गरज नव्हती. आधीच पुरेशी कुरूप आहे ती.'

आपल्या शब्दांनी रडू लागलेल्या आपल्या मुलीकडे मुळीच लक्ष न देता तो आपल्या पूर्वीच्या जागी जाऊन बसला.

' माझं मत मात्र उलट आहे. तिला ही केशभूषा खूपच शोभून दिसते.' प्रिन्स व्हॅसिली म्हणाला.

आता वृद्ध निकोलायने अनातोलवर मोर्चा वळवला. ' तरुण मित्रा, नाव काय तुझं? अरे इकडे जवळ ये. तुझी ओळख करून घ्यायची आहे मला. आपण थोडा वेळ बोलू. इकडे जवळ ये.'

' आता कुठे गमतीला सुरुवात होत आहे!' अनातोल मनाशी म्हणत त्या वृद्धाच्या शेजारी येऊन बसला.

' छान. छान. तुझं शिक्षण परदेशात झालं, नाही? तुझ्या वडिलांसारखा अगर माझ्या-

सारखा तू चर्चमधे शिकला नाहीस तर? हल्ली तू 'संरक्षक घोडेस्वार दलात' आहेस काय?' त्याच्याकडे रोखून पाहत वृद्धाने उत्सुकतेने प्रश्न केला.

'नाही. माझी आघाडीवर रवानगी झालेली आहे,' अनातोलने उत्तर दिले.

'छान. छान. म्हणजे तुला आपला देश आणि झार यांची सेवा करायची आहे? आता तर युद्ध चालू आहे. तुझ्यासारखी निवडक तरुण माणसं लढाईवर जायला हवीत-जायलाच हवीत. तुला आघाडीवर जायचा हुकूम झालाच असेल?'

'नाही. आमची रेजिमेंट आघाडीवर गेलेली आहे. माझी दुसरीकडे नेमणूक झाली आहे. पपा, माझी नेमणूक कुठं बरं झाली आहे?' अनातोलने हसत हसत वडिलांना विचारले.

'छान. सरकारी खात्याच्या लौकिकात चांगली भर टाकशील. माझी नेमणूक कुठं बरं झाली आहे? हा हा हा.' वृद्ध निकोलाय हसू लागला. त्याहून जोरजोराने अनातोल हसू लागला.

मग एकाएकी वृद्ध निकोलायने कपाळाला आठ्या घालून अनातोलला जायला सांगितले तसा तो स्मित करीत स्त्रियांकडे वळला.

'प्रिन्स व्हॅसिली, चिरंजीवांचं शिक्षण परदेशात झालं आहे तर?' वृद्ध निकोलायने प्रिन्स व्हॅसिलीला विचारले.

'माझ्याकडून शक्य होतं ते मी केलं. आपल्याकडील शिक्षणापेक्षा परदेशातील शिक्षण खूपच बरं असतं याची मी ग्वाही देतो.'

'खरं आहे. आताशा प्रत्येक गोष्ट बदलली आहे. नवीन फॅशन आली आहे. फार छान पोरगा आहे. फार छान. चला माझ्या खोलीत जाऊन बसू या.' त्याने प्रिन्स व्हॅसिलीला हाताशी धरून आपल्या अभ्यासिकेत नेले.

खोलीत तिसरे कुणी नसल्याने प्रिन्स व्हॅसिलीने वृद्ध निकोलायकडे आपल्या अपेक्षा व्यक्त केल्या.

तशी वृद्ध निकोलाय रागारागाने बोलू लागला. 'मला ती माझ्याकडेच हवी आहे, मला तिला दूर जाऊ द्यायचं नाही असं तुम्हाला का वाटतं? काय वाटेल त्या कल्पना करता तुम्ही. मी तिचं लग्न उद्या लावून द्यायला तयार आहे. मला माझ्या भावी जावयाची पारख अधिक चांगल्या तऱ्हेनं करायला पाहिजे एवढंच. माझा बाणा तुम्हाला ठाऊकच आहे. आत-बाहेर काही नाही. सर्व व्यवहार स्पष्ट आणि स्वच्छ. उद्याच मी तुमच्यादेखत तिला विचारतो. तिची इच्छा असली तर तोही हजर असू दे. त्यांनी लग्न केलं तर मी काही आड येणार नाही.' तो किंचाळल्यासारखा म्हणाला. अशा आवाजातच त्याने आपल्या मुलाला निरोप दिला होता.

माणसांची चांगली पारख करणाऱ्या वृद्ध निकोलायकडे धूर्ततेचा काही उपयोग होणार नाही ह्याची खात्री होऊनही प्रिन्स व्हॅसिली धूर्त माणसाच्या सुरात म्हणाला, 'मी तुमच्याशी मोकळेपणानं बोलत आहे. तुम्हाला लोकांची पारख आहे हे मला ठाऊक आहे. अनातोलला मोठी बुद्धिमत्ता नाही पण तो प्रामाणिक आहे, सुस्वभावी आहे.'

'टीक. ठीक. विचार करू या आपण त्याबद्दल.'

अनातोलला पाहून निकोलायच्या घरातील तीनही स्त्रियांना आपण आजपर्यंत खरेखुरे जीवन जगलोच नव्हतो असे वाटू लागले. प्रिन्सेस मार्याला आपल्या चेहऱ्याचा, आपल्या केशरचनेचा आता विसर पडला. जो कदाचित तिचा नवरा होणार होता त्या पुरुषाच्या देखण्या प्रेमळ चेहऱ्याखेरीज तिला दुसरे काही सुचेना. तिला तो दयाळू, शूर, निश्चयी, पराक्रमी आणि उदारहृदयी वाटू लागला. भावी वैवाहिक जीवनाची असंख्य चित्रे तिच्या मनासमोर तरळू लागली.

प्रयत्न करूनही त्याच्याशी प्रेमाने कसे वागावे हे तिला समजेना.

'काय ध्यान आहे. अगदीच कुरूप!' तिच्याबद्दल अनातोलचे मत झाले.

अनातोलच्या आगमनाने बूरिअनबाईच्या मनातही खळबळ उडाली होती. कोणीतरी रशियन उमराव येईल, कुरूप बेंधळ्या आणि गबाळ पोषाख केलेल्या रशियन मुलींहून आपण सुंदर असल्याचे त्याला पटेल, तो आपल्या प्रेमात पडेल, त्यांना बाजूस सारून तो आपणास घेऊन जाईल असे स्वप्न बूरिअनबाई उराशी बाळगून होती. आता तो रशियन उमराव आला होता. अनातोलला आपल्याकडे आकर्षून घेण्याची ती शिकस्त करू लागली.

रणवाद्ये ऐकताच रणांगणावरील म्हातारी घोडी चौखुर उधळतात तशी काहीशी स्थिती धाकट्या प्रिन्सेसची झाली. ती आपले समाजातील स्थान नकळत विसरली होती. नेहमीच्या सवयीनुसार तिचे प्रेमाचे चाळे सुरू झाले होते; त्यात कसला मोठा हेतू नव्हता, कसला संघर्ष नव्हता, त्यात तिला उथळ आनंद काय तो मिळत होता.

सगळेजण आपापल्या खोल्यांत गेले. अनातोल काय तो बिछान्यावर पडताच गाढ झोपी गेला. बाकी सर्वांना किती वेळ झोप येईना. प्रिन्सेस मार्या विचार करीत तळमळत होती. 'तो देखणा, दयाळू अंतःकरणाचा पुरुष माझ्याशी लग्न करील का?' कधी नव्हे ती तिला भीती वाटू लागली. तिला भोवताली बघण्याचे धाडस होईना. जवळपास कुणीतरी आहे असा भास तिला होऊ लागला. कुणी पिशाच्च असेल का? तिने दासीला बोलावून आपल्या खोलीत झोपायला सांगितले.

बूरिअनबाई त्या रात्री कितीतरी वेळ बागेमध्ये कुणाची तरी उगाचच प्रतीक्षा करीत येरझाऱ्या घालीत होती.

बिछाना व्यवस्थित केला नाही म्हणून धाकटी प्रिन्सेस दासीला बोलत होती. तिला बिछान्यात पाठीवर आणि कुशीवरही झोपता येईना. कशीही झोपली तरी तिला आराम मिळत नव्हता. आपल्यावरील जबाबदारीची जाणीव तिला कधी नव्हे ती त्या रात्री तीव्रतेने झाली. अनातोल आला आणि तिला आपला पूर्वीचा काळ आठवला. तेव्हा जबाबदारीचे ओझे नव्हते. तेव्हा

ती किती हसरी आनंदी होती! कपडे न उतरता ती तशीच बैठ्या खुर्चीत बसून राहिली. कात्या दासीच्या डोळ्यांत झोप होती, तिचे केस विस्कटलेले होते. काहीतरी पुटपुटत तिने तिसऱ्यांदा बिछाना झोडपून उलटा केला.

'झोप लागली तर मला नको का आहे? पण मी तरी काय करणार? बिछान्यात कसे खळगे उंचवटे झाले आहेत बघ.' धाकट्या प्रिन्सेसने पुन्हा ऐकवले. तिच्या आवाजात रडण्याच्या बेतात येणाऱ्या मुलाच्या आवाजासारखा कंप होता.

वृद्ध निकोलायला देखील झोप येत नव्हती. मालक रागारागाने येरझाऱ्या घालीत होता, नाक शिंकरीत होता, ते अर्धवट झोपेत असलेल्या तिहॉनला ऐकू येत होते. आपल्या मुलीमुळे आपला अपमान झाला असे वृद्ध निकोलायला वाटत होते. सगळ्या गोष्टींचा पुन्हा एकवार विचार करून योग्य निर्णय घ्यावा असे त्याला वाटत होते. प्रत्यक्षात मात्र त्याचा राग वाढण्याखेरीज काही घडत नव्हते.

'कुणीतरी भटक्या घरी येतो. ही बापाला विसरते. सगळ्यांना विसरते. माडीवर जाऊन घाईघाईने वेषभूषा करते. आपण काय करतो आहोत याची अक्कलही तिला राहत नाही. माझ्या लक्षात येईल हे ठाऊक असूनही आचरटपणा करते! त्या गद्ध्याचं लक्ष बूरिअनवरती. ह्या कारटीला थोडासा स्वाभिमान असता तरी त्याचे चाळे दिसले असते. स्वाभिमान राहू दे, निदान आपल्या बापाच्या प्रतिष्ठेसाठी तरी तिने डोळस राहायला हवे होते. तो ठोंब्या तिला काडीचीही किंमत देत नाही. त्याचा डोळा बूरिअनवर आहे. तिला हे दाखवून दिले पाहिजे ...स्वाभिमान म्हणजे काय हे शिकविले पाहिजे...'

तिला तिची चूक दाखवून दिली, अनातोल बूरिअनशी प्रेमाचे चाळे करू लागला आहे हे सांगितले तर तिचा स्वाभिमान जागृत होईल. आणि आपल्याला सोडून जाण्याचा विचार ती रहित करील, म्हणजे अशा तऱ्हेने आपले उद्दिष्ट साध्य होईल ह्या विचाराने वृद्ध निकोलाय शांत झाला. तिहॉनला हाक मारून तो कपडे उतरू लागला. तिहॉन त्याच्या वाळलेल्या शरीरावर नाईटशर्ट चढवीत असताना तो मनाशीच पुटपुटला, 'कुठल्या सैतानाने त्यांना इकडे पाठवले नकळे! न बोलावता येऊन त्यांनी मनस्ताप दिला!'

नेहमीप्रमाणे तो झोपण्यासाठी कोचावर पडला.

प्रिन्सेस मार्या आपल्या वडिलांच्या अभ्यासिकेत शिरली तेव्हा ती नेहमीपेक्षा खूपच बेचैन होती. त्या सकाळी वृद्ध निकोलाय तिच्याशी अतिशय प्रेमाने वागला, पण ते वागणे अतिशय कृत्रिम होते.

तो एकदम महत्त्वाच्या गोष्टीबद्दल बोलू लागला, 'तुला मागणी घालण्यात आली आहे.' कृत्रिम हास्य करीत तो म्हणाला, 'प्रिन्स व्हॅसिली आपल्या आश्रिताला (का कोण जाणे,

निकोलाय अनातोलचा उल्लेख तो नेहमी या शब्दानेच करी.) घेऊन आला तो काही माझ्या दर्शनासाठी नव्हे एवढं तुला खास कळलं असेल. त्यांनी काल तुला मागणी घातली. माझ्या तत्त्वानुसार मी तुझा सल्ला घेतो आहे.'

'बाबा, मला काहीच कळत नाही.' लाजेनं लालबुंद झालेली प्रिन्सेस मार्या म्हणाली, तशी वृद्ध निकोलाय रागाने ओरडला, 'त्यात न कळण्यासारखं काही नाही. प्रिन्स व्हॅसिलीला तू सून म्हणून पसंत आहेस. त्यानं आपल्या आश्रितासाठी तुला मागणी घातली आहे. यात न कळण्यासारखं काय आहे? आता तुझं मत सांगून टाक.'

'बाबा, मला तुमचं मत कळलं नाही.' प्रिन्सेस मार्या हळू आवाजात बोलली.

'माझं मत? माझ्या मताचा इथं काय संबंध? माझा तू विचारच करू नकोस. लग्न तुझं व्हायचं आहे; माझं नव्हे. तुला काय वाटतं ते कळणं आवश्यक आणि योग्य आहे.'

वडिलांना लग्न बिलकुल पसंत नाही हे प्रिन्सेस मार्याला कळून चुकले. आपले भवितव्य ठरायची आयुष्यातील ही शेवटची संधी आहे याची त्याच क्षणी तिला जाणीव झाली. वडिलांच्या नजरेच्या दडपणाखाली तिची विचारशक्ती नाहीशी होई, त्यांची आज्ञा पाळण्याखेरीज तिला काही करता येत नसे. तसे आता झाले. वडिलांची नजर चुकवून ती खाली पाहत राहिली. 'मी माझी इच्छा व्यक्त करणं आवश्यक असेल तर .. तर बाबा, मी तुमच्या इच्छेबाहेर नाही.'

तिला पुरते बोलू न देता वृद्ध निकोलाय ओरडला, 'छान! फारच छान! तो तुझा हुंड्यासकट स्वीकार करील आणि त्या सौद्यात बूरिअनला पटकावील. तिला आपली पत्नी करून तुला...' तो थांबला. आपल्या शब्दांचा तिच्यावर काय परिणाम होतो ते पाहू लागला. ती खाली मान घालून रडू लागली होती.

'असं काय करतेस? मी आपली थट्टा केली तुझी. मार्या, मुलींना निवड करण्याचा पूर्ण हक्क आहे ह्या तत्त्वावर माझी पूर्ण श्रद्धा आहे. मी तुला पूर्ण स्वातंत्र्य दिलं आहे. तुझ्या निर्णयावर तुझं सौख्य आहे हे विसरू नकोस. माझ्याबाबत काही बोलण्याची जरुरी नाही.'

'बाबा, मला हे कळत नाही...'

'आता बोलण्याची आवश्यकता नाही. तो कोणाशीही लग्न करायला तयार आहे. निवड करायला, निर्णय घ्यायला तुझी तू मुखत्यार आहेस. खोलीत जा आणि ह्यावर विचार कर. तासाभरानं परत येऊन त्याच्यासमोर तुझा होकार-नकार मला सांग. परमेश्वराची प्रार्थना करशीलच. आवश्यक वाटल्यास कर. तू विचारांती निर्णय घे. मग सारं काही ठीक होईल. जा आता.'

प्रिन्सेस मार्या खोलीबाहेर पडली तेव्हा धुक्यात ठेचकाळल्यागत निकोलाय ओरडत राहिला. 'होकार किंवा नकार, नकार किंवा होकार...' तिने आपले भावी जीवन सुखी करण्याचा निर्णय घेतला. वडिलांनी बूरिअनबाईच्या संदर्भात काढलेल्या उद्गारांमागील अर्थ फार भयंकर होता. ते उद्गार सत्याला धरून नसले तरीही भयंकर होते. तिला त्यांचा

विसर पडेना. बागेमधून सरळ रस्त्याने ती जात होती, पण तिला काही दिसत नव्हते, ऐकू येत नव्हते.

एकाएकी बूरिअनबाईचा परिचित आवाज तिच्या कानांवर पडला आणि ती भानावर आली. तिने दृष्टी वर उचलली तो तिला दोनचार पावलांवरच बूरिअनबाईच्या कमरेभोवती हाताचा वेढा घालून अनातोल तिच्याशी काहीतरी कुजबुजत असलेला दिसला. प्रिन्सेस मार्याकडे वळून पाहताच अनातोलची मुद्रा भयानक झाली. लागलीच त्याचा हात बूरिअनबाईच्या कमरेवरून दूर झाला. जेव्हा बूरिअनबाईने प्रिन्सेस मार्याला पाहिले तेव्हा ती किंचाळून पळत सुटली. या विचित्र प्रसंगातील गंमत चाखण्यासाठी बोलावल्यागत अनातोलने गोड स्मित करून झुकून प्रिन्सेस मार्याला प्रणाम केला आणि खांदे उडवून आपल्या खोलीचा रस्ता धरला.

अर्ध्या तासाने तिहॉन प्रिन्सेस मार्याकडे आला. तिला तिच्या वडिलांनी बोलावले असल्याचे सांगितले. त्यांच्याबरोबर प्रिन्स व्हॅसिली असल्याची माहितीही त्याने दिली. तिहॉन तिथे आला त्यावेळी सोफ्यावर बसलेल्या मार्याच्या मिठीत बूरिअनबाई रडत होती. प्रिन्सेस मार्या हलुवारपणे तिचे डोके थोपटीत होती. तिच्या सुंदर डोळ्यांत पुन्हा शांतभाव उजळत होता. तिचे स्नेहाने आणि करुणेने भरलेले डोळे बूरिअनबाईच्या सुंदर मुखावर खिळले होते.

'प्रिन्सेस, आता तुझ्या अंतःकरणात मला जरादेखील जागा उरली नसेल.' बूरिअनबाई बोलत होती.

'तसं होण्याचं कारण काय? मला तू पूर्वीहून आवडतेस. तुझ्या सुखासाठी मला शक्य ते सारं मी करीन.'

'तू किती शुद्ध, पवित्र अंतःकरणाची आहेस. तुला वासनेचं वादळ ठाऊक नाही. तुला माझा तिरस्कार वाटत आहे, होय ना?'

दुःखीकष्टी प्रिन्सेस मार्या उत्तरली, 'मला सारं कळतं आहे. पण तू आता शांत हो. मी माझ्या वडिलांकडे जाऊन येते.' असे बोलून ती खोलीबाहेर निघाली.

प्रिन्सेस मार्या आत आली त्यावेळी प्रिन्स व्हॅसिली पाय पायावर ठेवून हातात तपकिरीची डबी घेऊन बसलेला होता.

'ये बाळ, आत ये' उठून तिला दोन्ही हातांनी धरून तो म्हणाला. एक दीर्घ उसासा टाकून तो म्हणाला, 'माझ्या मुलाचं नशीब तुझ्यावर अवलंबून आहे. बाळ मार्या, आता तूच निर्णय घ्यायचा आहेस.' त्याच्या डोळ्यांत आसवे उभी राहिली.

प्रिन्स निकोलाय म्हणाला, 'मार्या, प्रिन्स व्हॅसिली आपल्या पाल्याच्या— आपल्या चिरंजीवांच्या वतीने तुला मागणी घालताहेत. प्रिन्स अनातोल कुरॅगिनशी लग्न करायला तुझी संमती आहे का? होय की नाही ते सांगून टाक.' त्याने ओरडून म्हटले. 'माझं मत प्रदर्शित करण्याचा हक्क मी राखून ठेवला आहे. मी केवळ मतप्रदर्शन करीन. आणखी काही करणार नाही.'

'बाबा, तुम्हाला सोडून जावं असं मला वाटत नाही. मला लग्न करायचं नाही.' प्रिन्स व्हॅसिली आणि अनातोल यांच्यावर आपले सुंदर डोळे खिळवून ती निश्चयी स्वरात म्हणाली.

कपाळाला आठ्या घालीत प्रिन्स निकोलाय ओरडला, 'मूर्खपणा! हा निव्वळ मूर्खपणा आहे!' त्याने आपल्या मुलीचा हात धरून तिला आपल्याकडे ओढले, तिचे चुंबन न घेता आपल्या कपाळाने तिच्या कपाळाला स्पर्श केला आणि तिचा हात एवढ्या जोराने पिरगाळला की ती जोराने विव्हळली. प्रिन्स व्हॅसिली उठून उभा राहिला.

तो म्हणाला, 'हा क्षण मी कधीच विसरणार नाही. बाळ तुझं अंतःकरण उदार आहे, थोर आहे. आमच्या आशेला थोडी जागा ठेव. सांग, आज नाही पण काही काळानं... भविष्यकाळ आजच संपला नाही. कदाचित...'

'असं विचारून तुम्ही माझा सन्मान करीत आहात. यासाठी मी तुमची ऋणी आहे. मी आता जे बोलले ते अगदी मनापासून बोलले. मी तुमच्या मुलाशी कधीच लग्न करणार नाही.'

प्रिन्स निकोलाय म्हणाला, 'मित्रा, आता प्रश्न कायमचा मिटला. प्रिन्सेस, तू जायला हरकत नाही.' मग त्याने प्रिन्स व्हॅसिलीला निरोप दिला. 'तुमच्या भेटीनं मला आनंद वाटला. या तुम्ही.'

रोस्तॉफ कुटुंबाला निकोलुश्काची बातमी कितीतरी दिवस कळली नव्हती. हिंवाळ्याच्या मध्याला काउंट रोस्तॉफला पत्र मिळाले. पाकिटावरील हस्ताक्षर आपल्या मुलाचे आहे हे त्याने ओळखले. पत्र मिळताच काउंट दचकला. सर्वांचे लक्ष चुकवून तो घाईघाईने खोलीत शिरला आणि त्याने दार लावून घेऊन पत्र वाचले. ॲना मिहालोवनाला पत्राचा सुगावा लागला. ती हलक्या पावलांनी खोलीत आली तेव्हा तिला काउंट पत्र हातात घेऊन एकाच वेळी रडत आणि हसत असलेला दिसला.

'निकोलुश्काचं पत्र...जखमी...कदाचित ..माझा लाडका...धाकट्या काउंटेसला .. त्याला वरची जागासुद्धा...देव दयाळू आहे ..धाकट्या काउंटेसला ही वार्ता...'

ॲना मिहालोवनाने जवळ बसून आपल्या हातरुमालाने काउंटचे डोळे आणि पत्र पुसले. स्वतःचे डोळे पुसले, पत्र वाचले आणि मग काउंटचे सांत्वन केले. दुपारच्या जेवणानंतर आणि संध्याकाळच्या चहापानापूर्वी तिने काउंटेसचे मन तयार करण्याचे ठरवले. चहापानानंतर ईश्वरावर भरवसा ठेवून ती तिला सगळे सांगणार होती.

जेवणाच्या वेळी ॲना मिहालोवना युद्धातील अफवांबद्दल बोलू लागली. सर्वांच्या आवडत्या निकोलायाबद्दल तिने विषय काढला. तिला सगळे ठाऊक असूनही त्याचे अगदी अलीकडील पत्र कधी मिळाले याची दोनदा चौकशी केली. कदाचित आज त्याचे पत्र मिळेल असे ती सहज

बोलून गेली. अशा बोलण्याने काउंटेस अस्वस्थ झाली की ॲना मिहालोवना कुणाच्या लक्षात येणार नाही अशा अप्रतिम सफाईने संभाषणाचा ओघ क्षुल्लक विषयांकडे वळवी.

आपले वडील आणि ॲना मिहालोवना यांमधे काहीतरी गुपित आहे, आपल्या भावासंबंधी आहे आणि ॲना मिहालोवना ते सांगण्यासाठी पूर्वतयारी करीत आहे याबद्दल नताशाची खात्री झाली. निकोलुश्काकडून आलेल्या बातमीचा ओझरता उल्लेख झाला तरी आपली आई अत्यंत अस्वस्थ होते हे तिला ठाऊक होते. नताशा तशी अविचारी होती तरीही तिने जेवताना एक चकार शब्दही काढला नाही. तिच्या मनात इतकी खळबळ माजली होती की तिला जेवण जाईना, ती खुर्चीतल्या खुर्चीत चुळबूळ करीत राहिली. शिक्षिकेने तिला कितीही दरडावले पण काही उपयोग झाला नाही.

भोजन संपल्यावर ती थेट ॲना मिहालोवनाला गाठण्यासाठी धावली. ती दिवाणखान्यात दिसताच तिच्या गळ्यात हात टाकून ती म्हणाली, ' आन्टी, मला आधी खरं काय ते सांग.'

' कुठं काय ? काही नाही ग. '

' असं काय करतेस ? तू आमची आवडती आन्टी आहेस.. मी कुण्णाला सांगणार नाही. तुला काहीतरी माहीत आहे हे मला माहीत आहे. '

' तू फारच चलाख दिसतेस, पोरी. ' ॲना मिहालोवना मान हालवीत म्हणाली.

' निकोलिश्काकडून पत्र आलं आहे का ? खात्रीनं तसंच असणार. '

' कृपा कर. आपल्याला काळजी घ्यायला हवी. तुला कल्पना नाही. तुझ्या आईला मोठा धक्का बसेल. '

' मी घेईन काळजी. मला सगळं सांग. नाही सांगत ? नाही सांगत ? मी आताच जाऊन आईला हे सगळं सांगते. '

' कुणाला सांगणार नसशील तर सांगते. ' असे म्हणून ॲना मिहालोवनाने नताशाला पत्रातील मजकूर थोडक्यात सांगितला.

क्रूसची खूण जुळवीत नताशा म्हणाली, ' मी तुला शब्द देते. मी कुणालाच काही सांगणार नाही. ' मग ती तशीच सोन्याकडे धावत गेली आणि उत्साही स्वरात तिला तिने ऐकवले, ' निकोलिश्का जखमी...पत्र आलंय...'

' निकोलिश्का ! ' सोन्या एवढेच बोलली आणि लागलीच पांढरी फटक पडली. सोन्यावर झालेला परिणाम पाहून बातमी गंभीर असल्याची जाणीव नताशाला प्रथमच झाली.

ती सोन्याजवळ धावत गेली. तिला मिठी मारून रडू लागली. ' फार नाही जखमी झालेला...त्याला ऑफिसर म्हणून प्रमोशन मिळालं आहे...तो आता बरा आहे...त्यानंच पत्र लिहिलं आहे...' बोलत असताना तिच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते.

खोलीत ठामपणे पावले टाकीत आलेला पेत्या त्यांना म्हणाला, ' तुम्ही सगळ्या स्त्रिया म्हणजे रडणाऱ्या बाहुल्या. माझ्या भावानं नावलौकिक मिळवला म्हणून मला आनंद वाटत आहे. तुम्हा बायकांना काही कळत नाही. ' डोळ्यांत अश्रू असलेल्या नताशाने स्मित केले.

'तू पत्र वाचलंस का?' सोन्याने विचारले.

'नाही ग. पण तिनं मला सांगितलं. तो आता बरा झाला आहे. एवढंच नव्हे तर ऑफिसर झाला आहे.'

सोन्याने क्रूसची खूण जुळवीत देवाचे आभार मानले आणि म्हटले, 'कदाचित ती तुला फसवीत असेल. आपण तुझ्या आईकडे जाऊ.'

पेत्या शांतपणे येरझाऱ्या घालीत होता. 'मी निकोलिश्काच्या जागी असतो तर आणखी कित्येक सैनिक ठार केले असते. सगळे नरपशू आहेत. त्यांना ठार मारून मी त्यांचा एक मोठा ढीग रचला असता.' पेत्या आपला बोलतच होता.

'पेत्या, जीभ आवर. काय मूर्खासारखी बडबड लावली आहेस?'

'मी मूर्ख नाही. क्षुल्लक गोष्टींसाठी रडणारी माणसं मूर्ख आहेत.'

'तुला त्याची आठवण आहे का?' क्षणभराने नताशाने एकदम सोन्याला प्रश्न केला. तेव्हा सोन्याचा चेहरा स्मिताने उजळला.

'मला निकोलिश्काची आठवण आहे का असं का विचारलंस?'

'तसं नाही सोन्या. तुला तो अगदी चांगला आठवतो का? पूर्णपणे आठवतो का?' अत्यंत महत्त्वाचा अर्थ शब्दांनी व्यक्त केल्यागत मोठ्या कष्टाने हातवारे करीत तिने विचारले.

'मला निकोलिश्का चांगला आठवतो. पण बोरिस मात्र जराही आठवत नाही.'

'काय? काय म्हणतेस तू? तुला बोरिस जराही आठवत नाही?' सोन्याने आश्चर्यचकित होऊन विचारले.

'बोरिसची मला आठवण येत नाही असं नाही म्हणत मी. तो कसा आहे हे मला ठाऊक आहे. मी डोळे मिटून बोरिसला पाहू शकत नाही.' तिने डोळे मिटून घेतले. आणि म्हटले, 'नाही. मुळीच दिसत नाही तो.'

'काय हे नताशा.' गंभीरपणे आपल्या मैत्रिणीकडे पाहत सोन्या म्हणाली. जणू तिला जे सांगायचे होते ते ऐकायला नताशा बिलकूल पात्र नव्हती; जिच्याबाबत मस्करी करणे शक्य नाही अशा कुणी दुसऱ्याच व्यक्तीला ती जणू सांगत होती. 'तुझ्या भावावर मी प्रेम केलं ते पहिलं आणि शेवटचंही. आमचं काही बरंवाईट झालं तरी माझं प्रेम अढळ राहील.'

नताशा विस्मयाने आणि कुतूहलाने सोन्याकडे पाहत राहिली, पण काही बोलली नाही. सोन्याच्या बोलण्यात सत्य आहे, सोन्या ज्या प्रेमाबद्दल बोलत होती तसे प्रेम आहे हे तिला जाणवले. पण तशा प्रेमाशी तिची ओळखच झाली नव्हती. तसे प्रेम असू शकेल असे तिला वाटले पण तसे प्रेम तिला कळले नाही.

ॲना मिहालोवनाने भोजनाच्या वेळी केलेल्या सूचक उल्लेखांमुळे काउंटेसच्या मनाची तयारी झाली होती, खोलीत जाऊन ती तपकिरीच्या डबीवर रंगवलेल्या आपल्या मुलाच्या चित्रावर डोळे लावून बसली. ॲना मिहालोवना पत्र घेऊन हलक्या पावलांनी येऊन दारात स्तब्ध उभी राहिली. मागून येणाऱ्या थोरल्या काउंटला तिने सांगितले. 'तुम्ही एवढ्यात

येऊ नका, मग या.' तिने दरवाजा लावून घेतला तशी थोरला काउंट दाराच्या फटीला कान लावून ऐकू लागला.

पहिल्यांदा साध्या विषयांवरचे बोलणे ऐकू आले. त्यानंतर एकट्या ॲना मिहालोवनाचा आवाज. मग किंकाळी. मग शांतता. मग दोघींचेही आनंदी सुरातले बोलणे. त्यानंतर पावलांचा आवाज. त्यामागोमाग ॲना मिहालोवनाने दार उघडले. 'झालं काम!' ती विजयी मुद्रेने काउंटला म्हणाली आणि त्याला काउंटेसकडे घेऊन गेली.

काउंटला पाहून काउंटेसने दोन्ही हात पसरून त्याला आलिंगन दिले. त्यानंतर व्हेरा, नताशा, सोन्या आणि पेत्या यांनी खोलीत प्रवेश केला आणि आता पत्राचे वाचन सुरू झाले. निकोलिश्काने दोन लढायांत भाग घेतला होता, त्याला कमिशन मिळाले होते, त्याने ह्या गोष्टी थोडक्यात लिहिल्या होत्या. त्याने आईवडिलांची आठवण काढून त्यांचा आशीर्वाद मागितला होता. व्हेरा, नताशा आणि पेत्या यांची मोठ्या प्रेमाने खुशाली विचारली होती. शेलींग, शॉसबाई आणि वृद्ध दासी यांनाही प्रणाम सांगितले होते. आपल्या वतीने त्यांनी सोन्याचे पापे घ्यावेत, सोन्यावर आपले पूर्वीसारखेच प्रेम आहे आणि राहील असे लिहिले होते. ते ऐकून सोन्या इतकी लाजली की तिच्या डोळ्यांत अश्रू आले. लाजून चूर होऊन ती मोठ्या दिवाणखान्यात पळाली. तिच्या चेहऱ्यावर स्मित उमटले, ती गिरक्या घेऊ लागली आणि गिरक्या घेत ती खाली बसली तेव्हा तिचा स्कर्ट फुग्यासारखा फुगला होता.

रडणाऱ्या काउंटेसला व्हेरा म्हणाली, 'आई, अग रडायचं काय कारण? त्याचं पत्र वाचलंस ना? आपण आनंद मानायला हवा.'

तिचे म्हणणे अगदी बरोबर होते. पण काउंट, काउंटेस, नताशा व्हेराकडे रोषाने पाहू लागली. काउंटेस स्वतःशीच म्हणाली, 'व्हेरा आपल्याला समजते तरी कोण!'

निकोलिश्काच्या पत्राचे वाचन किती वेळा झाले त्याला गणती नव्हती. ज्यांनी ज्यांनी ते ऐकावे अशी अपेक्षा होती त्यांना काउंटेसकडे येऊन ते ऐकावे लागे. काउंटेस आपल्या हातातून पत्र खाली ठेवीत नव्हती. मुलांच्या शिक्षकांची हजेरी लागली, दाया आल्या, मायटेङ्का आला, अनेक परिचित माणसे येऊन गेली. प्रत्येक वेळी काउंटेस नव्या उत्साहाने पत्र वाचीत होती. प्रत्येक वेळी तिला निकोलिश्कामधे नवे नवे सद्गुण आढळत होते.

पत्रातील वर्णने वाचून ती म्हणाली, 'किती सुरेख शैली आहे त्याची. प्रत्येक गोष्टीचं वर्णन किती छान आहे. स्वतःबद्दल एक अक्षरही नाही. डेनिसॉव्हविषयी खूप लिहिलं आहे. खरं तर तो खूप शूर आहे. स्वतःला झालेल्या वेदनांबद्दल एक शब्दही नाही. केवढं सोशिक मन. त्याला म्हणूनच हे जमतं. इतरांबद्दल केवढी आस्था. कुणाला विसरला नाही. तो अगदी लहान होता तेव्हापासून मी म्हणायची...'

आठवडाभर रोस्तॉफकुटुंब निकोलिश्काला पाठवायचे पत्र 'तयार करण्यात' गुंतले. आधी कच्चा खर्डा तयार होई. मग त्यावरूनच चांगली प्रत केली जाई. काउंटेसने खूप दक्षता घेतली, काउंट उगाच काळजी करीत राहिला. एकदाच्या आवश्यक वस्तू जमवण्यात आल्या.

त्यात ऑफिसरच्या युनिफॉर्मसाठी व इतर साहित्यासाठीही पैसे होते. ॲना मिहालोवना व्यवहारी स्त्री होती. तिने स्वतःसाठी आणि सैन्यातील आपल्या मुलासाठी खास सोयी उपलब्ध करून घेतल्या होत्या. त्यात टपालाबाबतची सोय होती. संरक्षकदल ज्याच्या ताब्यात होते त्या ग्रँड ड्यूक कॉन्स्टन्टिन पावलोविचला तिने पत्रे पाठवली होती. म्हणून रोस्तॉफकुटुंबाने ठरवले—ग्रँड ड्यूकच्या खास दूताकरवी पत्रे आणि पैसे बोरिसकडे रवाना करायचे म्हणजे तो ते टपाल निकोलिस्काकडे पोचते करील.

कुटुझॉफच्या सैन्याचा तळ ऑल्मुटझजवळ होता. रशिया आणि ऑस्ट्रिया या दोन्ही देशांचे सम्राट दुसऱ्या दिवशी सैन्याची पाहणी करणार होते. म्हणून १२ नोव्हेंबरला सैन्य त्या तयारीत गुंतले होते.

त्याच दिवशी निकोलाय रोस्तॉफला बोरिसची चिठ्ठी मिळाली. ऑल्मुटझपासून दहा मैलांवर बोरिसच्या रेजिमेंटने रात्री मुक्काम केला होता. पत्र आणि पैसे देण्यासाठी बोरिसला त्याची गाठ घ्यायची होती. रोस्तॉफला आताच तर पैशांची गरज होती. लढाईनंतर सैन्याचा तळ ऑल्मुटझजवळ पडला होता. तिथे असलेली सुसज्ज उपाहारगृहे आणि ऑस्ट्रियाच्या ज्यूंनी आणलेल्या विविध वस्तू यांचे जबरदस्त आकर्षण निर्माण झाले होते. ज्या हॉटेलात मुली नोकरीला होत्या त्या हॉटेलांकडे सैनिकांची रांग लागली होती.

कॉर्नेट झाल्यावर रोस्तॉफने मेजवानी दिली होती. डेनिसॉव्हचा घोडा खरेदी केला होता. त्याच्याकडे सहकाऱ्यांची आणि हॉटेलवाल्यांची बाकी होती. बोरिसची चिठ्ठी मिळताच रोस्तॉफ ऑल्मुटझला आला. मग त्याने संरक्षकदलाच्या छावणीकडे घोडा पिटाळला. खाजगी सैनिकाचे क्रूसचे चित्र असलेले गबाळे जाकिट त्याच्या अंगात होते. चामड्याची झिजलेली किनार असलेली गबाळी विजार त्याने चढवली होती. कमरेच्या पट्ट्याला छोटीशी तलवार अडकवली होती. एका बाजूस दिमाखाने कलती ठेवलेली टोपी चुरगाळलेली होती. रेजिमेंटच्या दिशेने घोडा नेत असताना बोरिस आणि त्याचे सहकारी यांच्यावर आपली कशी छाप पडेल याचा रोस्तॉफ विचार करीत होता.

आपल्या हुशारीचा आणि शिस्तीचा अभिमान बाळगीत संरक्षकदलाच्या सैनिकांनी एखाद्या सहलीस जावे तशा मजेत मार्चिंग केले होते. छोट्या छोट्या टप्प्यांवर ते मुक्काम करीत आले होते. मालवाहू गाड्या त्यांचे सामान घेऊन निघत. प्रत्येक मुक्कामाला ऑस्ट्रियन सरकार ऑफिसरांना उत्तम प्रकारचे भोजन पुरवी. रेजिमेंट शहरात शिरताना आणि शहरातून निघताना बँड वाजवला जाई.

ग्रँड ड्यूकच्या हुकुमानुसार एका ठेक्यात पावले टाकीत सैनिक कूच करीत आले होते. योग्य ठिकाणी असलेले अधिकारीही सामील झाले होते. या शिस्तीचा सर्वांना अभिमान वाटत

होता. कूच करताना आणि इतर वेळीही आता कॅप्टन झालेल्या बर्गबरोबर बोरिस होता. मार्चिंग चालू असतानाच बर्गची आपल्या तुकडीशी गाठ पडली होती. बर्गने आपल्या कर्तव्य-निष्ठेने आणि अचूक वागण्याने वरिष्ठांची मर्जी संपादन केली होती. आपला आर्थिक प्रश्न समाधानकारकरीत्या सोडवला होता.

त्याच अवधीत बोरिसने आपल्या उपयोगी पडतील अशी बरीच माणसे हेरून त्यांच्याशी ओळखी केल्या होत्या. पीएरकडून आणलेल्या शिफारसपत्राच्या जोरावर त्याने प्रिन्स आंद्रेशी ओळख केली होती. त्याच्या मार्फत कमांडर-इन्-चीफच्या स्टाफमधे आपण शिरकाव करू शकू अशी त्याला आशा वाटत होती.

जवळजवळ सहा महिन्यांनंतर आज रोस्तॉफ आणि बोरिस भेटत होते. त्यांची ताटातूट झाल्यापासून ते दोघेही खूप बदलले होते. प्रत्येकाला आपल्यात झालेला बदल शक्यतो दुसऱ्याला लवकर दाखवायचा होता.

' झकपक नीटनेटका पोषाख तेवढा बघून घ्यावा. काय रे आयुष्यात काही मजाविज करता की नाही ? की केवळ स्वच्छता आणि शिस्त ?...आघाडीवर जीवन घालवणारे आम्ही त्यापेक्षा खूप बरे. ' रोस्तॉफ म्हणाला आणि त्याने आपली चिखलाने माखलेली विजार त्याला दाखवली. रोस्तॉफ मोठमोठ्याने बोलत होता म्हणून की काय एका जर्मन स्त्रीने बाहेर डोकावले. तेव्हा डोळे मिचकावून रोस्तॉफ म्हणाले, ' मारू दिसते नाही ? '

तशी बोरिस म्हणाला, ' असा ओरडू नकोस. ती माणसे घाबरतील, तू आज येशील अशी कल्पना नव्हती. कुटूझॉफचा ॲडज्युटंट बोलकॉन्स्की माझा दोस्त आहे. त्याच्यामार्फत मी तुला कालच चिठ्ठी पाठवली होती. तो इतक्या लवकर तुझ्याकडे ती रवाना करील असे वाटले नव्हते. तुझे ठीक चालले आहे ना ? गोळ्यांच्या माऱ्यातून जाऊन आला असशीलच ?

रोस्तॉफने काही न बोलता युनिफॉर्मच्याच दोरीला लटकवलेला क्रूस सैनिकी थाटात हलवला, आपला झोळीतील हात दाखवला. तशी स्मित करीत बोरिस म्हणाला, ' ठीक, ठीक. आलं ध्यानात. आमचा येथवरचा प्रवास फार मस्त झाला. ग्रँड ड्यूकची स्वारी बरोबर असल्यानं सगळ्या सुखसोयी मिळत गेल्या. पोलंडमध्ये स्वागतसमारंभ काय, भोजनसमारंभ काय, नाचगाणी काय—काही विचारू नकोस. झारचा थोरला मुलगा झारविच याची सगळ्या ऑफिसरांवर चांगली कृपा होती. '

दोघेही मित्र गप्पात रंगले. एक आघाडीवरील जीवन आणि घोडेस्वारांच्या मौजा यांबद्दल बोलू लागला. दुसरा राजाच्या ताब्यातील लष्करात नोकरी करणं कसं फायदेशीर असतं त्याचं वर्णन करू लागला.

रोस्तॉफ म्हणाला, ' तुम्ही संरक्षक दलाचे सैनिक म्हणजे—जाऊ दे. आधी मद्य तर मागव. ' तशी बोरिसने पलंगाकडे जाऊन उशीखालून पर्स काढून घेतली आणि मद्य आणायला सांगितले. त्याला आठवण झाली तेव्हा त्याने रोस्तॉफला त्याची पत्रे आणि पैसे दिले.

कुटुंबियांकडून आलेल्या पत्रांबरोबरच प्रिन्स बेग्रेशनला देण्यासाठी एक शिफारसपत्र होते.

ॲना मिहालोवनाच्या सल्ल्यावरून काउंटेस रोस्तॉफने कोणा ओळखीच्या व्यक्तीमार्फत ते मिळवून मुलाला पाठवले होते. दिलेल्या पत्त्यावर जाऊन त्याने त्या माणसाला भेटावे व त्या शिफारसपत्राचा उपयोग करावा अशी विनंती काउंटेसने केली होती.

' निव्वळ मूर्खपणा ! ' असे म्हणत रोस्तॉफने ते शिफारसपत्र टेबलाखाली टाकले.

' पत्र फेकून का दिलंस ? ' बोरिसने विचारले.

' ते कसलंतरी शिफारसपत्र होतं. शिंचं असलं पत्र घेऊन काय करू ? '

बोरिसने ते पत्र उचलले. त्यावरील पत्ता वाचीत तो म्हणाला, ' काय करू ? हे पत्र तुझ्या फार उपयोगी पडेल. '

' मला गरज नाही. मला कुणाचा ॲडज्युटंट व्हायचं नाही.'

' का बरं ? ' बोरिसने विचारले.

' ॲडज्युटंट होणं म्हणजे गुलाम होणं. '

' तू पूर्वीइतकाच अजूनही ध्येयवादी आहेस तर ! ' बोरिस डोके हालवीत म्हणाला.

' तूही होतास तसाच डिप्लोमॅट आहेस बघ. जाऊ दे ते. तुझं कसं चाललं आहे ? ' रोस्तॉफने विषय बदलला.

मद्य घेता घेता बर्ग, रोस्तॉफ आणि बोरिस हे तिघेही ऑफिसर रंगात येऊन बोलू लागले. संरक्षकदलातील सैनिकांनी रोस्तॉफला आपल्या सैन्याच्या मजलांबद्दल सांगितले. रशिया, पोलंड आणि इतर देशांत आपले स्वागत कसे झाले, आपले कमांडर ग्रँड ड्यूक काय बोलले, त्यांनी काय काय केले ते सांगितले. कमांडरांच्या रागीटपणाच्या तसेच दयाळूपणाच्या गोष्टीही ऐकवल्या. बर्गचा विषय निघाला नाही त्यामुळे तो काही बोलला नाही.

ग्रँड ड्यूकच्या रागीटपणाचा विषय निघाला तेव्हा मात्र त्या संदर्भात बर्गने मोठ्या उत्साहाने एक गोष्ट सांगितली.

गॅलिसिया येथे ग्रँड ड्यूकनी सैन्याची पाहणी केली तेव्हा त्यांना सैन्य अव्यवस्थित वाटले. तेव्हा ते खूप संतापले आणि त्यांनी बर्गच्या दिशेने घोडा आणला. हे सांगितल्यावरून बर्गने मंद स्मित करीत म्हटले, ' काउंट, तुमचा विश्वास बसेल का ? तेव्हा मी मुळीही घाबरलो नाही. मला माहीत होते माझी काहीही चूक नव्हती. मी बढाई मारीत नाही; पण काउंट, मला रेजिमेंटच्या कवायतीच्या सूचना, तसेच कायम स्वरूपाचे हुकूम प्रार्थनेहूनही अधिक तोंडपाठ आहेत. त्यामुळे माझ्या कंपनीत बारीकसारीक तपशीलही चुकत नाही. मला कसलीच धाकधूक वाटत नव्हती. मी पुढे झालो तेव्हा ड्यूकनी मला खूप छेडलं, खूप छेडलं, खूप शिव्या दिल्या; सैबेरियाची धमकी दिली. माझी चूक नव्हती ते मला ठाऊक होतं. म्हणून मी काही बोललो नाही. त्यांच्यासमोर मी बोलणार तरी कसा ? ' तू बोलत का नाहीस ? ' ते ओरडले, पण मी चकार शब्दही

काढला नाही. मग काय झालं असेल ? दुसऱ्या दिवशीच्या हुकमात आदल्या दिवशीच्या घटनेबद्दल एक अक्षरही नव्हतं. डोकं शांत ठेवलं म्हणजे असं होतं.' पाईपचे झुरके घेत धूम्रवलये सोडीत बर्ग म्हणाला.

बोरिसने मोठ्या कुशलतेने संभाषणास कलाटणी दिली. त्याने रोस्तॉफला म्हटले, 'तू कसा आणि कुठं जखमी झालास ते तर सांग.' रोस्तॉफला बरे वाटले. तो त्यांना युद्धाचा अनुभव अधिकाधिक उत्तेजित होऊन सांगू लागला.

लढ्यात भाग घेणारी माणसे लढायांचे खरेखुरे वस्तुनिष्ठ वर्णन करू शकत नाहीत. ते त्यात आपल्या आवडीनिवडीचे रंग मिसळतात. दुसऱ्याच्या वर्णनांचा उपयोग करून ऐकायला रम्य असे वर्णन करतात. रोस्तॉफने शॉंग्रबेन येथील लढाईचे वर्णन अशाच तऱ्हेने केले.

रोस्तॉफ तसा सत्यप्रिय होता. त्याने जाणूनबुजून सत्याचा अपलाप केला नव्हता. सगळ्या घटना जशा घडल्या तशाच सांगाव्या ह्या हेतूने त्याने सुरुवात केली होती, पण त्याच्या नकळतच तो खोट्या गोष्टी रंगवून सांगू लागला. तसे होणे अपरिहार्य होते. ज्यांना तो आपले अनुभव सांगत होता त्यांनी अगोदरच घोडदळाच्या हल्ल्यांची वर्णने अनेकवार ऐकलेली होती. अशा हल्ल्यांबद्दल त्यांनी एक पक्की कल्पना करून घेतलेली होती. तशाच प्रकारच्या हल्ल्याच्या वर्णनाची त्यांनी अपेक्षा केली होती. त्यांना रोस्तॉफने जर का आपले खरेखुरे अनुभव सांगितले असते तर त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला नसता. ज्यांनी घोडदळाच्या पराक्रमाची वर्णने केली होती त्या बहुतेकांनी जसा पराक्रम गाजवला होता तसा पराक्रम रोस्तॉफने गाजवला नाही असे त्यांना रोस्तॉफच्या दुर्दैवाने वाटले असते.

रोस्तॉफने आणि त्याच्या सहकाऱ्यांनी घोडे भरधाव सोडून हल्ले केले होते, तो स्वतः घोड्यावरून पडला होता, त्याच्या हाताला मार लागला होता, फ्रेंच सैनिकांना घाबरून जीव घेऊन तो जंगलात जाऊन लपला होता. पण हे सारे रोस्तॉफ त्यांना सांगू शकला नाही.

श्रोत्यांना त्याच्याकडून खूप खूप चित्तथरारक गोष्टी ऐकायच्या होत्या. लढाईत त्याची मनःस्थिती कशी क्षुब्ध झाली, त्याचे भान कसे हरपले, शत्रूच्या पायदळावर तो विजेसारखा कसा तुटून पडला, उजव्या डाव्या बाजूच्या सैनिकांना सपासप कापीत तो पुढे कसा घुसला, मग तो बेशुद्ध कसा झाला, इ० इ० त्यांना त्याच्याकडून ऐकायचे होते. त्यानेही काही सांगायचे ठेवले नाही.

अनुभव सांगता सांगता तो मधेच म्हणाला, 'हल्ला करताना एक विचित्र कैफ चढतो त्याची कल्पना तुम्हाला येणार नाही.' तो असे बोलत असताना प्रिन्स आन्द्रे बोलकॉन्स्की खोलीत आला. बोरिस त्याचीच वाट पाहत होता. प्रिन्स आन्द्रेला आपल्याहून लहान वयाच्या तरुण माणसांना उत्तेजन द्यायला, मदत करायला आवडे. आपले वजन खर्च करायची त्याला विनंती करण्यात आली होती. त्यामुळे त्याचा अहंकार सुखावला होता.

आदल्या दिवशी भेटलेल्या बोरिसबद्दल त्याचे चांगले मत झाले होते. त्याला मदत करावी असे त्याला वाटू लागले. कुटूझॉफने त्याला कागदपत्रे देऊन झारविचकडे पाठवले होते.

बोरिस एकटा भेटेल या अपेक्षेने तो खोलीत आला. त्याला एक हुशार सैनिक आढ्यतेने आपले लढाईतील पराक्रम सांगत असताना आढळला. तो हुझार रोस्तॉफ होता. नको त्या मंडळींत आपण येऊन पडलो म्हणून पश्चात्ताप करीत प्रिन्स आन्द्रे सोफ्यावर बसला.

तो बोरिसकडे वळून म्हणाला, 'तुझ्या कामाचं आपण नंतर पाहू.' मग रोस्तॉफकडे नजर टाकीत तो त्याला म्हणाला, 'शुक्रवारी तपासणी आटोपल्यानंतर भेट. आपण शक्य होईल ते करूया.' असे म्हणून प्रिन्स आन्द्रेने बोरिसचा निरोप घेतला.

रोस्तॉफ बोरिसला भेटला त्याच्या दुसऱ्याच दिवशी ऑस्ट्रियन आणि रशियन सैन्याची तपासणी झाली. रशियाहून आलेली जादा कुमक आणि कुटूझॉफबरोबर मोहिमेवर असलेले सैन्य यांचा त्या सैन्यात समावेश होता. दोन्ही राष्ट्रांच्या सैन्यात सुमारे ऐंशी हजार सैनिक होते. त्यांची तपासणी दोन्ही सम्राट करणार होते.

सैनिकांच्या दर दोन पथकांमध्ये रस्त्यासारखी मोकळी जागा सोडण्यात आली. सैन्याचे स्पष्ट दिसणारे तीन भाग होते; कुटूझॉफचे सैन्य (त्याच्या उजव्या बाजूस पहिल्या रांगेत पावलोग्रॅड घोडदळ होते); आघाडीवरील रेजिमेंट आणि रशियातून आलेली संरक्षकदळे आणि तिसऱ्या ठिकाणी ऑस्ट्रियन सैन्य.

पानांतून शिरणाऱ्या वाऱ्याप्रमाणे थरारलेल्या सैनिकांत कुजबूज सुरू झाली. 'आले-आले' घाबरलेले आवाज ऐकू आले.

ऑल्मुट्झच्या दिशेने त्यांच्यासमोर येणारी काही माणसे त्यांना दिसू लागली. सम्राट आपल्या खास अधिकाऱ्यांसह येत होते. सम्राटांचे घोडे सैन्याच्या बाजूने जाऊ लागले तशी पहिल्या घोडदळाच्या रेजिमेंटच्या तुताऱ्या समरगीत वाजवू लागल्या. त्या संगीतामधून एका माणसाचा– सम्राट अलेक्झांडर यांचा प्रेमळ उत्साही आवाज स्पष्टपणे ऐकू येत होता. त्यांनी काही शब्द उच्चारून स्वागत केले तशी पहिल्या रेजिमेंटने आरोळी दिली, 'हुर्रा.' त्याची आरोळी इतकी कानठळ्या बसवणारी, लांबलचक आणि इतकी आनंदाने भरलेली होती.

'हुर्रा! हुर्रा! हुर्रा!'

एकामागून एक रेजिमेंट झारला अभिवादन करू लागली. कूच करण्याच्या वेळचे संगीत झारच्या अभिवादनार्थ वाजू लागले. आवाज सारखा वाढत गेला आणि दुसरे काही एक ऐकू येईनासे झाले. 'हुर्रा! हुर्रा!' कानठळ्या बसवणारा भयानक कोलाहल सुरू होता. पुतळ्यां-प्रमाणे निश्चल असणाऱ्या सैनिकांच्या तुकड्या, तुकड्यांमधून शंभर एक घोडेस्वार, सम्राटांचा परिवार आणि अग्रभागी दोन सम्राट सावकाश फिरत होते.

तुतारीवादकांजवळ रोस्तॉफ उभा होता. त्याच्या तीक्ष्ण नजरेने दुरून येणाऱ्या झारला ओळखले आणि तो त्याच्याकडे पाहत राहिला. झार वीस एक पावलांवर आला तेव्हा रोस्तॉफने त्या तरुण सम्राटाचा देखणा आनंदी चेहरा बारकाईने न्याहाळला. कधी नव्हे ते त्याचे अंतःकरण प्रेम आणि अत्यानंद यांनी भरले. झारची प्रत्येक गोष्ट त्याचे शरीर, त्याची हालचाल त्याला सुंदर आणि आकर्षक वाटू लागली.

झार पावलोग्रॅड रेजिमेंटसमोर थांबला, ऑस्ट्रियन सम्राटाशी फ्रेंचमधे काही बोलून त्याने स्मित केले.

ते स्मित पाहताच रोस्तॉफ नकळत स्वतःशी स्मित करू लागला. सम्राटांबद्दल त्याच्या मनात उत्कट भक्ती निर्माण होऊ लागली. कोणत्या तरी तऱ्हेने आपली भक्ती प्रकट केली पाहिजे अशी त्याला तीव्र इच्छा झाली. ते अशक्य आहे हे त्याला ठाऊक होते. त्याला रडावेसे वाटू लागले.

रेजिमेंटच्या कर्नलला बोलावून झार त्याच्याशी चार शब्द बोलला.

रोस्तॉफला सम्राटांसाठी मरावे असे तीव्रतेने वाटू लागले. झार आणखी काही बोलला पण रोस्तॉफला ते ऐकू आले नाही. सगळे सैनिक फुप्फुसे दुखेपर्यंत ओरडले, ' हुर्रा ! हुर्रा ! '

झारची दोलायमान वृत्ती क्षणभरच टिकली. झारच्या पायात त्या काळच्या फॅशनच्या निमुळत्या टोकाचे बूट होते. झारने आपल्या उत्तम जातीच्या किरमिजी रंगाच्या इंग्लिश घोड्याच्या पोटाला त्या बुटाने स्पर्श केला. पांढरे मोजे घातलेल्या झारने लगाम एकत्र केले आणि घोडा पिटाळला. प्रत्येक रेजिमेंटशी थांबत तो घोडा पुढेपुढे नेऊ लागला. शेवटी आपल्या परिवारात वेढला गेलेला सम्राट दिसेनासा झाला. रोस्तॉफला त्याच्या हॅटचा पांढरा तुरा तेवढा दिसू लागला. रोस्तॉफला झारच्या परिवारात असलेला बोलकॉन्स्की घोड्यावर आळसावून बसलेला दिसला.

झारने जवळजवळ प्रत्येक रेजिमेंटची तपासणी संपवली तेव्हा सैनिकांच्या तुकड्या त्यांच्या जवळून जाऊ लागल्या.

तपासणी संपली तशी आलेल्या नव्या सैन्याचे आणि कुटूझॉफच्या सैन्याचे ऑफिसर घोळक्याघोळक्याने जमू लागले. कोणाकोणाचा झालेला मानसन्मान, ऑस्ट्रियन सैनिक आणि त्यांचे युनिफॉर्म, त्यांचे आघाडीचे सैन्य, इसेनची तुकडी आल्यावर आणि प्रशियाने आमच्या बाजूस आल्यावर नेपोलिअनच्या समोर वाढून ठेवलेले दुर्दैवी भवितव्य, इ० गोष्टींवर बोलणी निघाली. पण बोलण्याचा प्रमुख विषय होता सम्राट अलेक्झांडर. त्यांनी उच्चारलेला प्रत्येक शब्द, त्यांची प्रत्येक हालचाल, हावभाव यांची वर्णने झाली आणि त्या वर्णनाची सारखी उजळणी करण्यात कुणाचा उत्साह कमी पडत नव्हता.

सर्वांच्या मनामधे एकच एक इच्छा होती. सम्राटांच्या नेतृत्वाखाली शक्य तितक्या लवकर शत्रूशी मुकाबला करणे. सम्राटांच्या नेतृत्वाखाली आपण कोणीही शत्रू असला तरी त्याचा नक्की पराभव करू असे तपासणीनंतर रोस्तॉफलाच नव्हे तर इतर अनेक सैनिकांना वाटू

लागले. दोनदा निर्णायक विजय मिळाल्यानंतर त्यांना विजयाचा जेवढा आत्मविश्वास आला असता त्याहून अधिक आत्मविश्वास तपासणीनंतर आला.

तपासणी संपली त्याच्या दुसऱ्या दिवशी बोरिस द्रबेत्स्कॉयने ऑल्मुट्झ येथे बोलकॉन्स्कीची भेट घेण्याचे ठरवले.

"आपण कुणाकडे लाचार होणार नाही, कुणाचे गुलाम होणार नाही' असं रोस्तॉफनं म्हणणं ठीक आहे. त्याचा बाप त्याला एकाच वेळी दहा हजार रुबल्स पाठवीत असतो. बुद्धीशिवाय दुसरे काही माझ्याकडे नसल्यामुळे मला व्यवसाय पत्करणं भाग आहे. कुठलीही संधी न गमवता तिचा जास्तीत जास्त उपयोग करून घ्यायला हवा,' असे बोरिसला वाटत होते.

त्या दिवशी त्याला ऑल्मुट्झ येथे प्रिन्स आंद्रे बोलकॉन्स्की भेटला नाही. ऑल्मुट्झ येथील मुख्य कार्यालय, वकिलातीचा भाग, दोम्ही सम्राट, त्यांचा परिवार, सरकारी अधिकारी, त्यांची निवासस्थाने ह्यांच्या दर्शनाने आपण वरिष्ठ गोटात स्थान मिळवले पाहिजे ही त्याची इच्छा आणखी प्रबळ झाली.

तरुण माणसांना मार्गदर्शन करण्यात आणि त्यांना लौकिक यश मिळवून देण्यासाठी मदत देण्यात प्रिन्स आन्द्रे नेहमीच तत्पर असे. त्याने मोठ्या तत्परतेने बोरिसला मदत करण्याचे ठरवले. त्याला घेऊन तो प्रिन्स डॉल्गोरुकॉव्हकडे गेला.

ऑल्मुट्झच्या राजवाड्यामध्ये सम्राट आणि त्यांचा परिवार उतरलेला होता. ते तिथे गेले तेव्हा खूपच रात्र झाली होती. त्या ठिकाणी त्याच दिवशी हॉफक्रिग्जरॅथचे सदस्य आणि दोन्ही सम्राट यांची युद्धाबाबत विचार करण्यासाठी बैठक भरली होती. तावडतोब कूच करून बोनापार्टशी युद्ध करायला लागावे असे बैठकीत ठरले. मात्र कुटूझॉफ आणि प्रिन्स स्वाईनबर्ग यांनी या ठरावास विरोध केला होता. बोरिसला घेऊन प्रिन्स आन्द्रे प्रिन्स डॉल्गोरुकॉव्हला शोधण्यासाठी राजवाड्यात शिरला त्या वेळी नुकतीच बैठक आटोपली होती. तरुण मंडळींना बैठकीत विजय मिळाला होता. मुख्य ठाण्यातील प्रत्येक व्यक्ती धुंदीत होती. काहीना काही कारणे पुढे करून उशीर करावा, सैन्याने पुढे सरू नये असे म्हणणाऱ्यांची मते जवळ जवळ एकमताने फेटाळण्यात आली त्यांची मते कशी चूक आहेत, सैन्य पुढे सरले तर किती फायदेशीर आहे हे पटवून देऊन इतके निरुत्तर करण्यात आले, भविष्यकाळात होणारी लढाई आणि त्यानंतर मिळणारा जय यांबद्दल बैठकीत इतकी चर्चा झाली की, त्या गोष्टी भूतकाळात घडून गेल्या असे वाटू लागले. सगळ्या गोष्टी आम्हाला अनुकूल होत्या. नेपोलियनच्या सैन्यापेक्षा निःसंशय श्रेष्ठ असलेले आमचे प्रचंड सैन्य एका ठिकाणी गोळा झालेले होते; दोन्ही सम्राटांनी प्रोत्साहन दिलेले सैन्य लढाईला उत्सुक झाले होते. ऑस्ट्रिअन जनरल विरॉथर सैन्याचा

प्रमुख होता. ज्या ठिकाणी सैन्याची रचना करून लढाई द्यायची त्या ठिकाणाची त्याला खडानुखडा माहिती होती. ( दैवयोग असा की ऑस्ट्रियन सैन्याने हालचाली करण्यासाठी जे ठिकाण निवडले होते त्याच ठिकाणी त्यांची फ्रेंचांशी लढाई व्हायची होती. ) त्यांनी आजूबाजूच्या प्रदेशाची सगळी माहिती नकाशावर टिपून ठेवलेली होती. कमजोर होत गेलेल्या नेपोलियनच्या सैन्याने मात्र काहीच उपाययोजना केली नव्हती.

डॉल्गोरुकॉव्हने हल्ला करावा हे मत अत्यंत कळकळीने मांडले होते. बैठकीहून तो परत आला तेव्हा थकून गेला होता. पण विजय मिळाल्याबद्दल त्याला आनंद आणि अभिमान वाटत होता. प्रिन्स आन्द्रेने ज्याच्यासाठी शब्द टाकायचा होता त्या आफिसरला डॉल्गोरुकॉव्ह-समोर नेले. प्रिन्स डॉल्गोरुकॉव्हने प्रेमळपणाने हस्तांदोलन केले पण बोरिसशी तो काहीही बोलला नाही. त्याच्या मनात मघापासून जे विचार थैमान घालत होते ते त्या क्षणाला व्यक्त केल्यावाचून त्याला राहवेना म्हणून तो प्रिन्स आन्द्रेशी फ्रेंचमध्ये बोलू लागला, ' मित्रा, आज आम्ही मोठी लढाई जिंकली. परमेश्वर करो आणि होणाऱ्या लढाईचा शेवटही असाच विजयात होवो ! ' मग अंगाला झोके देत तो म्हणाला, ' मित्रा, ऑस्ट्रियन लोकांच्या, विशेषतः विरॉथरच्या तुलनेनं मी फारच मागं आहे, हे कबूल करायला हवं. त्यांना प्रदेशाबद्दल माहिती आहे ती किती अचूक आहे, किती तपशीलवार आहे ! विलक्षण ज्ञान आहे त्यांचं ! पुढं काय घडेल, कसं घडेल, कोणत्या परिस्थितीत घडेल ते ते अचूक सांगतात. '

' ऑस्ट्रियन माणसाचं अचूक ज्ञान आणि रशियन माणसांचा पराक्रम एक झाले आहेत. याहून अधिक चांगली गोष्ट कोणती असणार ? '

' हल्ला करायचा असंच शेवटी ठरलं तर ? ' बोलकॉन्स्कीने विचारले.

' आता तो आमच्या तावडीत सापडला आहे. अगदी काळ्या दगडावरची रेघ. ' डॉल्गोरुकॉव्ह एकदम मोकळेपणाने हसला.

मग बोरिसकडे त्याचे लक्ष वेधीत प्रिन्स आन्द्रे त्याला म्हणाला, ' मी ह्या तरुण मित्राच्या वतीने एक विनंती करायला आलो होतो. ' तो पुढे काही बोलणार तोच एक ॲडज्युटंट दालनात आला आणि त्याने सम्राट बोलावत असल्याचे प्रिन्स डॉल्गोरुकॉव्हला सांगितले.

' काय त्रास आहे ! ' घाईघाईने उठत डॉल्गोरुकॉव्ह म्हणाला. मग प्रिन्स आन्द्रे आणि बोरिस यांच्याशी हस्तांदोलन करीत त्याने म्हटले, ' माझ्याकडून शक्य होईल ते मी तुझ्यासाठी आणि ह्या तुझ्या दोस्तासाठी करीन. त्यात मला आनंदच वाटेल. आपण भेटू पुन्हा. ' त्याने पुन्हा बोरिसशी हस्तांदोलन केले तेव्हा त्याला नकळतच त्याच्या सुस्वभावी चेहऱ्यावर अकृत्रिम आनंद दिसत होता.

आपण उच्चपदस्थ अधिकाऱ्याच्या जवळ आहोत ह्या कल्पनेने त्या क्षणी बोरिसला धन्यता वाटली. रेजिमेंटमध्ये असताना त्याला आपण अनेक माणसांच्या मोठ्या प्रमाणावरील हालचालीवर ताबा ठेवणाऱ्या शक्तींच्या सान्निध्यात असल्याची जाणीव झाली. ते डॉल्गोरुकॉव्हच्या मागून बाहेर पडले आणि कॉरिडॉरमध्ये आले. डॉल्गोरुकॉव्ह ज्या दाराने

झारच्या खोलीत शिरला त्याच दारातून दुसरा एक मनुष्य बाहेर पडला. कमी उंची असलेल्या त्या माणसाच्या अंगावर नागरी पोषाख होता. त्याचा चेहरा धूर्त होता, त्याचा खालचा जबडा बराच पुढे आलेला होता. त्यामुळे त्याच्या मुद्रेवरील सावधपणा आणि कारस्थानीपणा उठून दिसत होता तो त्याला शोभतही होता.

दुसऱ्याच दिवशी सैन्याने कूच करायला सुरुवात केली. ऑस्टरलिटस येथे लढाई होईपर्यंत बोरिस बोलकॉन्स्कीला अगर डॉल्गोरुकॉव्हला भेटू शकला नाही. काही काळ तो आपल्या जुन्या रेजिमेंटमधे राहिला.

प्रिन्स बॅग्रेशनच्या खास पथकातील एक पथक डेनिसॉव्हच्या ताब्यात होते. निकोलाय रोस्तॉफ त्या पथकात होता. रात्रीचा मुक्काम झाल्यावर सोळा तारखेस ते पथक लढाईसाठी निघाले. इतर सैनिकांच्या रांगांमागून सुमारे मैलभर मजल झाल्यावर त्यांना राजरस्त्यावर थांबावे लागले. कोसॅक हुझारांची पहिली आणि दुसरी तुकडी आणि तोफखाना बरोबर असलेल्या पायदळाच्या बटालिअन जवळून कूच करीत गेलेल्या रोस्तॉफने पाहिल्या. जनरल बॅग्रेशन, डॉल्गोरुकॉव्ह आणि सोबत त्याचे ॲडज्युटंट घोड्यावरून गेलेले त्याने पाहिले. लढाई होणार या कल्पनेने त्याला किती धास्ती वाटली होती, ती धास्ती मनातून काढून टाकण्यासाठी त्याला किती झुंज द्यावी लागली होती, ह्या लढाईत घोडदळाच्या खऱ्या सैनिकांसारखे आपण पराक्रमाची शर्थ गाजवून नावलौकिक कमावू अशी त्याने स्वप्ने रंगवली होती. हे सारे उगाच, फुकट होते तर ! त्याचे पथक मागे ठेवण्यात आले होते. निकोलाय रोस्तॉफचा तो सबंध दिवस कंटाळवाणा गेला. सकाळी नवाच्या सुमारास त्याला समोर चाललेला गोळीबार आणि विजयाचा घोष ऐकू आला. मग जखमी सैनिकांना ( त्यांची संख्या फारशी नव्हती ) आणताना त्याने पाहिले. शेवटी कोसॅकांच्या कंपनीमधून जखमी झालेल्या फ्रेंच घोडदळाच्या सैनिकांना आणले जात होते तेही त्याला दिसले. लढाई छोटीच झाली पण त्यात विजय मिळाला होता. परतणारे सैनिक आणि ऑफिसर उज्ज्वल यशाबद्दल, विशाव शहर काबीज केले त्या घटनेबद्दल आणि सबंध फ्रेंच तुकडी कैद केली त्याबद्दल बोलत होते.

रस्त्याच्या बाजूला काहीतरी खाद्यपदार्थ आणि मद्याची बाटली घेऊन बसलेला डेनिसॉव्ह ओरडला, ' अरे रोस्तॉफ, इकडे ये. सगळा वैताग रिचवून टाकू. ' डेनिसॉव्हच्या भोवती ऑफिसरांनी कोंडाळे केले आणि ते खात आणि बोलत राहिले.

' सम्राट येताहेत. . .सम्राट ' घोडेस्वारांमधे एकाएकी शब्द उमटले. सगळीकडे धांदल, गडबड उडाली. रोस्तॉफने मागे वळून पाहिले. हॅटमधे पांढरी पिसे असलेले अनेक घोडेस्वार दौडत येत होते. एका क्षणात सगळे आपापल्या जागी राहिले.

तरुण सम्राटाला प्रत्यक्ष रणांगणावर हजर राहण्याची इच्छा आवरत नव्हती. दरबारी लोकांनी मना केले तरीही त्याने तिसऱ्या विभागाला मागे टाकून बारा वाजता आघाडीच्या तुकडीकडे घोडा नेला. त्या घोडदळाकडे पोचण्यापूर्वीच त्याला कित्येक अॅड्ज्युटंट भेटले. त्यांनी त्याला लढाईत विजय झाल्याची वार्ता दिली.

त्यांनी फ्रेंचांची केवळ एक तुकडी पकडली होती. पण 'शत्रूवर एक महान विजय' असे त्या चकमकीला अतिरंजित स्वरूप दिले होते. आणि अद्यापही रणांगणावर धूर रेंगाळत होता, त्यामुळे फ्रेंच सैन्याचा पराभव झाला आणि त्यांना नाइलाजाने मनाविरुद्ध माघार घ्यावी लागली असा झारचा आणि सर्व सैन्याचा समज झाला. झारने घोडा पिटाळल्यानंतर थोड्याच वेळात पावलोग्रॅड घोडदळाला पुढे कूच करण्याचा हुकूम मिळाला.

शत्रूचे सैन्य टप्प्यात येईल अशा रीतीने आघाडीचे सैन्य विशाव शहरासमोर तळ देऊन होते. थोड्याशा फैरींची देवाणघेवाण झाली की शत्रूचे सैन्य माघार घेई. आघाडीवरील सैनिकांना झारचे धन्यवाद कळवण्यात आले, बक्षिसे जाहीर करण्यात आली आणि त्यांना दुप्पट व्होडका देण्यात आली. आदल्या रात्रीच्या दुप्पट आनंदाने उघड्या तळांवरील शेकोट्या पेटू लागल्या आणि सैनिक उत्साहाने गाऊ लागले. मेजर झाल्याबद्दल डेनिसॉव्हने ती रात्र साजरी केली. सगळ्यांना यथेच्छ मद्यपान घडवणाऱ्या त्या समारंभाच्या शेवटी रोस्तॉफने सम्राटांना आरोग्य चिंतिणारे भाषण केले. 'आपण आपले सार्वभौम सम्राट अलेक्झांडर यांना असे सरकारी भोजन समारंभातले शब्द मी वापरत नाही. मी म्हणतो—सुस्वभावी, मन जिंकणाऱ्या थोर सम्राट अलेक्झांडर यांना– आपण आरोग्य चिंतूया! फ्रेंचांवर आपणांस निर्णायक विजय मिळेल अशी अशा करूया. आपण यापूर्वी लढाया खेळलो, एक तसूभर देखील फ्रेंचांपासून मागे हटलो नाही, शॉंग्रबेनचे उदाहरण आपल्याला ठाऊक आहे.— आता तर सम्राटच आमचे नेतृत्व करत आहेत. त्यांच्यासाठी आम्ही आनंदाने मरण पतकरू. दोस्त हो, मला योग्य शब्द सुचत नाहीत. थोडी जास्त झाली असेल पण माझी भावना व्यक्त करण्याचा मी प्रयत्न केला. तुमचीही भावना अशीच असेल. पहिले अलेक्झांडर यांना आरोग्य लाभो! 'हुर्रा!'

'हुर्रा!' ऑफिसरांचे उत्साही आवाज दुमदुमले. रोस्तॉफसारख्या वीस वर्षांच्या पोराहून अधिक उत्साहाने अधिक तळमळीने कॅप्टन किर्स्टेनने आरोळ्या दिल्या.

'छे! छे! तुला ती कळणारच नाही' रोस्तॉफ उठला. शेकोट्यांजवळून फिरताना त्याला वाटू लागले— 'सम्राटांचे प्राण वाचवण्यासाठी नव्हे (सम्राटांचे प्राण वाचवण्याचे मनोराज्य करायला त्याचे मन धजेना)– तर केवळ त्यांच्या डोळ्यांसमोर नुसते मरण आले तरी मी धन्य होईन!' तो खरोखर सम्राट झार, वैभवशाली रशियन सैन्य आणि भावी विजयाची आशा या साऱ्यांच्या प्रेमात पडला होता. ऑस्टरलिट्स येथे लढाई झाली त्यापूर्वीच्या त्या संस्मरणीय दिवसांत अशी भावना असणारा रोस्तॉफ काही एकटा नव्हता. त्यावेळी प्रत्येक दहा रशियन सैनिकांतले नऊ सैनिक झार सम्राट आणि वैभवशाली रशियन सैन्य यांच्या प्रेमात पडले होते.

कदाचित ते रोस्तॉफप्रमाणे आनंदाने बेहोष झाले नसतील एवढेच.

दुसऱ्या दिवशी झारने विशाव शहरी मुक्काम केला. त्याची प्रकृती बघण्यासाठी त्याचा डॉक्टर व्हिल्यर याला कित्येक वेळा बोलावण्यात आले. मुख्य ठाण्यावर आणि जवळपास असलेल्या सैन्यात झारची प्रकृती बरी नाही ही बातमी पसरली. झार काही खात नव्हता, काल रात्री त्याला चांगली झोप लागली नव्हती असे त्याच्या जवळचे सांगू लागले. जखमी आणि मृत सैनिक पाहून झारच्या हळव्या अंतःकरणाला एवढा जबरदस्त धक्का बसला की तो आजारी पडला होता.

सतरा तारखेस सकाळी आमच्या आउटपोस्टमधून एका फ्रेंच ऑफिसरला विशाव शहरात आणण्यात आले. तो तहकुबीचे निशाण दाखवीत रशियन सम्राटांची भेट घेण्यासाठी आला. त्या ऑफिसरचे नाव होते सॅव्हरी. झारचा नुकताच डोळा लागला होता त्यामुळे सॅव्हरीला थांबावे लागले. दुपारी त्याला सम्राटाची भेट घेता आली. एका तासानंतर तो प्रिन्स डॉल्गोरुकॉव्ह-बरोबर फ्रेंच सैन्याच्या आउटपोस्टकडे निघाला. अलेक्झांडर आणि नेपोलियन यांची भेट घडवून आणावी या उद्देशाने सॅव्हरी आला होता, अशी अफवा पसरली होती. झारने व्यक्तिशः भेट घ्यायचे नाकारले, याबद्दल सैन्याला आनंद आणि अभिमान वाटला.

अठरा आणि वीस तारखेला सैन्याने दोन दिवसांची मजल मारली. शत्रूच्या आउटपोस्ट-वरील सैनिकांनी थोडासा प्रतिकार करून माघार घेतली. एकोणीस नोव्हेंबर सकाळपासून वीस नोव्हेंबर दुपारपर्यंत उच्च अधिकाऱ्यांत जोराची खळबळ उडाली होती. आणि त्यांना कामापुढे फुरसद नव्हती. वीस नोव्हेंबर रोजीच ऑस्टरलिट्स् येथे गाजलेली लढाई झाली. एकोणीस तारखेला दुपारपर्यंत उत्साहाचे बोलणे, घाईगर्दीने कामे करणे आणि ॲडज्युटंट पाठवून देणे ह्या सर्व गोष्टी दोन्ही सम्राटांच्या मुख्य ठाण्यापुरत्या मर्यादित होत्या. दुपारनंतर सर्व कामे कुटूझॉफचे मुख्य ठाणे आणि कॉलमच्या कमांडिंग ऑफिसरचा स्टाफ यांपर्यंत पोचली. संध्याकाळपर्यंत ह्या हालचाली ॲडज्युटंटांनी सर्व दिशांतील सैन्याच्या प्रत्येक भागाला पोचवल्या. एकोणीस तारखेला रात्री दोस्त राष्ट्रांच्या ऐंशी हजार सैनिकांनी मुक्काम हालवला आणि आपापसात बोलत ती सहा मैल लांबीची माणसांची रांग अंतर कापू लागली.

त्या दिवशी प्रिन्स आन्द्रे ड्यूटीवर होता. तो कमांडर इन्-चीफच्या अगदी हाताशी होता. संध्याकाळी सहा वाजता कुटूझॉफने दोन्ही सम्राटांच्या मुख्य ठाण्यास भेट दिली. झार-बरोबर थोडेसे बोलणे झाल्यावर तो ओबरहॉफ मार्शल काउंट टॉल्स्टॉय याला भेटायला निघाला.

ह्या मधल्या अवधीचा प्रिन्स आन्द्रेने फायदा घेतला. होऊ घातलेल्या लढाईबद्दल अधिक तपशीलवार माहिती डॉल्गोरुकॉव्हकडून मिळविण्याचा बेत त्याने केला. कुटूझॉफ कशाने तरी अस्वस्थ व नाराज झाला होता. मुख्य ठाण्यावरील अधिकारी त्याच्यावर नाराज होते, मुख्य

ठाण्यावरील सम्राट अलेक्झांडरचे सगळे लोक आपल्यालाच तेवढे कळते आहे आणि दुसऱ्यांना त्यात गम्य नाही अशा तऱ्हेने कुटूझॉफशी वागले होते, हे सगळे प्रिन्स आन्द्रेला जाणवले होते, म्हणूनच त्याला डॉल्गोरुकॉव्हशी थोडा वेळ बोलण्याची गरज भासली होती.

डॉल्गोरुकॉव्ह बिलिबिनबरोबर चहापान करीत होता. त्याने म्हटले, 'आपण उद्या उत्सव साजरा करणार आहोत. तुझा म्हातारा दोस्त काय म्हणतो ? अजून चिडलेलाच आहे काय ?'

'तो चिडलेला आहे असं मला वाटत नाही. आपली बाजू ऐकून घ्यावी असं त्याला वाटत असावं.'

'कालच्या बैठकीत त्याची बाजू ऐकली की, तो शहाण्यासारखा बोलेल तेव्हाच त्याची बाजू ऐकतील लोक. बोनापार्टला व्यापक लढाईची सर्वांत अधिक भीती वाटते आहे. अशा वेळी दिरंगाई करण्याची किंवा वाट पाहण्याची गोष्टच काढू नका.'

'मला म्हाताऱ्या कुटूझॉफबद्दल गाढ आदर आहे. आम्ही वाट पाहत राहिलो तर आता निश्चितपणे तावडीत सापडलेला बोनापार्ट पळून जाईल. नाहीतर आम्हाला फसवील. मग आम्ही सगळे मूर्ख ठरू. शत्रू सापडल्यावर हल्ला करील अशा स्थितीत आपण कधीही असता कामा नये, उलट आपण स्वतःच हल्ला करायला पाहिजे ही सुव्हॉरॉफची पद्धत आपण विसरता कामा नये. वेळकाढू म्हाताऱ्याच्या अनुभवापेक्षा तरुणांचं उत्साही मार्गदर्शन अधिक सुरक्षित असतं हे विसरू नकोस.'

'तुम्ही त्याच्यावर हल्ला कसा करणार आहात ? मी आज आउटपोस्टवरून आलो. त्याचं मुख्य सैन्य कुठं एकवटलं आहे याची कुणालाच कल्पना नाही.' प्रिन्स आन्द्रे म्हणाला.

डॉल्गोरुकॉव्ह तावडतोब उठला. आणि टेबलावरील नकाशा उलगडीत म्हणाला, 'ती काही तेवढी महत्त्वाची बाब नाही. आकस्मिकपणे उद्‌भवणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर उपाय आहे. समज, त्याचं सैन्य ब्रुनला गोळा झालेले असते.'...

बिरॉथरने सैन्याच्या बाजूवर हल्ला करण्याची योजना कशी आखली त्याची स्थूल कल्पना डॉल्गोरुकॉव्हने भरभर दिली.

प्रिन्स आन्द्रे त्या योजनेवर आक्षेप घेऊ लागला आणि आपली स्वतःची योजना मांडू लागला.

पण डॉल्गोरुकॉव्ह मख्खपणे प्रिन्स आन्द्रेच्या तोंडाकडे पाहू लागला.

'आज रात्री युद्धाविषयी चर्चा करण्यासाठी बैठक भरणार आहे. तेव्हा तू हे सारं समजावून दे.' डॉल्गोरुकॉव्ह म्हणाला.

'तेच करायचे ठरवले आहे.' नकाशापासून दूर होत तो म्हणाला.

बिलिबिन उपरोधाने म्हणाला, 'दोस्तांनो, कसली काळजी करताहात ? उद्या विजय होवो नाही तर पराभव होवो, रशियन सैन्याच्या कीर्तीला धोका नाही. कुटूझॉफ सोडल्यास दुसऱ्या कोणाही रशियन माणसाच्या ताब्यात एकही कॉलम नाही. हेर विम्पफेन, कौंट लँगेरन, प्रिन्स लिचटेन्स्टीयन, प्रिन्स होहेन्लोहे आणि कोणीतरी एक पोलिश माणूस, असे कमांडर आहेत.'

तशी डॉल्गोरुकॉव्ह म्हणाला, ' चुगलखोरा, बाता मारू नकोस. तू म्हणतोस ते खरं नाही, मिलॅरॅडविच आणि डॅातुरॉव्ह असे दोन रशियन कमांडर आहेत. काउंट अराकृचेव्ह पडला भित्रा. नाहीतर तो तिसरा कमांडर झाला असता. '

' मिहाइल मिलॅरॅडविच लढाईला बाहेर पडला तर. ' प्रिन्स आन्द्रे त्यांना सुदैव आणि सुयश चिंतून त्यांच्याशी हस्तांदोलन करून बाहेर पडला.

प्रिन्स आन्द्रे निवासस्थानावर आला. जवळ स्तब्धपणे बसलेल्या कुटूझॉफला ' या होणाऱ्या लढाईबद्दल तुम्हाला काय वाटतं ? ' असे विचारल्याशिवाय त्याला राहावले नाही.

कुटूझॉफने आपल्या अॅडज्युटंटकडे रोखून पाहिले आणि काही वेळाने उत्तर दिले. ' मला वाटतं आपला पराभव होईल. मी काउंट टॉल्स्टॉयला हेच सांगितलं. माझा हा निरोप झारला कळव म्हणून त्याला सांगितलं, तेव्हा त्यानं मला काय उत्तर दिलं असेल ? तो म्हणाला, ' जनरल महाशय, मी स्वैंपाकपाण्याची व्यवस्था बघतो, तुम्ही युद्धाची व्यवस्था बघा.'

कुटूझॉफच्या निवासस्थानी युद्धाबाबत चर्चा करण्यासाठी बैठक भरायची होती. रात्री दहा वाजता आपली योजना घेऊन विरॉथर आला. कमांडर-इन्-चीफच्या निवासस्थानी प्रत्येक कॉलमच्या कमांडरला बोलावण्यात आले होते. प्रिन्स बॅग्रेशनने येण्याचे नाकारले, बाकी सगळे ठरल्या वेळी हजर झाले.

होऊ घातलेल्या लढाईची संपूर्ण जबाबदारी घेणारा मोठ्या तळमळीने आणि घाईने काम करू लागलेला विरॉथर आणि युद्धचर्चेच्या बैठकीचे अध्यक्षपद नाखुषीने स्वीकारणारा, डुलक्या घेणारा आणि चिडलेला कुटूझॉफ या दोघांत भलताच विरोध होता. युद्धासाठी आता पावले टाकण्यात आली होती. ही हालचाल थांबवता येणार नव्हती. विरॉथरला आपण ह्या हालचालीचे नेतृत्व करतो आहोत असे वाटत होते.

त्या रात्री विरॉथरने दोन वेळा जातीने शत्रूच्या सैन्याची तपासणी केली होती; रशियन आणि ऑस्ट्रियन या दोन्ही सम्राटांकडे जाऊन त्याने रिपोर्ट दिला.

तो आपल्या कामात इतका व्यग्र होता की, कमांडर-इन-चीफशी आदरपूर्वक वागणे विसरून गेला. त्याच्या कपड्यांवर चिखल उडालेला होता. तो केविलवाणा, थकलेला आणि भांबावलेला दिसत होता, तसाच आत्मविश्वासू व उद्धटही वाटत होता. तो कुटूझॉफला बोलू देत नव्हता. आपणच भरभर आणि अस्पष्ट बोलत होता. कुटूझॉफशी बोलताना त्याच्याकडे पाहतही नव्हता आणि कुटूझॉफने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरेही देत नव्हता.

कुटूझॉफने आपल्या युनिफॉर्मची बटणे लावली नव्हती. त्याचा जाडजूड गळा बंधनमुक्त झाल्यासारखा कॉलरबाहेर आला होता. बैठ्या खुर्चीच्या हातांवर आपले दोन्ही हात प्रमाणबद्ध ठेवून तो जवळजवळ झोपी गेला होता. विरॉथरच्या आवाजाने त्याने मोठ्या कष्टाने

डोळे उघडले. त्यात एकाकीपणाची भावना दिसत होती.

'खरं आहे. खरं आहे. आधीच उशीर झाला आहे.' त्याने संमती दाखवण्यासाठी मान तुकवली. बघता बघता त्याचे डोके खाली झुकले आणि त्याचे डोळे पुनश्च मिटले.

विरॉथरने कुटुझॉफकडे पाहिले. तो झोपी गेला आहे याची खात्री करून घेऊन त्याने आपली टाचणे उचलली. येऊ घातलेल्या लढाईमधे सैन्याची मांडणी कशी असावी याबद्दलची आपली योजना तो मोठ्या आणि एकसुरी आवाजात वाचू लागला. ती सगळी योजना गुंतागुंतीची आणि किचकट होती.

सैन्याच्या हालचालीसंबंधीची ही किचकट गुंतागुंतीची माहिती जनरल नाखुषीने ऐकून घेत होते असे वाटत होते. सुंदर केसांचा उंचापुरा बक्सेव्हडन भिंतीला रेलून उभा होता. त्याने पेटत्या मेणबत्तीवर आपले डोळे खिळवले होते. त्याचे मुळीच लक्ष नव्हते; आपले लक्ष आहे असे लोकांना वाटावे असेही त्याला वाटत नसावे.

विरॉथरच्या अगदी समोर लालबुंद मिलॅरॅडॉविच आपले चमकदार विस्फारलेले डोळे विरॉथरवर लावून होता. त्याच्या मिश्या आणि खांदे वरच्या दिशेने वळल्यासारखे दिसत होते. तो मोठ्या निग्रहाने स्तब्ध राहून विरॉथरकडे रोखून पाहात होता. तो ऑस्ट्रियन स्टाफ कमांडर बोलायचा थांबे तेव्हाच फक्त त्याची नजर त्याच्यावरून दूर होई. मग तो इतर जनरलांकडे अर्थपूर्ण नजरेने पाहू लागे. परंतु त्याच्या अर्थपूर्ण नजरेवरून त्याला सैन्याच्या हालचाली पसंत होत्या का नापसंत होत्या, तो त्याच्याशी सहमत होता का नव्हता हे ओळखणे कठीण होते. विरॉथरच्याजवळ काउंट लँगेरन बसला होता आणि विरॉथरचे वाचन चालू असताना त्याच्या चेहऱ्यावरचे स्मित नाहीसे झाले नव्हते. वर चित्र असलेली सोन्याची डबी हातात फिरवीत असताना तो आपल्या नाजूक बोटांकडे पाहत होता.

मोठ्या आदराने पण आदबशीरपणे कानाला हात लावून आपण लक्षपूर्वक ऐकत आहोत अशा थाटात विरॉथरच्या अगदी जवळ बसला होता प्रोबिशेव्स्की. लहानखुरा डॉतुरॉव्ह विरॉथरच्या अगदी समोर अभ्यासू आणि विनम्र मुद्रेने बसला होता. नकाशावर झुकून तो मोठ्या मनापासून सैन्याची मांडणी आणि अपरिचित प्रदेश यांचा अभ्यास करीत होता. त्याने ध्यानात न आलेली गावांची नावे विरॉथरला पुष्कळ वेळा पुन्हा उच्चारायला सांगितली आणि विरॉथरने आनंदाने ती पुन्हा वाचली. डॉतुरॉव्हने ती टिपून घेतली.

विरॉथरचे वाचन जवळजवळ एक तासाने संपले, तशी लँगेरन डबी फिरवणे थांबवून विरॉथर किंवा दुसऱ्या कुणाकडेही न पाहता बोलू लागला. शत्रूच्या हालचाली सुरू नसण्याची शक्यता असताही त्याच्या रचना गृहीत धरून आपल्या हालचाली ठरवणे फार कठीण आहे हे त्याने दाखवून दिले. लँगेरनच्या आक्षेपांना भरभक्कम आधार होता. पण त्याचा मुख्य उद्देश वेगळाच होता. विरॉथरने मोठ्या गर्विष्ठपणाने आपल्या योजना शाळकरी पोरांना वाचून दाखवावे तशा वाचून दाखवल्या होत्या. लँगेरनला दाखवून द्यायचे होते की, त्याच्यासमोर मूर्ख माणसे बसलेली नसून त्याला लष्करी बाबतीत काही धडे देतील अशी माणसे आहेत.

विरॉथरचा एकसुरी आवाज थांबला. पाणचक्कीच्या चाकाची घरघर थांबल्यावर झोपेतून उठणाऱ्या मालकाप्रमाणे कुटूझॉफने डोळे उघडले. लँगेरनचे बोलणे ऐकून त्याने 'अजून काय मूर्खपणा चालवला आहे!' असे जणू स्वतःशी म्हणत पुन्हा त्वरित डोळे मिटले, त्याचे डोके आणखी खाली झुकले.

विरॉथरने सर्व आक्षेपांना उत्तर द्यायची अगोदरच तयारी केली होती. लोक काय म्हणतील याची पर्वा न करता तो तुच्छतापूर्वक स्मित करीत आत्मविश्वासाने आपल्या योजनेचे समर्थन करू लागला. आक्षेप खोडून काढू लागला.

'तुम्हाला नेपोलियन समर्थ नाही असे वाटते काय ?' लँगेरनने विचारले.

'त्याच्याकडे चाळीस हजार तरी सैनिक असतील की काय याची मला शंका आहे.'

'मग अशा परिस्थितीत तो आम्ही चढाई करतो याची वाट पाहत राहिला असेल तर त्याचा नाशच होईल.' तल्लख लँगेरन उपरोधिक स्मित करीत व मिलॉरॅडॉविचकडे पाठिंब्या-साठी पाहत म्हणाला. त्या क्षणी मिलॉरॅडॉविचच्या मनात कोणते विचार चालले होते कुणास ठाऊक, पण त्याच्या मनात दोन जनरलांच्या भांडणाबद्दल काहीही विचार आला नव्हता.

विरॉथर म्हणाला, 'शत्रूच्या शेकोट्या विझलेल्या आहेत, त्यांच्या तळावरून सतत आवाज ऐकू येत आहेत. याचा अर्थ काय ? कदाचित ते माघार घेत असतील. ( दुर्दैवाने तसे होऊ नये. ) अगर ते आपल्या हालचालींची ठिकाणे बदलत असतील, उपरोधिक स्मित करीत तो पुढे म्हणाला,

'त्यांनी तुरास येथे जरी तळ ठोकला तरी आमचे खूप श्रम वाचतील, आमच्या सैन्याची रचना जराही बदलण्याची गरज पडणार नाही.'

'ते कसं शक्य आहे ?' प्रिन्स आन्द्रे म्हणाला. मघापासून तो आपल्या शंका विचारण्याची संधी शोधत होता. पण कुटूझॉफ उठला, खाकरला आणि जनरलांवर दृष्टी फिरवीत तो म्हणाला, 'दोस्तहो, कोणत्याही परिस्थितीत उद्यांची... खरे तर आजची...(आता रात्रीचा एक वाजला आहे ) आजची सैन्याची मांडणी बदलता येणे शक्य नाही. तुम्हाला सांगायला नको, तुम्ही आपले कर्तव्य पार पाडाल अशी आशा आहे. लढाईपूर्वी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ...( तो थांबून म्हणाला ) रात्रभर गाढ झोप.'

त्याने खुर्चीतून उठल्यासारखे केले. त्याला झुकून प्रणाम करीत जनरल बाहेर निघाले. मध्यरात्र उलटली होती. प्रिन्स आन्द्रे बाहेर पडला.

प्रिन्स आन्द्रेला युद्धमंडळात आपली मते व्यक्त करायची होती पण त्याला संधी मिळाली नाही. त्यानंतर मात्र त्याला अनिश्चिततेने आणि अस्वस्थतेने घेरले. कोणाचे बरोबर होते ? डॉल्गोरूकॉव्हचे आणि विरॉथरचे बरोबर होते का ? की हल्ल्याच्या योजनेला विरोध करणारे कुटूझॉफ आणि लँगेरन बरोबर होते ? त्याला काही कळेना. कुटूझॉफने आपले मत सरळ झारला का सांगितले नाही ? न सांगणे इतके अशक्य का वाटले असेल ? ते निराळ्या तऱ्हेने सांगता आले नसते का ? व्यक्तिगत अगर सरकारी कारणांसाठी हजारो जीव धोक्यात

घालायचे काय ? माझा जीवसुद्धा धोक्यात येईल ? कदाचित मी उद्याच मारला जाईन.' प्रिन्स आन्द्रे विचारमग्न झाला.

मरणाच्या विचाराशी त्याच्या असंख्य स्मृती–गतकाळातल्या आणि अत्यंत प्रिय अशा स्मृती–जागृत झाल्या. त्याला वडिलांची आणि पत्नीची शेवटची भेट आठवली. त्याला तिच्यावरील आपले प्रारंभीचे प्रेम आठवले. तिला दिवस गेले आहेत हेही आठवले. त्याला स्वतःबद्दल आणि तिच्याबद्दल वाईट वाटले. विकल हळुवार मनःस्थितीत तो आपल्या निवासातून बाहेर पडला आणि समोरच येरझाऱ्या घालू लागला. धुक्यातून पसरलेला सौम्य चंद्रप्रकाश गूढ अद्‌भुत वाटत होता. त्याचे विचार सुरू झाले. 'उद्या–होय उद्याच या साऱ्याला मी मुकलेला असेन. ह्या सगळ्या स्मृती नाहीशा होतील... त्यांना माझ्या दृष्टीने काही अर्थ उरलेला नसेल. कदाचित उद्याच...'

त्याच रात्री रोस्तॉफला बॅग्रेशनच्या पथकापुढे दूरवर टेहळणी करण्यासाठी एक प्लॅटून देऊन पाठविण्यात आले होते. त्याचे हुझार जोडीजोडीने टेहळणी करण्यासाठी निघाले. आउट-पोस्टवर असताना त्याला झोप अनावर झाली होती. तो मोठ्या कष्टाने ती आवरीत होता. त्याला मागे पाहिल्यावर विस्तृत प्रदेशात पसरलेल्या आमच्या सैन्याच्या शेकोट्या अंधुक दिसत होत्या. त्याच्यासमोर काळोख आणि धुके पसरलेले होते.

त्याने दूरवर पाहण्याचा प्रयत्न केला. पण त्या धुक्यात काही दिसेना. एका क्षणी काहीतरी धूसर दिसू लागे तर दुसऱ्याच क्षणी काहीतरी काळे दिसे. कधी शेकोटीसारखा मंद प्रकाश दिसे तेव्हा त्या ठिकाणी शत्रुसैन्य असावे असे त्याला वाटे, मग त्याला आपल्या डोळ्यांना तो भास झाला असे वाटू लागे. मधूनमधून त्याचे डोळे मिटत आणि त्याला निरनिराळे भास होऊ लागत. कधी सम्राट अलेक्झांडर दिसे, कधी डेनिसॉव्ह दिसे ..मग मॉस्को शहरातील आठवणी जाग्या होत... पुन्हा त्याचे डोळे उघडत आणि मग त्याला आपल्या घोड्याचे डोके आणि कान दिसत. हुझारांच्या जवळून चाललेला असला तर त्यांच्या काळ्या आकृती दिसू लागत. पण दूरवर मात्र तेच धुके आणि काळोख. त्याचे विचारचक्रसु रूच होते.

'कुठे आहे मी ? टेहळणी पथकात असेन. होय बरोबर, आमच्या स्क्वॉड्रनला राखीव दलात टाकल्याने मी किती त्रस्त झालो आहे...मला आघाडीवर पाठवून द्या. अशी मी आता विनंती करणार आहे. सम्राटांना पाहायची तीच एक संधी आहे. मी लवकरच ह्या ड्यूटीवरून मोकळा होईन. एक राउंड तर व्हायचे आहे. मागे फिरल्यावर मी जनरलांना विनंती करीन. मी सम्राटांना पाहिले हे नताशाला सांगितले तर तिला किती आश्चर्य वाटेल.'

'महाराज, घोडा उजव्या बाजूने घ्या.' घोडदळातील कोण्या सैनिकाचा आवाज आला. रोस्तॉफ झोपेत असल्याने त्याचा घोडा त्या सैनिकाच्या घोड्याजवळून जात होता तेव्हा तो

सैनिक बोलला. रोस्तॉफने आपले घोड्याच्या आयाळीवर पडलेले डोके उचलले आणि घोड्याचा लगाम खेचला. तरुण रोस्तॉफला झोप काही आवरत नव्हती. ' काय बरे म्हणत होतो ? मी विसरता कामा नये.. नताशा, हा आठवले...नताशा...डेनिसॉव्ह तसा चांगला दोस्त.. हा सगळा खुळेपणा काय चालवलाय मी ? महत्त्वाची बाब म्हणजे सम्राटांचा मुक्काम आज इथंच आहे.' पुन्हा डोके घोड्याच्या मानेवर कोसळले. एकाएकी त्याला वाटले आपल्या-वर गोळ्यांचा मारा होतो आहे. ' बघता काय ? त्यांना कापून काढा. ' रोस्तॉफ जागा झाला तेव्हा बडबडू लागला होता. जेव्हा रोस्तॉफने डोळे उघडले तेव्हा त्याला जिथे शत्रू होता त्या आघाडीवरून हजारो माणसांच्या ओरडण्याचे आवाज ऐकू आले. त्या आरडाओरडीसरशी त्याच्या आणि त्याच्या जवळच्या सैनिकाच्या घोड्याने कान टवकारले. जिथून आरोळ्या येत होत्या तिथे प्रकाश दिसला आणि नाहीसा झाला. मग टेकडीवर पसरलेल्या सर्व फ्रेंच सैन्या-मध्ये ठिकठिकाणी जाळ दिसू लागले. आणखी जोराच्या आरोळ्या ऐकू येऊ लागल्या.

रोस्तॉफने जवळच्या सैनिकाला विचारले, ' ते सगळे शत्रूच्या सैन्यातच चालले आहे ना ? तुला काय वाटतं ? '

त्या सैनिकाने उत्तर दिले नाही.

' तुला ऐकू येत नाहीत का आरोळ्या, आरडाओरड ? ' उत्तराची थोडा वेळ वाट पाहून रोस्तॉफने विचारले.

' महाराज, ते सांगणे कठीण आहे. ' त्याने उत्तर दिले.

' दिशा लक्षात घेतली तर ते शत्रूचे सैनिक असले पाहिजेत ' रोस्तॉफ म्हणाला.

' असतीलही...कदाचित नसतीलही. अंधारातून काय दिसणार ? सैनिक म्हणाला. मग अस्वस्थ झालेल्या घोड्याला त्याने दटावले. रोस्तॉफचा घोडादेखील अस्वस्थ झाला होता. आरोळ्या ऐकून आणि जाळ बघून तो जमिनीवरचे हिम खुरांनी उकरू लागला होता. आरोळ्या वाढत चालल्या. मग हजारो सैनिकांनीच करावा तसा कोलाहल सुरू झाला.

बहुधा फ्रेंच छावण्यांच्या रांगांतील तो जाळ दूरवर पसरत चालला. रोस्तॉफला आता स्पष्टपणे ऐकू येऊ लागले...' सम्राट अमर रहे ! '

' जवळ आले आहेत ते. ओढ्याच्या पलीकडेच असणार ' तो जवळच्या सैनिकाला म्हणाला.

उत्तर न देता सैनिकाने उसासा टाकला. मग तो रागाने खाकरला. घोडदळाच्या सैनिकांच्या बाजूने घोड्यांच्या टापा ऐकू आल्या आणि मग रात्रीच्या धुक्यातून हत्तीसारखी प्रचंड अशी घोडदळ सैनिकांच्या सार्जंटची मूर्ती अवतीर्ण झाली.

' महाराज, जनरल येताहेत. ' रोस्तॉफजवळ घोडा नेत सार्जंट म्हणाला. तरीही जाळांच्या आणि आरोळ्यांच्या दिशेने पाहात रोस्तॉफ सार्जंटबरोबर आघाडीवर दौडत येणाऱ्या घोडेस्वारांना भेटण्यास निघाला. येणाऱ्या घोडेस्वारांपैकी एकाचा घोडा सफेत होता.

शत्रूच्या सैन्यात सुरू झालेल्या जाळांचे आणि आरोळ्यांचे निरीक्षण करण्यासाठी प्रिन्स

डॉल्गोरुकॉव्ह आणि त्याचा ॲडज्युटंट यांना घेऊन प्रिन्स बॅग्रेशन घोड्यावरून दौडत आला. रोस्तॉफ बॅग्रेशनजवळ गेला आणि त्याने आपण काय पाहिले आणि ऐकले त्याचा रिपोर्ट त्याला सादर केला आणि दोघे जनरल काय बोलतात ते तो आणि ॲडज्युटंट ऐकू लागले.

प्रिन्स डॉल्गोरुकॉव्ह बॅग्रेशनला म्हणत होता, ' मी निश्चित सांगतो. हा त्यांचा निव्वळ डावपेच आहे. त्यांनी माघार घेताना आम्हाला फसवण्यासाठी पिछाडीवरील संरक्षकदलाच्या सैनिकांना जाळ करायला आणि आरोळ्या द्यायला सांगितलेलं असणार. '

फ्रेंच माघार घेत आहेत, त्यांनी आपणास फसवण्यासाठी जाळ केलेला आहे असे डॉल्गोरुकॉव्ह आग्रहाने सांगत राहिला.

' प्रिन्स, त्या सगळ्यांनी माघार घेतलेली नाही हे स्पष्ट आहे. उद्या काय ते निश्चित कळेल.' बॅग्रेशन म्हणाला.

' महाराज, काल संध्याकाळी टेहळणी पथक टेकडीवर जेथे होतं तेथंच आहे. ' रोस्तॉफ आपल्या कॅपला हात लावून म्हणाला.

बॅग्रेशनने मान डोलावून रोस्तॉफचे आभार मानले.

' महाराज, माझ्यावर एक मेहरबानी कराल का ? ' रोस्तॉफने विचारले.

' बोल. '

' उद्या आमचं स्क्वॉड्रन राखीव म्हणून ठेवण्यात आलं आहे. मला पहिल्या स्क्वॉड्रनमधे घ्या अशी विनंती आहे. '

' तुझं नाव ? '

' काउंट रोस्तॉफ '

' ठीक. तू माझ्याबरोबर राहा मी हुकूम देतो. '

रोस्तॉफला वाटलं, उद्या कदाचित ते मला सम्राटाकडे निरोप घेऊन जायला सांगतील.

शत्रूच्या सैन्याच्या उघड्या छावण्या पडल्या होत्या. त्या सैनिकांना नेपोलिअनचे आज्ञापत्र वाचून दाखवण्यात आले होते. तिथे आता जाळ दिसत होते आणि सैनिक आरोळ्या देत होते– ' सम्राटांचा विजय असो ! '

•

सकाळचे पाच वाजले होते तरी गुडुप अंधार होता. मध्यभागीचे राखीव सैन्य आणि बॅग्रेशनचे उजव्या फळीचे सैन्य अजून विश्रांती घेत होते. मात्र डाव्या फळीतील पायदळ, घोडदळ आणि तोफखाना यांच्या सैनिकांच्या हालचाली केव्हाच सुरू झाल्या होत्या. विरॉथरच्या आखणीप्रमाणे हे सैनिक उंच प्रदेशावरून खाली उतरून फ्रेंच सैन्याच्या उजव्या फळीवर हल्ला करून त्याला बोहेमिअन पर्वतापर्यंत पिटाळणार होते.

आता ते टाकाऊ वस्तू शेकोट्यात फेकत होते. त्यातून उठणारा धूर त्यांच्या डोळ्यांना

झोंबत होता. थंडी पडली होती; अजून अंधार होता. अधिकारी घाईघाईने ब्रेकफास्ट घेत होते. बरोबर नेता येणार नव्हत्या अशा राहुट्यांचे भाग, खुर्च्या, टेबले, चाके, टब इ. सगळ्या टाकाऊ वस्तू त्यांनी आगीत टाकल्या होत्या. आगीसमोर शेक घेत आणि तालात पावले वाजवीत सैनिक बिस्किटे खात होते.

ऑस्ट्रिअन ऑफिसर रशियन सैन्यात सारखी ये-जा करीत होते. आता कूच करताना तेच अग्रभागी राहणार होते, मार्गदर्शन करणार होते. कमांडर ऑफिसरच्या निवासस्थानाजवळ ऑस्ट्रियन ऑफिसर आला आणि सर्वांची धावपळ सुरू झाली. ते शेकोटी सोडून बुटामध्ये पाईप सारून मालवाहू वाहनात पिशव्या फेकून बंदुका हातात घेऊन आपापल्या रांगांत शिस्तीत उभे राहिले. ऑफिसर युनिफॉर्म चढवून, बटणे लावून, पट्ट्याला तलवार आणि पिशवी अडकवून सज्ज होत रांगेसमोर ओरडत फिरू लागले.

पुरवठा विभागाची माणसे आणि ऑफिसरांचे नोकर घोड्यांवर खोगीर चढवून त्यांना गाड्यांना जुंपून, गाड्यांमधे सामान व्यवस्थित भरू लागले. ॲडज्युटंट तसेच रेजिमेंट आणि बटालिअन यांचे ऑफिसर घोड्यावर स्वार होऊन क्रूसची खूण जुळवून सामानवाहू गाड्यां-बरोबर राहिलेल्या माणसांना शेवटच्या सूचना देऊ लागले.

मग एकसुरी आवाजात पावले पडू लागली, सैन्य कूच करू लागले. कुठे जायचे ते सैनिकांना माहीत नव्हते. आजूबाजूच्या माणसांमुळे, धुरामुळे आणि दाट होऊ लागलेल्या धुक्यामुळे त्यांना ते सोडून जात असलेला प्रदेश दिसत नव्हता किंवा ज्या ठिकाणाकडे ते कूच करीत होते ते ठिकाणही दिसत नव्हते.

उजाडत होते तरीही धुके इतके दाट होते की, त्यांना चार पावलांसमोरचे दिसत नव्हते. झुडपे प्रचंड वृक्षांसारखी भासत. सपाट जमिनीच्या ठिकाणी दऱ्याखोऱ्या आहेतसे वाटू लागे. दहा पावलांवर असलेल्या, आता न दिसणाऱ्या शत्रूवर कुठल्याही बाजूने केव्हाही आदळण्याचा संभव होता. कितीतरी काळ सैन्य धुक्यामधून टेकड्या चढत उतरत होते, बागांच्या व कुंपणांच्या जवळून, नव्या अनोख्या प्रदेशातून जात होते, पण शत्रू कुठेही आढळत नव्हता. उलट आपल्या पुढे, मागे, बाजूंना आपलेच सैन्य असून ते त्याच दिशेला कूच करीत आहे याची त्या सैन्याला जाणीव झाली. जिथे कुठे अज्ञात ठिकाणाकडे आपण कूच करीत आहोत तिथे आपले अनेक सैनिक येताहेत हे कळून प्रत्येक सैनिकाला मनस्वी आनंद झाला.

कमांडिंग ऑफिसरांपैकी एकहीजण सैनिकांजवळ जात नव्हता अगर त्यांच्याशी बोलत नव्हता. तरीही प्रत्येक सैनिक लढाईसाठी–विशेषकरून चढाईसाठी ज्या उत्साहाने, जोमाने कूच करीत असतो त्याच उत्साहाने, जोमाने ते कूच करीत होते.

दाट धुक्यातून सुमारे अर्धा एक तास मजल मारल्यावर बऱ्याचशा तुकड्यांना थांबावे लागले. ह्या अव्यवस्थेविषयी सैनिकांमधे कडवट भावना आणि गैरसमज पसरू लागला.

'ते आता कशासाठी थांबले आहेत ! वाट अडवली गेली आहे का ?'

'आपल्याला कूच करायला सांगितले तसे कूच करीत आलो आणि येडपटासारखे या

मैदानात थांबलो.'

'पुढचे लोक जरा हातपाय का हालवीत नाहीत?'

'हे बिनडोक जर्मन. त्यांना स्वतःच्या प्रदेशही ठाऊक नाही.'

'तुमची डिव्हिजन कोणती?' एका अॅडज्युटंटने विचारले.

'अठरावी डिव्हिजन.'

'मग तुम्ही इथं कसे? तुम्ही यापूर्वी केव्हाच आघाडीवर पोचायला हवं होतं. आज रात्रीपर्यंत तुम्ही काही पोचत नाही.' असे म्हणून अॅडज्युटंट तेथून गेला.

मग एका जनरलचा घोडा दुडक्या चालीने आला. जनरल कुठल्यातरी परक्या भाषेत काहीतरी रागारागाने ओरडला.

घोडदळापलीकडे ऑस्ट्रिअन ऑफिसर आणि रशियन जनरल यांच्यात भांडण सुरू झाले. रशियन जनरलाने 'घोडदळाला थांबण्याचा हुकूम द्या,' अशी विनंती केली. तेव्हा ऑस्ट्रिअन ऑफिसर म्हणाला, 'यासाठी मी जबाबदार नाही. माझे वरिष्ठ अधिकारी जबाबदार आहेत.' तिथे थांबलेले सैनिक अधिकाधिक थकत होते आणि नाउमेद होत होते. एक तासाच्या विलंबानंतर शेवटी एकदाचे सैन्य हालले आणि टेकडी उतरू लागले. टेकडीवरील धुके विरळ होते पण सैन्य ज्या सपाट प्रदेशाकडे उतरू लागले होते त्यावरील धुके मात्र दाट होते. समोरील धुक्यातून त्यांना एक फैर ऐकू आली. मग दुसरी एक फैर ऐकू आली. सुरुवातीला ह्या फैरी निश्चित ठिकाणी अगर निश्चित कालांतराने झडत नव्हत्या. पण काही वेळाने मात्र एकसारख्या नियमितपणाने झडू लागल्या. आता छोटीशी चकमक सुरू झाली.

ओढ्याजवळ शत्रूशी गाठ पडेल याची सैनिकांना कल्पना नव्हती. धुक्यामधे त्यांची शत्रूशी अनपेक्षितपणे गाठ पडली होती. कमांडिंग ऑफिसरकडून त्यांनी उत्तेजनाचा एक शब्दही ऐकला नव्हता. आपल्याला फार उशीर झाला आहे असे वाटून रशियन सैनिक हळूहळू शत्रूवर गोळीबार करू लागले. त्यांचे ऑफिसर आणि अॅडज्युटंट अपरिचित प्रदेशातील धुक्यातून फिरत होते. त्यांना आपली पथके सापडत नव्हती. त्यामुळे त्यांच्याकडून सैनिकांना योग्य वेळी हुकूम मिळाले नाहीत.

अशा प्रकारे ऑस्टरलिट्स येथील लढाईस प्रारंभ झाला. सखल जमिनीवर गेलेल्या पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या कॉलमने लढाईला प्रारंभ झाला. ज्या चौथ्या कॉलमबरोबर कुटूझॉफ होता ती चौथी कॉलम अद्याप प्रॅटझेनच्या पठारावर होती.

नऊ वाजले तरीही खाली मैदानावरील धुक्याचा समुद्र तसाच पसरलेला होता. खेड्याच्या उंच प्रदेशावर नेपोलिअन आपल्या मार्शलांसमवेत होता. त्या ठिकाणचे धुके पार निवळलेले होते. त्याच्या डोक्यावर स्वच्छ उजळ निळे आकाश होते.

नेपोलिअन आपल्या मार्शलांपुढे काही अंतरावर आपल्या अरब जातीच्या करड्या लहान घोड्यावर होता. धुक्याच्या सागरातून डोकावणाऱ्या टेकड्यांकडे आणि त्यांवरून दूरवर फिरणाऱ्या रशियन सैन्याकडे नेपोलिअन काही न बोलता उत्सुकतेने पाहात होता. खोऱ्यात

चालू असलेल्या गोळीबारांचे आवाज लक्षपूर्वक ऐकत होता. त्याच्या कृश चेहऱ्यावरील एकही स्नायू हालत नव्हता. त्याचे चमकदार डोळे एकाच जागेवर खिळलेले होते. त्याचे आडाखे खरे ठरत होते. बरेचसे रशियन सैनिक दरीत उतरून डबक्यांकडे आणि तळ्यांकडे जात होते. प्रॅटझेनचा उंच प्रदेश नेपोलिअनच्या मते महत्त्वाचे ठिकाण होते. ते त्याला काबीज करायचे होते. बाकीचे रशियन सैनिक तो प्रॅटझेनचा उंच प्रदेश सोडून जात होते. प्रॅटझेन खेड्याजवळील दोन टेकड्यांमधील सखल प्रदेशात धुके पसरले होते. त्यातून एकाच दिशेने रशियन सैनिक दरीकडे चाललेले नेपोलिअनला दिसत होते. त्या सैनिकांच्या संगिनी चमकत होत्या. एकेक सैनिक धुक्यात दिसेनासा होत होता.

रात्रभर गोळा केलेली माहिती, टेहळणी भागातून ऐकू आलेले चाकांचे आणि सैनिकांच्या पावलांचे आवाज, रशियन सैन्यात कूच करताना दिसलेली बेशिस्त आणि अव्यवस्था या साऱ्या गोष्टींवरून नेपोलिअनला आपण आघाडीपासून फार दूर आहोत अशी दोस्त राष्ट्रांची कल्पना झाली आहे हे कळून चुकले, तरीही त्याने लढाईला प्रारंभ करायचे टाळले.

तो दिवस त्याच्या दृष्टीने विजयाचा होता. त्याच दिवशी वर्षापूर्वी त्याच्या राज्यारोहणाचा समारंभ साजरा झाला होता. आज पहाटे त्याने फार थोडी झोप घेतली होती. आज त्याचे मन तसेच शरीर ताजेतवाने आणि उत्साही होते. कोणतीही गोष्ट शक्य आहे. कोणत्याही गोष्टीत यश येईल असे त्याच्या प्रसन्न मनास वाटू लागले. धुक्यातून वर डोकावलेल्या टेकड्यांच्या उंच माथ्याकडे तो स्तब्धपणे पाहत राहिला. मागे असलेल्या मार्शलांनी त्याच्या एकाग्रतेत व्यत्यय आणला नाही.

सूर्य धुक्यातून पूर्णपणे बाहेर आला. आता तो मैदानावर आणि धुक्यावर प्रखर तेजाने तळपू लागला. लढाई सुरू करण्यासाठी नेपोलिअन जणू त्याचीच वाट पाहत होता.

त्याने आपल्या सुंदर गोऱ्या हातातील मोजा काढून घेतला. त्या मोज्याने मार्शलांना खूण करून लढाई सुरू करण्याचा हुकूम दिला.

आठ वाजता कुटूझॉफ मिलॉरॅडॉविचच्या चौथ्या कॉलमच्या अग्रभागी राहून प्रॅटझेनला निघाला. कुटूझॉफने अगदी पुढच्या रेजिमेंटमधील सैनिकांचे स्वागत केले. कूच करण्याचा हुकूम दिला. अशा प्रकारे आपण स्वतःच अग्रभागी राहणार असल्याचे दाखवले. कमांडर-इन्-चीफची अनेक खास माणसे होती त्यांत प्रिन्स आन्द्रेही होता.

त्या सकाळी कुटूझॉफ थकलेला आणि त्रासलेला दिसत होता. त्याच्यासमोरून जाणारे पायदळाचे सैनिक हुकमाशिवाय एकाएकी थांबले. समोर कशामुळे तरी त्यांचा मार्ग अडवला गेला होता.

सफेत युनिफॉर्म घातलेल्या आणि हॅटमधे हिरवी पिसे खोवलेल्या ऑस्ट्रियन ऑफिसरने

कुटूझॉफजवळ घोडा आणला आणि आपणास सम्राटांची चौथी कॉलम निघाली की काय याची चौकशी करायला पाठवल्याचे सांगितले.

कुटूझॉफ काही न बोलता वळला. सहजच त्याची दृष्टी जवळ असलेल्या प्रिन्स आन्द्रेवर गेली. चाललेल्या घटनांत आपल्या ॲडज्युटंटचा दोष नाही याची त्याला जाणीव झाली की काय नकळे. कुटूझॉफच्या क्रोधकठोर मुद्रेवर हळुवारपणा आला. तरीही ऑस्ट्रियन ऑफिसरला काही उत्तर न देता तो बोलकॉन्स्कीशी बोलू लागला.

'गड्या, तिसरी डिव्हिजन खेड्यातून गेली का जाऊन बघ. ह्या डिव्हिजनला माझा हुकूम येईपर्यंत थांबायला सांग.'

प्रिन्स आन्द्रे जायला निघाला न निघाला तोच कुटूझॉफने त्याला थांबवले. 'आणि हेही विचार. बरकंदाजांना आपापल्या जागा नेमून दिल्या काय? काय करताहेत नकळे!' तो आपल्याशी बडबडत राहिला पण त्याने ऑस्ट्रियन ऑफिसरला काही उत्तर दिले नाही.

त्याचा हुकूम सांगण्यासाठी प्रिन्स आन्द्रेने घोडा भरधाव सोडला. त्याने पुढे जाणाऱ्या सगळ्या बटालिअन मागे टाकून तिसऱ्या डिव्हिजनला रोखले. आमच्या कॉलमच्यापुढे बरकंदाजांचा विभाग गेला नाही याची खात्री करून घेतली. सर्वांच्या आधी बरकंदाजांची तुकडी पाठवून द्या असा कमांडर-इन्-चीफचा हुकूम मिळाल्यावर अगदी पुढच्या रेजिमेंटचा कमांडिंग ऑफिसर खूप विस्मित झाला. आपल्यापुढे इतर अनेक तुकड्या जात आहेत आणि शत्रू सहासात मैलांहून अधिक दूर आहे अशा पक्क्या समजुतीने ऑफिसर आरामात होता. खरे तर त्याच्या समोर पसरलेल्या धुक्याने झाकलेल्या टेकड्यांच्या विस्तीर्ण उतारावर काहीही नव्हते. प्रिन्स आन्द्रेने त्याला चूक सुधारण्याचा कमांडर इन्-चीफचा हुकूम दिला, आणि घोडा मागे वळवला. कुटूझॉफ अद्याप त्याच ठिकाणी होता. त्या वृद्धाचे थकलेले स्थूल शरीर खोगिरावर शिथिलपणे पडले होते. थकल्यामुळे डोळे मिटल्यामिटल्या त्याला जांभया येत होत्या. सैन्य अजून हलले नव्हते. अटेन्शनच्या पवित्र्यात उभे होते. 'ठीक, ठीक' कुटूझॉफ आन्द्रेला म्हणाला.

उजव्या फळीचे सर्व कॉलम केव्हाच खाली उतरले होते. हातात घड्याळ घेऊन उभा असलेला जनरल घाई करत होता. 'यापूर्वीच आपण निघायला हवं होतं. उशीर होतो आहे.' तो म्हणाला. तेव्हा जांभया देत कुटूझॉफ म्हणाला, 'युवर एक्सलन्सी, अजून आपल्याला खूप अवकाश आहे— खूप अवकाश आहे.'

त्याच वेळी कुटूझॉफच्या मागे काही अंतरावर रेजिमेंट सॅल्यूट देत असल्याचा आवाज झाला. कूच करणाऱ्या रशियन सैन्याच्या लांबलचक पसरलेल्या रांगेतून वाढत्या आवाजात आरोळ्या ऐकू येऊ लागल्या. ज्या रेजिमेंटसमोर कुटूझॉफ उभा होता तिचे सैनिक आरोळ्या देऊ लागले तशी कुटूझॉफने घोडा थोडा बाजूस नेला आणि कपाळाला आठ्या घालून तो आजूबाजूला पाहू लागला. प्रॅटझेन रस्त्यावरून येणारे विविध रंगाच्या फिती आणि युनिफॉर्म घातलेल्या घोडेस्वारांच्या एका संपूर्ण स्क्वॉड्रनप्रमाणे वाटत होते. सर्वांचे पुढे असलेले दोन

घोडेस्वार बरोबर येत होते. त्यातल्या एकाचा युनिफॉर्म काळा होता आणि त्याच्या हॅटमधे काळे पीस होते, तो चांगल्या इंग्लिश जातीच्या लाल घोड्यावर स्वार झाला होता. सफेत युनिफॉर्म-मध्ये असणारा दुसरा घोडेस्वार काळ्या घोड्यावर बसला होता. ही सगळी येणारी माणसे म्हणजे दोन सम्राट आणि त्यांचा खास परिवार होता. रेजिमेंटच्या प्रमुख असणाऱ्या वृद्ध सैनिकांच्या कृत्रिमतेने कुटूझॉफने उभ्या असलेल्या सैन्यास हुकूम केला. ' स्टेडी. ' मग सॅल्यूट करीत घोडा सम्राटांच्या समोर नेला. त्याचा देह आणि त्याचा ढंग एकदम बदलून गेला. चिकित्सा न करता मान्यता देणाऱ्या कनिष्ठ सेवकाची भूमिका तो बठवू लागला. त्याने कृत्रिम आदराने केलेल्या सॅल्यूटमुळे त्याच्याबद्दल अलेक्झांडरचे मत चांगले झाले नाही.

दोन मैलांच्या घोडदौडीमुळे झार काहीसा लालबुंद झाला होता. त्याने लगाम खेचता खेचता एक सुटकेचा श्वास टाकला. मग आपल्या परिवारातील आपल्यासारख्या तरुणांचे उत्सुक चेहरे न्याहाळले. त्यांचा पोशाख उंची होता. आणि प्रत्येकाचा घोडा देखणा होता. नव्या दमाचा होता आणि काळजीपूर्वक जतन केलेला दिसत होता. दौडल्यामुळे उबदार झाला होता.

गुलाबी कांतीचा, उभट चेहऱ्याचा सम्राट फ्रान्सिस अतिशय ताठपणे आपल्या उमद्या, काळ्या घोड्यावर बसला होता. तो भोवताली सावधपणे आणि अस्वस्थपणे पाहात होता.

दोन्ही सम्राटांच्या परिवारामध्ये संरक्षदल आणि सैन्य यातून निवडलेले वरिष्ठ वर्गातील फॅशनेबल रशियन आणि ऑस्ट्रियन तरुण होते. त्या परिवारातच झारच्या पागेतील भरत-कामाची खोगिरे असलेले उमदे जादा घोडे हाकीत घोडेस्वार चालले होते.

उघड्या खिडकीतून माळावरची ताजी झुळूक कोंदट खोलीत शिरावी त्याप्रमाणे कुटूझॉफच्या निर्जीव स्टाफमधे त्या तेजस्वी तरुणांमुळे तारुण्य, उत्साह आणि यशाची खात्री निर्माण झाली.

' मिहाइल लॅरिऑनॉविच, तुम्ही सुरुवात का करीत नाही ? ' सम्राट अलेक्झांडर घाईघाईने कुटूझॉफला उद्देशून म्हणत असताना मोठ्या आदबीने सम्राट फ्रान्सिसकडे पाहात होता.

आदराने झुकून प्रणाम करून कुटूझॉफ उत्तरला, ' महाराज, मी वाट पाहतोय...'

सम्राटाने किंचित आठ्या घालून न ऐकल्यासारखे करीत त्याच्या दिशेने मान वळवली.

' मी वाट पाहतोय ' कुटूझॉफ पुनश्च म्हणाला, ' महाराज, अद्याप सगळे सैन्य एकत्र झालेले नाही.'

झारला उत्तर ऐकू आले पण आवडले नाही. त्याने आपले निमुळते, खांदे उडविले आणि कुटूझॉफकडे रुष्टतेने पाहात असलेल्या नॉव्होसिल्स्टॉव्हकडे पाहिले.

' मिहाइल, लॅरिऑनॉविच, झारच्या मैदानात सर्व रेजिमेंटस् तयार झाल्याखेरीज परेडला सुरुवात होत नाही, आपण आता ग्राउंडवर नाही हे लक्षात घ्या. ' झारने असे म्हणताना सम्राट फ्रान्सिसकडे नजर टाकली. सम्राट फ्रान्सिसने संभाषणात भाग घेतला नव्हता तरी आपण काय म्हणतो हे ऐकावे यासाठी त्याचे लक्ष वेधावे असा त्याचा उद्देश असावा. परंतु सम्राट

फ्रान्सिस कुठेतरी दूरच पाहत होता, त्याने लक्ष दिले नाही.

' महाराज म्हणून तर मी सुरुवात करीत नाही. ' आपल्या म्हणण्याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता आहे हे जाणून कुटूझॉफने खणखणीत आवाजात उत्तर दिले. आता पुन्हा एकदा त्याचा चेहरा थरथरला. ' आपण परेडला उभे नाही, तसेच झारच्या मैदानावर नाही म्हणून मी प्रारंभ करीत नाही. ' कुटूझॉफने स्पष्टपणे आणि ठामपणे सांगितले.

त्याच क्षणी झारच्या परिवारातील माणसे एकमेकांकडे पाहू लागली. सर्वांच्या चेहऱ्यावर खंत आणि निर्भर्त्सना होती. ते जणू म्हणत होते, ' तो कितीही वृद्ध का असेना, पण त्याने असे उद्गार काढायला नको होते ! '

झार कुटूझॉफच्या मुखावर धीमेपणाने आणि सावधपणाने दृष्टी रोखून तो आणखी काय बोलतो याची वाट पाहू लागला. इकडे कुटूझॉफदेखील आदराने मस्तक झुकवून वाट पाहू लागला.

मान वर उचलीत कुटूझॉफ म्हणाला, ' आपला हुकूम असेल तर...' मग पुन्हा त्याने चिकित्सा न करता हुकमाची तामिली करणाऱ्या मूर्ख जनरलाची पूर्वीची भूमिका वठवली. तो पुढे सरला आणि कॉलमचा कमांडिंग ऑफिसर मिलोरॅडोविच ह्याला खूण करून पुढे कूच करण्याचा हुकूम दिला.

पुन्हा सैन्य चालू लागले. झारच्या समोरून तीन बटालिअन्स गेल्या.

कुटूझॉफ आपल्या ॲडज्युटंटबरोबर छोट्या बंदुका असलेल्या घोडेस्वारांच्या मागून सावकाश निघाला.

कॉलमच्या मागून अर्धा मैल अंतर गेल्यानंतर तो तिठ्याजवळील एका एकाकी घरात थांबला. दोन्ही रस्ते टेकडीवरून खाली गेले होते, सैन्य रस्त्यावरून चाललेले होते.

आता धुके विरू लागले होते. समोरील उंच प्रदेशावरील एक दीड मैलाच्या अंतरावर असलेले शत्रूचे सैन्य अस्पष्टपणे दिसत होते. खाली डाव्या बाजूकडून गोळीबाराचा आवाज अधिकाधिक स्पष्टपणे ऐकू येत होता. कुटूझॉफ ऑस्ट्रिअन जनरलशी बोलत थांबला होता. प्रिन्स आन्द्रे थोडा मागे राहून त्या दोघांकडे उत्सुकतेने पाहात होता. जवळच्या ॲडज्युटंट-कडून दुर्बिण मागून घ्यावी म्हणून तो त्याच्याकडे वळला.

तो ॲडज्युटंट दूरवरचे सैन्य पाहात नव्हता. तो पाहात होता समोरच्या टेकडीच्या पायथ्या-कडे. ' आलेच, फ्रेंच सैन्य जवळ आले.'

फ्रेंच सैनिक दीड दोन मैल दूर असतील अशी त्याची कल्पना होती. आता तर एकाएकी त्यांच्याशी गाठ पडली होती.

' शत्रूचे सैन्य असेल ?—नसेल—नीट—बघ—निश्चितच—आता काय करणार ?—'

सगळीकडे सैनिक बोलत होते.

प्रिन्स आन्द्रेने पाहिले, खाली उजव्या बाजूकडून फ्रेंच सैनिकांचा कॉलम येत होता. जिथे कुटूझॉफ उभा होता तिथून ते पाचशे पावलांहून जास्त दूर नव्हते.

सगळीकडे धूरच धूर पसरला होता. अगदी जवळ गोळीबाराचे आवाज ऐकू येत होते. प्रिन्स आन्द्रेपासून अगदी जवळ कोणी तरी भावड्या भयभीत स्वरात ओरडला, 'आता आपण खलास!' त्या हुकमासारख्या आवाजासरशी सगळीकडे धावपळ सुरू झाली. जमाव सारखा वाढू लागला आणि पाच मिनिटांपूर्वी जिथून तो सम्राटांजवळून गेला होता त्याच ठिकाणी गोंधळून धाव घेऊ लागला. जोराने धावणाऱ्या जमावाला रोखून धरणे अशक्य होतेच, पण एका जागी पाय खिळवून राहणेही अशक्य होते. जमाव सगळ्यांना आपल्याबरोबर लोटून मागे घेऊन जात होता. बोल्कॉन्स्कीला काय घडते आहे ते कळत नव्हते, तो गोंधळून इकडे तिकडे पाहात होता, आपण मागे राहू नये यासाठी त्याची धडपड चालली होती. रागाने लालबुंद झालेला नेस्व्हिटस्की कुटूझॉफला ओरडून सांगत होता, 'तुम्ही इथून तावडतोब पळा, नाहीतर खात्रीने कैद करतील.' मघापासून तिथेच असणाऱ्या कुटूझॉफने उत्तर न देता हातरुमाल बाहेर काढला. त्याच्या गालातून रक्त ओघळत होते. प्रिन्स आन्द्रे कसाबसा जमावातून मार्ग काढीत त्याच्याकडे आला.

धावत सुटणाऱ्या सैनिकांचे लक्ष वेधीत कुटूझॉफ म्हणाला, 'थांबा. धावू नका!' त्याच क्षणी त्यांना रोखून धरणे अशक्य आहे याची त्याला खात्री पटली. त्याने आपल्या घोड्याला जोराने लाथ मारून उजवीकडे वळवले, पळणाऱ्या जमावाच्या आणखी एका लोंढ्यात तो सापडला आणि मागे रेटला गेला.

कुटूझॉफ जेव्हा ह्या लोंढ्यातून उजव्या बाजूस बाहेर पडला तेव्हा त्याच्या परिवारात निम्मी माणसेही शिल्लक नव्हती, जवळून येणाऱ्या तोफांच्या आवाजाच्या रोखाने कुटूझॉफने घोडा पिटाळला. कुटूझॉफपासून आपण मागे पडू नये यासाठी प्रिन्स आन्द्रेची धडपड चालली होती. रेटत नेणाऱ्या लोकांच्या धावपळीतून तो बाहेर आला तेव्हा त्याला रशियन तोफखाना टेकडीवरील धुरामधे भडिमार करीत असून फ्रेंच सैन्य तोफखान्याच्या दिशेने धावत आहे असे दिसले. थोड्या अधिक उंचीवर असलेले रशियन पायदळ तोफखान्याच्या मदतीला जात नव्हते, तसेच सैनिक पळत होते त्या दिशेनेही धावत नव्हते. पायदळाच्या जनरलने पायदळ सोडून आपला घोडा कुटूझॉफकडे आणला. आता कुटूझॉफच्या परिवारात फक्त पाच माणसे उरली होती, ती सारी भीतीने पांढरीफटक झाली होती. काही न बोलता एकमेकांकडे पाहात होती.

पळत सुटलेल्या सैनिकांकडे बोट दाखवीत रेजिमेंटच्या ऑफिसरला कुटूझॉफ श्वासाची उसंत न घेता ओरडला, 'त्या हरामखोरांना थांबवा.' त्याच क्षणी कुटूझॉफचा परिवार आणि ती रेजिमेंट यांवरून पक्ष्यांच्या थव्यासारख्या गोळ्या सुसाटत गेल्या. फ्रेंच सैन्य तोफखान्यावर हल्ला चढवीत होते.

कुटूझॉफ दृष्टीस पडताच ते त्याच्या दिशेने गोळ्यांचा मारा करीत होते. गोळी लागल्याने जनरलने आपला पाय गच्च आवळून धरला. कित्येक सैनिक पडले. सेकंड लेफ्टनंटच्या हातून निशाण खाली पडले. निशाण भेलकांडत जवळ असलेल्या सैनिकांच्या बंदुकांवर पडून अडकले. हुकूम नव्हता तरीही सैनिकांनी गोळीबार करण्यास प्रारंभ केला.

कुटूझॉफच्या चेहऱ्यावर निराशा पसरली. तो रागाने काहीतरी पुटपुटला. त्याने वळून पाहिले. त्याने बोलकॉन्स्कीला हाक मारली तेव्हा त्याचा आवाज वार्धक्य आणि असहायता यांची जाणीव होऊन थरथरला. शत्रूचे सैन्य आणि आपले पराभूत सैन्य यांच्याकडे बोट दाखवून तो बोलकॉन्स्कीला हळू आवाजात म्हणाला, ' हे चाललं आहे तरी काय ? '

त्याचे शब्द पुरे होण्यापूर्वीच प्रिन्स आन्द्रेने घोड्यावरून उडी घेऊन निशाणाकडे धाव घेतली होती.

' चला, दोस्तांनो पुढे चला. ' प्रिन्स आन्द्रे पोरासारखा किंचाळत होता. कित्येक सैनिक कोसळत होते.

' हुर्रा ' प्रिन्स आन्द्रे ओरडत होता. त्याच्या दोन्ही हातांना ते जड निशाण पेलवत नव्हते. सगळीच्या सगळी बटालियन आपल्या मागून धावत येईल या निष्ठेने तो पुढे धावत होता.

आणि खरे तर काही पावलेच तो एकट्याने धावला. बटालिअनचा अंडर-ऑफिसर धावत आला आणि त्याने वजनामुळे हेलकावत राहणारे निशाण प्रिन्स आन्द्रेच्या हातून स्वतःकडे घेतले आणि निमिषार्धात तो गोळीला बळी पडला. प्रिन्स आन्द्रेने पुन्हा ते निशाण आपल्याकडे घेतले, काठीला धरून त्याला हेलकावे देत तो बटालिअनबरोबर धावू लागला.

डोकीवरून सारख्या सू सू करत जाणाऱ्या गोळ्या त्याला ऐकू येत होत्या. त्याच्या उजव्या, डाव्या दोन्ही बाजूंना सैनिक कण्हता कण्हता खाली कोसळत होते. प्रिन्स आन्द्रेचे लक्ष त्यांच्याकडे नव्हते. त्याचे लक्ष समोर तोफखान्यावर खिळलेले होते. लाल केसांच्या गोलंदाजाची ' शॅको ' ( मिलिटरी टोपी ) एका बाजूला चुरगाळली होती आणि त्याचे केस एका बाजूस ओढले गेले होते; फ्रेंच सैनिक त्याची टोपी दुसऱ्या बाजूस ओढीत होता. आपण काय करतो आहोत याची त्या दोघांना जराही कल्पना नव्हती. ते दोघेही क्षुब्ध झालेले होते. चिडले होते. प्रिन्स आन्द्रेला हे सारे स्पष्ट दिसत होते.

त्यांच्याकडे पाहताना प्रिन्स आंद्रे स्वतःशी म्हणू लागला, ' ते करताहेत तरी काय ? गोलंदाजाकडे काही शस्त्र नाही, मग तो पळून का जात नाही ? तो फ्रेंच सैनिक त्याला अजून भोसकीत का नाही ? ' त्याचे काय झाले हे मात्र प्रिन्स आन्द्रेला कळले नाही.

' हे काय चाललं आहे ? मी खाली पडतोय का ? माझे पाय सुटल्यासारखे वाटताहेत.' त्याला वाटले तो उताणा पडलाय. त्याने डोळे उघडले. 'फ्रेंच सैनिक आणि गोलंदाज यांच्या झगड्याचा शेवट काय झाला ? लाल केसाच्या गोलंदाजाला त्यांनी मारले का ? की तो जिवानिशी पळाला ?' त्याच्यावर होते फक्त आकाश. उंच पण अभ्राच्छादित आकाश–अगाध, अनंत, खोल आकाश. करडे ढग संथपणे त्यातून तरंगत जात होते. ' उंच, उदार, अनंत

आकाशातून सरकणारे हे संथ शांत विजयशाली ढग! धावपळ करून ओरडणाऱ्या भांडणाऱ्या आम्हां मानवप्राण्यांहून किती वेगळे! एकमेकांचे केस ओढणारे भयभीत आणि मदोन्मत्त चेहऱ्याचे फ्रेंच सैनिक आणि गोलंदाज याहून किती वेगळे! हे उंच, उदार आकाश मला इतके दिवस कसे दिसले नव्हते? शेवटी एकदाचे त्याचे दर्शन झाले हे माझे केवढे भाग्य! ह्या अमर्याद अनंत, अगाध आकाशाखेरीज इतर सगळे खोटे आहे. सर्व माया आहे. फक्त आकाश तेवढेच सत्य आहे. पण हेही खरे नव्हे. शांती आणि स्तब्धता याखेरीज जगात काही खरे नसेल. केवढी ही परमेश्वरी कृपा!'

लढाईसाठी पुढे निघावे हा डॉल्गोरुकॉव्हचा सल्ला प्रिन्स बॅग्रेशनने धुडकावून लावला. त्याला सर्व जबाबदारी टाळायची होती. म्हणून त्याने कमांडर-इन्-चीफकडे कोणालातरी पाठवावे असे डोल्गोरुकॉव्हला सुचवले.

बॅग्रेशनचे टपोरे, भावशून्य आणि निद्रिस्त डोळे परिवारातील माणसांवरून फिरले. भावावेगाने थरथरणाऱ्या रोस्तॉफच्या बालकसदृश चेहरा त्याला दिसला. त्याने रोस्तॉफला पाठवण्याचे ठरवले.

'महाराज, कमांडर-इन्-चीफच्या अगोदर सम्राटाची भेट झाली तर काय करू?' आपल्या टोपीच्या पुढच्या टोकास हात लावून रोस्तॉफने विचारले.

'मग सम्राटांना दे.' बॅग्रेशनला बोलू न देता डोल्गोरुकॉव्ह घाईघाईने म्हणाला.

त्या सकाळी रोस्तॉफच्या सर्व आशाआकांक्षा पूर्ण झाल्या होत्या, होऊ घातलेल्या मोठ्या प्रमाणावरील लढाईत तो भाग घेत होता, त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो सर्वांत शूर असलेल्या जनरलच्या हाताखाली होता. त्याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याला महत्त्वाच्या कामासाठी कुटूझॉफकडे—कदाचित झारकडेही पाठविण्यात आले होते. सकाळ प्रसन्न होती. तो उमद्या घोड्यावर स्वार झाला होता. त्याचे अंतःकरण आनंदाने उचंबळत होते. हुकूम मिळताच त्याने घोड्याला टाच मारली. त्याचा घोडा सैनिकांच्या रांगेकडे निघाला.

प्रॅटझेन खेड्यापलीकडील टेकड्यांच्या उतारावर बंदुकींच्या गोळीबाराबरोबरच तोफांचा मारा इतक्या वारंवार होत होता की काही वेळा होणारे प्रचंड आवाज एकमेकांपासून वेगळे कळत नव्हते, त्या साऱ्यांची मिळून एकच एक गर्जना होत होती.

टेकड्यांच्या उतारावर गोळीबारामुळे धुराचे लोट उठत ते जणू एकमेकांचा पाठलाग केल्यासारखे वेगाने जाऊ लागत. गोळी सुटल्यानंतर तोफांमधून धुराचे ढग बनून तरंगत आणि मग एकमेकात मिसळू लागत. धुरात चमकणाऱ्या संगिनी दिसत होत्या. पायदळाचे खूप सैनिक खाली चालले आहेत हे त्याने अनुमान काढले. त्याला तोफखान्याच्या दारुगोळ्याची हिरव्या गाड्यांची बारीक रांगही दिसली.

काय चालले आहे ते पाहण्यासाठी रोस्तॉफने छोट्याशा टेकडीवर घोडा थांबवला. त्याने बारकाईने पाहण्याची खूप शिकस्त केली, परंतु त्याने जे पाहिले ते त्याचा त्याला काही बोध झाला नाही. निरनिराळ्या तऱ्हेची माणसे इतस्ततः धुरात धावपळ करीत होती. सैनिकांच्या रांगा पुढे मागे हालचाल करीत होत्या. कशासाठी चालले आहे हे सारे ? ही माणसे कुठे चालली आहेत ? कोण आहेत ही माणसे ? त्याला काही कळणे शक्य नव्हते.

आता त्याचा घोडा आघाडीवरील सैन्याजवळून चालला होता. काही घोडेस्वार त्याच्या दिशेने दौडत येत होते. ऊलान्स पथकाचे ते सैनिक हल्ल्यातून वाटेल तसे धावत पळत होते. रोस्तॉफला त्यांपैकी एकजण रक्ताने माखलेला दिसला पण रोस्तॉफने घोडा तसाच पुढे पिटाळला.

सर्व प्रकारच्या दळाच्या, विभागाच्या लोकांनी गर्दी केलेल्या प्रॅटझेन खेड्याच्या मागील प्रदेशात रोस्तॉफ जसजसा शिरू लागला तसतशी काहीतरी वाईट, अशुभ होणार आहे ही एकाएकी पछाडून टाकणारी भावना वाढीस लागली.

रोस्तॉफला वाटेवर अस्ताव्यस्तपणे पळत सुटणारे गोंधळलेले कित्येक रशियन व ऑस्ट्रियन सैनिक भेटत होते आणि तो स्वतःलाच विचारत होता, ‘ काय चाललं आहे हे ? ते कोणावर गोळ्या चालवताहेत ? गोळ्या चालवताहेत तरी कोण ? ’

त्या दाणादाण उडालेल्या जमावातील त्याच्याप्रमाणेच कुणालाही काय चालले आहे याची कल्पना नव्हती. धावत जाणारा कुणी ना कुणी रशियन भाषेत नाहीतर जर्मन भाषेत अगर झेक भाषेत त्याला उत्तर देत होता. ‘ सैतान जाणे काय चाललं आहे ते ! सगळ्यांना ठार मारलं त्यांनी ! त्यांचा सर्वांचा सत्यानाश होवो ! ’

‘ जर्मनांना ठार करा. ’

‘ त्या विश्वासघातक्यांचा सर्वनाश होवो ! ’

पराभवाची आणि पलायनाची कल्पना रोस्तॉफच्या मनाला स्पर्शही करीत नव्हती. प्रॅटझेन खेड्याच्या टेकडीवर व ज्या ठिकाणी त्याला कमांडर-इन्-चीफची गाठ घेण्याचा हुकूम झालेला होता त्याच ठिकाणी त्याला फ्रेंच सैनिक आणि त्यांच्या तोफा दिसल्या. तरी त्याचा आपल्या पराभवावर आणि पलायनावर विश्वास बसला नाही, आणि त्याला तसा विश्वास बसायलाही नको होता.

ज्याला ज्याला थांबवता येईल त्याला त्याला थांबवून रोस्तॉफ विचारत होता, ‘ सम्राट कुठे आहेत ? कुटूझॉफ कुठे आहेत ? ’ कोणीच त्याला उत्तर देत नव्हते.

जवळून जाणाऱ्या एका जखमी ऑफिसरने त्याला हटकले, ‘ कोण पाहिजे तुला ? कमांडर-इन्-चीफ ? ’

त्या खेड्याकडे जा. सगळे कमांडिंग ऑफिसर तिकडे आहेत. त्या ऑफिसरने खेड्याच्या दिशेने बोट केले व तो निघून गेला.

रोस्तॉफचा घोडा धीरे धीरे जाऊ लागला. आपण कुणाला भेटायला जात आहोत, कशासाठी

भेटणार आहेत हे त्याला कळेनासे झाले. झार जखमी झाला होता. त्याचा लढाईत पराभव झाला होता. त्यावर विश्वास न ठेवणे आता शक्य नव्हते. सांगितलेल्या दिशेने रोस्तॉफ घोडा नेऊ लागला. दूरस्थ असलेले इमारतीचे मनोरे आणि चर्च त्याला दिसू लागले. कशासाठी आता घाई करायची ? झार आणि कुट्झॉफ जरी जिवंत असले, जरी त्यांना जखम झालेली नसली तरी त्यांना आता आपण काय सांगणार आहोत ?

एक सैनिक त्याला ओरडून सांगत होता, ' महाराज, ह्या रस्त्याने जा. त्या रस्त्याने गेलात तर थोड्या वेळात प्राणाला मुकाल. '

रोस्तॉफने क्षणभर विचार केला आणि ज्या मार्गाने प्राणास मुकण्याची भीती आहे असे सांगण्यात आले होते त्याच मार्गाने त्याने घोडा वळवला.

प्रॅटझेन खेड्यातून पळत असताना ज्या प्रदेशात जास्त माणसे मेली त्या प्रदेशातून रोस्तॉफ आपला घोडा नेऊ लागला. थोडेसे जखमी झालेले किंवा मुळीच जखम न झालेले रशियन सैनिक त्या प्रदेशातून केव्हाच पसार झाले होते. तरीही फ्रेंच सैन्याने तो प्रदेश अजून काबीज केला नव्हता. चांगल्या शेतजमिनीत उकिरड्याचे ढीग टाकावेत त्याप्रमाणे त्या मैदानात सर्वत्र जखमी आणि मृत सैनिक पडलेले होते. दोन दोन किंवा तीन तीन सैनिक सोबतीने रांगत होते. त्यांच्या आर्त किंकाळ्या आणि कण्हणे ऐकून रोस्तॉफचे मन हेलावून गेले. त्याला आता भीती वाटू लागली. आपला जीव जाईल म्हणून ती भीती नव्हती. त्या दुर्दैवी जीवांना पाहून आपले धैर्य नाहीसे होईल म्हणून तो भ्याला.

लढाईतून परतलेले रशियन सैनिक गॉस्टिएरडेक खेड्यात गोळा झाले होते. फ्रेंच तोफांच्या माऱ्याच्या पलीकडे सगळे सैन्य होते. गोळीबाराचा आवाजही खूप दूर होत असल्याचे वाटत होते. इथल्या प्रत्येकाला लढाईत पराभव झाल्याचे कळून चुकले होते. जो तो त्याचबद्दल बोलत होता. रोस्तॉफला कुणीही झार किंवा कुट्झॉफ कुठे आहे ते सांगू शकत नव्हता. खेड्याच्या पलीकडे डाव्या बाजूला आपण हेडक्वार्टर्समधील कुणाला तरी पाहिले असे एक ऑफिसर रोस्तॉफला म्हणाला. कोणी भेटणार नाही हे माहीत असूनही, मनाला टोचणी नको म्हणून, त्याने त्या दिशेने घोडा पिटाळला. दोन मैल गेल्यावर शेवटच्या रशियन सैन्याजवळून जाताना त्याला भोवताली खंदक असलेल्या बागेसमोर दोन घोडेस्वार उभे असलेले दिसले. त्यांच्यापैकी एकाच्या हॅटमध्ये सफेत पीस खोवलेले होते. तो रोस्तॉफला काहीसा ओळखीचा वाटला. त्याला ठाऊक नसलेला दुसरा स्वार ज्या लाल रंगाच्या घोड्यावर बसलेला होता तो घोडा आपण पूर्वी कुठेतरी पाहिला होता असे रोस्तॉफला वाटले.

' नाही. सम्राट असणे शक्य नाही. या अशा मोकळ्या मैदानात तो कसा असेल ? रोस्तॉफला वाटले, त्याच वेळी अलेक्झांडरने मान वळवली. आणि आजवर त्याच्या मनावर पक्का ठसलेला सम्राटाचा चेहरा त्याला दिसला. झार फिकट झाला होता. त्याचे गाल आत ओढल्यासारखे झाले होते, डोळे खोल गेले होते तरीही त्याच्या चेहऱ्यावरील मोहकता आणि सौम्यता अधिकच उठून दिसत होती. त्याला जखम झाली ही वार्ता निश्चित खोटी ठरली

म्हणून रोस्तॉफला कोण आनंद झाला. त्याच्या दर्शनाने तो सुखावला. डॉल्गोरुकाव्हने दिलेला निरोप देण्यासाठी आपण आता त्याला भेटणार आहोत, नव्हे आपण भेटलेच पाहिजे असे त्याला वाटू लागले.

त्याला सम्राटांना कसे भेटावे हे कळेनासे झाले. त्यांना भेटणे अयोग्य, वाईट आणि अशक्य कसे आहे हे तो हजार तऱ्हांनी स्वतःला सांगू लागला.

मी आता त्यांची भेट घेतली तर त्यांच्या एकटेपणाचा व निराशेचा फायदा घेतला असे तर नाही होणार ? अशा दुःखाच्या क्षणी माझ्यासारख्या अपरिचित माणसाला भेटणे त्यांना दुःसह वाटण्याचा संभव आहे. त्यांना केवळ पाहून माझे अंतःकरण इतके धडधडते आहे आणि मी इतका निःशब्द झालो आहे की त्यांना मी काही सांगू शकेन असे वाटत नाही.

रोस्तॉफने भेट न घेण्याचे ठरवले. मोठ्या दुःखाने आणि निराशेने त्याने घोडा पिटाळला. तरीही तो सारखा वळून झारकडे पाहात होता.

झार अजून उभा होता. त्याचा काहीच निश्चय होत नव्हता. विश्रांतीची जरुरी असलेला झार सफरचंदाच्या झाडाखाली बसला. आणि हातांनी चेहरा झाकून तो रडू लागला.

■ ■

क. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
ग्रंथालय

# भाग चौथा

## १८०६

१८०६ च्या प्रारंभी रजा घेऊन निकोलाय रोस्तॉफ घरी येण्यास निघाला. डेनिसॉव्हदेखील आपल्या घरी जायला निघाला होता. रोस्तॉफने त्याला मॉस्कोला आपल्या घरी येऊन राहण्याचा आग्रह केला. मॉस्कोला जाणाऱ्या त्या रस्त्यावरून गाडी जाताना सारखे हिसके बसत होते. परंतु गाडीच्या खालच्या भागात रोस्तॉफच्या शेजारी डेनिसॉव्ह गाढ झोपी गेला. मॉस्को शहर जसजसे जवळ येऊ लागले तसतशी रोस्तॉफची अधीरता वाढू लागली.

शहराच्या चौकीशी आपली कागदपत्रे सादर केल्यानंतर मॉस्को शहरात शिरताना रोस्तॉफच्या मनात विचार येऊ लागले, ' घर लवकर येईल का ? हे रस्ते, हे दिवे, ही केकची दुकानं संपणार तरी कधी ? गाडीवान किती उशीर करीत आहे! '

सगळे शरीर पुढच्या दिशेला झुकवून गाडीचा वेग आणखी वाढविण्याची इच्छा करीत तो डेनिसॉव्हला म्हणाला, ' डेनिसॉव्ह, आपण आलोच आता जवळ. '

रोस्तॉफने गाडीवानास म्हटले, ' चल लवकर, तुला व्होडकासाठी तीन रूबल देतो. ' रोस्तॉफला घोडे जागच्या जागी उभे आहेत असे वाटत होते. शेवटी गाडी एकदा उजवीकडे प्रवेशद्वाराकडे वळली. रोस्तॉफला प्लॅस्टर उडालेली परिचित कमान, पायऱ्या आणि दिव्याचा खांब दिसला. गाडी थांबण्यापूर्वीच रोस्तॉफने गाडीतून उडी टाकली आणि तो पोर्चमध्ये धावला. मग पोर्चमधून धावत धावत तो परिचित नागमोडी पायऱ्यांजवळ आला. दरवाजा नेहमीप्रमाणे थांबत थांबत उघडला. त्याची मूठ मळली म्हणजे काउंटेस किती रागे भरायची. दिवाणखान्यामध्ये एकुलती एक मेणबत्ती जळत होती.

एका काळी सबंध गाडीच उचलणारा म्हातारा मिहाइलो बसल्या बसल्या झोपी गेला होता.

' देवाची कृपा ! छोटे धनी आले, ' आपल्या छोट्या मालकांना ओळखताच तो ओरडला। इतरांना मालकाच्या येण्याची बातमी सांगण्यासाठी तो निघाला. पण त्याने आपला विचार बदलला. ' छोटे धनी, मला एकदा तुम्हाला डोळे भरून पाहू द्या.'

' सारी ठीक आहेत ना ? ' रोस्तॉफने विचारले.

रोस्तॉफ डेनिसॉव्हला पूर्णपणे विसरून गेला. त्याने अंगावरचा लोकरी कोट भिरकावला. कुणाला स्वागताची संधी मिळू नये म्हणून तो हलक्या पावलांनी काळोख्या स्वागत दालनात शिरला. कुठे काही बदल झाला नव्हता. पत्ते खेळण्याची टेबले, मेणबत्त्यांची घरे पूर्वीप्रमाणेच होती. पण कुणीतरी छोट्या धन्याला अगोदरच पाहिले होते. रोस्तॉफ दिवाणखान्यात आला नाही तोच कुणीतरी वेगाने आत येऊन त्याच्यावर आलिंगने आणि चुंबने यांचा वर्षाव केला. दुसऱ्या तिसऱ्या दरवाजातूनही माणसे आत आली. आलिंगनांचा आणि चुंबनांचा वर्षाव झाला. सारा दिवाणखाना आनंदाने गजबजून गेला. सगळ्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. रोस्तॉफला आपले वडील, नताशा, पेत्या कुणीच ओळखू येईना. सगळी माणसे एकाच वेळी ओरडत होती, बोलत होती आणि त्याला चुंबीत होती. त्या साऱ्यांमध्ये आपली आई नसल्याचे त्याच्या लक्षात आले.

पेत्या ताटकळत उभा होता. ' माझादेखील पापा घ्या. ' तो ओरडत राहिला. नताशाने त्याला आपल्याकडे ओढले आणि त्याचे पटापट मुके घेतले. तिने त्याच्यामागे उडी मारली आणि त्याचे जाकीट धरून ती एकाच जागी बकऱ्याप्रमाणे आनंदाने किंचाळत उभी राहिली.

त्याच्या भोवतालच्या सर्वांचे डोळे आनंदाश्रूंनी उजळले होते. सगळ्यांचे ओठ चुंबनाला अधीर झाले होते. लाजेने लाल झालेली सोन्या त्याच्या हाताला बिलगली. ज्यांची ती इतका काळ वाट पाहत होती त्या डोळ्यांकडे आनंदाने टक लावून बघताना तिचा जीव आनंदाने मोहरला.

ह्या अत्यानंदाच्या क्षणी ती थोडशा आणखीनच सुंदर दिसू लागली. श्वास रोखून स्मित करीत ती त्याच्याकडे टक लावून पाहत होती. त्याच्यावरून नजर काढून घेणे तिला अशक्य होत होते. रोस्तॉफ कृतज्ञतापूर्वक तिच्याकडे पाहत होता. तरी दुसऱ्या कुणाची तरी तो प्रतीक्षा करीत होता. थोरली काउंटेस अजून आलेली नव्हती. त्याला दरवाजाशी पावले ऐकू आली. पण ती इतक्या भरभर पडत होती की ती आपल्या आईची असतील असे त्याला वाटेना.

पण ती आईच होती. तिच्या अंगावर नवा पोशाख होता. त्याच्या गैरहजेरीत तो शिवलेला असावा. सगळ्यांनी त्याला आईकडे जाऊ दिले. तो जवळ आला तशी त्याची आई त्याच्या अंगावर कोसळली. निळी किनार असलेल्या त्याच्या जाकिटावर ती तशीच पडून राहिली. डेनिसॉव्ह दिवाणखान्यात आला तेव्हा त्याला कोणी पाहिले नव्हते. तो डोळे चोळीत त्यांच्याकडे पाहत उभा राहिला.

प्रश्नार्थक नजरेने आपल्याकडे पाहणाऱ्या काउंटला त्याने आपली ओळख करून दिली.

मी व्हॅसिली डेनिसॉव्ह. तुमच्या मुलाचा मित्र.'

डेनिसॉव्हला कवेत घेत चुंबीत काउंट म्हणाला, 'तुला पाहून मला फार आनंद झाला. तुझी मला चांगली माहिती आहे. निकोलाइकाने मला पत्रात तुझ्याबद्दल लिहिलं होतं.' त्याने नताशा आणि डेनिसॉव्ह यांची ओळख करून दिली.

विसकटलेल्या केसांच्या डेनिसॉव्हकडे मघाच्याच आनंदाने माणसे पाहू लागली, त्यांनी त्याला वेढून टाकले.

आनंदाने बेहोष झालेली नताशा त्याच्याकडे धावली. त्याच्यावर आलिंगने आणि चुंबने यांचा तिने वर्षाव केला. नताशाच्या वागण्याने सर्वजण अस्वस्थ झाले. डेनिसॉव्हदेखील लाजेने लाल झाला. तरीही त्याने स्मित करून नताशाच्या हाताचे चुंबन घेतले.

डेनिसॉव्हला खास राखून ठेवलेल्या खोलीत नेण्यात आले आणि दिवाणखान्यामध्ये सारे रोस्तॉफ कुटुंब निकोलायच्या भोवती गोळा झाले.

थोरली काउंटेस निकोलायच्या शेजारी बसली. त्याचा हात घट्ट पकडून ती त्याचे पुन्हा पुन्हा चुंबन घेऊ लागली. बाकीची माणसे त्याच्याभोवती उभी होती. ती त्याच्या प्रत्येक हालचालीने, प्रत्येक शब्दाने सुखावत होती. आपले उत्साही आणि प्रेमळ डोळे त्याच्यावरून दूर करत नव्हती. त्याची भावंडे त्याच्या जवळची जागा मिळण्यासाठी भांडत होती. त्याला चहा, पाईप अगर रुमाल कोणी आणून द्यावा यावर वाद घालीत होती.

दुसऱ्या दिवशी तो सकाळी दहापर्यंत झोपून राहिला. जवळच्या खोलीमध्ये लहान-मोठ्या तलवारी, सैनिकांच्या पिशव्या, उघड्या ट्रंका आणि मळके बूट अस्ताव्यस्त पसरले होते. तळव्याला खिळे असलेल्या स्वच्छ बुटांचे दोन जोड भिंतीला ओटंगून ठेवले होते. नोकरांनी हात धुण्यासाठी भांडे आणले, दाढी करण्यासाठी गरम पाणी आणले आणि ब्रशाने स्वच्छ केलेले कपडे आणले. पुरुषांचा वावर जाणवून देणारा वास आणि तंबाखूचा उग्र दर्प भरून राहिला होता.

व्हॅस्का डेनिसॉव्ह घोगऱ्या आवाजात म्हणाला, 'ग्रिश्का, पाइप कुठे आहे? अरे रोस्तॉफ, ऊठ आता.'

चिकटल्यासारखे डोळे चोळीत, विस्कटलेल्या केसांच्या रोस्तॉफने ऊबदार उशीवरून डोके वर उचलले.

'उशीर झाला काय?'

'चांगलाच उशीर झालाय. दहा वाजले आहेत.' नताशाचा आवाज ऐकू आला. शेजारच्या खोलीतून त्यांना स्टार्च केलेल्या स्कर्टची सळसळ आणि मुलींचे हसणे ऐकू आले. दरवाजा किलकिला झाला आणि त्या मुलींच्या निळ्या रिबिनी, काळे केस आणि आनंदी चेहरे यांचे त्याला ओझरते दर्शन घडले. तो अजून उठला की नाही हे पाहायला नताशा सोन्या आणि पेत्या यांना घेऊन आलेली होती. दारातून नताशाने हाक मारली. 'निकोलेङ्का, तावडतोब उठ बघू.' तेवढ्या वेळात पेत्याच्या दृष्टीला तलवारी पडल्या. भाऊ सैनिक

असला म्हणजे लहान मुलांना जो उत्साह वाटतो त्या उत्साहाने त्याने त्या उचलल्या. तरुण कपडे बदलत असताना मुलींनी तिकडे पाहणे बरे नव्हे हे लक्षात न घेता पेत्याने त्यांच्या निजण्याच्या खोलीचा दरवाजा उघडला.

'ही तुझी तलवार आहे काय ?' त्याने जवळ जवळ ओरडून विचारले.

मुली तिथून दूर झाल्या. मदतीसाठी आपल्या मित्राकडे पाहत दचकलेल्या डेनिसॉव्हने आपले केसाळ पाय चादरीखाली लपविले. बाहेरून खिदळण्याचा आवाज ऐकू आला.

'निकोलेङ्का कपडे करून बाहेर ये' नताशा ओरडली. रोस्तॉफने घाईघाईने कपडे केले आणि तो बाहेर आला. नताशाने एक बूट पायात घातला होता आणि ती दुसरा पायात घालीत होती. सोन्या झुकून प्रणाम करीत होती. गरगरा फिरून आपला स्कर्ट फुग्यासारखा फुगवून ती खाली बसत असताना रोस्तॉफ आत आला.

त्या दोघींनी सारखेच निळया रंगाचे नवे फ्रॉक घातले होते. दोघीही गुलाबी, ताज्यातवान्या आणि सुस्वभावी दिसत होत्या. सोन्या पळत सुटली पण नताशाने आपल्या भावाचा हात धरून त्याला दिवाणखान्यात नेले. केवळ त्या दोघांच्याच आवडीचे असे अनेक क्षुल्लक विषय होते त्यांबद्दल विचारायला ऐकायला त्यांना वेळ मिळाला नव्हता. त्याच्या आणि आपल्या प्रत्येक शब्दाला नताशा हसत होती. त्यांच्या दोघांच्या बोलण्यात खास करमणुकीचे असे काही नव्हते, पण नताशाला इतका आनंद झाला होता की तो हसण्यावाटे उतू जात होता.

प्रत्येक क्षणाला ती बोलत होती, 'किती छान ! किती सुरेख !' त्या प्रेमाच्या सौम्य सूर्य-प्रकाशामध्ये रोस्तॉफला वाटले दीड वर्षांनी प्रथमच आपले अंतःकरण निष्पाप हास्याने डवरून येत आहे. घर सोडल्यापासून आतापर्यंत त्याला हास्य पारखे झाले होते.

'तू आता खराखुरा मोठा माणूस झालास, होय ना ? तू माझा भाऊ आहेस म्हणून किती आनंद वाटतो आहे म्हणून सांगू ?' त्याच्या मिश्यांना हात लावत ती म्हणाली.

'का ग, सोन्या पळून का गेली ?' रोस्तॉफने विचारले.

'तिच्याबद्दल सांगण्यासारखे खूप आहे.'

'का पण ?'

'मग सांगतेच तर आता. सोन्या माझी मैत्रीण आहे. इतकी जिवाभावाची आहे की तिच्यासाठी मी माझा हात भाजून घेतला.' तिने आपली बाही वर केली आणि आपल्या लांब-सडक, कृश आणि मऊ हातांवर..कोपराच्या वर खांद्याजवळ...जो भाग नाचाच्या वेळी उघडा नसतो त्या भागावरील डाग दाखवला.

'माझं प्रेम दाखवण्यासाठी मी हात भाजून घेतला. आगीत फूटपट्टी घातली आणि इथं धरून दाबली.'

रोस्तॉफ पूर्वी जिथे शिकत होता त्या खोलीत आता हात ठेवण्यासाठी उशा असलेल्या सोफ्यावर बसला होता. नताशाचे विलक्षण उत्सुक डोळे पाहता पाहता तो आपल्या

बालपणाच्या विश्वात शिरला. त्या विश्वात इतरांना काही अर्थ दिसत नसला तरी त्याला मात्र जीवनातील श्रेष्ठ आनंद लाभत असे. आपले प्रेम पटवण्यासाठी हात भाजून घेण्यासारखी गोष्ट त्याला निरर्थक वाटली नाही.

त्याला तिचे आश्चर्य वाटले नाही. उलट ती मनोमन पटली.

'एवढंच की, आणखी काही आहे?' त्याने विचारले.

'आम्ही दोघी इतक्या जवळच्या मैत्रिणी आहोत...ती फूटपट्टीची गोष्ट सोडून दे. तो मूर्खपणा असेल. पण आम्ही अगदी जिवाभावाच्या मैत्रिणी आहोत. एखाद्यावर तिचा जीव जडला की तो कायमचा कसा जडतो ते मला समजत नाही. मी किती लवकर विसरून जाते.'

'तुला म्हणायचं आहे तरी काय?'

'तिचं माझ्यावर प्रेम आहे तसंच तुझ्यावरही आहे.' नताशा एकाएकी लाजेने चूर झाली आणि पुढे म्हणाली, 'तू गेलास त्यापूर्वीचं तुला आठवतं ना?...ती म्हणते तू सगळं विसरून जायला हवं. ती म्हणाली, 'माझं त्याच्यावर नेहमी प्रेम राहील पण त्याला मोकळा असू दे.' तिची भावना किती सुंदर आहे, विचार किती उदात्त आहे!' नताशा अगदी गंभीरपणे आणि अंतःकरणपूर्वक बोलली. आताच्या गोष्टीबद्दल पूर्वी रडून रडून ती बोललेली असणार याची रोस्तॉफला स्पष्ट कल्पना आली. रोस्तॉफने काही वेळ विचार केला.

'मी माझं वचन मोडणार नाही. सोन्या इतकी सुंदर आहे की तिला नाकारणं म्हणजे सुखाला नको म्हणण्यासारखं होईल. तसा मूर्खपणा कोण करील?'

नताशा म्हणाली, 'असं म्हणू नको. मी आणि सोन्या याबद्दल अगोदरच बोललो आहोत. तू असं बोलणार याची आम्हाला कल्पना होती. पण तसं व्हायला नको आहे. मी आपलं वचन पाळणार आहे असं तू म्हणालास तर त्याचा अर्थ काय होतो माहीत आहे? तुला तिच्याशी लग्न करणं भाग आहे असा त्यातून अर्थ निघतो. आणि हे काही योग्य नाही.'

त्या दोघींनी बराच विचार केलेला असावा हे रोस्तॉफच्या ध्यानात आले. आदल्याच दिवशी सोन्याने आपल्या लावण्याने त्याचे लक्ष वेधून घेतले होते. आज तिचे ओझरते दर्शन घडले तेव्हाही त्याला ती आणखी सुंदर वाटली होती. ती षोडशा आपल्यावर निस्सीम प्रेम करते आहे याबद्दल त्याला त्या क्षणी तरी संशय वाटत नव्हता. 'लग्न करायचं नसेल तरी प्रेम करू नये असं थोडंच आहे?' रोस्तॉफ विचार करू लागला. 'त्यांनी घेतलेला निर्णय चांगला आहे. मी मोकळा राहणं ठीक होईल.' रोस्तॉफच्या मनात विचार आला. तो म्हणाला, 'तू म्हणतेस ते ठीक आहे. आपण त्याबद्दल नंतर बोलू या. परत तुमच्याबरोबर राहायला मिळाले म्हणून मला किती आनंद झाला म्हणून सांगू. आता मला सांग, तुझं बोरिसवरील प्रेम अजून टिकून आहे ना?'

नताशा हसत म्हणाली, 'काय वेड्यासारखं विचारतोस? मी त्याचाच काय, दुसऱ्या

कुणाचाही विचार करीत नाही. मला कोणाचाच विचार करायचा नाही.'

'काय म्हणतेस तरी काय? मग करणार तरी काय?'

'मी नर्तिका होणार आहे. मी मुळी लग्नच करणार नाही. तू कुणाला माझा निश्चय सांगू नकोस हो.' ती म्हणाली.

रोस्तॉफ मनापासून इतक्या मोठ्याने हसला की, शेजारच्या खोलीतील डेनिसॉव्हला त्याचा हेवा वाटला. नताशाही त्याच्याबरोबर हसली.

'छान, छान. एकूण तुला बोरिसशी लग्न करायचं नाही तर?'

'मला कुणाशीच लग्न करायचं नाही. मला तो भेटला की मीच स्वतः त्याला सांगून टाकीन.' नताशा भडकून म्हणाली.

'खरंच सांगशील?'

'जाऊ दे. सगळा मूर्खपणा! मला सांग–डेनिसॉव्ह तुला चांगला वाटतो का?'

'चांगलाच आहे तो.'

'ठीक आहे. मी निघते आता. तू कपडे कर. काय रे, तुझा हा डेनिसॉव्ह भयंकर असामी नाही ना?'

'भयंकर असामी? छे. छे! मोठा गमतीदार प्राणी आहे.'

'आता घाई कर आणि चहाला चल. सगळेजण एकत्र चहा घेणार आहेत.'

नताशा उठून चवड्यांवरून नर्तिकेप्रमाणे खोलीच्या बाहेर निघाली. पंधरा-सोळा वर्षांच्या मुली आनंदात असल्या म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर जसे हास्य असते तसे हास्य तिच्या चेहऱ्यावर होते.

दिवाणखान्यात सोन्याची गाठ पडताच रोस्तॉफचा चेहरा लालबुंद झाला. तिच्याशी कसे वागावे त्याला कळेना.

आपली आई, आपल्या बहिणी आपल्याकडे पाहताहेत. आपण सोन्याशी कसे वागणार आहोत याचे त्यांना कुतूहल आहे, याची त्याला जाणीव झाली. त्याने सोन्याचा हात हातात घेऊन त्याचे चुंबन घेतले. त्या भेटीत त्याचे डोळे मात्र प्रेमाची आणि चुंबनाची भाषा बोलत राहिले. नताशामार्फत त्याला त्याच्या वचनाची आठवण करून दिल्याबद्दल तिने नजरेनेच त्याची क्षमा मागितली आणि नजरेनेच त्याच्या प्रेमाबद्दल आभार मानले. तिने वचनमुक्त केल्याबद्दल तो ऋणी होता. काही झाले तरी तिच्यावरील त्याचे प्रेम अढळ राहणार होते, तिला विसरणे त्याला अशक्य होते.

सगळीकडे शांतता पसरली. व्हेरा म्हणाली, 'सोन्या आणि निकोलेङ्को आता भेटली तरी परकेपणाने वागताहेत हे दृश्य किती चमत्कारिक वाटते आहे!'

व्हेराच्या इतर निरीक्षणाप्रमाणे हेही निरीक्षण बरोबर होते. तिच्या इतर निरीक्षणांप्रमाणे ह्याही निरीक्षणामुळे इतर माणसे मात्र अस्वस्थ झाली. सोन्या, नताशा आणि निकोलाय लाजेने लाल झाले. निकोलायची आई थोरली काउंटेसदेखील एखाद्या मुलीसारखी लाजली.

आपल्या मुलाचे सोन्यावर प्रेम असले तर त्याला उत्तम स्थळ मिळायला अडचण पडेल अशी भीती तिला वाटत होती.

निकोलाय रोस्तॉफ आघाडीवरून मॉस्कोला आला होता तेव्हा त्याच्या कुटुंबियांनी त्याचे शूर पुरुष, थोर सुपुत्र आणि आदर्श रोस्तॉफ म्हणून स्वागत केले. हा सुस्वभावी मोहक तरुण नातेवाइकांना हवाहवासा वाटू लागला. घोडदलातील देखणा लेफ्टनंट, कुशल नर्तक आणि एक उत्कृष्ट स्थळ म्हणून तो परिचितांनाही प्रिय झाला.

सर्व मॉस्को शहर रोस्तॉफ कुटुंबाला ओळखत असे. सर्व इस्टेट गहाण ठेवल्याने थोरल्या काउंटकडे भरपूर पैसा आलेला होता. निकोलायचा स्वतःचा रेसचा घोडा होता. मॉस्कोत न आढळणाऱ्या विजारी तो घोड्यावरून रपेट करणयसाठी वापरीत होता; अतिशय फॅशनेबल असे टोकदार बूट तो वापरीत होता. त्याचा वेळ आता मजेत चालला होता. जुन्या जीवनाशी जुळते घ्यायला प्रारंभी काही वेळ लागला तेवढाच. मग मात्र तो घरच्या वातावरणात पुरता रंगून गेला. आपण आता बालपण ओलांडून वयात आल्याचे त्याला जाणवू लागले.

आता तो चांदीची किनार असलेले जाकीट वापरणारा घोडदलातील लेफ्टनंट होता. त्याच्या जाकिटावर सेंट जॉर्जचा क्रॉस होता. रेससाठी तो घोड्याला तयार करीत होता. रेसमध्ये भाग घेणाऱ्या प्रतिष्ठित बड्या मंडळींत आता तो वावरत होता. त्याने आता एका स्त्रीशी ओळख करून घेतली होती. संध्याकाळी तो तिच्या भेटीसाठी जाऊ लागला. अराराव्ह येथील नृत्यसमारंभात तो मझुर्का नृत्यात पुढाकार घेऊ लागला. फील्डमार्शल केमेन्स्कीबरोबर युद्ध-विषयक चर्चा करू लागला.

डेनिसॉव्हने ओळख करून दिलेल्या चाळिशी ओलांडलेल्या कर्नलशी त्याचे वागणे सलगीचे होऊ लागले.

पुन्हा सैन्यात दाखल होण्यापूर्वी रोस्तॉफ मॉस्को शहरात थोडा काळ राहिला. त्या अवधीत तो सोन्याच्या अधिक जवळ येण्याऐवजी तिच्यापासून अधिकाधिक दूर गेला. मात्र मोहक सुंदर सोन्या त्याच्यावर अलोट प्रेम करीत होती यात संशय नव्हता.

रोस्तॉफच्या मनात मॉस्कोला असताना सोन्याबद्दल विचार येत. ' तिच्यासारख्या आणखी कित्येकजणी आयुष्यात भेटायच्या आहेत. त्या कुठे ना कुठे आताशा असतील. मला आता ठाऊक नसल्या म्हणून काय झाले ? प्रेम करायचे असेल तेव्हा त्याबद्दल विचार करायला मला पुढे पुष्कळ वेळ मिळेल. आता ह्या वेळी मात्र मला त्यासाठी सवड नाही. ' स्त्रियांची संगत पुरुषाच्या प्रतिष्ठेस बाध आणणारी आहे असे त्याला वाटत असावे. तो नृत्यसमा-रंभात जाई आणि स्त्रियांच्या सहवासातही वावरे, पण हे सारे तो मनाविरुद्ध करीत असे. त्याच्या मते घोड्यांच्या शर्यती, इंग्लिश क्लब, डेनिसॉव्हसोबतचे मद्यपान आणि रात्रीच्या

गाठीभेटी ह्या साऱ्या गोष्टी वेगळ्या होत्या, पण घोडदलातील धाडसी तरुण सैनिकांना त्या साजेशा होत्या.

मार्चच्या प्रारंभी इंग्लिश क्लबने प्रिन्स बॅग्रेशनच्या सत्कारार्थ भोजनसमारंभ आयोजित केला होता. थोरला काउंट इल्या अँड्रीच रोस्तॉफ त्याची व्यवस्था पाहण्यात मग्न झाला.

थोरला काउंट येरझारा घालीत क्लबच्या मॅनेजरला आणि मुख्य आचाऱ्याला कोणते पदार्थ कसे करायचे त्याच्या सूचना देऊ लागला.

क्लबच्या स्थापनेपासून काउन्ट क्लबचा सदस्य होता आणि त्याची व्यवस्थाही पाहत होता. त्याच्याप्रमाणेच दुसऱ्या कोणी भोजनाची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर आणि अगत्यपूर्वक केली नसती. तसेच पैसे कमी पडले असते तर त्याच्याखेरीज दुसऱ्या कोणी आपणहून आगाऊ रक्कम दिली नसती. म्हणून तर बॅग्रेशनच्या मेजवानीची व्यवस्था त्याच्यावर सोपविण्यात आली होती. आचारी आणि क्लबचा मॅनेजर काउन्टच्या सूचना उत्सुकतेने ऐकत होते. हजारो रूबल खर्च येणाऱ्या जेवणाच्या व्यवस्थेतून काउंट असतानाच आपणास चांगला फायदा होणार आहे याची त्यांना कल्पना होती.

काउंटने आचाऱ्याला स्ट्रॉबेरी, तिसऱ्या, गोमांस, काकड्या आणि मासे यांचे कोणकोणते पदार्थ बनवायचे याची सूचना दिली.

मॅनेजरने विचारले, 'मोठे स्टर्जन मासे आणण्याची व्यवस्था करायची काय?'

'ते महाग असले तरी आणणं भाग आहे. आणखी एखादा पदार्थ वाढायला हवा. मी विसरतच होतो.' तो आपले डोके आवळत म्हणाला, 'आता फुलांची व्यवस्था कोण बघणार आहे?' मग दृष्टीस पडलेल्या नोकरांना तो म्हणाला, 'मायटेङ्का, लागलीच पॉडमॉस्कॉव्ह-नीच्या शेतीवाडीकडे घोडा पिटाळ, आणि मॅस्कसिम्का बागवानाला सांग. बागेतील फुलं गोळा करण्यासाठी तिथल्या गुलामांना कामाला लाव. त्याच्या बागेतील सगळी फुलं इथं यायला हवीत सगळी. व्यवस्थित कापडात गुंडाळून पाठवायला सांग. शुक्रवारपर्यंत मला निदान दोनशे भांडी तरी मिळायला पाहिजेत हे त्याला सांग.'

थोरला काउंट आपल्या मुलाला म्हणाला, 'अरे माझं तर डोकं चक्रावून गेलं आहे. तू तरी आता मला मदत कर. अजून काही गायक मिळवायचे आहेत. तसा जलशाचा कार्यक्रम ठरलेला आहे. जिप्सींचं गाणं ठेवलं तर कसं होईल? तुम्हा लष्करी माणसांना तसे कार्यक्रम आवडतात.'

'खरं सांगू पपा? शॉग्रबेनच्या लढाईची तयारी करायला प्रिन्स बॅग्रेशननेसुद्धा इतका आटापिटा केला नसेल.' निकोलाय हसून म्हणाला.

थोरल्या काउंटने राग आल्यासारखे दाखविले.

'तू बोलतोस ते ठीक आहे. तूच प्रयत्न करून पहा.'

धूर्त आचारी नम्र चेहरा करून त्या दोघांचे सहानुभूतिपूर्वक निरीक्षण करत होता.

त्याच्याकडे वळून काउंट म्हणाला, 'फियोकटिस्टा, या तरुण माणसांनी ठरविलं तरी

काय ? आम्हा म्हाताऱ्यांची ते चेष्टा करतात.'

'खरं सांगू, धनीसाहेब ? या तरुण लोकांना चांगलं खायला हवं असतं. पण भोजनाची व्यवस्था करणं किंवा त्याचं वाढप करणं मात्र...'

'अगदी खरं बोललास,' काउंट म्हणाला. मग आपल्या मुलाचे दोन्ही हात पकडून त्याला म्हणाला, 'आता मी तुला काही सोडत नाही. तुला चांगलाच कामाला जुंपतो. आत लागलीच गाडी घेऊन बेझुहॉव्हकडे जा आणि त्याला सांग— 'काउंट इल्या अँड्रीचने स्ट्रॉबेरी आणि ताजी अननसे मागायला पाठविलं आहे. दुसऱ्या कोणाकडे ती मिळण्यासारखी नाहीत. जर बेझुहॉव्ह घरी नसला तर माझा निरोप कुठल्यातरी प्रिन्सेसला दे आणि मग तिथून गेइटीकडे गाडी वळव. इपाक्टा गाडीवानाला ती जागा ठाऊक आहे. तिथे इल्युश्काची चौकशी कर. काउंट ऑर्लिव्हकडे सफेद कोसॅक पोशाख चढवून नृत्य केलं होतं तो इल्युश्का जिप्सी तुला आठवत असेल त्याला इथे घेऊन ये.'

'त्याच्याबरोबर जिप्सी मुलींना पण घेऊन येऊ का ?' निकोलायने हसत विचारले.

'अरे वा, चांगलंच ज्ञान दिसतं.'

त्याच क्षणी अॅना मिहालोवना आवाज न करता खोलीत शिरली. तिचा चेहरा विनयशील दिसत असला तरी व्यवहारदक्षता आणि काळजी मुद्रेवर तिच्या उमटली होती.

ती म्हणाली, 'काउंट, मी बेझुहॉव्हला भेटायला जात आहे. बेझुहॉव्ह आल्यामुळे आपल्याला आता हवी तेवढी फुलं मिळतील. माझं स्वतःचंही त्याच्याकडे काम आहे. मी त्यासाठी त्याला भेटणार आहे. त्यानं मला बोरिसमार्फत पत्र पाठविलं आहे. परमेश्वरकृपेनं बोरिस आता अधिकारी झाला आहे.'

अॅना मिहालोवनाने एक कामगिरी स्वीकारल्यामुळे काउंटला अत्यानंद झाला. तो तिला म्हणाला, 'बेझुहॉव्हला बोलावलं आहे म्हणून सांग. पाहुण्यांच्या यादीत त्याचं नाव मी समाविष्ट करतो आहे. तो बायकोला घेऊन आला आहे का ??'

अॅना मिहालोवनाने वर पाहिले तेव्हा तिच्या चेहऱ्यावर गडद दुःखाची छाया होती. ती म्हणाली, 'काउंट, त्याच्या नशिबी सुख दिसत नाही. जे ऐकते आहे ते खरे असेल तर ते फार भयंकर आहे. त्याच्या सुखानं आपण जेव्हा आनंदित झालो, तेव्हा काही प्रतिकूल घडलं असं बिलकुल वाटलं नव्हतं. मला त्याच्याबद्दल मनस्वी वाईट वाटतं.'

'असं घडलंय तरी काय ?' थोरला काउंट आणि त्याचा मुलगा दोघांनीही एकदम विचारले.

अॅना मिहालोवनाने एक दीर्घ उसासा टाकला आणि ती काहीशा गूढ आवाजात कुजबुजली, 'मार्या इव्हानॉव्हनाचा मुलगा डोलोहॉव्ह याने तिच्याशी सूत जमवलं आहे असं म्हणतात. त्यानं पीएरला पीटर्झबर्ग येथील आपल्या घरी बोलावलं. आता ती येथे आली आहे आणि तो हरामखोरही इथं आला आहे.' तिला पीएरबद्दल केवळ सहानुभूती व्यक्त करायची होती, परंतु तिच्या उत्स्फूर्त उच्चारणातून आणि अर्धस्फुट हास्यातून हरामखोर डोलोहॉव्हबद्दल

सहानुभूती व्यक्त झाली. 'पीएर या आपत्तीमुळे फार खचून गेला आहे असं म्हणलात.'

'ते काही असू दे. त्याला क्लबवर यायला सांग. त्याचं मन दुसरीकडे गुंतून राहील. भोजनसमारंभ भव्य प्रमाणावर साजरा होणार आहे.'

ऑस्टरलीट्स येथे झालेल्या पराभवाची बातमी ऐकून सबंध मॉस्को शहर संभ्रमात पडले. त्या काळात रशियनांना विजयाचा इतका सराव झाला होता की पराभवाची बातमी येताच तिच्यावर कित्येकांचा विश्वास बसला नाही. तर काहींना अपवादात्मक परिस्थितीच अशा विचित्र प्रसंगाला जबाबदार असली पाहिजे असे वाटू लागले.

रशियन सैन्याचा पराभव झाला या विश्वास न बसणाऱ्या अश्रुतपूर्व आणि अशक्य गोष्टींची कारणे शोधण्यात येऊ लागली आणि ही कारणे मॉस्कोच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत पुन्हा पुन्हा उच्चारली जाऊ लागली. ती कारणे थोडक्यात अशी होती. ऑस्ट्रियाचा द्रोह, लष्कराच्या पुरवठा-शाखेची अकार्यक्षमता, पोलिश आणि फ्रेंच अशा दोन ऑफिसरांनी केलेला द्रोह, कुटूझॉफची अकार्यक्षमता आणि चारित्र्यशून्य व कर्तव्यशून्य माणसांवर विश्वास ठेवणाऱ्या तरुण सम्राटांचा अननुभव. शेवटचे कारण हलक्या आवाजात कुजबुजले जाई. रशियन सैन्य अजोड आहे आणि त्याने सामर्थ्याचे चमत्कार केले आहेत असे प्रत्येकजण म्हणे. सर्वांच्या मते सैनिक, ऑफिसर आणि जनरल सगळेच शूरवीर होते.

पण या सर्वांमध्ये प्रिन्स बॅग्रेशन हा नायकांचा नायक होता. शॉग्रेबेन येथील लढाई आणि ऑस्टरलीट्स येथून घेतलेली माघार यांमुळे तो प्रसिद्धीस आलेला होता. त्याचेच सैन्य फक्त चांगल्या स्थितीत आले होते. आपल्या दुप्पट असलेल्या शत्रूशी त्याने यशस्वीरीत्या मुकाबला करून त्याला पळवून लावले होते. मॉस्कोच्या लोकांनी आपला शूर नायक म्हणून त्याचे स्वागत केले होते. त्याला एक महत्त्वाचे कारण असे होते की, तो मॉस्को शहराचा रहिवासी नव्हता, मॉस्को शहरातील लोकांशी त्याचे कोणतेही नाते, संबंध नव्हते. त्यांच्या मते त्याचा सन्मान म्हणजे कसल्याही नात्यासंबंधांचा आणि कारस्थानांचा आधार नसलेल्या आणि सुव्हॉरॉफच्या नेतृत्वाखाली झालेल्या इटालियन मोहिमेच्या आठवणीशी निगडित असलेल्या साध्यासुध्या रशियन सैनिकांचा सन्मान होता. खेरीज अशा प्रकारे त्याचा सन्मान करून त्यांना कुटूझॉफबद्दल नापसंती व नावड व्यक्त करण्याची शक्य ती संधी मिळत होती.

व्हॉल्टेअरच्या शब्दांचे विडंबन करीत बुद्धिजीवी शिन्शिन म्हणाला, 'बॅग्रेशन नावाची कोणी असामी नसली तर आपणाला तशी एक असामी निर्माण करावी लागेल.'

कुटूझॉफबद्दल लोक बिलकुल बोलत नसत. बोललेच तर हलक्या आवाजात त्याला शिव्या देण्यासाठी बोलत. त्यांच्या मते तो सम्राटांच्या दरबारातील संधिसाधू, हुजऱ्या आणि रंगेल गडी होता. सबंध मॉस्को शहर प्रिन्स डॉलगोरुकॉव्हचे शब्द उच्चारू लागले होते—'झाडे पुरेशी तोडून टाकलीत की तुमच्या बोटांना निश्चितच इजा होईल.' ते शब्द आजचा पराभव विसरायला लावून जुन्या विजयाची आठवण करून देण्याचे काम करीत. तसेच भारदस्त शब्द वापरून फ्रेंच सैनिकांना लढाईस प्रवृत्त करायला पाहिजे हे रोस्तॉप्चिनचे म्हणणे त्यातून

ध्वनित होत होते. चढाई करण्यापेक्षा माघार घेणे हे अधिक धोकादायक आहे हे जर्मनांनी त्यांना सिद्ध करून दाखविलेले असावे. रशियन सैनिकांनी मात्र अविचाराने पुढे जाऊ नये म्हणून त्यांना थोपवून धरण्याची गरज होती. ऑस्टरलीट्स येथे ऑफिसर आणि सैनिक यांनी बजावलेल्या व्यक्तिगत शौर्याच्या गोष्टी सारख्या ऐकू येत होत्या. कोणी ध्वजाचे रक्षण केले होते, कोणी पाच फ्रेंच सैनिकांना ठार केले होते, तर कोणी एकटा पाच तोफा डागत होता. बर्गला न ओळखणारे लोक त्याच्या शौर्याच्या गोष्टी सांगू लागले. उजव्या हाताला जखम झाली असता देखील डाव्या हातात तलवार घेऊन बर्ग शत्रूवर तुटून पडला होता. वोलकॉन्स्कीविषयी कोणी काही बोलत नव्हते. वोलकॉन्स्की ऐन तारुण्यात मरण पावला होता. त्याच्यामागे त्याची पत्नी, लहान मूल आणि त्याचे विचित्र स्वभावाचे वडील राहिले होते. त्याला ओळखणारी माणसे मात्र त्याच्यासाठी हळहळत राहिली.

मार्चच्या ३ तारखेस इंग्लिश क्लब सभासदांच्या आणि पाहुण्यांच्या कोलाहलाने भरून गेला. कुणी गणवेष चढविले होते. कुणी फ्रॉककोट घातले होते, काहीजण पावडर लावून आले होते. काहीजण रशियन काफ्तान घालून आले होते. वसंतऋतूतील मधमाश्यांप्रमाणे माणसे एकमेकांना भेटत होती, दुसरीकडे जात होती. सारखी ये-जा करत होती. गणवेष चढविलेले नोकर प्रत्येक दाराशी उभे होते. प्रत्येक सदस्याची हालचाल आस्थेने न्याहाळीत त्यांच्या सेवेला सज्ज राहिले होते. उपस्थितांपैकी बहुतेक माणसे प्रौढ व प्रतिष्ठित होती. त्यांच्या रुंद चेहऱ्यांवर आत्मविश्वास होता, त्यांची बोटे स्थूल होती. त्यांच्या हावभावात आणि आवाजात ठामपणा होता. पाहुणे व सदस्य ठरावीक ठिकाणी ठरावीक गोटात बसत होते. उपस्थितांतील काही थोडेजण अधूनमधून येणारे पाहुणे होते. ते बहुतेक तरुण होते. डेनिसॉव्ह, रोस्तॉफ आणि आता सेम्यॉनॉव्स्की रेजिमेंटमध्ये पुन्हा ऑफिसर झालेला डोलोहॉव्ह अशा पाहुण्यांपैकी होते.

क्लबचा जुना सदस्य नेस्विट्स्की आलेला होता. पीएरने आपल्या पत्नीच्या आज्ञेनुसार केस वाढवले होते, चष्मा सोडलेला होता. अद्ययावत फॅशनमध्ये तो वावरत असला तरी दुःखी आणि निराश दिसत होता.

वयाच्या दृष्टीने तो तरुण पिढीत मोडत होता, परंतु संपत्ती आणि नातीगोती यामुळे वडिलधाऱ्या मंडळींतही त्याला स्थान प्राप्त झाले होते. त्यामुळे तो एका घोळक्याकडून दुसऱ्या घोळक्याकडे फिरत होता.

काउंट इल्या अँड्रीविच रोस्तॉफ चिंतातुर मनाने भोजनगृह आणि स्वयंपाकगृह यांच्या दरम्यान येरझारा करीत होता. येणाऱ्या महत्त्वाच्या आणि बिनमहत्त्वाच्या लोकांचे तो सारख्याच तऱ्हेने घाईघाईने स्वागत करीत होता. मधूनमधून त्याची नजर आपल्या देखण्या

धाडसी मुलाला शोधी. आनंदाने तो त्याला पाहत राही आणि त्याने पाहिले की डोळे मिचकावू लागे. निकोलाय खिडकीशी डोलोहॉव्हजवळ उभा होता. त्याची डोलोहॉव्हशी नुकतीच ओळख झाली होती. आणि ती त्याला फार मोलाची वाटली होती. थोरल्या काउंटने येऊन डोलोहॉव्हशी हस्तांदोलन केले. 'तू माझ्या मुलाचा मित्र आहेस. आता आमच्या घरी येना कधीतरी. तुम्ही एकत्र होता आणि तिथं एकत्र शौर्य गाजवलं हे ऐकून आनंद झाला.' मग थोरल्या काउंटने म्हाताऱ्या वासिली इग्न्याटिचचे स्वागत केले. त्याचे स्वागत पुरे होण्यापूर्वी सर्व मंडळींत किंचित खळबळ उडाली. दचकलेला नोकर धावत आला आणि म्हणाला, 'स्वारी आलेली आहे.'

घंटा वाजू लागल्या. नोकर पुढे धावत निघाले. निरनिराळ्या खोल्यांत विखुरलेले पाहुणे फावड्यात धान्य एकत्र यावे तसे एकत्र आले आणि सगळे मोठ्या दिवाणखान्याच्या दाराशी वाट बघत राहिले.

दिवाणखान्यालगतच्या छोट्या खोलीच्या दाराशी बॅग्रेशनची मूर्ती दिसू लागली. क्लबच्या रिवाजाप्रमाणे त्याने आपली हॅट आणि तलवार दारवानाकडे दिली होती. त्याच्या डोक्याला लोकरी टोपी नव्हती. आणि खांद्यावर चाबूकही नव्हता. रोस्तॉफने त्याला तशा स्वरूपात ऑस्टरलिट्सची लढाई सुरू होण्यापूर्वीच आदल्या रात्री पाहिले होते. बॅग्रेशनने आता अधिकारचिन्हे धारण करून डाव्या बाजूस सेंट जॉर्जचा स्टार असलेला युनिफॉर्म घातला होता.

बॅग्रेशन स्वागत दालनाच्या लाकडी जमिनीवरून संकोचाने कसातरी चालू लागला. त्याला आपले हात कसे धरावेत हे समजेना. शॉग्रबेन येथे रेजिमेंटच्या अग्रभागी गोळीबार होत असताना तो नांगरलेल्या जमिनीवरून त्यापेक्षा कितीतरी आरामाने चालला असता.

व्यवस्थापकाने दाराशी स्वागत करून माननीय पाहुण्यांच्या भेटीबद्दल आनंद व्यक्त केला. बॅग्रेशनला काही बोलण्यास अवसर न देता ते त्याला घेरून दिवाणखान्यात नेऊ लागले. एखाद्या प्राण्याकडे पाहावे त्याप्रमाणे सभासद आणि पाहुणे बॅग्रेशनला पाहण्यासाठी गर्दी करीत होते. त्या चेंगराचेंगरीतून दिवाणखान्याच्या दाराशी जाणे अशक्य होऊन बसले होते.

काउंट इल्या अँड्रीच रोस्तॉफ सर्वांपेक्षा अधिक उत्साहाने हसत होता, सारखा बोलत होता, 'अरे बाबांनो! वाट सोडा.' गर्दी बाजूला करीत त्याने पाहुण्यांना दिवाणखान्यात नेले आणि मध्यभागी असलेल्या सोफ्यावर बसविले. प्रतिष्ठित आणि अधिक सन्मान्य सभासद आलेल्या पाहुण्यांभोवती राहिले.

काउंट इल्या अँड्रीचने पुन्हा गर्दीतून मार्ग काढला, तो दिवाणखान्याच्या बाहेर आला आणि मिनिटभरात एका व्यवस्थापकाला घेऊन परत आला. त्या व्यवस्थापकाने चांदीचे तबक प्रिन्स बॅग्रेशनच्या समोर धरले. तबकात त्या शूर वीराच्या सन्मानार्थ रचून छापलेले कवन होते. कवन रचणाऱ्याने ते कवन घेऊन मोठ्याने वाचण्यास प्रारंभ केला. प्रिन्स बॅग्रेशन डोके झुकवून ऐकू लागला.

'तू अलेक्झांडरच्या साम्राज्याचा स्वाभिमान आहेस. आमच्या सम्राटांचं रक्षण कर.

आम्हाला पाठीशी घाल. आमच्या देशाला आधार दे. तू विशाल अंतःकरणाचा आहेस. लढाईत सीझरसारखा पराक्रमी आहेस. कीर्तीच्या शिखरावर असलेला नेपोलियन तुझं नाव ऐकून घाबरतो आणि रशियाची पुन्हा छेड काढायला धजत नाही.'

कवन पुरे होण्यापूर्वीच वाढपी कर्णमधुर आवाजात ओरडला, 'जेवण तयार आहे.' दरवाजा उघडला आणि भोजनगृहातून पोल्का संगीताचे सूर ऐकू येऊ लागले. 'शूर रशियन सैनिका, विजयाची गर्जना जोराने दे. आनंदाने गाऊ लाग.' अद्यापही कवन वाचीत राहिलेल्या कवीकडे रागाने पाहत काउंट इल्या अँड्रीचने बॅग्रेशनपुढे झुकून त्याला भोजनगृहात चलण्याची विनंती केली. कवनापेक्षा भोजन अधिक महत्त्वाचे आहे असे वाटून सगळी मंडळी भोजनगृहात शिरली. पाणी आपली पातळी शोधते त्याप्रमाणे ती तीनशे माणसे आपापल्या दर्जानुसार प्रमुख पाहुण्यांच्या भोवती बसली.

डेनिसॉव्ह आणि नव्याने ओळख झालेला डोलोहॉव्ह यांच्याबरोबर निकोलाय रोस्तॉफ मध्यभागी बसला होता. त्यांच्यासमोर पीएर आणि प्रिन्स नेस्विट्स्की बसले होते. इतर व्यवस्थापकांबरोबर काउंट इल्या अँड्रीच बॅग्रेशनसमोर बसला होता. मॉस्को शहरातील तो आतिथ्यशील माणूस प्रिन्स बॅग्रेशनची करमणूक करण्याची शिकस्त करीत होता.

त्याचे श्रम वाया गेले नाहीत. जेवणात उत्तमोत्तम पदार्थ होते. तरीही भोजन संपेपर्यंत बॅग्रेशनला तो काही स्वस्थचित्त करू शकला नाही. त्याने वाढप्यांना खुणा केल्या, नोकरांना हलक्या आवाजात सूचना दिल्या आणि येणाऱ्या नवीन पदार्थाची तो अस्वस्थ मनाने वाट पाहू लागला. सगळे कसे ठीक पार पडत होते. दुसऱ्या वाढपाच्या वेळी मोठा स्टर्जन मासा वाढण्यात आला. तो नुसता पाहूनच झालेला आनंद इल्या अँड्रीचला लपविता आला नाही. नोकर बूच उघडून शांपेन ओतू लागला. कौतुकाचा विषय झालेला मासा वाढून झाल्यावर काउंट अँड्रीचने इतर व्यवस्थापकांकडे पाहिले. 'आता प्रमुख पदार्थ वाढण्यास घ्या.' तो कुजबुजला आणि हातात पेला घेऊन उभा राहिला. तो काय म्हणतोय हे ऐकण्यासाठी सारे शांत झाले.

'सम्राटांना आरोग्य चिंतू या.' तो ओरडला. त्याच क्षणी आनंदाने आणि उत्साहाने त्याच्या प्रेमळ डोळ्यांत पाणी तरारले. त्या क्षणी संगीत सुरू झाले. 'शूर रशियन सैनिका, विजयाचा घोष जोराने कर.' सगळेजण उठून ओरडले 'हुर्रा!' बॅग्रेशनने त्यांना साथ दिली. त्याच सुरात त्याने शांग्रबेनच्या रणांगणावर घोषणा दिल्या होत्या. उत्साही तरुण रोस्तॉफचा आवाज त्या तीनशे माणसांच्या आवाजाहून वेगळा उमटला. त्याचे डोळे आनंदाश्रूंनी भरण्याच्या बेतात आले. 'सम्राटांना आरोग्य लाभो.' तो ओरडला. एका दमात पेला रिकामा करून त्याने तो जमिनीवर जोरात भिरकावला. कित्येकांनी त्याचे अनुकरण केले. काही काळ हा जल्लोष चालला. तो थांबल्यानंतर नोकरांनी फुटलेल्या काचा गोळा केल्या. पुन्हा सगळे आपापल्या जागी बसले. मद्याशी केलेल्या आवाजावर खूष होऊन ते बोलू लागले. पुन्हा एकदा काउंट इल्या अँड्रीच उठला. त्याने आपल्या थाळीवर नजर टाकली आणि शेवटच्या

मोहिमेचा वीर पुरुष प्रिन्स बॅग्रेशन याला आरोग्य चिंतिले. पुन्हा काउंटचे निळे डोळे अश्रूंनी भरून आले. पुन्हा तीनशे पाहुण्यांनी 'हुर्रा' म्हणून प्रतिसाद दिला. आता संगीताऐवजी गायकांचा वृन्द पॅव्हेल इव्हानाविच कुटूझॉफ याने रचलेले समूहगीत गाऊ लागला.

गायन संपल्यानंतर पुन्हापुन्हा आरोग्य चिंतण्यात आले. काउंट इल्या अँड्रीच अधिकाधिक भावविवश होत होता. अधिकाधिक पेले फुटले जात होते आणि अधिकाधिक जल्लोष होत होता. बेक्लेशॉव्ह, नॅरिश्किन उव्हारॉव्ह, डोलगोरुकॉव्ह, अप्रॉक्सिन, व्हॅल्युएव्ह, व्यवस्थापक क्लबची समिती, तिचे सदस्य आणि पाहुणे या सर्वांचे आरोग्य चिंतण्यात आले. त्या वेळी आपला चेहरा रुमालात लपवून काउंट रडू लागला.

नेहमीप्रमाणे पीएर आधाशासारखा खात आणि पीत होता. त्याची थोडीफार माहिती असणारांनादेखील त्याच्यात पडत चाललेला बदल जाणवत होता. तो शांतपणे जेवत होता. किलकिल्या डोळ्यांनी भोवताली पाहत होता, स्वतःला विसरून कुठेतरी शून्य दृष्टीने पाहत होता, आपल्या बोटांनी डोळ्याजवळील नाकाचा भाग दाबीत होता. कसल्यातरी अनिश्चित आणि दुःखदायक गोष्टींचा तो विचार करीत असावा असे दिसत होते.

मॉस्कोतील त्याच्या बहिणीने त्याची पत्नी आणि डोलोहॉव्ह यांच्या दाट ओळखीबाबत सूचक उद्‌गार काढले होते आणि त्याला त्याच दिवशी सकाळी निनावी पत्र मिळाले होते. त्यामुळे तो उद्विग्न झाला होता. निनावी पत्रात असतो तशाच प्रकारचा घाणेरडा थट्टेचा मजकूर त्यात होता. पीएरला आपल्या चष्म्यातून स्वच्छ दिसत नसावे असे मत व्यक्त करून त्याच्याखेरीज सर्वांना त्याच्या बायकोचे आणि डोलोहॉव्हचे संबंध ठाऊक आहेत ही माहिती पुरवली होती. प्रिन्सेसच्या शब्दांवर आणि त्या निनावी पत्रातील मजकुरावर पीएरचा पूर्ण विश्वास बसला नव्हता. तरीही पीएरला समोर बसलेल्या डोलोहॉव्हकडे पाहण्याचे धैर्य होत नव्हते.

मधून मधून देखण्या डोलोहॉव्हच्या उद्धट नजरेशी नजर भिडली की पीएरला आपल्या अंतःकरणात काहीतरी भयानक गोंधळ उसळतो आहे असे वाटू लागे आणि तो आपली नजर दुसरीकडे वळवू लागे. त्याच्या नकळतच त्याला आपल्या पत्नीचा भूतकाळ आठवे. तिचे डोलोहॉव्हबद्दलचे मत आठवे. आणि पीएरला पत्रातील मजकूर कसा बरोबर आहे याची लख्ख जाणीव होई. तो मजकूर आपल्या पत्नीसंबंधी नसता तर निश्चित खरा असला पाहिजे असे त्याला वाटल्याखेरीज राहिले नसते. डोलोहॉव्ह पुन्हा नोकरीत स्थिर झाल्यानंतर पीटर्स्बर्गला कसा आला आणि आपल्याला भेटायला कसा आला ते पीएरला आठवल्याखेरीज राहिले नाही. डोलोहॉव्हने पूर्वीच्या रंगेल व्रात्य दिवसांतील पीएरच्या मैत्रीचा फायदा घेतला होता आणि तो थेट पीएरच्या घरी आला होता. पीएरने त्याला स्थिर व्हायला मदत केली

होती. पैसे उसने दिले होते. डोलोहॉव्हने घरी मुक्काम ठोकला म्हणून स्मित करीत एलनने कशी नाराजी प्रकट केली होती आणि डोलोहॉव्हने काहीशा कुत्सितपणे आपल्या पत्नीच्या सौंदर्याची तारीफ आपल्याकडे कशी केली होती याचीही त्याला आठवण झाली. मॉस्कोला येईपर्यंत त्याने आपला पिच्छा सोडला नव्हता हेही त्याच्या ध्यानात आले.

पीएरच्या मनात विचार येत होते. 'तो देखणा आहे यात संशय नाही. मी त्याला चांगला ओळखतो. त्याच्यासाठी मी धडपडलो. त्याला मदत केली. त्याच्याशी मैत्री केली म्हणून त्याला माझं नाव बदनाम करण्यात आणि मला हास्यास्पद ठरवण्यात आनंद मिळत असेल. ते खरे असेल तर माझा विश्वासघात करण्यात त्याला किती उत्साह वाटत असेल याची मला कल्पना येते आहे. अर्थात ते खरे असेल तर...ते खरे असेल असे मला वाटत नाही. त्यावर विश्वास ठेवण्याचा मला अधिकार नाही. तसे करणे मला शक्यही नाही.' डोलोहॉव्हने एकदा पोलिस ऑफिसरला अस्वलाबरोबर जखडून बांधून पाण्यात फेकले होते, काही कारण नसताना एका माणसाला द्वंद्वयुद्धासाठी आव्हान दिले होते. एका गाडीच्या घोड्याला पिस्तु-लाच्या गोळीने ठार केले होते. पीएरला हे सगळे प्रसंग आठवले आणि त्या त्या प्रसंगाच्या वेळची डोलोहॉव्हची निर्दय मुद्रा आठवली. पीएरला वाटले, 'डोलोहॉव्ह म्हणजे इतरांना छळणारा सैतान आहे. माणसाला ठार मारण्यात त्याला विशेष काही वाटत नाही. प्रत्येकाने आपल्याला घाबरले पाहिजे असे त्याला वाटत असते आणि आवडतही असावे. मी त्याला घाबरले पाहिजे असे त्याला वाटते. खरे तर मी त्याला घाबरतोही.' असे विचार मनात येऊ लागले तेव्हा आपल्या मनात भयंकर ओंगळ असे काहीतरी उसळून येत आहे असा त्याला भास झाला.

पीएरच्या समोरच बसलेले डोलोहॉव्ह, डेनिसॉव्ह आणि रोस्तॉफ मोठ्या मजेत वेळ घालवीत होते. रोस्तॉफ मोठ्या मजेने त्या दोघा मित्रांशी बोलत होता. मधून मधून पीएरकडे उपरोधाने नजर टाकीत होता. त्या भोजनसमारंभात स्वतःत रंगलेल्या, विसरभोळ्या आणि स्थूलकाय पीएरचे अस्तित्व वैशिष्ट्यपूर्ण वाटत होते. रोस्तॉफला पीएर आवडत नव्हता. घोडेस्वारदलातील त्या तरतरीत सैनिकाच्या मते पीएर म्हणजे लष्कराचा गंध नसलेला श्रीमंत नागरिक आणि सुंदर पण आता वृद्ध असलेल्या स्त्रीचा नवरा होता. आपल्यातच गढलेल्या विसरभोळ्या पीएरने रोस्तॉफला ओळखले नव्हते. रोस्तॉफने प्रणाम केला तरी त्याला त्याने प्रतिसाद दिला नव्हता. झारचे आरोग्य चिंतण्यासाठी जेव्हा सर्व उभे राहिले तेव्हा आपल्या विचारात मग्न झालेला पीएर उठला नाही वा त्याने आपला पेलाही घेतला नाही.

'तू पुन्हा ओळख करून का घेत नाहीस?' डोलोहॉव्हने रोस्तॉफला विचारले.

'मरू दे त्याला. मूर्ख आहे लेकाचा' रोस्तॉफ म्हणाला.

'सुंदर बायकोच्या नवऱ्याशी गोडीगुलाबीने वागायचं असतं.' डेनिसॉव्ह म्हणाला. ते काय बोलत होते हे पीएरला ऐकू आले नाही तरी ते आपल्याबद्दल बोलताहेत हे कळून चुकले. शरमिंधा होऊन तो दूर झाला. 'आता सुंदर स्त्रियांना आरोग्य चिंतूया.' डोलोहॉव्ह म्हणाला,

त्याच्या ओठांच्या कोपऱ्यात हास्य तरळत होते तरीही गंभीर मुद्रा करीत तो पीएरकडे वळला. 'सुंदर स्त्रिया आणि त्यांचे प्रियकर यांना आरोग्य लाभो.' डोलोहॉव्ह म्हणाला.

नजर वर न करता, डोलोहॉव्हकडे न पाहता अगर त्याला काही उत्तर न देता पीएरने ग्लास संपवला. पीएर सन्मान्य पाहुण्यांपैकी एक होता. त्यामुळे नोकराने कुटूझॉफच्या समूहगीताची एक प्रत त्याच्यापुढे ठेवली. पीएरने ती उचलण्यापूर्वीच डोलोहॉव्हने झुकून त्याच्या हातातून काढून घेऊन वाचण्यास प्रारंभ केला. डोलोहॉव्हकडे पाहून पीएरने रागाने नजर वळवली. आपले बोजड शरीर टेबलावर झुकवून तो ओरडला, 'असे हिसकावून घेण्याचे धाष्ट्यं करू नकोस.'

आरडाओरडा ऐकू आला. तो कोणाला उद्देशून आहे हे लक्षात येताच नेस्विट्स्की आणि त्याच्या शेजारचा पाहुणा लागलीच भीतीने व आश्चर्याने बेझुहॉव्हकडे पाहू लागले.

'थांबा, तुम्ही काय चालवले आहे हे?' भयभीत हलक्या आवाजात लोक बोलू लागले. डोलोहॉव्ह खेळकर, क्रूर नजरेने पीएरकडे पाहत स्मित करीत होता. जणू त्याला म्हणायचे होते, 'अरे, मला असल्या गोष्टी आवडतात.'

'मी काही हातातून सोडणार नाही.' तो स्पष्ट शब्दात बोलला. प्रत हिसकावून घेताना पीएर फिकट पडला होता. त्याचे ओठ थरथरत होते.

'हरामखोर...तुला माझं आव्हान आहे.' आपली खुर्ची टेबलापासून दूर सरकवीत तो उठला. त्याच क्षणी पीएरला कळून चुकले. गेले चोवीस तास जीव खात राहिलेला आपल्या पत्नीच्या अपराधाचा प्रश्न आता कायमचा सुटला आहे. त्याचे उत्तर निश्चित होकारार्थी आले आहे.

तिच्याबद्दल त्याच्या मनात तिरस्कार निर्माण झाला. तिच्यापासून तो आता कायमचा दूर झाला. रोस्तॉफचा ह्या प्रकरणाशी काहीही संबंध नसल्याने त्याने यापासून परावृत्त व्हावे असे डेनिसॉव्हने परोपरीने सांगितले तरीही रोस्तॉफने डोलोहॉव्हचा मदतनीस होण्याचे ठरवले. भोजन झाल्यानंतर त्याने पीएरचा मदतनीस नेस्विट्स्की याच्याशी द्वंद्वयुद्धाच्या व्यवस्थेबाबत चर्चा केली.

दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता पीएर आणि नेस्विट्स्की सॉकोल्निकी जंगलातील मोकळ्या भागात पोहोचले. डोलोहॉव्ह, डेनिसॉव्ह आणि रोस्तॉफ तिथे आधीच येऊन पोचले होते. पीएर वेगळ्याच विचारात गुंगला होता. द्वंद्वयुद्धाशी त्याचे काही सोयरसुतक असल्याचे दिसत नव्हते. त्याच्या चेहऱ्यावर शून्यता आणि फिकटपणा पसरला होता. रात्रभर त्याला झोप आली नव्हती. विसरभोळ्यासारखा तो अवती-भोवती पाहात होता. प्रखर सूर्यप्रकाशात वावरल्याप्रमाणे तो डोळे किलकिले करत होता. दोन गोष्टींनी त्याचे चित्त व्यापून टाकले होते. रात्रभराच्या जागरणाने त्याला आपल्या पत्नीच्या अपराधाची पुरती खात्री झाली होती. पीएरचा लौकिक राखण्याची ज्याच्यावर मुळीही जबाबदारी नव्हती तो डोलोहॉव्ह पीएरच्या दृष्टीने निरपराधी होता. पीएरला वाटले, 'त्याच्याजागी मी असतो तर असाच

वागलो असतो. निश्चितपणे तसाच वागलो असतो. खरे तर ह्या द्वंद्वयुद्धाची — ह्या खुनाची काही गरज आहे का? कदाचित मी त्याला मारीन, नाहीतर तो माझ्या डोक्यात किंवा कोपरात किंवा गुडघ्यात गोळी घालील. पीएरच्या मनात आले आपण त्या जागेपासून दूर पळावे, कुठेतरी आपणांला पुरून दडवून घ्यावे. अशा प्रकारचे विचार त्याच्या मनात येत, तेव्हा वळून तो विचित्र, शांत आणि निर्विकार मुद्रेने पाहू लागे. त्यामुळे त्याच्याकडे बघणाऱ्या मदतनिसाच्या मनात त्याच्याबद्दल आदर निर्माण होई. वळून पाहिल्यानंतर तो विचारी, ' आता सुरुवात होईल ना? सगळी तयारी झाली की नाही?'

' चला, सुरुवात करू. ' डोलोहॉव्ह म्हणाला.

' अवश्य ', पीएर म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर पूर्वीचेच स्मित होते. सगळीकडे भीषणता पसरली होती. डेनिसॉव्ह प्रथम हद्दीपाशी आला आणि उद्गारला, ' ज्या अर्थी दोघेही प्रतिस्पर्धी समेटास तयार नाहीत त्या अर्थी प्रारंभ करणे बरे. तुमची पिस्तुले हातात घ्या आणि तीन म्हणताच एकाच वेळी पुढे सरायला लागा. ठीक... एक, दोन, तीन! ' डेनिसॉव्ह रागाने ओरडला आणि हद्दीपासून दूर झाला. दोघेही तुडविलेल्या वाटेवरून एकमेकांच्या दिशेने येऊ लागले. हद्दीपाशी आल्यानंतर प्रतिस्पर्ध्यांना केव्हाही गोळी झाडण्याची मुभा होती. पिस्तुल न उचलता आपल्या स्वच्छ चमकदार डोळ्यांनी प्रतिस्पर्ध्याकडे रोखून पाहत डोलोहॉव्ह चालला होता. नेहमीप्रमाणे त्याच्या ओठांवर स्मित झळकत होते.

' मला वाटेल त्या वेळी मी गोळी झाडू शकतो. ' पीएर स्वतःशीच म्हणाला. तो जलद चालू लागला. पीएरने पिस्तूल धरलेला उजवा हात दूर धरला होता. डोलोहॉव्हकडे झटकन दृष्टी टाकून त्याला सूचना देण्यात आल्याप्रमाणे बोटे विलग करून त्याने गोळी झाडली. अनपेक्षितपणे मोठा आवाज आल्यामुळे पीएर दचकला आणि शांत उभा राहिला. धुक्या-मुळे धूर अधिक दाट झाला होता म्हणून त्याला काही क्षण काही दिसेना. त्याने अपेक्षा केली होती त्याप्रमाणे प्रतिस्पर्ध्याकडून गोळी सुटली नाही. त्याला डोलोहॉव्हची जलद पडणारी पावले ऐकू आली आणि धुक्यातून त्याची आकृतीही दिसू लागली. एका हाताने तो आपली डावी बाजू दाबून धरत होता. दुसऱ्या हातात गच्च धरलेले पिस्तूल खाली झुकले होते. त्याचा चेहरा पांढराफटक पडला होता. धावत येऊन रोस्तॉफ त्याला काहीतरी सांगत होता.

' नाही. अजून संपलेलं नाही. ' डोलोहॉव्ह तोंडातल्या तोंडात पुटपुटत होता. कशीतरी वेडीवाकडी पावले टाकत, धडपडत बर्फात कोसळला. त्याचा डावा हात रक्ताने माखला होता. तो त्याने कोटावर घासला. त्याचा चेहरा फिकट झाला होता.

त्याला काही बोलायचे होते, पण तोंडातून शब्द फुटेना. मोठ्या प्रयासाने तो म्हणाला, ' जवळ ये.' पीएरला हुंदके आवरेनात. तो डोलोहॉव्हच्या दिशेने धावला. दोघांमध्ये असणारी

हद्द तो ओलांडणार होता तोच डोलोहॉव्ह म्हणाला, 'हद्दीजवळ रहा'. त्याचे म्हणणे पीएरच्या ध्यानात आले आणि तो तलवारीजवळ स्तब्ध उभा राहिला. दोघांमध्ये आता फक्त दहा पावलांचे अंतर होते. डोलोहॉव्हने मान खाली झुकविली, अधाशीपणाने बर्फाचा घास घेतला. त्याने पुन्हा डोके वर उचलले आणि तो उठून बसला. उभे राहण्याचा त्याने प्रयत्न केला. पण तो खाली कोसळला. पुन्हा तो तोल सावरण्याचा प्रयत्न करू लागला. थंडगार ओठ थरथरत होते तरी त्याच्या चेहऱ्यावरील स्मित मावळले नव्हते. शरीरातील बळ कमी होत होते. तो आता पार थकून गेला होता. शरीरावर पडलेल्या ताणामुळे त्याचे डोळे चमकत होते. पिस्तूल उचलून तो नेम धरू लागला. असहायपणे पाय फाकवून आणि हात कसेतरी धरून पीएर उभा राहिला. त्याच्या चेहऱ्यावर सहानुभूती आणि पश्चात्ताप यांचे सौम्य स्मित झळकत होते. त्याची भरदार छाती डोलोहॉव्हच्या अगदी समोर होती. डोलोहॉव्हकडे दुःखाने बघत तो उभा होता. त्याच क्षणी गोळीचा आवाज आणि डोलोहॉव्हचा चिडखोर आक्रोश ऐकू आला.

'नेम चुकला.' डोलोहॉव्ह ओरडला आणि असहायपणे बर्फात पालथा कोसळला. पीएर मागे वळला. काहीतरी असंबद्ध बडबडत जंगलातील बर्फ तुडवीत तो निघाला.

'सगळा मूर्खपणा आहे...कसलं हे मरण...काय हा खोटारडेपणा.' तो ओरडत चरफडत निघाला होता. नेस्विट्स्कीने त्याला थांबविले आणि घरी नेले.

रोस्तॉफ आणि डेनिसॉव्ह यांनी जखमी डोलोहॉव्हला हलविले. डोलोहॉव्ह गाडीमध्ये स्वस्थ डोळे मिटून राहिला. त्याला विचारण्यात आलेल्या एकाही प्रश्नाला त्याने उत्तर दिले नाही. गाडी मॉस्को शहरात शिरताना तो एकाएकी सावध झाला आणि आपला हात प्रयासाने उचलून जवळ बसलेल्या रोस्तॉफचा हात त्याने आपल्या हाती घेतला. त्याच्यात अकस्मात झालेला बदल पाहून आणि त्याच्या मुद्रेवरील उत्कट प्रेमळभाव पाहून रोस्तॉफला आश्चर्य वाटले.

'तिच्या मरणाला कारणीभूत होणार आहे...तिला हा धक्का सहन होणार नाही. ती यातून वाचणार नाही.'

'कुणाबद्दल बोलतो आहेस तू?' रोस्तॉफने विचारले.

'माझ्या आईबद्दल. माझी आई मला देवासारखी आहे. तिच्याइतकी पूज्य गोष्ट मला दुसरी कोणती नाही.' डोलोहॉव्हने रोस्तॉफचा हात दाबला आणि त्याच्या डोळ्यांत अश्रू आले. तो थोडासा शांत झाला आणि रोस्तॉफला म्हणाला, 'मी माझ्या आईकडे असतो. माझ्या मरणाचा धक्का आईला सहन होणार नाही. तू तिच्याकडे जाऊन तिच्या मनाची तयारी कर.'

त्याच्या इच्छेला मान देऊन रोस्तॉफ पुढे गेला. दादागिरी करणारा आणि द्वंद्वयुद्धात प्रसिद्ध असणारा डोलोहॉव्ह मॉस्कोमधे आपली वृद्ध आई आणि कुबड असलेली बहीण यांच्याकडे राहात होता. तो अतिशय प्रेमळ मुलगा आणि प्रेमळ भाऊ म्हणून जगत होता हे

कळताच रोस्तॉफला अत्यंत आश्चर्य वाटले.

अलिकडे कित्येक दिवस पीएरची आपल्या पत्नीशी एकान्तात भेट झाली नव्हती. पीटर्झबर्ग काय किंवा मॉस्को काय, दोन्ही ठिकाणच्या घरी पाहुण्यांची सतत वर्दळ असे. ही अभ्यासिका पूर्वी त्याचे वडील वापरत असत. ह्या अभ्यासिकेतच ते मरण पावले होते.

तो कोचावर पडला आणि सगळ्या घटना विसराव्या म्हणून झोपण्याचा प्रयत्न करू लागला. पण त्याला झोप येईना. भावना, विचार आणि आठवणी यांची वादळे एकाएकी त्याच्या अंतःकरणात सुरू झाली. त्याला झोप तर येईनाच. पण एका जागी स्वस्थ बसणेही अशक्य झाले. कोचावरून उठून तो जलद पावलांनी खोलीत येरझारा घालू लागला. कधी त्याला लग्नानंतरच्या पहिल्या दिवसांतील अनावृत खांद्याच्या, भावपूर्ण डोळ्यांच्या आपल्या पत्नीचे दर्शन झाल्याचा भास होई. लागलीच त्याला भोजनगृहात दिसला होता तसाच देखणा, निलाजरा, निबर आणि उपरोधिक चेहऱ्याचा डोलोहॉव्ह तिच्या बाजूला दिसू लागे. पुन्हा डोलोहॉव्हचा चेहरा बदले. बर्फात कोसळणाऱ्या डोलोहॉव्हचा फिकट, कष्टी आणि थरथरता चेहरा दिसू लागे.

तो स्वतःला विचारू लागला, ' असं घडलं आहे तरी काय ? मी तिच्या प्रियकराला ठार मारलं. होय, मी माझ्या पत्नीच्या प्रियकराला ठार मारलं. असंच घडलं आहे खरं. का केलं मी हे ? माझ्या हातून असं का घडावं ? ' त्याचा आतला आवाज उत्तरला, ' तू तिच्याशी लग्न केलंस म्हणून हे घडलं. पण मी दोषी कसा काय ठरतो ? ' त्याने विचारले.

' तिच्यावर प्रेम नसताना तू लग्न केलंस आणि तुला आणि तिला फसवलंस. ' त्याच क्षणी त्याला स्पष्टपणे आठवले : प्रिन्स व्हॅसिलीकडे रात्रीचे जेवण झाल्यानंतर त्याने ते शब्द उच्चारले होते. ते उच्चारताना त्याला अत्यंत प्रयास पडले होते. ' माझं तुझ्यावर प्रेम आहे. ' त्याला वाटू लागले, त्यापासूनच या साऱ्याला सुरुवात झाली असावी. आपण करतो ते योग्य नव्हे. आपल्याला तसा हक्क नाही. खरे तर तेव्हाच आपणाला हे जाणवले होते. त्यातूनच या घटना घडल्या. त्याला मधुचंद्राची रात्र आठवली आणि तो शरमून गेला. लग्नानंतरच्या त्या एका दिवसाची आठवण अजूनही ठळक होती. अजूनही अपमानास्पद वाटत होती. शरमेची वाटत होती. रेशमी ड्रेसिंग गाऊन घालून तो शय्यागृहातून दुपारी बारा वाजता अभ्यासिकेत आला होता. त्याचा प्रमुख व्यवस्थापक अभ्यासिकेत होता. त्याने नम्रपणे झुकून प्रणाम केला होता. त्याच्या चेहऱ्याकडे आणि ड्रेसिंग गाऊनकडे बघून त्याने मंदस्मित केले होते. जणू त्याला आपल्या धन्याच्या सुखाबद्दल सादर आस्था व्यक्त करायची होती.

' तिच्या अप्रतिम लावण्याचा आणि लोकांत मिसळणाऱ्या तिच्या चातुर्याचा मला किती अभिमान वाटत असे! पीटर्झबर्गमधील लोकांचे ज्या घरात ती आतिथ्य करी त्या घराचा मला

किती अभिमान वाटत असे. ती आपली प्रतिष्ठा राखून असे, म्हणून मला किती अभिमान वाटे. तेव्हा मला वाटायचे की, ती आपल्या आकलनापलीकडची आहे. तिच्या स्वभावाचा विचार करून मी मलाच दोष देत असे. ती सतत शांत नि संतुष्ट राहायची, कशाची तिने इच्छा बाळगली नाही वा पसंती दाखविली नाही. यामागची कारणे मला कळली नाहीत. ह्या सर्व कोड्याचे उत्तर एका शब्दात होते.— त्या भयंकर शब्दात होते.— ती जारिणी होती. तो शब्द सुचताच मला सगळ्या गोष्टी स्पष्टपणे समजू लागल्या.'

'अनातोल तिच्याकडे पैसे उसने मागायला यायचा आणि तिच्या उघड्या खांद्यांचे चुंबन घ्यायचा. तिने त्याला पैसे दिले नाहीत. पण चुंबनांना आडकाठी केली नाही. तिचे वडील गंमतीने तिचा मत्सर जागृत करण्याचा प्रयत्न करायचे. करारी स्मित करत ती म्हणायची, 'मत्सर वाटायला मी काही मूर्ख नाही.' माझ्याबद्दल ती म्हणायची, 'त्याला काय वाटेल ते करू दे.' एकदा मी तिला गरोदरपणाची काही चिन्हं जाणवतात काय म्हणून विचारले. ती तुच्छतेने हसली आणि म्हणाली, 'मुलांची इच्छा करणारी मी मूर्ख बाई नाही. तुमच्यापासून तर कधीच मुलं होऊ देणार नाही मी.' ती उच्च वर्गात वावरलेली होती तरीसुद्धा तिच्या तोंडी तिला खास शोभणारी ग्राम्य भाषा होती. ती तोंडाला येईल ते रांगडे शब्द उच्चारत असे. ते त्याला आठवले. 'तुझ्यासारखा मूर्ख कोणी नाही.... इथून तू चालता हो.' ती म्हणायची. सर्व तरुण, वृद्ध स्त्री-पुरुषांचे तिच्याबद्दल अनुकूल मत होत असे. आपणालाच मात्र ती का आवडत नाही हे पीएरला समजेना. तो स्वतःशीच म्हणे, 'मला ती कधीच आवडली नाही. तिचा चवचालपणा मला माहीत होता. पण स्वतःशी कबूल करण्याचे धैर्य मला नव्हते.'

'डोलोहॉव्ह कसा बर्फात बसून हसण्याची शिकस्त करत होता. माझ्या पश्चात्तापाला दाद देण्यासाठी असेल कदाचित चेहऱ्यावर आत्मतृप्तीचं अवसान आणून तो मरत असेल...

'तीच एकटी या सगळ्याला जबाबदार आहे. दुसऱ्या कोणाचा दोष नाही. मी तिला माझ्याशी जखडून घ्यायला नको होतं. माझं तिच्यावर प्रेम आहे असं सांगून मी खोटेपणा का केला? यासाठी मीच दोषी आहे. मलाच आता सगळं सोसलं पाहिजे. माझा दुर्लौकिक आणि दुःखं यांनाही काही अर्थ नाही. दुर्लौकिक काय वा मानसन्मान काय या गोष्टी सापेक्ष आहेत. यांचा माझ्या स्वतःशी काही संबंध नाही.'

'कोण दोषी, कोण निर्दोषी हे सांगता येणे कठीण आहे. जगता येईल तोपर्यंत जगावे. तासापूर्वी मी मेलो असतो तसा माणूस कोणत्याही क्षणाला मरून जाईल. अनंत काळाच्या तुलनेने आपले जीवन एका क्षणाचेही नाही. असं असताना स्वतःसाठी चिंताग्रस्त होणं कितपत योग्य आहे?' अशा प्रकारच्या चिंतनाने त्याच्या मनाला विरंगुळा मिळतो न मिळतो तोच त्याला एकाएकी तिचा भास झाला. त्याने आपले तिच्यावर प्रेम असल्याचे खोटे उद्‌गार जेव्हा मोठ्या उत्कटतेने काढले होते तेव्हाची तिची मुद्रा त्याला दिसू लागली. तो स्वतःलाच विचारू लागला, 'माझं तुझ्यावर प्रेम आहे असं मी तिला का म्हणून सांगितलं?'

त्या रात्री त्याने नोकरांना बोलावून पीटर्सबर्गला निघण्याची तयारी करण्याचे सांगितले.

आपण तिच्याशी कसे बोलणार आहोत याची त्याला कल्पना नव्हती. तिला एक पत्र ठेवून दुसऱ्या दिवशी निघून जावे असे त्याने ठरविले. तिच्यापासून सदैव विभक्त होण्याची आपली इच्छा तो तिला पत्राने कळविणार होता.

सकाळी कॉफी घेऊन नोकर अभ्यासिकेत आला तेव्हा त्याला पुस्तक हातात उघडे ठेवून पीएर झोपी गेलेला आढळला.

पीएर उठला आणि भोवताली आश्चर्याने पाहू लागला. आपण कुठे आहोत ते त्याच्या ध्यानात येईना.

' मालकीणबाईंनी तुम्ही घरी आहात काय बघायला पाठविलं. ' नोकर म्हणाला. काय उत्तर पाठवावे याचा पीएर विचार करीत असताना स्वतः काउंटेस अभ्यासिकेत धिमेपणाने आणि दिमाखाने प्रवेश करती झाली. रुपेरी भरतकाम केलेला पांढऱ्या सॅटीनचा ड्रेसिंग गाऊन तिने घातला होता. तिने आपले केस दोन मुगुटांसारखे वळवून घेतले होते. ती शांत होती तरीही तिच्या गोऱ्यापान भालप्रदेशावर रोषाची आठी होती. नोकर बाहेर पडेपर्यंत नित्याच्या धिम्या आणि संयमी प्रकृतीनुसार ती काही बोलली नाही. तिला द्वंद्वयुद्धाची बातमी कळली होती. त्याबद्दल ती बोलायला आली होती. नोकर कॉफी ठेवून बाहेर निघून जाईपर्यंत ती थांबली. पीएरने चष्म्यातून भिऱ्या नजरेने तिच्याकडे पाहिले. कुत्र्यांनी कोंडलेला ससा जसा ते जवळ असेपर्यंत कान पाडून राहतो तसा पीएर वाचण्याचा प्रयत्न करू लागला. तसे करणे मूर्खपणाचे आणि अशक्यही आहे हे त्याला कळले. पुन्हा तो भेदरलेल्या नजरेने तिच्याकडे पाहू लागला. नोकर केव्हा जातो याची वाट बघत ती तुच्छतापूर्ण स्मित करत त्याच्याकडे बघत उभी राहिली.

' तुम्ही आता हे काय चालविलं आहे ? तुमचा विचार तरी काय आहे ? मी तुम्हाला विचारते आहे. ' तिच्या विचारण्यात जरब होती.

' मी ? मी ? कुठं ? काय ? '

' तुम्हाला शौर्य गाजवायचं आहे. तुमच्या द्वंद्वयुद्धाचा अर्थ काय तो मला सांगा. मी तुम्हालाच विचारते आहे. द्वंद्वयुद्धानं तुम्हाला काय साधायचं होतं ? ' पीएर कष्टाने सोफ्यावर दुसऱ्या बाजूस वळला. त्याने तोंड उघडले, पण शब्द उमटले नाहीत. एलन बोलत होती, ' तुम्ही जर उत्तर दिलं नाही तर लक्षात ठेवा. कोणी काहीही सांगावं, तुमचा त्याच्यावर विश्वास बसतो. ' ती हसून पुढे म्हणाली, ' डोलोहॉव्ह माझा प्रियकर आहे असं कोणीतरी तुम्हाला सांगितलं. ' फ्रेंच भाषेतील प्रियकर या अर्थाचा आमंत ( amant ) शब्द तिने नेहमीच्याच इतर शब्दांप्रमाणेच रांगडेपणाने उच्चारला. ' द्वंद्वयुद्धानं तुम्ही काय साधलंत ? एवढंच प्रसिद्ध केलंत की तुम्ही मूर्ख आहात. पण ही गोष्ट सर्वांनाच ठाऊक होती. त्याचे परिणाम काय झाले माहीत आहे का ? सबंध मॉस्को शहरात मी थट्टेचा विषय झाले आहे. तुम्ही प्यालेले असल्यानं आणि आपण काय करतो त्याची शुद्ध नसल्यानं, संशयाला आधार नसतानाही एका माणसाला द्वंद्वयुद्धाला आव्हान दिलंत असं सर्वजण म्हणत आहेत. ' एलनचा

आवाज चढला, अधिकाधिक प्रक्षुब्ध होत ती म्हणाली, ' सर्व बाबतीत तो माणूस तुमच्याहून श्रेष्ठ आहे. तो माझा प्रियकर आहे याच्यावर तुमचा विश्वास कसा बसला? मला त्याची सोबत आवडते म्हणून? तुम्ही अधिक हुशार असता, अधिक मनमिळाऊ असता तर तुमची सोबत मला अधिक आवडली असती.'

पीएर घोगऱ्या आवाजात म्हणाला, ' तुला बजावतो, आता एक शब्दही बोलू नकोस.'

' का बोलू नको? मी मनाला येईल तसं बोलत राहणार. तुम्हाला बजावून सांगते, तुमच्यासारखा नवरा असता तर कोणत्याही बाईनं प्रियकर गाठला असता. पण मी तसं केलेलं नाही.' पीएरने काही बोलण्याचा प्रयत्न केला आणि स्वस्थ पडून तिच्याकडे विचित्र नजरेने तो पाहत राहिला. त्याच्या नजरेचा अर्थ तिला काही उमगला नाही. त्याच क्षणी त्याला शारीरिक वेदना होत होत्या. छातीवर एवढे मोठे भले दडपण जाणवत होते, की त्याला श्वास घेता येत नव्हता. या वेदना नष्ट करण्यासाठी काहीतरी करायला हवे असे त्याला वाटू लागले. त्याने मनात आणलेला निश्चय अतिशय भयानक होता.

' आपण विभक्त होऊ या, ' तो भयानक घोगऱ्या आवाजात म्हणाला.

' तुमची संपत्ती मला देत असाल तर माझी काही ना नाही.'

पीएर कोचावरून ताडकन उठला आणि धडपडत तिच्या रोखाने धावला. ' तुला ठार करून टाकतो.' तो ओरडला. कधी नव्हे ती त्याच्यात शक्ती आली आणि त्याने टेबलाखालील संगमरवरी शिला उचलली. तिच्या दिशेने उगारत त्याने पाऊल टाकले. ' याने मस्तक फोडतो.'

एलनचा चेहरा भीतीने पांढराफटक पडला. किंचाळी मारून तिने धूम ठोकली.

त्याने संगमरवरी लादी खाली फेकली तशी तिचे तुकडे-तुकडे झाले. दोन्ही हात फाकवून तिच्या दिशेने झेप घेत तो ओरडला, ' चालती हो.'

त्याचा आवाज इतका भयानक होता की घरातील सर्व माणसे भयभीत झाली. एलनने खोलीच्या बाहेर धूम ठोकली. आठवड्यानंतर पीएरने आपल्या शेतीवाडीचे निम्मे उत्पन्न तिच्या नावे केले. आपल्या मालमत्तेचा निम्म्याहून अधिक हिस्सा तिला दिल्यावर पीएर एकटाच पीटर्सबर्गला गेला.

ऑस्टरलीट्झ येथे रशियन सैन्याचा पराभव झाला होता. प्रिन्स आन्द्रेचा ठावठिकाणा लागला नव्हता. या दोन्ही बातम्या ब्लीकहिल्सला पोचून दोन महिने झाले होते. रशियन वकिलातींमार्फत पत्रे गेली होती. शोध करण्यात आला होता. पण त्याचे प्रेत सापडले नव्हते. तो कैद्यांमध्ये नव्हता. रणांगणावरून त्याला अपरिचित लोकांनी उचलून नेले असेल आणि त्याच लोकांमध्ये तो बरा होत वा अखेरचे दिवस मोजीत पडला असेल, त्याला आपल्या-

बद्दलची माहिती सांगता येत नसेल अशा तऱ्हेचे विचार त्याच्या वडिलांच्या आणि बहिणीच्या मनात येत होते. थोरल्या प्रिन्सने वर्तमानपत्रात ऑस्टरलीट्झ येथील पराभवाची बातमी वाचली होती. रशियन सैन्याला नेत्रदीपक विजय मिळूनही माघार घ्यावी लागली होती. आणि ते सैन्य मोठ्या शिस्तीत मागे वळले होते. याबद्दलचा अतिशय त्रोटक आणि अस्पष्ट वृत्तान्त सर्वच वर्तमानपत्रांनी दिला होता. या अधिकृत वृत्तान्तावरून आपल्या सैन्याचा पाडाव झाल्याचे थोरल्या प्रिन्सला कळून चुकले. ऑस्टरलीट्झच्या पराभवाची बातमी वर्तमानपत्रात आल्यावर सात-आठ दिवसांनी कुटूझॉफकडून प्रिन्स आन्द्रेच्या कामगिरीचे वर्णन करणारे पत्र थोरल्या प्रिन्सला मिळाले.

कुटूझॉफने लिहिले होते, 'रेजिमेंटच्या अग्रभागी हाती निशाण घेतलेला तुमचा मुलगा मी माझ्या डोळ्यांनी वीरासारखा पडलेला पाहिला. आपल्या पित्याला व मातृभूमीला साजेसे त्याचे कर्तव्य होते. तो जिवंत असल्याची अजून निश्चित बातमी मिळत नाही. यामुळे व्यक्तिशः मला आणि सबंध सैन्यास अत्यंत वाईट वाटत आहे. तो अजून जिवंत असेल अशा विश्वासावर आपण राहूया. रणांगणावर सापडलेल्या ऑफिसरांची यादी तहाच्या वेळी मिळाली होती, त्यात तुमच्या मुलाचे नाव नाही म्हणून आशा वाटते.'

थोरला प्रिन्स रात्री एकटाच आपल्या खोलीत असताना त्याला हे पत्र मिळाले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी तो नेहमीप्रमाणे फिरायला गेला. नोकराचाकरांशी तो काही बोलला नाही. मात्र त्याची चर्या रागावलेली दिसत होती. नेहमीच्या वेळी प्रिन्सेस मार्या त्याला भेटायला गेली तिच्याकडे न पाहता त्याने लेथवर काम सुरू ठेवले. 'कोण ? मरिया का ?' लेथच्या चाकावरील हात काढून घेत तो कृत्रिम आवाजात बोलला. चाक काही वेळ फिरत राहिले.

प्रिन्सेस मार्या वडिलांजवळ गेली. वडिलांचा चेहरा पाहताच तिचे अंतःकरण हेलावून गेले. 'पपा, आपला आन्द्रे' मार्या म्हणाली. तिच्या वेदना इतक्या शब्दातीत होत्या की थोरल्या प्रिन्सला तिच्या डोळ्याशी डोळा मिळवणे शक्य झाले नाही. तो पाठमोरा होऊन हुंदके देऊ लागला.

'त्याच्याबद्दलची बातमी आली आहे. तो कैद्यांमध्ये नाही. मृतांमध्येही नाही. कुटूझॉफचं पत्र आहे. तो मारला गेला असावा.' तो कर्कश किंचाळला. जणू त्या किंकाळीने त्याला आपल्या मुलीला बाहेर घालवून द्यायचे होते.

ते शब्द ऐकताच तिचा चेहरा बदलून गेला. तिचे सुंदर आणि तेजस्वी डोळे उजळले. ऐहिक सुखदुःखाच्या पलीकडचा एक अलौकिक आनंद तिच्या अंतःकरणातील दारुण दुःख नाहीसे करता झाला. वडिलांबद्दल वाटणारी भीती नाहीशी झाली. तिने जवळ जाऊन त्यांचा हात धरला. त्यांना जवळ घेतले. त्यांच्या शुष्क, बळकट मानेला विळखा घालीत ती म्हणाली, 'पपा, मला दूर लोटू नका. आपण दोघे मिळून त्याच्यासाठी शोक करू.'

तिच्यापासून आपला चेहरा दूर करीत तो वृद्ध ओरडला, 'हरामखोर, बदमाश, सैन्याचा नाश करतात, माणसे मरतात, कशासाठी हे सारं ? जा. लिझला जाऊन सांग जा.'

प्रिन्सेस मार्या असहाय्यपणे जवळच्या आरामखुर्चीत कोसळली. तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. आपल्याला आणि लिझला निरोप देणाऱ्या भावाची प्रेमळ तरीही आढ्यताखोर मुद्रा त्या क्षणी तिला दिसू लागली. प्रेमळपणे पण उपरोधाने तिने दिलेली प्रतिमा त्याने गळ्यात घातली तो क्षण डोळ्यांसमोर साकार झाला.

'त्याचा प्रतिमेवर विश्वास बसला होता का? आपल्याबद्दल त्याला पश्चात्ताप झाला असेल का? कुठं असेल तो आता? चिरंतन शांती आणि सुख यांच्या राज्यात तो वावरत असेल का?' ती विचार करू लागली.

डोळ्यांतून आसवे वाहत असताना ती म्हणाली, 'पपा, काय घडलं ते मला सांगा.'

'काही सांगण्याची गरज नाही. तू इथून निघून जा. तो पराभवामध्ये मारला गेला. त्यांनी उत्कृष्ट रशियन सैन्याची आणि रशियाच्या कीर्तीची हानी केली. तेच पराभवाला कारणीभूत आहेत. मार्या, इथून निघून जा आणि लिझला सांग मी थोड्याच वेळात येतो.' प्रिन्सेस मार्या वडिलांकडून लिझकडे आली. लिझ काहीतरी काम करीत होती. गरोदर स्त्रिया ज्या अंतर्मुख आत्मतृप्तीने पाहतात तशी पाहत होती.

भरतकामाच्या चौकटीपासून बाजूला होत मागे झुकत ती म्हणाली, 'मार्या, मला तुझा हात दे.' नणंदेचा हात घेऊन तिने तो आपल्या ओटीपोटावर ठेवला. तिचे डोळे उत्सुकतेने चमकले. बालकाच्या निरागस आनंदाने तिचा ओलसर ओठ विलग झाला. प्रिन्सेस मार्या तिच्यापुढे गुडघे टेकून राहिली आणि तिच्या कपड्याच्या चुण्यात तिने आपला चेहरा लपविला. आपल्या नणंदेच्या चमकदार आनंदी डोळ्यांत पाहात लिझ म्हणाली, 'तिथंच... तिथंच तुला जाणवलं का? मला इतकं विचित्र वाटतं आहे. हे बघ मार्या, त्याच्यावर मी जिवापाड प्रेम करणार आहे.' मार्याला रडू आवरत नव्हते.

'असं काय करतेस मार्या? झालं तरी काय?'

'काही नाही... मला दुःख झालंय एवढंच... आन्द्रेची आठवण येऊन दुःख झालं?' तिच्या चुण्यावरील आपले अश्रू झटकीत मार्या म्हणाली. त्या सकाळी कितीतरी वेळा आपल्या वहिनीच्या मनाची तयारी करण्याचा मार्या प्रयत्न करी आणि तिला रडू कोसळे. लिझ तशी फारशी चोखंदळ चौकस नव्हती. तरीही मार्याच्या अश्रूंचे कारण न उमगल्याने अस्वस्थ झाली. काही न बोलता काहीतरी शोधल्यागत ती मुकाट राहिली. आणि एकाएकी तिला रडू कोसळले.

'आन्द्रेची काही बातमी आली का?'

'नाही. इतक्या लवकर काही बातमी येणं अशक्य आहे. पपा त्यामुळंच बेचैन झाले आहेत. माझा जीव बावरून गेला आहे.'

'तुम्हाला काही बातमी कळली नाही तर?'

'काहीच कळलं नाही.' आपल्या चमकदार डोळ्यांनी तिच्याकडे रोखून पाहत मार्या म्हणाली. लवकरच लिझ प्रसूत होणार होती तोपर्यंत ती भयानक बातमी तिला सांगायची

नाही असे तिने ठरविले होते आणि आपल्या वडिलांनाही तसे करण्यास प्रवृत्त केले होते. प्रिन्सेस मार्या आणि तिचे वडील आपापल्यापरीने आपले दुःख दडवीत आणि सोशीत होते. थोरल्या प्रिन्सने आशा सोडून दिली होती, प्रिन्स आन्द्रे लढाईत ठार झाला याबद्दल त्याच्या मनात आता संशय नव्हता. त्याने आन्द्रेचा शोध करण्यासाठी एका कारकुनाला ऑस्ट्रियात पाठवले होते. तरीही त्याने आपल्या मुलाचे स्मारक उभारण्यासाठी मॉस्कोतील कारागिरांकडे काम सोपवले होते. तो सर्वांना आपला मुलगा युद्धात कामी आल्याचे सांगत होता. जुन्या जीवनक्रमात बदल न करण्याचा त्याने प्रयत्न केला तरीही तो खचत चालला होता. त्याचे फिरणे कमी झाले. भूक, झोप कमी झाली. दिवसेंदिवस तो अशक्त होऊ लागला. मार्याने मात्र आशा सोडली नव्हती. ती आपल्या भावासाठी प्रार्थना करीत होती. तो कोणत्याही क्षणी घरी येईल अशी आशा ती बाळगून होती.

एका सकाळी लिझने तक्रार केली. 'मार्या, आजच्या न्याहारीने माझी प्रकृती बिघडली आहेसे दिसत आहे.'

'काय, झाले तरी काय? तू अशी का दिसते आहेस? तू किती पांढरी-फटक पडली आहेस.' आश्चर्यचकित झालेली मार्या म्हणाली.

तिथे असलेल्या एका दासीने विचारले, 'बाईसाहेब, आपण मार्या बॉग्डनॉवनाला बोलावून घ्यायचं काय?' मार्या बॉग्डनॉवना जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणी राहणारी सुईण होती. गेले पंधरा दिवस ब्लीकहिल्सला तिचा मुक्काम होता.

प्रिन्सेस मार्याने लागलीच रुकार दिला. 'कदाचित तेच कारण असणार. मीच जाऊन तिला घेऊन येते.' लिझचे चुंबन घेत ती म्हणाली, 'लाडके, धीर सोडू नकोस.'

'नको, नको' आधीच फिकट झालेली तिची मुद्रा निश्चितपणे येणाऱ्या शारीरिक वेदनांच्या कल्पनेमुळे लहान मुलासारखी भयभीत झाली.

'मार्या, हा अपचनाचा त्रास आहे. होय ना? होय म्हण ना.' लहान मुलाप्रमाणे दुःखाने अकांडतांडव करीत आपले हात वळवीत लिझ रडू लागली.

'अरे देवा!' तिला मागून शब्द ऐकू आले. तिला भेटण्यासाठी सुईण केव्हाच निघाली होती. आपले गुबगुबीत गोरे हात ती चोळीत होती. तिची मुद्रा शांत नि अर्थपूर्ण होती.

सुइणीकडे विस्फारलेल्या, भेदरलेल्या डोळ्यांनी पाहत प्रिन्सेस मार्या म्हणाली, 'मार्या बॉग्डनॉवना, मला वाटतं वेणांना प्रारंभ झाला असेल.'

आपली चाल मंद न करता मार्या बॉग्डानॉवना म्हणाली, 'परमेश्वरी कृपा. तुम्हा तरुण पोरींना ते समजून घ्यायची गरज नाही बरं.'

'अजून मॉस्कोहून डॉक्टर कसे आले नाहीत?' प्रिन्सेस मार्याने विचारले. लिझ आणि

प्रिन्स आन्द्रे यांच्या इच्छेला मान देऊन त्यांनी मॉस्कोच्या डॉक्टरांना बोलावणे पाठवले होते. ते केव्हाही येण्याचा संभव होता.

' ते नाही आले तरी, प्रिन्सेस, काळजी करू नको. डॉक्टर नसले तरी आम्ही आमचं काम व्यवस्थित पार पाडू. ' मार्या बॉग्डानॉवना म्हणाली.

पाचएक मिनिटांनी कुणी काहीतरी जड वस्तू नेत असल्याचा आवाज प्रिन्सेस मार्याला आपल्या खोलीतून ऐकू आला. तिने डोकावून पाहिले. नोकरमाणसे कशासाठी कोण जाणे प्रिन्स आन्द्रेच्या अभ्यासिकेतील कातडी कव्हर असलेला सोफा हलवीत होते. सर्व नोकर शांत-गंभीर होते.

प्रिन्सेस मार्या घरात होणारे आवाज ऐकत शांतपणे खोलीत बसली होती. मात्र मधून मधून कोणी दरवाज्याजवळून जाऊ लागले की ती दार उघडून कॉरिडॉरमध्ये काय चालले आहे ते पाहू लागे. कितीतरी स्त्रिया हलक्या पावलांनी तिथून गेल्या. प्रिन्सेस मार्याकडे पाहून तिला टाळून त्या पुढे गेल्या. त्यांना प्रश्न विचारण्याचे धैर्य तिला झाले नाही. दार लावून येऊन ती खोलीत स्वस्थपणे आरामखुर्चीत बसली. मग तिने प्रार्थनासंगीताचे पुस्तक चाळले; मग पूजास्थानासमोर गुडघे टेकून राहिली. प्रार्थनेमुळे आपल्याला शांती मिळत नाही ह्याची जाणीव होताच ती निराश झाली, आणि दचकली.

एकाएकी कुणीतरी हलकेच दरवाजा उघडला. तिने पाहिले तो दारात वृद्ध सुईण प्रस्कोव्हया साव्हिश्ना उभी होती. तिच्या डोक्याला सफेद रुमाल गुंडाळलेला होता. थोरल्या प्रिन्सची मनाई असल्याने ती कधीच खोलीत येत नसे. ती आताही तशीच दारात घुटमळत राहिली.

ती वृद्ध नर्स उसासा टाकीत म्हणाली, ' माशेन्का, तुझ्याजवळ थोडा वेळ बसायला मी आले आहे. प्रिन्स् आन्द्रेच्या लग्नातील मेणबत्त्या त्याच्या संतांसमोर लावायला मी आणल्या आहेत. '

' बेटा, परमेश्वर दयाळू आहे. ' नर्सने सुवर्ण-मंडित मेणबत्त्या पूजास्थानासमोर लावल्या आणि ती मोजे न काढताच दाराशी बसली. प्रिन्सेस मार्या पुस्तक वाचीत बसली. जेव्हा पावले नाही तर कुणाचे बोलणे ऐकू येई तेव्हा प्रिन्सेस आणि नर्स एकमेकींकडे पाहत. एकजण दचकून जिज्ञासेने पाही. दुसरीच्या मुद्रेवर धीर देणारे आश्वासन उमटे. खोलीत बसलेल्या मार्याला जे वाटत होते त्यानेच घरातील सर्वांचा कबजा घेतला होता. बाळंत होणाऱ्या स्त्रीच्या वेदना जितक्या कमी लोकांना ठाऊक असतील तेवढ्या तिच्या वेदना कमी होतात ह्या समजुतीमुळे प्रत्येकजण आपणास काही ठाऊक करून न घेण्याची शिकस्त करीत होता. प्रिन्सच्या घरात नित्याप्रमाणे गंभीर शांतता पसरली होती आणि प्रत्येकजण शिष्टाचारांचे पालन करीत होता. तरीही सर्वांना काळजी वाटत असल्याचे दिसत होते, प्रत्येकाचे अंतःकरण हळुवार बनले होते आणि महान, अनाकलनीय रहस्य आकारास येत असल्याची जाणीव प्रत्येकास होत होती. मोठ्या दालनात बसलेल्या दासींचा हसण्याचा जराही आवाज ऐकू येत

नव्हता. स्वागत दालनातील सगळी माणसे शांत राहून ध्यान देऊन बसली होती. नोकरांच्या निवासस्थानात मेणबत्त्या आणि मशाली पेटत होत्या. कुणी झोपी गेलेले होते. थोरला प्रिन्स आपल्या अभ्यासिकेत हलक्या पावलांनी येरझारा घालत होता. मधून मधून तिहॉनला मार्या बॉग्डनॉवनाकडे बातमी विचारण्यासाठी पाठवीत होता.

'मी बातमीसाठी पाठविलं एवढंच सांग, आणि ती काय म्हणते ते सांगायला ये.'

तिहॉनकडे अर्थपूर्ण दृष्टी टाकत मार्या बॉग्डनॉवना म्हणाली, 'थोरल्या प्रिन्सना सांग– वेणा सुरू झाल्या आहेत.' तिहॉनने येऊन ती वार्ता सांगितली.

'फार छान.' दरवाजा झाकीत थोरला प्रिन्स म्हणाला. त्यानंतर तिहॉनला खोलीतून कसलाही आवाज ऐकू आला नाही. काही वेळाने तिहॉन मेणबत्त्यांकडे लक्ष देण्याच्या निमित्ताने खोलीत गेला. त्याने पाहिले, थोरला प्रिन्स पहुडलेला होता. त्याच्या अस्वस्थ चेहऱ्याकडे पाहून तिहॉनने डोके हलविले, काही न बोलता तो त्याच्याकडे गेला आणि त्याने त्याच्या खांद्यावर ओठ टेकले. मेणबत्त्यांकडे लक्ष न देता आणि आपण कशासाठी आलोत हे न सांगताच तो खोलीच्या बाहेर पडला.

ती मार्च महिन्यामधील रात्र होती. पुन्हा एकदा हिंवाळा हल्ला करून आपली शिकस्त करून दुष्टपणाने हिमवर्षाव करीत होता आणि वादळे निर्माण करीत होता. कोणत्याही क्षणी येणाऱ्या जर्मन डॉक्टरसाठी मुख्य रस्त्याकडे घोड्यामागून घोडे पाठविण्यात येत होते. बर्फा-खालील धोक्याच्या खळग्यांपासून इशारा देण्यासाठी तिठ्यातिठ्यावर हातात कंदील घेतलेल्या घोडेस्वारांना पाठविण्यात येत होते.

प्रिन्स मार्याने वाचन केव्हाच थांबविले होते. आपल्या चमकदार डोळ्यांनी ती वृद्ध नर्सच्या चेहऱ्यावरील तिला पूर्वीपासून परिचित असलेल्या बारीकसारीक सुरकुत्या रोखून पाहत होती. डोकीला बांधलेल्या रुमालातून बाहेर आलेला पांढऱ्या केसांचा झुबका आणि हनुवटीखाली लोंबणारी पिशवीसारखी सैल कातडी तिच्या नजरेतून सुटत नव्हती. वृद्ध नर्स हातात मोजे घेऊन हलक्या आवाजात बोलत होती. तिचे बोलणे तिलाच ऐकू येत नव्हते आणि त्याचा अर्थ तिलाच कळत नव्हता. पूर्वी कित्येक वेळा सांगितलेली गोष्टच ती सांगत होती. प्रिन्सेस मार्याच्या जन्माच्या वेळी तिच्या आईची अवस्था कशी झाली होती आणि त्या वेळी तिच्यासाठी सुईणीऐवजी एका शेतकऱ्याच्या बाईला कसे आणण्यात आले होते त्याबद्दल ती बोलत होती.

'परमेश्वर दयाळू आहे. डॉक्टरांची काही गरज पडत नाही.' ती म्हणाली.

एकाएकी एका खिडकीच्या चौकटीवर जोराचा वारा वाहू लागला. जोराच्या वाऱ्याने कशीतरी लावलेली खिडकीची कडी निसटली आणि पडदा फडफडू लागला. थंडगार हिमाच्या सरीने मेणबत्ती विझली. प्रिन्सेस मार्या थंडीने काकडली. मोजे खाली ठेवून नर्स खिडकीकडे धावली. डोके खिडकीबाहेर काढून ती खिडकीची बाहेर असलेली तावदाने आत ओढू लागली. तिच्या डोक्याच्या रुमालाची टोके आणि पांढऱ्या केसांच्या बटा थंड वाऱ्यात उडू लागल्या.

खिडकी बंद न करता ती म्हणाली, 'प्रिन्सेस, कुणाची तरी गाडी येताना दिसत आहे.

सोबत कंदील घेतलेले घोडेस्वार आहेत. बहुतेक डॉक्टर असावेत. '

' परमेश्वराची कृपा ! मी खाली जाऊन त्यांना भेटते. त्यांना रशियन भाषा येत नसल्यामुळे मला त्यांची गाठ घेणे भाग आहे. '

प्रिन्सेस मार्याने अंगावर शाल घेतली आणि त्या अनोळखी माणसाला भेटायला ती निघाली. छोट्या दालनातून जाताना तिला प्रवेशद्वाराशी उभी असलेली गाडी आणि कंदील दिसले. ती तशीच जिन्यापर्यंत आली. हिमसेक चालू होता. तरी जिन्याच्या कठड्याच्या खांबाशी एक मेणबत्ती जळत होती. नोकर फिलिप जिन्याच्या पहिल्या चौकातच आणखी एक मेणबत्ती घेऊन उभा होता. तो घाबरलेला दिसत होता. त्याच्या खाली जिन्याच्या वळणावर मोठाले बूट वाजलेले ऐकू येऊ लागले. ' परमेश्वराची कृपा. पपा कुठं आहेत ? ' मार्याला आवाज ओळखीचा वाटला. ' ते झोपी गेले आहेत ' खाली असलेल्या देम्यान नामक वाढप्याने दिलेले उत्तर ऐकू आले. जिन्याच्या पायऱ्यांवरून मोठाले बूट मोठ्या जलदीने जवळ येत असल्याचे तिला ऐकू आले.

' हा आन्द्रे तर नाही ना ? पण छे ! तो कुठला यायला ! कधीकाळी चमत्कार घडला तरच तो येईल. ' प्रिन्सेस मार्या मनाशी म्हणाली. त्याच क्षणी जिथे मेणबत्ती घेऊन नोकर उभा राहिला होता त्या ठिकाणी तिला प्रिन्स आन्द्रेची मूर्ती दिसू लागली. त्याचा चेहरा तिला स्पष्टपणे दिसला. त्याने लोकरीचा कोट घातला होता. त्याच्या रुंद कॉलरवर हिम गोळा झाले होते. तो आन्द्रे होता यात शंका नव्हती. तो कृश आणि फिक्कट झाला होता. त्याची चर्या बदलली होती. त्याच्या मुद्रेवर विचित्र हळुवारपणा आणि अस्वस्थता दिसत होती. जिना चढून आल्यावर त्याने आपल्या बहिणीला जवळ घेतले.

' माझं पत्र तुम्हाला मिळालं नाही तर ! ' उत्तराची त्याने वाट पाहिली नाही. प्रिन्सेसला बोलणे अशक्य झाल्याने त्याला उत्तर मिळालेही नसते. मागे वळून त्याने डॉक्टरांना बरोबर घेतले. धावत जिना चढून वर आला, बहिणीला पुन्हा जवळ घेत म्हणाला, ' माशा, नशीब किती विचित्र आहे ! ' आपला लोकरीचा कोट आणि बूट भिरकावून तो लिझच्या खोलीकडे निघाला.

लिझच्या शारीरिक वेदना क्षणभर थांबल्या होत्या. तिच्या डोकीला पांढरी टोपी होती. उशीवर डोके ठेवून ती पहुडली होती. तिच्या सुजलेल्या गालांवर घाम गोळा होत होता. त्यावर काळ्याभोर केसांच्या बटाही पडल्या होत्या. तिचे गुलाबी मोहक मुख उघडे होते. तिचा ओलसर ओठ विलग झाला होता. ती अत्यानंदाने स्मित करीत होती. प्रिन्स आन्द्रे खोलीत शिरला आणि तिच्या कॉटच्या पायागती उभा राहून तिच्याकडे पाहत राहिला. लहान मुलासारख्या भयभीत झालेल्या तिच्या चमकणाऱ्या डोळ्यांत एकच एक भाव भरून राहिला होता' तिची मुद्रा जणू म्हणत होती, ' तुम्हा सगळ्यांवर माझा जीव आहे. मी कुणाचं वाईट केलं नाही. तरीही माझ्या नशिबी ह्या वेदना का ? मला यातून मुक्त करा. ' तिला आपला नवरा समोर दिसला पण त्याच्या अस्तित्वाचा अर्थ तिला उमगला नाही. प्रिन्स आन्द्रेने जवळ

जाऊन तिच्या भालप्रदेशाचे चुंबन घेतले. ' लाडके, परमेश्वर दयाळू आहे. ' ती त्याच्याकडे कुतूहलाने आणि बालसुलभ रोषाने पाहू लागली.

' तुम्ही मदत कराल अशी आशा होती, पण तुम्ही काहीच केलं नाही. ' जणू तिचे डोळे म्हणत होते. त्याच्या येण्याने तिला आश्चर्य वाटले नाही. किंबहुना तो आला हेच तिला मुळी कळले नाही. तिच्या यातनांशी आणि यातनांतून मुक्त होण्याशी त्याच्या आगमनाचा जणू काही संबंध नव्हता. पुन्हा तिला कळा येऊ लागल्या तशी मार्या बॉग्डनॉवनाने प्रिन्स आन्द्रेला खोलीच्या बाहेर जायला सुचविले.

डॉक्टर खोलीत शिरले. प्रिन्स आन्द्रे खोलीच्या बाहेर आला आणि प्रिन्सेस मार्याशी हलक्या आवाजात बोलू लागला. मधूनमधून त्यांचे बोलणे थांबत होते आणि ते खोलीकडे लक्ष देत होते.

प्रिन्सेस मार्याने सांगितले तेव्हा प्रिन्स आन्द्रे आपल्या पत्नीकडे गेला आणि मग लगतच्या खोलीत प्रतीक्षा करीत बसला. झोपण्याच्या खोलीतून एक भेदरलेली स्त्री बाहेर आली. आन्द्रे-कडे तिने जराही लक्ष दिले नाही. हाताने चेहरा झाकून तो काही काळ बसला. शेजारच्या खोलीतून केविलवाणे, असहाय कण्हणे ऐकू येत होते. प्रिन्स आन्द्रे उठला आणि दरवाजाकडे गेला. आतून कोणी दरवाजा लोटून धरला नसता तर प्रिन्स आन्द्रेने तो उघडला असता.

आतून कोणीतरी भेदरलेल्या आवाजात म्हणत होते, ' आत यायचं नाही. ' आन्द्रे लगतच्या खोलीत अस्वस्थपणे येरझारा घालू लागला. आक्रोश थांबला आणि थोडासा काळ गेला. मग एकाएकी भीतिदायक किंकाळी ऐकू आली. ' किती ही विचित्र किंकाळी. अशा तऱ्हेने ती किंकाळू शकेल का ? ' प्रिन्स आन्द्रे दरवाजाकडे धावला. किंकाळी थांबली होती. आता त्याला लहान मुलाचे रडणे ऐकू आले.

त्याच्या डोळ्यांत अश्रू आले, त्याला धड श्वास घेता येईना. खिडकीच्या चौकटीवर दोन्ही कोपरे टेकून तो लहान मुलासारखा रडू लागला. दरवाजा उघडून डॉक्टर बाहेर आले. त्यांच्या अंगात कोट नव्हता. शर्टच्या बाह्या दुमडलेल्या होत्या. त्यांचा चेहरा फिकट झाला होता. आणि खालचा जबडा थरथरत होता. प्रिन्स आन्द्रेने त्यांना हाक मारली. त्याच्याकडे निर्विकार नजरेने पाहत, त्याच्याशी एक शब्द न बोलता डॉक्टर तिथून निघून गेले. आतून धावत आलेली एक स्त्री काय करावे हे न कळून दारातच थांबली. आन्द्रे आपल्या पत्नीच्या खोलीत गेला. पाच मिनिटांपूर्वी त्याने तिला ज्या अवस्थेत पाहिले होते त्याच स्थितीत ती आता होती. पण तिचा प्राण गेलेला होता. खिळलेली नजर आणि पांढरे फटफटीत पडलेला भालप्रदेश सोडला तर काळ्या केसांनी झाकलेल्या तिच्या निरागस ओठांवर पूर्वीचेच भाव होते. ' माझा तुम्हा सर्वांवर जीव आहे. मी कुणाचं वाईट केलं नाही. माझी अशी अवस्था तुम्ही का केली ? ' तिचा केविलवाणा, मोहक, पण मृत चेहरा विचारीत होता. खोलीच्या कोपऱ्यात असलेल्या बॉग्डनॉवनाच्या थरथरत्या गोऱ्या हातात आक्रंदन करणारा लहानगा जीव होता.

त्यानंतर दोन तासांनी प्रिन्स आन्द्रे हलक्या पावलांनी आपल्या वडिलांच्या खोलीत गेला. म्हाताऱ्याला सर्व गोष्टी अगोदरच कळल्या होत्या. तो दाराशी उभा होता. दार उघडून आन्द्रे आत येताच आन्द्रेला घट्ट मिठीत घेऊन तो लहान मुलासारखा ओक्साबोक्शी रडू लागला.

तीन दिवसांनंतर लिझचे दफन करण्यात आले. शेवटचा निरोप घेण्यासाठी, प्रिन्स आन्द्रे थडग्यांच्या पायऱ्याशी गेला. शवपेटिकेतील लिझचा चेहरा अजून तसाच होता. डोळे मात्र मिटलेले होते. ती जणू अजूनही म्हणत होती, 'तुम्ही माझी काय ही अवस्था केलीत!' कुणी तरी आपल्या काळजाचा लचका तोडतो आहे असे प्रिन्स आन्द्रेला वाटले. त्याला वाटले, आपण केलेला गुन्हा अक्षम्य आहे. त्याची कधीही भरपाई करता येणार नाही आणि त्याचे कधी विस्मरण होणार नाही. त्याला रडताही येईना. थोरल्या प्रिन्सने तिच्या हाताचे चुंबन घेतले. त्याला देखील ती जणू म्हणू लागली, 'तुम्ही माझी ही काय अवस्था केली? कशासाठी असं केलंत?' तिच्या चेहऱ्याकडे नजर जाताच म्हातारा रागाने तेथून वळला.

नंतर पाच दिवसांत नामकरण विधी झाला. मुलाचे निकोलाय अँड्रीच असे नाव ठेवले. कपड्यात गुंडाळलेल्या मुलाला नर्सने आपल्या हनुवटीजवळ छातीशी धरले होते. मुलाच्या सुरकुत्या पडलेल्या लाल तळव्यांना आणि हातांना हंसाच्या पिसांनी तेल लावण्याचा विधी धर्मगुरूने पार पाडला.

डोलोहॉव्ह आणि बेझुहॉव्ह यांच्यामध्ये झालेल्या द्वंद्वयुद्धात रोस्तॉफचा वाटा होता ही बातमी थोरल्या काउंटच्या प्रयत्नाने दडपण्यात आली. आपल्याला खालचा हुद्दा देण्यात येईल अशी निकोलायची अटकळ होती. तसे न घडता त्याला मॉस्कोचा अॅडज्युटंट म्हणून नेमण्यात आले. परिणामतः त्याला आपल्या कुटुंबियांबरोबर खेड्यात जाता आले नाही. नवीन कामामुळे सबंध उन्हाळ्यात त्याला मॉस्कोत राहावे लागले. डोलोहॉव्ह आजारातून बरा झाला त्या काळात त्याची आणि रोस्तॉफची मैत्री वाढली.

ऑक्टोबरच्या सुमारास रोस्तॉफ कुटुंब मॉस्कोला परतले. हिवाळा सुरू होऊ लागला त्या वेळी डेनिसॉव्हदेखील परत येऊन रोस्तॉफ कुटुंबात राहायला आला. १८०६ मधील प्रारंभीचा हिवाळा रोस्तॉफला आणि त्याच्या कुटुंबियांना अतिशय सुखाचा गेला. निकोलाय रोस्तॉफने अनेक तरुण मुलांना आपल्या घरी आणले. वीस वर्षांची सुंदर व्हेरा, प्रफुल्ल फुलासारखी मोहक अशी सोळा वर्षांची सोन्या, लहान पोरीसारखा मूर्खपणा करणारी तर कधी तरुणी-सारखी मोहक वाटणारी तारुण्याच्या सीमारेषेवरील नताशा ह्या तिथे होत्या.

रोस्तॉफने ज्या तरुणांना घरी आणले होते त्यात महत्त्वाचा तरुण होता डोलोहॉव्ह. नताशा

सोडली तर कुटुंबातील सर्वांनाच तो आवडत होता. नताशाचे डोलोहॉव्हवरून आपल्या भावाशी जवळजवळ भांडणच झाले होते. डोलोहॉव्ह दुष्ट माणूस असल्याचे ती वारंवार बजावीत होती. त्या द्वंद्वयुद्धात पीएरची काही चूक नव्हती. डोलोहॉव्हचाच दोष होता. डोलोहॉव्हचे वागणे दुष्टपणाचे आणि मानवी स्वभावास धरून नाही हे आपले मत सोडायला ती तयार नव्हती.

दुराग्रही नताशा ओरडत होती. 'मला त्या द्वंद्वयुद्धाबद्दल काही ठाऊक नाही. पण डोलोहॉव्ह दुष्ट आणि निर्दय आहे हे माझं मत कायम आहे. तुझ्या डेनिसॉव्हबद्दल बोलायचं तर तो मला आवडतो. तो वाईट चालीचा असेल, आणखीही काही दुर्गुण त्याच्यात असतील तरीही मला तो आवडतो. तुला कसं पटवून द्यायचं मला कळत नाही. तुझा डोलोहॉव्ह प्रत्येक गोष्ट योजना आखून करीत असतो. मला असला स्वभाव आवडत नाही. डेनिसॉव्हबद्दल म्हणशील तर . ...'

'डेनिसॉव्हची गोष्टच नको काढू...' डेनिसॉव्ह डोलोहॉव्हशी तुलना करण्याच्या देखील लायकीचा नाही असा सूर निकोलायच्या बोलण्यात उमटला. 'डोलोहॉव्हचं अंतःकरण जाणून घ्यायला पाहिजे. त्याचं अंतःकरण किती विशाल आहे ते पाहण्यासाठी त्याच्याकडे आईच्या डोळ्यांनीच पाहायला हवं.'

'मला ते काही सांगू नकोस. त्याच्या सहवासात मला स्वस्थ वाटत नाही. तो सोन्याच्य प्रेमात पडतो आहे हे तुला कळलं का?'

नताशाची भविष्यवाणी खरी ठरली. डोलोहॉव्हला स्त्रियांची फारशी पर्वा नसे. पण तो वारंवार घरी यायला लागला. तो कशासाठी येत आहे हे सर्वांनाच निश्चित कळले, पण कुणी बोलून दाखवले नाही-तो सोन्यासाठीच येत होता. सोन्याला हे कबूल करण्याचे धाडस नव्हते, पण तिलाही ते ठाऊक झाले होते.

त्याचे सोन्याबाबतचे स्त्रीदाक्षिण्य लक्षात यावे इतके उत्कट असे. तो अशा भावार्त नजरेने पाही की सोन्या त्यामुळे लाजून चूर होई. त्याची ती नजर पाहून थोरली काउंटेस आणि नताशा शरमून जात.

१८०६ मधील ऑक्टोबरच्या सुमारास नेपोलियन बरोबरच्या युद्धाबद्दल जो तो पूर्वीपेक्षा अधिक उत्साहाने बोलू लागला. आता लढाईसाठी दर हजारी दहा सैनिक आणि राखीव सैन्यासाठी नऊ सैनिक लष्करात भरती करण्याचा हुकूम निघाला. सगळीकडे आता नेपोलियनच्या नावाचा उद्धार केला जात होता. मॉस्कोमधील सगळेजण येऊ घातलेल्या युद्धाविषयी बोलू लागले होते. निकोलुश्का आता मॉस्कोमधे जास्त काळ राहणार नव्हता. डोलोहॉव्हची रजा संपली की त्याच्या बरोबरच पुन्हा आपल्या रेजिमेंटमध्ये दाखल होणार होता. युद्धाच्या तयारीतील ही एकमेव गोष्ट रोस्तॉफ कुटुंबियांना विशेष ध्यान देण्याजोगी वाटत होती. लवकरच जावे लागणार आहे ह्या विचाराने निकोलाय रोस्तॉफच्या आनंदी जीवनाला खीळ पडली नव्हती, उलट तो दुप्पट उत्साहाने सुखोपभोगांत मश्गूल होता. घराबाहेर राहून

मेजवान्या आणि नाच समारंभ यांत तो बराचसा काळ घालवू लागला.

निकोलाय घरी क्वचितच जेवी. नाताळानंतर तिसऱ्या दिवशी मात्र तो घरी जेवला. निकोलाय डेनिसॉव्हबरोबर रेजिमेंटमधे दाखल होण्यास जाणार होता. त्यापूर्वीचा हा पहिला निरोप-समारंभ साजरा करण्यासाठी त्याला जेवण देण्यात आले होते. डोलोहॉव्ह आणि डेनिसॉव्ह धरून एकुण वीस माणसांना आमंत्रण होते.

निकोलायला जिथे जायचे होते आणि जिथून आमंत्रण होते तिथे तो गेलाच नाही. मात्र त्याने घोड्यांच्या दोन जोड्या दमेपर्यंत गाडी फिरवली. आणि शेवटी ऐन जेवणाच्या वेळी तो घरी पोहोचला. तो घरात शिरला तेव्हा त्याला घरातील वातावरण प्रीतीने भारलेले जाणवले. त्याचबरोबर काही विशिष्ट माणसे परस्परांच्या सहवासाने संकोचून अतिशय अस्वस्थ झालेली आहेत असे त्याच्या लक्षात आले. विशेषतः सोन्या, डोलोहॉव्ह, थोरली काउंटेस आणि थोड्याफार प्रमाणात नताशा ही मंडळी अस्वस्थ झालेली दिसत होती. सोन्या आणि डोलोहॉव्ह यांमधे जेवणापूर्वी काही बिनसले असल्याचे निकोलायने ओळखले. अशा वेळी कसे वागावे हे त्याच्या हळुवार अंतःकरणाला आपोआप कळे; त्याप्रमाणे तो त्यांच्याशी सहानुभूतीने आणि सावधगिरीने वागला. नृत्यशिक्षक इओजेल सुट्टीत आपल्या विद्यार्थ्यांसाठी जी नृत्ये करणार होता त्यांतील एक नृत्य तो रात्री करणार होता.

नताशा निकोलायला म्हणाली, ‘ निकोलेंका, तू इओजेलच्या नृत्यास जाणार आहेस का ? अवश्य जा. त्यानं मुद्दाम तुला आणि व्हॅसिली डिमिट्रिचला ( म्हणजे डेनिसॉव्हला ) आमंत्रण दिलं आहे.’

रोस्तॉफ कुटुंबात गमतीखातर नताशाच्या सरदाराची भूमिका घेणाऱ्या डेनिसॉव्हने म्हटले, ‘ काउंटेसच्या हुकमासरशी मी वाटेल तिथं जाईन. ’

‘ पण मला वेळ असेल तेव्हा ना. मी अरारॉव्ह कुटुंबियांना वचन दिलं आहे. त्यांच्याकडे पार्टी आहे.’

डेनिसॉव्हने वळून डोलोहॉव्हला विचारले, ‘ आणि तुझं काय ? ’ लागलीच त्याला वाटले, आपण असा प्रश्न त्याला विचारायला नको होता.

सोन्याकडे पाहात डोलोहॉव्ह धुस्श्यातच म्हणाला, ‘ कदाचित मीही जाईन. ’ भोजनसमारंभाच्या वेळी त्याने पीएरकडे जसे कपाळाला आठ्या चढवून पाहिले होते तसे तो निकोलायकडे पाहू लागला.

‘ काहीतरी बिनसलेलं आहे.’ निकोलायला वाटले. भोजन संपल्यानंतर डोलोहॉव्ह लागलीच निघून गेला तेव्हा त्याची खात्री पटली. त्याने नताशाकडे त्यासंबंधी चौकशी करावी म्हणून आपल्याकडे येण्याची तिला खूण केली.

नताशा धावत त्याच्याकडे आली आणि त्याला म्हणाली, 'मी तुलाच शोधत होते. मी तुला केव्हाच सांगितलं होतं. पण तुझा विश्वास बसत नाही.' मग ती विजयी मुद्रेने म्हणाली, 'त्यानं सोन्याला मागणी घातली आहे.'

निकोलाय तसा आताशा सोन्याचा फारसा विचार करीत नव्हता. तरीही ती बातमी ऐकताच आपल्या काळजाचा लचका कोणी तोडीत आहे असे त्याला वाटले. संपत्ती नसलेल्या अनाथ सोन्याला डोलोहॉव्ह चांगला नवरा होता. — काही बाबतीत अप्रतिम होता. ज्या समाजात ती वावरत होती त्या समाजाच्या दृष्टीने आणि काउंटेसच्या दृष्टीने सोन्याने स्थळ नाकारण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. त्यामुळे ती बातमी ऐकताच निकोलायची पहिली प्रतिक्रिया चिडण्यात झाली. त्याला म्हणावेसे वाटले, 'फार चांगली गोष्ट आहे. त्यासाठी तिने लहानपणची वचनं विसरून त्याला होकार द्यायला हवा.' असे म्हणून त्याने फारसे काही साधले नसते. कारण नताशा म्हणाली, 'तुला कल्पनाही यायची नाही. सोन्यानं त्याला पुरता नकार दिला आहे. पुरता नकार दिला आहे.' मग जरा थांबून नताशा म्हणाली, 'ती म्हणते की तिचं दुसऱ्या कुणावर प्रेम आहे.'

'माझी सोन्या त्याखेरीज दुसरं काही करू शकणार नाही.' निकोलायला वाटले.

'आईनं तिला असं करू नकोस म्हणून किती वेळा विनविलं, पण तिनं ऐकलं नाही. मला माहीत आहे. एकदा ती नाही म्हणाली तर तसंच करील. बदलणार नाही.' नताशा म्हणाली.

'आईनं तिला नकार देऊ नकोस म्हणून सांगितलं?' निकोलायच्या सुरात रोष होता.

'होय. निकोलेंका, रागावणार नसशील तर सांगते. तू तिच्याशी लग्न करणार नाहीस हे मला ठाऊक आहे. का कोण जाणे तू तिच्याशी निश्चित लग्न करणार नाहीस असं मला वाटतं.'

'तुला असं वाटण्याचं कारण काय? मला तिच्याशी बोलायचं आहे.' तो स्मित करीत म्हणाला.

'मी तिला तुझ्याकडे पाठवून देते.' आपल्या भावाचे चुंबन घेऊन नताशा धावत निघाली.

भेदरलेली, दुःखाने खचलेली आणि अपराधी वाटणारी सोन्या लवकरच आत आली. निकोलायने जवळ जाऊन तिच्या हाताचे चुंबन घेतले. तो आघाडीहून परत आल्यापासून आज प्रथमच ती दोघे एकान्तात बोलत होती आणि तेही आपल्या प्रीतीबद्दल बोलत होती.

निकोलायच्या स्वरातला मित्रेपणा हळूहळू नाहीसा झाला. तो अधिकाधिक धीटपणे बोलू लागला. 'सोफी, डोलोहॉव्हसारख्या तडफदार तरुणाला तू नकार का देत आहेस? ते स्थळ सर्व दृष्टींनी फायदेशीर आहे. तो फार चांगला उमदा तरुण आहे... माझा दोस्तही आहे तो...'

सोन्याने त्याला पुढे बोलू दिले नाही. . 'निकोलाय, मला तसलं काही सांगू नकोस.' तिच्या डोळ्यांत भीती होती, विनवणी होती.

'नाही, मला सांगणं भाग आहे. माझ्या दृष्टीनं आत्मस्तुती असेल. तरीही मी बोललो तर

अधिक बरं होईल. माझ्यासाठी जर तू त्याला नाकारीत असलीस तर मला संपूर्ण सत्य सांगणं भाग आहे. कुणावर नाही एवढं प्रेम मी तुझ्यावर करतो... ऐकून तर घे, तुझ्याइतकी आस्था, विश्वास आणि प्रेम मला दुसऱ्या कुणाबद्दल वाटलं नाही, तरीही मी हजार वेळा प्रेमात पडलो आहे, आणि पुन्हा पडेनही. शिवाय मी तरुण आहे. मी प्रेमात पडू नये असं आईला वाटतं. खरं सांगू ? तुला मी वचन देऊ शकत नाही. मी तुला विनंती करतो, तू डोलोहॉव्हच्या मागणीचा विचार कर !' प्रयासाने तो म्हणाला.

'तू मला त्याबद्दल काही सांगू नको. मी तुझ्यावर प्रेम करीत राहीन. मला आणखी काही नको.'

'मी तुझ्या प्रेमाला योग्य नाही. मी तुला फसवीन अशी भीती मला वाटते,' असे म्हणून निकोलायने फिरून एकदा तिच्या हाताचे चुंबन घेतले.

नृत्यसमारंभ होऊन दोन दिवस लोटले तरी रोस्तॉफला डोलोहॉव्ह कोठे आढळला नाही. तिसऱ्या दिवशी त्याला त्याच्याकडून एक चिठ्ठी मिळाली.

'तुमच्या घरी पुनः येण्याचा माझा विचार नसल्याने (तुला त्याची कारणे ठाऊकच आहेत) आणि मला पुन्हा रेजिमेंटमध्ये दाखल व्हायचे असल्याने मी माझ्या मित्रांना निरोप देण्यासाठी मेजवानीचा कार्यक्रम आखला आहे तरी तू 'इंग्लिश हॉटेल'मध्ये ये.'

रोस्तॉफ आपल्या कुटुंबातील माणसे आणि डेनिसॉव्ह यांना घेऊन नाटकाला गेला होता. तेथून ठरलेल्या दिवशी दहा वाजता इंग्लिश हॉटेलमध्ये तो येऊन पोचला. तावडतोब त्याला हॉटेलमधील सर्वोत्कृष्ट खोलीत नेण्यात आले. डोलोहॉव्हच्या समोरील टेबलाभोवती वीस-एक माणसे बसली होती. टेबलावर नाणी आणि नोटा पडल्या होत्या. डोलोहॉव्ह हिशेब करीत होता. त्याने सोन्याला मागणी घातली होती आणि तिने नकार दिला होता त्या दिवसानंतर त्याला प्रथमच आज निकोलाय भेटत होता. त्याला भेटावे लागणार या विचाराने निकोलाय अस्वस्थ झाला होता.

रोस्तॉफ दारात येताच त्याच्याकडे डोलोहॉव्हने निर्विकार नजरेने पाहिले. जणू तो किती तरी काळ त्याची प्रतीक्षा करीत होता.

'आपण खूप दिवसांनी भेटतो आहोत. तू समारंभाला आलास म्हणून मी तुझे आभार मानतो. मी आता पत्ते वाटून टाकतो. इल्युश्का जिप्सी गायकांचा वृन्द घेऊन येईल.'

रोस्तॉफ शरमिंध्या आवाजात म्हणाला, 'मी खरंच तुला भेटण्याचा प्रयत्न केला होता.'

डोलोहॉव्हने काही उत्तर दिले नाही.

'तू पैसे लावून खेळणार तर खेळ.' डोलोहॉव्ह म्हणाला. रोस्तॉफच्या मनातील ओळखल्यागत डोलोहॉव्ह रोस्तॉफला म्हणाला, 'माझ्याशी खेळायला तू घाबरतोस काय ?' दैनंदिन

आयुष्यक्रमातील तोचतोपणाचा कंटाळा आला आणि त्यापासून दूर जाण्यासाठी काहीतरी विचित्र–निर्दय कृती करावीशी वाटली म्हणजे डोलोहॉव्हची जी वृत्ती बने ती वृत्ती क्लबच्या भोजनसमारंभात वा अन्य प्रसंगी प्रकट होई. आताही त्याच्या हसण्यामागे हीच वृत्ती रोस्तॉफला जाणवली.

रोस्तॉफ बेचैन झाला. त्याने डोक्याला खूप शीण दिला. पण त्याला डोलोहॉव्हला उत्तर द्यायला हजरजबाब सुचेना.

पिसलेले पत्ते खाली ठेवत डोलोहॉव्ह म्हणाला, ' चला, दोस्त हो, पैसे लावा.'

आपले पैसे पुढे सारीत डोलोहॉव्ह पत्त्याची पाने वाटू लागला. डोलोहॉव्हने त्याच्याकडे नजर टाकीत म्हटले, ' तू का खेळत नाहीस ? ' आणि काय आश्चर्य ! पत्ते उचलून थोडे पैसे लावून खेळायला सुरुवात केल्याखेरीज निकोलायला राहवेना.

' माझ्याजवळ आता पैसे नाहीत.' निकोलाय रोस्तॉफ म्हणाला.

' तुझ्यावर मी विश्वास ठेवतो.'

रोस्तॉफने पाच रूबल पत्त्यावर लावले आणि तो हरवून बसला. पुन्हा लावले. पुन्हा गमावले. डोलोहॉव्हने लागोपाठ दहा डावांत त्याला सफा केले. काही वेळ पिसून झाल्यावर तो म्हणाला, ' दोस्त हो, कृपा करून प्रत्येकाने पानावर पैसे लावून ठेवा. नाहीतर हिशेब करताना माझा घोटाळा उडेल.'

' तुला आमच्यावर विश्वास ठेवायला हरकत नाही.' एक भिडू म्हणाला.

' तुमच्यावर माझा विश्वास आहे पण हिशोबाबाबत माझा माझ्यावर विश्वास नाही. मी चुकेन असं मला वाटतं. म्हणून कृपा करून पानावर पैसे लावा. ' तो रोस्तॉफला म्हणाला.

' तू काळजी करू नकोस. आपण सगळा हिशेब शेवटी करू '

त्यांनी पुन्हा खेळणे चालू ठेवले. नोकर सगळ्यांना सारखी शांपेन पुरवीत होता.

रोस्तॉफ सगळ्या डावांत हरत गेला. आता तो एकूण आठशे रूबल रक्कम देणे लागत होता. त्याने पत्त्यावर आठशे रूबल लिहिले. नोकर शांपेन ओतत असताना त्याने आपला बेत बदलला आणि नेहमीची रक्कम–वीस रूबल लिहिली.

त्याच्याकडे न बघितल्यासारखे करीत डोलोहॉव्ह म्हणाला, ' जाऊ दे यार. तू लौकर सर्व परत मिळवशील. तुझी रक्कम मी जिंकतो आहे. पण इतर मला हरवताहेत. कदाचित तुला माझी भीती वाटत असेल.'

रोस्तॉफने काहीतरी सबब सांगितली. आठशेची रक्कम लावली नाही. एक कान फाटलेले बदाम सत्त्याचे पान जमिनीवरून उचलून ते त्याने खाली ठेवले. त्याला त्या पानाची चांगली ओळख राहिली. त्याने ते बदाम सत्त्याचे पान खाली ठेवले, त्यावर खडूच्या तुकड्याने आठशेचा ठळक आकडा काढला. मग त्याला देण्यात आलेली शांपेन त्याने घशाखाली घातली. धडधडत्या काळजाने बदाम सत्त्याची वाट पाहात तो डेनिसॉव्हच्या हातातील जोडाकडे पाहात राहिला. त्या पानावर रोस्तॉफचे भवितव्य अवलंबून होते. आदल्या रविवारी काउंट

इल्या अँड्रीचने आपल्या मुलाला दोन हजार रूबल दिले होते. त्याला आर्थिक अडचणींचा पाढा वाचणे आवडत नसे तरीही यानंतर मेपर्यंत आणखी काही रक्कम मिळणार नसल्याचे त्याने मुलाला सांगितले होते आणि त्यासाठी त्याने त्याला अधिक काळजीपूर्वक खर्च करायला विनवले होते. त्या दोन हजारांतील आता फक्त बाराशे रूबल शिल्लक राहिले होते. बदामच्या त्या सत्त्यावर केवळ सोळाशे रूबलची हानीच अवलंबून नव्हती; तो निश्चित वचनभंग करणार का नाही तेही त्यावरच अवलंबून होते. धडधडत्या काळजाने डोलोहॉव्हच्या हाताकडे पाहात तो मनाशी म्हणू लागला, 'गड्या, घाई कर, ते पान मला घेऊ दे. मग मी आपला थेट डेनिसॉव्ह, नताशा आणि सोन्या यांच्याबरोबर जेवायला जाईन. पुन्हा म्हणून मी पत्ते हातात धरणार नाही हे निश्चित.' त्या क्षणी त्याचे घरातले जीवन, पेत्या-बरोबरची मस्करी, सोन्याबरोबरची संभाषणे, नताशाबरोबर गायिलेली गीते, वडिलांबरोबर खेळलेले पत्त्यांचे खेळ, पॉवरस्की येथील घरातील आरामशीर बिछाना-ह्या साऱ्या गोष्टी त्याच्या कल्पनाचक्षूंसमोर इतक्या ठळकपणे, इतक्या उजळपणे आणि इतक्या आकर्षकतेने साकार झाल्या की त्याला वाटू लागले- ह्या गोष्टी कधी भूतकाळात होत्या, आता त्या हरवल्या आहेत, त्यांपासून आजपर्यंत आपणाला कधी सौख्य लाभले नव्हते. आता नव्या जाणिवेने मिळालेले आणि नव्या झळाळीने पाहिलेले हे सारे सौख्य नाहीसे करून आपणास अज्ञात आणि अनोख्या दुःखाच्या खाईत भिरकावून देण्याचे सामर्थ्य सत्त्याला डाव्या बाजूऐवजी उजव्या बाजूला टाकणाऱ्या मूर्ख योगायोगात आहे यावर त्याचा विश्वास बसेनासा झाला.

पण तसे होता कामा नये असे त्याला वाटू लागले. धास्तावलेल्या मनाने तो डोलोहॉव्हच्या हातांच्या हालचाली पाहू लागला. डोलोहॉव्हचे हात रुंद आणि तांबूस होते. शर्टच्या कफाखाली केस दिसत असत. कुणीतरी पेला आणि पाईप पुढे केला, तेव्हा त्यांसाठी त्याने पत्त्यांचा जोड खाली ठेवला.

'माझ्याशी खेळायला तुला भीती वाटत नाही तर?' पुन्हा डोलोहॉव्हने विचारले. एखादी फर्मास गोष्ट सांगण्याच्या मिषाने पत्ते खाली ठेवून तो खुर्चीत रेलला आणि सहेतुक हसू लागला.

'दोस्त हो, मॉस्कोमधे म्हटलं जातं—मी पत्त्यांबाबत फार चलाखी करतो. तेव्हा तुम्हाला माझा सल्ला आहे—माझ्याकडे चांगलं लक्ष ठेवा.'

'पानं टाकायला लाग.' रोस्तॉफ म्हणाला.

'मॉस्कोमधे काय वाटेल त्या अफवा उठतील.' डोलोहॉव्ह म्हणाला आणि त्याने हसत पत्ते उचलले.

'अरे देवा.' दोन्ही हातांनी डोके धरीत रोस्तॉफ जवळजवळ ओरडला. त्याला हवा असलेला सत्त्या अगदी वर होता—ते जोडामध्ये अगदी पहिले पान होते. तो जितकी रक्कम देऊ शकला असता त्याहून कितीतरी अधिक हरला होता.

'आपली शक्ती पाहून माणसानं पोहायला हवं.' रोस्तॉफकडे ओझरती नजर टाकत

डोलोहॉव्ह म्हणाला आणि खेळू लागला.

दीड एक तास झाला आणि बऱ्याचशा भिडूंचे आपल्या खेळातील लक्ष उडाले.

सगळ्यांचे लक्ष रोस्तॉफकडे लागले होते. रोस्तॉफ आता सोळाशे रूबलांवरून हरत हरत पंधरा हजारांपर्यंत पोचला होता. डोलोहॉव्ह आता गोष्टी सांगत नव्हता अगर ऐकत नव्हता. ती रोस्तॉफच्या हाताची प्रत्येक हालचाल न्याहाळीत होता. मधूनमधून त्याच्या आणि आपल्या रकमांवर ओझरती नजर टाकीत होता. त्याने त्रेचाळीस हजार रक्कम होईपर्यंत खेळण्याचे ठरवले. त्याने त्रेचाळीस आकडा ठरवण्याचे खास कारण होते. त्याच्या व सोन्याच्या वयाची बेरीज त्रेचाळीस होत होती. रोस्तॉफ दोन्ही तळहातांवर डोके ठेवून बसला होता. समोर मद्याचे डाग पडलेल्या टेबलावर हिशेबाचे कागद आणि पत्त्यांचा पसारा पडला होता. आता एकच एक जाणीव त्याचा जीव घेऊ लागली. लालसर रंगाचे, शर्टच्या कफखाली केसाळ दिसणारे डोलोहॉव्हचे रुंद हात—ज्यांवर त्याने प्रेम केले होते आणि ज्यांचा त्याने तिरस्कारही केला होता—ते हात त्याचा पुरता कबजा घेत होते.

'सहाशे रूबल...एक्का.. फाटलेला कोपरा...नवा...आता जिंकणे स्वप्नातही शक्य नाही. ...घरी असतो तर किती मजेत राहिलो असतो. गुलामावर आता दुपटीसाठी रक्कम लावून काही उपयोग नाही...माझ्याशीच हा असा का वागतो आहे?' रोस्तॉफच्या मनात येत होते. कधी कधी तो पानावर मोठाली रक्कम लावू लागे. डोलोहॉव्ह त्याला तसे करू देईना, तोच निश्चित रक्कम ठरवी. निकोलाय त्याचे म्हणणे निमूटपणे ऐके. पुलावर असताना गोळीबार झाला तेव्हा त्याने प्रार्थना केली होती तशी प्रार्थना तो मधूनमधून करू लागे, कधी टेबलाखाली पडलेल्या, चुरगळलेल्या पानांतील एखादे पान आपल्याला वाचवील असे समजून त्याच्या भरवशावर तो नशीब पारखू लागे, कधी आपल्या कोटावरील पट्ट्याच्या क्रमांकावरून नशीब पारखू लागे आणि त्या क्रमांकाच्या पत्त्यावर पैसे लावी. मग तो खेळणाऱ्या इतर भिडूंकडे मदतीसाठी पाही. आता अगदी निर्विकार झालेल्या डोलोहॉव्हकडे रोखून पाहू लागे आणि त्याच्या मनात या वेळी काय चालले असेल याचा अंदाज घेऊ लागे.

शेवटी त्रेचाळीस हजार रुबलांची निर्णायक रक्कम पुरी झाली. रोस्तॉफ पान घेऊन तयार होता. ते तीन हजार रकमेसाठी किंवा ती रक्कम दुप्पट करण्यासाठी लावण्याचा त्याचा बेत होता.

डोलोहॉव्हने पत्ते टेबलावर आपटले, ते दूर सारले. मग आपल्या स्वच्छ, दांडग्या हातात खडू घेऊन रोस्तॉफ हरला होता ती सर्व रक्कम त्याने भरभर लिहिली आणि खडू मोडून टाकला.

'जेवण- जेवण द्या जिप्सींना. हे पाहा जिप्सी आले.' आणि खरोखरच बाहेरच्या गारठ्यातून काळ्या वर्णाचे स्त्री-पुरुष आत शिरले. सगळे आटोपल्याचे निकोलायला कळून चुकले.

'मला पैसे कधी मिळतील?' डोलोहॉव्हने विचारले.

' उद्या, ' असे बोलून रोस्तॉफ खोलीबाहेर पडला.

आवाजावर योग्य हुकमत ठेवून ' उद्या ' उच्चारणे कठीण नव्हते. मात्र घरी एकट्याने जाऊन भावंडांना आणि आईवडिलांना भेटून अपराध कबूल करणे आणि वचनभंग करून पैशावरील हक्क गमावलेला असतानाही त्यांच्याकडे पैशाची याचना करणे हा अनुभव भयानक होता.

तो घरी पोचला तेव्हा कुणी झोपी गेले नव्हते. नाटकाहून परतल्यावर कुटुंबातील छोट्या मंडळींनी जेवण आटोपले होते आणि ती क्लॅव्हिकॉर्डभोवती जमा झाली होती. निकोलाय दिवाणखान्यात शिरला तशी त्याला हिवाळ्यामधे घर भारून टाकणाऱ्या प्रीतीच्या काव्यात्म वातावरणात आल्यासारखे वाटले. डोलोव्हॉव्हने घातलेली मागणी आणि इऑजेलच्या नृत्य-समारंभ ह्या घटनांनंतर ते वातावरण सोन्या आणि नताशा यांना अधिकाधिक वेढून टाकत होते. वादळ होण्यापूर्वी हवा असते तसे ते वातावरण होते. नाटकासाठी सोन्या आणि नताशा यांनी जो फिकट निळा पोषाख चढवला होता तोच अजून त्यांच्या अंगात होता. आपल्या सौंदर्याची जाणीव असलेल्या त्या दोघी स्मित करीत खुशीत क्लॅव्हिकॉर्डभोवती उभ्या होत्या. दिवाणखान्यात व्हेरा शिन्शिनबरोबर सोंगट्या खेळत होती. थोरली काउंटेस मुलगा आणि नवरा केव्हा येतात याची सारखी वाट पाहात होती. चमकदार डोळ्यांचा आणि विसकटलेल्या केसांचा डेनिसॉव्ह एक पाय मागे घेऊन क्लॅव्हिकॉर्डशी बसला होता. आपल्या जाड बोटांनी तो तारा छेडीत होता. त्याच्या डोळ्यांची सारखी हालचाल होत होती. स्वतःच रचलेली ' जादूगारीण ' ही कविता तो आपल्या घोगऱ्या, नैसर्गिक आवाजात गात होता आणि गातागाता तिला संगीत देण्याचा प्रयत्न करीत होता.

तो उत्कट स्वरात गात होता. आनंदाने उजळलेल्या नताशाला पाहून त्याचे काळेभोर डोळे चमकत होते.

' ओहो ! निकोलाय आला की ! ' नताशा त्याच्याकडे धावली. तशी त्याने तिला विचारले, ' पपा आले आहेत का ? '

त्याच्या प्रश्नाचे उत्तर न देता नताशा म्हणाली, ' तू आलास म्हणून मला किती आनंद झालाय ! आमचा वेळ किती मजेत जातो आहे. व्हॅसिली डिमिट्रिच माझ्यासाठी एक दिवस उशिरा जाणार आहे. तुला ठाऊक आहे ना ? '

' पपा अजून आलेले नाहीत. ' सोन्या बोलली.

' निकोलाय, तू इथं आहेस का ? इकडे ये ना बाळ. ' दिवाणखान्यातून काउंटेस बोलत होती. निकोलायने आईजवळ जाऊन तिच्या हाताचे चुंबन घेतले. तिच्या टेबलाशी बसून ती पाने वाटत असताना तो तिच्या हाताच्या हालचाली पाहू लागला. तिकडे नताशाला कुणी

कसलातरी आग्रह करीत होते. कुणी हसत होते. कुणी आनंदाने ओरडत होते. बसल्याबसल्या निकोलाय हे सारे ऐकत होता.

डेनिसॉव्ह नताशाला म्हणत होता. ' ठीक. ठीक. आता ओरडून उपयोग नाही. आता व्हेनिसच्या होडीवाल्याचे गीत गा. तुझी पाळी आहे. माझी विनंती आहे, गायला लाग. '

काउंटेसने वळून आपल्या अबोल मुलाकडे पाहिले आणि विचारले, ' असा गप्प का? काय झालं रे? '

त्या प्रश्नाचा उबग आल्यागत तो उत्तरला, ' काही नाही. ' विचार करीत निकोलाय क्लॅव्हिकॉर्ड असलेल्या हॉलमध्ये पुन्हा शिरला.

व्हेनिसच्या होडीवाल्याच्या गीतातील प्रारंभीचा भाग डेनिसॉव्हच्या खास आवडीचा होता. सोन्या तोच भाग क्लॅव्हिकॉर्डवर वाजवत होती. नताशा गायला सुरुवात करण्याच्या बेतात होती. डेनिसॉव्ह तिच्याकडे प्रेमपूर्ण नजरेने पाहत होता.

' चल सोन्या. ' खोलीच्या मध्यभागी जात ती म्हणाली. तिच्या मनाला तिथल्या संगीता-पेक्षा अधिक चांगला विरंगुळा नव्हता. आपले डोळे उंच धरीत, नर्तिकेप्रमाणे दोन्ही हात निर्जीवपणे सोडीत, अवघ्या शरीराला जोराने वळवीत ती खोलीच्या मध्यभागी जाऊन स्वस्थ उभी राहिली. तिच्याकडे वळलेल्या डेनिसॉव्हच्या उत्साही नजरेला प्रतिसाद देण्यासाठी ती जणू म्हणत होती, ' मी इथं उभी आहे. पाहून घे. '

डेनिसॉव्हने तिच्या गायनाबद्दल उत्साह दाखवला म्हणून असेल, आता नताशाने त्या हिवाळ्यात प्रथमच गंभीरपणे गायनाच्या अभ्यासास सुरुवात केली होती. आता ती लहान मुलासारखी गात नव्हती. पूर्वी तिच्या गायनात मजेशीर बालिशपणा आढळायचा. तो आता दिसेनासा झाला होता.

त्या कुमारिकेचा आवाज अतिशय शुद्ध नितळ होता. आपल्या आवाजाच्या सामर्थ्याची तिला जाणीव नव्हती. मखमलीसारखा मृदुमृदुल आवाज अगदी सहजपणे बाहेर येत होता.

नताशाचे गीत संपले तेव्हा पुन्हा एकदा रोस्तॉफला वास्तवाची प्रखर जाणीव झाली. काही न बोलता तो बाहेर पडला आणि जिना उतरून आपल्या खोलीत शिरला. पंधरा-एक मिनिटांनंतर त्याचे वडील आत आले. ते खुशीत दिसत होते. ते आत आलेले निकोलायला ऐकू आले. रुबाबदार आणि आनंदी हास्य करीत इल्या आन्द्रेविचने आपल्या मुलाला विचारले, ' तुझा वेळ मजेत गेला ना? ' निकोलायने होकार देण्याचा प्रयत्न केला. पण ते जमले नाही. तो हुंदके देण्याच्या बेतात होता. काउंट पाइप पेटविण्यात मग्न असल्याने त्याला आपल्या मुलाची अवस्था कळली नाही.

निकोलायने शहरात जायला गाडी मागावी तशा सहजतेने ( त्या सहजतेमुळे आपण दुष्ट

आहेत असे त्याला वाटू लागले.) वडिलांना म्हटले, 'पपा, तुमच्याकडे माझं एक काम होतं. मी विसरूनच जाणार होतो बघा. मला थोडे पैसे हवे आहेत.'

आज त्याचे वडील विशेष खुषीत होते. ते म्हणाले, 'खरोखरच मागतो आहेस की काय? मी तुला पैसे उरणार नसल्याचं सांगितलं होतं. तुला मोठी रक्कम हवी आहे का?'

'फार मोठी रक्कम हवी' निकोलायने शरमून मूर्ख व बेफिकीर हास्य करीत उत्तर दिले. (ह्याबद्दल पुढे कितीतरी काळ त्याने स्वतःला क्षमा केली नाही.) 'मी जुगारामध्ये मोठी रक्कम हरलो आहे. मोठी म्हणजे फारच मोठी. त्रेचाळीस हजार रूबल.'

'एवढी रक्कम कोणाला देणार आहेस? तू थट्टा करीत असशील.' काउंट रागाने लाल होत ओरडला.

निकोलाय म्हणाला, 'उद्या पैसे देण्याचं मी वचन दिलं आहे.' हताश होऊन हात उडवीत असहाय्यपणे काउंट सोफ्यावर कोसळला.

'दुसरा उपाय नाही. प्रत्येकाच्या बाबतीत असंच घडत असतं.' काउंटचा मुलगा अगदी सहज बोलला. मनातल्या मनात आपल्या अधमतेची त्याला तीव्र जाणीव होत होती. त्या गुन्ह्याचे प्रायश्चित्त घ्यायला सगळे आयुष्य पुरे पडणार नाही असे त्याला वाटत होते. आपल्या वडिलांच्या हाताचे चुंबन घ्यावे आणि त्यांच्या समोर गुडघे टेकून त्यांची क्षमा मागावी असे त्याला वाटले, पण प्रत्यक्षात मात्र तो बेफिकिरीने आणि उद्धटपणाने वडिलांना सांगत होता, 'प्रत्येकाच्या बाबतीत असंच घडत असतं.'

आपल्या मुलाच्या तोंडून ते शब्द ऐकताच काउंटने डोळे झाकून घेतले. जणू काही उपाय शोधण्यासाठी तो जोराने येरझारा घालू लागला. तो कसाबसा म्हणाला, 'पैसे उभे करणं अतिशय कठीण गोष्ट आहे. सर्वांच्या बाबतीत असं घडत असतं. खरं आहे ते. सर्वांच्या बाबतीत असं घडत असतं.' मुलाच्या चेहऱ्यावर ओझरती नजर टाकून काउंट खोलीबाहेर पडला. विरोधाला तोंड देण्याची निकोलायने मनाची तयारी केली होती. जे घडले ते मात्र त्याला अनपेक्षित होते.

'पपा', वडिलांच्या मागे धावत तो ओरडला, हुंदके देत म्हणाला, 'मला क्षमा करा.' वडिलांचा हात पकडून तो आपल्या ओठांवर दाबीत निकोलाय ओक्साबोक्शी रडू लागला.

पिता-पुत्रांमधे असे बोलणे चालले होते. त्याच वेळी माय-लेकींमधे तसेच महत्त्वाचे बोलणे चालू होते. बेहोष झालेली नताशा आईकडे धावत आली. 'आई, त्यानं मला...'

'काय ते लवकर सांग.'

'त्यानं मला मागणी घातली.' नताशाला रडू आवरेना. काउंटेसचा आपल्या कानांवर विश्वास बसेना. डेनिसॉव्हने मागणी घातली आणि ती सुद्धा बाहुल्यांशी खेळणे नुकतेच

सोडलेल्या आणि अजूनही शिकत असलेल्या चिमुरड्या पोरीला-नताशाला.

ती थट्टा आहे असे वाटून ती म्हणाली, ' नताशा, तुझा मूर्खपणा पुरे झाला. '

नताशा रागाने म्हणाली, ' मूर्खपणा म्हणे ! मी तुला खरं काय ते सांगते आहे, मी तुला काय करायचं ते विचारायला आले आहे आणि तुला हा मूर्खपणा वाटतो आहे ! '

खांदे उडवीत काउंटेस म्हणाली, ' डेनिसॉव्हनं तुला मागणी घातली हे जर खरं असलं तर त्याला एवढंच सांग, ' तुझ्यासारखा मूर्ख तूच. '

नताशा रोषाने आणि गंभीरपणे म्हणाली, ' तो मुळीच मूर्ख नाही. '

' मग तू काय करणार आहेस ? नताशा, तू सर्वस्वी प्रेमात पडलेली दिसतेस. तुझं जर त्याच्यावर प्रेम असेल तर त्याच्याशी लग्न करावंस हे बरं, मग परमेश्वर तुझी काळजी घेवो. ' काउंटेस रागाने हसत म्हणाली.

' आई, माझं त्याच्यावर प्रेम नाही. मला वाटतं. नाहीच त्याच्यावर माझं प्रेम. आई, तू रागावलीस का ? अशी रागावू नकोस. यात माझा काय दोष आहे ? '

' तू सांगत असशील तर मी जाऊन त्याला खरंच सांगते ' काउंटेस स्मित करीत म्हणाली.

' तसं नको. मीच स्वतः सांगेन. तुला सगळ्या गोष्टी कशा सहज साधतात. त्याला कसं सांगू ते तेवढंच मला शिकव. त्यानं मागणी कशी घातली ते तू ऐकायला हवं होतंस. मला वाटतं त्याच्या मनात तसं नसावं, पण चुकून योगायोगानं तो बोलून गेला. '

' काही झालं तरी तू त्याला नकार द्यायला हवास. '

' नाही. मी नकार देणार नाही. मला त्याची इतकी दया येते ! त्यातून तो इतका चांगला आहे ! '

' तसं असेल तर तू त्याला होकार देऊन टाक. तुझं लग्न यापूर्वीच व्हायला हवं होतं. ' तिच्या बोलण्यात राग आणि उपरोध होता.

' खरंच आई, त्याच्याबद्दल मला इतकं वाटतं. मला कसं बोलावं तेच कळत नाही. '

' ठीक आहे. तू सांगण्याची काही गरज नाही. मीच जाऊन त्याच्याशी बोलते.' छोट्या नताशाला एखाद्या प्रौढ स्त्रीसारखे वागवले जाते म्हणून काउंटेस भडकली होती.

' काही झालं तरी तू जाऊ नकोस. मी स्वतःच जाईन ' नताशा दिवाणखान्यातून धावत गेली. खोलीमध्ये क्लॅव्हिकॉर्डच्या जवळच्या खुर्चीत दोन्ही तळहातांवर डोके टेवून डेनिसॉव्ह बसला होता. हलकी पावले ऐकू येताच तो ताडकन उठला.

तिच्याकडे जलद पावलांनी जात तो तिला म्हणाला, ' नताशा, माझं नशीब तुझ्या हातात आहे. '

' व्हॅसिली डिमिट्रिच, मला फार वाईट वाटतं. तू फार चांगला आहेस. पण माझा नाइलाज आहे. आतासारखंच माझं तुझ्यावर नेहमी प्रेम राहील.'

डेनिसॉव्ह तिच्या दिशेने झुकला. तिला विचित्र आवाज ऐकू आले पण कसले ते कळले नाही. तिने त्याच्या विस्कटलेल्या कुरळ्या केसांचे चुंबन घेतले होते. तेवढ्यात त्यांना घाईने

येणाऱ्या काउंटेसच्या स्कर्टची सळसळ ऐकू आली.

त्यांच्याजवळ येऊन काउंटेस संकोचलेल्या आवाजात बोलू लागली. डेनिसॉव्हला मात्र तिचा आवाज करारी वाटला. ' व्हॅसिली डिमिट्रिच, मागणी घालून आमचा सन्मान केल्याबद्दल मी तुझी आभारी आहे. माझी मुलगी लहान आहे. तू माझ्या मुलाचा मित्र असल्यामुळे माझ्याकडे प्रथम येशील असं मला वाटत होतं. तसं झालं असतं तर तुला नकार देणं मला भाग पडलं नसतं. '

डेनिसॉव्हची नजर खाली वळली, मुद्रा अपराधी झाली, ' काउंटेस '...त्याला पुढे बोलता येईना.

त्याची दयनीय अवस्था पाहून नताशा हेलावून गेली. ती मोठ्याने रडू लागली.

रडवेल्या स्वरात डेनिसॉव्ह बोलू लागला. ' काउंटेस, माझी चूक झाली. तुमच्या मुलीवर आणि तुमच्या कुटुंबातील माणसांवर माझं इतकं प्रेम आहे की मी त्यासाठी माझे प्राणही देईन. ' त्याचे काउंटेसच्या करारी मुद्रेकडे लक्ष गेले. काउंटेसच्या हाताचे चुंबन घेऊन त्याने निरोप घेतला. नताशाकडे वळूनही न पाहता तो निग्रहाने जलद पावले टाकीत बाहेर पडला.

डेनिसॉव्ह आणखी एक दिवसही मॉस्कोत थांबायला राजी नव्हता. मधा घडलेल्या प्रसंगाच्या दुसऱ्या दिवशीच रोस्तॉफने डेनिसॉव्हला निरोप दिला. मॉस्कोमधील सर्व मित्रांनी जिप्सी हॉटेलमध्ये जमून त्याचा निरोप-समारंभ साजरा केला. आपण घोडागाडीत कसे बसलो हे डेनिसॉव्हला आठवेना. गाडीने तीन स्टेशने ओलांडली याची त्याला दखल नव्हती.

डेनिसॉव्ह गेल्यानंतर रोस्तॉफ पंधरा दिवस मॉस्कोत राहिला. त्याला कर्जफेडीसाठी हवे असलेले पैसे काउंटला एकदम जमवता येत नव्हते. रोस्तॉफ घराबाहेर क्वचितच पडे. बहुतेक वेळ तो मुलींच्या खोलीत घालवी.

सोन्याचा जीव त्याच्यावर पूर्वीपेक्षा अधिक जडला. त्याच्या जुगारात झालेल्या हानीमुळे आपले प्रेम अधिकाधिक वाढत आहे असे तिला जणू दाखवायचे होते. निकोलाय मात्र आपण तिच्या प्रेमाला अपात्र आहोत असे समजू लागला.

त्याने मुलींसाठी संगीत उतरवून दिले. त्यांच्या आल्बममधे कविता लिहिल्या. डोलोहॉव्हची सर्व रक्कम देऊन टाकली. त्याबद्दल डोलोहॉव्हची पावती घेतली. कुणाही परिचिताचा निरोप न घेता नोव्हेंबरच्या अखेरीस त्याने मॉस्को शहर सोडले आणि पोलंडमध्ये पोचलेली रेजिमेंट गाठली.

■ ■

# भाग पाचवा

## १८०६–१८०७

पत्नीच्या भेटीनंतर पीटर पीटर्सबर्गला निघाला. टॉर्झहॉक येथील टप्प्यावर घोडे नसल्याने किंवा तेथला व्यवस्थापक द्यायला तयार नसल्याने पीएरला तेथे थांबावे लागले. प्रवासातला पोषाख न काढताच तो सोफ्यावर पहुडला. समोरच्या वाटोळ्या टेबलावर मोठाल्या बुटांचे पाय टाकून तो विचारात गढून गेला.

त्याचा नोकर विचारीत होता, 'ट्रंका इकडे आणू का? बिछाना तयार करून देऊ का? चहा घेणार आहात का?'

पीएर काही उत्तर देत नव्हता. ऐकण्या-बोलण्याच्या मनःस्थितीत तो नव्हता. मागचा टप्पा सोडल्यापासून तो महत्त्वाच्या गोष्टीत इतका गढला होता की त्याला आजूबाजूला काय चालले आहे याची जाणीव होत नव्हती.

'मी स्वतःला जखमी समजलो म्हणून तर डोलोहॉव्हला गोळी घातली. सोळाव्या लुईला फाशी देण्यात आले. कारण त्यांच्या मते तो गुन्हेगार होता. एक वर्षानंतर त्याला गुन्हेगार ठरविणाऱ्या न्यायाधीशांना कसल्यातरी कारणासाठी ठार करण्यात आलं. न्याय काय? अन्याय काय? प्रेम कशावर करावं? तिरस्कार कशाचा करावा? जीवनाचा उद्देश काय? जीवनात माझं कर्तव्य काय? जीवनाचा अर्थ काय? या साऱ्यावर कोणाची सत्ता चालते?' तो स्वतःला विचारीत होता. या प्रश्नांना उत्तरे नव्हती. फक्त तर्काला धरून नसलेले एक उत्तर होते. खरे तर ते कुठल्याच प्रश्नाचे उत्तर नव्हते. ते उत्तर असे, 'माणूस मरतो आणि तो प्रश्न संपुष्टात येतो. माणूस मरतो आणि त्याचं प्रश्न विचारणं थांबतं.'

टॉर्झहॉकची ती फेरीवाली स्त्री आपल्या वस्तू— विशेषतः बकऱ्याच्या कातड्याचे जोडे—

खपवण्यासाठी करुण स्वरात ओरडत होती.

पीएरच्या मनात आले, 'माझ्याकडे हजारो रूबल आहेत, त्यांचे काय करावे ते मला समजत नाही. जीर्णशीर्ण वस्त्रातील ही बाई माझ्याकडे भयभीत होऊन पाहात उभी आहे. कशासाठी हवा आहे तिला पैसा? जणू पैसा तिला सुखाचा एक कण, आत्मशांतीचा एक क्षण देणार आहे! जिच्यामुळे पाप आणि मृत्यू यांपासून थोडीफार उसंत मला आणि तिला मिळेल अशी एखादी गोष्ट या जगात असेल का? सर्वांचा शेवट करणारे मरण आज ना उद्या, कधी ना कधी येणारच आहे. अनंत कालाच्या संदर्भात मरण म्हणजे एक क्षण आहे.' त्याला आपले मन आणि भोवताचे जग निरर्थक आणि तिरस्कृत वाटू लागले. भोवतालच्या तिरस्कृत जगातच आशेचे मृगजळ दिसू लागले.

त्या ठिकाणी दुसरा एक प्रवासी आला. पुढच्या मुक्कामास जाण्यासाठी घोडे नसल्याने तो अडकून पडला होता. त्याला पीएरच्या खोलीत आणल्यावर व्यवस्थापक दिलगिरीपूर्वक म्हणाला, 'महाराज, कृपा करून थोडी जागा ह्यांना द्या.'

त्या वृद्ध प्रवाशाच्या भरभक्कम अंगावर सुरकुत्या होत्या, त्याची कांती पिवळसर होती, त्याच्या सफेद पापण्यांखालील घारे डोळे चमकत होते.

पीएर टेबलावरील पाय खाली घेऊन उठला. अगोदरच तयार केलेल्या बिछान्यावर पडून मधून मधून त्या नव्या प्रवाशाकडे पाहू लागला. त्या नव्या प्रवाशाची मुद्रा संत्रस्त व थकलेली दिसत होती. आपल्या नोकरांच्या मदतीने त्याने कसाबसा पोषाख उतरला. आता त्याने मेंढ्याच्या कातडीचा गबाळा कोट घातला. आपल्या कृश हडकुळ्या पायांत मोठाले बूट चढविले आणि तो सोफ्यावर बसला. त्याचे कपाळ मोठे होते. त्याने डोक्यावरील केस बारीक केले होते. डोके मागे झुकवून त्याने पीएरवर नजर टाकली. त्याच्या करारी, धूर्त आणि भेदक नजरेची पीएरच्या मनावर छाप पडली, त्याच्याशी बोलावे असे त्याला वाटू लागले. त्या वृद्धाच्या चमकदार डोळ्यांनी पीएरला आपल्याकडे खेचले. पीएर काही प्रतिकार करू शकला नाही.

मुद्दाम आवाज चढवून तो परका प्रवासी म्हणाला, 'तुमची गाठ पडली म्हणून मला आनंद होत आहे. तुम्ही काउंट बेझुहॉव्ह आहात, होय ना?' पीएर काही न बोलता चौकसपणे त्याच्याकडे चष्म्यातून पाहत राहिला. तो प्रवासी आपला बोलत होता. 'तुमच्याबद्दल मी बरंच ऐकलं आहे. तुमच्यावर ओढवलेल्या दुर्दैवाविषयीही मला माहिती आहे.' दुर्दैव ह्या शब्दावर भर देत त्याने म्हटले, 'त्याला दुर्दैव म्हणा वा इतर काही नाव द्या. मॉस्कोमधे तुमच्यावर ओढवलेल्या प्रसंगाला दुर्दैवच म्हटलं पाहिजे.'

'मला त्याबद्दल अतिशय वाईट वाटतं.' लालबुंद झालेल्या पीएरने बिछान्यावरून खाली पाय सोडता सोडता म्हटले. अस्वाभाविक आणि भित्रे हास्य केले.

'मी त्याचा उल्लेख केला तो केवळ जिज्ञासेनं नव्हे. त्याला त्याहून गंभीर कारणं आहेत.' पीएरला आपल्या नजरेच्या टप्प्यात ठेवून तो म्हणाला. सोफ्यावरून बाजूला सरकून त्याने

पीएरला आपल्या जवळ बसण्याची सूचना दिली. त्या म्हाताऱ्याशी संभाषण सुरू करावे असे पीएरला बिलकूल वाटत नव्हते. पण तो त्याच्याजवळ येऊन बसला.

तो प्रवासी बोलत होता, ' तुम्ही दुःखी आहात, तरुण आहात आणि मी वृद्ध आहे. तुम्हाला शक्य तेवढी मदत करायला मला आवडेल. '

कृत्रिम हास्य करीत पीएर म्हणाला, ' मी आपला आभारी आहे. तुम्ही कुठून प्रवास करता आहात ? ' त्या परक्या प्रवाशाच्या चेहऱ्यावर प्रेमळपणा नव्हता, उलट मुद्रा निर्विकार आणि करारी वाटत होती. असे असूनही त्याचे बोलणे आणि त्याचा चेहरा यांबद्दल पीएरच्या मनात अतिशय ओढ निर्माण झाली.

त्याच्या हाताकडे पुन्हा एकदा लक्ष टाकून पीएरने हातातली अंगठी अधिक बारकाईने न्याहाळली. अंगठीवर मेसनांचे प्रतीक असलेली ॲडमची प्रतिमा होती.

' चौकशी करतो म्हणून क्षमा करा. तुम्ही मेसन आहात का ? '

' होय. मी फ्रीमेसनांच्या मंडळाचा सभासद आहे. ' पीएरच्या डोळ्यांत पूर्वीहून अधिक रोखून पाहत तो प्रवासी उत्तरला. ' त्यांच्या आणि व्यक्तिशः माझ्या वतीनं मी मैत्रीचा हात पुढे करतो आहे. '

ह्या फ्रीमेसनच्या व्यक्तित्वामुळे मनात निर्माण झालेला विश्वास आणि आजवर फ्रीमेसन पंथाच्या नियमांची थट्टा करण्याची सवय यांच्या रस्सीखेचीत त्याचे मन सापडले. तो स्मित करीत म्हणाला, ' मला भीती वाटते, आपण एकमेकांना समजून घेऊ शकणार नाही. मला स्पष्ट करता येणार नाही. विश्वाच्या सिद्धान्ताबद्दलचे माझे विचार तुमच्या विचारांच्या एवढे विरुद्ध आहेत की, आपण एकमेकांना समजणं अशक्य आहे. '

तो फ्रीमेसन म्हणाला, ' तुमच्या विचारप्रणालीशी माझा परिचय आहे. आपल्या स्वतःच्या चिंतनातून जी तयार झाली आहे असं तुम्हाला वाटतं ती विचारप्रणाली अनेक लोकांची विचारप्रणाली आहे. गर्व, आळस आणि अज्ञान यांचा अपरिहार्य परिपाक म्हणजे ही तुमची विचारप्रणाली होय. मला याची कल्पना नसती तर— माझ्या बोलण्याबद्दल क्षमा करा—तर मी आपणाला हाकही मारली नसती. तुमची विचारप्रणाली ही दुर्दैवी गफलत आहे असं मला वाटतं. '

' जसं मला वाटतं की तुमची गफलत होत आहे. ' पीएर मंदस्मित करीत म्हणाला.

' मी सत्य जाणतो असं म्हणण्याइतका धीटपणा माझ्या अंगी कधीच येणार नाही,' मेसन म्हणाला. त्याच्या बोलण्यातील निश्चितता आणि निर्णयशक्ती यांचा प्रभाव पीएरच्या मनावर अधिकाधिक पडू लागला. ' कोणा एकट्या व्यक्तीला सत्य सापडणार नाही. आपला पहिला पूर्वज ॲडम याच्यापासून आजपर्यंत लाखो पिढ्यांतील माणसांनी सहकार्यानं एकेक वीट रचून उभारलेलं मंदिर सर्वशक्तिमान परमेश्वराचं खरं निवासस्थान होऊ शकेल. ' असे बोलून त्या फ्रीमेसनने आपले डोळे झाकून घेतले.

' तुम्हाला सांगणं माझं कर्तव्य आहे... माझा परमेश्वरावर विश्वास नाही. ' संपूर्ण सत्य

सांगणे आवश्यक आहे ह्या भावनेने पीएरने खेदपूर्वक आणि प्रयासपूर्वक म्हटले.

पाच रूबल असते तरी आपण सुखी झालो असतो असे म्हणणाऱ्या गरीब दुर्दैवी जिवाकडे पाहून लाखो रूबल जवळ असणाऱ्या धनिकाने स्मित करावे तसे स्मित फ्रीमेसनने केले आणि म्हटले, ' महाशय, तुम्ही त्याला ओळखत नाही म्हणून तुम्ही दुःखी आहात. '

' मी दुःखी आहे हे खरं ' पीएरने कबुली दिली. ' मग मी काय करायला हवं? '

' तुम्ही त्याला जाणून घेत नाही म्हणून तुम्ही दुःखी आहात. तुम्ही त्याला ओळखा न ओळखा, तो इथंच असतो. तो माझ्यामधे आहे. तो माझ्या शब्दात आहे. तो तुमच्यामधे आहे. तुमच्या थट्टेत आहे. ' त्याच्या थरथरत्या आवाजात वचक होता.

तो जरा थांबला, त्याने उसासा टाकला. शांत होण्याचा त्याचा प्रयत्न स्पष्ट दिसत होता.

तो हळुवार आवाजात बोलू लागला, ' तो अस्तित्वात नसता तर आपण त्याच्याविषयी बोलत नसतो. आपण कुणाविषयी, कशाविषयी बोलत होतो? तुम्ही कोणाचं अस्तित्व नाकारत आहात? ' तो एका दमात बोलला. त्याच्या त्या उत्साही वाणीमागे चारित्र्य होते, अधिकार होता. ' तो अस्तित्वात नाही म्हणता, मग त्याला कोणी निर्माण केलं? अगम्य गूढ अशी शक्ती आहे अशी जाणीव तुमच्यामधे आलीच कशी आणि कुठून? सर्वशक्तिमान, सनातन आणि अनंत गुणांनी युक्त अशा कल्पनेलाही भावत नसलेल्या शक्तीचं अस्तित्व तुम्ही आम्ही सर्व गृहीत धरतो याचं कारण तरी काय? '

तो बराच वेळ स्तब्ध राहिला.

पीएर त्याला अडवू शकला नाही. त्याला अडवावे असे त्याला वाटले नाही.

तो फ्रीमेसन आता पीएरच्या डोळ्यांत रोखून पाहत नव्हता. पण त्याची नजर सरळ त्याच्या दिशेनेच दूरवर जात होती. अंतःकरणात खळबळ माजल्याने स्वस्थ न राहणारे त्याचे हात ग्रंथाची पाने चाळत होते. तो पुन्हा बोलू लागला. ' परमेश्वर अस्तित्वात आहे पण त्याचं आकलन होणं कठीण आहे. ज्याच्या अस्तित्वाबद्दल तुला संशय आहे अशा प्रकारचा तो मनुष्य असता तर मी त्याला हाताला धरून तुझ्यासमोर आणला असता आणि तुला दाखवला असता. जो आंधळा आहे, पाहायचं नाही म्हणून जो डोळे मिटून घेतो, त्याला कळून घ्यायची ज्याची इच्छा नाही, आपले दुरित पाहण्याची, अतर्क्य समजून घेण्याची ज्याला इच्छा नाही अशा माणसाला माझ्यासारखा क्षुद्र, मर्त्य मनुष्य परमेश्वराची सर्व शक्ती, त्याचे अनादी अनंत रूप, त्याची आनंदमयता कशी दाखवू शकणार? ' किंचित काळ थांबून तो म्हणाला, ' तू कोण आहेस? स्वतःला ओळखलं आहेस का? तशा प्रकारचे तिरस्काराचे शब्द आपल्याला बोलता येतात म्हणून आपण विद्वान आहोत अशा भ्रमात तू आहेस. ' त्याच्या उपरोधिक बोलण्यात खिन्नता आणि तुच्छता होती. ' कुशलतेने तयार केलेल्या घड्याळाच्या सुट्या भागाशी लहान मूल खेळत असते. घड्याळाचा उपयोग कळत नसल्याने घड्याळाच्या निर्मात्यावर माझा विश्वास नाही असं म्हणणाऱ्या त्या लहान मुलापेक्षाही तू अधिक भाबडा, अधिक मूर्ख आहेस. त्याला जाणून घेणं साधं सोपं

नाही. त्या ज्ञानासाठी आपला पहिला पिता ॲडम याच्या काळापासून आजपर्यंत कित्येक युगं आपण धडपडत आहोत. त्या उद्दिष्टाची प्राप्ती आणि आपण यांत अनंत अंतर आहे. आमच्या अज्ञानात आम्ही आमचे केवळ दोष पाहतो आणि ईश्वराची महानता पाहतो. '

पीएर चमकदार डोळ्यांनी फ्रीमेसनच्या चेहऱ्याकडे पाहात होता. त्याच्या शब्दांनी त्याचे अंतःकरण थरारून जात होते. तो त्याला प्रश्न विचारत नव्हता, मधे व्यत्यय आणत नव्हता. त्याचे अवघे अंतःकरण श्रद्धेसाठी आसुसले. त्या श्रद्धेत त्याला समाधान लाभले, पुनर्जीवन लाभले, विलक्षण आनंद लाभला.

फ्रीमेसन म्हणाला, ' या गोष्टी युक्तिवादानं साध्य होणार नाहीत. जीवनानंच साध्य होतील.'

फ्रीमेसनच्या स्मितात पित्याचे वात्सल्य होते. तो म्हणाला, ' बौद्धिक ज्ञान ज्यात विभागलं गेलं आहे अशा इतिहास, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र इत्यादी ऐहिक शास्त्रांवर अथवा केवळ युक्तिवादावर देखील उच्च ज्ञान आधारलेले नाही; ते उच्चतम ज्ञान संपूर्ण, सलग, एक आहे. उच्चतम ज्ञान फक्त एकच शास्त्र जाणतं. ते म्हणजे प्राणिनिर्मिती आणि तिच्यातील मानवाचं स्थान स्पष्ट करणारं अवघ्या विश्वाचं शास्त्र. आपलं आंतरिक जीवन नव्यानं घडवलं आणि विशुद्ध केलं तरच हे शास्त्र आपल्याला आत्मसात करता येईल. ज्ञानप्राप्तीच्या आधी श्रद्धेची आणि संपूर्ण जीवनाची आवश्यकता आहे. ही सगळी उद्दिष्टं साधण्यासाठी आपल्या अंतःकरणात ईश्वरानं ज्योत पेटती ठेवली आहे. तिचं नाव सदसद्विवेक बुद्धी.'

पीएरने मान डोलावली.

' आत्मिक दृष्टी घेऊन तू स्वतःचं आंतरिक जीवन पारखून घे. तू स्वतःवरच तृप्त आहेस का ? हे स्वतःलाच विचार. केवळ बुद्धिवादाच्या मदतीनं तुला आजवर काय मिळालं ? स्वतःलाच विचार—कोऽहम् ? तू तरुण आहेस, धनिक आहेस, सुसंस्कृत आहेस. तुझ्यावर झालेल्या ह्या कृपेचा तू कोणता सदुपयोग केलास ? तुला स्वतःबद्दल आणि जीवनाबद्दल समाधान वाटतं का ? '

पीटर कपाळाला आठ्या घालत म्हणाला, ' मला जीवन बिलकुल आवडत नाही. '

' जर तुला ते बिलकुल आवडत नाही तर ते बदलण्याचा प्रयत्न कर. तू पवित्र झालास म्हणजे तुला ज्ञानप्राप्ती होईल. जीवनावर जरा दृष्टिक्षेप तर टाक. तू जीवन कसं व्यतीत करीत होतास ते आठव. तू व्यसनात लोळत होतास, समाजाकडून सर्व काही मिळवत होतास त्याच्या बदल्यात समाजाला काहीही देत नव्हतास. तुला मिळालेल्या संपत्तीचा तू कसा वापर केलास ? आपल्या शेजाऱ्यासाठी तू काय केलंस ? तुझ्या हजारो गुलामांचा तू कधी सहानुभूतीनं विचार केलास का ? त्यांच्या शरीराला आणि त्यांच्या अंतःकरणाला कधी मदत पोचवलीस का? तू त्यांच्या कष्टांचा स्वतःच्या विषयासक्त जीवनासाठी उपयोग करून घेतलास. त्याखेरीज काहीही केलं नाहीस. शेजाऱ्यांना उपयोगी पडेल अशी एखादी नोकरीही तू पत्करली नाहीस. सगळं आयुष्य आळसात घालवलंस. लग्न करून एका तरुण स्त्रीला

जीवनात मार्गदर्शन करण्याची जबाबदारी तू उचललीस. आणि तू केलंस काय तर तिला वंचनेच्या आणि दुःखाच्या गर्तेत लोटलंस. गृहस्था, सत्याचा मार्ग शोधायला तू तिला मदत केली नाहीस. ज्याने तुला दुखवलं त्याला तू ठार मारलंस. आता तू म्हणतोस की आपण परमेश्वर ओळखत नाही. आपणाला जीवनाचा तिरस्कार वाटतो. या साऱ्या गोष्टींत बिलकुल शहाणपण नाही.'

एवढे बोलून झाल्यावर फ्रीमेसनने आपले दोन्ही कोपर सोफ्याच्या पाठीवर टेकवले आणि डोळे झाकून घेतले. बराच वेळ बोलल्याने जणू त्याला शीण आला होता. पीएर त्या वृद्धाच्या करारी, स्थिर आणि मृतवत भासणाऱ्या चेहऱ्याकडे टक लावून बघत राहिला. त्याच्या ओठांची हालचाल होत होती, परंतु शब्द फुटत नव्हते. त्याला म्हणायचे होते, 'मी खरोखर आळशी, व्यसनी आणि पापी जीवन जगलो.' शांततेचा भंग करण्याचे धाडस त्याला झाले नाही. वृद्ध माणसे खाकरतात तसा फ्रीमेसन खाकरला आणि त्याने आपल्या नोकराला बोलावले.

पीएरकडे न बघताच त्याने विचारले, 'घोड्यांची काय व्यवस्था झाली?'

'दुसऱ्या प्रवाशांनी सोडलेले घोडे आता मिळताहेत. तुम्ही विश्रांती घेणार नाही का?' वृद्ध नोकराने विचारले.

'विश्रांती नाही, त्यांना घोडे जुंपायला सांग.'

पीएर उठून उभा राहिला. मान खाली घालून खोलीत येरझारा घालत मधूनमधून फ्रीमेसनकडे पाहत विचार करू लागला. 'मला एकट्याला टाकून फ्रीमेसन जाणार आहे काय? काहीही न सांगता, मदतीचे वचन न देता? मी पूर्वी अविचाराने वागलो हे खरे आहे, तिरस्कार वाटावा असे व्यसनी जीवन मी घालविले. मला तसे वागणे आवडले नव्हते, तसे जीवन मला घालवायचेही नव्हते. या माणसाला साक्षात्कार झालेला आहे. त्याने मनात आणले तर मला सत्याचे दर्शन घडेल.' पीएरला हे सारे फ्रीमेसनला सांगायचे होते, पण तसे करायला तो धजला नाही. आपल्या सरावलेल्या हातांनी त्या वृद्ध प्रवाशाने सामानाची आवराआवर केली, कोटाची बटने लावली. एवढी तयारी झाल्यावर तो बेझुहोव्हकडे वळला, त्याने बेफिकीर व नम्र स्वरात त्याला विचारले, 'तुम्ही आता कुठं जाणार आहात?' लहान मुलाच्या अनिश्चित स्वरात पीएर उत्तरला, 'मी पीटर्सबर्गला निघालो आहे. मी तुमचा ऋणी आहे. तुम्ही सांगितलेल्या सर्व गोष्टी मला पटल्या. मी इतका वाईट होतो असं समजू नका. तुम्ही सांगता तसं जीवन जगण्याची माझी मनापासून इच्छा होती आणि आहेही. पण मला कुणाकडून मदत वा मार्गदर्शन मिळालं नाही. माझ्याकडेच दोषाचा बराचसा वाटा जातो. मला मदत करा, मार्गदर्शन करा, कदाचित मी...'

पीएरला पुढे बोलवेना. तो मागे वळला.

फ्रीमेसन शांत होता. तो कशाचा तरी विचार करीत होता. तो म्हणाला, 'केवळ परमेश्वर मदत करतो. आमच्या पंथाला जेवढी मदत देणं शक्य आहे तेवढी तुला मिळेल.' त्याने

आपले नोटबुक काढले. चार भागांत दुमडलेल्या मोठ्या कागदावर दोन ओळी लिहिल्या. तो कागद त्याच्याकडे देत म्हटले, 'पीटर्झबर्गला गेल्यावर ही चिठ्ठी काउंट व्हिलार्स्कीला दे, तुझ्या हिताचा सल्ला मी तुला देतो. राजधानीत गेल्यावर एकान्तात आत्मपरीक्षण करण्याला तुझा सगळा वेळ दे. पुन्हा जुन्या प्रकारचं जीवन जगू नकोस.' नोकर खोलीत आलेला पाहून त्याने पीएरचा निरोप घेतला, 'तुझा प्रवास सुखाचा जावो आणि नवीन मार्गही.'

व्यवस्थापकाच्या नोंदवहीवरून पीएरला कळले, त्या अपरिचित व्यक्तीचे नाव ऑसिप अलेक्स्येवीच बझ्डेव्ह होते. नॉव्हिकोव्हच्या कारकीर्दीतही अतिशय प्रसिद्ध असलेल्या फ्रीमेसनांपैकी तो एक होता. तो निघून गेल्यानंतर कितीतरी काळ पीएर त्या टप्प्यावरील खोलीत येरझारा घालीत राहिला. झोपेसाठी अंथरुणावर पडला नाही. त्याने घोड्यांची मागणी पण केली नाही. त्याने आपल्या भूतकाळातील दुर्वर्तनाचा आढावा घेतला. आता आपण नवीन जीवनाला सुरुवात करू. निष्कलंक, सद्‌गुणी आणि सुखी जीवन जगणे आपल्याला शक्य आहे या विचाराने त्याला अतिशय आनंद झाला. सद्‌गुणी असणे किती चांगले हे आपण योगायोगाने विसरलो होतो म्हणून आपण दुर्गुणी जीवन जगत होतो असे त्याला वाटू लागले. त्याच्या अंतःकरणातून पूर्वीचे संशय पार नाहीसे झाले. माणसामाणसांत भ्रातृभाव नांदेल, ती परस्परांना सद्‌गुणी होण्यासाठी सहकार्य करतील यावर त्याची पुरती श्रद्धा बसली. फ्रीमेसनांचा पंथ असा भ्रातृभाव निर्माण करीत आहे असे चित्र तो मनाशी पाहू लागला.

पीएरने पीटर्झबर्गला आपण आल्याचे कोणाला कळू दिले नाही. तो कुणाला भेटायलाही गेला नाही. टॉमस केम्पिसचे एक धार्मिक पुस्तक कोणी तरी त्याला पाठवले होते ते तो कित्येक दिवस वाचत होता. पीटर्झबर्गला येऊन आठवडा झाल्यानंतर एका संध्याकाळी व्हिलार्स्की नावाचा तरुण पोलीश काउंट त्याच्या भेटीला आला. पीटर्झबर्गच्या प्रतिष्ठित मंडळांत तो वावरत असल्याने पीएर त्याला थोडेसे ओळखत होता. आत आल्यावर त्याने दरवाजा लावून घेतला. पीएरला उद्देशून तो उभ्याउभ्याच बोलू लागला.

'काउंट, मी आपणाकडे काही संदेश, काही सूचना घेऊन आलो आहे, नेहमीचा कालावधी संपण्यापूर्वीच तुम्हाला आमच्या भ्रातृमंडळात प्रवेश द्यावा म्हणून आमच्या भ्रातृमंडळातील उच्च स्थानावरील एक प्रसिद्ध व्यक्ती विनंती करीत आहे. तिनं मला तुमचा पालक व्हायला सांगितलं आहे. त्या व्यक्तीची इच्छा अमलात आणणं माझं पवित्र कर्तव्य आहे असं मी मानतो. माझ्या पालकत्वाखाली फ्रीमेसनांच्या भ्रातृमंडळात तुम्ही प्रवेश घ्याल ना?'

'होय, अवश्य घेईन.' पीएर म्हणाला.

व्हिलार्स्कीने डोळे झुकवून म्हटले, 'काउंट, तुम्हाला एक प्रश्न विचारतो. भावी मेसन म्हणून नव्हे तर एक प्रामाणिक व्यक्ती म्हणून तुम्ही त्या प्रश्नाचं अगदी खरंखुरं उत्तर द्या

अशी विनंती करतो.—तुम्ही आपल्या पूर्वीच्या श्रद्धांचा त्याग केलाय का? तुमचा परमेश्वरावर विश्वास आहे काय?'

पीएर क्षणभर विचारमग्न झाला. मग म्हणाला, 'आहे. माझा परमेश्वरावर विश्वास आहे.'

'तसे असेल तर—' व्हिलार्स्की बोलत होता, पण मध्येच पीएर म्हणाला, 'माझा परमेश्वरावर विश्वास आहे.'

'तसं असेल तर आपण बाहेर पडू. माझी गाडी तुमच्या सेवेला सज्ज आहे.'

मुक्कामाला जाईपर्यंत व्हिलार्स्की काही बोलला नाही; पीएरने त्याच्याकडे चौकशी केली, 'मला तिथं काय करावं लागेल? कशी उत्तरं द्यावी लागतील?' व्हिलार्स्कीने सांगितले, 'माझ्याहून अधिक लायक असलेले सदस्य तुमच्याबद्दल खात्री करून घेतील. तुम्ही केवळ सत्य ते सांगा.'

गाडी एका प्रशस्त इमारतीच्या फाटकापाशी आली. त्या इमारतीत त्यांचे निवासस्थान होते. ते दोघे अंधारात असलेला जिना चढले. मग त्यांनी छोट्याशा खोलीत प्रवेश केला. तिथे दिवे लावलेले होते. त्या ठिकाणी त्याने नोकरांची मदत न घेता स्वतःच आपला ओव्हर-कोट काढला. तिथून ते दुसऱ्या खोलीकडे गेले. विचित्र पोषाखातील एक व्यक्ती दाराशी आली. व्हिलार्स्की फ्रेंचमधे हळू आवाजात तिच्याशी काही बोलला. नंतर व्हिलार्स्की छोट्या कपाटाकडे वळला. व्हिलार्स्कीने कपाटातून एक रुमाल काढला आणि पीएरच्या डोळ्यांवर बांधला. मागच्या बाजूला बांधलेल्या गाठीत सापडलेले केस दुखू लागले. मग त्याचा हात धरून त्याला कुठेतरी नेण्यात आले.

पीएरची धिप्पाड मूर्ती व्हिलार्स्कीच्या मागून भीत भीत चाचपडत जाऊ लागली.

त्याला दहा पावले नेल्यावर व्हिलार्स्की थांबला. तो म्हणाला, 'आमच्या भ्रातृमंडळात प्रवेश मिळवायचा पक्का निश्चय असेल तर डोळ्यांवरील रुमाल सोडायला हरकत नाही. तुम्हाला चांगलं धैर्य लाभो आणि सुयश लाभो अशी मी इच्छा करतो.' पीएरचे हात दाबीत एवढे बोलून व्हिलार्स्की निघून गेला.

पीएर एकटा राहिला. त्याने दोन वेळा रुमाल काढून टाकण्यासाठी की काय हात वर नेले.

दारावर जोरजोराने थाप पडू लागली. पीएरने डोळ्यांवरील रुमाल काढून भोवती पाहिले. खोलीत गडद काळोख होता. मात्र एका जागी कसल्यातरी पांढऱ्या वस्तूसमोर लहानसा दिवा जळत होता. पीएरने जवळ जाऊन पाहिले. काळ्या टेबलावर दिवा होता आणि त्याच्याजवळ उघडून ठेवलेले एक पुस्तक पडले होते. ते पुस्तक बायबल होते. डोळ्यांच्या जागी भोके असलेल्या आणि दात असलेल्या पांढऱ्या मानवी कवटीत तो दिवा जळत होता. पीएरने उघड्या बायबलमधील पहिली ओळ वाचली: 'प्रारंभी शब्द होता आणि शब्द देवापाशी होता.' मग पीएरने टेबलाला वळसा घातला तेव्हा कशाने तरी भरलेली मोठीशी पेटी त्याच्या दृष्टीस पडली. ती हाडांनी भरलेली शवपेटी होती. ते पाहून त्याला जराही आश्चर्य

वाटले नाही. जुन्या जीवनाहून सर्वस्वी वेगळ्या, एकदम नवीन अशा जीवनाला प्रारंभ करण्याची तो आशा बाळगून होता. त्यामुळे कोणत्याही विचित्र– समोर दिसत असणाऱ्या प्रसंगापेक्षाही अधिक विचित्र प्रसंगासाठी त्याने मनाची तयारी केली होती. कवटी, शवपेटी, बायबल ह्या असल्या गोष्टींची आपण अपेक्षा केली होती असे त्याला वाटू लागले. खरे तर त्याने याहून अधिक विचित्र गोष्टींची अपेक्षा केली होती: तो आपल्यातील भक्तिभाव जागृत करण्याचा प्रयत्न करू लागला. तो स्वतःशीच उच्चारू लागला, 'ईश्वर, मरण, प्रेम, मानवता...' त्याच्या मनात या शब्दांशी कसल्यातरी अनामिक आनंदाचे नाते जडले जाऊ लागले.

दरवाजा उघडून कुणीतरी आत प्रवेश केला. त्या मंद प्रकाशात पीएरला आता थोडे दिसू लागले होते. आत आलेली व्यक्ती ठेंगणी असल्याचे त्याला कळले. बाहेरील उजेडातून आतील अंधारात आल्याने ती व्यक्ती दिपून थांबली. मग ती सावधगिरीने टेबलाच्या दिशेने पावले टाकू लागली. तिने आपले कातड्याचे मोजे घातलेले लहानखोर हात टेबलावर ठेवले.

त्या ठेंगण्या व्यक्तीने गळ्यापासून गुडघ्यापर्यंत शरीर झाकणारा कातड्याचा ॲप्रन घातला होता. तिच्या गळ्यात सरीसारखे काहीतरी दिसत होते. त्या सरीतून वर गळ्यापर्यंत आलेली बरीच रुंद पांढरी शुभ्र कॉलर होती. तीत तिचा चेहरा चौकटीतील चित्रागत बसला होता. त्या कॉलरवर खालून येणारा प्रकाश पडला होता.

पीएरच्या कपड्यांची किंचित सळसळ झाली तेव्हा त्या व्यक्तीने वळून विचारले, 'तुम्ही इथं का आला आहात? दैवी प्रकाशावर तुमची श्रद्धा नाही, तुम्ही तो प्रकाश पाहिला नाही, मग तुम्ही कशासाठी इथं आला आहात? तुम्हाला आमच्याकडून काय हवं आहे? ज्ञान, सद्‌गुण, प्रबोधन...?'

कितीतरी वेळ पीएर गप्प होता. तेव्हा पंडिताला प्रश्न पुन्हा विचारावा लागला.

'होय...नव्या जीवनाला प्रारंभ करण्याची माझी इच्छा आहे.' पीएर कष्टाने उद्‌गारला.

'फार छान.' स्मॉल्यानिनॉव्ह म्हणाला आणि विचारू लागला, 'तुमचं उद्दिष्ट साध्य होण्याकरिता आमचा संप्रदाय तुम्हाला कोणत्या प्रकारे मदत करू शकेल याची तुम्हाला काही कल्पना आहे का?' पंडित शांतपणे पण भरभर बोलत होता.

'मला आशा वाटते...पुनरुज्जीवनासाठी मला मार्गदर्शन– मदत मिळेल,' पीएरचा आवाज थरथरत होता.

'फ्रीमेसनांच्या संप्रदायाबद्दल तुमची काय कल्पना आहे?'

'मला वाटतं सद्‌गुणसंवर्धनाचं ध्येय बाळगणारा, बंधुता आणि समानता यांवर आधारलेला तो संप्रदाय आहे.

'आपल्या उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी तुम्ही धर्माचा आश्रय घेतला होता का?'

'नाही, मला त्यात खरेपणा वाटला, मी त्या मार्गानं गेलो नाही.' पीएर एवढ्या हळू आवाजात बोलला की पंडिताला ते ऐकू आले नाही. पंडिताने पुन्हा सांगायला सांगितले तशी पीएर म्हणाला, 'मी नास्तिक होतो.'

'सत्याचे नियम पालन करण्यासाठी तुम्ही सत्याचा शोध घेत आहात, खरं ना? म्हणजेच तुम्ही ज्ञान आणि सद्गुण यांच्या शोधात आहात, होय ना?' पंडिताने विचारले.

'होय.' पीएरने मान डोलावली.

पंडिताने खाकरून आपले मोज्यांचे हात छातीशी जुळवले आणि बोलण्यास प्रारंभ केला.

'मी आता तुम्हाला आमच्या संप्रदायाचं मुख्य उद्दिष्ट विशद करून सांगतो. जर ते तुमच्या उद्दिष्टांशी जुळत असेल तर तुम्ही भ्रातृमंडळात सामील व्हा. तुमचा फायदा होईल. एका महत्त्वाच्या रहस्याचं रक्षण करून ते पुढच्या पिढीच्या हाती सोपवणं हे आमचं पहिलं प्रमुख उद्दिष्ट आहे. ह्यावर आमचा संप्रदाय आधारलेला आहे. हा पाया कुठलीही मानवी शक्ती नष्ट करू शकणार नाही. हे महत्त्वाचं रहस्य फार प्राचीन काळापासून- अगदी पहिल्या मानवापासून आमच्याकडे येऊन पोचलं आहे. कदाचित या रहस्यावर सर्व मानवजातीचं भवितव्य अवलंबून असेल. हे रहस्य असं आहे की ते कोणाला सहजासहजी कळणार नाही, आत्मशुद्धीच्या दीर्घ तपश्चर्येनंतरच त्या रहस्यापासून लाभ होण्याचा संभव आहे. त्यामुळं ते थोड्या काळात गवसेल अशी आशा कुणीच बाळगू शकत नाही. म्हणून आम्ही दुसरं उद्दिष्ट समोर ठेवलं आहे. विश्वरहस्य प्राप्त करण्याचा आणि ते रहस्य आत्मसात करण्यासाठी स्वतःला पात्र करण्याचा जी माणसं प्रयत्न करतात त्यांच्या परंपरेतून प्रतीत झालेल्या मार्गांच्या मदतीनं सदस्यांच्या अंतःकरणाची शुद्धी करून व त्यांच्या बुद्धीचं प्रबोधन करून त्यांना त्या रहस्यासाठी तयार करण्याचा प्रयत्न चालू असतो. आम्ही आमच्या सदस्यांची अंतःकरणं पवित्र करतो आणि त्यांचं पुनरुज्जीवन करतो. अशा प्रकारे त्यांच्या रूपानं पावित्र्य आणि सद्गुण यांचा आदर्श ठेवून अवघ्या मानवजातीला सुधारण्याचा प्रयत्न करतो. जगात प्रभुत्व गाजविणाऱ्या दुरिताविरुद्ध लढण्याची आम्ही शर्थ करीत असतो. या सर्व गोष्टींचा तुम्ही विचार करा. मी पुन्हा तुमच्याकडे येतो,' असे बोलून पंडित खोलीच्या बाहेर गेला.

'जगात प्रभुत्व गाजविणाऱ्या दुरिताविरुद्ध लढण्यासाठी...' पीएरने स्वतःशीच ते शब्द उच्चारले. तशा अर्थाचे चित्र त्याच्या मनश्चक्षूंसमोर उभे राहिले.

अर्ध्या तासानंतर पंडित साधकाला सप्त-सद्गुण विशद करण्यासाठी आला. हे सप्त-सद्गुण सॉलमनच्या मंदिराच्या सात पायऱ्यांशी जुळते होते. फ्रीमेसनने ते आत्मसात करणे आवश्यक असे. ते सप्त-सद्गुण असे होते : (१) भ्रातृभावमंडळाच्या संप्रदायाच्या गोष्टी गुप्त ठेवण्याचा विवेक. (२) संप्रदायाच्या वरिष्ठ हुद्द्यावरील व्यक्तींच्या आज्ञांचे पालन, (३) नीतिमत्ता, (४) मानवजातीवर प्रेम, (५) धैर्य, (६) औदार्य आणि (७) मृत्यूची ओढ.

'जर तुमचा निश्चय झाला असेल तर मी तुम्हाला दीक्षा द्यायला प्रारंभ करतो,' त्याच्याजवळ येत पंडित म्हणाला.

'आज्ञापालनाचं प्रतीक म्हणून कृपा करून अंगावरील पोशाख उतरा.'

पीएरने कोट काढला, जाकीट काढले आणि डाव्या पायातील बूट काढला. मेसनने पीएरचा शर्ट उजव्या बाजूला छातीशी उघडा केला. त्याची तुमान डाव्या गुडघ्यावर

सरकवली, आणि डाव्या पायात चढविण्यासाठी त्याला जोडा दिला. पाय फाकून दोन्ही हात तसेच सोडून पंडिताच्या दुसऱ्या आज्ञेची वाट बघत पीएर त्याच्यामागे उभा राहिला. त्याच्या मनात नसताही त्याला संशय वाटू लागला, त्याला संकोचल्यासारखे झाले आणि स्वतःची चेष्टा करावी असे वाटू लागले आणि त्याच्या चेहऱ्यावर मुलासारखे स्मित उमटले.

बराच काळ फ्रीमेसन काही बोलला नाही आणि हलला नाही. शेवटी तो उठून पीएरकडे आला. टेबलावर पडलेला रुमाल घेऊन त्याने त्याचे डोळे बांधले.

' तुम्हाला मी शेवटचं सांगतो. सगळं लक्ष तुमच्यावरच केंद्रित करा. भावनांना लगाम घाला. अंतःकरणात आनंदाचा शोध घ्या, वासनांमधे नको. आनंदाचं रहस्य अंतःकरणात असतं, भोवताली नसतं. ' कितीतरी काळ पीएरला स्वतःमधे असलेल्या संजीवन देणाऱ्या आनंद-निर्झराची जाणीव होत राहिली.

यानंतर थोड्याच वेळात त्याला घेऊन जाण्यासाठी त्या अंधाऱ्या मंदिरात पंडिताऐवजी व्हिलार्स्कीने प्रवेश केला. पीएरने आवाजावरून त्याला ओळखले. पीएरला पुन्हा विचारण्यात आले, ' तुमचा निश्चय दृढ आहे का ? '

पीएर सर्व गोष्टींना तयार झाला. त्याच्या चेहऱ्यावर लहान मुलाचे निरागस स्मित उमटले. एका पायात बूट आणि दुसऱ्या पायात स्लिपर घालून तो चालू लागला, तेव्हा त्याची पावले नीट पडत नव्हती. त्याच्या उघड्या भरदार छातीवर व्हिलार्स्कीने तलवार रोखून धरली होती. भीत भीत तो कॉरिडॉरमधून जाऊ लागला. कधी त्याला पुढे, कधी मागे सरावे लागत होते. शेवटी तो लॉजच्या दरवाजाशी आला. व्हिलार्स्की खाकरला तसे दरवाजावर हातोड्याचे ठोके पडले आणि मग दरवाजा उघडला गेला. डोळे बांधलेल्या पीएरला गंभीर आवाजात प्रश्न विचारण्यात आले. त्याचा जन्म, व्यवसाय, त्याचे जन्मठिकाण, त्याची जन्मवेळ इत्यादी गोष्टींबाबत प्रश्न विचारण्यात आले. डोळे बांधलेल्या अवस्थेतच त्याला अन्यत्र नेण्यात आले. तो चालत असताना मेसन नाना विषयांवर त्याला उद्देशून बोलत होते. यात्रिकांचे कष्ट, दैवी कृपा, सनातन विश्वनिर्माता, कष्ट आणि संकटे यांवर मात करायला लागणारे धैर्य यांबद्दल ते रूपकांच्या भाषेत बोलत होते.

कधी ते आपल्याला ' साधक ' म्हणून संबोधत आहेत, कधी ते आपल्याला ' दुःखभाक् ' म्हणून संबोधत आहेत, तर कधी ते आपल्याला ' स्वीकृत ' म्हणून संबोधत आहेत आणि मधून मधून हातोड्याने वा तलवारीने वेगवेगळ्या तऱ्हेने टकटक आवाज करताहेत हे पीएरला कळत होते. कुठल्यातरी वस्तूकडे आपल्याला नेताना त्या लोकांमध्ये एकमत होत नव्हते, निश्चय होत नव्हता हे त्याला कळल्यावाचून राहिले नाही. भोवतालचे काहीजण हलक्या आवाजात कुजबुजत होते, त्यातला एकजण पीएरला कुठल्यातरी सतरंजीवरून चालत

नेण्याचा आग्रह धरत होता ते त्याला ऐकू आले. मग त्यांनी त्याचा उजवा हात घेऊन तो कशावर तरी ठेवला. त्याच वेळी त्यांनी त्याला डाव्या हातात कंपास घेऊन ती छातीशी धरायला सांगितले. त्याच्यातील एकजण संप्रदायाच्या नीति-नियमांशी एकनिष्ठ राहण्याची शपथ मोठ्याने वाचू लागला. पीएरला त्याच्यामागून ती उच्चारायला लावली. मग मेणबत्त्या मालवण्यात आल्या आणि स्पिरिटचा दिवा पेटवण्यात आला. त्याच्या वासामुळे पीएरला स्पिरिटचा दिवा ओळखू आला. मग त्याला सांगण्यात आले, ' तुला आता पूर्वीहून मंद प्रकाश दिसेल. ' त्याच्या डोळ्यांवरील रुमाल काढण्यात आला. स्पिरिटच्या दिव्याच्या मंद प्रकाशात स्वप्नात असल्यागत त्याला सात माणसे दिसली. त्यातल्या प्रत्येकाने पंडिताप्रमाणे ॲप्रन घातला होता. त्याच्यासमोर उभे राहून त्यांनी त्याच्या छातीशी तलवारी रोखून धरल्या होत्या. त्यातील एकाचा पांढरा शर्ट रक्ताने माखला होता. तो पाहून त्यांनी आपल्याला भोसकावे म्हणून छाती तलवारींच्या दिशेने पुढे करीत पीएर पुढे सरला, पण तलवारी मागे घेण्यात आल्या. पुन्हा त्याचे डोळे बांधण्यात आले.

कुठून तरी आवाज आला, ' तू आताच मंदतर प्रकाश पाहिला आहेस. ' पुन्हा मेणबत्त्या पेटवण्यात आल्या आणि त्याला सांगण्यात आले, ' तुला आता पूर्ण प्रकाश पाहावा लागेल. ' पुन्हा त्याच्या डोळ्यांवरील कपडा काढण्यात आला. मग दहाहून अधिक माणसे एकदम उद्गारली, ' ऐहिक ऐश्वर्य अशाश्वत असते. '

हळूहळू पीएरमध्ये आत्मविश्वास येऊ लागला. तो भोवताली बघू लागला. लोकांना न्याहाळू लागला. काळ्या कापडाने आच्छादलेल्या एका मोठ्या टेबलाशी बारा-तेरा माणसे बसलेली होती. पीएरने पूर्वी पाहिलेल्या प्रकारचा पोषाख त्यांच्या अंगावर होता. पीटर्सबर्गमधील प्रतिष्ठित मंडळींत त्यांच्यापैकी बऱ्याचजणांना पीएरने पाहिले होते. अध्यक्षांच्या आसनात एक तरुण बसला होता, एक वेगळाच क्रूस त्याच्या गळ्यात होता. पीएर त्या तरुणाला ओळखत नव्हता. त्या तरुणाच्या उजव्या बाजूला एक इटालिअन धर्मगुरू बसला होता. दोन वर्षांपूर्वी ॲना पावलोवनाच्या घरी पीएरला तो भेटला होता. त्या मंडळींत बऱ्याच हुद्द्याची प्रतिष्ठित माणसे होती. पूर्वी कुरॅगिन कुटुंबात ट्यूटर ( शिक्षक ) म्हणून असलेला एक गृहस्थ त्यात होता. हातात हातोडा घेतलेल्या अध्यक्षाचे बोलणे सर्वजण ध्यान देऊन ऐकत होते. सर्वत्र गंभीर शांतता पसरली होती. भिंतीमध्ये एक चमकणारा तारा खोदलेला होता. टेबलाच्या एका बाजूला लहानसा रग होता. त्याच्यावर विविध आकृती काढण्यात आल्या होत्या. टेबलाच्या दुसऱ्या बाजूला वेदीसारखी वाटणारी एक जागा होती, तिथे बायबल आणि कवटी ठेवलेली होती. टेबलाच्या भोवती धार्मिक विधींत वापरतात तसली मेणबत्त्यांची सात घरे होती. दोघांनी पीएरला वेदीकडे नेले. त्याची पावले काटकोनात जुळवली, त्याला खाली पहुडायला सांगितले आणि म्हटले, ' तू आता मंदिराच्या दाराशी प्रणाम करीत आहेस. '

' अगोदर त्याला फावडं द्यायला हवं, ' त्यांच्यापैकी कोणीतरी एक कुजबुजला. दुसऱ्याने शांत राहण्याचा इशारा केला.

पीएरने आज्ञा पाळली नाही. त्याची अस्वस्थ, मंद दृष्टी भोवताली फिरली. एकाएकी त्याच्या मनात विकल्प आला,

'मी कुठे आहे? काय करतो आहे? हे लोक मला हसत तर नाहीत ना? हे आठवून पुढे मला शरम तर वाटणार नाही?' पण हा विकल्प क्षणभरच टिकला. पीएरने भोवतालच्या लोकांचे गंभीर चेहरे पाहिले. आतापर्यंत करावे लागलेले धार्मिक विधी त्याला आठवले. आता अर्ध्यावरून मागे वळता येणार नाही असे त्याला वाटले. आपल्या अनिश्चिततेची त्याला धास्ती वाटली. पूर्वीची भक्तिभावना अंतःकरणात जागवण्याचा प्रयत्न करीत त्याने मंदिराच्या दाराशी स्वतःला झोकून दिले आणि खरोखरच भक्तिभावना अधिक उत्कटतेने त्याच्या अंतःकरणात निर्माण झाली. तो तसाच काही वेळ राहिल्यानंतर त्याला उठायला सांगण्यात आले. इतरांनी घातला होता तसा पांढरा कातडी अॅप्रन त्याच्या अंगाभोवती बांधण्यात आला आणि त्याच्या हातात एक फावडे आणि मोज्यांच्या तीन जोड्या देण्यात आल्या. मग प्रमुख गुरूने उपदेश केला, 'सामर्थ्य आणि पावित्र्य यांचं प्रतीक असलेला हा शुभ्र अॅप्रन कधी मळवू नकोस. ह्या फावड्याच्या मदतीनं आपल्या अंतःकरणातून दुर्गुण काढून टाक. मोठ्या चिकाटीनं शेजाऱ्यांच्या अंतःकरणात रिघण्यासाठी मार्ग तयार कर. हातमोज्यांच्या पहिल्या जोडीचा अर्थ आज तुला कळणार नाही, पण ती तू जपून ठेव. दुसरी जोडी तू सभेच्या वेळी वापरायला हवीस. तिसरी जोडी स्त्रियांच्या हातमोज्यांची आहे. प्रिय बंधू, नियतीनंच तुला हे स्त्रियांचे मोजे दिलेले आहेत. ज्या स्त्रीबद्दल तुला सर्वांत अधिक आदर वाटत असेल, जिला तू या सांप्रदायातील सुयोग्य साथी म्हणून निवडशील तिला हे हातमोजे तुझ्या अंतःकरणाच्या शुद्धतेची ग्वाही म्हणून भेट दे. प्रिय बंधू, हे लक्षात ठेव. अपवित्र हाताना हे मोजे कधीही शोभा देणार नाहीत.'

मुख्य गुरू शेवटचे शब्द उच्चारत असताना आपण खजील झालो आहो ह्या जाणिवेने पीएर शरमून गेला. अस्वस्थपणे तो भोवताली पाहू लागला. तेथे विचित्र शांतता पसरली. त्या शांततेचा भंग त्यांपैकी एकाने केला. त्याने पीएरला रगजवळ नेले, रगवर असलेल्या सूर्य, चंद्र, हातोडा, तराजू, फावडे, ओबडधोबड दगड, आकार दिलेला दगड, खांब, तीन खिडक्या इत्यादी आकृत्यांचा अर्थ तो हस्तलिखित वाचून स्पष्ट करू लागला. पीएरला त्याची नेमलेली जागा आणि निवासस्थानाच्या खुणा दाखविण्यात आल्या. त्याला परवलीचा शब्द सांगितल्यावर बसायला परवानगी दिली. मुख्य गुरू नीतिपाठ वाचू लागला.

'आमच्या मंदिरात आम्ही कसला भेद जाणत नाही. मात्र सद्गुण आणि दुर्गुण यांमध्ये आम्ही भेद करतो. समानतेला बाध येईल अशा तऱ्हेचा कोणताही भेदाभेद होणार नाही याची सावधगिरी बाळग. कुणीही बांधव असला तरी त्याच्या मदतीला धाव घे. भलत्या मार्गावरून जाणाऱ्याला उपदेश कर. पडलेल्यांना उचल. कोणत्याही बंधूबद्दल द्वेष वा तिरस्कार बाळगू नकोस. नेहमी मित्रत्वाने आणि सौजन्याने वाग. प्रत्येकाच्या अंतःकरणात सद्गुणांची ज्योत लाव. शेजाऱ्यांना सुखामध्ये सहभागी करून घे म्हणजे शुद्ध आनंदात हेवेदावे

व्यत्यय आणणार नाहीत. शत्रूला क्षमा कर, सूड घ्यायचा असेल तर त्याचे भले करून सूड घे. अशा प्रकारे श्रेष्ठ नियमांचे पालन केलेस तर तुला आतापर्यंत गमावलेले हरवलेल्या प्राचीन ऐश्वर्याचे मार्ग पुन्हा सापडतील.' वाचन संपल्यावर मुख्य गुरूने उठून पीएरला आलिंगन दिले आणि त्याचे चुंबन घेतले.

बैठक संपली. पीएर घरी परतला. आपण जणू बारा एक वर्षांनी लांबच्या प्रवासाहून परत आलो आहोत. आपल्यामधे पूर्णपणे बदल झाला आहे, जुन्या सवयी आणि जुनी राहणी आपण सर्वस्वी टाकून दिली आहे असे त्याला वाटू लागले.

मेसनांच्या निवासस्थानावर पीएरला दीक्षा मिळाली. त्याच्या आदल्या दिवशी त्याला कळले होते, द्वंद्वयुद्धाची बातमी सम्राटांच्या कानांवर गेली होती. त्याने पीटर्सबर्ग सोडले तर शहाणपणाचे होईल असा त्याला सल्ला देण्यात आला होता. दक्षिणेतील आपल्या शेतवाडीवर जावे आणि आपल्या कुळांची काळजी घ्यावी असा बेत पीएर करू लागला.

पीएरने आठवड्यानंतर आपल्या मित्रांचा आणि फ्रीमेसनांचा निरोप घेतला. फ्रीमेसनांना भली मोठी रक्कम देणगी देऊन तो आपल्या शेतवाडीवर निघाला. त्याच्या नव्या बंधूंनी त्याला कीव्ह आणि ओडेसा येथे राहणाऱ्या फ्रीमेसनांना पत्रे दिली. आणि त्याला मधून मधून पत्राने मार्गदर्शन करण्याचे आश्वासन दिले.

पीएर-डोलोहॉव्ह द्वंद्वयुद्धातील कटुता आता संपली होती. द्वंद्वयुद्धाविरुद्ध झारचे कडक कायदे होते तरीही त्यात भाग घेणाऱ्यांना आणि त्यांना मदत करणाऱ्यांना काही त्रास झाला नाही. पीएरच्या पत्नीबरोबरच्या वितुष्टामुळे द्वंद्वयुद्धामागील प्रवादाला पुष्टी मिळाली. आणि प्रतिष्ठित मंडळींत मोठी खळबळ उडाली. पीएर अनौरस पुत्र होता तेव्हा लोक त्याच्याकडे आश्रयदात्याच्या भावनेने पाहात. रशियन साम्राज्यातील तो अत्यंत धनिक असे स्थळ असताना त्याच्या सद्‌गुणांची बेफाट स्तुती केली जाई; त्याचे लग्न झाले; त्यामुळे स्त्रियांना आणि त्यांच्या तरुण मुलींना त्याच्याकडून आशा बाळगण्याचे काही कारण उरले नाही, खेरीज लोकप्रियता संपादन करण्यास आवश्यक असे नर्मचतुर संभाषण आणि लोकप्रियतेची इच्छाही त्याच्यामधे नव्हती. त्यामुळे प्रतिष्ठितांच्या मंडळात त्याची किंमत पार कमी झाली होती. आता झाल्या प्रकरणाबद्दल त्याला सर्वस्वी दोष दिला जात होता. आपल्या वडिलांप्रमाणेच त्याला रागाचे झटके येतात आणि तो मत्सराने वेडा होतो असे लोक बोलू लागले. पीएर निघून गेल्यावर एलन पीटर्सबर्गला आली तेव्हा तिच्या परिचितांनी तिचे प्रेमाने स्वागत

केले; एवढेच नव्हे तर तिच्या निराश जीवनाचा सत्कार केल्यागत त्यांनी तिला काहीशा आदरानेच वागवले.

नवऱ्याबद्दल बोलणे निघाले की एलन मोठ्या कुशलतेने कुलीन मुद्रा धारण करून राही. त्या मुद्रेचा अर्थ तिला समजत नसे. तरीही तिने आपल्यावरील आपत्ती न कुरकुरता सोसण्याचा निश्चय केलेला आहे, आणि तिचा नवरा म्हणजे देवाने तिला वाहायला लावलेला क्रूस आहे असे लोकांना तिच्या मुद्रेवरून वाटे.

प्रिन्स व्हॅसिलीने आपले मत अधिक उघडपणे व्यक्त केले. पीएरबद्दल बोलणे निघाले तेव्हा खांदे उडवून आपल्या डोक्याकडे अंगुलिनिर्देश करीत तो म्हणाला, 'मी नेहमीच म्हणत होतो—त्याचं डोकं फिरलेलं आहे.'

पीएरबद्दल ॲना पावलोवनाही असेच उद्गार काढी. 'मी सगळ्यांच्या आधी त्याच्याबद्दल हेच म्हणायची. स्वैराचारी कल्पनांनी बिघडून गेलेला तो चक्रम तरुण आहे असं मी केव्हाची म्हणत आले आहे. जेव्हा प्रत्येकजण त्याच्यावर निहायत खूष होता त्या वेळी मी हेच म्हटलं होतं. त्या वेळी तर तो नुकताच परदेशाहून स्वदेशी आला होता. आता काय शेवट झाला बघा. त्या वेळी मी ह्या लग्नाविरुद्ध होते, पुढं काय घडणार याचं आधीच भविष्य वर्तवलं होतं.'

१८०६ च्या अखेरीस रशियाने नेपोलियनबरोबर दुसऱ्यांदा लढाईस सुरुवात केली. याच वेळी ॲना पावलोवनाने रात्रीचा भोजनसमारंभ आयोजित केला होता. तिथे गोळा झालेल्या निवडक प्रतिष्ठित मंडळींत आकर्षक आणि दुःखी, परित्यक्ता एलन, मॉर्टीमार्ट, व्हिएन्नामधून नुकताच परत आलेला आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा प्रिन्स इपॉलिट, दोन परराष्ट्रखात्याची माणसे, ज्याचा अतिशय बुद्धिमान असा गौरव केला जात होता असा एक तरुण, 'मेड ऑफ ऑनर' म्हणून नुकतीच गौरविलेली एक स्त्री आणि तिची आई, शिवाय बरीच सामान्य माणसे जमली होती.

आपल्या पाहुण्यांचे रंजन करण्यासाठी ॲना पावलोवनाने एका नव्या व्यक्तीला आमंत्रण दिले होते. त्या व्यक्तीचे नाव बोरिस द्रुबेत्स्कॉय. तो वरिष्ठ गोटात वावरत असे. खास राजदूत म्हणून तो प्रशियन सैन्याकडून आला होता.

बोरिस आता लष्करात चांगल्या हुद्द्यावर चढला होता. ॲना पावलोवनाचे प्रयत्न, त्याच्या आवडी-निवडी आणि त्याचा वैशिष्ट्यपूर्ण मितभाषी स्वभाव या सगळ्या गोष्टी त्याच्या यशाला कारणीभूत होत्या. अगदी वरच्या गोटातील तो ॲडज्युटंट होता. प्रशियामध्ये त्याच्यावर महत्त्वाची कामगिरी सोपविण्यात आली होती. तेथून तो खास राजदूत म्हणून नुकताच परतला होता. लष्करामध्ये यश मिळविण्यासाठी प्रयत्न, चांगले काम, चिकाटी यांची गरज नसते. गरज असते ती ज्याच्या हातात प्रमोशन असते त्याच्याशी केवळ मिळते घेण्याची. आपली इतकी भरभर प्रगती झाली म्हणून त्याचे त्यालाच आश्चर्य वाटे. इतरांना या रहस्याचे आकलन कसे होत नाही याचे तो नवल करी. त्याची साधी राहणी, जुन्या मित्रांशी

असलेले संबंध आणि भावी जीवनाबद्दलचे बेत या साऱ्या गोष्टी त्याला झालेल्या नव्या ज्ञानामुळे पूर्णपणे बदलून गेल्या. त्याची आर्थिक स्थिती उत्तम होती असे नव्हे, परंतु तो शेवटच्या कोपेक इतरांहून आपला पोषाख चांगला दिसावा म्हणून खर्च करी. दरिद्री घोडागाडीतून जावे लागू नये म्हणून वा पीटर्झबर्गमधील रस्त्यांतून हिंडताना आपला गणवेष जुना असू नये म्हणून तो फार जपे. त्यासाठी तो इतर अनेक सुखांवर पाणी सोडी. जे आपल्याहून वरच्या हुद्द्यावर आहेत आणि म्हणून ज्यांच्याकडून आपल्याला लाभ होण्याचा संभव आहे अशा लोकांशी तो ओळखी करी आणि मैत्री टिकवी. त्याला पीटर्झबर्ग शहर आवडत असे पण मॉस्को शहर बिलकूल आवडत नसे. रोस्तॉफ कुटुंब आणि नताशाबद्दल निर्माण झालेले पोरकट प्रेम ह्यांबद्दलची स्मरणे त्याला अप्रिय वाटू लागली. सैन्यात दाखल झाल्यापासून तो एकदाही रोस्तॉफ कुटुंबाकडे वळला नव्हता. ॲना पावलोवनाच्या भोजनसमारंभातील आपली उपस्थिती लष्करातील बढतीस उपयोगी ठरेल हे त्याने ओळखले. त्याने तिची व पाहुण्यांची अधिकाधिक करमणूक करण्याचे ठरविले. त्याच वेळी तो प्रत्येकाचा चेहरा न्याहाळू लागला. त्यांपैकी कुणाशी मैत्री होण्याची शक्यता आहे आणि त्या मैत्रीपासून आपणास किती लाभ होईल याचे आडाखे बांधू लागला. सुंदर एलनच्या जवळच्या आसनावर त्याला बसविण्यात आले. भोवताली चाललेले बोलणे तो ऐकू लागला.

ॲना पावलोवनाने प्रशियाच्या राजाचे धैर्य, खंबीर निश्चय यांकडे संभाषणाचा ओघ वळविला. बोरिसने संभाषणात भाग घ्यावा असा तिचा हेतू होता. कुणीतरी बोलत होता आणि बोरिस लक्षपूर्वक ऐकत आपल्याला केव्हा संधी मिळते याची वाट बघत होता. मधल्या काळात त्याने कित्येकदा सुंदर एलनकडे वळून पाहिले. तिनेही कित्येक वेळा त्या देखण्या तरुण ॲडज्युटंटकडे पाहून स्मित केले.

प्रशियाच्या सैन्याच्या हालचालींबद्दल बोलणी चालू असताना अगदी सहजगत्या ॲना पावलोवनाने बोरिसला ग्लोगॉवपर्यंतचा प्रवास आणि त्याला ठाऊक असलेली सैन्याची हालचाल यांबद्दल बोलायला सांगितले. बोरिसने जाणूनबुजून सैन्य आणि राजदरबार यांच्याबद्दल कित्येक मनोरंजक गोष्टी ऐकविल्या. तो शुद्ध फ्रेंच भाषेत बोलत होता. त्याने जी वस्तुस्थिती सांगितली तीबद्दल स्वतःचे मत देणे त्याने कटाक्षाने टाळले. काही काळ बोरिसने सर्वांचे लक्ष आपल्याकडे खिळवून ठेवले. आपण आणलेल्या नव्या व्यक्तीवर पाहुणे मंडळी निहायत खूष आहेत हे ॲना पावलोवनाला कळून चुकले. बोरिसच्या वर्णनात सर्वांत अधिक रस एलन घेत असल्याचे दिसत होते. तिने त्याला मोहिमेबद्दल कित्येक प्रश्न विचारले. प्रशियाच्या सैन्याच्या हालचालीबद्दल तिला विलक्षण कुतूहल असल्याचे दिसत होते. त्याचे बोलणे संपले तेव्हा तिने त्याच्याकडे वळून नेहमीच्या सवयीचे स्मित केले आणि म्हटले, 'तुम्ही काही झालं तरी आमच्याकडे यायला हवं.' तिचा सूर असा होता की बोरिसला वाटले, कारण ठाऊक नसले तरी आपल्याला तिच्याकडे जाणे अत्यंत आवश्यक आहे. 'मंगळवारी आठ ते नऊच्या दरम्यान तुम्ही आलात तर मला अतिशय आनंद होईल.'

बोरिसने भेटण्याचे वचन दिले.

प्रत्येकजण जायला निघाला तेव्हा आतापर्यंत फार थोडे बोलत असलेली एलन बोरिसकडे वळली आणि त्याला तिने मंगळवारी आपल्याकडे येण्याची विनंती नव्हे, प्रेमळ आज्ञाच केली. ' तुमच्या येण्याला माझ्या दृष्टीनं फार महत्त्व आहे, ' तिने ॲना पावलोवनाकडे स्मित करीत बघत म्हटले. ॲना पावलोवना नेहमी राजघराण्यातील माणसांशी वागताना उदास स्मित करी. तसे स्मित करीत तिने एलनच्या स्मिताला दुजोरा दिला. त्या रात्री बोरिस प्रशियाच्या सैन्याबद्दल काही बोलत होता. त्यामुळे त्याला भेटावे असे एलनला एकाएकी वाटू लागले. तो मंगळवारी आला म्हणजे ती त्याला आपली आवश्यकता उघड करून सांगणार होती. मंगळवारी रात्री बोरिस एलनच्या भव्य स्वागतदालनात आला पण त्याला तिला भेटण्याची खास कारणे काही कळली नाहीत. इतर पाहुणे जमलेले होते. काउंटेस त्याच्याशी फार थोडे बोलली. निरोप घेताना त्याने जेव्हा तिच्या हाताचे चुंबन घेतले तेव्हा कधी नव्हे ते तिच्या चेहऱ्यावरील स्मित लोपले होते. अनपेक्षितरीत्या ती अगदी हळू स्वरात कुजबुजली, ' उद्या रात्री जेवायला या, अवश्य या. नाही म्हणू नका. '

पीटर्सबर्गला मुक्काम असेपर्यंत बोरिस वारंवार काउंटेस बेझुहॉव्हकडे जाऊ लागला. त्यांच्या परिचयाचे रूपांतर दाट मैत्रीत झाले.

युद्धास सुरुवात झाली, युद्धाचे क्षेत्र रशियाच्या सीमेलगतच होते. मानवजातीचा शत्रू बोनापार्ट याला सगळीकडून शिव्याशाप मिळू लागले. खेड्यापाड्यामध्ये सक्तीची लष्करभरती सुरू झाली. युद्धावरून उलटसुलट स्वरूपाच्या वातम्या येऊ लागल्या. त्यातल्या बऱ्याचशा खोट्या असत.

१८०५ पासून थोरला प्रिन्स वोल्कॉन्स्की, प्रिन्स आन्द्रे आणि प्रिन्सेस मार्या यांच्या जीवनात खूपच बदल घडून आला. त्या वेळी रशियाच्या लष्करी व्यवस्थेसाठी कमांडर-इन चीफच्या आठ जागा निर्माण करण्यात आल्या. १८०६ मधे थोरल्या प्रिन्सची एका जागेवर नियुक्ती झाली. थोरला प्रिन्स अशक्त होता आणि वृद्धही झाला होता. आपला मुलगा युद्धात कामी आला आहे ह्या समजामुळे त्याची अशक्तता आणि वार्धक्य अधिकच लक्षात येत होते. स्वतः सम्राटानेच नियुक्ती केल्यामुळे ती जागा नाकारणे त्याला योग्य वाटले नाही. या नव्या कार्यक्षेत्राने त्याला नवा उत्साह आणि कार्यशक्ती दिली. त्याच्या ताब्यात दिलेल्या तीन प्रांतांत तो सारखे दौरे काढू लागला. आपले कर्तव्य पार पाडीत असताना तो क्लिष्ट वाटावा इतका

दक्ष असे. सहकाऱ्यांशी निर्दय वाटावा इतक्या कडकपणे वागे. स्वतःच्या कामाचा बारीक-सारीक तपशील तो चुकवीत नसे. प्रिन्सेस मार्याने आपल्या वडिलांकडे गणित शिकणे केव्हाच बंद केले होते. वडील घरी असले म्हणजे तो धाकटा प्रिन्स निकोलाय आणि त्याची दाई यांना घेऊन दररोज सकाळी त्यांच्या खोलीत जाई. प्रिन्स निकोलाय, त्याची दाई आणि वृद्ध नर्स साविश्ना ही लिझच्या जुन्या खोलीत राहू लागली. प्रिन्सेस मार्या आपल्या-कडून होईल तेवढी आईची भूमिका बठवी आणि छोट्या निकोलायच्या बरोबर बराचसा काळ खेळत राही. बूरिअनबाईना मुलाचा खूप लळा लागल्याचे दिसत होते.

' प्रिन्स आन्द्रे परत आल्यावर त्याच्या वडिलांनी काही मालमत्ता त्याला दिली. ब्लीक-हिल्सपासून सुमारे तीस मैलांवर असलेली एक शेतवाडी त्याला दिली. ब्लीकहिल्सशी निगडित असलेल्या दुःखद स्मृतीपासून दूर जावे म्हणून, आपल्या वडिलांच्या विचित्र वागण्याशी जुळते घेणे जमत नव्हते म्हणून आणि एकान्ताची ओढ निर्माण झाली म्हणून प्रिन्स आन्द्रेने मिळालेल्या शेतवाडीचा लाभ उठवला. तो बस्तीला तेथेच राहून बहुतेक काळ घालवू लागला.

ऑस्टरलिटसच्या मोहिमेनंतर प्रिन्स आन्द्रेने पुन्हा म्हणून लष्करात शिरायचे नाही असा ठाम निश्चय केला. पुन्हा युद्ध सुरू झाले. सक्तीची लष्करभरती सुरू झाली. प्रत्यक्ष युद्धावर जायचे टाळण्यासाठी त्याने वडिलांच्या नागरी संरक्षण दलात भरती करण्याच्या मोहिमेत भाग घेतला. १८०५ च्या मोहिमेनंतर थोरला प्रिन्स व त्याचा मुलगा यांनी जणू आपल्या भूमिकांची अदलाबदल केली होती. नव्या कार्यक्षेत्रामुळे प्रभावित झालेल्या थोरल्या प्रिन्सला वाटत होते, या नव्या मोहिमेतून चांगलेच निष्पन्न होणार आहे. उलट युद्धात भाग न घेणाऱ्या आणि स्वतःच्या निष्क्रियतेबद्दल खंत करणाऱ्या प्रिन्स आन्द्रेला युद्धात काहीही चांगले दिसत नव्हते.

१८०७ च्या २६ फेब्रुवारी रोजी थोरला प्रिन्स तपासणीसाठी दौऱ्यावर निघाला. वडिलांच्या अनुपस्थितीत नेहमीप्रमाणे प्रिन्स आन्द्रे ब्लीकहिल्स येथे राहत होता. गेले तीन दिवस धाकटा निकोलुश्का आजारी होता. थोरल्या प्रिन्सला पोचवायला गेलेल्या गाडीवानाने शहरातून प्रिन्स आन्द्रेची कागदपत्रे आणि पत्रे आणली.

प्रिन्स आन्द्रेने यांत्रिकपणे पत्रे उघडली आणि तो वाचू लागला. त्याच्या वडिलांनी मोठाल्या सुट्या अक्षरांत संक्षिप्त रूपांचा प्रसंगोपात्त उपयोग करून निळसर कागदावर ते पत्र लिहिलेले होते.

' मला आताच एका खास दूताकडून बातमी मिळाली आहे. ती खरी असेल तर अतिशय आनंदाची बातमी आहे. बातमीवरून असे दिसते की, बेनिंगजसनने इलॉ (Eylau) येथे बोनापार्टचा पूर्ण पाडाव केला आहे. पीटर्सबर्गमधील सर्वांना हर्ष झाला आहे. सैन्याला पाठ-विण्यात येणाऱ्या बक्षिसांना मर्यादा नाही. तो जर्मन असला तरी मी त्याचे अभिनंदन करतो. पेटेंकाने मला प्रॉइसिश इलॉ (Preussisch Eylau) येथे झालेल्या प्रशियाच्या लढाईबद्दल पत्र लिहिले आहे. त्याने त्यात भाग घेतला होता. बातमी खरी आहे. अनधिकारी लोकांनी ढवळाढवळ करण्याचे थांबवले तर जर्मन सैन्य देखील बोनापार्टला पराभूत करील. तो पळ

काढतो.आणि त्याच्या सैन्याची दुर्दशा झाली आहे असं म्हणतात.'

उसासा टाकून प्रिन्स आन्द्रेने दुसरे पाकिट उघडले. ते पत्र बिलिबिनचे होते.

इलॉ येथे लढाई झाली त्यापूर्वीची पत्रावर तारीख होती. बिलिबिनने उपरोधिक भाषेत लिहिले होते, 'मित्रा, तुला ठाऊकच आहे-ऑस्टरलिट्सला प्रचंड यश मिळाल्यापासून मी मुख्य ठाणे सोडून गेलो नाही. युद्धाबद्दल आता निश्चितच माझ्या मनात आवड निर्माण झाली आहे. माझ्या दृष्टीने ते काही वाईट नाही. गेल्या तीन महिन्यांत मी जे पाहिले त्यावर तुझा विश्वास बसणार नाही.

'मी मुळापासून सुरुवात करतो. मानवजातीचा वैरी कोण ते तू जाणतोसच - तो प्रशियाच्या सैन्यावर हल्ला करीत आहे. प्रशियन आमचे इमानी दोस्त आहेत, त्यांनी गेल्या तीन वर्षांत फक्त तीनदा आम्हाला फसविले. आम्ही त्यांना मदत करीत आहोत. पण मानवजातीच्या वैऱ्याने आमच्या गोड गोड भाषणांकडे लक्ष दिले नाही, सुरू केलेली परेडही पुरी करू न देता मोठ्या क्रूरपणे आणि रानटीपणे हल्ले चढवले; जादूचे दोन कार्यक्रम करून त्यांना साफ लोळवले, आणि मग तो पॉट्सडॅम येथल्या राजवाड्यात राहायला गेला.

'प्रशियाच्या राजाने बोनापार्टला लिहिले, 'तुम्हाला पसंत पडेल अशा तऱ्हेने तुमचे स्वागत करावे, माझ्या वाड्यात आतिथ्य करावे अशी माझी उत्कट इच्छा आहे. त्या दृष्टीने मी तयारी करण्याची त्वरा करीत आहे. प्राप्त परिस्थितीत शक्य तेवढी शिकस्त करीत आहे. यश मिळते तर बरे झाले असते.'' प्रशियन जनरलना आपण फ्रेंचांशी सौजन्याने वागतो याचा अभिमान वाटला आणि पहिल्याच हुकुमासरशी त्यांनी आपली शस्त्रे खाली ठेवली.

'ग्लोगॉव येथील दहा हजार सैनिकांच्या फौजेच्या प्रमुखाने प्रशियाच्या राजाला विचारले : 'शरण जाण्याचा हुकूम आल्यास आम्ही काय करायचे?'... ह्या सगळ्या खऱ्या खऱ्या घटना आहेत.

'थोडक्यात काय, लष्करी दृष्टिकोण घेऊन काही साध्य होईल अशी आशा बाळगता बाळगता आम्ही स्वतः मनःपूर्वक लढाईत उतरलो आहोत. एवढेच नव्हे तर प्रशियाच्या राजाबरोबर त्याच्यासाठीच आमच्याच सीमेवर लढाई करतो आहोत. सगळे कसे जय्यत तयार आहे— फक्त एका लहान गोष्टीची आवश्यकता आहे— ती म्हणजे एक कमांडर-इन्-चीफ्. कमांडर-इन्-चीफ् तरुण नसता तर ऑस्टरलिट्सचा विजय निर्णायक लागला असता असे मत व्यक्त होऊ लागले. तशी ऐंशी वर्षांच्या व्यक्तीच्या मुलाखती झाल्या. प्रॉसॉरॉव्स्की आणि कॅमेन्स्की या दोघांमधून कॅमेन्स्कीची निवड झाली. सुहारॉफच्या रिवाजाप्रमाणे जनरल किबिक-मधून (आच्छादलेल्या गाडीतून) आला तेव्हा विजयाच्या घोषणा देत लोकांनी त्याचे मोठ्या प्रेमाने स्वागत केले.

' चार तारखेला पीटर्सबर्गचे टपाल येऊन पोचले. मार्शलला सगळ्या गोष्टी आपणहून करणे आवडत असल्याने त्याच्या खोलीत टपाल नेण्यात आले. मार्शलने मला बोलावून घेतले आणि आमची पत्रे वेगळी काढायला सांगितले. आम्ही काम करीत असताना मार्शल आमच्याकडे पाहात होता.' आपल्यासाठी काही पत्रे असतील अशी आशा बाळगून होता. आम्ही पत्रे शोधून पाहिली–मार्शलसाठी एकही पत्र नव्हते. उतावळा होऊन मार्शल स्वतःच कामाला लागला. त्याला काउंट टी., प्रिन्स व्ही. आणि इतर काहींना सम्राटांकडून आलेली पत्रे आढळली. मग त्याला कधी कधी येतो तसा रागाचा जोराचा झटका आला. तो आता सर्वांवर चिडला. त्याने सगळी पत्रे ताब्यात घेतली आणि उघडली. सम्राटाने इतरांना लिहिलेली पत्रे त्याने वाचून काढली.

' अरे! अशी वागणूक मला देता काय? माझ्यावर विश्वास नाही काय? माझ्यावर लक्ष ठेवायला सांगता काय? ठीक.'

त्याने सम्राटांना लिहिले, ' सर्व मोहिमांतून घोड्यावरून रपेट करावी लागल्यामुळे सूज येऊन घोड्यावर बसणे कठीण झाले आहे, त्यामुळे दूरवर पसरलेल्या सैन्यावर हुकुमत गाजवणे अशक्य झाले आहे, म्हणून मी उपरिनिर्दिष्ट आज्ञा माझ्यानंतरचा प्रथम ज्येष्ठ जनरल काउंट बक्सेव्हडेन याला दिली आहे. माझ्या परिवारातील माणसे आणि त्यांचे सर्व सामान त्यांच्या स्वाधीन केले आहे. खेड्यातील शेतकऱ्यांनी सर्व अन्न संपवले आहे आणि ऑस्टरमन आणि सेड्मॅरिट्स्की यांच्या रिपोर्टानुसार एक दिवसाचा रोटीचा शिधा उरला आहे हे लक्षात घेऊन मी त्याला सल्ला दिला आहे—जर अन्नपुरवठा कमी पडत असेल तर प्रशियातील आतील प्रदेशात माघार घेऊन जावे. मी स्वतः बरा होईपर्यंत ऑस्ट्रॉलेंड्का येथील हॉस्पिटलमधे राहणार आहे. आजच्यासारखा उघडा तळ देऊन जर का सैन्याने आणखी पंधरा दिवस मुक्काम केला तर वसंतऋतू येण्याआधीच सर्व सैनिक आजारी पडतील हे आपणास मी नम्रपणे कळवीत आहे.

' नेमून दिलेले भव्य आणि उदात्त कार्य करण्यास असमर्थ ठरल्याने आधीच पुरता बदनाम ठरलेल्या वृद्धाला निवृत्त करण्याची कृपा करावी. मी हॉस्पिटलात पडून आपल्या हुकमाची वाट पाहत आहे. दयावंत होऊन मला निवृत्त होण्यास परवानगी द्यावी म्हणजे माझ्यावर कमांडर ऐवजी सेक्रेटरीचे काम करण्याचा प्रसंग येणार नाही. मला काढून टाकल्याने सैन्यामधे जराही खळबळ माजणार नाही—आंधळ्याने सैन्य सोडून जाण्यात विशेष ते काय असणार? माझ्याहून अधिक लायक व्यक्ती हजारांच्या संख्येने रशियात सापडतील!'

मार्शल सम्राटावर चिडला होता आणि शिक्षा करीत होता आम्हाला! आणि ते किती तर्कशुद्ध होते!

कीव्हला पोचल्यावर पीएरने आपल्या सर्व व्यवस्थापकांना हिशेब करण्याच्या मुख्य ठाण्यावर बोलावले. त्याने आपले हेतू आणि आपल्या इच्छा त्यांना समजावून दिल्या. आपल्या कुळांना गुलामगिरीतून पूर्णपणे मुक्त करण्यासाठी तो लवकरच उपाय योजणार होता. तोपर्यंत व्यवस्थापकाने कुळांकडून वाटेल तशी कामे करून घेता कामा नयेत. तसेच गरोदर स्त्रियांना कामाला जुंपू नये, कुळांना शक्य तो मदत करावी, कुणी आगळीक केली तर त्यांची कानउघाडणी करावी, त्याला शारीरिक शिक्षा करू नये अशा सूचना त्याने दिल्या. प्रत्येक शेतवाडीला तो इस्पितळ, अन्नछत्र आणि शाळा देणार होता. त्याच्या योजना ऐकून पुष्कळसे व्यवस्थापक खिन्न झाले. त्यांच्यातील बरेचसे लिहिता वाचता न येणारे होते. तरुण काउंटचे बोलणे ऐकून त्यांना वाटले, आपल्या कारभारामुळे आणि पैशांच्या अफरातफरीमुळे तो नाखूष झाला आहे. पीएरच्या बोलण्याच्या शैलीमुळे आणि कधीतरी ऐकलेल्या नव्या शब्दांच्या वापरामुळे काहींची करमणूक होत होती. मात्र पहिल्यांदा त्यांना आश्चर्याचा धक्का बसला होता. काही सरळ स्वभावाच्या व्यवस्थापकांना मात्र समाधान वाटले होते. धन्याचे भाषण ऐकल्यावर त्याच्याशी यापुढे कसे वागावे आणि आपले उखळ पांढरे कसे करावे याचे बेत काही व्यवस्थापक करू लागले. मुख्य व्यवस्थापक देखील ह्यातलाच होता.

मुख्य व्यवस्थापकाने पीएरच्या योजनांना फार मोठा पाठिंबा व्यक्त केला आणि तो म्हणाला, 'तुमच्या योजना अगदी नवीन आहेत, पण वस्तुस्थिती तुम्हाला वाटते तेवढी चांगली नाही. तिचा तुम्हाला सांगोपांग विचार करावा लागेल.'

काउंट बेझुहॉव्हची संपत्ती प्रचंड होती. पीएरला ती मिळाल्यापासून वर्षाला पाच लाख प्राप्ती होत असावी असा लोकांचा कयास होता. वडिलांकडून दहा हजार भत्ता मिळत होता तेव्हापेक्षा आता आपण गरीब आहोत असे पीएरला वाटू लागले. त्याला आपल्या अंदाजपत्रकाची अस्पष्ट कल्पना होती. इस्टेट गहाण ठेवून काढलेल्या रकमेवर त्याला लँड-बँकेस सालिना ऐंशी हजार द्यावे लागत होते. मॉस्कोमधील घर, त्याची भावंडे आणि मॉस्कोच्या भोवताली असलेली शेतवाडी यांसाठी सुमारे तीस हजार खर्च होत. त्याहून अधिक रक्कम धर्मादायखाती खर्च पडे. दीड लाख काउंटेसला पाठवावे लागत. कर्जाऊ रकमेवर सत्तर हजार व्याज द्यावे लागे. नव्या चर्चच्या इमारतीला गेली दोन वर्षे दहा हजार खर्च होत होते. उरलेले सुमारे एक लाख कसे खर्च होत हे त्याचे त्यालाच ठाऊक नसे. दरवर्षी त्याला कर्ज काढावे लागे. खेरीज दरवर्षी मुख्य व्यवस्थापक वणवा लागल्याचे, पीक पडल्याचे अगर कारखान्याच्या इमारती बांधणे आवश्यक असल्याचे कळवीत असे. व्यवहाराकडे लक्ष देणे आता त्याचे आद्य कर्तव्य होते. अशा कामासाठी त्याच्यामधे क्षमता नव्हती आणि तिकडे त्याचा कलसुद्धा नव्हता.

पीएरला व्यावहारिक शहाणपण नव्हते. त्यामुळे सगळा कारभार स्वतः सांभाळणे त्याला शक्य होईना. त्यामुळे त्याला त्यात रसही नव्हता. मुख्य व्यवस्थापकासमोर कारभारात लक्ष घालण्याची तो केवळ बतावणी करीत असे.

कीव्हमधे पीएरच्या ओळखीची माणसे होती. जी ओळखीची नव्हती ती माणसे तातडीने ओळख करून घेऊ लागली. आपल्यामधे राहायला आलेल्या प्रांतातील सर्वांत मोठ्या जमीनदाराचे त्यांनी मनःपूर्वक स्वागत केले. पीएरचे मन कमकुवत होते. दीक्षा घेण्याच्या वेळी त्याने ज्या कमकुवतपणाचा प्रथम उल्लेख केला होता त्या कमकुवतपणाचा फायदा घेणारे मोह इतके जबरदस्त होते की तो टाळू शकला नाही. पुन्हा त्याचा बराचसा काळ मेजवान्या, भोजन, नाचसमारंभ यांत जाऊ लागला. पीटर्सबर्गप्रमाणे इथे त्याला चिंतनाला बिलकूल सवड सापडेना. आपण नवीन प्रकारचे जीवन जगू अशी इथे येण्यापूर्वी त्याने आशा बाळगली होती. परंतु इथे आल्यावर त्याचे तेच जुने आयुष्य सुरू झाले. भोवतालची माणसे आणि जागा बदलली एवढेच.

पीएरला स्वतःशी कबूल करावे लागले-फ्रीमेसनांच्या तीन तत्त्वांपैकी प्रत्येक मेसनने सदाचरणाचा आदर्श लोकांसमोर ठेवला पाहिजे, हे तत्त्व आपण बिलकुल आचरणात आणले नाही. सात सद्गुणांपैकी नीतिमत्ता आणि मरणाची ओढ हे दोन सद्गुण तो पार विसरला होता. तरीही आपण शेजाऱ्यांवर प्रेम आणि औदार्य ह्या दोन सद्गुणांचे पालन करीत आहोत, तसेच मानवजातीची सुधारणा करण्याचा उपदेश अमलात आणीत आहोत ह्या विचाराने त्याने स्वतःचे समाधान करून घेतले.

१८०७ च्या वसंतऋतूत पीएरने पुन्हा पीटर्सबर्गला जाण्याचे ठरवले. जाण्यापूर्वी सर्व शेतवाडीचा दौरा करावा, परमेश्वराने ज्यांना आपल्यावर सोपवले आहे आणि ज्यांच्या कल्याणासाठी आपण झटतो आहोत त्या कुळांची स्थिती डोळयांखालून घालावी, तसेच आपण नेमून दिलेली कामे कुठवर आली ते व्यक्तिशः पाहावे असा त्याने बेत केला.

तरुण काउंटचे वागणे मुख्य व्यवस्थापकास पागलपणा वाटे. त्यामुळे पीएर स्वतः तो आणि कुळे या सर्वांवर आपत्ती ओढवेल असे त्याला वाटे. तरीही त्याने पीएरमधील दोषांना मान्यता दिली. गुलाम कुळांना स्वातंत्र्य देणे ही गोष्ट अव्यवहार्य आहे हे मत तो सतत मांडीत असे. तरीही त्याने पीएरच्या डोळयांत धूळ फेकण्याचे ठरवले. सर्व शेतवाड्यांवर शाळा, वेड्यांसाठी आणि इतर रोग्यांसाठी इस्पितळे मोठ्या प्रमाणावर बांधली जात आहेत असे पीएरला दिसेल अशी व्यवस्था करवून ठेवली. भव्य जंगी मिरवणुका त्याला आवडणार नाहीत हे लक्षात घेऊन त्याने अन्य व्यवस्था केली. पवित्र प्रतिमा, पाव आणि मीठ घेऊन लोक कृतज्ञतेने व भक्तिभावाने त्याचे सर्वत्र स्वागत करतील अशी त्याने व्यवस्था केली. अशा भेटींचा त्याच्या मनावर प्रभाव पाडून त्याला फसविता येईल असे त्याला वाटले.

दक्षिणेकडील वसंतऋतू, व्हिएन्ना गाडीतून होणारा जलद व सुखद प्रवास आणि निर्जन शांत रस्ते यांमुळे पीएरच्या चित्तवृत्ती उल्हसित झाल्या. त्याने पूर्वी कधी आपल्या शेतवाड्यांना भेट दिली नव्हती. प्रत्येक शेतवाडी दुसरीपेक्षा अधिक चित्रमयी वाटे. सगळीकडे शेतकरीवर्गाची भरभराट होत असल्याचे दिसून येई. उपकारकर्त्याबद्दल त्यांनी दाखवलेली कृतज्ञता अंतःकरणाला स्पर्शून जाई. ठिकठिकाणी होणाऱ्या स्वागतांनी जरी पीएर संकोचून

जाई तरी मनातल्या मनात त्याला आनंद होऊ लागे. एका ठिकाणी पाव, मीठ आणि पीटर व मॉल या संतांच्या प्रतिमा घेऊन शेतकरी त्याला सामोरे आले, त्यांनी त्याला 'संतांच्या सन्मानार्थ तसेच कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून छोटेसे चॅपेल आमच्या खर्चाने उभारण्यासाठी परवानगी द्या' अशी विनंती केली, तर आपल्याला कष्टाच्या कामातून मुक्त केल्याबद्दल पीएरचे आभार मानण्यासाठी तान्ह्या मुलांना घेऊन स्त्रिया एका ठिकाणी जमल्या होत्या. एका ठिकाणी क्रूस घेऊन धर्मगुरू उभा होता. त्याच्याभोवती मुले गोळा झाली होती. याच मुलांना काउंटच्या कृपेने तो लिहायला वाचायला शिकवीत होता आणि धार्मिक शिक्षण देत होता. आपल्या सर्व शेतवाडीवर पीएरने स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले—कुठे इमारती तयार झाल्या होत्या, कुठे तयार होत होत्या, कुठे एकत्रित शाळा इस्पितळांची योजना तयार झाली होती. लवकरच शाळा-इस्पितळे सुरू होणार होती. पूर्वीपेक्षा मुख्य व्यवस्थापकाला कामाबद्दलचे श्रेय कमी मिळत होते हे पीएरने पाहिले.

निळ्या लांब कोटातील शेतकरी आपणास मिळणाऱ्या सोयीसवलतींबद्दल आभार मानत होते ते ऐकून पीएरचे अंतःकरण हेलावून जात होते.

'लोककल्याण करणे किती सोपे आहे! त्यासाठी किती अल्पप्रयत्नांची गरज असते. पण आम्ही जराही तसदी घेत नसतो.' पीएरच्या मनात येऊ लागले.

दक्षिणेचा दौरा संपल्यावर अत्यंत प्रसन्न मनःस्थितीत असलेल्या पीएरने आन्द्रे बोलकान्स्की या आपल्या मित्राला भेटण्याचा खूप दिवसांचा बेत पुरा केला. दोन वर्षे तरी त्यांची भेट झाली नव्हती.

बॉगुचेरॉव्हो सपाट घाणेरड्या प्रदेशातील गाव होते. सर्वत्र शेते होती. मधून मधून फर आणि बर्च वृक्षांची जंगले होती. काही ठिकाणी जंगले तोडली होती म्हणून जंगलात मोकळ्या जागाही होत्या. बोलकॉन्सीचे शेतावरील घर मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूंस लांबच लांब पसरलेल्या खेड्याच्या टोकाशी होते. त्याच्यासमोर नवीनच तयार केलेले उतू जाणारे तळे होते. त्याच्या काठावर गवत जवळजवळ नव्हते.

शेतावरील घराजवळ धान्य झोडपण्याचे खळे, कुळांची घरे, तबेले, न्हाणीघरे, इतर निवासस्थाने आणि अद्याप बांधकाम सुरू असलेले, वर्तुळाकार दर्शनी भागाचे एक प्रशस्त चिरेबंदी घर होते. घराभोवती नुकतीच बाग तयार करण्यात आली होती. कुंपणे आणि फाटके भरभक्कम व नव्याने बनविलेली होती. एका शेडमधे दोन आगीचे बंब होते आणि हिरव्या रंगाचे एक पिंप होते. रस्ते सरळ गेलेले होते. दोन्ही बाजूंना संरक्षक भिंती असलेले मजबूत पूल होते. सर्व गोष्टी आस्थेने काळजीपूर्वक केल्या जात असल्याचे दिसत होते. पीएरने प्रिन्स आन्द्रेच्या निवासस्थानाची चौकशी केली तेव्हा त्याला तळ्याच्या काठी असलेले त्याचे छोटेसे

घर दाखवले. प्रिन्स आन्द्रेच्या अटन नावाच्या जुन्या शरीरसंरक्षकाने पीएरला गाडीतून उतरायला मदत केली. प्रिन्स आन्द्रे घरी असल्याचे सांगितले आणि त्याला त्याने छोट्या स्वच्छ लॉबीमध्ये नेले.

पीएरने पीटर्सबर्ग येथे आपल्या मित्राला प्रशस्त इमारतीत पाहिले होते. त्यामुळे त्याचे आताचे छोटे, साधे, स्वच्छ घर पाहून त्याला आश्चर्य वाटले.

तो घाईघाईने बैठकीच्या छोट्या खोलीत शिरला. खोलीच्या भिंतींना अजून प्लास्टर लावलेले नव्हते. पाइनवुडचा वास अजूनही येत होता. पीएर आणखी पुढे गेला असता पण पावले न वाजवता अटनने त्याच्याआधी दाराकडे जाऊन दारावर टक-टक केले.

' कोण आहे ? ' त्याला रुक्ष त्रस्त आवाज ऐकू आला.

' पाहुणे आले आहेत. ' अटन उत्तरला.

पीएर घाईने दाराशी गेला. त्याला दारातच प्रिन्स आन्द्रे भेटला. त्याच्या कपाळाला आठ्या होत्या आणि तो वृद्ध भासत होता. पीएर त्याला कडकडून भेटला. चष्मा काढून तो प्रिन्स आन्द्रेला जवळून निरखू लागला.

प्रिन्स आन्द्रे म्हणाला, ' तुझी भेट अनपेक्षित आहे. तू आलास म्हणून मला बरं वाटतं आहे. '

पीएर काही बोलला नाही. टक लावून तो आपल्या मित्राकडे चकित होऊन पाहात होता. प्रिन्स आन्द्रेमध्ये झालेल्या बदलाने त्याला धक्का बसला होता. प्रिन्स आन्द्रेच्या शब्दात जिव्हाळा होता, त्याची मुद्राही हसरी होती. त्याच्या निस्तेज, निर्जीव डोळ्यांत तो आनंद दाखविण्याचा प्रयत्न करीत असला तरी आनंदाचा लवलेश नव्हता.

दीर्घकाळाने दोन मित्र भेटल्यानंतर संभाषण जसे होते तसे झाले. ते दोघे अनेक विषयांवर बोलत राहिले. ते एकमेकांना प्रश्न विचारीत होते आणि ज्या विषयांवर पुष्कळ बोलले पाहिजे असे त्यांना वाटे त्या विषयांबद्दल ते थोडक्यात बोलत होते. गतकाळातील जीवन, भविष्यकाळचे बेत, पीएरचा प्रवास, प्रिन्स आन्द्रेच्या मधल्या काळातील जीवनक्रम, युद्ध, इत्यादी विषयांवर आरंभी ते ओझरते बोलू लागले. पीएर त्याला आपल्या भूतकाळाबद्दल आणि भावी जीवनाबद्दल मोठ्या आस्थेने सांगत असताना प्रिन्स आन्द्रेची नजर विसरू शकत नसे. जणू आन्द्रेला त्याच्या सगळ्या कथनात रस घेणे आवडले असते. परंतु शक्य होत नव्हते. आपला उत्साह, आपली ध्येये, सुखावरील तसेच चांगुलपणावरील आपला विश्वास प्रिन्स आन्द्रेसमोर व्यक्त करणे योग्य नव्हे असे पीएरला वाटू लागले. गेल्या दौऱ्यामध्ये मेसनांच्या संप्रदायाकडून मिळालेल्या तत्त्वांवरील त्याची श्रद्धा अधिक दृढ झाली होती, ती प्रिन्स आन्द्रेला ऐकविण्याची त्याला लाज वाटू लागली. आपण अगदी भाबडे दिसू या विचाराने त्याने स्वतःला आवरले, पण त्याच वेळी त्याच्या मनामध्ये उत्कट इच्छा निर्माण झाली. आपण पीटर्सबर्गला होतो त्या-पेक्षा कितीतरी वेगळे आणि चांगले झालो आहोत, हे प्रिन्स आन्द्रेला तावडतोब दाखवून द्यायला हवे. ' ह्या काळात मी काय काय अनुभवलं ते मला सांगता येणार नाही. माझं जुनं जीवन

मी न आठवणं बरं. '

प्रिन्स आन्द्रे म्हणाला, ' तुझ्यामध्ये आताशा खरोखर विलक्षण बदल झाला आहे. '

पीएर म्हणाला, ' ते राहू दे. तुझ्याबद्दल काय? तुझ्या काही योजना आहेत काय? '

उपरोधाच्या सुरात प्रिन्स आन्द्रे उत्तरला, ' माझ्या योजना? ' जणू त्या शब्दाचा अर्थ आपल्याला कळलाच नाही अशा स्वरात त्याने विचारले. ' हे बांधकाम चाललं आहे हे तू पाहतो आहेस. पुढच्या वर्षापासून मी इथंच कायमचा राहणार आहे. '

पीएरने प्रिन्स आन्द्रेकडे काही न बोलता कुतूहलाने पाहिले. प्रिन्स आन्द्रे मित्राच्या भेटीने उदास आणि अस्वस्थ झालेला दिसत होता. तो पीएरला म्हणाला, ' खरं सांगू? मी इथं उघड्यावर तळ दिलेल्या सैन्यासारखा आहे. इथली थोडीशी व्यवस्था बघण्यासाठी मी इथं आलो होतो. मी आजच बहिणीकडे परतणार आहे. तुझी तिच्याशी ओळख करून देईन पण मला वाटतं तू तिला ओळखत असशील. ' दुपारी भोजन झाल्यावर त्याने निघण्याचे ठरवले. प्रिन्स आन्द्रेने त्याला भोवतालचा परिसर बघण्याची विनंती केली. जेवणाची वेळ होईपर्यंत ते बाहेर फिरत राहिले. घनिष्ठ मैत्री, ओळख नसलेली माणसे जशी बोलतात तसे ते राजकीय बातम्या आणि दोघांच्याही ओळखीची माणसे यांवर बोलत राहिले. तिथे नव्या इमारती बांधल्या जात होत्या त्यांच्याविषयी मात्र प्रिन्स आन्द्रे मोठ्या तळमळीने आणि आवडीने बोलू लागला. बांधकामासाठी उभ्या केलेल्या परातीबद्दल बोलताना आणि इमारतीच्या प्लॅनबद्दल बोलता बोलता प्रिन्स आन्द्रे एकदम थांबला आणि म्हणाला, ' जाऊ दे. त्यात काही स्वारस्य नाही. चल, जेवण करू आणि निघू. '

जेवण करताना पीएरच्या लग्नाचा विषय निघाला.

' तुझ्या लग्नाची बातमी ऐकून मला खूप आश्चर्य वाटलं. ' प्रिन्स आन्द्रे म्हणाला. आपल्या लग्नाचा विषय निघाला की पीएर नेहमी लाजे. तसा तो आताही लाजला आणि घाईघाईने म्हणाला, ' मी एकदा तुला सगळ्या घटना सांगेन. तुला समजलं असेलच. ते सगळं संपलं आहे. कायमचं संपलं आहे. '

' कायमचं? कायमचं काहीच असत नाही. '

' त्याचा शेवट कसा झाला ते तुला ठाऊक आहे काय? द्वंद्वयुद्धाची गोष्ट तुझ्या कानी आली होती का? '

' होय. '

' त्या माणसाला मी ठार केलं नाही. म्हणून तरी परमेश्वराचे आभार मानायला हवेत. '

' असं का म्हणतोस? खरं तर अशा हरामखोरांना ठार मारणं मी सत्कृत्य समजतो. '

' असं म्हणू नकोस. मानवी हत्या वाईट असते, अयोग्य असते. '

' अयोग्य कशावरून? योग्य काय आणि अयोग्य काय हे ठरविणं माणसाच्या हाती नाही. योग्यायोग्य ठरविताना माणसांनी नेहमीच चुका केल्या आहेत आणि ती नेहमीच चुका करीत राहतील. '

' जे दुसऱ्याला   माणसाला दुखवतं ते अयोग्य. ' पीएर म्हणाला. आल्यापासून प्रथमच प्रिन्स आन्द्रे उत्तेजित होऊन आपल्या जीवनात बदल घडवून आणणारे विचार ऐकवीत होता म्हणून पीएरला आनंद होत होता.

' दुसऱ्याला कोणत्या गोष्टी दुखवतात त्या तुला ठाऊक आहेत का ? '

' ज्या गोष्टी आपल्याला पीडा देतात त्याच दुसऱ्यांना दुखवतात. '

' आपल्याला पीडा देणाऱ्या गोष्टी आपल्याला ठाऊक असतात, पण आपल्याला पीडा देणाऱ्या गोष्टी दुसऱ्यांना पीडा देणाऱ्या असतीलच असे नाही, ' प्रिन्स आन्द्रे अधिकाधिक उत्तेजित होऊन बोलत होता. आपली नवीन जीवनदृष्टी पीएरला ऐकवायला तो उत्सुक झाल्याचे स्पष्ट दिसत होते. तो फ्रेंचमध्ये बोलत होता. ' मला एवढंच माहीत आहे की जीवनातील खऱ्याखुऱ्या दुर्दैवाचे दोनच प्रकार आहेत...पश्चात्ताप आणि आजार. त्याच्या अभावाखेरीज कल्याण संभवतच नाही. हे दोन प्रकार टाळून मला जीवन व्यतीत करायचं आहे. आजवरच्या माझ्या शहाणपणाचं हे सार समज. '

पीएर विचारू लागला, ' तर मग शेजाऱ्यावरील प्रेम आणि स्वार्थत्याग यांचं काय ? तुझा दृष्टिकोण मला बिलकुल पटत नाही. पश्चात्ताप होऊ नये म्हणून, हातून वाईट गोष्ट घडणार नाही ह्या उद्देशानं आयुष्य घालविणं अगदीच क्षुद्रपणा आहे. मी तसं जीवन जगत होतो. मी स्वत:साठी जगत होतो तसं जगून मी माझं जीवन बिघडवलं. आता मी इतरांसाठी जगतो आहे...निदान जगण्याचा प्रयत्न करतो आहे. ( नम्र स्वभावाच्या पीएरने आपले विधान सुधारून घेतले. ) म्हणून मला आता कोठे जीवनातील आनंद उमगू लागला आहे. तू म्हणतोस त्याच्याशी मी सहमत होणार नाही. तुझा स्वत:चाही तुझ्या बोलण्यावर विश्वास नसेल. '

काही न बोलता प्रिन्स आन्द्रेने पीएरकडे पाहिले. त्याच्या मुद्रेवर उपरोधिक स्मित झळकले.

' माझ्या बहिणीला तू आता भेटशील ? तुझं तिचं चांगलं जमेल. कदाचित तुझ्या दृष्टीनं तू बरोबर असशील. नाहीतरी प्रत्येकजण आपापल्या मार्गानं जीवन जगतो. तू स्वत:साठी जगत होतास. तसं केल्यानं आपण जीवन फुकट घालवलं असं तुला वाटलं, दुसऱ्यासाठी जगू लागल्यावरच तुला सुखाचा शोध लागला. माझा अनुभव मात्र उलट आहे. मी इतरांसाठी जगलो आणि मी माझं जीवन पूर्णपणं नसेल पण जवळजवळ फुकट घालवलं. मी स्वत:साठी जगू लागल्यापासून मात्र मला अधिकाधिक मन:शांती मिळत आहे. '

पीएरने चिडून विचारले, ' तू केवळ स्वत:साठी कसा जगू शकशील ? तुझा मुलगा, तुझी बहीण, तुझे वडील यांचं काय ? '

' ती सगळी माणसं म्हणजे मीच. ती माझ्याहून वेगळी नव्हेत, पण तू ज्यांना शेजारी म्हणतोस त्या इतर माणसांमुळंच दुर्दैव ओढवतं. ज्यांचं आपल्याला कल्याण करायचं आहे ती माणसं म्हणजे आपले शेजारी. उदा० कीव्ह येथील तुझी कुळं, ' प्रिन्स आन्द्रे म्हणाला आणि उपरोधाने आव्हान दिल्यागत पीएरकडे पाहू लागला. पीएरला वादविवादात

खेचावे असे त्याने निश्चित ठरवले होते.

पीएर अधिकाधिक तळमळीनं बोलू लागला. ' कुळांसाठी काही चांगलं करावं अशी माझी इच्छा आहे. त्या दृष्टीने मी काही करीत असतो. माझ्या इच्छेत काय पातक आहे? कित्येक माणसं रोगानं औषधावाचून मरतात, त्यांचं भौतिक जीवन सुखी करणं तसं किती सोपं आहे. त्यांच्यासाठी डॉक्टरांची, इस्पितळांची सोय केली, वृद्धाश्रम चालविले तर त्यात काय चुकलं? शेतकऱ्यांना आणि तान्ही मुलं असणाऱ्या त्यांच्या बायकांना रात्रंदिवस विश्रांती मिळत नाही. त्यांना जर मी फुरसतीचा वेळ दिला, विश्रांती दिली, तर त्यांचं कल्याण नाही का होणार? ते वादातीत नाही का?' पीएर घाईघाईने तोंडातल्या तोंडात बोलत होता. ' मी हे सारं केलं आहे, चांगल्या तऱ्हेनं केलं नसेन, थोड्या प्रमाणात केलं असेल; पण त्या दिशेनं थोडंफार काम केलं आहे. माझी ही श्रद्धा तू काही डळमळीत करू शकणार नाहीस. तुझा स्वतःचाच तुझ्या विधानावर विश्वास नाही हा माझा विश्वासही तू खोटा पाडू शकणार नाहीस. इतरांचं असं भलं करण्यात जो आनंद आहे तो जीवनातील सर्वांत खराखुरा आनंद आहे. मला जाणवलेलं निश्चितपणं जाणवलेलं हे महान सत्य आहे.'

प्रिन्स आन्द्रे म्हणाला, ' आपल्या दोघांच्या दृष्टिकोणातच फरक आहे. मी घर बांधतो आहे, बाग करून घेतो आहे, तर तू इस्पितळं बांधतो आहेस. यातल्या कोणत्याही कामात माणसाचा वेळ जाऊ शकेल. जो सगळ्यांचा न्याय करतो त्यालाच यातील योग्य काम कोणतं व अयोग्य कोणतं हे ठरवू दे. आम्हा माणसांना निर्णय करता येणार नाही.'

ते टेबलाजवळून उठले आणि बाल्कनी नसल्यामुळे पायऱ्यांवर बसले. ' आता आपण त्याबाबत चर्चा करू.' आपले एक बोट दुमडीत प्रिन्स आन्द्रे म्हणाला. ' शाळा, शिक्षण अशा गोष्टींबद्दल तू बोलतोस. अशा गोष्टी करून तुला जनावरांच्या स्थितीत असलेल्या त्या माणसांना बाहेर काढायचं आहे आणि त्यांना आत्मज्ञान द्यायचं आहे. माझ्या मते शक्य कोटीतलं सुख म्हणजे जनावरांचं सुख होय. ते तुला त्यांच्यापासून हिरावून घ्यायचं आहे. मला त्यांचा हेवा वाटतो. उलट तू त्यांना माझी परिस्थिती न देता माझ्याप्रमाणे बनविण्याचा प्रयत्न करतो आहेस. तुला त्यांचे श्रम कमी करायचे आहेत. माझ्या मते त्यांच्या अस्तित्वाला शारीरिक श्रम अत्यंत आवश्यक आहेत. तुला मला बौद्धिक श्रम आवश्यक आहेत, तसे तुला विचारात गढणे भाग आहे. मी तीन वाजता अंथरुणावर पडतो, माझ्या डोक्यात विचार येतात आणि मला झोप येत नाही. विचारांपासून सुटका नसल्यामुळं मला सकाळपर्यंत जागरण घडतं. मला विचार करणं भाग आहे तसं त्यांना शेतातील कामं करणं. त्यांनी तसं केलं नाही तर ते गुत्त्याकडे वळतील, नाही तर आजारी पडतील. त्यांचे भयंकर शारीरिक श्रम मला झेपणार नाहीत. तशा श्रमानं मी आठवड्यात मरून जाईन. त्यांचंही तसंच आहे. त्यांनीही श्रम केले नाहीत तर ते लठ्ठ होतील आणि मरतील. तू सांगितलेली तिसरी गोष्ट कोणती? तिसरी गोष्ट इस्पितळ, औषधी मदत. शेतकऱ्याला फीट येते आणि तो मरून जातो. तुम्ही त्याच्या अंगातून रक्त काढता आणि त्याला वाचवता, तो पंगू बनतो, इतरांना भारभूत होत

दहाबारा वर्षं रखडत राहतो. त्यापरीस मरण त्याच्या दृष्टीनं अधिक सुखाचं असतं. नवीन माणसं जन्माला येतात, त्यांची उणीव भासत नाही. मजूर कमी पडू नये असं तुम्हाला वाटत असेल तर गोष्ट वेगळी. परंतु तुम्हाला त्याच्यावरील प्रेमापोटी त्याचं कल्याण करायचं असतं. त्याला त्याची गरज नसते.'

प्रिन्स आन्द्रेने इतक्या स्पष्टपणे आणि रेखीवपणे आपले विचार मांडले की त्याने त्याबद्दल बरेच चिंतन केलेले असावे असे वाटत होते. खूप दिवस शांत असलेल्या माणसासारखा तो भरभर आणि तळमळीने बोलत होता. तो जितक्या निराशेने आपले विचार व्यक्त करीत होता, तितक्या तीक्ष्णपणे पाहात होता.

'असा भयंकर विचार घेऊन माणसं कशी जगतात हेच मला कळत नाही. माझ्या डोक्यात असले विचार आले होते. काही दिवसांपूर्वी मॉस्कोत असताना आणि प्रवासात असताना असे विचार आले होते खरे. पण अशा वेळी मला इतकं अधःपतित वाटतं की माझं जीवन जीवन राहात नाही—प्रत्येक गोष्ट मला तुच्छ, तिरस्कृत वाटते ... मला माझीच सर्वांत अधिक घृणा येते ..मग मी जेवत नाही—आंघोळ करीत नाही...अशा स्थितीत जगणं कसं शक्य आहे?' पीएरने विचारले.

'आंघोळ न करणं बरं नाही. तसं करणं घाणेरडेपणा आहे. प्रत्येकानं जीवन सुसह्य करण्याची शिकस्त करावी. मी जीवन जगत असतो, मी जिवंत असतो हा माझा काही अपराध नाही. म्हणून मरेपर्यंत दुसऱ्यांना न दुखावता जास्तीत जास्त चांगल्या तऱ्हेनं जगण्याचा प्रयत्न करणं माझं कर्तव्य आहे.'

'अशा कल्पना डोक्यात घेऊन जगावं हे कोणी तुला सांगितलं? खरं तर कशात भाग न घेता तू स्वस्थ बसणं बरं.'

'तुम्ही काही केलंत तरी जीवन तुम्हाला शांती देणार नाही. निष्क्रिय राहणं मला आवडेल. पण इथल्या उमरावांनी मार्शलपदी माझी निवड करून माझा सन्मान केला आहे. त्याच्यावरून मोकळीक मिळावी म्हणून दुसरं काही करता येण्याजोगं नव्हतं. मार्शलच्या जागेसाठी चांगुलपणा लागतो, बारीकसारीक गोष्टींसाठी काळजी करणारा रांगडेपणा याची गरज लागते. हे गुण माझ्यात नाहीत हे त्यांना ठाऊक नाही. मला शांतपणं बसण्यासाठी जागा मिळावी म्हणून इथं घर बांधलेलं आहे. खेरीज नागरी संरक्षणदल आहेच.'

'तू लष्करात का शिरला नाहीस?'

प्रिन्स आन्द्रे खिन्नपणे म्हणाला, 'ऑस्टरलिट्सला जे घडलं त्यानंतर? माफ कर. पुन्हा म्हणून कधी रशियन सैन्यात दाखल व्हायचं नाही अशी शपथ मी घेतली आहे. जरी बोनापार्ट इथं स्मॉलेन्स्कला आला आणि ब्लीकहिल्सला धोका निर्माण झाला तरीही मी सैन्यात शिरणार नाही.' प्रिन्स आन्द्रेने स्वतःला सावरले आणि म्हटले, 'खेरीज नागरी संरक्षणदल आहे. माझे वडील तिसऱ्या जिल्ह्याचे कमांडर-इन-चीफ् आहेत. लढाईवर जाणं चुकवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे त्यांच्या हाताखाली नोकरी करणं.'

'म्हणजे तू नोकरी करतोस तर?'

'होय,' तो काही वेळ स्तब्ध राहिला.

'तू नोकरी कशासाठी करतोस?'

'त्याला खास कारण आहे. माझे वडील त्यांच्या पिढीतील एक मातबर आसामी आहेत. आता ते वृद्ध झाले आहेत. ते क्रूर आहेत असं अचूकपणं म्हणता येणार नाही. त्यांच्यात अमाप उत्साह आहे. अमर्याद सत्तेची सवय झाल्यानं त्यांचं वागणं भयानक झालं आहे. नागरी संरक्षणदलाचे कमांडर–इन्–चीफ म्हणून सम्राटांनी त्यांची नेमणूक केल्यानं त्या वागण्यात बदल झालेला नाही. पंधरा दिवसांपूर्वी जर का मला दोन तास उशीर झाला असता तर त्यांनी रजिस्टर क्लार्क युनॉव्होला फाशी दिलं असतं.' स्मित करीत प्रिन्स आन्द्रे पुढे म्हणाला, 'माझ्याइतकं दुसऱ्या कुणाचं त्यांच्यावर वजन नाही म्हणून मी त्यांच्या हाताखाली काम करतो. त्यांच्यावर पश्चात्ताप करण्याची पाळी येऊ नये म्हणून मी काही वेळा त्यांना काही गोष्टींपासून परावृत्त करतो.'

'आता आलं लक्षात.'

'तुझ्या लक्षात आलंच असेल असं नाही. नागरी संरक्षणदलाच्या माणसाच्या बूट आणि अशाच काही वस्तू चोरणाऱ्या हरामखोर रजिस्टर क्लार्कचं थोडंही भलं व्हावं अशी माझी इच्छा नव्हती आणि नाहीही. खरं म्हणजे त्याला फाशी देण्यात आलं असतं तर मला आनंद वाटला असता. पण मला माझ्या वडिलांची—म्हणजे पर्यायानं माझीच—काळजी वाटली.'

प्रिन्स आन्द्रे अधिकाधिक तळमळीने बोलत होता. आपल्या कृत्यात शेजाऱ्याचे भले करण्याची थोडीही इच्छा नव्हती हे सिद्ध करून देण्याचा तो प्रयत्न करीत असताना त्याचे डोळे चांगलेच चमकत होते.

तो आणखी बोलू लागला, 'तुला कुळांना मुक्त करायचं आहे. ती फार चांगली गोष्ट आहे. तू कुळाला कधी मारलं नसशील अगर सैबेरियाला पाठवलं नसशील. गुलामगिरीतून त्यांना मुक्त केल्यानं तुझं भलं होणार नाही आणि त्यांचंही मुळीच भलं होणार नाही. एखाद्या कुळाला मारपीट करून सैबेरियाला पाठवलं तर त्याचं तिथं काही वाईट होणार नाही असं मला ठामपणं वाटतं. सैबेरियात तो तसल्याच प्रकारचं पशूचं जिणं घालवील; त्याच्या शरीराचे वळ बरे होतील आणि तो पूर्वीसारखाच सुखात राहू लागेल. ज्यांचा नैतिकदृष्ट्या ऱ्हास झाला आहे, पश्चात्तापानं ज्यांना घेरून टाकलं आहे, जे पश्चात्ताप दडपून टाकीत आहेत, भोवतालच्या लोकांना शिक्षा करून जे बेफिकीर राहतात अशा लोकांना स्वातंत्र्याची आवश्यकता आहे. वर्षानुवर्षं अनिर्बंध सत्ता मिळालेल्या लोकांच्या परंपरेत चांगली माणसं वाढतात, अधिकाधिक रागीट, क्रूर, पाशवी बनतात; आपल्या वर्तनाची त्यांना जाणीव असते परंतु ती स्वतःला आवरू शकत नाहीत यामुळं ही चांगली माणसं अधिकाधिक दुःखी होऊ लागतात.' प्रिन्स आन्द्रे इतक्या तळमळीने बोलत होता की त्याने ह्या कल्पना वडिलांकडून उचलल्या असाव्यात असे पीएरला वाटल्यावाचून राहिले नाही. पीएर स्तब्ध राहिला.

‘ माझा जीव तडफडतो तो मानवी प्रतिष्ठेसाठी, सदसद्विवेकबुद्धीसाठी, शुद्ध अंतःकरणासाठी. त्यांच्या शरीरासाठी माझा जीव तडफडत नाही; त्यांना किती झोडा, किती मढवा, त्यांची शरीरं तशीच राहतील. त्यात बदल होणार नाही. ’

‘ तुझं म्हणणं चूक आहे. मी हजार वेळा असंच म्हणेन. तुझं म्हणणं मला बिलकुल पटत नाही, ’ पीएर म्हणाला.

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/१२२
१
मंत्रालय

प्रिन्स आन्द्रे आणि पीएर घोडागाडीतून ब्लीकहिल्सकडे निघाले.

ब्लीकहिल्स येथील घराच्या मुख्य प्रवेशद्वाराशी प्रिन्स आन्द्रे आणि पीएर आले तेव्हा रात्र झाली होती. गाडी आत शिरू लागली तेव्हा मागच्या प्रवेशद्वाराशी चाललेली गडबड प्रिन्स आन्द्रेने स्मित करून पीएरला दाखविली. पाठीवर पिशवी घेतलेली पोक आलेली एक वृद्ध स्त्री आणि काळा पोषाख केलेला लांब केसांचा, लहानखोर बांध्याचा एक तरुण गाडी येताना दिसताच मागच्या प्रवेशद्वाराकडे धावत होते. त्यांच्या मागून दोन स्त्रिया धावत होत्या. ती चारही माणसे घाबरून गाडीकडे पाहात मागील प्रवेशद्वाराकडे धाव घेत होती.

प्रिन्स आन्द्रे म्हणाला, ‘ ती सगळी माशाची देवमाणसं आहेत. मला माझे वडील समजून ती पळताहेत. फक्त ह्या बाबतीत माझी बहीण वडिलांचं ऐकत नाही. माझे वडील ह्या यात्रिकांना घालवून द्यायला सांगतात, पण ती त्यांचं स्वागत करते. ’

पीएरने विचारले, ‘ ही देवमाणसं आहेत तरी कोण ? ’

तो पीएरला म्हणाला, ‘ आता आपण माझ्या बहिणीची भेट घेऊ या. मला ती अद्याप दिसली नाही. आपल्या देवमाणसांबरोबर ती कुठंतरी दडून बसली असेल. तिची चांगलीच कानउघाडणी करतो. तुला देवमाणसं पाहता येतील. ही देवमाणसं खरोखर तुला प्रेक्षणीय वाटतील. ’

‘ देवमाणसं म्हणजे काय प्रकार आहे ? ’

‘ तुला आता लवकरच दिसेल. ’

जेव्हा ते दोघे खोलीत आले तेव्हा प्रिन्सेस मार्या बेचैन झाली, संकोचाने लालबुंद झाली. तिच्या आरामशीर खोलीत पवित्र प्रतिमेसमोर दिवे लावलेले होते. तिथेच सोफ्यावर तिच्या शेजारी लांब नाकाचा आणि लांब केसांचा भिक्षूचा झगा घातलेला एक तरुण मनुष्य बसला होता. त्यांच्यासमोर चहादाणी होती, जवळच्या बैठ्या खुर्चीत सुरकुत्या पडलेली कृश, वृद्ध स्त्री बसली होती. लहान मुलाप्रमाणे तिची मुद्रा सौम्य, शांत होती.

‘ आन्द्रे, तू मला अगोदर का कळवलं नाहीस ? ’ प्रिन्सेस मार्याच्या सुरात थोडीशी कान-

उघाडणी होती. पिलांसमोर उभ्या राहणाऱ्या कोंबडीप्रमाणे ती यात्रिकांसमोर उभी राहिली.

पीएरने तिच्या हाताचे चुंबन घेतले तेव्हा ती म्हणाली, ' तुझ्या भेटीनं खूप खूप आनंद झाला. ' ती त्याला लहानपणापासून ओळखत होती. आता त्याची आन्द्रेशी असलेली मैत्री, त्याचे दुःखी वैवाहिक जीवन आणि विशेषतः त्याची दयाळू निगर्वी मुद्रा यांमुळे तिचे त्याच्या-बद्दल फार चांगले मत झाले. तिचे सुंदर तेजस्वी डोळे त्याला जणू म्हणत होते, ' तू मला अतिशय आवडतोस, परंतु कृपा करून माझ्या मित्रांना हसू नकोस. '

' तुम्ही कीव्हमधून आला का ? ' प्रिन्स आन्द्रेने म्हातारीला विचारले. संभाषणाला उत्सुक असणारी ती म्हातारी म्हणाली, ' होय महाराज, संतांच्या पवित्र दैवी रहस्यात सहभागी व्हायला मी लायक आहे असं ख्रिस्ताच्या पवित्र जन्मदिनी मानण्यात आलं. कोल्याझीनमधे परमेश्वराच्या महान कृपेचा साक्षात्कार घडत आहे. '

' कसल्या प्रकारचा ? ' प्रिन्स आन्द्रेने विचारले.

प्रिन्सेस मार्या आन्द्रेला चूप बसवीत पेल्यागेयुश्काला म्हणाली, ' त्याबद्दल आम्हाला काही सांगू नकोस. '

' का ? का सांगू नको ? मला तो आवडतो. ईश्वरानं ज्याच्यावर कृपा केली आहे, असा चांगला माणूस आहे तो. तो माझा उपकारकर्ता आहे. त्यानं मला दहा रूबल दिल्याचे आठवतात. मी कीव्हमधे असताना कीर्युष नावाचा वेडा यात्रिक मला भेटला. तो खरोखर देवानं पाठवलेला माणूस आहे. हिवाळ्यात तसंच उन्हाळ्यात तो अनवाणी चालतो. तो मला म्हणाला, ' तू तुझ्या योग्य जागी का जात नाहीस ? तू कोल्याझीनला जा. तिथं तुला पवित्र मातेची प्रतिमा दिसेल. ती चमत्कार घडवून आणते. ' ते ऐकताच मी बरोबरच्या भक्तांचा निरोप घेतला आणि निघाले. '

सगळेजण शांत होते. नियमितपणे श्वास घेत ती यात्रेकरू स्त्री फक्त तोलून-मापून संथपणे बोलत होती. ' मी आले तेव्हा तिथले भगत म्हणू लागले, ' ईश्वराची महान कृपा प्रकट झाली आहे. पवित्र मातेच्या गालांवरून धूपाचा द्रव ठिपकत आहे. ' '

' पुरे झालं तेवढं. बाकीचं नंतर मला सांग. ' संकोचलेली प्रिन्सेस मार्या म्हणाली.

पीएर म्हणाला, ' मी हिला एक प्रश्न विचारतो. हा चमत्कार तू स्वतः पाहिलास का ? '

' परमेश्वरी कृपेमुळं तो चमत्कार पाहायला मी योग्य ठरले. प्रतिमेच्या चेहऱ्यावर दैवी प्रकाश पसरला होता. पवित्र मातेच्या गालांवरून एवढे एवढे थेंब...'

त्या वृद्धेचे बोलणे लक्षपूर्वक ऐकून झाल्यावर पीएर भाबडेपणाने म्हणाला, ' ती हात-चलाखी असली पाहिजे. '

' तुम्हाला असं बोलवतं तरी कसं ? ' धास्तावलेल्या स्वरात पेल्यागेयुश्का म्हणाली आणि तिने प्रिन्सेस मार्याकडे आधारासाठी वळून पाहिले.

' लोकांवर अशा गोष्टी लादल्या जातात. ' पीएर म्हणाला.

क्रूसची खूण जुळवीत ती यात्रेकरू स्त्री म्हणाली, ' जीझस ख्रिस्त क्षमा करो. महाराज,

असं बोलू नका. एका जनरलचा असाच विश्वास नव्हता, भिक्षू फसवतात असं त्यानं म्हटलं न म्हटलं तोच त्याची दृष्टी गेली. मग त्याला स्वप्न पडलं. पेट्चेरस्कोची पवित्र माता त्याच्या स्वप्नात येऊन म्हणाली–' माझ्यावर श्रद्धा ठेव म्हणजे मी तुला बरं करीन. ' मी तुम्हाला पवित्र सत्य सांगत आहे. मी ते स्वतः पाहिलेलं आहे. त्यांनी त्या आंधळ्याला तिच्याकडे नेलं. तिच्यासमोर शरीर झोकून तो म्हणाला, ' माझी दृष्टी मला दे. झारनं मला दिलेलं पारितोषिक मी परत करतो. मी स्वतः पाहिलं–त्यानं ताऱ्यासारखं काही कोरलेलं होतं. शेवटी त्याला त्याची दृष्टी परत मिळाली. तुम्ही जे बोलता ते पाप आहे; त्याबद्दल देव तुम्हाला शिक्षा करील.' तिने पीएरची कानउघाडणी केली.

' त्या पवित्र प्रतिमेमध्ये तारा होता का ?' पीएरने विचारले.

' मग त्यांनी पवित्र मातेला जनरल करून टाकलं असेल नाही ?' प्रिन्स आन्द्रेने स्मित करून विचारले.

पेल्यागेयुश्का एकदम पांढरीफटक पडली. तिने आपले हात उडवले. तिचा पांढरा फट-फटीत चेहरा लालबुंद झाला. ती बोलू लागली, ' तुम्ही घोर पाप करताहात. तुम्हाला मुलगा आहे हे विसरू नका. परमेश्वर तुम्हाला क्षमा करो. ' क्रूसची खूण जुळवीत ती म्हणाली, ' प्रभो, त्यांना क्षमा करा. ' मग प्रिन्सेस मार्याकडे वळून ती म्हणाली, ' बाई, हे काय चाललं आहे ? ' ती उठली आणि जवळजवळ रडत आपली पिशवी भरू लागली. ज्या घरात असे उद्गार काढले जातात, त्या घरात आपल्याला दान स्वीकारावे लागले म्हणून ती घाबरली होती आणि शरमली होती; त्या घराच्या दानधर्माला आपण यापुढे मुकणार म्हणून ती दुःखी झाली होती.

'तुम्ही कशासाठी केलंत हे ? तुम्ही माझ्याकडे कशासाठी आला होतात ? ' प्रिन्सेस मार्याने विचारले.

पीएर म्हणाला, ' पेल्यागेयुश्का, मी खरंच गंमतीनं बोलत होतो. प्रिन्सेस, माझ्या मनात तिचा अपमान करावयाचा नव्हता. सर्वस्वी माझाच दोष होता. माझ्या मनात तसलं काही नव्हतं. तो गंमत करत होता.'

पेल्यागेयुश्काचा प्रारंभी विश्वास बसला नाही. पण पीएरच्या मुद्रेवर खराखुरा पश्चात्ताप दिसत होता. प्रिन्स आन्द्रे पेल्यागेयुश्काकडून पीएरकडे सौम्य, शांतपणे पाहू लागला. त्यामुळे हळूहळू तिचा संशय नाहीसा झाला.

यात्रेकरू स्त्री शांत झाली आणि पुन्हा संभाषणात भाग घेऊ लागली. तिने त्यांना फादर, ॲम्फीलॉहेच्या पवित्र जीवनाची कथा खूप वेळ सांगितली. तो इतका पवित्र आचरणाचा होता की, त्याच्या हातांना धुपाचा वास येत असे. कीव्हच्या शेवटच्या तीर्थयात्रेत परिचित भिक्षूंनी

आपल्याला थडग्यांच्या चाव्या कशा दिल्या आणि आपण कोरडा पाव घेऊन त्या थडग्यात संतांच्या सहवासात दोन दिवस रात्री कशा घालविल्या ते सांगितले. 'एका थडग्यात थोडीशी प्रार्थना करायची, एखादं गीत गायची मग दुसऱ्या थडग्यात जायची. कुठेतरी झोप घ्यायची. इतकी मनःशांती आणि इतकी कृपा मिळाली, इतका दैवी आनंद लाभला की पुन्हा ईश्वराच्या जगात यावंसं वाटेना.

पीएर गंभीरपणे लक्ष देऊन ऐकत होता. प्रिन्स आन्द्रे खोलीच्या बाहेर पडला. देवाची माणसे चहा घेत असतानाच प्रिन्सेस मार्या पीएरला घेऊन आपल्या भावामागून दिवाणखान्यात आली.

डेनिसॉव्ह आणि आपली रेजिमेंट यांच्याशी आपले नाते किती दृढ झाले आहे याची जाणीव रोस्तॉफला पहिल्यांदा झाली ती तो रजा संपवून परत आला तेव्हा.

मॉस्कोला आल्यानंतर रोस्तॉफला जसा थरारून सोडणारा अनुभव आला होता तसाच अनुभव रेजिमेंटमध्ये पुन्हा आल्यावर आला. आपल्या रेजिमेंटमधेच बटणे नसलेला गणवेष घातलेला पहिला घोडस्वार त्याने पाहिला. लाल केसांच्या दिमेत्येव्हला त्याने ओळखले. लाल रंगाच्या घोड्यांची दावी त्याला दिसली. लाव्रुश्काने आनंदाने ओरडून आपल्या धन्याला सांगितले, 'काउंट आलेले आहेत.' अजून झोपेत असणारा डेनिसॉव्ह विसकटलेल्या केसांनीच बाहेर पडला आणि रोस्तॉफला कडकडून भेटला. नवागताचे स्वागत करण्यासाठी ऑफिसर त्याच्याभोवती गोळा झाले. रोस्तॉफला आपली आई, वडील आणि बहिणी कडकडून भेटल्यानंतर जो आनंद झाला होता तसाच आता झाला. आनंदाने त्याच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले आणि त्याला बोलता येईना. रेजिमेंटदेखील त्याला घरासारखी होती.

रोस्तॉफने कर्नलकडे जाऊन हजर झाल्याचे कळवले. आपल्या स्क्वॉड्रनमध्ये तो दाखल झाला. ऑर्डर्लीचे काम पाहू लागला. घोड्यांच्या वैरणीसाठी फिरू लागला. रेजिमेंटमधील बारीक-सारीक तपशील आवडीने जाणून घेऊ लागला. आपले स्वातंत्र्य हिरावून घेण्यात आले आहे आणि एका ठराविक कामाला आपल्याला जुंपण्यात आले आहे याची त्याला जाणीव झाली. तरीही घरी असल्याप्रमाणेच त्याला शांत वाटत होते—आणि आपल्या वर्तनाला सगळ्यांचा पाठिंबा मिळेल असे वाटत होते. बाहेरच्या जगात त्याला आपली योग्य जागा कळत नव्हती. निवडीचे स्वातंत्र्य वजावताना त्याच्या हातून चुका होत होत्या. बाहेरच्या जगातील गोंधळ या ठिकाणी नव्हता. जिला समजून घ्यावे वा जिच्याबद्दल गैरसमज करून घेता येईल अशी सोन्या या ठिकाणी नव्हती. कुठे जाता येईल अशी शक्यता नव्हती. निरनिराळ्या तऱ्हेने उपयोगात आणता येतील असे दिवसाचे चोवीस तास या ठिकाणी नव्हते. ज्यांच्यापासून दूर जावे लागावे वा ज्यांच्या अगदी जवळ जावे लागावे असे असंख्य लोक

या ठिकाणी नव्हते, इथे वडिलांबरोबरचे अंधुक आणि अनिश्चित आर्थिक संबंध नव्हते. रोस्तॉफला गमावून बसलेल्या पैशांची कटु स्मृती नव्हती. या ठिकाणी रेजिमेंटमध्ये सगळ्या गोष्टी कशा स्पष्ट सरळ होत्या. या जगाची दोन विषम भागांत विभागणी झाली होती. एक भाग पावलोग्रॅड रेजिमेंट आणि दुसरा भाग बाहेरील जग. या बाहेरील विशाल जगाशी त्याला काही कर्तव्य नव्हते. रेजिमेंटमधील सगळ्या गोष्टी सगळ्यांना ठाऊक असत–अमका लेफ्टनंट आहे, तमका कॅप्टन आहे, ही व्यक्ती चांगली आहे तशी ती दुसरी व्यक्ती वाईट आहे पण काही झाले तरी प्रत्येकजण दुसऱ्याचा सहकारी आहे.

या मोहिमेवर असताना रेजिमेंटचे जीवन रोस्तॉफला फार मोठा दिलासा देई. जुगारामध्ये त्याला डोलोहॉव्हला पैसे द्यावे लागले होते, त्याच्या कुटुंबियांनी त्याचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला होता तरीही तो स्वतःला क्षमा करू शकत नव्हता. त्याने ठरविले–आता पूर्वीप्रमाणे सेवा करायची नाही, उलट झालेल्या अपराधाचे प्रायश्चित्त घेण्यासाठी चांगले आचरण ठेवायचे. बाहेरच्या जगात चांगला मनुष्य बनणे कठीण आहे पण रेजिमेंटमध्ये सर्वस्वी चांगला सैनिक बनणे...चांगला ऑफिसर बनणे म्हणजेच चांगला मनुष्य बनणे शक्य आहे.

जुगारासाठी काढलेले कर्ज पाच वर्षांच्या आत आई-वडिलांना परत करण्याचा त्याने निश्चय केला. त्याला आईने वर्षाला दहा हजार पाठवले. त्याने आता त्यांच्याकडून फक्त दोन हजार घेण्याचा निश्चय केला. उरलेल्या पैशांतून कर्जफेड होणार होती.

संपूर्ण उद्ध्वस्त झालेल्या निर्जन जर्मन खेड्यात पावलोग्रॅड घोडेस्वारांनी एप्रिलपर्यंत कित्येक आठवडे तळ दिला होता. त्या जागेपासून ते हलले नव्हते.

बर्फ वितळत होते, सर्वत्र चिखल झाला होता, थंडी चालूच होती. नद्यांच्या पृष्ठावरील बर्फ फुटू लागले होते. रस्त्यावरून जाणे अतिशय कठीण झाले होते. कित्येक दिवस घोड्यांना वैरण नव्हती, सैनिकांना अन्न नव्हते. अन्नपुरवठा होणे अशक्य आहे हे सैनिकांना दिसले आणि ते निर्जन ओसाड खेड्यात फिरू लागले. बटाटे मिळतात की काय पाहू लागले. तेदेखील फारसे मिळाले नाही.

त्या प्रदेशातील लोकांनी अन्न केव्हाच खाऊन टाकले होते आणि पळ काढला होता. जे तेथे राहिले होते त्यांची स्थिती भिकाऱ्यांहूनही वाईट होती. त्यांच्याकडून हिसकावून घेता येईल असे काही नव्हते. सैनिकांच्या मनात फारशी दया नव्हती. तरीही त्यांनी त्यांना आपल्याकडील काही खाद्यवस्तू दिल्या. पावलोग्रॅड रेजिमेंटचे फक्त दोन सैनिक लढाईत जखमी होऊन मरण पावले. पण निम्म्याहून अधिक सैनिक उपासमार आणि रोग यामुळे मेले.

गेले पंधरा दिवस घोड्यांना छपराचे गवत खावे लागले होते. बघून शिसारी यावी इतके ते हाडकले होते. तरीसुद्धा पुंजक्यापुंजक्यांनी त्यांच्या अंगावर केस येत होते. हलाखीची परिस्थिती होती तरीही सैनिकांचे आणि ऑफिसरांचे जीवन पूर्वीसारखेच वक्तशीरपणे चालले होते. आता त्यांचे चेहरे पांढरे फटफटीत झाले होते, सुजले होते. गणवेष फाटला होता तरीसुद्धा पूर्वीसारखेच ते हजेरीसाठी रांगेत उभे राहात होते. वैरण गोळा करायला निघत होते, घोड्यांना स्वच्छ करीत

होते, आपल्या हातांनी रगडीत होते. घोड्यांना वैरण मिळाली नाही तर छपराचे गवत ओढीत होते. जेवणासाठी मोठ्या भांड्यांभोवती गोळा होत होते. घाणेरड्या अन्नावर, आपल्या भुकेवर विनोद करीत तिथून अर्धपोटी उठत होते. फुरसतीच्या वेळी नेहमीप्रमाणे शेकोट्या पेटवीत होते. उघड्या अंगाने त्यांच्यासमोर बसत होते. कुणी धूम्रपान करीत होते, कुणी कुजके कोंब आलेले बटाटे हुडकून भाजत होते, गप्पा मारीत होते.

नेहमीप्रमाणे दोन किंवा तीन ऑफिसर छप्पर नसलेल्या पडक्या घरात राहत होते.

पूर्वीप्रमाणेच रोस्तॉफ डेनिसॉव्हबरोबर राहत होता. तो रजा संपवून आल्यापासून त्यांची मैत्री अधिक दाट झाली. डेनिसॉव्ह रोस्तॉफच्या कुटुंबाबद्दल काहीही बोलत नसे. आपल्यासारख्या कनिष्ठ ऑफिसरशी डेनिसॉव्ह स्नेहाने वागतो याचे कारण नताशावरील असफल प्रेम असावे, असे रोस्तॉफला वाटे. डेनिसॉव्ह रोस्तॉफची अधिकाधिक काळजी घेत होता, त्याला शक्यतो धोक्याच्या ठिकाणी पाठवत नव्हता यात संशय नव्हता. एकदा चकमक संपल्यानंतर रोस्तॉफ सुरक्षित परत आलेला पाहून त्याला अतिशय आनंद झाला होता.

एप्रिलमध्ये रोस्तॉफ ड्यूटीवर होता. रात्रभर जागून तो सकाळी आठ वाजता परत आला. त्याने निखारे आणायला सांगितले. पावसात चिंब भिजलेले कपडे बदलले. प्रार्थना म्हटली. थोडा चहा घेतला. शरीरात ऊब आल्यानंतर कोपऱ्यातील आणि टेबलावरील वस्तू नीटनेटक्या ठेवल्या. हात उशाशी घेऊन तो पडला. त्याच्या चेहऱ्यावर वारा येत होता. आगीमुळे चेहरा तापत होता. शेवटच्या टेहळणीच्या मोहिमेसाठी आपल्याला निश्चित बढती मिळेल अशा सुखद विचारात तो गढला होता. तो डेनिसॉव्हची वाट पाहात होता. त्याच्याशी त्याला बोलायचे होते.

भिंतीपलीकडे दुसरा कोणीतरी बोलत असल्याचे त्याला ऐकू आले. लाव्रुश्का—डेनिसॉव्हचा लुच्चा नोकर त्याला बिस्किटे, बैल, वाहतूक यांबद्दल काहीतरी सांगत होता. अन्नपुरवठ्याच्या शोधात असताना त्याने काहीतरी पाहिले होते. दूर असलेल्या डेनिसॉव्हचे ओरडणे त्याला ऐकू आले. त्याने दुसऱ्या प्लॅटूनला निघण्याचा हुकूम केला होता. ते कुठे निघाले ते रोस्तॉफला कळेना.

पाच मिनिटांतच डेनिसॉव्ह झोपडीत आला. चाबूक आणि तलवार अडकवून. तो बाहेर पडू लागला तशी रोस्तॉफने त्याला विचारले—' कुठं चालला आहेस ? ' डेनिसॉव्हने रागाने मोघम उत्तर दिले, ' काम निघालं आहे. '

' परमेश्वर आणि सम्राट माझा न्याय करतील, ' बाहेर पडताना डेनिसॉव्ह म्हणाला. रोस्तॉफला कित्येक घोडे दलदली-चिखलातून जाताना ऐकू आले. डेनिसॉव्ह कशासाठी निघाला आहे हे शोधून काढण्याची तसदी रोस्तॉफने घेतली नाही. कोपऱ्यात उबदार वाटत

होते त्यामुळे तो झोपी गेला. संध्याकाळी उठून तो झोपडीच्या बाहेर आला तरी डेनिसॉव्ह परतला नव्हता. हवा निवळली होती. जवळच्या झोपडीत दोन ऑफिसर कडे फेकण्याचा खेळ खेळत होते. चिखलामधे त्यांनी खुंट्यांसाठी मोठे लाल मुळे पुरले होते. रोस्तॉफ त्यांच्या बरोबर खेळू लागला. खेळ चालू असताना त्यांनी पाहिले—मालाची ने-आण करणाऱ्या गाड्या त्यांच्या दिशेने येत होत्या. त्यांच्यामागून कृश घोड्यांवरून पंधरा एक स्वार येत होते.

घोडेस्वारांच्या मागून डेनिसॉव्ह येत होता. सोबत असलेल्या पायदळाच्या दोन ऑफिसरांशी तो बोलत होता. त्याला भेटण्यासाठी रोस्तॉफ पुढे आला.

त्यांतला कुशेव्ह हा लहान बांध्याचा ऑफिसर रागावलेला दिसत होता. तो म्हणत होता, 'कॅप्टन, मी बजावून सांगतो.'

'मी तुम्हाला अगोदरच सांगितलेलं आहे, मी गाड्या जाऊ देणार नाही.'

'कॅप्टन याची सर्व जबाबदारी तुमच्यावर राहील. आपल्याच सैन्यातील मालाची लूट करणं हे बंड आहे. आमच्या सैनिकांना गेले दोन दिवस अन्न मिळालं नाही.'

'माझ्या सैनिकांना तर गेले पंधरा दिवस अन्न मिळालं नाही,' डेनिसॉव्ह म्हणाला.

'हा शुद्ध दरोडा आहे. याबद्दल तुम्हाला शिक्षा होईल.' आवाज चढवीत पायदळाचा ऑफिसर म्हणाला.

एकाएकी भडकून डेनिसॉव्ह ओरडला, 'तू मला सारखी तंबी का देतो आहेस? शिक्षा होणार आहे ती मला, तुला नव्हे.'

'ठीक आहे.' तो अधिकारी म्हणाला. तो मुळीच भ्यायला नव्हता किंवा जागचा हालला नव्हता. 'पुन्हा सांगतो ही डाकूगिरी आहे.'

त्याच्या दिशेने जात डेनिसॉव्ह म्हणाला, 'अजून सुखरूप आहेस तोपर्यंत इथून निघून जा.'

धमकीच्या स्वरात तो ऑफिसर म्हणाला, 'ठीक आहे. ठीक आहे.' त्याने घोड्याला पिटाळले.

घोडेस्वारांनी जो अन्नपुरवठा पळवून आणला होता तो खरे तर पायदळाच्या रेजिमेंट-साठी होता. मालवाहू गाड्यांना सैनिकांचे संरक्षण नसल्याचे लाचुरकाकडून कळताच डेनिसॉव्ह आणि त्याचे घोडेस्वार यांनी अन्नपुरवठा बळजबरीने आणला होता. सैनिकांना मुक्तहस्ताने बिस्किटे वाटण्यात आली. त्यांनी ती इतर स्क्वॅड्रनच्या सैनिकांना दिली.

दुसऱ्या दिवशी डेनिसॉव्हला कर्नलने बोलावले. पसरलेली बोटे डोळ्यांसमोर धरून तो म्हणाला, 'याबाबत माझी दृष्टी अशी आहे, मला काही ठाऊक नाही; मी काही उपाय-योजना करणार नाही. पण मी तुला सल्ला देतो, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जा. कटकटी मिट-विण्यासाठी मोदीखान्यातील अधिकाऱ्यांना भेट. शक्य तर मिळालेल्या अन्नपुरवठ्याची पावती त्यांना दे. तसं झालं नाही तर आणि पायदळाच्या रेजिमेंटच्या नावे अन्नपुरवठा पाठवल्याचं दाखल केलेलं असलं तर मोठ्या कटकटी उद्भवतील, आणि फार वाईट परिणाम होईल.'

त्याची सूचना इमाने इतबारे पाळण्यासाठी डेनिसॉव्ह सरळ वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे गेला.

तो संध्याकाळी आपल्या झोपडीमध्ये परतला. तशा अवस्थेत रोस्तॉफने त्याला कधीही पाहिले नव्हते.

'लुटालूट केली म्हणून लष्करी कोर्ट माझी चौकशी करणार आहे—थोडे आणखी पाणी दे...करू दे लष्करी कोर्टाला चौकशी. हरामखोरांना चांगलं ठोकून काढतो, सम्राटांना जाऊन सांगतो...' तो सारखा बडबडत होता.

तो काय झाले हे सांगण्याइतका सावध झाला. 'मी तिथं पोचल्यावर विचारलं, 'तुमचे प्रमुख कुठं राहतात?' त्यांनी मला ठिकाण दाखवलं. 'थोडा वेळ थांबाल काय?' 'मी महत्त्वाच्या कामासाठी आलो आहे, वीस मैलांवरून आलो आहे, मला थांबायला वेळ नाही. मी आल्याची वर्दी द्या.' त्याचा परिणाम झाला. चोरांचा नायक येऊन उपदेश करू लागला. 'हा दरोडा आहे' तो म्हणाला. तशी मी म्हणालो, 'दरोडेखोर काही आपल्या सैनिकांना खाऊ घालण्यासाठी अन्नपुरवठा घेऊन जात नसतो; तो स्वतःसाठी अन्नपुरवठा पळवतो.' 'आता कृपा करून गप्प बसा.' मी तसं केलं. मग तो म्हणाला, 'मोदीखान्याला पावती लिहून द्या. तरीही मुख्य ठाण्याला या घटनेचा रिपोर्ट आम्ही पाठवू.' मी मोदीखान्याच्या प्रमुखाकडे गेलो. 'टेबलापाशी कोण बसला होता? आमची उपासमार कोण करीत असेल? ओळख बघू.' डेनिसॉव्ह ओरडली. ओरडताना त्यानं भाला असलेल्या हाताची मूठ इतक्या जोरानं टेबलावर आपटली की टेबल जवळजवळ कलंडलं. त्यावरचे पेले पडले. तो टेल्यानिन होता. 'आमची उपासमार करणारे आपणच का?' आणि त्याच्या नाकाडावर एक ठोसा दिला. तो चांगला वर्मी बसला. पुन्हा एक दिला. जोडीला शिव्या दिल्या. मग बडवून काढला. तशी थोडीफार मजा आली. दुष्ट आनंदाने तो हसला, तेव्हा त्याच्या काळ्या मिश्यांखालचे पांढरे दात दिसले. मला त्यानं ओढून बाजूला केलं नसतं तर मी त्याला ठारच मारलं असतं.'

दुसऱ्या दिवशी दुपारी रेजिमेंटचा ॲडज्युटंट गंभीर आणि खिन्न चेहऱ्याने आला. त्याने कर्नलकडून मेजर डेनिसॉव्हला आलेले पत्र खेदपूर्वक दाखवले. त्या पत्रात आदल्या दिवशी झालेल्या घटनेबद्दल विचारणा करण्यात आली होती. ॲडज्युटंट म्हणाला, 'या घटनेचे परिणाम गंभीर होण्याचा संभव आहे. लष्करी कोर्ट चौकशी करणार आहे. लुटालूट आणि शिस्तभंग यावाबत मोठे कडक कायदे आहेत. डेनिसॉव्हला केवळ खालचा हुद्दा देऊन हे प्रकरण मिटलं तरी ते सुदैव म्हणायला हवं.'

मेजर डेनिसॉव्हने अन्नपुरवठा हस्तगत केला. प्यालेल्या अवस्थेत मोदीखान्याच्या प्रमुखांकडे जाऊन काही कारण नसता त्याने त्यांना चोर म्हटले, मारण्याची धमकी दिली, त्याला ते बाहेर नेऊ लागले तेव्हा तो ऑफिसात घुसला आणि त्याने दोघांवर हल्ला केला. एकाच्या हाताला चांगलाच मार दिला. असा आरोप ठेवण्यात आला होता.

झाल्या घटनेबद्दल डेनिसॉव्ह बेफिकिरीने बोलत होता. रोस्तॉफ त्याला चांगला ओळखत होता. त्यामुळे तो दाखवत नसला तरी त्याला मनातल्या मनात लष्करी कोर्टाची भीती वाटते आहे,

त्यामुळे होणाऱ्या भयानक परिणामांच्या विचाराने तो अस्वस्थ झाला आहे हे रोस्तॉफला कळून चुकले. दररोज कागदपत्रे येऊ लागली. कोर्टाकडून नोटिसा येऊ लागल्या. डेनिसॉव्हने आपले पथक आपल्या हाताखालच्या ज्येष्ठ ऑफिसरच्या ताब्यात द्यावे आणि एक मे रोजी भांडणाच्या चौकशीसाठी मोदीखान्याच्या ऑफिसात डिव्हिजनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर हजर व्हावे असे समन्स त्याच्यावर बजावले गेले. कोसॅक घोडेस्वारांची रेजिमेंट आणि हुजारांची दोन स्क्वॉड्रन घेऊन प्लॅटाव्हने आदल्या दिवशी शत्रूची टेहळणी करण्याचे काम सुरू केले होते. डेनिसॉव्ह विचकत विचकत का होईना मोठ्या शौर्याने आघाडीवर पुढच्या रांगेत होता. फ्रेंच गोलंदाजांनी मारलेली एक गोळी त्याच्या पोटरीत घुसली. कदाचित इतक्या छोट्या जखमेमुळे इतर वेळी डेनिसॉव्हने रेजिमेंट सोडली नसती पण आता त्याने त्या जखमेचा फायदा घेतला. जखमेमुळे आपण राहू शकत नाही असे वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिलगिरीपूर्वक कळवून तो हॉस्पिटलात दाखल झाला.

रोस्तॉफने तात्पुरत्या युद्धविरामाचा फायदा घेतला. हॉस्पिटलमध्ये असलेल्या डेनिसॉव्हला भेटण्यासाठी रजा मिळविली.

हॉस्पिटल रशियातील ज्या एका छोट्या गावात होते ते गाव रशियन आणि फ्रेंच सैनिकांनी दोन वेळा लुटले होते.

हॉस्पिटलची इमारत दगडी होती. आवारामध्ये कुंपणाचे भाग पडलेले होते, खिडक्यांच्या चौकटी आणि मोडलेली तावदानेही पडली होती. आवारामध्ये कित्येक सैनिक सूर्यप्रकाश घेत बसले होते, काही फिरत होते, त्यांच्या जखमांवर पट्ट्या बांधलेल्या होत्या. त्यांचे चेहरे सुजलेले आणि फिकट होते.

रोस्तॉफ दाराशी पोचला तोच त्याला हॉस्पिटलची कुबट घाण जाणवली. सडणाऱ्या मासाची दुर्गंधी आली. जिन्यावर तोंडात सिगार असलेला रशियन सैन्याचा डॉक्टर त्याला भेटला. त्याच्यामागून प्रशिक्षित मदतनीस रशियन येत होता.

डॉक्टर मदतनिसाला म्हणत होता, ' मी एकाच वेळी कुठं कुठं म्हणून जाऊ ? तुला योग्य वाटेल ते कर, काही केलंस तरी सारखंच. '

डॉक्टरने जिना चढणाऱ्या रोस्तॉफला पाहिले आणि म्हटले, ' महाशय, इथं कशाला आला आहात ? हे साथीच्या रोगाचे हॉस्पिटल आहे. इथे विषमज्वराचे रोगी आहेत. आत कोणी आला की तो दगावलाच. आम्ही दोघेच–मॅकीव्ह ( त्याने मदतनिसाकडे बोट दाखविले ) आणि मी काय ते आपल्या पायांवर उभे आहोत. आमच्यापैकी पाच डॉक्टर केव्हाच खलास झाले. जो कोणी नवीन माणूस येतो तो आठवड्याच्या आत आटोपतो. '

रोस्तॉफने त्यांना सांगितले, ' मला घोडदलाच्या डेनिसॉव्हला भेटायचं आहे. जखमी

झाल्यानंतर तो इथंच दाखल आहे.'

'मला ठाऊक नाही आणि मी सांगूही शकत नाही. मला एकट्याला तीन हॉस्पिटलांतील चारशेहून अधिक रोग्यांवर देखरेख ठेवावी लागते हे लक्षात घे. प्रशियन बायका उदारपणाने आम्हाला कॉफी आणि जखमा बांधण्याचं सामान पाठवतात म्हणून बरं आहे. महिन्याला दोन पौंड कॉफी नसती तर आम्ही काही जिवंत राहिलो नसतो.' डॉक्टर हसून पुढे म्हणाला, 'चारशे रोगी आहेत. दररोज आणखी येतच आहेत. आताशा चारशे रोगी आहेत ना?' त्याने वळून मदतनिसाला विचारले.

रोस्तॉफ पुन्हा म्हणाला, 'मॉलिटन येथे जखमी झालेल्या मेजर डेनिसोव्हला भेटायचं आहे.'

डॉक्टर म्हणाला, 'हो, असा माणूस होता खरा, तो मेलेला असेल. तरीपण पाहतो, माझ्याकडे याद्या आहेत.

'अधिकाऱ्यांच्या विभागात गेलात तर तुम्ही स्वतः पाहू शकाल.'

रोस्तॉफ आणि मदतनीस कॉरिडॉरमधे गेले. हॉस्पिटलात इतकी दुर्गंधी येत होती की त्या अंधाऱ्या कॉरिडॉरमधून जाताना रोस्तॉफने आपले नाक दाबून धरले; पुढे सरकण्यासाठी जोर यावा म्हणून त्याला थांबणे भाग पडू लागले.

उजवीकडच्या बाजूचा दरवाजा उघडला आणि त्यातून कुबड्या घेतलेला, पिवळया कांतीचा कृश मनुष्य रखडत रखडत बाहेर आला. त्याच्या पायात काही नव्हते. अंगात केवळ गंजी-फ्रॉक होता. दरवाजाला रेलून तो येणाऱ्या लोकांकडे उत्सुक नजरेने बघत होता. रोस्तॉफने दरवाजातून डोकावून पाहिले. आजारी आणि जखमी माणसे जमिनीवर वा गवताच्या गादीवर वा ओव्हरकोट पसरून त्यावर पडली होती.

रोस्तॉफ सैनिकांच्या विभागात शिरला. कॉरिडॉरमधून येताना त्याला दुर्गंधीचा सराव झाला होता. पण इथली दुर्गंधी कितीतरी तीव्र होती आणि ती वेगळ्या प्रकारची होती. सगळ्या दुर्गंधीचा उगम इथे असल्याचे जाणवत होते. खिडकी मोठी असल्यामुळे त्या प्रशस्त खोलीमध्ये भरपूर उजेड पडला होता. दोन्ही बाजूंना भिंतीकडे डोकी करून आजारी आणि जखमी सैनिक पडले होते. या दोन रांगांमध्ये जाण्यासाठी वाट होती. बऱ्याचशा सैनिकांची शुद्ध हरपली होती, बाहेरून कुणी आला तरी त्यांना कळत नव्हते. शुद्धीवर असलेले सैनिक उठत होते वा आपले कृश पिवळे चेहरे वर करीत होते. सगळ्यांच्या मुद्रेवर तेच भाव दिसत होते. कुणीतरी आपल्याला मदत करील अशी आशा त्यांना वाटत होती. निरोगी माणसाबद्दल त्यांना हेवा वाटत होता.

रोस्तॉफकडे त्यांनी पाहिले तेव्हा त्यांच्या चेहऱ्यांवर हेच भाव होते. रोस्तॉफ खोलीच्या मध्यभागी गेला. तेथून त्याने बाजूच्या खोल्यांत डोकावले. दोन्ही बाजूंना सैनिक अशाच तऱ्हेने पडले होते. भोवताली पाहत तो काही न बोलता उभा राहिला. असे दृश्य पाह्यला मिळेल असे त्याला कधीही वाटले नव्हते. त्याच्यासमोर मध्यभागाच्या मोकळ्या भागापलीकडे नुसत्या जमिनीवर एक आजारी सैनिक पडला होता. तो बहुधा कोसॅक असावा. कारण त्याचे केस

बेसिनच्या आकारासारखे वर्तुळाकार कापलेले होते. हा कोसॅक आपले दांडगे हातपाय पसरून उताणा पडला होता. त्याचा लाल चेहरा काळवंडला होता. त्याचे डोळे इतके खोल गेले होते की त्यांचा पांढरा भाग तेवढा दिसत होता. अजूनही लालबुंद असणाऱ्या त्याच्या हातापायांवरील धमन्या जाड दोरीसारख्या टचटचीत दिसत होत्या. जमिनीवर आपले डोके आदळीत तो काही शब्द पुन्हा पुन्हा उच्चारीत होता.

रोस्तॉफला तिथून जायचे होते, पण उजव्या बाजूकडून कोणीतरी आपल्याकडे अपेक्षेने पाहात आहे असे त्याला वाटले. त्याने त्या दिशेने वळून पाहिले. जवळजवळ कोपऱ्यामधे ओव्हर-कोटवर एक वृद्ध सैनिक बसला होता. त्याची मुद्रा उग्र होती. चेहरा पिवळा होता, त्याचा अगदी सांगाडा झाला होता आणि वाढलेली दाढी पांढरीशुभ्र होती. तो टक लावून एक-सारखा रोस्तॉफकडे पाहात होता. जवळचा मनुष्य रोस्तॉफकडे बोट दाखवून वृद्ध सैनिकाच्या कानात काहीतरी कुजबुजत होता. रोस्तॉफला वाटले, त्या वृद्ध सैनिकाला काहीतरी सांगायचे असेल. रोस्तॉफ जवळ गेला तेव्हा त्याला दिसले—त्या वृद्ध सैनिकाने एक पाय दुमडून अंगा-खाली घेतला होता, दुसरा पाय गुडघ्याच्या वरपासून कापून टाकण्यात आला होता. वृद्ध सैनिकाच्या दुसऱ्या बाजूला काही अंतरावर मान मागे टाकून हालचाल न करता एक तरुण सैनिक पडला होता. त्याच्या फेंदाड्या नाकावर आणि फिकट तपकिरी डाग असलेल्या चेहऱ्यावर मेणासारखा फटफटीतपणा पसरला होता. त्याचे मिटलेले डोळे खोल गेले होते. त्या फेंदाड्या नाकाच्या सैनिकाकडे नजर जाताच रोस्तॉफचे अंग शहारले.

'महाराज, किती वेळा विनवलं आम्ही.' तो वृद्ध सैनिक बोलू लागला तेव्हा त्याचा खालचा जबडा थरथरू लागला. 'तो पहाटे मरण पावला आहे. आम्ही देखील माणसं आहोत. कुत्री-मांजरं नव्हत.'

'मी आता त्याची व्यवस्था करतो, आता त्याला घेऊन जायला सांगतो, आत्ता सांगतो,' मदतनीस घाईघाईने म्हणाला.

'चला महाराज, बाहेर पडू.'

'चल,' रोस्तॉफ घाईने म्हणाला. त्याने नजर खाली उडवली, त्याचे शरीर अवघडून गेले. कानउघाडणी करणाऱ्या आणि हेवा असलेल्या नजरा चुकवण्याचा प्रयत्न करीत त्या रांगां-मधून रोस्तॉफ बाहेर सटकला.

मदतनिसाने रोस्तॉफला कॉरिडॉरमधून ऑफिसरांच्या वॉर्डमध्ये नेले. परस्परांना दरवाजांनी जोडलेल्या त्या तीन खोल्या होत्या. त्यांत बिछाने टाकलेल्या खाटा होत्या. ऑफिसर त्यावर बसले होते, कुणी लोळत होते. कुणी हॉस्पिटलचा ड्रेसिंग-गाउन घालून फिरत होते. ऑफिसरांच्या वॉर्डमधे रोस्तॉफला भेटलेला मनुष्य कृश लहानखोर बांध्याचा होता. त्याचा एक हात गेलेला होता. पहिल्याच खोलीत तो फिरत होता. त्याच्या डोक्याला नाइटकॅप होती आणि त्याने हॉस्पिटलचा ड्रेसिंग-गाउन घातला होता. तो छोटासा पाइप दातात धरून ओढत होता. त्याला आपण कुठे पाहिले ते रोस्तॉफ आठवू लागला.

मग तोच लहान बांध्याचा माणूस म्हणाला, ' आपण इथं भेटावं अशी परमेश्वराची इच्छा दिसते. माझं नाव टुशिन. शॉग्रबेननंतर मीच तुला घेऊन आलो. तुला आठवत असेल ? ' आपली बिनहाताची बाही दाखवीत, स्मित करीत तो म्हणाला, ' त्यांनी थोडासा लचका उडवला. हा बघ एवढा. ' रोस्तॉफला कोण पाहिजे हे कळताच तो म्हणाला, ' तू व्हॅसिली दिमित्र्येविच डेनिसॉव्हला भेटण्यासाठी आला आहेस का ? तुम्ही एकत्र राहत होता. नव्हे ? तो या बाजूला आहे...इकडे.' त्याने रोस्तॉफला दुसऱ्या खोलीत नेले.

डेनिसॉव्ह दुपारचे बारा वाजले तरी अजून अंथरुणात होता. त्याने गळ्यापर्यंत चादर ओढून घेतली होती.

डेनिसॉव्हला झालेली जखम छोटीशी होती. सहा महिने लोटले होते तरी,ती भरून आली नव्हती. हॉस्पिटलातील इतर रोग्यांच्या चेहऱ्याप्रमाणे त्याचा चेहरा सुजला होता, पिकुडला होता, पण ही गोष्ट रोस्तॉफला जाणवली नाही. आपल्याला बघून डेनिसॉव्हला आनंद झाल्याचे त्याला दिसले नाही. त्याने बळेबळे हासू आणले आहे ही गोष्ट मात्र त्याला जाणवली. रेजिमेंट अगर युद्धाची प्रगती यांबद्दल डेनिसॉव्हने एक अक्षर विचारले नाही. रोस्तॉफ त्याबद्दल बोलू लागला पण डेनिसॉव्हने त्याच्याकडे लक्ष दिले नाही.

रेजिमेंट आणि हॉस्पिटलच्या भिंतीबाहेरील मोकळे जीवन यांबद्दलचे बोलणे त्याला आवडत नाही हे रोस्तॉफला कळून चुकले. डेनिसॉव्ह ते जुने जीवन विसरण्याचा प्रयत्न करीत असल्याचे त्याला जाणवले. मोदीखान्याच्या अधिकाऱ्याशी झालेल्या भांडणात त्याला गोडी दिसली. रोस्तॉफने त्याबाबत काय झाले अशी चौकशी करताच त्याने लागलीच कमिशनरकडून मिळालेली पत्रे आणि आपण तयार केलेल्या उत्तराची कच्ची प्रत उशीखालून काढून दिली. आपण लिहिलेले उत्तर वाचून दाखवताना त्याच्यात आवेश संचारत होता. आपण आपल्या शत्रूंना बोचऱ्या उपरोधाने कसे लिहिले आहे याकडे तो रोस्तॉफचे खास लक्ष वेधून घेत होता. बाहेरच्या मोकळ्या जगातून नव्याने आलेल्या रोस्तॉफच्या भोवती डेनिसॉव्हचे हॉस्पिटलातील दोस्त जमले होते. ते डेनिसॉव्ह पत्र वाचू लागताच हळूहळू दूर पांगू लागले. त्यांनी अनेक वेळा डेनिसॉव्हकडून गोष्ट ऐकलेली असावी आणि त्यांना तिचा वीट आलेला असावा हे रोस्तॉफने त्यांच्या मुद्रेवरून ताडले. त्याच्या अगदी जवळ असलेला लठ्ठ ऊलान खिन्नपणे कपाळाला आठ्या घालीत आणि पाइप ओढत गवती बिछान्यावर बसून राहिला. मान हलवून नाखुषी दाखवीत एक हाताचा टुशिन ऐकू लागला. डेनिसॉव्ह वाचीत असताना मध्येच ऊलान म्हणाला, ' माझं म्हणणं एवढंच...' मग रोस्तॉफकडे वळून तो म्हणाला, ' त्यानं सम्राटाकडे क्षमायाचनेचा एक अर्ज तेवढा पाठवला पाहिजे. आता थोड्याच दिवसांत मोठमोठी बक्षिसं देणार आहेत असं म्हणतात. सम्राट खात्रीने क्षमा करील. '

' मी ? सम्राटाकडे क्षमेची याचना करू ? ' डेनिसॉव्हने आपल्या आवाजात पूर्वीचा जोष आणि चीड आणण्याचा प्रयत्न केला. पण त्याच्या चिडण्यात काही दम दिसत नव्हता. ' कशासाठी म्हणून क्षमा मागू ? मी दरवडेखोर असतो तर मी दयेचा अर्ज केला असता—

मला लुटारू ठरविण्यासाठी बोलावून घेतात. त्यांना माझी चौकशी करू दे. मी कुणालाच डरत नाही. मी माझ्या सम्राटाची आणि देशाची इमानेइतबारे सेवा केली. मी काही चोर नव्हे. मला खालच्या हुद्द्यावर ढकलणार आहेत? हं! मी त्यांना सरळ टणकावून सांगणार... हे बघ. मी त्यांना लिहिलं आहे, ' जर मी सरकारी मालमत्ता लुटली असेन '...'

ड्रुशिन म्हणाला, ' त्यानं चांगल्या तऱ्हेनं पत्र लिहिलं आहे यात वाद नाही. व्हॅसिली दिमित्र्येविच, मुद्दा दुसराच आहे. हात जोडणं हाच एक मार्ग आहे. ' रोस्तॉफकडे वळून ड्रुशिन म्हणाला, ' हा मार्ग दिमित्र्येविचला पसंत नाही. ऑडिटरनं त्याला सांगितलं आहे, ' तुझ्या दृष्टीनं बाब गंभीर आहे.' '

' माझ्या दृष्टीनं गंभीर असली तरी हरकत नाही. ' डेनिसॉव्ह म्हणाला.

ड्रुशिन बोलत होता, ' ऑडिटरनं तुला अर्ज लिहून दिला आहे. तू त्याच्यावर सही कर आणि रोस्तॉफमार्फत धाडून दे. वरिष्ठ अधिकाऱ्याकडे रोस्तॉफचं निःसंशय वजन असेल. यापेक्षा अधिक चांगली संधी तुला मिळणार नाही.'

' मी आधीच सांगितलं आहे. मी लांगूलचालन करणार नाही.' डेनिसॉव्हने मधेच म्हटले आणि पुनश्च उत्तर वाचून दाखवायला सुरुवात केली.

ड्रुशिन आणि इतर ऑफिसरांनी सुचवलेला मार्ग योग्य असल्याचे रोस्तॉफला मनोमन पटले पण डेनिसॉव्हचे मन वळवण्याचा प्रयत्न करण्याचे धाडस त्याला झाले नाही. डेनिसॉव्हला काही मदत करता आली असती तर त्याला आनंद झाला असता. त्याचा हट्टी आणि रोखठोक स्वभाव ठाऊक असल्यामुळे रोस्तॉफ गप्प राहिला.

डेनिसॉव्हने चावे घेणाऱ्या उत्तराचे वाचन तासाभराने संपवले, तेव्हा रोस्तॉफ काही बोलला नाही. पुन्हा गोळा झालेल्या डेनिसॉव्हच्या मित्रांच्या सहवासात रोस्तॉफने उरलेला दिवस अतिशय निराश मनाने घालवला. त्याने स्वतःला ठाऊक असलेली माहिती त्यांना सांगितली, त्यांच्या गोष्टी ऐकून घेतल्या. संध्याकाळपर्यंत डेनिसॉव्ह काही न बोलता खिन्नपणे बसून होता.

रात्र पडू लागली तसा रोस्तॉफ जायला उठला. निरोप घेताना त्याने डेनिसॉव्हला म्हटले, ' तुझं काही काम असेल तर सांग. '

तशी डेनिसॉव्ह म्हणाला, ' जरा थांब.' त्याने वळून ऑफिसरांकडे पाहिले, उशीखालून कागदपत्रे काढली; खिडकीपाशी लेखणीदौत असलेले टेबल होते तिथे तो बसला आणि लिहू लागला.

' दगडी भिंतीवर डोके आदळून घेण्यात काही लाभ नाही, ' खिडकीजवळून रोस्तॉफकडे येऊन त्याला एक मोठे पाकिट देत तो म्हणाला. त्या पाकिटात सम्राटांना उद्देशून ऑडिटरने त्याच्यासाठी लिहिलेले पत्र होते. त्या पत्रात मोदीखान्यातील उणिवांचा जराही उल्लेख न करता डेनिसॉव्हने केवळ दयेची याचना केली होती. ' हे पत्र दे. मला वाटतं...' त्याला पुढे बोलता आले नाही. बळेबळेच त्याने क्षीण हास्य केले.

तेरा जून रोजी फ्रेंच सम्राट आणि रशियन सम्राट यांची टिल्झिट येथे भेट झाली. टिल्झिट येथे जो परिवार राहणार होता त्यामधे आपला समावेश करा अशी विनंती बोरिस द्रबेत्स्कॉयने आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना केली.

तेव्हा जनरलने त्याला आपल्याबरोबर घेतले. सम्राटाच्या भेटीच्या दिवशी जे थोडे लोक नीमननदीच्या तीराबर जमले होते, त्यात बोरिस होता. सम्राटांच्या नावाची आद्याक्षरे असलेला ध्वज असलेला तराफा त्याला दिसला. पलीकडच्या तीरावरून फ्रेंच संरक्षकदलाच्या सैनिकांतून नेपोलिअनला पुढे सरकताना त्याने पाहिले. नीमननदीच्या तीरावरील पथिकाश्रमात शांतपणे बसून नेपोलिअनची मार्गप्रतीक्षा करणाऱ्या सम्राट अलेक्झांडरचा विचारमग्न चेहरा त्याने पाहिला. त्याने दोन्ही सम्राटांना होडीत चढताना पाहिले. नेपोलिअन आधी तराफ्यावर चढला आणि पुढे होऊन त्याने अलेक्झांडरला आपला हात दिला. मग दोघेही सम्राट शामियान्यात शिरून दिसेनासे झाले. दोन्ही सम्राटांच्या परिवारातील निवडक व थोडी माणसे होती. त्यामुळे टिल्झिट येथे होणाऱ्या सम्राटांच्या भेटीच्या वेळी हजर असणे नोकरीतील यश व बढती यांना महत्त्व देणाऱ्या व्यक्तींच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे होते. भेटीला उपस्थित रहाण्याचा लाभ मिळाला तेव्हा रोस्तॉफला वाटले—यापुढे आपल्या नोकरीत पूर्णपणे शाश्वती आली. सर्वांना आता त्याचे केवळ नाव ठाऊक झाले नव्हते, सर्वांनी त्याला पाहिले होते, त्याच्याशी परिचय झाला होता. दोन वेळा तर काही कामानिमित्त त्याला सम्राटांची भेट घ्यायला धाडण्यात आले होते. त्यामुळे सम्राट त्याला व्यक्तिशः ओळखू लागले आणि दरबारचे लोक नवा म्हणून त्याच्यापासून पूर्वी फटकून वागत असत, तसे वागण्याचे बंद झाले.

बोरिस दुसरा ॲडज्युटंट झिलिन्स्की नावाचा पोलिश काउंट याच्याबरोबर राहात होता. झिलिन्स्कीचे शिक्षण पॅरिसमध्ये झालेले होते. तो श्रीमंत होता. फ्रेंचांबद्दल त्याच्या मनात गाढ भक्तिभाव होता. टिल्झिट येथे त्यांचा मुक्काम असेपर्यंत जवळजवळ दररोज फ्रेंच संरक्षक-दलाचे सैनिक आणि फ्रेंच वरिष्ठ ऑफिसर झिलिन्स्की आणि बोरिस यांच्याकडे सकाळचा नाश्ता करीत आणि खाना घेत.

ज्याच्याबरोबर बोरिस राहात होता त्या झिलिन्स्कीने चोवीस जूनच्या रात्री आपल्या परिचित फ्रेंचांना खाना दिला. ह्या खान्याला अनेकजण हजर होते. प्रमुख पाहुणा म्हणून नेपोलिअनचा एक ॲडज्युटंट, फ्रेंचांच्या संरक्षकदलाचे कित्येक ऑफिसर, जुन्या वरिष्ठ फ्रेंच कुटुंबातला एक तरुण, नेपोलिअनचा खाजगीतील एक नोकर. लोकांनी ओळखू नये म्हणून रोस्तॉफने त्या रात्रीच्या अंधाराचा फायदा घेतला. त्या रात्री तो साध्या पोषाखात टिल्झिटला येऊन झिलिन्स्की आणि बोरिस यांच्या निवासस्थानी आला.

नेपोलिअन आणि फ्रेंच सैनिक यांबाबत वरिष्ठ अधिकारी आणि बोरिस यांच्या भावना

एकदम बदलून गेल्या होत्या. आता त्यांना ते शत्रू न वाटता मित्र वाटत होते. रोस्तॉफला मात्र इतर सैनिकांप्रमाणे असे बिलकुल वाटत नव्हते. सैन्यातील प्रत्येकाला अजूनही फ्रेंचांबद्दल व नेपोलिअनबद्दल द्वेष, भीती आणि तिरस्कार वाटत होता. नेपोलिअनला कैद केल्यावर त्याला सम्राट म्हणून वागवायचे का गुन्हेगार म्हणून वागवायचे यावरून अगदी अलीकडे रोस्तॉफने फ्रेंचव्हच्या घोडदलातील ऑफिसरशी वाद घातला होता. फ्रेंच सैनिकांच्या गणवेषाकडे तो आपल्या हद्दीवरून किती वेगळ्या दृष्टीने पाहात असे. आता त्याच गणवेषातल्या फ्रेंच ऑफिसरांना बोरिसच्या निवासस्थानी पाहताच त्याला किती विचित्र वाटले! शत्रूला पाहताच त्याच्या मनात जी युद्धाची, वैराची भावना निर्माण होई तीच भावना फ्रेंच माणसे पाहताच निर्माण झाली. दारातच राहून त्याने रशियन भाषेत द्रबेत्स्कॉयची चौकशी केली. बाहेर वेगळा आवाज ऐकू आला म्हणून बोरिस बाहेर आला आणि त्याची भेट झाली. रोस्तॉफला त्याने ओळखले. त्याच क्षणी त्याची मुद्रा संत्रस्त झाली.

तरीपण स्मित करीत त्याच्या जवळ येत तो म्हणाला, 'अरे, रोस्तॉफ का? छान–फार छान.'

'मला वाटतं मी भलत्या वेळी आलो आहे. मी यायला नको होतं, पण काम महत्त्वाचं आहे,' रोस्तॉफ थंडपणे म्हणाला.

बोरिसच्या चेहऱ्यावरील संत्रस्तता नाहीशी झाली होती. विचार करून कसे वागावे हे त्याने ठरवले असावे. लक्षात येईल इतक्या शांतपणे त्याने रोस्तॉफचे दोन्ही हात हाती घेतले आणि त्याला जवळच्या खोलीत नेले. पाहुण्यांना त्याचा परिचय करून दिला. त्याचे नाव सांगितले. तो साधा नागरिक नसून घोडदळातील ऑफिसर आहे हे सांगायला तो विसरला नाही. रोस्तॉफने कपाळाला आठ्या घालीत फ्रेंचांकडे पाहिले, नाखुषीने झुकून प्रणाम केला आणि तो मुकाट राहिला.

अनोळखी रशियन बाहेरून आपल्या गोटात आल्याचे झिलिन्स्कीला आवडले नाही हे स्पष्ट दिसत होते. तो रोस्तॉफशी एक चकार शब्द बोलला नाही. नवागतामुळे लोकांवर निर्माण झालेले दडपण बोरिसने न कळल्यासारखे केले. त्याने भावना दडवून सौजन्याने रोस्तॉफचे स्वागत केले होते. त्याच वृत्तीने त्याने संभाषणात चैतन्य ठेवण्याची शिकस्त केली. एक फ्रेंच ऑफिसर फ्रेंचांच्या खास अदबीने घुम्या रोस्तॉफकडे वळून म्हणाला, 'कदाचित तुम्ही सम्राटांना भेटण्यासाठी टिल्झिटला आला असाल?'

'छे, मी माझ्या कामासाठी आलो आहे.' रोस्तॉफ तुटकपणे बोलला. बोरिसच्या मुद्रेवरील नाराजी दिसल्यापासून रोस्तॉफ चिडलेलाच होता. चिडलेल्या माणसाला वाटावे तसे त्याला वाटत होते—प्रत्येकजण आपल्याकडे वैऱ्यासारखा पाहात आहे, प्रत्येकाच्या वाटेत आपण अडथळ्यासारखे आहोत. खरे म्हणजे प्रत्येकाला त्याची अडचण होत होती. पुन्हा सगळेजण संभाषणात भाग घेऊ लागले तेव्हा फक्त त्यालाच सामील होता आले नाही. त्याच्याकडे पाहुण्यांचे डोळे वळले. ते जणू त्याला विचारीत होते—'इथे तू कशासाठी बसला आहेस?' रोस्तॉफ उठून बोरिसकडे गेला.

'तुम्हाला माझी अडचण होत असेल. माझ्या कामाबद्दल थोडं बोलू. म्हणजे मी जातो.' तो हळू आवाजात बोलला.

'अडचण बिलकूल नाही. तू दमला असशील तर माझ्या खोलीत पड आणि विश्रांती घे.'

'खरं म्हणजे...'

बोरिस झोपत असे त्या छोट्या खोलीत ते गेले. उभ्या उभ्याच रोस्तॉफ जणू बोरिसचा अपराध असल्यागत चिडून बोलू लागला. डेनिसॉव्हवरील संकटाबद्दल बोलून त्याने विचारले, 'तुझ्या जनरलमार्फत तू डेनिसॉव्हसाठी सम्राटांकडे रदबदली करशील का?' बोरिस पायावर पाय ठेवून बसला होता आणि आपली डावी बोटे उजव्या बोटांवर मारीत, कनिष्ठ अधिकाऱ्याने केलेल्या रिपोर्टकडे जनरलने लक्ष द्यावे तसे रोस्तॉफचे बोलणे ऐकत होता. कधी दूर पाहात होता, कधी रोस्तॉफकडे पूर्वीच्याच भाव दडवणाऱ्या नजरेने रोखून पाहात होता. प्रत्येक वेळी रोस्तॉफ बेचैन होऊन नजर खाली वळवीत होता.

'तू सांगतोस तसं काही घडलेलं मी ऐकलं आहे. अशा बाबतीत सम्राट अतिशय कडक आहेत हे मला ठाऊक आहे. सम्राटांकडे हे प्रकरण नेलं नाही तर बरं होईल असं माझं मत आहे. मला वाटतं, सरळ कमांडरला अर्ज केला तर बरं होईल...खरं म्हणशील तर माझ्या मते...'

'तुझ्या मते काहीच करू नये. तुला त्याची पर्वा नाही, असं सरळ म्हण ना.' बोरिसकडे न पाहता रोस्तॉफ ओरडला.

बोरिसने स्मित केले.

'उलट मी मला शक्य होईल ते करीन. फक्त माझ्या मते...'

रोस्तॉफ टिल्झिटला आला तो दिवस डेनिसॉव्हच्या वतीने मध्यस्थी करायला अत्यंत अयोग्य होता. तो साध्या वेषात होता, खेरीज परवानगीशिवाय टिल्झिटला आला होता, त्यामुळे जनरलला जाऊन भेटणे अशक्य होते. बोरिसची इच्छा असती तरीही त्याला रोस्तॉफ आला त्याच्या दुसऱ्या दिवशी जनरलला भेटता आले नसते. त्या दिवशी म्हणजे २७ जून रोजी शांततेच्या प्राथमिक बाबींवर सह्या झाल्या. सम्राटांनी परस्परांना किताब दिले : अलेक्झांडरला 'लीजन ऑफ् ऑनर' हा किताब मिळाला. नेपोलिअनला पहिल्या दर्जाचा 'ऑर्डर ऑफ् सेंट अॅन्ड्री' हा किताब दिला गेला. फ्रेंच संरक्षकदलाच्या बटालिअनने त्रिओब्रेझेन्स्की बटालिअनला खाना देण्यासाठी तो दिवस ठरवला होता.

या भोजनसमारंभास दोन्ही सम्राट उपस्थित राहणार होते. निकोलाय रोस्तॉफ फ्रेंच माणसे आणि त्यांचे गणवेष यांकडे पाहात, रशियन व फ्रेंच सम्राटांची निवासस्थाने आणि शहरातील रस्ते न्याहाळीत भटकू लागला. त्याला बाजारपेठेतल्या मधल्या चौकात भोजन-

समारंभाची तयारी चाललेली दिसली, रस्तोरस्ती पडदे लावले होते, त्यावर A आणि N ही प्रचंड आद्याक्षरे काढली होती, रशियन व फ्रेंच राष्ट्रध्वज उभारले होते. खिडक्याखिडक्यांवर देखील ध्वज व आद्याक्षरे दिसत होती.

' मला मदत करावी असं बोरिसला वाटत नाही, मीदेखील त्याच्याकडे याचना करणार नाही. आता त्याचे आणि माझे संबंधच तुटले. पण काही झालं तरी मी डेनिसॉव्हसाठी माझी शिकस्त करीन, मुख्य म्हणजे सम्राटांना पत्र मिळेल याची व्यवस्था करीन आणि मगच इथून जाईन. सम्राट तर इथंच आहेत.' रोस्तॉफ आता नकळत अलेक्झांडरच्या निवासस्थानाकडे आला होता.

प्रवेशद्वाराशी खोगीर चढवलेले घोडे उभे होते. परिवारातील माणसे त्यांवर स्वार होत होती. लवकरच बाहेर येणाऱ्या सम्राटांसाठी ते तयार होत होते हे स्पष्ट होते. रोस्तॉफचे विचारचक्र सुरू झाले. ' आता कोणत्याही क्षणाला सम्राटांचं दर्शन होईल. प्रत्यक्ष भेटून पत्र देता आले आणि सगळं सांगता आलं तर.. सम्राटांना कोणाची बाजू सत्य आहे ते समजेल. त्यांच्याहून अधिक न्याय देणारा आणि अधिक उदार कोण असणार ! मी इथं आलो म्हणून मला त्यांनी पकडलं तर काय बिघडणार आहे ?' निवासस्थानात शिरणाऱ्या ऑफिसरला पाहून त्याला वाटलं—' लोक तर आत जाताहेत.'

आपल्याकडे वळलेल्या चौकस नजरांकडे लक्ष न देता रोस्तॉफ जिना चढू लागला.

' तुम्ही कोणाला शोधत आहात ? ' कुणीतरी विचारले.

' मला अर्ज द्यायचा आहे—सम्राटांना अर्ज द्यायचा आहे.' थरथरत्या आवाजात रोस्तॉफ बोलला.

' अर्ज असेल तर तो ड्यूटीवर असलेल्या ऑफिसरकडे द्या. द्या इकडे जा.' पण तिथल्या नोकराने त्याला पाहताच ऑफिसरच्या खोलीचा दरवाजा उघडला तसा तो आत शिरला.

खोलीमध्ये ठेंगण्या बांध्याचा दणकट प्रकृतीचा तिशीचा पुरुष शेजारच्या खोलीतील कुणा व्यक्तीशी बोलत होता.

' बांधा छान आहे आणि ऐन ज्वानीत आहे.' तो आणखी काही बोलणार होता पण रोस्तॉफला पाहताच थांबला. त्याच्या कपाळावर आठ्या उमटल्या.

' काय हवं आहे ? अर्ज आणलाय का ?'

' कोण आहे ? ' जवळच्या खोलीतून पृच्छा झाली.

' आणखी एक अर्ज.'

' त्यांना नंतर यायला सांगा. मग थेट आपल्याकडे भेटायला सांग. आता आपणाला निघालं पाहिजे.'

' आज नाही, नंतर....उद्या ..आज फार उशीर झालाय्.'

रोस्तॉफ मागे फिरला. तो बाहेर पडणार होता तेवढ्यात त्या माणसाने हटकले, ' कोणाकडून आलात ? तुम्ही कोण ?'

' मी मेजर डेनिसॉव्हकडून आलो आहे ' रोस्तॉफ उत्तरला.

' तुम्ही कोण ?—ऑफिसर आहात का ? '

' मी लेफ्टनंट....काउंट रोस्तॉफ. '

' उद्धटपणाची कमाल आहे. अर्ज योग्य मार्गानं रवाना कर. चला निघा इथून. ' एवढे बोलून तो मनुष्य नोकराने दिलेले कपडे अंगात चढवू लागला.

रोस्तॉफ पुन्हा दिवाणखान्यात आला. एवढ्या वेळात तिथे कितीतरी ऑफिसर आणि जनरल जमले होते. सर्वांनी गणवेष चढविलेला होता. आता त्याला त्यांच्यामधून वाट काढीत जायचे होते.

रोस्तॉफ आपल्या अविचारी साहसाला दोष देऊ लागला. त्या निवासस्थानी भपकेदार पोषाख घालून जमलेल्या सम्राटाच्या परिवारातून तो नजर खाली वळवून बाहेर पडू लागला. तेवढ्यात परिचित आवाजात हाक ऐकू आली. कुणी तरी हाताने त्याला थांबवले.

' महाशय, इथं फ्रॉककोटमधे कशासाठी आला आहात ? ' तो घोडदलाचा जनरल होता. ह्या मोहिमेमध्ये त्याने सम्राटाची खास मर्जी संपादन केली होती. पूर्वी ज्या डिव्हिजन-मध्ये रोस्तॉफ नोकरीला होता ती डिव्हिजन ह्याच्या ताब्यात होती.

भ्यालेला रोस्तॉफ काहीतरी सबबी सांगू लागला. पण विनोदी जनरलचा चांगुलपणा लक्षात येताच त्याला त्याने एका बाजूस घेऊन संतप्त आवाजात डेनिसॉव्हची कथा ऐकवली. आणि म्हटले, ' तुम्ही डेनिसॉव्हला ओळखता. त्याच्यासाठी शब्द टाकता येईल तर बघा. '

सगळी गोष्ट ऐकून जनरलने गंभीरपणे मान हालवीत म्हटले, ' मला त्या शूर सैनिकाबद्दल फार वाईट वाटतं. माझ्याकडे अर्ज दे. '

पण पत्र द्यायला आणि डेनिसॉव्हच्या अविचारी कृत्याचा सगळा तपशील सांगायला रोस्तॉफला अवसर मिळाला नाही. त्याआधीच बुटांचा जिन्यावरून आवाज ऐकू आला तशी जनरल त्याला सोडून पायऱ्यांकडे धावला. सम्राटांच्या परिवारातील माणसे जिना उतरून आपापल्या घोड्यांकडे गेली. ऑस्टरलिट्स येथे गाडीच्या घोड्यावर जो स्वार होता तोच स्वार आता सम्राटाच्या गाडीच्या घोड्यावर होता. आता जिन्यावर हलके वाजलेली पावले रोस्तॉफने ओळखली. आपण ओळखले जाऊ ही भीती त्याच्या मनातून पार गेली. शहरातून आलेल्या काही बघ्या लोकांबरोबर तोही पायऱ्यांजवळ सरकला. दोन वर्षांनंतर पुन्हा त्याने आपल्या वंद्य सम्राटाचे दर्शन घेतले. चेहरा, नजर, चाल यांत काही बदल झाला नव्हता. भव्यता आणि मृदुता यांचा संगम पूर्वीसारखाच होता. पूर्वीच्याच आवेगाने त्याच्या मनात उत्साह उधाणून आला, सम्राटावरील भक्ती उचंबळून आली. हरिणाच्या कातड्यांची पांढरी विजार, गुडघ्यांपर्यंत पोचणारे बूट हा प्रिओब्रॅझेन्स्की रेजिमेंटचा गणवेष त्याने चढवला होता. त्याच्या गणवेषावरील ' लीजन ऑफ् ऑनर 'चा तारा मात्र रोस्तॉफला ओळखू आला नाही. सम्राट पायऱ्यांशी आला तशी त्याने हाताखाली हॅट धरून हातात मोजे घातले.

त्याने थांबून भोवताली पाहिले तेव्हा त्याच्या नजरेतून तेज ओसंडत आहे असे वाटू

लागले. कुठल्यातरी एका जनरलबरोबर तो दोनचार शब्द बोलला. त्याने रोस्तॉफच्या डिव्हिजनच्या पूर्वीच्या कमांडरला ओळखले, त्याच्याशी स्मित करून त्याला आपल्या-जवळ बोलावले.

सगळा परिवार मागे थांबून राहिला. सम्राट बराच काळ जनरलशी बोलत असल्याचे रोस्तॉफने पाहिले.

सम्राटांनी जनरलला काहीतरी थोडक्यात सांगितले आणि घोड्याच्या दिशेने पाऊल उचलले. पुन्हा परिवारातील माणसे आणि बघे लोक–त्यांत रोस्तॉफ होता–सम्राटांच्याजवळ दाटीवाटीने जाऊ लागले. खोगिरावर हात ठेवून सम्राट उभे राहिले, घोडदलाच्या जनरलकडे वळून सर्वांनी ऐकावे या उद्देशाने त्याला मोठ्याने म्हणाले, ' जनरल, तसं करणं अशक्य आहे. कारण कायदा माझ्याहून शक्तिमान आहे. ' मग त्यांनी रिकिबीत पाय ठेवला. जनरलने आदराने मस्तक झुकवले. सम्राट बसताच घोडा चौखूर निघाला. इतर लोकांप्रमाणे रोस्तॉफही उत्साहाने मागून धावू लागला.

ज्या सार्वजनिक चौकाकडे झार घोड्यावरून जात होता त्या चौकात समोरासमोर दोन बटालिअन उभ्या होत्या. उजव्या बाजूस प्रिओब्रॅझेन्स्कीची बटालिअन होती, डाव्या बाजूस अस्वलाच्या कातड्याच्या टोप्या घातलेल्या फ्रेंच संरक्षकदल सैनिकांची बटालिअन होती.

सम्राट एका बटालिअनकडून मानवंदना घेत असताना घोडेस्वारांचा एक घोळका विरुद्ध बाजूकडून चालला होता. त्याच्या अग्रभागी नेपोलिअन होता. रोस्तॉफने लागलीच त्याला ओळखले. त्याच्या डोक्याला छोटीशी हॅट होती, खांद्यावर सॅंट आन्द्रेची सन्मानदर्शक फीत होती, त्याचा गणवेष निळ्या रंगाचा होता. तो उत्तम अरबजातीच्या पांढऱ्या रंगाच्या घोड्या-वर स्वार झाला होता. त्याच्या खोगिराच्या लाल कापडावर सोनेरी भरतकाम केलेले होते. अलेक्झांडरजवळ घोडा नेऊन नेपोलिअनने आपली हॅट काढून उंच धरली. तेव्हा घोडदलात सराईत झालेल्या रोस्तॉफच्या नजरेला नेपोलिअनची घोड्यावरील मांड नीट पक्की नसल्याचे आढळून आले. दोन्ही बटालिअनांनी सम्राटांचा जयजयकार केला. नेपोलिअन अलेक्झांडरला काहीतरी म्हणाला. सम्राट घोड्यावरून खाली उतरला. दोन्ही सम्राटांनी एकमेकांचे हात हाती घेतले. नेपोलिअनच्या मुद्रेवर नाराज, दांभिक हास्य उमटले. नेपोलिअनशी बोलणाऱ्या अलेक्झांडरच्या मुद्रेवर मैत्रीचा भाव दिसत होता.

फ्रेंच लष्करी सैनिकच पोलिसाचे काम करीत होते. ते जमाव रोखून धरीत होते. त्यांचे घोडे लाथा झाडीत होते. तरीही सम्राट अलेक्झांडर आणि नेपोलिअन यांच्या हालचाली रोस्तॉफ टक लावून पाहात होता. बोनापार्ट आपल्या बरोबरीचा आहे असे जणू समजून अलेक्झांडर वागत होता. उलट रशियन झारशी वागताना नेपोलिअन बिलकुल अस्वस्थ झाला

नव्हता. जणू सम्राटांशी आपण बरोबरीच्या व मैत्रीच्या नात्याने वागत आहोत यात अस्वाभाविक काही नाही असे नेपोलिअनच्या वागण्यात दिसत होते. हे सारे रोस्तॉफला अनपेक्षित होते, विचित्र वाटत होते.

अलेक्झांडर व नेपोलिअनच्या परिवाराची मागून लांबच लांब रांग हालत होती. ते दोघेही उभ्या असलेल्या जमावाजवळील प्रिओब्रेझेन्स्की बटालिअनच्या उजव्या फळीकडे जाऊ लागले. अनपेक्षितरीत्या ते इतके जवळ आले होते त्यामुळे जमावात पुढे असलेल्या रोस्तॉफला आपण ओळखले जाऊ की काय याची भीती वाटू लागली.

'महाराज, तुमच्या सर्वांत शूर सैनिकाला 'लीजन ऑफ् ऑनर' देण्याची मला परवानगी द्या.' प्रत्येक शब्दावर जोर देणारा कर्कश, रेखीव आवाज ऐकू आला.

नेपोलिअनची छोटीशी मूर्ती आलेक्झांडरकडे पाहात बोलत होती. लक्षपूर्वक ऐकून अलेक्झांडरने प्रसन्न स्मित करीत मान डोलावली.

'ज्याने कालच्या युद्धात शौर्य दाखविले त्याला 'लीजन ऑफ् ऑनर' द्यायचा आहे,' नेपोलिअनने प्रत्येक शब्दावर जोर देत म्हटले. शिस्तीत उभ्या राहिलेल्या मानवंदना देणाऱ्या रशियन सैनिकांची तो धिमेपणाने पाहणी करू लागला. रोस्तॉफला नेपोलिअनचे वागणे बिलकुल आवडले नाही. सर्व सैनिक हालचाल न करता आपल्या सम्राटाकडे टक लावून उभे राहिले.

'मला माझ्या कर्नलचं मत कृपा करून विचारू द्या.' असे बोलून अलेक्झांडर घाईघाईने बटालिअनचा कमांडर प्रिन्स कॉझ्लॉव्स्कीकडे गेला. तेवढ्या वेळात नेपोलिअनने आपल्या लहानशा गोऱ्या हातातून मोजा काढला आणि तो टरकावून फेकून दिला. त्याच्या मागे असलेल्या अॅडज्युटंटने घाईने पुढे येऊन तो मोजा उचलला.

'कोणाला सन्मान द्यायचा?' हळू आवाजात सम्राट अलेक्झांडरने रशियन भाषेत कॉझ्लॉव्स्कीला प्रश्न केला.

'जशी महाराजांची आज्ञा.' कॉझ्लॉव्स्की म्हणाला. सम्राट अलेक्झांडरने आठ्या घातल्या, रुष्ट मुद्रेने भोवताली पाहत तो म्हणाला, 'त्यांना काहीतरी सांगावंच लागेल.'

निश्चयी मुद्रेने कॉझ्लॉव्स्कीने रांगांवरून डोळे फिरविले, त्याने तेव्हा रोस्तॉफलाही पाहिले असावे. 'माझी निवड झाली नाही म्हणजे झाले' रोस्तॉफ मनाशी म्हणत होता.

त्रस्त मुद्रेने कर्नल उद्गारला, 'लाझारेव्ह'. लाझारेव्ह दूरवर गोळी मारण्यात सर्वांत कुशल असा सैनिक होता. मोठ्या तरतरीतपणे, सफाईने त्याने पुढे पावले टाकली.

'चाललास कुठं? तिथंच राहा' त्याला कोणी ना कोणी सूचना देऊ लागले. आपण कुठे जायचे ते बिचाऱ्याला कळेना. कर्नलकडे भयभीत दृष्टी टाकून तो लागलीच थांबला. रांगेच्या बाहेर हाकललेल्या सैनिकाप्रमाणे त्याचा चेहरा थरथरू लागला.

नेपोलिअनने आपली मान किंचित मागे झुकवली. आपला लहान स्थूल हात काहीतरी शोधल्यागत किंचित हलवला. त्याला काय हवे आहे याची त्याच्या परिवारातील माणसांना लागलीच कल्पना आली आणि त्यांची धांदल उडाली. त्यांनी एकमेकांना काहीतरी हलक्या

आवाजात सांगितले. कसलीशी वस्तू एकाने दुसऱ्याकडे अशी त्यांनी सरकवली. नेपोलिअनने पुढे केलेल्या हातात नोकराने अत्यंत आदराने झुकून लाल फीत असलेले सन्मानचिन्ह ठेवले. त्याकडे न पाहताच नेपोलिअनने ते चिन्ह दोन बोटांत धरले. मग नेपोलिअन लाझारेव्हजवळ आला. आपण हे सारे दोस्तीखातर करीत आहोत हे जणू सुचविण्यासाठी नेपोलिअनने अलेक्झांडरकडे वळून पाहिले. नेपोलिअनने ते :सन्मान चिन्ह लाझारेव्हच्या छातीवर ठेवले आणि लागलीच आपला हात काढून घेऊन तो अलेक्झांडरकडे वळला.

मग दोन्ही सम्राट घोड्यांवर स्वार होऊन निघून गेले. प्रिओब्रेझेन्स्की बटालिअन पांगून फ्रेंच संरक्षकदलात मिसळली. सगळेजण खान्यासाठी टेबलाशी बसले.

लाझारेव्हला सन्माननीय ठिकाणी बसवण्यात आले. फ्रेंच आणि रशियन ऑफिसरांनी त्याला मिठ्या मारल्या, त्याचे अभिनंदन केले आणि त्याच्याशी हस्तांदोलन केले. केवळ लाझारेव्हला पाहण्यासाठी ऑफिसरप्रमाणेच सामान्य नागरिकांनी गर्दी केली. चौकात मांडलेल्या टेबलाशी बसलेल्या सैनिकांमध्ये रशियन किंवा फ्रेंच भाषेत संभाषण सुरू झाले होते. त्यांच्या हसण्याचा आवाजही सारखा ऐकू येत होता. लालबुंद चेहऱ्याचे दोन ऑफिसर रोस्तॉफजवळून बोलत गेले ते खुशीत दिसत होते.

'रशियन सैनिक उद्या फ्रेंचांना खास खाना देणार आहे म्हणतात.'

'लाझारेव्ह मोठा नशीबवान प्राणी आहे! बाराशे फ्रँकची पेन्शन मरेपर्यंत मिळणार!'

फ्रेंच संरक्षकदलाच्या सर्वांत शूर सैनिकाला आपले सम्राट सेंट जॉर्ज सन्मानचिह्न देणार आहेत.'

दुरूनच उत्सव पाहात रोस्तॉफ कोपऱ्याशी कितीतरी काळ उभा होता. त्याच्या डोक्यात गोंधळ उडाला होता, त्याचे डोके भणाणून गेले होते. त्याला काही मार्ग दिसत नव्हता. त्याच्या मनात भयानक विकल्प येत होते. डेनिसॉव्हची बदललेली मुद्रा, त्याची शरणागती आणि तुटलेल्या हातापायांच्या रोग्यांनी आणि घाण रोगांनी भरलेले हॉस्पिटल यांबद्दलचे विचार त्याच्या मनात येऊ लागले. हॉस्पिटलातील प्रेतांची दुर्गंधी त्याला इतक्या स्पष्टपणे जाणवली की ती कुठून येत आहे याचा शोध तो घेऊ लागला. मग तो गोऱ्यापान हाताच्या स्वतःवर खूष असलेल्या नेपोलिअनचा विचार करू लागला. सम्राट अलेक्झांडरांनी त्याला किती स्नेहाने आणि आदराने वागविले होते ते आठवू लागला.

मग ते हातपाय कशासाठी तुटले? ती सगळी माणसं मग कशासाठी मारली गेली? मग त्याला लाझारेव्हच्या गौरवाचा प्रसंग आठवला. डेनिसॉव्हला क्षमा न होता शिक्षा झाली ते आठवले. तो अशा काही चमत्कारिक आठवणीत गुंतू लागला की त्याचे त्यालाच भय वाटू लागले.

■ ■

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय मंत्रालय

# भाग सहावा

१८०८–१८१०

सम्राट नेपोलिअनशी पुन्हा बोलणी करण्यासाठी सम्राट अलेक्झांडरने एर्फर्ट येथे १८०८ मध्ये भेट दिली. ही भेट महत्त्वाची कशी आहे याबद्दल पीटर्सबर्गमधील प्रतिष्ठित मंडळींत खूप चर्चा सुरू झाली.

नेपोलिअन आणि अलेक्झांडर यांना जगाचे सम्राट समजले जाऊ लागले. १८०९ मध्ये त्यांच्यातील मैत्री फारच घनिष्ठ झाली. त्या वर्षी नेपोलिअनने ऑस्ट्रियाशी युद्ध पुकारले. तेव्हा आपल्या जुन्या दोस्ताविरुद्ध आपल्या जुन्या शत्रूला–बोनापार्टला सहाय्य करण्यासाठी रशियन सैन्याने सीमा ओलांडली; सम्राट अलेक्झांडरच्या एका बहिणीशी नेपोलिअनचे लग्न होणार असल्याची शक्यता प्रतिष्ठित वर्तुळात बोलली जाऊ लागली.

या अवधीत आरोग्य आणि आजार, विश्रांती आणि कष्ट, विचार, विज्ञान, काव्य, संगीत, प्रीती, वात्सल्य, तिरस्कार, रागलोभादी उत्कट भावना यांत खरीखुरी आवड घेऊन जगणाऱ्यांचे प्रत्यक्ष जीवन सुरळीत चालू होते. नेपोलिअनशी राजकीय कारणासाठी होणारी मैत्री आणि वैर यांची फिकीर न करता त्यांचे जीवन नेहमीप्रमाणे आपल्या मार्गाने चालले होते.

प्रिन्स आन्द्रेने सतत दोन वर्षं खेड्यात घालवली होती. पीएरने आपल्या शेतवाडीवर एकामागून एक अनेक धाडसी योजना प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यांतली एकही यशस्वी झाली नव्हती. प्रिन्स आन्द्रेने गाजावाजा न करता आणि लक्षात भरणारा प्रयास न करताही त्या योजना प्रत्यक्षात उतरवल्या होत्या. पीएरमधे नसलेला गुण प्रिन्स आन्द्रेमधे मोठ्या प्रमाणावर होता. फार तडफड आणि श्रम न करता तो चिकाटीने सगळे व्यवहार, सगळी कामे पूर्ण करून घेत असे. त्याने एका शेतवाडीवरील तीनशे गुलाम कुळांना

स्वतंत्र शेतकरी म्हणून मान्यता दिली. रशियातील ते पहिलेच उदाहरण होते. इतर ठिकाणची वेठ बंद करून मजुरी द्यायला सुरुवात केली. शेतकरी स्त्रियांना बाळंतपणात मदत व्हावी म्हणून त्याने बॉगुचेरॉव्हो येथे एक नर्स नेमली होती. शेतकऱ्यांच्या मुलांना आणि घरगड्यांना लिहायला वाचायला शिकवण्यासाठी एका पगारी धर्मगुरूची नेमणूक केली होती.

प्रिन्स आन्द्रे अर्धावेळ ब्लीकहिल्स येथे आपल्या वडिलांच्या व लहान मुलाच्या सहवासात घालवी. त्याच्या वडिलांनी ज्या शेतवाडीला ' बॉगुचेरॉव्हो विश्रांतिस्थान ' असे नाव ठेवले होते त्या ठिकाणी अर्धावेळ घालवी. बाह्य जगात चाललेल्या घटनांबद्दल त्याने पीएरजवळ बेफिकिरी उदासीनता दाखवली होती, पण तो त्या घटनांचे बारकाईने निरीक्षण करी, त्या समजून घेई, पुस्तके मागवून घेई.

सांस्कृतिक केंद्र असलेल्या पीटर्सबर्गहून नुकतीच आलेली माणसे त्याच्या वडिलांना किंवा त्याला भेटायला येत तेव्हा सतत खेड्यात राहूनही आपणाला स्वदेशात आणि परदेशात चाललेल्या घडामोडींचे ज्ञान त्यांच्याहून अधिक असल्याचे त्याला आढळून येई.

प्रिन्स आन्द्रे आपल्या शेतवाडीवर देखरेख ठेवत होता. निरनिराळ्या विषयांवरील वाचन चालू होते. त्याखेरीज तो दोन महत्त्वाच्या कामांत गुंतला होता. आमच्या गेल्या दोन दुर्दैवी मोहिमांचा आढावा घेऊन त्यांचे परीक्षण करीत होता. तसेच सैन्यातील नियमांत सुधारणा सुचवणारा एक ठराव तो तयार करीत होता.

त्याच्या मुलाच्या नावावर रॅझान शेतवाडी होती. प्रिन्स आन्द्रे विश्वस्त म्हणून काम बघत होता. १८०९ च्या वसंतऋतूत रॅझान शेतवाडीकडे जायला तो निघाला.

प्रिन्स आन्द्रे आपल्या मुलाच्या रॅझान शेतवाडीचा विश्वस्त होता. त्यामुळे त्याला आपल्या कामासाठी जिल्ह्याच्या मार्शलची भेट घेणे आवश्यक होते. हा मार्शल होता काउंट इल्या अँड्रीच रोस्तॉफ. मे महिन्याच्या मध्यास प्रिन्स आन्द्रे त्याला भेटायला गेला.

आता वसंतऋतूतील उष्मा सुरू झाला होता. जंगले केव्हाच पानांनी डवरून गेली होती. सगळीकडे धूळ उडत होती, त्यामुळे कुठे पाणी दिसले की स्नान करण्याची इच्छा होत होती.

ऑट्रॅड्नू येथील रोस्तॉफच्या घराकडे जाणाऱ्या दुतर्फा झाडे असणाऱ्या रस्त्यावर घोडागाडी जाऊ लागली तशी मार्शलला आपल्या कामासंबंधी कोणते प्रश्न विचारावेत या विचारात प्रिन्स आन्द्रे मग्न झाला. त्याला उजव्या बाजूच्या झाडांमागून मुलींचे खिदळणे ऐकू आले. त्याने पाहिले ज्या रस्त्यावरून गाडी चालली होती त्याच रस्त्यावरून काही मुली धावत होत्या. गाडीच्या दिशेने धावणाऱ्या मुलींत सर्वात पुढे असणारी मुलगी विलक्षण नाजूक होती. तिने पिवळ्या रंगाचा सुती गाऊन घातला होता. तिचे डोळे आणि केस काळेभोर होते. तिने डोक्याला पांढरा रुमाल बांधला होता. त्याच्या खालून तिच्या बटा भुरूभुरू उडत होत्या.

ती काहीतरी जोराजोराने ओरडत होती. पण अनोळखी मनुष्य दिसताच ती त्याच्याकडे न पाहताच हसत हसत मागे पळाली.

का कोण जाणे प्रिन्स आन्द्रे एकाएकी व्याकुळ झाला. हवा कशी छान पडली होती, सूर्य लख्ख प्रकाशत होता. त्याला सर्वत्र आनंदीआनंद दिसत होता. सडपातळ बांध्याच्या त्या सुंदर मुलीला त्याच्या अस्तित्वाची दखल नव्हती आणि अस्तित्व जाणून घ्यायचीही इच्छा नव्हती. आपल्या जीवनावर निःसंशय अडाणी जीवनावर ती खूप होती, समाधानी होती. ती आपल्यापासून फार दूर आहे; तिला कशाचा एवढा आनंद झाला आहे? ती कशाचा विचार करीत आहे? त्याला कळेना.

१८०९ मध्ये काउंट इल्या अंड्रीच ऑट्रड्नू येते राहत होता. गेल्या वर्षाप्रमाणे याही वर्षी तो शिकारी, नाटके, खाने, जलसे अशा गोष्टींनी जवळजवळ सगळ्या प्रांताचे रंजन करीत होता. नवीन पाहुणा आला की त्याला नेहमीच आनंद होई. प्रिन्स आन्द्रे आला तेव्हा त्याला आनंद झाला, हे सांगायला नको. त्याने प्रिन्स आन्द्रेला त्या रात्री सक्तीने राहायला लावले.

यजमान, यजमानीण आणि यजमानाच्या येणाऱ्या वाढदिवसाच्या सत्कारार्थ जमलेले अनेक सन्मान्य पाहुणे यांच्या आतिथ्याने प्रिन्स आन्द्रे अगदी वैतागून गेला. तरुण मंडळींमधे असलेली नताशा सारखी हसत होती, अगदी आनंदधुंद झाली होती. तिच्याकडे प्रिन्स आन्द्रेने कितीदा तरी पाहिले आणि स्वतःशीच म्हटले—ही विचार तरी कसला करते आहे? हिला आनंद तरी कसला झाला आहे?'

रात्री नव्या जागेत तो एकटा असल्याने की काय त्याला कितीतरी वेळ झोप येत नव्हती. थोडा वेळ वाचल्यावर त्याने मेणबत्ती पुन्हा पेटवली. झडपा बंद केल्यामुळे झोपण्याच्या खोलीत उकाडा होत होता. मूर्ख म्हाताऱ्याने (तो काउंट रोस्तॉफचा मनातल्या मनात ह्या नावाने उल्लेख करी) आवश्यक कागदपत्रे शहरातून आली नसल्याचे सांगून त्याला थांबायला लावले होते, म्हणून तो त्याच्यावर खूपच चिडला होता.

प्रिन्स आन्द्रे उठला आणि त्याने खिडकीची तावदाने उघडी टाकली. लागलीच खोलीत चंद्रप्रकाश शिरला. जणू तो मघापासून किती वेळ याच संधीची वाट बघत होता. रात्र शीतळ, उजळ आणि शांत होती. खिडकीसमोर रांगेत असणाऱ्या वृक्षांचे शेंडे कापलेले होते. त्यांना आता पालवी आली होती. आता ते चांदण्यात एका बाजूने काळे दिसत होते. दुसऱ्या बाजूस रुपेरी झाले होते. त्या झाडांच्या खाली भरघोस पानांची झुडपे वाढली होती. त्यांच्या पानांवर, डहाळ्यांवर कुठे कुठे रुपेरी चांदणे पडले होते. त्याच्या माथ्यावर जवळ जवळ पूर्ण चंद्र वसंतऋतूतील निरभ्र आणि प्रायः नक्षत्रहीन आभाळात प्रकाशत होता. प्रिन्स आन्द्रेने खिडकीवर कोपर ठेवून आभाळात दृष्टी लावली.

त्याची खोली दुसऱ्या मजल्यावर होती. वरच्या मजल्यावर डोक्यावरील खोलीत माणसे होती आणि ती जागी होती. त्याला मुलींचे बोलणे ऐकू आले.

‘ आणखी एकदाच ’ प्रिन्स आन्द्रेने कोणती मुलगी बोलत होती ते ओळखले.

‘ अग, तू झोपणार तरी केव्हा ? ’ दुसरी विचारीत होती.

‘ मी एवढ्यात नाही झोपणार. मला झोपच येत नाही. झोपून तरी काय फायदा ? चला, आता शेवटचं गीत...’

मग दोन मुली कुठल्यातरी गीताचे शेवटचे कडवे गाऊ लागल्या.

‘ फार सुरेख ! झोप आता. खूप झालं ’

‘ तुम्ही झोपा. मला झोप येत नाही. ’ असं बोलणारी मुलगी खिडकीजवळ आली होती. ती बहुधा खिडकीच्या बाहेर डोकावत असावी. कारण तिच्या कपड्यांची सळसळ आणि तिचा श्वासोच्छ्वासही प्रिन्स आन्द्रेला ऐकू येत होता. मग सगळीकडे स्तब्धता पसरली— चंद्रासारखी, चांदण्यासारखी, आणि चांदण्यातील सावल्यासारखी. प्रिन्स आन्द्रे तिथे निरुद्देश उभा होता. तरीपण आपली उपस्थिती त्यांना कळेल या भीतीने तो निश्चल राहिला.

‘ सोन्या, सोन्या, ’ त्याला पुन्हा पहिल्या मुलीचा आवाज ऐकू आला. ‘ अग तुला झोप-तरी कशी येते ? किती सुंदर...किती सुंदर...सोन्या, उठच तू गडे. ’ आता ती मुलगी रडवेली झाली होती. ‘ अग, इतकी सुंदर रात्र पूर्वी कधीच...कधीच उगवली नव्हती. ’

सोन्या नाखुषीनं काहीतरी बोलली.

‘ अग असं काय करतेस ? उठून चंद्राकडे बघ तरी. किती सुंदर दिसतो आहे ! इकडे ये ना. गडे ये ना इथं. बघितलास ना ? असं वाटतं ..चवड्यावर बसावं...चवडे जुळवून घ्यावेत...अगदी शक्य तितके गच्च जुळवून घ्यावेत आणि, आणि जोरानं उसळी घेऊन आकाशात उड्डाण करावं...अगदी असं...’

‘ अग, अग, पडशील की खाली. ’

प्रिन्स आन्द्रेला धकाधकीचा आवाज ऐकू आला आणि पाठोपाठ पुन्हा सगळीकडे स्तब्धता पसरली. ती अजूनही तिथे बसलेली असणार हे प्रिन्स आन्द्रेने ओळखले. त्याला मधूनमधून हळुवार सळसळ नाहीतर उसासा ऐकू येत होता.

एकाएकी त्याच्या अंतःकरणात तारुण्यसुलभ आशाआकांक्षा आणि कल्पना यांची अनपेक्षित गर्दी उसळून त्याचा जीवनप्रवाह थोपवू लागली. आपल्या मनात काय चालले आहे, याचा थांगपत्ता त्याला जराही लागेना तेव्हा त्याने घाईघाईने झोपेचा आश्रय घेतला.

प्रवास संपवून घरी गेल्यावर सप्टेंबर–ऑक्टोबरमध्ये पीटर्सबर्गला जायचे असे प्रिन्स आन्द्रेने ठरवले. ह्या निर्णयासाठी तो सर्व तऱ्हेच्या सबबी शोधू लागला. पीटर्सबर्गला जाणे— एवढेच नव्हे तर लष्करात भरती होणेही- आवश्यक कसे आहे हे सांगणारी तर्कशुद्ध कारणमीमांसा त्याच्याकडे कोणत्याही क्षणी सज्ज होती. खेडे सोडून दूर जाण्याची कल्पना

आपणाला कधी सुचेल असे एक महिन्यापूर्वी त्याला कधीही वाटले नसते. तेव्हा जीवनात सक्रिय भाग घेण्याच्या आवश्यकतेबद्दल आपणांस संशय कसा वाटत होता, हे आता त्याला कळेनासे झाले.

जर आपण आपले अनुभव प्रत्यक्षात उतरवले नाहीत, जीवनात सक्रिय सहभागी झालो नाही तर आपले जीवनातील सर्व अनुभव व्यर्थ ठरतील, शून्य ठरतील हे त्याला आता स्पष्ट दिसू लागले. आतापर्यंत जीवनानुभव घेऊनही तो पुन्हा आपण समाजास उपयुक्त ठरू व पुन्हा आपणास सौख्य आणि प्रीतीची प्राप्ती होईल, या शक्यतेवर विश्वास ठेवू लागला. ह्यामुळे आपण स्वतःला क्षुद्र ठरवीत आहोत हे त्याला दिसत नव्हते. आपण शोधून काढलेली विधाने दुबळी पण ती वादातीत आहेत असे त्याला वाटू लागले. रॅझानला जाऊन आल्यानंतर प्रिन्स आन्द्रेला खेड्यातील जीवनाचा कंटाळा येऊ लागला; पूर्वीच्या आवडीच्या कामात त्याला रस उरला नाही. अभ्यासिकेत एकटा असला म्हणजे तो आरशासमोर उभा राहून आपल्याच चेहऱ्याकडे कितीतरी वेळ टक लावून पाहत राही. मग तो लिझच्या सोनेरी चौकटीतील चित्राकडे पाहू लागे. बांधलेल्या कुरळ्या केसांची लिझ त्याच्याकडे प्रसन्नपणे आणि हळुवारपणे पाहत राही. आता ती पूर्वीचे भयानक शब्द बोलत नसे. त्याच्याकडे चौकसपणे आणि आनंदाने पाहत राही. हात पाठीशी धरून कपाळाला आठ्या घालत कधी स्मित करीत तो येरझाऱ्या घालू लागे. शब्दात व्यक्त होऊ न शकणाऱ्या आणि गुन्ह्यासारख्या गुप्त असणाऱ्या पीएर, कीर्ती, खिडकीशी उभी राहिलेली मुलगी, ओकवृक्ष, स्त्रीचे सौंदर्य, त्याच्या जीवनाचा ओघ पालटून टाकणारी प्रीती यांबद्दच्या स्वैर कल्पना त्याच्या मनात येऊ लागत. अशा वेळी कुणी त्याच्या खोलीत आले तर तो लक्षात येईल इतके तुटक बोले, हिशेबी आणि तार्किक होई.

१८०९ च्या ऑगस्टमध्ये प्रिन्स आन्द्रे पीटर्झबर्गला आला. त्या काळात तरुण स्पेरान्स्की कीर्तीच्या शिखरावर होता. त्याच्या सुधारणा प्रत्यक्षात आणण्याची शिकस्त केली जात होती. त्याच महिन्यात झार गाडीतून खाली पडून त्याचा पाय दुखावला. तीन महिने तो पीटर्हॉफ येथे पडून होता. स्पेरान्स्कीखेरीज कुणाला त्याने भेट घेऊ दिली नाही. स्पेरान्स्की मात्र दररोज भेटीला जायचा. त्या वेळी दोन प्रसिद्ध कायदे तयार होऊ घातले होते. त्यामुळे समाजात खळबळ उडाली होती. एका कायद्यानुसार कोर्टाच्या कृपेने देण्यात येणाऱ्या पदव्या, उपाधी बंद होणार होत्या. दुसऱ्या कायद्यानुसार सरकारी सल्लागार आणि विधिमंडळाचे सभासद या हुद्द्यांसाठी परीक्षा घेण्यासाठी समिती नेमली जाणार होती.

ह्या सुधारणांखेरीज सर्व राज्यघटनेवर चर्चा चालली होती. ही चर्चा प्रिव्ही कौन्सिलपासून जिल्हा न्यायालयापर्यंत कायदा, शासन आणि अर्थ या क्षेत्रातील सर्वच सरकारी यंत्रणा

बदलून टाकणार होती. सम्राट अलेक्झांडर ज्या अस्पष्ट उदार कल्पना उराशी घेऊन गादीवर आला होता त्या कल्पना आता निश्चित साकार होत होत्या, प्रत्यक्षात येत होत्या.

आल्यानंतर लगलीच प्रिन्स आन्द्रेने दरबारात आणि राजाने दिलेल्या खान्याच्या वेळी व्यवस्थापक म्हणून प्रवेश केला. दोन वेळा भेट झाली तरी झारने त्याच्यावर एका शब्दानेही कृपा केली नाही. झारला आपले व्यक्तित्व आवडत नाही, आपण त्याच्या मनातून उतरलो आहोत ह्याची जाणीव प्रिन्स आन्द्रेला पूर्वीच झाली होती. झारने त्याच्याकडे हेटाळणीने पाहिले तेव्हा त्याचा समज पक्का झाला. १८०५ मधे प्रिन्स आन्द्रेने लष्कर सोडल्यापासून झार त्याच्यावर नाराज झाला होता म्हणून त्याने प्रिन्स आन्द्रेला अनादराची वागणूक दिली असावी असा दरबारच्या लोकांनी खुलासा केला.

प्रिन्स आन्द्रे मनाशी म्हणाला, ' आपल्या आवडीनिवडीवर आपली हुकमत चालत नाही हे मी जाणतो. ' सैन्यात करावयाची सुधारणा ' हा लेख मी व्यक्तिशः नेऊन दिला तर उपयोग होणार नाही हे मी जाणून आहे. मात्र लेखाची गुणवत्ता स्वयंसिद्ध आहे. '

वृद्ध फील्ड मार्शल त्याच्या वडिलांचा मित्र होता. त्याला त्याने आपल्या लेखासंबंधी पत्र लिहिले. फील्ड मार्शलने त्याला भेटीची वेळ ठरवून दिली. मोठ्या अगत्याने प्रिन्स आन्द्रेची भेट घेऊन तो लेख झारसमोर ठेवण्याचे त्याने आश्वासन दिले. काही दिवसांनी प्रिन्स आन्द्रेला कळवण्यात आले—' युद्धमंत्री काउंट अराक्चीव्ह यांना भेटा. '

ठरलेल्या दिवशी सकाळी नऊ वाजता प्रिन्स आंन्द्रे काउंट अराक्चीव्हच्या स्वागत-दालनात शिरला.

प्रिन्स आन्द्रेला काउंट अराक्चीव्हची माहिती नव्हती. तो त्याला कधीच भेटला नव्हता. त्याने त्याच्याबद्दल जे ऐकले होते त्यामुळे त्याच्या मनात अराक्चीव्हबद्दल फारच थोडा आदर उरला होता.

' तो युद्धमंत्री आहे. झारचा त्याच्यावर विश्वास आहे. त्याच्या व्यक्तिगत गुणांशी मला काय करायचं आहे ? माझ्या लेखावर मत व्यक्त करण्याचं काम त्याच्यावर सोपवलं आहे. तोच एक माझ्या सूचना अमलात आणू शकेल. ' काउंट अराक्चीव्हच्या स्वागत-दालनात अनेक प्रतिष्ठित आणि सामान्य व्यक्तींमधे प्रतीक्षा करीत बसलेला प्रिन्स आन्द्रे स्वतःशी म्हणत होता.

ॲडज्युटंटच्या संमतीने कित्येक माणसे मंत्र्यांना भेटून बाहेर आली. मग त्या भयानक दारातून आत जाण्याची संधी एका ऑफिसराला मिळाली. धास्तावून क्षुद्र झालेला त्याचा चेहरा प्रिन्स आन्द्रेच्या चांगलाच लक्षात राहिला. युद्धमंत्री त्या ऑफिसरशी बराच वेळ बोलत राहिले. मग एकाएकी दरवाजातून कर्कश आवाज ऐकू आला. ऑफिसर बाहेर आला तेव्हा त्याचा चेहरा पांढरा फटफटीत पडला होता; त्याचे ओठ थरथरत होते. आपले डोके दाबून धरीत तो स्वागतदालनातून बाहेर निघाला. त्यानंतर प्रिन्स आन्द्रेला दारापर्यंत सोबत करून ॲडज्युटंट हळू आवाजात म्हणाला, ' उजव्या बाजूस. खिडकीजवळ. '

प्रिन्स आन्द्रेने साध्या नीटनेटक्या व्यवस्थित अशा त्या अभ्यासिकेत प्रवेश केला. टेबलाशी

चाळिशीतील व्यक्ती बसलेली त्याला दिसली. तिच्या लांबट डोक्यावरील केस बारीक केलेले होते. कपाळावर खोल आठ्या उमटल्या होत्या. भुवया त्रस्त दिसत होत्या. तपकिरी डोळे निस्तेज दिसत होते. नाक लाल आणि लांबुडे होते. अराक्‌चीव्हने त्याच्या दिशेने डोळे वळवले पण पाहिले मात्र नाही.

'तुम्ही कशासाठी अर्ज केला आहे?' अराक्‌चीव्हने विचारले.

'अर्ज कशासाठीच नाही, महाराज...' प्रिन्स आन्द्रे संथपणे उत्तरला. अराक्‌चीव्हचे डोळे त्याच्याकडे वळले.

'बसा खाली. तुम्ही प्रिन्स बोलकॉन्स्की का?'

'मला अर्ज करायचा नाही. झारमहाराजांना मी एक लेख सादर केला होता तो त्यांनी आपल्या...'

'अवलोकनार्थ पाठवला आहे. मी तो वाचला आहे.' पहिले काही शब्द सौजन्याने उच्चारीत अराक्‌चीव्हने त्याच्यावरील दृष्टी दुसरीकडे वळवली. पुन्हा तो तिरस्काराने म्हणाला, 'तुम्ही सैन्यासाठी नवीन नियम सुचवीत आहात ना? नियम शेकड्यांनी पडून आहेत. जुने नियम कोणी अमलात आणीत नाहीत. जो उठतो तो नवे नियम तयार करीत सुटतो. नियम लिहिणं नियम पाळण्याहून सोपंच म्हणा.'

'मी झारमहाराजांच्या इच्छेवरून तुम्हाला भेटतो आहे. माझ्या सूचनांबद्दलची तुमची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आलो आहे.' प्रिन्स आन्द्रे विनयाने म्हणाला.

'मी तुमच्या लेखाबाबत सूचना केली आहे. ती समितीपुढे पाठवलेली आहे. मला तुमच्या सुधारणा बिलकुल पसंत नाहीत.' अराक्‌चीव्ह उठला. टेबलाच्या खणातून लेख बाहेर काढून तो त्याच्यापुढे सरकवीत तो म्हणाला, 'हा घ्या'. लेखावरच शेरा मारलेला होता. विरामचिन्हे न वापरता शुद्धाशुद्ध न पाहताच खरडलेले होते —'फ्रेंच सैन्याच्या नियमांची ही नक्कल आहे. उथळपणे एकत्रित केलेले नियम. आजवर असलेल्या नियमांपेक्षा वेगळे नियम जरूर नसताना सुचवलेले आहेत.'

'आपण हा लेख कुठल्या समितीला दाखवला होता का?'

'सैन्यातील नियम पाहणाऱ्या समितीला. त्या समितीवर सदस्य म्हणून तुमची नेमणूक व्हावी अशी सूचना मी केलेली आहे. फक्त पगार मिळणार नाही.'

'मला पगाराची आवश्यकता नाही' प्रिन्स आन्द्रे स्मित करीत म्हणाला.

'पगाराशिवाय सदस्य. अच्छा!' प्रिन्स आन्द्रेला त्याने झुकून निरोप दिला आणि तो ओरडला, 'कोण आहे तिकडे! दुसऱ्याला पाठवून द्या.'

समितीवर आपल्याला घेतल्याचे केव्हा कळवतात याची प्रिन्स आन्द्रे वाट पाहत होता.

याच वेळी उपयोगी पडतील अशा सत्तेवर असणाऱ्या ओळखीच्या माणसांना तो भेटत होता. पीटर्झबर्ग शहरातील उच्च विविध मंडळांमध्ये त्याचे चांगले स्वागत झाले. सुधारणा करू पाहणाऱ्या पक्षाने त्याला आस्थेने आपल्या बाजूस घेतले. त्याचे एक कारण म्हणजे त्याची बुद्धिमत्तेबद्दल आणि बहुश्रुततेबद्दल ख्याती होती. दुसरे म्हणजे आपल्या कुळाची गुलामगिरीतून मुक्तता केल्यामुळे त्याच्या औदार्याची आधीच प्रसिद्धी झाली होती. केवळ त्याच्या वडिलांमुळेच मागची असमाधानी पिढी त्याचे स्वागत करीत होती, आणि आपण त्याच्या सुधारणांना संमती दिली नाही तरीही त्याचा जिव्हाळा कमी होणार नाही असा त्यांना भरवसा होता. पीटर्झबर्गला तो नवीनच आला होता. तो उच्च हुद्द्यावरील धनिक तरुण होता. अगदी थोडक्यात मरणाच्या जबड्यातून सुटून आलेला असल्याने आणि पत्नीच्या शोककारक मृत्यूमुळे त्याच्याभोवती अद्‌भुततेचे वलय होते. या सर्व कारणांमुळे प्रतिष्ठित स्त्रीवर्गानेही त्याचे हार्दिक स्वागत केले. पूर्वी त्याला जे ओळखत असत त्यांचे आता त्याच्याबद्दलचे मत बदलले होते; अनुकूल झाले होते. त्यांच्या मते तो गेल्या पाच वर्षांत खूपच सुधारला होता. अधिक हळुवार आणि अधिक मर्दानी झाला होता. पूर्वीचा दंभ, गर्व आणि उपरोध त्याच्यात उरला नव्हता. वय वाढल्यानंतर होते तशी त्याची वृत्ती शांत झाली. लोक त्याच्याबद्दल बोलू लागले, त्याच्याबद्दल त्यांना कुतूहल निर्माण झाले आणि त्याला भेटायला ते अधीर झाले. काऊंट अराक्‌चीव्हशी भेट झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी रात्री तो काऊंट कॉटच्युबेने दिलेल्या खान्याला हजर होता. त्याने काऊंट कॉटच्युबेला आपल्या भेटीचा वृत्तान्त सांगितला.

तेवढ्यात एक उंच टक्कल पडलेला, भुऱ्या केसांचा चाळिशीतील मनुष्य आत आला. काऊंट कॉटच्युबे आन्द्रेचा हात धरून त्याचे स्वागत करण्यास पुढे झाला. आलेल्या माणसाचा भालप्रदेश विशाल होता. त्याचा लांबट चेहरा विलक्षण पांढरा फटफटीत पडला होता. त्याच्या अंगात निळया रंगाचा फ्रॉककोट होता, गळयात क्रॉस होता आणि छातीवर डाव्या बाजूला ताऱ्याचे चिन्ह होते. आलेला मनुष्य स्पेरान्स्की होता. प्रिन्स आन्द्रेने त्याला लागलीच ओळखले. महत्त्वाच्या क्षणी माणूस थरारतो तसा तो थरारून गेला. आपल्या थरारण्याच्या बुडाशी आदर होता का हेवा होता का काही आशा-अपेक्षा होत्या हे त्याचे त्यालाच कळले नाही.

'तुमच्या परिचयाने मला आनंद झाला. मी तुमच्याबद्दल ऐकले होते. तसे तुम्ही खूप जणांना ठाऊक आहात.' स्पेरान्स्की म्हणाला. अराक्‌चीव्हने बोलकॉन्स्कीचे स्वागत कसे केले ते कॉटच्युबेने थोडक्यात सांगितले. तसे स्पेरान्स्कीने तोंडभर हास्य केले.

'सैन्याचे नियम करणाऱ्या समितीचा अध्यक्ष माझा मित्र आहे. त्याचे नाव एम्. मॅग्निट्स्की.' तो प्रत्येक शब्द स्पष्टपणे बोलत होता. 'तुमची इच्छा असेल तर तुमची आणि त्याची गाठ घालून देईन. मला वाटते तुम्ही त्याच्याशी आस्थेने वागावे आणि योग्य अशा बाबतीत त्याला सहकार्य देण्याच्या इच्छेने बोलावे.'

कॉटच्युबेकडे पहिल्या भेटीत स्पेरान्स्की आणि प्रिन्स आन्द्रे यांच्यामध्ये जसे बराच वेळ खाजगी बोलणे झाले तसेच बोलणे पुन्हा त्या बुधवारी दोघांत झाले. तेव्हा प्रिन्स आन्द्रेचे स्पेरान्स्कीबद्दल चांगले मत झाले.

प्रिन्स आन्द्रेला बहुतेक सर्व माणसे तुच्छ आणि निरुपयोगी वाटत. तो स्वतः आदर्श जीवन जगण्याची धडपड करीत होता. इतरांमध्ये आदर्श सापडावा ही इच्छा इतकी तीव्र होती की आपणाला स्पेरान्स्कीमध्ये पूर्ण विचारी आणि सद्गुणी माणसाचा आदर्श सापडला असे मानायला तो तयार झाला. प्रिन्स आन्द्रे आणि स्पेरान्स्की यांची जगे भिन्न नसती तर, दोघांचेही संस्कार आणि नैतिक परंपरा भिन्न नसत्या तर बोलकॉन्स्कीला कितीतरी लौकर स्पेरान्स्कीच्या स्वभावात दैवी अंश नाही अगर वीरता नाही याचा प्रत्यय आला असावा. पण त्याचे मन युक्तिवादाला अपरिचित होते. त्या युक्तिवादी मनाची ओळख पूर्णपणे पटली नाही तरीही त्याला त्याच्याबद्दल अतीव आदर वाटू लागला. खेरीज स्पेरान्स्कीने प्रिन्स आन्द्रेच्या बुद्धिमत्तेचे कौतुक केले होते. त्याचे सहकार्य मिळावे म्हणून त्याने त्याच्यासमोर शांत, निःपक्ष-पाती वृत्तीचा देखावा केला होता. धूर्तपणाने त्याने त्याची स्तुती केली होती. इतर जगाचा मूर्खपणा तसेच आपल्या दोघांच्या कल्पनेतील खोली आणि आपली बुद्धिमत्ता जाणणारे आपणच दोघे आहोत असे कौशल्याने ध्वनित करणाऱ्या स्तुतीने स्पेरान्स्कीने प्रिन्स आन्द्रेला खूष केले होते.

बुधवारी रात्री बराच वेळ त्याचे संभाषण चालू होते. स्पेरान्स्की कित्येक वेळा म्हणाला, 'परंपरेच्या चाकोरीच्या बाहेरचे जे जे आहे त्या सर्वांकडे पाहण्याचा तुमचा नि माझा दृष्टिकोण लांडग्याचे पोट भरावे त्याचबरोबर मेंढ्यांच्या केसांना धक्का लागू नये अशी आमची इच्छा आहे...त्यांना हे कळत नाही.' त्याची मुद्रा सारखी म्हणत होती, 'आम्ही म्हणजे तुम्ही आणि मी—त्यांचे स्वरूप जाणून आहोत—आमचे स्वरूप जाणून आहोत.— '

ह्या दीर्घकाळ चाललेल्या संभाषणावरून प्रिन्स आन्द्रेची आधीच्या पहिल्या भेटीनंतरची भावना अधिक बळकट झाली. त्याला वाटू लागले, ह्या माणसाची बुद्धिमत्ता अगाध आहे, हा वृत्तीने स्थिरशांत आहे, याची निर्णयशक्ती अचूक आहे. आपल्या सामर्थ्याने आणि चिकाटीने याने सत्ता मिळविली आहे आणि तिचा उपयोग तो केवळ रशियाच्या कल्याणासाठी करीत आहे. सगळ्या गोष्टी असाव्या तशा ठीक होत्या पण एका गोष्टीने प्रिन्स आन्द्रे अस्वस्थ होई. भावशून्य आणि आरशासारखे वाटणारे त्याचे डोळे अंतःकरणात कधी प्रवेश देणार नाहीत असे वाटू लागे. सत्ताधारी माणसाच्या हाताकडे पहावे तशा प्रकारे प्रिन्स आन्द्रे त्याच्या हाताकडे पहात राही. का कोण जाणे त्या आरशासारख्या डोळ्यांमुळे आणि पुष्ट हातांमुळे प्रिन्स आन्द्रे संत्रस्त होई.

स्पेरान्स्कीची ओळख झाल्यानंतर लवकरच त्याच्याबद्दल प्रिन्स आन्द्रेला गाढ व अनावर आदर निर्माण झाला. एकाकाळी त्याला बोनापार्टबद्दल असेच वाटले होते. पुष्कळ मूर्ख लोक स्पेरान्स्कीला तुच्छ क्षुद्र लेखीत याचे कारण तो धर्मगुरूचा मुलगा होता. परंतु याच गोष्टीमुळे प्रिन्स आन्द्रे त्याच्याविषयीच्या आपल्या भावनेला हळुवारपणे जपत होता, आणि उलट त्याची भावना नकळत उत्कट होत होती.

त्या रात्री ते दोघे कायद्यात सुधारणा करण्यासाठी नेमलेल्या समितीबद्दल बोलले. गेली दीडशे वर्षे समितीच्या बैठका कशा होताहेत, लक्षावधीचा खर्च झाला, अजून काहीही कसे निष्पन्न झाले नाही, हे स्पेरान्स्कीने उपरोधिक स्वरात प्रिन्स आन्द्रेला सांगितले.

'अशा प्रकारे लक्षावधीचा खर्च करून देशाला एवढी प्राप्ती झाली. सिनेटला नवे न्यायालयीन अधिकार आम्ही देऊ इच्छितो पण आमच्याकडे कायदेच नाहीत. याचा अर्थ हा की तुमच्यासारखी माणसे सरकारात नसणे म्हणजे पाप आहे. अशा कामासाठी कायद्याचे ज्ञान आवश्यक असते आणि मला ते नाही ' असे प्रिन्स आन्द्रेने म्हटले.

'तसे ज्ञान कोणालाच नसते. मग तुम्ही काय करणार आहात? ह्या दुष्ट वर्तुळातून कोणीतरी बाहेर पडले पाहिजे.'

सैन्याच्या नियमांत सुधारणा करणाऱ्या समितीवर एका आठवड्यातच प्रिन्स आन्द्रेला घेण्यात आले. त्याची कल्पना नसताना त्याला कायद्याची संहिता सुधारण्यासाठी नेमलेल्या समितीच्या एका विभागाचे अध्यक्षपद देण्यात आले. स्पेरान्स्कीच्या विनंतीवरून त्याने दिवाणी कायद्याच्या संहितेचा पहिला भाग सुधारण्याचे ठरवले. नेपोलिअन विधिसंहिता आणि जस्टिनिअन विधिसंहिता यांच्या मदतीने त्याने 'व्यक्तींचे हक्क' या विभागात सुधारणा सुचविण्यास प्रारंभ केला.

दोन वर्षांपूर्वी १८०८ च्या प्रारंभी पीएर आपल्या शेतवाडीवरील दौरा आटपून पीटर्सबर्गला आला होता. त्याने कसलीही योजना आखली नव्हती. तरीही पीटर्सबर्गमधील फ्रीमेसनांमध्ये त्याला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते. आता तो भोजनसमारंभ, प्रेतयात्रा यांची व्यवस्था पाहू लागला, नवे सदस्य मिळवू लागला, निरनिराळ्या शाखा बनवण्यात नवनवीन अधिकृत कामे करण्यात भाग घेऊ लागला. मंदिरे उभारण्यासाठी तो आपल्या पदरचे पैसे खर्च करू लागला. धर्मादाय करण्याबाबत बहुसंख्य सदस्य कंजूषपणा करीत अगर अनियमितपणा दाखवीत. दानासाठी कमी पडलेली रक्कम पीएर शक्य असेल तेवढी आपल्या पैशातून देई. पीटर्सबर्गमध्ये फ्रीमेसनांनी अनाथालय सुरू केले होते. जवळजवळ कुणाची मदत न घेता पीटरने आपल्या खर्चाने ते चालवले.

ह्या अवधीत त्याचा जीवनक्रम पूर्वीसारखा सुरू राहिला. त्याने तेच स्वैर जीवन सुरू केले.

त्याला चमचमीत भोजन आणि उंची मद्य आवडे. अशा मोहाच्या आहारी जाऊन आपला नैतिक अधःपात होत आहे हे त्याला कळे पण तो ज्या अविवाहितांच्या मंडळात वावरे त्यांची सोबत टाळणे त्याला अशक्य होई.

आपण सुरू केलेली कार्ये आणि आपली व्यसने यांच्या भोवऱ्यात पीएर सापडला तरीही वर्ष-भरातच त्याला ज्या फ्रीमेसनांच्या तत्त्वावर आपण आपल्या जीवनाची उभारणी करतो आहोत ती तत्त्वेच आपण कितीही प्रयत्न केला तरी आपल्या हातून निसटून जात आहेत असे वाटू लागले.

ऑसिप अलेक्स्येविच आता पीटर्झबर्गमध्ये रहात नव्हता. त्याने पीटर्झबर्ग येथील शाखेतील सर्व कामांतून अंग काढून घेतले होते. मॉस्को सोडून तो आता कुठेही जात नसे. त्या शाखेतील सर्व सभासद पीएरला दैनंदिन जीवनात परिचित होते. खाजगी जीवनात ही माणसे चारित्र्य-शून्य होती, हे पीएरला ठाऊक होते. त्यामुळे केवळ फ्रीमेसनांच्या संप्रदायातील सभासद म्हणून त्यांच्याकडे पहाणे कठीण जाई. त्यांनी मेसनांची वस्त्रे आणि चिन्हे अंगावर धारण केली तरी ऐहिक जीवनात ती माणसे अधिकारपदे आणि ऐषआराम यांसाठी धडपडत असतात हे पीएरच्या नजरेतून सुटत नसे. पीएर दान गोळा करी. कुणी पंचवीस-तीस रुबल देण्याचे आश्वासन देई. त्यांच्यावर अवलंबून राही. दहा सदस्यांतील निम्म्यातरी सदस्यांची सांपत्तिक स्थिती पीएरसारखी होती तरीही ते दान न देताच जात असत. मग पीएरला ' मी आपल्या शेजाऱ्यांसाठी माझे सर्वस्व देईन ' ही मेसनसंप्रदायातील प्रत्येकाने घेतलेली शपथ आठवू लागे. मग त्याच्या मनात संशय निर्माण होई, तो तो दडपण्याचा प्रयत्न करी.

त्याला ठाऊक असलेल्या सदस्यांचे त्याने चार वर्ग केले. पहिल्या वर्गात शाखेच्या कसल्याही कामात सक्रिय रस न घेणारे आणि मानवतेची कसलीही सेवा न करणारे सदस्य घातले. हे सदस्य संप्रदायाची शास्त्रीय रहस्ये, परमेश्वराची तीन स्वरूपे गंधक, पारा आणि मीठ ही वस्तुजातातील पहिली मूलतत्त्वे, सालोमनच्या मंदिरातील चौरस आणि इतर मूर्ती यांचा अर्थ यांसारख्या गोष्टीतच फक्त मग्न असत. बहुधा ह्या वर्गात भ्रातृभाव-मंडळातील वरिष्ठ सदस्य असत. ह्या वर्गाबद्दल पीएरला आदर वाटे. पण त्याला त्यांच्या विषयात गोडी नसे. फ्रीमेसनसंप्रदायाच्या गूढ बाजूचे आकर्षण त्याच्या मनाला वाटले नाही.

पीएरला आपल्या कामाबद्दल असमाधान वाटू लागले. या ठिकाणी तरी त्याला फरीमेसनांचा संप्रदाय काही वेळा केवळ कर्मकांडावर आधारलेला दिसू लागला. खुद्द संप्रदायाबद्दल त्यांच्या मनात अश्रद्धा निर्माण झाली नाही. मात्र रशियातील संप्रदाय चुकीच्या मार्गाकडे जात आहे आणि मूळ मार्गापासून दूर चालला आहे. असा संशय त्याला येऊ लागला म्हणून संप्रदाया-तील अधिक गहन रहस्यांचा शोध घेण्यासाठी त्या वर्षाच्या अखेरीस पीएर परदेशी गेला.

जिची पीएरला भीती वाटत होती त्या निराशेने त्याचा ताबा घेतला. फ्रीमेसनच्या शाखे-समोर भाषण झाल्यानंतर तो सतत तीन दिवस सोफ्यावर पडून होता; कोणाला भेटला नाही की कुठे बाहेर गेला नाही.

ह्या काळातच त्याला आपल्या पत्नीचे पत्र मिळाले. तिने त्याला भेटण्याची विनंती केली होती. त्याच्यामुळे आपण किती दुःखी झालो आहोत हे तिने लिहिले होते. आपले जीवन सर्वस्वी त्याला समर्पण करण्याची इच्छा व्यक्त केली होती.

' एकदोन दिवसांत मी विदेशाहून पीटर्झबर्गला येऊन पोचेन ' असे तिने पत्राच्या शेवटी त्याला कळवले होते.

पत्र वाचून संपले, तेव्हा एक फ्रीमेसन त्याच्या भेटीला आला. त्याने आपल्या एकान्तावर आक्रमण केले असे पीएरला बिलकुल वाटले नाही. पीएरच्या वैवाहिक जीवनाबद्दल बोलताना त्या फ्रीमेसनने आपुलकीच्या नात्याने आपले मत सांगितले. पीएर आपल्या पत्नीशी कडक-पणे वागतो ते अयोग्य आहे. पश्चात्ताप झालेल्याला क्षमा न करणारा पीएर फ्रीमेसनसंप्र-दायाच्या तत्त्वापासून ढळत आहे, असेही तो म्हणाला. त्याच वेळी त्याच्या सासूने–प्रिन्स व्हॅसिलीच्या पत्नीने–त्याला निरोप पाठवला ' थोड्या वेळाकरिता का होईना पण महत्त्वाच्या गोष्टीची चर्चा करण्यासाठी कृपा करून भेटून जा. ' आपल्याविरुद्ध कट सुरू झाला आहे, लोक आपला आपल्या पत्नीशी समेट घडवून आणताहेत हे पीएरच्या ध्यानात आले. तरीही त्या वेळच्या मनःस्थितीत त्याला ते नापसंत पडले नाही. त्याच्या दृष्टीने कोणतीही गोष्ट महत्त्वाची नव्हती. खरे तर पीएरला आयुष्यात कोणतीही गोष्ट महत्त्वाची वाटली नव्हती. त्या वेळी त्याच्या मनावर निराशेचा पगडा होता म्हणून की काय त्याने आपल्या स्वतंत्र जीवनाला तसेच स्वतःच्या मताप्रमाणे पत्नीस शिक्षा करावी ह्या निर्णयालाही महत्त्व दिले नाही.

' कुणीच बरोबर नसतो, कुणीच दोषी नसतो म्हणून तीसुद्धा निर्दोषी आहे ' त्याला वाटू लागले. निराशेचा पगडा मनावर असल्यामुळे पीएर कोणतीही कृती करायला असमर्थ होता, म्हणूनच त्याने पत्नीशी पुन्हा सलोखा करायला एकाएकी संमती दिली नाही. त्याची पत्नी त्याच्याकडे आली असती तर तो तिला घालवून देऊ शकला नसता. पीएरला देहभान हरपायला लावणारे अनेक प्रश्न होते. पत्नी त्याच्याबरोबर राहिली काय न राहिली काय तिला त्या प्रश्नांपेक्षा अधिक महत्त्व नव्हते.

पत्नीला आणि सासूला उत्तर न धाडता पीएर त्याच रात्री उशिरा बाहेर पडला. ऑसिप् अलेक्स्येविचला भेटण्यासाठी मॉस्कोकडे निघाला.

त्याने डायरीत लिहिले.

मॉस्को–१७ नोव्हेंबर : मी आत्ताच माझ्या उपकारकर्त्यास भेटून आलो. मला काय वाटले ते घाईघाईने कागदावर उतरीत आहे. ऑसिप् अलेक्स्येविच दारिद्र्यात राहात आहेत. गेली तीन वर्षे त्यांना मूत्राशयाची दुःसह व्याधी जडलेली आहे. पण ते कधी कण्हल्याचे वा कुरकुरल्याचे कुणी ऐकले नाही. सकाळपासून रात्री खूप उशिरापर्यंत ते शास्त्राभ्यास करीत

असतात. साधेसुधे जेवण घेण्यासाठी मधे थोडीशी सवड काढतात इतकेच. त्यांनी मोठ्या आपुलकीने माझे स्वागत केले. आपल्या बिछान्यावर मला बसायला लावले.

सौम्य स्मित करून त्यांनी मला विचारले, 'प्रशिया आणि स्कॉटलंड येथील आपल्या संप्रदायाच्या शाखापासून तुम्ही काय शिकला ? काय मिळविलेत ?' मी त्यांना शक्य तेवढ्या गोष्टी सांगितल्या. पीटर्झबर्गच्या शाखेमध्ये मी कोणती तत्त्वे सुचविली, लोकांची प्रतिकूल प्रतिक्रिया कशी झाली, माझ्यामधे आणि सदस्यांमधे मतभेद कसे झाले ते सारेसारे मी सांगितले. ऑसिप् अलेक्स्येविच काही काळ विचारमग्न झाले. त्यांनी त्या विषयावरील आपली मते मला ऐकविली. त्यामुळे लागलीच माझा भूतकाळ आणि माझ्यापुढचा मार्ग यांवर चांगलाच प्रकाश पडला. त्यांनी मला 'संप्रदायाची तीन उद्दिष्टे ठाऊक आहेत का' असा प्रश्न विचारून आश्चर्यचकित केले. त्यांनी मला तीन उद्दिष्टे सांगितली ती अशी : ( १ ) पवित्र रहस्याचे रक्षण आणि अभ्यास, ( २ ) ते रहस्य प्राप्त व्हावे म्हणून आत्मशुद्धी आणि आत्मसुधारणा, ( ३ ) अशा तऱ्हेच्या शुद्धीसाठी केलेल्या प्रयत्नातून मानव जातीची प्रगती. त्यांनी विचारले, 'यातील सर्वश्रेष्ठ उद्दिष्ट कोणते ?' 'अर्थातच दुसरे. आत्मशुद्धी आणि आत्मसुधारणा.' परिस्थितीवर अवलंबून न राहता आपण त्या उद्दिष्टांसाठी नेहमी प्रयत्न करू शकतो. पण ह्याच उद्दिष्टाखातर सर्वांत अधिक प्रयत्न करावे लागतात. गर्वाने आम्ही मार्गभ्रष्ट होतो तेव्हा ते उद्दिष्ट नजरेआड जाते. आत्मशुद्धी न झाल्याने रहस्यप्राप्तीला अपात्र असे आम्ही व्यर्थ धडपडत राहतो, नाहीतर आम्ही स्वतःच दुर्गुणांचे आणि जुगुप्सेचे पुतळे असूनही मानवजातीच्या प्रगतीसाठी प्रयत्न करू पाहतो. 'साक्षात्कार' शुद्ध तत्त्व नाही याचे निश्चित कारण हे की त्याला ऐहिक व्यवहाराचा मोह पडतो आणि ते गर्वाने फुगून जाते.' अशा आधारावर ऑसिप् अलेक्स्येविच यांनी माझ्या भाषणाला आणि माझ्या कार्याला बोल लावला. मनातल्या मनात मी त्यांच्याशी सहमत झालो. माझ्या वैयक्तिक जीवनाबद्दल ते म्हणाले, 'मी तुम्हाला सांगितलेच आहे—मेसनचे प्रथम कर्तव्य निर्दोष जीवन व्यतीत करणे. जीवनातील सगळ्या अडीअडचणी दूर करून हे उद्दिष्ट आपण अधिक चांगल्या तऱ्हेने गाठू असे आपणांस वाटत असते. पण महाशय आपला समज अगदी चुकीचा आहे. जीवनकलहातच आपणाला तीन महान उद्दिष्टे साध्य करता येतील. ( १ ) माणूस स्वतःला तुलनेनेच ओळखू शकत असल्याने आत्मज्ञान होते. ( २ ) केवळ संघर्षातूनच निर्दोष जीवन प्राप्त करता येते. ( ३ ) जीवनातील विनाश पाहून जीवनाची व्यर्थता उमगते; मृत्यूबद्दल उपजत असलेली ओढ वाढीला लागते. पुनर्जन्मावर विश्वास बसतो.' ऑसिप् अलेक्स्येविच यांचे हे शब्द वैशिष्ट्यपूर्ण होते. इतक्या शारीरिक वेदना होऊनही त्यांना जीवन नकोसे झालेले नाही. त्यांना मरणाचे प्रेम आहे आणि त्यांचे अंतःकरण शुद्ध व उदात्त आहे. तरीही आपण मृत्यूला सामोरे जायला सज्ज आहोत असे त्यांना वाटत नाही. मग माझ्या उपकारकर्त्यांने मला सृजनाच्या मोठाल्या चौरसाचा अर्थ विशद करून सांगितला. तिसरा आणि सातवा क्रमांक सर्व गोष्टींना पायाभूत असल्याचे सांगितले. पीटर्झबर्ग येथील सदस्यांना मी सहकार्य

नाकारू नये, तिथल्या शाखेवर दुय्यम प्रतीची कामे करीत असताना मी त्यांना अहंकार होणार नाही याची काळजी घ्यावी, तसेच त्यांना आत्मज्ञानाच्या आणि निर्दोष जीवनाच्या मार्गावर नेण्याचा मी प्रयत्न करावा असा त्यांनी मला सल्ला दिला. मी माझ्या वर्तनावर सतत लक्ष ठेवले पाहिजे. त्यासाठी त्यांनी मला एक वही दिली. त्याच वहीत मी आता लिहीत आहे. भविष्यकाळातील माझ्या सर्व कृतींची नोंद मी या वहीत करायची आहे.'

पीटर्सबर्ग २३ नोव्हेंबर—माझा आणि पत्नीचा समेट झाला. माझ्या सासूबाई येऊन डोळ्यांत पाणी आणून म्हणाल्या : 'एलन इथं आहे. तिचं म्हणणं तुम्ही ऐकून घ्या अशीही तिची विनंती आहे. ती निष्पाप आहे. तुम्ही सोडून गेल्यामुळे ती दुःखी झाली आहे' आणखी काही त्या बोलत होत्या. एकदा का तिची भेट घेतली की मला तिच्या इच्छा मान्य कराव्या लागतील हे मी जाणून होतो. माझ्या मनाचा निर्णय होईना. कोणाची मदत घ्यावी, कोणाचा सल्ला घ्यावा हे सुचेना. माझा उपकारकर्ता इथे असता तर त्याने मी काय करावे हे सांगितले असते. मग मी माझ्या खोलीत गेलो. ऑसिप् अलेक्स्येविच यांनी मला लिहिलेली पत्रे वाचली, त्यांच्यावरोबर झालेले संभाषण आठवू लागलो आणि शेवटी मी निर्णय घेतला.—कुणाची विनवणी मी अव्हेरणे योग्य नाही. प्रत्येकाला मी मदतीचा हात पुढे केला पाहिजे. विशेषकरून जी व्यक्ती मला अगदी जवळची आहे अशा व्यक्तीला मी मदत केली पाहिजे. माझा क्रूस मीच वाहून नेला पाहिजे. योग्य गोष्ट करण्यासाठी मी तिला क्षमा करीत असेन तर आमच्या समेटाला निदान आत्मिक ध्येय असू दे असे मी ठरवले. मी माझा निर्णय ऑसिप् अलेक्स्येविच यांना कळवला. मी माझ्या पत्नीला म्हणालो, 'कृपा करून तू आता मागचे सारे विसरून जा. मी तुझ्यावर अन्याय केला असेल त्याचीही कृपा करून आठवण ठेवू नकोस. मी तुला क्षमा करावी असे तू काही केलेलं नाहीस. मी तुला कशाची क्षमा करू.' असे तिला सांगण्यात मला केवढा आनंद झाला. तिची पुन्हा भेट घेताना मला किती यातना झाल्या त्या तिला कधीही कळू नयेत.' ह्या प्रचंड वाड्याच्या वरच्या मजल्यावर मी राहतो आहे. पुन्हा नव्याने मी आनंदी होऊ लागलो आहे. याची मला जाणीव होऊ लागली आहे.

त्या काळी दरबारात आणि नृत्यसमारंभाला उच्चभ्रू मंडळी जमत होती. नेहमीप्रमाणे त्या मंडळीत वेगवेगळे गट पडत होते. प्रत्येक गटाचा खास ढंग होता. त्या सर्वांत मोठा गट फ्रेंचांचा होता. नेपोलिअनशी दोस्ती करावी असे म्हणणाऱ्या या गटात काउंट रुम्यान्त्सेव्ह आणि कॉलेनकोर्ट होते. पीटर्सबर्गला आपल्या नवऱ्याकडे येऊन स्थिर झालेली एलन ह्या गटात अग्रभागी होती. फ्रेंच वकिलातीतील सभासद, फ्रेंच गटातील बुद्धिचातुर्य आणि सौजन्य याविषयी प्रसिद्ध असलेली बरीचशी माणसे यांचे स्वागत एलनकडे होई.

दोन सम्राटांची इतिहासप्रसिद्ध भेट झाली त्या वेळी एलन एर्फर्ट येथे होती. युरोपातील

नेपोलिअनच्या गटात असणाऱ्या बड्या लोकांशी तिथे तिने घनिष्ठ संबंध जोडले. एर्फर्ट येथे ती विलक्षण यशस्वी झाली होती. एकदा ती नाटकाला गेली असताना प्रत्यक्ष नेपोलिअनने तिच्याबद्दल चौकशी केली होती, तिच्या सौंदर्याची वाखाणणी केली होती. आपल्या लावण्या-मुळे ती यशस्वी झाली होती याबद्दल पीएरला आश्चर्य वाटत नव्हते. वाढत्या वयाबरोबर ती पूर्वीपेक्षा अधिक सुंदर दिसत होती. गेल्या दोन वर्षांत तिच्या लावण्याबरोबर तिच्या बुद्धि-चातुर्याचीही स्तुती केली जात होती. याचे पीएरला आश्चर्य वाटले. ख्यातनाम प्रिन्स द लीन तिला आठआठ पृष्ठांची पत्रे पाठवू लागला. काउंटेस बेझुहॉव्ह समोर पहिल्यांदा उच्चारण्यासाठी बिलबिन सुभाषिते योजून ठेवू लागला. काउंटेस बेझुहॉव्हच्या बैठकीत प्रवेश मिळणे बुद्धि-चातुर्याचे शिफारसपत्र मिळाल्यासारखे होते. तिच्या बैठकीत काहीना काही बोलता यावे म्हणून रात्रीच्या भोजनाला जाण्यापूर्वी तरुण मंडळी नाना विषयांचे वाचन करून येत. परराष्ट्रवकिला-तील बडे बडे अधिकारी तिला विश्वासात घेऊन परराष्ट्रधोरणातील गुपिते सांगत. त्यामुळे एका अर्थाने एलन बडी अधिकारी व्यक्ती बनली होती.

ती मठ्ठ असल्याचे पीएरला ठाऊक होते. त्यामुळे जेव्हा भोजनाच्या वेळी राजकारण, काव्य वा तत्त्वज्ञान यांवर चर्चा सुरू होई तेव्हा पीएर संभ्रमित आणि चकित होऊन ऐकू लागे. त्याची अवस्था मोठी चमत्कारिक होई. प्रत्येक क्षणाला आपली हातचलाखी उघडकीस येईल अशी धास्ती जादूगारास पडावी तसे त्याला प्रत्येक खान्याच्या वेळी वाटू लागे. अशा बैठका यशस्वीरीत्या चालवायला मूर्खपणाचीच आवश्यकता असते म्हणून अगर जे फसले जात त्यांनी फसवणुकीत आनंद मानला असेल म्हणून तिने केलेली फसवणूक उघड झाली नाही. लावण्यवती म्हणून तिची इतकी प्रसिद्धी झाली की ती वाटेल ते मूर्खासारखी बडबडली तरी प्रत्येकजण तिचे उत्साहाने कौतुक करी, तिला कधी माहीत नसलेले खोल अर्थ तिच्या बडबडण्यातून काढू लागे.

मंडळींत वावरणाऱ्या अशा चाणाक्ष स्त्रीला अगदी हवा होता तसा नवरा पीएरच्या रूपाने मिळाला होता. विसराळू, एककल्ली आणि उदार स्वभावाचा हा उमराव कोणाच्या आड येत नव्हता. दिवाणखान्यातील उच्च वातावरण तो कधी बिघडून टाकीत नसे. उलट त्याच्या विरोधी वागण्यामुळे तिच्या सौंदर्याला आणि चाणाक्षपणाला चांगलाच उठाव मिळत होता. गेली दोन वर्षे पीएरने भौतिकेतर विषयांवर आवडीने लक्ष केंद्रित केले होते. इतर गोष्टींबद्दल त्याला खरोखर घृणा निर्माण झाली होती. यामुळे त्याला आपल्या पत्नीभोवती जमणाऱ्या मंडळींत रस वाटत नसे. तो सर्वांशी सारख्याच बेपर्वाईने, उदासीनतेने आणि औदार्याने वागे. त्याचे वागणे इतके अकृत्रिम असे की सर्वांनाच त्याच्याबद्दल आपोआप आदर वाटे. नाटकगृहात शिरल्यासारखा तो आपल्या पत्नीच्या दिवाणखान्यात शिरे, सर्वांशी परिचय करून घेई, सर्वांशी सारख्याच आपुलकीने आणि उदासीनतेने वागे. त्याला प्रिय असणाऱ्या एखाद्या विषयावर बोलणे निघाले तर तो त्यात भाग घेई आणि मग परराष्ट्र–वकिलातीतील बडी प्रस्थे हजर आहेत की नाहीत याचा विचार न करता तो आपली मते पुटपुटू लागे. ती

मते बहुधा त्या वेळच्या लोकप्रिय घोषणांशी जुळती नसत. परंतु अत्यंत प्रसिद्ध स्त्रीचा चक्रम, लहरी नवरा म्हणून त्याची प्रतिमा लोकमानसात एवढी पक्की झाली होती की कुणी त्याच्या टीकेची गंभीरपणे दखल घेत नसत.

एलनच्या घरी नेहमी दिसणाऱ्या तरुणमंडळीत बोरिस द्रबेत्स्कॉय होता. त्याने आता लष्करात चांगली कामगिरी बजावली होती. एलन एर्फर्टहून आल्यापासून तो बेझुहॉव्ह कुटुंबाचा जिवलग स्नेही झाला होता. एलन त्याला मुलाप्रमाणे वागवी. इतरांप्रमाणे ती त्याच्याशीही स्मित करी, पण ते स्मित पाहून पीएरला केव्हा केव्हा अतिशय घृणा वाटे. बोरिस पीएरशी लक्षात येईल अशा आदराने वागे. त्यामागे प्रतिष्ठा असे. ह्या आदरामुळेही पीएर अस्वस्थ होई. गेली तीन वर्षे पत्नीने केलेल्या मानखंडनेमुळे त्याला इतका त्रास झाला होता की, तो आता तशा तऱ्हेची मानखंडना होऊ नये याची शक्य ती काळजी घेऊ लागला. तो आता केवळ नावापुरता तिचा नवरा उरला होता. तिच्याबद्दल कसलाही संशय त्याने मनात ठेवला नव्हता. ' आता ती कलाभिरुची असलेली बुद्धिमान स्त्री झाली आहे. तिने आता पूर्वीचे दोष कायमचे टाकले आहेत. अशा बुद्धिमान स्त्रिया क्षणिक विकाराच्या आहारी कधीही जात नसतात ' तो कुठेतरी ऐकलेले अवतरण उद्धृत करून स्वतःशी बोले. त्या अवतरणावर त्याचा विश्वास होता. पण गंमत अशी की जेव्हा जेव्हा तो बोरिसला दिवाणखान्यात आपल्या पत्नीच्या सहवासात पाही—तसा बोरिस नेहमीच तिथे असे—तेव्हा त्याच्या शरीरावर त्याचा परिणाम होई. त्याचे सारे अवयव आकुंचल्यासारखे होत. त्याच्या हालचाली सहज आणि मुक्त होत नसत.

' एकाकाळी तो मला किती आवडत असे. आता त्याच्याबद्दल मला तिरस्कार वाटतो. किती विचित्र' पीएरला वाटे.

जगाच्या दृष्टीने मोठा उमराव असलेला पीएर सुविख्यात स्त्रीचा काहीसा आंधळा आणि मूर्ख नवरा होता. हुषार पण चक्रम, निष्क्रिय पण कुणाला त्रास न देणारा असा फार भला इसम होता. ह्या अवधीत पीएरच्या मनात आंतरिक विकासाची जटिल प्रक्रिया चालूच होती. त्या प्रक्रियेमुळेच त्याला खूप कळू लागले; पारमार्थिक जीवनातील संभ्रम आणि आनंद यांची ओळख झाली.

रोस्तॉफ कुटुंबाने दोन वर्षे खेड्यात काढली पण त्यांची आर्थिक स्थिती सुधारली नाही. निकोलाय रोस्तॉफ कसोशीने आपला निश्चय अमलात आणीत होता. कुठल्यातरी अज्ञात रेजिमेंटमधे तो अगदी साधेपणाने राहत होता आणि इतरांच्या मानाने फार थोडा खर्च करीत होता. ऑट्रॅड्नू येथील राहणी आणि त्याहीपेक्षा मायटेङ्काने ठेवलेली व्यवस्था यामुळे कर्ज भरमसाठ वाढत चालले होते. सरकारी नोकरी करूनच काही उत्पन्न मिळाले असते.

त्याखेरीज दुसरा मार्ग थोरल्या काउंटला दिसत नव्हता. तरी एखादी नोकरी मिळवावी आणि आपल्या कुटुंबातील तरुण मुलींना शेवटी शेवटी तरी सुखात ठेवावे या उद्देशाने थोरला काउंट पीटर्झबर्ग येथे आला.

मॉस्कोमधे रोस्तॉफ कुटुंब सुप्रतिष्ठित मानले जाई. त्यांना त्याची दखल नव्हती. आपण कुठल्या वर्गात मोडतो आहोत हे जाणून घ्यायची उत्सुकता कधी त्यांनी दाखवली नव्हती. पीटर्झबर्गमधे त्यांचे स्थान अनिश्चित होते. पीटर्झबर्गमधे ते गावठळ लोक ठरले होते. रोस्तॉफ कोणत्या कुटुंबात मोडतात याचा विचार न करता त्यांच्या खर्चाने मॉस्कोमधे जेवणारे लोक आता पीटर्झबर्गला त्यांच्याकडे येईनासे झाले होते.

रोस्तॉफ कुटुंबाने मॉस्कोतल्याप्रमाणे पीटर्झबर्गमधेही आपल्या घराचे दरवाजे सर्वांसाठी खुले ठेवले होते. त्यांच्या रात्रीच्या जेवणाला निराळ्या प्रकारचे लोक जमलेले दिसत: खेड्यातील शेजारी, सांपत्तिक स्थिती खालावलेले वृद्ध आणि त्यांच्या मुली, वृद्ध दासी, पेरॉन्स्कीबाई, पीएर बेझुहॉव्ह, पीटर्झबर्ग येथील ऑफिसात असणारा जिल्हा पोस्टमास्तराचा मुलगा इ. माणसे जमत. नेहमी रोस्तॉफ कुटुंबात येऊन मिसळण्यात आणि मैत्री करणाऱ्या माणसांत बोरिस, पीएर आणि बर्ग हे तरुण होते. थोरल्या काउंटने रस्त्यात भेटलेल्या पीएरला जवळजवळ ओढतच घरी आणले होते. बर्ग दिवसच्येदिवस रोस्तॉफ कुटुंबाच्या संगतीत घालवी. मागणी घालू इच्छिणारा तरुण आपल्या प्रेयसीच्या जसा पुढेपुढे करतो तसा बर्ग थोरली बहीण काउंटेस व्हेरा हिच्या बाबतीत करीत होता.

ऑस्टरलिट्सच्या लढाईत जखमी झालेला आपला उजवा हात आणि डाव्या हातात उगाच धरलेली तलवार बर्ग प्रत्येकाला दाखवीत होता. त्याचा लोकांवर परिणाम होई. त्याने प्रत्येकाला ती घटना इतक्यांदा सांगितली होती आणि इतक्या अभिमानाने सांगितली होती की प्रत्येकाला त्याचा पराक्रम योग्य होता आणि उपयुक्त होता असे वाटू लागले. बर्गला दोन पदकेही त्यासाठी मिळाली होती.

फिन्लंडमधील लढाईतही त्याने नाव कमावले होते. कमांडर-इन्-चीफच्या अगदी जवळ ज्या हातगोळ्याने ॲडज्युटंट ठार झाला होता त्या गोळ्याचा काही भाग उचलून त्याने कमांडरकडे नेऊन दिला. ऑस्टरलिट्सच्या युद्धाप्रमाणे याही युद्धाबाबत तो कितीतरी वेळ चिकाटीने बोलत राहिला त्यामुळे ह्याने जे केले ते कुणीतरी करायलाच पाहिजे होते असे लोकांना वाटू लागले. मग फिन्लंडमधील लढाईसाठी देखील बर्गला दोन पदके मिळाली. १८०८ मध्ये तो संरक्षणदलात कॅप्टन झाला. त्याच्या छातीवर पदके लागली होती. पीटर्झबर्गमधे महत्त्वाची अधिकारपदे त्याला मिळत गेली.

बर्गच्या गुणाचा उल्लेख झाला की हसणारे काही अश्रद्ध लोक होते, तरीही बर्गमधील काही गुण त्यांना नाकारता आले नसते. तो शूर ऑफिसर होता, आपल्या कामात नेहमीच वक्तशीर होता, वरिष्ठांचे त्याच्याबद्दल चांगले मत होते, सदसद्विवेकबुद्धी असलेला तो तरुण होता, त्याचे भवितव्य उज्ज्वल होते आणि त्याला समाजात मानाचे स्थान होते.

चार वर्षांपूर्वी मॉस्को येथील नाटकगृहात बर्गला एक जर्मन सहकारी भेटला. त्याला दुरून व्हेरा रोस्तॉफकडे बोट दाखवून बर्ग जर्मन भाषेत म्हणाला, ' त्या मुलीशी मी लग्न करणार आहे. ' त्या क्षणापासून त्याने तिच्याशी लग्न करण्याचा निश्चय केला होता. पीटर्सबर्गला आल्यावर त्याने आपल्या आणि रोस्तॉफ कुटुंबाच्या परिस्थितीचा चांगला विचार केला. योग्य वेळ आली आहे असे वाटताच त्याने व्हेराला मागणी घातली.

बर्गने मागणी घातली तेव्हा त्याला लागलीच होकार मिळाला नाही. त्याचे कारण बर्गबद्दल त्यांचे मत मुळीच अनुकूल नव्हते.

काउंटेस रोस्तॉफला लिव्होनियातील एका अपरिचित माणसाने मागणी घालावी हे त्यांना चमत्कारिक वाटले. पण बर्गच्या स्वभावाचे प्रमुख वैशिष्ट्य होते भोळाभाबडा आणि सुखभावी अहंभाव. त्यामुळे रोस्तॉफ कुटुंबाला नकळत वाटू लागले–आपण मागणी घातली ही गोष्ट फार चांगली केली अशी बर्गची खात्री आहे त्याअर्थी ती गोष्ट नक्कीच चांगली असली पाहिजे. खेरीज आर्थिक बाबतीत रोस्तॉफ कुटुंबाने अगदी संकोचून राहावे अशी स्थिती होती. आणि ह्या स्थितीची कल्पना मागणी घालणाऱ्याला नव्हती असे नाही. चोवीस वर्षांच्या व्हेराला अनेक ठिकाणी दाखवण्यात आले होते पण ती सुंदर आणि सुजाण असूनही अजून कोणी तिला मागणी घातलेली नव्हती. ह्या सर्व कारणांमुळे बर्गच्या मागणीस होकार देण्यात आला.

बर्ग आपल्या सहकाऱ्याला म्हणाला, ' मित्रा, मी सगळ्या गोष्टींचा पूर्ण विचार केला आहे. मी पूर्ण विचार केला नसता आणि लग्न कोणत्याही दृष्टीनं मला अयोग्य वाटलं असतं तर मी लग्नाला तयार झालो नसतो. आज माझ्या आईवडिलांची सोय नीट लागली आहे. ऑस्ट्सी जिल्ह्यात मी त्यांच्यासाठी भाड्याने जागा घेतली आहे. माझा पगार, तिच्या वाट्याला आलेली संपत्ती आणि माझ्या काटकसरीच्या सवयी यामुळे मी पीटर्सबर्गला चांगल्या तऱ्हेनं राहू शकेन. आमचं चांगलं चालेल. मी पैशासाठी लग्न करीत नाही. पैशासाठी लग्न करणं माझ्या दृष्टीनं रानटीपणाचं आहे. तरीही नवऱ्यानं उचलायला हवा तसा पत्नीनंही काही वाटा उचलावा. मला लष्करात चांगली नोकरी आहे. तिच्या ओळखी, नाती आहेत. खेरीज उत्पन्नाची काही साधनं आहेत. आताशा त्या गोष्टींनाही महत्त्व आहे. नाही का? विचारात घेण्याजोगी सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिचं रूप, तिचं चारित्र्य आणि तिचं माझ्यावरील प्रेम. ' बर्ग लाजला आणि हसला.

' मला ती आवडते याचं कारण ती विचारी आहे, गोड स्वभावाची आहे. तिच्याच कुटुंबातील तिची बहीण अगदी वेगळी आहे. मला तिचा स्वभाव आवडत नाही. हिच्या शतांशही तिला बुद्धी नाही. ती काहीशी...मला आवडत नाही हे खरं...उलट माझी वाग्दत्त वधू...तू एकदा आमच्याकडे येच. '

बर्ग ' भोजनाला ये ' असं म्हणणार होता. पण त्याने थोडा विचार करून म्हटले, ' चहालाच ये ना. ' मग त्याने जीभ बाहेर काढून हवेत लहानसे धूम्रवलय सोडले. जणू त्या धूम्रवलयाच्या रूपाने त्याचे सुखस्वप्न समूर्त झाले होते.

वर्गच्या मागणीमुळे प्रारंभी व्हेराच्या आईवडिलांना काय करावे हे कळत नव्हते. मग मात्र अशा प्रसंगाला साजेसा आनंदीआनंद कुटुंबात सुरू झाला. तरी तो आनंद वरवरचा होता, सच्चा नव्हता.

ह्या विवाहाच्या बाबतीत तिच्या नातलगांना काहीसा संकोच, शरम वाटत असल्याचे दिसून येत होते. आतापर्यंत प्रिय असलेल्या व्हेराला आपण एकदा खपवण्याला तयार झालो आहोत याची टोचणी त्यांच्या विवेकबुद्धीला लागली होती. थोरला काउंट सर्वात अधिक बेचैन झाला होता. आपण निश्चित कोणत्या कारणामुळे बेचैन आहोत हे त्याला सांगता आले नसते. पण ह्या गोष्टीच्या बुडाशी आर्थिक अडचण होती. आपल्याकडे किती पैसा आहे. आपल्या कर्जाची रक्कम किती वाढली आहे, व्हेरासाठी आपण किती हुंडा देऊ शकू - त्याला काहीही सांगता आले नसते. प्रत्येक मुलीला जन्मतःच हिस्सा काढून ठेवण्यात आला होता. प्रत्येकीला तीनशे कुळे काम करीत असलेली शेतवाडी देण्यात आली होती. त्या शेतवाड्यांपैकी एक विकून टाकलेली होती. बाकीच्या गहाण टाकण्यात आल्या होत्या. त्यावर काढलेल्या कर्जावरील व्याजाची बाकीच इतकी होती की त्या विकून टाकणे भाग होते. सारांश, शेतवाडी किंवा रोख पैसे देणे अशक्य होते.

वर्ग–व्हेरा यांचा वाङ्‌निश्चय होऊन महिन्याहून अधिक काळ लोटला होता. लग्नाला अजून एक आठवडा होता. तरीही हुंड्याची व्यवस्था काय करावी याचा निर्णय थोरल्या काउंटला घेता येत नव्हता. त्याबाबत तो आपल्या पत्नीला अजून काही बोलला नव्हता. रॅझान शेतवाडी व्हेराला देऊन टाकावी का ? अरण्य विकून टाकावे का ? प्रॉमिसरी नोट देऊन पैसे उसने घ्यावेत का ? त्याचा निर्णय होत नव्हता.

लग्नाला थोडे दिवस उरले असताना वर्ग एका सकाळी काउंटच्या खोलीत शिरला. गोड हास्य करून त्याने आपल्या सासऱ्याला हुंड्याबाबत विचारले. थोरल्या काउंटला या चौकशीची कितीतरी दिवस कल्पना होती. वर्गच्या प्रश्नाने तो इतका अस्वस्थ झाला की जे सुचले ते त्याने म्हटले. ' तुझा व्यवहारीपणा मला आवडला. तुमचं समाधान होईल अशा साऱ्या गोष्टी होतील...'

वर्गच्या खांद्याला थोपटून संभाषण थांबवण्याच्या उद्देशाने तो उठला. सौम्यपणे हसत वर्गने ऐकवले, ' निश्चित हुंडा किती मिळणार आहे हे कळलं नाही तर आणि त्यातील काही रक्कम आगाऊ मिळाली नाही तर मला हे लग्न मोडावं लागेल. माझ्या पत्नीच्या उपजीविकेची सुरक्षितता न पाहताच मी लग्न केलं तर मी दुष्टपणा केला असं होईल. '

आपण औदार्यात कमी पडू नये आणि त्याने आणखी विनंती करू नये या इच्छेने थोरला काउंट ऐंशी हजार रुबलांची प्रॉमिसरी नोट लिहून द्यायला तयार झाला. वर्गने प्रेमळ स्मित केले. काउंटच्या खांद्याचे चुंबन घेतले आणि म्हटले, ' रोख तीस हजार रुबल मिळाल्याखेरीज मला नव्या संसाराला प्रारंभ करता येणार नाही. काउंट, कमीत कमी वीस हजार रुबल तरी रोख पाहिजेत. मग तुम्ही साठ हजारांची प्रॉमिसरी नोट दिली तरी हरकत नाही.

काउंट घाईघाईने म्हणाला, 'ठीक आहे. माफ कर. मी तुला फक्त वीस हजार रूबल रोख देईन आणि ऐंशी हजारांची प्रॉमिसरी नोट देईन. मग तर झालं ना?' त्याने चुंबन घ्यावे म्हणून काउंट वाकला

१८१० साल उजाडले. त्याच्या आदल्या रात्री कॅथरीनच्या दरबारातील एका बड्या असामीने नृत्यसमारंभ योजला होता. त्याला झार आणि परराष्ट्र वकिलातीतील माणसे हजर राहणार होती.

त्या बड्या असामीच्या प्रसिद्ध वाड्यावर चांगलीच रोषणाई केलेली होती. लोकरीच्या लाल जाड्याभरड्या कापडाने मढवलेल्या प्रवेशद्वारावरही रोषणाई होती. प्रवेशद्वाराशी पोलिस आणि दहावारा अधिकारी उभे होतेच. शिवाय पोलिस कमांडरही उभा होता. तिथे गाड्यांची सारखी ये-जा सुरू झाली होती. गाड्यांबरोबर लाल गणवेषातले आणि टोप्यांना पिसे लावलेले नोकर दिसत होते. सॅटिनच्या आणि अर्मिनच्या लोकरीच्या पोषाखातील स्त्रिया काळजीपूर्वक गाड्यांच्या पायऱ्यांवर पाऊल ठेवीत होत्या. त्यासरशी आवाज होऊन पायऱ्या खाली जात होत्या. त्या स्त्रिया घाईघाईने आवाज न करता प्रवेशद्वारात अंथरलेल्या लोकरीच्या लाल रुजाम्यावरून जात होत्या.

बरीचशी पाहुणेमंडळी समारंभाला आली तरी रोस्तॉफकुटुंब अजून घाईघाईने तयारीच करीत होते.

रोस्तॉफकुटुंबात या समारंभाबाबत किती चर्चा झाल्या, किती काळ तयारी चालली! आपल्याला आमंत्रण येणार नाही, पोषाख वेळेवर मिळणार नाही, योजलेल्या गोष्टी मनाजोगत्या घडणार नाहीत अशी त्यांना भीती वाटत होती.

मार्या इग्नात्येव्ना पेरॉन्स्की काउंटेसची मैत्रीण आणि नातेवाईकही होती. पूर्वीच्या दरबारात ती ज्येष्ठ सखी म्हणून वावरलेली होती. खेड्यातून आलेल्या रोस्तॉफकुटुंबाला पीटर्सबर्गच्या उच्चभ्रू मंडळींत वावरण्यासाठी मार्गदर्शन करण्याचे काम ती करीत होती. ती देखील त्या रात्री त्यांच्याबरोबर समारंभाला जाणार होती.

दहा वाजता रोस्तॉफकुटुंबातील माणसे ताव्रिचेस्की बागेकडे जाऊन मार्या पेरॉन्स्कीला भेटणार होती. पण दहाला पाच मिनिटे होती तरीही तरुण मुलींची वेषभूषा व्हायचीच होती.

नताशा नाचसमारंभाला अशी पहिल्यांदाच जात होती. ती सकाळी आठ वाजता उठली होती. सगळा दिवस उत्साहाने काही ना काही करण्यात तिने घालवला होता. आपण स्वतः आई, सोन्या या सर्वांनी जास्तीत जास्त चांगला पोषाख करावा यासाठी ती दिवसभर आपली शक्ती वेचीत होती. सोन्या आणि तिची आई यांनी आपणाला सर्वस्वी तिच्या हातात सोपवले होते. काउंटेस लाल गडद मखमली पोषाख करणार होती; त्या दोन तरुण मुली

गुलाबी रंगाच्या रेशमी अंतर्वस्त्रावर तलम शुभ्र कपडे घालणार होत्या; काचोळीला गुलाब खोवणार होत्या; ग्रीक पद्धतीने केशभूषा करणार होत्या.

आवश्यक त्या साऱ्या गोष्टी झाल्या. पावले, हात, मान आणि कान धुऊन त्यांवर अत्तर आणि पावडर लावण्यात आली. त्यांनी रेशमाचे जाळीदार पायमोजे घातले आणि सॅटिनच्या फिती असलेल्या चपला चढवल्या. केशभूषा जवळ जवळ पूर्ण होत आली होती. सोन्याने आणि काउंटसनेही केशभूषा पुरी करीत आणली होती. इतरांकडे लक्ष देत असल्यामुळे नताशाला केशभूषा करायला उशीर होत होता. आपल्या कृश खांद्यांवर ड्रेसिंग गाऊन टाकून ती आरशासमोर बसली होती. सोन्या पोषाख करून तयार होती. खोलीच्या मध्यभागी राहून ती शेवटची फीत बांधण्याचा प्रयत्न करू लागली. रेशमी कपड्यात पिन सारताना तिच्या बोटाला इजा झाली.

'झाली का तयारी? आता एका मिनिटात दहा वाजतील' त्यांना काउंटेसचा आवाज ऐकू आला.

'झालंच...आता आल्ये...ममा. तुझी झाली का तयारी?'

'फक्त टोपी तेवढी बांधायची आहे.'

'माझ्या मदतीशिवाय बांधू नको. तुला कशी बांधायची माहीत नाही.' नताशा ओरडली.

'अग, पण दहा वाजून गेलेत.'

वेषभूषा पुरी झाल्यावर आईचं जाकिट आणि आखूड पेटीकोट घालून नताशा सोन्याकडे धावली. सोन्याच्या वेशभूषेवर दृष्टी टाकून ती आईकडे वळली. डोके वळवीत तिने आईच्या टोपीला पिन लावली. तिच्या पांढऱ्या केसांचे चुंबन घेऊन ती पुन्हा धावत दासीकडे आली. दासी तिचा स्कर्ट आखूड करू लागल्या.

आता सर्वांचे लक्ष नताशाला बराच लांब होणाऱ्या स्कर्टवर खिळले. दोघीजणी टोकाचे दोरे काढीत तो आखूड करण्यात गढल्या. तिसरी दातात पिना धरून काउंटेसकडून सोन्याकडे धाव घेत होती.

'मावरुश्का, गडे जलदी कर ना.'

'ते अंगुस्तान इकडे द्या.'

दरवाजाबाहेरून काउंटेस ओरडली 'अग घाई कर.' मग ती आत येत म्हणाली, 'हे तुझं हुंगण्याचं औषध घे. पेरॉन्स्कीबाई वाट पाहून पाहून कंटाळल्या असतील.'

'झाला. आता घालायला लागा' दासीने आखूड झालेला रेशमी स्कर्ट दोन बोटांवर धरून उचलला. त्याच्यावर फुंकर घालून काहीतरी उडवून हलके झटकला.

नताशा पोषाख चढवू लागली.

'पपा, एका मिनिटात आटोपते. आत येऊ नका.' दाराशी असलेल्या वडिलांना तिने ओरडून सांगितले. तेव्हा त्या रेशमी वस्त्रात तिचा चेहरा झाकला गेला होता. सोन्याने दरवाजा धाडदिशी लावला. मिनिटानंतर काउंटला आत प्रवेश मिळाला. काउंटने निळा फ्रॉक कोट

घातला होता. पायात मोजे आणि नाचाचे खास जोडे होते. त्याने कपड्यांवर अत्तर चोपडले होते. केसांना पोमेड लावले होते.

खोलीच्या मध्यभागी उभी राहून आपल्या वस्त्राच्या चुण्या थोपटीत ती म्हणाली. ' पपा, किती छान दिसता तुम्ही. '

त्याच वेळी टोपी आणि मखमली गाऊन घातलेली काउंटेस संकोचून हलक्या पावलांनी खोलीत आली.

' ओहो ! काय मस्त दिसते ! तुम्हा सर्वांपेक्षा ती सुंदर दिसते आहे ! ' काउंट ओरडला. तो तिला कवेत घेण्याच्या बेतात होता. पण लाजलेली काउंटेस कपडे चुरतील म्हणून दूर झाली.

' ममा, टोपी ह्या बाजूला कलती पाहिजे. मी पुन्हा पिन लावते. ' असे म्हणत नताशा वेगाने तिच्याकडे धावली.

एकदाची सव्वा दहा वाजता ती मंडळी गाडीत बसली. तेव्हा गाडी निघाली. अजून त्यांना ताव्रिचेस्की बागेकडे जायचे होते.

पेरॉन्स्कीबाई तयार होऊन वाट पाहात होती. ती वृद्ध होती. दिसायला बरी नव्हती. नाच-समारंभाच्या तयारीसाठी ती रोस्तॉफकुटुंबाप्रमाणे धांदल, घाई करीत नव्हती. नित्यासारखे तिचे काम चालले होते. आकर्षक नसलेली ती प्रौढ स्त्री स्नान करून अत्तर चोपडून व पावडर लावून तयार राहिली होती. पिवळा गाऊन घालून वर प्रमुख सखीचा बिल्ला लावून ती दिवाणखान्यात आली तेव्हा तिच्या वृद्ध दासीने रोस्तॉफच्या दासीप्रमाणे तिचे कौतुक केले त्याला सीमा नव्हती. पेरॉन्स्कीबाईने रोस्तॉफकुटुंबियांच्या वेषभूषेची स्तुती केली. त्यांनीही तिच्या पोषाखाची आणि तिच्या अभिरुचीची प्रशंसा केली. मग आपल्या केशभूषेची आणि पोषाखाची काळजी घेत त्या अकरा वाजता गाडीत बसून समारंभाच्या ठिकाणाकडे निघाल्या.

नताशाला दिवसभर उसंत मिळाली नव्हती. आपल्यापुढे काय मांडून ठेवले असेल याचा विचार करायला तिला वेळच मिळाला नाही.

हवा दमट, थंड होती. हालत्या गाडीच्या बंदिस्त अंधाऱ्या जागेत बसून ती आता पहिल्यांदाच आपल्यापुढे काय वाढून ठेवले असेल याची कल्पना करू लागली. दालना-दालनातील झगमगाट, फुले, संगीत, नाच, झार, पीटर्सबर्गमधील सगळी हुशार तरुण मंडळी यांबद्दल ती विचार करू लागली. तिच्या समोरील भावी जीवन इतके रम्य होते की ते जीवन प्रत्यक्षात येईल यावर तिचा विश्वास बसत नव्हता. सर्द हवा, अंधार आणि गाडीतील बंदिस्त जागा या गोष्टींशी ते भावी जीवन विसंवादी होते.

तांबड्या लोकरीच्या मार्गावरून ती प्रवेशद्वारात शिरली, तिने आपला वरचा बिनबाह्यांचा

अंगरखा काढून घेतला, आईला मागे ठेवून फुलझाडांच्या कुंड्यांमधून, रोषणाई केलेल्या जिन्यावरून ती सोन्याबरोबर जाऊ लागली. त्या वेळी पुढच्या प्रसंगाची तिला केवळ कल्पना आली होती. पण आता मात्र आपण नाचसमारंभात कशा प्रकारे वागले पाहिजे याची तिला आठवण झाली. तिच्या मते नाचसमारंभात भाग घेणाऱ्या तरुण मुलीला अत्यावश्यक असणारा रुबाब ती आपल्या वागण्यात आणण्याचा प्रयत्न करू लागली.

सुदैवाने तिला डोळ्यांसमोर अंधारी आल्यासारखे वाटले. तिला समोर काहीच स्पष्टपणे दिसेना. तिची नाडी जोरजोराने उडू लागली. काळीज वेगाने धडधडू लागले. त्यामुळे तिचे वागणे हास्यास्पद झाले नाही. मनात उद्‌भवलेली खळबळ शक्य तेवढी दडवण्यासाठी ती धडपडू लागली.

आणि ह्या अशा मनःस्थितीतच ती सुंदर दिसत होती. तिच्यामागून आणि तिच्यापुढेही पाहुण्या चालत होत्या. नृत्यसमारंभासाठी त्यांनी तिच्यासारखाच पोषाख केला होता. तिच्याप्रमाणेच त्याही हळू आवाजात बोलत होत्या. उघड्या हातात आणि गळ्यात रत्नांचे आणि मोत्यांचे अलंकार ल्यायलेल्या पांढऱ्या, निळ्या आणि गुलाबी पोषाखातील स्त्रियांची प्रतिबिंबे जिन्याच्या बाजूच्या आरशाआरशातून उमटत होती.

नताशाला आपले प्रतिबिंब इतरांच्या प्रतिबिंबाहून वेगळे दिसत नव्हते. आरशांमध्ये सर्वांची एक लखलखती मिरवणूक चालल्याचे दिसत होते. ती पहिल्या दालनाच्या दाराशी गेली तेव्हा कोलाहल, पावलांचे आवाज, स्वागताचे शब्द यांमुळे बधीर झाली. आतल्या झगमगाटाने तिचे डोळे दिपले. येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत तेच तेच शब्द उच्चारीत दाराशी उभे राहिलेले यजमान आणि यजमानीणबाई करीत होते. त्याच शब्दांनी त्यांनी रोस्तॉफकुटुंबातील माणसे आणि पेरॉन्स्कीबाई यांचे स्वागत केले. दोन्ही तरुण मुलींनी सारखाच पांढराशुभ्र पोषाख केला होता. दोघींनीही सारख्याच तऱ्हेची गुलाबाची फुले माळली होती. त्यांनी सारख्याच तऱ्हेने झुकून प्रणाम केला. तरीही यजमानीणबाईंचे लक्ष नकळत त्यांतील नाजूक देहाच्या नताशावर अधिक काळ स्थिर झाले. तिने नताशाकडे पाहून स्मित केले. त्या स्मितात स्वागताच्या वेळी इतरांशी केलेल्या स्मितापेक्षा काहीतरी अधिक होते. यजमान देखील नताशाला न्याहळीत राहिला. त्याने काउंटला विचारले, ' यातील तुमची मुलगी कोणती ? '

' फार सुंदर ! ' यजमान आपल्या बोटांच्या अग्रांचे चुंबन घेत म्हणाला.

नृत्यदालनाच्या दाराशी पाहुणे मंडळी झारची वाट बघत गर्दी करून राहिली. काउंटेसने ह्या गर्दीत पहिल्या रांगेत जागा पटकावली होती.

पेरॉन्स्कीबाई काउंटेसला नाचसमारंभास आलेल्या बड्या बड्या व्यक्ती दाखवीत होत्या. ' तो पांढऱ्या केसांचा माणूस . तो डच परराष्ट्रवकिलातीत आहे. . .' पेरॉन्स्कीबाई विपुल रुपेरी केस असलेल्या वृद्ध माणसाकडे बोट दाखवून सांगत होती.

एलनने प्रवेश केला तशी पेरॉन्स्कीबाई म्हणाली, ' ही आता आली ती पीटर्सबर्गच्या उच्चभ्रू मंडळीतील सम्राज्ञी. तिचं नाव काउंटेस बेझुहॉव्ह. '

'किती सुंदर ! सगळे पुरुष तरुण नि वृद्ध–तिच्याकडे कसे टक लावून बघताहेत बघ ! ती नुसती सुंदर नाही, हुशारदेखील आहे. तो फलाणा प्रिन्स तर तिच्यासाठी जीव टाकतो म्हणतात. त्या दोघीजणी पाहिल्यास ? रूप तर यथातथाच आहे. पण त्यांच्यासाठी कितीजण तरी मरत असतात.'

आपल्या कुरूप मुलीला घेऊन दालनातून जात असलेल्या एका स्त्रीकडे तिने बोट दाखवले. 'ती लाखाची वारस आहे...आणि ते बघ...तिचे प्रियकर येताहेत...तो काउंटेस बेझुहॉव्हचा भाऊ अनातोल कुरॅगिन.' तिने संरक्षक घोडदलातील देखण्या ऑफिसरकडे बोट करीत म्हटले. उंच अनातोल त्यांच्या डोक्यांवरून पलीकडे पाहात कुणाला तरी शोधीत चालला होता. 'तो खूप देखणा आहे, नाही !...असं म्हणतात तो लाखाची वारस असलेल्या त्या स्त्रीशी लग्न करणार आहे. बोरिस द्रबेत्स्कॉयदेखील तिच्या प्रेमात पडला आहे. तिच्याकडे कैक लाखांची संपत्ती आहे असं म्हणतात. तो ना ? तो फ्रेंच परराष्ट्र वकील आहे.' काउंटेसने कॉलैनकोर्टबद्दल चौकशी केली तेव्हा पेरॉन्स्कीबाईने माहिती पुरवली. 'तो कसा एखाद्या राजासारखा आहे. तशी फ्रेंच माणसे काही झालं तरी चांगली माणसं असतात ! त्यांच्या-सारखी चांगली माणसं उच्च गोटात विरळाच !'

बेझुहॉव्हकडे बोट करीत पेरॉन्स्कीबाई म्हणाली, 'तो बघ. चश्मा घातलेला तो लठ्ठ प्राणी बघितलास ? तो विश्वबंधू फ्रीमेसन. त्याला त्याच्या बायकोजवळ उभा केला म्हणजे त्याच्या-सारखा विदूषक तोच.'

बाजारातील गर्दीतून रेंगाळत चालल्यागत त्याची लठ्ठ मूर्ती दोन्ही बाजूंना कलत अगदी आरामात गर्दीतून चालली होती. कोणालातरी शोधण्यासाठी तो गर्दीतून वाट काढत होता.

पीएरचा—पेरॉन्स्कीबाईच्या भाषेत विदूषकाचा–चेहरा पाहताच नताशाला आनंद झाला. तो गर्दीतून आपणा सर्वांना – विशेषतः आपल्याला—शोधीत असल्याचे तिने ओळखले. पीएरने नाचसमारंभाला येऊन तिला जोडीदार मिळवून देण्याचे वचन दिलेले होते. तारकाकृती पदके छातीवर धारण करणाऱ्या एका उंच माणसाशी अतिशय देखणा, मध्यम उंचीचा आणि पांढऱ्या गणवेषातील एक तरुण खिडकीजवळ राहून बोलत होता. त्यांच्याकडे येण्यापूर्वी त्या तरुणाजवळ पीएर थांबला.

सफेत गणवेषातील त्या देखण्या तरुणाला नताशाने लागलीच ओळखले. तो बोलकॉन्स्की होता. तिला तो आता अधिकच तरुण, प्रसन्न आणि देखणा वाटू लागला.

'ममा, आपल्या ओळखीची आणखी एक व्यक्ती आहे. बोलकॉन्स्कीला पाहिलंस का ?' प्रिन्स आन्द्रेकडे बोट दाखवीत ती म्हणाली. 'ऑट्रॅड्नूला आपल्या घरी त्याचा एक रात्र मुक्काम होता. तुला आठवत नाही का ?'

तशी पेरॉन्स्कीबाई म्हणाली, 'तुम्ही त्याला ओळखता वाटतं ? सगळेजण त्याच्यासाठी जीव टाकतात. मला मात्र तो डोळ्यांसमोर नको वाटतो. त्याच्या ढोंगीपणाला तर सीमाच नाही. तो अगदी आपल्या बापाच्या वळणावर गेला आहे. सुधारणेसाठी काही योजना आखणाऱ्या

स्पेरान्स्कीशी आता त्याचे निकटचे संबंध आहेत. तो स्त्रियांशी कसा वागतो ते तर पाहा. ती त्याच्याशी बोलते आहे आणि हा गडी तिच्याकडे पाठ फिरवून उभा आहे.' त्याच्याकडे बोट करीत ती म्हणाली, 'त्या बायकांशी वागतो तसा जर तो माझ्याशी वागला तर मी लागलीच त्याला चांगला धडा शिकवीन.'

एकाएकी जमावात खळबळ उडाली. लोक आपापसात बोलत पुढे घुसले, मग बाजूला सरले आणि मग एकाएकी सुरू झालेल्या बँडच्या तालावर मोकळ्या झालेल्या जागेतून झारची स्वारी चालू लागली. अभिवादनाला लागलीच प्रत्युत्तर देण्यासाठी की काय दोन्ही बाजूंना मान झुकवीत झार भरभर चालत होता.

झार दिवाणखान्यात शिरला तशी लोकांनी दाराशी घुसून गर्दी केली. मग ते मागे वळले तेव्हा त्यांचे चेहरे फुलून गेले होते. झार यजमानीणबाईशी बोलत दिवाणखान्याच्या दाराशी आला तशी लोक तेथून दूर जाऊ लागले. भ्रमिष्ट झाल्यासारखा दिसणारा एक तरुण स्त्रियांवर डाफरत होता आणि त्यांना दूर व्हायला विनवीत होता. कित्येक माणसे सभ्यतेचे नियम विसरून पुढे घुसण्याची संधी साधीत होती. कपडे मळले, फाटले तरी त्यांना त्याची पर्वा नव्हती. तरुण नृत्यासाठी जोडीदारणी निवडू लागले. नृत्यासाठी जोड्या जमू लागल्या.

झार स्मित करीत दिवाणखान्यातून बाहेर पडला. त्याने यजमानीणबाईला नृत्यासाठी बरोबर घेतले. त्याची पावले तालावर पडत नव्हती. त्यांच्यामागून मार्या अॅन्टोनोवना मारिश्किनला घेऊन यजमान आला. त्याच्यामागून परराष्ट्र वकील, मंत्री आणि निरनिराळे जनरल नृत्याला येऊ लागले. पेरॉन्स्कीबाई न कंटाळता त्यांची नावे उच्चारीत होती. निम्म्याहून अधिक स्त्रियांना नृत्यासाठी जोडीदार मिळाले होते. त्या नृत्यासाठी तयारी करू लागल्या, नाहीतर नृत्य करू लागल्या.

भिंतीजवळ गर्दी करून थोड्या स्त्रिया राहिल्या होत्या. त्यात आई आणि सोन्या यांच्या समवेत नताशा होती. आपण अशाच इथे राहणार, नृत्यासाठी आपणास कोणी बोलावणार नाही असे नताशाला वाटू लागले. तिची अजूनही आकारास न आलेली वक्षस्थळे वरखाली होत होती. ती आपला श्वास रोधून उजळत्या भयभीत डोळ्यांनी समोर टक लावून पाहात राहिली. दुःखाची किंवा सुखाची परमावधी होऊ दे, मी कशालाही तयार आहे असे जणू तिची मुद्रा सुचवीत होती. तिला झारबद्दल कुतूहल नव्हते, पेरॉन्स्कीबाई दाखवीत असलेल्या बड्या मंडळींतही गोडी वाटत नव्हती. तिच्या मनात एकच एक विचार येत होता—माझ्याकडे कुणीच फिरकणार नाही का? ह्या बड्या मंडळींत नृत्य करण्याची संधी मला कधीच मिळणार नाही का? ह्या पुरुषांच्या नजरेस मी कधीच पडणार नाही असं दिसतं. त्यांनी मला पाहिलंच तर त्यांच्या मुद्रेवर 'मघाची ती ही नव्हे, हिच्याकडे पाहून काही उपयोग नाही.' असा भाव

उमटतो आहे. हे तरुण माझी दखल कधीच घेणार नाहीत की काय? नाही, तसं होणार नाही.'

पॉलनॉझ नृत्यासाठी थोडा वेळच गत वाजवली गेली. ती नताशाला दुःखी स्मृतीसारखी वाटली. तिला रडू आले. पेरॉन्स्कीबाई त्यांना सोडून दुसरीकडे गेली होती. काउंट नृत्य-दालनाच्या दुसऱ्या टोकाशी होता. नताशा, काउंटेस आणि सोन्या त्या अपरिचितांच्या गर्दीत अरण्यात असल्यागत उभ्या होत्या. त्यांना त्या गर्दीत रस नव्हता, गर्दीचा त्यांना उपयोग नव्हता. कुणा स्त्रीला बरोबर घेऊन प्रिन्स आन्द्रे त्यांच्या जवळून गेला, त्याने त्यांना ओळखले नाही. देखणा अनातोल आपल्या हातावर रेललेल्या बाईला काहीतरी हसून बोलला आणि त्याने नताशाकडे भिंतीकडे पाहावे तसे निर्विकारपणे पाहिले. बोरिस दोन वेळा त्यांच्या जवळून गेला पण त्यांच्याकडे फिरकला नाही. बर्ग आणि त्याची पत्नी नृत्यात भाग घेत नव्हती. ती दोघे त्यांच्याकडे आली.

त्यांनी नाचसमारंभात आपणाला भेटावे ही गोष्ट नताशाला अपमानास्पद वाटली. घरगुती गोष्टी बोलायला त्यांना नृत्यदालनाशिवाय दुसरे ठिकाणच आढळले नव्हते. तिने त्यांच्याकडे लक्ष दिले नाही. आपल्या हिरव्या पोषाखाबद्दल व्हेराने तिला काहीतरी सांगितले, परंतु नताशाने तिच्याकडे पाहिलेही नाही.

शेवटी झार चौथ्या जोडीदारणीजवळ स्वस्थ उभा राहिला. संगीत थांबले, सचिंत दिसणारा ॲडज्युटंट रोस्तॉफकुटुंबियांकडे धावला. ती माणसे जरी अगोदरच भिंतीशी उभी होती तरी त्याने त्यांना आणखी मागे सरकायला सांगितले. मग ऑर्केस्ट्रामधून वॉल्ट्स नृत्यासाठी सावध, रेखीव, आकर्षक, ऐटदार ताल सुरू झाला. झारने नृत्यदालनातील प्रेक्षकांवर सस्मित दृष्टी टाकली. अजून कुणी नृत्यास प्रारंभ केला नव्हता.

ॲडज्युटंट काउंटेस बेझुहॉव्हकडे गेला. तिला त्याने नृत्यात सहभागी होण्याची विनंती केली. स्मित करीत तिने आपला उजवा हात उंच केला आणि त्याच्याकडे न पाहताच त्याच्या खांद्यावर हात ठेवला. नृत्यकलेत निष्णात असलेल्या ॲडज्युटंटने आपल्या जोडीदारणीला घट्ट धरले, आत्मविश्वासाने आणि सफाईने तिच्यासह प्लुतिनृत्य केले. मग नृत्यदालनाच्या टोकाशी तिला नेत त्याने तिचा डावा हात धरून तिला वळवले. ॲडज्युटंटच्या भरभर पडणाऱ्या सराईत पावलांमुळे होणारा बुटाच्या चक्रांचा किणकिणाट आणि दर तिसऱ्या ठेक्याला त्याची जोडीदारीण गिरकी घेताना होणारा फडफडत्या मखमली स्कर्टचा सुंद आवाज सोडल्यास संगीताच्या द्रुतस्वरांखेरीज दुसरे काहीही ऐकू येत नव्हते.

नताशा त्याच्याकडे पाहात होती. वॉल्ट्सच्या पहिल्या फेरीत आपल्याला भाग घेता येत नाही ह्या विचाराने ती रडकुंडीस आली.

प्रिन्स आन्द्रे रोस्तॉफ मंडळींपासून थोड्या अंतरावर उभा होता. दुसऱ्या दिवशी स्टेट कौन्सिलची पहिली बैठक घेण्याचे ठरले होते त्याबद्दल तो बॅरन फिरॉफशी बोलत होता. त्या बैठकीबद्दल नाना अफवा पसरत होत्या. प्रिन्स आन्द्रेची स्पेरान्स्कीशी मैत्री होती, खेरीज तो कायदे करणाऱ्या समितीच्या कार्यात रस घेत होता. त्यामुळे बैठकीबाबत अधिकृत माहिती

देणे त्याला शक्य होते. पण प्रिन्स आन्द्रे फिरॉफचे बोलणे न ऐकता झारजवळ असलेल्या, नृत्याच्या तयारीत असलेल्या माणसांकडे पाहात होता.

पीएरने जवळ येऊन प्रिन्स आन्द्रेचा दंड पकडला.

'तू नेहमी नृत्य करतोस ना? ह्या रोस्तॉफकुटुंबातील मुलीला नाचासाठी घे. ती माझी आश्रित आहे.'

'कुठे आहे ती?' बोलकॉन्स्कीने विचारले. मग वळून तो बॅरनला म्हणाला, 'माफ करा. हे बोलणं मग आपण दुसरीकडे कुठं तरी चालू ठेवा. नृत्यदालनात आपण नृत्यच केलं पाहिजे.' मग पीएरने दाखवलेल्या दिशेने तो गेला. निराशेने थरथरणारी नताशा आ वासून पाहू लागली.

प्रिन्स आन्द्रेने नताशाला ओळखले; तिच्या भावना त्याला कळल्या: उच्चभ्रू वर्गात ती प्रथमच प्रविष्ट होत होती. खिडकीशी राहून जे बोलत होती ते त्याला आठवले. तो आनंदी मुद्रेने काउंटेस रोस्तॉफजवळ येऊन पोचला.

काउंटेस लाजेने लालबुंद होऊन म्हणाली, 'मी माझ्या मुलीची तुमच्याशी ओळख करून देते.'

'तिची ओळख होण्याचं भाग्य मला पूर्वीच लाभलं आहे. तुम्हाला आठवत नाही का?' प्रिन्स आन्द्रेने बोलताना खूप झुकून प्रणाम केला. त्याचे वागणे पेरॉन्स्कीयाईने त्याच्या उद्धटपणाबद्दल काढलेल्या उद्‌गारांच्या किती विरोधी होते. तो नताशाकडे आला. तिला नृत्यासाठी विनंती करण्यापूर्वीच त्याने तिच्या कमरेभोवती टाकण्यासाठी आपला हात उंचावला. त्याने 'आपण वॉल्ट्स नृत्य करू' असे म्हणताच घोर निराशा अगर अत्युच्च आनंद यांपैकी कोणत्याही गोष्टींसाठी सज्ज असलेल्या नताशाचा थरथरता चेहरा आनंदाने, कृतज्ञतेने आणि निरागस स्मिताने एकदम उजळून निघाला.

त्या विस्मित आनंदित झालेल्या कुमारिकेचा चेहरा जणू सांगत होता— 'मी कितीतरी वेळ तुमची प्रतीक्षा करीत होते.'

नृत्यमंडळात प्रवेश करणारी दुसरी जोडी त्यांचीच होती.

त्याने तिच्या नाजूक, लवचिक कमरेभोवती हात टाकला, ती त्याला जवळ येऊन भिडली आणि हसली. तत्क्षणी तिच्या सौंदर्याने तो धुंद झाला. त्याला नवजीवन आणि तारुण्य प्राप्त झाल्यासारखे वाटले.

...

प्रिन्स आन्द्रेनंतर बोरिसने नताशाबरोबर नृत्य केले. त्यानंतर प्रारंभी नृत्य केलेल्या ॲडज्युटंटनेही. मग इतर बऱ्याच तरुणांना तिच्याबरोबर नृत्य करण्याचे भाग्य लाभले. लालबुंद झालेल्या आणि सुखावलेल्या नताशाने सटरफटर जोडीदारांना सोन्याकडे सोपवले आणि ती

रात्रभर नाचत राहिली.

इतर सगळे ज्यात रंगले होते ते तिला दिसत नव्हते, जाणवत नव्हते. झार कितीतरी वेळ फ्रेंच परराष्ट्रवकिलाशी बोलत होता. कुणा बाईवर त्याने खास मेहरनजर दाखवली. अनेक गोष्टींची चर्चा चालली होती. त्यात तिला रस नव्हता. तिने झारला पाहिलेसुद्धा नाही. झार गेल्यानंतर नाचसमारंभ अधिकच रंगला. झारला ते कळले नाही, पण नताशाला ते जाणवले.

रात्रीच्या भोजनानंतर सुंदर फ्रेंच नृत्ये झाली. त्यांतील एक नृत्य प्रिन्स आन्द्रे आणि नताशा यांचे होते. प्रिन्स आन्द्रेने ऑट्रॅड्नू येथे दुतर्फा झाडी असलेल्या रस्त्यावर तिला पहिल्यांदा पाहिले होते. त्या चांदण्या रात्री तिला झोप येत नव्हती. त्याने नकळतच तिचे बोलणे ऐकले होते. प्रिन्स आन्द्रेने या साऱ्या गोष्टींची तिला आठवण करून दिली तेव्हा नताशा लाजेने चूर झाली.

प्रिन्स आन्द्रेला सहज आढून समजलेल्या तिच्या भावनात जणू शरम वाटण्याजोगे काही होते म्हणून ती काहीना काही सबबी सांगण्याचा प्रयत्न करू लागली.

उच्चभ्रू मंडळींत वाढलेल्या पुरुषांप्रमाणे प्रिन्स आन्द्रेलाही उच्चभ्रू मंडळींचा सांकेतिक ठसा नसलेल्या व्यक्तीची गाठ घेणे आवडे. नताशा त्याला तशा तऱ्हेची आगळीवेगळी व्यक्ती वाटली. तिचा विस्मय, तिला वाटलेला आनंद, तिचा लाजाळूपणा, तिच्या फ्रेंच बोलण्यातल्या चुका—साऱ्याच गोष्टींत नावीन्य होते. तिच्याशी तो किती हळुवारपणे बोलत होता. तिच्याशी अगदी साध्या आणि अगदी क्षुल्लक गोष्टींबद्दल बोलत होता. तो तिच्या चमकदार डोळ्यांची स्तुती करू लागला. त्याच्या बोलण्याचा तिच्या स्मिताशी काही संबंध नव्हता. खूप खूप आनंद झाला होता म्हणून ती हसत होती.

कुणीतरी नताशाला पुन्हा नृत्याचा आग्रह केला तशी ती स्मित करीत उठली आणि नृत्य करू लागली. प्रिन्स आन्द्रेला तिचे सलज्ज लावण्य आवडले. गत संपता संपता धाप लागल्याने नताशा नृत्य अर्ध्यावर टाकून आपल्या जागी जाऊन बसली. पुन्हा एका जोडीदाराने तिच्याबरोबर नृत्य करण्याची इच्छा व्यक्त केली. आता ती दमली होती, धापा टाकीत होती. नकार द्यावा असे तिला क्षणभर वाटले. पण लागलीच तिने जोडीदाराच्या खांद्यावर हात ठेवला. प्रिन्स आन्द्रेकडे पाहून स्मित करीत ती मोठ्या खुषीने नृत्याला सज्ज झाली.

'तुझ्याजवळ बसून विश्रांती घेता आली असती तर मला किती आनंद झाला असता. हे लोक सारखे नृत्याला बोलावताहेत. तू बघतोच आहेस. मला त्यात आनंद वाटतो, नाही असं नाही. मला सगळी माणसं आवडतात. तुला आणि मला सगळी माणसं आवडतात, होय ना ?' तिचे स्मित असेच आणखी काही त्याला सांगत होते. जोडीदाराने तिला सोडले तशी ती संगीतासाठी दोन स्त्रिया मिळवण्यासाठी नृत्यदालनातून बाहेर पडली.

'जर ती त्या दुसऱ्या बाईकडे जाण्याऐवजी आपल्या वहिणीकडे गेली तर ती माझी पत्नी होईल.' तिच्याकडे पाहताना प्रिन्स आन्द्रेने असे गणित मनात मांडले. मग त्याचे त्यालाच आश्चर्य वाटले. नताशा आपल्या वहिणीकडे व्हेराकडेच प्रथम गेली.

उच्च दरबारी लोकांत आपल्या पत्नीने पटकावलेले स्थान पाहून त्या नाचसमारंभात पीएर प्रथमच अपमानित झाला. तो उदास व अस्वस्थ झाला. खिडकीत उभा राहून तो शून्य दृष्टीने पाहू लागला. त्याच्या कपाळावर चांगलीच आठी उमटली होती. भोजनाला जाताना नताशा पीएरजवळून गेली. तिला पीएरचा उदास खिन्न चेहरा खटकला. त्याच्याकडे पाहात ती थांबली. त्याला मदत करावी, आपल्या उतू जाणाऱ्या सौख्यातील काही सौख्य त्याला द्यावे अशी तिला इच्छा झाली.

' सगळीकडे किती आनंदीआनंद आहे. तुम्हाला नाही वाटत असं ? ' नताशाने विचारले.

ती काय म्हणाली ते पीएरला कळले नाही. विसरभोळेपणाने त्याने स्मित केले. ' मला ना ? मला वाटतो की आनंद ! '

' माणसं कोणत्याही गोष्टीमुळे असमाधानी कशी होतात ? बेझुहॉव्हसारख्या चांगल्या माणसानं तरी असं होऊ नये. ' नताशाला वाटले.

नताशाला वाटू लागले— ' समारंभाला आलेले सगळे लोक अतिशय दयाळू आहेत. सत्प्रवृत्त आहेत. त्यांचे एकमेकांवर प्रेम आहे. त्यांच्यापैकी कुणीही दुसऱ्याचं वाईट करणं शक्य नाही. म्हणून सगळे लोक सुखी असले पाहिजेत. '

प्रिन्स आन्द्रे पूर्वी न भेटलेल्या लोकांना दुसऱ्या दिवशी भेटायला गेला. नाचसमारंभात रोस्तॉफकुटुंबाशी पुन्हा ओळख झाली होती. त्या कुटुंबाला तो पुन्हा भेटला. त्यांना भेटण्याचे कारण केवळ सौजन्य नव्हते. जिच्या मधुर स्मृती त्याच्या मनात रेंगाळत होत्या त्या असामान्य सोत्कंठ मुलीला तिच्या घरी भेटावे असे त्याला वाटत होते.

पहिल्यांदा त्याला नताशाच भेटली. ती रोजच्या साध्या निळ्या पोषाखात होती. नाचसमारंभात वाटली होती त्याहून ती आता त्याला सुंदर वाटली. तिने आणि तिच्या कुटुंबातील सर्व माणसांनी जुन्या मित्राचे स्वागत करावे तसे प्रिन्स आन्द्रेचे स्वागत केले. थोरल्या काउंटचे आतिथ्य आणि त्याचा सुस्वभाव पीटर्सबर्गमधे विशेष जाणवणारा आणि आकर्षक होता. त्यामुळे त्यांनी रात्रीच्या भोजनाचे आमंत्रण दिले तेव्हा त्याला नकार देववेना.

त्याला वाटू लागले. ' ही सगळी फार चांगली माणसं आहेत. आपल्यामध्ये नताशासारखं अमोल रत्न आहे याची त्यांना कल्पनाही नाही. अप्रतिम कवितेप्रमाणे मोहक असणाऱ्या, जीवनोत्साहाने भरलेल्या ह्या मोहक मुलीला ह्या सुस्वभावी माणसाची अत्यंत अनुकूल अशी पार्श्वभूमी लाभलेली आहे. '

प्रिन्स आन्द्रेला नताशाच्या रूपाने वेगळ्या आगळ्या जगाची जाणीव होत होती. हे जग सर्वस्वी त्याच्यापासून दूर होते, त्याला अज्ञात असलेल्या आनंदांनी परिपूर्ण होते, ह्या अद्भुत जगाने ऑट्रॅड्नू येथील दुतर्फा झाडीच्या रस्त्यावर आणि चांदण्यारात्री खिडकीपाशी त्याच्या

मनात स्वप्ने उभविली होती. आता ते जग स्वप्ने उभवीत नव्हते, आता ते जग त्याला परके राहिले नव्हते. आता तो स्वतः त्या जगात प्रवेश करीत होता, त्या जगात त्याला नवनवीच सुखे लाभत होती.

रात्री जेवण झाल्यानंतर प्रिन्स आन्द्रेने विनंती केली म्हणून नताशा क्लॅव्हिकॉर्डवर गाऊ लागली. खिडकीशी उभे राहून इतर स्त्रियांशी बोलता बोलता प्रिन्स आन्द्रे तिचे गायन ऐकू लागला. ती गात असताना प्रिन्स आन्द्रेने बोलणे थांबवले. एकाएकी त्याला गळ्यात आवंढा आणि डोळ्यांत अश्रू आल्यासारखे वाटले. गात असलेल्या नताशाकडे पाहून त्याचे अंतःकरण अननुभूत आनंदाने हेलावून गेले. रडण्याला काही कारण नव्हते तरीही तो रडण्याला उत्सुक झाला. कशासाठी ? आपल्या गतकालीन प्रीतीसाठी ? लिझसाठी ? भ्रमनिरास झाला म्हणून ? भविष्यकालीन आशाआकांक्षांसाठी ?

त्या रात्री खूप उशिरा प्रिन्स आन्द्रेने रोस्तॉफकुटुंबाचा निरोप घेतला. नेहमीच्या सवयी-नुसार तो बिछान्यावर पडला पण त्याला झोप येईना. मेणबत्ती लावून तो अंथरुणात उठून बसला. पुन्हा उठला. पुन्हा अंथरुणात पडला. आपल्याला झोप येत नाही म्हणून तो बिल-कुल त्रस्त झाला नाही. अडगळीच्या कोंदट खोलीतून लख्ख सूर्यप्रकाशात आल्यासारखे त्याचे मन प्रफुल्लित झाले होते. आपण रोस्तॉफकुटुंबातील एका लहान मुलीच्या प्रेमात पडलो आहोत याची त्याला मुळीच कल्पना आली नाही. तिच्याविषयीचे विचार त्याच्या मनात येत नव्हते. तो तिचे चित्र मनासमोर आणीत होता. असे करताना त्याचे अवघे जीवन नव्या प्रकाशात उजळून निघत होते.

' मी कशासाठी धडपडतो आहे ? आनंदांनी भरलेले सर्व जीवन माझ्यासमोर असताना मी ह्या दैनंदिन बंदिस्त अरुंद चाकोरीत मला का कष्ट देत आहे ?

आणि पहिल्यांदा तो किती तरी काळ भावी जीवनाची सुखस्वप्ने रेखाटू लागला, योजना आखू लागला. आपल्या मुलाला शिक्षण द्यायचे, त्याच्यासाठी एक शिक्षिका शोधायची आणि तिच्याकडे त्याला सोपवायचे असे बेत तो करू लागला. सैन्यातून निवृत्त होऊन तो परदेशात फिरणार होता. इंग्लंड, स्विट्झर्लंड, इटाली हे देश पाहणार होता. तो स्वतःशी म्हणू लागला, ' उत्साह, तारुण्य, शक्ती आहे तोपर्यंत मी माझ्या स्वातंत्र्याचा लाभ घेतला पाहिजे. पीएरचं म्हणणं अगदी बरोबर होतं. सुखी व्हायचं असेल तर माणूस सुखी होऊ शकतो यावर विश्वास हवा. माझाही आता त्यावर विश्वास बसू लागला आहे. गतं न शोच्यम् । झालं गेलं विसरलं पाहिजे. जीव असेपर्यंत माणसानं जगावं, आनंदानं जगावं. '

मॉस्को आणि पीटर्सबर्ग शहरातील अनेकांना पीएर ओळखीत होता. कर्नल ॲडॉल्फ बर्ग हाही त्याच्या ओळखीचा होता. तो एके दिवशी पीएरच्या भेटीला आला. त्याने अगदी नवा

गणवेष चढवला होता. झार अलेक्झांडर पावलोविचप्रमाणे त्याच्या कपाळावर झुलपे होती.

'मी काउंटेसला—तुमच्या पत्नीला—आताच आमंत्रण दिलं पण दुर्दैवानं माझ्या आमंत्रणाचा स्वीकार झाला नाही. तुमच्या बाबतीत मी सुदैवी ठरेन अशी आशा आहे.'

बर्ग स्मित करीत म्हणाला, 'कर्नलसाहेब, तुमची काय आज्ञा आहे? मी हुकमाचा तावेदार आहे.'

'मी माझ्या नव्या निवासस्थानात चांगलाच स्थिर झालो आहे.' ह्या बातमीने त्याला आनंद होईल अशा ठाम विश्वासाने बर्ग बोलत होता. 'म्हणून माझ्या मित्रांना आणि माझ्या पत्नीला छोट्याशा रात्रोत्सवात सहभागी करून घ्यावे असे माझ्या मनात आहे.' त्याने पूर्वीहून अधिक विनयी स्मित केले. 'तुम्ही सपत्नीक माझ्याकडे जेवणासाठी येण्याचा अनुग्रह करावा अशी विनंती करण्यासाठी मी आलो आहे.'

बर्गसारख्या नगण्य लोकांत मिसळणे आपल्या प्रतिष्ठेला धरून नाही असे वाटून काउंटेस एलन व्हॅसिल्येवनाने आमंत्रणाचा स्वीकार केला नसता. तिच्यामध्ये आमंत्रणाचा अव्हेर करण्याचा निर्दयपणा होता. आपल्याला नव्या जागेमध्ये निवडक मित्र का हवे आहेत, तसे केल्याने आपणास आनंद का होणार आहे, पत्त्यांवर किंवा अशाच उपद्रवी गोष्टींवर पैसा खर्च करणे आपणास का आवडत नाही, आपण चांगल्या मंडळींसाठी पैसे खर्चायला का तयार असतो त्याची इतकी स्पष्ट कारणे बर्गने सांगितली की पीएरला नकार देणे शक्य झाले नाही. त्याने रात्रोत्सवाला येण्याचे वचन दिले.

'काउंट, कृपा करून उशीर करू नका. असे सांगितल्याबद्दल राग मानू नका. आठला दहा मिनिटे असताना या. पत्ते खेळण्यासाठी मग पुरेसे भिडू जमतील. आमचे जनरल साहेब येणार आहेत. माझ्यावर त्यांचे फार प्रेम आहे. रात्री जेवण घेऊ. बेत साधाच असेल. तुम्ही आलात तर माझा मोठा सन्मान होईल.' बर्ग म्हणाला.

पीएर नेहमीच उशिरा यायचा. यावेळी मात्र तो उलट वागला. बर्गकडे तो आठला चांगली पंधरा मिनिटे असताना आला.

बर्ग पतिपत्नींनी पार्टीची आवश्यक तयारी केव्हाच केली होती. आणि ती दोघे स्वागतास सज्ज होती.

बर्ग आणि त्याची पत्नी नव्या, स्वच्छ, प्रकाशित अशा बैठकीच्या खोलीत बसली होती. खोली छोटे छोटे पुतळे, अर्धपुतळे, चित्रे आणि नवे फर्निचर यांनी सजविलेली होती. दाटीने लावलेल्या बटणांचा गणवेश घातलेला बर्ग आपल्या पत्नीशेजारी बसला होता. आपल्यापेक्षा वरिष्ठ, वरच्या हुद्द्यावरील लोकांशी ओळखी करणे कसे बरे, त्यामुळे आनंद कसा मिळतो, ते सांगत होता, 'तुमचा काही ना काही लाभ होतो. काहीना काही गोष्टींसाठी तुम्ही शब्द टाकू शकता. माझेच बघ ना मी खालच्या हुद्द्यावर असताना कसा वागत होतो ते लक्षात घे. (बर्ग आपलं आयुष्य वर्षांत न मोजता मिळालेल्या बदल्यात मोजत असे.) माझ्या बरोबरचे सहकारी अजून काहीच स्थान प्राप्त करू शकले नाहीत. मी मात्र लेफ्टनंट कर्नल झालो आहे.

शिवाय सुदैवानं तुझ्याशी लग्नही झालं. ( त्याने उठून व्हेराचे चुंबन घेतले. तसे करीत असताना रगचा विस्कटलेला कोपरा दुमडण्यास तो विसरला नाही ) मी हा हुद्दा कसा मिळवला असेन ? माझ्या यशाचं रहस्य माणसं निवडून ओळखी करण्यात आहे. प्रत्येकानं आपलं काम प्रामाणिकपणं आणि नियमितपणं पार पाडलं पाहिजे. हे अर्थात सांगायला नको. '

आपल्या दुबळ्या पत्नीपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत ह्या जाणिवेने बर्गने स्मित केले. त्याला वाटले–ही मोहक पत्नी नेहमीच दुबळी स्त्री राहणार आहे. पुरुषाच्या प्रतिष्ठेला आवश्यक गोष्टी तिला कधीच प्राप्त करता येणार नाहीत. व्हेराच्या मते सगळ्याच पुरुषांचा जीवना-बद्दलचा दृष्टिकोण चुकीचा होता. त्यामुळे आपल्या स्वकर्तव्यतत्पर नवऱ्यापेक्षा आपण श्रेष्ठ आहोत अशा विचाराने तिने स्मित केले. बर्गने आपल्या पत्नीवरून सगळ्या स्त्रियांची पारख केली–सगळ्या दुर्बल आणि मूर्ख आहेत असे तो समजू लागला. व्हेरानेदेखील आपल्या निरीक्षणावरून पुरुषजातीबद्दल सामान्य सिद्धान्त काढला. पुरुष शहाणपणाचा मक्ता फक्त स्वतःकडे घेतो, पण त्याला काहीही समजण्याची कुवत नसते.

बर्गने उठून तिच्या खांद्यावरील खूप पैसे खर्चून घेतलेली फीत चुरडणार नाही याची काळजी घेत सावधपणे तिला आलिंगन दिले आणि तिच्या केवळ ओठांचे चुंबन घेतले.

' एक गोष्ट विसरू नकोस. आपल्याला मुले लवकर होता कामा नयेत. ' तो म्हणाला. त्याच्या नकळतच मघाच्या विचारमालिकेतील विचार तो बोलून गेला होता.

' अगदी मान्य, मलाही मुलांची इच्छा नाही. आपण उच्चभ्रू मंडळींसाठी जगलं पाहिजे.' व्हेरा म्हणाली.

' प्रिन्सेस युसुपॉव्ह वापरते तशा तऱ्हेची फीत वापरायची. ' मधुर स्मित करीत खांद्यावरील फीत दाखवीत तो म्हणाला.

त्याच वेळी त्यांना काऊंट बेझुहॉव्ह आल्याचे सांगण्यात आले. दोघांनी एकमेकांकडे समाधानाचे कटाक्ष टाकले. जणू प्रत्येकजण त्यांच्या बक्तशीर येण्याचे श्रेय मिळवू पाहात होता.

' ओळखी कशा करायच्या हे कळलं म्हणजे काय होतं बघ. योग्य तऱ्हेनं आतिथ्य केल्यानं किती फायदा होतो ते दिसेल आता ? ' बर्ग स्वतःशीच म्हणत होता.

' आणि हे बघा, मी जेव्हा पाहुण्यांची विचारपूस करीत असेन तेव्हा मधेच व्यत्यय आणू नका. प्रत्येकाचं स्वागत कशा तऱ्हेनं करायचं, वेगवेगळ्या माणसांत कायकाय बोलायचं हे मला ठाऊक आहे. ' व्हेरा म्हणाली.

पीएरला छोट्या बैठकीच्या खोलीत नेण्यात आले तिथली रंगसंगती, नीटनेटकेपणा आणि शिस्त न बिघडवता तिथे बसणे अशक्य होते. माननीय पाहुण्याखातर आरामखुर्ची आणि सोफा यांची सुसंगती बिघडू द्यायला बर्ग उदार मनाने तयार झाला. काय करावे हे न समजून त्याने पाहुण्यावरच आसनाची निवड सोपवली. पीएरने एक खुर्ची स्वतःसाठी ओढून घेतली. बर्ग आणि व्हेरा यांनी आपल्या रात्रोत्सवाला प्रारंभ केला.

पीएरशी फ्रेंच परराष्ट्र वकिलातीबद्दल बोलल्यास त्याला बरे वाटेल असे ठरवून व्हेर

एकदम त्या विषयाकडे वळली. पुरुषांच्या आवडीच्या विषयांकडे वळण्याची गरज आहे असे समजून बर्ग आपली पत्नी बोलत असतानाच ऑस्ट्रियाच्या युद्धाबद्दल बोलू लागला. मग नकळतच त्याने तो विषय बदलला आणि आपणांस ऑस्ट्रियन मोहिमेत भाग घ्यायला सांगितले आहे त्याबद्दल आपणास काय वाटते आणि आपण तीत भाग घ्यायला नकार का दिला यांविषयी तो बोलू लागला.

खरे तर संभाषण अत्यंत विस्कळित आणि असंबद्ध होत होते. पुरुषांच्या आवडीचे विषय व्यत्यय आणीत होते म्हणून व्हेरा चिडली होती. अजून दुसरा पाहुणा आलेला नव्हता तरीही त्या जोडप्याला रात्रोत्सव चांगल्या तऱ्हेने पार पडत आहे असे समाधान वाटत होते. आपला रात्रोत्सव पाण्याचा एक थेंब दुसऱ्या थेंबासारखा असावा तसा दुसऱ्या कोणत्याही रात्रोत्सवासारखा आहे; संभाषण, चहा आणि पेटत्या मेणबत्त्या यात काही कमतरता नाही अशा समाधानात ते जोडपे होते.

पीएरनंतर आलेला दुसरा पाहुणा बोरिस हा बर्गचा जुना सहकारी होता. बर्ग आणि व्हेरा यांच्यावर आपण उपकार करीत आहोत असा काहीसा सूर बोरिसच्या वागण्यात होता. बोरिसनंतर कर्नल आपल्या पत्नीसह आला. त्यानंतर स्वतः जनरल आला. मग रोस्तॉफ कुटुंबातील माणसे आली. आता निर्विवादपणे इतर रात्रोत्सवाप्रमाणे हाही रात्रोत्सव सुरू झाला. दिवाणखान्यातील या सर्वांचा वावर, सर्वांच्या बोलण्याचा कोलाहल, वस्त्रांची सळसळ, परस्परांनी केलेले स्वागत या सर्व गोष्टींमुळे त्या जोडप्यास होणारा आनंद त्यांनी लपवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी त्यांच्या स्मितातून प्रगट होत होता.

सगळ्या गोष्टी कशा मनासारख्या घडून येत होत्या. विशेषतः जनरल त्यांच्या खोल्यांचे कौतुक करीत होता; बर्गच्या खांद्यावर थाप मारीत होता; पितृसदृश अधिकारवाणीने बोस्टन खेळण्यासाठी तयारी करण्याचा आग्रह करीत होता. दर्जानुसार जनरल काउंट इल्या अँड्रीविचच्या शेजारी बसला. तरुण पाहुणेही वेगळे बसले. यजमानीणबाई टेबलाशी होती. पॅनिनच्या रात्रोत्सवात होते तसलेच केक तशाच प्रकारच्या चांदीच्या तबकात मांडून ठेवलेले होते.

सगळ्या गोष्टी कशा अगदी मनासारख्या घडत होत्या.

पीएर सन्मान्य पाहुण्यांपैकी एक असल्यामुळे त्याला बोस्टन खेळण्यासाठी थोरला काउंट जनरल आणि कर्नल यांच्याबरोबर बसावे लागले. टेबलाशी तो बसला तेव्हा त्याला आपल्यासमोरच नताशा बसलेली दिसली. नाचसमारंभाच्या दिवसापासून ती फार बदलून गेल्याचे त्याला जाणवले. नताशा शांतपणे बसली होती. नाचसमारंभाच्या दिवशी ती सुंदर वाटली होती तशी आता वाटत नव्हती. सर्व गोष्टींबद्दलची सौम्य उदासीनता तिच्या चेहऱ्यावर नसती

तर ती अगदीच निर्विकार भावनाशून्य वाटली असती.

'तिला झालं आहे तरी काय ?' तिच्याकडे पाहत पीएर स्वतःला विचारू लागला. ती आपल्या वहिणीबरोबर टेबलापाशी बसली होती. बाजूला असलेल्या बोरिसला ती नाखुषीनेच उत्तरे देत होती. पण त्याच्याकडे पाहत नव्हती. एकच रंग खेळून पीएरने पाच डाव केले तेव्हा त्याच्या भिडूला आनंद झाला. स्वागताचे शब्द ऐकत, येणाऱ्यांच्या पावलांचे आवाज ऐकत डाव करताना त्याने पुन्हा तिच्याकडे पाहिले.

प्रिन्स आन्द्रे तिच्यासमोर उभा राहून तिला काहीतरी सांगत होता. त्याच्या मुद्रेवर सावध हळुवारपणा प्रकटला होता. मान उचलून ती त्याच्याकडे पाहात लाजेने लालबुंद होत होती. ती लागलेली धाप थांबवण्याचा प्रयत्न करीत असल्याचे स्पष्ट दिसत होते. पुन्हा ती आंतरिक तेजाने उजळून निघत होती. ती सर्वस्वी बदलून गेली होती. तिचे सामान्य रूप नाहीसे होऊन पुन्हा एकदा नृत्यसमारंभातील लावण्य दिसू लागले.

खेळताना पीएरने कित्येक वेळा जागा बदलली. कधी तो नताशाकडे पाठ करून बसला. कधी ती समोर दिसेल अशा तऱ्हेने बसला. सहाही डाव खेळत असताना तो नताशाला आणि तिच्या दोस्ताला न्याहाळीत होता.

दोघांमध्ये गंभीर मामला सुरू झाल्याची जाणीव पीएरला झाली. एकाएकी त्याच्या अंतःकरणात हर्ष आणि शोक दाटून आला. तो अस्वस्थ झाला. त्याचे खेळातून चित्त उडाले.

अशा तऱ्हेने खेळण्यात अर्थ नाही असे म्हणत जनरलसाहेब सहा डावांनंतर उठले. आता पीएरला मोकळीक मिळाली.

त्याच वेळी बर्ग पीएरकडे आला. जनरल आणि कर्नल स्पेनमधील परिस्थिती या विषयावर वाद घालत होते, बर्गने पीएरला त्यात भाग घेण्याचा आग्रह केला.

दुसऱ्या दिवशी प्रिन्स आन्द्रेने रोस्तॉफ कुटुंबाकडे जेवण घेतले, सबंध दिवस त्याने त्यांच्या समवेत घालवला.

प्रिन्स आन्द्रे कोणासाठी आला आहे हे घरातील सर्वांच्या ध्यानात आले. प्रिन्स आन्द्रे दिवसभर नताशाच्या सहवासात राहण्याचा उघड उघड प्रयत्न करीत होता.

भ्यालेली पण आनंदी व उत्साही असलेली नताशाच नव्हे तर घरातील प्रत्येकजण काही-तरी मोठी गंभीर घटना घडणार म्हणून विस्मयाने पाहात होता. नताशाशी बोलणाऱ्या प्रिन्स आन्द्रेकडे काउंटेस विषण्ण आणि करारी नजरेने पाहात होती. त्याने नजर वळवून पाहिले की ती काहीतरी साध्या सामान्य विषयावर बोलत राही. असे करताना ती खूप संकोचून जात होती.

नताशाला सोडून जाण्याचा धीर सोन्याला होत नव्हता. पण तिथे राहिल्याने आपण त्यांना अडथळा होऊ अशी सोन्याला धास्ती वाटत होती. प्रिन्स आन्द्रेच्या सहवासात नताशा

एकटीच असली की काय होणार नि काय नाही या विचाराने धास्तावून जाई. प्रिन्स आन्द्रेच्या बुजरेपणाचा, भित्रेपणाचा तिच्या मनावर प्रभाव पडत होता. त्याला आपल्याला काहीतरी सांगायचे आहे पण त्याला धीर होत नाही हे तिच्या लक्षात येई.

त्या रात्री प्रिन्स आन्द्रे निघून गेला तशी काउंटेसने नताशाला जवळ घेऊन हळू आवाजात विचारले 'काय झालं ग?'

'ममा, कृपा कर. आता या वेळी तरी काही विचारू नकोस. ह्याबद्दल बोलणं अशक्य आहे.'

नताशाने असे उत्तर दिले तरी ती रात्री कितीतरी वेळ आपल्या आईच्या बिछान्यातच कुठेतरी डोळे लावून पडली होती. ती कधी उत्साहित होत होती. कधी भयभीत होत होती. त्याने आपली स्तुती कशी केली ते तिने आपल्या आईला सांगितले. तो परदेशी जाणार होता. त्याने तिला 'वसंतऋतूत कुठे जाणार?' असे विचारले होते.

'असा अनुभव...असा अनुभव मला पूर्वी कधीच आला नव्हता. त्याची मला भीती वाटते...तशी नेहमीच भीती वाटत होती. अशी का वाटते कुणास ठाऊक! तिचा अर्थ हे सारं खरं आहे असा होतो का? ममा, तू झोपलीस का ग?'

'नाही ग. बाळ, मला स्वतःलाच त्याची धास्ती वाटते. तू झोपी जा कशी.'

'छे! छे! आता झोपायचं नाही. झोपणं म्हणजे मूर्खपणा. ममा, ममा, असा अनुभव मला कधीच—कधीच आला नव्हता. असं काही घडेल असं स्वप्नातही वाटलं नव्हतं.' आपल्या मनातील भावनांची ओळख पटून ती विस्मयाने आणि भीतीने उद्‌गारली.

प्रिन्स आन्द्रेला आपण ऑट्रेड्नूला पहिल्यांदा पाहिले त्याच वेळी आपले मन त्याच्यावर जडले होते याची जाणीव नताशाला झाली.

त्या वेळी ज्या पुरुषाची तिने निवड केली होती (तिला आपले मन त्याच्यावर केव्हा जडले होते याबद्दल आता शंका नव्हती) तो पुरुष पुन्हा भेटला होता. त्याच्या वागण्यावरून तरी तो तिच्याबद्दल बेफिकीर दिसत नव्हता. ह्या अनपेक्षित सुखामुळे ती जणू भयभीत झाली होती.

'आम्ही इथं पीटर्सबर्गमध्ये असताना तो इथं आला. जणू सगळं ठरवल्याप्रमाणं घडतं आहे. नाचसमारंभात झालेली भेटही तशीच ठरवल्याप्रमाणं घडली. सगळं नियतीनं आखलेलं असावं. म्हणून तर येथपर्यंत गोष्टी घडत आल्या. त्या वेळी त्याला मी पाहिलं तोच मला काही तरी वेगळंच वाटू लागलं होतं.'

'त्यानं तुला सांगितलं तरी काय?' असे बोलून आई विचारमग्न झाली.

'ममा, तो विधुर असल्यानं काही बिघडतं का ग?'

'असं बोलू नकोस नताशा. ईश्वराची प्रार्थना कर. लग्नं स्वर्गात ठरवली जातात.' काउंटेसने तिला फ्रेंच म्हण ऐकवली.

'ममा, तू मला इतकी आवडतेस! मी किती सुखात आहे!' आपल्या आईला मिठी मारीत ती म्हणाली तेव्हा तिच्या डोळ्यांत आनंदाश्रू होते.

अगदी त्याच वेळी प्रिन्स आन्द्रे आपले नताशावर प्रेम असल्याचे आणि आपण तिच्याशी

लग्न करण्याचा ठाम निर्धार केल्याचे पीएरला सांगत होता.

त्या रात्री काउंटेस एलन व्हॅसिल्येव्हनाने स्वागतसमारंभ योजला. फ्रेंच परराष्ट्रवकील, आताशा काउंटेसकडे वारंवार येणारा राजघराण्यातील एक उमराव आणि बरेच बुद्धिमान स्त्रीपुरुष अशी मंडळी जमली. पीएर त्या ठिकाणी खोल्याखोल्यांतून फिरला. आपल्यातच गढलेल्या त्याच्या उदास दृष्टीचा पाहुण्यांवर प्रभाव पडला.

नाचसमारंभाच्या दिवसापासून आपल्याला निराशेचा झटका आलेला आहे याची जाणीव पीएरला होत होती. त्याविरुद्ध झगडण्याची तो जिवापाड शिकस्त करीत होता. राजघराण्यातील प्रिन्सशी त्याच्या पत्नीचा चोरटा संबंध सुरू झाला. त्यानंतर पीएरची व्यवस्थापक म्हणून नियुक्ती झाली तेव्हा त्याला आश्चर्य वाटले. मानवी जीवनातील दांभिकतेबद्दलच्या त्याच्या कल्पना त्याला पुनःपुन्हा आठवू लागल्या. त्याची पाल्य नताशा आणि प्रिन्स आन्द्रे यांमधे आताशा प्रीतिभावना दिसून येत होती. मित्राच्या आणि आपल्या स्थितीतील महदंतर त्याला जाणवू लागलं होते आणि तो अधिकाधिक विषण्ण होत होता. आपली पत्नी, नताशा आणि प्रिन्स आन्द्रे यांचा विचार मनातून काढून टाकण्याचा तो प्रयत्न करू लागला. अनंत काळाच्या संदर्भात त्याला प्रत्येक गोष्ट क्षुल्लक, क्षुद्र वाटू लागली. पुन्हा तोच प्रश्न डोके वर काढू लागला.

‘ कशासाठी ? ’

त्याने दुरात्म्याला दूर ठेवण्यासाठी फ्रीमेसन संप्रदायाच्या कार्याला रात्रंदिवस वाहून घेतले.

पीएर काउंटेसच्या खोलीतून रात्री बाहेर आला. गबाळा ड्रेसिंग गाऊन घालून तो वरच्या मजल्यावरील बैठ्या खोलीत टेबलापाशी बसून स्कॉटिश फ्रीमेसनांच्या सभेची इतिवृत्ते लिहीत बसला असताना प्रिन्स आन्द्रे आत आला.

आधीच दुसऱ्या कार्यात मग्न असलेला पीएर काहीशा त्रस्तपणे म्हणाला, ‘ तू आलास का ? हे बघ मी कामात आहे. ’ दुःखी माणसे आपल्या जीवनातील दुर्दैवाकडे जशी पलायनवादी दृष्टी टाकतात तशी दृष्टी टाकीत पीएरने त्याला आपल्यासमोरील हस्तलिखित दाखवले.

प्रिन्स आन्द्रे पीएरसमोर उभा होता तेव्हा त्याचा चेहरा आनंदाने उजळला होता. नवजीवनोत्साहाने ओसंडत होता. त्याला पीएरची दुःखी मुद्रा दिसली नाही. आत्मतृप्त स्मित करीत तो पीएरला म्हणाला, ‘ मित्रा, तुला काल सांगायचं राहून गेलं. आज सांगायला आलो आहे. मला पूर्वी असं कधी वाटलं नव्हतं. मी प्रेमात पडलो आहे. ’

पीएरने एकदम दीर्घ उसासा टाकला. प्रिन्स आन्द्रेच्या शेजारी त्याचा धिप्पाड देह सोफ्यावर जवळजवळ कोसळला.

' नताशा रोस्तॉफच्या, होय ना ? ' त्याने विचारले.

' होय. दुसऱ्या कुणाच्या असणार ? मला स्वतःलादेखील ते खरं वाटलं नसतं. माझी भावना इतकी प्रबळ ठरली की मला माझं मन आवरता येईना. काल किती त्रास झाला, किती यातना झाल्या. पण जगातल्या कोणत्याही गोष्टीच्या मोबदल्यात मी माझी यातना द्यायला तयार नाही. आजवर मी खरं जीवन जगलोच नव्हतो. मला आता तर तिच्याशिवाय जगणं अशक्य आहे. तिचं माझ्यावर प्रेम असेल का ?...तिच्या मानानं मी बराच प्रौढ आहे...तू बोलत का नाहीस ?'

पीएर एकदम उठला. येरझाऱ्या घालीत म्हणाला, ' मी तुला मागंच नाही का सांगितलं ? ती मुलगी म्हणजे रत्न आहे, असं मला नेहमीच वाटत आलेलं आहे. अशा प्रकारच्या मुली विरळा. मित्रा, मी तुला मनापासून सांगतो. जास्त विचार करू नकोस, नसते संशय घेत राहू नकोस....सरळ तिच्याशी लग्न कर. तुझ्यासारखा सुखी प्राणी मग जगात निःसंशय कोणी नसेल. '

' पण तिच्या मनात...? '

' तिचं तुझ्यावर प्रेम आहे. '

' मूर्खासारखा बडबडू नकोस. ' पीएरचा चेहरा न्याहाळीत स्मित करीत प्रिन्स आन्द्रे म्हणाला.

' तिचं तुझ्यावर प्रेम आहे हे मला माहीत आहे. ' पीएर रागाने ओरडला.

त्याचा हात पकडीत प्रिन्स आन्द्रे म्हणाला, ' माझं ऐकून तर घे. मी कोणत्या परिस्थितीत आहे हे तुला ठाऊक नसेल. मला कुणाकडे तरी त्याबद्दल बोललं पाहिजे. '

' मग सांग काय ते. मी आनंदाने ऐकेन. ' असे म्हणताना पीएरच्या मुद्रेत बदल झाला. कपाळावरील काळजी दाखवणाऱ्या आठ्या नाहीशा झाल्या. तो प्रिन्स आन्द्रेचे बोलणे उत्सुकतेने ऐकू लागला. त्याचा मित्र आता एकदम निराळा मनुष्य दिसत होता—नव्हे झालाच होता. त्याला वाटत असलेल्या मानसिक शीण, जीवनाचा उद्वेग, भ्रमनिरास ह्या गोष्टी आता कुठे गेल्या होत्या ? पीएरशिवाय दुसऱ्या कोणाजवळ तो आपले मन उघडे करू शकत नव्हता.

त्याच्याजवळ त्याने आपले मन मोकळे केले. आपल्या भावी जीवनाचे बेत त्याने तत्परतेने आणि धाडसाने आखले होते. ' माझ्या वडिलांच्या लहरीखातर माझ्या सौख्याचा बळी द्यायला मी तयार नाही. ' असे तो म्हणाला. तो आपल्या वडिलांना आपल्या लग्नाला संमती द्यायला भाग पाडणार होता; नाहीतर त्यांची मुळी संमतीच मागणार नव्हता. झपाटून टाकणाऱ्या भावनेचे त्याचे त्यालाच आश्चर्य वाटत होते. त्याला ती भावना आपल्यापासून अलग, स्वतंत्र आणि वेगळी अशी वाटू लागली होती.

तो बोलत होता. ' मी असं प्रेम करू शकेन असं कुणी अगोदर सांगितलं असतं तर माझा त्याच्यावर विश्वास बसला नसता. माझ्या पूर्वीच्या भावनेहून ही भावना किती वेगळी

आहे. माझ्या दृष्टीनं जगाचे दोन भाग झाले आहेत. ज्या भागात ती आहे तिथं सुख आहे, आशा आहे, प्रकाश आहे. ज्या दुसऱ्या भागात ती नाही तिथं केवळ निराशा आणि अंधार आहे. मला निराशा आणि अंधार यांची कल्पना चांगलीच येऊ लागली आहे.'

लग्न करण्यासाठी वडिलांची संमती घेणे आवश्यक होते म्हणून त्यांना भेटण्यासाठी प्रिन्स आन्द्रे आला.

त्याच्या वडिलांनी मुलाचे विचार बाह्यतः शांत वृत्ती धारण करून ऐकले. मनातून मात्र ते अतिशय संतापले. आयुष्य उताराला लागलेले असताना त्यात बदल करण्याची अगर ते नव्या तऱ्हेने चालवण्याची इच्छा माणसांना कशी होते ते त्यांना कळत नव्हते. 'ही माणसं मला हवं तसं जीवन जगू देतील आणि स्वतःला हवं ते करतील तर किती चांगलं होईल.' ते स्वतःशी म्हणाले. गंभीर पेचप्रसंग निर्माण झाला की ते नेहमीच मुत्सद्दीपणाने वागत. तसेच वागण्याचे त्यांनी ठरवले. शांत वृत्तीने ते प्रिन्स आन्द्रेच्या लग्नाच्या प्रश्नाची चिकित्सा करू लागले.

वय, संपत्ती, प्रतिष्ठा या दृष्टींनी विचार केला असता त्यांच्या मते त्याचे लग्न स्वागतार्ह नव्हते. दुसरं म्हणजे त्याचे तारुण्य ओसरलेले होते. त्याची प्रकृतीही धडधाकट नव्हती. (या मुद्द्यावर त्याच्या वडिलांनी विशेष भर दिला.) मुलगी तर अल्पवयीनच होती. अशा मुलीच्या हवाली त्याच्या लहान मुलाला करावे लागले तर ती कीव करण्याजोगी गोष्ट ठरणार होती.

आपल्या मुलाकडे उपरोधपूर्ण कटाक्ष टाकीत ते म्हणाले, 'चौथी आणि शेवटची गोष्ट ही की तू तुझा निर्णय वर्षभर लांबणीवर टाकावा असं मला वाटतं. परदेशी जाऊन जरा प्रकृती सुधारून ये. प्रिन्स निकोलायसाठी एखादी जर्मन शिक्षिका पाहा. त्यानंतरही जर तुझं प्रेम, तुझी वासना, तुझा दुराग्रह...तू काय म्हणशील ते.. ते टिकून राहिलं तर तिच्याशी लग्न कर. मला आणखी काही या विषयावर बोलायचं नाही. हा माझा अखेरचा शब्द समज.' आपला निर्णय कोणत्याही परिस्थितीत अटळ आहे असे सुचवणाऱ्या स्वरात ते म्हणाले.

प्रिन्स आन्द्रेला आता लख्ख कळून चुकले. 'एक वर्षभर माझी किंवा माझ्या वाग्दत्त वधूची प्रीतिभावना टिकणार नाही. त्या अवधीत आपण दिवंगत होऊ अशी आशा वडिलांना वाटत असावी.' प्रिन्स आन्द्रेने वडिलांच्या इच्छेनुसार वागण्याचे ठरवले. नताशाला मागणी घालून एक वर्षाने लग्न करण्याचा निर्णय त्याने घेतला.

त्याने रोस्तॉफकुटुंबास शेवटची भेट दिली. त्यानंतर तीन आठवड्यांनी तो पीटर्सबर्गला परतला.

आईशी बोलणे झाल्यानंतरचा दुसरा दिवस नताशाने बोलकॉन्स्कीची प्रतीक्षा करण्यात घालवला. पण तो काही आला नाही. आणखी दोन दिवस तसेच गेले. पीएरदेखील फिरकला नाही. प्रिन्स आन्द्रे आपल्या वडिलांना भेटायला गेल्याचे नताशाला ठाऊक नव्हते त्यामुळे त्याच्या गैरहजेरीचा अर्थ तिला कळेना.

असे तीन आठवडे गेले. नताशा घराबाहेर पडेनाशी झाली. ती निरुद्योगी, निरुत्साही बनली. भुतासारखी घरातल्या घरात फिरू लागली. रात्री एकान्तात रडू लागली. रात्री आई-कडे देखील जाईनाशी झाली. तिचा चेहरा सारखा लालबुंद व संत्रस्त राहू लागला. प्रत्येकाला आपली निराशा ठाऊक आहे, प्रत्येकजण आपल्याला हसत आहे, आपली कीव करीत आहे असे तिला वाटू लागले. तिचे आंतरिक दुःख तीव्र होते. पण तिला दारुण दुःख झाले होते ते तिचा अहंकार दुखावला गेल्यामुळे.

एक दिवस ती आपल्या आईच्या खोलीत गेली आणि तिला काही सांगण्याचा प्रयत्न करीत असताना ओक्साबोक्शी रडू लागली. आपल्याला शिक्षा का होत आहे हे ठाऊक नसलेल्या अपमानित मुलासारखी ती रडत होती. काउंटेस मुलीचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करू लागली. पहिल्यांदा तिने काही वेळ आईचे म्हणणे ऐकून घेतले. मग एकाएकी ती मधेच म्हणाली, 'ममा, आता काही बोलू नकोस. मी त्याचा विचार सोडून दिला आहे. मला त्याच्या-बद्दल विचारही करायचा नाही. तो इथं येऊ लागला काय आणि मग त्यानं एकदम यायचं बंद केलं काय !' तिच्या आवाजाला कंप होता. ती अगदी रडण्याच्या बेतात होती, पण स्वतःला सावरून ती शांतपणे बोलू लागली. 'मला लग्न करायचं नाही. मला त्याची धास्ती वाटते. मी आता सगळं सोसलं, पचवलं आहे.'

हे संभाषण झाले त्याच्या दुसऱ्या दिवशी नताशाने आपला जुना पोषाख चढवला. पूर्वी तो पोषाख सकाळीच चढवून तिने कितीतरी दिवस गमतीत घालवलेले होते. आता तिने नाच-समारंभापासून सोडून दिलेला आपला जुना कार्यक्रम त्या सकाळपासून पुन्हा सुरू केला.

सकाळचा चहा घेऊन ती मोठ्या दालनात गेली. ह्या दालनात आवाज मोठ्याने घुमायचा म्हणून ते तिला फार आवडायचे. तिथे जाऊन ती संगीताचे धडे गिरवू लागली. पहिला पाठ संपल्यावर ती दालनाच्या मध्यभागी उभी राहिली. तिला आवडणारी एकच एक तान तिने घेतली. तान निनादू लागली आणि ती नव्यानेच ऐकल्यासारखी आनंदून ऐकू लागली. ते स्वर तो अवकाश भरून टाकीत होते आणि हलके हलके विरत होते. ते ऐकून तिला एकदम उत्साह वाटू लागला. ती स्वतःशी म्हणाली, 'उगाच सारखा विचार करण्यात काय अर्थ आहे ? आहे ती परिस्थिती किती चांगली आहे !' ती खोलीतल्या खोलीत येरझाऱ्या घालू लागली. आपली तालात पडणारी पावले ऐकून ती आनंदित होत होती. तिने आरशात आपले रूप पाहिले. तिच्या चेहऱ्यावरील भाव जणू बोलू लागले, 'होय. मीच की ती ? फार छान दिसते की. मला कुणाची गरज नाही.'

खोली साफ करायला नोकर आत येऊ बघत होता पण तिने त्याला आत येऊ दिले नाही.

तो जाताच्च तिने दरवाजा लावून पुन्हा येरझारा सुरू केल्या. तिची पूर्वीची तिला हवीशी वाटणारी मनःस्थिती त्या सकाळी पुन्हा उफाळून आली. ती आता स्वतःवर प्रेम करू लागली. तो स्वतःवर खूष झाली. 'ही नताशा किती मोहक मुलगी आहे!' एखाद्या तिऱ्हाइताने-तेही तिऱ्हाईत पुरुषाने बोलावे—तशी ती स्वतःबद्दल बोलत होती.

'ती सुंदर आहे, तिचा गळा गोड आहे, ती तरुण आहे, ती कुणाच्या ना अध्यात ना मध्यात. तिला शांतपणे जगू द्या.' शांत जीवन जगण्याची तिची कितीही इच्छा असली तरी तिच्या मनाला शांतता मिळत नव्हती. आणि ती मिळणार नाही हे तिला लागलीच जाणवले.

दालनाचा दरवाजा उघडून कोणीतरी विचारीत होते. 'घरात आहेत का?' नताशा आरशात बघत होती. तरी तिचे लक्ष आपल्या प्रतिबिंबाकडे नव्हते. तिला दालनाबाहेर बोलण्याचा आणि पावलांचा आवाज ऐकू आला. तिने स्वतःच येऊन पाहिले तेव्हा ती पांढरी फटफटीत पडली. होय, तो आला होता. उघडलेल्या दाराशी त्याचा आवाज ऐकू आला तेव्हाच तिची खात्री झाली.

धास्तावून पांढरी फटफटीत पडलेली नताशा दिवाणखान्यात धावत गेली.

'ममा, बोलकॉन्स्की आले आहेत. ममा, किती भयंकर! मला अगदी असह्य होत आहे. मला माझा छळ व्हायला नको आहे. मी आता करू तरी काय?'

प्रिन्स आन्द्रे त्रस्त गंभीर मुद्रेने दिवाणखान्यात आला. त्यामुळे काउंटेसला आपल्या मुलीला काही सांगायला अवधीच्च सापडला नाही. नताशाला पाहताच प्रिन्स आन्द्रेचा चेहरा आनंदाने उजळला. त्याने काउंटेसच्या हाताचे चुंबन घेतले, मग नताशाच्या हाताचे चुंबन घेऊन तो सोफ्यावर बसला

'कितीतरी दिवसांनी आमचं भाग्य उजाडत आहे.' काउंटेस आणखी काही बोलण्या-पूर्वीच्च प्रिन्स आन्द्रेने तिचा प्रश्न हेरून घाईघाईने आपले म्हणणे तिला ऐकवले.

'मी वडिलांना भेटायला गेलो होतो. त्यामुळं तुम्हाला भेटू शकलो नाही. त्यांच्याकडे मला महत्त्वाच्या गोष्टीविषयी बोलायचं होतं. मी काल रात्रीच्च परत आलो.' तो नताशाकडे नजर टाकीत म्हणाला. क्षणभर शांतता पसरली. तो पुन्हा म्हणाला, 'काउंटेस, मला तुमच्याशी काही बोलायचं आहे.'

दीर्घ उसासा टाकीत नजर खाली वळवीत काउंटेस एकदाची म्हणाली, 'मी ऐकायला तयार आहे. नताशा तू पळ इथून. मग बोलावीन तुला.' ती हळू आवाजात नताशाला म्हणाली.

नताशाने भीतीने आणि अजीजीने प्रिन्स आन्द्रेकडे आणि आपल्या आईकडे पाहिले आणि मग ती बाहेर गेली.

'काउंटेस, मी तुमच्या मुलीला मागणी घालायला आलो आहे.' प्रिन्स आन्द्रे म्हणाला.

काउंटेसचा चेहरा चांगलाच्च लालबुंद झाला. ती काही बोलली नाही. 'तुमची मागणी... काउंटेस गंभीरपणे बोलू लागली तेव्हा प्रिन्स आन्द्रे मुकाटपणे तिच्याकडे पाहात राहिला.

निश्चित काय बोलावे हे तिला प्रथम कळेना. ती म्हणाली, ' तुमची मागणी मला मान्य आहे. मला आनंद वाटला. माझा नवरा...मला आशा आहे नताशानंच काय ते ठरवलं पाहिजे.'

' तुमची संमती असली तर मी तिच्याकडे हा विषय काढीन. तुमची संमती आहे ना ?' प्रिन्स आन्द्रेने विचारले.

' होय. ' काउंटेसने असे म्हणून आपला हात त्याच्यापुढे धरला. तिच्या हाताचे चुंबन घेण्यासाठी तो वाकताच तिने त्याच्या भालप्रदेशाचे चुंबन घेतले, त्यावेळी तिच्या मनात त्याच्याबद्दल तिटकारा होता आणि मार्दवही होते. त्याच्यावर प्रेम करावे असे तिला वाटू लागले. पण तो तिला परका वाटू लागला, त्याची तिला भीती वाटू लागली.

' मी तिला तुमच्याकडे पाठवते. ' असे म्हणून काउंटेस खोलीबाहेर गेली.

सोन्याने काउंटेसला सांगितले, ' नताशा झोपण्याच्या खोलीत आहे. ' नताशा बिछान्यावर बसली होती. तिचा चेहरा निस्तेज झाला होता. डोळे कोरडे झाले होते. पवित्र प्रतिमेवर डोळे लावून क्रूसची खूण जुळवीत असताना ती काहीतरी पुटपुटत होती. आईला पाहताच ताडकन उठून तिने तिच्याकडे धाव घेतली. ' ममा, काय झालं ?...काय झालं ?'

' नताशा, त्याला जाऊन भेट. त्यानं तुला मागणी घातली आहे. ' नताशाला आपल्या आईचे उद्गार निर्विकार वाटले. ती धावत जाऊ लागली असताना कानउघाडणी केल्यागत दुःखी स्वरात पुटपुटली, ' जा जा.'

आपण दिवाणखान्यात कसा प्रवेश केला ते नताशाला सांगता आले नसते. ती दारात राहिली तेव्हा तो दिसला तशी ती तिथेच थांबली. ' हा परका मनुष्य माझं सर्वस्व झाला आहे. होय, तो माझं सर्वस्व झाला आहे. जगातील कोणत्याही गोष्टींहून तो मला प्रिय आहे.'

पापणी न उचलता प्रिन्स आन्द्रे तिच्याजवळ आला.

' तुला पाहिलं तेव्हापासून माझा जीव तुझ्यात गुंतला आहे. ' त्याने तिच्याकडे पाहिले. तिची गंभीर भावपूर्ण मुद्रा त्याला जाणवल्याखेरीज राहिली नाही.

ती त्याच्याकडे येऊन थांबली तेव्हा त्याने तिच्या हाताचे चुंबन घेऊन विचारले, ' तुझं माझ्यावर प्रेम आहे का ?'

' होय. होय. ' नताशा जवळ जवळ रागाने उद्गारल्याचे दिसत होते. तिने एक दीर्घ उसासा टाकला, पुन्हा एक उसासा टाकला. तिचा श्वासोच्छ्वास जोरजोराने होऊ लागला. आणि ती स्फुंदू लागली.

' काय झालं ? रडतेस का ?'

' मला खूप आनंद झाला आहे. ' ती हसत म्हणाली तेव्हा तिच्या डोळ्यांत अश्रू तरळत होते. ती त्याच्याजवळ आणखी सरकली, त्याचे चुंबन घ्यावे का नाही याचा जणू तिने क्षणभर विचार केला आणि मग त्याचे चुंबन घेतले.

प्रिन्स आन्द्रेने तिचे हात हातात घेऊन तिच्या डोळ्यांत पाहिले. आता त्याला आपल्या अंतःकरणात तिच्याबद्दल ओढ नसल्याचे आढळले. त्याच्या मनात एकाएकी कसलीतरी

प्रतिक्रिया झाली असावी. त्याच्या पूर्वीच्या इच्छेतील काव्यात्मकता आणि अद्‌भुत मोहिनी आता उरली नव्हती. त्या दुबळ्या, बालिश वृत्तीच्या स्त्रीबद्दल त्याच्या मनात आता कीव निर्माण झाली. तिच्या भक्तीबद्दल भीती वाटू लागली आणि विश्वासही वाटू लागला. तिच्याबाबतच्या दुःखद पण गोड कर्तव्याच्या जाणिवेला तो कायमचा बांधला जात होता.

प्रिन्स आन्द्रे तिला म्हणाला, ' क्षमा कर मला. तू माझ्या मानानं खूपच लहान आहेस. मी तर जीवनाचा खूप अनुभव घेतलेला आहे. मला तुझी काळजी वाटते. तुला अजून स्वतःचीच ओळख झालेली नाही. '

नताशा एकाग्र चित्ताने त्याचा प्रत्येक शब्द ऐकून मनात साठवू पाहात होती, त्याचा अर्थ लावीत होती पण तिला काही समजत नव्हते.

प्रिन्स आन्द्रे बोलत होता, ' माझं सुख लांबणीवर पडणार आहे. मला एक वर्ष असह्य होणार आहे. तरीपण त्या अवधीत तुला निश्चित निर्णय घेता येईल. वर्षानंतर मला सुखी कर अशी मी तुला विनंती करतो. तरीही तू काहीही करायला स्वतंत्र आहेस. आपण आपला वाङ्‌निश्चय जाहीर करूया नको. जर तुझं माझ्यावर प्रेम नाही असं तुला आढळलं अगर तुझं प्रेम दुसऱ्या कोणावर...' प्रिन्स आन्द्रेने बळेबळे हास्य केले.

' असं का म्हणता तुम्ही ? तुम्हाला ठाऊक नाही का? तुम्ही जेव्हा पहिल्यांदा ऑट्रॅड्नूला आलात तेव्हापासून मला तुम्ही आवडत आहात. ' आपण सत्य बोलत आहोत अशा खात्रीने ती म्हणाली.

' एक वर्षात तुला आपलं मन कळेल. '

' एक सबंध वर्ष ? ' नताशा ओरडली. एक वर्ष आपले लग्न लांबणीवर पडणार आहे हे आता कुठे तिच्या डोक्यात शिरले. ' एक वर्ष का ? इतका दीर्घकाळ का म्हणून ? '

प्रिन्स आन्द्रेला विलंबाची कारणे सांगावी लागली. पण नताशाला ती ऐकू आली नाहीत.

' त्यावर काही उपाय नाही का ? ' तिने विचारले. पण प्रिन्स आन्द्रेने काही उत्तर दिले नाही. हा निर्णय बदलणे अशक्य आहे अशी त्याची मुद्रा सांगत होती.

' किती भयंकर ! किती भयंकर ! ' नताशा एकाएकी उद्गारली आणि पुन्हा स्फुंदू लागली. ' एक वर्ष वाट पाहावी लागली तर मी काही जगणार नाही. अशक्य, अशक्य आहे ते. फार भयंकर ! ' तिने आपल्या प्रियकराच्या चेहऱ्याकडे पाहिले. त्याला दुःख झाले होते, तो गोंधळून गेला होता.

' काही हरकत नाही. मी काहीही करीन. ' ती आपले अश्रू आवरीत म्हणाली. ' मी खूप खूप आनंदात राहीन. '

त्या दिवसापासून प्रिन्स आन्द्रे वाङ्‌निश्चय झालेला प्रेमिक या नात्याने रोस्तॉफकुटुंबाकडे येत राहिला.

बोलकॉन्स्की आणि नताशा यांचा वाङ्‌मनिश्चय उपचारपूर्वक झाला नाही तसेच जाहीरही झाला नाही. प्रिन्स आन्द्रेनेच तसा आग्रह धरला होता. तो म्हणाला होता, 'लग्नाला विलंब होण्याला मीच कारणीभूत असल्याने मीच सर्व त्रास सोसायला पाहिजे. मी माझे वचन नेहमीच पाळीन. मला नताशा वचनबद्ध व्हायला नको आहे. तिला मी पूर्ण स्वातंत्र्य देऊ इच्छितो. येत्या सहा महिन्यांत तिला आपले प्रेम माझ्यावर नाही असे वाटले तर तिला नकार द्यायला पूर्ण हक्क आहे.'

अशी शक्यता नताशाला अथवा तिच्या आईवडिलांना वाटत नव्हती. पण प्रिन्स आन्द्रेने आपले म्हणणे त्यांच्या गळी उतरवले. प्रिन्स आन्द्रे दररोज रोस्तॉफकुटुंबाच्या घरी येई. मात्र तो नताशाशी वाङ्‌निश्चय झाल्यासारखा वागत नसे. तो तिला शिष्टाचारपूर्वक हाक मारी आणि तिच्या केवळ हाताचे चुंबन घेई.

घरातील काव्यात्म वातावरण शांत होते. त्यात चैतन्य नव्हते. वाङ्‌निश्चय झालेले जोडपे असले म्हणजे वातावरण अशाच प्रकारचे असते. ती सगळी माणसे एकत्र बसली की कुणी बोलत नसे. काही वेळा बाकीची मंडळी उठून निघून जात. तरीही वाङ्‌निश्चय झालेले युगुल एकान्त मिळूनही बोलत नसे. ती दोघे आपल्या भावी जीवनाबद्दल अगदी क्वचितच बोलत. प्रिन्स आन्द्रे इतका धास्तावलेला आणि संकोचलेला असे की तो अबोल राही. नताशाला त्याच्या सगळ्या भावना कळत आणि ती त्या भावनांशी समरस व्हायला चुकत नसे.

थोरला काउंट कधीतरी प्रिन्स आन्द्रेकडे येई, त्याचे चुंबन घेई, पेत्याच्या शिक्षणाबाबत अगर निकोलायच्या नोकरीबाबत त्याचा सल्ला घेई. त्या दोघांकडे पाहून थोरली काउंटेस उसासा टाकी. सोन्याला प्रत्येक क्षणाला आपण त्यांना अडचण होऊ अशी भीती वाटे. त्यांना एकटे राहायचे नसले तरी ती काहीना काही सबब सांगून बाहेर पडण्याचा प्रयत्न करी. प्रिन्स आन्द्रे काही सांगू लागली की—त्याची वर्णनशैली अप्रतिम होती—नताशा मोठ्या अभिमानाने त्याचे बोलणे ऐकत राही. ती बोलू लागे तेव्हा तो तिला उत्सुकतेने न्याहाळीत राही. ते पाहून ती सुखावून जाई आणि तिला भीतीही वाटे. ती गोंधळून स्वतःला प्रश्न करी: 'माझ्यामध्ये हे काय शोधताहेत? अशी दृष्टी लावून त्यांना काय शोधायचे आहे? त्यांची दृष्टी त्यांना जे हवे आहे ते शोधीत आहे आणि त्यांना ते सापडले नाही तर काय होईल?' कधी कधी ती आनंदाने धुंद होई. प्रिन्स आन्द्रे कसा हसतो ते पाहणे तिला आवडे. प्रिन्स आन्द्रे क्वचितच हसे पण जेव्हा तो हसे तेव्हा तो मुक्त आनंदाने हसे. त्याच्या हसण्यामुळे आपण त्याच्याकडे अधिक आकर्षित होत आहोत असे तिला वाटू लागे.

पीटर्सबर्गला जायच्या आदल्या दिवशी प्रिन्स आन्द्रे आपल्याबरोबर पीएरला घेऊन आला. नाचसमारंभाच्या दिवसापासून पीएर रोस्तॉफकुटुंबाच्या घरी आला नव्हता. पीएर विमनस्क

आणि संकोचलेला दिसत होता. तो मुख्यतः काउंटेसशी बोलत राहिला. नताशा आणि सोन्य बुद्धिबळाचा पट मांडून बसल्या होत्या. नताशाने खेळण्यासाठी बोलावताच प्रिन्स आन्द्रे त्यांच्याकडे गेला.

'बेझुहोव्हला तू खूप दिवसापासून ओळखतेस, होय ना? तुला आवडतो का तो?' त्याने विचारले.

'आवडतो. तो चांगला माणूस आहे पण भारी असमंजस.'

मग ती इतर लोक सांगत त्याप्रमाणे पीएरच्या विसरळभोळेपणाच्या लोकांनी रचलेल्या आख्यायिका सांगू लागली.

प्रिन्स आन्द्रे तिला म्हणाला, 'हे बघ. मी आपलं गुपित त्याला सांगितलं आहे. मी त्याला लहानपणापासून ओळखतो आहे. तो उदार मनाचा आहे.' मग एकाएकी गंभीर होऊन प्रिन्स आन्द्रे म्हणाला, 'हे बघ नताली, तुला मी एक विनंती करणार आहे. मी आता इथं नसेन. काय होणार आहे ईश्वर जाणे. तू कदाचित बदलशील...माफ कर, खरं तर मी असं बोलायला नको होतं...माझी एकच विनंती आहे. मी दूर असताना तुझ्यावर जर काही प्रसंग ओढवला...'

'कसला प्रसंग...?'

'जर तुला काही त्रास झाला तर तू त्याच्याकडे जा. दुसऱ्या कुणाकडे सल्लामसलतीसाठी अगर मदतीसाठी जाऊ नकोस. तो भारी विसरभोळा आणि चक्रम आहे हे खरं. पण त्याच्यासारखा उदार अंतःकरणाचा मनुष्य विरळा.'

नताशाचे आईवडील, सोन्या अगर प्रिन्स आन्द्रे यांपैकी कोणालाच नताशावर विरहाचा काय परिणाम होईल ह्याची कल्पना नव्हती. दिवसभर नताशा घरात फिरली, लालबुंद झाली, संतापत राहिली, तिच्या डोळ्यांत एक टिपूसही आला नाही. भवितव्य काय आहे हे ठाऊक नसल्यागत ती अत्यंत क्षुद्र गोष्टींत मग्न झाली. शेवटच्या क्षणी प्रिन्स आंद्रेने हाताचे चुंबन घेतले तेव्हाही ती रडली नाही.

'तुम्ही जाऊ नका.' एवढेच शब्द ती बोलली तेव्हा त्या आवाजामुळे प्रिन्स आन्द्रेला आपण खरोखर राहावे असे वाटू लागले. तिचा आवाज नंतर त्याला कितीतरी दिवस आठवू लागला. तो निघून गेला तरीही ती रडली नाही. कित्येक दिवस ती आपल्या खोलीत न रडता बसून होती. तिला कशातच गोडी वाटेना. 'ते निघून गेले का?' एवढेच ती सारखी विचारीत राहिली. तो निघून गेल्यावर पंधरा दिवसांनी तिच्या मनाचा आजार बरा झाला. पुन्हा ती पूर्ववत वागू लागली तेव्हा सगळे आश्चर्यचकित झाले. दीर्घ आजारानंतर मुलाच्या चेहऱ्यात बदल पडतो, तसा तिच्या वृत्तीत बदल झाला.

त्या वर्षी मुलगा दूर गेल्यापासून प्रिन्स निकोलाय अँड्रीच बोलकॉन्स्कीची तब्येत ढासळू लागली. तो अधिकाधिक चिडखोर बनला. त्याच्या अकारण संतापाला बिचाऱ्या प्रिन्सेस मार्याला तोंड द्यावे लागे. जास्तीत जास्त कठोर प्रहार करण्यासाठी तो तिच्या स्वभावातील मर्मस्थळे हेरीत आहे असे वाटत होते.

प्रिन्सेस मार्याच्या उत्कट भावनेचे आणि परिणामतः अत्यानंदाचे विषय दोनच होते : एक निकोलुश्का, दुसरा धर्म. त्या दोन्ही विषयांची थट्टामस्करी करण्यात थोरल्या काउंटला कोण आनंद मिळे ! कोणी कसल्याही विषयावर बोलत असले तरी थोरला काउंट संभाषणाची गाडी दोन गोष्टींकडे वळवी : त्या अविवाहित मुलीच्या अंधश्रद्धा आणि तिचे मुलांना बिघडवणारे लाड. ' तुला निकोलुश्काला तुझ्यासारखी म्हातारी कुमारिका बनवायचं आहे का ? प्रिन्स आन्द्रेला मुलगा हवा आहे, म्हातारी कुमारिका नको.' तो म्हणायचा.

प्रिन्स मार्याच्यादेखत कधीकधी तो बूरिअनबाईला विचारी — ' तुला ह्या खेड्यातले धर्मगुरू आणि पवित्र प्रतिमा आवडल्या की नाहीत ? ' मग तो त्यांची थट्टा करू लागे.

थोरला काउंट नेहमीच प्रिन्सेस मार्याचे मन दुखवी. पण त्याला क्षमा करण्यासाठी तिला प्रयास करावा लागत नसे. काही झाले तरी तिच्या वडिलांचे तिच्यावर प्रेम होते. त्यांनी कधी अन्याय केला नसता असे तिला वाटे. त्यामुळे ते कसेही वागले तरी प्रिन्सेस मार्या त्यांना दोष देऊ शकत नसे. अन्याय अन्याय म्हणजे तरी काय ? ' न्याय ' ह्या प्रतिष्ठित शब्दाचा विचारदेखील मार्या करीत नसे. मानवतेचे सर्व गुंतागुंतीचे नियम तिच्या दृष्टीने एका सरळसाध्या नियमात सामावलेले होते—प्रेमाचा आणि त्यागाचा नियम. हे नियम ज्याने घालून दिले होते आणि ज्याने मानवजातीच्या प्रेमासाठी सोसले होते तो तर प्रत्यक्ष ईश्वर होता. इतर लोकांच्या न्यायाशी वा अन्यायाशी तिला काय करायचे होते ? दुःख सोसणे आणि प्रेम करणे याशिवाय अन्य असे कर्तव्य तिला नव्हते, आणि ती आपले कर्तव्य पार पाडीत होती.

हिवाळ्यामध्ये प्रिन्स आन्द्रे ब्लीक हिल्सला आला, तेव्हा तो अतिशय आनंदात होता; वागण्यात सौजन्य आणि प्रेमळपणा होता. गेल्या कित्येक वर्षांत तो असा वागल्याचे प्रिन्सेस मार्याला ठाऊक नव्हते. त्यामागे काहीतरी खास कारण असावे असे तिला वाटू लागले. परंतु त्याने आपल्या आवडत्या बहिणीला आपल्या प्रीतीबद्दल एक चकार शब्द सांगितला नाही. जाण्यापूर्वी प्रिन्स आन्द्रे आपल्या वडिलांशी कितीतरी वेळ बोलत होता. तो निरोप घेऊ लागला तेव्हा बापलेकांचे काहीतरी बिनसलेले असावे ह्याचा अंदाज प्रिन्सेस मार्याला आला.

प्रिन्स आन्द्रे निघून गेल्यावर प्रिन्सेस मार्याने ब्लीक हिल्स येथून पीटर्झबर्गमधील आपली मैत्रीण जूली कॅरॅगिन हिला पत्र लिहिले. मुलींचे मनोराज्य असावे तसे प्रिन्सेस मार्याचे आपले एक मनोराज्य होते. आपल्या मैत्रिणीचे लग्न आपल्या भावाशी व्हावे असे तिला वाटे. जूली कॅरॅगिनचा भाऊ तुर्कस्थानच्या लढाईत मारला गेला होता त्यामुळे ती शोकमग्न होती.

प्रिन्सेस मार्याने तिला पत्र लिहिले.

' प्रिय मैत्रिण जूली हीस—

‘ तुझ्या माझ्या नशिबात शोक लिहिलेला दिसतो.

‘ माझ्या प्रिय मैत्रिणी, आपल्याला समाधान देण्यास म्हणत नाही पण आपणास निराशेपासून वाचवण्यास एक धर्मच समर्थ आहे. धर्माच्या मदतीनेच अनाकलनीय गोष्टी कळू लागतील. इतरांना न दुखावता जी उत्तम, सत्प्रवृत्त माणसे आपले जीवन सुखी करीत असतात त्यांना परमेश्वर बोलावून का घेतो आणि इतरांना त्रास देणारी, स्वतःला व इतरांना भारभूत होणारी निरुपयोगी, दुष्ट माणसे जगात का राहतात याचे उत्तर फक्त धर्मच देऊ शकेल. माझ्या बहिनीचे मरण मी पाहिलेले पहिले मरण होय. मी ते कधीही विसरणार नाही. त्या मरणाने माझ्यावर असाच ठसा उमटवला आहे.

‘ तू नियतीबद्दल संशय व्यक्त करीत आहेस. ‘ माझा थोर मनाचा भाऊ का मरण पावला ?’ असे विचारतेस. मला देखील असाच प्रश्न पडला आहे. जिने कधी कुणाला जराही दुखापत केली नाही, जिच्या मनात सदैव करुणाच पाझरली ती देवमाणसासारखी असलेली माझी लिझवहिनी का सोडून गेली हे मला उमगलेले नाही. तिला मरणे का आवश्यक होते आणि आम्हाला बहुतांशी अनाकलनीय असली तरी ज्याची करणी प्राणिमात्रावरील अगाध प्रीतीचा आविष्कार असते त्या विश्वनिर्मात्याची अमर्याद करुणा मृत्यूच्या रूपाने कशी प्रकट होते हे माझ्यासारख्या मंदमतीला आता स्पष्ट कळू लागले आहे.

‘ तिच्या अकाली घडलेल्या भीषण मृत्यूचा माझ्यावर आणि माझ्या भावावर—आम्हाला दुःख झाले हे खरे असले तरी—अतिशय चांगला परिणाम झाला आहे. आमची हानी झाली त्या क्षणी असे विचार माझ्या मनात आले नव्हते. त्यावेळी असले विचार भयानक समजून मी डोक्यातून काढून टाकले असते. आता मला स्पष्ट कळू लागले आहे.

‘ प्रिय सखी, तुला बायबलमधील सत्याची खात्री पटवण्यासाठी मी हे पत्र लिहीत आहे. बायबलमधील सत्य माझ्या जीवनाचा सिद्धान्त बनले आहे. देवाच्या इच्छेखेरीज झाडावरील एक पानही गळत नाही. त्याच्या इच्छेचे मार्गदर्शक तत्त्व आहे. त्याची आमच्यावर अमर्याद अनंत माया आहे. आपणावर कोणताही प्रसंग आला तरी तो आपल्या भल्यासाठीच असतो ही श्रद्धा बाळग.

‘ माझ्या वडिलांची प्रकृती दिवसेंदिवस ढासळत आहे. त्यांना विरोध सहन होत नाही. ते क्षुल्लक कारणांवरून पटकन चिडतात, राजकीय गोष्टींवरून ते किती सहज संतापतात याची तुला कल्पना असेलच. युरोपच्या सर्व सम्राटांबरोबर—विशेषतः आमच्या सम्राटाबरोबर म्हणजे ग्रेट कॅथरीनच्या नातवाबरोबर—बोनापार्टने समान पातळीवरून बोलणी करावी ही कल्पनाच माझ्या वडिलांना सहन होत नाही. मला राजकारणात काडीचाही रस नाही हे तुला माहीत आहे. पण वडिलांकडून आणि मिहाइल इव्हानॉविचशी होणाऱ्या संभाषणांतून जगात काय चालले आहे ते मला कळत असते. बोनापार्टचा सन्मान करण्यात आला हे मी ऐकले आहे. जिथे बोनापार्टला थोर मनुष्य म्हणून सोडाच पण फ्रान्सचा सम्राट म्हणूनही मान्यता मिळालेली नाही अशी, मला वाटते पृथ्वीच्या पाठीवर, ब्लीक हिल्स ही एकच जागा असेल.

' माझा भाऊ आन्द्रे याची गैरहजेरी सोडली तर आमचे घरातील कार्यक्रम पूर्ववत चालू आहेत. तो आता खूप बदलला आहे. मागे तुला मी लिहिले होतेच. झालेल्या हानीच्या धक्क्यातून तो या वर्षी अगदी अलीकडे पूर्णतः सावरल्यासारखा दिसत आहे. मी त्याला लहानपणी पाहिले होते तसाच तो आता पुन्हा झाला आहे. तसाच सुस्वभावी, तसाच प्रेमळ, तसाच अलौकिक अंतःकरणाचा. आपले जीवन अद्याप संपलेले नाही असे त्याला वाटत असावे असे दिसते.

' त्याच्या आचारविचारांतील बदलाबरोबरच त्याचे शरीर फार अशक्त झाले आहे. तो कधी नव्हे इतका कृश आणि उद्विग्न झाला आहे. मला त्याची खूप काळजी वाटत आहे. डॉक्टरांनी फार पूर्वी त्याला परदेशगमन करायला सांगितले होते. ते आता करावे असे त्याच्या मनात आहे. यामुळे मला बरे वाटत आहे. त्यामुळे तो बरा होईल अशी मला आशा आहे.

' माझ्या भावाचा रोस्टॉफकुटुंबातील एका लहान मुलीशी वाङ्‌निश्चय झाला आहे ही आधार नसलेली बातमी तू पत्रात दिली आहेस. पीटर्सबर्गहून अशा तऱ्हेच्या वार्ता मॉस्कोला कशा जातात तेच मला कळत नाही. आन्द्रे कुणाशी लग्न करील आणि त्यातही त्या मुलीशी लग्न करील असे मला बिलकुल वाटत नाही. का ते सांगतेच आता. आन्द्रे आपल्या पत्नी-बद्दल जरी क्वचितच बोलत असला तरी तिच्या मृत्यूचे दुःख त्याच्या अंतःकरणात एवढे खोलवर गेले आहे की तो दुसरे लग्न करण्याचा आणि आपल्या छोट्या देवदूताला सावत्र आई आणण्याचा विचार स्वप्नातही करणार नाही. हे पहिले कारण झाले. आन्द्रेला आकर्षित करू शकेल अशी ती मुलगी नाही अशी माझी माहिती आहे. हे दुसरे कारण. आन्द्रेने आपली पत्नी म्हणून तिची निवड केली असेल यावर माझा विश्वास बसत नाही. खरे बोलायचे तर मलाही ही गोष्ट नको आहे. मी किती वहावत गेले. माझा दुसरा कागद संपत आला. प्रिय सखे, तुझा निरोप घेते.

' परमेश्वराची तुझ्यावर माया राहो.

' माझी प्रिय मैत्रीण बूरिअनबाई हिची तुला सप्रेम चुंबने.

मार्या '

स्वित्झर्लंडमधून प्रिन्स आन्द्रेने जुलैमधे प्रिन्सेस मार्याला पत्र पाठवले. त्याने तिला आश्चर्य-चकित करणारी बातमी कळवली. रोस्टॉफकुटुंबातील धाकट्या मुलीशी—नताशाशी आपला वाङ्‌निश्चय झाल्याचे कळवले. आपल्या वाग्दत्त वधूबद्दल त्याने किती उत्साहाने आणि प्रेमाने लिहिले होते.

' आतासारखी प्रीती मी आयुष्यात पूर्वी कधी अनुभवली नव्हती. आताच मला जीवनाचा अर्थ आणि महत्त्व कळू लागले आहे. ब्लीक हिल्सला असतानाच मी माझा बेत वडिलांना

सांगितला. त्याबद्दल तुझ्याकडे काहीच बोललो नाही म्हणून क्षमा कर. तू कदाचित त्यांना संमती द्यायला विनवले असतेस पण तुझा हेतू साध्य झाला नसता. उलट ते आणखी संतापले असते. आपला सगळा संताप त्यांनी तुझ्यावर काढला असता. हे लक्षात घेऊन मी तुझ्याकडे काही बोललो नव्हतो. खेरीज त्या वेळी आतासारख्या गोष्टी पक्क्या झाल्या नव्हत्या. त्या वेळी वडिलांनी एक वर्षानंतर मी लग्न करावे असा आग्रह धरला होता. आता सांगितलेला अर्धा कालावधी म्हणजे सहा महिने उलटले आहेत. माझा निश्चय पूर्वीहून अधिक अढळ आहे. डॉक्टरांनी राहाण्याचा आग्रह धरला नसता तर मी केव्हाच रशियात आलो असतो. आहे त्या परिस्थितीत मला आणखी तीन महिने इथे राहणे भाग आहे. माझे वडिलांशी कसे संबंध आहेत ते तुला ठाऊक आहे. मला त्यांच्याकडून कशाचीही अपेक्षा नाही. मी नेहमी-प्रमाणे स्वतंत्र राहणार आहे. त्यांचे अखेरचे दिवस फार उरले नाहीत. अशा वेळी मी त्यांच्या इच्छेविरुद्ध वागलो आणि त्यांचा राग ओढवून घेतला तर माझ्या जीवनातील निम्मे सौख्य नाहीसे होईल. मी त्यांना लिहिलेले पत्र अनुकूल वेळ पाहून दे. त्यांचे ह्याबाबत काय मत आहे ते कळव. वर्षाचा अवधी तीन महिन्यांनी कमी करायला ते संमती देण्याची शक्यता आहे का बघ आणि काय ते कळव.'

प्रिन्सेस मार्याला काय करावे ते बराच वेळ समजेना. तिच्या मनात नाना संशय येऊ लागले. कितीतरी वेळा तिने देवाची प्रार्थना केली. तिने एकदाचे ते पत्र वडिलांना दिले. दुसऱ्या दिवशी तिचे वडील तिला शांतपणे म्हणाले, 'तुझ्या भावाला कळव–मी मरेपर्यंत धीर धर. त्याला फार वेळ वाट पाहावी लागणार नाही. मी त्याला लौकरच मोकळा करीन.'

प्रिन्सेस मार्या काही बोलण्याचा प्रयत्न करू लागली पण तिला बोलू न देताच ते मोठमोठ्याने बोलू लागले, 'फार भला माणूस आहे तो. करू दे त्याला लग्न. करू दे लग्न. फार चांगले संबंध जुळताहेत. हुषार माणसं आहेत आणि श्रीमंतही आहेत, नव्हे? निकोलुश्काला फार चांगली सावत्र आई मिळणार तर! तू त्याला पत्र टाक. म्हणावं उद्या लग्न केलंस तरी चालेल. निकोलुश्काला सावत्र आई मिळेल. मी देखील बूरिअनबाईशी लग्न करीन म्हणतो.' मोठ्यांदा हसत तिचे वडील पुढे म्हणाले, 'म्हणजे त्याला देखील सावत्र आई मिळेल. एक गोष्ट त्याला बजावून सांग. ' मला माझ्या घरात आणखी स्त्रिया नकोत. लग्न करून त्याला खुशाल दुसरीकडे राहू दे, तूदेखील बहुधा त्याच्याकडे राहायला जाणार असशील? गेलीस तर फार चांगलं होईल. देव तुमचं कल्याण करो.'

एवढा उद्रेक संपल्यावर तिच्या वडिलांनी त्या विषयाबद्दल एक अक्षरही पुन्हा उच्चारले नाही. आपल्या भ्याड मुलाबद्दल वाटणाऱ्या संतापाला वाट करून देण्यासाठी ते आपल्या मुलीवर चिडू लागले. तिला हसण्यासाठी आणि त्रास देण्यासाठी त्यांनी आणखी नवीन गोष्टींची भर घातली. ते सावत्र आईचा उल्लेख करू लागले, बूरिअन बाईबद्दल प्रेमाने बोलू लागले.

ते आपल्या मुलीला विचारू लागले, 'मी तिच्याशी लग्न का करू नये? ती फार चांगली पत्नी होईल.' आताशा आपले वडील त्या फ्रेंच स्त्रीकडे अधिकाधिक आकर्षित होत आहेत हे

प्रिन्सेस मार्याच्या ध्यानात येऊ लागले.

निकोलुश्का, त्याचे शिक्षण, भाऊ आन्द्रे आणि धर्म ह्यात प्रिन्सेस मार्याला सुखसमाधान वाटत होते. प्रत्येकजण मनात सुखस्वप्ने बाळगतो तशी प्रिन्सेस मार्याच्या मनानेही सुखस्वप्ने बाळगली होती. जीवनातील सुखसमाधानाला ती स्वप्नेच कारणीभूत होती. ही स्वप्ने तिला देवमाणसांनी पुरवलेली होती. ही देवमाणसे म्हणजे थोरल्या प्रिन्सला चोरून तिच्या घरी येणारे वेडे प्रेषित आणि यात्रेकरू होत. वाढत्या वयाबरोबर प्रिन्सेस मार्याच्या अनुभवात भर पडू लागली, सुखासाठी धडपडणाऱ्या, कष्ट करणाऱ्या, दुःखे सोसणाऱ्या, अशक्य कोटीतील भ्रमसदृश पापमय सुखांमागे धाव घेणाऱ्या माणसांच्या अदूरदर्शीपणाचे व अल्पमतीचे तिला आश्चर्य वाटू लागले.

प्रिन्स आन्द्रेने आपल्या पत्नीवर प्रेम केले होते, ते पुरेसे नव्हते म्हणून तिच्या निधनानंतर त्याला पुन्हा नव्या स्त्रीशी आपले सौख्य निगडित करायचे होते. त्याच्या वडिलांना नवा संबंध पसंत नव्हता, कारण आन्द्रेचे लग्न तिच्याहून अधिक प्रतिष्ठित आणि श्रीमंत स्त्रीशी व्हावे असे त्यांना वाटत होते. ती सगळी माणसे आटापिटा करीत होती, मनस्ताप, दुःखे सोशीत होती आणि आपल्या अमर आत्म्यांना क्षणभंगुर आनंदाच्या मागे धावडवत होती. सुख किती काळ राहील हे कोणालाही सांगता येत नाही. ईश्वरपुत्र ख्रिस्त भूमीवर अवतीर्ण झाला, त्याने आम्हाला सांगितले, 'हे ऐहिक जीवन क्षणभंगुर आहे.' परमेश्वर आपली पारख करीत असतो. आम्ही मात्र आपल्या जीवनाचा मोह सोडीत नाही, त्याला चिकटून राहतो, त्यापासून सुख मिळेल अशी अपेक्षा करतो.

'जीवनाबद्दलचं सत्य कुणालाच कसं कळलं नाही.' प्रिन्सेस मार्या स्वतःलाच विचारू लागली. 'माझ्याकडे येणाऱ्या त्या तिरस्कृत देवमाणसांना मात्र सत्य उमगलेलं आहे. खांद्यांना पडश्या लटकावून ती माणसं मागच्या दारानं माझ्याकडे येतात. माझ्या वडिलांच्या दृष्टीस पडण्याची त्यांना भीती वाटते. ते आपल्याला वाईट वागवतील म्हणून नव्हे तर त्यांच्या हातून पाप घडेल म्हणून ती त्यांना चोरून येतात. ही माणसं घरदार, स्वदेश सोडतात, ऐहिक सुखांचा त्याग करतात, कोणत्याही गोष्टींची त्यांना आसक्ती नसते. निरनिराळी नावं धारण करून स्वतः विणलेले कपडे घालून ती गावोगाव भ्रमण करीत असतात, मदत करणाऱ्यासाठी इतकंच नव्हे तर त्यांना घालवून देणाऱ्यांसाठीही ती ईश्वराची प्रार्थना करतात. त्यांच्या जीवनाहून अधिक सत्य, अधिक उच्च जीवन दुसरे नसेल !'

प्रिन्सेस मार्याला फेडॉस्युश्का नावाच्या यात्रेकरू स्त्रीची आठवण आली. पन्नाशी गाठलेल्या, शांत वृत्तीच्या, लहान बांध्याच्या त्या स्त्रीच्या अंगावर देवीचे वण होते. साखळ्या अडकवून घेऊन ती तीस वर्षे अनवाणी चालत होती. प्रिन्सेस मार्याला ती विशेषकरून आवडायची. पवित्र प्रतिमेसमोर असलेल्या दिव्याचा प्रकाश सोडला तर खोलीत अंधार होता. त्या खोलीत यात्रेकरू स्त्रीने मार्याला आपली जीवनकथा सांगितली होती. जीवनाचा खरा अर्थ फक्त फेडॉस्युश्काला कळला आहे असे प्रिन्सेस मार्याला इतक्या तीव्रतेने वाटले की तिने स्वतः यात्रेकरू

बनण्याचा निश्चय केला. फेडॉस्युश्का झोपी गेल्यावर प्रिन्सेस मार्या कितीतरी वेळ विचार करीत राहिला. कितीही विचित्र वाटले तरी आता आपण यात्रेकरू बनायचे असा तिने निश्चय केला. फादर अकिन्फी ह्या भिक्षुला विश्वासात घेऊन तिने त्याला आपला बेत सांगितला. त्याला तिचा बेत पसंत पडला. यात्रेकरूंना भेटी देण्यासाठी आपण वस्तू गोळा करीत आहोत असा बहाणा करून तिने स्वतःसाठी झगा, विणलेले जोडे, लांब कोट असा यात्रेकरूचा पुरा पोषाख जमवला. तिने जेथे पोषाख चोरून ठेवला होता त्या गुप्त जागेकडे ती कधी जाऊन उभी राही. आपला बेत आपण तडीस कधी नेणार हे तिचे तिलाच कळत नव्हते.

ती पुष्कळ वेळा यात्रेकरूंच्या गोष्टी, त्यांची साधी साधी वचने ऐकू लागे. ते यात्रेकरू ती वचने यांत्रिकतेने उच्चारीत पण तिला मात्र त्या वचनात गहन गूढ अर्थ आहे असे वाटे. त्या गोष्टींचा, वचनांचा तिच्यावर इतका परिणाम होई की सगळं घर सोडून जावे असे कितीतरी वेळा तिच्या मनात येई.

मग कल्पनेनेच ती जाडेभरडे कपडे घालून खांद्यावर पिशवी टाकून हातात काठी घेऊन फेडॉस्युश्काबरोबर धुळीने भरलेला रस्ता तुडवू लागे आणि तिची यात्रा सुरू होई. मत्सर, ऐहिक प्रेम, सर्व वासना यांपासून मुक्त अशी यात्रा. एका साधूचे दर्शन आटोपून ती दुसऱ्या साधूच्या दर्शनास जाई. अखेर दुःखे, उसासे नसलेल्या, चिरंतन आनंद सौख्य असलेल्या ठिकाणी ती जाऊन पोचे.

'मी अशा ठिकाणी पोचेन. तिथे प्रार्थना करीन. त्या प्रार्थनेत गुंतून पडण्याआधीच मी पुढं जाईन. माझी पावलं मला घेऊन जाईपर्यंत, मी मरून पडेपर्यंत मी चालत राहीन. दुःख उसासे नसलेलं शांत अविनाशी आश्रयस्थान अखेर गाठीन.' प्रिन्सेस मार्या मनाशी म्हणत राही.

पण मग आपल्या वडलांना पाहून, त्याहूनही निकोलुश्काला पाहून तिचा निश्चय डळमळे. ती एकान्तात रडू लागे. परमेश्वरापेक्षा आपण आपल्या वडिलांवर आणि आपल्या भाच्यावर अधिक प्रेम करीत आहोत म्हणून आपण पापी आहोत असे तिला वाटू लागे.

■ ■

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
ग्र/१२२
१
मंत्रालय.

# भाग सातवा

## १८१०-१८११

१८०७ नंतर निकोलाय रोस्तॉफ पावलोग्रॅड रेजिमेंटमध्ये होता. पूर्वी डेनिसॉव्हकडे असलेल्या स्क्वॉड्रनचा आता तो प्रमुख होता.

मॉस्कोमधील जुन्या परिचितांना आताच्या घमेंडखोर सुस्वभावी रोस्तॉफचा स्वभाव आवडला नसता, तरी पण त्याचे सहकारी, हाताखालील अधिकारी, त्याचे वरिष्ठ अधिकारी यांना तो आवडे. ते त्याला मान देत. तो स्वतः सुखी समाधानी होता. आताशा म्हणजे १८०९ मध्ये त्याला घराकडून तक्रारीवजा पत्रे सारखी येऊ लागली होती. त्याची आई दिवसेंदिवस आर्थिक परिस्थिती खालावल्याची तक्रार त्याच्याकडे करीत होती. शक्य तितक्या लवकर आपल्या वृद्ध मातापित्यांना सुखी करण्यासाठी त्याने यावे म्हणून ती त्याला आग्रहाने बोलावीत होती.

निकोलाय जीवनातील गुंतागुंतीपासून दूर सुरक्षित जागी आरामात शांतपणे राहात होता. घराकडून येणाऱ्या पत्रांमुळे तो अस्वस्थ झाला. आपण सुरक्षित जीवनातून कुटुंबियांकडून बाहेर खेचले जाणार आहोत अशी त्याने धास्ती घेतली. आपल्याला पुन्हा त्या जीवनाच्या भोवऱ्यात उडी घालावी लागणार, अनेक अडचणींना तोंड द्यावे लागणार, अनेक कामांकडे लक्ष द्यावे लागणार, मुनिमांचे हिशेब, नाना भांडणे, खलबते, नातीगोती, प्रतिष्ठित समाज, सोन्यावरील प्रेम, तिला दिलेले वचन इ. अनेक गोष्टींत लक्ष घालावे लागणार याची त्याला कल्पना आली. हे सारे किती कठीण होते, गुंतागुंतीचे होते! त्याने आईला निर्विकारपणे फ्रेंच भाषेत पत्र लिहिले. मात्र पत्रात घरी परतण्याच्या बेताबद्दल एक चकार शब्द लिहिला नाही. १८१० मध्ये आलेल्या पत्रातून त्याला नताशा आणि बोलकॉन्स्की यांचा वाङ्‌निश्चय झाल्याचे आणि थोरल्या काउंटची संमती नसल्याने लग्न एक वर्ष लांबणीवर टाकण्यात आल्याचे कळले. ह्या

पत्राने निकोलाय अतिशय दुखावला गेला. त्याला घरातील माणसांत नताशा सर्वांत जास्त आवडे, ती जाणार म्हणून त्याला दुःख झाले. त्या वेळी आपण घरी नाही म्हणून लष्करी वृत्तीच्या त्या माणसाला वाईट वाटले. तो घरी आला तर त्याने बोल्कॉन्स्कीला सांगितले असते ' तुझ्याशी नाते जुळल्याने आम्हाला मोठा सन्मान वाटतो आहे असे मुळीच नाही. जर तुला नताशाबद्दल आस्था असेल तर तू आपल्या चक्रम वडिलांच्या संमतीची वाट पाहण्याची मुळीच गरज नाही. ' वाङ्निश्चय झालेल्या नताशाला पाहण्यासाठी रजेचा अर्ज टाकावा असे त्याला क्षणभर वाटले. पण त्याच वेळी सैन्याच्या योजनाबद्ध हालचाली सुरू झाल्या होत्या. शिवाय सोन्याची आणि इतर गुंतागुंतीची त्याला आठवण झाली. आणि त्याने रजा मागण्याचा विचार रहित केला. पण त्याच वर्षाच्या वसंत ऋतूत त्याला आपल्या आईचे पत्र मिळाले. तिने त्याच्या वडिलांच्या नकळत पत्र लिहिले होते. त्या पत्रामुळे त्याला घरी जाण्याचा निर्णय घ्यावा लागला. तिने निकोलायला लिहिले होते, ' तू इथे येऊन सर्व व्यवस्था पाहिली नाहीस तर सर्व इस्टेट लिलावाने विकली जाईल आणि आपण भिकेला लागू. काउंटची प्रकृती खालावली आहे. तो इतका सुस्वभावी आहे की प्रत्येकजण त्याचा गैरफायदा घेत आहेत. त्यामुळे आर्थिक परिस्थिती अधिकाधिक बिघडत चालली आहे. मी आणि घरची इतर माणसे दुःखी होऊ नयेत असे तुला वाटत असेल तर तावडतोब ये. तुला मी हात जोडून विनवणी करीत आहे. '

डेनिसॉव्हचा नोकर लाव्रुश्का याला त्याने नेमून घेतले होते. त्याने नोकराला आणि रात्री असलेल्या मित्रांना सांगितले—' मी रजेसाठी अर्ज केला आहे. मी घरी जाणार आहे. ' सैन्याच्या विशिष्ट हालचालीबद्दल त्याला सेंट ॲन पदक मिळण्याची शक्यता होती. त्याबद्दल त्याला खूपच उत्सुकता होती. कदाचित कॅप्टनचा हुद्दाही त्याला मिळणार होता. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे याबाबतीत काहीच बोलणे न ऐकता आपण जात आहोत याच्यावर त्याचा विश्वास बसत नव्हता. त्याच्या जवळच्या तीन तपकिरी-पांढऱ्या घोड्यांच्या किंमतीबाबत पोलिश काउंट घासाघीस करीत होता. ते घोडे काउंट गॉल्युहॉस्कीला विकल्याखेरीज आपण जात आहोत हा विचार त्याला चमत्कारिक वाटत होता. घोड्यांचे दोन हजार रूबल येतील अशी रोस्तॉफने पैज मारली होती. मादाम बॉझॉझॉव्स्की ह्या सुंदर स्त्रीसाठी ऊलानांनी ( भालाईत घोडेस्वारांनी ) नाचसमारंभ आयोजित केला होता. घोडदळाच्या सैनिकांनी त्याच्यावर मात करण्यासाठी मादाम शाइदेत्स्की ह्या रूपवतीच्या सन्मानार्थ नाचसमारंभ करण्याचे ठरवले होते. आपल्याशिवाय तो समारंभ होणार आहे ही कल्पना रोस्तॉफला सहन होत नव्हती. सरळ आणि सुरळीत असलेल्या ह्या जगापासून जिथे गुंतागुंत आणि मूर्खपणा आहे अशा ठिकाणी आपणास जाणे भाग आहे ह्याची त्याला जाणीव झाली.

आठवड्यानंतर त्याची रजा मंजूर झाली. रेजिमेंटमधीलच नव्हे तर सगळ्याच ब्रिगेडमधील सैनिकांनी प्रत्येकी पंधरा रूबल वर्गणी जमवून रोस्तॉफला खाना दिला. वादकांची दोन पथके वाजवीत होती आणि गायकांचे दोन समूह गीते गात होते. रोस्तॉफने मेजर बेझॉव्हबरोबर ट्रेपक

नृत्य केले. पिऊन तर्र झालेल्या अधिकाऱ्यांनी रोस्तॉफला वर उचलले, मिठ्या मारल्या आणि जमिनीवर टाकले. तिसऱ्या स्क्वॉड्रनच्या सैनिकांनी पुन्हा एकदा त्याला वर उचलून आनंदाने आरोळ्या ठोकल्या, मग त्यांनी रोस्तॉफला गाडीत बसवले. त्याच्या मार्गावरील पहिल्या टप्प्या-पर्यंत त्यांनी त्याला सोबत केली.

प्रवासाच्या पहिल्या अर्ध्या भागात बहुधा प्रवाशाचे मन मागे सोडून आलेल्या गोष्टीत रेंगाळत राहते. रोस्तॉफचे तसेच झाले. क्रेमेन्ट्चगपासून कीव्हला जाईपर्यंत तो आपल्या स्क्वॉड्रनचा विचार करीत होता. हिसके खातखात अर्धा प्रवास झाल्यानंतर तो आपले तीन तपकिरी घोडे विसरला. मोदीखान्याचा प्रमुख ( क्वॉर्टरमास्टर ) डोझोयव्येकी याला विसरला. ऑट्रॅड्नूला गेल्यानंतर आपल्याला काय काय पाहावे लागणार आहे याचा अस्वस्थपणे विचार करू लागला. जसजसा तो घराजवळ येऊ लागला तसतसा घराविषयीच्या विचारांचा त्याच्या मनावर अधिकाधिक ताण पडू लागला.

पहिल्या भेटीतील भावावेग ओसरला. त्याने अपेक्षा केली होती तसे काही झाले नाही. ' सगळे पूर्वीसारखेच आहे, मी उगाच येण्याची घाई केली. ' अशी विचित्र निराशा त्याला वाटू लागली. घरातील जुन्या जगात निकोलायचे जीवन सुरू झाले. आईवडिलांत काही फरक पडला नव्हता. ते फक्त अधिक वृद्ध झाले होते इतकेच. त्यांचा काहीसा अस्वस्थपणा आणि त्यांच्यातील मतभेद मात्र त्याला नवीन होते. ह्या गोष्टी त्याला पूर्वी कधी दिसल्या नव्हत्या. त्याला विचित्र, चमत्कारिक परिस्थिती कारण होती हे त्याच्या ध्यानात आले.

सोन्या आता जवळजवळ वीस वर्षांची झाली होती. आता तिच्या सौंदर्यात वाढ होण्याची शक्यता नव्हती. तिच्यामधे असलेले सौंदर्य पुरेसे होते. निकोलाय घरी आला तशी ती प्रीतीने आणि आनंदाने बहरून गेली. त्या मुलीच्या एकनिष्ठ अढळ प्रेमामुळे निकोलाय आनंदला. पेत्या आणि नताशा यांना पाहून तर तो आश्चर्यचकित झाला. पेत्या आता तेरा वर्षांचा देखणा, थोराड मुलगा झाला होता. त्याचा आवाज घोगरा होऊ लागला होता. तो भरपूर अवखळपणा करायचा. निकोलायला कितीतरी काळ नताशाबद्दल आश्चर्य वाटत राहिले. तिच्याकडे पाहताना त्याला हसू आवरत नव्हते.

' तू अगदी पूर्ण बदलली आहेस. '

' खरंच का ? पूर्वीहून वाईट ? '

' छे ग ! उलट अधिक सुंदर दिसतेस, किती प्रौढ वाटतेस. खरी प्रिन्सेस शोभतेस. '

' कबूल बाबा, कबूल ' नताशाचा आनंद मावत नव्हता. नताशाने त्याला प्रिन्स आन्द्रेचे प्रियाराधन आणि त्याने ऑट्रॅड्नू येथे दिलेली भेट यांबद्दल सारे सारे सांगितले. त्याला त्याचे अलीकडचे पत्र दाखवले.

' तुला आनंद झाला ना ? मी किती सुखात आहे बघ. '

' खूप आनंद झाला. तो फार चांगला माणूस आहे. त्याच्यावर तुझं खूप प्रेम आहे. होय ना ? '

'ते सांगता कसं येईल ?' नताशा म्हणाली 'मी बोरिसवर, आमच्या शिक्षकावर, डेनिसॉव्हवर प्रेम केलं. पण हे प्रेम सर्वस्वी वेगळं आहे. मला शांत, स्थिर वाटतं आहे. जगात त्याच्याहून चांगला पुरुष नाही असं मला वाटतं म्हणून माझं मन शांत आहे, तृप्त आहे. पूर्वी मला असं कधी कधीच वाटलं नव्हतं.'

लग्न एक वर्ष लांबणीवर टाकल्याबद्दल निकोलायने नाखुषी दाखवली. तशी नताशा जिवाचा आटापिटा करून त्याला सांगू लागली. तिच्यापुढे दुसरा मार्ग नव्हता. वडिलांच्या इच्छेविरुद्ध त्या कुटुंबात नांदायला जाणे भयानक ठरले असते. तिला स्वतःलाही तसे करावेसे वाटत नव्हते.

'तुला काही म्हटल्या काही कळत नाही.' ती सारखी म्हणत राहिली.

निकोलायने क्षणभर विचार करून म्हटले, 'तू म्हणतेस ते बरोबर आहे.'

घरी आल्यानंतर प्रारंभीच्या दिवसांत निकोलाय गंभीर बनला आणि कंटाळला. त्याच्या आईने त्याला खुळचट आर्थिक व्यवहारात लक्ष घालण्यासाठी बोलावून घेतले होते. त्यात दवळादवळ करावी लागणार होती म्हणून तो वैतागला होता. ह्या जबाबदारीतून शक्य तितक्या लवकर मुक्त होण्याचे त्याने ठरवले. आल्यापासून तिसऱ्या दिवशी तो रागारागाने बाहेर निघाला. आईने 'कुठे चाललास' म्हणून चौकशी केली तरी तिला त्याने उत्तर दिले नाही. संतापाने मायटेङ्काच्या घरात शिरून त्याने त्याला तपशीलवार हिशेब द्यायला सांगितले. तपशीलवार हिशेबाची कल्पना धास्तावलेल्या, गोंधळलेल्या मायटेङ्काला सोडा पण खुद्द निकोलायलाही पुरेशी नव्हती. संभाषण आणि मायटेङ्काचा हिशेब या गोष्टींनी जास्त वेळ घेतला नाही. तरुण काउंटचा आवाज गरजत होता. मायटेङ्कला तो फटकावत होता. त्याचा आवाज हळूहळू खाली येत होता. मग तो थरथरत्या आवाजात एकामागून एक शिव्या देत होता. गावातील प्रमुख, डेप्युटी, खेड्यातील कारकून सगळे निवासस्थानाच्या दाराशी उभे राहून मायटेङ्काला दिलेल्या शिव्या विस्मित आणि आनंदित होऊन ऐकत होते.

'चोर लुटारू...खाल्ल्या वरचे वासे मोजतोय...कुत्र्याला फटके मारतो आता ..पपांना हे जमणार नाही...सगळा पैसा लुटतो आहे...' तो असेच काहीबाही बोलत होता.

तो मायटेङ्काची कॉलर पकडून त्याला ओढत फरफटत होता. ओरडण्याच्या आणि शब्दांच्यामधील योग्य क्षणाला मोठ्या कौशल्याने त्याला लाथा हाणत होता. जमलेली माणसे ते पाहून पूर्वीसारखीच विस्मित आणि आनंदित झाली होती.

'चल चालता हो...हरामखोर...पुन्हा तोंड दाखवू नकोस.'

मायटेङ्का सहा पायऱ्या गडगडत गेला आणि मग थेट झाडीत पळाला. ऑर्ट्रॅड्नूमधील गुन्हेगारांना सुरक्षिततेचे ठिकाण म्हणून ही झाडी प्रसिद्ध होती. शहरातून दारू पिऊन तर्र

झालेला मायटेङ्का या झाडीतच दडला होता. लपण्याची ही सुरक्षित जागा होती. अनेकांनी तिचाच आश्रय घेतला होता, आणि त्यामुळे ते त्या झाडीचे ऋणी होते.

मायटेङ्काची पत्नी आणि मेहुणी आपल्या खोलीच्या दारातून भयभीत होऊन रस्त्यावर नजर टाकीत होत्या. खोलीतील चकचकीत सॅमोव्हारमधे चहाचे पाणी उकळत होते. त्याच्याकडे लक्ष न देता ठामपणे पावले टाकीत आणि कष्टाने श्वास घेत तरुण काउंट घरात शिरला.

काउंटेसला दासींकडून काय झाले ते कळले. आता आपली परिस्थिती खात्रीने सुधारेल असे तिला वाटू लागले. त्याचबरोबर आपल्या मुलावर त्याचा काय परिणाम होईल या विचाराने ती बेचैन झाली. ती कितीदातरी चवड्यांवरून हलकेच दाराशी येऊन कानोसा घेऊ लागली. तो आत एकामागून एक पाइप पेटवीत होता.

दुसऱ्या दिवशी थोरल्या काउंटने आपल्या मुलाला एका बाजूस घेऊन भित्रे हास्य करीत म्हटले, ' अरे बाबा, इतकं रागावण्याचं काही कारण होतं का ? मायटेङ्कानं मला सर्व गोष्टींची कल्पना दिली आहे.'

' ह्या मूर्ख जगातील कोणतीही गोष्ट मला समजणार नाही ह्याची कल्पना होतीच.' निकोलाय स्वतःशीच म्हणाला.

' सातशे रूबल त्यानं जमाखर्चात दाखवले नाहीत म्हणून तू रागावलास. त्यानं पुढच्या पृष्ठावर ती रक्कम दाखवली आहे.'

' पपा, माझी खात्री झाली आहे तो बदमाष आहे. मी जे केलं ते योग्यच होतं. तुमची इच्छा नसेल तर मी त्याला काहीही सांगणार नाही.'

' तसं नव्हे रे. ( थोरला काउंट गोंधळून गेला. आपण आपल्या पत्नीच्या इस्टेटीची ठीक व्यवस्था ठेवली नाही आणि मुलांवर अन्याय केला याची त्याला जाणीव होती. पण आता त्यावर काय उपाययोजना करावी हे त्याला कळत नव्हते. ) तू सगळ्या गोष्टींची चौकशी कर. मी म्हातारा झालो आहे...'

' पपा, तुम्हाला न आवडेल असं काही मी केलं असेल तर मला क्षमा करा. तुमच्याहून मला व्यवहार कमी कळतो.'

' हे शेतकरी, हे पैशाचे व्यवहार, खोटे जमाखर्च, सगळं खड्ड्यात जाऊ दे. मला काय करायचं आहे. पत्ते खेळताना हिशेब मांडणं ठेवणं एवढंच मला पूर्वी माहीत होतं. खरं आणि खोटं असे दोन प्रकारचे जमाखर्च ठेवणं मला कळणार नाही.' त्याच्या मनात असे विचार येऊ लागले. त्यानंतर त्याने कौटुंबिक गोष्टीत कसलीही ढवळाढवळ केली नाही. एके दिवशी त्याच्या आईने त्याला खोलीत बोलावून घेऊन म्हटले, ' ही ॲना मिहालेवनानं दिलेली दोन हजार रूबलांची प्रॉमिसरी नोट. तिचं तुला काय करायचं ते कर.'

निकोलाय म्हणाला, ' तू माझ्यावरच सोपवलं आहेस ना ? मला ॲना मिहालोवना आवडत नाही. बोरिसही आवडत नाही. पण ती माणसं आपली मित्र होती आणि गरीब होती. त्या प्रॉमिसरी नोटीचं बघ काय करतो ते. ' त्याने नोट फाडून टाकली तेव्हा काउंटेसच्या डोळ्यांत

आनंदाश्रू आले. त्यानंतर निकोलायने कसल्याही प्रकारच्या व्यवहारात लक्ष घातले नाही. थोरल्या काउंटेसच्या मालकीच्या प्रदेशात शिकारीला चांगला वाव होता. निकोलाय शिकारीसंबंधीच्या प्रत्येक गोष्टीत उत्साहाने रस घेऊ लागला.

हिवाळी हवा केव्हाच सुरू झाली होती. ऑक्टोबर-नोव्हेंबरातील पावसाने भिजलेली जमीन आता सकाळच्या हिमगारठ्याने घट्ट होत होती. गवतांना केव्हाच झुबके आले होते. हिवाळ्यातील गुरांनी तुडवलेल्या शेतांचे तपकिरी पट्टे, उन्हाळ्यातील रोपांचे उरलेले फिकट पिवळे बुडखे आणि गव्हाच्या शेतीचे लालसर पट्टे यांच्या पार्श्वभूमीवर गवताचे उजळ हिरवे झुबके उठून दिसत होते. ऑगस्टच्या अखेरीस बुडख्यांमधे आणि हिवाळी पिकांसाठी नांगरून तयार केलेल्या काळ्या शेतांमधे हिरव्या बेटांसारखी दिसणारी पठारे व जंगलातील लागवडीचे भाग आता हेमंतातील पिकाच्या चकचकीत हिरव्या समुद्रात सोनेरी आणि फिकट लाल बेटांसारखे दिसत होते. करड्या सशांनी आपले रंग कधीच बदलले होते. कोल्ह्यांची पिले आता आईवडिलांना सोडून स्वतंत्रपणे बाहेर भटकू लागली होती. लांडग्यांची पोरे कुत्र्यांहून मोठी झाली होती. रोस्तॉफसारख्या उत्साही शिकाऱ्याचे कुत्रे नुकते कुठे शिकार करण्यास सज्ज होत होते. त्यामुळे शिकाऱ्यांच्या सभेत कुत्र्यांना तीन दिवसांची रजा देणे आवश्यक आहे असे ठरवण्यात आले. १६ सप्टेंबरला शिकारीस निघायचे त्यांनी ठरवले. डयुब्राव्ही येथे शिकार करण्याजोगी लांडग्यांची पोरे होती. त्या ठिकाणापासून शिकारीस प्रारंभ करण्याचे त्यांनी ठरवले.

१४ सप्टेंबरला सबंध दिवस कुत्र्यांना घरी ठेवण्यात आले. त्यावरा वारा सुटला होता. हिम पडलेले होते. संध्याकाळच्या सुमारास आकाश अभ्राच्छादित झाले आणि हिम वितळू लागले. १५ सप्टेंबरच्या सकाळी ड्रेसिंग गाउन घातलेल्या तरुण रोस्तॉफने खिडकीबाहेर पाहिले. शिकाऱ्याला मनापासून आवडावी अशी अनुकूल हवा पडली होती. वारा पडला होता आणि आकाश पृथ्वीवर वितळून कोसळत आहे असे वाटत होते. हळुवारपणे खाली पडणाऱ्या लहान लहान हिमकणांच्या हालचालीशिवाय हवेत दुसरी हालचाल नव्हती. बागेमधील निष्पर्ण डहाळ्यांना लोंबणारे पारदर्शक थेंब खाली नुकत्याच पडलेल्या पानांवर पडत होते. बागेतील जमीन खसखशीच्या फुलातील मध्यभागाप्रमाणे सौम्य, उजळ, ओलसर, काळसर दिसत होती आणि थोड्या अंतरावर ओलसर धूसर दाट धुक्यात नाहीशी झाली होती.

निकोलाय दलदलीच्या मैदानातून जाऊ लागला. कुत्र्यांचा आणि कुजलेल्या पानांचा वास येत होता. भक्कम बांध्याची, काळ्या आणि पिवळट तपकिरी रंगाची, मोठ्या काळ्याभोर डोळ्यांची कुत्री आपल्या धन्याला पाहताच उठली. तिने आपले मागचे पाय ताणले आणि ती सशासारखी बसून राहिली. मग तिने एकदम उडी मारून आपल्या धन्याचे नाक आणि

मिश्या चाटल्या. चकचकीत झालेल्या मार्गावरून आपला धनी येताना पाहून दुसऱ्या शिकारी कुत्र्याने आपल्या पाठीची कमान केली आणि त्याच्या दिशेने धूम ठोकली. आपली शेपटी वर उचलीत त्याने निकोलायच्या पायांना आपले अंग घासण्यास सुरुवात केली.

त्याच क्षणी त्याला शिकाऱ्यांना अनुकरण करता येणार नाही अशी आरोळी मारलेली ऐकू आली. वळणावरच शिकारी डॅनिलो दिसला. डॅनिलोकडे कुत्र्यांना काबूत ठेवण्याचे काम होते. डॅनिलोच्या चेहऱ्यावर सुरकुत्या दिसत होत्या. युक्रेनिअन फॅशनप्रमाणे त्याने आपले पांढरे झालेले केस कापून घेतले होते. त्याच्या हातात वाकलेला चाबूक होता. त्याच्या चेहऱ्यावर सर्व शिकाऱ्यांच्या चेहऱ्यावर आढळणारा स्वतंत्रतेचा आणि जगाबद्दल तुच्छतेचा भाव दिसत होता. त्याने मालकाला पाहून आपली टोपी काढून घेतली आणि मालकाकडे तुच्छतेने पाहिले. सर्वांना तुच्छ लेखणारा, स्वतःला सर्वाहून श्रेष्ठ समजणारा हा डॅनिलो काही झाले तरी निकोलायला आपला मनुष्य, आपला शिकारी वाटत असे.

शिकारीला अनुकूल असलेली हवा, ते कुत्रे आणि शिकारी निकोलायने पाहिले. शिकारीच्या अनावर ओढीमुळे आपण आता प्रेयसीच्या दर्शनाने प्रेमात पडलेल्या प्रेमिकाप्रमाणे पूर्वीचे सगळे बेत विसरून जाऊ असे त्याला वाटले. त्याने डॅनि गेला हाक मारली, 'डॅनिलो.'

'मालक, काय आज्ञा आहे?' आरोळ्यांनी कर्कश झालेल्या आणि चर्चच्या मुख्य व्यवस्थापकास साजेशा धीर गंभीर स्वरात डॅनिलोने विचारले. स्तब्ध राहिलेल्या धन्याकडे त्याने आपले चमकणारे काळेभोर डोळे रोखले. 'तुम्हाला शिकारीचा मोह आवरणं शक्य नाही, खरं ना?' जणू त्याचे डोळे विचारीत होते.

'आज हवामान चांगलं आहे ना? घोड्यावरून रपेट करायला आणि शिकार करायला ठीक आहे ना?' मिल्का कुत्रीचे कान मागच्या बाजूने खाजवीत निकोलायने विचारले. डॅनिलोने डोळे मिचकावले पण उत्तर दिले नाही.

'मी पहाटेसच उव्हार्काला कानोसा घेण्यासाठी पाठवलं होतं.' क्षणभरच्या शांततेनंतर त्याचा धीरगंभीर आवाज उमटला. 'ऑट्रॅड्नूच्या बंदिस्त जंगलात ती गेल्याचे तो सांगत होता. तिथे त्यांचे ओरडणे ऐकू येत आहे.' ती गेली आहे याचा अर्थ त्या दोघांनाही ठाऊक असलेली लांडगी आपल्या पोरांना घेऊन दीड मैल दूर असलेल्या शिकारीसाठी राखलेल्या छोट्या जंगलात शिरली होती.

'आपण निघायचं ना? उव्हार्काला घेऊन माझ्याकडे ये' निकोलाय म्हणाला.

'जशी आपली इच्छा.'

'त्यांना नंतर खायला घाल.'

'जशी आज्ञा.'

पाच मिनिटांनंतर डॅनिलो आणि उव्हार्का निकोलायच्या मोठ्या अभ्यासिकेत उभे होते. डॅनिलो तसा उंच नव्हता. पण त्याला खोलीत पाहिल्यावर फर्निचर आणि इतर मानवी जीवनातील परिसर यात एखादा घोडा नाहीतर अस्वल उभे आहे की काय असे वाटायचे.

स्वत: डॅनिलोला याची जाणीव होती. नेहमीप्रमाणे तो दाराजवळ उभा राहून शक्यतेवढ्या हळू आवाजात बोलण्याचा प्रयत्न करीत होता. मालकाच्या वस्तूंची मोडतोड होईल ह्या भीतीने शक्यतो हालचाल करीत नव्हता. छपराखालून उघड्यावर शक्यतो लवकर बाहेर पडता यावे म्हणून सगळे काही जास्तीत जास्त लवकर सांगून टाकण्याची तो शिकस्त करीत होता.

निकोलायने डॅनिलोकडे चौकशी केली. कुत्रे शिकारीस योग्य असल्याचे डॅनिलोकडून कबूल करून घेतले. स्वत: डॅनिलोदेखील जायला उत्सुक होता. निकोलायने त्याला घोड्यांवर खोगीर चढवायला सांगितले. डॅनिलो बाहेर पडणार एवढ्यात नताशा खोलीत धावत आली. तिने आपल्या वृद्ध दासीची शाल लपेटून घेतली होती, तिने केस नीट केले नव्हते. पेत्याही तिच्या-बरोबर धावत आला होता.

'तू निघालास काय?' नताशाने विचारले. 'तू जाशील हे मला ठाऊकच होतं. तू जाणार नाहीस असं सोन्या म्हणाली. अशा दिवशी तू घरी राहणार नाहीस याची मला खात्री होती.'

'आम्ही निघालो.' निकोलाय नाखुषीने उत्तरला. त्याला मनापासून शिकार करायची होती. म्हणून त्याच्या मनात नताशा आणि पेत्या यांना न्यायचे नव्हते. 'आम्ही केवळ लांड-ग्यांची शिकार करणार आहोत. तुम्हाला कंटाळा येईल.'

'तुला ठाऊक आहे ती मला सर्वांत आवडणारी शिकार आहे. तू आपला एकटाच चालला आहेस. आपल्यासाठी घोडे सांगितलेस. आम्हाला निरोपही नाही. किती वाईट.'

'रशियन माणसाला अडचणी थांबवू शकत नाहीत. चल, आपण निघू' पेत्या म्हणाला.

'पण असं करू नकोस. ममानं तुम्ही जायचं नाही म्हणून तुम्हाला सांगितलं आहेना?' निकोलाय नताशाला म्हणाला.

तशी नताशा ठामपणे म्हणाली, 'ते काही नाही. मी जाणारच. डॅनिलो, त्यांना माझ्यासाठी घोडा तयार ठेवायला सांग. मिहाइलला सांग माझ्या कुत्र्यांना खेचून धरायचा पट्टा घेऊन ये.'

केवळ बसून राहणे डॅनिलोला अगदी त्रासाचे आणि अयोग्य वाटले. पण त्या तरुण मुलीसाठी काही करणे त्याला एकदम अशक्य वाटले. त्याने नजर खाली वळवून आपला कशाशी संबंध नाही असे दाखवीत काढता पाय घेतला. चुकून ती मुलगी आपल्याकडून दुखावली जाऊ नये अशी त्याची त्यामागे धडपड होती.

काउंट इल्या अँड्रीचने उमरावाचा मार्शल म्हणून काम करणे सोडून दिले. कारण त्या स्थानावर असताना भरमसाट खर्च होत होता. पण तरीही त्याच्या अडचणी दूर झाल्या नाहीत. पुष्कळदा आईवडील अस्वस्थ होऊन एकमेकांशी सल्लामसलत करीत. रोस्तॉफ कुटुंबियांचे जुने पुराणे महागडे घर आणि मॉस्कोजवळची शेतवाडी विकून टाकण्याच्या गोष्टी

बोलत. काउंट मार्शलच्या पदावरून दूर झाला तेव्हापासून मोठ्या प्रमाणावर लोकांचे आतिथ्य करण्याची आवश्यकता उरली नाही. आता ते ऑट्रॅड्नू येथे पूर्वीहून अधिक निवांत व आराम-शीर जीवन व्यतीत करू लागले. तरीही त्या अवाढव्य घरात व नोकरांच्या निवासस्थानात लोकांची चांगलीच वर्दळ होती. विसाहून अधिक माणसे रोस्तॉफ कुटुंबियांच्या पंक्तीला बसत असत. ही माणसे त्यांच्यापैकीच होती. कित्येक काळ ती रोस्तॉफ कुटुंबात राहिलेली होती. जवळ जवळ कुटुंबातील बनली होती. काउंटच्या घराखेरीज त्यांना दुसरीकडे आसरा असेल असे वाटत नव्हते. संगीताचा शिक्षक डिम्लर व त्याची पत्नी नृत्यशिक्षक व्हॉगेल आणि त्यांचे कुटुंब, वृद्ध झालेली ब्येलॉव्हबाई आणि अशीच काही माणसे. पेत्याचे शिक्षक, नताशाची वृद्ध शिक्षिका आणि आपल्या घरापेक्षा काउंटच्या घरात राहणे अधिक चांगले व अधिक फायद्याचे आहे असे मानणारी माणसे तिथे गोळा झाली होती. आता पूर्वीप्रमाणे अनेक पाहुण्यांची सरबराई होत नव्हती हे खरे. पण तरीही ते पूर्वीच्या थाटात राहत होते. त्या-खेरीज काउंट आणि काउंटेस यांना जीवन जगल्यासारखे वाटत नव्हते. पूर्वीप्रमाणेच शिकारी-साठी नोकरचाकर आणि इतर गोष्टी होत्या. निकोलायने त्यात भरच घातली होती. अजूनही तबेल्यात पन्नास घोडे होते. त्यांची व्यवस्था पाहायला पंधरा नोकर होते. वाढदिवसाच्या दिवशी पूर्वीप्रमाणेच महागड्या वस्तू भेटीदाखल दिल्या जात आणि सगळ्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना मेजवानी दिली जाईल, काउंट व्हिस्ट आणि बोस्टन हे पत्त्याचे खेळ खेळतच असे. खेळताना तो आपली पाने भिडूंना दिसू देई आणि दररोज आपल्या शेजाऱ्यांना आपले शेकडो रूबल लुटू देई. काउंटबरोबर खेळून त्याला हरवण्याची सवलत ही फायदेशीर गुंतवणूक आहे असे त्याच्या शेजाऱ्यांना वाटू लागले होते.

उद्योगधंद्यात पडलेल्या काउंटची भल्यामोठ्या जाळ्यात पडल्यासारखी अवस्था झाली. आपण जाळ्यात सापडलो आहोत हे नाकारण्याची त्याची धडपड होती. प्रत्येक पावलागणिक तो जास्तीत जास्त जाळ्यात गुरफटला गेला. मग त्याला दुर्बलतेची जाणीव झाली. आता आपण जाळे तोडून जाऊ अगर काळजीपूर्वक आणि चिकाटीने जाळे सोडवू शकू असे त्याला वाटेना. आपल्या मुलांच्या जीवनाचा नाश होत आहे असे प्रेमळ मनाच्या काउंटेसला वाटू लागले. पण तिने आपल्या नवऱ्याला दोष दिला नाही. तिच्या मते तो असा वागत होता त्याहून वेगळ्या तऱ्हेने वागणे त्याला अशक्य होते. मुलांच्या आणि आपल्या नाशाच्या जाणिवेने तो निराश झाला आहे. ( आपली निराशा तो व्यक्त न करण्याची धडपड करीत होता. ) आपली स्थिती सुधारण्याचा तो प्रयत्न करीत होता. हे सारे तिला ठाऊक होते. परिस्थिती सुधारण्याचा एकच एक मार्ग तिच्या स्त्रीमनाला दिसत होता आणि तो म्हणजे खूप संपत्तीची वारस असलेल्या मुलीशी निकोलायचे लग्न करणे. तिचा शेवटचा आशातंतू एवढाच होता. तिने शोधलेल्या मुलीशी लग्न करण्याचे निकोलायने नाकारले तर परिस्थिती सुधारण्याची आशा तिला कायमची सोडून द्यावी लागणार होती. तिने जे स्थळ हेरून ठेवले होते ते होते जूली कुरॅगिन. तिचे आईवडील अत्यंत चांगले आणि सद्‌गुणी होते. रोस्तॉफच्या कुटुंबातील

माणसांना लहानपणापासून माहीत होते. त्यांच्या मागे असलेला मुलगा—जूलीचा भाऊ मरण पावल्यामुळे एकटी जूलीच आता श्रीमंत वारस झाली होती.

काउंटेसने मॉस्कोमधे असलेल्या कुरॅगिनबाईला सरळ पत्र लिहून आपल्या मुलासाठी तिच्या मुलीला मागणी घातली. तिच्याकडून तिला होकार मिळाला. कुरॅगिनबाईने लिहिले होते, ' माझ्या बाजूने मी ह्या लग्नाला संमती द्यायला तयार आहे. परंतु सगळ्या गोष्टी मुलीला काय वाटते त्यावर अवलंबून ठेवावे हे बरे. ' कुरॅगिनबाईने निकोलायला मॉस्को येथे बोलावले.

थोरल्या काउंटेसने डोळ्यांत पाणी आणून कितीदातरी आपल्या मुलाला सांगितले होते, ' माझ्या दोन्ही मुली संसारात चांगल्या तऱ्हेनं नांदताहेत. तुझं लग्न झालेलं पाहावं एवढीच माझी इच्छा आहे. तुझं लग्न टरल्याचं ऐकलं तरी माझ्या थडग्यात मला शांती लाभेल. माझ्या डोळ्यांसमोर एक अतिशय चांगली मुलगी आहे. ' असे बोलून ती त्याच्याकडून त्याची विवाहविषयक मते काढून घेई.

कधी कधी ती जूलीची स्तुती करी. निकोलायने काही दिवस मजेत घालवण्यासाठी मॉस्कोला सुट्टीत जावे असे ती सांगे. आपल्या आईच्या मनात काय आहे हे निकोलायला समजून येई. अशा वेळी तो तिला तिच्या मनातील विचार प्रकट करायला भाग पाडी. त्याने जूली कुरॅगिनशी लग्न केले तरच आपली परिस्थिती सुधारण्याची आशा आहे असे तिने त्याला एकदा उघडच सांगून टाकले.

' माझं प्रेम एखाद्या गरीब मुलीवर असलं तरीही मी पैशासाठी माझ्या भावना, स्वाभिमान यांचा बळी द्यावा असं तुला खरोखर वाटतं का ? ' असे विचारताना त्याला आपल्या प्रश्नातील निर्दयता जाणवत नसे, उलट आपल्या उदात्त भावना व्यक्त करण्याची इच्छा असे.

आईला आपली चूक कशी सुधारावी कळेना. ती म्हणाली, ' तू माझ्याबद्दल गैरसमज करून घेत आहेस. निकोलाय, तुझं कल्याण व्हावं, तू सुखात राहावंस असंच मला मनापासून वाटतं. ' आपण खोटे बोलत आहोत. आपण चूक करीत आहोत याची तिला जाणीव होऊ लागली आणि तिला रडू कोसळले.

' नको. आई, रडू नकोस. तुझी इच्छा काय आहे ते फक्त सांग. तुझ्या मनाला शांती लाभावी म्हणून मी माझं सगळं जीवन देईन. तुला मी हे सांगायला नको. मी माझं सर्वस्व— माझ्या भावनाही तुझ्यासाठी झुगारून देईन. '

थोरल्या काउंटेसला अशा तऱ्हेने त्याने सांगायला नको होते. आपल्या मुलाने आपल्यासाठी त्याग करायला नको होता. आपल्या मुलासाठी तिला स्वतःला त्याग करणे आवडले असते, ' तू अजून मला समजून घेतलं नाहीस. आता आपण तो विषय थांबवू. ' आपले अश्रू पुशीत ती म्हणाली.

निकोलाय स्वतःशी म्हणाला, ' कदाचित मी खरोखर एखाद्या गरीब मुलीवर प्रेम करीत असेन. संपत्तीसाठी मी माझ्या भावनांचा माझ्या स्वाभिमानाचा त्याग करायला हवा का ? आई

असं का बोलते कळत नाही. सोन्या गरीब आहे म्हणून मी तिच्यावर प्रेम करता कामा नये. तिच्या एकनिष्ठ निस्सीम प्रेमाला मी प्रतिसाद देता कामा नये. जूलीसारख्या एखाद्या बाहुली-बरोबर संसार करून मी सुखी होणार नाही. सोन्याच मला सुखी करील. कुटुंबाच्या कल्याणा-साठी मी माझ्या भावनांचा केव्हाही बळी देईन. पण मला माझ्या भावना आवरता येत नाहीत. माझं सोन्यावरील प्रेम सर्वांहून श्रेष्ठ आहे. माझ्या दृष्टीनं त्याहून मोलाचं काही नाही.'

निकोलाय मॉस्कोला गेला नाही. थोरल्या काउंटेसने त्याच्याकडे पुनश्च लग्नाचा विषय काढला नाही. आपला मुलगा आणि गरीब सोन्या यांमधे वाढत असलेल्या प्रीतीची चिन्हे पाहून ती दुःखी होत होती. कधी अत्यंत संत्रस्त होत होती. ती स्वतःलाच याबाबत दोष देऊ लागली. तरीही मधूनमधून सोन्याला नाहक रागे भरल्याशिवाय तिला राहवत नसे. ती सोन्याला वारंवार प्रेमाने हाक मारी. काळ्याभोर डोळ्यांची ही गरीब मुलगी इतकी सालस होती, इतकी चांगली होती, आपल्या उपकारकर्त्याबद्दल तिच्या मनात इतकी कृतज्ञता होती आणि निकोलायवरील तिचे प्रेम इतके सच्चे, अतूट आणि निःस्वार्थी होते की थोरल्या काउंटेसला तिच्यामधे दोष काढता येत नव्हते. त्यामुळे त्या दयाळू मनाच्या काउंटेसला आणखीनच मनस्ताप होई.

रोस्तॉफकुटुंबाकडे सुखाने पाठ फिरवली होती.

नाताळ आल्यावर चर्चमधे मोठा धार्मिक समारंभ झाला. शेजाऱ्यांना आणि नोकरांना गंभीरतापूर्वक आणि कंटाळा येईतो शुभेच्छा देण्यात आल्या. सर्वांनी नवे गाऊन चढवले. एवढ्या गोष्टी घडल्या तरी वैशिष्ट्यपूर्ण असे काही त्या सुटीत घडले नाही. मात्र वीस अंश खाली गेलेले हवामान, संथ पसरलेले दाट धुके, दिपवणारा सूर्यप्रकाश आणि नक्षत्रांनी उजळ-लेले रात्रीचे आकाश ही सारी ह्या ऋतूचे खास समारंभपूर्वक स्वागत केले पाहिजे असे जणू सांगत होती.

नाताळच्या सप्ताहातील तिसऱ्या दिवशी भोजन झाल्यानंतर घरातील माणसे आपापल्या खोल्यांकडे वळली. वर्षातील अत्यंत कंटाळवाणा काळ सुरू झाला होता. सकाळी शेजाऱ्यांना भेटून आलेला निकोलाय आता बैठकीच्या खोलीत झोपी गेलेला होता. थोरला काउंट आपल्या खोलीत विश्रांती घेत पहुडला होता. दिवाणखान्यात वाटोळ्या टेबलाशी बसून सोन्या भरत-कामासाठी आकृती नकलून घेत होती. काउंटेसने पेशन्सचा डाव मांडला होता. नताशा खोलीत येताच सोन्याजवळ गेली, ती काय करते ते पाहू लागली. मग ती आपल्या आईजवळ जाऊन काही न बोलता उभी राहिली.

तिच्या आईने विचारले, 'अशी त्रस्त समंधासारखी कशाला भटकते आहेस? तुला काही हवं आहे का?'

'मला तो हवा आहे...आता, या क्षणी हवा आहे?' असे बोलताना नताशाचे डोळे चमकले. मात्र तिच्या ओठांवर स्मित दिसले नाही. थोरल्या काउंटेसने मान वर करून आपली साभिप्राय नजर आपल्या कन्येवर खिळवली.

'ममा, अशी पाहू नकोस माझ्याकडे. नकोना पाहूस. मला आता रडू येईल बघ.'

'इकडे ये आणि माझ्याजवळ बैस ये.' काउंटेसने तिला आपल्याकडे बोलावले.

'ममा, मला तो हवा आहे. माझ्या आयुष्याचा काळ असा का म्हणून फुकट चालला आहे?' तिच्या आवाजात कंप आला. तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा सुरू झाल्या. अश्रू लपवण्यासाठी ती सरकन मागे वळून खोलीबाहेर पडली.

ती मोठ्या दालनात गेली. आपले गिटार घेऊन पुस्तकांच्या कपाटामागे असलेल्या अंधाऱ्या कोपऱ्यात जाऊन बसली. ती तारा छेडून मंद्र स्वर काढू लागली. पीटर्सबर्गमधे प्रिन्स आन्द्रेबरोबर पाहिलेल्या ऑपेऱ्यातील एक तान आळवून ती छेडू लागली. तिच्या गिटारमधून उमटणाऱ्या सुरावटीने तिच्या मनात आठवणींची मालिका सुरू झाली. ती पुस्तकांच्या कपाटाच्या मागे बसली होती. सैंपाकघर आणि भोजनगृह यांच्यामधील खोलीच्या दरवाज्याच्या भेगेतून शिरलेल्या कवडशावर तिने दृष्टी लावली होती. ती स्वतःचेच संगीत ऐकत भूतकाळात शिरली. तिचे मन आठवणीत रंगून गेले.

'तो लवकर येईल तर किती छान होईल! तो कधीच येणार नाही अशी मनाला धास्ती वाटते. दिवसेंदिवस माझं तारुण्य ओसरत आहे ही सर्वांत वाईट गोष्ट आहे. आताची मी उद्या राहणार नाही. कदाचित तो आज वाटेत असेल. कुणी सांगावं थोड्या क्षणात येईलही! कदाचित तो कालच येऊन पोचलाही असेल आणि मला विस्मरण पडलं असेल.' ती गिटार खाली ठेवून उठली आणि पाहुण्यांच्या दालनात गेली. तिथे शिक्षक, शिक्षिका, पाहुणे इत्यादी कुटुंबाच्या परिचयातील माणसे चहा घेण्यासाठी टेबलाशी बसली होती. नोकरवर्ग टेबलाभोवती उभा होता. प्रिन्स आन्द्रे कुठे दिसला नाही. तिथे तेच जुने जीवन सुरू होते. त्यात बदल नव्हता.

'ही आलीच की!' नताशाला पाहून काउंट म्हणाला, 'ये ना जवळ बैस.' नताशा आपल्या आईजवळच उभी राहिली आणि तिच्याकडे पाहात राहिली. आईकडून तिला काही-तरी हवे होते असे वाटत होते.

'ममा, मला तो हवा आहे. अगदी लवकर हवा आहे.' तिला आता आपले हुंदके आवरता येईनात. टेबलाशी बसून ती वडिलधारी माणसे आणि चहापानासाठी आलेला निकोलाय यांच्यातील संभाषण ऐकू लागली. 'अरे देवा! अरे देवा! तीच तीच माणसं! तीच तीच संभाषणं! कप हातात धरून बसलेले, पूर्वीप्रमाणेच फुंकर घालणारे हे पपा...' नताशाच्या मनात आले. कधीही न बदलणाऱ्या आपल्या कुटुंबियांबद्दल आपल्या मनात तिटकारा निर्माण होत आहे. ह्या जाणिवेने नताशा भयभीत होऊन गेली.

चहापान झाल्यानंतर निकोलाय, सोन्या आणि नताशा बैठकीच्या खोलीत जाऊन आपल्या

आवडत्या कोपऱ्यात बसले. त्या ठिकाणी त्यांची जिवाभावाची बोलणी सुरू झाली.

ती बैठकीच्या खोलीत बसल्यानंतर थोड्याच वेळाने नताशा आपल्या भावाला म्हणाली, 'चांगलं काही निष्पन्न होणार नाही— कधीच होणार नाही. चांगलं सारं भूतकाळात जमा झालं आहे असं तुला कधी वाटतं का ? असं वाटण्यामागं निव्वळ कंटाळा नसून दुःख आहे हे तुला पटतं का ? '

प्रसन्न स्मित करीत ती भूतकाळाच्या आठवणींना उजाळा देत होती. त्या आठवणी वृद्धापकाळाच्या दुःखी आठवणी नव्हत्या. त्या तारुण्यातल्या अद्‌भुतरम्य आठवणी होत्या. जिथे स्वप्न आणि सत्य यांच्या सीमारेषा पुसट धूसर होतात अशा गतकाळातील त्या स्मृती होत्या. समाधानी वृत्तीने ती हसत होती. खरे तर त्या सगळ्यांनी भूतकाळ एकत्र घालवलेला होता. पण सोन्याला त्या आठवणी नेहमीप्रमाणे लवकर येत नव्हत्या.

त्यांना ज्या गोष्टी आठवत होत्या त्या सोन्याला आठवत नव्हत्या. तिला आठवणाऱ्या गोष्टी फारशा अद्‌भुतरम्य वाटत नव्हत्या पण त्यांच्या आनंदाने ती आनंदित होत होती.

सोन्याच्या पहिल्या आगमनाची गोष्ट त्यांना आठवली. तेव्हा सोन्या पूर्णपणे त्यांच्या आनंदात सहभागी झाली. निकोलायच्या जाकिटावर जाळी होती. त्यामधे आपल्याला बांधून ठेवण्यात येईल अशी दासीने भीती घातल्यामुळे आपल्याला निकोलायची कशी भीती वाटायची ते सोन्याने सांगितले.

' मला आठवतं. मला कुणीतरी सांगितलं होतं—तू कोबीखाली सापडली होतीस, ती थाप होती हे मला ठाऊक होतं, पण तेव्हा त्यावर विश्वास न ठेवण्याचा धीर मला झाला नाही. मी तेव्हा इतकी बेचैन झाले.' नताशा म्हणाली.

' नताशा, तू आता गायला पाहिजेस. ' थोरल्या काउंटेसचे शब्द कानांवर पडले. ' अरे, तुम्ही तिकडे स्तब्ध बसून एखादा कट करता आहात की काय ? '

' ममा, मला गायची मुळीच इच्छा नाही.' नताशा असे म्हणाली खरी पण ती लागलीच गायला उठली.

संभाषण व बैठकीच्या खोलीतील कोपरा सोडून येणे आता सगळ्यांच्याच जिवावर आले. पण नताशा गायला सज्ज झाली. निकोलाय क्लॅव्हिकॉर्ड वाजवण्यासाठी बसला. नेहमीप्रमाणे नताशा खोलीच्या मध्यभागी उभी राहिली. जेथून आवाज जास्तीत जास्त घुमेल अशी जागा शोधून आपल्या आईचे आवडते गीत गाऊ लागली.

आपल्याला गायचे नाही असे ती म्हणाली होती. त्या आधी कितीतरी काळ गायिली नव्हती आणि त्या रात्री ती गायिली तशी पुढे कितीतरी दिवस गायिली नाही. आपल्या खोलीत असलेला काउंट इल्या अँड्रीच तिचे गाणे ऐकू लागला. तो आपल्या खोलीत आपला

कारभारी मायटेङ्का याच्याशी बोलत होता. खेळायला जाण्यासाठी एखाद्या मुलाने घाईघाईने आपले गृहपाठ करून टाकावेत तशा घाईने काउंट मायटेकङ्काला सूचना देत होता. आणि त्यात चुका होत होत्या. शेवटी तो बोलायचा थांबला. मायटेङ्का काही न बोलता स्मित करीत उभा राहिला. आता दोघेही गाणे ऐकू लागले.

निकोलाय टक लावून आपल्या बहिणीकडे पाहात होता. ती त्याच्याकडे पाहू लागली की श्वास आत घेत होता. तिचे गाणे लक्ष देऊन ऐकणाऱ्या सोन्याला आपल्यात आणि तिच्यात किती प्रचंड अंतर आहे ह्याची जाणीव होत होती. आपल्या बहिणीच्या आकर्षित करणाऱ्या शक्तीचा एकसहस्रांशही आपल्यामधे येणे शक्य नाही, असे तिला वाटू लागले. थोरली काउंटेस आनंदाने रडत होती. तिच्या चेहऱ्यावर स्मित होते. डोळयांत अश्रू होते. मधूनमधून ती मान हलवीत होती. ती देखील नताशाबद्दल विचार करीत होती. आपल्या तारुण्याची तिला याद येत होती. नताशाने प्रिन्स आन्द्रेशी लग्न करणे भयानक आणि अस्वाभाविक गोष्ट आहे असे तिला वाटत होते.

काउंटेसशेजारी बसलेला डिम्लर मिटल्या डोळयांनी गाणे ऐकत होता. तो काउंटेसला म्हणाला, ' काउंटेस, तिच्यात युरोपिअन टॅलेन्ट आहे. तिला शिकवण्याची गरज नाही. तिचा आवाज किती मुलायम, हळुवार. . .'

' मला तिची फार काळजी वाटते– फार काळजी वाटते.' आपण कोणाशी बोलतो आहोत याचे काउंटेसला भान नव्हते. नताशामधे काहीतरी अत्यधिक प्रमाणात दिसू लागले. ते तिच्या सुखाच्या आड येणार असे काउंटेसची वात्सल्यभावना सांगू लागली.

नताशाने आपले गाणे संपवले न संपवले तोच चौदा वर्षांचा पेत्या अतिशय उत्साहाने धावत आला आणि त्याने सोंगाडे येत असल्याची वार्ता ऐकवली. नताशा एकदम गायची थांबली.

' मूर्ख कुठला ! ' ती एकदम भावावर डाफरली. ती खुर्चीकडे धावली आणि खुर्चीत कोसळली आणि ती कितीतरी वेळ जोरजोराने हुंदके देऊ लागली.

' ममा, तसं काहीच घडलं नाही, खरंच ठीक आहे मी. मला पेत्याने दचकवलं एवढंच.' ती स्मित करीत म्हणाली. तरीही तिच्या डोळयांतून अश्रू येतच होते. हुंदक्यामुळे श्वास अडत होता.

घरच्या गडीमाणसांनी रांगडी माणसे, तुर्क, गुत्तेवाले आणि स्त्रिया अशी सोंगे घेतली होती. ती पाहताना भीती वाटत होती. हसूही येत होते. संकोचाने प्रथम ते सोंगाडे लॉबीमधेच राहिले. त्यांनी आपल्याबरोबर बाहेरच्या गारठ्यातील ताजेपणा आणि उत्साह आणला होता. ते एकामागे एक लपत मोठ्या दालनात शिरले. मग त्यांनी भीतभीत गायला सुरुवात केली. प्रथम दबल्या आवाजात, नंतर मोठ्या हुरूपाने, मोकळेपणाने ते गाऊ लागले, गाता गाता नाचू लागले आणि नाताळातील खेळ खेळू लागले. काउंटेसने त्यांना ओळखले, त्यांच्या पोषाखाचे हसून कौतुक केले आणि ती दिवाणखान्यात गेली. काउंट हल्या अँड्रीच स्मित

करीत मोठ्या दालनात बसला होता आणि त्यांच्या नाचगाण्याची स्तुती करीत होता. एवढ्या वेळात तरुण माणसे नाहीशी झाली होती.

अर्ध्या तासानंतर त्या दालनात बरीच माणसे प्रवेश करती झाली. त्यात एक फुगीर झगा घातलेली वृद्धा होती. निकोलायने घेतलेले ते सोंग होते. पेत्या तुर्क स्त्री बनला होता. डिम्लर विदूषक झाला होता. नताशा घोडदलाचा सैनिक बनून आली होती. सोन्याने जाळलेल्या बुचाने भुवया आणि मिश्या रेखाटून सरकेशन माणसाचे रूप घेतले होते.

वेषांतर न केलेल्या घरच्या माणसांनी त्यांना ओळखले नाही; त्यांनी त्यांचे सोंगाबद्दल खूप कौतुक केले. तेव्हा त्या तरुण मुलांना आपली सोंगे फार चांगली वाटू लागली आणि ती आणखी कोणालातरी दाखवली पाहिजेत असे त्यांना वाटू लागले.

रस्ता चांगल्या स्थितीत असल्यामुळे निकोलायला सर्वांना गाडीतून फिरवायचे होते. त्याने सोंगे घेतलेल्या दहाबारा घरगड्यांनाही बरोबर घेऊन काकाकडे जायचे ठरवले.

' नको बाबा, त्या म्हाताऱ्याला का त्रास देतो आहेस ? तिथं तुम्हा लोकांना हालचाली करायला पुरेशी जागाही मिळणार नाही. तुम्हाला जायचंच असेल तर मेल्युकॉव्हकडे का जात नाही ? ' काउंटेसने विचारले.

मेल्युकॉव्हबाई विधवा होती. तिला भिन्नभिन्न वयाची बरीच मुले होती. तिच्या कुटुंबात बरेच शिक्षक व शिक्षिका होत्या. रोस्तॉफ कुटुंबाच्या घरापासून तिचे घर अडीच–तीन मैलांवर होते.

' फार नामी कल्पना आहे, ' काउंटने संमती दिली. लुइसा इव्हानोव्ना ( स्कॉस बाई ) सोबत येत असली तरच मुलींनी जावे असे ठरले. अर्ध्या तासातच घंटा असलेल्या चार घसर गाड्या निघाल्या. हिमावरून सरकणाऱ्या गाडीच्या पट्ट्यांचा करकर आवाज येत होता.

सोन्या, नताशा, स्कॉसबाई आणि दोन दासी निकोलायच्या गाडीत चढले. काउंटच्या गाडीमधे डिम्लर, त्याची पत्नी, आणि पेत्या बसले होते. बाकीचे सोंगाडे इतर दोन गाड्यांत बसले होते. निकोलायने आपल्या वडिलांच्या गाडीवानाला गाडी पुढे न्यायला सांगितले.

डिम्लर आणि इतर मंडळी असलेली काउंटची घोड्याची गाडी पुढे निघाली. तसा गाडीच्या पट्ट्यांचा करकर आवाज होऊ लागला. गाडीच्या घंटांचा गंभीर निनाद ऐकू येऊ लागला. घोडे जोखडांना भिडू लागले, हिमात रुतल्यावर हिम लाथांनी झटकू लागले, तेव्हा ते साखरेच्या कणांसारखे चमकू लागले.

निकोलायने पहिल्या गाडीचा पाठलाग सुरू केला. त्याला मागे येणाऱ्या गाड्यांचा हिमावरील करकर आवाज आणि आतील लोकांचे बोलणे ऐकू येऊ लागले. पहिल्या प्रथम घोडे दुडक्या चालीने अरुंद रस्त्यावरून सावकाश जाऊ लागले. ते बागेजवळून जाऊ लागले तेव्हा पर्णहीन वृक्षांच्या सावल्या मार्गात पडू लागल्या आणि उजळ चंद्रप्रकाश दिसेनासा होऊ लागला. मधूनमधून खड्ड्यांमुळे पहिल्या गाडीला हिसका मिळे. मग मागाहून येणाऱ्या दुसऱ्या गाडीला तसाच हिसका मिळे. तसाच तिसऱ्या, अभेद्य स्तब्धतेचा उद्दामपणे भंग करीत

एकामागून एक गाड्या चालल्या होत्या.

'सज्ञाचे माग दिसताहेत' धुक्यामधून नताशाचा आवाज दुमदुमला.

'निकोलेङ्का, किती हा प्रकाश!' सोन्या उद्‌गारली. निकोलायने वळून सोन्याकडे पाहिले. अगदी जवळून तिला पाहण्यासाठी तो झुकला. काळ्या मिशांचा आणि त्याच्या दिशेने उचललेल्या सेबलच्या लोकरीच्या भुवया असलेला तो मोहक चेहरा किती वेगळा, किती मोहक दिसत होता! त्या चंद्रप्रकाशात तो चेहरा जवळ असून खूप खूप दूर वाटत होता.

'सोन्या पूर्वीचीच राहिली आहे.' निकोलायच्या मनात आले. त्याने अधिक जवळून तिच्याकडे पाहिले आणि स्मित केले.

'काय पाहतोस निकोलेङ्का?'

'काही नाही.' तो म्हणाला आणि पुन्हा त्याने आपल्या घोड्यांकडे नजर वळविली.

पेलाजिआ डॅनिलोवना मेल्युकॉव्ह भरदार अंगाची उत्साही स्त्री होती. सैल कपडे घालून आणि चष्मा चढवून ती दिवाणखान्यात बसली होती. तिच्या भोवती तिच्या मुली होत्या. ती त्यांची करमणूक करण्याची शिकस्त करीत होती. वितळलेले मेण पाण्यात टाकून त्याचे तऱ्हे-तऱ्हेचे आकार बघण्यात ती सारी दंगली होती. एकाएकी त्यांना लॉबीत पावलांचा आवाज ऐकू आला. मग येणाऱ्या लोकांचे बोलणे ऐकू आले.

तेवढ्यात घोडदलाचे सैनिक, सुंदर स्त्रिया, डाकिणी, विदूषक आणि रांगडी माणसे खोकत खोकत आणि चेहऱ्यावरील हिमतुषार झटकीत दिवाणखान्यात शिरली. विदूषक डिम्लर आणि वृद्ध स्त्री निकोलाय यांनी नृत्यास प्रारंभ केला. मुलांनी ओरडा-ओरड करीत त्यांना घेरले तशी सोंगाड्यांनी आपले चेहरे लपवले, आपला आवाज बदलला. यजमानीणबाईंना झुकून प्रणाम करीत ते सोंगाडे दिवाणखान्याभर पांगले.

'त्यांना ओळखून काढणं कठीण आहे. नताशा बघ कशी दिसते आहे. तिला पाहिल्यावर मला कोणाचीतरी आठवण येते. एडवर्ड कार्लिच किती चांगला माणूस आहे! मला पूर्वी तो ठाऊकही नव्हता. तो किती सुरेख नाच करतो. अरे वा! हा इकडे सरकॅशन आहे. सोन्युश्काला सोंग किती शोभून दिसते आहे. हा कोण बरं? खरंच तुम्ही आमची चांगली करमणूक केलीत. निकिता, वान्या, अग टेबलं घेऊन जा. आम्ही कंटाळून कसे गप्प बसलो होतो मघाशी.'

'ओहो! घोडदलाचा सैनिक! अगदी हुबेहुब पोरगा. पाय मात्र... मला तो दिसत नाही...' कुणीना कुणी काहीना काही बोलत होते.

मेल्युकॉव्हच्या मुलांमुलींमधे नताशा प्रिय झाली. त्यांना घेऊन ती घराच्या मागील भागातील खोलीत गेली. तिथे तिने बूच जाळले. वेगवेगळ्या प्रकारचे ड्रेसिंग गाऊन आणि पुरुषांचे वेष

मागवून घेतले. अर्धवट उघडलेल्या दाराच्या फटीतून उघड्या बायकी हातांनी ते पोषाख नोकरांकडून घेतले. दहाबारा मिनिटांत मेल्युकॉव्ह कुटुंबातील छोटी मंडळी देखील चित्रविचित्र पोषाखात हजर झाली.

पेलाजिआ डॅनिलोवना पाहुण्यांसाठी खोली स्वच्छ करण्यासाठी हुकूम सोडू लागली. त्यांच्या करमणुकीसाठी तयारी करू लागली. चष्मा चढवून ती सोंगाड्यांमधे हिंडू लागली. आपले हसू आवरीत ती प्रत्येक सोंगाड्याला जवळून पाहू लागली. पण तिला कोणालाही ओळखता येईना. रोस्तॉफकुटुंबातील माणसे आणि डिम्लर यांना ती ओळखू शकली नाहीच पण तिला आपल्या मुलींनाही ओळखता आले नाही.

तिच्या मुलीने कझानच्या तातरचे सोंग घेतले होते. तिच्या चेहऱ्याकडे टक लावून पाहत ती आपल्या कुटुंबातील शिक्षिकेला पुन्हा पुन्हा विचारू लागली, 'ही कोण बरं? मला वाटतं रोस्तॉफकुटुंबातील कोणीतरी असेल. हा घोडदलातील सैनिक दिसतो. काय रे बाबा, तू कुठल्या रेजिमेंटमधे आहेस? सांग तरी.' तिने नताशाला उद्देशून म्हटले. खाद्यपदार्थ घेऊन जाणाऱ्या नोकराला ती म्हणाली, 'ह्या तुर्काला मोरांबा दे बरं. त्याच्या देशाच्या कायद्यानं त्याला तो खायला मनाई केलेली नाही.'

आपल्याला कोणी ओळखले नाही याची पक्की खात्री झाल्यावर सोंगाड्यांची भीड चेपली होती. आणि त्यामुळे ते नाचताना वाटेल तशा वेड्यावाकड्या उड्या मारू लागले. ते पाहून पेलाजिआला हसू आवरत नव्हते, ती हसू रुमाल तोंडावर धरून लपवीत होती.

रशियन पद्धतीची नृत्ये आणि समूह गीते झाल्यावर पेलाजिआ डॅनिलोवनाने नोकरांसकट सगळ्यांना मोठे कडे करून उभे राहायला सांगितले. मग एक दोर, एक कडे आणि चांदीचे रूबल नाणे आणण्यात आले आणि ते वेगवेगळे खेळ खेळू लागले.

पाहुण्यांना दिवाणखान्यात खाण्यासाठी नेण्यात आले. दुसऱ्या दालनात नोकरांची चांगली सरबराई ठेवण्यात आली.

मेल्युकॉव्ह कुटुंबात राहात असलेली एक वृद्ध अविवाहित खाण्याचे वेळी म्हणाली, 'स्नानघरात आपलं नशीब पारखणं म्हणजे भयानक अनुभव घेणं आहे.'

'कशावरून म्हणता तुम्ही?' मेल्युकॉव्हच्या थोरल्या मुलीने विचारले.

'हे बघ तू काही प्रयत्न करू नकोस. त्याला धाडस लागतं.'

'मी जाऊन बघते.' सोन्या म्हणाली.

'त्या तरुण बाईचं काय झालं ते तरी सांग.' क्रमांक दोनची मुलगी म्हणाली.

वृद्ध अविवाहिता सांगू लागली. 'सांगते. घडलं ते असं. ती तरुण बाई बाहेर निघाली. तिनं आपल्याबरोबर एक कोंबडा, दोन सुरे, काटे आणि आवश्यक त्या वस्तू घेतल्या आणि ती बसून राहिली. थोडा वेळ गेला आणि तिला एकाएकी कुणीतरी येत असल्याची चाहूल लागली. एक घसरगाडी येत होती. तिच्या घंटांचा आवाज ऐकू येऊ लागला. त्याच्या पावलांचा आवाज ती ऐकू लागली. तो अगदी माणसाच्या रूपाने आला. एखाद्या ऑफिसरसारखा दिसत

होता. मग तो त्याच्यासाठी ठेवलेल्या जागेवर तिच्या अगदी शेजारी बसला.

'ईऽ ईऽ' भीतीने डोळे फिरवीत नताशा किंचाळली.

'त्यानं काय केलं मग ? तो माणसासारखा बोलू लागला का ?'

'अगदी माणसासारखा. सगळ्या गोष्टी जशा घडाव्यात तशा घडत गेल्या. तो तिला वश करून घेण्याचा प्रयत्न करू लागला. कोंबडा आरवेपर्यंत तिने त्याला संभाषणातच गुंतवून ठेवायला हवं होतं. पण ती पोरगी घाबरली. घाबरून तिने आपला चेहरा दोन्ही हातांनी झाकून घेतला. त्यानं तिला गाठलं. सुदैवानं तेवढ्यात दासी धाऊन आल्या म्हणून बरं...'

'अग कशाला त्यांना घाबरवून सोडते आहेस ?' पेलाजिआ डॅनिलोवना म्हणाली.

'ममा, तू केली होतीस का नशिबाची पारख ?' मुलीने विचारले.

'धान्याच्या कोठीत नशिबाची पारख कशी करतात ?' सोन्याने विचारले.

'अशा प्रसंगी कोठीत जाऊन कानोसा घेता तुम्हाला जसं ऐकू येईल तसं नशीब असतं. दरवाजावर जर थाप पडली अगर कोणी टकटक केली तर नशीब वाईट समजावं. धान्य चाळण्याचा आवाज ऐकू आला तर चांगली गोष्ट. परंतु केव्हा केव्हा काय होतं...'

'ममा, धान्याच्या कोठीतील तुझा अनुभव सांग ना ?'

पेलाजिआ डॅनिलोवनाने स्मित केले आणि म्हटले, 'अग, माझ्या आता काही ध्यानात नाही. मला माहीत आहे तुमच्यापैकी कुणीही तिकडे फिरकणार नाही.'

'असं म्हणू नकोस, पेलाजिना डॅनिलोवना. मला परवानगी दिलीस तर मी ही आता निघाले.' सोन्या म्हणाली.

'तू घाबणार नसलीस तर जा बाई.'

'मला कशाचीच भीती वाटत नाही. मी जाऊ का आत्ताच ?' असे विचारीत सोन्या उठली. धान्याची कोठी कुठे आहे, शांत राहून तिने कसा कानोसा घेतला पाहिजे ते त्यांनी तिला सांगितले. त्यांनी दिलेला सैल अंगरखा डोक्यावरून घेत तिने निकोलायकडे दृष्टिक्षेप टाकला.

धान्याच्या कोठडीकडे जाण्यासाठी सोन्या कॉरिडॉरमधे गेली. आत फार उकडते आहे असे म्हणून निकोलाय घाईघाईने पुढच्या प्रवेशद्वाराशी गेला.

बाहेर पूर्वीसारखे दाट स्तब्ध धुके पसरले होते. पूर्वीहून चंद्रप्रकाश इतका लख्ख होता, हिमामधे इतक्या चांदण्या चकाकत होत्या की आकाशाकडे लक्षच जात नव्हते. खऱ्याखुऱ्या चांदण्या नजरेतच भरत नव्हत्या. आकाश सर्वत्र अंधारे, उदास वाटत होते, जमिनीवर मात्र लखलखाट होता.

'मी अगदी मूर्ख आहे. इतके दिवस मी कशाची प्रतीक्षा करीत होतो नकळे.' निकोलाय विचार करीत तो धावत धावत प्रवेशद्वारातून बाहेर पडला. मग त्याने घराच्या कोपऱ्याला वळसा घातला. तो मागील दरवाज्याकडे जाणाऱ्या वाटेने चालू लागला. त्या मार्गानं सोन्या येणार याची त्याला खात्री होती.

. दासींच्या निवासस्थानाच्या प्रवेशद्वाराच्या दिशेने पायऱ्यांवर पडणारी पावले ऐकू आली. शेवटच्या पायरीवर हिम साचले होते. त्यावर पावले पडताना करकर आवाज ऐकू आला आणि मग वृद्ध दासी बोलल्याचे ऐकू आले. ' पोरी, आता सरळ या मार्गानं जा. मात्र मागे वळून पाहू नकोस. '

' मला भीती नाही वाटत ' सोन्या म्हणाली. निकोलायच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर सोन्याची नृत्याचे जोडे घातलेली पावले पडू लागली तसा करकर आवाज होऊ लागला.

सोन्याने सैल अंगरख्याने स्वतःला लपेटून घेतले होते. तिने त्याला जेव्हा पाहिले तेव्हा ती त्याच्यापासून दोन पावलांवर होती. तिने डोक्यावरून घेतलेल्या झग्यात त्याने हलकेच हात सारून तिला मिठीत घेतली आणि जवळ ओढून तिच्या मिश्या असलेल्या ओठांचे दीर्घ चुंबन घेतले. सोन्याने त्याच्या ओठांचे दीर्घ चुंबन घेतले. तिने आपले हात बाहेर काढून त्यांनी त्याचे गाल दाबून धरले.

' सोन्या... निकोलेङ्का ' ती याखेरीज काही बोलत नव्हती. ती धान्याच्या कोठीकडे धावली आणि पुन्हा वेगवेगळ्या दारांतून घराकडे परतली.

नाताळचा सण संपल्यानंतर लागलीच निकोलायने आपल्या आईला आपले सोन्यावर प्रेम असल्याचे सांगितले. एवढेच नव्हे तर तिच्याशी लग्न करण्याचा निर्धार केल्याचेही सांगितले. तो असे काही सांगणार याची अपेक्षा तिला होती. तिने म्हटले, ' तू तुला हव्या त्या मुलीशी लग्न करण्यास स्वतंत्र आहेस. मात्र माझे व तुझ्या वडिलांचे आशीर्वाद तुझ्या लग्नाला मिळणार नाहीत. ' आपली आई आपल्यावर रागावली आहे, तिचे आपल्यावर प्रेम असले तरी ती आपल्या म्हणण्याला मान तुकवणार नाही याची निकोलायला जीवनात प्रथमच जाणीव झाली. आपल्या मुलाकडे न पाहता निर्विकारपणे तिने त्याच्या वडिलांना बोलावून घेतले. काउंट आल्यावर त्याला ती निकोलायच्या समोरच आपल्या चिरंजीवांचे बेत थोडक्यात निर्विकारपणे ऐकवणार होती. पण तिला आपला राग आवरता आला नाही, तिचे डोळे अश्रूंनी भरले आणि ती खोलीच्या बाहेर निघाली.

निकोलायने आपला विचार सोडून द्यावा म्हणून थोरला काउंट त्याचे मन वळवू लागला. त्याची आर्जवे करू लागला. पण त्याच्या बोलण्यात ठामपणा नव्हता. निकोलायने त्याला आपणास वचनभंग करणे शक्य नसल्याचे सांगितले. तेव्हा त्याच्या वडिलांनी उसासा टाकला. ते गोंधळल्या सारखे झाले. संभाषण लागलीच थांबवून ते काउंटेसच्या खोलीत शिरले. मुलामुळे आता आर्थिक अडचणी येणार होत्या. तरीही आपणच त्याच्या अडचणींना जबाबदार आहोत. ही अपराधी भावना काउंटच्या मनातून जात नव्हती. काउंटनेच बरीचशी संपत्ती उधळून टाकली होती त्यामुळे मुलाने खूप संपत्तीचा वारस असलेल्या मुलीला नाकारले आणि

गरीब सोन्याशी लग्न करण्याचे ठरवले तरीही त्याच्यावर रागावणे काउंटला शक्य नव्हते. संपत्ती उधळली गेली नसती तर सोन्याहून अधिक चांगल्या पत्नीची अपेक्षा निकोलायसाठी करता आली नसती, ह्याची त्याला अधिक तीव्रतेने जाणीव झाली. संपत्तीची वाट लावायला आपण, मायटेङ्का आणि आपली अनिवार व्यसने जबाबदार आहेत हे त्याला तीव्रतेने जाणवले. आईवडिलांनी आपल्या मुलाकडे पुन्हा तो विषय काढला नाही.

काही दिवसांनंतर काउंटेसने सोन्याला आपल्या खोलीत बोलावून घेतले. आपल्या मुलाला नादी लावल्याबद्दल आणि कृतघ्नता दाखवल्याबद्दल तिला निर्दयतेने छेडले. सोन्याने तिचे निर्दय बोलणे मान न उचलता निमूटपणे ऐकून घेतले. आपण काय करायला पाहिजे अशी तिची अपेक्षा आहे हे तिला कळेना. ती आपल्या उपकारकर्त्यांसाठी वाटेल तो त्याग करायला तयार होती. इतरांसाठी स्वार्थत्याग ही तिची आवडती कल्पना होती. पण ह्या वेळी मात्र तिला कोणासाठी आणि कोणता त्याग करायला हवा हे कळेना. काउंटेस आणि रोस्तॉफ कुटुंबातील इतर माणसे यांवर प्रेम केल्याशिवाय तिला राहवत नव्हते. आपल्या प्रेमावर निकोलायचे सौख्य अवलंबून असल्याची जाणीव असल्याने त्याच्यावर प्रेम न करणे तिला शक्य नव्हते. ती शांत राहिली, तिने काही उत्तर दिले नाही. अशी अवस्था फार वेळ राहू देणे आपणास शक्य नाही असे निकोलायला वाटले आणि तो आपणहून या प्रश्नाची तड लावण्यासाठी आईच्या खोलीत गेला. निकोलायने आईला आपल्याला आणि सोन्याला क्षमा करून लग्नाला मान्यता देण्यासाठी गळ घातली. 'तू सोन्याचा छळ सुरू केलास तर मी गुप्तपणे तिच्याशी लग्न करून टाकीन' अशी त्याने तिला धमकी दिली.

त्याच्या आईने निकोलायला पूर्वी कधीही न दिसलेल्या निर्विकारपणे उत्तर दिले, 'तू आता सज्ञान आहेस. प्रिन्स आन्द्रे वडिलांना न विचारता लग्न करीत आहे तसा तूही लग्न करू शकतोस. काही झालं तरी मी त्या कारस्थानी बाईला माझी सून म्हणून स्वीकारणार नाही.'

'पातळयंत्री बाई' अशा शब्दात सोन्याचा केलेला उल्लेख ऐकून निकोलाय एकदम भडकला. आपला आवाज चढवीत तो आईला म्हणाला, 'माझ्या भावना काय आहेत हे मला सांगायला भाग पाडशील अशी माझी अपेक्षा नव्हती. तुझी इच्छाच असेल तर पहिले आणि अखेरचे सांगतो...'

त्याची आई भयभीत मुद्रेने तो काय बोलतो याची वाट पाहू लागली. तो पुढे काही बोलला असता तर पुढे जन्मभर त्याच्या हृदयावर जखम राहिली असती. पण ते जीवघेणे शब्द उच्चारायला त्याला वेळ मिळाला नाही. कारण तेवढ्यातच आतापर्यंत दरवाजाशी राहून ऐकत असलेली नताशा आत धावत आली. तिचा चेहरा पांढरा फटफटीत पडला होता, नजर स्थिर होती.

'निकोलेङ्का, तू मूर्खासारखा बडबडतो आहेस. आता एक शब्द बोलू नकोस. मी सांगते म्हणून तरी गप्प राहा.' त्याचा आवाज दडपण्यासाठी ती जवळ जवळ किंचाळत म्हणाली.

तिच्या आईला आपण कुठेतरी खोल गर्तेच्या काठाशी उभे आहोत असे वाटू लागले. ती आपल्या मुलीकडे भयभीत नजरेने पाहात राहिली.

तिच्याकडे वळून नताशा म्हणाली, ' ममा गडे, तू काही मनावर घेऊ नकोस. मी बोलते काय ते. निकोलेङ्का, मी तुला मग समजावून सांगते. तू आता इथून जा बरं. ममा, मी सांगते ते ऐक.' ती सुसंगत असे काही बोलत नव्हती. पण तिला अपेक्षित असा परिणाम त्या शब्दांनी साधला होता.

काउंटेसने एक जोराचा हुंदका देत आपला चेहरा आपल्या मुलीच्या छातीत लपवला. निकोलाय उठला आणि आपले डोके दाबून धरीत तो खोलीच्या बाहेर पडला. नताशाने त्या दोघांत तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न चालवला. तिला थोडेफार यशही मिळाले. सोन्याला आपण त्रास देणार नाही असे आईने निकोलायला आश्वासन दिले. आपल्या आईवडिलांना कळवल्याखेरीज आपण काही करणार नांही असे निकोलायने वचन दिले.

रेजिमेंटमधील आपले व्यवहार मिटवून राजीनामा देऊन घरी यायचे आणि सोन्याशी लग्न करायचे निकोलायने पक्के ठरवून टाकले. जानेवारीच्या सुरुवातीस निकोलाय रेजिमेंटमधे परतला तेव्हा आईवडिलांशी भांडण झाल्यामुळे तो दुःखी आणि गंभीर बनला होता.

निकोलाय निघून गेल्यानंतर रोस्तॉफच्या घरामधील माणसे पूर्वीहून अधिक खचून गेली होती. मानसिक ताणामुळे काउंटेसने अंथरूण धरले होते.

निकोलायच्या विरहामुळे आणि त्याहूनही काउंटेसने धरलेल्या वैरभावामुळे सोन्या हताश झाली होती. आर्थिक अडचणीत सापडल्याने काउंट अतिशय चिंताग्रस्त होता. त्याला आता काहीतरी निर्णय घेणे आवश्यक होते. मॉस्कोमधील घर आणि मॉस्कोलगतची शेतवाडी विकल्याखेरीज गत्यंतर नव्हते. त्याच्यासाठी त्याला मॉस्कोला जाणे भाग होते. पण काउंटेसच्या आजारामुळे त्यांना तिकडे जाणे दरदिवशी लांबणीवर टाकावे लागत होते.

प्रारंभी प्रारंभी नताशाला नियोजित वराचा विरह फारसा जाणवला नाही. तशी तिची वृत्ती प्रसन्न होती. पण मग मात्र तिला विरह अधिकाधिक असह्य होऊ लागला आणि मनावरचे दडपण व ताण वाढू लागला. आपल्या आयुष्यातला जो उत्कृष्ट काळ आपण त्याच्यावर प्रेम करण्यात घालवला असता, तो नाहक फुकट जात आहे या विचाराने ती वैतागू लागली. प्रिन्स आन्द्रेच्या पत्रांनी तिला बहुधा संताप येऊ लागला. त्याच्या केवळ स्मृतीवर आपण जगत असताना तो खऱ्या अर्थाने जीवन जगत आहे, नव्या स्थळांना भेटी देत आहे, आवडणाऱ्या लोकांत मिसळत आहे, ह्या विचारानेही तिला विलक्षण मनस्ताप होऊ लागला. पत्रे जितकी मनोरंजक असत तितका तिचा मनस्ताप वाढत असे. त्याने पाठवलेली पत्रे तिला आनंद देऊ शकत नव्हती. उलट त्याने ती कंटाळून, कर्तव्य म्हणून लिहिली आहेत, त्यामागे प्रेम नाही असे तिला वाटे.

रोजच्या सवयीने ती जो भाव आवाजात, हास्यात आणि नजरेत व्यक्त करी त्याच्या एक-सहस्रांश भागही तिला आपल्या पत्रात उतरवता येत नसे. त्यामुळे तिला पत्र लिहिणे शक्य

होत नव्हते. ती त्याला ठरीव ठशाची औपचारिक पत्रे लिही. तिच्या दृष्टीने त्या पत्रांना काडीचेही महत्त्व नव्हते. पत्राच्या कच्च्या प्रतीतील चुका काउंटेस दुरुस्त करीत असे. काउंटेसची प्रकृती अद्याप सुधारली नव्हती, तरीही मॉस्कोला जाणे आता लांबणीवर टाकून चालणार नव्हते. वधूसाठी पोषाख खरेदी करायचा होता, घर विकायचे होते. प्रिन्स आन्द्रेचे वडील मॉस्कोमधे हिवाळा घालवीत होते. तिथे प्रिन्स आन्द्रे प्रथम जाणार होता. तो तिथे केव्हाच येऊन पोचला असेल असे नताशाला वाटत होते. काउंटेसला खेडेगावातच सोडून जानेवारीच्या अखेरीस सोन्या आणि नताशा काउंट यांना घेऊन मॉस्कोला आला.

■ ■

# भाग आठवा

## १८११-१८१२

प्रिन्स आन्द्रेचे लग्न नताशाशी ठरले त्यानंतर का कोण जाणे पीएरला एकाएकी वाटले पूर्वीसारखे जीवन व्यतीत करणे आपल्याला अशक्य आहे. त्याचा उपकारकर्ता वृद्ध फ्रीमेसन याने त्याला ज्या सत्याचा साक्षात्कार घडवला होता त्यावर त्याची नितांत श्रद्धा होती. अंतरात्मा निर्दोष करण्यासाठी भक्तिभावाने वाहून घेण्याच्या कार्यात त्याला आनंद मिळत होता तरीही प्रिन्स आन्द्रेचे नताशाशी ठरलेले लग्न आणि ऑसिप अलेक्स्येविचचा मृत्यू ह्या दोन्ही वार्ता एकाच वेळी त्याला कळल्यावर त्याचे धार्मिक जीवन जवळ जवळ संपुष्टात आल्यासारखे दिसू लागले. हुषार पत्नी असलेले घर, तिच्यावर होत असलेली बड्या व्यक्तींची कृपा, पीटर्झबर्गमधील उच्चभ्रूंची मंडळे, दरबारातील शिष्टाचारांनी भरलेली त्याची नोकरी ह्या बाह्य गोष्टी तेवढ्या जीवनात उरल्या होत्या. एकाएकी अनपेक्षितरीत्या पीएरला अशा जीवनाचा वीट आला. त्याने दैनंदिनी ठेवणे बंद केले, मेसनबंधूंच्या सहवासात राहणे तो टाळू लागला, पुन्हा क्लबमध्ये जाऊन चिकार मद्यपान करू लागला. पुन्हा तो रंगेल अविवाहित मित्रांत मिसळून इतके बेछूट स्वैर जीवन जगू लागला की त्याची कानउघाडणी करणे काउंटेस एलन व्हॅसिल्येवनाला आवश्यक वाटले. तिचे म्हणणे पीएरला पटले. तिच्याशी तडजोड करून राहण्याऐवजी तो थेट मॉस्कोला गेला.

मलूल झालेल्या आणि होऊ लागलेल्या प्रिन्सेस, त्याच्या वहिणी आणि नोकरांचा मोठाला ताफा यांनी भरलेल्या प्रचंड घरात तो शिरला. गाडीतून शहरात फिरताना त्याने बऱ्याच गोष्टी पाहिल्या. ज्यामध्ये मॅडोनाच्या सुवर्णजडित पूजास्थानासमोर असंख्य मेणबत्त्या पेटत होत्या ते इव्हेर्स्की चर्च, ज्याच्यावरील बर्फ अजून तुडवला गेला नव्हता तो क्रेमलीनचा चौक,

घसरगाड्यांचे गाडीवान, झोपडपट्ट्या, बदलाची अपेक्षा न धरता शांतपणे नेहमीची रपेट घेणारे मॉस्कोतील वृद्ध पुरुष, वृद्ध स्त्रिया, मॉस्कोतील नाचसमारंभ, इंग्लिश क्लब हे सारे पाहिल्यावर त्याला घरच्यासारखे आरामात असल्यासारखे वाटले. जुना ड्रेसिंगगाऊन घातल्या-वर वाटावे तसे सुखकर पण ओंगळ वाटले.

एखाद्या पाहुण्याची दीर्घकाळ वाट पाहावी, त्याच्यासाठी जागा राखून ठेवलेली असावी, ती कधी दुसऱ्याने घेतलेली नसावी आणि मग तो पाहुणा एके दिवशी येताच त्याचे जसे स्वागत व्हावे तसे पीएरचे स्वागत वरिष्ठ समाजातील वृद्ध स्त्रियांपासून मुलांपर्यंत सर्वांनी केले. मॉस्कोतील लोकांच्या दृष्टीने पीएर म्हणजे अत्यंत आनंदी, दयाळू, बुद्धिमान, सुस्वभावी, उदार आणि चक्रम व्यक्ती होती. जुन्या जमान्यातील बेफिकीर आणि सौजन्यशील मनमिळाऊ रशियन व्यक्ती होती. तो सर्वांना दान करीत असल्याने त्याचा खिसा नेहमीच रिकामा असे.

धर्मार्थ केलेले रंजनाचे कार्यक्रम, गरीब चित्रकारांची चित्रे आणि मूर्ती, परोपकारी संस्था, जिप्सी समूहगीते, शाळा, भोजन समारंभ, मद्यपान बैठकी, मेसनपंथीय, प्रार्थनामंदिरे आणि पुस्तके यांपैकी कशाला किंवा कुणालाच त्याच्याकडून नकार मिळाला नाही. त्याच्याखेरीज कोणताही भोजनसमारंभ अगर रात्रीचा नृत्योत्सव पार पडत नसे.

तो सोफ्यावर लोळत पडला की त्याची मित्रमंडळी जमा होई, आणि मग चर्चा, वादविवाद आणि हास्यविनोद यांना ऊत येई. त्याच्या प्रेमळ स्मितामुळे आणि सहज केलेल्या विनोदामुळे भांडणाऱ्या व्यक्ती आपले वैर विसरत. तो नसला म्हणजे मेसनच्या निवासातील भोजनगृह रूक्ष आणि कंटाळवाणे वाटे.

केवळ मित्रांना दिलेल्या एका रात्रीच्या भोजनसमारंभानंतर त्याला मित्रांनी आपल्याबरोबर मौज करण्यासाठी गाडीतून येण्याचा आग्रह केला. त्याने सौम्य गोड स्मित करीत त्यांच्या येतास संमती दिली. तेव्हा मित्रमंडळींनी आनंदाने घोषणा दिल्या. नाचसमारंभात कुणाला जोडीदार नसला तरच तो नृत्यात भाग घेई. जेवण झाल्यानंतर तो नेहमीच सर्वांशी चांगला वागे, कुणाकडे खास लक्ष देत नसे त्यामुळे तो मुलींना आणि तरुण विवाहित स्त्रियांना आवडत असे. त्याच्याबद्दल त्या नेहमी म्हणत, ‘ तो फार आकर्षक आहे. त्याच्या सहवासात स्त्रीपुरुष-संबंधाची जाणीव होत नाही.’

इतर शेकडो लोकांप्रमाणेच पीएरदेखील मॉस्कोमधे अखेरचे आयुष्य घालवण्यासाठी आला होता. सात वर्षांपूर्वी तो परदेशातून परतला होता तेव्हा त्याला जर कुणी सांगितले असते, ‘ स्वतःबद्दल विचार करण्याची जरुरी नाही, उगाच डोक्याला शीण देऊ नकोस, तुझ्या जीवनाचा मार्ग केव्हाच कायमचा तयार झालेला आहे, तू कितीही धडपड केलीस तरी तुझ्या दर्जाच्या इतर सर्व माणसांसारखेच तू आयुष्य व्यतीत करणार आहेस ’ तर त्याला भयंकर धक्का बसला असता, त्या वेळी त्याचा त्यावर विश्वास बसला नसता. त्याने आपल्या उराशी कितीतरी आशाआकांक्षा जोपासल्या होत्या. त्याला रशियात प्रजासत्ताकाची स्थापना करायची होती; स्वतः तो नेपोलियन बनणार होता, मग तत्त्वज्ञानी होणार होता. मग लष्करी

हालचालीतील तज्ज्ञ होणार होता. तो एक दिवस नेपोलियनचा पाडाव करणार होता. पापी मानव जातीचे पुनरुत्थान होणार आहे आणि आपणही संपूर्ण सद्गुणी बनणार आहोत असे त्याने उत्कट इच्छा बाळगली नव्हती काय ? त्याने शाळा आणि इस्पितळे सुरू केली नव्हती काय ? त्याने गुलामांना मुक्त केले नव्हते काय ?

ते सारे आता बाजूला पडले होते. तो आता बेइमान पत्नीचा पती होता, निवृत्त आसामी बनला होता. भोजनात आणि मद्यपानात रंगू लागला होता. भोजन झाल्यानंतर जाकिटाची बटणे काढून सरकारला थोड्या फार शिव्या देण्यात त्याला मजा वाटत होती. मॉस्को इंग्लिश क्लबचा तो सदस्य झाला होता, मॉस्कोच्या सर्वच उच्चभ्रू समाजात तो लोकप्रिय झाला होता. सात वर्षांपूर्वी त्याला मॉस्कोतील निवृत्त गृहस्थाचा अत्यंत तिरस्कार वाटत असे. आता आपण त्यात जमा झालो आहोत हा विचार कितीतरी काळ त्याला दुःसह वाटत होता, मनाला पटत नव्हता.

अशा प्रकारचे जीवन आपण थोडा वेळच जगणार आहोत तेव्हा त्याला फार महत्त्व देण्याचे कारण नाही असा विचार करून तो भयभीत झाला. आपण काही काळच असे जीवन जगणार आहोत अशा समजुतीने अनेक लोक तरुणपणी असे जीवन जगत क्लबमध्ये आले होते आणि दात, केस गळून गेल्यानंतरच त्यांनी क्लब सोडला होता ह्या जाणिवेने पीएर घाबरून गेला.

त्याला आता पूर्वीप्रमाणे निराशेचे आणि दुःखाचे झटके येईनातसे झाले; जीवनाबद्दल तिरस्कार वाटेनासा झाला. पूर्वीच्या दिवसांत जो आजार जोराच्या फेफऱ्यातून प्रगट होत असे त्याने आता त्याच्या अंतर्यामाचा कबजा घेतला. 'कशासाठी ?' त्याचा काय उपयोग ? ह्या जगात चालले आहे तरी काय ?' दिवसातून पुष्कळ वेळा संभ्रमित होऊन तो स्वतःला विचारू लागे.

पीएरला वाटायचे— स्वतःच्या शारीरिक सुखाशिवाय कशाची जिने काळजी केली नाही ती जगातील एक क्रमांकाची मूर्ख बाई एलन व्हॅसिल्येवना लोकांना श्रेष्ठ सुसंस्कृत विदुषी वाटते, अत्यंत वंद्य वाटते. नेपोलिअन बोनापार्ट जेव्हा खरोखर थोर होता तेव्हा सर्वांनी त्याचा तिरस्कार केला. जेव्हा तो केविलवाणे विदूषकी चाळे करू लागला तेव्हापासून सम्राट फ्रान्सिस लग्न कायदेशीर ठरले नसते तरीही आपली मुलगी नेपोलिअनला देऊ पाहात आहे. १४ जूनला फ्रेंचांवर विजय मिळाला म्हणून स्पॅनिश लोक कॅथॉलिक चर्चमधे देवाचे आभार मानत आहेत. माझे मेसन बंधू आपल्या शेजाऱ्यांसाठी सर्वस्व द्यायला तयार आहेत. मात्र ते गरिबांच्या मदतकार्यासाठी एक रूबल वर्गणी देखील द्यायला उत्सुक नाहीत. अधिकृत स्कॉटिश सतरंजी आणि ज्याची कुणाला जरुरी नाही आणि लिहिणाऱ्याला ज्याचा अर्थ ठाऊक नाही असा कायदा याबद्दल ते अकांडतांडव करतात. न्यायदेवता आणि धर्मपंडित ह्यांत भांडण लावतात

''शेजाऱ्यांवर प्रेम करा, पाप्याला क्षमा करा,' या ख्रिस्ताच्या वचनाचा आपण उदो उदो करतो ह्या धर्मनियमाच्या गौरवार्थ आपण हजारो प्रार्थनामंदिरे मॉस्को शहरात उभारली

आहेत. काल मात्र आम्ही कामचुकार सैनिकाला मरेपर्यंत चाबकांनी फोडून काढला. प्रेमाचे आणि क्षमेचे धर्मनियम आचारात आणायला लावणाऱ्या धर्मगुरूने चुंबन घेण्यासाठी त्या सैनिकापुढे क्रूस धरला होता.'

अशा प्रकारे पीएरच्या मनात विचारचक्र सुरू होते. ह्या सार्वत्रिक वंचनेची सर्वांना जाणीव होती. ती पाहण्याचा पीएरला जरी सराव होता तरीही ती काही नवीन गोष्ट असल्याप्रमाणे त्याला आश्चर्यचकित करून सोडी. 'मला ह्या वंचनेची आणि उलटसुलट हेतूच्या गुंतागुंतीची कल्पना आहे पण मी मला ठाऊक असलेले सारे त्यांना कसे सांगणार? मी तसा प्रयत्न केला आणि मला कळून चुकले—'माझ्याप्रमाणे त्यांनाही मनापासून समजलेले असते पण ते न समजून घेण्याचा प्रयत्न करीत असतात. मला वाटते हे असेच चालायचे. पण मी—मला आश्रय कोठे, कुणाचा आहे?'

न सुटणाऱ्या समस्यांच्या दडपणाखाली वावरणे भयंकर अनुभव होता. त्या समस्या केवळ विसरण्यासाठी, पलायनासाठी तो समोर प्रथम येईल त्या मोहाच्या स्वाधीन होऊ लागे; शक्य असेल त्या त्या मंडळींत तो मिसळे, चिकार मद्यपान करी, त्याला चित्रे खरीदणे, इमारती बांधणे आणि जास्त करून पुस्तके वाचणे या गोष्टींचा छंद जडू लागला. हाताशी येईल ते तो पुन्हा पुन्हा वाचू लागला.

त्याच्या स्थूलपणाचा विचार करताना दारू घातक आहे असे डॉक्टरांनी त्याला सांगितले. तरीही तो यथेच्छ मद्यपान करू लागला.

मद्याच्या एक दोन बाटल्या रिचवल्यानंतर त्याला अंधुकपणे वाटू लागले—पूर्वी जीवनाच्या भयानक गुंतागुंतीने आपल्याला चक्रावून टाकले होते ती गुंतागुंत आपल्याला वाटली होती तितकी भयानक नाहीच मुळी. डोक्यात गुई गुई आवाज होत असताना, गप्पा मारीत असताना, इतरांच्या गप्पा ऐकताना, दिवसारात्री भोजनानंतर वाचन करीत असताना त्याला हटकून जीवनाच्या गुंतवळीतील काही धागे निश्चित हाताशी लागलेसे वाटत. दारूच्या नशेत असे तेव्हाच तो स्वतःशी म्हणू लागे—'काही हरकत नाही. मी ही सगळी गुंतागुंत उकलून टाकीन. माझ्याकडे रामबाण उत्तर आहे. पण त्यासाठी ही वेळ अनुकूल नाही. मी त्याचा समाचार केव्हातरी घेईन' पण हा 'केव्हातरी' केव्हाच उगवत नसे.

हिवाळ्याच्या प्रारंभी प्रिन्स निकोलाय अँड्रीच बोलकॉन्स्की व त्याची मुलगी मॉस्कोला गेली.

त्या वर्षभरात प्रिन्स बराच म्हातारा झाला होता. वार्धक्याची लक्षणे स्पष्टपणे दिसू लागली होती. त्याला एकाकी चक्कर येऊ लागे, आता आता घडलेल्या गोष्टींचे त्याला विस्मरण होई, गतकाळातल्या घटना मात्र अचूक तपशीलवार आठवत, मॉस्कोतील विरोधकांच्या पुढाऱ्याची भूमिका वजावण्यात त्याला लहान मुलासारखी धन्यता वाटे.

असे असले तरी जेव्हा तो केसांचा टोप आणि लोकरीचा कोट घालून संध्याकाळचा चहा घ्यायला दिवाणखान्यात येई, कोणीतरी उद्युक्त केल्यावर गतकाळावर मोजकी टीका करू लागे, विशेषतः अधिक थोडक्यात पण कडक टीका वर्तमानकाळावर करू लागे, तेव्हा त्याच्या पाहुण्यांना त्याच्याबद्दल पूर्वीसारखाच आदर वाटल्याखेरीज राहात नसे. पुराणपद्धतीचा तो वाडा त्यातील प्रचंड आरसे, क्रांतीच्या पूर्वीच्या काळाचे फर्निचर, पावडर लावलेले हुजऱ्ये, गतकाळचा अवशेष असलेला करारी व धूर्त वृद्ध प्रिन्स निकोलाय, त्याच्यावर नितांत भक्ती असलेल्या सुस्वभावी कन्या आणि सुंदर फ्रेंच स्त्री ह्या साऱ्या गोष्टींची पाहुण्यांवर चांगलीच छाप पडे. आपण केवळ दोन तास ह्या घरातील वातावरण न्याहाळीत असतो. उरलेला दिवस-रात्रीचा वेळ ह्या घरामध्ये लोकांना ठाऊक नसलेले व खाजगी जीवन ठरलेल्या रीतिरिवाजांना धरून चालू असते हा विचार पाहुण्यांच्या मनातही कधी येत नसे.

मॉस्कोमधे आल्यावर आताशा प्रिन्सेस मार्याला कौटुंबिक जीवन दुःसह झाले होते. ब्लीक हिल्समध्ये असताना ती देवमाणसांबरोबर सुखसंवाद करायची, एकान्तवासामुळे तिचे मन ताजेतवाने राहायचे. ह्या महान सौख्याला ती मॉस्कोला आल्यावर मुकली. शहरी जीवनातील फायदे आणि सुखेही तिच्या वाट्याला आली नाहीत. ती शिष्टवर्तुळात मिसळत नसे. तिचे वडील आपल्यावाचून तिला कुठे धाडीत नसत आणि स्वतः आजारी असल्याने कुठे बाहेर पडत नसत याची सर्वांना कल्पना होती. आताशा तिला कोणी भोजनसमारंभांना तसेच नृत्यसमारंभांना बोलावीतनासे झाले.

प्रिन्सेस मार्याने लग्नाची आशा सर्वस्वी सोडून दिली होती. तिच्या घरी कधी कधी तरुण येत. त्यातल्या एखाद्याने तिला कदाचित मागणीही घातली असती. पण आपले वडील अशा तरुणांशी निर्विकारपणे आणि आकसाने वागतात हे तिच्या लक्षात येऊन चुकले होते. आता प्रिन्सेस मार्याला मित्र-मैत्रिणी उरल्या नव्हत्या. ती मॉस्को येथे राहू लागल्यावर तिचा आपल्या एकाकाळच्या जीवश्चकंठश्च मैत्रिणीवरील विश्वास पार उडाला. बूरिअनबाईशी ती कधीच मोकळ्या मनाने बोलली नव्हती. तिचा तिला आता तिरस्कार वाटू लागला. ती तिच्यापासून दूर राहू लागली. त्याला तशीच खास कारणे होती. दुसरी मैत्रीण जूली तिच्याशी प्रिन्सेस मार्याने पाच वर्षे खंड न पडता पत्रव्यवहार सुरू ठेवला होता. पण ती जूली आता मॉस्कोमधेच होती. जेव्हा प्रिन्सेस मार्याने त्या जुन्या मैत्रीला पुन्हा उजाळा देण्याचा प्रयत्न केला तेव्हा तिला आपली जुनी मैत्रिण एकदम परकी झालेली आढळली. जूलीचा भाऊ मरण पावला होता. त्यामुळे ती मॉस्कोमधील सर्वात श्रीमंत वारस बनली होती. त्या वेळी ती तत्कालीन ऐषआरामाच्या भोवऱ्यात गरगरत होती. तिच्याभोवती तरुण गोळा होऊ लागले. त्यांना एकाएकी आपल्या सद्गुणांचे कौतुक करावेसे वाटत आहे यावर तिचा विश्वास बसला होता. तारुण्य ओसरू लागलेल्या स्त्रीला आलेली लग्नाची अखेरची संधी घेतली नाही तर मग केव्हाच लग्न होणार नाही अशी धास्ती वाटते जूलीची मनःस्थिती अशीच झाली होती. जूलीच्या प्रत्यक्ष सहवासात तिला कसलाही आनंद मिळत नव्हता. जूली इथेच असल्याने आणि तिला आठवड्यातून एकदा तरी

भेटता येत असल्याने पत्र लिहावे अशी व्यक्तीच उरली नाही. याचे प्रिन्सेस मार्याला दुःख वाटे आणि ती विषण्ण स्मित करी. कित्येक रात्री जिच्या सहवासात घालवल्या त्या स्त्रीशी लग्न करायला नाकारणाऱ्या राजकीय कारणासाठी हद्दपार झालेल्या वृद्ध फ्रेंचाप्रमाणे तिलाही जूली इथेच असल्यामुळे, पत्र लिहायला व्यक्ती न सापडल्यामुळे दुःख होई, जिच्याशी मन मोकळे करावे, जिला आपली दुःखे विश्वासात घेऊन सांगावीत अशी व्यक्ती मार्याला मॉस्को शहरात आढळली नाही.

ह्या अवधीत तर तिच्या वाट्याला नवीनवी दुःखे येत राहिली. प्रिन्स आन्द्रे आता लवकरच येणार होता. त्याच्या लग्नाची वेळ नजीक येत होती. त्याने तिच्यावरच वडिलांची संमती मिळवण्याची कामगिरी सोपवली होती. त्यात तिला यश मिळाले नव्हते. एवढेच नव्हे तर लग्न फिसकटते की काय असे वाटत होते. आताशा थोरला प्रिन्स बहुतकरून चिडलेला असे. रोस्तॉफकुटुंबातील त्या तरुण काउंटेसचा उल्लेख झाला की तो भडकत असे. सहा वर्षांच्या आपल्या भाच्याला ती शिकवीत असे. त्यातूनही तिच्या वाट्याला मनस्ताप येत होता. धाकट्या निकोलायशी वागताना आपल्या वडिलांच्या रागाची लक्षणे आपल्यात दिसतात ही जाणीव तिला झाली तेव्हा ती विलक्षण दचकून गेली. शिकवताना आपण आपला तोल जाऊ द्यायचा नाही असे ती स्वतःला वारंवार बजावत असे. हातात छोटी काठी घेऊन फ्रेंच धुळाक्षरे दाखवीत ती त्याला शिकवू लागे. ती त्याने जलद शिकावे अशी अपेक्षा करी, त्याला लवकर समजावे म्हणून आपल्यापरीने सुलभ सोप्या तऱ्हेने शिकवू लागे. आपली आत्या आपल्यावर कोणत्या क्षणाला रागावेल याचा पोराला भरवसा वाटत नसे. त्यामुळे तो भयभीत होऊन शिकू लागे. त्याने लवकर शिकावे ही तिची इच्छा इतकी जबरदस्त असे की त्याने थोडेसे दुर्लक्ष केले तरीही ती रागाने थरथरू लागे, आपला आवाज चढवी आणि कधी कधी त्याच्या चिमण्या हाताला धरून ओढून त्याला कोपऱ्यात उभा करी. त्याला कोपऱ्यात उभा करून झाल्यावर तिला आपल्या दुष्ट स्वभावाचा राग येई आणि ती रडू लागे. त्याच वेळी तिकडे धाकटा निकोलायही ओक्साबोक्शी रडत असे. तिने बोलावले नाही तरी तो आपल्या जागेवरून येई आणि तिचे अश्रूंनी भिजलेले हात तिच्या चेहऱ्यावरून दूर करून तिचे सांत्वन करण्याची धडपड करी. वडिलांचा संताप तिला दिवसेंदिवस असह्य होत होता. वडील नेहमीच सगळा राग न चुकता तिच्यावर काढीत होते आताशा तर त्यांनी तिचा निर्दयपणे छळच चालवला होता.

आताशा त्याची पावले वेगळ्याच मार्गावर पडत होती. त्यामुळे प्रिन्सेस मार्या कधी नव्हे ती कष्टी होत होती. थोरल्या प्रिन्सचे बूरिअनबाईशी दिवसेंदिवस सख्य वाढू लागले होते. आपल्या मुलाचा बेत त्याला कळला त्याच क्षणी थट्टेमध्ये त्याला कल्पना सुचली होती. आन्द्रेने लग्न केले तर आपणही बूरिअनबाईशी लग्न करायला हरकत नाही ही कल्पना त्याला आता आवडू लागली होती. आणि आताशा तो बूरिअनबाईशी अधिकाधिक आस्था दाखवू लागला. ( मात्र आपणाला सतावण्यासाठी वडील असे वागत आहेत असे प्रिन्सेस मार्याला वाटू लागले.) त्या फ्रेंच स्त्रीवरील आपल्या प्रेमाचे प्रदर्शन करून थोरला प्रिन्स आपल्या मुलीवरील रोष प्रकट करीत होता.

एकदा तर प्रिन्सेस मार्याच्या समोर थोरल्या प्रिन्सने बूरिअनबाईच्या हाताचे चुंबन घेतले आणि तिला जवळ ओढून आलिंगन दिले. ( आपण जवळ असल्यामुळे वडिलांनी मुद्दामच ते कृत्य केले असा प्रिन्सेस मार्याचा ग्रह झाला. ) प्रिन्सेस मार्या एकदम लाजेने लालबुंद होऊन तडक खोलीच्या बाहेर पळाली. काही मिनिटांनंतर बूरिअनबाई प्रिन्सेस मार्याच्या खोलीत आली. स्मित करीत आपल्या गोड आवाजात ती कसल्यातरी विषयावर उत्साहाने बोलू लागली. प्रिन्सेस मार्याने जलदीने आपले डोळे पुसले. कसला तरी निश्चय करून ती त्या फ्रेंच स्त्रीकडे गेली. आपण काय करतो आहोत याची बहुधा तिला जाणीव उरली नाही. रागाच्या आवेगात आणि मधे मधे थांबत ती तिच्या अंगावर खेकसली, ' एखाद्याच्या दुर्बळपणाचा फायदा घेणाऱ्याचा मला तिरस्कार वाटतो, तुला असल्या कृत्याची शरम वाटली पाहिजे. ' तिला पुढे बोलवेना ! ' चालती हो माझ्या खोलीतून ' ती ओरडली आणि हुंदके देऊ लागली.

दुसऱ्या दिवशी थोरला प्रिन्स आपल्या मुलीशी एक शब्दही बोलला नाही. भोजनाच्या वेळी त्याने बूरिअनबाईला प्रथम वाढण्याची तिला आज्ञा केली ते तिच्या लक्ष्यात आले. भोजनाच्या शेवटी नोकराने नेहमीच्या सवयीमुळे प्रिन्सेसला पहिल्यांदा कॉफी दिली तेव्हा थोरला प्रिन्स रागाने एकदम भडकून उठला. त्याने फिलीपवर आपली छडी उगारली आणि त्याला सैन्यात भरती करण्याचा तात्बडतोब हुकूम दिला.

' तो तसा ऐकायचा नाही. त्याला दोनदा बजावलं तरी त्यानं ऐकलं नाही. ह्या घरात तिचा मान प्रथम राखायला हवा. ती माझी परम मैत्रिण आहे.' थोरला प्रिन्स पहिल्यांदाच प्रिन्सेस मार्याला उद्देशून रागारागाने ओरडला, ' कालच्याप्रमाणं जर पुन्हा तिच्यासमोर अविचारानं वागू लागलीस तर तुला ह्या घरात कोणाची सत्ता चालते ते दाखवून देईन. चल, चालती हो इथून. माझ्या दृष्टीसही पडू नकोस. तिची क्षमा माग आणि जा. '

प्रिन्सेस मार्याने बूरिअनबाईची आणि वडिलांचीही क्षमा मागितली.

अशा क्षणी स्वाभिमानी प्रिन्सेस मार्याच्या अंतःकरणात स्वार्थत्यागाची भावना उफाळून येत असे तशी ती आता आली. आणि अशा वेळी एकाएकी ज्यांच्या वर्तनाची ती चिकित्सा करीत असे ते तिचे वडील आपला चष्मा शोधू लागत, दिसला नाही की चाचपडू लागत, नुकते काय घडले त्याचे त्यांना विस्मरण पडे, अशक्त पायांनी ते कसेबसे धडपडत चालत, आपली दुर्बलता कुणाच्या लक्ष्यात तर आली नाही ना या शंकेने वळून पाहू लागत. सर्वांत दुःखाची गोष्ट म्हणजे जेवणाच्या वेळी कुणी चिथावणारा पाहुणा नसला म्हणजे ते एकाएकी झोपी जात, त्यांचा नॅपकिन खाली पडे, आणि त्यांचे थरथरते डोके ताटात झुकू लागे. अशा वेळी आपलाच उद्वेग येऊन प्रिन्सेस मार्या स्वतःशी म्हणे, ' माझे बाबा किती वृद्ध आणि अशक्त झाले आहेत. आणि तरीही मी त्यांच्या वर्तनाची चिकित्सा करायला धजावते. किती वाईट !'

सेंट निकोलायच्या दिवशी म्हणजे थोरल्या प्रिन्सच्या नामकरणादिवशी सगळे मॉस्को शहर त्यांच्या घराकडे लोटले, पण थोरल्या प्रिन्सने कुणालाही भेटण्यासाठी आत सोडायचे नाही असा हुकूम दिला होता. त्याने निवडक पाहुण्यांची यादी प्रिन्सेस मार्याकडे दिली होती. त्यांनाच फक्त भोजनाचे आमंत्रण होते.

त्याने निवडलेले सहा पाहुणे दोन वाजता भोजनासाठी आले. ख्यातनाम काउंट रास्तोपचिन, प्रिन्स लॉपुहिन, त्याचा भाचा, थोरल्या प्रिन्सच्या काळातला जुना सहकारी जनरल चॅट्रॉव्ह, नव्या पिढीतील पीएर आणि बोरिस द्रबेत्स्काय. हे सहाही पाहुणे त्याची प्रतीक्षा करीत दिवाणखान्यात बसले होते. बोरिस नुकताच मॉस्कोहून रजेवर आला होता, प्रिन्स निकोलाय अँड्रीचचा आणि आपला परिचय व्हावा असे त्याला फार फार वाटत होते. प्रिन्स निकोलायची मर्जी संपादन करण्यात तो यशस्वी झाला होता. सगळ्या अविवाहित तरुणांना आपल्या घरी फिरकू द्यायचे नाही असे त्याने ठरवले होते. पण त्याने बोरिसच्या बाबतीत हा नियम लागू केला नाही.

प्रिन्स निकोलायकडे रूढ अर्थाने उच्चभ्रूंचा समाज येत नव्हता. त्याच्या घरी निवडक माणसे गोळा होत असत. त्याबद्दल शहरात बोलबाला होत नव्हता, तरीपण त्या मंडळींत प्रवेश मिळणे इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा मानाचे समजले जाई. ही गोष्ट एक आठवड्यापूर्वीच बोरिसच्या लक्षात आली होती. मॉस्कोच्या कमांडर-इन-चीफने सेंट निकोलायच्या जन्मदिनी रास्तोपचिनला भोजनाचे आमंत्रण दिले होते तेव्हा रास्तोपचिन म्हणाला होता, ' माफ करा, मी येऊ शकणार नाही. मी त्या दिवशी दरवर्षी न चुकता प्रिन्स निकोलाय अँड्रीच यांच्याकडे जात असतो. '

कमांडर-इन-चीफ मान डोलवीत म्हणाला, ' ठीक. ठीक. त्यांची प्रकृती कशी आहे ?'

पुराणपद्धतीच्या, जुने फर्निचर असलेल्या त्या भव्य दिवाणखान्यात जेवणापूर्वी जमलेली मूठभर पाहुणेमंडळी कायदेविषयक सल्लागार मंडळ टेबलाभोवती बसावे तशी गंभीरपणे बसली होती.

सर्वजण न बोलता बसले होते. कुणी बोललाच तर अतिशय हळू आवाजात बोलत होता. गंभीर मुद्रेचा मितभाषी प्रिन्स निकोलाय अँड्रीच दिवाणखान्यात प्रविष्ट झाला, तशी प्रिन्सेस मार्या नेहमीपेक्षा अधिकच गरीब आणि भयभीत दिसू लागली. कुणाच्याही बोलण्याकडे तिचे चित्त नव्हते. त्यामुळे तिच्याशी संभाषण करावे असे कोणाही पाहुण्यास वाटत नव्हते. एकटा काउंट रास्तोपचिन काय तो बोलत होता. राजकीय जगातल्या आणि शहरातल्या अद्ययावत बातम्या तो ऐकवीत होता. लॉपुहिन आणि वृद्ध जनरल अगदी क्वचित मधूनमधून संभाषणात भाग घेत होते. सादर करण्यात आलेला रिपोर्ट घेत, शांत राहून कधी एखादुसरा शब्द बोलून, मांडण्यात आलेल्या पुराव्याकडे आपले लक्ष आहे असे दाखवणाऱ्या न्यायमूर्तींच्या थाटात प्रिन्स निकोलाय संभाषणे ऐकत होता.

भोजनाच्या वेळी संभाषणाचा ओघ अलीकडील राजकीय घटनांकडे वळला.

'चाच्यांच्या तावडीत जहाज सापडावे तसा युरोप नेपोलिअनच्या पकडीत सापडला आहे' रास्तोपचिनने अनेकवार वापरलेले शब्द पुन्हा एकवार वापरले. 'सत्तेवर असलेले सम्राट दीर्घकाळ जुलूम कसा सहन करतात याचं आश्चर्य वाटतं. आता पोपवर पाळी आली आहे. कॅथलिक चर्चच्या प्रमुखास अधिकारपदावरून हाकलताना नेपोलिअनला काहीच वाटत नाही आणि त्याच्याविरुद्ध कुणी एक शब्दही उच्चारत नाही. त्याने ऑल्डेनबर्गची मालमत्ता बळकावली. त्याचा निषेध फक्त आमच्या सम्राटांनी नोंदवला आहे. आणि तरीही...' रास्तोपचिन एकाएकी बोलायचा थांबला. यापलीकडे जाऊन टीका करणे अशक्य आहे याची जाणीव त्याला झाली होती.

'ड्यूकच्या ऑल्डेनबर्ग राज्याऐवजी त्याला इतर प्रदेश देऊ करण्यात आले होते. मी माझ्या शेतीवरील नोकरांना ब्लीक हिल्सवरून बॉगुचेरॉव्होकडे नाहीतर र्‍याझान शेतवाडीवर हालवावे, तशा प्रकारे तो ड्यूकना इकडून तिकडे हलवीत आहे.' थोरला प्रिन्स म्हणाला.

'ऑल्डेनबर्गचा ड्यूक आपल्यावर आलेले संकट ज्या धैर्याने आणि शांतपणे सोसत आहे ते बघून त्याच्याबद्दल कोणालाही आदर वाटेल.' बोरिस अत्यंत आदरपूर्वक म्हणाला. बोरिस असे बोलला याचे कारण पीटर्सबर्गहून येताना ड्यूकशी त्याची ओळख करून घेण्याचा मान त्याला मिळाला होता. थोरल्या प्रिन्सने काहीतरी उत्तरादाखल बोलण्याच्या इराद्याने त्या तरुण माणसाकडे पाहिले, पण हा अजून बच्चा आहे असे वाटून त्याने आपला विचार बदलला.

मांसाशनानंतर शांपेन दिली गेली. प्रत्येक पाहुणा आपापल्या आसनावरून उठून थोरल्या प्रिन्सला शुभेच्छा व्यक्त करू लागला. प्रिन्सेस मार्या देखील त्याच्याजवळ गेली. तेव्हा त्याने तिच्याकडे खुनशी नजरेने पाहात आपला सुरकुत्या पडलेला गुळगुळीत गाल तिच्यापुढे धरला.

दिवाणखान्यात मंडळी कॉफीपानासाठी जमली तेव्हा वृद्ध लोक एकत्र आले.

प्रिन्स निकोलाय अँड्रीच तावातावाने होऊ घातलेल्या युद्धाबद्दल आपली मते मांडत होता. 'टिल्झिट शांतता करारामुळे आपण युरोपातील राजकारणात ओढले गेलो आहोत. त्या राजकारणात जोपर्यंत आपण ढवळाढवळ करीत राहू आणि जोपर्यंत जर्मन राष्ट्रांशी दोस्ती करण्याचा प्रयत्न करीत राहू, तोपर्यंत आम्हाला बोनापार्टचा युद्धात पराभव करणे अशक्यप्राय आहे. ऑस्ट्रियाविरुद्ध अथवा ऑस्ट्रियासाठी आम्ही लढाई करणे अनावश्यक होते. आमचा तिथं काही संबंध नव्हता. राजकीय दृष्ट्या आपल्या देशाला पूर्वेकडे लक्ष द्यायला हवं. आणि एक निश्चित धोरण आखायला हवं. १८०७ मध्ये त्याने रशियन सरहद्द ओलांडली होती. तसे करण्याचे धाडस तो पुन्हा कधीही करणार नाही.'

'प्रिन्स, आपण फ्रेंचांच्याविरुद्ध कसे बरे लढू शकणार? आमच्या गुरूच्या धर्मगुरूच्या विरुद्ध आम्ही शस्त्र कसं उगारणार? जरा आमच्या तरुणतरुणींकडे नजर तर टाका. फ्रेंच माणसं त्यांना देवाच्या ठिकाणी आहेत. पॅरिस त्यांना स्वर्ग आहे.' सर्वांनी आपले म्हणणे ऐकावे म्हणून काऊंट रास्तोपचिन आवाज वाढवू लागला.

'आमच्या फॅशन्स फ्रेंच आहेत. आमच्या कल्पना फ्रेंच आहेत. आमच्या भावनाही फ्रेंच आहेत. मेटिव्हिए फ्रेंच होता आणि हरामखोर होता म्हणून तुम्ही त्याला हाकललेत. पण आमच्या महिला तर त्याच्यामागे रांगत जाताहेत. काल रात्री मी पार्टीला गेलो होतो तिथं दर पाचांत तीन स्त्रिया कॅथलिक होत्या. रविवारी त्या भरतकाम करण्याचे पाप करतात. तरीही त्यांना पोपनं सूट दिलेली आहे. त्या बसतात त्या नग्नावस्थेत नसतात एवढंच. मला उपमेबद्दल क्षमा करा. त्या सार्वजनिक स्नानघरावर असलेल्या खुणेच्या पाटीप्रमाणे उघड्या बसतात. ह्या तरुण पिढीकडे पाहिलं की असं वाटतं-पीटर–द–ग्रेटचा जुनापुराणा सोटा म्युझियममधून बाहेर काढावा आणि जुन्या रशियन पद्धतीप्रमाणं काही जणांच्या बरगड्या खिळखिळ्या कराव्यात म्हणजे त्यांच्यातील मूर्खपणा नाहीसा होईल.'

सगळे स्तब्ध होते. स्मित करीत थोरल्या प्रिन्सने रास्तोपचिनकडे पाहून संमतिदर्शक मान हलवली.

प्रिन्सेस मार्या दिवाणखान्यात बसून वृद्धांच्या चर्चा, टीका ऐकत होती. पण त्यांतले एक अक्षरही तिला कळत नव्हते. तिच्या मनात एकच एक विचार येत होता. आपल्या वडिलांचा आपल्याबद्दलचा आकस सगळ्या पाहुण्यांच्या ध्यानात आला असेल का ? त्या दिवशी तिसऱ्यांदा द्रबेत्स्कॉय त्याच्याकडे आला होता. जेवणाच्या वेळी त्याने लक्षात यावी इतकी प्रेमळ सलगी केली. पण तिचे लक्षच नव्हते.

थोरला प्रिन्स बाहेर निघून गेल्यानंतर पीएर हा एकटाच पाहुणा आता थांबलेला होता. हातात हॅट घेऊन हसऱ्या चेहऱ्याने तो प्रिन्सेस मार्याजवळ आला तशी तिने आपली विसराळू प्रश्नार्थक नजर त्याच्याकडे वळवली. आता ती दोघेच दिवाणखान्यात होती.

प्रिन्सेस मार्याजवळील बैठ्या खुर्चीत बसत, तो स्थूलकाय तरुण म्हणाला, 'मी आणखी थोडा वेळ थांबलो तर चालेल ना ?'

'बसा ना,' ती म्हणाली. तिचे डोळे मात्र विचारीत होते, 'तुमच्या काही गोष्टी ध्यानात आल्या नाहीत का ?'

भोजन झाले होते म्हणून असेल पीएर चांगल्या मनःस्थितीत होता. सरळ दृष्टी लावीत त्याने सौम्य स्मित केले 'प्रिन्सेस त्या माणसाशी तुझा दीर्घ परिचय आहे काय ?'

'कोणत्या माणसाशी ?'

'द्रबेत्स्कॉयशी.'

'नाही.'

'ठीक. तुला तो माणूस आवडतो का ?'

'हो, तो फार मनमिळाऊ तरुण आहे. पण तुम्ही असं का विचारता ?' प्रिन्सेस मार्याने

विचारले. अजूनही ती सकाळी वडिलांबरोबर झालेल्या संभाषणाचा विचार करीत होती.

'त्याचं कारण असं. जेव्हा एखादा तरुण पीटर्झबर्गहून मॉस्कोला येतो, तेव्हा त्याचा उद्देश, श्रीमंत वारसस्त्रीशी लग्न करण्याचा असतो हे निःसंशय. आणि हा तरुण मनुष्य जिथं जिथं श्रीमंत वारस स्त्रिया असतील तिथं तिथं शिरकाव करून घेण्याच्या प्रयत्नात असतो. मी अशा माणसाचं मन चांगलं ओळखू शकतो. तू की जूली कुरॅगिन याबद्दल त्याच्या मनाचा निर्णय झालेला नाही. तो तिच्याशी बरीच सलगी करतो आहे.'

'खरं की काय?' पीएरच्या प्रेमळ चेहऱ्याकडे पाहत पण आपल्या दुःखाचाच सारखा विचार करीत ती म्हणाली. तिला वाटत होते, 'मी माझ्या भावना विश्वासात घेऊन कुणाला सांगितल्या तर माझं मन हलकं होईल. एकट्या पीएरकडेच मी माझं मन मोकळं करू शकेन. तो किती दयाळू आणि उदार मनाचा आहे. तो मला योग्य सल्ला देईल.'

'तुला त्याच्याशी लग्न करायचं आहे का?' पीएरने विचारले.

'काय सांगू, काऊंट! केव्हा केव्हा असं वाटतं की कोणाशी तरी लग्न करून टाकावं.' डोळ्यांत अश्रू आणून प्रिन्सेस मार्या असे म्हणाली तेव्हा तिचे तिलाच आश्चर्य वाटले. कंपित स्वरात ती बोलू लागली, 'अगदी नात्यातील व्यक्तीवर आपण प्रेम करावं, पण तिला दुःख देण्याखेरीज आपण काहीच करीत नाही आणि ती स्थिती काही पालटता येत नाही हा अनुभव किती दारुण आहे! यावर एकच उपाय आहे. इथून निघून जाणं. पण मी जाणार कुठं?'

'प्रिन्सेस, असं झालं आहे तरी काय? तुला कशाचं दुःख आहे?'

प्रिन्सेस मार्या आणखी काही स्पष्टीकरण न देता रडू लागली.

'मला आज काय झालं आहे ते माझं मलाच कळेनासं झालं आहे. तुम्ही माझ्याकडे लक्ष देऊ नका. मी बोललेलं सारं विसरून जा.'

पीएरचा सगळा आनंद पार ओसरला. त्याने काळजीयुक्त मनाने तिची चौकशी केली. मनात असेल ते बोलून टाकायला, आपल्याला विश्वासात घेऊन आपले दुःख सांगायला विनविले. पण ती सारखी म्हणत राहिली, 'मी बोलले ते सारं विसरून जा. मी काय बोलले होते तेही मला आता आठवत नाही. माझी काळजी कोणती आहे ती तुम्हाला माहीत आहे—प्रिन्स आन्द्रेच्या लग्नाच्या प्रश्नावरून वडील आणि तो यांच्यात बेबनाव होईल का—याची मला काळजी लागून राहिली आहे.'

मग विषय बदलण्यासाठी तिने विचारले, 'तुम्हाला रोस्तॉफकुटुंबाची काही खबर मिळाली का? ती माणसं लवकरच इकडे येणार आहेत, असं मी ऐकलं आहे. मी रोज आन्द्रेचीही वाट पाहत असते. त्या सर्वांची इथं भेट झाली तर मला बरं वाटलं असतं.'

'आता त्याचं याबाबत काय मत आहे?' पीएरने प्रिन्स निकोलायचे नाव न घेता विचारले प्रिन्सेस मार्यानि मान हालवली.

'पण त्याला इलाज नाही. वर्ष संपायला आता फार थोडे महिने उरले आहेत. हे असंच चालेल असं नाही.'

' माझ्या भावाचा परिचयात खर्च होणारा वेळ मला वाचवता आला असता तर मला आनंद झाला असता. ती माणसं लवकर आली असती तर बरं झालं असतं. चांगल्या तऱ्हेनं तिचा परिचय करून घ्यावा असं माझ्या मनात आहे. तुमचा त्या कुटुंबाशी पुष्कळ दिवसाचा परिचय आहे. मला त्यांच्याबद्दल काय असेल ते खरंखुरं सांगा. ती कशा प्रकारची मुलगी आहे ? तिच्याबद्दल तुमचं मत काय आहे ? आन्द्रे वडिलांच्या इच्छेविरुद्ध वागून मोठा धोका पत्करीत आहे. म्हणून मी तुम्हाला विचारते आहे मला आडपडदा न ठेवता खरीखुरी माहिती द्या. '

प्रिन्सेस मार्या अशा तऱ्हेने संपूर्ण सत्यासाठी पुन्हापुन्हा विनवणी करू लागली तेव्हा हिच्या मनात आपल्या भावी वहिनीबद्दल आकस आहे, प्रिन्स आन्द्रेची निवड योग्य नाही असे आपण म्हणावे असे तिच्या मनात आहे असे पीएरला का कोण जाणे वाटू लागले.

पीएरने जे वाटले ते सांगून टाकले. ' तुमच्या प्रश्नाला काय उत्तर द्यावं कळत नाही ' असे म्हणताना तो संकोचला. आपण का संकोचलो हे त्याचे त्यालाही सांगता आले नसते, ' ती मुलगी कशी आहे हे मला खरोखर ठाऊक नाही. तिच्या स्वभावाची चिकित्सा करणं अवघड आहे. ती तशी आकर्षक आहे. ती का आकर्षक वाटते ते सांगता येणं शक्य नाही. तिच्याबद्दल सांगता येण्याजोगं एवढंच आहे.'

प्रिन्सेस मार्याने उसासा टाकला. तिची मुद्रा जणू म्हणत होती, ' मलासुद्धा तेच वाटलं होतं. तीच धास्ती वाटत होती. '

पीटर्सबर्गमधील कुणा श्रीमंत वारस स्त्रीशी लग्न करण्यात बोरिस यशस्वी झाला नाही. खरे तर तो त्या उद्देशाने मॉस्कोला आला होता. मॉस्कोत आलेल्या बोरिसला जूली आणि प्रिन्सेस मार्या या दोन श्रीमंत वारस तरुणींमधून कोणाची निवड करावी याचा निर्णय घेता येईना. प्रिन्सेस मार्या रूपाने तशी सामान्य होती, पण काही झाले तरी ती त्याला जूलीहून आकर्षक वाटत होती. तिचे प्रियाराधन करताना त्याला काहीसे चमत्कारिक वाटत होते. थोरल्या प्रिन्सच्या नामकरणाच्या दिवशी त्याचे तिच्याशी झालेले संभाषण शेवटचे होते. तो अगदी भावनापूर्ण बोलत होता तेव्हा ती मात्र त्याला असंबद्ध उत्तरे देत होती. तो काय बोलत होता त्याकडे तिचे लक्षही नव्हते.

उलट जूलीने मात्र त्याच्या सलगीला अतिशय तत्परतेने खास आपल्या पद्धतीने प्रतिसाद दिला. जूलीचे वय सत्तावीस वर्षांचे होते. तिचे दोन्ही भाऊ मरण पावल्यामुळे ती अतिशय धनाढ्य झाली होती, आता निश्चितपणे तिचे रूप सामान्य झाले होते. आपण पूर्वीप्रमाणेच अजून सुंदर आहोत एवढेच नव्हे तर पूर्वी कधी नव्हतो त्याहूनही खूप आकर्षक आहोत असे तिला मनापासून वाटत होते. ती आता धनाढ्य वारस झाल्याने आणि तिच्याभोवती उत्साही

मंडळी गोळा होत राहिल्याने तिचा हा भ्रम आणखी दृढ होऊ लागला. तिचे वय जसजसे वाढू लागले तसतसा तिच्या संगतीतील पुरुषांना निर्धोकपणा वाटू लागला. तिच्याशी चर्चा करताना त्यांना अधिक मोकळीक मिळू लागली. तिने योजलेले भोजनसमारंभ, रात्रीचे उत्सव आणि तिच्याभोवती जमणारी उल्हसित मंडळी याचा लाभ त्यांना होऊ लागला. असे करताना त्या मंडळींना आपण उपकृत होत आहोत असे वाटत नसे.

सतरा वर्षांची मुलगी असलेल्या घरात आपण गेलो तर ती बदनाम होईल व आपणाला तिला वचन द्यावे लागेल या धास्तीने तिच्या घराकडे जो मनुष्य दहा वर्षांपूर्वी फिरकला नसता, तोच मनुष्य आज मोठ्या धीटपणे दररोज तिला भेटत होता. विवाहयोग्य मुलगी म्हणून तिच्याकडे पाहात नव्हता तर तिचे स्त्रीत्व विसरून तिच्याकडे केवळ एक ओळखीची व्यक्ती म्हणून पाहत होता.

त्या हिवाळ्यात कॅरॅगिनांचे घर सगळ्या मॉस्कोत अत्यंत हवेहवेसे वाटणारे आणि अत्यंत आतिथ्यशील झाले होते. तिथे भोजनसमारंभ होत होतेच. रात्रीच्या उत्सवांना पाहुण्यांना बोलावण्यात येत होते. त्याशिवाय कॅरॅगिनांच्या घरी दररोज बरीच मंडळी जमत असे. बहुत-करून त्यात पुरुषांचाच भरणा असे. ते कॅरॅगिनांच्या घरी मध्यरात्री जेवण घेत आणि तिथेच पहाटे तीनपर्यंत राहत. जूलीने एकही नाचसमारंभ, करमणुकीचा इतर कार्यक्रम किंवा नाटक चुकवले नव्हते. ती नेहमी अतिशय फॅशनेबल पोषाख करीत असे.

ॲना मिहालोवना नेहमीच कॅरॅगिन कुटुंबाकडे येई. जूलीच्या आईशी पत्ते खेळताना तिने जूलीला लग्नानंतर किती वाटा मिळणार याबद्दल विश्वसनीय बातमी मिळवली. हुंडा म्हणून पेन्झा प्रांतातील दोन ठिकाणची शेतवाडी आणि निझ्निगॉरड प्रांतातील अरण्याचा भाग मिळणार होता.

ती आपल्या मुलाला म्हणे, 'मला आताशा जूली इतकी आवडते पण ते शब्दात सांगता येणार नाही. खरं म्हणजे ती पोरगी कोणाला आवडणार नाही? ती अगदी अलौकिक आहे.' क्षणभर थांबून ती म्हणे, 'बोरिस बाळ, मला तिच्या आईबद्दल इतकी सहानुभूती वाटते. तिनं आजच मला पेन्झाची कागदपत्रे, हिशेब दाखवले. तिथे त्यांची प्रचंड इस्टेट आहे. तिला बिचारीला मदत करायला कोणी नाही. सगळेजण तिचा गैरफायदा घेऊ पाहताहेत.'

बोरिस मंदस्मित करीत तिचे बोलणे ऐकत होता. तिच्या भाबड्या कारस्थानाचे त्याला हसू येत होते. तरीही तो तिचे बोलणे ऐकत होता आणि मधूनमधून पेन्झा आणि निझ्निगॉरड येथल्या स्थावर मालमत्तेची आस्थेने चौकशी करीत होता.

आपल्या प्रियकराकडून मागणी येईल अशी आशा जूली कितीतरी दिवस बाळगून होती. ती त्याला होकार द्यायला एका पायावर तयार होती. तिचे दिखाऊ वागणे, लग्न करण्याची तिची प्रबळ इच्छा यामुळे बोरिसच्या मनात सुप्त घृणा निर्माण झाली होती आणि खऱ्या प्रेमाला आपण मुकणार अशी धास्ती होती म्हणून तो विलंब लावीत होता. बोरिसची रजा

संपत आली होती. दररोज तो कॅरेगिन कुटुंबाच्या घरी जात होता. कधी कधी सबंध दिवस त्यांच्याकडे राहात होता. सर्व परिस्थितीचा विचार करून दररोज मनाशी म्हणत होता– 'मी उद्या जूलीला मागणी घालीन.' जूली समोर असली म्हणजे तिचा लालबुंद चेहरा, पावडरने जवळ जवळ माखून गेलेली तिची हनुवटी, तिचे ओलसर डोळे, आणि विषण्णता टाकून वैवाहिक वासनेच्या सुखाकडे वळण्यास सदैव सज्ज असल्याचे सुचवणारी तिची मुद्रा ह्याकडे लक्ष जाताच बोरिसचा निश्चय ओठातल्या ओठातच राही. मात्र आपण पेन्झा आणि निझ्निगॉरडचे मालक झालो आहोत अशी तो कधीपासून कल्पना करू लागला होता. त्याने कल्पनेने इस्टेटीचे कितीतरी उत्पन्न खर्च करून टाकले होते. बोरिसच्या मनाची द्विधा अवस्था जूलीला दिसली, आपला त्याला वीट येत आहे याची जाणीव तिला मधूनमधून होऊ लागली. पण त्याने स्तुती केली की ती स्त्रीसहजवृत्तीने सुखावून जाई. प्रेमापोटीच तो आपल्यापासून दूर जात आहे अशी ती आपल्या मनाची समजूत घालीत होती. तरीपण आताशा ती विषण्ण होण्याऐवजी चिडखोर होऊ लागली होती. बोरिसची रजा संपण्याआधी थोडेच दिवस तिने निश्चित कृती करण्याचा बेत आखला. बोरिसची रजा संपणार न संपणार तोच कॅरेगिनच्या मॉस्कोमधे आणि–सांगण्याची गरज नाही–कॅरेगिनच्या दिवाणखान्यात अनातोल कुरॅगिनचे आगमन झाले. जूलीची विषण्णता एकाएकी पार नाहीशी झाली. ती कुरॅगिनशी अतिशय प्रेमाने आणि उत्साहाने वागू लागली.

ॲना मिहालोवना आपल्या मुलाला म्हणाली, 'अरे बाळ, मला विश्वासातल्या माणसाकडून कळलं आहे. प्रिन्स व्हॅसिली आपल्या मुलाचं लग्न जूलीशी व्हावं म्हणून त्याला मॉस्कोला पाठवीत आहे. मला जूली इतकी आवडते. असं झालं तर मला वाईट वाटेल. तुझं काय मत आहे?'

आपण आता यशस्वी होणार नाही, आजपर्यंत जूलीचे प्रियाराधन करण्याचे कंटाळवाणे दुःखदायक काम करण्यात आपण वेळ फुकट घालवला, जी इस्टेट आपण नाना गोष्टींसाठी खर्च करणार होतो त्या इस्टेटीचे सर्व उत्पन्न दुसऱ्याच्या तेही अनातोल सारख्या मूर्ख माणसाच्या हातात पडणार आहे या विचाराने बोरिसच्या मनाला सहस्र इंगळ्या डसल्या. जूलीला मागणी घालण्याचा ठाम निश्चय करून त्याने कॅरेगिनच्या घराकडे गाडी न्यायला सांगितले. जूलीने त्याचे स्वागत प्रसन्न पण बेफिकीर मुद्रेने केले. सहज जाता जाता सांगावे तसे आपण रात्री नाचसमारंभात खूप मजा केल्याचे सांगितले आणि विचारले, 'तू कधी निघणार आहेस?' बोरिस खरे तर आपल्या प्रीतीबद्दल बोलायला आला होता. त्याने त्यामुळे आर्जवी स्वरात बोलण्याचे ठरवले होते. पण आता तो स्त्रियांच्या चंचलतेबद्दल चिडून बोलू लागला. तो म्हणाला, 'स्त्रिया क्षणात आनंदी, क्षणात दुःखी होतात. त्यांच्या चित्तवृत्ती प्रियाराधन करणाऱ्या पुरुषावर केवळ अवलंबून असतात.' जूली अपमानित होऊन म्हणाली, 'तू म्हणतोस ते अगदी खरं आहे. स्त्रियांना एकसुरीपणा नको असतो. विविधता हवी असते. त्याच त्याच गोष्टीचा कोणालाही कंटाळा येईल.'

'मग मला वाटतं तू—' बोरिसच्या मनात काहीतरी भेदक बोलायचे होते. बोलता बोलता तो मधेच थांबला. आपली चिडून वाईट झालेली, गोंधळलेली मुद्रा तिला दिसू नये म्हणून त्याने नजर खाली वळवली आणि म्हटले, 'तुझ्यावरोबर भांडण करायला मी आलेलो नाही. उलट—' आपण पुढे बोलावे की नाही हे पाहण्यासाठी त्याने तिच्याकडे पाहिले. तिच्या मुद्रेवरील सारी संत्रस्तता कुठेच्या कुठे निघाली, तिचे अस्वस्थ आर्जवी डोळे त्याच्यावर प्रबळ आशेने खिळले.

'तिला टाळणे मला यापुढं नेहमी शक्य होईल. आता विषयाला प्रारंभ सुरू झाला आहे तेव्हा तो पुरा करणं बरं!' तो लाजेने लालबुंद झाला. तिच्या चेहऱ्यावर नजर लावीत तिला म्हणाला, 'मला तुझ्याबद्दल काय वाटतं याची तुला कल्पना आहे.' आणखी काही बोलण्याची गरज उरली नाही. जूलीची मुद्रा विजयानंदाने आणि तृप्तीने उजळून निघाली. अशा प्रसंगी जे म्हणायचे असते ते-' माझं तुझ्यावर प्रेम आहे, दुसऱ्या कोणत्याही स्त्रीवर मी असं प्रेम केलं नाही'—हे सारे तिने बोरिसच्या मुखातून वदवून घेतले. आपल्या पेन्झा इस्टेटीच्या आणि निझ्निगॉरड अरण्याच्या मोबदल्यात आपणाला एवढे सांगण्याचा हक्क आहे असे तिला वाटत होते आणि म्हणून तिने आपला हक्क बजावला होता.

लग्न ठरल्यावर त्या दोघांनी उदासवाणे विचार बाजूला ठेवून पीटर्सबर्गमधे चांगल्या तऱ्हेने कसे राहता येईल याचे बेत आखले, लोकांना भेटण्यास सुरुवात केली आणि लग्न थाटामाटाने व्हावे म्हणून ती दोघे तयारीला लागली.

जानेवारीच्या शेवटच्या दिवसांत काउंट इल्या अंड्रीच रोस्तॉफ नताशा आणि सोन्या यांना घेऊन मॉस्कोला पोचला. काउंटेसला अजून बरे वाटत नव्हते. त्यामुळे प्रवास करणे तिला शक्य नव्हते. पण प्रिन्स आन्द्रे मॉस्कोला कोणत्याही दिवशी येण्याचा संभव असल्याने त्यांना काउंटेसला घरी ठेवून निघणे भाग पडले होते. खेरीज त्यांना इतर कामे करायची होती. त्यांना नवरीसाठी पोषाख खरेदी करायचा होता. मॉस्कोच्या उपनगरातील शेतवाडी विकायची होती, थोरला प्रिन्स बोलकॉन्स्की मॉस्कोत असल्याने त्याला त्याची भावी सून दाखवता आली असती. मॉस्कोमधील रोस्तॉफच्या घरात सबंध हिवाळ्यात शेकोटीची व्यवस्था केलेली नव्हती. ते थोडे दिवसच राहणार होते. त्यांच्याबरोबर काउंटेस नव्हती. तेव्हा काउंट इल्या अँड्रीचने मार्या दिमित्र्येवनाकडे उतरण्याचा निश्चय केला. ती कितीतरी दिवस काउंटला आपल्याकडे उतरण्याचा आग्रह करीत असायची.

रोस्तॉफकुटुंबाच्या चार भरलेल्या गाड्या मार्या दिमित्र्येवनाच्या प्रांगणात शिरल्या तेव्हा खूप रात्र झाली होती. मार्या दिमित्र्येवना एकटीच राहात होती. यापूर्वीच तिने आपल्या मुलीचे लग्न लावून दिले होते. तिचे सगळे मुलगे लष्करात होते.

तिचा ताठा अजूनही कमी झाला नव्हता. ती आपली मते भीडमुर्वत न ठेवता ठामपणे ऐकवीत असे. माणसांमधे कसल्याही दोषांची, विकारांची किंवा मोहांची शक्यता असू नये असे तिला वाटे. तशी शक्यता आढळली तर ती कानउघाडणी करील असे वाटायला लावणारे तिचे व्यक्तित्व होते. सकाळीच उठून जाकिट घालून सगळ्या घरकामांकडे ती लक्ष ठेवी. मग ती संतांच्या जन्मतिथी असतील तेव्हा चर्चमधील प्रार्थनेला हजर राही, मग तिथून तुरुंगांना भेटी द्यायला जाई. तिथे आपण काय करतो हे तिने कोणालाच सांगितले नाही.

इतर दिवशी ती विविध थरांतल्या गरजू लोकांना घरी भेटे. त्यांतले कित्येक जण तिच्याकडे मदतीच्या अपेक्षेने येत. ती भरपूर आणि रुचकर जेवण घेई. त्या वेळी तिच्या पंगतीला तीन-चार पाहुणे असत. जेवणानंतर ती पत्ते खेळे.

रात्री ती विणकाम करू लागे, त्या वेळी तिला वर्तमानपत्रे नाहीतर एखादे पुस्तक मोठ्याने वाचून दाखवले जाई. रात्री बहुधा ती बाहेर पडत नसे. शहरातील अत्यंत प्रतिष्ठित माणसांना भेटायचे असले तरच ती बाहेर पडे.

रोस्तॉफकुटुंब आले त्या वेळी ती जागीच होती. रोस्तॉफमंडळी आणि त्यांचे नोकर बाहेरच्या गारठ्यातून आत शिरू लागले तसा प्रवेशदालनाचा दरवाजा करकर वाजला. मार्या दिमित्र्येवना दिवाणखान्याच्या दारात उभी राहिली. तिचा चष्मा नाकावर सरकत आला होता. डोके किंचित मागे कलते ठेवून ती करारी व रागीट मुद्रेने नवागतांकडे पाहू लागली. त्याच वेळी ती आपल्या नोकरांना पाहुण्यांच्या राहण्याची व्यवस्था कुठे करायची, त्यांचे सामान कुठे ठेवायचे याबाबत काळजीपूर्वक सूचना देत नसती तर तिच्या मुद्रेवरून पाहुणे आल्याने ती रागावलेली आहे आणि कोणत्याही क्षणाला हुसकावून देईल असे वाटले असते.

'हे काउंटचं सामान का? इकडे या बाजूला आण.' ट्रंकांकडे बोट दाखवीत ती म्हणाली. पण तिने कुणाचेच स्वागत केले नाही. 'मुलींनो, ह्या बाजूला डाव्या बाजूला चला. उगाच रेंगाळण्यात काय अर्थ आहे?' मग ती आपल्या दासींना म्हणाली, 'चहादाणी शेगडीवर ठेवा.' धुक्यातून गारठून आलेल्या लालबुंद नताशाच्या फण्याच्या आकाराच्या शिरोवेष्टनाला धरून तिला आपल्याजवळ ओढून घेत मार्या म्हणाली, 'अंगाने बरीच भरली आहे आणि खूपच सुंदर दिसू लागली आहे ही! अगबाई! किती गारठून गेली आहे ही. पटकन आधी अंगावरचा गाऊन उतर बरं,' ती तिच्या हाताचे चुंबन घेण्याच्या बेतात असलेल्या काउंटला ओरडून म्हणाली. 'तुम्ही अगदी गारठून गेला आहात. चहाऐवजी रमच घ्या.' मग ती सोन्याला उद्देशून म्हणाली, 'बॉन्जूर, सोन्युश्का.' बॉन्जूर (ठीक ना?) हा स्वागत करणारा फ्रेंच शब्द वापरून तिने सोन्याबद्दल वाटणारा सूक्ष्म तिरस्कार सुचवला.

सर्वांनी प्रवासातील कपडे उतरले, सामान ठेवले, प्रवासाचा शीण घालवला. चहापानासाठी ती मंडळी उठली तेव्हा मार्या दिमित्र्येवनाने योग्य वेळी चुंबून त्यांचे स्वागत केले.

'तुम्ही आलात आणि माझ्याकडे राहणार आहात म्हणून मला आनंद होत आहे.' मग नताशाकडे अर्थपूर्ण नजर टाकीत ती म्हणाली, 'म्हातारा इथं आला आहे आणि त्याचे

चिरंजीवही लवकरच येणार आहेत. दररोज त्याची वाट पाहताहेत. त्याची जरूर ओळख करून घ्या. याबाबत आपण सावकाश बोलू. आताच घाई नाही.' सोन्यासमोर बोलण्याची आपली इच्छा नाही असे सुचवणारी नजर टाकीत ती म्हणाली. मग काउंटकडे वळून ती म्हणाली, 'आता मला सांगा. उद्या तुम्ही काय करणार आहात? कोणाला बोलावणार आहात? शिन्शिनला बोलावणार आहात काय?' तिने एक बोट दुमडले. 'दुसरी व्यक्ती म्हणजे अश्रु ढाळणारी अॅना मिहालोवना—ती आपल्या मुलासह इथं आलेली आहे. तिचाही मुलगा लग्नाचा आहे. मग उरला बेझुहॉव्ह. तो देखील इथं बायकोबरोबर राहतो आहे. तो तिला टाकून आला होता, पण ती त्याच्या मागून धावत आली. मागच्या बुधवारी तो इथंच जेवायला होता.' मुलींकडे बोट दाखवीत ती म्हणाली, 'मी ह्यांना उद्या चॅपेलला नेईन. नंतर आम्ही ऑबर्ट शामीकडे जाऊ. आता कशाची उणीव भासणार नाही–अशी आशा आहे. माझ्यावरून मते बनवू नका. आताशा बाह्या अशाच असतात. परवा छोटी प्रिन्सेस इरिना व्हॅसिल्येवना माझ्या भेटीला आली होती. तिने तर जणू दोन पिंपच हातात सारली होती. इतकं भयानक दृश्य होतं ते. इथे दररोज नवीन फॅशन निघते.' काउंटला तिने सरळच विचारले, 'तुम्ही खास कोणत्या कामाकरिता आला आहात?'

काउंट उत्तरला, 'सगळ्याच गोष्टी एकदम जुळून आल्या. नवरीचं कापडचोपड घ्यायला हवं. मॉस्कोची इस्टेट आणि घर विकत घ्यायला एकजण तयार आहे त्याला गाठायचं आहे. तू मेहरबानी केलीस तर, मी एक दिवस मार्योन्स्कोकडे जाणार आहे आणि मुलींना तुझ्या ताब्यात देणार आहे.'

'उत्तम, माझ्याकडे त्या सुरक्षित राहतील. मी अगदी मॉर्गिज बँकेसारखी सुरक्षित आहे. आवश्यक आहे तिथं त्यांना घेऊन जाईन, एरव्ही त्यांना दम भरीन नाही तर लाडही करीन.' मार्या दिमित्र्येवना आपल्या थोराड हाताने आपल्या आवडत्या नताशाचा गाल गोंजारीत म्हणाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी मार्या दिमित्र्येवना चॅपेलला गेली. नंतर ती मादाम ऑबर्ट शामीकडे गेली. ऑबर्टबाई मार्या दिमित्र्येवनाला इतकी घाबरत असे की, ती लवकर दुकानातून जावी म्हणून ती नुकसानी पत्करून तिला कपडे विकीत असे. मार्या दिमित्र्येवनाने नववधूचा जवळजवळ सगळा पोषाख खरेदी केला. घरी आल्यावर तिने सर्वांना खोलीबाहेर पिटाळले. फक्त प्रिय नताशाला आपल्या आरामखुर्चीजवळ बसायला सांगितले.

'आता आपल्याला थोड्या गप्पा मारता येतील. तुझं लग्न ठरलं म्हणून मी तुझं अभिनंदन करते. तुला चांगला नवरा मिळाला. मला खूप आनंद झाला. तो एवढा असल्यापासून मी त्याला पाहते आहे.' आपला हात जमिनीपासून तीनेक फूट वर धरून ती बोलली. नताशा आनंदाने लाजली. मार्या पुढे म्हणाली, 'मला त्याच्याप्रमाणे त्याच्या घरची मंडळीही आवडते आणि हे बघ कदाचित तुला ठाऊकही असेल. थोरल्या प्रिन्सचा आपल्या मुलाच्या लग्नाला विरोध होता. तो म्हातारा तसा चक्रम आहे. तसा प्रिन्स आन्द्रे काही लहान बाळ नाही.

बापावाचून त्याचं काही अडत नाही हे खरं. पण बापाच्या मनाविरुद्ध लग्न करून संसार करणं एकंदरीत काही चांगली गोष्ट नाही. संसारात माणसाला शांतता आणि प्रेम पाहिजे. तू हुशार मुलगी आहेस. कसं वागावं हे तुला सांगण्याची गरज नाही. तू अगदी शहाणपणानं आणि प्रेमळपणानं वागायला हवं. मग सगळं ठीक होईल.'

नताशा काही बोलली नाही. मार्या दिमित्र्येवनाला वाटले, ती लाजेमुळे बोलली नाही. पण तसे नव्हते. प्रिन्स आन्द्रेवरील तिच्या प्रीतीशी संबंधित अशा कोणत्याही गोष्टीत कुणी ढवळा-ढवळ करणे तिला आवडत नव्हते. आपली प्रीती मानवी व्यवहारापासून दूर असलेली बाब आहे, कुणालाही तिचे आकलन होणार नाही असे तिला वाटे.

तिची प्रिन्स आन्द्रेखेरीज दुसऱ्या कुणावर प्रीती नव्हती. तोच एक तिला ठाऊक होता. त्याचेही तिच्यावर प्रेम होते. तिला घेऊन जाण्यासाठी तो एक-दोन दिवसांत यायचा होता. तिला आता इतर कशाचीही फिकीर नव्हती.

'मी त्याला खूप दिवस ओळखते आहे, तुझ्या नणंदेला—माशालाही मी ओळखते. नणंदा नेहमी त्रास देणाऱ्या असतात. पण ती माशीलाही दुखावणार नाही. तुला भेटण्याची इच्छा तिनं माझ्याकडे प्रकट केली आहे. तू आपल्या वडिलांबरोबर तिला भेटायला जा. शक्य तितकी चांगली वाग. तिच्याहून तू लहान आहेस. तुझा आन्द्रे येईपर्यंत तुझी तुझ्या नणंदेशी व तुझ्या सासऱ्याशी चांगली ओळख होईल. तोपर्यंत तू त्यांना आवडूही लागशील. गेलीस तर चांगलं होईल, जाशील ना?'

'हो' नताशाने काहीशा नाखुषीने उत्तर दिले.

मार्या दिमित्र्येवनाच्या सल्ल्यानुसार दुसऱ्या दिवशी काउंट इल्या अँड्रीच नताशाला घेऊन प्रिन्स निकोलाय अँड्रीचच्या भेटीला निघाला. काउंटला भेटण्याचा मुळीही उत्साह नव्हता. उलट तो हबकून गेला होता. सैन्यभरतीच्या वेळी थोरल्या प्रिन्सशी झालेली मुलाखत काउंटच्या मनात चांगलीच जिवंत होती. त्याने जेव्हा थोरल्या प्रिन्सला जेवणाचे आमंत्रण दिले तेव्हा उत्तरादाखल अपेक्षित सैनिक पुरवले नाहीत म्हणून थोरल्या प्रिन्सने त्याची चांगली खरड-पट्टी काढली होती. उलट नताशा मात्र उत्तम पोषाख चढवून तयार होती. ती स्वतःशी म्हणत होती, 'त्यांना मी आवडणार नाही असं होणारच नाही. प्रत्येकाला मी आवडते. त्यांना आवडेल ते करायला मी नेहमीच मनाची तयारी केलेली आहे. आन्द्रेचे वडील म्हणून आणि आन्द्रेची बहीण म्हणून त्या त्या व्यक्तींशी मी प्रेमानं वागेन. म्हणजे मी अप्रिय व्हायला कारणच मिळणार नाही.'

उदास वाटणाऱ्या जुन्या घराकडे गाडी वळली आणि प्रवेशमार्गात थांबली.

'चला आता परमेश्वरावर भरवसा!' थोरला काउंट थोडे मनापासून थोडे विनोदाने

म्हणाला. प्रवेशद्वाराशी जात असताना आपले वडील अतिशय अस्वस्थ झाले आहेत हे नताशाला दिसले.

काउंटने भीतभीत हळू आवाजात ' थोरला प्रिन्स आणि प्रिन्सेस घरी आहेत का ? ' म्हणून चौकशी केली. त्यांच्या आगमनाचा पुकारा होताच प्रिन्सच्या नोकरांत काहीशी खळबळ उडालेली दिसली. प्रिन्सकडे जाण्यासाठी निघालेल्या एका नोकराला दुसऱ्या नोकराने मोठ्या दालनात थांबवले आणि दोघेही काहीतरी थोडा वेळ कुजबुजत राहिले, मग दासी धावत दालनात आली. आणि घाईघाईने प्रिन्सेसचे नाव घेत काहीतरी म्हणाली. शेवटी त्रस्त मुद्रा केलेला एक वृद्ध चाकर आला आणि रोस्तॉफमंडळीला म्हणाला, ' थोरले प्रिन्स तुम्हाला भेटणार नाहीत. पण प्रिन्सेसने तुम्हाला वर येण्याची विनंती केली आहे. '

पाहुण्यांना भेटलेली पहिली व्यक्ती होती बूरिअनबाई. लक्षात येईल इतक्या अदबीने झुकून तिने बापलेकींना प्रणाम केला. त्यांना प्रिन्सेसच्या निवासाकडे नेले. भयभीत आणि अस्वस्थ झालेल्या प्रिन्सेसचा चेहरा लालबुंद होता. स्वस्थ आणि प्रेमळ दिसण्याची शिकस्त करीत घाईघाईने पाहुण्यांच्या स्वागतासाठी पुढे झाली.

पहिल्याच दृष्टिक्षेपात प्रिन्सेस मार्याला नताशा आवडली नाही. तिच्या मते नताशाने जादा फॅशन केली होती, तिच्या उल्हसित वृत्तीत आणि आढ्यतेत उथळपणा होता. तिचे सौंदर्य, तारुण्य आणि सौख्य यांबद्दल नकळत वाटणारी असूया, तसेच आपल्या भावाचे तिच्यावर प्रेम असल्याने वाटणारा मत्सर यांमुळे तिला पाहण्याआधीच आपल्या मनात तिच्याबद्दल प्रतिकूल ग्रह निर्माण झालेला आहे याची प्रिन्सेस मार्याला कल्पना नव्हती. नताशाबद्दल वाटणारा द्वेष तिच्या मनातून जराही जात नव्हता. खेरीज ती आपल्या वडिलांच्या वागण्यामुळे अस्वस्थ झाली होती. रोस्तॉफमंडळी आल्याची वर्दी मिळताच त्यांनी ओरडून बजावले होते, ' मला त्या लोकांना भेटण्याची इच्छा मुळीच नाही. पाहिजे असल्यास मार्याने त्यांना भेटावं. कोणत्याही परिस्थितीत त्यांना माझ्या भेटीला पाठवू नका. '

प्रिन्सेस मार्याने रोस्तॉफमंडळींना भेटण्याचे ठरवले. रोस्तॉफमंडळीच्या येण्याने खवळलेले वडील कोणत्या लहरीत काय करतील याची शाश्वती नव्हती. त्यामुळे ती क्षणाक्षणाला जीव मुठीत घेऊन वावरू लागली.

' प्रिन्सेस, मी तुझ्या भेटीसाठी ह्या गायिकेला घेऊन आलो आहे. ' बोजडपणाने झुकून प्रणाम करून असे शब्द उच्चारीत असताना थोरला प्रिन्स तर आत येणार नाही या आशंकेने काउंट आजूबाजूला नजर वळवीत होता. ' तुम्हा दोघींची मैत्री झाली तर मला किती आनंद होईल.. .प्रिन्सना अजून बरं वाटत नाही हे ऐकून फार काळजी वाटली. ' आणखी थोडे फार बोलून तो जाण्यासाठी उठला. म्हणाला, ' प्रिन्सेस तुझी अनुज्ञा असेल तर नताशाला पंधरावीस मिनिटं संगतीत ठेवतो. मी इथून जवळच राहणाऱ्या ॲना सेम्योनॉवनाकडे जातो आहे. तिला न्यायला येतोच मी थोड्या वेळात. ' त्या दोघींना एकमेकींचे मन व्यक्त करायला अधिक स्वातंत्र्य मिळावे म्हणून धूर्तपणे काउंट इल्या अँड्रीचने बेत आखला होता ( त्याने आपल्या

मुलीला नंतर सांगितले. ) तसे करण्यात त्याचा दुसराही उद्देश होता. प्रिन्सची भीती वाटत असल्याने त्याची भेट त्याला टाळायची होती. त्याने हे कारण आपल्या मुलीला सांगितले नाही. पण नताशाला आपल्या वडिलांना वाटणारी धास्ती आणि अस्वस्थता कळून चुकली. तिला खूप यातना झाल्या. तिला वडिलांच्या मनःस्थितीची लाज वाटली आणि लाज वाटली म्हणून स्वतःचाच राग आला. मग ती धिटाईने आव्हान दिल्यागत प्रिन्सेसकडे पाहू लागली. जणू तिला म्हणायचे होते—'मी कुणालाच भीत नाही.' प्रिन्सेस काउंटला म्हणाली, 'ती इथं राहिली तर मला आनंदच वाटेल. तुम्ही आणखी काही वेळ ॲना सेम्यॉनोव्हनाकडे राहिलात तरी चालेल.' काउंट इल्या अंड्रीच मग तेथून निघाला.

प्रिन्सेस मार्याला एकटीलाच नताशाशी बोलायचे होते म्हणून मधून मधून ती बूरिअन-बाईकडे अस्वस्थ होऊन दृष्टिक्षेप टाकीत होती, पण बूरिअनबाई काही तिथून पाय काढीत नव्हती. उलट ती मॉस्कोमधील करमणुकी आणि नाटके असल्या विषयांवर बोलून संभाषण वाढवतच होती. प्रवेशद्वाराशी ताटकळत राहावे लागल्याने, वडील बेचैन झाल्याने आणि स्वागत करताना उपकार करतो आहोत अशा थाटात वागणाऱ्या प्रिन्सेसच्या अस्वाभाविक कृत्रिम थंड शिष्टाचाराने नताशा अपमानित झाली होती. आता सगळ्याच गोष्टी तिला नकोशा झाल्या. तिला प्रिन्सेस मार्या आवडेनाशी झाली. तिला ती अगदी कुरूप, ढोंगी आणि रुक्ष वाटू लागली. ती एकाएकी घुमी झाली, नकळतच तिची वृत्ती बेफिकीर दिसू लागली. त्यामुळे मार्याला तिचा अधिकाधिक तिटकारा वाटू लागला.

कंटाळवाणे आणि अवघडलेले संभाषण पाचएक मिनिटे चालले असेल तोच वेगाने जवळ येणारा चपलांचा आवाज ऐकू आला. प्रिन्सेस मार्याची मुद्रा भयभीत झाली. खोलीचा दरवाज उघडला गेला आणि पांढरी टोपी आणि झगा घातलेला प्रिन्स आत आला.

तो बोलू लागला—'बाईसाहेब—काउंटेस—काउंटेस रोस्टॉफ तुम्हीच आहात ना?—क्षमा करा मला, कृपा करून क्षमा करा—बाईसाहेब मला कल्पना नव्हती—तुम्ही आमच्या भेटीला याल याची कल्पना नव्हती. त्यामुळे मी अशा वेषभूषेत माझ्या मुलीकडे आलो. देवाशपथ कल्पना नव्हती—कृपा करा आणि मला क्षमा करा—देवाशपथ कल्पना मला नव्हती.' इतक्या कृत्रिमतेने तो 'देवाशपथ' शब्दावर जोर देत पुन्हा पुन्हा बोलत होता की मार्या एकदम उठून उभी राहिली आणि तिने जमिनीवर नजर वळवली. तिला नताशाकडे अगर वडिलांकडे बघण्याचा धीर होईना. नताशाने उठून झुकून प्रणाम केला. तिला पुढे काय करावे ते मार्याप्रमाणेच सुचेना. बूरिअनबाईने मात्र प्रेमळ स्मित केले.

'कृपा करून क्षमा करा. कृपा करून क्षमा करा. देवाशपथ मला कल्पना नव्हती.' म्हातारा सारखा पुटपुटत होता. शेवटी नताशाला आपादमस्तक न्याहाळून तो बाहेर पडला.

त्याचा फेरा गेल्यानंतर सगळयांच्या आधी बूरिअनबाई भानावर आली. ती थोरल्या प्रिन्सच्या आजाराबद्दल बोलू लागली. नताशा आणि प्रिन्सेस मार्या काही न बोलता एक-मेकींकडे नजर लावून बसल्या होत्या. त्या जितका काळ त्या तशा अवस्थेत बसल्या तितका

वेळ त्यांच्या मनात परस्परांबद्दल घृणा निर्माण होऊ लागली.

काउंट परत आला तेव्हा नताशा जाण्याची घाई करू लागली. तशा चमत्कारिक अवस्थेत टाकणाऱ्या आणि अर्ध्या तासाच्या सहवासात प्रिन्स आन्द्रेबद्दल एक अक्षरही न बोलणाऱ्या त्या रुक्ष, कोरड्या खत्रूड प्रिन्सेसची तिला अगदी घृणा वाटू लागली. त्या फ्रेंच बाईच्या उपस्थितीत आपण पहिल्यांदा आन्द्रेचा विषय काढायचा नाही असा तिने निश्चय केला होता. त्या अवधीत प्रिन्सेस मार्याला देखील त्याच विचाराचा अत्यंत मनस्ताप होत होता.

नताशाशी काय बोलावे हे तिला ठाऊक होते, पण तिच्या मुखातून शब्द येत नव्हते. बूरिअनबाईच्या उपस्थितीची तिला अडचण वाटत होती आणि का कोण जाणे तिला लग्नाच्या विषयावर बोलायला अवघड वाटत होते.

काउंट खोलीच्या बाहेर गेल्यावर प्रिन्सेस मार्या त्वरेने नताशाजवळ गेली. तिचा हात हातात घेऊन दीर्घ उसासा टाकून म्हणाली, ' क्षणभर थांब, मला तुझ्याशी थोडं बोलायचं आहे. '

प्रिन्सेसकडे पाहताना नताशाची मुद्रा उपरोधिक बनली. मात्र ती तशी का बनली ते तिचे तिलाच सांगता आले नसते.

प्रिन्सेस मार्या म्हणाली, ' गडे, नताली, माझ्या भावाचं आयुष्य तू सुखी करीत आहेस म्हणून मला खूप आनंद वाटतो आहे. माझ्या या बोलण्यावर विश्वास ठेव. ' आपण खोटे बोलत आहोत याची जाणीव होऊन ती थांबली. ती का थांबली ते नताशाला कळून चुकले.

' प्रिन्सेस, त्याबद्दल काही बोलणं योग्य नाही असं मला वाटतं.' वरकरणी प्रतिष्ठेने आणि बेफिकिरीने नताशा म्हणाली. खरे तर आपल्या गळ्यात आवंढा दाटत आहे असे तिला वाटू लागले.

' मी असं काय बोलले, असं काय केलं आहे म्हणून—? ' खोलीच्या बाहेर जाताच ती स्वतःला विचारू लागली.

नताशा कितीतरी वेळ जेवणासाठी बाहेर पडेना. इतरांना तिची खूप वेळ वाट पहावी लागली. ती आपल्या खोलीत बसून लहान मुलासारखी रडत होती. घुसमटत हुंदके देत होती, तिच्याजवळ उभी असलेली सोन्या झुकून तिच्या कपाळाचे चुंबन घेऊ लागली, ती विचारू लागली, ' नताशा, झालं तरी काय ? तू त्यांची पर्वा कशाला करतेस ? नताशा–दिवस असेच राहणार नाहीत.'

' मला त्यांनी किती अपमानास्पद वागणूक दिली याची तुला कल्पना नाही. जणू मी त्यांच्याकडे—'

' नताशा, विसरून जा ते सारं. त्याबद्दल काही बोलू नकोस. त्यात तुझा काही अपराध नाही. मग तू का म्हणून पर्वा करतेस ? नताशा माझं चुंबन घे ना. ' सोन्या म्हणाली.

नताशाने मान वर करून आपल्या मैत्रिणीच्या ओठांवर ओठ ठेवले. मग आपला अश्रूंनी भिजलेला चेहरा तिच्या चेहऱ्यावर दाबला.

' मला काही सांगता येत नाही. अपराध कुणाचाच नसेल. देवा! देवा! आन्द्रेला यायची बुद्धी का होत नाही?'

त्या रात्री रोस्तॉफमंडळी ऑपेराला गेली. मार्या दिमित्र्येवनाने त्यांच्यासाठी बॉक्सची तिकिटे मिळवली होती.

नताशाला जाण्याची इच्छा नव्हती, परंतु मार्या दिमित्र्येवनाने खास तिच्यासाठी मोठ्या आपुलकीने कार्यक्रम आखलेला होता. त्यामुळे तिला नाही म्हणता येईना. पोषाख करून वडिलांची वाट बघत ती बसली असताना तिने आरशात आपले रूप पाहिले. आपण खूपच सुंदर दिसत आहोत हे तिला जाणवले.

रोस्तॉफमंडळीची गाडी इतर गाड्यांच्या रांगेतून जाऊ लागली; बर्फावरून हळूहळू जाणाऱ्या चाकांचा संथ करकर आवाज होत होता. गाडी थिएटरजवळ आली. तशी नताशा व सोन्या यांनी आपापले पोशाख सावरीत घाईघाईने गाडीतून उड्या मारल्या. चाकराने काउंटला उतरायला मदत केली. तिघेही आत जाणाऱ्या प्रेक्षकांतून आणि कार्यक्रमपत्रिका विकणाऱ्या लोकांतून वाट काढीत कॉरिडॉरमधून आपल्या जागेकडे जाऊ लागले. बंद दारातून त्यांना अगोदरच सुरू झालेले संगीत ऐकू येऊ लागले.

' नताशा तुझे केस...' सोन्या कुजबुजली. बॉक्सच्या दारावरील नोकर आदराने पुढे झाला आणि त्याने दरवाजा उघडला. दाराशी आल्यावर संगीत अधिक स्पष्टपणे ऐकू येऊ लागले. त्यांना प्रकाशात उजळून निघालेल्या बॉक्सच्या रांगा दिसल्या. त्यांतील स्त्रियांचे अनावृत हात आणि खांदे दिसले. खाली स्टॉलमध्ये युनिफॉर्म घातलेले प्रेक्षक आनंदात होते, गडबड करीत होते. जवळच्या बॉक्समध्ये शिरणाऱ्या एका बाईने नताशाकडे पाहिले, तिच्या दृष्टीत स्त्रीसुलभ हेवा होता. अजून पडदा वर गेला नव्हता. प्रारंभीचे संगीत सुरू होते. आपला स्कर्ट सारखा करीत नताशा सोन्याबरोबर आत शिरली आणि समोरील उजळून निघालेल्या बॉक्सच्या रांगा न्याहाळीत बसली. शेकडो डोळे आपल्या अनावृत स्कंधांवर व हातांवर खिळलेले आहेत ह्याची जाणीव तिला कितीतरी वेळ झाली नाही. ती जेव्हा एकाएकी झाली तेव्हा तिला बरे वाटले आणि ती बेचैनही झाली. त्या अस्वस्थतेबरोबरच तिच्या मनात कैक स्मृती, कैक आशा–आकांक्षा आणि भावना यांची गर्दी उडाली.

विलक्षण सुंदर असणाऱ्या नताशा आणि सोन्या ह्या दोन मुली आणि दीर्घ कालावधीनंतर मॉस्कोमधे दिसणारा काउंट इल्या अँड्रीच यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. नताशाचे लग्न प्रिन्स आन्द्रेशी ठरल्याचे सर्वांच्या थोडे फार कानी आले होते, तेव्हापासून रोस्तॉफमंडळी खेड्यात राहात होती तेही त्यांना ठाऊक होते रशियातील उत्तम आणि अनुरूप स्थळी पडणार असणाऱ्या त्या मुलीकडे सगळेजण कुतूहलाने पाहात होते.

‘ खेड्यात राहिल्यानं तू अधिकच सुंदर दिसू लागली आहेस. ’ प्रत्येकजण तिला सांगत होता. त्या रात्री भावाकुल मनःस्थितीमुळे ती अप्रतिम सुंदर वाटत होती. तिचे काळेभोर डोळे गर्दीवर खिळले होते. ते कुणा एकाला शोधीत नव्हते. कोपराच्या वरपर्यंत उघडे असलेले तिचे नाजूक हात बॉक्सच्या रेशमी कडांवर रेललेले होते. एका हातात तिने कार्यक्रमपत्रिका धरली होती आणि नकळतच ती संगीताच्या तालानुसार मुठीची उघडमिट करीत होती.

‘ ती ॲलेनिना पाहिलीस का ? बरोबर आई आहे वाटतं ’ सोन्या म्हणाली.

‘ बाप रे ! मिहाइल किरिलिच भलताच लठ्ठ झाला आहे. ’

‘ आपल्या ॲना मिहाइलोवनानं कसली टोपी घातली आहे बघ ! ’

‘ त्यांच्याबरोबर कॅरॅगिन मंडळी आहे, जूली आहे, बोरिसही आहे. त्यांचं लग्न ठरल्याचं कोणीही एका क्षणात ओळखील. ’

वडील ज्या दिशेने पाहात होते त्या दिशेने नताशाने पाहिले. तिला जूलीच्या जाडजूड गळ्याभोवती हिऱ्याची माळ दिसली. प्रफुल्लित चेहऱ्याने जूली आपल्या आईच्या शेजारी बसली होती.

तिच्या शेजारी बसलेल्या देखण्या बोरिसचे केस नीट विंचरलेले डोके दिसत होते. त्याने आपला कान जूलीच्या मुखाजवळ नेला होता आणि त्याच्या चेहऱ्यावर स्मित उमटले होते. रोस्तॉफमंडळींकडे पाहात तो आपल्या वाग्दत्त वधूला काहीतरी हसून सांगत होता.

नताशाला ठाऊक असलेले आणि अतिशय आवडणारे वातावरण तिथे बॉक्समधे होते. नताशाने दृष्टी वळवली. सकाळच्या भेटीच्या वेळच्या सगळ्या अपमानास्पद गोष्टी तिला एकाएकी आठवू लागल्या.

‘ आपल्या कुटुंबात माझा प्रवेश नाकारण्याचा त्याला काय अधिकार आहे ? तो आल्या-खेरीज याबाबत काही विचारच करू नये हे बरं !’ ती स्वतःशीच म्हणाली आणि स्टॉलमध्ये बसलेल्या परिचित, अपरिचित प्रेक्षकांच्या चेहऱ्यावरून दृष्टी फिरवू लागली.

स्टॉलच्या समोर अगदी मध्यभागी कठड्याला रेलून पर्शियन पोषाख घातलेला डोलोहॉव्ह उभा होता. त्याचे वाढवलेले कुरळे केस उलटे विंचरलेले होते.

थिएटरातील अगदी मोक्याच्या जागी तो उभा होता. सर्व प्रेक्षकांचे आपण लक्ष वेधून घेत आहोत याची त्याला चांगलीच जाणीव होती. खोलीत एकटाच असल्यागत तो तिथे आरामात उभा होता. मॉस्को शहरातील अत्यंत तल्लख तरुण त्याच्याभोवती जमत होते. तो त्यांच्यातील प्रमुख असल्याचे स्पष्ट दिसून येत होते.

काउंट इल्या अँड्रीचने लाजणाऱ्या सोन्याला हसून कोपरखळी मारली आणि तिचे लक्ष तिच्या पूर्वीच्या चाहत्याकडे वळवले आणि तिला विचारले, ‘ त्याला ओळखलंस का ? ’ शिन्शिनकडे वळून त्याने विचारले, ‘ हा बेटा इथं कुठून टपकला ? मला वाटतं तो कुठं तरी हरवला होता. खरं ना ? ’

शिन्शिनने मान हालवीत म्हटले, ‘ तो हरवला होता हे खरंच आहे. तो कॉकेशसमधे होता.

तिथून त्यानं पलायन केलं. असं म्हणतात की पर्शियामधील सत्तेवर असलेल्या कुणा प्रिन्सचा प्रधान म्हणून तो काम करीत होता. तिथं त्यानं शहाच्या भावाला ठार केलं. मॉस्कोच्या सगळ्या स्त्रिया त्याच्यासाठी वेड्या होताहेत. ' पार्शियाचा डोलोहॉव्ह ' या शब्दातच तशी जादू आहे. आताशा डोलोहॉव्हखेरीज कोणतंही कार्य होत नसतं. सगळेजण त्याचा आदरसत्कार करताहेत, स्टर्जन माशाला पाहण्यासाठी आमंत्रण द्यावं त्याप्रमाणं त्याला भेटण्यासाठी लोकांना बोलावलं जात आहे. ' डोलोहॉव्ह आणि अनातोल कुरॅगिन यांनी, इथल्या बायकांची अंतःकरणं झपाटून टाकली आहेत. '

जवळच्या बॉक्समध्ये एक उंचेली, सुंदर स्त्री शिरली. तिला विपुल केस होते. तिच्या गळ्यात मोत्यांची दुपदरी माळ होती. ती बॉक्समधे कितीतरी वेळ नीटनेटकी बसत होती आणि त्या काळात तिचा जाड रेशमी झगा सारखा सळसळत होता.

ती स्त्री होती पीएरची पत्नी काउंटेस बेझुहॉव्ह. वरिष्ठ समाजातील सर्वांनाच ओळखणारा काउंट तिच्याकडे झुकला, ' तुला इथं येऊन फार दिवस झाले नाहीत ना ? ' तो बोलू लागला. तुझ्या हाताचं चुंबन घ्यायला मी हा आलोच. मी काही कामासाठी शहरात आलो होतो. माझ्या मुलींनाही बरोबर आणलं आहे. त्यांच्या मते सेम्यॉनॉवनाचा अभिनय अप्रतिम आहे. '

त्या वेळी त्यांना प्रारंभगीताचे शेवटचे सूर ऐकू आले. संगीतदिग्दर्शकाने काठीने टकटक केल्याचे ऐकू आले. उशिरा आलेल्या प्रेक्षकांनी घाईघाईने आपल्या जागा घेतल्या आणि पडदा वर गेला.

खेड्यात वाढलेल्या आणि आता गंभीर झालेल्या नताशाला तो सगळा प्रकार अतिशय वेगळा आणि हास्यास्पद वाटला. तिला ऑपेरा काही कळेना, संगीत ऐकवेना. समोरचे रंगवलेले कार्डबोर्ड आणि प्रखर प्रकाशात वडबडणारे, गाणारे आणि चमत्कारिक तऱ्हेने वावरणारे चित्र-विचित्र पोषाखातील स्त्रीपुरुष एवढ्याच गोष्टी काय त्या तिला समोर दिसत होत्या. त्यातून त्यांना काय दाखवायचे आहे याची तिला कल्पना आली होती, पण ते सारे इतके हास्यास्पद, खोटे आणि अस्वाभाविक होते की, तिला ते नट पाहून कधी शरम वाटत होती तर कधी तिची करमणूक होत होती. तिने भोवतालच्या प्रेक्षकांचे चेहरे न्याहाळले. त्यांच्याही चेहऱ्यावर तिच्याप्रमाणेच उपरोध आणि गोंधळ दिसत होता.

सर्वांची दृष्टी स्टेजवर खिळलेली होती. त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद नताशाच्या मते दिखाऊ होता. ' मला वाटते तो असाच असला पाहिजे असे मानत असतील, ' ती आलटूनपालटून स्टॉलमधील प्रेक्षकांकडे व बॉक्समधे बसलेल्या प्रेक्षकांकडे पाहू लागली. स्टॉलमधील प्रेक्षकांची पोमेड चोपडलेली डोकी दिसत होती. बॉक्समधे तर जवळजवळ वस्त्र-विहीन स्त्रिया दिसत होत्या. तिच्या शेजारीच बसलेल्या एलनच्या अंगावर तर कपडेच नसावेत.

ती स्टेजवर टक लावून शांत सौम्य स्मित करीत बसली होती. नाट्यगृह भरून टाकलेल्या प्रखर प्रकाशात आणि गर्दीमुळे निर्माण झालेल्या उबदार हवेत ती आरामशीर बसली होती. नताशाला हलके हलके धुंदी चढू लागली. आपला हुद्दा काय आहे, आपण कुठं आहोत, आपल्यासमोर काय चाललं आहे या गोष्टींची जाणीवच ती हरवून बसली होती. ती टक लावून पाहात होती आणि स्वप्नात शिरत होती. अनपेक्षितपणे तिच्या मनात चित्रविचित्र असंबद्ध कल्पना चमकून जाऊ लागल्या. फूटलाइटवरून उडी मारून स्टेजवर जाऊन त्या गायिके-प्रमाणे लकेर घ्यावी असे एका क्षणात तिला वाटले. जवळ बसलेल्या माणसाच्या गळ्यात आपला पंखा अडकवून ठेवावा असे दुसऱ्या क्षणी वाटले. जवळच्या बॉक्समधे बसलेल्या एलनला गुदगुल्या कराव्या असेही एकदा वाटू लागले.

गाणे सुरू होण्याआधी काही वेळ स्टेजवर स्तब्धता पसरली. अशा वेळी रोस्तॉफमंडळीच्या बॉक्सलगतचा स्टॉलचा दरवाजा आवाज करीत उघडला आणि कुणाच्या तरी पावलांचा आवाज ऐकू येऊ लागला 'कुरॅगिन आला.' शिन्शिन कुजबुजली. काउन्टेस बेझुहॉव्हने स्मित करून नवागताचे स्वागत केले. नताशाने काउन्टेस बेझुहॉव्हच्या डोळ्यांच्या रोखाने पाहिले. तिला एक अत्यंत देखणा ॲडज्युटंट त्यांच्या बॉक्सच्या दिशेने येताना दिसला. त्याचा आविर्भाव आत्मविश्वासपूर्ण पण सौजन्यशील होता. तो तरुण अनातोल कुरॅगिन होता. त्याला तिने खूप दिवसांपूर्वी पाहिले होते. पीटर्सबर्ग येथील नाचसमारंभात तो दिसला होता. आता त्याने ॲडज्युटंटचा गणवेष चढवला होता. त्याच्या खांद्यावर गोंडेदार झुबका आणि फीत होती. तो अतिशय देखणा होता आणि त्याच्या सुंदर मुद्रेवर भाबडे समाधान आणि उत्साह प्रतिबिंबित होत होता म्हणूनच की काय त्याची ऐटदार चाल हास्यास्पद वाटत नव्हती. कार्यक्रम चाललेला होता तरीही तो कॉरिडॉरमधल्या सतरंजीवरून घाई न करता संथपणे चालला होता. चालताना त्याने सुगंधित तेल लावलेले डोके ताठ ठेवले होते. चालताना त्याच्या तलवारीचा व बुटांचा आवाज ऐकू येत होता.

नताशाकडे नजर टाकीत तो आपल्या बहिणीच्याजवळ गेला. घट्ट मोजा घातलेला आपला हात त्याने बहिणीच्या बॉक्सच्या कडेवर ठेवला, तिच्याकडे पाहून त्याने मान हालवली. नताशा-कडे नजर लावून तिच्याकडे झुकून त्याने तिला काहीतरी विचारले.

'भलतीच आकर्षक आहे!' तो नताशाबद्दल बोलत होता यात संशय नव्हता. नताशाला त्याचे शब्द ऐकू आले नाहीत पण त्याच्या ओठांच्या हालचालीवरून तो काय बोलत असेल याची तिला कल्पना आली. मग तो पहिल्या रांगेत जाऊन डोलोहॉव्हजवळ बसला. ज्या डोलोहॉव्हशी इतर माणसे मोठ्या अदबीने वागत त्याला त्याने प्रेमाने आणि बेफिकिरीने कोपराने ढोसले. प्रसन्न स्मित करीत त्याच्याकडे पाहात डोळे मिचकावीत तो रेलून बसला.

'भाऊ कसा थेट बहिणीसारखा दिसतो. दोघेही भावंडे किती देखणी आहेत!' काउंट उद्गारला.

शिन्शिन हळू आवाजात काउंटला कुरॅगिनच्या मॉस्कोतील कारस्थानांची गोष्ट सांगू लागला. कुरॅगिनने ' भलतीच आकर्षक ' असे उद्गार उद्देशून काढलेले होते म्हणून केवळ नताशा त्या गोष्टीकडे कान देऊ लागली.

पहिला अंक संपला तशी स्टॉलमधील प्रत्येक व्यक्ती उठली, जागा बदलू लागली. त्यांची जा-ये ये-जा सुरू झाली.

बोरिस रोस्तॉफमंडळीच्या बॉक्सकडे आला. त्यांनी केलेले अभिनंदन त्याने साधेपणाने स्वीकारले, शून्यमनस्क बोरिसने भिवया उचलून स्मित करीत नताशा आणि सोन्या यांना आपल्या लग्नाला हजर राहण्याची विनंती आपल्या वाग्दत्त वधूच्या वतीने केली आणि तो निघून गेला.

एलनच्या बॉक्समधे आता सुविख्यात आणि बुद्धिमान माणसांची गर्दी झाली. प्रत्येकजण आपण एलनला ओळखतो हे दाखवण्याची शिकस्त करीत होता.

मध्यंतराच्या सबंध काळात अनातोल कुरॅगिन डोलोहाव्हबरोबर फूटलाइटच्या समोर उभा राहून रोस्तॉफमंडळीच्या बॉक्सवर डोळे लावून होता. तो आपल्याबद्दल बोलत आहे हे नताशाने ओळखले आणि त्या विचाराने ती सुखावली. आपण एका बाजूने जास्त सुंदर दिसतो असे तिला वाटे. म्हणून अशा तऱ्हेने त्याच्या दृष्टीस पडण्यासाठी ती वळून उभी राहिली. दुसरा अंक सुरू होण्याआधी तिला स्टॉलमधे पीएरची मूर्ती दिसली. थिएटरात आल्यापासून रोस्तॉफ मंडळीने त्याला अद्याप पाहिले नव्हते. त्याचा चेहरा उदास दिसत होता. कुणाकडेही लक्ष न देता पीएर पहिल्या रांगेकडे जाऊ लागला. अनातोल त्याच्याजवळ गेला आणि रोस्तॉफमंडळीकडे नजर टाकून आणि हात करून तो त्याला काहीतरी म्हणाला. पीएरला नताशा दिसताच आनंद झाला. तो घाईघाईने स्टॉलच्या रांगांतून त्यांच्या बॉक्स-कडे जायला निघाला. कोपरावर रेलून कितीतरी काळ नताशाशी त्याने हसून गप्पागोष्टी केल्या. पीएरशी बोलत असताना नताशाला कुणीतरी पुरुष काउंटेस बेझुहॉव्हच्या बॉक्समधे बोलत असल्याचे ऐकू आले. तो कुरॅगिन असला पाहिजे असे तिचे मन सांगू लागले. तिने वळून पाहिले तेव्हा त्याची आणि तिची दृष्टिभेट झाली. त्याने सरळ तिच्या नजरेला नजर भिडवली. जवळजवळ स्मित केले आणि उत्कट प्रेमाने आणि आदराने पाहिले.

तो आपल्याकडे पाहात असूनही आपल्याबद्दल प्रेमादर दाखवत असूनही आपला त्याच्याशी परिचय नसावा हे तिला विचित्र वाटू लागले.

दुसरा अंक चालू असताना नताशा ज्या ज्या वेळी स्टॉलकडे पाही त्या त्या वेळी खुर्चीच्या पाठीवर हात टाकून आपल्याकडे सारखा पाहात राहिलेला अनातोल कुरॅगिन तिच्या दृष्टीस पडे. आपल्यामुळे तो वेडावून गेला आहे हे पाहून तिला खूप बरे वाटले. असे करण्यात काही गैर आहे हा विचारही तिला चाटून गेला नाही.

दुसरा अंक झाला तशी काउंटेस बेझुहॉव्ह उठली. तिने रोस्तॉफमंडळींच्या बॉक्सकडे वळून पाहिले. मोजे घातलेल्या हाताने तिने थोरल्या काउंटला आपल्याकडे येण्याची खूण

केली. भोवताली जमू लागणाऱ्या पुरुषांकडे दुर्लक्ष करून ती गोड स्मित करीत थोरल्या काउंटशी बोलू लागली. ' तुमच्या सुंदर मुलीशी माझी ओळख करून द्या ना. सगळं शहर त्यांना नावाजतं आहे आणि मी मात्र त्यांना ओळखत नाही ! '

नताशाने उठून त्या भारदस्त काउंटेसला झुकून प्रणाम केला. ह्या हुशार आणि सुंदर स्त्रीने केलेल्या स्तुतीने ती खूप आनंदित झाली आणि खूप लाजली.

' मला स्वतःला मॉस्कोमधे राहायला आवडतं. अशी सुंदर रत्नं तुम्ही खेड्यात दडवून ठेवता ही लाजिरवाणी गोष्ट आहे. ' एलन म्हणाली.

काउंटेस बेझुहॉव्हची आकर्षक स्त्री म्हणून ख्याती होती ती अनाठायी मुळीच नव्हती. ती मनाला पटलेले नसताही खास करून स्तुतीने भरलेले उद्‌गार अत्यंत साधेपणाने आणि स्वाभाविकपणे काढायची.

' काउंट, तुम्ही इथं फार दिवस नसणार. आणि मीही इथं जास्त दिवस नसेन. तरीही मला तुमच्या मुलींचं आतिथ्य करायला मदत करा. मी त्यांची करमणूक करण्याची माझ्यापरीनं शिकस्त करीन. पीटर्सबर्ग शहरात मी तुमच्याबद्दल बरंच ऐकलं होतं. तुमची ओळख करून घ्यावी असं तेव्हापासून मला वाटत होतं. ' मग नेहमीचेच सुंदर स्मित करीत ती नताशाला म्हणाली, ' मी तुझ्याबद्दल देखील खूप ऐकलं आहे. ' प्रिन्स आन्द्रेचे आणि तिचे संबंध काय आहेत हे आपल्याला ठाऊक आहे हे सुचवण्यासाठी ती विशिष्ट शब्दावर जोर देत म्हणाली. नंतर ती म्हणाली, ' तुमच्यापैकी एकजण उरलेला कार्यक्रम बघण्यासाठी माझ्या बॉक्समधे येईल का ? म्हणजे आपली अधिक चांगली ओळख होईल.' नताशाने तिच्याबरोबर बसण्याचे मान्य केले आणि ती तिच्याबरोबर बॉक्समधे बसली.

मध्यान्तराच्या वेळी दरवाजा उघडला आणि एलनच्या बॉक्समध्ये थंड झुळूक शिरली. अनातोल वाकत आणि कुणाला स्पर्श न करण्याचा प्रयत्न करीत आत आला.

एलनने अस्वस्थपणे नताशाकडून अनातोलकडे नजर वळवीत म्हटले, ' माझ्या भावाची ओळख करून देते. ' त्या देखण्या ॲडज्युटंटकडे पाहात अनावृत स्कंधाच्या नताशाने स्मित केले. नताशाच्या शेजारी बसून तो म्हणाला, ' नॅरिश्किनच्या नाचसमारंभाच्या वेळी तुम्हाला मी प्रथम पाहिलं. ती गोड स्मृती अजूनही आहे. तेव्हापासून तुम्हाला भेटण्याचं भाग्य मिळावं अशी इच्छा बाळगून होतो. ' पुरुषाच्या सहवासापेक्षा स्त्रियांच्या सहवासात कुरॅगिन अधिक सावधपूर्वक आणि मोकळेपणाने वागत असे. नताशाने तशा त्याच्याबद्दल खूप गोष्टी ऐकल्या होत्या. आता तो भाबडेपणाने आणि धिटाइने बोलत होता ते पाहून त्याच्याबद्दल तिचे मत अनुकूल झाले. तिला त्याचा वचक वाटला नाही. त्याच्या मुद्रेवरील निरागस, आणि प्रसन्न स्मित पाहून ती भारावून गेली.

कुरागिनने तिला विचारले, 'तुला कार्यक्रम कसा काय वाटला? शेवटच्या कार्यक्रमाच्या वेळी काम करीत असताना सेम्योनावना खाली पडली हे कळलं का तुम्हाला?'

ती आपली जुनी मैत्रीण असल्यागत तिला वागवीत तो एकदम म्हणाला, 'काउंटेस, तुला माहीत असेल. आम्ही एक नाचसमारंभ योजिला आहे. त्या वेळी ऐतिहासिक वेषभूषा करायची आहे. तू त्यात भाग घ्यायला हवा. फार मजा येईल. सगळेजण कॅरगिनच्या घरी जमणार आहेत. तू येशील ना? अवश्य ये.' असे बोलत असताना त्याची हसरी नजर सारखी नताशाच्या चेहरा, गळा आणि उघडे खांदे यांवरून फिरत होती. तो आपल्यावर लुब्ध झाला आहे याची नताशाला खात्री झाली. ती सुखावून गेली तरीही त्याच्या सान्निध्यात का कोण जाणे तिच्या मनावर कसले तरी दडपण आले. जेव्हा ती त्याच्याकडे पाहात नव्हती त्या वेळी तिला तो आपल्या खांद्यावर नजर लावून बसला आहे असे वाटत होते. त्याने आपल्या चेहऱ्याकडेच पाहावे ह्या उद्देशाने त्याची नजर पकडल्याशिवाय तिला राहवत नव्हते. जेव्हा त्याच्या नजरेला तिची नजर भिडली तेव्हा जी नवी जाणीव झाली तिच्यामुळे ती भयभीत झाली. आजपर्यंत इतर पुरुषांत आणि तिच्यात एक शालीन अंतर असे आणि त्याची तिला नेहमीच जाणीव असायची. पण ह्या अंतराची भिंत अनातोल आणि ती यांच्यामध्ये उरलीच नव्हती. हे जाणवताच ती भयभीत झाली. पाच मिनिटांतच कसे कोण जाणे पण तिला वाटू लागले ह्या इसमाच्या भयंकर जवळ आपण आलो आहोत. जेव्हा ती वळली तेव्हा तिला धास्ती पडली न जाणो कदाचित तो मागून येईल आणि आपले उघडे हात धरून चुंबन घेईल. ती दोघे अगदी साध्या सामान्य गोष्टींबद्दल बोलत होती. आजवर कोणत्याही पुरुषाच्या जवळ गेलो नव्हतो तितके आपण ह्या पुरुषाच्याजवळ येत आहोत याची तिला जाणीव होऊ लागली. नताशा वळून एलनकडे आणि आपल्या वडिलांकडे पाहात होती. जणू तिला या साऱ्यांचा अर्थ काय असे विचारायचे होते. एलन कुणा जनरलशी गप्पा करण्यात गढली होती. तिचे नताशाच्या नजरेकडे लक्षच नव्हते. तिच्या वडिलांची नजर नेहमीप्रमाणेच सांगत होती 'आनंदात आहेस ना? छान! त्यात मला आनंद आहे.'

काही क्षण चमत्कारिक शांततेत गेले. त्या काळात अनातोल शांतपणे टक लावून नताशाकडे पाहात होता. शांततेचा भंग करावा म्हणून अनातोलने नताशाला विचारले, 'तुला मॉस्को शहर आवडलं का नाही?' नताशाने उलट त्याला हाच प्रश्न केला आणि तिची तिलाच मग लाज वाटली. आपण त्याच्याशी संभाषण करतो आहोत ते गैर आहे असे तिला सारखे वाटत होते. तिला जणू उत्तेजन देण्यासाठी अनातोल स्मित करीत होता.

तिच्याकडे साभिप्राय दृष्टी टाकीत अनातोल म्हणाला, 'पहिल्याप्रथम मला मॉस्को शहर बिलकुल आवडलं नाही. शहर कोणत्या गोष्टीमुळे आवडतं ठाऊक आहे का? शहरात सुंदर स्त्रिया असल्या तर ते आवडतं. आता मात्र मला ते भलतंच आवडू लागलं आहे.' त्याने तिच्याकडे अर्थपूर्ण दृष्टी टाकीत म्हटले, 'काउंटेस, तू नाचसमारंभाला येणार का? अवश्य ये.' असे म्हणत त्याने तिच्या पुष्पगुच्छाला स्पर्श केला आणि हळू आवाजात म्हटले, 'तू

तिथं सर्वांत सुंदर स्त्री असशील, तू अवश्य ये. वचन म्हणून मला यातील एक फूल दे.'

तो काय बोलत होता हे नताशाला समजले नाही. त्यालाही समजले नाही. पण या न कळलेल्या शब्दांमागे काहीतरी अनुचित हेतू असावा असे तिला वाटले. त्याला काय उत्तर द्यावे हे तिला सुचेना. ती तशीच वळली. जणू तिने त्याचे शब्द ऐकलेच नव्हते. ती वळली खरी पण तो आपल्या मागे अगदी जवळ आला आहे याची तिला जाणीव झाली.

त्याला आता काय वाटत असेल ? तो गोंधळला आहे का ? रागावला असेल का ? मी त्याला समजावले पाहिजे का ? तिला काय करावे कळेना. मागे वळून पाहिल्याशिवाय तिला राहवेना. तिने सरळ त्याच्या डोळ्यांत पाहिले. त्याचे सान्निध्य, त्याचा आत्मविश्वास आणि त्याचे प्रांजळ प्रेमळ स्मित यांमुळे ती पुरती जिंकली गेली. त्याच्या डोळ्यांत थेट पाहात ती अगदी त्याच्यासारखीच हसली. आता आपल्या दोघांत कसली भिंत उरली नाही ही जाणीव होऊन ती धास्तावून गेली.

पुन्हा पडदा वर गेला. अनातोल प्रसन्न मनाने बॉक्समधून बाहेर पडला. नताशा परत वडिलांच्या बॉक्समधे शिरली. आता एका नव्या जगाची मोहिनी तिच्यावर पडली होती. आतापर्यंत घडलेले सारे तिच्या दृष्टीने सर्वस्वी स्वाभाविक होते. उलट आपला नियोजित वर, प्रिन्सेस मार्या आणि खेड्यातील जीवन यांबद्दलचे विचार जणू दीर्घकाळापूर्वी घडलेल्या घटना होत्या. त्या तिला एकदाही आठवेनाशा झाल्या. थिएटरच्या बाहेर सर्वजण पडल्यावर अनातोल त्यांच्याकडे आला. त्याने त्यांची गाडी बोलावून घेतली आणि त्यांना गाडीत चढताना हात दिला. नताशाला चढायला मदत करताना त्याने तिचा दंड दाबला तशी नताशा लाजली. तिच्या मनात भावनांचा कल्लोळ माजला. तिने वळून त्याच्याकडे पाहिले तशी तोही तिच्याकडे प्रेमळ स्मित करीत, पाहात राहिला. त्याचे डोळे कसल्याशा अनामिक भावाने उजळत होते.

नताशा घरी पोचली तेव्हा कुठे तिला घडल्या प्रसंगाची स्पष्ट कल्पना आली. एकाएकी प्रिन्स आन्द्रेची आठवण येताच ती भयभीत झाली.

ह्या साऱ्यांचा अर्थ तरी काय ? त्याच्याबद्दल मला कसली भीती वाटते आहे ? माझ्या विवेकबुद्धीला आता टोचणी लागली आहे ती का म्हणून ?

मी काही केलेलं नाही. त्याचा गैरसमज व्हावा, त्याचा वाईट ग्रह व्हावा असं मी काहीही केलेलं नाही. कुणाला त्याबद्दल कधीच काही कळणार नाही आणि मीही त्याला परत कधी भेटणार नाही.

तरीही तिच्या अंतर्यामात तिला कुणी तरी बजावीत होते–प्रिन्स आन्द्रेवर असलेली तिची प्रीती आता विशुद्ध राहिलेली नाही. ती आता कल्पनेने पुन्हा कुरॅगिनशी झालेले सगळे संभाषण आठवू लागली. त्याने तिचा दंड दाबला होता तेव्हाची त्या देखण्या, धाडसी अनातोलची बदललेली मुद्रा, त्याचे प्रेमळ स्मित आणि त्याचे हावभाव तिच्या डोळ्यांसमोर पुन्हा साकार होऊ लागले.

अनातोल कुरॅगिन पीटर्सबर्गला वर्षाला वीस हजार रूबलांहून अधिक रक्कम खर्च करीत होता, तेवढीच किंवा त्याहूनही अधिक उधारी वाढवत होता. त्याचे सावकार त्याच्या वडिलांकडे पैशासाठी तगादा लावू लागले. तेव्हा अनातोलच्या वडिलांनी त्याला पीटर्सबर्गहून मॉस्कोला पाठवले. तेव्हापासून तो मॉस्कोत राहू लागला. त्याच्या वडिलांनी त्याला सांगितले, ' तुझं अर्धं कर्ज मी फेडीन. पण हे शेवटचंच. तू मॉस्कोला जाऊन राहात असशील तरच ती कर्जफेड करीन. त्या ठिकाणी कमांडर-इन-चीफच्या ॲडज्युटंट म्हणून तुझी नेमणूक व्हावी यासाठी मी खटपट केली आहे. तिथं एखादं चांगलं स्थळ मिळतं का पाहा. प्रिन्सेस मार्या किंवा जूली कॅरागिन यांपैकी कुणाशीही लग्न जमते का पाहा. '

वडिलांना होकार देऊन अनातोल मॉस्कोला आला, आणि पीएरबरोबर राहू लागला. प्रारंभी तरी त्याच्या आगमनाने पीएरला आनंद झाला नाही, पण काही दिवसांनी पीएरला त्याच्या सहवासाचा सराव झाला. पीएर कधी कधी त्याच्याबरोबर मद्यपानाच्या बैठकींना जाऊ लागला, कधी कधी त्याला कर्जाऊ रक्कम देऊ लागला.

शिन्शिन म्हणाला होता ते खरे होते. अनातोलने मॉस्कोतील सगळ्या स्त्रियांची अंतःकरणे जिंकली होती–त्यांच्याशी बेपर्वाईने वागूनही जिंकली होती. तो उघडपणे जिप्सी मुलींना आणि नट्यांना अधिक पसंत करीत होता. त्यातील मादाम जॉर्ज या प्रमुख बाईशी त्याचे लफडे असल्याची बोलवा होती. डॅनिलॉव्हच्या घरची कोणतीही मद्यपान बैठक त्याने चुकवली नाही, मॉस्कोमधील कोणत्याही समारंभाला तो गैरहजर राहिला नाही. वरिष्ठ समारंभाच्या प्रत्येक नाचसमारंभास नाहीतर रात्रीच्या उत्सवास तो हजर राही. रात्ररात्र मद्यपान करी आणि सर्वांना मद्यपानात मागे टाकी. मॉस्कोमधील अनेक स्त्रियांबरोबर त्याच्या भानगडी असल्याच्या अफवा होत्या. नाचसमारंभाला आल्यावर अनेकींशी त्याच्या प्रणयचेष्टा चालत. मात्र अविवाहित स्त्रियांशी–विशेषतः श्रीमंतीचा वारसा असणाऱ्या आणि साधारण रूपाच्या अविवाहित स्त्रियांशी वागताना तो बुजत असे.

त्याला तसेच सबळ कारण होते आणि ते त्याच्या अत्यंत निकट मित्रांखेरीज इतरांना ठाऊक नव्हते—दोन वर्षांपूर्वीच त्याचे लग्न झाले होते. दोन वर्षांपूर्वी त्याच्या रेजिमेंटचा मुक्काम पोलंडमधे असताना साधारण स्थितीतील एका जमीनदाराने अनातोलला आपल्या मुलीशी लग्न करायला भाग पाडले होते.

त्यानंतर थोड्याच दिवसांत अनातोलने आपल्या पत्नीचा त्याग केला होता. त्याने पैसे देऊ केले, त्यामुळे त्याच्या सासऱ्याने त्याचे लग्न झाले होते असे जाहीर न करण्याचे आश्वासन दिले.

आपले समाजातील स्थान, इतर माणसे आणि स्वतः आपण या सर्वांवर अनातोल निहायत

खूष होता. आपण ज्या तऱ्हेने आता जीवन जगत आहोत त्यापेक्षा वेगळे जीवन जगणे आपणास शक्य नाही, आपण कधीही जीवनात क्षुद्र कृत्य केले नाही याची त्याला मनोमन खात्री होती.

त्याच्या ह्या ठाम समजुतीचा प्रभाव इतरांवर पडला होता आणि त्यांनाही त्याच्याप्रमाणेच तो प्रतिष्ठित वाटत होता. त्याने पुन्हा परत न करण्याच्या विचाराने सर्व मार्गांनी पैसे उसने मिळवण्याचा प्रयत्न केला तर त्याला नकार मिळत नसे.

हद्‌पारी आणि पर्शियातील साहसी जीवन यांनंतर डोलोहॉव्ह पुनश्च मॉस्कोत आला होता. तो आपला वेळ चैनीत, जुगारात आणि दुराचरणात घालवू लागला. पीटर्सबर्गमधील आपला जुना सहकारी कुरॅगिन यांच्याशी त्याने पुन्हा दोस्ती जमवली आणि आपल्या उद्दिष्टांसाठी त्याचा तो उपयोग करून घेऊ लागला.

डोलोहॉव्ह हुषार आणि धाडशी होता म्हणून अनातोलला मनापासून आवडू लागला. श्रीमंत तरुणांना जुगार खेळायला आपल्या जाळ्यात ओढण्यासाठी डोलोहॉव्हला अनातोलच्या दर्जाचा, नावाचा आणि ओळखीचा उपयोग होण्यासारखा होता. डोलोहॉव्हने अनातोलला कळवू न देता तसा उपयोग करून घेतला आणि तसे करताना त्याला गंमत वाटत असे. डोलोहॉव्हला आपल्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी अनातोलची गरज होतीच. खेरीज दुसऱ्या माणसाच्या इच्छेवर हुकमत गाजवणे डोलोहॉव्हच्या दृष्टीने करमणूक होती, सवय झाली होती आणि गरज बनली होती.

कुरॅगिनवर नताशाचा चांगलाच प्रभाव पडला होता. नाटकाहून परत आल्यावर कुरॅगिनने मोठ्या रसिकतेने डोलोहॉव्हला नताशाचे हात, तिचे खांदे, तिची पावले, तिचे केस यांतील सौंदर्य विशद करून सांगितले आणि तिच्याशी प्रणयचेष्टा सुरू करण्याचा आपला मनोदय त्याच्याकडे जाहीर करून टाकला. अशा प्रणयचेष्टितांचे परिणाम काय होतील याचा विचार करण्याची क्षमता अनातोलमधे नव्हती. आपल्या कोणत्याही कृतीचे परिणाम काय होतील ह्याची कल्पना त्याला कधी करता येत नसे.

'दोस्ता, ती सुंदर आहे हे खरं. पण ती तुझ्यामाझ्यासाठी नाही हे विसरू नकोस!' डोलोहॉव्ह म्हणाला.

'मी माझ्या बहिणीमार्फत तिला जेवणाचं आमंत्रण देतो. कसं?' अनातोलने विचारले.

'तिचं लग्न होईपर्यंत धीर धरशील तर चांगलं होईल.'

'मला लहान पोरी फार आवडतात. तुला सांगायला नकोच. बघता बघता त्या गोंधळून जातात.' अनातोल म्हणाला.

'एका 'लहान पोरी'मुळं तू एकदा चांगलाच संकटात पडला आहेस. म्हणून म्हणतो 'सावध'.' अनातोलच्या लग्नाची माहिती असल्यामुळे डोलोहॉव्हने असे उद्‌गार काढले.

'माणूस काही पुन्हा पुन्हा संकटात पडत नाही. खरं ना?' अनातोलने हसून विचारले.

ग्रंथालय
ग्र/१३३
१
ग्रंथालय.

दुसऱ्या दिवशी रोस्तॉफमंडळी कुठे गेली नाही आणि त्यांच्याकडेही कुणी आले नाही. प्रिन्स आन्द्रे आला की नाही याची चौकशी करण्यासाठी तिने व्हॉस्दिझेङ्का येथे एका इसमाला पाठवले. प्रिन्स आन्द्रे आला नसल्याचे कळले.

प्रिन्स आन्द्रे आता कधीच येणार नाही. नाहीतर तो येण्यापूर्वी आपले काहीतरी बरेवाईट होणार असे तिला सारखे वाटू लागले.

आता ती त्याचा विचार मनात आणू लागली की त्याच्या स्मृतीत थोरला प्रिन्स, प्रिन्सेस मार्या, नाट्यगृह आणि कुरॅगिन यांच्या स्मृती मिसळू लागत. पुन्हा तिच्या डोळ्यांसमोर प्रश्न-चिन्हे उभी राहात. जे झाले त्यात तिचा दोष होता का ? प्रिन्स आन्द्रेशी तिने प्रतारणा केली नव्हती काय ? तिला अगम्य वाटणारी अनिवार वासना तिच्यामध्ये निर्माण कशी करावी हे चांगलेच ठाऊक असलेल्या त्या माणसाच्या मुद्रेवरील प्रत्येक छटा, त्याचे हावभाव आणि त्याचा प्रत्येक शब्द ती तपशीलवार आठवू लागली.

मार्या दिमित्र्येवना हिने उस्पेन्या येथील चर्चमधे होणाऱ्या धार्मिक उत्सवाला हजर राहण्याचे निमंत्रण आपल्या पाहुण्यांना रविवारी सकाळी दिले.

' मला कोणतंही फॅशनेबल चर्च आवडत नाही ' मार्या दिमित्र्येवनाला आपल्या स्वतंत्र विचारशक्तीचा गर्व होता. ' परमेश्वर सर्वत्र तोच असतो. आमच्या चर्चचा धर्मगुरू फार चांगला आहे. तो धार्मिक विधी फार चांगल्या तऱ्हेनं पार पाडतो. काही म्हणून कमी पडून देत नाही. तिथला व्यवस्थापकही चांगला मनुष्य आहे. संगीताचे जलसे झाले म्हणजे अधिक पावित्र्य येतं असं थोडंच आहे ? माझ्या मते असला प्रकार केवळ ऐषआरामासाठी असतो.'

मार्या दिमित्र्येवना गेल्यानंतर चॅल्मीवाईकडून आलेला शिंपी रोस्तॉफकुटुंबाच्या सेवेला हजर झाला. नताशाला ह्या बदलामुळे आनंद झाला. दिवाणखान्यालगतच्या खोलीत जाऊन दार लावून घेऊन ती नवे कपडे बरोबर बसतात का ते पाहू लागली. अद्याप बाह्या न लावलेली धावदोरा घातलेली बॉडीस तिने अंगावर चढवली आणि वळून आरशामधे पाठीची शिवण बघू लागली तोच तिला आपले वडील कुणाशीतरी—आवाजावरून ती दुसरी व्यक्ती स्त्री असल्याचे तिने ताडले—मोठ्या तळमळीने बोलत असल्याचे ऐकू आले आणि ती लाजेने लालबुंद झाली. बोलणारी दुसरी व्यक्ती एलन होती. नताशा अंगाला बरोबर होते का म्हणून पाहण्यासाठी घातलेली बॉडीस काढण्याच्या प्रयत्नात असतानाच काउंटेस बेझुहॉव्ह दार उघडून खोलीत शिरली. तिने रुंद कॉलर असलेला गडद जांभळ्या मलमलीचा गाउन घातला होता. तिचा चेहरा प्रेमळ स्मिताने उजळला होता.

' अग जादुगारिणी ! ' ती लाजून चूर झालेल्या नताशाला म्हणाली. आपल्या मागोमाग आलेल्या काउंट इल्या अँड्रीचला ती म्हणाली, ' काउंट, ही फारच मोहक आहे. कल्पना

करता येणार नाही इतकी अलौकिक सुंदर आहे. मॉस्कोत राहून तुम्ही कुठं बाहेर पडत नाही, असं का? मी आता तुम्हाला सोडणारच नाही. आज रात्री आमच्याकडे जॉर्जबाई कविता ऐकवणार आहेत. निवडक मंडळीच जमणार आहेत. जॉर्जबाईहून कितीतरी सुंदर असलेल्या ह्या मुलींना तुम्ही घेऊन आला नाहीत तर आपली ओळख इथंच संपली असं समजा. माझा नवरा इथं नाही. तो त्वेरला गेला आहे. नाहीतर त्यालाच मी तुम्हाला आणायला पाठवलं असतं. काही झालं तरी तुम्ही नऊपर्यंत या.'

शिंपी तिला ओळखत होता. ती आल्यावर तो तिला आदरपूर्वक झुकून प्रणाम करू लागला तशी तिने मान हालवून प्रणामाचा स्वीकार केला. मग ती आरशासमोरील बैठ्या खुर्चीत बसली आणि आपल्याभोवती जांभळ्या गाउनच्या चुण्या पाहून स्वतःलाच सजवू लागली. ती सारखी उत्साहाने आणि आनंदाने बोलत होती. पुन्हा पुन्हा नताशाच्या सौंदर्याची आवर्जून तारीफ करीत राहिली. नताशाच्या पोषाखाची स्तुती करीत राहिली.

नताशाच्या चेहऱ्यावरील स्मित जराही लोपले नव्हते. नताशाला खूप आनंद झाला होता. काउंटेस बेझुहॉव्हच्या स्तुतीमुळे ती मोहरून गेली होती. एका काळी ह्याच काउंटेसकडे जाण्याचा तिला धीर होत नव्हता; जी काउंटेस तिला अतिशय बडी प्रतिष्ठित व्यक्ती वाटत होती, तीच काउंटेस आज मात्र तिच्याशी आस्थेने वागली होती.

अनातोलने तिला नताशाशी आपली गाठ घालून देण्याची विनवणी केली होती. त्या उद्देशाने तर ती रोस्तॉफकुटुंबाच्या घरी आली होती. आपला भाऊ आणि नताशा यांची एकत्र गाठ घालून देण्याच्या कल्पनेनेही तिला गम्मत वाटत होती.

रोस्तॉफकुटुंबाचा निरोप घेताना तिने नताशाला आपल्या एका बाजूस घेतले.

'माझा भाऊ काल माझ्याकडे जेवायला होता. त्याची थट्टा करून आम्ही बेजार झालो. तू त्याच्यावर काय मोहिनी टाकली आहेस कुणास ठाऊक! त्याला जेवण जात नाही. तो सारखा तुझ्यासाठी उसासे टाकीत असतो. पोरी, तुझ्यावर त्याचा भलताच जीव जडला आहे.'

तिचे बोलणे ऐकून नताशा लाजेने लालबुंद झाली. 'काय पण लाजली! तुझ्या रूपासारखंच तुझं लाजणंही सुंदर आहे.' एलन बोलतच राहिली. 'न चुकता ये. तुझं कुणावर तरी प्रेम असेल. पण म्हणून काही मठातील शांत एकाकी जीवन जगण्याची गरज नाही. तुझा वाङ्निश्चय झाला असला म्हणून काय झालं? कंटाळून कंटाळून मरण्याऐवजी समाजात वावरलीस तर अधिक बरं होईल, असं तुझ्या नियोजित वरालाही वाटेल.'

माझा वाङ्निश्चय झाला आहे हे हिला माहीत आहे तर! नताशाला पूर्वी भयानक वाटणारी घटना सरळ साधी व स्वाभाविक वाटू लागली. 'मी जीवनातील गंमत का म्हणून लुटू नये?' एलनकडे डोळे विस्फारून आश्चर्याने पाहत नताशा विचार करू लागली.

काउंट इल्या अँड्रीच आपल्या दोन्ही मुलींना घेऊन काउंटेस बेझुहॉव्हच्या घरी गेला. तिथे बरीच माणसे आलेली होती. पण त्यांतील कुणी नताशाच्या ओळखीचे नव्हते. स्वच्छंदी

वर्तनाबद्दल कुप्रसिद्ध असलेले स्त्रीपुरुष मुख्यतः तिथे जमलेले पाहून काउंट इल्या अँड्रीच नाखूष झाला. दालनाच्या कोपऱ्यात तरुणांच्या कोंडाळ्यात जॉर्जबाई उभी होती. तिथे अनेक फ्रेंच माणसे गोळा झाली होती. त्यात मेटिव्हिए होता. काउंटेस बेझुहॉव्ह मॉस्कोला आल्यापासून तिला नेमाने मेटिव्हिए भेटत असे. काउंट इल्या अँड्रीचने मनाशी निश्चय केला. कुणाबरोबर पत्ते खेळायचे नाहीत, आपल्या मुलींना सोडून बाजूस व्हायचे नाही आणि जॉर्जबाईचा कार्यक्रम संपताच इथून सटकायचे.

अनातोल दाराशी टेपला. तो रोस्तॉफमंडळींना भेटायला आला होता यात शंकाच नव्हती. आल्याबरोबर काउंटला भेटल्यावर तो नताशाकडे गेला आणि तिच्या संगतीत राहू लागला. त्याला पाहताक्षणीच नताशाच्या मनात थिएटरात आलेली भावना उफाळून आली. त्याच्या प्रशंसेने तिचा अहंकार सुखावला. तरीही आपल्या दोघांमधील अनैतिक संबंधाच्या जाणिवेने ती भयभीत झाली.

एलनने नताशाचे मोठ्या आनंदाने स्वागत केले. तिच्या सौंदर्याची आणि तिच्या वेषाची ती इतरांना ऐकू न जाईल अशा आवाजात तारीफ करू लागली. त्यानंतर थोड्याच वेळात वेष बदलण्यासाठी जॉर्जबाई दालनाच्या बाहेर गेली. दिवाणखान्यात खुर्च्या रांगेने मांडण्यात आल्या तशी पाहुणे मंडळी बसू लागली. अनातोलने नताशासमोर खुर्ची सरकवली आणि स्वतः तिच्या शेजारी बसणार होता पण नताशावर लक्ष ठेवून असणाऱ्या काउंटने तिच्या-जवळची खुर्ची पटकावली. त्यामुळे अनातोलला नताशाच्या मागच्या रांगेत बसावे लागले.

गुबगुबीत हातावर खळी उमटलेली, खांद्यावर स्कार्फ गुंडाळलेली जॉर्जबाई खुर्च्यांमधे ठेवलेल्या मोकळ्या जागेत कृत्रिम पवित्रा घेऊन उभी राहिली.

जॉर्जबाईने करारी व उदास नजरेने प्रेक्षकांना न्याहाळून घेतले. ती आईच्या पुत्रावरील वासनेचे वर्णन करणारी फ्रेंच कविता म्हणू लागली.

प्रेक्षकांतून प्रशंसेचे उद्गार निघू लागले. अप्रतिम, अलौकिक, विलक्षण सुंदर ! नताशा त्या स्थूल नटीकडे टक लावून पाहात होती. पण तिला काही ऐकू येत नव्हते, काही दिसत नव्हते, समोर काय चालले आहे हे कळत नव्हते. आपण पुन्हा पुन्हा पूर्वीच्या जगापासून दूर असलेल्या नव्या अनोळखी संज्ञाहीन जगात—जिथे बरे वाईट, शहाणपण मूर्खपण यांतील भान नाहीसे झाले आहे अशा जगात अटळपणे खेचले जात आहोत असे तिला वाटू लागले. याखेरीज अन्य जाणीव उरली नाही. तिच्या मागे अनातोल बसला होता. त्याच्या सान्निध्याची जाणीव झाल्याने कोणत्याही क्षणाला काहीही घडेल अशी धास्ती तिच्या मनात निर्माण झाली.

पहिले स्वगत संपले तशी मंडळी उठली आणि जॉर्जबाईभोवती जमून तिची प्रशंसा करू लागली.

नताशाचे वडील इतरांबरोबर उठले आणि गर्दीतून वाट काढीत त्या नटीकडे जाऊ लागले. त्या वेळी नताशा आपल्या वडिलांना म्हणाली, ‘ जॉर्जबाई अतिशय सुंदर आहे नाही ?’

नताशाच्या मागून येणाऱ्या अनातोलने म्हटले, ' तुझ्याकडे पाहिल्यावर मला तरी तसं वाटत नाही. ' त्याने हे वाक्य अशा क्षणी म्हटले की तिसऱ्या कुणीच ते ऐकले नाही. ' तू किती मोहक आहेस...तुला पहिल्यांदा पाहिलं त्या क्षणापासून मी सारखा...'

तेवढ्यात मागे वळून काउंट आपल्या मुलीला म्हणाला, ' चल, नताशा, चल लवकर. '

काही न बोलता नताशा वडिलांकडे गेली आणि अनातोलकडे चकित नजरेने पाहू लागली.

विविध तऱ्हेने अनेक कविता म्हटल्यावर जॉर्जबाई निघून गेली. काउंटेस बेझुहॉव्हने सर्वांना मोठाल्या दालनात यायची विनंती केली.

एलनने आयत्या वेळी नाचसमारंभ योजला होता. आपला विरस करू नका अशी तिने विनंती केली म्हणून काउंटने तावडतोब तिचा निरोप घेतला नाही. रोस्तॉफमंडळींना मुक्काम करावा लागला. अनातोलने नताशाला वॉल्ट्स करायला बोलावले. वॉल्ट्सच्या वेळी तिची कंबर आणि तिचे हात आवळीत तो तिला म्हणाला, ' तू मला वेड लावलं आहेस. मी तुझ्या प्रेमात पडलो आहे. ' ती पुन्हा त्याच्या बरोबर एकोसेझ नृत्य करू लागली. ती एकटी असताना अनातोल काही न बोलता तिच्याकडे नुसता पाहात राहिला. तशी नताशाला संशय पडला. वॉल्ट्सवेळी तो जे काही बोलला ते आपण स्वप्नात तर ऐकले नाही ? नृत्याच्या पहिला खंड संपता संपता त्याने पुन्हा तिचा हात दाबला. भयभीत झालेल्या नताशाने त्याच्याकडे पाहिले पण त्याच्या प्रेमळ दृष्टीत आणि स्मितात तिला इतके आश्वासन आणि इतकी आपुलकी दिसून आली की तिचे शब्द तोंडातल्या तोंडात विरून गेले. तिने नजर खाली वळवली.

ती भरभर बोलली, ' तुम्ही मला असं काही बोलू नका. माझं लग्न ठरलं आहे. माझं दुसऱ्यावर प्रेम आहे हे विसरू नका.' तिने त्याच्याकडे पाहिले. तिच्या शब्दांनी अनातोल दुखावला गेला नव्हता, अस्वस्थही झाला नव्हता.

' मला काही ऐकायचं नाही. त्याच्याशी माझा संबंध नाही. माझं तुझ्यावर जिवापाड प्रेम आहे एवढंच सांगतो. तू वेड लागेल अशी सुंदर आहेस हा माझाच दोष का ?—आपण माघार घेऊन चालणार नाही—'

उत्कंठित आणि बेचैन झालेली नताशा त्याच्याकडे भयविस्मित डोळे विस्फारून पाहू लागली- नेहमीपेक्षा आता ती अधिक आनंद अनुभवीत असल्याचे दिसत होते. त्या रात्री काय घडले हे तिच्या ध्यानात आलेच नाही. त्या रात्री ती दोघे एकोसेझ नाचली. तिच्या वडिलांनी घरी निघण्याची सूचना केली पण तिने वडिलांना आणखी थोडा वेळ थांबण्याची विनंती केली. ती कुठेही असली आणि कुणाबरोबर असली तरीही त्याचे डोळे तिच्यावर खिळलेले होते. तिला हे सारखे जाणवत होते. नंतर काय झाले तेही तिला आठवले. वडिलांची परवानगी घेऊन ती कपडे नीट करण्यासाठी ड्रेसिंगरूममधे गेली. तिच्यामागून एलन आली आणि ती आपल्या भावाच्या अभिलाषेबद्दल काहीतरी हसून बोलली. बैठकीच्या छोट्या खोलीत पुन्हा अनातोलशी गाठ पडली. काहीतरी निमित्त करून एलन तिथून नाहीशी

झाली आणि ती दोघेच उरली. तिचा हात हातात घेऊन प्रेमळ स्वरात अनातोल म्हणाला, ' मी तुला भेटू शकणार नाही. मी तुला यापुढं कधीच भेटू शकणार नाही का? तुझ्यावर माझं निरतिशय प्रेम आहे. मी कधीच—' तिच्या मार्गात राहून त्याने आपला चेहरा तिच्या चेहऱ्याजवळ नेला.

त्या तरुणाचे विशाल चमकते डोळे तिच्या डोळ्याच्याजवळ इतके आले की तिला त्याच्या डोळ्यांखेरीज दुसरे काही दिसेनासे झाले.

' नताली?' तो कुजबुजला. त्याला काही तरी विचारायचे होते. त्याने तिचे हात दुखेपर्यंत आवळले.

' मला काही कळत नाही. मला काही सांगायचं नाही.' तिचे डोळे म्हणत होते.

त्याने वासनेने पेटलेले ओठ तिच्या ओठांवर दाबले. तिला एलनची पावले आणि तिचा सळसळणारा गाऊन ऐकू आला. नताशाने वळून एलनकडे पाहिले. तिने चकित होऊन प्रश्नार्थक मुद्रेने त्याच्याकडे पाहिले तेव्हा ती लालबुंद झाली होती आणि थरथरत होती. ती दाराच्या दिशेने जाऊ लागली तेव्हा अनातोल म्हणू लागला, ' कृपा करून क्षणभर थांब... एक क्षणभर '. तशी ती थांबली, त्याला काय सांगायचे आहे हे त्याने सांगून टाकावे म्हणजे आपल्याला काय घडले हे समजेल आणि त्यावर काही उपायही सापडेल असे तिला सारखे वाटू लागले.

' नताली...अगदी थोडक्यात सांगतो...' तो आपला पुन्हा पुन्हा बोलतच होता, पण काय बोलावे हे त्याला सुचत नव्हते. एलन त्याच्याकडे येऊन पोचेपर्यंत तो तेचतेच बोलत राहिला.

एलन नताशाबरोबर दिवाणखान्यात आली. रोस्तॉफमंडळीने रात्रीच्या जेवणाला न थांबता त्यांचा निरोप घेतला.

सकाळ झाली आणि दैनंदिन विवंचना आणि धावपळ यांना प्रारंभ झाला. सर्वांच्या हाल-चालींना आणि बोलण्याला सुरुवात झाली. शिंपी पुन्हा येऊन दाखल झाले. मार्या दिमित्र्ये-वनाने बाहेर जाऊन त्यांना चहापानाला बोलावले.

नताशाने रोजच्यासारखी दिसण्याची शिकस्त केली. दुपारच्या जेवणानंतर नताशा एकटीच होती. तेवढ्यात एक दासी पत्र घेऊन आली, ' बाईसाहेब,' ती कुजबुजली. ' त्यांनी हे तुम्हाला द्यायला सांगितलं.' त्या दासीने नताशाला पत्र दिले. ' बाईसाहेब, कृपा करून...' दासीच्या शब्दाकडे नताशाचे लक्ष नव्हते. तिने विचार न करता यांत्रिकतेने पत्राचे सील फोडले आणि अनातोलने पाठवलेले प्रेमपत्र वाचायला सुरुवात केली. त्यातले एक अक्षरही तिला कळले नाही. ते पत्र ज्याचे आपल्यावर प्रेम आहे त्या अनातोलकडून आले आहे एवढाच बोध तिला झाला. ' होय. माझं त्याच्यावर प्रेम आहे. नाहीतर जे घडलं ते कसं घडलं असतं? तिचं प्रेम

नसतं तर त्याच्याकडून प्रेमपत्र कशाला आलं असतं?

तिने थरथरत्या हातात ते उत्कट भावनेने लिहिलेले प्रेमपत्र धरले. खरे तर डोलोहॉव्हने अनातोलला ते पत्र लिहून दिले होते. ती पत्र वाचू लागली तेव्हा तिला वाटू लागले आपल्या भावनांचे पडसादच या पत्रात उमटत आहेत.

'काल रात्री माझे भवितव्य ठरल्यासारखे आहे. तुझे प्रेम मला मिळेल, नाहीतर मला मृत्यू येईल. याखेरीज तिसरा मार्ग माझ्यापुढे नाही' अशी पत्राची सुरुवात होती.

त्याने पुढे लिहिले होते, 'मला ठाऊक आहे तुझे नातेवाईक तुझे लग्न माझ्याशी लावून देणार नाहीत. त्याला अनेक खाजगी कारणे आहेत. तू एकटी भेटलीस तर मी तुला ती सांगेन. तुझे माझ्यावर प्रेम असेल तर नुसता होकार कळव. मग कुठलीही मानवी शक्ती आपल्या सुखाआड येणार नाही. प्रेम सर्वांवर मात करील. तुला घेऊन मी कुठेही दूर दुर्गम ठिकाणी जाऊ शकेन.'

त्याचे पत्र कितीतरी वेळा वाचल्यावर नताशाला त्याच्या प्रत्येक शब्दात गहनगूढ अर्थ प्रतीत होऊ लागला. आणि तिला वाटू लागले :—'माझं खरंच त्याच्यावर प्रेम आहे.'

त्या रात्री मार्या दिमित्र्येवनाने दोन्ही मुलींना आपल्याबरोबर घेऊन अरारॉव्हकुटुंबाकडे जाण्याचे ठरवले. नताशाने डोकेदुखीची सबब सांगितली आणि ती घरीच राहिली.

सोन्या रात्री उशिरा घरी आली आणि नताशाच्या खोलीत शिरली. नताशा रोजचा पोषाख न उतरवताच सोफ्यावर झोपलेली पाहून तिला आश्चर्य वाटले. जवळ टेबलावर अनातोलचे उघडे पत्र होते. ते उचलून सोन्या वाचू लागली.

पत्र वाचून सोन्या झोपी गेलेल्या नताशाच्या मुद्रेवर चेहऱ्यात वाचलेल्या मजकुराचे काही स्पष्टीकरण मिळते का बघू लागली. पण तिला काही बोध झाला नाही. तिची मुद्रा शांत, प्रेमळ, आणि सुखी दिसली.

सोन्या भीतीने पांढरीफटक पडली आणि थरथर कापू लागली. ताण सहन न होऊन ती वैळ्या खुर्चीत बसली व रडू लागली.

'मला हे काहीच कसं कळलं नाही? तिनं इतकी मजल कशी मारली? तिचं प्रिन्स आन्द्रेवरील प्रेम संपुष्टात आलं का? उदार हृदयाच्या निकोलेङ्काला हे कळलं तर तो काय करील? पण तिला त्याच्याविषयी आस्था वाटणं शक्य वाटत नाही.' सोन्याचे विचार सुरू होते.

डोळे पुसून सोन्या नताशाकडे गेली आणि पुन्हा एकदा तिची मुद्रा काळजीपूर्वक निरखू लागली.

ती तिला उठवणार होती मग तिला वाटले—'कदाचित तिचं अनातोलवर प्रेम नसेलही. माझीच चूक झाली असेल. काही न बोलणं बरं. प्रिन्स आन्द्रे परत आला तर किती

छान होईल!'

बुधवारी काउंट शेतवाडी विकत घेऊ पाहणाऱ्या इसमाबरोबर मॉस्कोलगतच्या आपल्या जमिनीकडे गेला.

काउंट गेला त्याच दिवशी नताशा आणि सोन्या यांना जूली कॅरॅगिनने मोठ्या भोजन-समारंभाचे आमंत्रण दिले. मार्या दिमित्र्येवना त्यांना तिथे घेऊन गेली. त्या वेळी नताशा पुन्हा अनातोलला भेटली. नताशा त्याच्याशी इतरांना ऐकू येणार नाही अशा बेताने बोलत होती आणि सबंध समारंभात ती उत्तेजित होऊन वावरत होती हे सोन्याच्या ध्यानात आले.

आता सोन्याने अधिक बारकाईने तिच्यावर लक्ष ठेवले. दुपारच्या भोजनाच्या वेळी आणि रात्री ती पूर्वीसारखी वागली नाही. तिच्या वागण्यात सोन्याला विचित्रपणा आणि कृत्रिमता जाणवली.

विचारलेल्या प्रश्नांना ती असंबद्ध उत्तरे देऊ लागली. तुटक बोलू लागली आणि कोणत्याही गोष्टीला हसू लागली.

चहापानानंतर नताशाच्या खोलीजवळ एक दासी रेंगाळत असल्याचे सोन्याच्या लक्षात आले. तिने दासीला आत जाऊ दिले. दाराशी कान दिल्यावर तिला कळले—नताशाला तिने दुसरे पत्र पोचवले होते. त्या रात्री नताशाने काहीतरी भयंकर बेत आखला आहे याची स्पष्ट कल्पना सोन्याला आली.

तिने दरवाजा ठोठावला. पण नताशा तिला दार उघडून आत घेईना.

सोन्याला वाटले, आता ती त्याच्याबरोबर पळून जाईल. ती काय वाटेल ते करील. चुलत्याचा निरोप घेताना ती रडली होती ते तिला आठवले. 'निश्चितच ती त्याच्याबरोबर पळून जाणार आहे. पण मी काय करू!' नताशा कसला तरी भयंकर बेत करीत असल्याची लक्षणे लक्षात घेऊन सोन्याला काय करावे ते कळेना. 'काउंट इथे नाही. मी आता करू तरी काय?' प्रिन्स आन्द्रेने सांगितले होते त्याप्रमाणे त्या पीएरला पत्र लिहू काय?'

मार्या दिमित्र्येवनाला सारे कळवले तर त्याचे परिणाम वाईट होतील असे सोन्याला वाटू लागले.

अंधाऱ्या कॉरिडॉरमधे उभी राहून सोन्याने ठरवले—'मला तीन रात्री जागरण घडले तरी चालेल. मी अशी इथेच कॉरिडॉरमधे उभी राहीन. ती पळून जाऊ नये म्हणून मी माझी शक्ती वापरीन. आपल्या कुटुंबाला कलंक लागेल असं तिला काहीही करू देणार नाही.

अनातोल नुकताच डोलोहॉव्हकडे राहायला गेला होता. नताशा रोस्तॉफला पळवून नेण्याची योजना डोलोहॉव्हने कित्येक दिवसांपूर्वी आखली होती.

रात्री दहा वाजता मागच्या प्रवेशद्वाराशी येऊन उभी राहण्याचे वचन नताशाने कुरॅगिनला दिले होते. तीन घोडे जोडून तयार असलेल्या घसरगाडीत कुरॅगिन तिला घेणार होता आणि

तिला मॉस्कोपासून चाळीस मैल दूर असलेल्या कॅमेङ्का खेड्यात नेणार होता. त्या ठिकाणी अधिकारच्युत झालेला धर्मगुरू लग्न लावून देण्याच्या तयारीत होता. कॅमेङ्का येथे त्यांना नेण्यास नव्या दमाचे घोडे वॉर्सा रोडपर्यंत नेण्यासाठी सज्ज होते. त्यानंतर ती दोघे जागोजागी पथिकाश्रमातून नवे घोडे मिळवीत जाणार होती.

अनातोलकडे पासपोर्ट होता. प्रत्येक मुक्कामावर घोडे घेण्याची परवानगीही त्याने मिळवली होती. त्याने दहा हजार रूबल बहिणीकडून आणि दहा हजार रूबल डोलोहॉव्हच्या मदतीने मिळवले होते.

खोट्या लग्नसमारंभासाठी साक्षीदार राहण्यासाठी व्हॉस्टिकॉव्ह आणि मॅकॅरिन हे दोघे तयार झाले होते. ते चहा घेऊन बाहेरच्या खोलीत बसले होते. व्हॉस्टिकॉव्ह हा एकाकाळी सामान्य अधिकारी होता. पत्ते खेळताना डोलोहॉव्ह त्याचा उपयोग करून घेई. मॅकॅरिन हा निवृत्त झालेला घोडदलातील सैनिक होता. ह्या अशक्त आणि सुस्वभावी माणसाची कुरॅगिनवर अमर्याद भक्ती होती.

डोलोहॉव्हच्या प्रशस्त अभ्यासिकेच्या भिंती आणि तक्तपोशी, पर्शियाचे रंग, अस्वलाची कातडी आणि शस्त्रे यांनी सुशोभित केली होती. प्रवासी घट्ट जाकिट घालून आणि गुडघ्यांपर्यंत पोचणारे बूट चढवून तो लिहिण्याच्या टेबलापाशी बसला होता. त्या टेबलावर हिशेबाचे कागदपत्र आणि नोटांची बंडले ठेवलेली होती. गणवेष चढवून पण बटणे न लावताच अनातोल येरझाऱ्या घालत होता. जिथे साक्षीदार बसले होते ती खोली आणि जिथे फ्रेंच नोकर इतर नोकरांच्या मदतीने शेवटच्या सामानाची बांधाबांध करीत होता ती खोली यांच्या दरम्यान डोलोहॉव्हच्या खोलीतून त्याच्या येरझाऱ्या चालल्या होत्या. डोलोहॉव्ह पैसे मोजून नोंद करीत होता.

'हे बघ तुला व्हॉस्टिकॉव्हला दोन हजार रूबल द्यावे लागतील' तो म्हणाला.

'मग देऊन टाक त्याला.' अनातोल उत्तरला.

'मॅकॅरिन तुझ्यासाठी वाटेल त्या आपत्तींना तोंड देईल. आणि त्यात त्याला काही लाभ होणार नाही. आता आपला हिशेब पुरा झाला. सगळे ठीक झालं ना ? ' डोलोहॉव्हने त्याला कागदपत्र दाखवीत विचारले.

'अर्थात सर्व ठीक आहे. ' अनातोल म्हणाला. त्याचे डोलोहॉव्हकडे लक्ष नव्हते हे स्पष्ट होते. नेहमीच्या हसऱ्या मुद्रेने तो सरळ समोर पाहात होता.

डोलोहॉव्हने टेबलाचा खण धाडकन बंद केला. आणि डोलोहॉव्हने पैसे योग्य जागी ठेवून दिले. प्रवासाला निघण्यापूर्वी खाण्यापिण्याची व्यवस्था करण्याचा हुकूम त्याने नोकरांना दिला आणि तो व्हॉस्टिकॉव्ह आणि मॅकॅरिन ज्या खोलीत होते त्या खोलीत गेला.

अनातोल अभ्यासिकेतील सोफ्यावर पहुडला होता.

डोलोहॉव्ह पलीकडच्या खोलीतून ओरडला, 'अनातोल, काहीतरी खाऊन घे. इकडे ये. थोडे ड्रिंकदेखील घे.'

' मला काही नको आहे. ' अनातोल उत्तरला. तो अजूनही स्वतःशी स्मित करीत होता.

' अनातोल, इकडे ये ना. बॅलगा इथे आहे !' अनातोल उठून भोजनगृहात गेला. बॅलगा हा प्रसिद्ध ड्रायव्हर होता. गेली सहा वर्षे तो अनातोल आणि डोलोव्हॉव्ह यांना ओळखीत होता. त्यांना त्याने आपल्या तीन घोड्यांच्या घसरगाडीतून कित्येक वेळा नेले होते. अनातोलच्या रेजिमेंटचा मुक्काम त्वेर येथे होता. त्या काळात कितीदा तरी तो अनातोलला त्वेरहून रात्री घेऊन पहाटे मॉस्कोला नेई आणि पुन्हा दुसऱ्या रात्री त्वेरला आणून पोचवीत असे. जेव्हा जेव्हा डोलोहॉव्हचा पाठलाग होई तेव्हा तेव्हा डोलोहॉव्हला सुरक्षितपणे नेत असे. पुष्कळदा त्याने त्यांना जिप्सी व खुशालचेंडू स्त्रियांबरोबर शहरातून हिंडवले होते. फिरवलेले होते. त्यांना घेऊन जाताना कितीदा तरी त्याचे घोडे कामी आले होते. त्यांना घेऊन जाताना त्याने कितीदा तरी मॉस्कोमधील लोकांच्या अंगावर गाडी घातली होती, वाहने उलटवली होती आणि त्याचे मालकच त्याला अशा वेळी संकटातून सोडवीत असत. त्यांनी त्याला कित्येकदा बडविले होते. कित्येकदा शांपेन आणि इतर मद्ये पाजली होती. सामान्य माणसाला ज्यामुळे सैबेरियालाच पाठवण्यात आले असते अशी अनेक दुष्कृत्ये त्यांनी केलेली त्याला ठाऊक होती. ते नेहमीच बॅलगाला मद्यपानात सहभागी करून घेत, त्याला मद्य पाजीत आणि जिप्सी पोरींबरोबर नाचायला लावीत. त्यांच्या हजारो रूबलांचा व्यवहार त्याच्या हाताने झालेला होता. त्यांची सेवा करताना वर्षातून वीस वेळा तरी त्याला आपला प्राण धोक्यात घालावा लागे, जिवावरच्या प्रसंगातून जावे लागे. त्याचे कित्येक घोडे निकामी होत, त्यांची भरपाई त्यांनी दिलेल्या पैशांनी होत नसे. पण त्याला ते आवडत, त्यांचे घोड्यांना बेफाम पिटाळणे आवडे, तासाला बारा मैल गाडी नेणे, गाडीवानांना उलटवणे, मॉस्कोतील पादचाऱ्यांच्या अंगावरून गाडी नेणे आणि नेहमीच मॉस्कोतील रस्त्यातून भरधाव गाडी हाकणे ह्या साऱ्या गोष्टी त्याला आवडत. गाडी आणखी भरधाव हाकणे अशक्य झाले तरी मागून झिंगलेल्या मालकांचे ओरडणे ऐकू येई. ' जाऊ दे—जोरात जाऊ दे.' ते त्याला आवडे. मार्गातून भीतीने अर्धमेला होऊन पळणाऱ्या शेतकऱ्यांच्या मानेवर चाबूक फटकावणे त्याला आवडे. बॅलगाच्या मते ती खरी माणसे होती.

अनातोल आणि डोलोहॉव्ह यांनाही बॅलगा आवडे. एकतर तो धाडसीपणाने गाडी हाके. दुसरे म्हणजे त्यांना ज्या गोष्टी आवडत त्याच गोष्टी त्यालाही आवडत. इतर लोकांबरोबर बॅलगा खूप घासाघीस करी. दोन तास गाडी हाकण्यासाठी तो इतरांकडून वेळप्रसंगी पंचवीस रूबल देखील घेई आणि बहुधा स्वतः गाडी हाकण्याऐवजी आपल्या एखाद्या तरुण नोकरास पाठवून देई. पण आपल्या ह्या मालकांसाठी मात्र तो स्वतः गाडी हाकायचा. कामाचा मोबदला आपणहून कधी मागायचा नाही.

त्यांच्या नोकरासाठी पैसे भरपूर असल्याची बातमी मिळाली की तो दोनतीन महिन्यांतून एकदा त्यांच्याकडे फेरी टाकी. शांतपणे झुकून उभा राहून तो त्यांना आपल्याला अडचणीत मदत करण्याची विनंती करी. त्याचे मालक नेहमी बसवून घेत.

तो म्हणायचा, ' फ्योदॉर इव्हानॉविच महाराज, मला यातून वाचवा. माझे घोडे निकामी झाले आहेत; या जत्रेला जाण्यासाठी मला थोडे पैसे उसने द्या. '

जवळ भरपूर पैसे असले म्हणजे अनातोल आणि डोलोहॉव्ह त्याला हजार दोन हजार रूबल देत असत.

बॅलगाच्या डोक्याचे केस फिकट पिवळे होते, त्याचे नाक चपटे होते. तो सत्तावीस वर्षांचा होता. त्याचा चेहरा आणि त्यातल्या त्यात जाड गळा लालबुंद होता. त्याच्या लहानखोर डोळ्यांत चमक होती. त्याची दाढी लहानशी होती. लोकरीच्या लांब झग्यावर त्याने रेशमी किनार असलेला सुरेख निळा कोट चढवला होता.

समोरच्या कोपऱ्यात असलेल्या डोलोहॉव्हकडे जाऊन त्याने आपला लहान हात पसरला.

' बैस खाली आणि ड्रिंक घे. ' अनातोल म्हणाला आणि त्याने मद्याचा एक मोठा ग्लास त्याला दिला. मद्य पाहूनच त्या गाडीवानाचे डोळे चमकले. प्रारंभी शिष्टाचारादाखल त्याने मद्य घेण्यास नकार दिला, मग घटाघटा पिऊन टाकले आणि टोपीत असलेल्या लाल रेशमी हातरुमालाने तोंड पुसले.

' महाराज, केव्हा निघायचं ते सांगा. '

अनातोल आपल्या घड्याळाकडे पाहात म्हणाला, ' आपण आत्ताच निघायला पाहिजे. '

अनातोल खोलीबाहेर गेला आणि लागलीच परत आला. आता त्याने लांब लोकरी कोट घातला होता. त्यावर चांदीचा पट्टा बांधला होता. तिरकी ठेवलेली ऐटदार लोकरी टोपी त्याच्या देखण्या चेहऱ्याला शोभत होती. आरशासमोर उभे राहून त्याने आपले रूप न्याहाळले. त्याच थाटात डोलोहॉव्हसमोर उभे राहून त्याने मद्याचा ग्लास घेतला.

' दोस्तांनो, चला निघू.' अनातोल उठून म्हणाला. ते सगळे बाहेरच्या दालनात जमले. तशी डोलोहॉव्ह म्हणाला, ' लोकरीचा कोट कुठं आहे ? इझात्का, मात्र्यो नामात्वेयेवनाकडे जा आणि तिच्याकडून सेबलचा लोकरीचा कोट घेऊन ये.' ' पळून जाताना काय काय होतं ते मी ऐकलं आहे' डोलोहॉव्ह डोळे मिचकावीत म्हणाला, 'ती अर्धमेली होऊन अंगावर असलेल्या वस्त्रानिशी बाहेर पडेल. थोडासा उशीर झाला तर अश्रुपात सुरू होईल, तिला प्रिय पपा आणि ममा यांची आठवण होईल, मग मिनिटभर ती थिजून जाईल आणि परत फिरण्याचा विचार करील. तू तिला तावडतोब लांब झग्यात गुंडाळून घेऊन घसरगाडीकडे घेऊन ये. '

तेवढ्यात नोकर बायकांचा लांब झगा घेऊन आला.

' मूर्खा, तुला मी लोकरीचा कोट घेऊन यायला सांगितलं होतं, मॅच्योश्का, लोकरीचा कोट हवा,' तो जोराने ओरडला आणि त्याचा आवाज खोल्याखोल्यांतून निनादत गेला.

कृश बांध्याची, फिकट कांतीची, चमकत्या काळ्याभोर डोळ्यांची, निळसर छटा असलेल्या

कुरळ्या केसांची एक देखणी जिप्सी स्त्री बाहेर धावत आली. तिने लाल शाल अंगाला लपेटून घेतली होती आणि तिने हातावर लोकरीचा कोट धरला होता.

' हा घ्या. मला हा गेल्याबद्दल वाईट वाटणार नाही. घ्या.' तिला आपल्या मालकाची भीती वाटत असल्याचे दिसत होते. झगा जाणार म्हणून ती दुःखी झाली होती. डोलोहॉव्हने काही उत्तर न देता तिच्याकडून झगा घेतला आणि मॅच्योश्काच्या अंगाला तो लपेटला. ' असंच. आणखी अशा तऱ्हेनं ' मग त्याने तिच्या गळ्याभोवतालची कॉलर चेहऱ्याच्या बाजूला थोडी जागा ठेवून सगळीकडे उंच केली. ' आणि मग अशा तऱ्हेनं. ' मग त्याने अनातोलचा चेहरा कॉलरच्या उघड्या जागेकडे वळवला तेव्हा अनातोलला मॅच्योश्काचा हसणारा चेहरा दिसला.

तिचे चुंबन घेत अनातोल म्हणाला, ' माच्योश्का, येतो मी आता. गुडबाय्. माझी इथली गम्मत आता संपली. माच्योशा, मी सुखी राहावं म्हणून देवाकडे प्रार्थना कर.गुडबाय् माच्योश्का.'

' प्रिन्स, देव तुला सुखात ठेवो. ' माच्योश्का जिप्सी उच्चारात म्हणाली.

पायऱ्यांपाशी दोन तीन घोड्यांच्या गाड्या उभ्या होत्या. दोन धिप्पाड गाडीवान लगाम खेचून बसले होते. बॅलगाने अगदी पुढची जागा पटकावली. कोपर वर धरून तो मुद्दामच हातातील लगाम नीट करू लागला. त्याच्याच गाडीत अनातोल आणि डोलोहॉव्ह बसले. मॅकॅरिन, ब्हॉस्टिकॉव्ह आणि नोकर दुसऱ्या गाडीत चढले.

' निघायचं ना ? ' बॅलगाने विचारले. मग हाताभोवती लगाम गुंडाळत पिरगाळीत तो ओरडला ' चला. ' दुतर्फा झाडे असलेल्या रस्त्यावरून गाडी विलक्षण वेगाने धावू लागली.

बॅलगा आणि गाडीवानाच्या आसनाच्या जागी बसलेला तरुण गाडीवान ओरडत होते.

अर्बाट्स्की चौकात घसरगाडी एका घोडागाडीवर जाऊन आदळली. काहीतरी मोडतोड झाल्याचा आणि लोकांच्या आरडाओरडीचा आवाज ऐकू आला. पण गाडी तशीच अर्बाट्स्की-मधून भरधाव निघाली. पॉडनॉविन्स्कीतून जाताना दोनदा वळणे घेऊन झाल्यावर बॅलगाने घोड्याचा लगाम खेचण्यास सुरुवात केली. मग मागे वळून पाहिल्यावर त्याने जुन्या इक्वेरीच्या चौकात घोडे थांबवले.

तो तरतरीत तरुण गाडीवान वेसणींना धरून घोड्यांना थोपवण्यासाठी उतरला. अनातोल आणि डोलोहॉव्ह फूटपाथवरून चालू लागले. फाटकांपाशी जाताच डोलोहॉव्हने शीळ घातली. त्याला उत्तर म्हणून शीळ ऐकू आली. एक दासी बाहेर धावत आली. ' आत चौकात या नाहीतर तुम्ही दृष्टीस पडाल. ' मिनिटभरात ती आलीच...

डोलोहॉव्ह फाटकाशी थांबला. अनातोल दासीच्या मागून चौकात गेला. कोपऱ्यावर वळून तो पायऱ्या चढू लागला तेवढ्यात त्याला मार्या दिमित्र्येवनाचा धिप्पाड नोकर ग्रॅब्रिलॉ भेटला. वाट अडवीत तो घोगऱ्या आवाजात म्हणाला, ' ह्या वाटेने मालकीणबाईंना भेटायला जा. '

' कोणती मालकीण ? कोण आहेस तू ?' श्वास न घेता अनातोलने हलक्या आवाजात विचारले.

' आत चला. तुम्हाला आत घेऊन यायचा मला हुकूम आहे. '

' कुरॅगिन मागे फिर. दगाफटका आहे. पळ. '

कुरॅगिन आत गेल्यावर फाटकाशी असलेला पहारेकरी फाटक बंद करण्याचा प्रयत्न करीत होता. त्या पहारेकऱ्याने फाटक बंद करू नये म्हणून डोलोहॉव्ह त्याच्याशी झटापट करीत होता. मोठ्या शिकस्तीने डोलोहॉव्हने त्या पहारेकऱ्याला ढकलले आणि अनातोलला फाटकाबाहेर ओढून घेतले. त्याला घेऊन त्याने घसरगाडीकडे धूम ठोकली.

मार्या दिमित्र्येवनाने कॉरिडॉरमधे रडत असलेल्या सोन्याला पाहिले आणि तिच्याकडून सगळ्या गोष्टी काढून घेतल्या. नताशाचे पत्र मिळवून तिने ते वाचले आणि ते पत्र घेऊन ती तशीच नताशाच्या खोलीत शिरली होती.

' निर्लज्ज, बेशरम, उद्धट कारटी. एक शब्दही बोलू नकोस. ' आश्चर्याने बघणाऱ्या आणि डोळ्यांत एक टिपूस न आणणाऱ्या नताशाला तिने खोलीत ढकलून दिले आणि बाहेरून कुलूप लावले. ' तिला त्या रात्री कोणी भेटायला आला तर त्याला फाटकाच्या आत घे, मात्र पुन्हा बाहेर पडू देऊ नकोस ' अशी तिने पहारेकऱ्याला आज्ञा दिली होती. ' भेटायला येणाऱ्या त्या माणसांना माझ्याकडे घेऊन या. ' असा हुकूम तिने आपल्या नोकरांना दिला होता. तिला पळवून नेण्यासाठी लोक केव्हा येतात याची वाट बघत मार्या दिमित्र्येवना दिवाणखान्यात बसली होती.

' आलेली माणसे पळून गेली. ' गॅब्रिलॉने येऊन मार्या दिमित्र्येवनाला सांगितले, तेव्हा तिने कपाळाला आठ्या घातल्या, पाठीमागे हात जुळवून आता काय करावे याचा विचार करीत ती कितीतरी वेळ खोलीत येरझाऱ्या घालत राहिली. मध्यरात्रीच्या सुमारास तिने खिशात चावी आहे का ते चाचपून पाहिले आणि ती नताशाच्या खोलीकडे गेली. सोन्या कॉरिडॉरमधे हुंदके देत बसली होती. ' मार्या दिमित्र्येवना, कृपा करून मला आत जाऊ दे. '

मार्या दिमित्र्येवनाने दरवाजा उघडला आणि ती आत शिरली. ' तिरस्कार वाटावा, ओंगळ वाटावा अशी ही दुर्वर्तनी कार्टी. मला तिच्या वडिलांची मात्र दया येते. मला खूप प्रयास पडले तरी चालतील पण मी कुणाला त्या गोष्टीची वाच्यता करू देणार नाही. काउंटला ती गोष्ट कळणार नाही असा प्रयत्न करीन. ' कसला तरी निश्चय करून मार्या दिमित्र्येवना खोलीत शिरली.

नताशा सोफ्यावर पहुडली होती. तिने दोन्ही हातांनी आपला चेहरा झाकून घेतला होता. मार्या दिमित्र्येवना आली तरीही तिने हालचाल केली नाही. मार्या दिमित्र्येवना मघाशी तिला ज्या स्थितीत सोडून गेली होती त्याच स्थितीत ती आताही होती.

मार्या दिमित्र्येवना तिला बोलू लागली, ' मोठे गुण उधळलेस ग बाई ! किती सद्‌गुणी ! माझ्या घरात आपल्या जाराच्या भेटी घेतेस. आता मला फसवून काही उपयोग होणार नाही. आता काय सांगते ते नीट ऐक..' तिच्या हाताला स्पर्श करून मार्या दिमित्र्येवना पुढे बोलू

लागली, ' नीट लक्ष देऊन ऐक. एखाद्या हलक्या प्रतीच्या बाईप्रमाणे तू स्वतःला बदनाम करून घेतलं आहेस. मी तुझी अवस्था काय केली असती मला सांगता येत नाही, पण मला तुझ्या बापाची दया येते. त्याला मी ही गोष्ट कळू देणार नाही. '

नताशा जशी पडली होती तशीच राहिली. आवाज न देता ती हुंदके देऊ लागली आणि तिचे सगळे शरीर थरथरू लागले. तिला धड श्वास घेता येईना. सोन्याकडे वळून पाहून मार्या दिमित्र्येवना नताशाजवळ सोफ्याच्या कडेला बसली.

' तो सुदैवी म्हणून माझ्या हातून निसटून गेला. पण मी त्याला पकडल्याशिवाय राहणार नाही. ' मार्या दिमित्र्येवना कर्कश आवाजात बोलू लागली, ' मी काय बोलते आहे ते ऐकते आहेस ना ? ' तिने आपला थोराड हात नताशाच्या डोक्याखाली धरला आणि तिचे तोंड आपल्या दिशेला वळवले. नताशाचा चेहरा दृष्टीस पडताच सोन्या आणि मार्या दिमित्र्येवना या दोघींनाही आश्चर्य वाटले. तिचे डोळे चमकत होते पण कोरडे होते. तिने ओठ घट्ट दाबून धरले होते, तिचे गाल बसले होते.

' मला आता...मी मेले तर...' ती बोलली. तिने रागाने झटका देऊन मार्या दिमित्र्येवना-पासून आपली सोडवणूक करून घेतली. पुन्हा ती पहिल्यासारखी पडून राहिली.

मार्या दिमित्र्येवना बोलू लागली, ' नताल्या, तुझं कल्याण व्हावं अशी माझी इच्छा आहे. स्वस्थ पडून राहा. मी तुला हात लावीत नाही. स्वस्थ पडून मी काय सांगते ते ऐक...तुझं वर्तन किती वाईट होतं याबद्दल मी तुला काही सांगणार नाही. त्याची जाणीव तुला आहेच. उद्या तुझे वडील परत येत आहेत. मी त्यांना काय सांगू ? '

पुन्हा नताशा हुंदके देऊ लागली, तिचे शरीर थरथरू लागले.

' आणि ही गोष्ट त्याच्या–तुझ्या नियोजित पतीच्या कानावर जाईल.'

' मला कुणी नियोजित पतीच नाही. मी त्याला नकार दिलेला आहे. '

' तरी परिणामात बदल होणार नाही. त्याच्या कानावर गेल्यावर ते स्वस्थ बसतील असं तुला वाटतं का ? तुझ्या वडिलांना मी चांगली ओळखते. तुझ्या वडिलांनीच जर त्याला द्वंद्व-युद्धास आव्हान दिलं तर योग्य होईल का ?'

' मला स्वस्थ पडू दे. प्रत्येक गोष्टीत तुम्ही अडथळा का आणता ? का म्हणून ? तुम्हाला कोणी सांगितलं अडथळे आणायला ? ' सोफ्यावरून उठता उठता नताशाने सूडबुद्धीने मार्या दिमित्र्येवनाकडे पाहात विचारले.

मार्या दिमित्र्येवना पुन्हा भडकून ओरडली, ' अग तुला हवं होतं तरी काय ? तुला आम्ही काही कोंडून ठेवलं नव्हतं. त्याला घरी यायला कोणी मना केली ? जिप्सी बाईला पळवतात तशा तऱ्हेनं तुला पळवून नेणार होता का ? तुला त्यानं पळवलं असतं तर त्यांनी तुला पकडलं नसतं अशी तुझी समजूत आहे -काय ? तुझ्या वडिलांनी, नाहीतर तुझ्या भावानं, नाहीतर तुझ्या नियोजित नवऱ्यानं त्याला पकडलं असतं. तो तुला पळवून नेणारा माणूस बेशरम, हरामखोर आहे...'

' तुमच्या कोणाहीपेक्षा तो अधिक चांगला आहे. तू मध्ये तोंड घातलं नसतंस तर...अरे देवा! काय प्रसंग आणलास हा? सोन्या, तू का म्हणून...? जा चालती हो इथून...' आपण स्वतःच आपल्यावर आपत्ती ओढवून घेतली आहे याची जाणीव होऊन निराश होऊन माणसे शोक करतात तसा ती शोक करू लागली, हुंदके देऊ लागली.

मार्या दिमित्र्येवना पुन्हा काही बोलणार होती. पण नताशा ओरडली, 'चालत्या व्हा इथून. तुम्ही माझा द्वेष करता, तिरस्कार करता' पुन्हा तिने आपले अंग धाडकन सोफ्यावर टाकले.

मार्या दिमित्र्येवना मग कितीतरी वेळ नताशाला उपदेश करीत राहिली. काउंटला यातील काहीही कळू देता कामा नये असे तिने बजावले. नताशाने सर्व विसरून जाण्याची आणि काही घडल्याची जाणीव न दाखवण्याची हमी द्यावी म्हणजे कुणालाच त्याबद्दल कळणार नाही असे तिने सांगितले. नताशा मुकाट होती. आता ती हुंदके देत नव्हती. मात्र तिचे शरीर सारखे थरथरत होते. मार्या दिमित्र्येवनाने तिच्या डोक्याखाली एक उशी सारली, तिच्या अंगावर दोन चादरी घातल्या, तिला आपल्या हाताने सोडावॉटर आणून दिले. नताशाशी ती बोलण्याचा प्रयत्न करू लागली, पण नताशाने ढुंकूनही पाहिले नाही.

' झोप बापडी. ' ती झोपली आहे असे समजून मार्या दिमित्र्येवना खोलीबाहेर गेली. पण नताशा झोपलेली नव्हती, तिचा चेहरा पांढराफटक झाला होता आणि आपल्या उघड्या विशाल डोळ्यांनी ती सरळ पाहात होती. सबंध रात्रभर ती झोपली नाही, रडली नाही. सोन्या कित्येकदा उठून तिच्याकडे आली पण नताशा तिच्याशी एक शब्दही बोलली नाही.

दुसऱ्या दिवशी जेवणाच्या वेळी शब्द दिल्याप्रमाणे काउंट इल्या अँड्रीच शहराबाहेरील आपल्या शेतवाडीवरून आला. तो प्रसन्न मनःस्थितीत होता. शेतवाडी विकून टाकण्याचा व्यवहार जवळ जवळ पक्का झाला होता. आता जास्त वेळ त्याला मॉस्कोमधे राहावे लागणार नव्हते. जिची त्याला ओढ लागली होती त्या काउंटेसला तो आता लवकर भेटू शकणार होता.

मार्या दिमित्र्येवना त्याला भेटली आणि म्हणाली, ' कालपासून नताशाला बरं नाही. काल डॉक्टरला बोलावून आणलं होतं. आज तिला बरं वाटतं आहे.'

त्या दिवशी सकाळी नताशा खोलीतून बाहेर पडली नाही. ती खिडकीशी आपले शुष्क ओठ गच्च मिटून आणि कोरड्या डोळ्यांनी नजर लावून खिडकीशी बसून रस्त्यातून जाणाऱ्या लोकांकडे पाहात राहिली. खोलीत आलेल्या लोकांकडे घाईघाईने वळून पाहू लागली. ती त्यांच्याकडून काही बातमी कळेल याची अपेक्षा करीत होती, तो आपण होऊन येईल निदान पत्र तरी लिहील असे तिला वाटत होते.

काउंट खोलीत शिरला तेव्हा पुरुषी पावलांचा आवाज ऐकून तिने अस्वस्थपणे चेहरा वळवला. तिच्या थंड निर्विकार मुद्रेवर सूडाची भावना उमटली. वडील आले तरी ती उठली नाही.

' काय झालं बाळ? बरं नाही का तुला? ' काउंटने विचारले.

'हो, थोडी आजारी आहे.' ती उत्तरली.

काउंटने विचारले, 'इतकी खचून का गेली आहेस? तुझ्या नियोजित वराबद्दल काही कळलं का?' तशी ती म्हणाली, 'तसं काहीच झालेलं नाही. तुम्ही उगाच बेचैन होऊ नका.' मार्या दिमित्र्येवनाने नताशाला दुजोरा देत म्हटले, 'काळजी करण्याजोगं काहीही घडलं नाही.' मुलीने केलेली आजाराची बतावणी, तिची अस्वस्थ मनःस्थिती, सोन्या व मार्या यांचे बेचैन चेहरे यांवरून आपल्या गैरहजेरीत काहीतरी घडले असावे याची स्पष्ट कल्पना काउंटला आली. आपल्या आवडत्या मुलीच्या बाबतीत काही बदनामी करणारे घडले असेल ही कल्पना काउंटला दुःसह वाटली आणि त्याला आपली मनःशांती अधिक मोलाची वाटली म्हणून की काय त्याने चौकशी करणे टाळले. विशेष काही घडले नसेल असा त्याने आपल्या मनाला धीर दिला. तिच्या आजारामुळे आपणाला गावाकडे लौकर जाता येणार नाही या विचाराने मात्र त्याला दुःख झाले.

आपली पत्नी मॉस्कोला आल्यापासून तिच्या सहवासात राहावे लागू नये म्हणून पीएर कुठेतरी बाहेरगावी जाण्याचे बेत करू लागला. रोस्तॉफमंडळी मॉस्कोला आली आणि नताशाने पीएरच्या मनावर छाप पाडली तेव्हा आपला बेत तडीस नेण्याची त्याने त्वरा केली. ऑसिप अलेक्स्येविचच्या विधवेला भेटण्यासाठी तो त्वेरला गेला. त्या बाईने आपल्या मृत नवऱ्याची कागदपत्रे देण्याचे मागेच वचन दिले होते.

पीएर मॉस्कोला परत आला तेव्हा त्याला मार्या दिमित्र्येवनाने पाठवलेले पत्र मिळाले. तिने त्याला आन्द्रे बोलकॉन्स्की आणि त्याची नियोजित वधू यांच्यासंबंधी महत्त्वाच्या बाबींवर चर्चा करण्यासाठी बोलावले होते. पीएर आजवर नताशाला टाळीत आला होता. मित्राच्या वाग्दत्त वधूबद्दल विवाहित पुरुषास जे वाटावे त्याहून खूपच जास्त आकर्षण आपणास नताशाबद्दल वाटते आहे हे पीएरला जाणवत होते. दैव मात्र त्याला सतत तिच्या सहवासात ठेवू पाहात होते.

'प्रिन्स आन्द्रे त्वरा करून घरी येईल आणि तिच्याशी लग्न करील तर किती बरं होईल!' पीएर मार्या दिमित्र्येवनाच्या घरी जाता जाता म्हणत होता.

दुतर्फा झाडी असलेल्या रस्त्यावरून तो जात असताना कुणीतरी त्याला हाक मारली.

'पीएर, परतून खूप दिवस झाले का?' परिचित आवाज कानावर पडला. पीएरने मान वर करून पाहिले. अनातोल आणि त्याचा नेहमी सोबत असलेला दोस्त मॅकॅरिन घसरगाडीतून जात होते. घसरगाडीचे करड्या रंगाचे घोडे मागच्या पायांनी घसरगाडीच्या पुढच्या भागावर हिम उडवीत दुडक्या चालीने जात होते.

पीएर मार्या दिमित्र्येवनाच्या प्रवेशदालनात पोचला तेव्हा त्याचा लोकरी कोट उतरवीत

असताना नोकर म्हणाला, ' मालकीणबाईंनी विनंती केली आहे. आपल्या खोलीत बोलावलं आहे.'

पीएरने स्वागतदालनाचा दरवाजा उघडला तेव्हा त्याला खिडकीशी बसलेली नताशा दिसली. ती कृश झाली होती. तिचा चेहरा फिकट झाला होता आणि मुद्रा चिडलेली दिसत होती. तिने वळून त्याच्याकडे पाहिले आणि कपाळाला आठ्या घातल्या. आढ्यतेने ती खोलीच्या बाहेर गेली.

' घडलं आहे तरी काय ? ' पीएरने मार्या दिमित्र्येवनाला विचारले तशी ती उत्तरली, ' फार छान वागते आहे ती. मला अठ्ठावन वर्षे झाली पण अशा लज्जास्पद गोष्टी पाहिल्या नव्हत्या.' ऐकलेला एक शब्दही कोणाला सांगणार नाही असे तिने पीएरकडून वचन घेतले आणि सांगितले, ' आपल्या वडिलांना न सांगताच नताशानं आपला वाङ्निश्चय मोडला आहे. त्याला कारण आहे अनातोल कुरॅगिन. तुझ्या पत्नीनंच तिची त्याच्याशी भेट घालून दिली. त्याच्याशी चोरून लग्न करण्यासाठी वडील घरी नसताना तिनं पळून जाण्याचा प्रयत्न केला. '

पीएर मार्या दिमित्र्येवनाचे बोलणे आ वासून ऐकत होता. त्याचा त्यावर विश्वास बसेना. प्रिन्स आन्द्रेने जिच्यावर उत्कट प्रेम केले होते आणि आजवर जी आकर्षक वाटत होती ती नताशा रोस्तॉफ विवाहित असलेल्या अनातोलवर प्रेम करीत होती. ( अनातोलच्या लग्नाचे रहस्य पीएरला माहीत होते. ) आणि त्याच्याबरोबर पळून जायला तयार झाली होती हे ऐकून पीएरला काही कळेनासे झाले. असे होईल याची त्याला कल्पनाही नव्हती. तो नताशाला लहानपणापासून ओळखत होता. त्याच्या अंतःकरणात नताशासंबंधीच्या मधुर स्मृती गोळा झालेल्या होत्या. त्याचा मेळ तिच्या आताच्या मूर्ख, क्षुद्र आणि निर्दय वागण्याशी घालता येणे अशक्य होते. त्याला आपल्या पत्नीची आठवण झाली. दुर्दैवाने आपली हलक्या वृत्तीच्या स्त्रीशी जन्माची गाठ पडली. पण आपल्यासारखे इतरही या जगात आहेत या विचारासरशी तो स्वतःशीच म्हणाला, ' सगळ्या स्त्रिया सारख्याच वृत्तीच्या ! ' पण तरीही त्याला प्रिन्स आन्द्रेबद्दल वाईट वाटले, त्याचा स्वाभिमान आठवून वाईट वाटले. त्याला मित्राबद्दल अधिकाधिक सहानुभूती वाटू लागली. तसतशी नुकत्याच आढ्यतेने गेलेल्या घुश्या नताशाबद्दल अधिकाधिक तिरस्कार आणि घृणा वाटू लागली. नताशाचे मन त्या वेळी निराशेने, शरमेने आणि अपमानाने व्यापले होते; योगायोगानेच त्या वेळी तिच्या चेहऱ्यावर आढ्यता दिसली होती. पण पीएरला याची कल्पना नव्हती.

' काय ? त्याच्याशी लग्न करणार आहे ? त्याला लग्न कसं करता येईल ? त्याचं लग्न झालेलं आहे.'

' मग आणखीनच वाईट. फार चांगली स्वारी आहे. एक नंबरचा बदमाष आहे तो. ती तर त्याची वाट पाहते आहे. गेले दोन दिवस वाट पाहते आहे. तिला याची कल्पना देऊ म्हणजे तरी ती त्याची वाट पाहणार नाही. '

मार्या दिमित्र्येवनाने पीएरकडून अनातोलच्या लग्नासंबंधीची बारीकसारीक माहिती काढून घेतली. अनातोलला खूप शिव्या देऊन त्याच्यावरील राग व्यक्त केला. मग तिने पीएरला

आपण का बोलावून घेतले ते सांगितले, ' काउंट कुठल्याही क्षणाला येईल आणि मी लपवण्याचा प्रयत्न केला तरी त्याला त्या गोष्टी कळतील अशी मला धास्ती वाटते. मग तो कुरॅगिनला द्वंद्वयुद्धाचे आव्हान दिल्याखेरीज राहणार नाही. म्हणून तुम्ही आपल्या मेहुण्याला मॉस्को सोडून जायला सांगा—त्यानं तिला पुन्हा तोंड दाखवण्याचं साहस करता कामा नये.' काउंट निकोलाय आणि प्रिन्स आन्द्रे याच्यावर कोणते संकट कोसळले त्याची जाणीव पीएरला झाली. त्याने मार्या दिमित्र्येवनाच्या इच्छेप्रमाणे वागण्याचे वचन दिले. आपल्या इच्छा थोडक्यात अचूकपणे सांगून तिने त्याला दिवाणखान्यात जाऊ दिले.

ती त्याला म्हणाली, ' काउंटला याबाबत एक अक्षर कळता कामा नये हे लक्षात घ्या. आपल्याला काही माहीत नाही अशा तऱ्हेने तुम्ही वागा. मी तिला जाऊन सांगते—त्याची वाट बघून काही उपयोग होणार नाही. शक्य असेल तर रात्री जेवण करून जा. '

पीएरला थोरला काउंट भेटला. तो अस्वस्थ आणि चिंताग्रस्त झालेला दिसला.

काउंट पीएरला म्हणाला, ' आई इथं नसल्यामुळं ह्या मुलींनी माझ्यावर संकटं आणली आहेत. इथं आल्याचा आता मला चांगलाच पश्चात्ताप होत आहे. मी तुझ्याकडे मन मोकळं करणार आहे. तिनं कुणाला न सांगता लग्न मोडलं हे तू ऐकलंस का ? मला ते लग्न पसंत नव्हतं हे मी कबूल करतो. तो चांगला तरुण आहे याबद्दल वाद नाही. वडिलांच्या इच्छे-विरुद्ध जाऊन तिनं लग्न केलं असतं तर ती सुखी झाली नसती. नताशाला मागणी घालणाऱ्यांची कमतरता पडणार नाही. लग्न ठरून खूप दिवस झालेले असताना आईवडिलांना विचारल्याशिवाय तिनं असा निर्णय घ्यावा हे चांगलं नाही. आता तर ती आजारी पडली आहे. कशानं आजारी आहे देव जाणे. आईपासून मुलीला दूर आणणं फार वाईट. फार वाईट. '

काउंट अतिशय अस्वस्थ झालेला पाहून पीएरने संभाषणाचा विषय बदलण्याचा प्रयत्न केला पण काउंट पुन्हा आपल्या अडीअडचणींबद्दल बोलू लागला.

सोन्या दिवाणखान्यात आली त्या वेळी तिची मुद्रा संत्रस्त झालेली होती.

' नताशा आपल्या खोलीत आहे. तिला अजून बरं नाही. तुम्ही तिला भेटलात तर बरं होईल. तिच्याबरोबर मार्या दिमित्र्येवना आहे. तुम्ही यावं अशी तिची इच्छा आहे. ' सोन्या पीएरला म्हणाली.

' अरे, तू तर बोलकॉन्स्कीचा परममित्र आहेस. खात्रीनं तुझ्याकडे काही निरोप देणार असेल. अरे देवा ! गेले ते सुखाचे दिवस ' काउंट खोलीबाहेर गेला.

अनातोल विवाहित असल्याची बातमी मार्या दिमित्र्येवनाने नताशाला ऐकवली. पण नताशाचा विश्वास बसेना. प्रत्यक्ष पीएरने अनातोलने लग्न केल्याचे आपल्याला सांगावे असा तिने आग्रह धरला. पीएरला नताशाच्या खोलीकडे कॉरिडॉरमधून नेताना सोन्याने ही गोष्ट सांगितली.

मार्या दिमित्र्येवनाच्या शेजारी बसलेल्या नताशाची मुद्रा फिकट आणि करारी होती. दारात पीएरला पाहताच तिची अस्वस्थ दृष्टी चमकली.

त्याला पाहून तिने स्मित केले नाही किंवा मानही हालवली नाही. तिने त्याच्याकडे केवळ रोखून पाहिले. नताशाला उद्देशून मार्या दिमित्र्येवना म्हणाली, 'त्याला सगळं ठाऊक आहे. मी खरं सांगितलं की नाही ते तोच सांगेल.'

नताशाने प्रत्येकाकडे पाहिले.

'नताल्या इल्यिनिचना,' पीएर नजर खाली वळवून बोलू लागला तेव्हा त्याला त्या मुलीबद्दल दया वाटू लागली. असले काम करावे लागत आहे म्हणून स्वतःचाच तिरस्कार वाटू लागला. तो तिला म्हणू लागला, 'गोष्ट खरी असली काय अगर खोटी असली काय तुझ्यावर तिचा काही परिणाम होणार नसल्यानं...'

'त्याचं लग्न झालं आहे ही बातमी खोटी तर...'

'नाही, ती खरी आहे.'

'तो अजून इथंच आहे का'? तिने भरभर विचारले.

'होय, मी आताच त्याला भेटलो होतो.'

यावर काही बोलायला ती असमर्थ दिसली. तिने उसासा टाकून हातानेच त्याला जायला सांगितले. पीएर जेवणासाठी थांबला नाही. नताशाच्या खोलीबाहेर पडला आणि निघून गेला.

अनातोलला शोधण्यासाठी त्याने शहरभर गाडी पिटाळली. जिप्सींच्या वस्तीत तो आढळला नाही. मग पीएर क्लबकडे वळला. क्लबमधे नेहमीप्रमाणे जीवन सुरू होते. जेवण घेण्यासाठी आलेले सभासद गटागटाने बसले होते. त्यांनी पीएरचे स्वागत केले आणि शहरच्या गोष्टी सुरू झाल्या. पीएरच्या एका परिचिताने विचारले, 'कुरॅगिन नताली रोस्तॉफला घेऊन पळून गेल्याचे ऐकलंत का? सगळ्या शहरात याच गोष्टीची चर्चा चालू आहे. ही बातमी खरी आहे का?' पीएर हसत उत्तरला, 'बातमीत तथ्य नाही. निव्वळ मूर्खांची बडबड आहे. मी आता रोस्तॉफ कुटुंबाकडूनच येतो आहे.' त्याने प्रत्येकाकडे अनातोलची विचारपूस केली. तो अजून आला नसल्याचे एकाने सांगितले तर दुसऱ्याने तो आज जेवायला येणार होता अशी बातमी दिली. तिथे जमलेल्या माणसांना पीएरच्या अंतःकरणातील खळबळीचा थांगपत्ता नव्हता. ती सगळीच कशी शांत, उदात्त होती. ते पाहून पीएरला चमत्कारिक वाटले. तो दिवाणखान्यात येरझाऱ्या घालत राहिला. सगळे येईपर्यंत तिथे थांबला पण अनातोलचा पत्ता नव्हता. म्हणून जेवण न घेताच तो घरी निघाला.

त्या दिवशी अनातोलने डोलोहॉव्हकडे जेवण घेतले. असफल झालेली साहसी कामगिरी कशी पार पाडायची याची चर्चा केली. यासाठी नताशाची भेट घेणे त्याला आवश्यक वाटले. तिला भेटण्याची व्यवस्था कशा तऱ्हेने करता येईल याबाबत सल्ला घेण्यासाठी अनातोल आपल्या बहिणीकडे आला होता. पीएर सर्व मॉस्को शहर फिरून अनातोलचा शोध न लावताच घरी

परत आला तेव्हा त्याच्या नोकराने प्रिन्स अनातोल व्हॅसिल्येविच काउंटेसबरोबर बोलत असल्याची बातमी दिली. काउंटेसचा दिवाणखाना पाहुण्यांनी भरलेला होता.

पीएर आपल्या पत्नीला ती मॉस्कोला आल्यापासून भेटला नव्हता. आता त्याने स्वागताचा एक शब्दही उच्चारला नाही. त्या क्षणी तर त्याला तिचा कधी नव्हे इतका तिरस्कार वाटू लागला. दिवाणखान्यात गेल्यावर त्याच्या दृष्टीला अनातोल पडला. तो सरळ त्याच्याकडे गेला.

आपल्या नवऱ्याजवळ जात काउंटेस म्हणाली, ' पीएर, बिचारा अनातोल केवढ्या संकटात सापडला आहे याची तुला कल्पना नाही. ' डोके खाली झुकवलेल्या नवऱ्याच्या चमकत्या डोळ्यांत आणि निश्चयी पावलांत तिला त्याच्या संतापाचे आणि त्याच्या सामर्थ्याचे भीषण दर्शन झाले आणि ती लागलीच थांबली. डोलोहॉव्हबरोबर झालेल्या द्वंद्वयुद्धानंतर तिला घडलेले त्याचे दर्शन याहून वेगळे नव्हते.

पीएर आपल्या पत्नीला म्हणाला, ' तू जिथं असशील तिथं दुर्गुण आणि दुष्टपणा असणारच.' मग तो फ्रेंचमधे अनातोलला म्हणाला, ' अनातोल इकडे ये. मला तुझ्याशी काही बोलायचं आहे. ' अनातोलने वळून आपल्या वहिणीकडे पाहिले. मुकाट्याने उठून पीएरच्या मागोमाग जायला तयार झाला.

पीएरने त्याचा हात धरला, त्याला आपल्याकडे खेचले आणि तो खोलीच्या बाहेर पडला.

' माझ्या दिवाणखान्यात तू अशा तऱ्हेनं—' एलन हळू आवाजात बोलली. पण तिच्याशी काही न बोलता पीएर खोलीच्या बाहेर पडला.

अनातोल त्याच्यामागून नेहमीच्या आळ्यतेने जाऊ लागला. मात्र त्याची मुद्रा अस्वस्थ दिसत होती. आपल्या खोलीत शिरताच पीएरने दरवाजा लावून घेतला. अनातोलकडे न पाहता त्याला उद्देशून तो म्हणाला, ' तू काउंटेस रोस्तॉफला लग्नाचं वचन दिलंस का ? तू तिला पळवून नेण्याचा प्रयत्न केला होतास का ? '

अनातोल फ्रेंचमधे म्हणाला, ' सद्गृहस्था, अशा सुरात विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देण्याचं बंधन माझ्यावर आहे असं मी मानीत नाही. '

मघा पांढराफटक असलेला पीएरचा चेहरा आता संतापाने वेडावाकडा झाला. त्याने आपल्या मोठाल्या पंजाने अनातोलची कॉलर पकडली आणि अनातोल चांगलाच भेदरून जाईपर्यंत त्याने त्याला गदगदा हालवले.

' तू एक नंबरचा पाजी, बदमाष इसम आहेस. तुझं मस्तक मी अद्याप फोडून कसं काढलं नाही याचंच मला आश्चर्य वाटतं. ' पीएर फ्रेंचमधे बोलत होता त्यामुळे त्याचे बोलणे अतिशय भयानक कृत्रिम वाटत होते. त्याने भलेमोठे पेपरपेट घेतले आणि त्याने अनातोलला धमकावण्यासाठी त्याच्या दिशेने उगारले. मग लागलीच ते जागच्या जागी ठेवून दिले.

' तू तिला लग्नाचं वचन दिलं होतंस काय ? '

' मी...मी ..मला नाही वाटत...मी मुळीच वचन दिलं नाही तरीपण...'

पीएरने त्याला पुढे बोलू न देता विचारले. ' तुझ्याकडे तिची काही पत्रं आहेत का ? सांग

लवकर ' त्याच्या अंगावर जात पीएरने विचारले, त्याच्याकडे दृष्टी टाकून अनातोलने एकदम खिशात हात घालून पत्रे काढून मुकाट्याने पीएरच्या ताब्यात दिली.

पीएरने पत्रे घेतली. मार्गात असलेले टेबल बाजूला सारले आणि त्याची स्थूल मूर्ती सोफ्यावर बसली.

अनातोल भेदरलेला पाहून पीएर म्हणाला, ' घाबरू नकोस, मला हाणामारी करायची नाही.' एखादा धडा पाठ केल्यासारखा तो पत्रे मोजू लागला. क्षणभर शांतता पसरली. मग तो उठून येरझारा घालता घालता म्हणाला, ' उद्या तुला मॉस्को सोडून जावं लागेल.'

' ते कसं शक्य आहे ? '

त्याच्याकडे लक्ष न देता पीएर बोलू लागला, ' तू आणि तरुण काउंटेस यांमधे काय घडलं त्याबद्दल तू एक चकार शब्द कुठे बोलता कामा नयेस. तुझ्या हालचालींना मी पायबंद घालू शकत नाही याची जाणीव आहे. पण तुला सदसद्विवेक बुद्धीची काही चाड असेल तर...' पीएर कितीतरी वेळ खोलीत येरझारा घालीत राहिला. अनातोल कपाळाला आठ्या घालून, दातओठ खात टेबलाजवळ बसला होता.

' आपल्या स्वतःच्या सुखाखेरीज इतरांच्या सुखाच्या, इतरांच्या मनःशांतीचा तू विचार केला पाहिजेस. केवळ स्वतःच्या करमणुकीसाठी, स्वतःच्या चैनीसाठी तू दुसऱ्याचं जीवन बरबाद करीत आहेस हे विसरू नकोस. माझ्या बायकोसारख्या स्त्रियांबरोबर तू चैन करायला हरकत नाही. तिथं तुझा तू मुखत्यार आहेस. तुला काय पाहिजे हे त्या स्त्रियांना ठाऊक असतं. त्याही दुर्गुणी असल्याने तुझ्याशी मुकाबला करायला त्या सज्ज असतात. पण एखाद्या मुलीला लग्नाचं वचन देणं, फसवणं, चोरी करणं...यांतील कोणतीही गोष्ट वृद्धावर नाहीतर लहान मुलावर हल्ला करण्याइतकीच नीच आहे हे तू विसरू नकोस.' पीएर बोलायचा थांबला आणि अनातोलकडे पाहू लागला. आता त्याच्या नजरेत रागापेक्षा जिज्ञासाच अधिक होती. ' तुला प्रवासाला पैशाची जरुरी पडेल. त्यासाठी हे पैसे घेऊन जा.'

अनातोलने स्मित केले.

त्याच्या मुद्रेवरील क्षुद्रता आणि लाचारी पाहून पीएरचे माथे भडकले. आपल्या पत्नीच्या चेहऱ्यावर हेच स्मित त्याने पाहिलेले होते.

' एकजात नीच, अधम माणसं साली.' तो ओरडून खोलीबाहेर पडला.

दुसऱ्या दिवशी अनातोल पीटर्झबर्गला निघाला.

मार्या दिमित्र्येवनाने कुरॅगिनला मॉस्कोतून घालवून द्यायला सांगितले होते. पीएरने ती कामगिरी पार पाडली होती. ते सांगण्यासाठी तो मार्या दिमित्र्येवनाकडे आला. त्याला सगळ्या घरात खळबळ माजलेली दिसली. नताशा खूप आजारी झाली होती. मार्या दिमित्र्येवनाने

त्याला एका बाजूस नेऊन सांगितले तेव्हा त्याला कळले. अनातोलचे लग्न झाले आहे हे कळले त्याच्या दुसऱ्या दिवशी नताशाने कुठून तरी आर्सेनिक मिळवले आणि थोडेसे गिळताच ती पार भेदरून गेली आणि तिने सोन्याला उठवले आणि आपण काय केले ते सांगितले. योग्य वेळी उतारा देण्यात आल्याने ती बचावली, पण ती इतकी अशक्त झाली की तिला गावी नेण्याची गोष्ट कुणी स्वप्नातही काढीत नव्हता. काउंटसेला बोलावणे पाठवले गेले. पीएरने आपत्तीत सापडलेल्या काउंटची आणि रडणाऱ्या सोन्याची भेट घेतली. त्याला नताशाला भेटता आले नाही.

त्या दिवशी पीएरने क्लबमधे जेवण घेतले. काउंटेस नताशा रोस्तॉफला पळवून नेण्याचा प्रयत्न करण्यात आला ही गोष्ट प्रत्येकजण बोलत होता. पीएरने ह्या वार्तेचा इन्कार केला. त्याने सर्वांना सांगितले, 'ह्या अफवेच्या मुळाशी एकच गोष्ट आहे. माझ्या मेव्हण्यानं त्या मुलीला मागणी घातली होती आणि त्याला नकार मिळला होता.' खरा प्रकार दडवून काउंटेस नताशाचा लौकिक जपणे आपले कर्तव्य आहे असे पीएरला वाटत होते.

प्रिन्स आन्द्रे आल्यानंतर काय होते नि काय नाही याची त्याला धास्ती पडली. प्रत्येक दिवशी तो थोरल्या काउंटकडे जाऊन प्रिन्स आन्द्रे आला की काय हे विचारून येई.

शहरात सुरू असलेल्या सगळ्या अफवा प्रिन्स निकोलाय अंद्रीचला बूरिअनबाईमार्फत कळत असत. प्रिन्स निकोलाय पूर्वीपेक्षा अधिक प्रसन्न मनःस्थितीत होता. तो मोठ्या अधीरतेने आपल्या मुलाच्या येण्याची प्रतीक्षा करीत होता.

प्रिन्स आन्द्रे मॉस्कोला आल्याबरोबर त्याच्या वडिलांनीच त्याला नताशाने पळून जाण्याचा कसा प्रयत्न केला होता ते सांगितले.

प्रिन्स आन्द्रे रात्री आल्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी त्याच्या भेटीला पीएर आला. नताशाप्रमाणेच प्रिन्स आन्द्रेचीही मनःस्थिती झाली असेल अशी पीएरची कल्पना होती. पण पीटर्सबर्गमधील कसल्यातरी कारस्थानाबद्दल तावातावाने बोलणाऱ्या प्रिन्स आन्द्रेचा आवाज अभ्यासिकेतून कानावर येताच पीएरला आश्चर्य वाटले. थोरला प्रिन्स आणि कुणीतरी त्याला मधूनमधून अडवीत असल्याचे ऐकू येत होते. प्रिन्सेस मार्या पीएरच्या स्वागतासाठी बाहेर आली. तिने उसासा टाकला. प्रिन्स आन्द्रे असलेल्या खोलीच्या दाराकडे नजर टाकून त्याच्या दुःखात आपण सहभागी असल्याचे तिने दाखवले. पण तिच्या मुद्रेवरून पीएरला कळून चुकले. जे घडले त्याबद्दल आणि आपल्या नियोजित वधूच्या विश्वासघाताची बातमी प्रिन्स आन्द्रेने ज्या तऱ्हेने ऐकून घेतली त्याबद्दल तिला आनंद झाल्याचे दिसत होते.

ती म्हणाली, 'असं घडेल याची आपणास कल्पना होती असं तो म्हणाला. तो इतका मानी आहे की आपल्या भावना व्यक्त करणार नाही. पण काही झालं तरी त्यानं माझी कल्पना होती त्याहून चांगल्या तऱ्हेनं सहन केलं. असं घडायचं होतं असं दिसतं...'

'पण खरोखर या प्रकरणाचा शेवट झाला आहे का?'

प्रिन्सेस मार्या त्याच्याकडे आश्चर्याने पाहू लागली. त्याने असा प्रश्न कसा विचारला ते तिला

कळेना. पीएर अभ्यासिकेत शिरला. प्रिन्स आन्द्रेमध्ये आता खूप बदल झाला होता. तो अधिक दांडगा दिसत होता. पण त्याच्या दोन्ही भिवयांमध्ये एक नवीन आडवी रेषा उमटली होती. साधा पोषाख करून तो आपले वडील आणि मेशचेर्स्की त्याच्यासमोर उभा राहून तावा-तावाने वाद करीत होता, जोराजोराने हातवारे करीत होता.

त्यांच्या वादाचा विषय होता स्पेरान्स्की. स्पेरान्स्कीला कामावरून काढून टाकण्यात आले होते. त्याने देशद्रोह केला असावा असे बोलले जात होते. मॉस्कोमधे ह्या वार्ता येऊन थडकल्या होत्या.

प्रिन्स आन्द्रे बोलत होता, 'महिन्यापूर्वी जे त्याच्याबद्दल ( म्हणजे स्पेरान्स्कीबद्दल ) उत्साहानं बोलत होते आणि ज्यांना त्याची धोरणं समजण्याची कुवत नव्हती ते लोक त्याच्यावर आता टीका करतील, त्याचा निषेध करतील. एकदा मनुष्य मर्जीतून उतरला म्हणजे त्याचा निषेध करणं सोपं असतं, लोकांच्या सगळ्या चुकांचं खापर त्याच्या माथ्यावर मारणं सोपं असतं. पण मी ठामपणं सांगतो आजच्या राजवटीत कोणी मोलाची कामगिरी बजावली असेल तर ती फक्त त्यानंच बजावली आहे, दुसऱ्या कुणीही नाही.' पीएर दृष्टीस पडताच प्रिन्स आन्द्रे थांबला. त्याची मुद्रा थरथरली. मुद्रेवर सूडाची भावना उमटली. 'त्याला पुढील पिढ्याच न्याय देतील.' असे बोलून तो पीएरकडे वळून म्हणाला. 'कसं काय चाललं आहे? आपला अधिकाधिक लठ्ठ होतो आहेस.' असे बोलताना त्याच्या कपाळावरील आठी अधिक खोल उमटली. 'मी ठीक आहे.' पीएरच्या प्रश्नास त्याने उत्तर देऊन स्मित केले. त्याच्या स्मिताचा अर्थ होता— 'मी ठीक आहे. पण माझ्या धडधाकट शरीराचा कोणालाच उपयोग नाही.'

पोलंडच्या आघाडीपासूनचा भयंकर रस्ता, स्विट्झर्लंडमधे भेटलेली पीएरच्या ओळखीची माणसे आणि मुलाच्या शिक्षणासाठी स्विट्झर्लंडमधून आणलेला देसॅले यांबद्दल त्याने पीएर-कडे थोडा वेळ गोष्टी केल्या. दोन वृद्धांनी स्पेरान्स्कीबद्दल संभाषण चालू ठेवले होते त्यात प्रिन्स आन्द्रेने पुन्हा तळमळीने भाग घेतला.

'त्याने देशद्रोह केला असता आणि नेपोलिअनशी त्याने चोरटे संधान बांधल्याबद्दलचे पुरावे असते तर ते जाहीर केले गेले असते.' प्रिन्स आन्द्रे तावातावाने बोलत होता. 'व्यक्तिशः मला स्पेरान्स्की आवडला नव्हता आणि आताही आवडत नाही. पण मला न्याय प्रिय आहे.'

अतिशय दुःखद असणारे, अंतःकरण व्यापून टाकणारे विचार दडपून टाकण्यासाठीच प्रिन्स आन्द्रे नेहमीच स्वतःचा संबंध नसलेल्या गोष्टींची चर्चा करण्याची आणि खळबळजनक गोष्टींत रमण्याची इच्छा धरी. त्याची ती इच्छा पीएरला चांगली ठाऊक होती. त्या इच्छेची आज त्याला ओळख पटली.

प्रिन्स मेशचेर्स्की निघून गेल्यावर प्रिन्स आन्द्रेने पीएरचा हात धरून त्याला आपल्याकडे येण्याचे आमंत्रण दिले. त्याच्या खोलीत घडी करता येण्याजोगा पलंग होता, उघड्या ट्रंका व पेट्या होत्या. प्रिन्स आन्द्रेने एका ट्रंकेतून बॅग काढली आणि तीतून पत्रांचा जुडगा काढला.

आन्द्रेची प्रत्येक कृती शांतपणे आणि भरभर होत होती. तो उठून खाकरला. त्याच्या कपाळाला आठ्या पडल्या. त्याचे ओठ गच्च मिटले होते.

'तुला त्रास देतो आहे. क्षमा कर...' प्रिन्स आन्द्रे आता नताशाबद्दल बोलणार आहे याची पीएरला कल्पना आली. त्याच्या मुद्रेवर सहानुभूती आणि दया उमटली. त्याच्या मुद्रेवरील भावामुळे प्रिन्स आन्द्रेला चीड आली. तो ठामपणे, स्पष्टपणे आणि कडवटपणे म्हणाला, 'काउंटेस रोस्तॉफनं मला नकार कळवला आहे. तुझा मेहुणा तिच्याशी लग्न करू बघत होता अशी अफवा माझ्या कानांवर आली आहे ती खरी आहे काय ? '

'खरीही आहे आणि खोटीही आहे' पीएर सांगू लागला. तोच त्याला मधेच अडवून प्रिन्स आन्द्रे म्हणाला, 'ही बघ तिची पत्रं आणि तिची छबी.' त्याने टेबलाच्या खणांतून पत्रांचा जुडगा काढून पीएरला दिला.

'तुला ती भेटली तर हे सारं तिला देऊन टाक.'

'ती फार आजारी आहे.' पीएर म्हणाला.

'म्हणजे ? ती अजून इथंच आहे? मग प्रिन्स कुरॅगिन कुठं आहे?' तो भरभर बोलत होता.

'तो निघून गेल्याला खूप दिवस झाले. ती मात्र मृत्युशय्येवर आहे.'

'तिच्या आजाराची बातमी ऐकून मला फार वाईट वाटतं', प्रिन्स आन्द्रे म्हणाला. तो वडिलांप्रमाणे दुष्टपणे भेसूर हसला.

'काउंटेस रोस्ताफला लग्न करून उपकृत करावं असं कुरॅगिनला वाटलं नाही तर ?' प्रिन्स आन्द्रे सारखा फुरफुरत होता.

'त्याचं लग्न झालेलं असल्यानं त्याच्याशी तिला लग्न करता आलं नसतं.' पीएर म्हणाला.

प्रिन्स आन्द्रे आपल्या वडिलांप्रमाणे भेसूर हसला.

'आता तो तुझा मेहुणा कुठं आहे ? हरकत नसेल तर सांग.'

'तो बहुधा पीटर्झबर्गला...मला निश्चित ठाऊक नाही.'

तशी प्रिन्स आन्द्रे म्हणाला, 'काउंटेस रोस्तॉफला माझा निरोप सांग—ती पूर्ण स्वतंत्र होती आणि आहे. तिला सुखी समृद्ध जीवन लाभावं अशी मी इच्छा करतो.'

'हे बघ. तुला आपली पीटर्झबर्गमधील चर्चा आठवते का ?' पीएरने विचारले.

प्रिन्स आन्द्रे घाईघाईने म्हणाला, 'मला आठवतं. मी म्हणालो होतो पतित स्त्रियांना क्षमा केली पाहिजे. पण मी क्षमा करीन असं मी म्हणालो नव्हतो. मला ते शक्य नाही.'

'तू अशी तुलना का करतो आहेस ?' पीएरने विचारले. त्याला बोलू न देता प्रिन्स आन्द्रे कर्कश सुरात ओरडला, 'पुन्हा तिला मागणी घालायची, औदार्य दाखवायचं आणि अशा तऱ्हेच्या गोष्टी करायच्या—तसं वागणं थोर असेल पण मी अशा थोरांच्या मार्गानं चालणारा नाही. तुला माझी मैत्री हवी असेल तर पुन्हा त्याबद्दल एक शब्द बोलू नकोस...तू ते सारं देशील ना ?'

पीएर तेथून निघाला तो थोरला प्रिन्स आणि प्रिन्सेस मार्या यांच्याकडे आला.

त्यांच्याकडे पाहाताच त्यांना रोस्तॉफकुटुंबाबद्दल किती घृणा वाटत असावी त्याची कल्पना पीएरला आली. कोणत्याही पुरुषाखातर प्रिन्स आन्द्रेला सोडून देणाऱ्या त्या मुलीचं केवळ नावही ह्या माणसांच्या देखत उच्चारणे अशक्य आहे असं पीएरला वाटू लागले.

प्रिन्स आन्द्रेचे काम करण्यासाठी पीएर त्या रात्री रोस्तॉफकुटुंबाकडे गेला. नताशा अंथरुणात पडली होती. थोरला काउंट क्लबमध्ये गेला होता. सोन्याच्या हवाली पत्रं करून पीएर मार्या दिमित्र्येवनाला भेटायला गेला. प्रिन्स आन्द्रेवर त्या बातमीचा परिणाम काय झाला हे जाणून घ्यायला ती उत्सुक होती. दहाबारा मिनिटांत सोन्या तिथे येऊन पोचली आणि म्हणाली, 'पीएरनं भेटून जावं असा नताशाचा आग्रह आहे.'

'त्याला तिच्याकडे घेऊन जायचं म्हणतेस? तिथं तर सगळा गोंधळ आहे.' मार्या दिमित्र्येवना म्हणाली.

'पोषाख करून ती दिवाणखान्यात आली आहे' सोन्या म्हणाली.

मार्या दिमित्र्येवनाने खांदे उडवले आणि ती पीएरला म्हणाली, 'थोरली काउंटेस कधी येणार कुणास ठाऊक. हिनं मला फारच हैराण केलं आहे. हे बघ तू तिला सगळं काही सांगू नकोस. त्या बिचारीची मला इतकी करुणा येते. तिला दम भरायला माझं मन धजत नाही.'

दिवाणखान्याच्या मध्यभागी उभी असलेली नताशा कृश आणि फिकट दिसत होती. तिचा चेहरा निर्विकार दिसत होता. पीएरला वाटले होते तशी ती शरमिंधी झालेली दिसत नव्हती. पीएरला दारात दिसताच तिची धांदल उडाली. तो आला म्हणून थांबावे का त्याला सामोरे जावे हे तिला कळेना.

पीएर घाईघाईने तिच्याजवळ आला. नेहमीप्रमाणे ती आपला हात पुढे करील असे त्याला वाटले. ती त्याच्याजवळ आली तेव्हा कष्टाने श्वास घेऊ लागली. खोलीच्या मध्यभागी गाण्यासाठी उभी राहताना जशी ती उभी राहायची तशी ती उभी राहिली होती, तिने निर्जीवपणे आपले हात सोडले होते. आता तिच्या मुद्रेवर गाण्याच्या वेळचे भाव बिलकुल नव्हते. ती भरभर बोलू लागली, 'प्योत्र किरिलिच, प्रिन्स बोलकॉन्स्की तुमचा मित्र होता—तुमचा मित्र आहे.' तिने आपले विधान दुरुस्त केले (सगळ्या घटना भूतकाळात घडल्या होत्या. आता सगळ्या गोष्टी बदलल्या आहेत असे तिला वाटू लागले होते) त्यानं मला तुमच्याकडे काय हवं असेल ते मागायला सांगितलं होतं.'

तिच्याकडे पाहताना पीएरला काही बोलवले नाही. त्याचा गळा दाटून आला. आतापर्यंत त्याने तिला दोष दिला होता. तिचा तिरस्कार केला होता. आता तिला त्याची इतकी दया आली की त्याचे मन तिला मुळीच दोष देईनासे झाले.

'तो इथं आलेला आहे ... त्याला सांगा...मला क्षमा करायला सांगा ...' ती थांबली. तिचा श्वासोच्छ्वास आणखी वेगाने सुरू झाला, पण ती रडली नाही.

'सांगेन...मी त्याला सांगेन... पण ...' पुढे काय बोलावे ते पीएरला सुचले नाही.

पीएरच्या मनात कोणते विचार आले असतील त्याची नताशाला कल्पना आली आणि ती दुःखी झाली.

ती घाईघाईने म्हणाली, ' सगळ्या गोष्टींचा शेवट झाला याची मला कल्पना आहे. आता तसं घडणार नाही. मी त्याचा अपराध केला आहे म्हणून मला दुःख भोगणं भाग आहे. त्याला माझी एवढीच विनंती सांगा. माझ्याकडून घडलेल्या सर्व गोष्टींची त्यानं मला क्षमा करावी. क्षमेखेरीज मला काही नको आहे. ' तिचे सर्वांग शरीर थरथरू लागले. ती खुर्चीत बसली.

' मी सांगेन त्याला पुन्हा एकदा. सगळं सांगेन, पण मला एक गोष्ट जाणून घ्यायची आहे. '

' काय जाणून घ्यायचं आहे ? ' नताशाचे डोळे विचारीत होते.

' मला जाणून घ्यायचं आहे ... तुझं त्याच्यावर प्रेम होतं का ? '

पीएरला अनातोलला काय म्हणावे कळेना. त्याच्या विचाराने तो लालबुंद झाला होता. ' तुझं त्या माणसावर प्रेम होत का ? '

' मला ठाऊक नाही. . .मला ठाऊक नाही. . .' ती पुन्हा रडू लागली. कधी नव्हे ती पीएरच्या अंतःकरणात दया, आपुलकी आणि प्रीतीची भावना निर्माण झाली आणि तो हेलावून गेला. आपल्या डोळयांतून अश्रू येत असल्याची त्याला जाणीव झाली.

' पोरी, आपण त्याबद्दल आता काही बोलू या नको ' तो म्हणाला. त्याचे मृदू , प्रेमळ, सहानुभूतीने ओथंबलेले शब्द ऐकून तिला एकदम आश्चर्य वाटले. ' आता त्याबद्दल आपण बोलू या नको. मी त्याला सगळं सांगेन. मी तुला आग्रहानं सांगतो. मला तू आपला मित्र समज. तुला मदत हवी असेल, काही सल्ला हवा असेल तर माझी आठवण ठेव...आता नको. '

त्याने तिचा हात हातात घेऊन त्याचे चुंबन घेतले. ' तुझ्यासाठी काही करायला मला आनंदच वाटेल ... ' पीएरचा आता गोंधळ उडाला होता.

पीएरने तिचा हात पकडून ठेवला नसता तर ती खोलीच्या बाहेर पडली असती. आपण आणखी काही बोलले पाहिजे असे त्याला वाटले. जेव्हा तो बोलला तेव्हा त्याला आपल्याच बोलण्याचे आश्चर्य वाटले.

' निराश होऊ नकोस. तुझ्या जीवनाला आता कुठं सुरुवात झाली आहे ' तो तिला म्हणाला. ' जीवन संपलं आहे असं का म्हणतेस तू ? मी जर दुसरा कुणी असतो, अत्यंत देखणा, हुशार आणि श्रेष्ठ पुरुष असतो आणि माझा मी स्वतंत्र असतो तर आता ह्याच क्षणी तुझ्यासमोर गुडघे टेकून तुला मागणी घातली असती. '

कित्येक दिवसांनंतर प्रथमच नताशाच्या डोळयांत कृतज्ञतेचे अश्रू उभे राहिले. तिच्या अंतःकरणातील खळबळ शांत झाली. पीएरकडे दृष्टिक्षेप टाकून ती खोलीबाहेर निघाली.

पीएर तिच्या मागोमाग प्रवेशदालनातून धावत सुटला. त्याचा गळा दाटून आला होता. त्याने आनंदाश्रू आवरून धरले होते. हात सारता न आल्याने त्याने लोकरीचा कोट नुसताच अंगावर घेतला आणि तो गाडीत शिरला.

' महाराज, कुठं जायचं ? ' गाडीवानाने विचारले. पीएर स्वतःशीच बोलू लागला, ' कुठं जायचं बरं ? मी आता कुठं जावं बरं ? क्लबमध्ये जाण्यात अर्थ नाही. मला कोणाला भेटावंसंही वाटत नाही.' त्याच्या अंतःकरणात दाटून येणारे प्रेम आणि सौख्य, तसेच तिने भरल्या डोळ्यांनी शेवटच्या क्षणी त्याच्याकडे टाकलेली हळुवार व कृतज्ञ दृष्टी यांच्या तुलनेने त्याला सगळी माणसे दयनीय, गरीब वाटू लागली.

' घरी जायचं ' बाहेर कडाक्याचा गारठा होता तरीदेखील पीएरने आपल्या विशाल छातीवरील लोकरी कोटाची बटणे काढली होती. आनंदामुळे त्याचा श्वासोच्छ्वास वेगाने होत होता.

आकाश निरभ्र होते, कडाक्याची थंडी पडली होती. घाणेरडे रस्ते मधून मधून प्रकाशात होते, छपरे काळीभोर दिसत होती. वर आकाशात चांदण्या चमकत होत्या.

# भाग नववा

## १८१२

युद्ध सुरू होईल असे सर्वांनाच वाटत होते. ते अखेर सुरू झाले.

राजदरबारातील प्रिन्स, ड्यूक, राजे आणि एक सम्राट यांच्या कोंडाळ्यात तीन आठवडे घालवल्यावर नेपोलिअन ड्रेझ्डनहून २९ मे रोजी निघाला. तो सहा घोड्यांच्या गाडीतून निघाला होता. त्याच्या पुढे मागे व बाजूला हुजरे, ॲडज्युटंट आणि सशस्त्र संरक्षक सैनिक होते. पॉसेन, थॉर्न डॅन्झिग आणि कॉनिग्झबर्ग या शहरांतून जाताना हजारो लोकांनी आनंदाने व भीतीनेही त्याचे स्वागत केले.

त्याचे सैन्य पश्चिमेकडून पूर्वेकडे चालले होते. त्यामागून त्याची गाडी चालली होती. टप्प्याटप्प्यावर ताज्या दमाचे सहा घोडे थकलेल्या घोड्यांऐवजी जोडले जात होते. दहा जून रोजी त्याने सैन्याला मागे टाकून रात्री विल्कॉविक अरण्यात मुक्काम केला. पोलिश काउंटच्या शेतवाडीवर त्याच्यासाठी निवासस्थान सुसज्ज ठेवलेले होते.

दुसऱ्या दिवशी नेपोलिअनची गाडी सैन्याला मागे टाकून नीमन नदीकडे आली. नदी पार करणाऱ्या सैन्याची पाहणी करण्यासाठी त्याने पोलिश गणवेष चढवला आणि तो घोड्यावरून काठाकाठाने फिरू लागला.

पलीकडच्या काठावर कोसॅकांनी तळ ठोकला होता. त्यापलीकडे असलेल्या विस्तीर्ण माळावर खूप दूरवरची साम्राज्याची राजधानी पवित्र मॉस्को शहर दिसत होते. तातडतोब पुढे घुसण्याचा आदेश देऊन नेपोलिअनने मुत्सद्द्यांना चकित केले आणि युद्धाच्या डावपेचाचे नियमही झुगारले.

नेपोलिअन आल्याचे सैनिकांना ठाऊक होते. ते त्याला शोधीत होते. तो समोरच्या

टेकडीवर आपल्या तंबूसमोर मोठा कोट घालून उभा असलेला दिसताच त्यांनी टोप्या उडवीत जयजयकार केला. ' सम्राट चिरायू होवोत. ' प्रचंड अरण्यात लपलेले सैन्य आता बाहेर पडू लागले. रेजिमेंट मागून रेजिमेंट बाहेर पडू लागली. तीन पुलांवरून नदी पार करण्यासाठी सैनिकांचे विभाग पडू लागले.

दीर्घकाळ ज्या मोहिमेची प्रतीक्षा केली होती ती मोहीम सुरू झाली होती. त्यामुळे झालेला आनंद, उत्साह आणि समोरच्या टेकडीवर उभ्या असलेल्या व्यक्तीवरील भक्ती एकजात सर्वांच्या मुद्रेवर उमटली होती.

सैन्याची पाहणी करीत आणि डावपेचांचा अभ्यास करीत रशियाच्या सम्राटाने व्हिलना येथे महिन्याहून अधिक काळ घालवला. युद्ध होणार अशी सर्वच अपेक्षा करीत होते. युद्धाची तयारी करण्यासाठी जरी झार पीटर्सबर्गहून आला होता तरी त्या दिशेने काहीच तयारी झाली नव्हती. लढाईची सर्वसाधारण योजना आखलेली नव्हती. मुख्य ठाण्यावर झार महिनाभर राहिल्यानंतर त्याला सुचवलेल्या योजना आणि त्यांतील एकही अमलात आणता येऊ नये अशी असमर्थता यातील अनिश्चितता पूर्वीहून अधिक नजरेत भरणारी होती. सैन्याच्या तीनही दलांचे नेतृत्व वेगवेगळे कमांडर-इन्-चीफ करीत होते. त्या सर्वांवर सत्ता असलेला कमांडर मात्र नव्हता. झारने अशा कमांडर-इन्-चीफची कामगिरी स्वतःकडे घेतली नाही.

झारचा व्हिलना येथील मुक्काम जसजसा लांबत चालला तसतशी रशियन सैन्याची लढाईची तयारी अधिकाधिक मंदावू लागली. युद्धाची प्रतीक्षा करून करून सैन्य कंटाळले होते. सम्राटांचा वेळ मजेत कसा जाईल आणि ते होऊ घातलेले युद्ध कसे विसरतील यासाठी त्यांच्या भोवती असलेल्या सर्व माणसांची धडपड चाललेली होती असे वाटत होते.

प्रतिष्ठित पोलिश व्यक्ती, दरबारी लोक आणि स्वतः झार नाचसमारंभादी उत्सव साजरे करीत होते. झारचे मदतनीस असलेल्या पोलिश जनरलांपैकी एकाने 'सर्व अधिकाऱ्यांनी झारच्या सन्मानार्थ भोजन आणि नाचसमारंभ योजावा' असे जून महिन्यात सुचवले. त्या सूचनेला सर्वांनी उचलून धरले. झारनेही त्या बेतास संमती दिली. झारच्या सैन्यातील अधिकाऱ्यांनीही आवश्यक ती वर्गणी जमविली. रसिक झारला जास्तीत जास्त पसंत पडेल अशा स्त्रीची यजमानीण म्हणून निवड झाली. काउंट बेनिंग्झनच्या मालकीची जमीन व्हिलना प्रांतात होती. त्याने ह्या समारंभासाठी शहराबाहेरील घर दिले. काउंट बेनिंग्झनच्या उपनगरातील घरी तेरा जून रोजी नाचसमारंभ, भोजनसमारंभ, होड्यांची शर्यत आणि दारुकाम हे कार्यक्रम करण्याचे ठरले.

ज्या दिवशी नेपोलिअनने नीमननदी ओलांडण्याचा हुकूम दिला होता आणि त्याचे सैनिक रशियन सरहद्दीत घुसून कोसॅकांना मागे हटवीत होते त्याच दिवशी अलेक्झांडर आपल्या

सल्लागार मंडळातील जनरलांनी काउंट बेनिग्झनच्या घरी योजलेल्या नाचसमारंभात सहभागी झाला होता.

समारंभाचे वातावरण अतिशय आनंदी होते. तिथे जमल्या होत्या तेवढ्या सुंदर स्त्रिया अन्यत्र क्वचितच जमल्या असतील असे रसिकांचे मत पडले. पीटर्सबर्गपासून व्हिलनापर्यंत झार मागून ज्या रशियन स्त्रिया गेल्या होत्या त्यांमध्ये काउंटेस बेझुहॉव्ह होती. ती नाचसमारंभाला हजर होती. तिच्या सौंदर्याच्या रांगड्या रशियन घाटणीमुळे तिच्याहून सुसंस्कृत असलेल्या पोलिश स्त्रिया फिक्या पडल्या होत्या. ती सगळ्यांचे लक्ष वेधून घेत होती. झारला देखील तिच्याबरोबर नृत्य करून तिच्यावर कृपा दाखवावी असे वाटले.

बोरिस द्रबेत्स्कॉयने आपल्या पत्नीला मॉस्को येथे सोडले होते. त्याच्या भाषेत तो आता व्हिलना येथे ब्रह्मचाऱ्याचे जीवन घालवीत होता. तोही समारंभाला आला होता. तो जरी स्टाफवरील जनरल नव्हता तरीही त्याने नाचसमारंभाला भली मोठी वर्गणी दिली होती. बोरिस आता श्रीमंत झाला होता आणि मोठमोठे सन्मान मिळवीत होता. आता तो कोणाच्या कृपाछत्राच्या शोधात नव्हता. उलट आपल्या समकालीन अतिशय विख्यात व्यक्तींच्या बरोबरीचे स्थान त्याने मिळवले होते. व्हिलना येथे तो एलनला भेटला. तिला तो बरेच दिवस भेटला नव्हता. एलनवर अत्यंत प्रतिष्ठित व्यक्तींचा लोभ होता. बोरिसचे नुकतेच लग्न झाले होते. त्यांनी भेटल्यावर गतकाळचा उल्लेख केला नाही. दोन जुने सुस्वभावी मित्र भेटावेत तशी ती दोघे भेटली.

मध्यरात्र झाली तरी नृत्य चालूच होते. एलनला नाचायला कुणी योग्य साथीदार मिळाला नव्हता म्हणून तिने आपणहूनच बोरिसला मझुर्का नृत्य करायला बोलावले. नृत्यात भाग घेणारे ते तिसरे युगुल होते.

काळे तलम वस्त्र परिधान केलेल्या आणि अंगावर अलंकार घातलेल्या एलनचे सुंदर उघडे खांदे बोरिस थंडपणे निरखीत होता. तिच्याशी जुन्या ओळखीच्या माणसांबद्दल बोलत होता. इतरांना आणि त्याला स्वतःलाही आपण एकसारखे खोलीत असलेल्या झारकडे पाहात आहोत याची मुळीच जाणीव नव्हती. झार नृत्य करीत नव्हता. तो दरवाजात उभा होता आणि एकेका व्यक्तीला थांबवून तिची मोठ्या जिव्हाळ्याने विचारपूस करीत होता.

मझुर्का नृत्याला आरंभ करताना बोरिसने पाहिले. जनरल बॅलाशॉव्ह–झारच्या खास गोटातील अधिकारी–झारजवळ गेला. झार एका पोलिश स्त्रीशी बोलत असताना तो शिष्टाचार सोडून त्याच्या शेजारी उभा राहिला. त्या स्त्रीशी चार शब्द बोलून झाल्यावर झारने प्रश्नार्थक मुद्रेने बॅलाशॉव्हकडे पाहिले. तो काहीतरी प्रबल कारण असल्यामुळेच अशा तऱ्हेने वागत आहे हे झारच्या लक्षात आल्यावाचून राहिले नाही. त्याने मानेनेच त्या स्त्रीला जाण्याची खूण केली आणि आपण बॅलाशॉव्हकडे वळला. बॅलाशॉव्ह बोलू लागताच झारच्या चेहऱ्यावर आश्चर्य उमटू लागले. झार बॅलाशॉव्हचा हात हातात घेऊन प्रकाशित केलेल्या बागेत शिरला.

बोरिस मझुर्का नृत्य करीत असताना बॅलाशॉव्हने कोणती बातमी आणली असेल आणि

ती सर्वांच्या अगोदर आपणाला कशी मिळवता येईल या विचाराने त्रस्त झाला नृत्याच्या एका भागात त्याने एका स्त्रीची निवड करायची होती. त्या वेळी तो एलनला हलकेच म्हणाला, 'मला काउंटेस प्रोटॉस्कीची निवड करायची आहे. मला वाटते ती आता बाल्कनीमधे असावी.' मग तो तसाच बागेकडील दरवाज्याकडे गेला. झार आणि बॅलाशॉव्ह व्हरांड्याकडे येत असलेले पाहून तो तसाच स्वस्थ उभा राहिला. व्यक्तिगत अपमानाने चिडलेल्या माणसासारखा झार बोलत होता. 'युद्ध जाहीर न करता रशियात प्रवेश करतात म्हणजे काय? जेव्हा शत्रूचा एकही सशस्त्र सैनिक माझ्या देशात उरणार नाही तेव्हाच मी समेटाला मान्यता देईन.'

बोरिस आपले संभाषण आडून ऐकत होता. म्हणून आठ्या घालीत झार म्हणाला, 'ह्या गोष्टी दुसऱ्या कुणालाही कळता कामा नये.'

हे आपल्याला उद्देशून आहे हे बोरिसने ओळखले. डोळे मिटून त्याने डोके थोडेसे मागे कलते केले. झार पुन्हा नृत्याच्या दालनात गेला. तिथे तो आणखी अर्धा तास राहिला.

फ्रेंच सैन्याने नीमन नदी ओलांडल्याचे वृत्त ऐकणारा पहिला श्रोता होता बोरिस.

अनेक प्रतिष्ठित व्यक्तींना बोरिसने पटवून दिले—'इतरांना ठाऊक नसणाऱ्या अनेक गोष्टी बहुतेक करून मला ठाऊक असतात.' त्या सगळ्या लोकांच्या दृष्टीने बोरिसचे महत्त्व पूर्वीहून खूपच वाढले.

मॉस्को येथे पीएरला भेटल्यावर प्रिन्स आन्द्रे आपल्या कुटुंबियांना पीटर्झबर्ग येथे काम असल्याचे सांगून निघाला. खरे तर पीटर्झबर्गला त्याला अनातोल कुरॅगिनला भेटायचे होते. त्याला भेटणे त्याला आवश्यक वाटले होते. पीटर्झबर्ग येथे गेल्यावर त्याने त्याची चौकशी केली तेव्हा तो तिथे नव्हता. पीएरने आपल्या मेव्हण्याला प्रिन्स आन्द्रे शोधत असल्याचे कळवले होते. अनातोल कुरॅगिन मोठ्या त्वरेने युद्धमंत्र्याकडून कमिशन मिळवून मॉल्डेव्हीजा येथील सैन्यात दाखल होण्यासाठी निघून गेला होता.

पीटर्झबर्ग येथे असताना प्रिन्स आन्द्रे आपल्याशी नेहमी मैत्रीने वागणारा वृद्ध जनरल कुटूझॉफ याला भेटला. कुटूझॉफने त्याला आपल्या बरोबर मॉल्डेव्हीआला ये असे सुचवले. तेथील सैन्याचे नेतृत्व करायला तो जाणारच होता. कमांडरचा सल्लागार मदतनीस म्हणून प्रिन्स आन्द्रेची नेमणूक झाली आणि तो तुर्कस्थानकडे निघाला.

तो कुरॅगिनला प्रत्यक्ष भेटण्याचा प्रयत्न करीत होता. पण तुर्कस्थान येथील सैन्यातही त्याला कुरॅगिन भेटला नाही. प्रिन्स आन्द्रे तुर्कस्थानातील सैन्यात पोचल्यानंतर थोड्याच वेळात कुरॅगिन रशियाला निघून गेलेला होता.

नव्या प्रदेशात नव्या वातावरणात प्रिन्स आन्द्रेला जीवन सुसह्य वाटू लागले. नियोजित

वधूने केलेल्या विश्वासघातातून तो सावरला नव्हता. त्या दुःखाचा आपल्यावरील परिणाम इतरांपासून दडवण्याची तो शिकस्त करू लागला. जे वातावरण त्याच्या जीवनात सुख निर्माण करत होते ते आता त्याला दुःसह होऊ लागले. एकेकाळी अत्यंत महत्त्वाच्या वाटणाऱ्या स्वातंत्र्य आणि स्वावलंबन ह्या गोष्टी आता त्याला कटकटीच्या वाटू लागल्या. ऑस्टरलिट्सच्या रणक्षेत्रावर प्रथमच तो विचार करू लागला होता. पीएरच्या सहवासात असताना चिंतनात रंगून जाणे, त्याला आवडू लागले होते. बॉगुचेरॉव्होच्या एकान्तात, नंतर रोम व स्विट्झर्लंड-मधेही चिंतनशीलतेमुळे त्याचे जीवन समृद्ध, संपन्न झाले होते. एकाकाळी अमर्याद प्रकाशमार्ग ज्यांनी दाखवले होते त्या विचारांची त्याला आता धास्ती वाटू लागली. आता तो अगदी जवळच्या अतिशय व्यावहारिक गोष्टींमधे रस घेण्यात मग्न झाला. त्या जुन्या आदर्शांशी त्याचा दुरूनही संबंध राहिला नाही. जेवढ्या उत्सुकतेने तो व्यावहारिक गोष्टींत रुतू लागला तेवढ्या वेगाने जुने आदर्श त्याच्यापासून दूर जाऊ लागले. एकेकाळी त्याच्यावर असलेले अमर्याद अगाध आकाश एकाएकी बदलून त्याला गुदमरवून टाकणारे अरुंद भुयार बनले होते. त्यातील सर्व गोष्टी स्पष्ट होत्या, पण एकही मुळीच शाश्वत, अद्भुत नव्हती.

कुटूझॉफच्या हाताखाली त्याने जनरल ह्या नात्याने मोठ्या तळमळीने आणि चिकाटीने काम केले होते. त्याच्या कार्यतत्परतेमुळे आणि सदसद्विवेकबुद्धीमुळे कुटूझॉफ आश्चर्यचकित झाला होता. तुर्कस्थानमधे कुरॅगिनची भेट चुकली तेव्हा त्याला शोधण्यासाठी पुन्हा मागे रशियात घोडदौड करीत जावे असे काही प्रिन्स आन्द्रेला वाटले नाही. कुरॅगिनबद्दल त्याला खूप तिरस्कार वाटत होता. आपण आपली पातळी सोडून कुरॅगिनशी भांडावे एवढ्या लायकीचा तो नाही असे प्रिन्स आन्द्रे स्वतःला सारखा पटवून देण्याचा प्रयत्न करीत होता. तरीही त्याला वाटत होते —कितीही काळ लोटला तरी आपणाला त्याला द्वंद्वयुद्धाचे आव्हान दिल्यावाचून राहवणार नाही. उपाशी माणसाला अन्नाकडे धाव घेतल्यावाचून राहवत नाही तशी आपली स्थिती होणार आहे. तुर्कस्थानात आल्यापासून प्रिन्स आन्द्रेने कार्यमग्न असल्याचा, काहीसा महत्त्वाकांक्षी आणि अकारण उत्साही असल्याचा बहाणा करून उसने अवसान आणले होते. परंतु आपण अपमानाचा बदला अजून घेतला नाही, आपला राग अजून ओसरलेला नाही उलट तो आपल्या अंतःकरणात साठून आहे ह्या जाणिवेने त्याची वरवर शांत असलेली वृत्ती पोखरून निघत होती.

बुखारेस्ट येथे गेले चौदा महिने कुटूझॉफ आपल्या वॉलेकिअन बाईबरोबर दिवस घालवीत होता. १८१२ मध्ये नेपोलियनबरोबर युद्ध सुरू झाले. ती बातमी बुखारेस्टला पोचली तेव्हा प्रिन्स आन्द्रेने आपल्याला पश्चिमेकडील सैन्यात बदलावे अशी विनंती केली. नाहीतरी बॉल-कॉन्स्कीच्या आजवरच्या उत्साहामुळे कुटूझॉफला वैताग आलेलाच होता. त्याच्या उत्साहामुळे आपला आळस चांगलाच दूषणीय ठरतो असे त्याला सतत वाटत होते. त्यामुळे त्याला जाऊ देण्यास तो नेहमीच उत्सुक होता. त्याने प्रिन्स आन्द्रेला ब्राक्लीं द टॉल्यच्या नावे नेमणूकपत्र देऊन पाठवले.

पश्चिमेकडील सैन्य मे मधेच ड्रिसा येथे मुक्काम ठोकून होते. तिथे दाखल होण्यापूर्वी प्रिन्स आन्द्रे ब्लीक हिल्सला गेला. ब्लीक हिल्स स्मॉलेन्स्क राजरस्त्यापासून दोन अडीच मैलांवर होते.

गेल्या तीन वर्षांत प्रिन्स आन्द्रेच्या जीवनात विलक्षण स्थित्यंतरे घडून आली होती. त्याच्या भावनांत, विचारांत खूपच उलथापालथ झालेली होती. पूर्व व पश्चिम भागात भ्रमंती केल्यामुळे त्याने विविध प्रकारचे जीवन पाहिले होते. त्यामुळे ब्लीक हिल्समध्ये अगदी पूर्वीच्याच तऱ्हेने जीवन चालू असलेले पाहून त्याला आश्चर्य वाटले. दुतर्फा झाडी असलेल्या रस्त्यावरून घराच्या दगडी फाटकापर्यंत जाईतो त्याला घर जादूने भारलेल्या निद्रिस्त किल्ल्यासारखे वाटू लागले होते. घरामध्ये पूर्वीचेच गांभीर्य, पूर्वीचीच स्वच्छता आणि पूर्वीचीच शांतता आढळून आली. घरातील फर्निचर, भिंती, आवाज, गंध यांत काही फरक झाला नव्हता. तिथे पूर्वीचेच भेदरलेले चेहरे दिसत होते, पण ते आता पूर्वीहून अधिक प्रौढ, अधिक वृद्ध झाले होते एवढेच.

प्रिन्सेस मार्या पूर्वीचीच सामान्य भित्री मुलगी होती. तिच्या तारुण्याचा बहर ओसरलेला होता. तिच्या आयुष्यातील उत्तमोत्तम वर्षे सततच्या धास्तीत आणि दुःखात वाया जात होती. सगळ्या सुखांना आणि सगळ्या फायद्यांना आचवून ती केवळ जिणे कंठीत होती. बूरिअनबाई मात्र पूर्वीसारखीच स्वतःवर तृप्त असलेली, चवचाल स्त्री होती. जीवनातील प्रत्येक क्षणाचा आनंदाने उपभोग घेत होती. आपले भावी जीवन अतिशय सुखात जाणार असा जबर आशावाद बाळगून होती. तिच्यातील धिटाई काय ती वाढलेली आहे असे प्रिन्स आन्द्रेला वाटल्यावाचून राहिले नाही. स्वित्झर्लंडहून त्याने आणलेला ट्यूटर देसॅले ह्याने रशियन पद्धतीचा कोट घातला होता. तो नोकरांशी आताशा मोडकीतोडकी रशियन भाषा बोलू लागला होता. तोही पूर्वीसारखाच संकुचित मनाचा राहिला होता, पूर्वीसारखाच शिष्टाचाराचे पालन करणारा बनलेला होता, पूर्वीसारखाच सदसद्विवेक बुद्धीला स्मरून वागत होता. पांडित्यपूर्ण भाषेत गुरूपदेश करीत होता. थोरल्या प्रिन्समधे लक्षात येण्याजोगा बदल झाला होता. तो म्हणजे त्याचा बाजूचा एक दात पडला होता. स्वभाव मात्र पूर्वीसारखाच होता. जगात घडणाऱ्या गोष्टींबाबत तो पूर्वीहून अधिक त्रस्तपणे बोलत होता. अधिक पाखंडी वृत्तीने जगाकडे पाहात होता. निकोलुश्का काय तो खरोखर बदलला होता. तो अधिक उंच वाढला होता. त्याची कांती गुलाबी झाली होती. त्याचे केस काळेभोर, कुरळे झाले होते. जादूने भारलेल्या निद्रिस्त किल्ल्यातील तोचतोपणाच्या नियमाच्या बंधनाला त्यानेच काय ते झुगारलेले होते. बाह्यतः सर्व गोष्टी पूर्वीसारख्याच दिसत होत्या. परंतु प्रिन्स आन्द्रे पूर्वी असतानाचे संबंध तेथील माणसामाणसांत आता राहिले नव्हते. घरामध्ये परस्परांशी वैरभाव बाळगणारे दोन गट निर्माण झाले होते. ते परस्परांशी फटकून वागत, दूर राहात होते. प्रिन्स आन्द्रे आला होता म्हणून त्याच्याखातर ते त्याच्या उपस्थितीत आपल्या नेहमीच्या सवयी सोडून एकत्र आले होते. एका गटात थोरला प्रिन्स, बूरिअनबाई, आणि घरबांधकामगार हे होते. दुसऱ्या गटात प्रिन्सेस मार्या, देसॅले, निकोलुश्का आणि सगळ्या दासी होत्या.

प्रिन्स आन्द्रेचा मुक्काम ब्लीक हिल्स येथे असेपर्यंत कुटुंबातील सर्व मंडळी एकत्र भोजन करी, पण प्रत्येकजण बेचैन असे. आपल्याला पाहुण्यासारखे वागवण्यात येत आहे, आपल्यासाठी नियमांना अपवाद करण्यात येत आहे, आपल्या उपस्थितीमुळे प्रत्येकाला चमत्कारिक वाटत आहे ह्याची जाणीव प्रिन्स आन्द्रेला होऊ लागली. पहिल्याच दिवशी त्याला हे जाणवल्याखेरीज राहिले नाही. त्यामुळे तो काही न बोलता बसला. त्याची ही अस्वाभाविक स्तब्धता थोरल्या प्रिन्सच्या लक्षात आली. तोदेखील तिथे कुढत स्तब्ध बसून राहिला आणि भोजन होताच लागलीच आपल्या खोलीकडे वळला. त्या रात्रीनंतर प्रिन्स आन्द्रे त्याच्या खोलीत गेला त्याचा कल अजमावण्यासाठी, त्याला संभाषणात ओढण्यासाठी त्याने तरुण प्रिन्स कॅमेन्स्कीच्या मोहिमेबद्दल बोलण्यास सुरुवात केली. थोरला प्रिन्स प्रिन्सेस मार्याबद्दल बोलू लागला. तिच्या अंधश्रद्धेबद्दल आणि त्याच्यावर जिव्हाळा दाखवणारी एकमेव व्यक्ती बूरिअनवाई हिच्याबद्दल ती दाखवीत असलेल्या नावडीबद्दल तो कुरकूर करू लागला तेव्हा त्याला आश्चर्य वाटले.

थोरला प्रिन्स म्हणाला, ‘ माझ्या आजाराला प्रिन्सेस मार्या सर्वस्वी कारणीभूत आहे. ती हेतुपूर्वक मला सतावीत असते, छळीत असते. प्रिन्स निकोलायचे लाड करून, त्याला अचरट गोष्टी सांगून ती त्याला बिघडवून टाकीत आहे. मी माझ्या मुलीचा छळ करतो. तिचे जीवन दुःखाकष्टांनी भरलेले आहे. हे मला कुणी सांगायला नको–तिचा छळ केल्याखेरीज मला राहवत नाही याची मला कल्पना आहे. पण माझ्या मते तिचा छळ व्हावा अशीच तिची लायकी आहे. ’ आपण इतके बोलत असताना प्रिन्स आन्द्रे आपल्या बहिणीविषयी काहीही बोलत का नाही हे थोरल्या प्रिन्सला समजत नव्हते. तो विचार करीत राहिला. ‘ मी बदमाष आहे, मूर्ख थेरडा आहे म्हणून उगाच आपल्या मुलीशी फटकून वागतो आहे आणि बूरिअनवाईशी मैत्री करीत आहे असे त्याला वाटत आहे की काय ? त्याला काही कळत नाही, तेव्हा मला सगळ्या गोष्टी त्याला समजावून सांगितल्या पाहिजेत. माझी बाजू त्याला ऐकवल्याखेरीज मी राहणार नाही. ’ तिची अविचारी वागणूक आपणाला का सहन होत नाही हे तो त्याला समजावून देऊ लागला.

तशी प्रिन्स आन्द्रेने आपल्या वडिलांकडे न पाहताच बोलण्यास सुरुवात केली. (आयुष्यात प्रथमच तो आपल्या वडिलांना दोष देत होता.) ‘ तुम्ही माझा सल्ला विचारीत असाल तर–खरं तर मला हा विषयच काढायचा नव्हता–पण तुम्ही विचारता म्हणून सांगतो. ह्या सर्व गोष्टींसंबंधी माझं स्पष्ट मत मी मोकळेपणानं सांगतो. मार्यामध्ये आणि तुमच्यामध्ये जो गैरसमज निर्माण झाला आहे, जो दुरावा निर्माण झाला आहे त्याला मी तिला जबाबदार धरीत नाही. तिचं तुमच्यावर किती प्रेम आहे, किती भक्ती आहे याची मला कल्पना आहे. ’ आताशा प्रिन्स आन्द्रेचा बोलताना तोल जात असे. तसा तो आता गेला आणि तो चिडून म्हणाला, ‘ तुम्ही विचारलंत तर मी एकच गोष्ट सांगेन. तुम्हा दोघांत गैरसमज असलेच तर ते असण्याचं एकमेव कारण ती नालायक स्त्री आहे. ती माझ्या बहिणीची सखी असायला

सर्वस्वी अपात्र आहे.'

त्या वृद्धाने क्षणभर आपल्या मुलाकडे रोखून पाहिले. ओढूनताणून चेहऱ्यावर हास्य आणले. तशी त्याच्या तोंडातील दात पडलेली जागा दिसू लागली. तसा चेहरा पाहण्याची सवय प्रिन्स आन्द्रेला नव्हती त्यामुळे त्याला कसेसेच वाटले.

'कोणत्या सखीबद्दल म्हणतो आहेस ? तू तर आधीच आपलं मत बनवलं आहेस !'

प्रिन्स आन्द्रे कठोर स्वरात म्हणाला. 'तुमच्या वागणुकीवर मत द्यायची माझी इच्छा नव्हती. पण तुम्ही मला बोलायला भाग पाडत आहात.' मी माझं मत सांगितलं आहे तेच पुन्हा सांगेन. मारीचा यात काही दोष नाही. जिला दोष द्यायला पाहिजे अशी एकच व्यक्ती आहे आणि ती म्हणजे ती फ्रेंच बाई.'

'शेवटी त्यानं आपलं मत सांगितलंच तर !'

म्हातारा हळू आवाजात म्हणाला. प्रिन्स आन्द्रेच्या मनात गोंधळ उडाला. लागलीच ताडकन उठून तो प्रिन्स आन्द्रेला ओरडला, 'चालता हो इथून. पुन्हा माझ्या डोळ्यांसमोर राहू नकोस !'

जूनच्या अखेरीस प्रिन्स आन्द्रे सैन्याच्या मुख्य ठाण्याला पोचला. ज्याबरोबर झार होता ते पहिले सेनादल द्रिसा येथे बंदोबस्त ठेवून मुक्काम करून होते. दुसरे सेनादल फ्रेंचांच्या प्रबळ सैन्यामुळे पहिल्या सेनादलापासून दूर पिटाळले गेले होते. ते माघार घेत पहिल्या सेनादलाशी मिळण्याची धडपड करीत होते. रशियन सैन्यात घडणाऱ्या सर्वसाधारण घटनांबाबत प्रत्येकजण असंतुष्ट होता. तरीही रशियन प्रांतावर आक्रमणाचे संकट ओढवेल, पोलंडच्या पश्चिम प्रांताच्या सरहद्दीपलीकडे युद्ध पसरत जाईल अशी कुणालाही कल्पना नव्हती.

प्रिन्स आन्द्रेला बार्क्ली द टॉल्यची भेट घ्यायला सांगण्यात आले होते. त्याला तो द्रिसाच्या तीरावर भेटला. सैन्याने तळ ठोकला तेथे जवळपास मोठेसे गाव नव्हते किंवा वस्तीला योग्य अशा जागा नव्हत्या. त्यामुळे सैन्याच्या बरोबर असलेल्या असंख्य जनरलांना आणि दरबारी लोकांना नदीच्या दोन्ही तीरांवर सातआठ मैलाच्या परिसरातील खेड्यातील चांगल्या चांगल्या घरांमधे राहावे लागत होते. बार्क्ली द टॉल्य झारपासून तीनएक मैलांवर राहात होता. त्याने प्रिन्स आन्द्रेचे रुक्ष, थंड स्वागत केले. तो जर्मन भाषेच्या उच्चारण्याच्या लकबीत म्हणाला, 'मी तुझ्यासंबंधी झारकडे बोललो आहे. भेटीला बोलावीपर्यंत तू माझ्या सल्लागार मंडळावर राहा अशी मी तुला विनंती करतो.'

पहिले चार दिवस त्याला काहीच काम सांगण्यात आले नाही. ते चार दिवस त्याने सुसज्ज केलेल्या तळाभोवती घोड्यावरून रपेट करण्यात घालवले. स्वतःच्या अनुभवाचा उपयोग करून आणि स्वतःहून अधिक अनुभवी असलेल्या लोकांशी संभाषण करून त्याने सैन्याच्या तळा-

बद्दलच्या कल्पना निश्चित करण्याचा प्रयत्न केला.

सगळीकडे अंदाधुंदी पाहून तो चकित झाला. झारच्या भोवती स्पष्ट दिसणारे असे आठ गट झाले होते. ते परस्परांशी भांडत होते आणि मोहिमेसाठी आपल्या धोरणाचा झारने पाठपुरावा करावा म्हणून झारची कृपा संपादन करण्याचा प्रयत्न करीत होते.

यामध्ये जे जोरजोराने बोलत होते ते बहुतेक विदेशी जनरल होते, कुणी स्वीडिश, कुणी फ्रेंच होते हे पाहून प्रिन्स आन्द्रे अस्वस्थ झाला. जर्मन जनरल तर आपल्या योजनाच काय त्या यशस्वी होतील असे आग्रहाने सांगत होते.

प्रिन्स आन्द्रे सैन्यात शिरला तेव्हा आणखी एक गट–नववा गट–इतर आठ गटांतून निर्माण होत होता आणि ह्या गटाच्या मतांचा प्रभाव पडू लागला होता. त्या गटात राजकारणाचा अनुभव असलेली वयोवृद्ध, समंजस माणसे होती. परस्परविरोधी मते ती धारण करीत नव्हती. मुख्य ठाण्याच्या ठिकाणी घडणाऱ्या घटनांचे सर्वसाधारण स्वरूप समजावून घेण्यास ती समर्थ होती. तसेच अंधुकता, अनिश्चितता, संभ्रम आणि दुर्बळता अशांपासून मुक्त होण्याचे मार्ग शोधून काढण्याचे ज्ञान त्यांना होते.

झारने आपल्याबरोबर प्रामुख्याने सैन्यामध्ये लष्करी दरबार आणल्यामुळेच बऱ्याच वाईट गोष्टींना प्रारंभ झाला असे ह्या गटाच्या लोकांना वाटत होते, तसे ते बोलून दाखवीत होते. त्यामुळेच परस्पर संबंध अतिशय अनिश्चित झाले आहेत, कोणत्या ना कोणत्या गोष्टीवर अवलंबून राहू लागले आहेत, सतत बदलू लागले आहेत असे त्यांना वाटे. झारने राज्य करावे पण सैन्याचे नेतृत्व स्वीकारू नये. ह्या प्राप्तपरिस्थितीतून बाहेर पडायचे असेल तर झारने आपल्या लवाजम्यासह सैन्यातून निघून जायला हवे असे त्यांचे मत होते. झार केवळ उपस्थित असला तरी त्याच्या व्यक्तिगत सुरक्षिततेसाठी पन्नास हजार सैनिक ठेवावे लागतात आणि त्यामुळे एवढे सैनिक लढाईच्या दृष्टीने निरुपयोगी ठरतात. झारच्या उपस्थितीने आणि सत्तेने हात जखडले गेलेल्या सर्वोत्कृष्ट कमांडर–इन्–चीफ्पेक्षा स्वतंत्रपणे कामगिरी बजावणारा अत्यंत निकृष्ट कमांडर–इन्–चीफ् अधिक चांगला असे त्यांना वाटे.

प्रिन्स आन्द्रे कसलेही काम न करता द्रिसा येथे दिवस घालवीत असताना शेवटच्या गटाचा प्रतिनिधी आणि राज्याचा सेक्रेटरी सिश्कॉव्ह याने झारला एक पत्र पाठवले. त्याच्याबरोबर बॅलाशॉव्ह आणि अराक्चीव्ह ह्यांनीही त्या पत्राखाली सह्या केल्या. झारने सिश्कॉव्हला सर्वसाधारण प्रश्नांवर मत व्यक्त करायची परवानगी देऊन ठेवली होती. त्या परवानगीचा फायदा घेऊन त्याने झारला सैन्य सोडण्याची अत्यंत आदरपूर्वक सूचना केली. लोकांच्या भावना चेतवण्यासाठी राजधानीमधे त्याच्या उपस्थितीची अत्यंत गरज आहे असे निमित्त त्याने पुढे केले.

लोकांना आवाहन करून पितृभूमीच्या रक्षणासाठी त्यांना प्रवृत्त करणे अत्यंत आवश्यक कार्य आहे अशी झारची समजूत करून देण्यात आली. सैन्य सोडून जाण्यास हे कारण पुरेसे आहे असे झारलाही वाटले.

खूप वर्षांपूर्वी प्रत्यक्ष युद्धावर असताना प्रिन्स आन्द्रेला नेहमीच वाटे—लष्करीशास्त्र असे एखादे शास्त्र असणे शक्य नाही आणि म्हणूनच लष्करीशास्त्रात अलौकिक बुद्धिमत्ता असलेला इसम असणे शक्य नाही. त्याला हे आपले मत आता सर्वथैव सत्य असल्याचे पटू लागले. युद्धाची परिस्थिती नेहमीच अनिश्चित असते. ती कधीच कुणाला आकलन होत नाही. त्याही-पेक्षा अज्ञात असते युद्धात गुंतलेल्या सैन्याचे सामर्थ्य. अशा स्थितीत युद्धाचे तत्त्वज्ञान, युद्धाचे शास्त्र बनणे मुळीच शक्य नाही. येत्या चोवीस तासांतील आमच्या आणि शत्रूच्या सैन्याच्या हालचालींचा तौलनिक अंदाज कुणालाही बांधता येत नाही, तसा बांधता येणे अशक्य आहे. ह्या किंवा त्या अलग पडलेल्या सेनादलाच्या सामर्थ्याची कोणालाही अटकळ बांधता येणार नाही. व्यवहारातील प्रत्येक गोष्टीप्रमाणे युद्धातही कोणतीही गोष्ट निश्चित नसते, प्रत्येक गोष्ट अनंत प्रकारांच्या परिस्थितीवर अवलंबून असते, त्या सर्वांचा परिणाम कधी एका क्षणात दिसून येतो. हा क्षण केव्हा उद्‌भवेल हे कोणालाही सांगता येत नाही. अशा युद्धाचे शास्त्र बनणे कधीतरी शक्य आहे का?

फार काळापूर्वी अलौकिक बुद्धिमत्तेचा सिद्धान्त तयार करण्यात आला हे पूर्णपणे समजण्या-सारखे आहे. हे अलौकिक बुद्धिवान सत्तेचे प्रतिनिधित्व करतात हे त्याचे कारण आहे. लढाई-तील यशावर खरे तर त्यांचा मुळीच हक्क नसतो. खरे तर युद्धातील यश किंवा अपयश पहिल्यांदा विजयाची आरोळी ठोकणाऱ्या किंवा भीतीने ओरडत सुटणाऱ्या सामान्य सैनिकां-वर अवलंबून असते. म्हणूनच आपण उपयोगी आहोत अशा ठाम विश्वासाने नोकरी करणे सामान्य सैनिकालाच शक्य असते.

भोवतालची चर्चा ऐकून प्रिन्स आन्द्रेच्या मनात अशा प्रकारचे विचार येऊ लागले.

दुसऱ्या दिवशी पाहणीच्या वेळी झारने प्रिन्स आन्द्रेला विचारले, 'तुला नोकरी कुठे हवी आहे?' आन्द्रेने आपणास आघाडीवर पाठवा अशी विनंती केली. झारच्या परिवारात त्याने नोकरी मागितली नाही. अशा तऱ्हेने दरबारी जगातील सुवर्णसंधी त्याने आपणहून कायमची घालवली.

मोहिमेला सुरुवात होण्यापूर्वी रोस्तॉफला आईवडिलांकडून एक पत्र आले. त्यांनी नताशाच्या आजारपणाचा आणि तिचे लग्न मोडल्याचा उल्लेख थोडक्यात केला होता. सैन्यातून निवृत्त होऊन त्याने आपल्याकडे घरी यावे असा त्यांनी त्याला आग्रह केला होता. नताशाने आपण होऊन वाङ्‌निश्चय मोडल्याचे त्यांनी कळवले होते. पत्र मिळाल्यानंतर निकोलायने निवृत्त

होण्याचा प्रयत्न केला नाही, रजा मिळवण्याचीही धडपड केली नाही. त्याने आईवडिलांना लिहिले, ' नताशा आजारी पडल्याचे ऐकून तसेच तिचे नियोजित वराशी बिनसल्याचे ऐकून मला वाईट वाटले. तुमच्या इच्छेप्रमाणे वागण्याची मी शिकस्त करीन. ' त्याने सोन्याला वेगळे पत्र लिहिले.

युद्धाला प्रारंभ झाला म्हणूनच वचन दिल्याप्रमाणे रोस्तॉफ घरी जाऊ शकला नाही आणि सोन्याशी लग्न करू शकला नाही. ऑट्रॅड्नू येथील शिकारींनी भरलेले ऑक्टोबर–नोव्हेंबरचे दिवस, नाताळचा उत्सव आणि सोन्याच्या प्रीतीने भारलेला हिवाळा यामुळे पूर्वी अपरिचित असलेले असे खेड्यातील सुखाचे, शांतीचे क्षण त्याच्या मनश्चक्षूंसमोर तरळू लागले आणि त्याचे मन सारखे मागे मागे ओढ घेत राहिले. ' मोहक पत्नी, मुले, चांगल्या शिकारी कुत्र्यांचा कळप, देखभाल करता येईल अशी शेतवाडी, शेजारी, निवडणुका...'

रोस्तॉफचे विचार चालूच होते. पण आता युद्ध सुरू झाले होते आणि त्याला आपली रेजिमेंट सोडता येत नव्हती. ह्या गोष्टी अपरिहार्य असल्याने आपल्या स्वभावानुसार निकोलाय रोस्तॉफ रेजिमेंटमधील जीवनावर समाधान मानीत होता. एवढेच नव्हे तर ते आनंदाने जगत होता.

निकोलाय रजा संपवून परत आला तेव्हा त्याच्या सहकाऱ्यांनी मोठ्या आनंदाने त्याचे स्वागत केले. त्याला ताज्या दमाचे घोडे आणण्यासाठी पाठवण्यात आले. युक्रेनमधून तो अगदी मनासारखे अव्वल दर्जाचे घोडे आणण्यात यशस्वी झाला. त्याच्या वरिष्ठांनी त्याची त्याबद्दल प्रशंसा केली. त्याच्या गैरहजेरीत त्याला कॅप्टनचा हुद्दा देण्यात आला होता. युद्धाला सज्ज करण्यासाठी जेव्हा रेजिमेंटमधे नव्या सैनिकांची भर घालण्यात येत होती तेव्हा त्याला त्याच्या जुन्या स्क्वॉड्रनचे नेतृत्व देण्यात आले.

मोहिमेला प्रारंभ झाला तसा पगार दुप्पट करण्यात आला. रेजिमेंटमधे नवे सैनिक, नवी माणसे, नवे अधिकारी यांची भरती झाली. नवे घोडेही घेण्यात आले/ रेजिमेंट पोलंडमधे शिरली होती. युद्धाच्या प्रारंभी असते तसे उत्कंठेचे, उत्साहाचे वातावरण सगळ्या सैन्यात निर्माण झाले होते. रोस्तॉफला रेजिमेंटमधील आपल्या वाढलेल्या हुद्द्याची चांगलीच जाणीव होती. कधीनाकधी आपण सैन्यातून निवृत्त होणार याची रोस्तॉफला कल्पना होती. तरीही तो आपल्या सैन्याच्या सुखसोयीकडे मनापासून लक्ष देत होता.

राज्य, धोरण आणि डावपेच इत्यादी विविध कारणांमुळे सैन्याला व्हिलना येथून माघार घ्यावी लागली. माघारीच्या प्रत्येक पावलामागे मुख्य ठाण्यावरील माणसाचा स्वार्थ, वादविवाद, हेवेदावे, रागलोभ ह्या गुंतागुंतीच्या गोष्टी होत्या.

सैन्याला उन्हाळ्यातील चांगल्या वातावरणात माघार घ्यावी लागत होती. त्याच्याबरोबर अन्नादी वस्तूंचा पुरेसा पुरवठा होता त्यामुळे पावलोग्रॅड रेजिमेंटमधील घोडेस्वारांना ही माघारीची बाब अतिशय सरळ, साधी आणि प्रिय वाटत होती. फक्त मुख्य ठाण्यावर काय ती निराशा, अस्वस्थता आणि कटकारस्थानाची वृत्ती असण्याची शक्यता होती. आपण कुठे

आणि कशासाठी चाललो आहोत याची फिकीर सामान्य सैनिकांनी कधीही केली नाही.

माघार घेताना सैनिकांना वाईट वाटले ते आपण अंगवळणी पडलेली ठिकाणे आणि सुंदर पोलिश यजमानीण सोडून जात आहोत या विचाराने.

१३ जुलै रोजी पावलोग्रॅड घोडदळाने पहिल्या प्रथम चकमकीत भाग घेतला.

आदल्याच रात्री जोराचे तुफान होऊन पाऊस आणि गारा पडल्या होत्या. १८१२ च्या उन्हाळ्यात सारखी तुफाने होत होती.

दोनही पावलोग्रॅड पथके रायच्या शेताच्या मध्यभागी उघड्यावर तळ ठोकून होती. रायच्या रोपांना नुकतीच कणसे येत होती. पण गुरांनी आणि घोड्यांनी शेत पार तुडवून टाकले होते. पाऊस मुसळधार पडत होता. रोस्तॉफसाठी घाईघाईने एक खोप बनवण्यात आली होती. तीत इल्यिन नावाच्या आपल्या ऑफिसरसह रोस्तॉफ बसला होता.

रोस्तॉफने पाइपचा एक झुरका घेत मान वळवली. त्याच्या मानेवरून पाणी ठिबकू लागले. त्याचे हकीकतीकडे फारसे लक्ष नव्हते. शेजारी बसलेल्या तरुण अधिकाऱ्याला तो मधून मधून पाहात होता. सोळा वर्षांचा पोरगा इल्यिन नुकताच रेजिमेंटमधे दाखल झाला होता. इल्यिन प्रत्येक बाबतीत रोस्तॉफचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करी.

इल्यिन म्हणाला, ' हे ओले कपडे मला अंगावर नको वाटताहेत. मी अगदी पुरता भिजून गेलो आहे. कुठं तरी आसरा शोधून काढतो. मला वाटतं–आता पाऊस जोराचा नसेल. ' इल्यिन बाहेर धावला.

पाच मिनिटांनंतर इल्यिन चिखल उडवीत झोपडीकडे आला. ' रोस्तॉफ, आनंदाची बातमी. दोनेकशे पावलांवर पथिकाश्रम आहे. चला घाई करा. निघू या इथून. बरेचजण तिथं अगोदरच जमले आहेत. आपण तिथं कोरडे होऊ शकू. '

रोस्तॉफने सदरा उडवून लाव्रुश्काला सगळ्या वस्तू घेऊन मागून यायला ओरडून सांगितले. आपण इल्यिनबरोबर चिखल तुडवीत, डबक्यातील पाणी उडवीत निघाला. बारीक बारीक पाऊस पडत होता. दूरवरच्या विजेने मधूनमधून अंधार चिरून निघत होता.

निळ्या गणवेषातील फ्रेंच घोडेस्वारांनी आमच्या भालाइतांचा ( ऊलानांचा ) पाठलाग केलेला ज्यांनी प्रथम पाहिला त्यांत खेळाडूंची तीक्ष्ण दृष्टी असलेला रोस्तॉफ होता. भालाइतांचा अस्ताव्यस्त झालेला जमाव वेगाने जवळजवळ येत होता. फ्रेंच घोडेस्वारांनी त्यांचा पाठलाग चालवला होता. आता रोस्तॉफला प्रत्येक सैनिक वेगवेगळा दिसू लागला. टेकडीच्या पायथ्याशी दूर असल्याने ते अगदी लहान दिसत होते. त्यांच्यामधे लढाई सुरू होती. एक दुसऱ्याला गाठीत होता. ते आपल्या तलवारी आणि इतर शस्त्रे फिरवीत होते.

समोर चाललेल्या प्रकाराकडे रोस्तॉफ शिकारीकडे पाहावे तसा पाहात होता. का कोण जाणे

त्याला एकाएकी वाटू लागले. आपण आता आपले घोडदळ घेऊन फ्रेंच घोडेस्वारांवर हल्ला चढवला तर त्यांचा निभाव लागणार नाही. त्यांच्यावर हल्ला चढवायचा असेल तर तो या क्षणीच चढवला पाहिजे, नाहीतर मग खूप उशीर झालेला असेल, उपयोग होणार नाही. त्याने वळून भोवताली पाहिले, त्याच्याजवळ असलेल्या कॅप्टनची नजरदेखील खाली असलेल्या घोडदळावर खिळलेली होती.

रोस्तॉफ म्हणाला, ' आन्द्रे सेबास्टिअनिच, आपण खात्रीने त्यांना गाठून हल्ला करू शकू.'

' फार चांगलं होईल.' कॅप्टनने म्हटले.

त्याच्या पुढील उत्तराची वाट न पाहताच रोस्तॉफने आपल्या घोड्याला टाच मारली आणि आपल्या स्क्वॉड्रनसमोरून घोडा पिटाळीत नेला. त्याने काही हुकूम देण्याच्या आधीच सगळी स्क्वॉड्रन त्याच्या भावनेशी सहमत होऊन त्याच्या मागोमाग भरधाव सुटली. आपण असे का केले, कसे केले हे खुद्द रोस्तॉफलाही सांगता आले नसते. विचार न करता सर्व गोष्टी आता त्याच्याकडून झाल्या. फ्रेंच घोडेस्वार जवळ आलेले आहेत. बेशिस्तपणे त्यांचे घोडे उधळताहेत हे त्याने पाहिले. आपल्यापुढे त्यांचा निभाव लागणार नाही हे त्याने ओळखले. ह्याच क्षणी आपण धडक मारली पाहिजे, हा क्षण घालवला तर पुन्हा येणार नाही हे त्याने जाणले.

सैरावैरा पळणाऱ्या फ्रेंच घोडेस्वारांना अडवण्यासाठी त्याने आपला घोडा कमाल वेगाने फेकला. एक भालाईत थांबला. दुसरा जमिनीवरचा ऊलान आपण तुडवले जाऊ नये म्हणून खाली पालथा झोपला. घोडदलाच्या सैनिकांनी घोडेस्वार नसलेला एक घोडा आपल्याबरोबर नेला. आता बहुतेक सगळे फ्रेंच घोडेस्वार पळ काढीत होते. रोस्तॉफने राखी घोड्यावरील घोडेस्वारांपैकी एकाला हेरले आणि त्याचा पाठलाग केला. रोस्तॉफ पाठलाग करताना सरळ झुडपात घुसला तरीही त्याचा शूर घोडा त्यातून बाहेर पडला. रोस्तॉफ घोड्यावर सावरून नीट बसला न बसला तोच त्याला आपण हेरलेला शत्रू आपल्या तावडीत लवकर सापडणार असे दिसले. गणवेषावरून बहुधा ऑफिसर असणारा तो फ्रेंच सैनिक आपल्या राखी घोड्यावर अंग आकसून बसला होता आणि तलवारीने घोड्याला पिटाळू बघत होता. दुसऱ्याच क्षणी रोस्तॉफच्या घोड्याने त्याच्या घोड्याच्या पुठ्ठ्याला धडक दिली. तेव्हा जवळजवळ तो घोडा कोसळलाच. त्याच क्षणी रोस्तॉफने आपली तलवार त्या फ्रेंच सैनिकावर उगारली. आपण असे का केले हे त्याचे त्यालाच कळले नाही.

त्याच क्षणी त्याची सगळी उमेद एकाएकी नाहीशी झाली. तो पार खचून गेला. तो फ्रेंच ऑफिसर जमिनीवर कोसळला. तलवारीची जखम झाली म्हणून तो कोसळला नव्हता. कारण तलवारीने त्याच्या दंडाला थोडेसेच खरचटले होते. तो अतिशय घाबरला होता आणि त्याच्या घोड्याला धडक मिळाली होती म्हणून कोसळला होता. रोस्तॉफने घोड्याचा लगाम खेचला. ज्याला आपण पराभूत केले तो कोणत्या प्रकारचा शत्रू आहे हे तो पाहू लागला होता. कोणत्याही क्षणी आता आपल्यावर तडाखा बसेल ह्या भीतीने कपाळावर आठ्या घालून डोळे फिरवीत तो रोस्तॉफकडे पाहू लागला. त्या देखण्या तरुण ऑफिसरच्या गालावर खळी होती.

त्याचे डोळे नितळ निळे होते. त्याची मुद्रा मुळीही युद्धखोर दिसत नव्हती. त्याचा सुस्वभावी चेहरा रणक्षेत्रावरील शत्रूला साजेसा असण्याऐवजी शेकोटीपाशी शांतपणे बसणाऱ्या मित्राला साजेसा होता. त्याचे काय करावे याचा रोस्तॉफने निर्णय घेण्यापूर्वीच तो ऑफिसर ओरडून म्हणाला, 'मी शरण आलो आहे.' त्याने रिकिबीतून आपला पाय काढून घेण्याची घाईघाईने धडपड केली, पण ती व्यर्थ ठरली. तो आपल्या भयभीत निळ्या डोळ्यांनी रोस्तॉफकडे अजूनही पाहात होता. घोडेस्वारांनी त्याच्याजवळ घोडे नेऊन त्याचा रिकिबीत अडकलेला पाय सोडवून त्याला घोड्यावर नीट बसवले. फ्रेंच घोडेस्वारांशी आमच्या घोडेस्वारांच्या चकमकी सर्व बाजूंनी झडतच होत्या. एका फ्रेंच घोडेस्वाराला जखम झाली. सगळा चेहरा रक्ताने माखून निघाला तरीही तो आपला घोडा सोडीत नव्हता. दुसरा घोडदलातील सैनिकाला कवटाळून मागे घोड्यावर बसला होता. तिसरा घोडदलातील सैनिकांच्या मदतीने घोड्यावर स्वार होण्याची धडपड करीत होता.

समोरचे फ्रेंच पायदळ पळतापळता गोळ्या झाडीत होते. घोडदलाचे सैनिक फ्रेंच कैद्यांना घेऊन जलदीने मागे परतत होते. इतरांबरोबर रोस्तॉफही घोड्यावरून मागे आला. त्याच्या मनाला कसली तरी बोचणी लागली, हृदयात कसलीतरी वेदना होती. त्या फ्रेंच ऑफिसरला त्याने पकडले होते, आणि त्याच्यावर एक वार केला होता. त्यामुळे त्याच्या मनात कसला तरी गोंधळ उडाला होता. त्याचे निश्चित स्वरूप त्याचे त्यालाच कळत नव्हते.

घोडदलाचे सैनिक परतले तेव्हा काउंट ऑस्टरमनने रोस्तॉफची गाठ घेतली. त्याला बोलावून घेऊन त्याचे आभार मानले आणि म्हटले, 'मी तुझ्या शूर कृत्यांची वार्ता झारच्या कानावर घालीन. तुला सन्मानदर्शक सेंट जॉर्ज क्रूस मिळावा म्हणून शिफारस करीन.' काउंट ऑस्टरमनने बोलावले तेव्हा रोस्तॉफला वाटले—हल्ला करण्याचा आपणास हुकूम नसताना आपण हल्ला केला आहे, त्यामुळे शिस्तभंगाबद्दल कानउघाडणी करण्यासाठी आपणास बोलावून घेतलेले असणार. पण काउंट ऑस्टरमनने त्याची स्तुती केली आणि त्याला बक्षीस मिळेल असे आश्वासन दिले. त्यामुळे रोस्तॉफला आश्चर्य वाटल्यावाचून राहिले नाही. तरीही आपण काहीतरी नैतिक दृष्ट्या गुन्हा केलेला आहे ही अंधुक कटू रुखरुख त्याच्या मनातून गेली नाही. जनरलकडून निघून घोड्यावरून जात असताना तो स्वतःलाच विचारू लागला, 'मी का म्हणून असा त्रस्त होतो आहे? इलियनबद्दल मला चिंता वाटते आहे का? तो तर सुखरूप आहे. मी शरम वाटण्याजोगं काही कृत्य केलं आहे का? निश्चित नाही.' पश्चात्तापासारखी कसली तरी भावना त्याचा जीव पोखरू लागली. 'होय होय.' त्या गालावर खळी असलेल्या ऑफिसरला मारण्यासाठी मी तलवार उगारली तेव्हा माझा हात कसा अवघडला ते मला आता स्पष्ट आठवते आहे.'

रोस्तॉफने कैद्यांना नेत असल्याचे पाहिले. गालावर खळी असलेल्या त्या ऑफिसरला पाहण्यासाठी त्याने आपल्या घोड्याला पिटाळले. वेगळा गणवेश घातलेला तो ऑफिसर एका घोड्यावर बसून भोवताली अस्वस्थपणे पाहात होता. त्याच्या दंडाला तलवारीने खरचटले

होते. त्याला जखम म्हणता आले नसते इतके थोडे खरचटले होते. त्याने रोस्तॉफकडे पाहून बळेबळे अस्वस्थ स्मित केले आणि आपला हात हालवून स्वागत केले. रोस्तॉफला अजूनही ती अस्वस्थता आणि अंधुक पश्चात्तापाची भावना सोडून गेली नव्हती.

रोस्तॉफ अजूनही आपल्या नेत्रदीपक पराक्रमाचा विचार करीत होता. 'ते आमच्यापेक्षा अधिक भयभीत झालेले होते. या शौर्याचा अर्थ तरी काय? मी हे शौर्य गाजवलं ते माझ्या देशासाठी गाजवलं का? तो गालावर खळी असलेला, निळ्या डोळ्यांचा ऑफिसर अपराधी होता का? तो बिचारा किती भयभीत झाला होता! त्याला वाटलं मी आता त्याला ठार करणार आहे. त्याला मी का म्हणून ठार करू? माझ्या हातांना कंप सुटला होता तरीही त्यांनी मला सन्मानदर्शक सेंट जॉर्ज क्रूस दिला आहे! मला काहीच कळेनासं झालं आहे.' रोस्तॉफ निकोलायचे मन ह्या प्रश्नांनी त्रस्त झाले होते. तो सतावणाऱ्या शंकांना निश्चित उत्तरे शोधण्याचा आटापिटा करीत होता. त्याच वेळी त्याचे भाग्यचक्र फिरले होते आणि त्याच्यावर भाग्याची कृपा होत होती. लष्करामधे कितीदा तरी घडते तसे घडत होते. ओस्ट्रावना येथील घटनेनंतर तो सर्वांच्या लक्षात आला. त्याला घोडदलाच्या सैनिकांच्या बटालिअनचा कमांडर करण्यात आले. धाडसी साहसी ऑफिसरची गरज पडली तेव्हा त्याची निवड करण्यात आली.

नताशाच्या आजाराची बातमी आली त्या वेळी काउंटेस रोस्तॉफला पूर्ण बरे वाटले नव्हते. ती अशक्त होती तरीही पेत्याला आणि कुटुंबातील इतर मंडळींना घेऊन मॉस्कोला निघाली. रोस्तॉफकुटुंब मार्या दिमित्र्येवनाच्या घरून निघाले आणि सगळेजण आपल्या स्वतःच्या घरात राहू लागले.

नताशाचे दुखणे इतके गंभीर होते की त्यामुळे तिच्या व तिच्या आईवडिलांच्या सुदैवाने सगळ्यांना तिच्या आजाराच्या कारणाचा, तिच्या वागण्याचा आणि तिच्या फिसकटलेल्या वाङ्निश्चयाचा विसर पडला. ती इतकी आजारी होती की घडलेल्या सर्व गोष्टींना ती कितपत जबाबदार होती याचा विचार करण्याच्या मनःस्थितीत कुणीही नव्हते. नताशाची झोप उडाली होती. ती काही खात नव्हती. ती वाळत चालली होती. डॉक्टरांच्या मते तिची स्थिती अतिशय गंभीर होती. ती पुन्हा बरी कशी होईल हा एकच प्रश्न सर्वांना पडला होता.

डॉक्टर दररोज येत होता, नाडी पाहात होता, जीभ तपासत होता, तिची मुद्रा उदास असे तरी तो विनोद करीत होता. जेव्हा तो शेजारच्या खोलीत जाई तेव्हा त्याची मुद्रा गंभीर होई. गंभीरपणे मान हलवीत तो म्हणे, 'खरोखरच तिची स्थिती गंभीर आहे तरीही अलिकडे नवीन औषधं निघाली आहेत. त्यांचा उपयोग होईल अशी मला आशा वाटते आहे. आता जे होईल ते पाहणं एवढंच आपल्या हातात आहे. हिच्या आजाराला शारीरिक कारणांपेक्षा मानसिक कारणंच अधिक आहेत.' काउंटेस त्याला कळू न देता त्याच्या हातात काही सुवर्ण

मुद्रा ठेवी आणि स्वतःलाही कळलं नाही असं दाखवून प्रसन्न मनाने रोग्याच्या खोलीकडे वळे.

१८१३ च्या संबंध उन्हाळ्यामधे रोस्तॉफकुटुंबाला खेड्याकडे जाता आले नाही.

नताशाला खेड्यातल्या जीवनाची सवय होती. त्या जीवनाला ती आचवली होती. तरीही तारुण्याने रोगावर मात केली. दैनंदिन जीवनातील अनुभवांनीच नताशा आपले दुःख विसरू लागली. तिच्या अंतःकरणावरील ते दुःखद ओझे दूर झाले. आता ते दुःख भूतकाळात विलीन होऊ लागले आणि नताशा पुन्हा निरोगी होऊ लागली.

नताशाच्या मनाची बेचैनी कमी झाली पण तिच्या सुखात काही भर पडली नाही. नाच-समारंभ, स्केटिंग, संगीताच्या मैफली, नाटके इत्यादी करमणुकीच्या प्रकारापासून ती दूर राहायची एवढेच नव्हे तर ती कधी हसतानाही दुःखाश्रू आवरू शकली नाही. तिला गाता येत नसे. पण जेव्हा ती हसू लागे किंवा एकटीच गाण्याचा प्रयत्न करी तेव्हा तिचे डोळे अश्रूंनी भरत. तिचा कंठ दाटून येई. निरामय आनंदाचे क्षण पुन्हा येणार नाहीत ह्या खिन्न विचाराने तिचे डोळे भरून येत. आपण आपले तारुण्य सुखी करण्याऐवजी आपल्याच हातांनी बेजबाबदारपणे नष्ट केले या जाणिवेने संत्रस्त होऊन ती अश्रू ढाळू लागे. आपल्या शोकाचो टर उडवण्यासाठी हास्य आणि गायन आहेत असे तिला वाटे आणि कुणी स्तुती करावी असे तिला कधीच वाटले नाही. तिच्यामधे अहंकाराचा, दंभाचा लवलेश नव्हता.

तिने कसल्याही प्रकारचे सुख घेऊ नये म्हणून तिच्या अंतर्यामी कुणीतरी पहारा देत असावा, असे वाटे. एकेकाळी आशेने भरलेल्या बालपणाच्या निष्काळजी जीवनाची गोडी आता ती जणू पूर्णपणे हरवून बसली होती. शरदातले दिवस आणि ऑट्रॅड्नू येथे निकोलाय बरोबर घालवलेले नाताळचे दिवस यांची ती वारंवार आठवण काढी आणि उसासे टाकी. त्या काळातला एखादा दिवस परत यावा म्हणून तिने वाटेल तो किंमत दिली असती. पण तिच्या हिशेबी आता सारे संपले होते. तरीदेखील तिला जीवन कंठणे भाग पडले होते. जीवनातील आनंद संपला होता. पण जीवन पुढे चालले होते.

कुटुंबातील सर्वांपासून ती दूरदूर राहात होती. आपल्या भावाच्या—पेत्याच्या सहवासात काय ते तिला बरे वाटायचे. इतरांपेक्षा त्याचा सहवास काय तो तिला आवडायचा. त्याच्या संगतीत एकटीच असली तर केव्हाकेव्हा ती हसायची देखील. ती घर सोडून क्वचितच कुठे बाहेर जाई. पीएर सोडल्यास इतर कुणीही पाहुणे आले तरी त्यांना भेटायला तिला आनंद होत नसे. पीएरची भेट मात्र ती आनंदाने घेई. तो काय तो तिच्याशी वागताना प्रेमळपणे, सावधगिरीने आणि त्याच वेळी गंभीरपणे वागायचा.

नताशाला त्याच्या प्रेमळ स्वभावाची नकळत जाणीव होत होती. आणि म्हणून की काय तिला त्याच्या सहवासात खूप आनंद होई. पण त्यासाठी तिला पीएरबद्दल कृतज्ञताही वाटली

नाही. प्रयत्न करून पीएर चांगुलपणा दाखवतो आहे असे तिला कधीही वाटले नाही. पीएरशी चांगुलपणा इतका उपजत, स्वाभाविक होता की तो त्याचा खास गुण असा वाटतच नव्हता. तो तिला सुख वाटावे म्हणून काही करण्याचा प्रयत्न करी, कधी संभाषणामुळे तिच्या दुःखद स्मृती जाग्या होतील याची त्याला भीती वाटे तेव्हा तो तिच्या सान्निध्यात गोंधळून जाई, गावंढळासारखा वागे, हे नताशाच्या ध्यानात आल्यावाचून राहात नसे. तो नेहमीच्या प्रेमळपणामुळे आणि लाजाळूपणामुळे असे वागतो आहे, कोणत्याही व्यक्तीशी तो असाच वागणार असे तिला वाटू लागे. तिला कल्पना नसताना पीएरने ते शब्द उच्चारलेले होते. ' मी स्वतंत्र असतो तर तुझ्यासमोर गुडघे टेकून तुला मागणी घातली असती. ' तिच्याबद्दलच्या उत्कट भावनेच्या क्षणी त्याने ते शब्द उच्चारले होते. पण तेव्हापासून पीएरने आपल्या भावना एका शब्दानेही व्यक्त केल्या नव्हत्या. त्या शब्दांमुळे तेव्हा तिला केवढे आश्वासन मिळाले होते. रडणाऱ्या मुलाचे सांत्वन करण्यासाठी अर्थशून्य बडबड करतात तशा प्रकारे त्याने ते शब्द उच्चारले होते. त्यांहून त्यांना अर्थ नव्हता, हे तिला लख्ख उमगले. पीएर विवाहित होता म्हणून नव्हे तर त्याच्या तिच्यामधील नैतिक बंधनांचा (कुरॅगिनच्या सहवासात तिला ज्या बंधनाची जाणीव मुळीच झालेली नव्हती त्या नैतिक बंधनाचा ) प्रभाव एवढा होता की पीएरबरोबर आपल्या संबंधाचे रूपांतर आपल्याकडून प्रणयात होईल असे तिला वाटले नाही. पीएर आपल्यावर प्रेम करू लागेल असे तर तिला मुळीच वाटले नाही. एवढेच नव्हे तर तिला ज्याची अनेक उदाहरणे ठाऊक होती त्या हळुवार, आत्मनिष्ठ आणि प्रणयी अशा स्त्रीपुरुषांमधील स्नेहसंबंधात परिणती होईल असे तिला कधीही वाटले नाही.

जुलैच्या प्रारंभी मॉस्को येथे युद्धासंबंधीच्या बातम्यांना पेव फुटले होते आणि घबराट निर्माण झाली होती. झारने लोकांना आवाहन केले होते त्याबद्दल चर्चा सुरू होती. स्वतः झार सैन्य सोडून मॉस्कोला येणार आहे अशी आवई उठली होती. ११ जुलैपर्यंत जाहीरनामा, तसेच लोकांना केलेले आवाहन पोचले नसल्याने त्याबद्दल आणि रशियाच्या युद्धातील स्थानाबद्दल अतिरंजित बातम्या पसरत होत्या. सैन्य संकटात असल्याने झार परत फिरत आहे. स्मोलेन्स्कने शरणागती पत्करली, केवळ चमत्कार झाला तरच रशिया वाचेल अशा तऱ्हेचे उद्गार लोकांत निघत होते.

शनिवारी ११ जुलै रोजी जाहीरनामा येऊन पोचला पण तो अद्याप छापून तयार नव्हता. रोस्तॉफ मंडळीकडे पीएर आलेला होता. त्याने काउंट रास्तोप्चिनकडून जाहीरनामा मिळवून तो दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी भोजनाला येतेवेळी आणण्याचे वचन दिले.

त्या रविवारी नेहमीप्रमाणे रोस्तॉफ मंडळी राझुमॉव्स्कीच्या खाजगी चर्चमध्ये प्रार्थनेसाठी

गेली. जुलै महिना असल्याने त्या दिवशी चांगलाच उष्मा जाणवत होता. रोस्तॉफमंडळी दहा वाजता गाडीमधून चर्चसमोर उतरली तेव्हा देखील दमट हवा, रस्त्यावरील फेरीवाल्यांचे ओरडणे, जमावातील माणसांचे उन्हाळ्यातील भडक रंगाचे पोषाख, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असणाऱ्या झाडांची धुळीने माखलेली पाने, लष्कराचे संगीत, परेडसाठी मार्च करीत जाणाऱ्या सैनिकांच्या पांढऱ्या विजारी, फूटपाथवरील खडखडाट, प्रखरतेने तळपणारा सूर्य या साऱ्यांवर उन्हाळ्याची ग्लानी पसरली होती. प्रखरतेने सूर्य तळपत असला म्हणजे मोठ्या गावातही माणसांचे मन वर्तमानकाळाबद्दल समाधान आणि असमाधान अशा मिश्र भावनांनी भरून जाते, तसे त्यांचेही मन भरून गेले. मॉस्कोमधील सर्व फशनेबल स्त्रिया तसेच रोस्तॉफमंडळीच्या परिचयातील माणसे चर्चमधे जमली होती. बरीचशी श्रीमंत कुटुंबे बहुधा उन्हाळा शहराबाहेर खेड्यात घालवीत असत. ती जणू सर्व त्या वर्षी कसल्यातरी गोष्टीची अपेक्षा करीत मॉस्कोमधेच राहिली.

स्वच्छ दिसणारा एक देखणा वृद्ध धीरगंभीर आवाजात प्रार्थना वाचत होता. प्रार्थना ऐकणाऱ्यांच्या मनाचे उन्नयन होत होते, शांतवन होत होते. प्रार्थनामंदिराचे दरवाजे लावले होते. पडदा सोडलेला होता. गूढ वाटणाऱ्या मंद आवाजात शब्द उच्चारले जात होते. नताशाच्या डोळ्यांत आसवे आली. ती का आली ते तिचे तिलाच सांगता आले नसते. अनामिक आनंदाने ती अस्वस्थ होऊन गेली.

'मी जीवन कसे व्यतीत करावे, मी पापी मार्गापासून दूर कसे राहावे हे मला शिकव— नेहमीच शिकव.'

ती प्रार्थना करू लागली. डीकन वेदीच्या पडद्यासमोरील पायऱ्यांवर उभा राहिला. इतर बोटांपासून आपला अंगठा दूर धरून त्याने आपल्या सफेत डगल्यामधून आपले लांब केस बाहेर ओढले. आपल्या छातीवर क्रॉस धरून तो गंभीरपणे मोठ्या आवाजात प्रार्थना म्हणू लागला—

'आपण सगळे एक होऊन प्रभूची प्रार्थना करू या.'

'वर्गजात विसरून, वैरभाव विसरून, बंधुभावाने एकत्र येऊन आपण सगळेजण एकदिलाने प्रभूची प्रार्थना करू या,' नताशा मनाशी म्हणत होती.

'परलोकासाठी आणि आमच्या आत्म्याच्या मोक्षासाठी–'

'देवदूतांच्या लोकांसाठी आणि आमच्यावरती राहणाऱ्या आत्म्यांच्या मोक्षासाठी—' नताशा प्रार्थना करू लागली.

जेव्हा त्यांनी सैन्यासाठी प्रार्थना केली तेव्हा नताशाला आपल्या भावाची आणि डेनिसॉव्हची आठवण झाली. समुद्रावरून आणि जमिनीवरून प्रवास करणाऱ्या सर्व व्यक्तींसाठी प्रार्थना करण्यात आली तेव्हा तिला प्रिन्स आन्द्रे आठवला. त्याच्यासाठी तिने प्रार्थना म्हटली· 'परमेश्वरा, मी त्याचा अपराध केला आहे, मला क्षमा कर.' अशी प्रार्थना तिने मनातल्यामनात केली. जे आपणा सर्वांवर प्रेम करतात त्या सर्वांसाठी प्रार्थना म्हणण्यात आली त्यावेळी

तिने आपले कुटुंब, आपले आईवडील, सोन्या—साऱ्यासाऱ्यांसाठी प्रार्थना म्हटली. त्याच्याशी वागताना आपण चुकत होतो हे तिला तेव्हा प्रथमच जाणवले. त्याच्याबद्दल असलेले आपले उत्कट प्रेमही तिला तेव्हाच पहिल्यांदा जाणवले. आपला द्वेष करणाऱ्यांसाठी जेव्हा त्यांनी प्रार्थना म्हटली तेव्हा ती आपले शत्रू आठवू लागली. त्यांच्यासाठी प्रार्थना म्हणू लागली. आपल्या वडिलांचे धनको तसेच आपल्या वडिलांशी आर्थिक व्यवहार करणारे सगळेजण तिला शत्रू वाटू लागले. द्वेष करणाऱ्या शत्रूंच्या विचारासरशी तिला अनातोलची आठवण झाली. अनातोल तिच्याशी किती क्रूरपणे वागला होता. त्याने जरी तिचा तिरस्कार केला नव्हता तरीही त्याला शत्रू समजून त्याच्यासाठी तिने आनंदाने प्रार्थना केली. अशा प्रार्थना करीत असतानाच ती प्रिन्स आन्द्रे आणि अनातोल यांच्याबद्दल शांतपणाने आणि स्वच्छपणाने विचार करू शकली. ईश्वराच्या भक्तीपुढे त्यांच्याबद्दलच्या भावना काहीच नव्हेत अशी तिची धारणा बनू लागली. जेव्हा सम्राटांचे कुटुंब आणि धर्मसभा यांच्यासाठी प्रार्थना म्हणण्यात आली. तेव्हा तिने पूर्वीहून अधिक भक्तिभावाने प्रार्थनेत भाग घेतला. त्याच वेळी ती स्वतःला सांगू लागली होती—'मला प्रार्थना पुरती कळली नसेल पण मी निःशंक झाले आहे. काही झालं तरी माझं पवित्र धर्मसभेवर प्रेम आहे आणि मी त्यासाठी प्रार्थना करीत आहे.'

प्रार्थना आटोपली तशी डीकनने आपल्या गळ्याभोवतालच्या रेशमी वस्त्राने छातीवर क्रूसची खूण जुळवून म्हटले—

'प्रभू खिस्ताला आम्ही आमचे जीवन अर्पण करीत आहोत.'

'आम्ही परमेश्वराला जीवन अर्पण करीत आहोत.' नताशा मनातल्या मनात बोलली. 'प्रभो, मी तुला शरण आले आहे. मी काहीही मागत नाही. मला कशाचीही इच्छा नाही. मला माझ्या कर्तव्याबद्दल मार्गदर्शन कर. तुझ्या इच्छेप्रमाणे कसे वागावे ते शिकव. तू माझा स्वीकार कर.' नताशा अधीर भक्तिभावाने उद्गारली. तिने क्रूसची खूण जुळवली नाही. आपले कृश हात तसेच सोडून ती उभी राहिली. जणू कुणीतरी अज्ञातशक्ती कोणत्याही क्षणी येऊन आपणाला घेऊन जाईल, आपली आपल्यापासून सुटका करील, आपल्या इच्छा, खंत, पश्चात्ताप, आशा, पापे या सर्वांपासून आपली मुक्तता करील. अशी अपेक्षा बाळगून ती तिथे उभी होती.

प्रार्थना चालू असताना काउंटेसने कितीदा तरी वळून आपल्या मुलीच्या भाविक चेहऱ्याकडे, उजळत्या डोळ्यांकडे पाहिले आणि परमेश्वराला प्रार्थना केली, 'प्रभो, हिला मदत कर.'

प्रार्थना अर्धी झाल्याचे नताशाला चांगले समजले. त्या वेळी डीकनने एक लहानसा बाक आणला. तेथून गुडघे टेकून प्रार्थना पुन्हा म्हणण्यात आली. ह्या वेळी सगळ्यांना आश्चर्य वाटत होते. प्रार्थना संपल्यानंतर बाक चर्चच्या दारासमोर ठेवण्यात आला. फिकट गुलाबी गोल टोपी घातलेला धर्मगुरू पुढे झाला. त्याने आपले केस मागे सारले. मोठ्या कष्टाने त्याने गुडघे टेकले. जमलेल्या सर्वांनी एकमेकांकडे आश्चर्याने पाहात त्याचे अनुकरण केले आणि

मग धर्मसभेकडून आलेली शत्रूपासून रशियादेश मुक्त होण्यासाठी केलेली प्रार्थना म्हणण्यात आली.

' आम्हाला शक्ती देणाऱ्या, आम्हाला मुक्ती देणाऱ्या प्रभो, ' धर्मगुरू जोर न देता स्पष्ट, सौम्य आवाजात प्रार्थना म्हणू लागला.

' मोक्षदात्या शक्तिमान प्रभो, आम्हा पामरांवर कृपा कर. दयाळूपणे आमच्या प्रार्थनेकडे लक्ष दे. आमच्यावर दया दाखव आणि आमचे रक्षण कर. शत्रू तुझ्या भूमीवर आक्रमण करीत आहे. सर्व जगाविरुद्ध उठून ते नष्ट करण्याच्या प्रयत्नात त्याला आनंद वाटत आहे, तुझ्या राज्यावर स्वारी करण्यासाठी, तुझा पवित्र जेरुसलेम देश, तुझा प्रिय रशियादेश नष्ट करण्यासाठी, तुझी मंदिरे विध्वंसण्यासाठी, तुझ्या वेदी उडवण्यासाठी, आमची पवित्र प्रार्थना-स्थळे भ्रष्ट करण्यासाठी, कायदा, नीतिनियम झुगारून देणारी माणसे एकत्र जमली आहेत. प्रभो, ह्या दुष्टांचा किती काळ जय होत राहणार आहे–किती काळ? हे दुष्ट आपली पापी इच्छा किती काळ अमलात आणणार आहेत?

' सर्व शक्तिमान प्रभो, आमची प्रार्थना ऐक. आमचे कृपाळू व सर्वश्रेष्ठ सम्राट अलेक्झांडर यांना तुझी शक्ती देऊन शक्तिमान बनव. त्यांची सत्यप्रियता, त्यांचा दयाळूपणा लक्षात घे. त्यांच्या सत्कृत्यांनुसार त्यांना बक्षीस दे. त्यांच्या सत्कृत्यांमुळे तुझ्या आवडत्या इझ्रेअलचे रक्षण होईल असे पाहा, त्यांनी दिलेला सल्ला, त्यांनी दिलेली आश्वासने, त्यांची कृत्ये या साऱ्यांना आशीर्वाद दे. तुझ्या शक्तिमान हातांनी त्यांच्या राज्याचे संरक्षण कर. मोझेसला ॲमलेकवर, गिडीअनला मिडीअनवर आणि डेव्हिडला गलिअथवर जसा विजय मिळवून दिलास तसा प्रभो, आमच्या सम्राटांना त्यांच्या शत्रूवर विजय मिळेल असे कर. त्यांच्या सैन्याचे रक्षण कर. तुझे नाव घेऊन लढाई करणाऱ्यांच्या हातात पितळेची हत्यारे दे. त्यांना लढण्याचे धैर्य दे. भाला आणि ढाल घेऊन तू आमच्या मदतीला धाव घे. आमचे वाईट करण्यासाठी जे कारस्थान करतात त्यांना शरम वाटेल, ते गोंधळात पडतील असे कर. तुझ्यावर निष्ठा ठेवणाऱ्या सैन्यासमोर शत्रू, वाऱ्यासमोर धुरळा उडून जातो तसा उधळून पळून जाईल असे कर. तुझा शक्तिमान दूत त्यांना पिटाळून लावू दे. त्यांचा गोंधळ उडवून दे. त्यांच्या नकळत त्यांच्या जाळ्यात तेच सापडू देत. त्यांनी गुप्तपणे केलेली कारस्थाने त्यांच्यावरच उलटू देत. तुझ्या दासांच्या चरणांवर ते नम्र होऊन पडू देत. आमच्या स्वामी-कडून त्या शत्रूंचा नायनाट होऊ दे.

' प्रभो, तुला आमचे वाडवडील भजत होते. आम्हीही भजत आहोत. तुझी दया, तुझी करुणा कधीही न संपणारी आहे. आमच्यापासून तू दूर होऊ नकोस. आम्ही नालायक असलो तरीही आमच्यावर कृपा कर. तुझी करुणा अपार आहे. तुझा चांगुलपणा अगाध आहे. तू आमच्या चुका, आमची पापे विसरून आम्हाला क्षमा कर. आमची अंतःकरणे पवित्र कर, आमच्या मनात संजीवन भर. तुझ्या पवित्र लोकांच्या प्रारब्धावर पापी लोकांच्या राजदंडाची सत्ता राहू देऊ नकोस.

'प्रभो, तुझ्यावर आमची निष्ठा आहे, तुझ्या दयाळूपणाबद्दल आमच्या मनात गोंधळ निर्माण होऊ देऊ नकोस. तू आम्हाला आमच्यावरील आशीर्वादाची खूण पटवून दे. प्रभो, आमच्यावर दया कर. ह्या घटकेला दया कर आणि आमचा उद्धार कर. आमच्या शत्रूंना तडाखे हाण. तुझ्या निष्ठावंत सेवकांच्या पायाखाली त्यांना तुडवून टाक. तुझ्यावर जे श्रद्धा ठेवतात त्यांचे संरक्षण तूच आहेस. त्यांचा आधार तूच आहेस. त्यांचा विजय तूच आहेस. तुझा, पित्याचा, पुत्राचा आणि पवित्र आत्म्याचा जयजयकार असो—सदैव जयजयकार असो. तथास्तु.'

भाविक, संवेदनक्षम नताशाच्या मनावर ह्या प्रार्थनेचा चांगलाच परिणाम झाला. मोझेसचा ॲमलेकवरील, गिडीअनचा मिडीअनवरील, डेव्हिडचा गलिअथवरील विजय आणि त्याच्या जेरुसलेमचा विनाश यासंबंधीचे शब्दन्‌शब्द तिने ऐकले. अंतःकरणात तुडुंब भरलेल्या प्रेमाने आणि कळकळीने तिने देवाची प्रार्थना केली.

ह्या प्रार्थनेद्वारे देवाकडे आपण काय मागत आहोत ह्याची तिला मुळीच स्पष्ट कल्पना नव्हती. नवसंजीवन मिळावे, आशा आणि निष्ठा यांनी अंतःकरण समर्थ व्हावे, प्रीतिभावनेचा जन्म व्हावा यांसाठी तिने मनापासून प्रार्थना केली. शत्रू पायाखाली तुडवले जावेत अशी प्रार्थना मात्र ती करू शकली नाही. कारण त्यापूर्वी काही मिनिटे आपल्या शत्रूंना क्षमा करावी आणि त्यांच्यासाठी प्रार्थना करावी असे तिला वाटू लागले होते. तरीही त्या धर्मगुरूने गुडघे टेकून केलेली प्रार्थना अयोग्य होती असे तिला मुळीच वाटले नाही. माणसांना पातकाबद्दल शिक्षा मिळणार आहे—विशेषतः आपल्याला आपल्या पातकांबद्दल शिक्षा होणार आहे. ह्या कल्पनेने ती मनातल्या मनात हादरून गेली. तिने परमेश्वराची प्रार्थना केली, 'प्रभो, त्या सर्वांना क्षमा कर. मला क्षमा कर. त्यांना आणि मला मनःशांती दे. सौख्य दे.'

परमेश्वराने आपली प्रार्थना ऐकली असा तिला भास झाला.

नताशाची कृतज्ञ दृष्टी आठवून आपल्यासमोर नवी सृष्टी उलगडत आहे असे पीएरला वाटू लागले होते. त्या दिवसापासून त्याला दंभाचा प्रश्न आणि भौतिक गोष्टींची निरर्थकता ह्या गोष्टींनी सतावले नाही. त्याने कोणतेही काम हाती घेतले की त्याला 'का? कशासाठी?' हे प्रश्न भंडावून सोडीत असत. त्यांची जागा नव्या प्रश्नांनी घेतली नाही अगर त्या प्रश्नांना उत्तरे मिळाली नाहीत तरीही त्या प्रश्नांची जागा तिच्या प्रतिमेने घेतली. पूर्वी तो क्षुल्लक वार्तांवर बोले वा त्यांबद्दल काहीना काही ऐके. मानवी क्षुद्रतेबद्दल आणि मूर्खपणाबद्दल काहीना काही वाची अगर ऐके त्या वेळी तो विषण्ण होई. आता तसे होत नव्हते. जीवन क्षणभंगुर चंचल असताना लोक त्रागा का करतात असा प्रश्न तो पूर्वी विचारी तसा आता विचारीत नसे. तो आता तिच्या भेटीचा विचार करीत राही आणि त्याचे विकल्प, त्याच्या शंका दूर

पळून जात. ह्याचे कारण त्याला सतावणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तिच्याकडून मिळत असे नव्हते. त्याचे कारण तिची मूर्ती त्याला क्षणार्धात आत्मज्ञानाच्या उजळ प्रदेशात घेऊन जाई. ज्यासाठी जीवन व्यतीत करावे असा तो सौंदर्याचा आणि प्रीतीचा प्रदेश असे. कसल्याही दुर्लौकिकाचा विचार त्याच्या मनात आला म्हणजे तो स्वतःशी म्हणे, ' देश आणि झार यांजकडून सन्मान मिळत असतानाच एखादा त्यांना लुबाडीत असेल तर लुबाडू दे. पण काल मला पाहून तिने स्मित केले. आपल्याकडे बोलावले. माझे तिच्यावर प्रेम आहे. कुणाला ते कळणार नाही,' तो विचार करीत राही.

पीएर अजूनही उच्चभ्रू मंडळींत मिसळत होता. येथेच्छ मद्यपान करीत होता. पूर्वीच्याप्रमाणेच आळशी उद्देशहीन जीवन घालवीत होता. रोस्तॉफमंडळींच्या घरी घालवलेला वेळ सोडला तर उरलेला काळ त्याला कसातरी घालवावा लागत होता. मॉस्कोमधील त्याच्या ओळखी आणि त्याच्या सवयी ह्यामुळे त्याला पूर्वीचेच जीवन जगावे लागत होते.

आघाडीवरून अधिकाधिक अस्वस्थ करणाऱ्या वार्ता येऊ लागल्या होत्या. नताशाची प्रकृती सुधारत होती. तिच्याबद्दल पूर्वीप्रमाणे काळजी करण्याचे कारण उरले नव्हते. पण पीएर अधिकाधिक अस्वस्थ होत होता. आपल्या अस्वस्थतेची कारणे त्याची त्यालाच सांगता येत नव्हती. आपण ज्या परिस्थितीत आहोत ती परिस्थिती फार काळ टिकणार नाही, आपल्या सर्व जीवनाला कलाटणी देणारी महान आपत्ती येणार आहे असे त्याला वाटू लागले होते. आणि तो त्या महान आपत्तीच्या चिन्हांची प्रतीक्षा करीत होता.

रविवारी चर्चमधून नवीन प्रार्थना वाचली गेली. त्याच्या आदल्या दिवशी पीएरने रोस्तॉफमंडळीला ' काउंट रास्तोपूचिन माझ्या चांगल्या परिचयाचा आहे. त्याच्याकडून मी झारने देशाला केलेल्या आवाहनाची प्रत आणि सैन्याच्या हालचालीबद्दलची अद्ययावत बातमी घेऊन येतो ' असे आश्वासन दिले होते. पीएर सकाळी काउंट रास्तोपूचिनकडे गेला. तिथे त्याला नुकताच सैन्याकडून येऊन पोचलेला जासूद दिसला. तो पीएरच्या ओळखीचा होता. मॉस्को येथे नाचसमारंभात त्यांची पुष्कळदा गाठ पडत असे.

तो जासूद म्हणाला, ' सैनिकांनी आपल्या आईवडिलांना लिहिलेली अनेक पत्रं माझ्याकडे आहेत. तुम्ही कृपा कराल तर माझं ओझं थोडंफार कमी होईल. '

त्या पत्रातील एक पत्र निकोलाय रोस्तॉफने आपल्या वडिलांना पाठवलेले होते. पीएरने ते आपल्याकडे घेतले. झारने मॉस्कोच्या जनतेला केलेले आवाहन नुकतेच छापले होते. त्याने त्याची एक प्रत आणि सैन्यातील काही जाहीर निवेदने आणि काही भित्तिपत्रिका पीएरला दिल्या. पीएरने सैन्यात प्रसृत करण्यात आलेली जाहीर निवेदने चाळली. एका निवेदनात जखमी, मृत आणि बढती मिळालेल्या सैनिकांच्या यादीत त्याला निकोलाय रोस्तॉफचे नाव आढळले. ओस्ट्रॉवनाच्या चकमकीत त्याने विलक्षण शौर्य गाजवल्याबद्दल त्याला चतुर्थ दर्जाचे सेंट जॉर्ज पदक बहाल करण्यात आले होते. त्याच निवेदनात प्रिन्स आन्द्रे बोलकॉन्स्कीला घोडेस्वारांच्या रेजिमेंटचा कमांडर नेमण्यात आल्याची बातमीही होती. पीएरला रोस्तॉफ-

मंडळींना बोलकॉन्स्कीची आठवण करून द्यायची नव्हती. मात्र त्यांच्या मुलाला बढती मिळाली ती बातमी सांगून त्यांना आनंदित करावे असे त्याला वाटल्याखेरीज राहिले नाही. झारचे निवेदन, रोस्तॉपचिनच्या भित्तिपत्रिका आणि इतर जाहीर निवेदने भोजनाच्या वेळी नेण्यासाठी पीएरने आपल्याकडे ठेवून घेतली. जाहीर पत्रके आणि निकोलायचे पत्र त्याने रोस्तॉफमंडळींकडे धाडून दिले.

रास्तॉपचिनच्या बोलण्यातून त्याची काळजी आणि घाई व्यक्त होत होती. जासुदाने जाता जाता सैन्यातील भयानक स्थितीचा उल्लेख केलेला होता. मॉस्कोमधे हेर पकडण्यात आले आहेत व ऑक्टोबरअखेर नेपोलिअन दोन्ही राजधान्यांत हजर होईल अशा अर्थाचे पत्रक शहरातून वाटले जात आहे, आणि दुसऱ्याच दिवशी झार मॉस्कोला भेट देणार आहेत, अशा प्रकारच्या अफवा पसरत होत्या. पीएरने धूमकेतू पाहिला होता. तेव्हा त्याच्या मनात खळबळ माजली होती, अपेक्षा निर्माण झाल्या होत्या. तीच भावना आता युद्ध सुरू झाल्यापासून अधिक तीव्र होऊ लागली.

सैन्यात दाखल व्हावे असे पीएरला फार पूर्वीपासूनच वाटत होते. तो दाखलही झाला असता. परंतु विश्वशांती आणि युद्धसमाप्ती ही ज्या मेसनांची उद्दिष्टे होती, त्या मेसनांच्या बंधुभावाची शपथ त्याने घेतली होती. मॉस्कोमधील अनेक सद्‌गृहस्थ गणवेश चढवून स्वतःला देशभक्त म्हणवीत ते त्याने पाहिले आणि त्यांच्या पावलांवर पाऊल टाकायची त्याला शरम वाटू लागली.

दर रविवारी रोस्तॉफ मंडळीकडे मूठभर निकटचे स्नेही भोजनाला येत तसे ते आजही आले होते.

रोस्तॉफकडे कुणी आले नसतील अशा अपेक्षेने पीएर आला. त्या वर्षी पीएर अंगाने भलताच भरला होता. तो उंच नसता, त्याचे खांदे विशाल नसते, वाढलेले शरीर सहजपणे पेलून तोलून धरण्याची ताकद त्याच्यामधे नसती तर हा धिप्पाड पीएर बोजड, हास्यास्पद प्राणी वाटला असता.

धापा टाकत, स्वतःशीच काही पुटपुटत तो जिना चढला. कोचमनने त्याला 'मी कुठे थांबू?' असे विचारले नाही. काउंट रोस्तॉफकडे आला की मध्यरात्रीपर्यंत तो बाहेर पडणार नाही हे त्याला ठाऊक होते.

रोस्तॉफच्या घरी त्याला पहिल्या प्रथम नताशा दिसली. त्याने तिला पाहण्यापूर्वी तिची पावले ऐकली. ती दिवाणखान्यामधे नृत्याचा सराव करीत होती. आजारी पडली तेव्हापासून तिने नृत्य टाकले होते हे त्याला ठाऊक होते. त्यामुळे तिचा आवाज ऐकून त्याला आश्चर्य वाटले आणि आनंदही झाला. त्याने सावकाश दरवाजा उघडला. प्रार्थनेच्या वेळचा फिकट जांभळा

पोषाख तिने केलेला होता. खोलीमध्ये येरझाऱ्या घालीत ती गात होती. त्याने दरवाजा उघडल तेव्हा तिची पाठ त्याच्याकडे होती. पण ती झटकन मागे वळली. त्याचा चकित झालेला घवघवीत चेहरा पाहून ती लाजली आणि तिने त्याच्याकडे धाव घेतली.

'मला पुन्हा नृत्याचा प्रयत्न करायचा आहे. पुन्हा गायचं आहे. तुम्ही आलात म्हणून मला किती बरं वाटलं! आज मी खूपच आनंदात आहे.' पीएर कितीतरी दिवसांनी तिला उत्साहाने बोलताना पाहात होता. 'तुम्हाला कळलं असेल–निकोलेन्काला सेंट जॉर्ज क्रूस मिळाला आहे. मला त्याचा खूप अभिमान वाटतो.'

'माहीत आहे तर. मीच तर ते निवेदन पाठवून दिलं. तुझं नृत्य चालू दे. मी त्यात व्यत्यय आणीत नाही.' तो दिवाणखान्याकडे वळणार होता. पण नताशाने त्याला थांबवले आणि त्याला विचारले, 'काउंट, मी गाते ही मी चूक करते आहे का?' असे बोलताना ती लाजली पण तिची प्रश्नार्थक दृष्टी पीएरवर खिळलेली होती.

'छे छे! त्यात चूक कसली? उलट...पण तू मला असं का विचारलंस?'

'मलाच ठाऊक नाही.' नताशाने लागलीच उत्तर दिले. 'तुम्हाला आवडणार नाही अशी कोणतीही गोष्ट करणं मला आवडणार नाही. माझा तुमच्यावर विश्वास आहे. सर्व बाबतींत विश्वास आहे. मी तुम्हाला किती मानते, तुम्ही माझ्यावर केवढे उपकार केले आहेत याची तुम्हाला कल्पना नसेल.' ती भरभर बोलत होती. आपल्या शब्दांनी पीएर संकोचून जात आहे इकडे तिचे बिलकुल लक्ष नव्हते. 'मी त्या निवेदनात वाचले.' मग तिने 'बोल-कॉन्स्की' हा शब्द अतिशय दबल्या आवाजात भरकन उच्चारून म्हटले, 'तो रशियात आला आहे. पुन्हा सैन्यात दाखल झाला आहे. तुम्हाला काय वाटतं?' आपली शक्ती आपल्याला दगा देईल, पुरते बोलताही येणार नाही ह्या धास्तीने ती वेगाने बोलून घेत होती. 'तो मला कधीतरी क्षमा करील का? माझ्याबद्दल त्याच्या मनात निरंतर आकसाची भावना राहणार नाही ना? सांगा ना, तुम्हाला काय वाटतं?'

'मला वाटतं...' पीएर म्हणाला, 'त्यानं क्षमा करावी असं काहीच घडलेलं नाही... त्याच्या जागी मी असतो तर...' कल्पनासाहचर्यामुळे पीएर त्याच क्षणी गतकाळात शिरला. एकेकाळी त्याने तिचे सांत्वन केले होते. तेव्हा तो तिला म्हणाला होता, 'मी मी नसतो, जगातील एखादा थोर पुरुष असतो आणि स्वतःचा मुखत्यार असतो, तर मी गुडघे टेकून तुझ्या प्रेमाची याचना केली असती.' हे त्याला आठवले आणि पुन्हा तीच करुणेची, जिव्हाळ्याची, प्रीतीची भावना त्याच्या अंतःकरणात दाटून आली. त्याच्या ओठात तेच शब्द उमटणार होते पण तिने त्याला बोलूच दिले नाही.

'तुमची गोष्टच वेगळी.' तिने 'तुमची' हा शब्द विलक्षण उत्साहाने उच्चारला. 'तुमच्याहून अधिक दयाळू, अधिक उदार मनुष्य मला ठाऊक नाही—पुढं कधी आढळेल असंही वाटत नाही. त्या वेळी तुम्ही मदतीला आलां नसतां तर...आणि आता देखील तुमची मदत नसती तर...माझं काय झालं असतं मला कल्पनाच करवत नाही.' तिचे डोळे एकदम

भरून आले. वळून स्वरलेखनाचा कागद डोळ्यांसमोर धरून ती गाऊ लागली. खोलीत येरझारा घालू लागली.

त्याच वेळी पेत्या दिवाणखान्यातून धावत आला. पंधरा वर्षांचा पेत्या आता देखणा दिसत होता. त्याची कांती गुलाबी झाली होती. त्याचे ओठ नताशाप्रमाणे लाल झाले होते. युनिव्हर्सिटीत प्रवेश मिळवण्यासाठी आताशा त्याला शिक्षण दिले जात होते. पण आता त्याने घोडदलात सामील व्हायचे असा निश्चय गुप्तपणे आपला सोबती ऑबेलन्स्की याच्याबरोबर केला होता.

आपल्या योजनेबद्दल बोलण्यासाठी पेत्या पीएरकडे धावत गेला. पेत्याला पीएरचे नाव ठेवण्यात आले होते.

त्याने पीएरला विनंती केली, ' मला घोडदलात प्रवेश देतील का याची चौकशी करा. '

पेत्याकडे लक्ष न देता पीएर तिथे येरझारा घालीत राहिला. पीएरचे लक्ष वेधून घेण्यासाठी पेत्याने त्याचा हात ओढला.

' प्यॉत्र किरिलॉविच, माझ्या योजनेबद्दल तुम्हाला काय वाटतं ते सांगा ना ? तुमच्यावरच माझी आता भिस्त आहे. '

' तुझी योजना म्हणतोस ? तुला घोडदळात जायचं आहे ? मी बोलेन त्याबद्दल. सर्वांना तुझी योजना आजच सांगेन. '

' अरे बाबा तुला जाहीरनामा मिळाला की नाही ? धाकटी काउंटेस रॅझुमॉवस्की चर्चमधे प्रार्थनेला गेली होती. तिथं तिनं नवी प्रार्थना ऐकली. ती म्हणत होती फार चांगली प्रार्थना आहे. ' आत येता येता थोरल्या काउंटने विचारले.

' ती प्रार्थना आहे की माझ्याजवळ. उद्या झार इथं येत आहेत. उमरावांची एक कधी झाली नव्हती अशी सभा होणार आहे. दर हजारी दहा जणांची लष्करभरती व्हायची आहे. मी तुमचं त्यासाठी अभिनंदन करतो. '

' देवाची कृपा, सैन्याबद्दल काय बातमी आहे ? '

' पुन्हा आमच्या सैनिकांनी माघार घेतली आहे. ते स्मॉलेन्स्कपलीकडे आहेत असं सांगतात' पीएरने उत्तर दिले.

' परमेश्वर आमच्यावर दया करो. जाहीरनामा कुठं आहे बरं ! ' काउंटने विचारले.

' झारचं आवाहन ना ? देतो की, ' पीएर आपल्या खिशात ते पत्रक शोधू लागला, पण त्याला ते सापडेना. तो खिसे चाचपडत असताना काउंटेस आत आली तेव्हा त्याने त्या अवस्थेत तिच्या हाताचे चुंबन घेतले. आता तो अस्वस्थ होऊन भोवती पाहू लागला. नताशाने गाणे नुकतेच थांबवले होते. ती अजूनही दिवाणखान्यात आली नव्हती. ती कोणत्याही क्षणाला येईल असे त्याला वाटत होते. ' अरे देवा, मी कुठं ठेवला बरं ? मला काहीच आठवेनासं झालं आहे. '

' तो नेहमी प्रत्येक गोष्ट भलत्याच जागी ठेवतो. ' काउंटेस उद्गारली.

नताशा आत आली तेव्हा तिचा हळुवार चेहरा त्रस्त दिसत होता. पीएरकडे पाहात काही न बोलता ती बसून राहिली. ती आत आली तेव्हा पीएरचा हताश झालेला चेहरा उजळला. कागदपत्र शोधीत असताना त्याने कितीतरी वेळा तिच्याकडे सहेतुक दृष्टी टाकली.

'अरे देवा, मला आता घरीच गाडी न्यायला हवी. मी तो जाहीरनामा घरीच विसरलो असणार.'

'पण आता गेलात तर भोजनाला उशीर होईल. आणि गाडीवान थांबलेलाही नसेल.'

पण त्या आधी सोन्या दिवाणखान्याबाहेरील खोलीत कागदपत्र शोधण्यासाठी गेली होती. पीएरला आपल्या हॅटमधील गादीखाली काळजीपूर्वक ठेवून दिलेले कागद आढळले.

पीएर आता जाहीरनामा वाचणार होता. पण काउंट म्हणाला, 'आता नको, जेवण झाल्यानंतर.' काउंटला त्या जाहीरनाम्याचे वाचन म्हणजे एक मेजवानी वाटत होती, हे उघड दिसत होते.

भोजनाच्या वेळी त्यांनी सेंट जॉर्ज मानचिन्ह मिळवणाऱ्या घोडेस्वाराला आरोग्य चिंतून शांपेन घेतली. शिन्शिनने त्यांना शहरातील वार्ता ऐकवल्या; वृद्ध जॉर्जियन प्रिन्सेस आजारी असल्याचे सांगितले. मॉस्कोहून मेटिव्हिए नाहीसा झाल्याची बातमी दिली.

शिन्शिनने आणखी बातमी पुरवली. 'तुम्ही ऐकलं असेलही–प्रिन्स गॅलिट्झिननं रशियन शिकण्यासाठी एका रशियन शिक्षकाची नेमणूक केली आहे. रस्त्यातून फ्रेंच बोलत जाणं धोक्याचं झालं आहे.'

'हे बघ काउंट प्यॉत्र, आता जर का नागरी दल उभारलं गेलं तर तुलाही घोड्यावर स्वार व्हावं लागेल.' पीएरला उद्देशून थोरला काउंट म्हणाला.

पीएरने काउंटकडे पाहिले तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर काहीही न कळल्याचा भाव दिसत होता.

'युद्धासाठी ? मी ? छे छे ! मला कसला सैनिकी पेशा जमणार ? पण परिस्थिती इतकी चमत्कारिक झाली आहे. असं का व्हावं ते माझं मलाच कळत नाही. खरं तर मला लष्करी पेशाची बिलकुल आवड नाही. पण ह्या दिवसांत कुणाला कुणाचा भरवसा देता येणार नाही.'

भोजन झाल्यावर काउंट वैठ्या खुर्चीत आरामशीर बसला आणि त्याने मोठ्या गंभीर मुद्रेने चांगल्या वाचनासाठी लौकिक असणाऱ्या सोन्याला झारचे आवाहन वाचायला सांगितले.

'राजधानी मॉस्को येथील नागरिक हो ! शत्रुसैन्य प्रचंड संख्येने आपल्या हद्दीत घुसत आहे. आपला प्रिय देश बेचिराख करू पाहात आहे.' सोन्या काळजीपूर्वक हळू आवाजात वाचू लागली. काउंट डोळे मिटून ऐकत होता आणि काही परिच्छेदाच्या वेळी उसासे टाकीत होता.

नताशा ताठ बसली होती. पीएरकडे कुतूहलाने पाहात होती.

नताशाची दृष्टी आपल्यावर आहे हे पीएरला जाणवले. त्याने तिच्याकडे वळून न पाहण्याचा प्रयत्न केला. जाहीरनाम्यामधील प्रत्येक गंभीर विधानाच्या वेळी काउंटेस नाराजीने आणि

रागाने मान हालवत होती. ह्या जाहीरनाम्यातील सर्व शब्दांतून तिला एकच दिसत होते— तिच्या मुलावरील संकट लवकर दूर होणार नव्हते. शिन्शिन ओठाचा चंबू करून आणि उपरोधिक स्मित करून येऊ घातलेल्या कोणत्याही विषयांची टर उडवण्यास टपलेला दिसत होता. सोन्याचे वाचन, काउंटची त्यावरील मल्लीनाथी किंवा दुसरे काहीच निमित्त सापडले नाही तर प्रत्यक्ष जाहीरनामा सुद्धा त्याच्या थट्टेतून सुटणार नव्हता.

रशियावर येऊ घातलेले संकट, झारने मॉस्कोवर विशेषतः—मॉस्कोतील प्रसिद्ध उमराव-वर्गावर ठेवलेला भरवसा याबद्दल सोन्याने वाचन केले. बहुधा सगळेजण तिचे वाचन ध्यान लावून ऐकत असल्याने सोन्याचा स्वर कापरा झाला. तशाच थरथरत्या आवाजात ती वाचू लागली. ' आम्ही लवकरच राजधानीतील नागरिकांची भेट घेणार आहोत. तसेच साम्राज्याच्या इतर भागातही जाणार आहोत. सर्वांशी चर्चा करणे हा आमचा उद्देश आहेच. तसेच अगोदरपासूनच शत्रूची गती थोपवून धरणाऱ्या नागरीदलाच्या मार्गदर्शनासाठी आम्ही दौरा काढणार आहोत. शत्रूशी झुंज देता यावी म्हणून आम्ही आणखी नागरी दले स्थापन करणार आहोत. शत्रू आम्हाला विनाशाची भीती घालत आहे. त्या शत्रूचाच विनाश होवो. मुक्त झालेला युरोप रशियाचे नाव उज्ज्वल करो. '

' ठीक आहे. ' आपले आसवांनी भिजलेले डोळे उघडीत काउंट उद्गारला. नाकाला स्मेलिंग सॉल्टची बाटली धरल्यागत तो कितीदातरी शिंकला. शिंकण्याने येणारा अडथळा सोडला तर तो एरव्ही सारखा बोलत राहिला. ' आमच्या सम्राटांच्या तोंडून शब्द यायचा अवकाश, आम्ही मुळीच कुरकूर न करता वाटेल तो त्याग करू. '

काउंटच्या देशभक्तीवर शिन्शिनला काहीतरी विनोद सुचला होता. तो काही बोलण्या-आधीच नताशा उठून आपल्या वडिलांकडे धावत आली.

' पपा, तुम्ही किती चांगले आहात ' वडिलांचे चुंबन घेत ती जवळजवळ ओरडली. तिने नकळत पीएरकडे प्रेमाचा कटाक्ष टाकला. ती पुन्हा नव्याने जीवनात रस घेऊ लागताच अशी सलगी वागण्यात येऊ लागली.

' केवढी हिची देशभक्ती ! ' शिन्शिन म्हणाला.

' केवळ देशभक्ती नव्हे... ' नताशा त्रस्त होऊन म्हणाली. ' तुम्हाला प्रत्येक गोष्टीत विनोद दिसतो. ही बाब अत्यंत गंभीर आहे. हा विनोद मुळीच नव्हे. '

' विनोद ? ' पुन्हा काउंट म्हणाला, ' सम्राटांच्या तोंडून शब्द यायचा अवकाश, आम्ही सगळे...आम्ही काही जर्मन लोक नव्हेत. '

' तुमच्या लक्षात आला का तो शब्द ? चर्चेसाठी...? ' पीएरने विचारले.

' अर्थातच काहीही झाले तरी आम्ही... '

एवढ्या वेळात पेत्या आपल्या वडिलांकडे गेला. आतापर्यंत त्याच्याकडे कुणीच लक्ष दिले नव्हते. लालबुंद होऊन तो वडिलांशी बोलू लागला. त्याचा प्रारंभीचा उद्धट स्वर कर्कश झाला. ' पपा, मी आता तुम्हाला निर्वाणीचं सांगतो आहे. आई, तू काही म्हटलंस तरी मी ऐकणार

नाही. तुम्ही मला सैन्यात दाखल होण्याची परवानगी दिलीच पाहिजे. मला आता अशक्य आहे. . .आणखी काही बोलण्याची गरज नाही. '

काउंटेसने निराश होऊन आपली नजर वर वळवली, दोन्ही हातांचे पंजे एकत्र घट्ट जुळवले आणि ती रागारागाने आपल्या नवऱ्याला म्हणाली, ' तुमच्या बोलण्याचा काय परिणाम झाला ते पाह्यलंत ? '

पण त्याच क्षणी काउंटने स्वतःला सावरले. ' अरे वा ! फार चांगला सैनिक होशील तू ! हा मूर्खपणा पुरे झाला. आधी आपल्या अभ्यासाकडे लक्ष दे. '

' हा मूर्खपणा नाही, पपा. फेद्या ऑबॉलेन्स्की माझ्याहून लहान आहे. तरीदेखील तो सैन्यात जाणार आहे. शिवाय माझं अभ्यासात लक्ष लागत नाही, कारण... ?' पेत्या थांबला. त्याचा चेहरा लालबुंद झाला. त्याला घाम फुटला तरीही तो धीर करून म्हणाला, ' कारण आपला देश संकटात आहे. '

' पुरे–पुरे, मूर्ख कुठला ! '

' तुम्ही आताच म्हणालात—तुम्ही वाटेल तो त्याग करायला तयार आहात म्हणून ? '

' पेत्या, एक अक्षर बोलू नकोस ' काउंट आपल्या पत्नीकडे पाहात ओरडला. ती बिचारी पांढरीफटक होऊन आपल्या धाकट्या मुलाकडे पाहात होती.

' मला बोलू द्या...प्यॉत्र किरिलॉविच तुम्हाला सांगतील...'

' मी तुला सांगतो हा मूर्खपणा आहे. ओठावरचं दूध वाळलं नाही आणि ह्याला सैन्यात जायला पाहिजे. ' काउंट सगळी पत्रकं आपल्याबरोबर घेऊन बाहेर जाऊ लागला. तो बहुधा आपल्या खोलीत जाऊन पुन्हा एकवार ती पत्रकं वाचणार होता.

' प्यॉत्र किरिलॉविच, धूम्रपान करणार का ? '

संकोचून गेलेल्या पीएरला काय बोलावे कळेना. कधी नव्हे ते नताशाचे उजळ उत्सुक डोळे त्याच्या दिशेने वळत होते. त्यांमध्ये आस्थेहून अधिक काहीतरी होते. त्यामुळे त्याची अशी अवस्था झाली होती.

' नको. मी आता घरी जावं म्हणतो. '

' घरी जाणार ? तुम्ही रात्र इथंच घालवणार होता ना ?. . .आधी तुम्ही क्वचितच आमच्या इथं येता. ' मग आपल्या मुलीकडे पाहात खुशीत येत तो म्हणाला, ' ही माझी मुलगी तर तुम्ही असलात म्हणजेच उत्साहात असते. एरव्ही कधीही तशी नसते. '

' मी काही गोष्टी विसरलो आहे. मला खरंच घरी जायला पाहिजे . महत्त्वाचं काम...' पीएर घाईघाईत बोलत होता.

' ठीक आहे. मग मी तुमचा निरोप घेतो. ' काउंट खोलीबाहेर पडता पडता बोलला.

' तुम्ही का जाताहात ? इतके अस्वस्थ का झाला आहात ? सांगा ना. ' नताशाने पीएरला विचारले. तिच्या नजरेत आव्हान होते.

त्याला वाटले. तिला सांगावे. ' मी जातो याचं कारण माझं तुझ्यावर प्रेम आहे. ' पण

त्याने ते शब्द उच्चारले नाहीत. त्याचा चेहरा आरक्त झाला. डोळयांतून अश्रू ओघळले.

'तुझ्या संगतीत वारंवार नसणं माझ्या हिताचं आहे म्हणून कारण...मला महत्त्वाचं काम आहे.'

'का म्हणून जाता आहात? मला नाही सांगणार का?' नताशा निश्चयी स्वरात म्हणाली, पण लागलीच ती गप्प झाली. दोघेही परस्परांकडे संकोचून, निराशेने पाहात होती. त्याने हसण्याचा व्यर्थ प्रयत्न केला. त्याच्या हसण्यातून वेदना व्यक्त झाल्या. तिच्या हाताचे चुंबन घेऊन एकही शब्द न बोलता त्याने तिचा निरोप घेतला.

पीएरने रोस्टॉफमंडळींना पुन्हा भेटायचे नाही असा निश्चय केला.

दुसऱ्या दिवशी झार मॉस्को शहरात आला. त्याला पाहण्यासाठी रोस्टॉफच्या कित्येक नोकरांनी बाहेर जाण्याची आज्ञा मिळवली. कोणाला काही न सांगता पेत्याने टोपी चढवली आणि सगळयांचा डोळा चुकवून तो मागच्या दाराने बाहेर पडला. जिथे झार असेल तेथे सरळ जायचे असे त्याने ठरवून टाकले होते.

जसजसा तो पुढे जाऊ लागला तसतसा क्रेमलीनभोवती जमलेल्या गर्दीत अधिकाधिक रंगून जाऊ लागला. प्रौढ माणसांप्रमाणे गंभीरपणे व संथ सावधपणे वागणे तो विसरलाच. तो क्रेमलीनच्या अगदी जवळ आला तेव्हा आपण चेंगरून जाऊ नये याची धडपड त्याला करावी लागली. निश्चयी आणि भयभीत मुद्रेने तो आपल्या दोन्ही बाजूंस कोपर मारू लागला. समोरून आवाज करत येणाऱ्या गाड्या कमान असलेल्या प्रवेशद्वारात शिरत होत्या. सगळ्या गाड्या समोरून गेल्या तेव्हा गर्दी त्याच्या दिशेने पुढे सरकू लागली. गर्दीच्या लोटाने पेत्यालाही आधीच खचून भरलेल्या चौकात नेले. चौकातच नव्हे तर छपरांवर, जागा मिळेल त्या ठिकाणी माणसेच माणसे होती.

पेत्या चौकात आला न आला तोच त्याला घंटांचा नाद ऐकू येऊ लागला. मग सगळ्या लोकांनी आनंदाने कोलाहल करून सगळा क्रेमलीनचा चौक भरून टाकला.

थोडा वेळ चौकात चेंगराचेंगरी कमी झाली. सर्वांनी एकदम टोप्या काढल्या आणि पुन्हा एकवार जमाव पुढे घुसू लागला. पेत्या तर इतका चिरडला गेला की त्याला श्वासही घेता येईना. लोक सारखे आनंदाने ओरडत होते.

पेत्या चवड्यावर उभा राहिला. समोरच्याला त्याने लोटले, चिमटा घेतला, पण त्याला भोवतालच्या गर्दीशिवाय काहीही दिसेना. सर्वांच्या चेहऱ्यावर बेहोषी दिसत होती. उत्साहाने ते ओसंडत होते. पेत्याच्या शेजारी उभी असलेली दुकानदाराची पत्नी तर हुंदके देऊ लागली. तिच्या गालांवरून अश्रू ओघळू लागले.

आपल्या बोटांनी अश्रू पुशीत ती म्हणत होती, 'आमचा पिता, आमचा परमेश्वर!'

सर्व बाजूंनी गर्दीतून आनंदाच्या घोषणा होत होत्या. क्षणभर गर्दी स्थिर झाली. पुन्हा ती पुढे घुसू लागली.

भावावेगाने बेभान झालेल्या पेत्याने आपल्या मुठी वळवल्या आणि अतिशय त्वेषाने डोळे फिरवीत तो पुढे घुसू लागला. कोपरांनी मार्ग काढू लागला. आनंदाने मोठ्याने घोषणा देऊ लागला. त्या क्षणी तो स्वतःला नाहीतर दुसऱ्या कुणालाही ठार करील असे वाटत होते. पण त्याच क्षणी त्याच्यासारख्याच त्वेषाने दुसरे कित्येकजण त्याच्या अंगावर घुसत होते. आरोळ्या देत होते.

तरीसुद्धा तो जिवावर उदार होऊन पुढे घुसतच होता. त्याने आपल्या समोर असलेल्या लोकांच्या पाठीवरून समोर पलीकडे पाहिले. तो त्याला मोकळी जागा दिसली. तिथे मध्यावर लाल वस्त्रे अंथरलेला मार्ग त्याला दिसला. पण त्याच क्षणी गर्दी मागे हटू लागली. मिरवणुकीच्या अगदी जवळ येऊन भिडलेल्या लोकांना पोलीस मागे हटवीत होते. झार राजवाड्याकडून अस्पेन्स्की कौन्सिलकडे चालला होता. पेत्याला एकाएकी कुशीमधे जोराचा ठोसा मिळाला आणि तो असा चेंगरला गेला की त्याच्या डोळ्यासमोर धुके तरंगल्यासारखे सारे अंधुक दिसू लागले आणि त्याची शुद्ध हरपली.

पुन्हा पांगापांग झाली. गुदमरलेल्या आणि पांढराफटक झालेल्या पेत्याला डीकनने मोठ्या तोफेवर बसवले. कित्येक लोक पेत्यासाठी हळहळले. एकाएकी बऱ्याच लोकांनी पेत्याची अवस्था बघितली आणि ते त्याच्या भोवती गर्दी करू लागले.

पेत्या लवकरच सावध झाला. त्याच्या चेहऱ्यावरील फटफटीतपणा गेला. वेदना मावळल्या. तात्पुरत्या गैरसोयीमुळे त्याला तोफेवर बसायला मिळाले होते. त्या ठिकाणाहून आपणाला परत जाणाऱ्या झारचे दर्शन होईल अशी आशा त्याला वाटू लागली. झारच्या आगमना-निमित्त सत्कारसमारंभ अस्पेन्की कौन्सिलमध्ये सुरू झाला आणि तुर्कांशी शांतता करार केल्याबद्दल त्याचे आभार मानण्यात आले. त्या अवधीत गर्दी चौकात पांगली होती. फेरीवाले निरनिराळे खाद्य पदार्थ–जिंजर ब्रेड, खसखस घातलेली मिठाई ओरडून विकीत होते. पेत्याला असले पदार्थ फार आवडत. पेत्या लोकांमधे चाललेले नेहमीचे विषय ऐकत होता. दुकान-दाराची बायको आपली गर्दीत फाटलेली शाल दाखवीत होती. ती आपण केवढ्याला घेतली होती ते सांगत होती.

'रेशमाचे सगळेच कपडे आताशा महाग झाले आहेत,' असे दुसरा एकजण म्हणत होता. बिशपबरोबर आज एका धार्मिक समारंभात भाग घेण्यासाठी अनेक धर्मगुरू जमले होते. दोन तरुण कारागीर तरुण मोलकरणींची थट्टामस्करी करीत होते.

दगडी भिंतीआडून गोळीबाराचा आवाज ऐकू येऊ लागला–झारने तुर्कांशी शांतता करार केला तो आनंद साजरा करण्यासाठी तोफांचे गोळे सुटत होते. तोफांची सरबत्ती पाहण्यासाठी जमाव भिंतीच्या दिशेने धावू लागला. पेत्यासुद्धा इतरांबरोबर धावणार होता. पण त्याला मघाशी वाचवणारा डीकन जाऊ देईना. अधिकारी, जनरल, झारची खास माणसे अस्पेन्स्की

कौन्सिलमधून धावत बाहेर पडत होती तरी तोफांची सरबत्ती चालूच होती. मग इतर लोक सावकाश बाहेर पडले. पुन्हा टोप्या काढून उंचावल्या गेल्या. तोफांची सरबत्ती बघायला गेलेली माणसे धावत मागे आली. शेवटी गणवेषातील चार माणसे कौन्सिलच्या दारातून आली. जमावाने आनंदाच्या आरोळ्या दिल्या.

'कुठं आहे? कोणता?' जवळ असलेल्या लोकांना पेत्या रडवेल्या हळू आवाजात विचारीत होता. पण कुणीच त्याला उत्तर दिले नाही. प्रत्येकजण बेहोष झाला होता. पेत्याने त्या चारांपैकी एक झार असणार असे मनाशी ठरवले. अश्रू आल्यामुळेच त्याला नीट बघता येत नव्हते. तरी सगळा उत्साह एकवटून त्या व्यक्तीकडे तो पाहात होता. ती व्यक्ती झार नव्हतीच. त्याने वेड्यासारखी आरोळी दिली. उद्या काही झाले तरी सैन्यात दाखल व्हायचे असा निश्चयही करून टाकला.

आता जमाव झारमागून धावू लागला, राजवाड्यापर्यंत गेला आणि मग पांगू लागला. उशीर झाला होता. पेत्याकडे खाण्याजोगे काही नव्हते. त्याच्या चेहऱ्यावरून घाम निथळत होता. पण तो घरी परतला नाही. झारचे भोजन चालू असताना राजवाड्याबाहेर तशी बरीच मंडळी थांबली होती. त्या लोकांबरोबर तोही थांबला. काहीतरी घडेल ह्या अपेक्षेने तो राजवाड्याच्या खिडक्यांकडे पाहात राहिला. झारबरोबर भोजन घेण्यासाठी आलेले वजनदार, प्रतिष्ठित लोक प्रवेशद्वारात शिरताना पाहून तो त्यांचा हेवा करू लागला. खिडकीतून त्याला भोजनगृहातील सेवक ओझरते दिसत होते. त्यांचाही त्याला हेवा वाटू लागला.

झार भोजन करीत असताना खिडकीच्याबाहेर पाहात व्हॅल्युएव्ह म्हणाला, 'महाराज, लोक अजून आपल्या दर्शनाच्या आशेने थांबले आहेत.'

भोजन जवळ जवळ संपत आले होते. झार उठला. अजून तो बिस्कीट चघळत होता. तो बाल्कनीत येऊन राहिला. जमाव त्या बाल्कनीच्या दिशेने घुसला. पेत्या जमावात मध्यभागी होता.

पित्यासारख्या पूज्य, देवासारख्या वंद्य झारचा लोकांनी आनंदून जयजयकार केला. पेत्याही त्यात सहभागी झाला. स्त्रियांच्या तसेच थोड्याफार प्रमाणात पेत्यादी पुरुषांच्या डोळ्यांत आनंदाची आसवे उभी राहिली.

झारने हातातील एक मोठे बिस्कीट मोडले, त्याचे तुकडे बाल्कनीच्या कठड्यावर पडले. तेथून खाली जमिनीवर पडले. जाकिट घातलेला गाडीवान अगदी जवळ उभा होता. त्याने झडप घालून काही तुकडे मिळवले. कितीतरी माणसे मग त्या गाडीवानाकडे घुसली. ते पाहून झार बरीच बिस्किटे टाकू लागला. पेत्या डोळे विस्फारून पाहू लागला. चिरडून जाण्याच्या धोक्याने तो कधी नव्हे तो प्रभावित झाला आणि बिस्किटांच्या दिशेने धावला. झारच्या हातचे बिस्कीट आपण मिळवले पाहिजे, माघार घेता कामा नये असे त्याला का कोण जाणे वाटू लागले. तो जोराने घुसला तशी बिस्कीट उचलण्यासाठी वाकलेली एक वृद्ध स्त्री धक्का लागून पडली. जमिनीवर पडली तरी ती वृद्ध स्त्री माघार घ्यायला तयार नव्हती. हात गुडघे

टेकलेल्या अवस्थेतही ती बिस्किटांवर झडप घालीत होती. पेत्याने आपल्या गुडघ्याने तिचे हात दूर लोटले, बिस्कीट हिसकावून घेतले. आपल्याला उशीर होईल ह्या धास्तीने त्याने जोराने घोगऱ्या आवाजात कर्कश आरोळी दिली. 'झार महाराजांचा जयजयकार असो!'

झार आत गेला तशी बरीचशी माणसे निघून गेली. पेत्याने घरी गेल्यावर आपला निर्णय जाहीर केला. 'तुम्ही मला सैन्यात जाऊ दिलं नाही तर मी पळून जाईन'. काउंट इल्या अँड्रीचने त्याचे सर्वस्वी मानले असे नव्हे पण जिथे कमी धोका असेल अशा ठिकाणी पेत्याला कमिशन मिळेल काय याची चौकशी करण्यासाठी तो बाहेर पडला.

१५ तारखेला सकाळी स्लॉबॉड्स्की राजवाड्याबाहेर कितीतरी गाड्या थांबल्या होत्या. मोठमोठे दिवाणखाने माणसांनी भरून गेले होते. पहिल्या दिवाणखान्यात गणवेष घातलेले उमराव होते. दुसऱ्या दिवाणखान्यात लांब दाढ्यांचे, लांब निळे कोट घातलेले, पदके मिळवणारे व्यापारी होते.

ज्यांना पीएरने क्लबमधे किंवा त्यांच्या घरी पाहिले होते ते सर्व उमराव गणवेषात होते. काहींनी कॅथरीनच्या दरबाराच्या वेळचा गणवेष केला होता. काहींनी सम्राट पॅवेलच्या वेळचा गणवेष चढवला होता, तर काहींच्या अंगावर अलेक्झांडरच्या राजवटीतील नवा गणवेष होता.

पीएर सकाळपासून अतिशय तंग अशा गणवेषामुळे अगदी वैतागून गेला होता. तो आता खोलीत होता. तो आता भारावून गेला होता. आज अपूर्व योग आला होता. उमराव आणि व्यापारीवर्ग या उदारमतवादी समूहांची अपूर्व बैठक पाहून त्याच्या मनामधे 'सामाजिक करार' आणि फ्रेंच राज्यक्रांती यासंबंधीची विचारमालिका सुरू झाली. बरेच दिवस त्याबद्दलचे विचार त्याच्या मनात आले नव्हते. तरीही त्यांचा त्याच्या मनावर खोल परिणाम झालेला होता. 'झार आपल्या जनतेबरोबर चर्चा करण्यासाठी राजधानीस येत आहेत' हे जाहीरनाम्यातील शब्द त्याने वाचले तेव्हा त्याचा आपल्या विचारांवर विश्वास बसू लागला. त्या दिशेने महत्त्वाच्या गोष्टी आता घडणार आहेत. आपण आजवर जे शोधत होतो ते प्रत्यक्षात येणार आहे ह्या अपेक्षेने तो भोवतालच्या लोकांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकू लागला. पण ज्या कल्पनांचा त्याने ध्यास घेतला होता त्या कल्पना कोणीही बोलताना त्याला आढळले नाही.

झारच्या जाहीरनाम्याचे वाचन होत होते, लोकांत उत्साह वाटत होता आणि लोक सारखे बोलत होते. दैनंदिन आवडीच्या विषयांखेरीज इतर विषयांवर ते बोलत असलेले पीएरला आढळत होते. झारचे आगमन झाल्यावर मार्शलांनी कुठे राहायचे, झारसाठी नृत्यसमारंभ केव्हा आयोजित करायचा, परगण्यानुसार विभागणी करायची की सगळ्या प्रांताच्या सैनिकांना

एकत्रच ठेवायचे इ. इ. गोष्टींसंबंधी ते चर्चा करीत होते. युद्ध आणि झारच्या भेटीचा उद्देश यासंबंधी बोलणे सुरू झाले म्हणजे मात्र त्यांच्या बोलण्यात काही निश्चितता नसे, त्यांना ठाम-पणे काही बोलता येत नसे.

निवृत्त नाविक अधिकाऱ्यांच्या गणवेषातील एक मध्यम वयाचा, देखणा अधिकारी एका खोलीत बोलत होता, त्याच्याभोवती छोटासा जमाव होता. त्यामध्ये पीएरही सामील होऊन ऐकू लागला.

' स्मॉलेन्स्कच्या लोकांनी सम्राटांना सैनिक पुरवले म्हणून काय झालं ? ते लोक आमच्या काही उपयोगाचे आहेत काय ? मॉस्कोच्या उमरावांना योग्य वाटत असेल तर त्यांना अन्य मार्गानं आपली सम्राटांवरील निष्ठा दाखवता येईल; १८०० मधील लष्करभरतीचा आपणास विसर पडला आहे काय ? त्या वेळी भिकारड्या धर्मगुरूंचे मुलगे आणि चोर यांनीच फायदा उठवला होता. '

काउंट इल्या अँड्रीचने मंद स्मित करीत संमतीदाखल मान हालवली.

' आणि त्या सैनिकांचा देशाला काही फायदा झाला का ? मुळीच नाही. त्यांनी आमच्या शेतीची नासाडी मात्र केली. सक्तीची लष्करभरती तरी बरी आहे. त्या परिस्थितीत तुमच्या-कडे जो मनुष्य येतो तो सैनिक नसतो, शेतकरी नसतो, काही नसतो. तो असतो केवळ मनो-धैर्य गमावलेला. उमराव आपले प्राण द्यायला तयार आहेत. आम्ही आपणहून लोकांकडे जाऊ. रिक्रूट मिळवू. सम्राटांनी फक्त एक शब्द उच्चारला तरी पुरे, आम्ही त्यांच्यासाठी मरायला तयार आहोत. ' उत्साहाच्या भरात एक वक्ता बोलला.

हेलावून गेलेला पीएर बोलायला पुढे सरकला. तो आपले तोंड उघडणार तोच तोंडाचे बोळके झालेल्या एका धूर्त चेहऱ्याच्या सिनेटरने व्यत्यय आणला.

तोंडाचे बोळके झालेला तो सिनेटर बोलू लागला, ' महाशय, आजच्या क्षणाला देशाला अधिक योग्य काय–सक्तीचे लष्कर की नागरीसंरक्षक दल–याची चर्चा करायला आपणाला बोलावलेले नाही असे मला वाटते. आपल्या सम्राटांनी कृपाळू होऊन जे आपणास आवाहन केले आहे त्याला उत्तर देण्यासाठी आम्हाला बोलावण्यात आले आहे. रिक्रूटभरती करणे योग्य की नागरीसंरक्षक दले उभारणे योग्य याचा निर्णय आमच्या वरिष्ठ जागेवरील व्यक्तीने करायचा आहे. '

उमरावांसमोर असलेल्या कर्तव्याचा हा पारंपरिक आणि संकुचित दृष्टिकोण मांडणाऱ्या सिनेटरची पीएरला भलतीच चीड आली.

तो त्याला उद्देशून म्हणाला, ' महाशय, माफ करा. उमरावांनी व्यक्त केलेली सहानुभूती आणि उत्साह बाजूला ठेवला तरी मला असे वाटते की, कोणत्या तऱ्हेने देशाला मदत करावी याबद्दल चर्चा करावी म्हणून उमरावांना बोलवण्यात आले आहे.' पीएर अधिकाधिक भावविवश होत होता. ' आम्ही केवळ तोफांचे खाद्य अशी माणसे पुरवणारे शेतकरी आहोत आणि आमच्याकडून सल्ला मिळण्याजोगा नाही असे जर त्यांना आढळले तर स्वतः सम्राट

नाराज होतील.'

सिनेटरच्या चेहऱ्यावरील तिरस्कारयुक्त हास्य आणि पीएरच्या बोलण्यातील स्वतंत्र विचार पाहून कित्येकजण त्या गोटापासून थोडेसे दूर सरकले. पीएरच्या बोलण्यावर एकच मनुष्य खूष झाला होता. आणि तो म्हणजे काउंट इल्या अंड्रीच. नाविक अधिकाऱ्याचे भाषण ऐकून तसेच सिनेटरचेही भाषण ऐकून तो असाच खूष झाला होता. ऐकलेल्या शेवटच्या भाषणावर तो नेहमीच असा खूष व्हायचा.

पीएर बोलत होता. 'मला वाटले या प्रश्नाची चर्चा करण्यापूर्वी आपण अतिशय आदरपूर्वक सम्राटांना विचारले पाहिजे आमच्याकडे सैन्य किती आहे? आमच्या लोकांची आणि सैन्याची परिस्थिती काय आहे? आणि...'

पीएरने एवढे शब्द उच्चारले न उच्चारले तोच एकदम तिघांनी त्याच्यावर हल्ला चढवला. सर्वांत प्रखर हल्ला चढवला तो परिचिताने. त्याचे नाव स्टेपन स्टेपनॉविच ॲड्रास्कीन. हा बोस्टनला पीएरचा भागीदार होता. तो खरे तर नेहमी पीएरशी अत्यंत मैत्रीने वागायचा. स्टेपन स्टेपनॉविच अर्थातच गणवेषात होता. त्यामुळे की अन्य काही कारणांमुळे असेल पीएरला तो एकदम बदललेला वाटला. स्टेपन स्टेपनॉविच म्हाताऱ्यासारखा कोपिष्ठ होऊन ओरडू लागला. 'मी प्रथम बजावतो—सम्राटांना असे प्रश्न विचारण्याचा आम्हाला मुळीच हक्क नाही. उमरावांना असा अधिकार असला तरीही सम्राटांना अशा प्रश्नांची उत्तरे देणे अशक्य आहे. शत्रूच्या सैन्याच्या हालचालीवर आपल्या सैन्याच्या हालचाली अवलंबून असतात. सैन्यातील पथके वाढत असतात, कधी कमी होत असतात.'

दुसऱ्या कुणी ॲड्रास्कीनला अडवले. आता बोलणारा मनुष्य चाळिशीतील, मध्यम उंचीचा होता. बऱ्याच काळापूर्वी पीएरने त्याला जिप्सींच्या करमणुकीच्या कार्यक्रमाला आलेला पाहिले होते. तो पत्ते खेळण्यात चांगला भिडू नव्हता. जवळ आला तेव्हा तोही पीएरला गणवेषामुळे बदललेला वाटला.

'खरे आहे. चर्चेला वेळ तरी कुठे आहे?' तो उमराव बोलू लागला. 'आता कृतीची आवश्यकता आहे. रशियात युद्ध चालू आहे. आपल्या देशाचा नाश करण्यासाठी, आमच्या वाडवडिलांची थडगी भ्रष्ट करण्यासाठी, आमची बायकापोरे पळवण्यासाठी शत्रू येत आहे.' त्या गृहस्थाने आपल्या छातीवर एक ठोसा मारला. 'आम्ही सगळे प्रतिकार करण्यासाठी सज्ज होऊ, आम्ही आमच्या पित्याकडे, आमच्या सम्राटांकडे जाऊ.' आपले तांबरलेले डोळे फिरवीत तो ओरडू लागला. जमावातील कितीतरी माणसे ओरडून संमती देत होती. 'आम्ही रशियन आहोत. आमची निष्ठा, आमचे सिंहासन, आमचा देश ह्या सर्वांच्या रक्षणासाठी आम्ही आमचे रक्त आनंदाने सांडण्यास तयार आहोत. आम्ही जर आपल्या पितृभूमीचे अस्सल पुत्र असलो तर आता व्यर्थ बडबड करणार नाही. रशिया आपले संरक्षण कसे करू शकतो हे आम्ही युरोपला दाखवून देऊ' तो माणूस ओरडत होता.

पीएरने बोलण्याचा प्रयत्न केला पण त्याला शब्द सुचेनात. पीएरला सांगायचे होते.—

' पैशांचा, शेतकऱ्यांचा अगर स्वतःचा त्याग करायला मी केव्हाही मागे सरणार नाही. तरीही मदत करायला शक्य व्हावे म्हणून आम्हाला खरी परिस्थिती समजावी असे वाटते. ' तो असे बोलणार होता खरा पण त्याला काहीच बोलता आले नाही.

' रशियन मेसेंजर 'चा संपादक ग्लिङ्का उभा राहिला तेव्हा लोकांनी त्याला ओळखले. ' लेखक, लेखक ' म्हणून त्याचे उत्साहाने स्वागत केले. ग्लिङ्का म्हणाला, ' नरकाला नरकानेच पिटाळून लावले पाहिजे. '

पांढऱ्या केसाचे अगर टक्कल पडलेले, गणवेष घातलेले आणि पदके, फिती लावलेले सत्तरीच्या घरातील उमराव मोठ्या टेबलाशी बसलेले होते. पीएर त्या सर्वांनाच कधी ना कधी त्यांच्या घरी भेटला होता. कधी त्यांना क्लबवर पत्ते खेळताना त्याने पाहिलेले होते. पूर्वीसारखाच कोलहल करीत गर्दी टेबलाजवळ सरकू लागली. ते वृद्ध उमराव एकमेकांकडे पाहात बसले होते. त्यांच्या चेहऱ्यावरून त्यांना फार उकडत असल्याचे काय ते दिसत होते. दुसरा कसलाही भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता.

पीएरने आपल्या कल्पना सोडल्या नाहीत, नाकारल्या नाहीत. पण त्याला काहीसे अपराधी वाटू लागले आणि तो आपल्या मताचे समर्थन करण्याचा प्रयत्न करू लागला.

' कशाची आवश्यकता आहे हे आम्हाला कळले तर आम्ही चांगल्या तऱ्हेने त्याग करू शकू एवढेच मी म्हणालो होतो. ' इतरांच्या आवाजांहून आपला आवाज चढवीत तो ओरडून सांगू लागला.

त्याच्या जवळ असलेल्या एका वृद्ध माणसाने वळून पाहिले पण लागलीच टेबलाच्या दुसऱ्या टोकाला कोणीतरी ओरडल्याने त्याने तिकडे पाहिले.

' मॉस्को शत्रूला द्यावे लागणार ! अशा तऱ्हेने पापाचे परिमार्जन होणार !' एकजण ओरडला.

' तो मानव जातीचा शत्रू आहे ' दुसरा ओरडू लागला.

' मला बोलू द्याल तर...'

' अरे बाबांनो, तुम्ही मला चेंगरून टाकताहात...'

त्याच क्षणी परतणाऱ्या गर्दीतून झरझर पावले टाकीत काउंट रास्तोप्चिन आला. त्याची हनुवटी पुढे आलेली होती. त्याची दृष्टी सावध होती. जनरलचा गणवेष त्याच्या अंगावर होता आणि खांद्यावर फीत लटकवलेली होती.

' सम्राट आता लवकरच इकडे येत आहेत.' रास्तोप्चिन म्हणाला. ' मी त्यांच्याकडून आत्ताच येतो आहे. आज आपली जी अवस्था आहे तिचा विचार करता अधिक चर्चेची गरज नाही असे मी मानतो. आम्हांला आणि व्यापाऱ्यांना बोलावणे योग्य आहे असे सम्राटांना

वाटले. ही त्यांची कृपा.' मग व्यापाऱ्यांच्या दिवाणखान्याकडे अंगुलिनिर्देश करून रास्तोप्चिन म्हणाला, 'ते लाखांनी पैसा ओततील. मनुष्यबळ उभे करणे, स्वतःहून त्या कामाला वाहून घेणे हे आमचे कर्तव्य आहे. कमीत कमी एवढे आम्ही करू शकूच.'

टेबलाशी बसलेल्या त्या मोठमोठ्या उमरावांमधे चर्चा सुरू झाली. सर्व चर्चा इतकी मंद आवाजात चालली होती की एखादी शोकसभा चालली आहे असे वाटत होते. कोलाहल संपला म्हणजे ती वृद्ध माणसे 'मान्य' किंवा विविधता यावी म्हणून 'मला कबूल आहे' असे बोलत होती ते ऐकू येत होते.

मॉस्कोतील उमरावमंडळींचा ठराव लिहून घेण्याचा हुकूम सेक्रेटरीला मिळाला. 'स्मॉलेन्स्का भागाप्रमाणेच मॉस्कोमधील उमरावमंडळी दर हजारी दहा सैनिक सर्व साहित्यानिशी पुरवील.'

आतापर्यंत बसून राहिलेला एक वृद्ध सुटकेचा श्वास टाकून उठला. जमिनीवरून खुर्च्या सरकवल्याचा आवाज ऐकू आला आणि पाय मोकळे करण्यासाठी उमराव फिरू लागले.

'सम्राट–सम्राट' सर्व खोल्यांतून एकाएकी शब्द उमटला. लोक प्रवेशद्वाराच्या दिशेने धावले. दोन्ही बाजूंना दाटीवाटीने उभ्या असलेल्या उमरावांच्या भिंतीमधील रुंद मोकळ्या जागेतून झार चालत गेला. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आदर, विस्मय आणि जिज्ञासा उमटत होती. पीएर बऱ्याच अंतरावर उभा असल्याने झारचे सगळे बोलणे त्याला समजले नाही. जे थोडेफार त्याने ऐकले त्यावरून साम्राज्य संकटात आहे आणि त्याची भिस्त मॉस्कोतील उमरावांवर आहे हा त्याच्या बोलण्याचा आशय असल्याचे त्याला कळून चुकले. आताच उमरावांनी पास केलेल्या ठरावाची माहिती कुणीतरी दिल्याचे त्याला ऐकू आले.

कंपित स्वरात झार म्हणाला, 'सज्जनहो–' सगळा जमाव रोमांचित झाला. पुन्हा शांतता पसरली. पीएरला आता झारचा प्रेमळ आणि भारावून गेलेला आवाज स्पष्टपणे ऐकू येऊ लागला. 'मला रशियाच्या उमरावांच्या स्वामिनिष्ठेबद्दल कधीही संशय वाटत नाही. आज मात्र माझ्या अपेक्षेहून अधिक निष्ठा माझ्या प्रत्ययास आली आहे. मी पितृभूमीच्या वतीने तुमचे आभार मानतो. सज्जनहो–आता कृती महत्त्वाची आहे...प्रत्येक क्षण लाख मोलाचा आहे.'

झारचे भाषण संपले तशी गर्दी त्याच्याभोवती सरकू लागली. भोवतालचे लोक उत्साहाने घोषणा देऊ लागले. देशसंरक्षणापुढे आपणाला कशाचीही पर्वा नाही आणि आपण सर्वस्वाचा त्याग करायला तयार आहोत हे दाखवून द्यावे हीच एकमेव इच्छा त्या क्षणी पीएरच्या मनात निर्माण झाली. आपल्या भाषणाचा रोख घटनाधिष्ठित होता म्हणून पीएरला अपराधी वाटत होते. आपले ते पाप धुऊन टाकण्याची संधी तो पाहात होता.

काउंट मॅमनॉव्ह रेजिमेंट उभी करणार आहे हे ऐकताच पीएर बेझुहॉव्हने लागलीच रॉस्तोप्चिनला सांगितले, 'मी एक हजार सैनिक सर्व सामग्रीनिशी पुरवीन.'

जे घडले ते आपल्या पत्नीला सांगत असताना वृद्ध रोस्तॉफला अश्रू आवरत नव्हते. त्याला पेत्याची इच्छा लागलीच पटली आणि तो स्वतः त्याला प्रवेश मिळवण्यासाठी बाहेर पडला.

दुसऱ्या दिवशी झार निघून गेला. जमलेले सगळे उमराव आपापल्या घरी गेले. आपापल्या क्लबात गेले. त्यांनी आपले गणवेष उतरवून ठेवले. त्यांनी आपल्या व्यवस्थापकांना सैन्यभरती अधिक प्रमाणात करण्याचे हुकूम चरफडत सोडले. मग मात्र त्यांचे त्यांनाच आपल्या कृतीचे आश्चर्य वाटू लागले.

■ ■

# भाग दहावा

## १८१२

मुलगा निघून गेल्यानंतर दुसऱ्याच दिवशी प्रिन्स निकोलाय अंड्रीचने प्रिन्सेस मार्याला बोलावून घेतले आणि म्हटले, 'आता तुझे समाधान झालं ना? तू माझं माझ्या मुलाबरोबर भांडण लावून दिलंस. आता बरं वाटलं ना तुला? तुला हेच हवं होतं. मन शांत झालं ना तुझं?...माझ्या दृष्टीनं ही शोकाची बाब आहे. मी आता वृद्ध झालो आहे. दुर्बल झालो आहे. तुझ्या इच्छेप्रमाणं घडलं आहे. आता तुझ्या दृष्टीनं आनंदाचा प्रसंग आहे.' त्यानंतर प्रिन्सेस मार्या आपल्या वडिलांना एक आठवडा भेटली नाही. ते आजारी पडले आणि आपल्या खोलीतून बाहेर पडले नाहीत.

आजारपणात वडिलांनी बूरिअनबाईलाही भेटण्याचे टाळले हे मार्याच्या ध्यानात आले तेव्हा तिला आश्चर्य वाटल्याखेरीज राहिले नाही. केवळ तिहॉन त्यांची शुश्रूषा करीत होता.

आठवड्यानंतर प्रिन्स निकोलाय बरा होऊन खोलीबाहेर फिरू लागला. त्याचा पूर्वीसारखा जीवनक्रम सुरू झाला. लक्षात येईल अशा उत्साहाने तो शेतवाडीवरील इमारत आणि बागा यांची आखणी करू लागला. बूरिअनबाईबरोबरचे संबंध त्याने अजिबात तोडले. प्रिन्सेस मार्याशी त्याचे वागणे रुक्ष, तुटक झाले होते. जणू तो सुचवीत होता. 'तू माझ्याविरुद्ध कारस्थान केलंस हे मला ठाऊक आहे. त्या फ्रेंच स्त्रीच्या आणि माझ्या संबंधाबद्दल तू आन्द्रेला खोट्यानाट्या गोष्टी सांगितल्यास आणि माझं त्याच्याशी भांडण लावलंस. पण लक्षात ठेव, माझं तुझ्यावाचून काही अडणार नाही आणि त्या फ्रेंच बयेवाचूनही काही अडणार नाही.'

प्रिन्सेस मार्या निकोलुश्काच्या सान्निध्यात राहून त्याला रशियन भाषेचे धडे देण्यात आणि त्याचा इतर अभ्यास करवून घेण्यात तसेच देसॅलेशी बोलण्यात दिवसाचा अर्धा–

अधिक वेळ घालवी. उरलेल्या वेळात ती वाचन करी, वृद्ध दासीच्या सहवासात वेळ घालवी. नाहीतर भक्तमंडळीशी बोलत राही. सर्वसामान्य स्त्रियांप्रमाणेच प्रिन्सेस मार्या युद्धाकडे पाही. आघाडीवर असलेल्या आपल्या भावाबद्दल तिला खूप काळजी वाटे, एकमेकांना ठार करू पाहणाऱ्या माणसांच्या निर्दयतेने ती भयभीत होई. हे काय चालले आहे ते तिला कळत नसे. मागे होऊन गेलेल्या युद्धासारखेच हे युद्ध आहे असे तिला वाटे. या युद्धाचे महत्त्व तिला पुसटही जाणवत नव्हते. नेहमी तिच्या सहवासात असणारा देसॅले युद्धामधे खूप रस घेत होता आणि त्याबद्दल तिला आपली मते ऐकवण्याचा प्रयत्न करीत होता. भयभीत झालेली भक्तमंडळी तिला आता खिस्तविरोधी व्यक्ती जन्माला येणार आहे अशा तऱ्हेची अफवा शेतकरी वर्गात कशी पसरली आहे ते आपल्या परीने सांगत होती. आता प्रिन्सेस द्रबेत्स्कॉय झालेली जूली पुन्हा नव्याने पत्रव्यवहारास सुरुवात करून तिला मॉस्कोहून देशभक्तीने ओथंबलेली पत्रे सारखी पाठवीत होती.

जूलीने लिहिले होते, 'प्रिय मैत्रिणी, सर्व फ्रेंच माणसांचा, एवढेच नव्हे तर फ्रेंच भाषेचा मला तिरस्कार वाटतो म्हणून मी तुला हे पत्र रशियन भाषेत लिहीत आहे. फ्रेंच भाषा ऐकणेही मला सहन होत नाही...मॉस्कोमधे आम्ही सर्वजण परमपूज्य सम्राटांच्या भेटीसाठी अतिशय अधीर झालो आहोत.

'बिचारा माझा नवरा ज्यूंच्या भिकार पथिकाश्रमात संकटे, उपासमार यांना तोंड देत आहे. त्याच्याकडून येणाऱ्या बातमीने माझे प्रेम मात्र वाढत आहे.

'आम्ही इथे शक्य तितका मजेत वेळ घालवीत असतो. पण युद्धामधे युद्धाला आवश्यक असेच वर्तन ठेवत असतो. प्रिन्सेस ॲलिना आणि सोफिया दिवसभर माझ्या सान्निध्यात असतात आणि ज्यांचे नवरे जिवंत आहेत अशा आम्ही, दुःखी विधवा कापड खरवडून मऊ करण्याचे काम करत असताना सुरेख गप्पा मारत असतो. आमच्या सुखी जीवनात उणीव राहू नये म्हणून तू इथं हवी आहेस.'

प्रिन्सेस मार्याला युद्धाचा अर्थ आकलन न होण्याचे प्रमुख कारण म्हणजे थोरल्या प्रिन्सचे वागणे. तो युद्धाबद्दल कधीच बोलत नव्हता. युद्ध चालू आहे हे तो मान्यच करीत नव्हता. जेवणाच्या वेळी देसॅलेने युद्धाचा उल्लेख केला की तो देसॅलेची टर उडवीत होता. त्याच्या वागण्याची रीत इतकी शांत आणि आत्मविश्वासपूर्ण होती की तिचा त्यावर निःशंक विश्वास बसला होता.

सबंध जुलै महिनाभर थोरला प्रिन्स विलक्षण उत्साहाने नाना उद्योगांत रमला होता. त्याने नव्या बागेची व नोकरांसाठी नव्या निवासाची योजना आखली होती. त्याला चांगली झोप येत नसल्यामुळे प्रिन्सेस मार्याला खूप काळजी वाटत होती. नेहमीप्रमाणे आपल्या स्वतःच्या खोलीत झोपण्याचे त्याने सोडून दिले होते. रोज रात्री नवीन ठिकाणी तो आपला बिछाना टाकायला सांगे. एका रात्री तो आपला प्रवासी पलंग गॅलरीत ठेवायला सांगे तर दुसऱ्या रात्री पोषाख न उतरताच दिवाणखान्यातील सोफ्यावर नाहीतर आरामखुर्चीत

डुलक्या घेत पडून राही. कोणी त्याला काहीतरी मोठ्याने वाचून दाखवी. कधीकधी थोरला प्रिन्स भोजनगृहात सगळी रात्र घालवण्याचा प्रयत्न करी.

ऑगस्टच्या पहिल्या तारखेस प्रिन्स आन्द्रेकडून दुसरे पत्र आले. घर सोडल्यानंतर त्याने लागलीच पहिले पत्र पाठवले होते. त्यात त्याने मोठ्या नम्रतेने आपल्या वडिलांची आपण त्या वेळी काढलेल्या उद्गारांबद्दल क्षमा मागितली होती. माझ्यावरील प्रेम पूर्ववत ठेवा अशी त्यांना विनंती केली होती. ह्या पहिल्या पत्राला थोरल्या प्रिन्सने प्रेमपूर्वक पत्र पाठवले होते. त्या वेळेपासून त्याने फ्रेंच बाईला जवळ फिरकू दिले नव्हते. फ्रेंच सैन्याने व्हीटेप्स्क घेतल्यानंतर प्रिन्स आन्द्रेने दुसरे पत्र लिहिले होते. त्यात त्याने सगळ्या मोहिमेची थोडक्यात हकीकत दिली होती. सोबत त्याने आराखडाही काढलेला होता. भविष्यकाळात लढाई कशा स्वरूपात होईल याबद्दल त्याने आपले विचार व्यक्त केले होते. आपल्या वडिलांना प्रिन्स आन्द्रेने सल्ला दिला होता, ' तुम्ही युद्धाच्या धुमाळीपासून फार दूर नसल्याने तुमची जागा गैरसोयीची आहे. शत्रूच्या कूच करण्याच्या सरळ रेषेत तुम्ही आहात. तेव्हा तुम्ही मॉस्कोला गेलात तर बरं होईल. '

त्या दिवशी जेवणाच्या वेळी देसॅले म्हणाला, ' फ्रेंच सैन्यानं केव्हाच व्हीटेप्स्कामध्ये प्रवेश केला आहे. असं मी ऐकतो. ' तेव्हा थोरल्या प्रिन्सला प्रिन्स आन्द्रेच्या पत्राची आठवण झाली. तो प्रिन्सेस मार्याला म्हणाला, ' आजच प्रिन्स आन्द्रेचं पत्र आलं आहे. तू वाचलंस का ? '

प्रिन्सेस भीतभीत म्हणाली, ' नाही '. तेव्हापर्यंत तिने पत्राबद्दल ऐकले नव्हते. त्यामुळे तिने ते वाचण्याची शक्यताच नव्हती.

' ह्याच युद्धाबद्दल त्यानं लिहिलं आहे '. असे म्हणताना तो तुच्छतेने हसला.

' प्रिन्स आन्द्रेला परिस्थितीची कल्पना असल्यामुळं पत्र वाचनीय असणार '. देसॅले म्हणाला.

' निश्चितच वाचनीय असणार ' बूरिअनबाईने री ओढली.

बूरिअनबाईला थोरला प्रिन्स म्हणाला, ' जाऊन ते पत्र आण बरं. ते छोट्या टेबलावर पेपरवेटखाली आहे. '

बूरिअनबाई उत्सुकतेने उडी मारल्यागत उठली.

कपाळावर आठ्या घालीत तो ओरडला. ' थांब, तू नको जाऊस. मिहाइल इव्हानिच, तू धावत जा. ' मिहाइल इव्हानिच उठला आणि अभ्यासिकेत शिरला. तो खोलीच्या बाहेर पडला न पडला तोच अस्वस्थपणे भोवताली पाहात नॅपकिन खाली ठेवत थोरला प्रिन्स उठला आणि बाहेर निघाला. ' कोणीच ठीक काम करीत नाही. गोंधळ उडवतात सगळे. ' तो बाहेर गेला तशी प्रिन्सेस मार्या, देसॅले, बूरिअनबाई आणि धाकटा निकोलुश्काही काही न बोलता एकमेकांकडे पाहात राहिले. थोरला प्रिन्स घाईघाईने धापा टाकीत आला. त्याच्याबरोबर मिहाइल इव्हॉनिच होता. त्याने आपल्याबरोबर पत्र आणले होते. बरोबर आणलेला आराखडा त्याने बाजूला ठेवला. जेवण होईतो त्याने कुणालाच पत्र वाचू दिले नाही.

दिवाणखान्यात सर्वजण जमले तेव्हा त्याने ते पत्र प्रिन्सेस मार्याकडे दिले. नव्या इमारतीचा आराखडा समोर टेवून त्यावर नजर खिळवून त्याने तिला पत्र मोठ्याने वाचण्याची आज्ञा केली.

पत्र वाचून झाल्यावर प्रिन्सेस मार्याने आपल्या वडिलांकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले. त्यांची नजर आराखड्यावर होती. ते स्वतःशी कसलातरी विचार करीत असल्याचे स्पष्ट दिसत होते.

' प्रिन्स तुमचं काय मत आहे ? ' देसॅलेने धाडस करून विचारले.

' अं ? काय म्हणालास ? ' तंद्रीतून जाग यायला थोरल्या प्रिन्सला कष्ट झाल्यासारखे दिसले. आराखड्यावरून नजर न काढता त्याने विचारले होते.

' युद्धक्षेत्र आपल्याजवळ येण्याची बरीच शक्यता आहे. '

जोरजोराने हसत थोरला प्रिन्स उद्गारला, ' कसलं युद्धक्षेत्र घेऊन बसलास ? मी नेहमीच सांगत आलो आहे आणि आताही तेच सांगेन. हे युद्ध पोलंडमधेच होणं अटळ आहे. शत्रू नीमननदीच्या अलीकडे येणं कधीच शक्य नाही. ' देसॅले चकित होऊन थोरल्या प्रिन्सकडे पाहात राहिला. शत्रू कधीच नीमननदीशी येऊन भिडला होता आणि थोरला प्रिन्स मात्र नीमननदीच्या गोष्टी करीत होता. मात्र प्रिन्सेस मार्याने नीमननदीचे नकाशातील ठिकाण विसरून वडिलांचे म्हणणे खरे मानले होते.

' हिम वितळू लागलं म्हणजे शत्रूचे सैनिक पोलंडच्या दलदलीत बुडून मरतील. त्यांच्या हे लक्षात येत नाही हे नक्की. ' थोरला प्रिन्स म्हणाला. तो अजूनदेखील १८०७ च्या मोहिमेचा विचार करीत होता. त्याला ती मोहीम अगदी काल परवा घडल्यासारखी वाटत होती. ' बेनिंग्झनने यापूर्वीच प्रशियामधे प्रवेश करायला हवा होता. मग युद्धाला वेगळीच कलाटणी मिळाली असती. '

देसॅले भीतभीत म्हणाला, ' परंतु प्रिन्स पत्रामधे विट्टेन्स्टाइनचा उल्लेख आहे. '

' पत्रात उल्लेख आहे ? असेल. ' थोरला प्रिन्स म्हणाला. त्याच्या स्वरात नाखुषी व्यक्त झाली. ' असेल. ' त्याची मुद्रा एकाएकी खिन्न झाली. जरा वेळ थांबून म्हणाला, ' होय. त्यानं लिहिलं आहे.—फ्रेंचांना चांगला मार मिळाला. कुठल्या नदीजवळ बरं ? '

नजर खाली वळवून देसॅले म्हणाला, ' प्रिन्सनं त्याबद्दल काहीच लिहिलेलं नाही. '

' काही लिहिलं नाही म्हणतोस ? तुला काय वाटतं–ह्या माझ्याच कल्पना आहेत म्हणून ? '

बराच वेळ कुणी काहीही बोलले नाही.

मग एकाएकी मान उंच करून इमारतीच्या आराखड्याकडे लक्ष वेधीत प्रिन्स म्हणाला, ' मिहाइल इव्हानिच, तू सांगितलेला बदल कसा कुठं करायचा ते सांगा बरं. '

मिहाइल इव्हानिच प्लॅनजवळ गेला. थोरला प्रिन्स त्याबद्दल त्याच्याशी बोलत बोलत आपल्या खोलीकडे वळला. जाताजाता त्याने प्रिन्सेस मार्याकडे आणि देसॅलेकडे चिडून पाहिले.

आपल्या मुलाचे पत्र दिवाणखान्यातील टेबलावर विसरून थोरला प्रिन्स गेला होता. ते पाहून मार्याला विस्मय वाटला. तिला त्या पत्राबद्दल बोलण्याची भीती वाटली.

विसरून टेबलावर राहिलेले पत्र मागण्यासाठी त्या रात्री थोरल्या प्रिन्सने प्रिन्सेस मार्याकडे मिहाइल इव्हानिचला पाठवले. प्रिन्सेस मार्याने त्याच्याकडे पत्र दिले. मनातून आवडत नव्हते तरीही तिने त्याच्याकडे वडील काय करीत आहेत याची चौकशी केली.

'अजून खूप कार्यमग्न आहेत.' मिहाइल इव्हानिचने आदरयुक्त उपरोधाने म्हटले तशी ती भीतीने पांढरीफटक पडली. नव्या बांधकामाची खूप चिंता करीत आहेत. मधाशी थोडे वाचत होते पण आता... मग हळू आवाजात म्हणाला, 'मला वाटतं आता ते टेबलाच्या खणातील आपलं मृत्युपत्र पाहात असतील.' मरणानंतर मागं ठेवायची कागदपत्रं—त्यांना ते मृत्युपत्र म्हणत असत—चाळत राहणं हा आताशा त्यांचा आवडता कार्यक्रम झाला होता.

'स्मॉलेन्स्क येथे अल्पाटिचला पाठवत आहेत ना?' प्रिन्सेस मार्याने विचारले.

'खात्रीनं पाठवत आहेत. तो केव्हाचा हुकुमाची वाट पाहात आहे.'

मिहाइल इव्हानिच पत्र घेऊन खोलीत आला तेव्हा थोरला प्रिन्स चष्मा लावून बसला होता. त्याच्या डोळ्यांवर सावली पडली होती. कागदपत्रांच्या पसाऱ्यात टेबलाच्या उघड्या खणाजवळ असलेल्या मेणबत्तीवरील आच्छादनाची सावली दूरवर पसरली होती. तो बहुधा गंभीरपणे कागदपत्रे वाचत होता. (तो कागदपत्रांना आपली 'मते' म्हणत असे.) ही कागदपत्रे त्याच्या मृत्यूनंतर झारला सुपूर्द केली जायची होती.

थोरला प्रिन्स आता जी कागदपत्रे वाचत होता ती त्याने जेव्हा लिहिली होती त्या काळच्या आठवणी त्याला आल्या आणि मिहाइल खोलीत शिरला त्या सुमारास त्याच्या डोळ्यांत अश्रू आले. त्याने मिहाइलच्या हातातून पत्र घेतले. आपल्या खिशात ठेवले. आपली कागदपत्रे आवरून ठेवली. मधापासून भेटीसाठी बाहेर बसलेल्या अल्पाटिचला त्याने हाक मारली.

स्मॉलेन्स्कला आपल्याला काय लागेल हे त्याने कागदाच्या कपट्यावर नोंदवून ठेवले आणि दाराशी उभ्या असलेल्या अल्पाटिचला सूचना देत असताना तो खोलीत येरझारा घालू लागला.

'ह्या नमुन्याच्या पत्राचा कागद आठ दस्ते घे. त्या कागदाची कडा सोनेरी हवी. हा नमुना घे म्हणजे याच्याशी पारखून घेता येईल. मिहाइल इव्हानिचच्या यादीप्रमाणे व्हार्निश, सील करण्यासाठी मेण इत्यादी गोष्टी घे...'

त्याने येरझारा सुरू ठेवल्या. मग टाचणाकडे पाहिले.

'सैन्यभरतीचे पत्र गव्हर्नरांना तू प्रत्यक्ष नेऊन दे.' नव्या इमारतीच्या दरवाजांना बोल्ट हवे होते. स्वतः थोरल्या प्रिन्सने बनवलेल्या नमुन्याचेच हवे होते. शिवाय त्याचे मृत्युपत्र ठेवण्यासाठी लोखंडी पेटी बनवायला सांगायची होती.

अल्पाटिचला अशा प्रकारच्या सूचना सुमारे दोन तास देऊनही थोरला प्रिन्स त्याला जाऊ देईना. तो खाली बसला. कसल्याशा विचारात गढला. त्याने डोळे मिटले, त्याला डुलकी

आली. अल्पाटिचने जाण्यासाठी थोडीशी हालचाल केली. तशी तो म्हणाला, 'तू जाऊ शकतोस. काही गरज लागलीच तर तुला बोलवीन.'

अल्पाटिच निघून गेला. थोरला प्रिन्स पुन्हा खणाकडे गेला. आत पाहात त्याने आतील कागदपत्रांवरुन हात फिरवला. पुन्हा खण मिटला. मग टेबलाशी येऊन गव्हर्नरला पत्र लिहू लागला.

पत्र सील करून तो उठला तेव्हा त्याला बराच उशीर झाला होता. तो पेंगुळला होता. आपणाला झोप येणार नाही. अंथरुणात पडल्यावर अतिशय विषण्ण विचारांनी मन चक्रावून जाईल हे त्याने ओळखले. त्याने तिहॉनला बोलावले. त्या रात्री कुठे बिछाना टाकायचा हे सांगण्यासाठी तो तिहॉनबरोबर खोल्याखोल्यांतून जाऊ लागला. प्रत्येक कोपरा तपासू लागला.

त्याला कुठलीही जागा पसंत पडेना. अभ्यासिकेतील कोच त्याच्या सवयीचा होता. त्याने त्याची धास्ती घेतली होती. तशी कुठलीच जागा त्याला योग्य वाटत नव्हती. पण त्यातल्या-त्यात दिवाणखान्यातील पिॲनो मागील कोपऱ्याची जागा त्याला उत्तम वाटली. तो अद्याप तिथे कधी झोपला नव्हता.

नोकरांच्या मदतीने बिछाना आणून तिहॉन नीट करू लागला.

'तसा नको—तसा नको' थोरला प्रिन्स ओरडला. त्याने आपल्या हातांनी बिछाना कोपऱ्यापासून एक इंचभर दूर केला आणि पुन्हा तो जवळ सारला.

कपडे काढले जाताना प्रयास होऊ लागल्याने थोरल्या प्रिन्सने कपाळाला आठ्या घातल्या. कपडे बदलून झाल्यावर त्याने धाडकन बिछान्यावर अंग टाकले. तो आता विचारात गढल्यासारखा दिसला. खरे तर तो विचार करीत नव्हता. पाय उचलून बिछान्यावर घेण्याचा प्रयास करण्याआधी तो थांबला होता.

पाय वर घेण्याचा लाखावा प्रयत्न केला आणि मग तो स्वस्थ पडून राहिला. तोच एकाएकी अंगाखालचा बिछाना पुढेमागे सारखा हालतो आहे, धापा टाकतो आहे, हिसके देतो आहे असा भास त्याला होऊ लागला. प्रत्येक रात्री त्याला असा भास व्हायचा. मिटू लागलेले डोळे त्याने उघडले.

कुणा अज्ञात माणसावर डाफरल्यासारखा तो म्हणाला, 'काय कटकट आहे. मी काहीतरी महत्त्वाची गोष्ट झोपताना आठवणार होतो. कोणती ती गोष्ट? बोल्ट का? मी त्याबद्दल बोललो आहे. दिवाणखान्यातील एखादी गोष्ट असणार. प्रिन्सेस मार्या मूर्खासारखी बडबडली. देसॅले तर अचरटच आहे...तो काहीतरी बोलला – मला आत काही आठवत नाही.'

'टिश्का, आपण जेवणाच्या वेळी कसल्या गोष्टी करीत होतो?'

'प्रिन्स मिहाइलबद्दल...'

'थांब. थांब' थोरल्या प्रिन्सने टेबलावर हात मारला. 'आलं आता लक्षात. प्रिन्स आन्द्रेच्या पत्राविषयी बोलत होतो. प्रिन्सेस मार्यानं पत्र वाचलं आहे. देसॅले व्हिटेप्स्कबद्दल काहीतरी म्हणाला. आता मी ते पत्र वाचीन.'

त्याने तिहॉनला आपल्या खिशातून पत्र काढायला सांगितले. वर मेणबत्ती असलेले छोटे टेबल जवळ ओढून ठेवायला सांगितले. चष्मा लावून तो वाचू लागला. त्या शांत रात्री तो पत्र वाचू लागला तेव्हा कुठे पहिल्या प्रथम त्या पत्राचा अर्थ त्याच्या अंतःकरणाला जाणवला. 'फ्रेंच सैन्य व्हिटेप्स्कला आहे. चार दिवसांत कूच करून ते स्मॉलेन्स्कला पोचेल. कदाचित या वेळी ते आता इथं आलंही असेल!' त्याने तिश्काला हाक मारली.

हाकेसरशी तिहॉन उडी मारून उभा राहिला. तशी थोरला प्रिन्स ओरडला. 'काही नाही रे, काही नाही. उगाच हाक मारली.'

त्याने मेणबत्तीच्या खाली पत्र सरकवले आणि डोळे मिटून घेतले. त्याच्या डोळ्यांसमोर डॅन्यूबनदी, उजळलेली दुपार, लव्हाळी, रशियन सैन्याचा तळ ही साकार झाली. पोत्यॉम्किनच्या भडक रंगाच्या तंबूत प्रवेश करणाऱ्या कपाळावर एकही सुरकुती नसलेल्या धीट, आनंदी, लालबुंद चेहऱ्याच्या तरुण जनरलचे म्हणजेच आपले रूप त्याला मनश्चक्षूसमोर दिसू लागले.

प्रिय व्यक्तीबद्दल हेवा वाटून तेव्हा तापदायक संवेदना ज्या तीव्रतेने त्याने अनुभवल्या होत्या तशाच तो आताही अनुभवू लागला. पोत्यॉम्किनशी झालेल्या पहिल्या भेटीतील शब्दन् शब्द त्याला आठवू लागला. मग त्याला रोगट फिकट गुबगुबीत चेहऱ्याची स्थूल स्त्री सम्राज्ञी वाटू लागली. त्याचे स्वागत करताना तिने केलेले स्मित आणि उच्चारलेले शब्द त्याला आठवू लागले. लाकडी स्टँडवर पहुडलेल्या त्या स्त्रीचा चेहरा त्याला दिसू लागला. तिच्या हाताचे चुंबन घेण्यावरून शवपेटिकेजवळ झुबॉव्हशी झालेले भांडणही त्याला आठवू लागले.

बाल्ड हिल्स ही शेतवाडी स्मॉलेन्स्कपासून चाळीस मैलांवर होती. ती स्मॉलेन्स्कच्या मागच्या बाजूस मॉस्कोला जाणाऱ्या मुख्य रस्त्यापासून दोनएक मैलांवर होती.

रात्री अल्पाटिचला थोरल्या प्रिन्सने सूचना दिल्या.

सगळ्या सूचना मिळाल्यावर अल्पाटिचने आपली पांढरी बीव्हरच्या लोकरीची हॅट चढवली (ही त्याला प्रिन्सकडून भेट मिळाली होती.) प्रिन्सप्रमाणे हातात काठी घेऊन तो बाहेर पडला तेव्हा त्याच्या सोबत घरातील सगळी माणसे होती. तो ज्या गाडीतून जाणार होता त्या गाडीला तीन तांबूस रंगाचे तुकतुकीत घोडे जुंपलेले होते.

'तसंच काही घडलं तर याकोव्ह अल्पाटिच, मागं फीर. कृपा करून आम्हाला विसरू नकोस.' लढाई जवळच होईल आणि शत्रू जवळ येईल ह्या अफवेला उद्देशून बायको त्याला विनवीत होती.

'ह्या बायका अशाच गडबड गोंधळ करणार.' गाडी निघाली तशी भोवतालच्या शेतावरून नजर फिरवीत अल्पाटिच स्वतःशीच पुटपुटला. त्याने पाहिले– रायची शेते पिवळी होत होती. कुठेकुठे अजूनही ओटची शेते हिरवी होती. शेतात कुठेकुठे अजूनही काळे पट्टे

राहिले होते. त्यात दुसऱ्यांदा नांगरणी सुरू झाली होती.

चार तारखेस रात्री स्मॉलेन्स्कला पोचल्यावर गेली तीस वर्षे ज्या पथिकाश्रमात उतरत असे त्याच पथिकाश्रमात तो उतरला.

छापील शर्ट आणि जाकिट घातलेला तुंदिलतनू मालक फेरॅपॉन्टॉव्ह आपल्या दुकाना-समोरच उभा होता. अल्पाटिचला पाहताच तो त्याच्याकडे गेला.

' याकोव्ह अल्पाटिच, सुस्वागत ! लोक शहरातून बाहेर पडताहेत आणि तू मात्र शहरात शिरतो आहेस.'

' लोक बाहेर पडताहेत ? म्हणतोस तरी काय ? '

' तेच तर सांगतो ना. मी नेहमीच म्हणतो. लोक बेटे मूर्ख असतात. नेहमीच फ्रेंचांची धास्ती घेतात.'

' बायकांसारखेच अचरट आहेत सगळे.'

' मलाही तेच वाटतं. तू नोटीस पाहिलीस का ? काही झालं तरी आम्ही फ्रेंचांना शिवू देणार नाही. आणि तेच अगदी बरोबर आहे. गाडीघोड्यासाठी शेतकरी तीन रूबल्स मागताहेत तीन रूबल्स. लोकांना बऱ्यावाईटाची काही चाडच उरली नाही.'

याकोव्ह अल्पाटिचचे त्याच्या बोलण्याकडे लक्ष नव्हते. त्याने स्वतःसाठी चहादाणी मागवली. घोड्यासाठी गवत मागून घेतले. चहा घेतल्यानंतर तो झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी अल्पाटिचने खास शहरात वापरण्यासाठी ठेवलेले घट्ट जाकिट अंगात घातले आणि तो आपल्यावर सोपवलेले काम पार पाडण्यासाठी बाहेर पडला. सकाळपासून लख्ख ऊन पडले होते. आठवाजेतो चांगलाच उष्मा होऊ लागला. अल्पाटिचच्या मनात आले. ' पीक कापणीला सोन्यासारखा दिवस आहे हा ! ' शहराच्या बाहेर अगदी सकाळ-पासून सुरू झालेला गोळीबार ऐकू येत होता.

आठ वाजता तोफेच्या गर्जनेत बंदुकीचा आवाज मिसळला. घाईघाईने धावणाऱ्या लोकांनी आणि सैनिकांनीही रस्ते भरून गेले. भाड्यासाठी गाडीवान फेऱ्या घालू लागले. आपल्या दुकानांच्या दारात दुकानदार उभे होते. नेहमीप्रमाणे चर्चमधे प्रार्थनादी धार्मिक विधी सुरू होते. अल्पाटिच दुकाने, सरकारी कचेऱ्या, पोस्ट ऑफिस आणि गव्हर्नरांचे ऑफिस या ठिकाणी गेला. सर्व ठिकाणी त्याला प्रत्येकजण युद्धाबद्दल बोलत असल्याचे आढळले. शत्रू शहरावर हल्ला करणार असे बोलले जात होते. सगळेजण परस्परांस आता पुढे काय करायचे असे विचारत होते, परस्परांस धीर देत होते.

गव्हर्नरच्या निवासाकडे अल्पाटिच आला तेव्हा त्याला प्रवेशद्वाराशी पुष्कळ माणसे जमलेली दिसली. कोसॅक घोडेस्वार आणि गव्हर्नरांची प्रवासी गाडी दिसली. पायऱ्यांवर अल्पाटिचला दोघेजण भेटले. त्यातील एक त्याच्या ओळखीचा होता. एकेकाळी पोलीस कॅप्टन असलेला तो मनुष्य तावातावाने बोलत होता. ' ही थट्टेची गोष्ट नाही. ज्याला स्वतःचीच काळजी करावी लागते तो सुदैवी होय. एकट्या माणसाला जीवन तितकं सुखाचं नाही. जेव्हा

एखाद्याला शेतवाडी आहे. तेरा माणसांचं कुटुंब आहे...परिस्थिती आता अशी आली आहे की आपणा सर्वांचा नाश होणार आहे...एवढं असल्यावर सरकारबद्दल काय बोलणार ?... मी तर या लुटारूंना फासावरच चढवीन...'

'गप्प बैस बाबा.' बाकीचे त्याला शांत करीत होते.

'मी कुणाची पर्वा करीत नाही. ऐकू दे त्याला आम्ही काही कुत्रे नाही.' तो माजी पोलिस कॅप्टन म्हणाला. वळून पाहिल्यावर त्याच्या दृष्टीस अल्पाटिच पडला.

'अरे वा ! अल्पाटिच ? तू कसा इकडे ?'

'परिस्थिती कशी आहे याची चौकशी करण्याचा हुकूम आम्हाला कृपाळू खाविंदांनी दिलेला आहे.' अभिमानाने मान उंचावून आणि एक हात जाकिटात घालून अल्पाटिचने उत्तर दिले. थोरल्या प्रिन्सचा उल्लेख करताना तो नेहमी असेच करी.

त्या माणसाने त्याला ओरडून सांगितले, 'मग ऐक तर—परिस्थिती इतकी हाताबाहेर गेलेली आहे की, गाड्या मिळणं अगदी अशक्य होऊन बसलं आहे.'

ज्या दिशेने गोळीबाराचे आवाज येत होते तिकडे बोट दाखवीत तो म्हणाला, 'ऐकलंस का ? पुन्हा सुरुवात झाली.'

'त्या दरोडेखोरांनी आमचा सत्यानाश केला आहे.' पुन्हा तो ओरडला आणि पायऱ्या उतरून गेला.

अल्पाटिचने मान हालवली आणि तो पायऱ्या चढू लागला. प्रतीक्षागृहात व्यापारी, स्त्रिया, कारकून यांनी गर्दी केली होती. ती सगळी माणसे काही न बोलता परस्परांकडे पाहात बसली होती. गव्हर्नरांच्या खोलीचा दरवाजा उघडला तशी सगळीजण उभी राहून पुढे सरण्याच्या पवित्र्यात राहिली. खोलीतून एक कारकून धावत आला. व्यापाऱ्याला काहीतरी म्हणाला. मग त्याने गळ्याला क्रॉस असलेल्या एका दांडग्या अधिकाऱ्याला आपल्या मागून यायला ओरडून सांगितले आणि तो पुन्हा नाहीसा झाला. इतरांच्या मुद्रा आणि त्यांचे प्रश्न टाळण्याचा त्याचा प्रयत्न स्पष्ट दिसत होता. पण अल्पाटिच पुढे सरला. दुसऱ्या खेपेस तोच कारकून पुन्हा बाहेर आला. तेव्हा अल्पाटिचने त्याचा बटणांचा कोट पकडला. दोन पत्रे पुढे करीत तो त्याला म्हणाला, 'जनरल-इन्-चीफ् प्रिन्स वोलकॉन्सीने माननीय बॅरन अॅश यांना ही दिली आहेत.' अल्पाटिचने हे शब्द अशा भपक्यात आणि अर्थपूर्ण रीतीने उच्चारले की त्या कारकुनाने त्याच्याकडे वळून ती पत्रे स्वीकारली, थोड्याच वेळात अल्पाटिचला गव्हर्नरांच्या भेटीला बोलावण्यात आले. गव्हर्नर घाईघाईने त्याला म्हणाले, 'प्रिन्स आणि प्रिन्सेस यांना सांगा मला त्याबद्दल काहीच माहिती नाही. वरून आलेल्या हुकमाची मी अंमलबजावणी केली. हे घे...' त्याने अल्पाटिचला कागदपत्र दिले.

'तरीपण प्रिन्स आजारी असल्यानं त्यांना माझा सल्ला सांग. त्यांनी मॉस्कोला जावं हे बरं. मी स्वतःदेखील लवकरच निघणार आहे. त्यांना सांग...' पण गव्हर्नर आपले वाक्य पुरे करू शकला नाही. तेवढ्यातच धुळीने कपडे माखलेला आणि घामाने डबडबलेला एक

अधिकारी खोलीत धावतच शिरला आणि फ्रेंचमधे काहीतरी सांगू लागला. गव्हर्नरची मुद्रा भयभीत झाली.

'तुम्ही जाऊ शकता.' गव्हर्नरने अल्पाटिचला मानेने खुणावले. त्याने त्या अधिकाऱ्याला काही प्रश्न विचारले. अल्पाटिच जेव्हा गव्हर्नरांच्या खोलीतून बाहेर पडला तेव्हा त्याच्याकडे उत्सुक, भयभीत आणि असहाय्य मुद्रा वळल्या. अल्पाटिच घाईघाईने पथिकाश्रमाकडे येऊ लागला. तेव्हा त्याला गोळीबाराचे आवाज अधिकाधिक जवळ येत आहेत, वातावरण अधिकाधिक तापत आहे. हे जाणवले गव्हर्नरने वाचायला दिलेल्या कागदपत्रातील मजकूर असा होता :

'स्मॉलेन्स्क शहराला कसलाही धोका नाही. शहरावर कसलेही संकट येण्याचा संभव नाही, असे मी आश्वासन देतो. स्मॉलेन्स्कच्या पुढे बावीस तारखेस मी एका बाजूने आणि प्रिन्स बॅग्रेशन दुसऱ्या बाजूने सैन्य एकत्रित करणार आहोत. दोन्ही सैन्ये एकत्रित होऊन तुमच्या शासनाखालील प्रांताच्या देशबांधवाच्या रक्षणासाठी पुढे सरतील. आमच्या देशाचे शत्रू मागे हटेपर्यंत अगर आमच्या शूर पलटणीतील शेवटचा सैनिक मारला जाईपर्यंत आमची सैन्ये पुढेच सरतील. अशा प्रकारचे शूर सैनिक तुमचे संरक्षण करीत आहेत. त्यांना आपल्याला विजय मिळणार याबद्दल पूर्ण आत्मविश्वास आहे. यावरून तुम्ही स्मॉलेन्स्कमधील रहिवाशांना आश्वासन दिले तर ते पूर्ण योग्य आहे. असे तुम्हास दिसेल.'

( बार्क्ली द् टॉल्य यांचे हुकमावरून स्मॉलेन्स्कचे गव्हर्नर बॅरन ॲश यांस रवाना, १८१२ )

रस्त्यारस्त्यातून लोकांचे जमाव अस्वस्थपणे फिरत होते. घरातील भांडी-कुंडी, खुर्च्या, कपाटे यांनी भरलेल्या मालवाहू गाड्या एकसारख्या फाटकाफाटकातून बाहेर पडत होत्या आणि रस्त्यावरून चालल्या होत्या. फेरॅपॉन्टॉव्हच्या शेजारच्या घराच्या प्रवेशद्वारांशी गाड्या उभ्या होत्या. बायका रडत होत्या. एकमेकींचा निरोप घेत होत्या. आवारातील कुत्रा घोड्यां-भोवती उड्या मारत भुंकत होता.

अल्पाटिच आवारात शिरला तेव्हा त्याची पावले पूर्वीहून जोरात पडू लागली. तो सरळ शेडमधील घोडे आणि गाडी होती तिथे गेला. झोपलेल्या गाडीवानाला त्याने उठवले. गाडीला घोडे जुंपायला सांगितले आणि तो बैठकीच्या खोलीत शिरला. घराच्या आतल्या खोलीतून मुलांचे रडणे आणि एका स्त्रीचे हृदयभेदक आक्रंदन त्याला ऐकू आले. पथिका-श्रमाचा मालक रागारागाने घोगऱ्या आवाजात ओरडत होता तेही त्याने ऐकले.

अल्पाटिच आत शिरला तेव्हा घाबरलेली स्वैपाकीण आत आली.

अल्पाटिचने आपल्या वस्तू गोळा केल्या. त्या गाडीवानाकडे दिल्या आणि मालकाचा हिशेब चुकता केला. मग फाटकातून गाडी निघाली.

आता दुपार कलली होती. अर्धा रस्ता सावलीत होता. अर्ध्या रस्त्यावर प्रखर ऊन होते. अल्पाटिच दरवाजाजवळ गेला. मग एकाएकी दूरवर सुसाटत धडामधूम असा विचित्र आवाज ऐकू आला. त्यानंतर लागलीच तोफांचा गडगडाट झाला आणि खिडक्यांची तावदाने थाड-

थाड आदळू लागली.

अल्पाटिच रस्त्यावर आला. दोन माणसे पुलाच्या दिशेने रस्त्यावरून धावत होती. निरनिराळ्या दिशांतून तोफांचा सुसाट आणि गर्जना ऐकू येत होती. गोळे शहरात पडत होते, स्फोट होत होते.

सुरुवातीला पडणाऱ्या हातबॉबचे आणि नंतर तोफांच्या गोळ्यांचे आवाज ऐकून लोकांची उत्सुकता तेवढी जागी झाली होती. मघापासून रडत असणारी पथिकाश्रमाची मालकीण आता थांबली. मुलाला घेऊन ती बाहेर फाटकाशी उभी राहिली. काही न बोलता लोकांकडे पाहात आणि आवाज ऐकत राहिली.

आचारी आणि दुकानदार घरातून बाहेर पडून फाटकापाशी आले. सगळी माणसे डोक्यां-वरून जाणाऱ्या गोळयांचे ओझरते दर्शन व्हावे म्हणून धडपडत होती. कोपऱ्यावरून बरीच माणसे जोरजोरात बोलत येत होती.

आणखी काहीजण त्या टोळक्यात मिसळले. ते थांबले आणि तोफेचा गोळा आपल्या-जवळील घरावर कसा पडला ते सांगू लागले. तेवढ्या काळात त्यांच्या डोक्यावरून सतत गोळे वेगाने उडत जात होते. अल्पाटिच गाडीत चढला तेव्हा मालक फाटकाशी उभा होता.

'जन्मात आ वासून कधी राहिलीच नव्हतीस काय ?' फेरॅपॉन्टॉव्ह स्वैपाकिणीच्या अंगावर खेकसला. लाल पेटिकोट घातलेली, बाह्या वर दुमडलेली स्वैपाकीण कोपऱ्याशी येऊन लोकांचे बोलणे ऐकताना आपल्या उघडया हातांना हेलकावे देत उभी होती.

'काय नवल तरी...' ती आणखी काही बोलणार होती पण आपल्या मालकाचा आवाज ऐकताच ती मागे आली. आपल्या बाह्या तिने खाली केल्या.

पुन्हा एकदा काहीतरी खाली झेप घेणाऱ्या पक्ष्यांसारखे सुसाटले पण आता अगदी जवळ आले. रस्त्याच्या मध्यभागी आग चमकून गेली. गोळी झाडल्याचा आवाज आला आणि रस्ता धुराने भरून गेला.

त्याच वेळी स्त्रियांनी आर्त किंकाळी फोडली. लहान मुलाने हृदयभेदक आकांत मांडला. भयाने फटफटीत झालेले लोक स्वैपाकिणीभोवती जमा झाले. त्या सर्व आवाजांना मागे टाकून गर्दीने घेरलेल्या स्वैपाकिणीच्या किंकाळ्या ऐकू येऊ लागल्या.

'अरे देवा ! अरे कुणीतरी मला वाचवा ! मला मारू नका रे ! देवा देवा ! कुणीतरी दया करा माझ्यावर.'

पाच एक मिनिटांनंतर कुणीही रस्त्यावर थांबले नाही. बॉबच्या स्फोटाने स्वैपाकिणीच्या पायाला चांगलीच इजा झाली. तिला स्वैपाकघरात नेण्यात आले. तळघरात बसून अल्पाटिच, त्याचा गाडीवान, फेरॅपॉन्टॉव्हची बायको, त्यांची मुले आणि नोकर बाहेरच्या जगाकडे कान देऊन होते. तोफांची गर्जना, गोळ्यांचे सुसाटत जाणे, स्वैपाकिणीच्या हृदयभेदक आरोळ्या क्षणभरही थांबल्या नव्हत्या. फेरॅपॉन्टॉव्हची बायको आपल्या मुलाला मांडीवर घेऊन थोपटून उगी करीत होती. तळघरात कुणी आला की त्याच्याकडे भयभीत हळू स्वरात रस्त्यावर

राहिलेल्या आपल्या नवऱ्याची चौकशी करीत होती. दुकानदाराने सांगितले, ' तुझा नवरा चर्चमधे गेला आहे. त्या ठिकाणी लोक चमत्कार करणारी स्मॉलेन्स्कची पवित्र तसबीर वर लावून ठेवीत आहेत. '

संध्याकाळच्या सुमारास तोफेच्या गोळ्यांचा वर्षाव कमी झाला. अल्पाटिच तळघरातून बाहेर येऊन दरवाजात उभा राहिला.

संध्याकाळचे निरभ्र आकाश आता संपूर्णपणे धुराने काळवंडून गेले. त्या धुरातून आकाशात चमकणारी चंद्रकोर चमत्कारिक वाटू लागली. तोफांची भयकारक गर्जना बंद पडल्यानंतर शहरावर शांततेचे राज्य पसरले, तरीही मधूनमधून पावलांच्या आवाजांनी शांततेचा भंग होत होता. ह्या पावलांतून सबंध शहरात चालू असणाऱ्या कण्हण्याचा आवाज, दूरवरच्या आरोळ्या आणि पेटून काडकन मोडणाऱ्या वस्तूंचा आवाज जाणवत होता. आता स्वैपाकिणीचे कण्हणे थांबले होते. दोन्ही बाजूंना धुराचे काळे ढग आगीतून उठत होते आणि सरकत चालले होते. वेगवेगळ्या गणवेषातील सैनिक निरनिराळ्या दिशांनी रस्त्यावरून जात होते, धावत होते. आता ते रांगांनी जात नव्हते. वारुळातून बाहेर पडणाऱ्या डिवचलेल्या मुंग्यांसारखे ते धावत पळत होते. अल्पाटिचच्या डोळ्यांसमोर कित्येक सैनिक फेरॅपॉन्टॉव्हच्या आवारात घुसले. अल्पाटिच फाटकाशी गेला. रेजिमेंटमधील सैनिक मागे वळले. गर्दी करून त्यांनी मोठ्या त्वरेने रस्ता अडवून धरला.

' शहर शरण गेलं आहे, आता दूर व्हा ' त्याला पाहून अधिकारी म्हणाला. आणि लागलीच सैनिकांकडे वळून ओरडला, ' आवारातून धावता आहात काय ? थांबा; मी तुम्हाला चांगलाच धडा शिकवतो ! '

अल्पाटिच आणि गाडीवान थरथरत्या हातांनी शेडमधील घोड्याचे गुंतलेले लगाम व पट्टे सोडवू लागले.

गाडी फाटकातून बाहेर निघणार होती. तेवढ्यात अल्पाटिचने पाहिले– फेरॅपॉन्टॉव्हच्या दुकानासमोर दहाबारा सैनिक मोठमोठ्याने आपापसात बोलत होते. ते आपल्या पिशव्यांत गव्हाचे पीठ आणि सूर्यफुलांच्या बिया भरत होते. त्याच वेळी फेरॅपॉन्टॉव्ह परत आला आणि आपल्या दुकानात शिरला. सैनिकांना पाहताच तो त्यांच्या अंगावर ओरडणार होता. पण एकाएकी त्याने स्वतःला आवरले. आपल्या डोक्याचे केस मुठीत पकडीत तो हुंदके देत देत हसू लागला.

' बाळांनो घेऊन जा, घेऊन जा सगळे. सैतानांसाठी आणखी काही शिल्लक ठेवू नका. ' तो आपणच पोती ओढून रस्त्यावर टाकू लागला. काही सैनिक घाबरून पळाले. काही पिशव्या भरीतच राहिले. अल्पाटिचला पाहताच फेरॅपॉन्टॉव्ह त्याच्याकडे वळून म्हणाला, ' रशियाचा सर्वनाश झाला ! अल्पाटिच सर्वनाश झाला ! मी स्वतःच आता सगळे पेटवून देतो. . .सर्वनाश झाला. . . ' असे ओरडत फेरॅपॉन्टॉव्ह घरात धावला.

रस्त्यावरून येणाऱ्या सैनिकांचा लोंढा संपतच नव्हता. रस्ता अडल्यामुळे अल्पाटिचला पुढे

जाता येईना. त्याला थांबणे भाग पडले. फेरॅपॉन्टॉव्हची पत्नी आणि मुले गाडीत बसून गाडी कधी चालू होते याची वाट बघत होती.

आता चांगलाच काळोख पडला. आकाशात चांदण्या होत्या, आणि मधूनमधून धुराच्या पडद्यातून चंद्राची कोर चमकत होती. अल्पाटिच आणि त्याची यजमानीण यांच्या गाड्या हळूहळू सैनिकांच्या आणि इतरांच्या वाहनांतून वाट काढीत जाऊ लागल्या. नीपरनदीच्या उताराला गाड्या लागल्या तेव्हा त्यांना मुळीच पुढे जाता येईना. पुढे तिठ्यावर रहदारी पूर्णपणे थांबली होती. अलीकडे असलेल्या गल्लीत दुकाने आणि घरे जळत होती. आता आग विझत चालली होती. ज्वाळांच्या सतत तडतडण्याला पुरून उरणाऱ्या आरोळ्या आणि बोलणे ऐकू येत होते. गाडी पुढे जायला बराच वेळ लागेल हे समजताच अल्पाटिच उतरून मागे गल्लीत जाऊन आग पाहू लागला. आगीजवळ सैनिकांच्या हालचाली जोरात सुरू होत्या. अल्पाटिचने पाहिले– दोन सैनिक आणि नक्षीदार कोटाचा एक मनुष्य रस्त्याच्या पलीकडील आगीतून जळणारी वहाले जवळच्या घराजवळ नेत होते. इतर सैनिक गवत दोन्ही हातांनी कवळून नेत होते.

धान्याच्या कोठाराची आग पुरती भडकली होती. ती पाहात अनेक लोक उभे होते. अल्पाटिच त्यांच्यात उभा राहून आग पाहू लागला. सगळ्या भिंती धडधडा पेटत होत्या. मागची भिंत तर कोसळून पडली होती. छपराच्या फळ्या मोडून पडत होत्या. वहाले पेटून निघाली होती. छप्पर केव्हा खाली कोसळून पडते त्या क्षणाची वाट पाहात लोकांचा जमाव उभा होता. अल्पाटिच देखील त्यासाठीच उभा होता.

'अल्पाटिच', एकाएकी परिचित हाक त्या वृद्ध माणसाच्या कानांवर पडली.

'देव तुमच्यावर कृपा करो, महाराज.' आपल्या तरुण मालकाचा आवाज लागलीच ओळखून अल्पाटिच उद्गारला. प्रिन्स आन्द्रेने बिनबाह्यांचा सैल अंगरखा घातला होता. काळ्या घोड्यावर स्वार झालेला प्रिन्स आन्द्रे जमावातून अल्पाटिचकडे पाहात होता.

'तू इथं कसा काय आलास?' त्याने विचारले.

'मालक...मालक' अल्पाटिच बोलण्याचा प्रयत्न करता करता रडू लागला. 'मालक... आपला खरंच का नाश झाला?'

'तू इथं कसा आलास?' प्रिन्स आन्द्रेने पुन्हा विचारले. त्याच क्षणी ज्वाळा भडकल्या आणि त्या उजळ प्रकाशात अल्पाटिचला आपल्या छोट्या मालकाची पांढरीफटक, खचलेली मुद्रा दिसली. अल्पाटिचने आपणास शहरात कसे पाठवले आणि आता जाताना कशी संकटे येताहेत ते सांगितले.

'तुमचं काय मत आहे मालक? खरंच का आपला सर्वनाश ओढवणार?' त्याने पुन्हा विचारले.

प्रिन्स आन्द्रेने उत्तर न देताच आपली वही काढली. फाडलेल्या पानावर गुडघ्यांवर वही ठेवून आपल्या बहिणीला पत्र लिहिले :

' स्मॉलेन्स्क शरण गेले आहे. आठवडाभरात शत्रू ब्लीक हिल्स व्यापील. तुम्ही लागलीच मॉस्कोला निघा. तुम्ही केव्हा निघता ते मला लागलीच कळवा. उस्थ्याश येथे निरोप पाठवा.'

एवढे लिहून झाल्यावर त्याने अल्पाटिचला तो कागद दिला. थोरला प्रिन्स, प्रिन्सेस, आपला मुलगा आणि त्याचा शिक्षक यांची कशा तऱ्हेने रवानगी करावी, ते गेल्या-नंतर लागलीच आपणास कशा तऱ्हेने कुठे कळवावे याबद्दल आणखी सूचना त्याने अल्पाटिचला दिल्या.

आगीमधे काहीतरी जोराने पडले; क्षणभर आग शांत झाली. छपराखालून धुराचे लोटच्या लोट उठू लागले. पुन्हा एकवार काहीतरी प्रचंड वजनाची वस्तू पडल्याचा भयानक आवाज झाला.

धान्याच्या कोठाराची तक्तपोशी कोसळून पडली, तशी जमावाने आरोळ्या ठोकल्या. पेटणाऱ्या गव्हाचा भाजलेल्या पावासारखा वास सुटला. पुन्हा ज्वाला भडकल्या आणि त्या प्रकाशात खुषीत असलेल्या आणि काळजीने घेरलेल्या लोकांचे चेहरे उजळून निघाले.

नक्षीदार कोट घातलेला मनुष्य आपले हात फिरवीत ओरडत होता, ' सुरेख ! अप्रतिम ! छान प्रारंभ झालाय्—दोस्तहो. एकदम अप्रतिम.'

' तो स्वतः मालक आहे ' लोक कुजबुजू लागले.

स्मॉलेन्स्कहून रशियन सैन्य माघार घेऊ लागले. शत्रू त्यांचा पाठलाग करू लागला. दहा ऑगस्ट रोजी प्रिन्स आन्द्रेच्या ताब्यातील रेजिमेंट राजरस्त्यावरून कूच करू लागली. ब्लीक हिल्सला जाणारा रस्ता राजरस्त्याला जिथे मिळाला होता तेथून जाऊ लागली.

गेले तीन आठवडे उष्मा होत होता पाऊस मुळीच पडला नव्हता. दररोज पिंजारलेले ढग आकाशात जमत. त्यामुळे सूर्य काही झाकला जात नसे. संध्याकाळच्या सुमारास आकाश मोकळे होई. रात्रीच्या वेळी जोराचे दव पडून जमीन ओली होई. उन्हाने होरपळून निघालेल्या कुरणात काहीच चरायला न मिळाल्याने भुकेलेली गुरे हंबरत होती. दळणवळण करणाऱ्या आणि तोफवाहू गाड्यांची चाके आसापर्यंत धुरळ्यात रुतत आणि त्यामुळे आवाज न करता गाड्या जाऊ लागत. गुदमरवून टाकणारा, भाजून काढणारा मऊ धुरळा रात्रीच्या वेळीही गार होत नसे. त्या धुरळ्यात पायदळांच्या सैनिकांची पावले घोट्यापर्यंत रुतू लागत. तो धुरळा त्यांच्या पायांवर बसे, गाड्यांच्या चाकावर बसे. त्याचे लोळ डोळ्यापर्यंत उठत. रस्त्यावरून चालणाऱ्या माणसांच्या आणि जनावरांच्या डोळ्यांत, केसांत, नाकपुड्यांत आणि फुफ्फुसांत धुरळा शिरू लागे. त्या कोंडलेल्या वातावरणात श्वास घेण्यासाठी लोकांना त्रास पडत होता. पाण्यासाठी भांडणे होत. चिखल ढवळून येईतो ते पाणी पिऊ लागत.

आपले वडील, मुलगा व बहीण मॉस्कोला निघून गेल्याची वार्ता दोन दिवसांपूर्वीच प्रिन्स

आन्द्रेला मिळाली होती. प्रिन्स आन्द्रेला करण्याजोगे असे काहीही काम ब्लीक हिल्सला उरले नव्हते. त्याने ब्लीक हिल्स येथे घोड्यावरून रपेट मारून येण्याचे ठरवले.

मग तो कूच करण्याचा मुख्य मार्ग सोडून आपल्या वडिलांच्या घराकडे वळला. त्या घरात त्याचा जन्म झाला होता. तिथेच त्याचे बालपण गेले होते. त्याचा घोडा छोट्या तळ्याजवळून जाऊ लागला. ह्या ठिकाणी तेव्हा दहाबारा बायका गप्पा मारायच्या, कपडे धुवायच्या, नाहीतर दांडक्याने कपडे बडवायच्या. आता मात्र प्रिन्स आन्द्रेला कुणीही त्या ठिकाणी आढळले नाही. पूर्वी फळ्यांच्या उभारलेल्या उंचवट्यावर तो उभा राहात असे. तो उंचवटा आता निखळून तळ्यात मध्यभागी कलता होऊन अर्धा पाण्यात बुडून राहिला होता. प्रिन्स आन्द्रेने रखवाल-दाराच्या निवासाकडे घोडा वळवला. दगडी प्रवेशद्वाराशी कुणीही नव्हते, प्रवेशद्वार उघडेच होते. बागेतील वाटा तण वाढून झाकून गेल्या होत्या. गाई-बैल आणि घोडे कुरणात फिरत होते. मग प्रिन्स आन्द्रेने रोपे तयार करण्याच्या बागेकडे घोडा नेला. बागेची तावदाने फुटली होती. कुंड्यांतील काही झाडे मोडून पडली होती. काही पार वाळून गेली होती. त्याने तिथला बागवान तारस ह्याला हाक मारली. पण कुणीही ओ दिली नाही. टेरेसवरील बागेभोवती फिरताच त्याला कळून चुकले की गजांचे कठडे पार निखळून गेले आहेत. जर्दाळूच्या झाडांच्या फांद्या फळांसकट खाली ओढलेल्या होत्या. ज्याला प्रिन्स आन्द्रे आपल्या लहान-पणी बागेच्या प्रवेशद्वाराशी पाहायचा तो शेतकरी आता वृद्ध झाला होता. तो आता हिरव्या-गार बागेतील जमिनीवर बसून सालीच्या दोऱ्यांचे जोडे विणीत होता.

तो बहिरा झाला होता. त्यामुळे त्याला प्रिन्स आन्द्रे जवळ आला तरी कळले नाही. ज्या आसनावर तो बसला होता, त्यावर बसणे प्रिन्स आन्द्रेला फार आवडायचे. त्याने जवळच असलेल्या मोडलेल्या, वाळलेल्या मॅग्नोलियाच्या फांद्यांवर सालीचे दोर लोंबकळत ठेवले होते.

प्रिन्स आन्द्रेने घरापर्यंत घोडा नेला. जुन्या बागेतील कितीतरी लिंबांची झाडे तोडून टाकण्यात आली होती. घरासमोरील गुलाबांच्या झाडामधे एक काळे-पांढरे पट्टे असलेली घोडी आणि एक शिंगरू दिसत होते. तळमजल्यावरील एक उघडी खिडकी सोडली तर इतर सगळ्या खिडक्यांच्या झडपा वर केलेल्या होत्या. एका पोरसवदा नोकराने प्रिन्स आन्द्रेला पाहिले आणि तो घरात धावला.

अल्पाटिचने आपल्या कुटुंबाला पाठवून दिले होते. आणि तो एकटाच ब्लीक हिल्स येथे राहिला होता. घरात बसून तो ' संतांच्या जीवनकथा ' वाचीत होता. प्रिन्स आन्द्रे आल्याचे ऐकून चष्मा न सावरता कोटाची बटणे लावत तो प्रिन्सकडे धावला. काही न बोलता त्याने त्याच्या गुडघ्यांचे चुंबन घेतले. त्या वेळी त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले.

आपल्या दुर्बलतेची त्याला चीड आली. मागे वळून तो प्रिन्स आन्द्रेला तिथली परिस्थिती सांगू लागला. महत्त्वाच्या आणि मौल्यवान अशा सगळ्या वस्तू बॉगुचेराव्होला नेण्यात आल्या होत्या. शंभर बुशेल धान्यदेखील पोचवले होते. परंतु गवत आणि गहू हिरवा असतानाच सैन्याने कापून नेला होता. अल्पाटिचच्या मते त्या हंगामात भलतेच पीक आले होते.

शेतकऱ्यांची खूप हानी झाली होती. काहीजण बागुचेरॉव्होला गेले होते. फारच थोडे तेथे राहिले होते.

त्याच्या बोलण्याकडे लक्ष न देता प्रिन्स आन्द्रेने विचारले, 'माझे वडील आणि बहीण इथून कधी गेली?' ती मॉस्कोला कधी निघाली असे त्याला विचारायचे होते. प्रिन्स आन्द्रे बागुचेरॉव्होपर्यंत केलेल्या हलवाहलवीबद्दल विचारीत आहे असे समजून अल्पाटिचने उत्तर दिले. 'ती मंडळी साताला निघाली.' मग अल्पाटिच पिकाबद्दल तपशीलवार बोलून त्याबद्दल काय करावे हे विचारू लागला. 'अधिकाऱ्यांकडून पावती घेऊन मी त्यांना ओट देऊ काय? अजून आपल्याकडे सहाशे बुशेल ओट शिल्लक आहे.'

प्रिन्स आन्द्रेने त्या वृद्धाच्या उन्हात चमकणाऱ्या टकलाकडे पाहिले. त्याला काय उत्तर द्यावे हे प्रिन्स आन्द्रेला कळेना. तो अल्पाटिचला म्हणाला, 'धान्य द्यायला हरकत नाही.'

'मालकांना बाग उद्ध्वस्त झालेली दिसली असेल. पण मी काही करू शकलो नाही. तीन रेजिमेंट इथे आल्या आणि रात्रभर वस्तीला राहिल्या. घोडदळाचे सैनिक तर फार वाईट वागले. तक्रार करण्यासाठी मी कमांडिंग ऑफिसरचे नाव आणि हुद्दा टिपून घेतला आहे.'

प्रिन्स आन्द्रेने त्याला म्हटले, 'राहू दे. तू आता काय करणार आहेस? शत्रूनं हा प्रदेश व्यापला तर तू इथंच राहणार आहेस काय?'

अल्पाटिचने वळून प्रिन्स आन्द्रेकडे पाहिले आणि मग एकदम गंभीरपणे त्याने आपला हात उंचावून म्हटले, 'तो माझा रक्षणकर्ता आहे. त्याच्या इच्छेप्रमाणं काय ते होईल.' काही शेतकरी आणि घरगडी कुरणातून येत होते. प्रिन्स आन्द्रेच्या जवळ येऊ लागले तशी त्यांनी आपल्या टोप्या काढल्या.

प्रिन्स आन्द्रे अल्पाटिचकडे झुकला आणि म्हणाला, 'मी तुझा आता निरोप घेतो. तू स्वतःही इथं राहू नकोस, तुला शक्य असेल ते बरोबर घे. शेतकऱ्यांना रॅझान येथील किंवा मॉस्कोजवळील शेतवाडीवर जायला सांग.'

अल्पाटिचने त्याच्या पायांना मिठी मारली. तो हमसाहमशी रडू लागला. प्रिन्स आन्द्रेने त्याला हलकेच दूर केले, घोड्याला टाच मारून तो बागेतील वाटेने निघाला.

आठ ऑगस्ट रोजी युद्धाच्या प्रगतीचा विचार करण्यासाठी जनरल फील्ड मार्शल सॅल्तीकॉव्ह, व्हॅझिमिटिनॉव्ह, अराक्चीव्ह, लॅपुहिन आणि कॉच्युबी यांची बैठक झाली. सगळे अधिकार एका व्यक्तीकडे नसल्याने आपत्ती येत आहेत असे समितीचे मत झाले. झारला कुटूझॉफ आवडत नाही याची कल्पना समितीच्या सभासदांना होती. तरीही त्यांनी कुटूझॉफची कमांडर-इन्-चीफ् म्हणून नेमणूक करावी असा सल्ला दिला. त्याच दिवशी त्याची तशी नेमणूक झाली आणि त्याला सैन्याने व्यापलेल्या प्रदेशावर अमर्याद अधिकार देण्यात आले.

या नेमणुकीचे सर्व लोकांनी स्वागत केले. मात्र पीटर्झबर्ग आणि मॉस्को येथील उच्चभ्रू वर्गात टीका होऊ लागली.

' ज्याला घोड्यावर बसता येत नाही, जो सभेत झोपा काढतो, ज्याला मुळीच चारित्र्य नाही अशा माणसाला कमांडर-इन्-चीफ् नेमल्याचे कुणी कधी ऐकले होते काय? त्याने ब्यूकरेस्टमधे तर चांगलाच नावलौकिक कमावला आहे! जनरलचे गुण त्याच्यात किती आहेत यासंबंधी तर बोलायलाच नको! गलितगात्र झालेल्या, दृष्टी गेलेल्या माणसाला अशा वेळी नेमले आहे! फार नामी कल्पना! आंधळा जनरल! छान. मात्र आंधळी कोशिंबीर खेळायला हा आंधळा योग्य आहे!'

' लोक म्हणतात कुटूझॉफला असा अधिकार द्यायला सम्राट राजी नव्हता. 'सम्राट आणि देश यांच्या आज्ञेने तुम्हास हा अधिकार देण्यात येत आहे.' असे म्हणताना सम्राट मुली सारखा लाजला होता.'

' झारविच सैन्याबरोबर असता कामा नये अशी अट कुटूझॉफने घातली आहे हे नक्की सांगतो.' तो झारला म्हणाला, ' जर झारविचने काही चूक केली तर मी त्याला शिक्षा करू शकणार नाही. चांगली कामगिरी बजावली तर गौरव करू शकणार नाही.'

' स्वतः सम्राटांनीही सैन्याबरोबर असता कामा नये, असे कुटूझॉफने सांगितले आहे असं ऐकतो.'

प्रिन्स आन्द्रेला वाटले होते त्याप्रमाणे प्रिन्सेस मार्या मॉस्कोमधे नव्हती. आणि संकटा-पासून दूरही नव्हती.

*

अल्पाटिच स्मॉलेन्स्कहून परत आला तेव्हापासून थोरला प्रिन्स एकाएकी झोपेतून दचकून उठल्यासारखा दिसत होता. त्याने नागरी सेनेच्या सैनिकांना सशस्त्र होऊन खेड्याच्या बाहेर जमण्याचा हुकूम दिला. त्याने कमांडर-इन्-चीफ्‌ला पत्र पाठवून कळवले, ' माझे संरक्षण करण्यासाठी अखेरच्या क्षणापर्यंत ब्लीक हिल्सला राहण्याचा माझा विचार आहे. ब्लीक हिल्सचे संरक्षण करायचे की नाही याचा निर्णय तुमचा तुम्ही घ्या.' त्याने आपल्या घरच्या माणसांना जाहीर करून टाकले, ' मी ब्लीक हिल्सलाच राहणार आहे.'

त्याने स्वतः राहण्याचा निश्चय घेतला तरीही त्याने देसॅले आणि धाकटा प्रिन्स यांसह प्रिन्सेसला बॉगुचेरॉव्हो येथे आणि तेथून पुढे मॉस्कोला पाठवून देण्याची व्यवस्था केली. त्यांना एकटे सोडून जायला तिचे मन धजेना. आयुष्यात प्रथमच तिने त्याचे न ऐकण्याचे ठरवले. तिने जाण्याचे नाकारताच थोरला प्रिन्स भयंकर वादळासारखा तिच्यावर भडकून उठला. आजवर तिच्यावर झालेल्या अन्यायाचा पाढा त्याने तिच्यासमोर वाचला. तिला शिव्याशाप देण्यासाठी निमित्त शोधीत तो म्हणाला, ' माझा तू सारखा छळ मांडला आहेस. तूच माझी

माझ्या मुलापासून ताटातूट केलीस. माझ्याबद्दल नकोनको ते संशय तुझ्या मनात आहेत. माझं सगळं जीवन विषारी करण्याचं ध्येय तू बाळगून आहेस.' आपल्या खोलीबाहेर तिला हाकलून देत म्हणाला, ' तू गेली नाहीस तर मला त्याची पर्वा नाही. तू जिवंत आहेस की मेलीस हे कळून घ्यायची मला इच्छा नाही. मी तुला बजावून सांगतो आहे—मला कधीही तुझं तोंड दाखवू नकोस.' प्रिन्सेस मार्याला भय पडले होते की कदाचित आपल्याला ब्लीक हिल्समधून हाकलून देण्याचा वडील हुकूम देतील. पण थोरल्या प्रिन्सने तसे काही केले नाही.

त्यांनी केवळ दृष्टीस पडू नये एवढेच सांगितले होते म्हणून प्रिन्सेस मार्याचा जीव भांड्यात पडला. आपण घरी राहात आहोत म्हणून वडिलांच्या अतःकरणात खोलवर कुठेतरी आनंदाची भावना आहे असा त्यांच्या वागण्याचा अर्थ आहे हे ती समजून चुकली.

निकोलुश्का गेला त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी थोरल्या प्रिन्सने पूर्ण गणवेष चढवला आणि तो कमांडर-इन्-चीफच्या भेटीला जायला सज्ज झाला. त्याला न्यायला गाडी बाहेर उभी होती. पुरा गणवेष चढवलेल्या छातीवर सर्व बिल्ले लावलेल्या थोरल्या प्रिन्सला घराबाहेर पडून शस्त्रधारी शेतकरी आणि घरगडी यांची पाहणी करण्यासाठी बागेत जात असताना प्रिन्सेस मार्याने पाहिले. बागेतून घुमत येणारा त्याचा आवाज ऐकत प्रिन्सेस मार्या खिडकीत बसली. भयभीत झालेली कित्येक माणसे बागेतील वृक्षाच्छादित रस्त्याने एकाएकी धावत वर येऊ लागली.

प्रिन्सेस मार्या पायऱ्यांच्या दिशेने फुलांच्या वाफ्यांच्या मार्गावरून धावत वृक्षाच्छादित रस्त्याकडे वळली तोच कितीतरी नागरी सैनिक आणि नोकर तिच्या दिशेने रस्ता उतरू लागले होते. गर्दीतून कित्येकजण म्हाताऱ्याला उचलून आणीत होते. प्रिन्स मार्या त्याच्या दिशेने धावली. आपल्या मुलीला पाहताच थोरल्या प्रिन्सने आपले निर्जीव ओठ हालवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा घशातून घोगरा स्वर उमटला. त्याला काय सांगायचे होते ते समजणे अशक्य होते. मग त्याला उचलून त्याच्या खोलीत नेण्यात आले. आताशा त्याने ज्याची खूप दहशत घेतली होती त्या कोचावरच त्याला ठेवण्यात आले.

त्याच रात्री डॉक्टरला बोलावण्यात आले. त्याने रक्त काढायला प्रारंभ केला. थोरल्या प्रिन्सला अर्धांगाचा झटका येऊन उजवी बाजू लटकी पडली असल्याचे त्याने सांगितले.

ब्लीक हिल्सला राहण्यात प्रत्येक दिवशी धोका वाढत होता. त्यामुळे दुसऱ्या दिवशी बोगुचेरॉव्हो येथे थोरल्या प्रिन्सला हलवण्यात आले. त्याच्या सोबत डॉक्टर होते.

जेव्हा ते बॉगुचेरॉव्होला पोचले तेव्हा धाकट्या प्रिन्सला घेऊन देसॅले पूर्वीच मॉस्कोला निघाल्याची बातमी त्यांना लागली.

नंतरचे तीन आठवडे थोरला प्रिन्स अर्धांगाने बिछान्याला खिळून होता. त्याच्या अवस्थेत काहीही बदल झाला नाही. प्रिन्स आन्द्रेने आराखडा काढून दिलेल्या बॉगुचेरॉव्हो येथील घरात थोरला प्रिन्स बेशुद्ध अवस्थेत होता. तो एखाद्या वेड्यावाकड्या प्रेतासारखा पडून

होता. भुवया आणि ओठ वेडेवाकडे करीत तो सतत काहीतरी पुटपुटू लागे. त्याला भोवताल्च्या जगाची जाणीव होती की नाही हे ठरवणे अशक्य होते. त्याला यातना होत आहेत आणि काहीतरी सांगण्याची तीव्र इच्छा आहे एवढे काय ते निश्चितपणे सांगता आले असते. त्याला काय बोलायचे होते ते कुणालाच सांगता येत नव्हते.

ह्या अवस्थेला तसा काही अर्थ नाही. तिच्यामागे शारीरिक यातना फक्त आहेत असे डॉक्टरचे म्हणणे पडले. वडिलांना आपल्याला काहीतरी सांगायचे आहे अशी प्रिन्सेस मार्याची श्रद्धा होती.

'ह्या सगळयाचा शेवट झाला तर बरे.' प्रिन्सेस मार्याच्या मनात असा विचार मधून मधून येऊन जाई. रात्री काय दिवसा काय प्रिन्सेस मार्या झोपत नव्हती असे म्हटले तरी चालेल. ती सदैव आपल्या वडिलांकडे लक्ष ठेवून होती. सांगितले तर भयानक वाटेल; आपल्या वडिलांच्या प्रकृतीत सुधारणा होईल याची ती अपेक्षा करीत नव्हती, तर मृत्यूची कोणती लक्षणे दिसतात ते पाहात होती.

प्रिन्सेस मार्याला हे स्वतःशी कबूल करणे विचित्र वाटत होते. तरीही तिच्या मनात तशी भावना होती. अनामिक अपेक्षा बाळगून तिने थोरल्या प्रिन्ससोबत राहण्याचे ठरवले होते तेव्हापासून कदाचित नसेल पण तो आजारी पडल्यापासून मात्र तिच्या आजवर विस्मृतीत पडून राहिलेल्या आशा-आकांक्षा जागृत झाल्या. हे तिच्या दृष्टीने भयंकर होते. आपल्या वडिलांच्या दहशतीपासून मुक्त असे जीवन जगण्याचे स्वप्न, प्रेम करण्याची आणि सुखी वैवाहिक जीवनाची शक्यता ह्या कल्पना कित्येक वर्षे तिच्या मनात आल्या नव्हत्या. त्या आता तिला सतानाने मोह घालावा तशा पछाडू लागल्या. ती मनातून ते विचार दूर सारण्याचा निष्फळ प्रयत्न करीत होती. त्याविरुद्ध एकमेव प्रतिकाराचे साधन म्हणून प्रार्थना उपयोगी पडेल असे तिला वाटले. आणि ती प्रार्थना करण्यासाठी धडपडू लागली. तिने प्रार्थनेचा पवित्रा घेतला. पवित्र प्रतिमांसमोर टक लावून प्रार्थनेचे शब्द उच्चारू लागली. पण तरीही तिला प्रार्थना करता येईना. जिथे आपणास बंधनात ठेवण्यात आले होते आणि जिथे प्रार्थना हीच समाधानाचे साधन होते त्या नीतिमत्तेच्या वातावरणाशी एकदम विरोधी अशा नव्या जगात– श्रमाच्या आणि स्वतंत्र जीवनाच्या नव्या जगात– आपणाला कुणीतरी नेत आहे असे तिला वाटू लागले. तिला प्रार्थना करता येईना. तिला रडता येईना. व्यावहारिक विवंचनांनी तिचे मन व्यापून टाकले.

बॉगुचेरॉव्होला राहणे असुरक्षित होऊ लागले होते. फ्रेंच जवळ आल्याच्या अफवा सर्व बाजूंनी येत होत्या. बॉगुचेरॉव्होपासून दहा एक मैलांवर एका खेड्यात फ्रेंच लुटारूंनी एक घर लुटले होते. प्रिन्सला दुसरीकडे नेणे आवश्यक आहे असे डॉक्टरने आग्रहाने सांगितले. प्रिन्सेस मार्याने शक्य तितक्या लवकर निघून जावे म्हणून तिचे मन वळवण्यासाठी त्या प्रांताच्या मार्शलने एका अधिकाऱ्यास पाठवले. त्याचसाठी पोलिसांचा कॅप्टन बॉगुचेरॉव्होला आला. त्याने तिला बजावले, 'फ्रेंच सैन्य पंचवीस-सव्वीस मैलांवर आले आहे. फ्रेंचांचे

जाहीरनामे गावागावांतून लागताहेत. पंधरा तारखेपूर्वी तुम्ही आपल्या वडिलांना हालवले नाही तर नंतरच्या परिणामांना मी जबाबदार नाही.'

प्रिन्सेस मार्याने पंधरा तारखेस गाव सोडण्याचा निश्चय केला. तयारी करण्यात आणि जो जो विचारील त्याला आवश्यक त्या सूचना देण्यात ती आधला सबंध दिवस मग्न होती. चौदा तारखेची रात्र तिने नेहमीप्रमाणेच कपडे न उतरता थोरल्या प्रिन्सच्या जवळच्या खोलीत जागून काढली. तो कण्हू लागे, काही पुटपुटू लागे, कधी पलंग वाजवू लागे, कधी तिहॉनची पावले वाजू लागत, कधी डॉक्टर त्याला तपासायला येई. त्या त्या प्रत्येक वेळी ती जागी होई. कितीतरी वेळा ती दाराशी कान देऊन ऐकू लागे. वडील नेहमीहून अधिक बडबडत आहेत आणि त्यांची अस्वस्थता वाढली आहे असे तिला वाटू लागले. वेळी अवेळी रात्री आपण त्यांच्या भेटीस गेलो तर ते चिडतील हे ती जाणून होती.

पण तिला त्यांच्याबद्दल इतकी करुणा यापूर्वी कधीच वाटली नव्हती. त्यांना गमावणे ही भयंकर गोष्ट आहे असे यापूर्वी तिला कधीच वाटले नव्हते. तिला त्यांच्या सहवासातील आपले सारे आयुष्य आठवले. त्यांच्या प्रत्येक शब्दात, प्रत्येक कृतीत आता तिला तिच्यावरील त्यांचे प्रेमच उमटलेले दिसू लागले. मधूनमधून सैतानी विचारांनी ह्या आठवणीत व्यत्यय येत होता. त्यांच्या मृत्यूनंतर काय होईल आणि आपण आपले नवे स्वतंत्र जीवन कसे व्यतीत करू अशी स्वप्ने तिला पुन्हा पुन्हा पडू लागली. भयभीत होऊन ती अशी स्वप्ने दूर सारू लागली. सकाळच्या सुमाराला थोरल्या प्रिन्सला जरा आराम पडला. तिला झोप येऊ लागली. ती उशिरा जागी झाली. जागी होऊन खोलीत काय चालले आहे याचा दारातून तिने कानोसा घेतला. थोरल्या प्रिन्सची बडबड ऐकून उसासा टाकून ती म्हणाली, 'काही बदल नाही.'

'पण काय घडायला हवं होतं ? मी कशाची अपेक्षा करत होते ? मला त्यांचा मृत्यू हवा होता.' मनोमन स्वतःचा तिरस्कार करीत ती ओरडली.

डॉक्टर तिच्याकडे येऊन म्हणाला, 'आज त्यांच्यात थोडी सुधारणा आहे. मी तुम्हाला शोधत होतो. ते काय म्हणताहेत ते आता थोडथोडं समजलं आहे. ते आता शुद्धीवर आहेत. तुम्ही भेटा. ते तुमचीच चौकशी करीत आहेत.'

ह्या बातमीने प्रिन्सेस मार्याचे अंतःकरण एवढ्या जोराने धडधडू लागले की तो पांढरी फट-फटीत पडली आणि आपला तोल सावरण्यासाठी तिने दाराचा आधार घेतला. आपले अवघे अंतःकरण अशा भयानक, पापी विचारांनी व्यापलेले असताना त्यांना आपण पाहणार आहोत, त्यांच्याशी बोलणार आहोत, त्यांच्या दृष्टीसमोर राहणार आहोत, ह्या कल्पनेनेच तिला भीती वाटली.

'चला त्यांना भेटा.' डॉक्टर म्हणाले.

प्रिन्सेस मार्या आत शिरून आपल्या वडिलांच्या पलंगाकडे गेली. पाठीला आधार देऊन तो पहुडला होता. गाठी असलेल्या जांभळ्या रंगाच्या शिरा असलेले वाळलेले लहानखोर हात चादरीवर पडले होते. त्याचा डावा डोळा समोर सरळ टक लावून पाहात होता. उजवा डोळा

वेडावाकडा झाला होता. त्याचे ओठ आणि त्याच्या भुवया यांची हालचाल थांबली होती. थोरला प्रिन्स आता अत्यंत कृश अत्यंत लहान आणि अत्यंत दयनीय वाटत होता. त्याची रया पुरती गेली होती. त्याचे सगळे शरीर पूर्वीहून लहान कृश झालेले होते. प्रिन्सेस मार्याने जवळ जाऊन त्याच्या हाताचे चुंबन घेतले. आपण तिची किती वेळ तरी वाट पाहत होतो हे दर्शवण्यासाठी त्याने डाव्या हाताने तिचा हात घट्ट धरला. आणि वेडावाकडा फिरवला. रागाने त्याच्या भुवया आणि ओठ थरथरले.

ती विषण्ण होऊन त्याच्याकडे पाहू लागली. आपल्याकडून त्याला काय हवे आहे, याचा थांगपत्ता तिला लागेना. त्याला डाव्या डोळ्याने बघता येईल अशा जागी ती उभी राहिली तेव्हा त्याला समाधान झाल्याचे दिसले. कित्येक क्षण त्याने तिच्यावर दृष्टी खिळवली. मग त्याच्या ओठांची आणि जिभेची हालचाल झाली. आवाज उमटू लागला. आपण बोलतो ते तिला कळणार नाही या भीतीने तो विनवणीपूर्वक तिच्याकडे पाहात राहिला.

'अं...अं...अं...' तो कितीतरी वेळ असेच बोलत राहिला. त्या स्वराचा अर्थ लावणे निव्वळ अशक्य होते. आपणाला अर्थ कळला आहे असे डॉक्टरला वाटले. त्याने थोरल्या प्रिन्सला विचारले, 'प्रिन्सेसला भीती वाटते आहे असं तुम्हाला म्हणायचं आहे का?'

त्याने मान नकारार्थी हलवीत पुन्हा तसेच आवाज केले. प्रिन्सेस मार्याने आपले डोके त्याच्या बाव्हळयावर दाबले.

तो तिच्या केसांवरून हात फिरवू लागला.

'लाडके, बाळ' प्रिन्सेस मार्याला शब्दात फरक करता येत नव्हता पण त्याच्या डोळ्यांतील भावांवरून तिला तिची खात्री झाली. आजवर त्याने कधी न उच्चारलेले मायेचे शब्द तो उच्चारीत होता.

'तू का आली नाहीस?'

'आणि मी तर त्यांच्या मृत्यूची इच्छा करीत होते.' प्रिन्सेस मार्याच्या मनात विचार आले.

तो थोडा वेळ स्तब्ध होता.

'बाळ...आभारी...तुझा...खूप केलंस...आभार...क्षमा कर... आभारी... क्षमा... आभार...' त्याच्या डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहू लागले. तो एकाएकी बोलला, 'आन्द्रुशा कुठे आहे?' त्या प्रश्नासरशी त्याच्या मुद्रेवर बालसदृश नापसंती दाखवणारा अविश्वास उमटला. त्याला आपला प्रश्न निरर्थक असल्याची जाणीव झालेली दिसली. निदान प्रिन्सेस मार्याला तरी तसे वाटले. तिने त्याला म्हटले, 'त्यानं मला पत्र पाठवलं आहे.'

त्याने दचकून तिच्याकडे पाहिले.

'कुठं आहे तो?'

'सैन्याबरोबर स्मॉलेन्स्क येथे.'

तो डोळे मिटून कितीतरी वेळ स्तब्ध राहिला. जणू आपल्या शंकेचे निरसन करण्यासाठी,

आपल्याला सगळे कळले आणि आठवले हे दाखवण्यासाठी त्याने मान हलवली आणि डोळे उघडले.

तो हळुवार स्पष्ट आवाजात म्हणाला, 'झाला. रशिया पराभूत झाला. ह्या लोकांनी रशियाचा नाश केला.'

पुन्हा तो स्फुंदू लागला.

पुन्हा त्याने डोळे उघडून काहीतरी म्हटले. पण ते कुणालाच कितीतरी वेळ कळले नाही. शेवटी तिहॉनने त्याच्या बोलण्याचा अर्थ लावला.

मिनिटांपूर्वी तो जे बोलला होता त्याच्या अनुरोधाने तो काय बोलला आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रिन्सेस मार्याने केला. तो प्रथम रशियाबद्दल बोलत असावा. मग प्रिन्स आन्द्रेबद्दल, मग तिच्याबद्दल, मग आपल्या नातवाबद्दल आणि मग आपल्या मृत्यूबद्दल बोलत असावा असे तिला वाटले. म्हणूनच तिला त्याचे बोलणे उमगले नाही.

'मला आवडणारा शुभ्र पोषाख तू कर' तो म्हणाला होता. प्रिन्सेस मार्याला हे शब्द समजले तेव्हा ती पूर्वीहून खूप जोराजोराने हुंदके देऊ लागली. डॉक्टरने तिला सावरत खोली-बाहेर नेले. टेरेसवर नेऊन तो तिला शांत करण्याचा प्रयत्न करू लागला. तिने त्याच्या प्रवासाची तयारी करावी म्हणून तिचे मन वळवू लागला. प्रिन्सेस मार्या निघून गेल्यावर थोरला प्रिन्स पुन्हा आपला मुलगा, युद्ध, झार यांबद्दल बडबडू लागला. रागाने भुवया वक्र करू लागला. त्याचा घोगरा आवाज चढला आणि त्याला दुसरा आणि शेवटचा झटका आला.

प्रिन्सेस मार्या टेरेसवर थांबली. आपल्या वडिलांवर आपले किती उत्कट प्रेम होते याची आपल्याला या क्षणापर्यंत जाणीव नव्हती असे तिला वाटू लागले. आता तिला त्या उत्कट प्रेमाखेरीज काही दुसरे समजेना. दुसरा विचार, दुसरी भावना मनात येईना. ती बागेत धावत गेली.

'मी...मी...त्यांच्या मृत्यूची इच्छा करीत होते...हे सारं एकदा संपावं...मला शांतता लाभावी म्हणून मी इच्छा करीत होते. आता माझं काय होणार ? ते गेल्यानंतर ह्या शांततेचा मला काय फायदा ?' प्रिन्सेस मार्या स्वतःशीच मोठ्याने बडबडू लागली. बागेतील रस्त्यावरून तिची पावले वेगाने पडत होती. बागेतील वर्तुळाकार मार्गाने चालत ती पुन्हा घरापाशी आली तेव्हा तिला बूरिअनबाई तिच्याकडे येताना दिसली. तिच्याबरोबर कुणीतरी नवखा इसम होता. बूरिअनबाईने बॉगुचेराव्होलाच राहण्याचे ठरवले होते. बरोबर असलेला नवखा इसम डिस्ट्रिक्ट मार्शल होता. प्रिन्सेस मार्याने तातडतोब निघणे किती आवश्यक आहे हे तिला सांगून तिला प्रवृत्त करण्यासाठी तो तिच्या भेटीला आला होता. प्रिन्सेस मार्याने त्याचे बोलणे ऐकले पण तिला काही समजले नाही. त्याला घेऊन ती घरात गेली. त्याला जेवण वाढून ती जवळ बसली. थोड्याच वेळात उठून 'माफ करा' म्हणून ती थोरल्या प्रिन्सच्या खोलीच्या दाराकडे वळली तेवढ्यात डॉक्टर बाहेर आला. त्याची मुद्रा त्रस्त होती. तो प्रिन्सेस मार्याला म्हणाला, 'प्रिन्सेस, आत नका जाऊ.'

प्रिन्सेस मार्या पुन्हा बागेत गेली. टेकडीच्या पायथ्याशी छोटे तळे होते. त्याच्या काठाशी कुणी पाहणार नाही अशा ठिकाणी हिरवळीवर ती बसून राहिली. आपण किती वेळ तिथे राहिलो ते तिचे तिलाच सांगता आले नसते.

डॉक्टर तिला थांबवण्याचा प्रयत्न करू लागला. तिने त्याला ढकलले आणि ती दाराकडे धावली. तिने दरवाजा उघडला. ती पलंगाशी उभी राहिली. थोरला प्रिन्स पूर्वीप्रमाणे पलंगावर पडला होता. त्याची शांत करारी मुद्रा पाहून प्रिन्सेस मार्या दारातच खिळून राहिली.

' नाही. ते शक्य नाही. बाबा गेलेले नाहीत.' प्रिन्सेस मार्या स्वतःशीच म्हणाली. ती त्याच्या जवळ गेली. मनातील भीती दूर करण्याची धडपड करीत तिने आपले ओठ त्याच्या गालावर दाबले. पण ती त्याच्यापासून एकदम दूर सरली. त्याच्याबद्दल वाटणारे प्रेम एका क्षणात नाहीसे झाले. त्याची जागा पुढे वाढून ठेवलेल्या भवितव्यतेच्या भयाने घेतली. ' आता बाबा कायमचे गेले ! ' ते जिथे होते त्या ठिकाणी अशुभसूचक, अपरिचित असे काहीतरी आहे. भयानक, नको असणारे, न कळणारे, रहस्यमय असे काहीतरी आहे, असे तिला वाटू लागले. आपला चेहरा दोन्ही हातांनी झाकून घेऊन प्रिन्सेस मार्या जमिनीवर कोसळली.

रात्र पडू लागली तशी शवपेटिकेभोवती मेणबत्त्या लावण्यात आल्या. शवपेटिकेवर शुभ्र वस्त्र पसरण्यात आले. जमिनीवर ज्यूनिपरची पाने पसरण्यात आली. शवाच्या शुष्क डोक्या-खाली छापील प्रार्थना ठेवली गेली. कोपऱ्यात बसून एक डीकन बायबलमधील प्रार्थनागीते मोठ्याने वाचू लागला. मेलेल्या घोड्याभोवती इतर घोड्यांनी गर्दी करावी, फुरफुरावे आणि भोवताली फिरावे त्याप्रमाणे शवपेटिकेभोवती कितीतरी परिचित आणि अपरिचित मानवी प्राणी जमले. त्यात मार्शल होता, खेड्यातील प्रौढ शेतकरी बाया होत्या, त्यांच्या डोळ्यांत भीती होती. कुतूहल होते. सर्वांनी क्रूसची खूण जुळवली खाली झुकून प्रणाम केला. आणि थोरल्या प्रिन्सच्या गार पडलेल्या ताठर हाताचे चुंबन घेतले.

प्रिन्स आन्द्रे बॉगुचेरॉव्होला येऊन राहीपर्यंत शेतवाडीवरील लोकांनी मालक येऊन राहि-लेला पाहिला नव्हता. ब्लीक हिल्सच्या शेतकऱ्यांपेक्षा बॉगुचेरॉव्होचे शेतकरी अगदीच भिन्न प्रकृतीचे होते. बोलण्यात; पोषाखात, रीतीभातीत अगदीच वेगळे होते. आपण गवताळ मैदानातून आलो असे ते म्हणत. बॉगुचेरॉव्होचे शेतकरी कापणीसाठी, तळी कालवे खोदण्या-साठी ब्लीक हिल्सला येत तेव्हा थोरला प्रिन्स त्यांच्या कामसूपणाची स्तुती करी. पण त्यांच्या रानटी वागण्यामुळे ते त्याला आवडत नसत.

प्रिन्स आन्द्रे बॉगुचेरॉव्होला राहिला. त्याने नवनवीन गोष्टी आणल्या. इस्पितळे बांधली, शाळा सुरू केल्या. लोकांचा खंड कमी केला. तरीही त्यांच्या वागण्यात सौम्यता आली नव्हती.

उलट त्यांच्या स्वभावातील वैशिष्टये आणखी वाढीला लागली होती. ह्या वैशिष्ट्यांनाच थोरला प्रिन्स रानटीपणा म्हणायचा.

अनिश्चित स्वरूपाच्या अफवा त्यांच्यामधे सारख्या उठत असत. आपणा सर्वांना घोडदळात नोकरी करण्यासाठी नेणार आहेत असे कुणाला वाटे. आपल्याला बाटवून नव्या धर्माची दीक्षा देणार आहेत असे कुणी सांगे. झार पीटर फिदॉरॉविच मृतात्म्यांतून उठून संपूर्ण मुक्तता आणणार आणि प्रचलित व्यवस्थेचा निकाल लावणार अशा तऱ्हेच्या वावड्या उठत होत्या. लोकांच्या मनात युद्धविषयक अफवा, बोनापार्ट व त्याची आक्रमणे यांचा संबंध, ख्रिस्तविरोधी वर्तन, प्रलयकाळ आणि संपूर्ण मुक्तता यांबद्दलच्या अस्पष्ट संकल्पना यांच्याशी जोडला जात होता.

काही विशिष्ट नद्यांकाठचे प्रदेश उबदार आहेत असे समजून तिकडे स्थलांतर करण्याची चळवळ ह्या प्रदेशातील शेतकऱ्यांमधे वीसएक वर्षांपूर्वी सुरू झाली होती. त्यात बॉगुचेरॉव्होचे शेतकरीही होते. शेकडो शेतकऱ्यांनी एकाएकी आपली गुरेढोरे विकायला आणि आपल्या कुटुंबांना घेऊन नैर्ऋत्येकडे जायला प्रारंभ केला होता. महासागरावरून अज्ञात प्रदेशाकडे उड्डाण करणाऱ्या पक्ष्यांप्रमाणे आपल्या बायकांमुलांसह त्यांच्यापैकी कुणी पूर्वी कधी गेला नव्हता त्या नैर्ऋत्येकडील प्रदेशाकडे निघाले होते. त्यांचे काफिले जाऊ लागले. एकेकजण स्वतंत्र जीवन मिळवू लागला. उन्हाळी झऱ्यांच्या अज्ञात नवख्या प्रदेशाकडे ते धाव घेऊ लागले. पुष्कळांना शिक्षा झाल्या. काहींना सैबेरियात धाडण्यात आले. काहीजण उपासमार व थंडी यांनी वाटेतच मरण पावले. काहीजण आपणहून माघारी आले. चळवळ जशी सुरू झाली तशीच थंडावली. दोन्ही वेळा उघड दिसणारी कारणे नव्हती. पण तरीही त्या त्या लोकांत अंतःप्रवाह सुरूच होते. ते नव्या तऱ्हेने व्यक्त होण्यासाठी शक्ती एकवटत होते.

थोरल्या प्रिन्सच्या मृत्यूपूर्वी काही काळ बॉगुचेरॉव्होला आलेल्या अल्पाटिचला शेतकऱ्यांतील खळबळ जाणवली होती. ब्लीक हिल्सच्या चाळीस मैलांच्या परिसरातील शेतकरी आपली खेडी घोडदळाच्या सैनिकांनी नष्ट करावी म्हणून सोडून गेले होते. उलट बॉगुचेरॉव्होच्या गवताळ प्रदेशातील शेतकऱ्यांनी फ्रेंचांशी संधान बांधल्याचा अंदाज होता. ह्या शेतकऱ्यांनी घरे सोडली नव्हती. त्यांच्यामधे कसलीतरी गूढ कागदपत्रे वाटली जात होती.

घोडदळातील सैनिक लोक सोडून गेलेली खेडी नष्ट करताहेत, मात्र फ्रेंच सैनिक खेड्यांना जराही धका लावत नाहीत, विस्लोहॉव्हो ह्या छोट्या खेड्यात फ्रेंच सैनिकांचा तळ असून तिथल्या फ्रेंच जनरलने 'कुणाही रहिवाशाला आम्ही त्रास देणार नाही, आम्ही इथे राहिलो तर लोकांकडून घेतलेल्या प्रत्येक वस्तूची – किंमत देऊ.' असे जाहीर केले आहे, अशी बातमी एका शेतकऱ्याने आणली होती.

गेली सुमारे तीस वर्षे बॉगुचेरॉव्हो ड्रॉन नावाच्या गावप्रमुखाच्या मार्गदर्शनाखाली होते. थोरला प्रिन्स ड्रॉनला 'ड्रॉनुश्का' म्हणत असे. शेतकरी मालकापेक्षा त्यालाच अधिक घाबरत

असत. थोरला प्रिन्स, प्रिन्स आन्द्रे आणि त्याचा कारभारी त्याला मान देत. गमतीने त्याला 'मंत्रिमहाशय' म्हणत. प्रमुख म्हणून नेमणूक झाल्यापासून ड्रॉन कधी दारू पिऊन झिंगला नाही अगर कधी आजारी पडला नाही. त्याने रात्री जागून काढल्या अगर भरपूर श्रम केले तरी तो थकल्याचे जराही चिन्ह दिसत नसे. त्याला वाचतालिहिता येत नसे. तरीही गाडी-तील प्रचंड पोत्यातील पीठ किती विकले अगर त्यासाठी किती पैसे दिले याचा हिशेब तो कधीच चुकत नसे. बॉगुचेरॉव्होच्या शेतातील गव्हाची एक लोंबीही त्याच्याकडून हरवत नसे.

ब्लीक हिल्स येथील शेतवाडीवर लुटालूट झाली होती. तेथून अल्पाटिच परत आला आणि त्याने ज्या शेतकऱ्याला बोलावणे पाठवले तोच हा ड्रॉन होय. त्याने ड्रॉनला हुकूम सोडला. 'प्रिन्सेसच्या गाड्यांसाठी बारा घोडे तयार ठेव. बॉगुचेरॉव्हो येथून निघणारी अठरा वाहनेही मिळव.' तिथले शेतकरी राबण्याऐवजी खंडणी भरीत असत. तरीही बॉगुचेरॉव्होमधे दोनशे-तीस कार्यक्षम कुटुंबे असल्याने आणि शेतकरीवर्ग सुस्थितीत असल्याने आपले हुकूम ते सहज पाळतील अशी अल्पाटिचची अपेक्षा होती. पण अल्पाटिचचा हुकूम मिळताच ड्रॉनने नजर खाली वळवली आणि काही उत्तर दिले नाही. अल्पाटिचने काही शेतकऱ्यांची नावे घेतली आणि त्यांच्याकडून गाड्या मिळवायला सांगितले.

तसे ड्रॉनने सांगितले, 'ह्या शेतकऱ्यांचे घोडे अगोदरच भाड्याने दिलेले आहेत.' तेव्हा अल्पाटिचने इतर शेतकऱ्यांची नावे घेतली. ड्रॉन उत्तरला. 'त्यांचेही घोडे मिळतील असं वाटत नाही. काहींनी सरकारी वाहतुकीत कामाला लावले आहेत; काहींचे घोडे लंगडताहेत; काहींचे घोडे वैरण नसल्याने मेले आहेत; माझ्या मते प्रिन्सेसच्या गाड्यांसाठी पुरेसे घोडे मिळवणं कठीण आहे. सामान वाहून नेण्याची गोष्ट तर दूरच राहिली.'

अल्पाटिचने ड्रॉनकडे रोखून पाहिले. ड्रॉनकडे एकच दृष्टिक्षेप टाकताच त्याला कळून चुकले, ड्रॉनने दिलेली उत्तरे त्याची स्वतःची मते नव्हेत. बॉगुचेरॉव्हो खेड्यातील लोकांचे सर्वसाधारण मत तो दडपणाला बळी पडून बोलत होता. ड्रॉनने बराच पैसा केला असल्याने गावाला त्याच्याबद्दल तिरस्कार वाटत होता. ह्या ड्रॉनला आता मालकाची बाजू घ्यावी की शेतकऱ्यांची बाजू घ्यावी याचा निर्णय घेता येत नाही हे त्याला त्याच वेळी कळून चुकले. त्याच्या डोळ्यांत अल्पाटिचला त्याची द्विधा मनःस्थिती दिसली. कपाळाला आठ्या घालीत तो ड्रॉनजवळ गेला आणि म्हणाला, 'हे बघ ड्रॉन्युश्का, मी काय सांगतो ते नीट ऐक. मूर्खा-सारखी उत्तरं देऊ नकोस. स्वतः मालकांनी—प्रिन्स आन्द्रे निकोलायविच यांनी मला हुकूम सोडला आहे. 'सगळ्या माणसांना तावडतोब हलव. कुणाला शत्रूच्या तावडीत सापडू देऊ नकोस.' झारचा हुकूमही अशाच अर्थाचा आहे असे असूनही कुणी गावातच राहिला तर तो झारशी द्रोह करतो असं ठरेल. कळलंना तुला मी काय म्हणतो ते?'

'कळलं' वर न पाहता ड्रॉन उत्तरला.

त्याच्या उत्तराने अल्पाटिचचे समाधान झाले नाही.

'ड्रॉन, लक्षात ठेव. चांगलाच गोत्यात येशील.' मान हलवीत अल्पाटिच म्हणाला.

' तुम्हीच काय तो हुकूम द्या ' दीनवाणा होऊन ड्रॉन म्हणाला.

' मूर्खपणा सोडून दे ' कोटाच्या छातीलगतच्या खिशातून आपला हात बाहेर काढून गंभीरपणे ड्रॉनच्या पायाखालील जमिनीकडे बोट करीत तो म्हणाला, ' मी तुझ्या मनात काय चाललं आहे ते पक्कं जाणतो. तुझ्या पायाखालील जमिनीच्या आत तीन यार्डांवर काय आहे ते मी पाहू शकतो.' अल्पाटिच ड्रॉनच्या पायाखालील जमिनीवर नजर खिळवून राहिला. ड्रॉन आता अस्वस्थ झाला. त्याने चोरून अल्पाटिचकडे पाहिले आणि पुन्हा नजर खाली वळवली.

' तू हा मूर्खपणा सोडून दे. सगळ्या लोकांना सांग, सामानाची आवराआवर करा. मॉस्कोला जाण्यासाठी घरं सोडण्याच्या तयारीला लागा. प्रिन्सेसचं सामान नेण्यासाठी उद्या सकाळी गाड्या तयार ठेवा. '

ड्रॉन उठून काहीतरी बोलणार होता – पण अल्पाटिचने त्याला मधेच अडवून विचारले, ' तुम्ही लोकांनी काय टरवलं आहे ? तुमच्या डोक्यात कुणी काय भरवलं आहे ? '

' मी लोकांना काय सांगणार ? ते सगळेच खवळलेले आहेत. तरी मी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. '

' आता काय सांगतो ते नीट ऐक. मी आता पोलिस कॅप्टनकडे जाणार आहे हे लोकांना सांग. सगळा मूर्खपणा टाकून गाड्या तयार ठेवा. '

' निश्चित सांगतो. ' ड्रॉन उत्तरला.

याकोव्ह अल्पाटिचने आणखी काही आग्रह धरला नाही. त्याला शेतकऱ्यांना हाताळण्याचा चांगलाच अनुभव होता. ते आपला हुकूम ऐकणार नाहीत असा मुळीही संशय दाखवता कामा नये म्हणजे ते मुकाट्याने हुकूम पाळतात. आणि हाच एक उत्कृष्ट मार्ग आहे हे तो जाणून होता. ड्रॉनने ' निश्चित सांगतो. ' असे मुकाट्याने कबूल केले. यावर अल्पाटिचने समाधान मानले. मात्र लष्कराने हस्तक्षेप केल्यावाचून गाड्या पुरवल्या जाणार नाहीत असे त्याला मनापासून वाटू लागले.

आणि तसेच घडले. रात्र झाली तरी गाड्या पुरवल्या गेल्या नाहीत. पथिकाश्रमात पुन्हा एकदा गावातील लोकांची बैठक भरली. घोड्यांना जंगलात पाठवायचे, वाहने म्हणून पुरवायची नाहीत असा निर्णय बैठकीत घेतला गेला. अल्पाटिचने याबद्दल एक चकार शब्दही प्रिन्सेसच्या कानांवर घातला नाही. त्याने ब्लीक हिल्सहून आलेल्या गाड्यांतून आपले स्वतःचे सामान उतरून टाकायला सांगितले. त्या गाड्यांचे घोडे प्रिन्सेसच्या गाड्याला जोडायचा हुकूम दिला. स्वतः पोलिस अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी त्याने घोड्याला पिटाळले.

वडिलांच्या दफनविधीनंतर प्रिन्सेस मार्याने स्वतःला खोलीत कोंडून घेतले. ती कुणाला

जवळ फिरकू देईना. ती म्हणे, 'मला कुठंच बाहेर जायचं नाही. मला कृपा करून इथं एकटीला पडू द्या.'

सूर्य मावळू लागला होता. उघड्या खिडकीतून आलेल्या तिरप्या किरणांनी खोली उजळून टाकली होती. ती उठून खिडकीकडे गेली. संध्याकाळ निरभ्र होती. वारा सुटलेला होता. ताजा-तवाना करणारा गारवा तिने नकळत आत खोलवर भरून घेतला.

'आता आरामात सूर्यास्ताचा आनंद घेता येईल. आता कुणी व्यत्यय आणणार नाही.' असे स्वतःशी म्हणत तिने खुर्चीत बसकण मारली आणि आपले डोके खिडकीवर टेकवले.

बागेतून कुणीतरी तिचे नाव हळू प्रेमळ स्वरात उच्चारले, मग कुणीतरी तिच्या डोक्याचे चुंबन घेतले. तिने पाहिले तो ती बूरिअनबाई होती. तिने शोकदर्शक काळा पोषाख घातला होता.

बूरिअनबाईने आताशा तिचा संबंध तोडला होता. तरीपण बूरिअनबाई तिच्यावर अवलंबून होती आणि परक्या माणसांत राहात होती. तिच्या परिस्थितीचे चित्र प्रिन्सेस मार्या आपल्या मनापुढे उभे करू लागली, तशी तिला तिच्याबद्दल करुणा वाटू लागली. तिने तिच्याकडे प्रेमळ प्रश्नार्थक नजरेने पाहिले, आणि तिच्यासमोर हात धरला. त्याचे चुंबन घेताना बूरिअन-बाईच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते. थोरल्या प्रिन्सेसच्या शोकाबद्दल ती बोलत असताना त्या शोकात ती सहभागी होऊ लागली. ती म्हणाली, 'तू मला आपल्या दुःखात सहभागी करून घेतलंस हेच एक मला समाधान आहे. ह्या प्रचंड शोकासमोर आपले पूर्वीचे गैरसमज नाहीसे होतील. मी कोणाचंही काही वाईट केलेलं नाही. माझी भक्ती आणि माझी कृतज्ञता ईश्वर वरून पाहात असेल.'

'प्रिय प्रिन्सेस, तुझी अवस्था आता अतिशय बिकट झाली असेल. तू स्वतःचा विचार करू शकली नव्हतीस—करू शकणार नाहीस याची मला कल्पना आहे. माझं तुझ्यावर प्रेम असल्यानं मला तुझा विचार केल्याखेरीज राहवत नाही. अल्पाटिच तुला भेटला का? इथून निघून जाण्यासंबंधी तो काही बोलला का? आपणाला धोका आहे. फ्रेंच सैन्यानं आप-ल्याला वेढा घातला आहे. आता निघून जाण्यात धोका आहे हे तुला ठाऊक आहे ना? आता जर आपण गाव सोडून जाऊ लागलो तर आपण निश्चितच कैदेत पडू आणि परमेश्वर जाणे आणखी काय होईल ते...'

प्रिन्सेस मार्या आपल्या सखीकडे पाहू लागली. ती काय म्हणत होती ते तिच्या डोक्यात शिरले नाही. ती म्हणाली, 'मला आता कसल्याच गोष्टीचं काहीच महत्त्व वाटत नाही. याची कल्पना कुणाला येईल तर किती छान होईल? कोणत्याही परिस्थितीत मी त्याला सोडून काही जाणार नाही. अल्पाटिच निघून जाण्यासंबंधी काही बोलला होता— तू त्यालाच विचार... मी काही करू शकणार नाही... काही करावंसंही मला वाटत नाही.'

'मी त्याच्याशी मघा बोलले. उद्या आम्ही जाऊ शकू अशी त्याला आशा वाटते. मला वाटतं आपण आता इथं राहणं अधिक चांगलं होईल. प्रिय मार्या, प्रवासात सैनिकांच्या अगर बंडखोर शेतकऱ्यांच्या हाती सापडलो तर भयंकर प्रसंग ओढवेल हे तू मान्य करशील.'

बूरिअनबाईने आपल्या बॅगमधून एक पत्रक काढले. ते नेहमीच्या रशियन कागदावर छापलेले नव्हते. ते पत्रक म्हणजे जनरल रॅमोने काढलेला जाहीरनामा होता. 'जे रहिवाशी आपली घरेदारे सोडणार नाहीत त्यांचे फ्रेंच कमांडर संरक्षण करतील.' असे त्यात जाहीर केले होते. बूरिअनबाईने ते पत्रक प्रिन्सेसच्या हाती दिले आणि म्हटले, 'त्या जनरलला आपण विनंती करावी हा सर्वांत उत्तम मार्ग असं मला वाटतं. तुम्हाला योग्य त्या मानानं वागवलं जाईल याची मला खात्री वाटते.'

प्रिन्सेस मार्यानि पत्रक वाचले. तिच्या डोळ्यांतील अश्रू आटले, आणि तिचा चेहरा हुंद-क्यांनी थरथरू लागला.

'कुणाकडून हे पत्रक तुला मिळालं?' तिने विचारले.

'माझ्या नावावरून मी फ्रेंच असल्याचं त्यांनी ओळखलं असावं' बूरिअनबाई संकोचून म्हणाली.

जाहीरनामा हातात घेऊन प्रिन्सेस मार्या खिडकीजवळून उठली. तिचा चेहरा आता फट-फटीत पडला होता. ती तशीच प्रिन्स आन्द्रे पूर्वी जिथे बसायचा त्या खोलीत गेली.

आपण फ्रेंच सैनिकांच्या तावडीत सापडू या कल्पनेने भयभीत झालेली प्रिन्सेस मार्या म्हणत होती, 'शक्य तितक्या लवकर निघालं पाहिजे. वाटलं तर बूरिअनबाईस इथ राहू दे. आपण फ्रेंचांच्या तावडीत सापडलो आहोत अशी बातमी प्रिन्स आन्द्रेच्या कानावर गेली तर—प्रिन्स निकोलाय अँड्रीच बोलकॉन्स्की यांची मुलगी रक्षणासाठी जनरल रॅमोची विनवणी करू लागली. त्यांच्या मदतीचा फायदा घेऊ लागली तर...' त्या कल्पनेनेच प्रिन्सेस मार्या भयभीत झाली, शहारली आणि शरमेने चूर होऊन गेली. तिच्या मनात खुनशी राग आणि गर्व उफाळून आला. आजवर या भावनांची तिला कल्पनाही नव्हती.

आपली दुःखकारक आणि त्याहूनही अपमानकारक अशी अवस्था तिच्या मनश्चक्षूंसमोर मूर्तिमंत उभी राहिली. 'शत्रूचे सैन्य आता घरातच ठाण मांडील. जनरल रॅमो प्रिन्स आन्द्रेच्या खोलीचा ताबा घेईल. प्रिन्स आन्द्रेची पत्रे आणि कागदपत्रे चाळून आपली करमणूक करून घेईल. बूरिअनबाईना त्यांचे आतिथ्य करावे लागेल. मला मेहरबानी म्हणून खोली देतील. फ्रेंच सैनिक माझ्या वडिलांचे क्रूस आणि सन्मानचिन्हे लुबाडण्यासाठी त्यांचे नुकतेच बांधलेले थडगे खणून काढतील. रशियन सैनिकांवर मिळवलेल्या विजयाच्या गोष्टी मला सांगू लागतील. माझ्या शोकाने दुःख वाटल्याचे ढोंग करतील.' प्रिन्सेस मार्याच्या मनात असे विचार येणे सहज स्वाभाविक नव्हते. पण आपल्या भावाला आणि वडिलांना जे वाटले असते तसे आप-णालाही वाटले पाहिजे अशा कर्तव्यबुद्धीने ती विचार करू लागली होती. ती तिथे राहिली काय अगर तिचे काहीही झाले काय, व्यक्तिशः तिच्या दृष्टीने कशालाच महत्त्व नव्हते. पण ह्यावेळी आपण आपल्या भावाचे प्रिन्स आन्द्रेचे आणि आपल्या मृत पित्याचे प्रतिनिधित्व करीत आहोत ही भावना ती विसरत नव्हती. त्यामुळे नकळतच त्यांच्या भावना त्या तिच्या भावना झाल्या होत्या. त्यांचे विचार ते तिचे विचार बनले होते. त्यांना जे वाटले असते,

त्यांनी जे केले असते ते वाटणे, ते करणे आपले आद्य कर्तव्य आहे असे तिला वाटू लागले.

प्रक्षुब्ध मनःस्थितीत ती खोलीतल्या खोलीत येरझाऱ्या घालू लागली. अल्पाटिच, मिहाइल इव्हानिच, तिहॉन, ड्रॉन यांना तिने एकामागून एक अशी बोलावणी केली. बूरिअनबाईचे म्हणणे कितपत खरे आहे हे वृद्ध दासी दुन्याशा आणि इतर दासी सांगू शकल्या नाहीत. अल्पाटिच घरात नव्हता. तो पोलिस अधिकाऱ्यांकडे गेलेला होता. बोलावणे पाठवल्यावर मिहाइल इव्हानिच डोळे चोळीत चोळीत आला पण तो प्रिन्सेसला काहीच सांगू शकला नाही. थोरल्या प्रिन्सने काही विचारले तरी काही न बोलता हसावे आणि कसल्याही गोष्टीत गुंतू नये अशी गेली पंधरा वर्षे त्याला सवय जडली होती. आता त्याने प्रिन्सेसच्या प्रश्नांना तशाच प्रकारे स्मित केले, पण काहीही निश्चित उत्तर दिले नाही.

गालफडे बसलेल्या फटफटीत चेहऱ्याच्या तिहॉन ह्या म्हाताऱ्या नोकराला दारुण दुःख झाल्याचे दिसत होते. तो प्रिन्सेसच्या प्रत्येक प्रश्नाला 'होय बाईसाहेब' एवढेच उत्तर देत होता. तिच्याकडे त्याची दृष्टी गेली की त्याला काही केल्या रडू आवरत नव्हते. सगळ्यांच्या-नंतर गावचा प्रमुख ड्रॉन खोलीत आला. प्रिन्सेसला झुकून प्रणाम करून त्याने दरवाज्या-जवळची जागा पकडली.

प्रिन्सेस मार्याने खोलीत येरझाऱ्या घातल्या. मग त्याच्याकडे पाहात ती उभी राहिली.

ड्रॉन्युश्का तिचा विश्वासू मित्र होता. व्हॅझ्मा येथील जत्रेतून तो तिला जिंजरब्रेड आणा-यचा. त्यावेळी तिच्या मनात ड्रॉन्युश्का आणि जिंजरब्रेड यांचे अभेद्य नाते असे. तो जिंजरब्रेड देताना नेहमी तेच ते ठरावीक स्मित करायचा. प्रिन्सेस मार्याला ह्या गोष्टी आता आठवल्या.

'ड्रॉन्युश्का, आमच्यावर आलेल्या आपत्तीनंतर...' ती एवढे बोलून थांबली. तिला पुढे बोलवेना.

'परमेश्वराची मर्जी' ड्रॉन्युश्का उसासा टाकीत म्हणाला.

थोडा वेळ स्तब्धता पसरली.

'ड्रॉन्युश्का, अल्पाटिच कुठे गेला माहीत नाही. मला मदत करील असा दुसरा कोणी नाही. मला बाहेर निघणं अशक्य आहे असं ऐकते ते खरं आहे का ?'

'बाईसाहेब, तुम्ही का निघू शकणार नाही ? कसली अडचण आहे ? तुम्ही जाऊ शकाल.'

'शत्रूपासून धोका आहे असं म्हणतात. ड्रॉन्युश्का, तू माझा चांगला दोस्त आहेस. मी काहीच करू शकत नाही. मला त्याबद्दल कसलीही माहिती नाही. मला मदत करील अशी कुणी व्यक्ती नाही. काही झालं तरी मला आज रात्री, नाहीतर उद्या पहाटेच निघणं भाग आहे.'

ड्रॉन बोलला नाही. तो प्रिन्सेसच्या तोंडाकडे पाहू लागला.

'घोडे मिळण्यासारखे नाहीत. मी अल्पाटिचला केव्हाच सांगितलं होतं.'

'घोडे का मिळू नयेत ?' तिने विचारले.

'हा सगळा परमेश्वरी प्रकोप आहे. काही घोडे सैन्यासाठी नेण्यात आले, काही मरण पावले. हे वर्ष अगदीच वाईट गेलं. घोड्यांना वैरण घालणं राहू द्या. आम्ही इकडे उपास-

मारीनं मरतो आहोत. गेले तीन दिवस कुणाला ब्रेडचा तुकडा मिळालेला नाही. त्यांनी सगळं लुटून नेलं.'

प्रिन्सेस मार्या त्याचे बोलणे लक्षपूर्वक ऐकू लागली.

'शेतकऱ्यांना लुटलं ? त्यांची उपासमार होत आहे ?' तिने विचारले.

'उपासमारीनं मरताहेत. घोड्या-गाड्यांच्या गोष्टी आता करण्यात फायदा नाही.'

'ड्रॉन्युश्का, हे तू मला आधी का नाही सांगितलंस ? त्यांना मदत देता येणार नाही काय ? त्यांच्यासाठी मी शक्य असेल ते करीन.' आपण शोक करीत आहोत त्याच वेळी आजूबाजूस गरीब आणि श्रीमंत लोक असावेत, गरिबांना मदत करणं श्रीमंतांना शक्य होऊ नये ही गोष्ट प्रिन्सेस मार्याला चमत्कारिक वाटली. उमरावांच्या वाड्यात धान्याचा साठा असतो आणि त्यातील धान्य कधी कधी शेतकऱ्यांना वाटले जाते हे तिला थोडंफार ऐकून ठाऊक होतं. गरजेच्या वेळी शेतकऱ्यांना आपले वडील आणि आपला भाऊ नाही म्हणत नसत हे तिला ठाऊक होतं. धान्यवाटपाचा हुकूम देताना हुकमाच्या शब्दयोजनेत आपल्याकडून चूक होईल की काय अशी तिला धास्ती वाटली. आपला शोक विसरता येईल, सदसद्‌विवेकबुद्धीला स्मरून काही करता येईल असे निमित्त मिळाले म्हणून तिला आनंद झाला. तिने ड्रॉन्युश्काला विचारले, 'शेतकऱ्यांच्या गरजा काय आहेत ? बॉगुचेरॉव्हो येथे उमरावांनी केलेले धान्यसाठे आहेत ना ? मला वाटतं माझ्या भावानं केलेला गव्हाचा साठा असेल'

'त्या गव्हाला अजून कुणी हात लावलेल्या नाही.' ड्रॉन अभिमानाने म्हणाला, 'तो विकण्याबाबत प्रिन्सनी मला काहीच हुकूम दिला नव्हता.'

'मग सगळा गहू शेतकऱ्यांना देऊन टाका. ज्यांना गरज आहे त्यांना वाटून टाका. मी माझ्या भावाच्या वतीनं तुला परवानगी देते.'

ड्रॉनने दीर्घ उसासा टाकला आणि तो गप्प राहिला.

'ते धान्य त्यांना पुरेसं होईल तर सगळं वाटून टाक. काही शिल्लक ठेवू नकोस. मी माझ्या भावाच्या वतीनं तुला हुकूम देते आहे. त्यांना सांग— जे आमचं आहे ते सारं त्यांचंच आहे. त्यांना सांग— आम्ही सगळं काही त्यांना खुषीनं देऊ.'

प्रिन्सेस मार्या बोलत होती आणि ड्रॉन विचारमग्न होऊन तिच्याकडे पाहात होता. तो तिला म्हणाला, 'बाईसाहेब, माझ्यावर कृपा करा. मला नोकरीवरून दूर करा. त्यांना माझ्याकडून चाव्या न्यायला सांगा. मी गेली तेवीस वर्षे नोकरी केली. कुणावर अन्याय केला नाही. कृपा करून मला आता नोकरीतून मुक्त करा.' आपल्याकडून त्याला काय हवं आहे आणि त्याला नोकरीतून मुक्त का व्हायचं आहे हे प्रिन्सेस मार्याला कळेना. ती त्याला म्हणाली, 'मी तुझ्या एकनिष्ठेबद्दल कधीच संशय घेतला नाही. तुझ्यासाठी आणि शेतकऱ्यांसाठी मी वाटेल ते करायला तयार आहे.'

तासाभरात दुन्याशाने प्रिन्सेसकडे येऊन सांगितले, ' ड्रॉन आला आहे. तुमच्या इच्छेप्रमाणे सगळे शेतकरी धान्यकोठाराकडे जमले आहेत. त्यांना तुमच्याशी बोलायचं आहे. '

दुन्याशा आणि म्हातारी दाई यांनी प्रिन्सेस मार्याला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचे न ऐकता ती बाहेर पडून पायऱ्यांपर्यंत पोचली. ड्रॉन्युश्का, दुन्याशा, म्हातारी दाई आणि मिहाइल इव्हानिच तिच्या मागोमाग गेले.

लोकांच्या दिशेने जात असताना प्रिन्सेस मार्याच्या मनात आले,—' मी स्वतः गाव सोडून जात आहे. यांना फ्रेंचांच्या मेहेरबानीवर सोडून देत आहे. त्यांनी येथं राहावं म्हणून त्यांना मी धान्य देत आहे, असे ह्या लोकांच्या मनात कदाचित विचार येत असतील. मॉस्कोजवळील शेतवाडीवर ते आले तर मी त्यांच्या राहण्याची सोय करीन. त्यांना दर महिन्याला अन्न-धान्य देईन असं आश्वासन मी आता देणार आहे. माझ्या जागी आन्द्रे असता तर त्यानं त्यांच्यासाठी निःसंशय खूप काही केलं असतं.'

जमावात हालचाल झाली. एकमेकांना लोक रेटू लागले आणि त्यांनी मग जलदीने आपल्या हॅट् काढून घेतल्या. प्रिन्सेस मार्या त्यांच्या जवळ आली. तिची नजर खाली वळली होती. तिची पावले तिच्या गाउनला अडखळत होती. तिच्या समोर इतके भिन्न भिन्न चेहरे होते की तिला त्यातील कोणताही एक चेहरा नीटसा दिसला नाही. सर्वांपुढे एकदम एकच भाषण देणे आवश्यक आहे हे तिला पटले. तरी भाषण कसे करावे ते तिला कळेना. मग आपण आपल्या वडिलांचे आणि बंधूचे प्रतिनिधित्व करतो आहोत ही जाणीव पुन्हा एकदा तिला झाली. आणि तिला धीर आला. तिने धिटाईने भाषणाला प्रारंभ केला.

' तुम्ही आलात म्हणून मला फार आनंद होत आहे.'

नजर वर न करता ती बोलू लागली तेव्हा तिला आपल्या काळजाची वेगाने व जोराने चाललेली धडधड जाणवत होती. ' युद्धामुळे तुमची हानी झाल्याचं मला ड्रॉन्युश्कानं सांगितलं. युद्धामुळं आपणा सर्वांवरच आपत्ती आली आहे. तुम्हाला मदत करायला मी कधीच मागंपुढं पाहणार नाही. इथं राहण्यात धोका आहे म्हणून मी स्वतः जात आहे...शत्रू जवळ येत आहे...माझ्या मित्रांनो, मी तुम्हांला सारं काही देत आहे. तुम्हाला कशाची कमतरता पडू नये म्हणून सारं सारं घ्या—हे सारं धान्य घ्या. अशी मी तुम्हाला विनंती करते. तुम्ही इथं राहावं म्हणून मी धान्य देत आहे असं कोणी तुम्हाला सांगितलं असेल तर ते खोटं आहे. त्यावर मुळीच विश्वास ठेवू नका. उलट तुम्ही सर्वांनी आपलं सामान-सुमान, आपली माल-मत्ता घेऊन माझ्याबरोबर मॉस्कोजवळील शेतवाडीवर चलावं असंच माझं तुम्हाला सांगणं आहे. तिथं तुम्हाला कशाची कमतरता पडणार नाही याची मी हमी देते. तुम्हाला तिथं घरं मिळतील, अन्नधान्य मिळेल. ' प्रिन्सेसचे भाषण संपले तेव्हा जमावातून केवळ उसासे ऐकू येत होते.

पुन्हा प्रिन्सेस मार्या बोलू लागली, ' मी आपणहून हे करीत नाही, ज्यांनी तुम्हाला चांगल्या रीतीनं वागवलं त्या तुमच्या मालकांच्या माझ्या मृत वडिलांच्या आणि माझ्या बंधूच्या आणि

त्याच्या मुलाच्या वतीनं मी हे करीत आहे.'

पुन्हा ती थांबली. सगळे स्तब्ध होते.

'आपणा सर्वांवरच आपत्ती कोसळली आहे. आपण सगळेजण सारखाच वाटा उचलू. माझं जे जे आहे ते सारं तुमचं आहे.' ती आपल्या समोरील चेहऱ्यांकडे दृष्टी टाकून बोलली. तिच्यावर खिळलेल्या सर्व डोळ्यांमधे एकच भाव उमटला होता. त्याचा अर्थ तिला कळत नव्हता. कसला भाव होता तो? त्यांच्या डोळ्यांत उत्सुकता होती? का भक्ती होती? का कृतज्ञता होती? आशंका होती? अविश्वास होता? कुणास ठाऊक. पण सर्व चेहऱ्यांवर एकच एक भाव उमटला होता.

'तुमच्या दयेबद्दल आभारी आहोत. पण आम्ही काही मालकाचं धान्य घेणार नाही.' पाठीमागून कुणीतरी बोलला.

'का घेणार नाही?' प्रिन्सेसने विचारले, पण उत्तर मिळाले नाही. प्रिन्सेसने जमावाकडे पाहिले तेव्हा नजरानजर होताच प्रत्येक जण नजर खाली वळवत असल्याचे तिला आढळून आले.

'तुम्हाला धान्य का नको आहे?' तिने पुन्हा विचारले.

कुणीही बोलले नाही.

तिला स्तब्धता असह्य झाली. तिने कुणाच्यातरी नजरेला नजर मिळवण्याचा प्रयत्न केला. तिच्याजवळ एक खूप म्हातारा झालेला इसम काठीवर रेलून उभा होता, त्याला तिने विचारले. 'तुम्ही का बोलत नाही? तुम्हाला आणखी कशाची गरज असेल तर तसं मला सांगा. मी तुमच्यासाठी काहीही करीन.' त्याच्या नजरेला नजर लावून ती बोलली. त्यामुळे रागावून की काय त्या म्हाताऱ्याने नजर खाली वळवून म्हटले, 'तुमचं आम्ही का म्हणून ऐकावं? आम्हाला तुमचं धान्य नको.'

'आम्ही सर्व सोडून निघण्याचं कारण काय? तसं करायला आम्ही तयार नाही...मुळीच तयार नाही. आमची मुळीच संमती नाही. आम्हाला तुमची दया वाटते पण इथून निघायला आमची संमती नाही. तुम्ही स्वतः जा. एकट्याच जा.' जमावाच्या निरनिराळ्या भागातून लोकांनी जोरदार पाठिंबा दिला. पुन्हा एकदा जमावातील सर्वांच्या मुद्रेवर एक भाव उमटला. तो निश्चितच कुतूहलाचा नव्हता. कृतज्ञतेचा नव्हता. त्यांच्या मुद्रेवर चीड आणि दृढ निश्चय दिसत होता.

प्रिन्सेस मार्या विषण्ण स्मित करीत म्हणाली, 'तुम्ही माझ्या म्हणण्याचा विपर्यास करीत आहात. तुम्ही इथून निघून जायला का तयार नाही? तुम्ही तिथं चांगल्या तऱ्हेनं राहाल. तिथं तुम्हाला अन्न, वस्त्र, निवारा मिळेल याची हमी मी घेते. इथं शत्रू आला तर तुम्हाला लुटल्याखेरीज राहणार नाही...' तिचे पुढचे शब्द जमावाच्या आरडाओरडीत विरले.

'आम्ही काही इथून निघायला तयार नाही. शत्रूनं आम्हाला लुटलं तरी चालेल. आम्ही तुमचं धान्य घेणार नाही. आम्हाला ते नको आहे.'.

प्रिन्सेस मार्याने पुन्हा जमावातील एखाद्याच्या नजरेस नजर भिडवण्याचा प्रयत्न केला. पण आता कुणीच तिच्याकडे पाहात नव्हते. सर्वजण निश्चितच जाणूनबुजून तिची नजर टाळीत होते. तिची अवस्था अतिशय चमत्कारिक झाली

' ती चांगले धडे देते आहे...चांगलं धोरण आहे बाईचं...तिच्या मागून जा आणि गुलाम बना...स्वतःचं घर मोडा आणि स्वातंत्र्य गमावून बसा...दुसरं काय...धान्य देते म्हणे ' जमावातून लोकांचे बोलणे ऐकू येऊ लागले.

प्रिन्सेस मार्या कोंडाळ्यातून बाहेर पडली. निराश मुद्रेने घरात शिरली. तिने ड्रॉनला पुन्हा हुकूम दिला, ' उद्या सकाळीच मी निघणार आहे, तेव्हा घोडे तयार ठेव. '

बॉगुचेरॉव्होपासून दहा मैल अंतरावर असलेल्या याकोव्ह येथून १७ ऑगस्ट रोजी रोस्तॉफ आणि इल्यिन घोड्यावरून निघाले. इल्यिनने नुकत्याच खरेदी केलेल्या नव्या घोड्याची ते चाचणी घेणार होते आणि खेड्यात वैरण मिळते का पाहणार होते.

बॉगुचेरॉव्हो गेले तीन दिवस दोन शत्रूंच्या सैन्यामध्ये सापडले होते. पिछाडीतील रशियन सैनिक ज्या सहजतेने त्या खेड्यात शिरत त्याच सहजतेने आघाडीवरील फ्रेंच सैनिक शिरत. रोस्तॉफ तसा सावध ऑफिसर होता. फ्रेंच सैनिक खेड्यामधली मिळेल ती वस्तू नेतील हे त्याने ओळखले होते आणि त्याचीच त्याला काळजी पडली होती.

रोस्तॉफ आणि इल्यिन चांगलेच खुशीत होते. बॉगुचेरॉव्हो ही प्रिन्सची शेतवाडी होती. तिथल्या घरात बरीच माणसे असतील आणि कदाचित आपणांस सुंदर मोलकरणी दिसतील, अशी ते आशा बाळगून होते. ज्या खेड्यात आपण चाललो आहोत ते खेडे ज्याच्याशी आपल्या बहिणीचा वाङ्निश्चय झालेला होता त्या प्रिन्स बोलकॉन्स्कीच्या मालकीचे आहे याची रोस्तॉफला जराही कल्पना नव्हती.

रोस्तॉफने इल्यिनला मागे टाकून प्रथम खेड्यात प्रवेश केला आता त्यांचे घोडे संथ गतीने धान्याच्या कोठाराकडे जाऊ लागले. तिथे शेतकऱ्यांचा मोठा जमाव उभा होता. कित्येक शेतकऱ्यांनी आपल्या टोप्या काढून घेतल्या. बाकीचे टोप्या न काढता त्याच्याकडे रोखून पाहू लागले. चेहऱ्यावर सुरकुत्या असलेले, तुरळक दाढी असलेले दोन म्हातारे शेतकरी गुत्त्यातून झोकांड्या खात आणि भसाड्या सुरात गात बाहेर पडले.

गर्दीतून दुसरा एक ठेंगणासा शेतकरी जवळ आला आणि विचारू लागला, ' तुमच्याकडे इथं खूप सैन्य आहे का ? '

रोस्तॉफ म्हणाला, ' खूप आहे. पण तुम्ही सगळे इथं का जमला आहात ? कसला सण वगैरे आहे की काय ? '

' गावच्या कामासाठी वृद्ध माणसं जमली आहेत ' त्याच्यापासून दूर होता होता तो मद्याचा

शेतकरी म्हणाला.

तेवढ्यात दोन स्त्रिया आणि पांढरी हॅट घातलेला एक पुरुष प्रिन्सच्या घराकडून अधिकाऱ्यांच्या दिशेने धावत येताना दिसला.

' प्रिन्सेसनं मला पाठवलं आहे. तिनं विचारायला सांगितलं आहे– तुम्ही कोणत्या रेजिमेंटचे आहात ? तुमचं नाव काय ? '

' हा काउंट रोस्तॉफ, स्क्वॉड्रनचा कमांडर. मी तुमचा नम्र सेवक. '

' महाराज तसदीची माफी असावी. ' बोलताना अल्पाटिचने एक हात कोटाखाली छातीशी धरला होता. त्याच्या बोलण्यात आदर होता; तरी त्यात अधिकाऱ्याच्या तारुण्याबद्दलच्या तिरस्काराची छटा होती. ' माझ्या मालकीणबाईंनी तुम्हाला बोलावलं आहे. ह्या महिन्याच्या पंधरा तारखेस मरण पावलेल्या कमांडर-इन्-चीफ प्रिन्स निकोलाय अँड्रीच बोलकॉन्स्कीच्या त्या कन्या. रांगड्या अडाणी लोकांमुळे त्या संकटात सापडल्या आहेत. त्यांनी तुम्हाला येऊन जाण्याची विनंती केली आहे. ' घोड्याभोवती माश्या फिराव्यात त्याप्रमाणे दोन शेतकरी अल्पाटिचच्या भोवती फिरत होते. त्यांच्याकडे बोट दाखवीत उदास स्मित करीत अल्पाटिच म्हणाला, ' आपण कृपा करून थोडे दूर सराल का ? ही जागा तेवढी सोयीची नाही. ' दूर होत रोस्तॉफ म्हणाला, ' हं सांगा काय ते. '

' महाराजांना सांगण्याचं धाडस मी करीत आहे. इथले उद्दाम शेतकरी मालकीणबाईंना शेतवाडी सोडून जायला देत नाहीत. गाडीचे घोडे सोडून टाकण्याच्या धमक्या देताहेत. आज सकाळी निघण्याची सगळी तयारी करूनही मालकीणबाई बाहेर पडू शकत नाही. '

रोस्तॉफ घोड्यावरून उतरला. ऑर्डर्लीकडे घोडा सोपवून तो अल्पाटिचबरोबर घराकडे जाऊ लागला. वाटेत त्याने सगळ्या गोष्टी समजावून घेतल्या.

प्रिन्सेसने धान्य देऊ केले होते, ड्रॉन आणि इतर शेतकरी यांच्याशी चर्चा केली. ह्यामुळे परिस्थिती आणखीनच बिघडली होती. शेवटी ड्रॉनने कचेरीच्या चाव्या दिल्या व तो शेतकऱ्यांना मिळाला. अल्पाटिचने त्याला बोलावणे धाडले तेव्हा त्याने येण्याचे नाकारले. सकाळी प्रिन्सेसने निघण्यासाठी घोडे जुंपायला सांगितले. त्या वेळी शेतकरी मोठ्या संख्येने धान्यकोठाराकडे जमा झाले. तिथून त्यांनी निरोप पाठवला, ' आम्ही प्रिन्सेसला गावातून बाहेर जाऊ देणार नाही. लोकांनी आपली घरं सोडू नये असा हुकूम निघालेला आहे. आम्ही गाडीचे घोडे सोडल्याशिवाय राहणार नाही. ' अल्पाटिच त्यांच्यासमोर भाषण करायला गेला. त्यांनी त्याला सांगितले,—' आम्ही प्रिन्सेस ा जाऊ देणं शक्य नाही. तसे करण्यास तिला मनाई करण्याचा हुकूम आहे. प्रिन्सेस राहिली तर तिची प्रत्येक गोष्ट ऐकू. '

रोस्तॉफला प्रिन्सेस मार्याच्या भेटीला नेण्यात आले. त्या वेळी ती असहायतेने भ्रमिष्टासारखी दिवाणखान्यात बसली होती. तो कोण आहे, कशासाठी आला आहे, आपली काय अवस्था झाली

आहे, कशाचेच तिला भान नव्हते. रोस्तॉफचा चेहरा तिला रशियन वाटला. त्याच्या शब्दांवरून आणि हालचालींवरून तो आपल्या दर्जाचा माणूस असल्याचे तिने ओळखले. आणि त्याच्याकडे गहिरी, चमकदार नजर लावली. ती बोलू लागली तेव्हा तिचा आवाज भावकंपित झाला. रोस्तॉफला ही भेट अद्‌भुतरम्य वाटू लागली. 'संरक्षण नसलेली, दुःखाने खचलेली, अडाणी बंडखोर शेतकऱ्यांच्या कृपेवर अवलंबून असलेली ही एकाकी मुलगी! विचित्र दैवानेच मला इथं खेचून आणलं असावं.' मनात असा विचार करीत रोस्तॉफ तिचे बोलणे ऐकू लागला व तिच्याकडे पाहू लागला.

उठता उठता रोस्तॉफ म्हणाला, 'प्रिन्सेस, मी या मार्गानं येण्याचा योग आला आणि तुम्हाला थोडीफार मदत करू शकलो म्हणून मला झालेला आनंद मी सांगू शकत नाही. मला वाटतं तुम्ही आता एकदम प्रवासाला निघा. तुम्ही मला तुमच्या संरक्षणाची व्यवस्था करू देत असाल तर कोणीही तुम्हाला त्रास देणार नाही याची मी जबाबदारी घेतो.'

राजघराण्यातील स्त्रियांना करतात तसा पार झुकून प्रणाम करून रोस्तॉफ दरवाजाकडे वळला.

घोडदळाचे सैनिक गावात शिरले आणि रोस्तॉफ प्रिन्सेसला भेटायला गेला. त्यानंतर जमावातील लोकांची मनःस्थिती द्विधा झाली. त्यांच्यात मतभेद झालेले दिसून आले. काही शेतकरी म्हणू लागले, 'घोडदळाचे सैनिक रशियन आहेत. आपण त्यांच्या तरुण स्त्रीला जाऊ दिलं नाही तर ते रागावतील याची जाणीव ठेवली पाहिजे.' ड्रॉनचे असे मत होते. त्याने ते व्यक्त करताच त्याच्यावर कार्प आणि इतर शेतकरी भडकले.

'तू किती वर्षं ह्या गावावर पोसला आहेस याची जाणीव आहे का तुला? तुला काही घडलं तरी सारखंच. आपलं पैशाचं डबोलं जमिनीतून खणून घेऊन तू पळ काढशील. आमच्या घरांचा नाश होऊ दे किंवा न होऊ दे, तुला त्याचं काहीच नाही.'

'सगळ्या गोष्टी जेथच्या तेथं असायला हव्यात, कुणी आपलं घर सोडता नये असा आम्हास हुकूम आहे. कोणतीही वस्तू गावाबाहेर हालवली जाता नये.' कोणीतरी जमावातून ओरडले.

ड्रॉनवर झडप घालीत एक म्हातारा एकदम ओरडू लागला, 'तुझ्या लठ्ठ पोराची सैन्यात जाण्याची पाळी असताना तू त्याला वाचवलंस आणि माझ्या वॅङ्काला सैन्यात पाठवलंस. आम्हा सगळ्यांना मरावं लागत आहे.'

इल्यिन, लाव्रुश्का आणि अल्पाटिच यांना बरोबर घेऊन रोस्तॉफ जमावाकडे येऊ लागला. जमाव आणखी जवळ झाला.

जमावाजवळ भरभर चालत येऊन रोस्तॉफने विचारले, 'तुमच्यामधे वडिलधारी माणसं

कोण आहेत ?'

'वडिलधारी माणसं कशासाठी हवी आहेत ?' कार्पने विचारले, पण हे शब्द त्याने पुरते उच्चारले नाहीत तोच त्याच्या हॅटमधून त्याचे डोके बाहेर पडले आणि डोक्यावर बसलेल्या जोराच्या ठोशामुळे तो खाली कोलमडला.

'विश्वासघातकी कुठले ! टोप्या काढून घ्या' रोस्तॉफ शिरा ताणून संतापाने ओरडला, 'गावचा प्रमुख कुठं आहे ?'

'गावचा म्होरक्या कुठं आहे ?' रोस्तॉफने पुन्हा ओरडून विचारले. आळ्या घातलेला फिकट मुद्रेचा ड्रॉन जमावातून बाहेर पडला.

'तूच का गावचा म्होरक्या ? लाब्रुश्का बांध त्याला' आपल्या हुकमाला कुणी विरोध करणार नाही अशा थाटात रोस्तॉफ ओरडला आणि खरोखरच दोन शेतकरी ड्रॉनला बांधू लागले. त्यांच्या कामात मदत करण्यासाठी की काय ड्रॉननेही त्यांना आपला दुशेला काढून दिला.

रोस्तॉफ शेतकऱ्यांकडे वळून म्हणाला, 'सगळेजण मी काय म्हणतो ते ऐकून घ्या. सरळ आपल्या घरी निघून जा. मला एक शब्द पुन्हा ऐकू येता कामा नये.'

'खरं तर आपण काहीच नुकसान केलेलं नाही. सगळं मूर्खपणातून घडतं आहे. आचरटपणाच आहे...हे बरं नाही असं मी कधीपासून सांगत होतो.' एकमेकांना दोष देत लोक घराकडे परतू लागले.

दोन तासांच्या आत हवे असलेले घोडे आणि गाड्या प्रिन्सेसच्या घरासमोर आणण्यात आल्या. शेतकरी घाईघाईने आपल्या मालकिणीच्या वस्तू गाड्यात भरू लागले. अडगळीच्या खोलीत कोंडून ठेवलेल्या ड्रॉनला प्रिन्सेस मार्याच्या इच्छेनुसार मोकळे करण्यात आले. तोच ड्रॉन आता अंगणात उभा राहून शेतकऱ्यांना सूचना देऊ लागला.

मुद्दामहून आपला परिचय प्रिन्सेसला करून द्यावा असे रोस्तॉफला वाटले नाही. तो तिच्या घरी परत न जाता, गावातच राहून तिच्या गाडीची वाट पाहू लागला. प्रिन्सेस मार्याची गाडी घरापासून निघाली, तेव्हा रोस्तॉफ घोड्यावर स्वार झाला. बॉगुचेरॉव्होपासून आठ मैल रस्ता रशियन सैन्याने व्यापला होता. तेवढे अंतर रोस्तॉफने तिला संरक्षण देऊन नेले. याकोव्हो येथील पथिकाश्रमात त्याने तिच्या अनुज्ञेने प्रथमच तिच्या हाताचे चुंबन घेतले आणि मोठ्या आदराने तिचा निरोप घेतला.

आपल्याला वाचवल्याबद्दल प्रिन्सेस मार्याने रोस्तॉफचे आभार मानले तसा रोस्तॉफ अतिशय संकोचून म्हणाला, 'असं का म्हणता तुम्ही प्रिन्सेस ? कोणत्याही पोलिस ऑफिसरनं हेच केलं असतं. आम्हाला केवळ शेतकऱ्यांशी लढा द्यावा लागला असता तर आम्ही शत्रूंना इतकं आत घुसू दिलं नसतं.' काहीशा संकोचाने संभाषणाचा ओघ बदलण्याचा प्रयत्न करीत तो म्हणाला, 'तुमच्याशी परिचय करून घेण्याची संधी मिळाली, हे माझं भाग्य होय. प्रिन्सेस, तुम्हाला सुखसमाधान लाभेल असा मला विश्वास आहे. यापुढे मी तुम्हाला

चांगले दिवस आलेले पाहीन अशी मला आशा आहे. येतो मी '

प्रिन्सेसने त्याचे आभार शब्दांऐवजी कृतज्ञता आणि जिव्हाळा यांनी उजळलेल्या मुद्रेने मानले. त्याचे आभार मानण्याजोगे काही घडले नाही असे तिला वाटत नव्हते. उलट तो नसता तर आपण खात्रीने बंडखोर शेतकऱ्यांचे किंवा फ्रेंच सैन्याचे बळी ठरलो असतो याबद्दल तिला बिलकूल शंका वाटली नाही. तिला वाचवण्यासाठी त्याने उघड उघड दिसणाऱ्या भयंकर संकटाला आमंत्रण दिले होते. जेव्हा त्याने तिचा निरोप घेतला आणि ती एकटी राहिली तेव्हा तिचे डोळे एकाएकी आसवांनी भरून आले. तिनं स्वतःलाच विचारले, 'मी त्याच्या प्रेमात तर पडले नाही?' हा प्रश्न ती काही पहिल्यांदाच स्वतःला विचारीत नव्हती. मॉस्कोला जाईपर्यंत परिस्थिती तशी काही आनंददायक नव्हती. तरीही तिच्याबरोबर गाडीत असलेल्या दुन्याशाच्या नजरेतून खिडकीतून पाहणाऱ्या आपल्या मालकिणीची कसल्या तरी आनंदाने व विचाराने उजळलेली मुद्रा सुटली नाही.

'त्याच्या प्रेमात पडले म्हणून काय झालं?' जो कदाचित आपल्याकडे कधीही लक्ष देणार नाही त्या माणसावर आपला जीव जडला आहे ही गोष्ट मान्य करताना तिला शरम वाटत होती. तरीही आपलं प्रेम कुणालाच कळणार नाही आणि जरी आपण प्रथमच आणि शेवटचेच आणि सबंध आयुष्यभर त्याच्यावर चोरून प्रेम केले तरी त्यात आपला दोष नाही अशा विचारांनी ती स्वतःचे समाधान करू लागली.

कधीकधी त्याची नजर, त्याची सहानुभूती, त्याचे शब्द ती आठवू लागे आणि आपल्याला सौख्य मिळणे अगदीच अशक्य नाही असे तिला वाटू लागे. त्याच वेळी ती खिडकीबाहेर पाहून हसत असल्याचे दुन्याशाला दिसे.

ऐन त्याच क्षणी त्याने बॉगुचेराव्होला यावे आणि त्याच्या बहिणीने आन्द्रेला नकार दिलेला असावा ह्या गोष्टी तिच्या मनातून जाईनात. ह्या साऱ्यांमागे तिला नियतीचा डाव असावा असे वाटू लागले.

रोस्तॉफच्या मनावर प्रिन्सेस मार्थाने चांगलीच छाप टाकली होती. तिची आठवण झाली की तो सुखावून जाई, त्याच्या सहकाऱ्यांना त्याचे बॉगुचेरॉव्होमधील साहस कळले. तो गवत शोधायला गेला होता आणि त्याने रशियातील प्रचंड संपत्तीची वारस असलेली मुलगी शोधली होती. या गोष्टीचा उल्लेख करून त्याचे सहकारी त्याची थट्टा करू लागले की तो रागावे,— प्रेमळ आणि त्याच्या मते आकर्षक अशा आणि गडगंज संपत्ती असलेल्या प्रिन्सेस मार्याशी लग्न करण्याचा विचार, त्याची इच्छा नसताना, त्याच्या मनात पुन्हा पुन्हा येत होता. म्हणून त्याला सहकाऱ्यांच्या थट्टेचा राग येत होता. व्यक्तिशः निकोलायने प्रिन्सेस मार्याहून अधिक चांगल्या पत्नीची मागणी केली नसती. त्याला वाटले आपण तिच्याशी लग्न केले तर आपली आई–थोरली काउंटेस सुखावेल आणि आपल्या वडिलांची आर्थिक दुरवस्था टळेल. खेरीज लग्न केल्याने प्रत्यक्ष प्रिन्सेसही सुखी होईल.

पण सोन्याचे काय? तिला दिलेल्या वचनाचे काय?

प्रिन्सेस वोलकॉन्स्कीवरून सहकाऱ्यांनी थट्टा केली की त्याला राग येत होता तो त्यामुळेच...

कुटूझॉफला सैन्याचा कमांडर-इन्-चीफ् नेमण्यात आले. त्याने प्रिन्स आन्द्रेला आठवणीने हेडक्वॉर्टर्सला बोलावले.

प्रिन्स आन्द्रे झारेव्हो झाइमिश्चे इथे पोचला. त्याच दिवशी व त्याच वेळी कुटूझॉफ सैन्याची प्रथमच तपासणी करीत होता. कमांडर-इन्-चीफ्ची गाडी गावातील धर्मगुरूच्या घरासमोर थांबली होती. प्रिन्स आन्द्रे त्या घराच्या फाटकाजवळील बाकावर बसून हिज हायनेस कुटूझॉफची वाट पाहू लागला. गावापलीकडल्या मैदानावरून रेजिमेंटचे संगीत आणि नव्या कमांडर-इन-चीफ्च्या स्वागतासाठी असंख्य लोकांनी दिलेल्या आरोळ्या ऐकू येत होत्या. फाटकाजवळ प्रिन्स आन्द्रेपासून आठ-दहा पावलांवर दोन ऑर्डर्ली, एक निरोप्या आणि एक बटलर उभा होता. मालकाच्या गैरहजेरीचा फायदा घेऊन ते चांगल्या हवामानाचा आनंद लुटत होते. झुबकेदार मिशा आणि कल्ले असलेल्या, घोडदळाच्या सावळ्या वर्णाच्या लेफ्टनंट कर्नलने फाटकाजवळ घोडा थांबवला. प्रिन्स आन्द्रेकडे नजर टाकून त्याने विचारले, 'महाराज इथंच मुक्काम करणार आहेत काय? की ते त्वरित इथून मागे फिरणार आहेत?'

वोलकॉन्स्कीने त्याला बाकावर बसायला जागा करून दिली. तो घोडदळाचा सैनिक त्याच्या शेजारी बसला.

'तुम्ही देखील कमांडर-इन-चीफ्ची वाट पाहात आहात होय ना? ते कुणाचीही भेट घ्यायला तयार असतात हे बरं आहे. सॉसेज बनवणाऱ्यांची गोष्ट वेगळी. यर्मेलॉव्ह आपणास 'जर्मन म्हणून बढती द्या' अशीही विनंती करील. आतापर्यंत रशियन काय करीत होते कुणास ठाऊक. सारखे माघार घेताहेत. तुम्ही लढाईवर होता का?'

प्रिन्स आन्द्रे उत्तरला, 'लढाईवर असण्याचं भाग्य मला लाभलं होतं. माघार घेण्याचंच नव्हे तर माघार घेताना मौल्यवान गोष्टी हरवण्याचं भाग्य लाभलं होतं. माझी मालमत्ता आणि माझा जिथं जन्म झाला ते घर मी गमावलंच, पण मी माझे वडीलही गमावून बसलो. ते शोकानं मरण पावले. मी स्मॉलेन्स्कचा रहिवासी आहे.'

'अरे! म्हणजे तुम्ही प्रिन्स वोलकॉन्स्की तर? तुमचा परिचय झाला, म्हणून मला आनंद वाटतो. मी लेफ्टनंट कर्नल डेनिसॉव्ह. मला वास्का या नावाने सगळे ओळखतात.' प्रिन्स आन्द्रेचा हात दाबीत आणि त्याच्याकडे खास दयाळू नजरेने पाहात डेनिसॉव्ह म्हणाला, 'मी त्याबद्दल ऐकले आहे.' त्याच्या स्वरात सहानुभूती होती. क्षणभर स्तब्ध राहून तो म्हणाला, 'ही सिथिआतील लढाई आहे. ज्यांना हानी सोसावी लागते, त्यांना लढाई काही चांगली नव्हे. प्रिन्स आन्द्रे वोलकॉन्स्की तुम्हीच तर. ठीक.' मान हलवीत तो म्हणाला, 'प्रिन्स, मला तुमच्या परिचयामुळं खरंच खूप आनंद झाला आहे!' उदास स्मित करीत प्रिन्स आन्द्रेचा

हात दाबीत तो म्हणाला.

नताशाने आपल्या पहिल्या प्रियकराच्या गोष्टी सांगितल्या होत्या. त्यामुळे प्रिन्स आन्द्रेला डेनिसॉव्हबद्दल माहिती होती. त्या मधुर कडवट गोष्टींमुळे त्याच्या हृदयातील व्यथा पुन्हा जाग्या झाल्या. आताशा त्याला त्याचा विसर पडला होता. तरी त्या खोलवर अंतर्यामी दबून राहिलेल्या होत्या. आताशा त्याचे मन विविध आणि गंभीर गोष्टींनी व्यापले होते--स्मॉलेन्स्क गावाचा त्याग, ब्लीक हिल्सला दिलेली भेट, वडिलांच्या मृत्यूची कालपरवा आलेली बातमी इत्यादी गोष्टींमुळे त्याच्या अंतःकरणात भावनांचा कल्लोळ उठला होता. त्यांमुळे ज्या गोष्टी पार विस्मृतीत पडल्या होत्या, त्या जाग्या झाल्या. पण तो पूर्वीसारखा हेलावून गेला नाही.

डेनिसॉव्हच्या मनात बोलकॉन्स्की नावामुळे अद्‌भुतरम्य गतकाळातील गोष्टी जागृत झाल्या. रात्रीचे जेवण झाले होते. नताशाचे गाणेही संपले होते. त्यानंतर आपण काय करतो आहोत याचा विचार न करता त्याने पंधरा वर्षांच्या मुलीला मागणी घातली होती. त्या काळाची आणि नताशावरील आपल्या प्रीतीची आठवण होऊन तो स्वत:शीच हसला. मग लागलीच ज्यात त्याला अतिशय रस होता त्या वर्तमानकालीन कामाकडे तो वळला. हे काम म्हणजे मोहिमे-संबंधी त्याने आखलेली योजना. माघार घेत असताना आपल्या मुक्कामात त्याने ही योजना आखलेली होती. त्याने ही योजना बॉर्क्ली द टॉल्य याच्यापुढे मांडली होती. आता ही योजना कुटूझॉफला दाखवण्याचा त्याचा विचार होता. फ्रेंच सैन्याच्या हालचालीचे क्षेत्र विस्तृत होते. तेव्हा त्याची प्रगती रोखून धरण्यासाठी आघाडीवर हल्ला करण्याऐवजी अगर आघाडीवर हल्ला चालू असतानाच त्याच्या दळणवळणाच्या मार्गावर हल्ले चढवले पाहिजेत, अशी योजना डेनिसॉव्हने मांडली होती. तो आपली योजना प्रिन्स आन्द्रेला स्पष्ट करून सांगू लागला.

' फ्रेंच सैनिकांना आपल्या हालचालीच्या सबंध मार्गाचं रक्षण करणं अशक्य आहे. त्यांच्या हालचाली मधूनमधून थांबवता येतील. मला पाचशे सैनिक दिलेत तरीही मी त्यांचा दळणवळणाचा, अन्नपुरवठ्याचा मार्ग खात्रीनं तोडून टाकीन. गनिमी काव्यानं मधूनमधून हल्ले करणं हाच त्याला उपाय. '

त्यांना सैनिकांच्या आरोळ्या, संगीत आणि गाणे ऐकू येऊ लागले. दूरवर पसरलेल्या वेगवेगळ्या तुकड्यांतून ते आवाज येत होते. गावामधून सैनिकांच्या आरोळ्या आणि घोड्यांच्या खुरांचे आवाज ऐकू येऊ लागले.

' स्वतः महाराज येताहेत. ' फाटकाशी उभा असलेला एक कोसॅक म्हणाला.

बोलकॉन्स्की आणि डेनिसॉव्ह फाटकाजवळ आले. फाटकाजवळ मानवंदना देण्यासाठी सैनिकांचा समूह उभा होता. त्यांनी पाहिले. समोरच्या रस्त्यावरून तपकिरी घोड्यावर स्वार झालेला कुटूझॉफ येत होता. त्याच्यामागून कितीतरी जनरल येत होते. बार्क्ली त्याच्या अगदी जवळून चालला होता. कितीतरी ऑफिसर त्यांच्या मागून आणि बाजूने घोषणा देत धावत होते.

कुटूझॉफने घोड्याला टाच मारली. कुटूझॉफ सारखा मान हालवीत होता. आणि आपल्या पांढऱ्या संरक्षक घोडदळाच्या लाल पट्टा असलेल्या व टोक नसलेल्या टोपीला हात लावत होता. भरदार शरीराच्या उंच ग्रेनेडीअरांनी–त्यात बहुतेक घोडदळाचे सैनिक होते त्याला मानवंदना दिली तेव्हा कुटूझॉफने त्यांच्याकडे हुकमत गाजवणाऱ्या माणसाप्रमाणे साभिप्राय नजरेने काही न बोलता मिनिटभर रोखून पाहिले. मग तो भोवताली उभ्या असलेल्या जनरलांच्या आणि ऑफिसरांच्या घोळक्याकडे वळला. त्याच्या मुद्रेत एकाएकी सूक्ष्म बदल झाला. संभ्रमित अवस्थेत असल्याप्रमाणे त्याने खांदे उडवले आणि म्हटले, 'अशी माणसं असताना सारखी माघार घ्यावी लागावी अं!' त्यांचा निरोप घेऊन तो घोड्याला टाच मारून फाटकातून प्रिन्स आन्द्रे आणि डेनिसॉव्हजवळून गेला. त्याच्या मागे जमाव स्वागताच्या घोषणा देत राहिला.

प्रिन्स आन्द्रेने कुटूझॉफला पूर्वी पाहिले होते, त्याहून तो आता खूपच दांडगा आणि गलेलठ्ठ झाला होता. त्याची चरबी खूपच सुटली होती. मात्र परिचित वण, पांढरा डोळा, मुद्रेवर आणि शरीरावर दिसणारा थकवा ह्या गोष्टींत बदल झालेला नव्हता. त्याने पांढऱ्या संरक्षक घोडदळाची टोपी आणि लष्करी कोट घातला होता. त्याच्या अरुंद पट्ट्याला खांद्याशी चाबूक लोंबत होता. त्याचे जड शरीर दांडग्या घोड्यावर हेलकावत होते.

प्रांगणात घोडा नेताना त्याने ऐकू येईल न येईल अशी शीळ घातली. काम संपल्यानंतर विश्रांतीची आतुरतेने वाट पाहणाऱ्या माणसाचा भाव त्याच्या मुद्रेवर उमटला. त्याने आपले डावे पाऊल रिकिबीतून बाहेर काढले, ते वर खोगिरापर्यंत आणले आणि कण्हत खाली आधार देण्यास सज्ज असलेल्या कोसॅकांच्या आणि ॲडज्युटंटांच्या अंगावर देह झोकून दिला.

खाली पडताच कुटूझॉफने स्वतःला सावरले. अर्धमिटल्या डोळयांनी भोवती पाहिले. त्याची नजर प्रिन्स आन्द्रेवर पडली. पण त्याने त्याला ओळखले नाही हे उघड होते. तो पायऱ्यांच्या दिशेने फेंगडत चालू लागला.

शीळ घालीत त्याने पुन्हा वळून प्रिन्स आन्द्रेकडे पाहिले. वृद्धांच्या बाबतीत घडते तसे घडले. कुटूझॉफने प्रिन्स आन्द्रेचा चेहरा पाहिला पण त्याला एकदम त्याची ओळख पटली नाही. 'तरुण माणसा, कसं चाललं आहे? ठीक आहे ना?' त्याच्या बोलण्यात थकवा होता. त्याचे जड शरीर चालू लागले. तशी त्याच्या पावलाखाली पायऱ्या करकरू लागल्या. कोटाची बटणे काढून पोर्चमधील एका आसनावर तो बसला.

'तुझे वडील कसे आहेत?'

'ते गेल्याची बातमी कालच आली.' प्रिन्स आन्द्रे म्हणाला. खिन्नपणे विस्फारल्या डोळयांनी कुटूझॉफने त्याच्याकडे पाहिले. मग आपली टोपी काढून त्याने छातीशी क्रूसाची खूण जुळवली. 'ईश्वर त्याना शांती देवो! तो आपल्या इच्छेनुसार आमचा सांभाळ करो!'

एक दीर्घ उसासा टाकून तो स्तब्ध झाला. काही वेळाने म्हणाला, 'तुझे वडील मला

खूप आवडायचे. त्यांच्याबद्दल मला खूप आदर होता. मला मनस्वी दुःख वाटतं.' त्याने प्रिन्स आन्द्रेला आपल्या लठ्ठ छातीशी बराच वेळ धरून ठेवले. त्याच्या मिठीतून मोकळा झाल्यावर प्रिन्स आन्द्रेने पाहिले. कुटूझॉफचे जाड ओठ थरथरत होते. त्याच्या डोळ्यांत अश्रू होते. कुटूझॉफने उसासा टाकला अ णि उठायला मदत व्हावी म्हणून त्याने दोन्ही हात आसनावर दाबले.

'चल आपण गप्पा मारू.' तो म्हणाला. पण त्याच क्षणी शत्रूप्रमाणे अधिकाऱ्यांना क्वचितच घाबरणारा डेनिसॉव्ह धिटाईने पुढे झाला. त्याची पावले पडताना बुटाचे खिळे वाजले. त्याला अडवू पाहणाऱ्या चिडलेल्या ॲडज्युटंटांच्या कुजबुजण्यास दाद न देता तो कुटूझॉफकडे वळला.

उठण्यासाठी हाताचे तळवे अजून आसनावर दाबून धरलेल्या कुटूझॉफने रडवेल्या चेहऱ्याने डेनिसॉव्हकडे पाहिले. डेनिसॉव्हने म्हटले, 'मी डेनिसॉव्ह. मी महाराजांना रशियाच्या कल्याणासाठी एक अतिशय महत्त्वाची गोष्ट सांगावी म्हणून आलो आहे.' कुटूझॉफने थकलेले डोळे डेनिसॉव्हवर वळवले. त्रासिकपणे हात वर करून त्याने ते पोटाशी दुमडून घेतले, आणि म्हटले, 'रशियाच्या कल्याणासाठी? काय सांगणार आहात? सांगा.' स्मॉलेस्की आणि व्हॅझमा यांच्या दरम्यान शत्रूचे दळणवळण तोडून टाकण्याची आपली योजना तो धिटाईने विशद करू लागला. डेनिसॉव्हचे घर त्या भागातच होते. त्या प्रदेशाशी तो चांगलाच परिचित होता. त्याची योजना तो ज्या ज्वलंत निष्ठेने बोलत होता तीवरून निःसंशय चांगली होती. कुटूझॉफ आपल्या स्वतःच्या पावलाकडे पाहात, मधून मधून वळून शेजारच्या झोपडीच्या अंगणात नजर टाकीत होता. जणू तिकडून काहीतरी अप्रिय येण्याची तो अपेक्षा करीत होता आणि तसेच घडले. डेनिसॉव्ह बोलत असताना त्या झोपडीकडून कागदपत्रे काखोटीस मारलेला एक जनरल दाखल झाला.

डेनिसॉव्हचे विवेचन चालू असताना कुटूझॉफने जनरलला विचारले; 'आता तयार आहेस ना?'

'होय महाराज,' जनरलने उत्तर दिले. कुटूझॉफने मान हालवली. जणू त्याला म्हणायचे होते, 'एकटा माणूस सगळ्या कामांना कितीसा पुरा पडणार?' पुन्हा तो डेनिसॉव्हचे बोलणे ऐकू लागला.

डेनिसॉव्ह म्हणत होता, 'रशियन ऑफिसर या नात्यानं मी तुम्हाला ग्वाही देतो- मी नेपोलियनचं दळणवळण तोडून टाकीन.'

'गव्हर्नर किरिल अँड्रीविच डेनिसॉव्ह तुमच्या कोणी नात्याचे आहेत का?'

'होय महाराज. ते माझे चुलते.'

'अरे वा! आम्ही एके काळी दोस्त होतो.' कुटूझॉफ अधिक उत्साहाने म्हणाला. 'छान छान! तरुण माणसा. तू इथं स्टाफवर राहा. उद्या आपण बोलू या.' मान हलवून डेनिसॉव्हचा निरोप घेऊन तो वळला आणि कॉनोव्हनित्सियनने आणलेले कागद घेण्यासाठी

त्याने हात पुढे केला.

ड्यूटीवरील जनरल नाखूष स्वरात म्हणाला, 'महाराज घरात येतील तर बरं होईल. काही योजना पाहणं आणि काही कागदपत्रांवर सह्या करणं आवश्यक आहे.' ॲडज्युटंट दरवाजाशी येऊन म्हणाला, 'आत सर्व तयारी आहे.' परंतु आत जाण्यापूर्वी कुटूझॉफला सगळी कामं हातावेगळी करायची होती. त्याने आपली इच्छा जरा थांबून प्रकट केली.

'अरे बाळ, टेबल इथंच मांड. सगळी कागदपत्रं मी इथंच बसून पाहतो.' मग प्रिन्स आन्द्रेला उद्देशून तो म्हणाला, 'तू थांब, जाऊ नकोस.' ड्यूटीवरील जनरलचे बोलणे ऐकत प्रिन्स आन्द्रे पोर्चमधे बसून राहिला.

जनरल सैन्याच्या हालचालीवरील टीका ऐकवत होता. ह्याच तऱ्हेने कुटूझॉफने डेनिसॉव्हचे बोलणे ऐकले होते. त्याच तऱ्हेने त्याने सात वर्षांपूर्वी ऑस्टरलिट्सच्या अलीकडे भरलेल्या लष्करी सभेतील चर्चा ऐकली होती. तो सारे ऐकत होता ते केवळ त्याला कान होते म्हणून. त्याच्या एका कानात सध्या कापसाचा बोळा घातलेला होता. तरी त्याला दोन्ही कानांनी ऐकण्याखेरीज गत्यंतर नव्हते. जनरल सांगत असलेल्या कोणत्याही वार्तेने त्याला आश्चर्य वाटले नव्हते. तीत रस वाटत नव्हता. त्याला सांगण्यात येणाऱ्या साऱ्या गोष्टी त्याला अगोदरच ठाऊक असाव्यात. प्रार्थनागीते ऐकण्याखेरीज गत्यंतर नसते त्याप्रमाणे ऐकावे लागत होते म्हणून तो ऐकत होता असे स्पष्ट दिसत होते. डेनिसॉव्हने मांडलेल्या सर्व योजना व्यावहारिक आणि शहाणपणाच्या होत्या. पण कुटूझॉफ ज्ञान आणि बुद्धी या दोन्ही गोष्टींचा तिरस्कार करीत असल्याचे उघड दिसत होते. प्रश्नाचा निकाल लावणारी ज्ञान व बुद्धी यांहून भिन्न अशी गोष्ट जणू त्याच्याकडे होती.

कुटूझॉफने आपली स्वतःची अशी एकच सूचना त्या रिपोर्टात समाविष्ट केली होती. ती सूचना रशियन सैन्याच्या लुटालुटीसंबंधीची होती. रिपोर्ट सादर केल्यावर शेवटी जनरलने कुटूझॉफच्या सहीसाठी एक कागद पुढे केला. एका जमीनदाराने नुकसानभरपाईचा अर्ज केला होता. काही ऑफिसरांनी त्याचे ओटचे शेत कापून नेले होते. त्या नुकसानीविरुद्ध त्याचा अर्ज होता. ते ऐकताना कुटूझॉफच्या विलग झालेल्या ओठांचा आवाज झाला. त्याने मान हालवीत म्हटले, 'शेगडीत टाक...जाळून टाकतो अर्ज. मी तुला एकदाच बजावून सांगतो. असले अर्ज आगीत टाकीत जा आपल्या सैनिकांना हवं तेवढं पीक कापून घेऊ दे. लाकूडफाटा जळणाला वापरू दे. हे माझ्या हुकमानं होणार नाही. माझी संमती मिळणार नाही. पण मी असल्या गोष्टींचा पिच्छा पुरवणार नाही. असं होणार, त्याला इलाज नाही. झाडं तोडून पाडायची असतील तर त्यांचे ढलपे उडणारच.' त्याने पुनश्च कागदांकडे पाहिले. डोके हालवीत त्याने शेरा मारला—'काय हे जर्मनांसारखे काटेकोर लेखन!'

' पुरे झालं आता ' शेवटच्या कागदपत्रावर सही करताना कुटूझॉफ म्हणाला आणि कसा-बसा उठून निवासाकडे वळला.

अर्ध्या एक तासाने कुटूझॉफने प्रिन्स आन्द्रेला बोलावून घेतले. कुटूझॉफ बैठ्या खुर्चीत आराम करीत होता. त्याच्या अंगात मधाचाच बटणे काढलेला लष्करी कोट होता. त्याच्या हातात फ्रेंच कादंबरी होती. प्रिन्स आन्द्रे आत आला तेव्हा त्याने ती बाजूला ठेवून दिली.

' बसून घे. इथं बस. आपणाला थोडा वेळ बोलता येईल.' कुटूझॉफ म्हणाला, ' फार वाईट झालं, मी तुला तुझ्या वडिलांच्या जागी आहे असं समज.'

प्रिन्स आन्द्रेने कुटूझॉफला आपल्या वडिलांच्या मृत्यूबद्दल ठाऊक असलेली सगळी बातमी सांगितली, ब्लीक हिल्स येथील आपला अनुभव सांगितला.

' आपणावर काय हा प्रसंग आला ! ' कुटूझॉफ एकाएकी उत्कट भावनेने उद्गारला. प्रिन्स आन्द्रेने सांगितलेल्या हकीकतीमुळे त्याच्या समोर रशियाची परिस्थिती जिवंतपणे उभी राहिली.

' थोडा धीर धर, थोडा धीर धर. ' त्याच्या मुद्रेवर सूडाची भावना होती. हेलावून टाकणारे संभाषण आता त्याला चालू ठेवायचे नव्हते. त्या उद्देशाने तो म्हणाला, ' मी तुला माझ्याकडे ठेवणार आहे. त्यासाठी बोलावून घेतलं आहे मी.'

प्रिन्स आन्द्रेने त्याचे आभार मानले आणि म्हटले, ' महाराज, कार्यालयातील कामाला माझा चांगला उपयोग होणार नाही, असं मला वाटतं. ' त्याने केलेले स्मित कुटूझॉफच्या नजरेतून सुटले नाही. तो त्याच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहू लागला. ' सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी की मला माझी रेजिमेंट चांगली मानवली आहे. मला तिचे ऑफिसर आवडतात. तिथल्या माणसांनाही मी आवडू लागलो आहे असं मला वाटतं. रेजिमेंट सोडावी लागली तर मला वाईट वाटेल. तुमच्या सेवेत राहण्याचं भाग्य मी नाकारत असलो तरी तुम्ही विश्वास ठेवा...' प्रिन्स आन्द्रे म्हणाला.

कुटूझॉफचा गुबगुबीत चेहरा धूर्तता, सौजन्य आणि तरीही सूक्ष्म उपरोध यांनी उजळला. त्याने बोलकॉन्स्कीला पुढे बोलू न देता म्हटले, ' तू माझ्याकडे असतास तर मला उपयोग झाला असता, याची मला खात्री वाटते. तरीही तुझं म्हणणंही योग्य आहे. बरोबर आहे. आम्हाला माणसांची जरुरी आहे ती या ठिकाणी नव्हे. सल्ला देणारे लोक असंख्य असतात पण शूर सैनिक तुरळक असतात. जर सगळे भावी सल्लागार तुझ्याप्रमाणं रेजिमेंटमधून सेवा करतील तर रेजिमेंटची अवस्था आजच्यासारखी राहणार नाही. मला ऑस्टरलिट्स येथील तुझी कामगिरी आठवते. तू निशाण घेऊन होतास ते मी मुळीच विसरलो नाही. ' कुटूझॉफ असे म्हणाला तेव्हा त्या आठवणीसरशी प्रिन्स आन्द्रेचा चेहरा आनंदाने आरक्त झाला. कुटूझॉफने आपला हात त्याच्या समोर धरला. त्याने चुंबन घ्यावे म्हणून त्याने आपला गाल पुढे केला. प्रिन्स आन्द्रेला त्या वृद्धाचे डोळे आसवांनी भरलेले दिसले. कुटूझॉफच्या डोळ्यांत सहजासहजी आसवे येतात आणि आपल्यावरील संकटामुळे तो हेतुतः आपल्याशी प्रेमळपणाने

वागत आहे हे प्रिन्स आन्द्रेला उमगले नव्हते असे नाही, तरीही त्याने ऑस्टरलिट्सच्या आठवणी काढल्याने तो सुखावून गेला, शेफारून गेला.

'तू तुझ्या मार्गानं जा. परमेश्वर तुला यश देईल. तू निवडलेला मार्ग सन्मानाचा आहे. हे मी जाणतो.' थांबून कुटूझॉफ म्हणाला, 'बुखारेस्टला आपली चुकामूक झाली. मी कोणाला तरी पाठवणार होतो...' मग त्याने विषय बदलला. तो तुर्कांचे युद्ध आणि आपण घडवून आणलेला समेट यावर बोलू लागला. 'मला लोकांनी युद्धासाठी आणि तहासाठी चांगल्याच शिव्या मोजल्या...पण सगळया गोष्टी कशा योग्य वेळी घडून गेल्या. मग त्याने एक फ्रेंच म्हण उद्धृत केली. 'ज्याला प्रतीक्षा करणं ठाऊक आहे त्याला सगळया गोष्टी योग्य वेळी मिळतात.' इथे सल्लागार आहेत तसे तिथेही पुष्कळ सल्लागार होते. सल्लागारांची आवश्यकतेहून अधिक असलेली संख्या त्याच्या चिंतेचा विषय होती. 'सल्लागार खूप झाले आहेत. त्या सर्वांचं आम्ही ऐकलं असतं तर आज आम्ही तुर्कस्तानात असतो. आम्ही तह करू शकलो नसतो. आणि युद्ध काही संपुष्टात आलं नसतं. सारखी अधिकाधिक घाई केल्यानं प्रगती होत नाही. कॅमेन्स्की मरण पावला नसता तर त्याचं तिथं दुर्दैव ओढवलं असतं. तो तीस हजार सैनिक घेऊन जोराचे हल्ले करून किल्ले जिंकीत सुटला. किल्ले जिंकणं सोपं आहे पण मोहीम यशस्वीरीत्या संपवणं अवघड आहे. आपणास जोरदार हल्ल्याची गरज नसून वेळ आणि धीर यांची गरज आहे. रस्टचकवर हल्ला करण्यासाठी कॅमेन्स्कीनं सैनिक पाठवले. मी मात्र वेळ आणि धीर यांवर केवळ भरवसा ठेवला. आणि कॅमेन्स्कीनं जिंकले त्याहून जास्त किल्ले जिंकले. तुर्कांना घोडे खायला लावले.' मग डोके हालवीत तो म्हणाला, 'आणि माझ्यावर विश्वास ठेव. फ्रेंचांनाही तसंच करावं लागेल.' कुटूझॉफ तावातावाने आपल्या छातीवर हात मारीत ओरडला, 'मी फ्रेंचांनाही घोडे खायला लावीन.' पुन्हा कुटूझॉफचे डोळे आसवांनी भरून आले.

'तरीही आपणास लढावं लागेलच. नाही का?' प्रिन्स आन्द्रेने विचारले.

'सगळ्यांना लढाई हवीच असेल तर आपणास लढण्यावाचून गत्यंतर नाही. पण पोरा, माझे शब्द विसरू नकोस. सर्व सैनिकांपेक्षा जास्त ताकदवान दोनच—वेळ आणि धीर.'

मॉस्कोच्या अधिकाधिक जवळ शत्रू सरकू लागला तरी तेथल्या रहिवाशांनी स्वतःच्या स्थितीबद्दल गंभीरपणे विचार केला नाही. मोठे संकट येताना पाहूनही लोक मूर्ख, उथळ बनतात त्याप्रमाणेच मॉस्कोचे रहिवाशी बनले होते. कितीतरी काळ ते ख्यालीखुशालीत दिवस घालवीत होते.

कार्पुश्का चिगिरिनचे पोस्टर ठिकठिकाणी रास्तोप्चिनने लावले. त्या पोस्टरांची आणि पुश्किन याने रचलेल्या गाण्याची चर्चा होऊ लागली.

इंग्लिश क्लबचे सदस्य पोस्टर बघण्यासाठी एका खोलीत जमले होते. पोस्टरमधे कार्पुश्क फ्रेंचांना हसत असल्याचे दाखवले होते. ती पद्धत त्यातील काहींना आवडली होती. पोस्टरमधील कार्पुश्का म्हणत होता, 'ह्या फ्रेंचांवर रशियन कोबी मारून त्यांना घालवून दिले जाईल. रशियन पॉरीज त्यांची आतडी फोडून काढतील, कोबीचे सूप त्यांना खलास करून टाकील. ही सगळी फ्रेंच माणसे खुजी आहेत रशियन खेड्यातील एकेकटी किसानकन्या त्यांच्यातील तिघांना खोचेऱ्याने उडवून देईल.'

काहींना हा सूर आवडत नव्हता. त्यांच्या दृष्टीने असे बोलणे मूर्खपणाचे आणि ग्राम्य होते. रास्तोप्चिनने फ्रेंचांना आणि इतर परकीय माणसांना मॉस्कोमधून घालवून दिले होते. त्यामधे नेपोलिअनचे हस्तक व हेर होते असे लोक बोलू लागले. त्या प्रसंगी रास्तोप्चिनने काढलेले उद्गार पुन्हा बोलण्यासाठीच मुख्यतः ते लोक असे बोलू लागले. रास्तोप्चिन त्यांना म्हणाला होता, 'तुम्ही आता स्वतःला सांभाळा. आता जहाजात चढा. ते जहाज मृतात्म्यांना स्टिक्स ही पाताळनदी पार करून नेणाऱ्या केरनची होडी बनणार नाही याची काळजी घ्या.' मॉस्कोहून सरकारी कचेऱ्या हालवल्या गेल्या त्याबद्दलही चर्चा होऊ लागली.

मॅमनॉव्हच्या रेजिमेंटला आठ लक्ष रूबल खर्च येत असे. बेझुहॉव्ह यापेक्षा अधिक रक्कम खर्च करायचा. बेझुहॉव्हच्या देशभक्तीचे उदात्त उदाहरण हे की तो स्वतः गणवेष घालून रेजिमेंटच्या अग्रभागी राहात आहे आणि आपणास काही खर्च न करता हे दृश्य बघायला मिळत आहे असे लोक आपापसात बोलत होते.

अंगठ्या असलेल्या नाजूक बोटांनी तलम कापड उचलीत जूली द्रबेत्स्कॉय म्हणाली, 'तुम्हाला कोणाचीच दया येत नाही.'

जूली दुसऱ्या दिवशी मॉस्कोला जाणार होती. त्या रात्री तिने निरोपादाखल पार्टी दिली होती.

'बेझुहॉव्ह तसा हास्यास्पद आहे. पण तो इतका सुस्वभावी आहे! इतका चांगला आहे! दुसऱ्यांना असे चावे घेण्यात तुम्हाला काय मजा वाटते?'

'असं बोलू नका.' स्वयंसेवकाच्या गणवेषात असलेला एक तरुण मनुष्य म्हणाला. त्याला जूली 'माझा शिलेदार' म्हणायची. त्याला घेऊन ती निझ्नि येथे जाणार होती.

जूली पुढे म्हणाली, 'तुम्हाला कोणाची दया येत नाही. चावे घेण्याची सवय आहे हे मी मान्य करते. पण सभ्य भाषणाच्या आनंदासाठी मी दंडही भरीन. त्याहूनही अधिक रक्कम भरीन असं बोलताना अ-रशियन वाक्प्रचार आला तरी मी पर्वा करणार नाही. प्रिन्स गॅलिट्झिनप्रमाणे रशियन शिक्षक नेमून त्याच्याकडून रशियन शिकायला मला वेळ नाही आणि तेवढा पैसाही नाही? तेवढ्यात पीएर आला. त्याच्याकडे प्रेमळ नजरेने पाहात स्मित करीत ती म्हणाली, 'जेव्हा आपण सूर्याबद्दल बोलतो तेव्हा आपणाला त्याची किरणे दिसतात. आम्ही नुकतेच तुमच्याबद्दल बोलत होतो.' उच्चभ्र समाजातील स्त्रिया ज्या सहजतेने खोटे बोलतात त्या सहजतेने ती खोटे बोलली. 'तुमची

रेजिमेंट मॅमनॉव्हच्या रेजिमेंटपेक्षा खात्रीने चांगली ठरणार असं आम्ही म्हणत होतो.'

आपल्या यजमानीणबाईच्या हाताचे चुंबन घेऊन तिच्या शेजारी बसता बसता पीएर म्हणाला, 'जाऊ द्या. माझ्या रेजिमेंटबद्दल मला काहीच ऐकायचं नाही. मला तिचा इतका वैताग आला आहे!'

'रेजिमेंटचे कमांडर अर्थात तुम्हीच व्हाल, नाही?' स्वयंसेवकाकडे धूर्त आणि उपरोधिक कटाक्ष टाकीत जूलीने पीएरला विचारले.

पीएर उपस्थित असल्याने त्या स्वयंसेवकाला कोणते मर्मभेदक बोल बोलावे याचे अवधान राहिले नाही. जूलीच्या स्मिताचा अर्थ काय असेल हे त्याला उमजले नाही. त्याच्या मुद्रेवर गोंधळ दिसू लागला. पीएर विसराळू आणि भाबडा असला तरी तो आपली चेष्टा करण्याचा कोणताही प्रयत्न हाणून पाडायचा.

पीएर आपल्या स्थूल देहाकडे पाहात हसत म्हणाला, 'छे छे! मी कमांडर झालो तर फ्रेंचांना चांगलंच भलं मोठं लक्ष्य सापडेल. मला तर धड घोड्यावरही बसता येत नाही.'

अनेकांबद्दल अफवा सुरू झाल्या होत्या. जूलीच्या मित्रांनी आता रोस्तॉफकुटुंबाबद्दल गप्पा मारायला प्रारंभ केला. जूली म्हणाली, 'मी ऐकते की, रोस्तॉफकुटुंबाची आर्थिक स्थिती पार ढासळली आहे. काउंट तर अतिशय अविचारी आहे. रॅझुमोव्स्की कुटुंबाला त्याचे शहराबाहेरील घर आणि शेतवाडी विकत घ्यायची आहे. पण अजून व्यवहार काही ठरत नाही. काउंट रोस्तॉफ भलतेच पैसे मागतो आहे म्हणे.'

तशी कुणीतरी म्हणाले, 'मला वाटतं खरेदीचा व्यवहार थोड्याच दिवसांत होईल. हल्लीच्या काळात मॉस्कोतील कोणतीही गोष्ट खरेदी करणं हा मूर्खपणा आहे खरं तर.'

'का बरं? मॉस्को शहर संकटात आहे अशी तुमची खात्री झाली आहे काय?' जूलीने विचारले.

'मग तुम्ही मॉस्को का बरं सोडत आहात?'

'हा काय प्रश्न झाला? मी जात आहे याचं कारण...याचं कारण इतकंच की प्रत्येकजण जात आहे आणि मी काही आर्कची जोन नव्हे की कुणी लढाऊ स्त्री नव्हे.'

'त्यांनी व्यवहार केला तर ते आपलं कर्ज फेडू शकतील?' स्वयंसेवकाने काउंट रोस्तॉफबद्दल विधान केले.

'तो सरळ मनाचा माणूस आहे. पण अतिशय मूर्ख आहे.'

'पण ती माणसं इतके दिवस इथं का राहिली आहेत? ती शहर सोडून गावी केव्हाच जाणार होती. मला वाटतं नताली आता पूर्ण बरी झाली असेल?' धूर्त स्मित करीत जूलीने पीएरला विचारले.

पीएर म्हणाला, 'ते आपल्या धाकट्या मुलाची वाट पाहात आहेत. तो ऑबोलेन्स्कीच्या घोडदळात गेला. त्याला ब्येली त्सेर्कव्हिला पाठवण्यात आले. तिथे रेजिमेंटची जुळणी होत आहे. पण त्यांनी आता त्याला माझ्या रेजिमेंटमधे पाठवलं आहे. तो आता कोणत्याही दिवशी

येईल. काउंट मॉस्को सोडून केव्हाच जायला पाहात होता. पण मुलगा आल्याशिवाय कोण-त्याही परिस्थितीत मॉस्को सोडून जायला काउंटेस तयार नाही.'

'मी परवाच त्यांना अरारॉव्ह कुटुंबाकडे पाहिलं. नताली आता चांगलीच सुधारली आहे. ती उत्साहात आहे. तिनं एक गाणंही म्हटलं. काही लोक किती सहज सगळ्या गोष्टी विसरून जातात!'

'सगळ्या म्हणजे कोणत्या?' पीएरने रोषाने विचारले. तशी जूली हसली.

'काउंट, तुमच्यासारखे सौजन्यशील शिलेदार केवळ कादंबऱ्यांतच आढळतात.'

'शिलेदार? काय म्हणायचं आहे तुम्हाला?' पीएरने लाजत विचारले.

'जाऊ द्या, काउंट, सगळं मॉस्को शहर त्याबद्दल बोलत आहे. देवाशपथ, तुम्ही तर मला चकितच करता आहात.'

'असं बोलू नका, असं बोलू नका.'

'ठीक आहे. उगाच वैताग नको.'

'सगळं मॉस्को शहर कशाबद्दल बोलतं आहे?' उठता उठता पीएरने रागाने विचारले.

'तुम्हाला माहीत आहे, काउंट. शहरातले लोक काहीतरी मूर्खासारखं बोलत असतात.'

'मला काहीच माहीत नाही,' पीएर म्हणाला.

'तुमची नतालीशी किती दाट मैत्री आहे हे मला ठाऊक आहे. आणि म्हणून...माझी त्याहूनही अधिक दाट मैत्री व्हेराशी आहे.'

त्रस्तपणे पीएर म्हणाला, 'तसं नाही बाईसाहेब. काउंटेस रोस्तॉफच्या शिलेदाराची भूमिका मी कधीही बजावली नाही. खरं तर गेला महिनाभर मी त्यांच्याकडे फिरकलो नाही. मला हा क्रूरपणा कळत नाही...'

'जो सबब सांगतो तो स्वतःलाच दोषी ठरवतो.' हसत आणि विजयाने कपडा हालवीत जूली ओरडली. त्याबद्दल आपला शब्द अखेरचा असावा म्हणून तिने त्वरित विषय बदलला. 'बिचारी मारी बोलकॉन्स्की कालच मॉस्कोमधे आली आहे असं मी ऐकते. तिचे वडील गेल्याचं तुम्ही ऐकलं असेल?'

'काय म्हणता? कुठं आहे ती? मला तिला भेटलं पाहिजे!'

'मी कालची रात्र तिच्या सोबत घालवली. ती आपल्या भाच्याबरोबर उद्या किंवा परवा सकाळी खेड्यातील शेतवाडीवर जाणार आहे.'

'आता कशी आहे ती?' पीएरने विचारले.

'ती आता बरी आहे. पण दुःखी आहे. तिची कोणी सुटका केली तुम्हाला ठाऊक आहे का? मोठी अद्‌भुतरम्य गोष्टच आहे ती. निकोलाय रोस्तॉफ तिच्या मदतीला आला. तिला लोकांनी घेरलं होतं. त्यांनी तिला मारण्याचा आणि तिच्या नोकरांना जखमी करण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यात तो धावून आला आणि त्यानं तिला वाचवलं.'

'ही दुसरी अद्‌भुत गोष्ट आहे. हे युद्ध बहुधा प्रौढ कुमारिकांची लग्नं लावण्यासाठी सुरू

झालं असावं. कॅटिश एक उदाहरण. प्रिन्सेस बोलकॉन्स्की दुसरं उदाहरण आहे.' स्वयंसेवक म्हणाला.

'तुला ठाऊक नसेल. ती थोडीफार त्या तरुण माणसाच्या प्रेमात पडली असणार याची मला खात्री आहे.'

'असं बोलू नका. असं बोलू नका.'

'रशियन भाषेत ते कसं म्हणायचं ते सांगा.'

रास्तोप्चिनची दोन पत्रके नुकतीच आलेली होती. पीएर घरी आला तेव्हा त्याला ती देण्यात आली.

पहिल्या पत्रकाने जाहीर केले होते, 'काउंट रास्तोप्चिनने हुकूम काढून कुणालाही मास्को सोडून जाण्याची बंदी केली आहे अशी अफवा उठलेली असेल तर ती खोटी आहे. उलट स्त्रिया शहर सोडून जात आहेत म्हणून रास्तोप्चिनला आनंद वाटत आहे; शहरातील घबराट कमी होईल, अफवा कमी पसरतील अशी रास्तोप्चिनला आशा वाटत आहे. दुष्ट लोक मॉस्को शहरात घुसू नयेत म्हणून रास्तोप्चिन आपले प्राण पणास लावून सज्ज आहे.'

ह्या शब्दांवरून पीएरची खात्री झाली की फ्रेंच सैनिक निश्चित मॉस्को शहरात शिरकाव करणार आहेत. दुसऱ्या पत्रकात जाहीर केले होते, 'मास्कोतील बऱ्याच लोकांना शस्त्रे बाळगण्याची इच्छा असल्याने त्यांना शस्त्रागारातून शस्त्रे देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यांना कमी किंमतीत तलवारी, पिस्तुले आणि बंदुका मिळू शकतील.' धास्ती निर्माण करणारे वादळी ढग जवळ येऊ लागले आहेत हे पीएरला आता कळून चुकले.

'मी लष्करात दाखल होऊ का? की वाट बघत इथंच राहू?' पीएरने हा प्रश्न हजार वेळा स्वतःला विचारला असेल तोच प्रश्न पुन्हा एकदा स्वतःला केला. पेशन्सचा डाव टाकण्यासाठी त्याने टेबलावर पडलेला पत्त्यांचा जोड उचलला.

तेवढ्यातच त्याला दाराशी थोरल्या प्रिन्सेसचा आवाज ऐकू आला. ती विचारत होती, 'मी आत येऊ का?'

पीएरची ही सर्वांत थोरली चुलतबहीण. तिची कंबर कृश होती आणि मुद्रा निर्विकार होती. तीच फक्त पीएरच्या घरात अद्याप राहात होती. तिच्यापेक्षा लहान असलेल्या दोन्ही बहिणींची लग्नं झाली होती.

'तुझ्याकडे आले म्हणून माफ कर.' तिच्या सुरात थोडी निर्भर्त्सना होता, भावावेग होता. 'काहीतरी निर्णय घेणं भाग आहे हे तुला सांगायला नको. आता काय घडणार आहे नकळे. सर्वांनी मॉस्को सोडलं आहे. लोक उद्दाम होत आहेत. ते लवकरच आम्हाला ठार करायला लागतील. आता रस्त्यावरून जाणंही मुश्कील झालं आहे. सर्वांत वाईट गोष्ट म्हणजे एक दोन

दिवसांत फ्रेंच सैन्य इथं येऊन पोचेल. आम्ही त्यांची वाट कशासाठी पाहात आहोत? माझ्यावर आता एकच कृपा कर. मला पीटर्सबर्गला घेऊन जाण्याचा हुकूम दे. काही झालं तरी मी बोनापार्टच्या अमलाखाली जगणार नाही. मी तुझ्या नेपोलियनला शरण जायची नाही. इतरांनी त्यांना हवं तसं वागावं...जर तू माझ्यावर ही कृपा करणार नसलास तर... '

'मी तुझ्यासाठी आत्ताच तसा हुकूम देतो. मात्र काउंट रास्तोप्चिनच्या मते...' पीएर बोलू लागला.

'तुझ्या काउंटचं सांगू नकोस.' तिच्या शब्दात द्वेष व्यक्त होत होता. 'तो पक्का ढोंगी आहे. त्या दुष्टानंच लोकांना चिथावणी दिली म्हणूनच ते माजले आहेत. त्यानंच नाही का आपल्या त्या अचरट पत्रकात लिहिलं आहे—त्यांनी कोणालाही पकडावं. त्याचे केस धरून फरफटत नेऊन त्याला डांबून ठेवावं म्हणून? (त्याच्यापेक्षा मूर्खपणा तो काय असणार!) तो म्हणतो असं करील तो मनुष्य प्रतिष्ठित, गौरवास पात्र. त्याच्यामुळं ही अशी अवस्था झाली आहे. माझी मैत्रीण सांगत होती—ती फ्रेंच बोलत होती म्हणून लोक तिच्या जिवावर उठले होते.'

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी प्रिन्सेस जायला निघाली. पीएरचा मुख्य व्यवस्थापक आला आणि पीएरला म्हणाला, 'तुमच्या रेजिमेंटच्या साहित्यासाठी तुम्हाला हवा असलेला पैसा उभारणं अशक्य आहे. एखादी शेतवाडी विकली तरच पैसा उभा राहील. रेजिमेंट उभारण्याच्या वेडापायी तुमची खात्रीनं चांगलीच हानी होईल,' त्याचे बोलणे ऐकताना पीएरला हसू आवरले नाही.

'ठीक आहे. तसं असेल तर एक शेतवाडी विकून टाक. काही इलाज नाही. मी काही आता माघार घेऊ शकत नाही.'

भोवतालची परिस्थिती जितकी बिघडत चालली होती, स्वतः पीएरची स्थिती जितकी खालावत होती, तितका पीएर खूष होत होता. आपण अपेक्षित होतो ते संकट आता नजीक ठेपले आहे असे त्याला स्पष्ट दिसू लागले. त्याच्या परिचितांपैकी फारच थोडेजण आता शहरात राहिले होते. जूली गेली होती. प्रिन्सेस मार्या गेली होती. अतिशय निकटवर्तियांपैकी रोस्तॉफकुटुंब काय ते शहरात अजून राहिले होते. पण पीएर त्यांना भेटायला गेला नाही.

विरंगुळा म्हणून पीएरने त्या दिवशी व्होरॉन्त्सॉव्हो खेड्याकडे गाडी वळवली. शत्रूच्या विरुद्ध वापरण्यासाठी एक हवाई बलून लेपिच तयार करीत होता. ते त्याला पाहायचे होते. दुसऱ्याच दिवशी टेस्ट बलून सोडले जाणार होते तेही तो पाहणार होता.

व्होरॉन्त्सॉव्हो येथील आपल्या घराकडून पीएर गाडीतून निघाला होता. बॉलॉट्नी चौकातून त्याची गाडी गेली. लॉब्नॉय प्लेसजवळ गर्दी पाहून पीएरने गाडी थांबवली आणि तो खाली उतरला. एका फ्रेंच स्वैपाक्याला हेर असल्याच्या आरोपावरून बदडण्यात येत होते आणि जमाव ते पाहात होता. फटके मारणे नुकतेच थांबले होते. ज्याने फटके मारले होते तो मनुष्य फटके मारण्यासाठी खांबाला मारून ठेवलेल्या त्या लाल मिशाच्या, दांडग्या शरीराच्या, निळे

मोजे आणि हिरवे जाकिट घातलेल्या, कण्हत असलेल्या माणसाला आता मोकळा करीत होता. दुसरा एक तसाच शिक्षा करण्यासाठी आणलेला कृश, फिकट मनुष्य जवळ उभा होता. त्यांच्या चेहऱ्यांवरून ते दोघे फ्रेंच दिसत होते. त्यांच्याप्रमाणेच पीएरची मुद्रा अतिशय भयभीत झाली. तो गर्दीतून घुसून वाट काढता काढता विचारू लागला, 'काय आहे प्रकार ? कोण आहेत ती माणसं ? कशासाठी ?' लॉब्नॉय प्लेस येथे घडलेल्या प्रकाराने सगळ्या जमावाचे–कारकून, कारागीर, दुकानदार, शेतकरी, जाकिट घातलेल्या स्त्रिया या सर्वांचे–लक्ष इतके वेधून घेतले होते की कोणीही त्याला उत्तर दिलं नाही. तो दांडगा इसम उठला. आठ्या घालीत त्याने आपले खांदे उडवले. आपली सोशिकता दाखवीत भोवताली न पाहता तो आपले जाकिट अंगात घालू लागला. पण एकाएकी त्याचे ओठ रागाने कापू लागले. आशावादी वृत्तीची प्रौढ माणसे रडावी तसा तो संतापाने रडू लागला. जमावातील माणसे मोठ्यामोठ्याने बोलू लागली. तसे करून ती आपल्यातील करुणेची भावना दडपून टाकत आहेत असे पीएरला वाटले

'कोणत्या प्रिन्सचा सेवाकी ?'

'अरे बाबा, फ्रेंचाच्या पोटाला रशियन सॉस थोडा कडकच...दातांना झिणझिण्या येतात.' फ्रेंच इसम ज्या वेळी रडू लागला त्याच वेळी पीएरच्या जवळ असलेल्या आठ्या घातलेल्या कारकुनाने उद्‌गार काढले. मग आपल्या विनोदाचे कुणी कौतुक करील ह्या अपेक्षेने तो भोवती पाहू लागला. कित्येक माणसे हसली, काही माणसे मात्र दुसऱ्या फ्रेंचाचे कपडे उतरून त्याला फटके मारण्याची तयारी करीत असलेल्या माणसाकडे पाहून विषण्ण होत होती.

पीएरला दाटून आले. तो उद्विग्न झाला. आणि तसाच स्वतःशीच काहीतरी पुटपुटत आपल्या गाडीकडे वळला. वाटेत त्याला कितीदातरी रडू आले. आणि तो इतक्या मोठ्यांदा रडला की गाडीवानाने त्याला 'काय हवं ?' असे विचारले.

पीएरने रागाने त्याला विचारले, 'कुठं नेतो आहेस गाडी ?'

'तुम्ही मला गव्हर्नरकडे गाडी न्यायला सांगितलीत.' गाडीवान म्हणाला.

'मूर्ख ! अचरट !' पीएरने गाडीवानाला कधी नव्हे त्या शिव्या दिल्या. 'मी तुला घरी न्यायला सांगितलं होतं. गाढवा, आता वेळ नको लावूस.' पीएर स्वतःशीच म्हणाला, 'आजच मला निघालं पाहिजे.'

छळ झालेले फ्रेंच इसम आणि लॉब्नॉय प्लेस येथे जमलेला जमाव पाहून मॉस्कोमधे आता मुळीच राहायचे नाही, आता तावडतोब सैन्यात दाखल व्हायला निघायचे असा त्याने पक्का निश्चय केला.

पीएरने घरी गेल्यावर आपला प्रमुख गाडीवान येव्स्टाफिच याला बोलावून घेतले. येव्स्टाफिच हा सर्वज्ञ आणि सर्वशक्तिमान गाडीवान होता. सगळे मॉस्को शहर त्याला ओळखायचे. त्याला पीएरने सांगितले, 'मी आज रात्रीच मोझाइस्क येथे लष्करात दाखल व्हायला गाडीनं जाणार आहे. खोगीर असलेले माझे घोडे लागलीच तिथे पाठव.'

दुसऱ्या दिवशी पहाटेच्या सुमारास पीएर मोझाइस्क येथे पोचला. मोझाइस्क येथील घराघरांतून सैनिकांच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली होती. पथिकाश्रमात पीएरला त्याचा गाडीवान आणि त्याच्या गाडीच्या घोड्याचे स्वार भेटले. पथिकाश्रमात जागा नव्हती. ऑफिसरांनी सगळा पथिकाश्रम भरून गेला.

पीएर जास्तीत जास्त वेगाने पुढे घुसत होता. जसजसा तो पुढे जात होता, जसजसा तो सैनिकांच्या महासागरात खोलवर घुसत होता, तसतशी त्याची अस्वस्थता आणि नव्या सुख-संवेदनेची थरारी वाढू लागली होती. झारच्या भेटीच्या वेळी स्लॉबॉड्स्की राजवाड्याशी त्याची चित्तवृत्ती जशी झाली होती, जवळजवळ तशीच त्याची चित्तवृत्ती आता झाली. काहीतरी कार्य करावे, काहीतरी स्वार्थत्याग करावा अशी ऊर्मी त्याच्या मनात उसळली होती.

पंचवीस तारखेस सकाळी पीएरची घोडागाडी मोझाइस्कच्या बाहेर पडली. शहराबाहेरील प्रचंड निमुळत्या टेकडीच्या उताराबरील वळणवळणाच्या रस्त्यावर पीएरने गाडी थांबवली व तो उतरून उजव्या बाजूस असलेल्या चर्चच्या बाजूने चालू लागला. चर्चमधे प्रार्थना सुरू होती. त्याच्यामागून घोडदलातील सैनिकांची रेजिमेंट येत होती. रेजिमेंटचे गायक अग्रभागी होते. खालून कितीतरी गाड्या रांगेने त्यांच्या दिशेने वर येत होत्या. त्यांमध्ये आदल्या दिवशीच्या लढाईत जखमी झालेले सैनिक होते. गाड्या हाकणारे शेतकरी गाड्यांच्या या नाही तर त्या बाजूने धावत होते, ओरडत होते. आणि घोड्यांना चाबकांनी फटकावीत होते. प्रत्येक गाडीत तीनचार सैनिक बसले होते किंवा पहुडले होते. उताराचा तो रस्ता दुरुस्त करण्यासाठी दगड टाकण्यात आले होते. त्यामुळे गाड्यांना हिसके बसत होते. त्यामुळे आत बसलेले फिकट चेहऱ्याचे आणि अंगभर बँडेज असलेले सैनिक ओठ दाबून आणि कपाळाला आठ्या घालून गाड्यांच्या बाजूला धरून राहिले होते. बहुतेक सगळेजण पीएरच्या पांढऱ्या हॅटकडे आणि हिरव्या कोटाकडे बालसुलभ भाबड्या कुतूहलाने पाहात होते.

जखमी लोकांनी भरून गेलेली एक गाडी अगदी पीएर थांबला होता तिथे रस्त्याच्या कडेशी येऊन थांबली. विणलेले जोडे घातलेला गाडीवान धापा टाकत गाडीकडे धावला. गाडीच्या मागच्या टायर नसलेल्या चाकांना अडवण्यासाठी त्याने दगड सारले. आपल्या घोड्याच्या पुठ्ठ्याभोवतीचा पट्टा सरळ केला.

गाडीत दोन जखमी माणसे बसली होती आणि एक जखमी मनुष्य पहुडला होता. बसलेल्यांपैकी एका सैनिकाच्या बहुधा गालाला जखम झाली असावी. त्याच्या सबंध डोक्याला कितीतरी ठिकाणी बँडेज बांधले होते. एक गाल तर सुजून लहान मुलाच्या डोक्याएवढा दिसत होता. त्याचे सबंध तोंड आणि नाक एका बाजूला झाले होते. तो सैनिक चर्चकडे पाहून क्रूसाची खूण जुळवीत होता. दुसरा सैनिक तरुण होता. त्याचे केस भुऱ्या रंगाचे होते. तो

इतका पांढरा फटफटीत होता की त्याचे कृश मुख रक्तहीन वाटत होते. तो गोड स्मित करून पीएरकडे टक लावून पाहत होता. तिसरा सैनिक अशा तऱ्हेने पहुडला होता की त्याचा चेहरा दिसत नव्हता.

गाडीशेजारी उभा असलेला सैनिक विषण्ण स्मित करीत पीएरला उद्देशून म्हणाला, ' आता त्यांना निवड करणं शक्य नाही. त्यांना आता सर्व लोकांना एकत्रित करायचं आहे. आता मॉस्कोशहराच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. आता एकच गोष्ट करण्यासारखी आहे. ' सैनिकाचे बोलणे संदिग्ध होते. तरीपण पीएरला त्याचे म्हणणे कळले आणि त्याने संमती-दाखल मान हालवली.

पुन्हा एकदा रस्ता खुला झाला. पीएर टेकडी उतरून आला आणि त्याची गाडी पुढे जाऊ लागली. गाडी चालली असताना परिचित चेहरे दिसतील या अपेक्षेने पीएर दोन्ही बाजूंना पाहात होता.

तीनएक मैल गाडी गेल्यानंतर त्याला एक परिचित मनुष्य दिसला. त्याने पीएरचे आनंदाने स्वागत केले. हा इसम वैद्यकीय पथकातील एक प्रमुख डॉक्टर होता. पीएरला भेटण्यासाठी त्याने आपली आच्छादन असलेली दोन चाकांची घोडागाडी पुढे घेतली. गाडीत त्याच्या शेजारी एक तरुण डॉक्टर बसला होता.

' काउंट महाशय, तुम्ही इकडे कसे ' डॉक्टरने विचारले.

' मी इकडे पाहणी करण्यासाठी आलो आहे. ' पीएर गाडीतून उतरला आणि डॉक्टरशी बोलण्यासाठी थांबला. लढाईत भाग घेण्याची आपली योजना डॉक्टरला समजावून देऊ लागला.

डॉक्टरने बेझुहॉव्हला सरळ सम्राटांकडे जायला सांगितले.

डॉक्टरने आपल्या गाडीकडे जाता जाता म्हटले, ' मी तुम्हाला मार्ग दाखवला असता. पण तुम्ही पाहताच आहात. मला पथकाच्या कमांडरकडे अगदी लवकर जाऊन पोहोचणं भाग आहे. आम्ही चांगल्याच अडचणीत आहोत...उद्या लढाई होईल याची तुम्हाला कल्पना असेल. आपल्या एक लक्ष सैनिकांतील मला वाटतं कमीत कमी वीस हजार जखमी होतील. हा अंदाज आहे– आमच्याकडे स्ट्रेचर्स नाहीत, खाटा नाहीत, सेवक नाहीत. डॉक्टर नाहीत. सहा हजार सैनिकांना पुरतील एवढेही नाहीत. दहा हजार गाड्या आहेत खऱ्या, पण आम्हाला इतर साहित्य हवं आहे. आता आहे त्यात व्यवस्था केली पाहिजे. '

जिवंत आणि धडधाकट, तरुण व वृद्ध, अशी हजारो माणसे त्याच्या हॅटकडे गमतीने टक लावून पाहात होती. त्यांच्यापैकी वीस हजार निश्चितच जखमी होणार नाहीतर मरणार होती- जी माणसे आपण पाहिली त्या साऱ्यांची अवस्था हीन होणार आहे, ह्या चमत्कारिक कल्पनेने पीएर अतिशय अस्वस्थ झाला. ' कदाचित उद्याच ह्या साऱ्यांचे मरण ओढवेल. '

पीएरने गाडी तशीच गॉर्की शहराच्या दिशेने न्यायला सांगितले. टेकडी चढून एका

खेड्यातील छोट्या रस्त्याला गाडी आली तेव्हा पहिल्यांदाच पीएरने लष्करात दाखल झालेले पांढरे शर्ट घातलेले शेतकरी पाहिले. त्यांच्या टोप्यांवर क्रूस होते. रस्त्याच्या उजव्या बाजूस एक भले मोठे टेकाड होते. त्यावर गवत वाढलेले होते. त्या टेकाडावर ते मोठ्याने बोलत, हसत व उत्साहाने काम करीत होते. त्यांची शरीरे घामाने निथळत होती.

पीएर गाडीतून उतरला. काम करणाऱ्या शेतकऱ्यांजवळून निघून त्या टेकाडावर चढला. ह्याच टेकाडावरून रणांगणावर दृष्टी टाकता येईल असे डॉक्टर म्हणाला होता.

सकाळचे अकरा वाजले होते. सूर्य काहीसा डाव्या बाजूला प्रकाशत होता. स्वच्छ निवळलेल्या हवेमधे पीएरच्या मागे चढत्या मैदानाच्या ॲंफिथिएटरमधे पसरलेली भव्य दृश्यमालिका उजळ सूर्यप्रकाशात न्हाऊन निघाली होती.

ह्या ॲंफिथिएटरमधून स्मॉलेन्स्कीचा राजमार्ग वळण घेत थिएटरच्या डाव्या बाजूस वरच्या भागी छेदून गेला होता. तिथून तो टेकाडापासून पुढे खाली पाचशे पावलांवर शुभ्र चर्च असलेल्या खेड्यातून जात होता. हे खेडे म्हणजे बोरोदिनॉ होय. रस्ता खाली खेड्यातून निघाला होता. एका ठिकाणी पूल होता. वळणे घेत टेकड्यांवरून वर खाली जात चार मैलांवरून दिसणाऱ्या व्हॅल्युएव ह्या छोट्या खेड्याकडे वरवर चढत गेला होता. आता नेपोलियनचा मुक्काम याच खेड्यात होता. वृक्षांच्या राईत तो रस्ता शिरून दिसेनासा झाला होता. ह्याच बर्च आणि पाईन वृक्षांच्या राईत रस्त्याच्या उजव्या बाजूस दूरवर असलेल्या कोलॉट्स्की मठाचा चमकता क्रूस आणि घंटेचा मनोरा दिसत होता. दूरवर पसरलेल्या निळ्या वातावरणात वृक्षांच्या राईच्या आणि रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना धुमसणाऱ्या शेकोट्या आणि आमच्या आणि शत्रूच्या सैनिकांचे घोळके ठिकठिकाणी अस्पष्ट दिसत होते. उजव्या बाजूस दोन नद्यांच्या प्रवाहालगतचा प्रदेश सपाट नव्हता, सगळीकडे टेकड्या पसरल्या होत्या. ह्या टेकड्यांमधून इतर खेडी दिसत होती. डाव्या बाजूकडील जमीन त्या मानाने बरीच सपाट होती. तिकडे धान्याची शेते होती. आग लावण्यात आल्याने बाजूचे एक खेडे धुमसत होते.

' ही सर्व आपलीच माणसं आहेत का ? ' पीएरने जवळच्या अधिकाऱ्याला विचारले.

' होय. ती त्या पलीकडे फ्रेंच माणसं आहेत. ' तो अधिकारी म्हणाला.

' कुठं आहेत ? ' पीएरने विचारले.

' उघड्या डोळ्यांनाही फ्रेंच सैनिक दिसतात पाहा. ' नदीच्या पलीकडे डाव्या बाजूला वर वर जाणाऱ्या धुराकडे बोट करून तो अधिकारी म्हणाला. आजवर भेटलेल्या अधिकाऱ्यांची मुद्रा उग्र व गंभीर होई, तशीच त्याचीही मुद्रा झाल्याचे पीएरला आढळले.

' खरंच की. ते फ्रेंच सैनिक आहेत. आणि त्या तिकडे कोण ? ' पीएरने डावीकडील टेकाडाकडे बोट केले. त्या ठिकाणी सैनिक दिसत होते.

‘ ते आपले सैनिक आहेत. ’

‘ खरंच की आणि त्या बाजूस ? ’ दूरवर असलेल्या एका टेकाडाकडे बोट दाखवीत पीएरने विचारले. त्यावर एक मोठे झाड होते. टेकड्यांमधून दिसणाऱ्या खेड्याजवळ ते टेकाड होते. त्यावर एक काळा पट्टा आणि शेकोटीचा धूर दिसत होता.

‘ काल तो कोट आमचा होता, पण आता तो त्यांचा झाला आहे. ’ अधिकारी म्हणाला.

थोडा वेळ कोणी बोलले नाही. मग त्या अधिकाऱ्याने विचारले, ‘ तुम्ही कोण ? डॉक्टर आहात काय ? ’

तसे पीएरने उत्तर दिले, ‘ खरं म्हणजे तसा मी कोणीच नाही. ’ मग तो सैनिक झालेल्या शेतकऱ्यांमधून पुन्हा टेकडी उतरू लागला.

पीएर बरोबर त्या शेतकरी सैनिकांमधून जाताना आपल्या नाकाला चिमटा घेत त्याने त्यांना एक शिवी हासडली.

“ ते आलेच !...ते तिला घेऊन येताहेत...आलेच इकडे...ती दिसली का ?...एका मिनिटात इकडे येतील ” कोणीना कोणी बोलत होते. अधिकारी, सैनिक आणि शेतकरी रस्त्यावरून पुढेपुढे धाव घेऊ लागले.

बोरोदिनाकडून चर्चमधून निघालेली मिरवणूक टेकडी चढत होती. मिरवणुकीच्या अग्रभागी पायदळाची रेजिमेंट धुळीने भरलेल्या रस्त्यावरून चालली होती. सगळ्या सैनिकांनी आपल्या टोप्या काढून घेतल्या होत्या. आपल्या बंदुका खाली धरल्या होत्या. पायदळाच्या मागून चर्चचा वृंद गात येत होता.

अनवाणी सैनिक आणि शेतकरी मिरवणुकीच्या दर्शनासाठी खाली धाव घेऊ लागले. त्यांनी पीएरला केव्हाच मागे टाकले.

‘ ते पवित्र मातेला आणताहेत...इव्हरकींची पवित्र माता...आमची संरक्षक देवता... ’

‘ स्मॉलेन्स्कची पवित्र माता म्हण. ’ दुसऱ्याने चूक दुरुस्त केली. तोफखान्यावर काम करीत असलेल्या सर्व माणसांनी फावडी टाकून मिरवणुकीकडे धाव घेतली. धुळीने भरलेल्या रस्त्यावरून सैनिकांची तुकडी कूच करीत येत होती. तिच्यामागून झगे घातलेले चर्चचे प्रीस्ट येत होते. त्यात फणाकृती शिरोवेष्टन घातलेला एक वृद्ध मनुष्य होता. आणि त्याच्याबरोबर काही डीकन व चर्चचे गायक होते. त्यांच्या मागून सैनिक आणि अधिकारी चालत होते. ते एक भली मोठी प्रतिमा वाहून आणीत होते. या प्रतिमेची चांदीत कोरलेली मुद्रा मळकट झाली होती. ही पवित्र प्रतिमा स्मॉलेन्स्कहून आणलेली होती. तेव्हापासून ती सैन्याने बरोबर बाळगली होती. त्या प्रतिमेच्या पुढे, मागून, बाजूने टोप्या काढलेले कितीतरी सैनिक चालत होते, नाहीतर धावत होते आणि सगळे झुकून प्रणाम करीत होते.

टेकडीच्या माथ्यावर आल्यावर मिरवणूक थांबली. कापडावरील ती पवित्र प्रतिमा आता दुसऱ्या लोकांनी घेऊन आधीच्या लोकांना विश्रांती दिली. डीकनांनी पुन्हा धूपदाण्या

पेटवल्या आणि धार्मिक विधी सुरू झाले. सूर्य माथ्यावर आला होता. लोक कडक उन्हात उभे होते. मंद, ताजी झुळूक सैनिकांच्या उघड्या डोळ्यांच्या केसांना स्पर्शून जात होती. आणि पवित्र प्रतिमेला सजवणाऱ्या फिती फडफडत होत्या. उघड्या आकाशाखाली गायनाचे सूर मंद झाले होते. ऑफिसर, सैनिक आणि शेतकरी सैनिक सगळे टोप्या काढून वर्तुळाकार उभे राहिले.

आतापर्यंत वीस वेळा प्रार्थना गाऊन झाली होती. त्यामुळे गायक थकले होते. थकलेल्या आवाजात सवयीनुसार ते प्रार्थना म्हणू लागले. 'हे ईश्वराच्या माते, तुझ्या दासांचे आपत्तीपासून रक्षण कर.' प्रीस्ट आणि डीकन प्रार्थना म्हणू लागले. तू आमचे 'अजिंक्य असे आश्रयस्थान आहेस. तू आमची रक्षणकर्त्री आहेस. आम्ही तुझ्याकडेच धाव घेत आहोत.' भावी क्षणाच्या गंभीर जाणिवेने सर्वांचे चेहरे उजळून गेले. पीएरने मोझाइस्क टेकडीवर असेच उजळते चेहरे पाहिले होते. त्या सकाळी त्याला भेटलेल्या असंख्य लोकांच्या मुद्रा अशाच उजळलेल्या दिसल्या होत्या. आता सर्वांनी जास्तीत जास्त झुकून प्रणाम केला. झुळूक आली आणि त्यांचे केस उडू लागले. ते सैनिक क्रूसाची खूण जुळवू लागले. तेव्हा उसासे ऐकू येऊ लागले. छातीवर पडणाऱ्या हातांचा आवाज ऐकू येऊ लागला.

एकाएकी गर्दी पांगू लागली. आणि पीएर रेटला जाऊ लागला. कोणीतरी व्यक्ती पवित्र प्रतिमेकडे जाऊ लागली. लोकांनी तिला मोठ्या त्वरेने वाट करून दिली. ती व्यक्ती कुटूझॉफ होती. सैन्यरचनेची तो पाहणी करीत होता. तारीनॉव्होला परत जाताना तो प्रार्थनेसाठी आला होता. सर्वांत उठून दिसणाऱ्या त्याच्या आकृतीमुळे पीएरने त्याला लगेच ओळखले.

कुटूझॉफने लांब लष्करी कोट घातला होता. त्याचा देह स्थूल आणि धिप्पाड होता. त्याच्या पाठीला पोक आले होते. शुभ्र केस असलेले डोके उघडेच होते. गुबगुबीत चेहऱ्यात दृष्टिहीन पांढरा डोळा उठून दिसत होता. डुलतडुलत तो संथ गतीने आतील दालनात आला आणि प्रीस्टच्या मागे उभा राहिला. सवयीनुसार त्याने क्रूसाची खूण जुळवली. खाली झुकून जमिनीला हातांनी स्पर्श केला. दीर्घ उसासा टाकून आपले शुभ्र मस्तक झुकवून तो उभा राहिला. कुटूझॉफच्या मागून बेनिंग्झन आणि त्याचा परिवार आला. कमांडर-इन्-चीफ् आल्यावर वरच्या हुद्द्यांवरील सर्वांचे लक्ष त्याच्याकडेच गेले. मात्र सैनिक आणि शेतकरी यांनी त्याच्याकडे न पाहता प्रार्थना सुरूच ठेवली.

प्रार्थना संपल्यावर कुटूझॉफ पवित्र प्रतिमेकडे गेला आणि मोठ्या प्रयासाने त्याने गुडघे टेकले. जमिनीजवळ डोके झुकवले. कितीतरी वेळ तो वर उठण्याचा प्रयत्न करू लागला परंतु अशक्तपणा आणि स्थूल शरीर यांमुळे त्याला उठता येईना. शुभ्र केस असलेली कुटूझॉफची मुद्रा वेडीवाकडी झाली. शेवटी तो एकदाचा उठला. बालसुलभ भावडेपणाने ओठ पुढे करून त्याने त्या पवित्र प्रतिमेचे चुंबन घेतले. पुन्हा तो झुकला. या वेळी त्याने एक हात जमिनीवर ठेवला होता. इतर जनरलांनी त्याचे अनुकरण केले. त्याच्या मागून अधिकारी, त्यानंतर सैनिक आणि शेतकरी पुढे धावले. सर्वांच्या मुद्रा उजळल्या होत्या. एकमेकांना

लोटीत श्वास न घेता ते पुढे घुसू लागले.

गर्दीमुळे पीएर चेंगरला जात होता. लोटला जात होता. पीएर कसाबसा धडपडत चालत होता आणि भोवताली दृष्टी टाकत होता.

' काउंट ! प्योत्र किरिलीच ! इथं कसे तुम्ही ? ' कोणीतरी बोलल्याचे ऐकू येताच पीएरने वळून पाहिले.

तो बोरिस द्रबेत्स्कॉय होता. पवित्र प्रतिमेपुढे भक्तिभावाने गुडघे टेकल्याने बहुधा धुळीने माखलेले गुडघे हाताने झटकीत स्मित करीत तो पीएरकडे आला. युद्धात असलेल्या सैनिकासारखा त्याचा पोषाख असला तरी तो त्याला शोभत होता. त्याने लांब लष्करी कोट घातला होता. कुटूझॉफप्रमाणे त्याने खांद्याला चाबूक लटकावला होता.

ह्या वेळात कुटूझॉफ गावात पोचला होता. एका कोसॅकने धावत जाऊन बाक आणला आणि दुसऱ्याने घाईघाईने त्यावर रग पसरला. एका घराच्या सावलीत ठेवलेल्या त्या बाकावर कुटूझॉफ बसला. अनेक बड्याबड्या अधिकाऱ्यांनी त्याच्याभोवती कोंडाळे केले.

मिरवणूक पुढे पुढे चालली होती. गर्दी कमी होत नव्हती. कुटूझॉफपासून तीसएक पावलांवर पीएर बोरिसशी बोलत उभा होता.

पीएरने लढाईत भाग घेण्याची आणि सैन्याची रचना पाहण्याची इच्छा बोरिसकडे व्यक्त केली.

तसा बोरिस म्हणाला, ' त्यापेक्षा तू असं करीनास ? तू माझाच पाहुणा म्हणून राहा. काउंट बेनिंग्झन असेल तिथून तुला सर्व काही दिसू शकेल. मी त्याच्या हाताखालीच आहे. मी तुझ्याबद्दल त्याच्याकडे बोलतो. तुला सैन्याच्या हालचालींचं निरीक्षण करायचं असेल तर आमच्या बरोबर ये. आम्ही आत्ताच डाव्या फळीकडे निघालो आहोत. तिथून परत आलो की कृपा करून तू माझ्याबरोबर रात्र घालव. आपण पत्ते खेळू. तू डिमित्री सर्जेचला ओळखतोस ना ? ते त्याचं निवासस्थान. ' त्याने गॉर्की गावातील तिसऱ्या घराकडे बोट दाखवले.

' सर्व सैन्याची रचना पाहता आली असती तर बरं झालं असतं, ' पीएर म्हणाला.

' तू नंतर पाहू शकशील. डावी फळीच महत्त्वाची आहे. ' बोरिस हळू आवाजात अगदी खाजगी सुरात म्हणाला. ' कोणाला सांगू नको. तुला म्हणून खरं ते सांगतो. डाव्या फळीची निश्चित अवस्था काय आहे ते सांगता येत नाही. काउंट बेनिंग्झननं अगदी वेगळीच सूचना केली आहे. ते तिथं टेकाड दिसतं आहे ना ? त्यावर तटबंदी उभारावी असं त्याचं म्हणणं...' बोरिसने खांदे उडवीत म्हटले. ' हिज हायनेसनी त्याचं काही ऐकलं नाही. त्याला मत बदलावं लागलं. '

कुटूझॉफने स्टाफवरील अनावश्यक माणसे काढून टाकली होती. तरीही बोरिसची हेड-

कार्टसंमधील जागा कायम राहिली होती. बोरिस काउंट बेनिंग्झनच्या हाताखाली काम करीत होता. बोरिसने ज्यांच्या ज्यांच्या हाताखाली काम केले होते त्या सर्वांप्रमाणे काउंट बेनिंग्झनला प्रिन्स द्रबेत्स्कॉय ही व्यक्ती महत्त्वाची वाटत होती. सैन्याच्या प्रमुख अधिकाऱ्यांत सरळसरळ दोन तट पडले होते. एक कुटूझॉफचा आणि दुसरा स्टाफचा प्रमुख असलेल्या बेनिंग्झनचा तट. बोरिस दुसऱ्या पक्षात होता. कुटूझॉफचे लांगूलचालन करण्यात, खुशामत करण्यात आणि त्याच वेळी 'म्हातारडा कशासाठीही योग्य नाही, उलट बेनिंग्झन पुढाकार घेत असल्याने सर्व गोष्टी होत असतात' असे धूर्तपणे सुचवण्यात तोच एक यशस्वी होत होता. आता लढाईचा निर्णायक क्षण आला होता म्हणजेच कुटूझॉफचा विनाश आणि बेनिंग्झनची कमांडर-इन्-चीफ म्हणून नियुक्ती या गोष्टी लवकरच होणार होत्या. कुटूझॉफला विजय मिळाला तर त्याचे श्रेय मोठ्या धूर्तपणे बेनिंग्झनच्या पदरात घातले जाणार होते. कोणत्याही स्थितीत बऱ्याच बढत्या खात्रीने होणार होत्या. एकदोन दिवसांत बऱ्याच नवीन माणसांना आघाडीवर नेले जाणार होते. म्हणूनच सबंध दिवस बोरिस अत्यंत उत्साहात वावरत होता.

पीएरच्या ओळखीचे इतर अनेक त्याच्याभोवती गोळा झाले. मॉस्कोबाबत त्यांनी त्याला नाना प्रश्न विचारले. पण सर्वांची उत्तरे द्यायला आणि त्यांचे बोलणे ऐकायलाही त्याला सवड नव्हती.

कुटूझॉफने पीएरला पाहिले. त्याच्याभोवती जमा झालेला घोळकाही पाहिला.

'त्याला मी बोलावतो म्हणून सांग' कुटूझॉफने सांगितले. ॲडज्युटंटने त्याची इच्छा पीएरच्या कानांवर घातली. तशी पीएर बाकावर बसलेल्या कुटूझॉफकडे जायला निघाला. त्यापूर्वीच एक शेतकरी सैनिक कुटूझॉफकडे येऊन पोचला होता. तो होता डोलोहॉव्ह.

'डोलोहॉव्ह हा माणूस इथं कसा काय आला?' पीएरने विचारले.

'तो धूर्त कोल्हा-कुठंही नाक खुपशीत असतो. तुम्हाला ठाऊक असेल. त्याला खालच्या हुद्द्यावर टाकण्यात आलं आहे. त्याला पुन्हा वर यायचं आहे ना? त्यानं कसली तरी योजना तयार केली आहे. रात्रीच्या वेळी तो शत्रूच्या सैन्यात हेरगिरी करतो...गडी तसा शूर आहे' कुणीतरी बोलला.

पीएरने हॅट काढून कुटूझॉफला नम्रतापूर्वक झुकून अभिवादन केले.

'मी आपल्यापुढं वस्तुस्थिती मांडावी असं ठरवलं होतं. कदाचित आपण मला न ऐकता घालवून द्याल अगर आपल्याला याची कल्पना होती असं म्हणाल असं मला वाटलं होतं. मग मी काही गमावणार नव्हतो.' डोलोहॉव्ह म्हणाला.

'अगदी खरं.'

'मला वाटतं मी माझ्या पितृभूमीची सेवा करीन. तिच्यासाठी मी मरण पत्करायला तयार आहे.'

'निःसंशय...त्यात वादच नाही.'

'आपला प्राण द्यायला तयार असणाऱ्या माणसाची गरज पडली तर माझी महाराजांनी

आठवण ठेवावी...कदाचित मी आपल्या उपयोगी पडू शकेन...'

' निःसंशय...निःसंशय...' किलकिल्या डोळ्यांनी पीएरकडे पाहात हसत कुटूझॉफ म्हणाला.

एवढ्या वेळात दरबारी व्यक्तीच्या चातुर्याने बोरिस पीएरबरोबर कमांडर-इन्-चीफच्या जवळ येऊन पोचला आणि तो अतिशय सहजपणे शांत आवाजात आधीचे संभाषण चालू ठेवल्यागत पीएरला म्हणाला, ' शेतकरी सैनिक स्वच्छ पांढरे शर्ट घालून मरायला तयार झाले आहेत. काउंट, केवढी ही वीरश्री ! '

आपले बोलणे कमांडर-इन्-चीफच्या कानावर पडावे या उद्देशाने बोरिस पीएरला बोलला होता. ह्या शब्दांमुळे कुटूझॉफचे लक्ष आपल्याकडे जाईल असे त्याला वाटत होते. आणि खरेच कुटूझॉफ बोरिसशी बोललाही, ' तुम्ही निमलष्करी सैनिकांबद्दल काही म्हणालात का ? '

' महाराज, त्यांनी पांढरे शर्ट चढवले आहेत. उद्याच्या तयारीसाठी, मरायला तयार होण्यासाठी. '

' ती विलक्षण माणसं आहेत ' कुटूझॉफने डोळे मिटून घेत मान हालवली. उसासा टाकून पुन्हा म्हटले. ' विलक्षण माणसे आहेत ती '. मग त्याने पीएरला विचारले, ' तुला तपकीर हवी का ? छान वास आहे. मी तुझ्या पत्नीच्या अनेक चाहत्यांपैकी एक आहे. मला त्यात गौरव वाटतो. तिची प्रकृती ठीक आहे ना ? इथं काय हवं नको ते मागून घे. तुझ्या सेवेस माझी माणसं सज्ज आहेत. ' मग वृद्ध माणसे बघतात त्याप्रमाणे कुटूझॉफ त्याच्याकडे शून्य दृष्टीने पाहू लागला. जणू काय सांगायचे होते ते तो विसरून गेला होता.

पीएर कुटूझॉफचा निरोप घेऊन बाहेर पडला तशी डोलोहॉव्हने पुढे सरून त्याचा हात आपल्या हातात घेऊन म्हटले, ' काउंट, तुमची इथं भेट झाली म्हणून मला आनंद होत आहे. ' इतरांची दखल न घेता तो मोठ्या आवाजात बोलत होता. ' आज संध्याकाळी आमच्यापैकी किती जणांच्या नशिबात मरण आहे देव जाणे. गतकाळात तुझ्यामाझ्यात गैर-समज निर्माण झाले होते त्याबद्दल मला अतिशय खंत वाटते. हे सांगण्याची संधी मला मिळाली म्हणून आनंद वाटतो आहे. तुझ्या मनात माझ्याविषयी काही किल्मिष नाही असं मला कळलं तर मला समाधान वाटेल. तू कृपा करून मला क्षमा कर.

पीएरला काय उत्तर द्यावे कळेना. तो डोलोहॉव्हकडे स्मित करीत पाहात राहिला. डोलो-हॉव्हने पीएरला मिठी मारली आणि त्याचे चुंबन घेतले. त्या वेळी त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहत होते.

बोरिसने आपल्या जनरलला थोडक्यात पीएरबद्दल सांगितले तेव्हा बेनिग्झनने पीएरला बोलावून सांगितले, ' तुम्ही आमच्या सैन्याबरोबर या, तुमचा वेळ चांगला जाईल. '

अर्ध्या तासानंतर कुटूझॉफ तातारिनोव्होला जायला निघाला होता. त्याच वेळी बेनिंग्झन, त्याचा परिवार आणि पीएर सैन्याच्या रचनेची पाहणी करीत होते.

गॉर्कींहून बेनिंग्झन मुख्य रस्त्याने पुलाकडे गेला. टेकाडावरील अधिकाऱ्याने पीएरला हेच हालचालीचे केंद्र असल्याचे सांगितले होते. याच ठिकाणी नदीच्या तीरावर नुकत्याच कापलेल्या, गोड वास येणाऱ्या गवताच्या पेंढ्या हारीने पडल्या होत्या. सैन्याने पूल ओलांडून बोरोदीनों गावात प्रवेश केला. नंतर ते डावीकडे वळले. वाटेत त्यांना कितीतरी सैनिक दिसले, तोफा दिसल्या. ते जेव्हा टेकाडाच्या माथ्यावर आले, तेव्हा त्यांना शेतकरी-सैनिक खणत असलेले आढळले. या ठिकाणी संरक्षक तटबंदी उभारली जात होती. तिला त्या वेळी नाव नव्हते. पण नंतर रॅव्स्की तटबंदी किंवा टेकाडावरील तटबंदी असे म्हटले जाऊ लागले.

पीएरने खास असे लक्ष या तटबंदीकडे दिले नाही. बोरोदीनॉच्या मैदानावरील इतर कोणत्याही ठिकाणापेक्षा हे ठिकाण अधिक संस्मरणीय ठरणार याची त्याला त्या वेळी कोठून कल्पना असणार ? मग बेनिंग्झनचे सैन्य दरी ओलांडून सेम्यनॉव्स्कॉयला गेले. त्या ठिकाणी सैनिक झोपड्यांची आणि कोठारांची शेवटची लाकडे ओढून नेत होते. तेथून पुढे सैन्य टेकडी उतरून पुन्हा दुसरी टेकडी चढून हिमवादळाप्रमाणे रायच्या शेताची नासाडी करीत तोफखान्याने नुकत्याच तयार केलेल्या रस्त्यावरून, नांगरलेल्या जमिनीतून संरक्षक बंधाऱ्याकडे गेले. त्या ठिकाणी माणसे अजूनही काम करीत होती.

बेनिंग्झन संरक्षक बंधाऱ्याकडे थांबला. समोरील शेवर्डिनॉच्या तटबंदीकडे त्याने पाहिले. कालपर्यंत ती तटबंदी आमच्या ताब्यात होती. त्यावर कित्येक घोडेस्वार असल्याचे अंधुक दिसत होते. नेपोलिअन आणि म्युरा त्यात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्या घोडेस्वारांच्या लहान घोळक्याकडे सगळेजण उत्कंठेने पाहू लागले. पीएर देखील तिकडे रोखून पाहू लागला. अंधुक दिसणाऱ्या घोडेस्वारांत नेपोलिअन कोणता असावा याचा तो तर्क करू लागला. ते घोडेस्वार शेवटी टेकडी उतरून दिसेनासे झाले.

घोड्यावरून आलेल्या जनरलला बेनिंग्झन सैन्याची रचना कशी आहे ते सांगू लागला. पीएर ध्यान देऊन ऐकू लागला. होऊ घातलेल्या लढाईतील महत्त्वाच्या गोष्टी तो मन एकाग्र करून समजावून घेऊ लागला. पण आपणाला त्या गोष्टी पुरेशा कळत नाहीत ही जाणीव झाल्याने त्याला अतिशय वाईट वाटले. त्याला त्या गोष्टी काही समजल्या नाहीत. बेनिंग्झनने बोलणे संपल्यावर ध्यान देऊन ऐकणाऱ्या पीएरला पाहून एकदम म्हटले, 'मला वाटतं यात तुम्हाला फार रस नसेल ?'

'छे छे ! उलट मला आवडण्यासारख्याच गोष्टी आहेत ह्या,' पीएरने म्हटले, पण त्यात फार थोडे सत्य होते.

संरक्षक बंधाऱ्याकडून ते रस्त्यावरून आणखी डाव्या बाजूला निघाले. फारशी वाढ न झालेल्या बर्चवृक्षांच्या दाट जंगलातून तो रस्ता वेडीवाकडी वळणे घेत गेला होता. ते

जंगलाच्या मध्यभागी आल्यावर एक पांढऱ्या पायाचा तपकिरी रंगाचा ससा त्यांच्या समोर रस्त्यावर येऊन उभा राहिला. पण तो कित्येक घोड्यांच्या टापांमुळे इतका भेदरला की त्यांच्या-समोर कितीतरी वेळ रस्त्यावरून उड्या मारीत पळू लागला. तशी सगळेजण हसू लागले. कित्येकजण मोठमोठ्याने ओरडले तेव्हा कुठे तो बाजूला झाडीत घुसून नाहीसा झाला. एक दीड मैलानंतर ते जंगलाच्या बाहेर पडून मोकळ्या जागी आले. त्या ठिकाणी तुचकॉव्हचे सैन्य होते. ते डाव्या फळीचे रक्षण करणार होते.

याच ठिकाणी अगदी डाव्या बाजूला बेनिंग्झन तावातावाने खूप काही बोलत होता. त्याने दिलेल्या सूचना लष्करी दृष्टिकोणातून फार महत्त्वाच्या आहेत असे पीएरला वाटले. तुच-कॉव्हचे सैन्य होते त्या जागेसमोरच एक टेकाड होते. पण ते सैन्याने व्यापले नव्हते. ह्या दुर्लक्षाबद्दल बेनिंग्झनने ओरडून टीका केली. 'ह्या टेकाडावरून भोवतालच्या प्रदेशाची पाहणी करता येईल. तेथून प्रदेशावर ताबा ठेवता येईल. पण तुम्ही तिथे सैनिकच ठेवलेले नाहीत. त्या टेकाडाच्या अगदी खाली, पायथ्याशी मात्र सैनिक ठेवले आहेत हा अगदी शुद्ध वेडेपणा आहे ! कित्येक जनरलांनी तेच मत व्यक्त केले. एकाने तर लढाऊ वृत्ती प्रकट करीत म्हटले, ' इथे आपला विनाश निश्चितच ठरलेला आहे. ' बेनिंग्झनने स्वतःच्या जबाब-दारीवर सैन्याला मुख्य रस्त्यावर हालवण्याचा हुकूम दिला.

डाव्या बाजूला सैन्य हालवले गेले. तशी आपल्यामधे लष्करी बाबी कळण्याची कुवत आहे का याबद्दल पीएरला अधिकच संशय वाटू लागला. टेकडीच्या पायथ्याशी ठेवलेल्या सैन्याच्या रचनेबद्दल बेनिंग्झन आणि जनरल यांनी केलेली टीका पीएरने ऐकली तेव्हा त्यांची मते त्याला चांगली कळली, आणि पटली. सैन्य त्या ठिकाणी ज्याने हलवले होते त्या माणसाने इतकी मोठी घोडचूक कशी केली हे त्याला कळेना.

खरे तर आपल्या सैन्याच्या बचावासाठी काही ते सैन्य तिथे ठेवण्यात आले नव्हते. बेनिं-ग्झनची तशी समजूत झाली होती एवढेच. शत्रूवर त्याच्या ध्यानीमनी नसताना एकाएकी हल्ला चढवावा यासाठी ते राखीव सैन्य तिथे दडवून ठेवले होते. बेनिंग्झनला ह्या योजनेची कल्पना नव्हती, त्यामुळे त्याने सैन्य लक्षात येणाऱ्या ठिकाणी हलवले. या बदलाबद्दल त्याने कमांडर-इन्-चीफला काहीही सांगितले नाही.

रेजिमेंटच्या एका टोकाला दूरवर एक पडके धान्य-कोठार होते. त्यामधे ऑगस्टच्या एका निरभ्र रात्री प्रिन्स आन्द्रे कोपऱ्यावर पहुडला होता. पडक्या भिंतीच्या भगदाडातून तो पाहात होता. समोर कुंपणामधे तीस एक वर्षांच्या, वरचा भाग छाटलेल्या बर्चवृक्षांची रांगच्या रांग होती. समोरच्या शेतात ओट धान्याच्या लोंब्या पडलेल्या होत्या. झुडपाझुडपाजवळून शेको-टीचा धूर निघत होता. त्या ठिकाणी सैनिक स्वैपाक करीत होते.

आता प्रिन्स आन्द्रेला आपले जीवन दुःखित, अर्थशून्य आणि दुस्तर वाटू लागले. लढाईच्या प्रारंभीच त्याच्या मनात खळबळ माजली होती. आणि तो संत्रस्त झाला. ऑस्टरलिट्स जवळ असताना सात वर्षांपूर्वी त्याच्या मनाची अवस्था अशीच झाली होती.

दुसऱ्या दिवशी होणाऱ्या लढाईसंबंधीचे हुकूम त्याला मिळाले आणि त्याने इतरांना हुकूम दिले. आणखी काही काम उरले नव्हते. पण साध्या, सरळ म्हणूनच अतिशय भयंकर अशा विचारांमुळे त्याचे मन थाऱ्यावर नव्हते. आजपर्यंत आपण भाग घेतलेल्या लढायांपेक्षा उद्याची लढाई खूप भयंकर ठरणार हे तो जाणून होता. पहिल्यांदाच त्याला मृत्यूची जाणीव झाली. ती स्वतःच्या जीवनाच्या संदर्भात झाली नाही. दुसऱ्यावर मृत्यूचा काय परिणाम होईल याचाही विचार मनात आला नाही. स्वतःच्या आत्म्याच्या संदर्भात त्याला मृत्यू जाणवला: इतक्या साध्या, भयानक स्वरूपात इतक्या स्पष्टपणे तो उभा राहिला की त्याला तो प्रत्यक्ष साकार झाला आहे असे वाटू लागले.

हा साक्षात्कार घडताच त्याला पूर्वी कार्यमग्न, विचारमग्न करणाऱ्या सर्व गोष्टी थंड, शुभ्र प्रकाशाने उजळलेल्या छायारहित बाह्यांगहीन आणि अस्तित्वशून्य वाटू लागल्या. त्याला आपले अवघे आयुष्य जादूच्या कंदिलाप्रमाणे वाटू लागले. त्याकडे तो काचेतून कृत्रिम प्रकाशात पाहात होता. आता तो एकाएकी काचेशिवाय स्वच्छ सूर्यप्रकाशात ती कशीतरी रंगवलेली चित्रे पाहू लागला.

त्याच्या जीवनातील तीन प्रमुख शोककारक घटनांनी त्याचे चित्त आता वेधून घेतले. त्याची नताशावरील प्रीती, त्याच्या वडिलांचा मृत्यू आणि अर्धा रशियादेश काबीज करणाऱ्या फ्रेंचांचे आक्रमण.

'माझ्या वडिलांनी ब्लीक हिल्सच्या घराची आखणी केली होती. ते घर, ती जागा, तेथील हवा आणि तेथील शेतकरी यांवर आपलं स्वामित्व आहे असं त्यांना वाटायचं. पण नेपोलिअन आला, त्यानं त्यांची मुळीच दखल घेतली नाही, वाटेवरून लाकडाची ढलपी उडवावी तसे त्यानं त्यांना भिरकावून दिलं. त्यांचं ब्लीक हिल्समधील घर उद्ध्वस्त झालं, त्याचबरोबर त्यांचं जीवनही संपुष्टात आलं.'

त्याने डोळे मिटले. एकापाठोपाठ एक दृश्यमालिका त्याच्या डोळ्यांसमोरून सरकू लागल्या. मनासमोर एक दृश्य बराच काळ तरळले आणि तो आनंदात पोहू लागला. पीटर्सबर्गमधील एक संध्याकाळ त्याला जशीच्या तशी आठवली. नताशा त्याला गेल्या उन्हाळ्यात जंगलात अळंबी शोधत असताना आपण वाट कशी चुकलो ते उत्कट उत्कंठित मुद्रेने सांगत होती.

जंगलातील काळोखा अंतर्भाग, त्या वेळची आपली मनःस्थिती, त्या वेळी भेटलेल्या मधमाश्या

पाळणाऱ्या इसमाशी झालेले भाषण यासंबंधी ती जे बोलली होती, त्यात सुसूत्रता नव्हती. सांगता सांगता दर मिनिटाला ती थांबून म्हणत होती, 'छे, असं नव्हे. मला ते नीट सांगता येत नाही. मी काय सांगते हे तुला कळणार नाही.' प्रिन्स आन्द्रे मात्र तिला सारखे आश्वासन देत होता, 'मला कळतं आहे. तुला जे सांगायचं आहे ते चांगलं कळतं आहे.' नताशा आपल्या शब्दांवर समाधानी नव्हती. त्या दिवशी अंतःकरणात असलेली उत्कट काव्यमय भावना आपल्या शब्दांतून व्यक्त होत नाही असे तिला वाटत होते तरी ती व्यक्त करण्याचा ती प्रयत्न करीत होती. संकोचून आणि हेलावून ती बोलत होती. 'सगळा अनुभव इतका अप्रतिम होता, तो वृद्ध मनुष्य...जंगलात इतका गुडुप काळोख...त्याच्या डोळ्यात इतका प्रेमळपणा...छे. छे! मला सांगता येणार नाही.'

प्रिन्स आन्द्रेने तिच्या डोळयांत पाहात पूर्वीसारखे मधुर स्मित केले. प्रिन्स आन्द्रेच्या मनात आले, 'मला ती आता कळते आहे. नव्हे त्याहूनही अधिक काही कळते आहे. तिची आत्मिक शक्ती, तिचा प्रामाणिकपणा, तिच्या आत्म्याचा प्रांजळपणा, तिच्या शरीराशी संबद्ध असलेला आणि ज्याच्यावर मी उत्कट प्रेम केलं तो तिचा प्रत्यक्ष आत्मा...आपल्या प्रेमाचा शेवट कसा झाला ते एकाएकी त्याला आठवलं. 'त्याने त्या साऱ्यांची पर्वा केली नाही. त्याने ह्यातले काही पाहिले नाही, त्याला काही कल्पनाच नव्हती. त्याला तिच्यामधे एक सुंदर अनाघ्रात कोवळी मुलगी तेवढी आढळली. त्याला तिच्याशी कायमचे नाते जोडायचे नव्हते. आणि मला...तो अजून जिवंत आहे, सुखात आहे.' एकाएकी चटका बसल्यागत प्रिन्स आन्द्रे ताडकन् उठला आणि त्या कोठारासमोर येरझारा घालू लागला.

तो पिवळ्या, हिरव्या, निःस्तब्ध बर्चवृक्षांच्या रांगांकडे आणि त्याच्या उन्हात चमकणाऱ्या सालीकडे टक लावून पाहू लागला.' आता मरण अटळ आहे. उद्या त्यांनी मला ठार करू दे... उद्या मी जिवंत असणार नाही...साऱ्या गोष्टी चालल्या आहेत तशा चालू देत. माझा मात्र अंत होऊ दे.' आपण भोवतालच्या जीवनातून कायमचे दूर होत आहोत याचे चित्र तो अतिशय ठळकपणे मनासमोर रंगवू लागला. ते छायाप्रकाशयुक्त बर्चवृक्ष, फिरणारे ढग, धुराचे लोट,... भोवतालची प्रत्येक गोष्ट त्याला एकाएकी विचित्र, भीतिदायक वाटू लागली.

पंचवीस ऑगस्ट रोजी बोरोदीनोची लढाई सुरू होण्याआधी थोडा वेळ फ्रेंच सम्राटाच्या राजवाड्याचा व्यवस्थापक बोसे आणि कर्नल फॅब्हीए हे व्हॅल्युएव्ह येथील नेपोलिअनच्या छावणीकडे पोचले.

बोसेने दरबारी गणवेष चढवला. सम्राटांना भेट देण्यासाठी आणलेला पेटारा त्याने आपल्यासमोर ठेवायला सांगितला. मग तो नेपोलिअनच्या तंबूच्या पहिल्या दालनात गेला. सेनापती सहाय्यकांशी बोलत असताना तो पेटारा खोलू लागला.

तंबूच्या प्रवेशद्वाराशी उभा राहून फॅब्व्हीए आपल्या ओळखीच्या जनरलांशी बोलत होता.

सम्राट नेपोलिअन अजून शयनागारातून बाहेर पडला नव्हता. आत त्याची वेशभूषा चालली होती. त्याचा नोकर ब्रशाने त्याचे अंग घासत होता. नेपोलिअन ब्रशसमोर प्रथम आपली दणकट पाठ, नंतर भरदार केसाळ छाती धरीत समाधानाने गुरगुरत, फुरफुरत होता. दुसरा नोकर बाटलीच्या तोंडावर बोट ठेवून नेपोलिअनच्या पुष्ट शरीरावर ओ द् कोलन शिंपडत होता. ओ द् कोलन कसे आणि कुठे शिंपडले पाहिजे हे फक्त आपल्यालाच ठाऊक आहे असे जणू त्याची मुद्रा सांगत होती. नेपोलिअनचे आखूड केस ओले झाले होते. भुवयांवर जटा आल्या होत्या. त्याच्या गुबगुबीत पिवळ्या चेहऱ्यावर तृप्ती उमटली होती.

ब्रशने अंग घासणाऱ्या नोकराला नेपोलिअन खांदे उडवीत, खाकरत सांगत होता. 'आणखीन घास...जोराने...थांबू नको.' कालच्या लढाईत कैद किती झाले ह्याचा रिपोर्ट देण्यासाठी ॲडज्युटंट नेपोलिअनच्या शयनागारात आला. रिपोर्ट देऊन झाल्यावर जाण्यासाठी त्याच्या परवानगीची वाट पाहात तो दाराशी उभा राहिला. कपाळाला आठ्या घालीत नेपोलिअनने ॲडज्युटंटकडे रोखून पाहिले. 'कुणीही कैदी नाहीत.' त्याने ॲडज्युटंटचे शब्द पुन्हा उच्चारून म्हटले, 'ते आपणच आपला विनाश ओढवून घेताहेत, त्यात त्यांचेच अकल्याण होत राहील.' आपले पुष्ट खांदे नोकरासमोर बाकवीत तो म्हणाला, 'जोराने ब्रश घासायला लाग. ठीक.'

मग तो ॲडज्युटंटला म्हणाला, 'बोसेला पाठवून दे. फॅब्व्हीएलाही येऊ दे.'

'जशी आज्ञा.' असे म्हणून ॲडज्युटंट दिसेनासा झाला.

दोन्ही नोकरांनी मोठ्या त्वरेने नेपोलिअनच्या अंगावर पोषाख चढवला. संरक्षक दलाच्या निळ्या गणवेषातील नेपोलिअन निश्चयी पावले भरभर टाकीत स्वागतिकेत आला.

एवढ्या वेळात बोसे नेपोलिअनसाठी सम्राज्ञीकडून आणलेली भेट घाईघाईने दोन खुर्च्यांवर ठेवीत होता. पण त्याचा हिशेब चुकला. नेपोलिअन जरा लवकरच पोषाख चढवून आला. त्यामुळे भेट दाखवून चकित करायला त्याला अवधी सापडला नाही.

त्याचा हेतू नेपोलिअनच्या लक्षात आला. ते अजून सज्ज नसल्याचे त्याने ओळखले. आपल्याला चकित करून भेट देण्यातील आनंद त्याला मिळू द्यावा असे त्याने ठरवले. त्याने बोसे आपल्या दृष्टीस पडला नाही असे भासवून फॅब्व्हीएला आपल्याकडे बोलावले. युरोपच्या दुसऱ्या टोकाशी सॅलमॅङ्काजवळ लढणाऱ्या सैन्याच्या शौर्याबद्दल आणि निष्ठेबद्दल फॅब्व्हीए बोलत होता. आणि कपाळाला आठ्या घालून उग्र मुद्रेचा नेपोलिअन काही न बोलता ऐकत होता. तो म्हणाला, 'आपण सम्राटांना शोभेल असे असावे हेच त्यांचे एक स्वप्न आहे. सम्राटांची इतराजी होईल की काय ही एकच धास्ती त्यांना आहे.' त्या लढाईचा शेवट अतिशय दारुण झाला होता. त्या लढाईचा वृत्तान्त फॅब्व्हीए सांगत असताना नेपोलिअन जणू आपल्या गैरहजेरीत त्याशिवाय दुसरे काही घडणार नाही हे माहीत असावे अशा थाटात उपरोधिक भाष्य करीत होता.

नेपोलिअन म्हणाला, ' त्याची भरपाई मला मॉस्कोला केली पाहिजे. अगदी लवकरच केली पाहिजे. '. एवढ्या वेळात बोसेने सम्राटांना चकित करण्याची तयारी पुरी केली होती. त्याने कसली तरी वस्तू दोन खुर्च्यांवर उभी केली होती. तिच्यावर आच्छादन टाकले होते.

जुन्या सेवकांनी करावा तसा दरबारी सलाम बोसेने केला. आणि जवळ जाऊन पत्र दिले.

नेपोलिअनने हसून त्याचे स्वागत केले. त्याच्या कानाला चिमटा घेत म्हटले, ' तुला पाहून आनंद झाला. फार लवकर आलास. पॅरिसची काय हालहवाल ? ' त्याची उग्र मुद्रा एकाएकी अतिशय प्रेमळ झाली.

' महाराज, तुम्ही गेल्यानं पॅरिसमधे सर्वांना दुःख झालं आहे. ' कर्तव्यपालन केल्यागत बोसे म्हणाला. बोसेला हे किंवा अशासारखे बोलणे भाग आहे हे नेपोलिअन जाणून होता. अशा बोलण्यात सत्य नसते हे सावध क्षणी त्याला ठाऊक असे. पण आता मात्र त्या शब्दांनी तो सुखावला. पुन्हा एकदा त्याने बोसेवर अनुग्रह केला त्याच्या कानाला चिमटा घेतला.

' तुला इतका प्रवास करायला लावला म्हणून मला वाईट वाटतं ' तो म्हणाला.

' महाराज, तुम्ही निदान मॉस्को शहराच्या प्रवेशद्वाराशी असाल अशी मी अपेक्षा बाळगून होतो. ' बोसे म्हणाला.

नेपोलिअनने स्मित केले आणि विसराळूपणाने उजवीकडे मान उंचावून पाहिले. एका ॲडज्युटंटने तपकिरीची डबी अत्यंत अदबीने पुढे होऊन नेपोलिअनला दिली.

उघडी डबी नाकाशी धरीत तो म्हणाला, ' तुला चांगली संधी आली आहे. तुला प्रवासाची आवड आहेच. तीन दिवसांत तुला मॉस्को दिसेल. आपण आशियातील ही राजधानी पाहू अशी तुझी अपेक्षा नव्हती. तुझा प्रवासही मजेत जाईल. '

महाराजांनी आपल्या प्रवासाच्या आवडीबद्दल अगत्य दाखवले म्हणून बोसेने कृतज्ञतापूर्वक प्रणाम केला. ( खरे तर ह्या क्षणापर्यंत बोसेला आपल्या प्रवासप्रियतेची जाणीव नव्हती. )

सर्व दरबारी लोक आच्छादन घातलेल्या त्या वस्तूकडे नजर लावून होते ते पाहून नेपोलिअनने विचारले, ' अरे, हे आहे तरी काय ? ' तशी बोसे दरबारी व्यक्तीच्या चपळाईने पाठ न दाखवता दोन पावले मागे टाकून थोडासा वळला आणि त्याच क्षणी त्याने आच्छादन दूर करीत म्हटले, ' महाराजांना सम्राज्ञींनी ही भेट पाठवलेली आहे. '

नेपोलिअन आणि ऑस्ट्रियाच्या सम्राटाची कन्या यांच्या मुलाचे ते पोर्ट्रेट होते. झेरार या चित्रकाराने लखलखीत रंगात काढले होते. त्या मुलाला सर्वजण का कोण जाणे ' रोमचा राजा ' म्हणत.

त्या अतिशय सुंदर, कुरळ्या केसाच्या मुलाचे डोळे मेरीजवळ असलेल्या ख्रिस्ताच्या डोळ्यांसारखे होते. तो पेला आणि चेंडू घेऊन खेळत आहे असे चित्र काढले होते. चेंडू म्हणजे पृथ्वीचा गोल आणि दुसऱ्या हातातील पेला म्हणजे राजदंड असे रूपक होते.

रोमचा राजा पृथ्वीचा गोल राजदंडावर फेकतो आहे असे दाखवण्यात चित्रकाराचा हेतू

काय होता हे पुरेसे स्पष्ट होत नव्हते. तरीही ज्यांनी ते चित्र पॅरिसमधे पाहिले होते त्यांना आणि नेपोलिअनला ते रूपक अगदी स्पष्ट वाटले आणि त्यामुळे अतिशय आनंद झाला.

' रोमचा राजा ' पोर्ट्रेटकडे अंगुलिनिर्देश करीत नेपोलिअन उद्गारला,' फार छान '. मनाला येईल तसा मुद्राभिनय करण्याची इटालिअनांची सहजता नेपोलिअनच्या अंगी होती. तो पोर्ट्रेटकडे गेला तेव्हा त्याची मुद्रा हळुवार आणि चिंतनमग्न बनली. आपण ह्या क्षणी जे करू किंवा जे बोलू त्याला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त होणार आहे हे त्याने ओळखले. त्याचा मुलगा पृथ्वीच्या चेंडूशी खेळत होता. हा वैभवाच्या शिखरावरचा क्षण होता. अशा वैभवाला विरोधी असे केवळ पितृवात्सल्य प्रकट केले तर तेच अप्रतिम उद्गार ठरतील असे त्याला वाटले. त्याने भावना दाटून आल्याने डोळे मिटून घेतले. तो खुर्चीसाठी भोवती पाहू लागला तोच खुर्ची पुढे करण्यात आली. तिच्यावर बसून तो पोर्ट्रेटकडे पाहू लागला. त्याने केलेल्या इशाऱ्या-सरशी सगळी माणसे पावले न वाजवता गेली. तो थोर पुरुष एकटाच स्वतःच्या भावनांत दंग झाला. पोर्ट्रेटच्या खरखरीत ( खडबडीत ) पृष्ठभागावरून काही वेळ त्याने बोटे फिरवली. आपण असे का करतो आहोत हे त्याला सांगता आले नसते. तेथे थोडा वेळ बसल्यावर उठून त्याने बोसेला आणि ड्यटीवर असलेल्या अधिकाऱ्याला बोलावून घेतले. त्याने पोर्ट्रेट तंबूच्या बाहेर नेऊन ठेवायला सांगितले. ' बाहेर असलेल्या संरक्षक दलाला आपल्या पूज्य सम्राटाचा वारस आणि मुलगा, रोमचा राजा पाहून आनंद वाटेल. '

नेपोलिअनने बोसेला आमंत्रण देऊन त्याचा सन्मान केला. त्याच्याबरोबर तो ब्रेकफस्ट घेत असताना त्याला त्याच्या अपेक्षेबरहुकूम सैनिकांच्या आणि संरक्षकदलाच्या अधिकाऱ्यांच्या उत्साहाने केलेल्या घोषणा ऐकू आल्या. ते सगळे पोर्ट्रेट पाहायला धावले होते.

' सम्राटांचा विजय असो ! रोमच्या राजाचा विजय असो ! सम्राटांचा विजय असो ! ' लोक उत्साहाने जयजयकार करीत होते.

ब्रेकफस्ट झाल्यानंतर बोसे असतानाच नेपोलिअनने सैन्याला उद्देशून करायची घोषणा कथन केली.

कसल्याही दुरुस्त्या न करता नेपोलिअनने एकदम घोषणा उतरून घ्यायला सांगितले होते. ती घोषणा वाचताना तो म्हणाला, ' छोटी आणि निर्णायक. '

ती घोषणा खालीलप्रमाणे होती.

' सैनिकहो, तुम्हाला हवी असलेली लढाई जवळ आली आहे. विजय तुमच्या हातात आहे. विजयाची आम्हाला आवश्यकता आहे. विजयामुळे आपणास हव्या त्या गोष्टी मिळतील. सुख-सोयींनी युक्त अशी आरामशीर निवासस्थाने मिळतील. आपण मायदेशी लवकरात लवकर जाऊ शकू. ऑस्टरलिट्झ, फ्रिडलँड, व्हायटेप्स्क आणि स्मॉलेन्स्क या ठिकाणी तुम्ही जशी कामगिरी केली तशीच कामगिरी करा. भावी पिढ्यांनी तुमच्या ह्या दिवशीच्या कर्तबगारीचे स्मरण मोठ्या अभिमानाने करायला हवे. तुमच्यापैकी प्रत्येकाबद्दल भावी पिढ्या म्हणू देत : ' मॉस्कोजवळ झालेल्या त्या महान युद्धात तो होता. ' '

नेपोलिअन घोड्यावरून रपेट करायला निघाला तेव्हा त्याने प्रवासप्रिय बोसेला आपल्याबरोबर बोलावले. तंबूच्या बाहेर खोगीर घातलेले घोडे बाहेर वाट पाहात होते.

' महाराजांचा फार लोभ आहे माझ्यावर ' नेपोलिअनने रपेट करायला बोलावले तेव्हा बोसे म्हणाला. बोसेला झोप आवरत नव्हती. त्याला घोड्यावर चांगले बसता येत नव्हते. घोड्याची त्याला भीती वाटत होती.

पण नेपोलिअनने मानेने इशारा करताच बोसेला घोड्यावर स्वार व्हावेच लागले. नेपोलिअन तंबूच्या बाहेर आला तेव्हा त्याच्या मुलाच्या पोर्ट्रेटसमोर असलेल्या संरक्षक दलाच्या सैनिकांनी दुप्पट जोराने जयजयकार करण्यास सुरुवात केली. नेपोलिअनने कपाळाला आठ्या घातल्या. राजेशाही दिमाखात इशारा करीत तो म्हणाला, ' त्याला न्या येथून. तो अजून खूप लहान आहे. एवढ्यात त्यानं युद्धक्षेत्रावर नजर टाकायला नको. '

सम्राटांचे म्हणणे आपणास समजले आणि पटले हे दाखवण्यासाठी बोसेने नजर खाली वळवली, मान झुकवली आणि एक दीर्घ उसासा टाकला.

आघाडीची दुसऱ्यांदा काळजीपूर्वक तपासणी करून आल्यानंतर नेपोलिअन म्हणाला,

' पटावर सोंगट्या मांडल्या आहेत. उद्या डावाला प्रारंभ होईल. '

त्याने मद्य मागवले. बोसेला बोलावून घेऊन तो त्याच्याशी पॅरिसबद्दल बोलू लागला. सम्राज्ञीच्या वाड्यात कोणते बदल करणार आहेत ते तो सांगू लागला. दरबारातील कामकाजाचे बारीकसारीक तपशील सांगून त्याने आपल्या स्मरणशक्तीने गव्हर्नरला आश्चर्यचकित केले.

आता तो क्षुल्लक बाबींत रस घेऊ लागला. बोसेच्या प्रवासप्रियतेची मस्करी करू लागला. मद्याचा दुसरा पेला घेतल्यानंतर नेपोलिअन विश्रांती घ्यायला उठला. दुसऱ्या दिवशी आपल्यापुढे गंभीर कार्य आहे याचा त्याला विसर पडला नव्हता.

दुसऱ्या दिवशीच्या कामाच्या विचाराने तो इतका व्यग्र झाला की, त्याला झोप येईना. रात्रीच्या दमट हवेत त्याची सर्दी आणखीन बळावली. तरीही तो पहाटे तीनला जागा होऊन जोराजोराने शिंकत तंबूच्या मुख्य विभागात आला. ' रशियनांनी माघार घेतली काय ? ' त्याने चौकशी केली. शत्रू त्याच ठरलेल्या ठिकाणावर असल्याचे त्याला समजले. त्याने मान हालवली.

ड्यूटीवर असलेला ॲडज्युटंट तंबूत आला.

' काय रॅप ? आज आपण कामगिरी चांगल्या तऱ्हेने पार पाडू असं तुला वाटतं काय ? '

' निःसंशय ! ' तो उत्तरला.

नेपोलिअनने त्याच्याकडे पाहिले. तशी रॅपने म्हटले, ' महाराज, आपणाला आठवतं का ?

स्मॉलेन्स्क येथे मला काय म्हणाला होता ते ? आपण म्हणाला होता; मद्य तयार आहे. आता ते पिऊन टाकले पाहिजे.'

नेपोलिअनने कपाळाला आठ्या घातल्या. बराच वेळ काही न बोलता तो दोन्ही हातांनी डोके दाबून बसला.

' स्मॉलेन्स्क सोडल्यापासून आपल्या कमजोर सैन्यात बरीच घट झाली आहे. रॅप, दैव इमानी वेश्येसारखं असतं. मी नेहमीच असं म्हटलं आहे. आता मला ते जाणवू लागलं आहे. रॅप, संरक्षकदल सुरक्षित आहे ना ? '

' होय महाराज. ' रॅपने उत्तर दिले.

नेपोलिअनने एक गोळी घेऊन तोंडात टाकली आणि आपल्या घड्याळात पाहिले. त्याला झोप येत नव्हती. सकाळ व्हायला अद्याप खूप वेळ होता. वेळ घालवण्यासाठी सूचना द्याव्यात तर आता देण्याजोग्या सूचना उरल्या नव्हत्या. सगळ्या सूचना अगोदरच देण्यात आलेल्या होत्या. त्यांची अंमलबजावणी व्हायला सुरुवात झाली होती.

' संरक्षकदलाच्या रेजिमेंटांना बिस्किटे आणि भात वाटण्यात आला काय ? ' नेपोलिअनने दरडावून विचारले,

' होय महाराज '

' भात देखील ? '

' भाताबद्दल तुम्ही दिलेला हुकूम मी त्यांना सांगितला होता. ' रॅप उत्तरला. नेपोलिअनने नाखुषीने डोळे हालवले. जणू आपल्या हुकमाची अंमलबजावणी होत नसावी असा त्याला संशय येत होता. तेवढ्यात नोकर मद्याचा पेला घेऊन आला. तसे नेपोलिअनने त्याला रॅपसाठी मद्य आणायला सांगितले. काही न बोलता त्याने काही घुटके घेतले. मग पेल्याचा वास घेत तो म्हणाला, ' मला चव उरली नाही आणि वास येत नाही. ह्या सर्दीनं मी वैतागून गेलो आहे. '

रॅपने काही उत्तर दिले नाही.

' उद्या आपली कुटूझॉफशी गाठ पडेल. बघू काय होतं ते. तुला आठवतं का ? ब्रॉनॉ येथे त्याच्या हाताखाली सैन्य होतं, पण त्या तीन आठवड्यांत खंदकांची पाहणी करण्यासाठी तो कधीच घोड्यावरून फिरला नाही. आता काय होतं ते पाहू. '

त्याने घड्याळात पाहिले. अजून चारच वाजले होते. त्याची झोप उडाली होती. मद्य संपले होते. आता काही काम उरले नव्हते. तो उठून येरझारा घालू लागला. मग त्याने उबदार कोट चढवला. हॅट घातली आणि तो तंबूच्या बाहेर आला. बाहेर अंधार होता. हवा दमट होती. बारीक पाऊस आवाज न करता पडत होता. अगदी जवळ असलेल्या फ्रेंच संरक्षक दलाच्या शेकोट्या मंद मंद पेटत होत्या. दूरवर असलेल्या रशियनांच्या आघाडीवरील शेकोट्यांच्या भडक ज्वाला धुरामधून दिसत होत्या. वातावरण शांत होते. आपापल्या जागा घेण्यासाठी फ्रेंच सैनिक हालचाली करीत होते. आणि जराशी हालचाल आणि पायरव

स्पष्टपणे ऐकू येत होता.

नेपोलिअनने तंबूभोवती येरझारा घातल्या. शेकोट्यांकडे पाहिले. सैनिकांच्या पावलांकडे ध्यान दिले. मग तो तंबूच्या दाराशी उभ्या असलेल्या, फरकॅप घातलेल्या उंच पहारेकऱ्या-जवळ आला. सम्राटांना पाहताच अंग सावरून पहारेकरी एखाद्या काळ्या खांबासारखा ताठ उभा राहिला. त्याच्याकडे पाहात नेपोलिअन स्तब्ध उभा राहिला.

' कधीपासून नोकरी करतो आहेस ? ' सैनिकाशी बोलताना नेपोलिअन नेहमीच लष्करी गुर्मी आणि सहानुभूतीचा आव आणून बोले. तसेच आता बोलला. सैनिकाने उत्तर दिल्यावर नेपोलिअनने विचारले, ' अरे वा ? चांगलाच अनुभवी आहेस ! आज रेजिमेंट-मधील सगळ्यांना भात मिळाला ना ? '

' मिळाला महाराज ! '

मान हालवून नेपोलिअन तिथून निघाला.

आता उजाडू लागले, आकाश उजळू लागले. पूर्वेकडे क्षितिजावर फक्त एक बादली ढग होता. सकाळच्या मंद प्रकाशात सैनिकांनी सोडलेल्या शेकोट्या विझू लागल्या.

उजव्या बाजूला तोफेच्या गोळ्यांचा आवाज घुमला. गोळा वर उडाला आणि पुन्हा शांतता पसरली. कित्येक मिनिटे तशीच गेली. पुन्हा दुसरा, मग तिसरा गोळा सुटल्याचा आवाज ऐकू आला. वातावरण थरारून गेले. अगदी उजव्या बाजूला चौथा, नंतर पाचवा गोळा भयानक तऱ्हेने घुमला.

डावाला सुरुवात तर झाली होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी पीएर जागा झाला तेव्हा त्याला झोपडीत कुणी दिसेना. छोट्या खिडक्यांची तावदाने खडखडत होती. जवळ उभा राहून नोकर त्याला उठवीत होता. ' महाराज, महाराज, महाराज ' त्याचा खांदा हालवीत त्याच्याकडे न पाहता नोकर सारखा हाका मारत होता. आपण मालकाला कधीच उठवू शकणार नाही असे त्याला वाटत होते.

' काय रे जायची वेळ झाली का ? ' उठता उठता पीएरने विचारले.

' महाराज, गोळीबार ऐकलात का ? ' त्या वृद्ध सैनिकाने त्याला विचारले. ' सगळे केव्हाच गेले आहेत. महाराज तर कधीच गेले. '

घाईघाईने पोषाख करून पीएर पोर्चमधे गेला. उघड्या वातावरणात तोफांचे आवाज अधिक स्पष्टपणे ऐकू येत होते. रस्त्यावरून घोडा दौडवीत एक ॲडज्युटंट आला. त्याच्या मागून एक कोसॅकही आला.

' काउंट, वेळ झाली आहे. ' ॲडज्युटंट ओरडला. पीएरने आपल्या मागून घोडा पाठवून देण्याची आज्ञा केली. आदल्या दिवशी ज्या टेकाडावरून लढाईची जागा न्याहाळली होती

त्या टेकाडावर पीएर गेला. त्या टेकाडावर अधिकाऱ्यांची गर्दी झाली होती. स्टाफची माणसे फ्रेंचमधे बोलत होती. लाल पट्टे असलेली पांढरी टोपी घातलेला शुभ्र केसाचा कुटूझॉफ खांदे उंचावून समोर असलेल्या मुख्य रस्त्याकडे दुर्बिणीतून पाहात होता.

पीएरने तो ढिगारा चढण्यासाठी केलेल्या पायऱ्या चढून समोर पाहिले. समोरच्या सुंदर दृश्याने तो थरारून गेला. आदल्याच दिवशी तिथेच राहून त्याने ते दृश्य विस्मयचकित होऊन पाहिले होते.

आता त्या सगळ्या प्रदेशात फौजा पसरल्या होत्या. तोफांचा, बंदुकांचा धूर पसरला होता. सकाळच्या स्वच्छ हवेत पीएरच्या मागे डाव्या बाजूस असलेल्या सूर्याची तिरपी किरणे पडली होती. त्या प्रदेशावर सोनेरी गुलाबी छटा असलेला प्रखर प्रकाश पडला होता. त्यात मधून मधून लांबलांब गडद सावल्या होत्या. दूर क्षितिजाला लागून असलेल्या चंद्रकोरीच्या आकाराच्या जंगलांनी त्या दृश्याला वेढा घातला होता. ते क्षितिज पाचूच्या रत्नातून कोरून काढल्यासारखे दिसत होते. त्यात पसरलेल्या धुक्यातून व्हॅल्युएव्हच्या मागून स्मॉलेन्स्कचा मोठा रस्ता जात होता. त्यावरून सैन्य चालले होते. अलीकडच्या बाजूस सोनेरी रंगाची शेते आणि जंगलातील छोट्या झाडांचा प्रदेश उन्हात चमकत होता. सर्व बाजूंना सैनिक दिसत होते.

कोलॉचाच्या जवळपास, बोरोदीनॉमधे आणि कोलॉचाच्या दोन्ही बाजूस, विशेषतः ज्या दलदलीतून वाहत व्हॉयना नदी कोलॉचाला मिळते, त्या दलदलीच्या प्रदेशात सर्वत्र धुके साचले होते. ते वितळत होते. दूर होत होते. उजळल्या उन्हात चमकत होते आणि आत दिसणाऱ्या आकारांना परिकथेतील सौंदर्य प्राप्त होत होते. बंदुका, तोफांचा धूर त्या धुक्यात मिसळत होता. त्यामधून पाण्यात दंवबिंदूवर आणि बोरोदीनॉमधे व नदीच्या तीरांवर गर्दी करणाऱ्या सैनिकांच्या बायोनेटांवर चमकणारे ऊन दिसत होते. ह्या धुक्यातून मधून मधून पांढरेशुभ्र चर्च दिसे. बोरोदीनॉमधील इतस्ततः असलेल्या झोपड्यांची छपरे दिसत.

जिथे धूर उठत होता, संगिनी चमकत होत्या, सैनिक धावत पळत होते आणि ओरडत होते, त्या ठिकाणी पीएरला जावेसे वाटू लागले. त्याने कुटूझॉफ आणि त्याचा परिवार यांच्याकडे वळून पाहिले. त्यांची प्रतिक्रिया आपल्यासारखीच झाली आहे की काय ते त्याला पाहायचे होते. ती सगळी माणसे त्याच्याप्रमाणेच मैदानाकडे डोळे लावून होती. आपल्यासारख्या त्यांच्याही भावना असतील असे त्याला वाटू लागले.

जवळ असलेल्या जनरलला रणक्षेत्रावरून नजर न काढता कुटूझॉफ म्हणाला, 'जा गड्या जा. खिस्त तुझ्या पाठीशी राहील.' हुकूम मिळताच जनरल पीएरजवळून ढिगारा उतरू लागला.

'घोडे सरळ न्यायचे...मैदानातून.' स्टॉफमधील कोणत्यातरी माणसाच्या प्रश्नाला उत्तर म्हणून तो जनरल शांतपणे दटावणीच्या स्वरात बोलला.

'मीसुद्धा जातो.' पीएर म्हणाला आणि त्या दिशेने जाऊ लागला.

कोसॅकने आणलेल्या घोड्यावर जनरल स्वार झाला. पीएरने त्याच्यामागून घोडा पिटाळला.

जनरलने घोडा टेकडीवरून खाली पळवीत नेला. एकदम तो डावीकडे वळला. त्याच्या मागून जाणाऱ्या पीएरची चुकामूक झाली आणि समोर कूच करणाऱ्या पायदळाच्या बटालिअनमधे त्याचा घोडा घुसला. डाव्या, उजव्या बाजूला घोडा नेत पीएर त्यांना टाळण्याचा प्रयत्न करू लागला. पण सर्व बाजूंना सैनिक होते. सगळ्यांचे चेहरे पूर्वीसारखेच तसेच चिंतातुर होते.

त्याला समोर पूल दिसला. पुलाशी सैनिक गोळ्या झाडीत होते. पीएरने त्यांच्या दिशेने घोडा हाकलला. कोलॉचावर बांधलेला तो पूल गॉर्की आणि बोरोदीनॉ यांना जोडणारा होता. पीएरला तिथे मुख्य लढाई चालली आहे याची कल्पना नव्हती. तो अगदी लढाईच्या जागी आला.

' आघाडीच्या अगदी समोर काय करतो आहे तो ! ' कोणीतरी ओरडून विचारले.

' उजवीकडे वळ...डावीकडे वळ...' सैनिक त्याला ओरडून सूचना देत होते. पीएर उजवीकडे वळला. नकळतच तो जनरल रेव्स्कीच्या ॲडज्युटंटकडे आला. तो ॲडज्युटंट त्याच्या परिचयाचा होता. ॲडज्युटंटने रागाने त्याच्याकडे पाहिले. तो सुद्धा खरेतर त्याच्यावर ओरडणार होता, पण त्याने पीएरला ओळखले आणि मान हालवली.

' तुम्ही इथं कसे ? ' असे बोलून त्याने पीएरजवळ घोडा पिटाळला. आपण अस्थानी आलो आहोत, आपला काही उपयोग नाही, उलट आपण इतरांच्या मार्गात आडवे येऊ ह्याची पीएरला जाणीव झाली आणि त्याने ॲडज्युटंटच्या मागून आपल्या घोड्याला पिटाळले.

ते आता तोफखान्यामागे तंत्रज्ञांच्या सहाव्या पथकामधून निघाले आणि छोट्या झाडीच्या प्रदेशात आले. त्या ठिकाणी गारवा होता. शांतता होती आणि शरत्कालीन वनश्रीचे सुगंध दरवळत होते. पीएर आणि तो ॲडज्युटंट घोड्यावरून उतरून पायीच टेकडी चढू लागले.

' जनरल इथं आहेत का ? ' ॲडज्युटंटने संरक्षणाच्या जागी पोचताच विचारले.

' आताच ते इथं होते. ह्या बाजूनं गेले ' कोणीतरी उजव्या बाजूला बोट करीत म्हटले.

ॲडज्युटंटने वळून पीएरकडे पाहिले. पीएरचे काय करावे त्याला कळेना.

' माझ्याबद्दल काळजी करू नका. मी ह्या ढिगाऱ्यावर चढलो तर चालेल ना ? ' पीएरने विचारले.

' अवश्य जा. तिथून तुम्ही सगळं पाहू शकाल. तिथं तसा काही धोका नाही. मी तुम्हाला न्यायला येईन. '

पीएर तोफखान्याजवळ गेला. ॲडज्युटंटने घोड्याला टाच मारली. त्या दोघांची पुन्हा काही गाठ पडली नाही. त्याच दिवशी त्या ॲडज्युटंटचा एक हात तुटला, पण हे पीएरला खूप दिवसांनी कळले.

त्या ढिगाऱ्याला रशियन ' तोफखान्याचा ढिगारा ' किंवा ' रेव्स्कीचा तोफखाना ' असे म्हणत. फ्रेंचांमधे तो ढिगारा ' मोठाला मोर्चा ' ' भयानक मोर्चा ' ' मध्यवर्ती मोर्चा ' अशा नावांनी प्रसिद्ध होता. ह्याच ठिकाणी दहा-एक हजार सैनिक मारले गेले. फ्रेंचांच्या

दृष्टीने ही तटबंदी हालचाली रोखण्याची महत्त्वाची जागा होती.

त्या जागेला काही महत्त्व नाही असे त्याला वाटले. मोर्च्याला वेढणाऱ्या मातीच्या बांधाच्या एका टोकाशी पीएर बसला आणि भोवताली जे चालले होते ते पाहात राहिला. त्या वेळी त्याच्या चेहऱ्यावर प्रसन्न स्मित होते. मधूनमधून तो उठत होता आणि त्याच मुद्रेने मोर्च्याजवळ फिरत होता. मात्र फिरत असताना सैनिकांना आपली अडचण होणार नाही याची काळजी घेत होता. सैनिक तोफांत दारूगोळा भरत होते. तोफांना बत्ती लावत होते. पिशव्या व दारूगोळा घेऊन त्याच्याजवळून सतत धावपळ करीत होते. तोफा एकामागून एक सतत मारा करीत होत्या. कानठळ्या बसवणारे आवाज होत होते. सगळा प्रदेश धुराच्या ढगात झाकून जात होता.

मोर्च्याचे संरक्षण करणाऱ्या पायदळातील सैनिकांच्या मुद्रा भयग्रस्त झाल्या होत्या. उलट प्रत्यक्ष मोर्च्यात असलेले थोडेसे सैनिक सारखे कामात मग्न होते. खंदकामुळे ते इतरांपासून वेगळे पडले होते. तरीही एकाच कुटुंबातील माणसात असावा तसा समान उत्साह त्यांच्यात होता.

धावत असताना सैनिक कधी आश्चर्याने, कधी दचकून पीएरकडे दृष्टिक्षेप टाकत होते. देवीचे व्रण असलेला, लांब पायांचा तोफखान्यावरील वरिष्ठ अधिकारी पीएरजवळ आला. टोकाशी असलेल्या तोफा कशा चालतात हे पाहण्यासाठी जणू तो तिथे आला आणि चौकसपणे पीएरकडे पाहू लागला.

तो गोल चेहऱ्याचा पोरसवदा अधिकारी नुकताच शिक्षण संपवून आलेला दिसत होता. आपल्या ताब्यात असलेल्या दोन तोफांकडे तो जातीने मनोभावाने लक्ष देत होता. तो काहीसा दरडावून पीएरला म्हणाला, ' महाशय, तुम्ही येथून उठाल तर बरं होईल. इथं तुम्हाला राहता येणार नाही. '

पीएरकडे पाहात बऱ्याच सैनिकांनी माना हालवून आपली नापसंती दर्शवली. पांढरी हॅट घातलेला हा मनुष्य कधी व्यत्यय आणीत नव्हता, ढिगाऱ्याच्या उतारावर शांतपणे बसत होता; नाहीतर संकोचाने स्मित करून सैनिकांना जाण्यासाठी वाट करून देत होता. दुतर्फा झाडी असलेल्या रस्त्यावरून जावे तितक्या शांतपणे तो तोफा चालू असताना फिरत होता. ह्या गोष्टी जसजशा त्यांच्या ध्यानात आल्या तसतसा त्यांना त्याच्याविषयी आकस, संशय वाटेनासा झाला. रेजिमेंटच्या सुखदुःखात सहभागी होणाऱ्या कुत्रे, कोंबडी, बकरे आणि इतर जनावरांबद्दल सैनिकांना जशी आपुलकी वाटते तशी आपुलकी त्यांना पीएरबद्दल वाटू लागली होती.

लवकरच सैनिक पीएरला आपल्या छोट्या गोटातील एक मानू लागले. ' आमचा भला माणूस ' असे ते त्याला म्हणू लागले. त्याच्याबद्दल आपापसात विनोद करून ते हसू लागले.

पीएरपासून दोनचार पावलांवर एक गोळा पडला आणि जमीन उखडली गेली. कपड्यावर उडालेली माती झटकून भोवताली पाहात त्याने स्मित केले.

‘ महाशय, मोठं आश्चर्य आहे. तुम्हाला भीती नाही वाटत ? ’ रुंद, लालबुंद चेहऱ्याच्या सैनिकाने विचारले. विचारताना त्याने केलेल्या हास्यामुळे त्याचे मळकट पांढरे दात पीएरला दिसले.

‘ तुम्हाला भीती वाटते तर ? ’ पीएरने विचारले.

‘ अर्थातच. तोफेला दयामाया नाही. ती तुम्हांला धडक देऊन तुमची आतडीच बाहेर भिरकावून देते. तिची भीती न वाटणं अशक्य. ’ तो हसत म्हणाला.

अजूनही कित्येक सैनिक पीएरजवळ उभे होते. त्यांच्या प्रेमळ मुद्रेवर स्मित उमटले होते. त्याने इतरांहून काहीतरी वेगळे बोलावे असे त्यांना वाटत असल्याचे दिसत होते. त्याच्या वागण्यावर ते खूष होते.

‘ आमचा हा उद्योगच आहे. काही झालं तरी आम्ही सैनिक आहोत पण तुमच्यासारख्या गृहस्थाचं असं वागणं आश्चर्यकारक आहे, चमत्कारिक आहे. ’

‘ आपल्याला जागा द्या. ’ पीएरच्या भोवती गोळा झालेल्या सैनिकांना त्या पोरसवदा अधिकाऱ्याने हुकूम सोडला. हा पोरगा पहिल्यांदाच फार तर दुसऱ्यांदाच अधिकारी म्हणून कामगिरी बजावत होता हे नक्की. त्यामुळे तो सैनिकांशी आणि आपल्या वरिष्ठांशी जास्तीत जास्त कर्तव्यपालनाच्या भावनेने आणि औपचारिकपणे वागत होता.

सगळ्या मैदानात तोफा, बंदुकांचा गडगडाट वाढतच होता, डाव्याबाजूस जिथे बॅग्रेशनचे बंधारे होते तिथे तर फारच गडगडाट होत होता. पीएर उभा होता तिथून मात्र धुरामुळे काहीच दिसत नव्हते. तटबंदीवर बाहेरच्या जगापासून दूर असलेल्या बंधुभावाने, काम करीत असलेल्या मूठभर माणसांच्या घोळक्याकडे पीएर मन लावून पाहात होता. रणक्षेत्रावरही पीएरला नकळत आनंद वाटू लागला होता. परंतु आता एकाकी मृत सैनिक गवतात पडलेला पाहून त्याची भावना बदलून गेली. बांधाच्या उतारावर बसून तो जवळपास हालचाल करणाऱ्या व्यक्तींना पाहात राहिला.

दहा वाजेपर्यंत वीस एक माणसांना तरी तोफखान्याच्या जागेपासून हलवावे लागले. दोन तोफा निकामी झाल्या होत्या. तोफांवर अधिकाधिक गोळे सारखे पडतच होते. दूर अंतरावरून तोफांचे गोळे फुत्कारत सुसाटत येत होते. तोफखान्यावरील गोलंदाजांना मात्र त्याची जाणीव नसावी असे वाटत होते. सगळेजण मोठ्या आनंदाने हास्यविनोद करताना ऐकू येत होते.

एकेक गोळा त्यांच्यामधे पडत होता आणि एकेका हानीबरोबर त्या सैनिकांचा उत्साह अधिकाधिक वाढत असल्याचे पीएरला जाणवत होते.

वादळी ढगासारखा ढग त्याच्याजवळ झेपावत येऊ लागला. तसतशी त्यातील अप्रगट आगीची झळाळी अधिकाधिक तेजस्वी होऊ लागली, वारंवार दिसू लागली. त्या लोकांचे चेहरे त्या झळाळीने विजेच्या प्रकाशात उजळावेत तसे उजळू लागले. संकटाला त्यांनी तोंड द्यावे म्हणून जणू तो प्रकाश त्यांना आज्ञा देत राहिला.

पीएरने समोरील रणक्षेत्राकडे पाहिले नाही. आता त्याला समोर जे चालले होते त्यात रस उरला नव्हता. त्याला आपल्या अंतःकरणातदेखील तो अग्नी धगधगत आहे असे वाटू लागले. आणि त्या वाढत चाललेल्या अग्नीच्या चिंतनात तो मग्न झाला.

तोफखान्याच्या पुढे गेलेले पायदळ कॅमेङ्का ओढ्याच्या तीरावर झुडपात होते. त्यांनी दहा वाजता माघार घेतली. तोफखान्याच्या जागेवरून त्यांना जवळून जाणारे सैनिक दिसत होते. माघारी जाताना ते बंदुकांवरून जखमी सैनिकांना वाहून नेत होते. आपल्या परिवारासह जनरल त्या तटबंदीवर आला. त्याचे कर्नलशी काही बोलणे झाले. पीएरकडे त्याने रागाने पाहिले. जाण्यापूर्वी त्याने तोफखान्याच्या रक्षणासाठी मागे राहिलेल्या पायदळाला हुकूम दिला. ' खाली पडून राहा. म्हणजे गोळ्यांच्या भडिमारात क्वचित सापडाल. ' त्यानंतर तोफखान्याच्या जास्त करून उजव्या बाजूस पायदळात ड्रम वाजला. कुणीतरी उच्चस्वरात हुकूम सोडले. पुढे सरकणारी पायदळाची पथके तोफखान्यावरून दिसत होती.

पीएरने बांधापलीकडे पाहिले. एका आकृतीने त्याचे लक्ष वेधून घेतले. तो फिकट पोरसवदा चेहऱ्याचा अधिकारी मागे मागे जात होता. त्याने आपली तलवार खाली वळवून धरली होती आणि तो अस्वस्थपणे भोवताली पाहात होता.

पायदळ सैनिकांच्या रांगा धुरात दिसेनाशा झाल्या, पण त्यांची बराच वेळ चाललेली ओरड आणि द्रुत वेगाने सोडलेल्या गोळ्यांचे आवाज ऐकू येत होते. थोड्याच वेळात त्या दिशेने कित्येक जखमी सैनिक आणि कित्येक स्ट्रेचर येऊ लागले. तोफखान्यावर अधिकाधिक गोळे पडणे चालूच होते. गोळे चुकवीत कित्येक माणसे जमिनीवर पडून राहिली. आता सैनिकांची तोफांजवळील कामे अधिक झपाट्याने आणि चपळाईने होऊ लागली. आता कुणी पीएरची दखल घेत नव्हता. वरिष्ठ अधिकारी कपाळाला आठ्या घालून तोफांतोफांकडे धावू लागले. त्या पोरगेल्या अधिकाऱ्याचे गाल पूर्वीहून अधिक लाल झाले होते. तो कधी नव्हे त्या इमानाने सैनिकांना हुकूम देत होता. सैनिक तोफांना दारुगोळा आणीत होते. उलट वळत होते. दारु-गोळा भरीत होते. आणि आपले प्रत्येक काम भलत्याच हुषारीने पार पाडत होते. शरीरात स्प्रिंग बसवल्यागत ते काम करीत होते.

वादळी ढग जवळ झेपावत होता. पीएरला आढळलेला अग्नी प्रत्येक मुद्रेवर अधिकाधिक प्रखरतेने धगधगत होता. पीएर वरिष्ठ अधिकाऱ्याजवळ उभा होता. त्या अधिकाऱ्याचा पोरगेला नोकर धावत आला. आपल्या टोपीला हात लावून त्याने वरिष्ठ अधिकाऱ्यास प्रणाम केला. ' कर्नलसाहेब, केवळ आठ वेळा तोफ डागता येईल एवढाच दारुगोळा शिल्लक आहे. गोळीबार चालू ठेवावा असा आपला हुकूम आहे काय ? '

बांधाच्या पलीकडे पाहत वरिष्ठ अधिकारी म्हणाला. ' मारा सुरू करा. '

मग एकाएकी एक घटना घडली. त्या पोरगेल्या नोकराने कण्हत गरगरा फिरत जमिनी-वर बसकण मारली. पंखात गोळी घुसलेल्या पक्ष्यासारखा तो खाली कोसळला. पीएरला सारे कसे विचित्र, अस्पष्ट आणि अंधकारमय वाटू लागले.

तोफांचे गोळे सुसाटत एकसारखे कंबरभर उंचीच्या बांधावर सैनिकांवर आणि तोफांवर आदळू लागले. पीएरने पूर्वी हे आवाज क्वचितच ऐकले होते. त्यामुळे आता त्याला ह्या आवाजाखेरीज दुसरा कसलाही आवाज ऐकू येत नव्हता. तोफखान्याच्या उजव्या बाजूला जयघोष करीत सैनिक धावत होते. ते पुढे धावण्याऐवजी मागे धावत आहेत असे पीएरला वाटले.

ज्या बांधासमोर पीएर बसला होता, त्या बांधाच्या अगदी कडेवरच एक तोफेचा गोळा आदळला आणि माती उखडून उडाली. एका काळ्या गोल ढगातून त्याच्या डोळ्यांसमोर प्रकाश चमकला, त्याच वेळी धडाड्धूम आवाज होऊन स्फोट झाला.

तोफखान्यात येणारे शिबंदीचे सैनिक मागच्यामागे पळाले. 'बारीक गोळ्यांचा वर्षाव करा' अधिकारी ओरडला.

सार्जंट धावत अधिकाऱ्याकडे आला. भयभीत आवाजात कुजबुजला. 'दारूगोळा संपला आहे.'

अधिकाऱ्याचा चेहरा लालबुंद झाला आणि त्याला चांगलाच घाम सुटला. त्याचे भेदक डोळे चमकले. 'राखीव साठ्याकडे धाव घे. दारूगोळ्याच्या पेट्या आण.' पीएरची नजर चुकवीत त्या सैनिकाला रागाने हुकूम दिला.

'हवं तर मी जाईन' पीएर म्हणाला. काही उत्तर न देता अधिकारी दुसऱ्या बाजूस गेला आणि ओरडला. 'तोफा डागू नका...थांबा.'

दारूगोळा आणण्यासाठी पाठवण्यात आलेला सैनिक धावत सुटला. पोरगेला अधिकारी बसला होता ती जागा टाकून पीएर त्या सैनिकामागून धावू लागला.

तो टेकडी उतरत असताना एकामागून एक असे तीन गोळे जमिनीवर आदळले. एक त्याच्या पुढ्यात आदळला. दुसरा उजव्या बाजूला. तिसरा डाव्या बाजूस आदळला. दारूगोळ्याच्या हिरव्या पेट्यांकडे धाव घेताना एकाएकी त्याच्या मनात विचार आले. 'मी कुठे धावतो आहे कुणास ठाऊक!' पुढे जावे की मागे वळावे ह्याचा निर्णय थोडा वेळ त्याला घेता येईना. त्याला एकाएकी भयंकर धक्का बसला आणि तो धाडकन मागच्या मागे जमिनीवर कोसळला. त्याच वेळी क्षणभर चमकून गेलेल्या अग्नीच्या प्रकाशाने त्याचे डोळे दिपून गेले. मग गर्जना झाली; सूंसूं असा आवाज झाला; धाडकन काहीतरी पडल्याचा आवाज झाला आणि सगळे आवाज त्याच्या कानांत घुमत राहिले.

पीएर जेव्हा शुद्धीवर आला तेव्हा आपण हातांवर रेलून जमिनीवर बसून असल्याचे त्याला आढळले. ज्या दारूगोळ्याच्या पेटीच्या तो जवळ होता ती पेटी नाहीशी झाली होती. करपून गेलेल्या गवतावर थोडाफार कोळसा झालेल्या हिरव्या फळ्या आणि चिंध्या होत्या. एक घोडा गाडीचे मोडके भाग ओढत दौडत होता. त्या भागांचा खडखडाट होत होता. दुसरा एक घोडा पीएरप्रमाणेच जमिनीवर पडला होता आणि कितीतरी वेळ चीत्कार करीत होता.

पीएरचा भीतीमुळे स्वतःवर ताबा राहिला नाही. भोवतालच्या भयकारक गोष्टींपासून सुरक्षित आसरा घेण्यासाठी तो मागच्या मागे तोफखान्याकडे धावत सुटला.

तो संरक्षक तटबंदीकडे आला तेव्हा तोफांचे आवाज काही त्याच्या कानांवर पडले नाहीत. मात्र तिथे काही ना काही काम करीत असलेली माणसे त्याला दिसली. ती माणसे ओळखायला त्याला वेळ नव्हता. त्याने पाहिले तो वरिष्ठ अधिकारी समोरच्या बांधावर पालथा पडला होता. खाली कुठेतरी टक लावून तो पाहात असल्याचे दिसत होते. त्याने पाहिले–काही माणसे एका सैनिकाला धरून ठेवण्याचा प्रयत्न करीत होती. त्याच्यापासून सुटण्याची धडपड करीत तो ओरडला ' दोस्त हो '...

कर्नल केव्हाच ठार झाला होता. ' दोस्त हो ' असे ओरडणारा सैनिक कैदी होता. पण ह्या गोष्टी लक्षात घेण्याच्या आतच पीएरच्या डोळ्यांसमोर एका सैनिकाला संगीन पाठीत खुपसून मारण्यात आले. पीएर वेगाने टेकडी उतरताना मृत आणि जखमी सैनिकांत अडखळू लागला. ते सैनिक आपली पावले पकडताहेत असा त्याला भास होत होता.

पायथ्याला पोचण्याआधीच कितीतरी रशियन सैनिकांनी गर्दी केलेली त्याला दिसली. ते एकमेकांना अडखळत होते, पडत होते, मोठ्या उत्साहाने तोफखान्याच्या दिशेने धाव घेत होते.

तोफखाना ताब्यात घेणाऱ्या फ्रेंच माणसांनी पळ काढला. रशियन सैनिकांनी त्यांचा तोफखान्यापासून इतक्या दूरवर पाठलाग केला की, त्यांना मुश्किलीने आवरावे लागले. ते मग तोफखान्याकडून कैदी खाली आणू लागले. त्यामधे एक जखमी झालेला फ्रेंच जनरल होता. त्याच्याभोवती अधिकारी होते. जखमी झालेल्या अनेकांत फ्रेंच व रशियन सैनिक होते. त्यांमधे पीएरच्या ओळखीची माणसे होती. त्यांपैकी काही चालत होते. काही खुरडत होते. काहींना तोफखान्याच्या जागेपासून स्ट्रेचरांवरून वाहून नेण्यात येत होते. यातनांनी त्यांच्या मुद्रा वेड्यावाकड्या झालेल्या होत्या.

जिथे एक तास घालवला होता त्या तटबंदीच्या ठिकाणी पीएर चढून गेला. ज्यांनी मघा त्याला आपल्यातील एक मानले होते त्या बंधुभावाने काम करणाऱ्या मूठभर सैनिकांपैकी एकहीजण त्याला तिथे आढळला नाही. तिथे असलेल्या बऱ्याच मृत सैनिकांना त्याने पूर्वी पाहिले नव्हते. तरीही त्यातील अनेकांना त्याने ओळखले. बांधाच्या कड्याशी रक्ताच्या थारोळ्यात अंगाचे मुटकुळे करून अजूनही तो पोरगेला अधिकारी बसलेला होता. लालबुंद चेहऱ्याचा गमत्या सैनिक अजूनही यातनांनी विव्हळत होता. पण त्यांनी त्याला वाहून नेले नाही.

पीएर वेगाने टेकडी उतरू लागला. रणक्षेत्रापासून दूर जाणाऱ्या स्ट्रेचरांच्या लोंढ्यामागून

निरुद्देशपणे जाताना तो मनाशी म्हणत होता, ' आता ते सगळं बंद करतील. आपण काय केलं ते पाहून त्यांना भयंकर धक्का बसेल. '

धुराच्या पडद्यामागील सूर्य अजूनही बराच वर होता. समोरच्या आणि त्याहीपेक्षा उजवीकडच्या प्रदेशात अजूनही धुरामधे गडबड चालूच होती. जिवावर उदार होऊन शेवटची धडपड करणाऱ्याने आपली असली नसली शक्ती एकवटून कानठळ्या बसवणारा आक्रोश करावा त्याप्रमाणे तोफाबंदुकांचा धडधडाट कमी होण्याऐवजी सारखा वाढत होता.

गढीवर उभा राहून नेपोलिअन दुर्बिणीतून पाहात होता. दुर्बिणीच्या छोट्या वर्तुळाकार काचेतून त्याला धूर आणि माणसे दिसत होती. कधी त्याची स्वतःची, कधी रशियन माणसे. दुर्बिणीशिवाय तो जेव्हा बघू लागे तेव्हा आपण कुठे काय पाहिले हे त्याचे त्यालाच सांगता येईना.

लढाई कशी चालली आहे याबद्दल नेपोलिअनच्या मार्शलांनी दिलेले रिपोर्ट लढाईच्या मैदानातून घेऊन घोड्यावर स्वार झालेला ॲडज्युटंट नेपोलिअनकडे येत होता. पण हे सगळे रिपोर्ट फसवे होते. कारण लढाईच्या ऐन धामधुमीत काय घडले आहे हे सांगणे कोणत्याही क्षणी अशक्य होते. पुष्कळसे ॲडज्युटंट लढाईच्या मैदानावर जातच नसत. ते इतरांकडून ऐकलेल्या बातम्याच नेपोलिअनला पुन्हा सांगत. शिवाय ॲडज्युटंट घोड्यावरून दोन मैल अंतर काटून नेपोलिअनकडे येईपर्यंत परिस्थिती बदलून जाई आणि त्यांनी नेपोलिअनला दिलेली बातमी खोटी ठरे.

जादा कुमक पाठवण्याची विनंती करण्यासाठी म्युराने आपल्या ॲडज्युटंटला भर दुपारी नेपोलिअनकडे पाठवले.

नेपोलिअन तटबंदीखाली मद्यपान करीत बसला होता. अशा वेळी म्युराचा ॲडज्युटंट घोड्यावरून आला आणि त्याने नेपोलिअनला निरोप दिला. ' महाराजांनी आम्हाला आणखी एक डिव्हिजन पुरवली तर रशियनांची दाणादाण उडवून देऊ ? '

म्युराप्रमाणे कुरळे केस ठेवणाऱ्या त्या पोरगेल्या देखण्या ॲडज्युटंटकडे नेपोलिअनने अशा थाटात पाहिले की त्याचे बोलणे त्याला कळले नव्हते. नेपोलिअनने आश्चर्य दाखवीत करारी आवाजात विचारले, ' जादा कुमक ? '

रशियनांच्या पुरेशी मदत नसलेल्या दुबळ्या फळीवर आपण आपली अर्धांअधिक सेना खिळवून ठेवलेली असताना लोक जादा कुमक कशी मागतात हे नेपोलिअनला कळेना.

' नेपल्सच्या राजाला सांग--अजून दुपार झालेली नाही. अजून मला बुद्धिबळाचा पट

स्पष्टपणं दिसत नाही. तू जाऊ शकतोस. ' नेपोलिअनच्या स्वरात दरारा होता.

त्या ॲडज्युटंटने टोपीवरील हात न काढताच कत्तल चालली होती तिकडे पुनश्च घोडा पिटाळला.

नेपोलिअनने उठून कॉलाइन कोर्ट आणि बर्थिए यांना बोलावले. त्याच्याशी तो युद्धाशी संबंधित नसलेल्या गोष्टींवर बोलत राहिला.

नेपोलिअन संभाषणात रस घेऊ लागला होता. संभाषण चालू असताना बर्थिएच्या दृष्टीला घामाने निथळलेल्या घोड्यावरून तटबंदीकडे येणारा जनरल पडला. तो जनरल बेलिअर्ड होता. घोड्यावरून उतरून घाईघाईने तो सम्राटांकडे आला आणि जादा कुमक मिळण्याची अत्यंत गरज असल्याचे धिटाईने आणि मोठ्या आवाजात नेपोलिअनला तो सांगू लागला, ' सम्राटांनी आणखी एक डिव्हिजन पुरवली तर आपण खात्रीनं रशियन सैन्याचा निःपात करू '

नेपोलिअनने खांदे उडवले. तो येरझाऱ्या घालू लागला.

' बेलिअर्ड, तू अगदी धांदरट आहेस. ' त्याच्याकडे जाऊन नेपोलिअन म्हणाला, ' ऐन लढाईत चुका होणं सहज शक्य असतं. जाऊन व्यवस्थित निरीक्षण कर आणि मगच माझ्याकडे ये. ' बेलिअर्ड दिसेनासा होण्याआधी दुसरा एकजण निरोप घेऊन रणक्षेत्राच्या दुसऱ्या भागाकडून आला.

पुन्हापुन्हा येणाऱ्या व्यत्ययांनी त्रस्त झालेल्या माणसाच्या स्वरात नेपोलिअन मनाशी म्हणाला, ' आता आणखी काय आणलं आहे यानं ! '

' महाराज, प्रिन्स... ' ॲडज्युटंट बोलू लागला तोच रागीट मुद्रा करून नेपोलिअनने विचारले. ' जादा कुमक मागत आहेत असंच ना ? ' ॲडज्युटंटने होकारार्थी मान झुकवली. तो आणखी काही निरोप सांगणार होता. परंतु सम्राटाने त्याच्याकडे पाठ फिरवली, दोन पावले तो त्याच्यापासून दूर सरकला. मग थांबून मागे वळून त्याने बर्थिएला खुणेने बोलावून घेऊन, थोडेसे हातवारे करीत त्याने म्हटले, ' आपणाला जादा कुमक पाठवणं भाग आहे. कुणाला तिकडे पाठवू ? तुझं काय मत ? '

' क्लॅपारेदची डिव्हिजन पाठवावी ' बर्थिएने उत्तर दिले. नेपोलिअनने संमतीदाखल मान हालवली. थोड्या वेळात म्हटले, ' नको. फ्रिअंटची डिव्हिजन पाठवा. '

इतरांप्रमाणेच फ्रिअंटची डिव्हिजन लढाईच्या मैदानातील धुरात दिसेनाशी झाली. सर्व दिशांतून घोडे पिटाळीत ॲडज्युटंट येतच होते. आणि सगळेजण संगनमत केल्यासारखे तीच ती बातमी सांगत होते. सर्वजण जादा कुमक मागत होते. सगळेजण सांगत होते.—' रशियन सैन्य ठाम राहून गोळ्यांचा प्रचंड भडिमार करीत आहे. आणि त्यामुळे फ्रेंच सैन्य वितळून गेल्यासारखे नाहीसे होत आहे. '

एखादा जुगारी बेफिकिरीने जुगारात पैसे लावत असतो आणि नेहमीच जिंकत असतो. सगळ्या आकस्मिक गोष्टी लक्षात घेऊन अतिशय काळजीपूर्वक पैसे लावल्यानंतर लागलीच

त्याच्या एकाएकी लक्षात येते की, आपण काय होणार याचा जो जो विचार करत आहोत तो तो आपण हरणार असल्याची आपली खात्री होत आहे. अशा सुदैवी जुगाऱ्याची घोर निराशा नेपोलिअनच्या वाट्याला आली होती.

त्याचे सैनिक तेच होते. त्याचे जनरल तेच होते. पूर्वीसारखीच त्यांनी युद्धासाठी तयारी केली होती. सैन्याची रचना तशीच होती. छोटा आणि उत्साही असा जाहीरनामाही तोच होता. स्वतः नेपोलिअनही तोच होता. पूर्वीपेक्षा आपण अधिक अनुभवी आहोत, असे त्यास वाटत होते. ऑस्टरलिट्स आणि फ्रीडलॅण्ड येथील शत्रूसारखाच हाही शत्रू होता. आपल्या हाताच्या दुर्निवार इशाऱ्यांची शक्ती कसल्यातरी जादूने नष्ट झाली आहे असे त्याला वाटू लागले.

सर्व दिशांनी एकाच तऱ्हेच्या बातम्या येऊ लागल्या.—सैनिक मरण पावले, सैनिक जखमी झाले, जादा कुमकेची जरुरी आहे, सैन्य विस्कळीत बेशिस्त झाले आहे, रशियनांनी हालचाली अशक्य केल्या आहेत.

जास्तीत जास्त शिकस्त करून आठ तास महाप्रयास करून चढवलेला हल्ला अयशस्वी झाला होता. युद्धाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या नेपोलिअनला या घटनेचा अर्थ चांगलाच उमगला होता. हे अपयश जवळजवळ पराजयाच्या बरोबर आहे, युद्धाच्या आणीबाणीच्या ह्या काळात आपला आणि आपल्या सैन्याचा पाडाव होण्याचा योग फार दूर नाही हे त्याला कळून चुकले.

तो काही न बोलता दोन्ही कोपर गुडघ्यांवर ठेवून आणि दोन्ही हातांनी डोके धरून स्टुलावर बसला होता. बर्थिए त्याच्या जवळ येऊन म्हणाला, ' आपण आघाडीची तपासणी करून परिस्थिती निश्चितपणे जाणून घेऊ. '

' काय ? काय म्हणालास ? ठीक तर. माझा घोडा आणायला सांग !' असे म्हणून घोड्यावर स्वार होऊन तो सेम्यनॉवस्कीला निघाला.

ज्या मैदानातून नेपोलिअन चालला होता त्यावरील धूर आता विरळ होत चालला होता. मैदानात काही ठिकाणी एखादा सैनिक, एखादा घोडा, काही ठिकाणी सैनिकच्या सैनिक अगर घोडेच्या घोडे रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. कितीतरी माणसे आणि जनावरे लहानशा क्षेत्रात मारली गेली होती. नेपोलिअनने आणि त्याच्या जनरलांनी इतके भीषण दृश्य यापूर्वी केव्हाच पाहिले नव्हते. सतत दहा तासांवर चालू असलेल्या तोफांच्या धडधडाटाने कानठळ्या बसल्या होत्या आणि त्या दृश्याला चलच्चित्रपटाला संगीताने साथ मिळावी तशी वेगळीच कळा प्राप्त झाली होती.

जे चालले होते त्याला लढाई म्हणता आले नसते. तिथे दीर्घकाळ संहार चालला होता. त्या संहाराचा उपयोग फ्रेंचांना होणार नव्हता, आणि रशियनांही होणार नव्हता.

नेपोलिअनने लगाम खेचले आणि तो कसल्यातरी दिवास्वप्नात रंगला. बर्थिएने त्याला त्यातून जागे केले. नेपोलिअनला आपल्यासमोर आणि भोवती जे चालले होते ते थांबवता येत

नव्हते. त्याचे नेतृत्व खरेतर त्यानेच केले होते. आता अपयश आल्यानंतर त्याला हे सारे अनावश्यक अणि भीषण वाटू लागले. एका जनरलने आपला घोडा नेपोलिअनजवळ नेला आणि मोठे धाडस करून त्याला सुचवले, ' आता ओल्ड गार्डीनी ( साम्राज्याच्या संरक्षक सैनिकांनी ) युद्ध करायला बाहेर पडावे. ' ते आणि बर्थिए जवळच उभे होते. त्यांनी एकमेकां-कडे पाहिले आणि त्या जनरलने केलेल्या भरमसाट सूचनेला ते तुच्छतेने हसले.

नेपोलिअन खाली मान घालून स्तब्ध होता.

' आपण फ्रान्सपासून चोवीसशे मैल दूर आहोत. मी माझ्या ' ओल्ड गार्डींचा ' नाश होऊ देणार नाही ' असे म्हणून आपला घोडा फिरवून तो शेवर्डिनॉला निघाला.

कुटूझॉफचे शुभ्र केसांचे डोके खाली झुकले होते. त्याचा लठ्ठ अवजड देह बाकावर विसावला होता. त्याने रग लपेटून घेतला होता. पीएरने त्याला सकाळी पाहिले होते त्याच ठिकाणी तो बसला होता. तो हुकूम सोडीत नव्हता. त्याच्यापुढे करण्यात येणाऱ्या सूचनांना तो संमती देत होता, नाहीतर त्या अव्हेरीत होता.

निरनिराळ्या सूचना मांडल्या गेल्या की तो म्हणे, ' ठीक आहे. मग तसं कर. बेटा, करायला लाग.' असे तो जवळ असलेल्या ॲडज्युटंटला मग दुसऱ्या ॲडज्युटंटला मोठ-मोठ्याने सांगे. नाहीतर म्हणे, ' खरं म्हणजे असं नको. आपण थोडा वेळ दम धरू.' आलेल्या बातम्या तो ध्यानपूर्वक ऐके. कुणी विचारलेच तर तो हुकूम देई. पण बातमी ऐकत असताना तो उच्चारलेल्या शब्दांच्या अर्थामधे फारसा रस घेत असल्याचे दिसत नसे. सांगणाऱ्याच्या मुद्रेवरील हावभावातील अगर त्याच्या आवाजातील दुसरेच काहीतरी त्याला आवडत असल्याचे दिसे. लष्करातील प्रदीर्घ अनुभवाने तो बऱ्याच गोष्टी शिकला होता आणि वार्धक्यातील शहाणपणामुळे तो बऱ्याच गोष्टी ओळखून होता. मृत्यूशी झुंज देणाऱ्या लाखो माणसांना एकटा मनुष्य मार्गदर्शन करू शकत नाही. कमांडर-इन्-चीफने दिलेले हुकूम, सैन्याला मिळालेली जागा, तोफांची संख्या, मृत सैनिकांची संख्या यांपैकी कोणत्याही गोष्टीवर लढायांचे भवितव्य ठरत नाही. ते ठरते स्पर्श न करता येणाऱ्या शक्तीवर. सैन्याच्या हिमतीवर. त्याने ती शक्ती समजून घेतली आणि आपल्याकडून शक्य होईल तेवढे नेतृत्व केले.

तीन वाजता फ्रेंचांचे हल्ले थांबले. लढाईच्या मैदानावरून आलेल्यांच्या तसेच भोवताली उभे असलेल्यांच्या मुद्रांवर आत्यंतिक परिश्रमाने आलेला ताण कुटूझॉफच्या नजरेतून सुटला नाही. अपेक्षेहून त्या दिवशी खूप यश मिळाले होते त्यामुळे तो समाधानात होता. परंतु तो वृद्ध शरीराने अगदी दुर्बळ झाला होता. पुष्कळ वेळा तो खाली पडल्यागत त्याचे डोके खाली झुकत होते. तिथेच त्याला झोप लागली. त्याचे जेवण आणण्यात आले.

कुटूझॉफ जेवण घेत असताना ॲडज्युटंट-जनरल वॉल्ट झॉगन त्याच्याकडे आला. डाव्या

बाजूला लढाई कशी चालली आहे हे सांगण्यासाठी वॉल्ट झॉगन बार्क्लीकडून आला होता. बार्क्लीं द टॉल्य तसा चलाख असामी होता. कित्येक जखमी सैनिक रणांगणातून पळ काढू लागले. सैन्यात शिस्त राहिली नाही. तेव्हा परिस्थितीचा सर्व तऱ्हेने अंदाज घेऊन लढाईत पराभव झाला अशी त्याने मनाची खात्री करून घेतली, आणि ही बातमी कमांडर-इन्-चीफच्या कानांवर घालण्यासाठी आपल्या आवडत्या अॅडज्युटंटला त्याने पाठवले होते.

कुट्रझॉफ मोठ्या कष्टाने भाजलेली कोंबडी चघळत होता. वॉल्टझॉगनला पाहताच त्याने मोठ्या उत्साहाने आपले डोळे किलकिले केले.

काहीशा तिरस्कारानेच स्मित करीत, टोपीला हातही न लावता वॉल्टझॉगन निष्काळजीपणाने कुट्रझॉफकडे आला. ' माझ्यासारखा उच्च शिक्षित लष्करी मनुष्य ह्या निरुपयोगी म्हाताऱ्याला अलौकिक अद्भुत गोष्ट मानणार नाही. तुम्ही रशियनांनी हवे तर तसे माना. कसल्या प्रकारच्या माणसाशी आपल्याला व्यवहार करायचा आहे याची मला चांगलीच जाणीव आहे.' असे दाखवून देण्यासाठी वॉल्टझॉगन कमांडर-इन्-चीफशी मुद्दाम काहीशा उपेक्षेनेच वागत होता. त्याच्या जर्मन गोटात ' म्हातार बाबा ' असा कुट्रझॉफचा उल्लेख होई. कुट्रझॉफच्या समोरील अन्नाकडे रोखून पाहात त्याने त्याला बार्क्लीचा निरोप सांगितला, आपली मतेही ऐकवली. ' आपल्या मान्याच्या जागा शत्रूच्या हाती गेल्या आहेत. आपल्याकडे सैन्य नसल्याने शत्रूच्या सैनिकांना मागे पिटाळणे अशक्य आहे. आपले सैनिक पळ काढताहेत त्यांना थोपवून धरणं शक्य होत नाही '

कुट्रझॉफ चघळणे थांबवून वॉल्टझॉगनकडे आश्चर्याने रोखून पाहू लागला. जणू त्याला त्याचे म्हणणेच कळले नव्हते अशा तऱ्हेने पाहू लागला. त्याच्या अंतःकरणातील खळबळ जाणून वॉल्टझॉगन स्मित करीत त्याला म्हणाला, ' महाराज मी जे पाहिलं ते आपणापासून दडवून ठेवण्याचा हक्क मला नाही असं मी समजतो...आपलं सैन्य पूर्ण जमीनदोस्त झालं आहे.'

' तुम्ही स्वतः पाहिलंत? स्वतः?' ताडकन उठून वॉल्टझॅगनकडे जोराने जात कुट्रझॉफने ओरडून विचारले. आपल्या थरथरत्या हातांनी त्याला धमकावल्यासारखे करीत त्याने विचारले. ' इतकं धाडस अं?' त्याचा श्वास किंचितकाळ थांबला. ' मला-मला असं सांगण्याचं धाडस तुम्हाला कसं झालं? तुम्हाला काहीच ठाऊक नाही. जनरल बार्क्लीला माझा निरोप सांग—' तुझी माहिती चुकीची आहे. मला–कमांडर-इन्-चीफला लढाई कशी चालली आहे त्याचं ज्ञान तुझ्याहून अधिक आहे."

वॉल्टझॉगन त्याला अडवण्यासाठी काहीतरी बोलणार होता, पण कुट्रझॉफने त्याला बोलू दिले नाही. ' डाव्या बाजूला शत्रूला परतवून लावण्यात आलं आहे. उजव्या बाजूला त्यांचा पाडाव झाला आहे. तुम्ही जर काही भलतंच पाहिलं असेल तर आपल्याला न कळणाऱ्या गोष्टीबद्दल तोंड बंद ठेवण्याची काळजी घ्या. कृपा करून जनरल बार्क्लीकडे जा आणि त्यांना सांगा–उद्या फ्रेंचांवर हल्ला करण्याचा मी पक्का निश्चय केला आहे.' कुट्रझॉफचा आवाज

करडा झाला.

सगळेजण स्तब्ध होते. वृद्ध जनरलच्या धापांखेरीज दुसरा आवाज ऐकू येत नव्हता. ' शत्रूला सगळ्या ठाण्यांहून पिटाळून लावलं आहे. त्याबद्दल मी परमेश्वराचा आणि माझ्या शूर सैनिकांचा आभारी आहे. शत्रूचा पराभव झाला आहे. उद्या आपण त्याला रशियाच्या पवित्र भूमीच्या बाहेर हुसकावून लावू या.' छातीशी क्रूसाची खूण जुळवीत कुटूझॉफ म्हणाला. एकाएकी त्याच्या डोळ्यांत अश्रू आले आणि त्याने हुंदका दिला.

वॉल्टझॅगनने खांदे उडवले आणि काही न बोलता पाय काढता घेतला.

दोन वाजेपर्यंत राखीव सैन्याला सेम्यनॉव्स्कॉयच्या मागे जोराच्या तोफखान्याच्या भडिमाऱ्यात अगदी निष्क्रिय अवस्थेत ठेवण्यात आले होते. प्रिन्स आन्द्रेची रेजिमेंट याच राखीव सैन्यात होती. दोन वाजेपर्यंत त्या रेजिमेंटमधील दोनशे सैनिक ठार झाले. दोन वाजण्यापूर्वी ती रेजिमेंट सेम्यनॉव्स्कॉय आणि तटबंदीवरील तोफखाना यांमधील तुडवून टाकलेल्या ओटच्या शेतात हालवण्यात आली. त्या दिवशी त्या जागी हजारो माणसे मारली गेली. त्याच जागेवर लक्ष केंद्रित करून शत्रूच्या हजारो तोफांनी मारा सुरू ठेवला.

रेजिमेंटने जागा सोडली नाही. दारूगोळ्याचा उपयोग करून एकही फैर झाडली नाही. रेजिमेंटमधील एकतृतीयांश माणसे पुन्हा कामी आली. समोरून आणि विशेषतः उजव्या बाजूकडून न विरणाऱ्या धुरातून तोफा सारख्या धडधडत होत्या. समोरचा सगळा प्रदेश झाकून टाकलेल्या धुराखालील गूढ प्रदेशातून तोफांचे गोळे फुत्कारत वेगाने उडत येत होते. आणि सूंसूं करीत हातगोळे सावकाश येत होते. काही काळ त्यांना जणू श्वास घ्यायला फुरसत देण्यासाठी चांगली पंधरा मिनिटे तोफांचे गोळे आणि हातगोळे त्यांच्या डोक्यावरून उडत जात होते. केव्हा केव्हा मिनिटाभरात रेजिमेंटचे कित्येक सैनिक त्या गोळ्यांनी जमीनदोस्त होत. मृत सैनिकांना ओढून टाकण्यात आणि जखमींना हालवण्यात सैनिकांचा सर्व वेळ जात होता.

सगळे सैनिक सारखेच उदास आणि स्तब्ध होते. क्वचित मधून मधून रांगांमधे कुणीतरी बोलू लागे पण जेव्हा धपकन पडल्याचा आवाज ऐकू येई आणि ' स्ट्रेचर आणा ' असे कुणीतरी ओरडे मग बोलणे बंद होई. अधिकाऱ्याच्या हुकमानुसार बराचसा काळ सैनिक जमिनीवर बसून घालवीत होते. एकाने आपली शॅको ( लष्करी टोपी ) काढून सैल केली आणि मग तिच्या चुण्या नीट केल्या. दुसऱ्याने दोन्ही हातांनी कोरडी माती चुरडली आणि तिने संगिनीचे पाते घासायला सुरुवात केली. एकाने खांद्यावरील पट्ट्याचे बकल काढले आणि पुन्हा नीट लावले. दुसऱ्याने मोठ्या काळजीपूर्वक पायाचे बँडेज सोडले आणि पुन्हा गुंडाळून ठेवले. मग आपले बूट बदलले. माणसे मारली जात होती; जखमी होत होती. जखमींना नेणाऱ्या

स्ट्रेचरांची रांग लागत होती. रशियन सैनिक माघार घेत होते. धुरातून पलीकडचे असंख्य शत्रुसैनिक दिसत होते पण इथले सैनिक कशाचीच दखल घेत नव्हते. रशियन तोफखाना किंवा घोडदळ पुढे जाऊ लागले. पायदळ पुढे कूच करू लागले म्हणजे मात्र सर्व बाजूंनी संमतिदर्शक आरोळ्या ऐकू येत. लढाईशी काहीही संबंध नसलेल्या आगांतुक गोष्टींकडे त्यांचे जास्त लक्ष जाई. जणू मनावर अतिशय ताण पडलेल्या या माणसांना दैनंदिन जीवनातील साध्या साध्या गोष्टींत मनःशांती लाभत असावी. तोफांच्या तुकड्या त्यांच्या आघाडी समोरून जाऊ लागल्या. दारूगोळा वाहून नेणाऱ्या गाड्यांपैकी एका गाडीच्या घोडीचा पाय पट्ट्यात सापडला होता.

'अरे ! अरे ! घोडीचा पाय पट्टयात सापडलाय. तो काढून घ्या. नाहीतर ती पडेल... अरे दिसतेय की नाही ?...' रेजिमेंटमधील सर्व रांगांतून सैनिक ओरडत होते.

एकदा तर एका छोट्या तपकिरी कुत्र्याने सगळ्यांचे लक्ष आपल्याकडे खेचून घेतले. तो कुठून आला होता कुणाला ठाऊक नव्हते. आपले शेपूट वर उंच धरीत तो धांदरटपणे सैनिकांच्या रांगांसमोर धावत होता. एकाएकी तोफेचा गोळा त्याच्या जवळ येऊन आदळला. तसा तो केकाटला आणि शेपूट पायात घालून धूम पळत सुटला. सगळ्या रेजिमेंटांमधून सैनिक ओरडले आणि हास्याचा कल्लोळ उठला. अशा तऱ्हेने बाजूला लक्ष नेणाऱ्या गोष्टी एखाद्या मिनिटापेक्षा अधिक वेळ टिकत नव्हत्या. ती माणसे गेले आठ तास अन्नावाचून आणि कसल्याही कामावाचून होती. क्षणभरही त्यांच्या मनातून मरणाचे भय दूर होत नव्हते. त्यांचे निस्तेज फिकट चेहरे आणखीन निर्जीव होत होते.

रेजिमेंटमधील इतरांप्रमाणे प्रिन्स आन्द्रेही निस्तेज, फिकट पडला होता. हात पाठीशी बांधून आणि जमिनीवर नजर खिळवून तो ओटच्या शेताजवळ असलेल्या कुरणातून एका हद्दीपासून दुसऱ्या हद्दीपर्यंत येरझारा घालीत होता. त्याला हुकूम देण्याची गरज नव्हती. त्याला काही काम नव्हते. प्रत्येक गोष्ट आपोआप होत होती. मृत सैनिक आघाडीवरून दूर ओढून नेण्यात येत होते, जखमींना हालवले जात होते. रांगा एकत्र केल्या जात होत्या. जर काही सैनिक दूर पळाले असले तर ते एकदम घाईघाईने मागे येत होते. सैनिकांचा उत्साह टिकवणे आपले काम आहे असे समजून प्रिन्स आन्द्रे त्यांच्यासमोर आदर्श ठेवण्यासाठी सैन्यातून फिरत होता. पण त्यांना शिकवण्याजोगे आपणाकडे काही नाही असे लवकरच त्याला वाटू लागले.

तो कुरणातून पावले ओढीत चालला होता. त्यामुळे गवत सरसरत होते. बुटांवर साचणाऱ्या धुळीकडे त्याची नजर जात होती. मग तो गवत कापून गेलेल्या माणसांच्या पावलांच्या मागावर पावले टाकीत जाऊ लागला. नंतर आपली पावले मोजून एका हद्दीपासून दुसऱ्या हद्दीपर्यंत किती वेळा गेल्यावर एक मैल पुरा होईल याचा हिशेब करू लागला. मग तो खाचेतून उगवलेली कडू दवण्याची फुले खुडू लागला. हाताने चुरगाळून त्यांचा उग्रमधुर गंध हुंगू लागला. कालच्या विचारांचा आता मागमूसही राहिला नव्हता. त्याच्या मनात

कसलेच विचार उरले नव्हते. तोफांच्या धडधडाटामागून सूंसूं करीत येणाऱ्या गोळ्यांचा आवाज पूर्वीसारखाच चालू होता. ते आवाज तो त्रस्तपणे ऐकत होता. पहिल्या बटालिअनच्या सैनिकांचे चेहरे बघून त्याला केव्हाच कंटाळा आला होता. तरीही तो त्यांच्या चेहऱ्यांकडे बघत वाट पाहात राहिला. 'हा गोळा आला...हा पुन्हा आमच्यासाठीच आहे.' धुराने व्यापलेल्या प्रदेशातून उडत येणाऱ्या वस्तूचा सूंसूं आवाज ऐकून तो स्वतःशीच म्हणाला, 'हा आणखी एक ... आणखी एक...पडला खाली.' तो चटकन थांबून सैनिकांकडे पाहू लागला. 'तो गोळा पडला नाही. तो उडून दूर गेला. तो गोळा मात्र पडला.'

तेवढ्यात सूंसूं आवाज झाला. त्या मागोमाग काहीतरी धप्पकन पडल्याचा आवाज ऐकू आला. त्याच्यापासून पाचसहा पावलांवर तोफेचा गोळा जमिनीत रुतला आणि कोरडी माती उखडून वर उडाली. त्याच्या मणक्यातून एक शिरशिरी उठली. त्याने सैनिकांकडे पाहिले. बहुधा बऱ्याच जणांना तडाखा बसला असावा. सैनिक दुसऱ्या बटालिअनमधे गोळा झाले.

त्याने एड द् कँपला ओरडून सांगितले, 'सैनिकांना एकत्र गर्दी करून राहू देऊ नका.'

त्याची सूचना अमलात आणून ॲडज्युटंट प्रिन्स आन्द्रेकडे जाऊ लागला. ज्याच्या नेतृत्वाखाली बटालिअन होती तो मेजर दुसऱ्या बाजूकडून घोडा पिटाळीत आला.

'सांभाळा' एका सैनिकाने भयभीत आरोळी दिली. पंखांनी भर्र आवाज करीत वेगाने पृथ्वीवर उतरणाऱ्या पक्ष्याप्रमाणे एक गोळा भिरभिरत येऊन प्रिन्स आन्द्रेपासून दोन पावलांवर मेजरच्या घोड्याजवळ धप्पकन आपटला. भीती दाखवणे योग्य की अयोग्य याचा विचार घोड्याने केला नाही. फुरफुरत मागे न वळता मेजरला पाठीवरून फेकून देऊन तो चौखूर उधळला.

स्वतः जमिनीवर पालथे होत ॲडज्युटंट ओरडला, 'पडून घ्या.' काही न सुचून प्रिन्स आन्द्रे उभाच राहिला. त्याच्या आणि पालथा पडलेल्या ॲडज्युटंटमधे कुरण आणि शेत यांमधील खाचेतील झुडपाजवळ तो गोळा एखाद्या भोवऱ्याप्रमाणे फिरत धूर सोडीत होता.

गवत, दवण्याचे झुडूप आणि फिरणाऱ्या भोवऱ्यातून निघालेले धुराचे वेटोळे याकडे पाहताच प्रिन्स आन्द्रेच्या मनात सर्वस्वी नवीन हुरहूर निर्माण झाली. आणि तो स्वतःशी म्हणू लागला, 'माझा मृत्यू जवळ आला का? मी मरू शकत नाही. नाही, मला मरायचं नाही. जीवनावर माझं प्रेम आहे. हे गवत, ही जमीन, ही हवा...ह्या सगळ्या गोष्टी मला आवडतात.'

त्याच्या मनात हे विचार येत होते. त्याच वेळी आजूबाजूची माणसे आपणाकडे पाहात आहेत हे त्याला जाणवत होते. तो ॲडज्युटंटला म्हणाला, 'मोठ्या शरमेची गोष्ट आहे...' पुढे तो बोलू शकला नाही. चिनी मातीची भांडी फुटावी तसा एकाएकी काहीतरी फुटल्यातडकल्याचा आवाज झाला...गुदमरवून टाकणारा धूर निघाला. प्रिन्स आन्द्रे गरगर फिरवला गेला. एक हात बाजूला फेकीत तो पालथा पडला.

कित्येक अधिकारी त्याच्याकडे धावले. त्याच्या पोटाच्या उजव्याबाजूकडून बाहेर पडणारे रक्त गवतावर पसरू लागले. त्याच्या श्वासाच्या धापा जोराजोराने सुरूच होत्या.

' अरे बघता काय ? कामाला लागा. '

तशी ते शिबंदीचे सैनिक जवळ आले. आणि त्याचे पाय व खांदे धरून त्यांनी त्याला वर उचलले. त्याचे आर्त कण्हणे ऐकून एकमेकांकडे पाहात त्यांनी त्याला खाली ठेवले.

' त्याला उचलून घ्या. स्ट्रेचरवर ठेव. काही बिघडत नाही. ' कुणीतरी ओरडला. त्यांनी पुन्हा त्याला खांद्यांना धरून उचलले आणि स्ट्रेचरवर झोपवले.

' अरे देवा ! हे काय ? पोटाला जखम ? मग संपलेच ! फार वाईट ' अधिकाऱ्यांचे आपापसातील बोलणे ऐकू येत होते. ' माझ्या कानाला खरचटून गेला. ' अॅडज्युटंट बोलत होता. खांद्यावर स्ट्रेचर घेतलेले शेतकरी मळलेल्या वाटेवरून अँब्युलन्सकडे घाईघाईने जायला निघाले.

शिबंदीच्या सैनिकांनी प्रिन्स आन्द्रेला झाडीत आणले. त्या ठिकाणी गाड्या होत्या, फिरते इस्पितळ केंद्र होते. इस्पितळासाठी बर्चच्या राईच्या कडेशी तंबू उभारण्यात आले होते. अरण्यात अँब्युलन्स गाड्या आणि घोडे उभे होते. घोडे तोंडाशी बांधलेल्या पिशव्यांतील ओट चघळीत होते. चिमण्या तिथे उडून येत होत्या आणि घोड्यांनी उडवलेले धान्य वेचीत होत्या. रक्ताचा वास येऊन की काय कावळे बर्चच्या राईतून अधीरतेने ओरडत सारखे फिरत होते. वेगवेगळ्या तऱ्हेचे पोषाख केलेली आणि रक्ताने माखलेली माणसे तंबूच्या बाहेरील पाच एकर प्रदेशात बसून किंवा पडून होती. तंबूतून आरडाओरड, रागाचा आक्रोश आणि आर्त विव्हळणे ऐकू येत होते. मधून मधून डॉक्टरांचा मदतनीस पाण्यासाठी किंवा कोणाला उपचारासाठी आत न्यायचे ते सांगण्यासाठी बाहेर येई. आपली पाळी कधी येते याची वाट पाहात तंबूच्या दाराशी नसलेले जखमी सैनिक घोगऱ्या आवाजात कण्हत व विव्हळत होते, रडत होते. ओरडत होते. शिव्याशाप देत होते नाहीतर व्होडका मागत होते. काहीजण चित्त-भ्रम झाल्याने जोरजोराने बडबडत होते. प्रिन्स आन्द्रे कर्नल असल्याने त्याला त्या गर्दीतून एका तंबूजवळ नेण्यात आले. त्या ठिकाणी त्याला वाहून आणणारे शेतकरी पुढील सूचनांची वाट पाहात राहिले. प्रिन्स आन्द्रेने डोळे उघडले पण बराच काळ आपल्या भोवती काय चालले आहे हे त्याला कळेना. ते कुरण, ते दवण्याचे झुडूप, गरगरणारा काळा चेंडू आणि त्याची तीव्र जीवनलालसा या साऱ्याच गोष्टी त्याला अडवू लागल्या.

' आता त्यात काय फरक पडणार आहे ? तिथं काय असणार आहे ? इथं तरी काय राहिलं आहे ? मरणाचा प्रसंग आला तेव्हा मी दुःखी का झालो ? मला समजलं नाही आणि आजही समजत नाही असं काहीतरी या जीवनात होतं खरं...'

तंबूमधे तीन टेबले होती. दोन टेबलांवर जखमींना ठेवण्यात आले होते. तिसऱ्या टेबलावर त्यांनी प्रिन्स आन्द्रेला ठेवले.

काही वेळ त्याच्याकडे कुणी लक्ष दिले नाही. इतर टेबलांवर जे चालले होते त्याचा तो अनिच्छेने साक्षीदार झाला. अगदी जवळच्या टेबलावर तार्तर बसला होता. जवळच फेकून देण्यात आलेल्या गणवेशावरून तो बहुधा कोसॅक रेजिमेंटमधील सैनिक होता असे प्रिन्स आन्द्रेला वाटले. चार सैनिकांनी त्याला धरून ठेवले होते. एक चष्मेवाला डॉक्टर त्या तार्तराच्या तपकिरी भरभक्कम पाठीतून काहीतरी काढत होता.

'ओऽय, ओऽय—' तार्तर डुकरासारखा कण्हू लागला. मग एकाएकी आपला उन्हाने रापलेला मोठाला चेहरा त्याने वर करून आपले पांढरेधोप दात दाखवीत तो विव्हळू लागला, हिसके देऊ लागला आणि भेदक, कर्कश व दीर्घ अशा किंकाळ्या मारू लागला. दुसऱ्या टेबलाभोवती बरीच माणसे उभी होती. त्या टेबलावर धिप्पाड धडधाकट मनुष्य मान मागे टाकून उताणा झोपला होता. त्या माणसाचा रंग, केसांचा कुरळेपणा, त्याचा बांधा का कोण जाणे प्रिन्स आन्द्रेला परिचित वाटला. कित्येक मदतनीस त्या माणसाला धरून ठेवून त्याच्या छातीवर भार ठेवून होते. त्याचा एक गोरा, स्थूल पाय सारखा हालत होता. मधून मधून जोराने हिसके देत होता. तो माणूस हुंदके देत होता. त्याचा श्वास थांबत होता आणि त्याला फेफरे येऊ लागले होते. दोन डॉक्टरांपैकी एकजण पांढरा फटक पडला होता आणि थरथर कापत होता. काही न बोलता त्या माणसाच्या रक्ताने माखलेल्या दुसऱ्या लाल पायांवर काहीतरी उपाय करण्यात मग्न झाले होते. तार्तरावरील शस्त्रक्रिया आटोपल्यावर त्याच्यावर झगा टाकण्यात आला. मग चष्मेवाला डॉक्टर आपले हात पुशीत प्रिन्स आन्द्रेकडे वळला.

त्याने प्रिन्स आन्द्रेच्या चेहऱ्याकडे नजर टाकली आणि लागलीच वळून तो रागारागाने आपल्या मदतनिसाला ओरडून बोलला, 'ह्याचे कपडे काढ. वेळ फुकट कशाला घालवतो आहेस?'

मदतनिसाने बाह्या वर सारून घाईघाईने प्रिन्स आन्द्रेची बटणे काढून त्याचे कपडे काढायला सुरुवात केली. तेव्हा त्याला आपले खूप दिवसांपूर्वीचे बालपण आठवू लागले. डॉक्टरने अगदी जवळ वाकून जखम चाचपून पाहिली. आणि एक दीर्घ उसासा टाकला. मग त्याने कुणाला तरी इषारा केला. पोटातील आत्यंतिक वेदनेमुळे प्रिन्स आन्द्रेची शुद्ध हरपली. त्याच्या मांडीतील मोडलेल्या हाडाचे तुकडे बाहेर काढण्यात आले. फाटलेल्या मांसाचे तुकडे कापून काढण्यात आले आणि जखम बांधण्यात आली. त्यानंतर केव्हातरी प्रिन्स आन्द्रे शुद्धीवर आला. त्याच्या तोंडावर पाणी शिंपडण्यात आले. त्याने डोळे उघडताच डॉक्टर त्याच्या जवळ झुकला. काही न बोलता त्याच्या ओठाचे चुंबन घेऊन तो घाईघाईने गेला.

यातना सोसून झाल्यानंतर प्रिन्स आन्द्रेला आनंदमय शांतीचा अनुभव आला. कित्येक दिवस असा अनुभव त्याला माहीत नव्हता. जीवनातील अत्युत्तम व अत्यंत सुखाचे क्षण –विशेषतः अगदी बाल्यातले–त्याच्या मनश्चक्षूंसमोर तरळू लागले. तो अगदी लहान असतान त्याचे कपडे काढून त्याला अंथरुणात ठेवले जाई. त्याची दाई त्याच्यावर झुकून अंगाई गात

असे. तो उशीत डोके खुपसून पडून राही. त्या वेळी त्याला जगण्याच्या केवळ जाणिवेत आनंद वाटत असे. भूतकाळातील हे सगळे क्षण आपण आता प्रत्यक्ष अनुभवीत आहोत असे त्याला वाटू लागले.

डॉक्टर ज्या माणसाची शुश्रूषा करण्यात गढले होते. त्या माणसाचे डोके आपल्या काहीसे परिचयाचे आहे असे प्रिन्स आन्द्रेला वाटले.

त्या माणसाला वर उचलून ते त्याचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करीत होते. ' मला दाखवा ना...ओय...ओय ' त्याचे भयभीत दयनीय कण्हणे आणि मधूनमधून त्याने दिलेले हुंदके प्रिन्स आन्द्रेच्या कानावर पडत होते. त्याचे कण्हणे ऐकून प्रिन्स आन्द्रेला रडावेसे वाटू लागले.

त्या जखमी माणसाला त्यांनी त्याचा तोडलेला पाय दाखवला. त्या पायात बूट होता आणि तो पाय रक्ताने माखलेला होता. ' ओय-ओय ' तो हुंदके देत होता. जवळ उभ्या असलेल्या डॉक्टरने त्याचा चेहरा झाकून तिथून पाय काढला.

' अरे देवा ! हे कसं काय घडलं ? हा इथं कसा आला ? ' प्रिन्स आन्द्रे मनाशी आश्चर्य करू लागला.

ज्याचा पाय नुकताच तोडला गेला होता तो दुःखी, कष्टी हुंदके देणारा तिरस्कारार्ह प्राणी अनातोल कुरॅगिन आहे हे त्याने ओळखले. त्या अनातोललाच त्यांनी सावरून धरले होते आणि पाण्याचा पेला त्याच्यासमोर धरला होता. आपल्या थरथरत्या सुजलेल्या ओठांनी अनातोलला पेल्याचा काठ पकडता येत नव्हता. ' होय. तोच तो मनुष्य आहे. कसं कोण जाणे माझ्यात व त्याच्यात अगदी जवळचं आणि क्लेशदायक नातं निर्माण झालं आहे.' पुढे काय होईल त्याची प्रिन्स आन्द्रेला कल्पना येईना. तरीही तो विचार करीत राहिला. ' त्या माणसाचा माझ्या बालपणाशी, माझ्या जीवनाशी संबंधच काय ? ' त्याला त्याचे उत्तर सापडेना आणि मग एकाएकी बालपणच्या निरागस व प्रेमळ विश्वातून एक नवीनच अनपेक्षित स्मृती त्याच्यासमोर टाकली. एकाएकी त्याला नताशा आठवली. १८१० मधल्या एका नृत्य-समारंभात त्याने प्रथम जिला पाहिले होते ती नताशा त्याच स्वरूपात त्याला आठवली. नाजुक मानेची आणि नाजुक हातांची, आनंदोत्सवाला सज्ज असलेली, भयभीत व सुखावलेल्या मुद्रेची नताशा त्याला आठवली आणि तिच्याबद्दल त्याला कधी वाटले नव्हते इतके उत्कट प्रेम वाटू लागले. अश्रूंनी भरलेल्या सुजलेल्या डोळयांनी संदिग्ध दृष्टी लावणाऱ्या त्या माणसाचे आणि आपले नाते त्याला आता आठवले. त्याला सगळ्या गोष्टी आठवल्या. यातना भोगणाऱ्या त्या माणसाबद्दल वाटणाऱ्या तीव्र अनुकंपेने आणि प्रीतीने त्याचे सुखी अंतःकरण तुडुंब भरले.

प्रिन्स आन्द्रेला आता आपले मन आवरता येईना. आपल्या देशबांधवांबद्दल, आपल्या-बद्दल, आपल्या आणि त्यांच्या चुकाबद्दल त्याला आपुलकी आणि प्रेम वाटू लागले. आणि त्याच्या डोळयांतून अश्रू आले. ' सर्वांबद्दल आपुलकी' आपल्या बांधवांवर प्रेम, आपल्यावर प्रेम करतात त्यांच्यावर प्रेम, आपला द्वेष करतात त्यांच्यावर प्रेम. शत्रूवर प्रेम. परमेश्वराने

पृथ्वीवर ह्याच प्रेमाची शिकवण दिली आहे. मारी मला ह्याच प्रेमाची दीक्षा द्यायचा प्रयत्न करीत होती, पण मला ते प्रेम समजलं नाही म्हणूनच माझं मरण जवळ आलं असताना मी दु:खी झालो. मी जिवंत राहिलो तर हे प्रेम मला मिळेल. पण आता मात्र खूप उशीर झाला आहे. ते प्रेम मिळेल असं मला वाटत नाही !"

■ ■

# भाग अकरावा

## १८१२

बोरोदीनोच्या रणक्षेत्रावर हजारो सैनिक कामी आले. उपचारकेन्द्रावर दोन एकर जमीन आणि गवत रक्ताने भिजून गेले होते. जखमी झालेले अगर न झालेले सैनिक रखडत रखडत सुरक्षिततेसाठी आपापल्या आघाड्यांमागे जात होते. उरलेले अजून मैदानात राहून गोळीबार करीत होते.

सकाळच्या किरणातील धुराचे लोट आणि चकाकणाऱ्या संगिनी यांमुळे चकचकीत प्रसन्न वाटणाऱ्या मैदानावर आता दमट धूर आणि धुक्याचे काळे ढग गोळा झाले होते. दारूगोळ्यांचा आणि रक्ताचा वास सुटला होता. वादळी ढग जेमा झाले होते; आणि मेलेल्या, जखमी झालेल्या, भयभीत झालेल्या, भांबावलेल्या, पार शिणून गेलेल्या सैनिकांवर हलका पाऊस पडत होता. जणू तो त्यांना म्हणत होता—' खूप झालं. थांबवा आता सारं. काय चालवलं आहे याचा विचार करा. '

लढाई संपता संपता सैनिकांना आपल्या कृत्यांची भयानकता जाणवली होती. लढाई त्यांनी आनंदाने थांबवली असती, तरीही कुठली तरी गूढ अगम्य शक्ती त्यांना कार्यप्रवृत्त करीतच होती. आता जे एक तृतीयांश गोलंदाज जिवंत राहिले होते ते घामाने भिजून गेले होते, दारूगोळ्यांनी माखून गेले होते आणि थकून धापा टाकीत होते. ते अजूनही दारूगोळा आणीत होते, तोफेत भरीत होते, तोफ फिरवून नेम धरीत होते आणि काडी लावीत होते. दोन्ही बाजूंकडून तोफांचे गोळे वेगाने आणि निर्दयपणे सुटत होते. मानवी शरीरे चिरडून टाकीत आपले भयंकर काम चालू ठेवीत होते.

फ्रेंच सैनिकांना गेल्या पंधरा वर्षांतल्या विजयांची आठवण होती. सर्वसंहारक बुद्धिमत्ता

असणाऱ्या नेपोलिअनवर त्यांची श्रद्धा होती. रणांगणावर हुकमत मिळवत असल्याची जाणीव होती. त्यांची एकचतुर्थांश माणसे काय ती कामी आली होती. संरक्षकदलातील वीस हजार गार्ड अगदी सुखरूप होते. ह्या सर्व गोष्टींमुळे फ्रेंच सैन्याला पुन्हा एकदा हल्ला चढवणे सोपे होते.

संध्याकाळच्या सुमारास बोरोदीनॉ येथील लढाई संपत येत असताना रशियन सैन्याला महान विजय मिळाला आहे अशी कुटूझॉफची पक्की खात्री झाली. त्याने तशा अर्थाचे पत्र झारला लिहिले. दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा एका नव्या हल्ल्याच्या तयारीत राहण्याचा त्याने आपल्या सैन्याला आदेश दिला, परंतु फ्रेंच पुन्हा हल्ला करीत आहेत आणि आपली रणांगणावर अपरिमित हानी होत आहे—आपले निम्मे सैन्य गारद झाले आहे अशा विश्वास न बसणाऱ्या वार्ता येऊ लागल्या. तशी त्याला हल्ल्याच्या योजना सोडून देणे भाग पडले. आता बचावासाठी लढणेही अशक्य झाले, तेव्हा त्याने माघार घेण्याचा आदेश दिला. मग नंतरचे तीन दिवस तो आपले सैन्य मागे मॉस्कोच्या दिशेने नेऊ लागला.

बोरोदीनॉ येथून माघार घेत जाणारे रशियन सैन्य फिलीजवळ म्हणजे मॉस्कोपासून सहाएक मैलांवर थांबले. कुटूझॉफ गाडीतून उतरून रस्त्याच्या कडेला असलेल्या बाकावर बसला. बरेच जनरल त्याच्याभोवती गोळा झाले. मॉस्कोहून परतलेला काउंट रास्तोप्चिन त्यांच्यात सामील झाला. बहुतेककरून ते आपापसात चर्चा करू लागले. तेथे जमलेल्यांपैकी कोणीही विनोद करीत नव्हता, हसत नव्हता, फार काय स्मितही करीत नव्हता. कमांडर–इन्–चीफ त्यांचे संभाषण लक्ष देऊन ऐकत होता. जवळ कोणी काही बोलला तर त्याबद्दल विचारीत होता. मात्र स्वतः संभाषणात भाग घेत नव्हता अगर आपले एखादे मतही व्यक्त करीत नव्हता.

बराच काळ कोणत्यातरी गटाचे संभाषण ऐकून झाल्यावर कुटूझॉफ तिथून निराश मुद्रेने उठला. जणू त्याने ऐकण्याजोगे काहीही त्या गटात कुणी बोलत नव्हते. काहीजण सैन्याला दिलेल्या मान्याच्या जागांवर टीका करीत होते. खरे तर ती टीका जागांवर नसून 'जागा निवडणाऱ्यांच्या बौद्धिक पात्रतेवर होती. काहींच्या मते अगोदरच घोडचूक झाली होती. दोन दिवसांपूर्वीच लढाईला प्रारंभ करायला हवा होता. काउंट रास्तोप्चिन म्हणत होता, ' मॉस्को शहराचे गार्ड (संरक्षकदल) घेऊन रक्षण करताकरता शहराच्या तटाखाली मरायला मी तयार आहे. आम्हाला अजून अनिश्चित अवस्थेत ठेवलं आहे म्हणून माझी तक्रार आहे. मला अगोदर ठाऊक असतं तर काही वेगळंच घडलं असतं...'

कुटूझॉफची मुद्रा अधिकाधिक चिंताग्रस्त आणि उदास होत होती. आपल्या सैन्याची स्थिती लक्षात घेता, मॉस्कोचे संरक्षण करणे अशक्य आहे हे त्याला ठाऊक होते. खेरीज त्याला पुन्हा फ्रेंचांशी लढाई द्यायची नव्हती. बोरोदीनॉच्या लढाईत खरे तर फ्रेंचांचा पराभव झाला अशी त्याची एकट्याची ठाम श्रद्धा होती. फ्रान्सपासून हजारो मैलांवरील जागी लढाई केली होती आणि ते आपली शक्ती हरवून बसले होते. त्यांचा हा विजय म्हणजे खरा

तर पराभवच होता. नेपोलिअनचे भव्य सैन्य हे जखमी हिंस्र पशूसारखे आहे, ते हळूहळू रक्तस्राव होत मरणार असे कुटूझॉफला वाटत होते. नेपोलिअनचे सैन्य रशियामधे आणखी आतवर येऊ दे. त्याने मॉस्को काबीज केले तरी चालेल. मॉस्कोचा पाडाव म्हणजे काही रशियाचा पाडाव नव्हे.

कुटूझॉफला याबद्दल आत्मविश्वास होता. परंतु मॉस्को शहर सोडून जाण्याचा हुकूम देणे त्याला भयंकर गोष्ट वाटत होती. ह्या वेळी त्याला काही बोलवेना. तो बाकावरून उठला आणि त्याने फिलीच्या दिशेने घोडा पिटाळला.

शेतकऱ्याच्या झोपडीतील एका उत्तम प्रशस्त खोलीत दोन वाजता बैठक भरली. त्या शेतकऱ्याच्या मोठ्या कुटुंबातील स्त्रीपुरुष आणि मुले दुसऱ्या बाजूच्या खोलीत गर्दी करून राहिली. एकामागून एक जनरल खोलीत शिरत होते आणि पवित्र प्रतिमेखाली सर्वांत चांगल्या असलेल्या कोपऱ्यातील रुंद बाकावर बसत होते. कुटूझॉफ मात्र सर्वांपासून दूर एका अंधाऱ्या कोपऱ्यात शेगडीमागे बसला होता. त्याच्या स्थूल देहाने आरामखुर्चीत बसकण मारली होती. तो सारखा खाकरत होता. आपल्या कोटाची कॉलर सारखी सरळ करीत होता. त्याच्या कॉलरची बटणे लावलेली नव्हती तरी कॉलर त्याच्या मानेला घासत असावी असे वाटत होते. एकामागून एक जनरल खोलीत येत होते. कमांडर-इन-चीफजवळ जात होते. कमांडर इन-चीफ काही जणांशी हस्तांदोलन करीत होता, काहींना पाहून केवळ मान हालवीत होता.

ॲडज्युटंट समोरील खिडकीचा पडदा दूर करण्याच्या बेतात होता. पण कुटूझॉफने त्याच्याकडे बघून रागाने मान हलवली. लोकांनी आपला चेहरा पाहावा असे काही त्याला वाटत नसल्याचे कायसरॉव्हने ओळखले.

शेतकऱ्याच्या लाकडी टेबलावर नकाशे, योजनांचे कागद, पेन्सिली आणि इतर कागदपत्रे ठेवलेली होती. त्या टेबलाभोवती खूपच गर्दी झाली म्हणून ऑर्डर्लींनी दुसरा एक बाक आणून टेबलाजवळ ठेवला. यर्मलॉव्ह, कायसरॉव्ह आणि टॉल ह्या बाकावर बसले. पवित्र प्रतिमांखाली अगदी पुढे बार्क्ली द टॉल्य बसला होता. त्याचा चेहरा रोगट फिकट झाला होता. त्याचे कपाळ बरेच रुंद होते आणि त्याला टक्कल पडले होते. गेले दोन दिवस त्याला चांगला ताप येत होता. आताही त्याचे शरीर शिरशिरत, थरथरत होते. लक्षात भरेल अशा शरीराचा आणि चमकदार डोळ्यांचा काउंट ऑस्टर्मन टॉलस्टॉय एका बाजूला आपले मोठाले डोके हातावर टेकून बसला होता. तो आपल्याच विचारात मग्न झालेला दिसत होता.

ते सगळेजण बेनिंग्झनची प्रतीक्षा करीत होते. बेनिंग्झन मात्र सैन्यरचनेची नव्याने पाहणी करण्याचे निमित्त करून त्या वेळी अत्युत्कृष्ट भोजन घेण्यात रंगला होता. चारपासून सहा

वाजेपर्यंत त्यांनी त्याची वाट पाहिली तोपर्यंत कुणीही चर्चेला प्रारंभ केला नाही. सगळेजण अवांतर गोष्टींवर हळू आवाजात बोलत राहिले.

बेनिंग्झन झोपडीत शिरला तेव्हा कुटूझॉफ कोपरा सोडून टेबलाजवळ आला आणि टेबलावरील मेणबत्त्यांच्या प्रकाशात आपला चेहरा येणार नाही अशा बेताने बसला.

बेनिंग्झनच्या प्रश्नाने सभेला सुरुवात झाली. 'आपण रशियाच्या पवित्र आणि प्राचीन राजधानीचा त्याग करणार आहोत का तिचे संरक्षण करणार आहोत ?'

दीर्घकाळ शांतता पसरली. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आठ्या पडल्या. कुटूझॉफ रागारागाने खोकत, खाकरत होता ते त्या शांततेत ऐकू येत होते. सर्वांचे डोळे त्याच्यावर खिळले होते.

तो रडण्याच्या बेतात आलेला दिसत होता. पण त्याची रडवेली मुद्रा लवकरच पालटली.

'रशियाची पवित्र आणि प्राचीन राजधानी' कुटूझॉफ क्रुद्ध आवाजात म्हणाला. बेनिंग्झनचे शब्द पुन्हा उच्चारून त्याने त्यामागील खोटा सूर आणवून दिला. 'महाशयांच्या निदर्शनास मला आणू द्या. त्या प्रश्नाला रशियनांच्या दृष्टीने काही अर्थ नाही.' (त्याने आपला स्थूल देह पुढे लोटला.) 'अशा तऱ्हेने प्रश्न विचारणे चूक आहे, अशा प्रश्नात काहीही अर्थ नाही. ह्या लोकांना ज्या प्रश्नाची चर्चा करण्यासाठी मी बोलावले आहे, तो प्रश्न युद्धासंबंधीचा प्रश्न आहे. प्रश्न असा आहे— रशियाची सुरक्षितता सैन्यावर अवलंबून असताना लढाई करून मॉस्को शहराच्या आणि सैन्याच्या हानीचा धोका पतकरणे चांगले की लढाई न करता मॉस्को शहर सोडून देणे चांगले ? मला तुमची ज्या प्रश्नावर मते हवी आहेत, तो प्रश्न हा. यातील अधिक चांगली गोष्ट कोणती ?' पुन्हा एकदा तो बैठ्या खुर्चीत कलंडला.

मग चर्चेला प्रारंभ झाला. बेनिंग्झनला आपण पराभूत झालो असे अजूनही वाटत नव्हते. बार्क्ली आणि इतर अधिकाऱ्यांच्या मतांमुळे त्याला फिली येथे बचावाचा पवित्रा घेणे अशक्य असल्याचे मान्य करणे भाग पडले. आपली रशियावरील आणि मॉस्कोवरील भक्ती सिद्ध करण्यासाठी बेनिंग्झन सुचवू लागला. 'रात्रीच्या वेळी आपली फौज उजव्या फळीकडून डाव्या फळीकडे हालवली पाहिजे. आणि दुसऱ्या दिवशी फ्रेंचांच्या उजव्या फळीवर हल्ला करण्यासाठी सरसावले पाहिजे.' पण याबद्दल मतभेद झाले. ह्या योजनेच्या विरुद्ध, तशीच बाजूनेही मते मांडण्यात आली. सर्व जनरलांनी बेनिंग्झनची बाजू उचलून धरली शहर सोडण्यापूर्वी त्याग करण्याची जरुरी आहे असे वाटल्यामुळे अगर अन्य वैयक्तिक कारणांमुळे त्या जनरलांना मॉस्को याआधीच खरोखर सोडण्यात आले होते ही गोष्ट आकलन होणे अशक्य असल्याचे दिसले. मात्र इतर जनरलांना ह्या गोष्टी समजल्या होत्या. मॉस्को सोडून जाण्याचा प्रश्न त्यांनी दूर टेवला आणि सैन्याने कोणत्या दिशेने माघार घेत जावे याबद्दल ते बोलत राहिले.

कुटूझॉफ म्हणाला, 'सद्गृहस्थहो, मला काउंट यांनी मांडलेली योजना पसंत नाही. शत्रूच्या अगदी नजीकच्या भागात सैन्याने हालचाली केल्या तर ते नेहमीच धोक्याचे ठरते. अशा हालचालीतून निर्माण झालेली संकटे इतिहासात अनेक आढळतील. उदाहरणार्थ...( उदाहरण

शोधण्यासाठी कुटूझॉफ विचार करीत असल्याचे दिसले. मग तो बेनिंग्झनकडे मोकळेपणाने आणि भाबडेपणाने दृष्टी टाकीत म्हणाला ) फ्रीडलंडची लढाई काउंटना निश्चित आठवत असेल...ती पूर्णपणे यशस्वी झाली नाही याचे कारण शत्रूच्या अगदी जवळच्या भागात राहून सैन्याने आपल्या हालचाली केल्या होत्या...'

क्षणभर पसरलेली स्तब्धता सर्वांनाच खूप दीर्घ वाटली.

पुन्हा चर्चेला प्रारंभ झाला. मधून मधून स्तब्धता पसरू लागली. आणखी बोलण्यासारखे आहे असे कुणालाच वाटेना.

अशीच एकदा स्तब्धता पसरली असताना कुटूझॉफने बोलण्यासाठी म्हणून की काय एक दीर्घ उसासा टाकला. सर्वजण वळून त्याच्याकडे पाहू लागले.

' सद्‌गृहस्थहो, सगळ्या अपयशाचे खापर माझ्या माथ्यावर फोडले जाणार आहे हे मी जाणून आहे. ' असे म्हणून तो सावकाश आरामखुर्चीतून उठला. टेबलाकडे चालत गेला. आणि म्हणाला, ' सद्‌गृहस्थहो, मी तुमची मते ऐकली आहेत. तुमच्यापैकी काहीजण माझ्या मताशी सहमत होणार नाहीत. ' जरा थांबून तो म्हणाला, ' झार आणि माझा देश यांनी मला दिलेल्या अधिकारानुसार मी माघार घेण्याचा हुकूम देत आहे. '

जनरलांना निरोप दिल्यावर कुटूझॉफ किती तरी वेळा टेबलावर कोपरा टेकून बसला आणि तोच भयंकर प्रश्न त्याच्या मनात येऊ लागला. ' मॉस्को सोडून जाणे केव्हा अपरिहार्य ठरेल ? ज्या गोष्टीमुळे ते अटळ झाले ती गोष्ट केव्हा ठरली ? त्यात दोष कोणाचा ? '

त्याचा ॲडज्युटंट रात्री उशिरा त्याच्याकडे आला तेव्हा कुटूझॉफ त्याला म्हणाला, ' ही अपेक्षा मी केली नव्हती; मुळीच केली नव्हती, मला कल्पनाही नव्हती. '

' महाराज आता विश्रांती घ्या. ' त्याचा ॲडज्युटंट म्हणाला.

त्याच्याकडे लक्ष न देता आपली गुबगुबीत मूठ टेबलावर मारीत कुटूझॉफ म्हणाला, ' तुर्कांप्रमाणे त्यांनाही घोड्याचे मास खावे लागणार आहे. निश्चित लागणार आहे. फक्त मला......'

बोरॉदीनॉ आणि फिली या ठिकाणी अशा घटना घडत असताना आणि लवकरच मॉस्को शहरातून सैन्य काढून घेतले जाणार आहे हे समजून लोक तेथून बाहेर पडत असताना पीटर्झबर्ग येथील शौकिनांचे जीवन पूर्ववत चालू होते.

व्हिल्ना येथून पीटर्झबर्ग येथे राजकचेरी हलवण्यात आली. त्या सोबत एलन आली होती. तिथे तिची स्थिती अवघड झाली होती. सरकारात अत्युच्च पदावर असलेल्या बड्या व्यक्तीचा आश्रय असल्याने ती पीटर्झबर्गला सुखात होती. व्हिल्नामधे असताना तिने एका तरुण परदेशी प्रिन्सशी संबंध जोडले होते.

ती पीटर्सबर्गला परत आली तेव्हा तो प्रिन्स आणि ती बडी व्यक्ती, दोघेही शहरात होते. दोघेही तिच्यावर आपला हक्क सांगू लागले. पूर्वी आयुष्यात पडला नव्हता, असा प्रश्न एलन-समोर उभा राहिला. ' कुणाचेच मन न दुखवता दोघांशीही दाट मैत्री कशी ठेवावी ? '

अत्यंत हुषार स्त्री म्हणून काउंटेस बेझुहॉव्हचा लौकिक होता आणि त्याला ती पात्र होती. इतर स्त्रियांना कठीण अथवा अशक्य वाटणारे काम ती चुटकीसरशी सोडवी. जर का तिने प्रकरण गुप्त ठेवायचा प्रयत्न केला असता, काही युक्तिप्रयुक्ती करून जर का तिने चमत्कारिक स्थिती निभावून नेण्याची धडपड केली असती, तर तिने स्वतःच अपराधी असल्याचे मान्य करून आपली बाजू बिघडवून घेतली असती. एलन मनात येईल ते नेहमी करू शकणाऱ्या खऱ्या महान व्यक्तीसारखी होती. आपल्या वागण्यात प्रामाणिकपणा आहे असे तिने गृहीत धरलें. तिची स्वतःची खरोखर तशी खात्री झाली होती. आपल्याखेरीज इतर सर्व अपराधी, बेजबाबदार आहेत असे ती मानू लागली.

जेव्हा पहिल्यांदाच त्या परदेशी प्रिन्सने धीर करून तिची कानउघाडणी केली तेव्हा ती आपले सुंदर मस्तक उंचावून आढ्यतेने आणि ठामपणे म्हणाली, ' हा पुरुषजातीचा अहंकार आहे. निर्दयपणा आहे. तुम्हा पुरुषांकडून मी आणखी कशाची अपेक्षा केली नव्हती. स्त्री तुमच्यासाठी त्याग करते. दुःखं सोसते आणि तिला बक्षीस मिळतं ते हे. माझ्या मैत्री-बद्दल, माझ्या प्रीतीबद्दल स्पष्टीकरण मागण्याचा तुम्हाला काय अधिकार ? तो मनुष्य तर मला वडिलांहून पूज्य वाटत आला आहे. '

प्रिन्स काही तरी बोलणार होता पण एलनने त्याला बोलू दिले नाही.

' मला कृतघ्न होता येत नाही. माझ्या खाजगी जीवनातील भावनांचा हिशेब मी एक परमेश्वराला देईन नाही तर माझ्या विवेकबुद्धीला देईन. ' एलन म्हणाली.

' कृपा करून माझं म्हणणं ऐकून तरी घे. '

' तुम्ही माझ्याशी लग्न करा. मी तुमची दासी होऊन राहीन. '

' ते अशक्य आहे. '

' माझ्यावर दया करावी असं तुम्हाला वाटतच नाही. ' एलनला रडू कोसळले.

प्रिन्सने तिचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. जणू भ्रमिष्ट झालेली एलन रडता रडता म्हणाली, ' आपल्या लग्नाच्या आड काहीही येणार नाही, अशी पूर्वीची उदाहरणं आहेत. ( त्या वेळी तशी थोडी उदाहरणे होती. परंतु एलनने नेपोलिअनचा आणि इतर वरिष्ठ दर्जाच्या माणसांचा उल्लेख केला. ) मी माझ्या नवऱ्याची खऱ्या अर्थानं पत्नी कधीच नव्हते. माझी इच्छा नसताना बळजबरीनं माझा या लग्नात बळी देण्यात आला. '

' परंतु कायद्याचं काय...धर्माचं काय ?... ' प्रिन्स पुटपुटला. तो आता शरण येण्याच्या बेतात होता.

' धर्म...कायदे...जर त्यांना ह्या गोष्टीची सोय बघता येत नसेल तर ते कशासाठी शोधून काढले आहेत ? ' एलनने विचारले.

इतका साधा विचार पूर्वी कधीच सुचला नव्हता. म्हणून तो प्रिन्स तिच्या उद्‌गारांनी चकित झाला. जेझुइट पंथाशी त्याचा निकटचा संबंध होता. त्या सोसायटीच्या भ्रातृभाव मंडळाकडे त्याने अर्ज केला.

कॅमेनी ऑस्ट्रॉव्ह येथील आपल्या उन्हाळी बंगल्यावर एलन आकर्षक मेजवान्या देत असे. काही दिवसांनंतर अशाच एका मेजवानीच्या वेळी एलनची कुणा आकर्षक जॉबर्टशी ओळख करून देण्यात आली. जॉबर्ट मुळीच तरुण नव्हता. त्याचे केस रुपेरी झाले होते. त्याचे डोळे काळे व चमकदार होते. त्या जेझुइट माणसाने आखूड कोट घातला होता. रोषणाई केलेल्या बागेतून संगीताचे सूर ऐकत तो एलनबरोबर बराच वेळ फिरला. ईश्वराची कृपा, ख्रिस्ताची माया, पवित्र मातेचे अंतःकरण, खऱ्या कॅथलिक निष्ठेमुळे या जगात आणि परलोकात मिळणारे समाधान या विषयांवर तो तिच्याशी बोलला. एलन हेलावून गेली. कित्येक वेळा दोघांच्या डोळ्यांत अश्रू आले. दोघांचे आवाज कापरे झाले. एलनला नृत्यात भाग घेण्यासाठी कोणीतरी नेले. तेव्हा ' विवेकबुद्धीच्या भावी गुरू ' बरोबरचे तिचे भाषण खंडित झाले. परंतु दुसऱ्या दिवशी जॉबर्ट एकटाच तिला भेटायला आला. तेव्हापासून तो तिला सारखा भेटू लागला.

एके दिवशी त्याने काउंटेसला कॅथलिक चर्चमधे नेले. तिथे तिने वेदीसमोर गुडघे टेकले. मग तिला वेदीजवळ नेण्यात आले. एका आकर्षक, मध्यमवयीन फ्रेंच इसमाने आपले दोन्ही हात तिच्या मस्तकावर ठेवले. तेव्हा आपल्या अंतःकरणात ताजी झुळूक शिरल्याचे तिला वाटले ( तिने स्वतःच नंतर असे वर्णन केले. ) ते दुसरे तिसरे काही नसून ' ईश्वरी कृपा ' आहे असे तिला तेव्हा सांगण्यात आले.

एका फ्रेंच धर्मगुरूने तिची भेट घेतली. त्याने तिच्याकडून पापांची कबुली ऐकून घेतली आणि तिला पापमुक्त केले. दुसऱ्या दिवशी पवित्र ब्रेड असलेली मंजूषा तिला देण्यात आली. तिने तो ब्रेड खावा म्हणून मंजूषा घरी ठेवण्यात आली. आपल्याला कॅथलिक पंथात प्रवेश मिळाला आहे आणि लवकरच स्वतः पोप आपली बाजू ऐकून घेऊन कसल्यातरी प्रकारचे कागदपत्र पाठवून देणार आहे हे बऱ्याच दिवसांनी एलनला कळले आणि तिला समाधान वाटले.

कितीतरी हुशार पुरुषांनी तिला काय हवे नको ते पाहिले. हव्याहव्याशा वाटणाऱ्या तऱ्हांनी त्यांनी आपली आस्था प्रगट केली होती. ती नेहमीच पांढरेशुभ्र कपडे आणि पांढऱ्याशुभ्र फिती वापरीत होती. संभाषणाच्या वेळी तिचे वर्तन निष्कलंक असे. ह्या काळात तिच्या बाबतीत जे जे घडले त्यामुळे ती संतुष्ट झाली होती. तरीही ती या संतोषामुळे आपले उद्दिष्ट एक क्षणही नजरेपासून दूर करायला तयार नव्हती. चातुर्याच्या शर्यतीत नेहमीच मूर्ख माणसे हुशार माणसांपेक्षा अधिक मिळवून बसतात. ह्या सगळ्या शब्दांचा आणि डावपेचांचा उद्देश आपल्याला कॅथलिक धर्माची दीक्षा देऊन आपल्याकडून जेझुइट पंथासाठी भलीमोठी रक्कम उकळणे हा आहे ( आणि खरेच तसे सुचवले गेले होते ), याची एलनला चांगलीच कल्पना

होती. आधी पैसे न देता वैवाहिक बंधनातून मुक्त करतील अशी वेगवेगळी कामे त्यांनी करावीत असा ती सारखा आग्रह धरत राहिली. मानवी इच्छांच्या तृप्तीसाठी उचित वर्तनास मान्यता देणे हा प्रत्येक धर्माचा प्रमुख उद्देश आहे असे तिला वाटे. हेच उद्दिष्ट समोर ठेवून तिने आपल्या आध्यात्मिक गुरूबरोबर झालेल्या एका संभाषणात आपले लग्न कितपत बंधनकारक आहे याचे उत्तर त्यांनी द्यावे असा आग्रह धरला.

ती दिवाणखान्याच्या खिडकीजवळ बसली होती. अंधार पडत होता. फुलांचा सुगंध खिडकीतून येत होता. एलनने शुभ्रवेष केला होता. पारदर्शक वस्त्रातून छाती, खांदे दिसत होते. तिच्या शेजारीच फ्रेंच धर्मगुरू आपले गोरेपान हात आपल्या गुडघ्यावर हलकेच ठेवून बसला होता. त्या गुबगुबीत धर्मगुरूची त्वचा तुकतुकीत होती. त्याची स्थूल हनुवटी तुळतुळीत होती आणि त्याच्या दणकट चेहऱ्यावर प्रेमळपणा दिसत होता. आपली मते मांडत असताना तो सारखा तिच्या तोंडाकडे टक लावी. तेव्हा त्याच्या ओठावर सूक्ष्म गूढ स्मित चमकून जाई आणि त्याचे डोळे सावधगिरीने आदर व्यक्त करीत. एलन त्याच्या कुरळ्या केसांकडे आणि गुळगुळीत हजामत केलेल्या काळसर गालांकडे टक लावून पाही आणि अस्वस्थपणे स्मित करी. संभाषणाचा ओघ बदलावा अशी प्रत्येक क्षणाला ती अपेक्षा करीत होती असे वाटत होते. ॲबेला आपल्या सोबतिणीच्या सौंदर्याची निश्चितच जाणीव होती तरीही तो आपल्यापुढील समस्या कौशल्याने सोडवण्यात रस घेत होता. एलनच्या त्या आध्यात्मिक गुरूने पुढीलप्रमाणे युक्तिवाद मांडला. ‘ आपण दिलेल्या वचनाचा अर्थ काय याचं ज्ञान नसताना त्या माणसाशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतली. त्या माणसानं मात्र विवाहातील धार्मिक हेतूंवर विश्वास नसतानाही विवाहबंधन स्वीकारून पापाचरण केलं आहे. लग्न उभय पक्षांवर बंधनकारक असायला हवं. तसं हे लग्न नाही. काही झालं तरी तुम्ही घेतलेली शपथ तुम्हाला बंधनकारक होती. तुम्ही शपथ मोडलेली आहे. तुमच्याकडून कोणतं पाप घडलं आहे? क्षुद्र उपेक्षणीय पाप की आत्मनाश करणारं घोर पाप? तुमचं पाप क्षुद्र आहे, क्षम्य आहे. दुराचरण करण्याच्या हेतूनं तुम्ही पाप केलेलं नाही. जर तुम्ही आता संततिप्राप्तीसाठी पुन्हा लग्न करू इच्छीत असाल तर तुम्हाला तुमच्या पापाबद्दल क्षमा होऊ शकेल. तरीही ह्या प्रश्नाला दोन बाजू आहेत. पहिली बाजू... ’

कंटाळून गेलेली एलन एकदम मोहक स्मित करीत म्हणाली, ‘ मी आता नवा धर्म स्वीकारला आहे. त्यामुळे खोट्या धर्मानं लादलेली कर्तव्यं मला बंधनकारक नाहीत असं मला वाटतं. ’

तिचे उत्तर साधे सरळ होते. त्या उत्तराने तिचा आध्यात्मिक गुरू हबकून गेला. पण त्याला आतापर्यंत मानसिक कष्ट घेऊन उभवलेला कुशल युक्तिवादाचा मोठा इमला सोडून देता येईना.

स्मित करीत तो म्हणाला, ‘ आपण एकमेकांचं म्हणणं समजून घेऊ या. ’ आध्यात्मिक क्षेत्रातील आपल्या शिष्येच्या मताचे खंडण करण्यासाठी तो नवा युक्तिवाद शोधू लागला.

आपला प्रश्न धार्मिक दृष्टिकोणातून पाहता साधा सरळ आहे परंतु ऐहिक क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या धास्तीने धर्मोपदेशक अडचणी निर्माण करीत आहेत हे एलनच्या लक्षात आले.

परिणामत: एलनने मनाशी निश्चय केला. ह्या प्रश्नाकडे समाजाने योग्य दृष्टीने पाहावे यासाठी आपणच मार्ग घालून दिला पाहिजे. तिने त्या वृद्ध प्रतिष्ठिताचा मत्सर चेतविला आणि दुसऱ्या प्रियकराला जे सांगितले होते तेच त्यालाही ऐकवले. ' माझ्यावर संपूर्ण अधिकार गाजवायचा असेल तर त्याला माझ्याशी लग्न हा एकमेव मार्ग आहे. ' नवरा जिवंत असलेल्या स्त्रीने लग्नाची मागणी घातलेली पाहताच तो वृद्ध प्रतिष्ठित त्या तरुण प्रिन्ससारखाच विस्मित झाला. मात्र आपली बाब अविवाहितेच्या लग्नाइतकीच साधी व स्वाभाविक आहे असे तिने ज्या आत्मविश्वासाने सांगितले त्याचा त्याच्यावरही परिणाम झाल्यावाचून राहिला नाही. तिच्या वागण्यात अनिश्चितता, शरम, आणि अप्रामाणिकपणा यांचे पुसट दर्शन जरी झाले असते तरीही तिचा उद्देश सफल झाला नसता. परंतु तसे मुळीच घडले नाही. तिने आपल्या जिवलग मित्रमैत्रिणींना ( म्हणजे सगळ्या पीटर्झबर्ग शहराला ) अगदी प्रांजळपणाने आणि भोळ्या अंत:करणाने सांगून टाकले. ' प्रिन्स आणि ती बडी व्यक्ती या दोघांनीही मला लग्नासंबंधी विचारलं. माझं दोघांवरही प्रेम आहे. त्यांपैकी एकाला दु:खी करावं लागणार याची मला धास्ती वाटत आहे. '

मग लागलीच साऱ्या पीटर्झबर्ग शहरात अफवा पसरली. एलनला आपल्या नवऱ्यापासून घटस्फोट हवा आहे अशी अफवा पसरली नाही ( अशी अफवा पसरली असती तर अनेक लोकांनी त्या बेकायदा व्यवहाराला विरोध केला असता ). अफवा पसरली ती दु:खी मोहक एलनला दोन प्रियकरांपैकी कोणाशी लग्न करावे याचा निश्चय करता येत नाही याबद्दलची. पुन्हा लग्न होणे कितपत शक्य आहे या प्रश्नाचा कोणी विचारच केला नाही. त्या दोघांपैकी अधिक लायक कोण असेल आणि ह्या लग्नाबाबत दरबारचा दृष्टिकोण काय असेल याचसंबंधी चर्चा होऊ लागली. ज्यांना ही गोष्ट पटणे शक्य नव्हते असे काही कर्मठ सनातनी लोक होते त्यांना एलन वैवाहिक पावित्र्याचा भंग करीत आहे असे वाटत होते. पण जे असे थोडे लोक होते ते गप्प होते.

मार्या दिमित्र्येव्ना वसंतऋतूत आपल्या एका मुलाला भेटण्यासाठी पीटर्झबर्गला आली होती. तिने मात्र विरोधी मत सरळ शब्दात व्यक्त करण्याचे धाडस केले. नृत्यसमारंभाच्या वेळी तिची एलनशी गाठ पडली तेव्हा मार्याने तिला दालनाच्या मध्यभागी थांबवले. सर्वत्र स्तब्धता पसरलेली असताना ती कर्कश आवाजात म्हणाली, ' मग तू आता एक नवरा सोडून दुसरा नवरा करणार आहेस तर ! आपण एक नवी फॅशन पाडत आहोत असं तुला निश्चित वाटत असेल. बाई, असं करणारी तू पहिलीच व्यक्ती नव्हेस. ती खूप जुनी कल्पना आहे.

असं जिथं चालतं ती ठिकाणं...' असे म्हणत नेहमीचा दटावण्याचा पवित्रा घेत तिने आपल्या अस्तन्या सरसावल्या. रोखून एलनकडे पाहात ती नृत्यदालनातून निघाली.

होऊ घातलेले लग्न कायदेशीर आहे का असा प्रश्न विचारण्याचे धाष्टर्य काहींनी दाखवले. एलनची आई प्रिन्सेस कुरॅगिन त्यातील एक होती. मुलीचा हेवा वाटून तिला सतत यातना होत होत्या, हेवा करण्याचे कारण तिला प्रिय अशी व्यक्ती होती. त्यामुळे तिला तिच्या लग्नाची कल्पना दुःसह झाली.

नवरा हयात असताना स्त्रीला घटस्फोट घेणे आणि पुन्हा लग्न करणे कितपत शक्य आहे याची खात्री करून घेण्यासाठी तिने एका रशियन धर्मगुरूचा सल्ला घेतला. धर्मगुरूने ही गोष्ट अशक्य असल्याचे तिला सांगितले. त्याने तिला गॉस्पेलमधील वचनाचा हवाला दिला. ( त्याने त्यांचा अर्थ लावला त्यावरून ) नवऱ्याच्या हयातीत स्त्रीने पुनर्विवाह करण्याला सरळ मनाई केली होती हे ऐकून तिला बरे वाटले.

हा युक्तिवाद तिला बिनतोड वाटला. ह्या युक्तिवादाने सुसह्य होऊन ती एका सकाळी आपल्या मुलीला एकटी गाठण्यासाठी गाडीतून तिच्याकडे गेली.

एलनने आईने केलेला निषेध पुरता ऐकून घेतला आणि सौम्य उपरोधिक स्मित केले.

' हे बघ, धर्मग्रंथात स्पष्ट म्हटलं आहे. घटस्फोट घेतलेल्या स्त्रीशी जो लग्न करतो त्याला...'

' ममा, मूर्खासारखी बरळू नकोस. तुला समज कमी आहे, प्राप्त-परिस्थितीत माझी काही कर्तव्यं आहेत...' एलन बोलू लागली.

' अग पण...'

' ममा, तुला कसं कळत नाही ? ज्या पवित्र पित्याला आज्ञा देण्याचा हक्क आहे...'

तेवढ्यात एलनच्या घरात राहणारी तिची सखी आत आली आणि म्हणाली, ' महाराज दिवाणखान्यात आहेत. तुमची भेट घ्यायची आहे. '

' मला भेटायचं नाही असं त्यांना जाऊन सांग. त्यांनी आपला शब्द पाळला नाही म्हणून मी त्यांच्यावर रागावले आहे हेही सांग...'

' काउंटेस, प्रत्येक पापाला क्षमा असते ' सुंदर केसांचा, लांबट चेहऱ्याचा नाकेला तरुण मनुष्य आत येत म्हणाला.

तो आत येताच थोरल्या प्रिन्सेसने आदराने उठून झुकून प्रणाम केला. त्या तरुण माणसाने तिची दखल घेतली नाही. प्रिन्सेस कुरॅगिन मुलीला मानेने इषारा करून संथ पावले टाकीत दरवाजाकडे वळली. तिथे आलेल्या तरुण माणसाच्या दर्शनाने तिच्या सर्व श्रद्धा पार नाहीशा झाल्या होत्या आणि तिला वाटू लागले, ' एलनचे वागणे योग्यच आहे. अगदी योग्य आहे. आम्हाला तरुणपणी–आता ते दिवस कायमचे गेले...त्या दिवसांत याबद्दल काहीच कसे ठाऊक नव्हते ? हे सगळे किती सरळ सोपे आहे ! ' गाडीत बसल्या बसल्या तिच्या मनात विचार येत होते.

ऑगस्टच्या प्रारंभी एलनच्या प्रश्नात अडथळे उरले नाहीत. नवऱ्याचे अजूनही आपल्या-

वर अतिशय प्रेम आहे अशी तिची समजूत होती. त्याला पत्र लिहून तिने आपला एन्. एन्.शी लग्न करण्याचा बेत कळवला. एका नव्या खऱ्या धर्मपंथाचा आपण अंगीकार केल्याचेही तिने त्याला कळवले, आणि त्याला विनंती केली.

'घटस्फोट मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या सगळया गोष्टी तुम्ही कराव्यात अशी विनंती आहे. हे पत्र घेऊन येणारी व्यक्ती तुम्हाला पुढील आवश्यक सूचना देईलच. परमेश्वराची कृपा तुमच्यावर सदैव राहावी अशी प्रार्थना करते.

तुमची मैत्रिण,

एलन.

हे पत्र पीएरच्या घरी जेव्हा पोचले तेव्हा पीएर बोरोदीनोंच्या रणक्षेत्रावर होता.

बोरोदीनोला लढाई झाली त्या दिवशी संध्याकाळी पीएर दुसऱ्यांदा रॅव्स्कीच्या तोफखान्या-कडून पळत सुटला. दाटीने जाणाऱ्या सैनिकांबरोबर न्याझकोव्होला जाणाऱ्या मार्गातील खोल दरी पार केली. मग तो फिरत्या दवाखान्याच्या तंबूकडे पोचला. रक्त पाहात, आरोळया, कण्हणे ऐकत तो तसाच त्वरेने सैनिकांच्या गर्दीतून पुढे निघाला.

दिवसभराच्या मानसिक यातनांतून मुक्त व्हावे, नित्याचे साधे जीवन जगावे, आपल्या घरात आपल्या अंथरुणात शांतपणे झोपी जावे याखेरीज त्याच्या मनाला दुसऱ्या कशाचा ध्यास लागला नव्हता. स्वतःचा आणि त्याला जे दिसले, जाणवले त्याचा अर्थ नेहमीच्या साध्या-सुध्या जीवनक्रमातच उमगेल असे त्याला वाटले. पण नित्याचे सामान्य जीवन त्याला कुठेच सापडत नव्हते.

तो ज्या रस्त्यावरून चालला होता, त्या रस्त्यावर बंदुकींच्या गोळया आणि तोफांचे गोळे सुसाटत जात नव्हते. तरीही त्याला सर्वत्र लढाईच्या मैदानातील दृश्येच दिसत होती. सगळी-कडे तेच यातना भोगणारे, मरगळलेले आणि चमत्कारिक निर्विकार चेहरे आढळत होते. सगळीकडे तेच रक्त, तेच सैनिकांचे ओव्हरकोट, दुरून येणारे पण तशीच दहशत निर्माण करणारे तेच गोळीबारांचे आवाज. यात भर म्हणून उष्मा आणि धूळ.

मोझाइस्क रोडवरून दोन एक मैल चालल्यावर पीएर रस्त्याच्या कडेला बसला.

संध्याकाळच्या सावल्या पडू लागल्या होत्या. तोफांचे आवाज ऐकू येईनासे झाले. कोपरां-वर रेलून पीएर कितीतरी वेळ काळोखात विरू लागणाऱ्या सावल्या बघत होता. तोफेचा गोळा भयानक सुसाट करीत आपल्या दिशेने वरून झेप घेत आहे असा त्याला सारखा भास होत होता. तो दचकून उठून बसला. आपण किती काळ तिथे घालवला याची त्याला कल्पना येईना. मध्यरात्री तीन सैनिक फांद्या ओढीत ओढीत तिथे आले. त्याच्याजवळच मुक्काम ठोकून त्यांनी शेकोटी पेटवण्यास सुरुवात केली.

पीएरकडे ओझरते पाहात सैनिकांनी विस्तव तयार केला, त्यावर भांडे ठेवले. त्यात बिस्कि-टांचा चुरा आणि डुकरांची चरबी टाकली. त्या चरबी घातलेल्या चवदार पदार्थांचा वास आणि धुराचा वास एकमेकात मिसळले. पीएरने उठून उसासा टाकला. पीएरची दखल न घेता ते तिघेही सैनिक खाता खाता आपापसांत बोलू लागले.

'तू कुठल्या विभागात आहेस ?' एका सैनिकाने पीएरला एकदम प्रश्न केला. पीएर ज्याबद्दल विचार करीत होता त्याचीच चौकशी त्याने केली होती. 'जर तुला भूक लागली असेल तर आम्ही तुला थोडं खायला देऊ. तू खरोखरच सैनिक आहेस का तेवढं सांग.'

त्याच्या अधिक जवळ येण्यासाठी आणि त्याच्या बरोबरीचे स्थान मिळावे म्हणून आपला सामाजिक हुद्दा आहे त्यापेक्षा जास्तीत जास्त कमी करून सांगण्याची गरज त्याला वाटली. तो म्हणाला, 'खरं तर मी शिबंदीवरील अधिकारी आहे. पण माझ्या कंपनीचा कुठं पत्ता नाही. मी लढाईत उतरलो आणि माझ्या सहकाऱ्यांची चुकामूक झाली.'

'आश्चर्यच आहे' एकजण उद्गारला.

दुसऱ्याने मान हालवली.

'तुला ही बटाट्याची लापशी घे' तो पीएरला म्हणाला. त्याने लाकडी चमचा चाटला आणि तो पीएरला दिला.

पीएर आगीजवळ बसला आणि भांड्यातील पदार्थावर तुटून पडला. आपण आयुष्यात इतकी चवदार लापशी कधीच खाल्ली नव्हती असे त्याला वाटले. तो भांड्यावर वाकून चमच्यामागून चमचा चांगला भरून घेऊन अधाशासारखा चघळून खात असताना ते सैनिक काही न बोलता त्याच्याकडे टक लावून पाहांत होते.

'तुला कुठे जायचं आहे, ते आम्हांला सांग. त्यातील पहिल्या सैनिकाने विचारले.

'मोझाइस्काला.'

'तू घरंदाज मनुष्य आहेस का ?'

'होय.'

'तुझं नाव ?'

'प्योत्र किरिलॉविच.'

'प्योत्र किरिलॉविच, आमच्याबरोबर चल. आम्ही तुला तिथं पोचवतो'

दाट काळोखातून पीएर आणि ते सैनिक मोझाइस्कला निघाले. मोझाइस्कला पोचल्यावर शहरात शिरण्यासाठी ते उंच निमुळती टेकडी चढू लागते त्या वेळी कोंबडे आरवू लागले होते.

आपला पथिकाश्रम टेकडीच्या पायथ्याशी आहे आणि आपण नुकतेच तिथून पुढे आलो आहोत हे विसरून पीएर त्या सैनिकाबरोबर पुढे जातच होता. तो इतका विचारमग्न होता की आपण पुढे आलो आहोत हे त्याच्या लक्षातच आले नव्हते. परंतु त्याला शोधण्यासाठी शहरात गेलेला त्याचा नोकर आता पथिकाश्रमाकडे परतत होता. पीएर टेकडी चढत असताना अर्ध्या वाटेवर योगायोगाने त्या दोघांची गाठ पडली. पीएरची पांढरी हॅट

अंधारात चमकली, त्यावरून नोकराने पीएरला ओळखले.

' महाराज, ' तो ओरडला. ' आम्ही तुमची अगदी आशा सोडून दिली होती. तुम्ही पायी का चालताहात ? आणि हे काय ! तुम्ही इकडे कुठे निघालात ? '

' खरं म्हणजे... ' पीएर काही बोलणार एवढ्यात ते सैनिक थांबले. त्यांच्यातील एकजण म्हणाला, ' तुला तुझी माणसं भेटली म्हणायची तर ! '

' ठीक तर. तुझा निरोप घेतो–प्यॉत्र किरिलॉविच–असंच ना तुझं नाव ? '

' गुड् बाय्, प्यॉत्र किरिलॉविच. ' इतरांचे आवाज ऐकू आले.

' गुड् बाय. ' असे बोलून पीएर आपल्या नोकराबरोबर पथिकाश्रमाच्या दिशेने जायला निघाला.

खिसे चाचपीत पीएर स्वतःशीच म्हणाला, ' त्यांना मी काहीतरी बक्षिसं द्यायला हवी होती. ' तोच त्याच्या अंतर्यामी कुणीतरी म्हटले, ' तशी काही गरज नाही. '

पथिकाश्रमात एकही खोली रिकामी नव्हती. पीएर बाहेर आवारात गेला. डोके लपेटून घेऊन तो गाडीत पहुडला.

पीएरने उशीवर डोके टेवले न टेवले तोच त्याला आपल्याला झोप अनावर झाल्याचे कळले. तोच एकाएकी प्रत्यक्षातल्याप्रमाणे स्पष्ट आवाज त्याच्या कानावर पडले. तोफांचा सारखा घुमणारा आवाज, लोकांचे कण्हणे आणि किंचाळ्या, गोळ्यांचा पडतानाचा धप्प आवाज त्याला ऐकू आला. दारूगोळ्यांचा आणि रक्ताचा वास आला. त्याला मरणाची भयंकर धडकी भरली. धास्तीनेच त्याने डोळे उघडले आणि पांघरुणाबाहेर डोके काढले. आवारात सगळीकडे शांत होते, फाटकापाशी असलेल्या पहारेकऱ्याशी कोणी नोकर बोलत होता. त्याचा तेवढा आवाज ऐकू येत होता. पीएरने बसण्यासाठी हालचाल केली तशी डोक्यावरील अंधाऱ्या वळचणीतील कबुतरे दचकून फडफड करू लागली. ते त्याने ऐकले. सगळ्या आवारात गवत, लेंड्या आणि डांबर यांचा दर्प भरून राहिला होता. त्या वासाने पीएरला शांतता असल्याचे कळले आणि त्याच्या मनाला स्वस्थता लाभली. दोन अंधाऱ्या इमारतींच्या मधल्या मोकळ्या भागातून नक्षत्रांनी उजळलेले निरभ्र आकाश दिसत होते.

पुन्हा पांघरूण डोक्यावर घेत पीएर म्हणाला, ' देवाची कृपा म्हणून सगळे संपले. किती भयानक अनुभव होता तो. त्या वेळी माझी हिंमत खचली. किती शरमेची गोष्ट परंतु ते...ते मात्र अखेरपर्यंत शांत होते. डगमगले नव्हते. ' पीएरला ते सैनिक आठवले...तोफखान्यावरचे सैनिक...ज्यांनी त्याला खायला दिले होते ते सैनिक...पवित्र प्रतिमेसमोर प्रार्थना म्हणणारे सैनिक. ते सगळे अनोळखी होते. त्यापूर्वी त्यांच्याबद्दल त्याला काही ठाऊक नव्हते. बाकी सगळे लोक त्याच्या मनातून पुसट होऊ लागले. ते सैनिक तेवढे स्पष्टपणाने त्याला आठवू लागले.

पीएर पडल्या पडल्या विचार करू लागला, ' केवळ सैनिक होणे किती चांगले आहे ! आपल्या अवघ्या व्यक्तिमत्त्वानिशी ते सामान्य जीवन जगायला पाहिजे. सैनिकी जीवनातील त्या

सगळ्या गोष्टींनी जीवन व्यापून जायला हवे ! पण आपल्या बाह्य व्यक्तिमत्त्वातील अनावश्यक व दुष्ट प्रवृत्तींचे ओझे कसे फेकून देता येईल ? पूर्वी कधीकाळी मी असाच आलो असतो. माझ्या इच्छेप्रमाणे मी तेव्हा वडिलांपासून पळून जाणार होतो. डोलोहॉव्हशी माझे द्वंद्वयुद्ध झाले. त्यानंतरदेखील मी सैनिक होण्याचा संभव होता. '

पीएरच्या मनात क्लबमधील भोजनाचा प्रसंग तरळून गेला. त्या वेळी त्याने डोलोहॉव्हला आव्हान दिले होते. त्यानंतर टॉझॉर्क येथील उपकारकर्ता त्याच्या मनश्चक्षूंसमोर तरळून गेला. मग लॉजमधील गंभीरपणे चाललेली बैठक दिसू लागली. इंग्लिश क्लबमधे चाललेल्या त्या बैठकीत कुणीतरी त्याच्या परिचयाचा आणि त्याला आवडणारा असा टेबलाच्या टोकाशी बसला होता. पीएर स्वतःशीच म्हणाला, ' अरे ! हा तर माझा उपकारकर्ता ! पण तो तर निश्चित हयात नाही. तो मरण पावला होता ना ? मला तो जिवंत असल्याचे ठाऊक नव्हते. तो मरण पावला तेव्हा मी किती दुःखी झालो होतो. तो पुन्हा जिवंत असल्याचे पाहून मला खूप आनंद वाटतो आहे. ' टेबलाच्या एका बाजूला अनातोल, डोलोहॉव्ह, नेस्विट्स्की, डेनिसॉव्ह आणि असेच त्यांच्यासारखे लोक बसले होते. ( पीएरच्या स्वप्नात अशा लोकांचा एक अगदी वेगळा वर्ग होता. आणि मघाच्या त्या सैनिकांचा दुसरा वेगळा वर्ग होता. ) ते लोक—विशेषतः अनातोल आणि डोलोहॉव्ह जोरजोराने ओरडत, गात होते. ह्या सगळ्यांच्या कोलाहलातूनही सतत बोलत असलेल्या त्याच्या उपकारकर्त्याचा आवाज ऐकू येत होता. रणक्षेत्रावरील कोलाहलाप्रमाणेच त्याचा वजनदार आवाज अव्याहत ऐकू येत होता. तरीही पीएरला त्या आवाजामुळे आनंद आणि समाधान वाटले. आपला उपकारकर्ता काय म्हणत होता ते पीएरला समजले नाही. तरीही तो चांगुलपणाबद्दल आणि त्या सैनिकांसारखे होणे कसे शक्य आहे याबद्दल बोलत असल्याचे त्याला कळले ( तो स्वप्नात कल्पनांचे स्पष्ट वर्गीकरण करीत होता. ) भावड्या, सुस्वभावी व धाडसी चेहऱ्यांचे ते सगळे सैनिक त्या उपकारकर्त्याभोवती गोळा झाले होते. ते दयाळू दिसत होते. पण त्यांनी पीएरकडे दृष्टी टाकली नाही; त्यांनी त्याला ओळखले नाही. पीएरला त्यांचे लक्ष आपल्याकडे वेधून घ्यायचे होते. त्यांच्याशी बोलायचे होते. तो जागा झाला त्याच क्षणी आपले पाय उघडे आहेत आणि गार पडले आहेत याची त्याला जाणीव झाली.

पीएरला आपलीच लाज वाटली. पायांवरून पांघरूण निसटले होते. त्याने पायावर हात ठेवला. पांघरूण ओढून घेताना क्षणभर त्याने डोळे उघडून पाहिले. तीच छपरे, तेच खांब, तेच आवार होते. पण आता सर्वत्र निळसर मंद प्रकाश पसरला होता. त्यात धुके चमकत होते.

पीएर मनाशी म्हणाला, ' आता उजाडू लागले आहे. पण ही महत्त्वाची बाब नव्हे. मला उपकारकर्त्याचे बोलणे ऐकू यायला आणि समजायला पाहिजे. ' त्याने पुन्हा पांघरूण लपेटून घेतले. पण मेसनांनी दिलेले भोजन आणि त्याचा उपकारकर्ता आता त्याच्या मनश्चक्षूंसमोर येईनात. शब्दांत व कल्पनांत स्पष्टपणे व्यक्त झालेले विचार तेवढे शिल्लक राहिले होते.

कुणीतरी बोलत होते. पीएर विचार करीत होता.

नंतर पीएरला त्या विचारांची आठवण झाली. जरी ते विचार त्या दिवसाच्या अनुभवामुळे जागृत झाले होते, तरी ते विचार आपल्याखेरीज दुसरा कुणीतरी विचारत होता याबद्दल पीएरला संशय नव्हता. जागृतीच्या क्षणी आपल्या मनात असे विचार येणे आणि ते अशा तऱ्हेने व्यक्त करणे कधीच शक्य नव्हते असे त्याला वाटू लागले.

तो आवाज सांगू लागला, ' मानवी इच्छेने ईश्वरी कायद्यापुढे शरण जाणे सर्वांत कठीण गोष्ट आहे. साधेपणाने राहून त्याला शरण जाता येते. देवापासून दूर जाता येत नाही. ते सैनिक सरळ साधे आहेत. ते बोलत नाहीत, कृती करतात. उच्चारलेल्या शब्दांहून न उच्चारलेल्या शब्दांचे मोल भारी असते. मरणाची भीती असेपर्यंत तुम्ही कशावरच प्रभुत्व गाजवू शकणार नाही. मरणाला न भिणाऱ्याला सर्व गोष्टी मिळतात. यातना नसत्या तर माणसाला आपल्या मर्यादा कळल्या नसत्या, स्वतःची ओळख झाली नसती. आपल्या हृदयात विश्वाचा अर्थ एकत्रित करणे सर्वांत अवघड काम आहे ' ( पीएरच्या मनात असे विचार आले किंवा त्याने ते विचार स्वप्नात ऐकले असावेत. )

काही तासांनंतर तो कोणाच्यातरी ओरडण्याने जागा झाला.

' आता घोडे जुंपायला पाहिजेत. महाराज, घोडे जुंपायची वेळ होत आली आहे, ' कुणीतरी बोलत होते, ' घोडे जुंपायला हवेत, वेळ होत आली. '

पीएरचा नोकर पीएरला उठवीत होता. सूर्याची किरणे थेट पीएरच्या तोंडावर पडली होती. त्याने पथिकाश्रमाच्या घाणेरड्या आवाराकडे पाहिले. आवाराच्या मध्यभागी असलेल्या विहिरीजवळ सैनिक आपल्या हडकुळ्या घोड्यांना पाणी पाजीत होते. मालवाहू गाड्या फाटकातून बाहेर पडत होत्या.

नोकर, गाडीवान आणि पहारेकरी यांनी पीएरला सांगितले, ' मोझाइस्कवर फ्रेंच सैन्य चाल करून येत आहे आणि आमचं सैन्य माघार घेत आहे, अशी बातमी घेऊन एक अधिकारी आला होता. '

पीएर उठला. गाडी बाहेर काढून आपल्या मागून आणण्यास सांगून तो आपण स्वतः शहरात पायी फिरू लागला.

हजारो जखमी सैनिकांना मागे सोडून सैनिकांच्या तुकड्या कूच करीत निघाल्या. जखमी सैनिक घराघरांच्या खिडक्यांतून दिसत होते. आवारात आणि रस्त्यावर गर्दी करीत होते. रस्त्यावर जखमींना घेऊन जाण्याच्या तयारीत असलेल्या गाड्यांभोवती जमलेले ओरडत, रडत, शिव्या देत, नाहीतर मारामाऱ्या करीत होते. पीएरने एका ओळखीच्या जखमी जनरलच्या सेवेला आपली गाडी दिली. त्याच्याबरोबर तोही मॉस्कोला निघाला. त्याचा मेहुणा अनातोल आणि प्रिन्स आन्द्रे हे मरण पावल्याची बातमी त्याला वाटेत मिळाली.

प्रिन्स आन्द्रेच्या मरणाची बातमी खोटी होती; तो जिवंत होता.

तीस तारखेला पीएर मॉस्कोला परत आला. जवळ जवळ शहराच्या फाटकाशीच त्याला काउंट रास्तोप्चिनचा ॲडज्युटंट भेटला.

ॲडज्युटंट म्हणाला, ' आम्ही तुम्हाला सगळीकडे शोधीत आहोत. काउंटला तुमची त्वरित भेट घ्यायची आहे. अतिशय महत्त्वाच्या कामासाठी त्यांनी तुम्हाला ताबडतोब आपल्याकडे बोलावलं आह. अगदी विनंती केली आहे.' पीएरने हाक मारून गाडी थांबवली आणि घरी जाण्याऐवजी तो गव्हर्नरकडे गेला.

काउंट रास्तोप्चिन त्याच दिवशी सकाळी आपल्या उन्हाळी बंगल्यावर परतला होता. दिवाणखान्यालगतचे छोटे दालन तसेच प्रतीक्षादालन अधिकाऱ्यांनी भरून गेले होते. काही त्याच्या हुकूमावरून आले होते, काही त्याच्याकडून सूचना घेण्यासाठी आले होते. व्हॅसिलचे-कॉव्ह आणि प्लॅटॉव्ह यांनी काउंटची आधीच भेट घेऊन त्याला सांगितले होते. ' आता मॉस्कोचे संरक्षण करणे अशक्य आहे. शहर सोडवे लागणार आहे.' नागरिकांपासून वार्ता लपविली जात होती. तरीही काउंट रास्तोप्चिनप्रमाणेच निरनिराळ्या खात्यांच्या प्रमुखांना आणि विविध प्रकारच्या अधिकाऱ्यांना मॉस्को लवकरच शत्रूच्या हातात जाणार आहे हे माहीत झाले होते. सगळ्यांना व्यक्तिगत जबाबदारी चुकवायची होती म्हणून ते सगळे आपल्याकडे असलेल्या खात्याबाबत काय करायचे हे विचारण्यासाठी गव्हर्नरकडे आले होते.

पीएरने प्रतीक्षादालनात पाऊल टाकले त्याच वेळी सैन्याकडून आलेला एक दूत काउंटची भेट घेऊन बाहेर पडत होता.

अनेकांनी त्याला प्रश्न केले तेव्हा त्या दूताने हातवारे करीत असहाय्यता प्रगट केली आणि खोलीच्या बाहेर पाय काढला.

' थकलेला पीएर वाट बघत बसल्या बसल्या तिथे गोळा झालेल्या विविध अधिकाऱ्यांना, तरुण, वृद्ध, लष्करी, नागरी महत्त्वाच्या पदांवरच्या व सामान्य अशा अधिकाऱ्यांना न्याहा-ळीत होता. सगळेजण असमाधानी आणि अस्वस्थ दिसत होते. पीएरला त्या अधिकाऱ्यांच्या एका गटातील काहीजण ओळखीचे वाटले तेव्हा तो त्यांच्याकडे गेला. मॉस्कोचे संरक्षण केले जाईल असे रोस्तॉप्चिनने वचन दिले होते त्याबद्दल ते बोलत होते. पीएरला उद्देशून स्मित करीत एकजण म्हणाला, ' काउंट, तुम्ही कसल्या तरी घरगुती तणावामुळं व्यग्र आहात असं आम्ही ऐकत आहोत. तुमची पत्नी काउंटेस...'

बेपर्वाईने पीएर म्हणाला, ' त्याबद्दल माझ्या कानांवर काही आलेलं नाही. तुम्ही काय ऐकलंत ? '

' तुम्हाला ठाऊकच आहे. पुष्कळदा गोष्टी रचून सांगितल्या जातात. मी जे ऐकलं तेवढंच पुन्हा सांगतो.'

' तुम्ही ऐकलंत तरी काय ? '

पुन्हा स्मित करीत ॲडज्युटंट म्हणाला, ' तुमची पत्नी काउंटेस परदेशी जाण्याची तयारी करीत आहे असं लोक म्हणतात. ते बहुधा मूर्खासारखे बडबडत असावेत.'

हरवल्यासारख्या दृष्टीने बघत पीएर म्हणाला, ' तसं असेलही. ' तेवढ्यात मोठाली हिमशुभ्र दाढी आणि भुवया असलेला लालबुंद चेहऱ्याचा, निळा ओव्हरकोट अंगात असलेला एक उंच वृद्ध माणूस पीएरच्या दृष्टीस पडला. त्याच्याकडे बोट दाखवून पीएरने विचारले, ' तो कोण इसम ? '

' तो ना ? तो व्यापारी आहे. तो रेस्टॉरंटचा मालक आहे. त्याचं नाव व्हेरेशचागीन. तुम्ही जाहीरनाम्यासंबंधी ऐकलंच असेल. '

' व्हेरेशचागीन हाच काय ? ' त्या व्यापाऱ्याचा निश्चयी आणि शांत चेहरा निरखीत आणि त्यात देशद्रोहाची काही खूण दिसते का पाहात पीएर म्हणाला.

' तो हा मनुष्य नव्हे. ज्याने जाहीरनामा लिहिला त्याचा हा बाप. तो तरुण मुलगा तुरुंगात आहे. त्याच्यावर ते प्रकरण चांगलंच शेकणार असं वाटतं.' ॲडज्युटंट म्हणाला.

ताऱ्याचे सन्मानचिन्ह असलेला एक लहानखुरा वृद्ध मनुष्य आणि गळ्यात क्रॉस असलेला जर्मन अधिकारी त्या गटात सामील झाले.

ॲडज्युटंट सांगू लागला, ' ती सगळीच गुंतागुंतीची गोष्ट आहे. दोन महिन्यांपूर्वी जाहीरनामा निघाला. काउंटला तो मिळाला तेव्हा त्यानं चौकशी करण्याचा हुकूम सोडला. गॅब्रिलो इव्हानिचनं चौकशी केली. जाहीरनामा त्रेसष्ट माणसांजवळून फिरत होता. आम्ही एकाला विचारलं होतं—' तुला जाहीरनामा कोणाकडून मिळाला ? प्रत्येकजण दुसऱ्याचं नाव घेत होता. असं करीत व्हेरेशचागीनपर्यंत शोध लागला. तो आहे व्यापाऱ्याचा शिकलेला, लाडावलेला पोरगा. त्यालादेखील विचारलं, ' हा जाहीरनामा तुला कोणी दिला ? ' त्यानं तो कोणाकडून मिळवला त्याचं उत्तर आम्हाला चांगलं ठाऊक होतं. पोस्ट ऑफिसच्या डायरेक्टरांखेरीज दुसऱ्या कुणाकडून त्याला तो मिळणं शक्य नव्हतं. पण त्या दोघांचं आपसात काहीतरी ठरलेलं असावं. तो म्हणाला, ' मला कोणी दुसऱ्यानं दिलेला नाही. मीच स्वतः तो तयार केला.' त्याला खूप धमकावण्यात आलं, खूप प्रश्न विचारले गेले पण त्याचं उत्तर एकच—' मीच तो जाहीरनामा तयार केला.' मग तसा रिपोर्ट केला. काउंटनं त्याला बोलावून घेतलं. त्यालाही त्यानं तेच उत्तर दिलं, ' मीच जाहीरनामा लिहिला. ' काउंट त्याच्यावर भलताच चिडला. त्याचा उद्धटपणा, त्याचा खोटारडेपणा आणि त्याचा हट्ट— सारंच आश्चर्यकारक होतं.'

' आपणास तो क्लुचार्याव्हकडून मिळाला असं त्यानं सांगावं अशी काउंटची अपेक्षा होती का ? ' पीएरने विचारले.

ॲडज्युटंट म्हणाला, ' छे ! तसं मुळीच नाही. क्लुचार्याव्हनं शिक्षा व्हायला योग्य अशी अनेक पापं केली होती. त्यासाठी तर त्याला हद्दपार करण्यात आलं. काउंटनं संतापून विचारलं, ' तू कसा लिहिलास ? ' मग काउंटने ' हॅंबुर्ग गॅझेट ' उचलून म्हटलं, ' तू जाहीर-

नाम्याचे भाषांतर केलं आहेस. फार वाईट भाषांतर केलं आहेस. तुला फ्रेंचदेखील येत नाही.' तशी तो म्हणाला, 'मी कुठलंच गॅझेट वाचलेलं नाही. मी स्वतःच तो तयार केला.' तेव्हा काउंटनं वजावलं, 'असं असेल तर तू देशद्रोही आहेस. मी तुझ्यावर खटला भरीन. तू फासावर लटकशील. कुठं मिळाला सांग.' तरीही तो म्हणाला, 'मी कोणतंही गॅझेट पाहिलेलं नाही.' तिथंच चौकशी संपली. काउंटनं त्याच्या बापाला बोलावून घेतलं. त्याचा बापही तेच सांगू लागला. त्या पोरावर खटला भरला गेला. मला वाटतं त्याला सक्तमजुरीची शिक्षा झाली. आता त्याचा बाप त्याच्यासाठी दयेचा अर्ज घेऊन आला आहे. तो अगदी पक्का लुच्चा आणि उडाणटप्पू आहे. व्यापाऱ्यांची बिघडलेली पोरं कशी वागतात ते तुम्ही जाणताच. तो नखरेबाजी करायचा, बायकांना भुलवायचा. कसलंतरी शिक्षण त्यानं घेतलं आहे आणि आपण इतरांहून कुणीतरी श्रेष्ठ आहोत असं त्याला वाटतं. खरं तर तो पक्का लफंगा आहे. त्याच्या बापाचं इथं कॅमेनी पुलावर हॉटेल आहे. त्या ठिकाणी सर्वतारक परमेश्वराची एक भली मोठी तसबीर आहे. त्या परमेश्वराच्या एका हातात राजदंड आहे. दुसऱ्या हातात साम्राज्य आहे. त्यानं ती तसबीर काही दिवस घरी नेऊन ठेवली. तिथं त्यानं काय केलं असेल ? कुठलातरी एक फालतू चित्रकार गाठून...'

हे घडत असतानाच गव्हर्नरने पीएरला बोलावले. तो येताच काउंट रास्तोप्चिनने पीएरचे स्वागत केले. 'ये वीर पुरुषा, तुझं स्वागत असो. तुझ्या शौर्याच्या गोष्टी आम्ही ऐकत असतो. पण ती महत्त्वाची बाब नव्हे. मी तुला खाजगी प्रश्न विचारतो. 'तू मेसन आहेस का ?' रास्तोप्चिनचा सूर दरडावणीचा होता. मेसन असणे गुन्हा आहे, पण तुला क्षमा करण्याचा मी विचार करतो आहे असे, त्या सुरातून तो सुचवीत होता. पीएर काही बोलला नाही. 'माझ्या मित्रा, माझी माहिती पक्की आहे. कित्येक मेसन वावरत आहेत हे मला ठाऊक आहे. मानवजातीला नवजीवन देण्याच्या मिषाने ते रशियाचा नाश करताहेत. तू त्यांच्यापैकी एक नसशील अशी मी आशा बाळगतो.'

'मी मेसन आहे.' पीएर म्हणाला.

'पोरा, मी काय सांगतो ते ध्यानात घे. स्पेरान्स्की आणि मॅग्निट्स्की यांना योग्य अशा जागी पाठवण्यात आलं. याची तुला कल्पना असेल याची मला खात्री आहे. क्लुचार्याव्ह आणि सॉलमनचे मंदिर उभारण्याच्या मिषाने जे पितृभूमीचे मंदिर पाडण्याचा प्रयत्न करीत होते त्यांचीही तीच गत झाली आहे. असं करण्याला पुरेशी कारणं आहेत. आणि पोस्ट ऑफिसचा डायरेक्टर धोकेबाज मनुष्य नसता तर मी त्याला हद्दपार केला नसता हे तू लक्षात घे. शहराबाहेर जाण्यासाठी तू त्याला आपली गाडी दिलीस, त्याच्या कागदपत्रांचा ताबाही तू घेतला आहेस असं माझ्या कानावर आलं आहे. मला तू आवडतोस. तुझं वाईट

व्हावं असं मला वाटत नाही. तू माझ्या निम्म्या वयाचा आहेस, वडिलांनी सल्ला द्यावा तसा मी तुला सल्ला देतो आहे.— तशा प्रकारच्या लोकांशी कसलाही संबंध ठेवू नकोस. शक्य तितक्या लवकर येथून निघून जा.'

'क्लुचार्याव्हनं असा गुन्हा तरी कोणता केला होता ?' पीएरने विचारले.

'ते मी पाहीन. तुला त्याबद्दल प्रश्न करण्याचा अधिकार नाही.' रास्तोप्चिन ओरडला.

'नेपोलिअनचा जाहीरनामा लोकांना वाटला असा त्याच्यावर जर आरोप असेल तर तो सिद्ध झालेला नाही.' रास्तोप्चिनकडे न पाहता पीएर बोलत राहिला. 'आणि व्हेरेशचा-गीन...... '

'हा घे पुरावा.' रास्तोप्चिन एकदम डोळे वटारून पूर्वीहून मोठ्या आवाजात ओर-डला, 'व्हेरेशचागीन हा देशद्रोही आहे. बदमाश आहे. त्याला योग्य ती शिक्षा होईलच.' राष्ट्राच्या उपमर्दाची जाणीव होऊन माणसे ज्या खुनशीपणाने बोलतात तो खुनशीपणा त्याच्या बोलण्यात होता. 'माझ्या कृतीवर टीका करण्यासाठी मी तुला बोलावलं नाही. तुझी इच्छा असेल त्याप्रमाणं तुला सल्ला नाहीतर हुकूम द्यावा म्हणून मी तुला बोलावलं आहे. क्लुचा-र्याव्हबरोबर आणि त्याच्या माणसांबरोबर असलेले सगळे संबंध तोडून टाक आणि शहर सोडून जा अशी मी तुला विनंती करतो. गरज पडेल तेव्हा त्याच्या मूर्खपणाचा मी योग्य तो बंदोबस्त करणार आहे.' बेझुहॉव्हने अद्याप तरी कसला गुन्हा केला नव्हता, तरीही आपण उगाच त्याच्याबरोबर तावातावाने बोलत आहोत याची त्याला बहुधा जाणीव झाली असावी. त्याने स्नेहभराने पीएरचा हात आपल्या हातात घेऊन म्हटले, 'आपल्या राष्ट्रावर संकटं येऊ घातली आहेत, ज्याच्याशी माझा संबंध येतो त्या सर्वांशी सभ्यतेनं वागायला मला फुरसत नाही. पुष्कळदा माझं मस्तक चक्रावून जातं. तू आता व्यक्तिशः काय करायचं ठरवलं आहेस ?'

'काहीही नाही.' पीएर उत्तरला. त्याची नजर अजूनही खालीच वळलेली होती. त्याच्या स्वप्नाळू मुद्रेत काहीही बदल झाला नव्हता.

काउंट रास्तोप्चिनच्या कपाळावर आठ्या पडल्या.

'मी तुला मित्रत्वाचा सल्ला देतो. इथून निघून जा आणि तेही शक्य तेवढ्या लवकर. जो सल्ला मानायला तयार असतो, त्याचं स्वागत असो! पोरा, आता निरोप घेऊ.' त्याला पोचवायला दारापर्यंत जाताजाता रास्तोप्चिनने विचारले, 'बरं आठवलं. जेझुइट पंथाच्या पवित्र पित्याच्या तावडीत काउंटेस सापडली आहे असं ऐकतो. ते खरं का ?'

पीएरने काही उत्तर दिले नाही. रास्तोप्चिनच्या खोलीतून बाहेर पडला तेव्हा तो कधी नव्हे इतका चिडलेला संतापलेला होता.

तो घरी पोचला तेव्हा काळोख पडला होता. त्या संध्याकाळी आठ वेगवेगळ्या दर्जाची माणसे त्याची वाट पाहात थांबली होती. कुठल्या तरी समितीचा सेक्रेटरी, शिबंदीच्या बटा-लिअनचा कर्नल, त्याचा कारभारी, त्याचा बेलिफ, आणि इतर काही माणसे अर्ज-विनंत्यांनिशी

थांबली होती. त्या सगळ्यांबरोबर पीएरला काहीनाकाही व्यवहार ठरवायचे आणि पुरे करायचे होते. त्याला त्यांच्या प्रश्नांचे ज्ञान नव्हते. त्यांच्या प्रश्नांत रसही नव्हता. एकदाचे त्यांनी निघून जावे ह्या एकमेव उद्देशाने त्याने त्यांना काही ना काही उत्तरे दिली. शेवटी जेव्हा तो एकटा राहिला तेव्हा त्याने आपल्या पत्नीचे पत्र वाचण्यास सुरुवात केली.

'ते...तोफखान्यावरील सैनिक...प्रिन्स आन्द्रे ठार...तो वृद्ध मनुष्य ... साधेपणाने ईश्वरी इच्छेला शरण जाता येते...प्रत्येकाला दुःखे भोगावी लागतात...सर्व विश्वाचे रहस्य... सगळ्यांना एकत्र जुंपायला हवे...माझी पत्नी लग्न करणार आहे...विसरा आणि क्षमा करा, ...' कपडे न काढताच त्याने बिछान्यावर अंग टाकले आणि तो लागलीच झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो उठला. तेव्हा त्याचा कारभारी येऊन म्हणाला, 'खाली पोलिस अधिकारी आलेला आहे.' काउंट बेझुहॉव्ह निघून गेला की नाही हे पाहण्यासाठी काउंट रास्तोप्चिनने त्याला अगदी उघडपणे पाठवले होते.

काहीनाकाही व्यवहारानिमित्त पीएरची भेट घेण्यासाठी विविध थरांतली दहाबारा माणसे दिवाणखान्यात बसली होती. पीएरने घाईघाईने कपडे चढवले. त्यांची भेट न घेता तो मागच्या जिन्याने उतरून मागच्या फाटकातून बाहेर निसटला.

त्या क्षणापासून मॉस्कोवरील शत्रूचा ताबा संपुष्टात येईपर्यंत बेझुहॉव्हच्या घरातील कुणालाही पीएर पुन्हा दिसला नाही, एवढेच नव्हे तर त्याला शोधण्याचा खूप प्रयत्न करूनही त्याचा ठावठिकाणा लागला नाही.

सप्टेंबरच्या एक तारखेपर्यंत रोस्तॉफकुटुंब मॉस्कोत राहिले. दुसऱ्या दिवशी शत्रूने शहरात प्रवेश केला.

पेत्या ऑबोलेन्स्कीच्या कोसॅक रेजिमेंटमधे दाखल झाला होता. त्यामुळे काउंटेस अतिशय भयभीत झाली. आपले दोघेही मुलगे लढाईवर आहेत, आपले छत्र सोडून गेले आहेत, एखादे दिवशी त्यातला एकजण किंवा दोघेही एकदमच आपल्या परिचित बाईचे तीन मुलगे मारले गेले तसे मारले जातील ही निष्ठुर कल्पना तिला छळू लागली. तिने निकोलायला परत आणण्याचा प्रयत्न केला. तिला स्वतःला पेत्याला शोधायला जायचे होते. नाहीतर पीटर्सबर्ग-मधे त्याच्यासाठी एखादी नोकरी पाहायची होती. सगळ्या गोष्टी तिला सारख्याच अशक्य वाटत होत्या. आघाडीवर असलेल्या रेजिमेंटमधे पेत्याची बदली होत होती. त्यामुळे त्याला माघारी आणणे शक्य नव्हते. त्याची रेजिमेंट परत आली असती तरच तो येऊ शकला असता. निकोलाय आघाडीवर कुठेतरी होता. प्रिन्सेस मार्याशी झालेल्या आपल्या भेटीची सविस्तर हकीकत त्याने एका पत्रातून कळवली होती. तेव्हापासून त्याचे पत्र नव्हते. काउंटेसला रात्री झोप येत नव्हती. झोप आलीच तर आपले मुलगे मारले गेले आहेत अशी दुःस्वप्ने

तिला पडत होती.

काउंटने याबाबत बरीच चर्चा केली. मित्रांचा सल्ला घेतला, आणि काउंटेसला बरे वाटेल असा उपाय शोधून काढला. मॉस्कोजवळ बेझुहॉव्हची एक रेजिमेंट उभारली जात होती. काउंटने आपल्या मुलाला-पेत्याला-ऑबेलेन्स्कीच्या रेजिमेंटमधून त्या रेजिमेंटमधे दाखल करून घेतले. असे झाले तरी पेत्या सैन्यातच राहिला. तरीही ह्या बदलीमुळे आपला एकतरी मुलगा आपल्या पंखाखाली जवळ असल्याचे समाधान तिला लाभले. पेत्या आपल्यापासून दूर होणार नाही आणि धोका नसेल त्या ठिकाणी त्याला नेहमी नेमले जाईल यासाठी आपण यशस्वी प्रयत्न करू अशी आशा ती बाळगू लागली.

संकटात असलेला असा निकोलाय काय तो एकटा होता. इतर मुलांपेक्षा थोरल्या मुलावर आपले अधिक प्रेम आहे असे ( विवेकबुद्धीची टोचणी लागल्यामुळे की काय ) तिला वाटत असायचे. पण तिचा धाकटा मुलगा, चंचल-धडपड्या, अभ्यासात कंटाळा करणारा, नेहमी व्रात्यपणा करणारा, सर्वांना सतावणारा, चपट्या नाकाचा, प्रसन्न काळयाभोर डोळ्यांचा, सतेज कांतीचा, ओठावर नुकतीच मिसरूड आलेला पेत्या-लढाईला निघाला होता. त्यामुळे आपले त्याच्यावर इतर सर्वांहून अधिक प्रेम आहे असे आता तिला वाटू लागले. ज्याच्या सहवासाची तिने इच्छा धरली होती तो पेत्या आता मॉस्कोला परत येणार होता. त्याच्या येण्याची वेळ जसजशी जवळ येत चालली होती तसतशी काउंटेसची अस्वस्थता वाढत होती. इतके सुख पाहायला आपण खात्रीने जगणार नाही असे तिला वाटू लागले.

वीस ऑगस्टच्या आधीच रोस्तॉफकुटुंबाच्या परिचयातील बहुतेक सर्वांनी मॉस्को शहर सोडले होते. काउंटेसने शक्य तितक्या लवकर मॉस्को सोडून जावे म्हणून प्रत्येकजण तिचे मन वळवण्याचा प्रयत्न करीत होता. ती मात्र आपला अमोल ठेवा-आपला लाडका पेत्या परत येईपर्यंत मॉस्को सोडण्याचे नाव काढत नव्हती. २८ ऑगस्टला पेत्या येऊन पोचला. आईने ज्या उत्कट पण रोगट प्रेमाने त्यांचे स्वागत केले त्यामुळे त्या सोळा वर्षांच्या अधिकाऱ्यास आनंद होणे मुळीच शक्य नव्हते. पेत्याला आपल्या पंखांपासून तिला कधीच दूर जाऊ द्यायचे नव्हते. आपली ही इच्छा तिने त्याच्यापासून दडवून ठेवली तरीही पेत्याला तिच्या बेताचा सुगावा लागला. आपली आई आपणास हळवा बनवील, आपणाला खुळचट करून टेवील अशी आपोआपच त्याच्या मनात धास्ती निर्माण झाली. तो तिच्याशी भावनाशून्य वागू लागला, तिचा सहवास टाळू लागला. मॉस्को येथील वास्तव्यात त्याने बहुतेक सगळा काळ नताशाच्या सहवासात घालवला.

स्वभावत:च निष्काळजी असल्याने काउंटने २८ तारखेपर्यंत निघण्याची काहीच तयारी केली नव्हती. घरातील सगळी चीजवस्तू नेण्यासाठी मॉस्को आणि रॅझानची शेतवाडी येथून येणाऱ्या मालवाहू गाड्या तीस तारखेला आल्या.

२८ पासून ३१ पर्यंत सबंध मॉस्को शहरात धामधूम सुरू झाली. दररोज बोरोदीनोच्या रणक्षेत्रावरून हजारो जखमी सैनिकांना डोरोगोमिलाव्ह गेटशी आणण्यात येई आणि मग

मॉस्को शहरातून नेले जाई. मॉस्को शहरातील रहिवासी आणि त्यांचे सामान घेऊन हजारो वाहने शहराच्या दुसऱ्या टोकाच्या प्रवेशद्वारातून बाहेर पडत होती. रास्तोप्चिनची प्रचार-पत्रके निघत होती. तरीही त्याच्याशी संबंधित नसलेल्या, किंवा त्याचा परिणाम म्हणून निर्माण झालेल्या अतिशय चमत्कारिक व परस्पर विरोधी अफवा शहरात फैलावत होत्या. सर्वांना शहर सोडण्याची मनाई करण्यात आली आहे असे काही बोलत. एकूण-एक चर्चमधील पवित्र चित्रे काढून नेण्यात आली आहेत असे कुणी सांगत. सर्वांनाच मॉस्कोमधून सक्तीने घालवून देणार अशीही वदंता उठे. बोरोदीनॉनंतर आणखी एक लढाई झाली. आणि तीत फ्रेंचांचा पुरता पाडाव झाला असे कुणी सांगू लागे तर दुसरे काहीजण सगळ्या रशियन सैन्याचा पुरता नाश झाल्याचे सांगत. मॉस्कोमधील शिबंदी सैनिक थ्री हिल्सकडे कूच करणार आहेत. त्याच्या आधी धर्मगुरू जाणार आहेत असे बोलले जाऊ लागले. देशद्रोही पकडले गेले. शेतकरी बंड करून उठले आहेत, आणि शहर सोडून जाणाऱ्यांना लुटत आहेत इत्यादी वार्ता कुजबुजल्या स्वरात सांगितल्या जाऊ लागल्या. ह्या सगळ्या अफवा होत्या.

शत्रूने मॉस्को शहर काबीज करण्यापूर्वी सतत तीन दिवस सगळे रोस्तॉफकुटुंब नाना कामे करण्यात मग्न झाले होते. कुटुंबप्रमुख काउंट इल्या अँड्रीच शहरभर घोड्यावरून सारखा फिरत होता. शहरात चालू असलेल्या सगळ्या अफवा ऐकत होता आणि घरी असला म्हणजे प्रवासाच्या तयारीबाबत धांदरटपणे फालतू सूचना देत होता.

प्रवासात कोणत्या वस्तू बरोबर घ्यायच्या आणि त्या कशा भरायच्या यावर काउंटेस देखरेख करीत होती. ती सगळ्यांवर चिडत होती. पेत्या तिच्यापासून सारखा दूर पळत होता. त्याला ती सारखी शोधीत होती. बहुतेक वेळ तो नताशाच्या सहवासात घालवीत असल्यामुळे तिला मत्सर वाटत होता. फक्त सोन्या काय ती सगळ्या वस्तू व्यवस्थितपणे बांधून घेण्याचे काम मन लावून करीत होती. आताशा ती लक्षात यावी इतकी स्तब्ध आणि दुःखी झाली होती. निकोलायने पाठवलेल्या पत्रात प्रिन्सेस मार्याचा उल्लेख केला होता. प्रिन्सेस मार्या आणि निकोलाय यांच्या भेटीत प्रत्यक्ष नियतीचा हात असला पाहिजे असे अनुमान काउंटेसने मोठ्या आनंदाने काढले होते. त्या वेळी सोन्या जवळपासच होती.

काउंटेस म्हणाली होती, ' बोलकॉन्स्कीचा नताशाशी वाङ्‌निश्चय झाला तेव्हा मला मुळीच आनंद झाला नव्हता. निकोलायनं प्रिन्सेसशी लग्न करावयाला हवं असं मला सतत वाटायचं. त्या वाङ्‌निश्चयापासून चांगलं निष्पन्न होणार नाही असं मला वाटायचं. त्यानं प्रिन्सेसशी लग्न केलं तर किती चांगलं होईल ! '

सोन्याला वाटले–तिचे म्हणणे किती खरे आहे. बऱ्याच संपत्तीची वारस असलेल्या प्रिन्सेसशी निकोलायचे लग्न झाले तरच रोस्तॉफकुटुंबाची परिस्थिती सुधारणे शक्य आहे. निकोलायला प्रिन्सेस चांगली पत्नी म्हणून शोभेल. पण ह्या विचाराने तिला क्लेश झाले, दुःख झाले. तरीही किंबहुना दुःख झाले म्हणूनच घरातील वस्तू निवडून प्रवासासाठी व्यवस्थित भरून घेण्याचे कठीण काम तिने अंगावर घेतले. ती त्या कामात गढून गेली. काही

सांगायचे असले की काउंट आणि काउंटेस तिचा सल्ला घेऊ लागले. पेत्या आणि नताशा आपल्या आईवडिलांना काहीही मदत करीत नसत. उलट इतरांच्या कामात बहुधा अडचणी निर्माण करीत. सबंध दिवसभर ते घर त्यांच्या जलदीने पडणाऱ्या पावलांच्या आवाजांनी आणि अकारण आनंदाने भरलेल्या आरोळ्यांनी निनादून जात होते. हसायला काही कारण नसतानाही ती दोघे हसत होती. आनंदात वावरत होती. ती स्वभावतःच आनंदी असल्याने तिथे घडणारी कोणतीही गोष्ट त्यांना आनंदी ठेवण्यास व हसवण्यास पुरेशी होती. पेत्या पोरगा असताना घर सोडून गेला होता आणि आता ( प्रत्येकजण त्याला ऐकवीत त्याप्रमाणे ) तो देखणा तरुण बनून आला होता. आता तो घरीच होता. ब्येली त्सर्कोव्ह सोडून तो आलेला होता. तिथे लढाईवर जाण्याची आशा उरली नव्हती. जिथे थोड्याच दिवसांत लढाई होणार होती त्या मॉस्को शहरात तो आता येऊन पोचला होता. तो नेहमी जिचे अनुकरण करी ती नताशा प्रसन्न आणि उत्साही होती. त्यामुळे पेत्याही प्रसन्न व उत्साही बनला होता. नताशा कितीतरी काळ दुःखी होती. आता ती आनंदी बनली होती. दुःखाच्या कारणाची आठवण करून देणारी कोणतीही गोष्ट नव्हती. तिचे मन पुन्हा खंबीर झाले होते.

कोणीतरी आपल्यासाठी जीव टाकावा असे तिला वाटे. ( इतरांचा स्नेह हा चाकांना मिळणाऱ्या वंगणासारखा असतो. त्या वंगणाखेरीज तिचे यंत्र कधीच सुरळीत चालत नसायचे. ) आणि तसा स्नेह पेत्या करू लागल्यामुळे ती आनंदात होती. त्या दोघांच्या आनंदाला आणखी कारणे होती. युद्ध मॉस्कोच्या प्रत्यक्ष प्रवेशद्वाराशी येऊन ठेपले होते. सरहद्दीवर आता युद्ध होणार होते. शस्त्रे वाटली जात होती. प्रत्येकजण झपाटला गेला होता. एकंदरीत काहीतरी विलक्षण घडत होते. अशा विलक्षण घटनांनी माणसांना स्फूर्ती मिळत असते–विशेषतः तरुणांना तर अधिकच मिळते. म्हणूनच नताशा आणि पेत्या दोघेही प्रसन्न आणि उत्साही होती.

३१ ऑगस्टला शनिवारी रोस्तॉफ कुटुंबाचे सगळे घरच उलथे-पालथे झालेले दिसत होते. सगळे दरवाजे सताड उघडे होते. सगळे फर्निचर हलवण्यात आले होते. आरसे तसबिरी काढून टाकण्यात आल्या होत्या. खोल्यांमधे पेट्या, गवत, सामान गुंडाळण्यासाठी लागणारा कागद आणि दोरे यांची एकच दाटी झाली होती. सामान घेऊन शेतकरी आणि घरातील नोकर लाकडी जमिनीवरून पावले वाजवीत जात होते शेतकऱ्यांच्या गाड्यांनी आवार भरून गेले होते. काही गाड्यांत सामानाचा ढीगच्या ढीग भरून दोऱ्यांनी बांधून घेण्यात आला होता तर काही गाड्यांत सामान भरावयाचे होते.

असंख्य नोकरांच्या आणि गाड्या घेऊन आलेल्या शेतकऱ्यांच्या बोलण्यांनी आणि पावलांच्या आवाजाने आवार व घर दुमदुमत होते. काउंट सकाळपासून घराबाहेरच होता. धावपळीमुळे व आवाजामुळे काउंटेसचे डोके दुखू लागले होते. म्हणून ती दिवाणखान्यात बुडव-

लेली घडी डोक्याला बांधून नव्या दिवाणखान्यात पहुडली होती. पेत्या घरी नव्हता. तो एका सहकाऱ्याला निरोप द्यायला गेला होता. त्याच्या मार्फत शिबंदीमधून आघाडीवरील रेजिमेंटमधे बदली करून घेण्याचा बेत तो आखत होता. मोठ्या दिवाणखान्यात चिनीमातीची आणि काचेची भांडी पेट्यांत भरण्याचे काम चालले होते. त्यावर सोन्या लक्ष ठेवीत होती. नताशा सामानसुमान काढलेल्या खोलीत जमिनीवर बसली होती. तिच्या भोवती कपडे, फिती आणि स्कार्फ यांचे ढीग पडले होते. ती हालचाल न करता जमिनीवर नजर लावून बसली होती. तिच्या हातात एक जुना, आता फॅशनमधे नसलेला नृत्याचा पोषाख होता. हाच पोषाख चढवून ती पीटर्सबर्गमधे पहिल्या नृत्यसमारंभाला गेली होती.

घरातील इतर सर्वजण कार्यमग्न असताना आपण काहीच करीत नाही म्हणून नताशाला शरम वाटत होती. त्या दिवशी सकाळी कितीतरी वेळा तिने काही ना काही काम करण्याचा प्रयत्न केला परंतु तिचा त्यात जीव नव्हता. तिला मनःपूर्वक काम करावेसे वाटले नाही तर तिच्याकडून कसलेही काम मुळीच होत नसे. सोन्या चिनीमातीची भांडी पेटीत भरीत असताना ती तिथे उभी राहिली आणि तिने सोन्याला मदत करण्याचा प्रयत्न केला. पण लागलीच ते काम टाकून ती आपल्या सामानाची बांधाबांध करायला आपल्या खोलीत गेली. आपले कपडे आणि आपल्या फिती दासींना देताना तिला पहिल्यापहिल्यांदा गंमत वाटली. पण जेव्हा उरलेल्या कपड्यांची बांधाबांध करायची वेळ आली तेव्हा ते काम तिला दमछाक करणारे वाटू लागले.

दुन्याशा तिच्यासाठी काम करायला लागलीच तयार झाली. तशी नताशा तो जुना पोषाख हातात घेऊन जमिनीवर बसली. त्या वेळी तिच्या मनात जे यायला हवे होते त्याहून वेगळ्याच विषयांची स्वप्ने तिला पडू लागली. शेजारच्या खोलीतील दासी बोलू लागल्या. खोलीतून मागच्या जिन्यावरून घाईघाईने जाताना त्यांची पावले वाजू लागली. तशी नताशा आपल्या दिवास्वप्नातून भानावर आली. ती उठली आणि तिने खिडकीबाहेर डोकावून पाहिले. जखमी सैनिकांनी भरलेल्या गाड्यांची लांबच लांब रांग रस्त्यावर उभी होती.

दासी, हुजऱ्ये, सैपाकी, वृद्ध दासी, सैपाकीण, गाडीवान, मोतद्दार आणि स्वैपाकघरात सटरफटर कामे करणारी पोरे-सगळेजण फाटकाशी राहून जखमी सैनिकांकडे पाहात होते.

वृद्ध कारभारी स्त्री मात्रा कुझिमनिश्ना फाटकाशी उभ्या असलेल्या गर्दीला सोडून पुढे होऊन चटईचे छप्पर असलेल्या गाडीजवळ गेली होती. ती आता गाडीत पहुडलेल्या फिकट तरुण अधिकाऱ्याशी बोलत होती. नताशाने दोनचार पावले टाकली आणि रुमाल तसाच डोक्यावर ठेवून ती वृद्धा काय म्हणते ते ऐकत ती तशीच भीतभीत थांबली.

'मॉस्कोमधे तुझ्या नात्याचे कुणी नाही तर ?' मात्रा कुझिमनिश्ना बोलत होती. 'एखाद्या घरी राहिलास तर आराम मिळेल तुला...आमच्या घरीही चालेल. मालक मंडळी जात आहेत.'

तो अधिकारी क्षीण आवाजात बोलू लागला. 'परवानगी मिळेल का पण ? मला काही कल्पना नाही...तिकडे आमचे प्रमुख अधिकारी आहेत...त्यांना विचारा.' त्याने पाठ वळवून रस्त्यावरून गाड्यांच्या रांगेला समांतर येरझारा घालणाऱ्या लठ्ठ मेजरकडे बोट दाखवले.

नताशाने भयभीत नजरेने जखमी अधिकाऱ्याकडे पाहिले. ती लागलीच मेजरला भेटायला गेली.

' जखमी लोकांना आमच्या घरी राहू द्याल का ?' तिने विचारले. मेजरने स्मित करीत आपल्या हाताने टोपीला स्पर्श केला, डोळे किलकिले करीत म्हटले, ' बाईसाहेब, आपली काय इच्छा आहे ?'

नताशाने संथपणे आपला प्रश्न पुन्हा उच्चारला. तिने अजूनही हातरुमालाचे कोपरे धरून ठेवले होते. तरीही तिचा चेहरा आणि एकंदर वागणे इतके गंभीर होते की मेजरचे हसू ओसरले. क्षणभर त्याने विचार केला— तिची विनंती पुरी करणे कितपत शक्य आहे हे त्याने स्वतःलाच जणू विचारले आणि होकारार्थी उत्तर दिले, ' खुशाल, तुम्ही त्यांना खुशाल राहू द्या.'

नताशाने मान किंचित झुकवली आणि मोठ्या त्वरेने ती अजूनही सहानुभूतीपूर्ण स्वरात त्या तरुण अधिकाऱ्याशी बोलत असलेल्या मात्रा कुझ्मिनिश्नाजवळ आली.

' ते राहू शकतील. मेजरनी परवानगी दिली आहे.' नताशा कुजबुजली.

आत तरुण अधिकारी असलेल्या त्या छपराच्या गाडीला रोस्तॉफच्या आवारात वळवण्यात आले. मग जखमी सैनिकांच्या दहाबारा गाड्या रहिवाशांच्या आमंत्रणानुसार पोवार्स्की स्ट्रीट-वरील घराच्या प्रवेशद्वाराजवळ आल्या. दैनंदिन जीवनाच्या चाकोरीच्या अगदी बाहेरील परिस्थितीतील लोकांशी आपला संबंध येणार म्हणून नताशाला आनंद झाल्याचे उघडउघड दिसत होते. आपल्या आवारात जास्तीत जास्त गाड्या याव्यात म्हणून तिने मात्रा कुझ्मि-निश्नाच्या मदतीने खूप प्रयत्न केला.

' तुझ्या वडिलांची परवानगी घ्यायला हवी.' मात्रा कुझ्मिनिश्ना म्हणाली,

' मूर्ख आहेस ! एवढी कसली मोठी बाब आहे ? आपण दिवाणखान्यात राहू. आपण त्यांना घराची अर्धी जागा सहज देऊ शकू. '

' चांगली कल्पना आहे ! पुढं काय करणार आहेस ? पुरुषांची खोली आणि वृद्ध दाईची खोली त्यांना राहायला देता येईल पण त्यासाठी परवानगी काढायला पाहिजे.'

' ठीक आहे, मी विचारून येते.' असे म्हणून नताशा आत पळाली, ती दिवाणखान्यात गेली.

' आई जागी आहेस का ?'

' हो ग ! झोप कुठली यायला ?' काउंटेस म्हणाली. ती नुकतीच कुठे डुलकी घेत होती. आई समोर गुडघे टेकून तिच्या गालावर आपला गाल ठेवीत ती म्हणाली, ' आई, गडे, माझी चूक झाली. मला क्षमा कर. मी पुन्हा अशी वागणार नाही. मात्रा कुझ्मिनिश्नानं मला पाठवलं म्हणून. . .तुला उठवलं. त्यांनी काही जखमी सैनिकांना-अधिकाऱ्यांना आत घेतलं आहे. तू त्यांना राहू देशील ना ? त्यांना दुसरीकडे कुठं जागा नाही. तू त्यांना राहू देशील असं मला वाटलं.' श्वास न घेता ती भरभर बोलली.

' अधिकारी ? त्यांना आत घेण्यात आलं ? कुणी ? काही कळत नाही.' काउंटेस म्हणाली.

नताशा हसली, काउंटेसनेही मंद स्मित केले.

'मला ठाऊक होतं तू परवानगी देशील म्हणून...मी जाते नी त्यांना तसं सांगते.' नताशा आपल्या आईचे चुंबन घेऊन उठली आणि दाराशी गेली.

दिवाणखान्यात वडिलांची गाठ पडली. वडील वाईट बातमी घेऊन आले होते.

'आम्ही फार काळ रेंगाळत राहिलो.' काउंटचा आवाज त्याच्या नकळत रागीट झाला होता. 'क्लब बंद झाला आहे. पोलिस सोडून जात आहेत.'

'पपा, मी काही जखमींना आपल्या घरी राहायला बोलावलं म्हणून तुम्हाला राग नाही ना आला?' नताशाने विचारले.

'छे, छे! मुळीच नाही.' काउंटचे तिच्या बोलण्याकडे लक्ष नव्हते. 'तो महत्त्वाचा सुद्दा नाही. आता कृपा कर. कसलंही वेड डोक्यात घेऊ नकोस. सामानाची बांधाबांध करायला मदत कर. उद्या निघायला हवं– उद्याच निघायला हवं.'

काउंटने आपल्या बटलरला आणि नोकराला तोच हुकूम सोडला. जेवणाच्या वेळी पेत्या आला. त्यांना सांगण्याजोगी वार्ता घेऊन तोही आला होता.

तो म्हणाला, 'आज क्रेमलिनमधे लोक युद्धाची तयारी करू लागले आहेत. दोन दिवसांनंतर आपण आदेश देऊ असं रास्तोप्चिननं पत्रकात सांगितलं आहे तरीही सर्व लोकांनी उद्याच शस्त्रं घेऊन थ्री हिल्सकडे जायचं आणि तिथं मोठ्या लढाईला प्रारंभ करायचा असं आधीच ठरवण्यात आलेलं आहे.'

हे सांगत असताना पेत्याचा चेहरा उत्सुक, उत्साही झाला होता. मुलाच्या त्या तशा चेहऱ्याकडे काउंटेस भयभीत अंतःकरणाने पाहात होती. भावी युद्धाच्या आशेने तो किती आनंदित होतो याची तिला कल्पना होती. आता ह्या युद्धापासून परावृत्त करण्यासाठी आपण काही बोललो तर तो काय म्हणेल हे तिला ठाऊक होते. मनुष्याचे कर्तव्य, प्रतिष्ठा, पितृभूमी यांबद्दल काहीतरी, युक्तिवादाला सोडून पुरुषी बोलण्याचे, हेकट वृत्तीचे तो काहीतरी बडबडणार, त्याला विरोध करून काही उपयोग होणार नाही, त्याला परावृत्त करण्याची आशा संपूर्णपणे सोडून द्यावी लागणार हे तिने ओळखले. ही लढाई सुरू होण्यापूर्वी आपण इथून निघू. वाटेत रक्षण करण्यासाठी म्हणून पेत्याला बरोबर घेता येईल अशी तिला आशा वाटू लागली. म्हणून ती मुलाला काही बोलली नाही. जेवण झाल्यानंतर तिने नवऱ्याला एका बाजूला बोलावले आणि डोळ्यांत अश्रू आणून त्याला विनवले, 'मला शक्य तितक्या लवकर— जमेल तर आज रात्रीच इथून घेऊन चला.' आतापर्यंत तिने कधी भीतीची पुसट खूणही दाखवली नव्हती. प्रेमापोटी असणाऱ्या स्त्रीसुलभ उपजत प्रतारणेतून ती उद्गारली, 'आपण आज रात्री इथून निघालो नाही तर मी धास्तीनं मरून जाईन.' ती आता मुळीच ढोंग करीत नव्हती. खरोखर प्रत्येक गोष्टीची तिला आता धास्ती वाटत होती.

स्कॉसबाई आपल्या मुलीला भेटण्यासाठी गेली होती. म्यास्नित्स्की स्ट्रीटवरील स्पिरिटाच्या दुकानातील प्रकार वर्णन करून तिने काउंटेसला घाबरवून सोडले. त्या रस्त्यावरून ती घरी यायला निघाली होती. पण त्या दुकानाभोवती चिडलेला झिंगलेला जमाव जमला होता त्यामुळे तिला तिथून जाता येईना. म्हणून तिने गाडी ठरवून दूरचा फेरा मारून घर गाठले होते.

जेवण संपल्यानंतर रोस्तॉफकुटुंबातील सगळी माणसे सामान बांधण्याचे आणि प्रवासासाठी इतर तयारी करण्याचे काम त्वरेने करायला मनापासून लागली. त्या कामासाठी थोरला काउंटही एकाएकी तयार झाला. आवार आणि घर यामध्ये ये-जा करण्यात, गडबडीत असणाऱ्या नोकरांना गोंधळात टाकणाऱ्या सूचना देऊन त्यांची आणखी घाई उडवण्यात त्याने सगळा दिवस घालवला. आवारातील कामावर पेत्या लक्ष ठेवीत होता. काउंटच्या परस्पर-विरोधी सूचनांमुळे सोन्या गोंधळून गेली होती आणि तिला आपण काय करावे हे सुचत नव्हते. खोल्याखोल्यांतून धावपळ करणारे नोकर ओरडत होते, भांडत होते, गडबड करीत होते. एकाएकी नताशा देखील कामाला लागली. घेतलेले काम तळमळीने करणे हे तिच्या स्वभावात होते. त्या तळमळीने ती काम करू लागली. ती कामाला लागलेली पाहून प्रत्येकाच्या मनात विकल्प उभे राहिले. ती गंभीरपणे काही काम करील, तिच्या सूचना पाळाव्यात असे कुणालाच वाटत नव्हते. उत्कट ओढ आणि चिकाटी यांच्या जोरावर तिने सर्वांना आपले म्हणणे ऐकायला लावले. लोक आपल्याकडे लक्ष देत नाहीत म्हणून ती रागावली, एवढेच नव्हे तर रडवेली झाली. शेवटी त्यांचे मन वळवण्यात ती यशस्वी झाली.

त्या सर्वांनी इतके परिश्रम घेतले तरी मध्यरात्रीपर्यंत सगळी तयारी झाली नाही. काउंटेस केव्हाच झोपी गेली होती. काउंटने सकाळी निघायचे ठरवले आणि तो स्वतःही झोपी गेला.

सोन्या आणि नताशा कपडे न बदलताच दिवाणखान्यात झोपी गेल्या.

त्या रात्री पोवास्की स्ट्रीटवरून आणखी एका जखमी अधिकाऱ्याला आणण्यात आले. फाटकाशी माव्रा कुझ्मिनिश्ना उभी होती. तिनेच त्याला रोस्तॉफच्या आवारात आणले होते. हा जखमी अधिकारी कुणीतरी उच्च हुद्द्यावर असावा असे माव्रा कुझ्मिनिश्नाला वाटले.

गाडीवानाच्या शेजारी पेटीवर अतिशय आदर वाटावा असा म्हातारा बसला होता. तो त्या अधिकाऱ्याचा नोकर होता. त्या गाडीच्या मागोमाग येणाऱ्या दुसऱ्या गाडीत एक डॉक्टर आणि दोन सैनिक होते.

त्या म्हाताऱ्या नोकरास उद्देशून म्हातारी माव्रा कुझ्मिनिश्ना म्हणाली, ' तुम्ही आमच्या घराचा आश्रय घेऊ शकता. मालक आपल्या सगळ्या माणसांसह जाताहेत. सगळं घर रिकामं आहे. '

तसा तो म्हातारा उसासा टाकून म्हणाला, ' काय सांगू तुम्हाला. मालकांना घरी सुखरूप नेता येईल अशी मला मुळीच आशा वाटत नाही. आमचं स्वतःचं घर मॉस्को शहरात आहे. पण ते इथून फार दूर अंतरावर आहे. शिवाय आताशा त्या ठिकाणी कोणीही राहात नाही. '

' तुम्ही राहायला या ना. मालकांकडे सगळ्या गोष्टी भरपूर प्रमाणात आहेत. तुमचं इथं

स्वागतच होईल.' मात्रा कुझिमनिश्ना म्हणाली. 'तुमच्या मालकांची प्रकृती फार गंभीर आहे का?'

'मला तर आशा वाटत नाही. आता डॉक्टरांनाच बोलावलं पाहिजे.' नोकर गाडीतून उतरून मागच्या गाडीकडे गेला.

'फार छान.' डॉक्टर म्हणाले.

म्हातारा नोकर पुन्हा आपल्या गाडीकडे आला. गाडीतून डोकावून त्याने मान हालवली आणि गाडीवानाला गाडी आवारात घ्यायला सांगितली. आपण मात्रा कुझिमनिश्नाच्या जवळ उभा राहिला. आजारी अधिकाऱ्याला घरात हालवायला सांगितले. 'मालक काही म्हणणार नाहीत,' ती म्हणाली.

त्यांना पायऱ्या चढून आजारी अधिकाऱ्याला वर न्यायचे नव्हते. प्रवेशद्वाराशी नोकरांच्यासाठी बांधलेले छोटे घर होते त्यात त्याला ठेवण्यात आले. हा जखमी अधिकारी होता प्रिन्स आन्द्रे बोलकॉन्स्की.

मॉस्कोचा अखेरचा दिवस उजाडला. शरदातील आकाश उजळ निरभ्र होते. तो रविवारचा दिवस होता. इतर रविवारी प्रार्थनेसाठी चर्चमधे घंटानाद होई तसा तो आजही सुरू झाला. मॉस्कोच्या नशिबात काय वाढून ठेवले आहे याची कल्पना कुणालाच आलेली दिसत नव्हती.

पहाटेपासून मॉस्कोला जाणाऱ्या गाडीत जागा मिळावी म्हणून नोकरामार्फत विनंती करण्यासाठी जखमी अधिकाऱ्यांनी पाठवलेले ऑर्डर्ली व नोकर रोस्तॉफच्या आवारात येत होते. तसेच रोस्तॉफच्या व जवळच्या घरातील जखमी सैनिकही स्वतःच खुरडत रखडत सारखे येत होते. बटलरला अशा प्रकारची विनंती केली जाई आणि त्याला जरी जखमी अधिकाऱ्यांबद्दल दया वाटे तरीही तो ठामपणे त्यांना नकार देई आणि म्हणे, 'अशा तऱ्हेची सूचना काउंटला करण्याचं धाडस मला तरी कधीही होणार नाही.' ह्या सगळ्या जखमी सैनिकांची परिस्थिती दयनीय होती. तरीही एकाला गाडी दिली तर सर्वांना गाड्या द्याव्या लागतील हे उघड होते. तीस मालवाहू गाड्या काही सर्व जखमींना वाचवू शकणार नाहीत. सर्वांवर आलेल्या ह्या संकटात प्रत्येकाने आपला आणि आपल्या कुटुंबाचा विचार प्रथम केला पाहिजे अशा तऱ्हेचा युक्तिवाद तो बटलर आपल्या धन्याच्या वतीने करीत होता.

त्या दिवशी सकाळी काउंट इल्या अँड्रीच उठला. पहाटेपर्यंत जागून आता झोपी गेलेली पत्नी उठू नये म्हणून तो अगदी हलक्या पावलांनी शयनगृहाच्या बाहेर पडला. फिकट जांभळ्या रंगाचा रेशमी ड्रेसिंग गाऊन अंगावर चढवून तो पायऱ्यांशी आला. आवारात सामान भरलेल्या गाड्या होत्या. काही गाड्या पायऱ्यांजवळ आणलेल्या होत्या. प्रवेशद्वाराशी बटलर एक वृद्ध ऑर्डर्ली आणि झोळीत हात असलेला एक अधिकारी यांच्याशी बोलत उभा होता. आपल्या धन्याला पाहताच बटलरने त्या दोघांनाही त्वरित निघून जाण्याचा इशारा केला.

'व्हॅसिलिच, सगळी तयारी झाली ना?' आपल्या टकलावर हात चोळीत काउंटने विचारले. मग म्हाताऱ्या ऑर्डलींकडे व त्या अधिकाऱ्याकडे प्रेमळपणे पाहून मान हालवली. (काउंटला नेहमीच नव्या चेहऱ्यांचे आकर्षण वाटे.)

'सगळी तयारी आहे. केवळ घोडे जुंपायचा अवकाश आहे, महाराज.'

'फार उत्तम. काउंटेस आता लवकरच उठेल. परमेश्वरकृपेने आम्ही आता निघू.' मग अधिकाऱ्याला उद्देशून काउंटने विचारले, 'मी आपल्यासाठी काय करू?'

तो अधिकारी काउंटच्या जवळ आला. त्याचा फिकट चेहरा एकदम लाल झाला. 'काउंट, माझ्यावर उपकार करा...कृपा करून मला...काहीही करून तुमच्या एखाद्या सामानवाहू गाडीत...माझ्याजवळ इथं काहीच नाही...मला सामानाची अडचण होणार नाही...'

अधिकाऱ्याने आपले बोलणे संपवण्यापूर्वीच तशा प्रकारची विनंती आपल्या धन्याच्या वतीने करण्यासाठी एक ऑर्डर्ली आला.

काउंट घाईघाईने म्हणाला, 'ठीक आहे. मला मदत करायला आनंद होईल. व्हॅसिलिच तूच कर याची व्यवस्था...एखाद-दुसरी सामानवाहू गाडी रिकामी असेल...काय करावं लागेल?' काउंटने काहीतरी अस्पष्ट शब्दात सूचना दिल्या. काउंटने भोवताली पाहिले... आवारात, फाटकांपाशी, खिडक्यांखाली सगळीकडे जखमी माणसे, जखमी ऑर्डर्ली दिसत होते. सगळेजण त्याच्याकडे टक लावून पाहात पायऱ्यांच्या दिशेने सरकत होते.

'महाराज, तुम्हाला वेळ आहे का? चित्रदालनात या आणि चित्रांचं काय करायचं ते सांगा.' बटलर म्हणाला. काउंट त्याच्याबरोबर घरात शिरला. त्याने बटलरला सांगितले, 'बरोबर घ्या अशी विनंती करणाऱ्या जखमींना तुम्ही नकार देता कामा नये. सामानातील काही सामान वाटलं तर काढून ठेवा.' शेवटचे वाक्य कुणी ऐकले की काय या भीतीने तो हळू चमत्कारिक आवाजात उद्गारला.

नऊ वाजता काउंटेस उठली. काउंटेसच्या लग्नापूर्वी तिची सखी म्हणून वावरणारी आणि आता तिचे काहीसे व्यवस्थापिकेचे काम करणारी मॅट्रोना तिमॉफ्येवना काउंटेसकडे येऊन म्हणाली, 'स्कॉसबाई अतिशय दुखावल्या आहेत. तरुण मुलींचे वसंतात घालायचे कपडे काही इथं ठेवता येणार नाहीत.' काउंटेसने स्कॉसबाईच्या रागाचे कारण विचारले तेव्हा तिला कळले–स्कॉसबाईची ट्रंक गाडीतून बाहेर काढून टाकण्यात आली आहे. काउंट नेहमीच लोकांचे ऐकतात त्याप्रमाणे आजही जखमी लोकांना बरोबर न्यायला कबूल झाले आहेत. म्हणून गाड्या रिकाम्या केल्या जात आहेत. सामान बाहेर काढले जात आहे. काउंटेसने लागलीच आपल्या नवऱ्याला बोलावणे धाडले.

'काय चाललं आहे तरी काय? सामान गाड्यांतून बाहेर टाकताहेत असं ऐकते ते खरं का?'

'हे बघ. मी तुझ्याकडे त्यासंबंधी बोलणारच होतो...रागावू नको...एक अधिकारी

माझ्याकडे आला...जखमी लोकांना सामानगाड्या देण्याची विनंती करताहेत. आपली यात आर्थिक हानी आहे हे खरंच...पण इथंच पडून राहणं किती भयंकर...त्यांच्या दृष्टीनं विचार कर...ते सगळे इथं आपल्या आवारात जमले आहेत. आपण त्यांना इथं बोलावून आणलं ...हे सगळे अधिकारी...मला मनापासून वाटतं...त्यांना गाड्या द्याव्यात...आपणाला इतकी घाई नाही.'

पैशासंबंधीची गोष्ट आली की काउंट भीतभीत बोलायचा तसा तो आताही बोलत होता. चित्रदालनासाठी नवी इमारत, संरक्षित उद्यान, घरात बांधायचे नवे नाट्यगृह अगर वाद्य-वृंदांचे शिक्षण अशासारख्या स्वतःच्या मुलांच्या कल्याणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या गोष्टी मांडताना त्याचा स्वर कसा होतो याचा तिला नेहमी परिचय होता. अशा स्वरात मांडलेल्या सर्व योजनांना विरोध करायचा हे तिने आपले कर्तव्य मानले होते आणि तशी सवय तिला जडली होती.

काही विरोध न करता ती अश्रू गाळीत राहिली आणि मग नवऱ्याला म्हणाली, 'काउंट, तुम्ही एकही काम व्यवस्थित केलेलं नाही. घर तर सोडून जावं लागत आहे. त्यावद्दल काही मिळणार नाही. आता तुम्हाला आपली मुलांची सगळी मालमत्ता फुंकून टाकायची आहे. आपल्या घरात लाखो रूबल किंमतीची मालमत्ता आहे, असं तुम्हीच मला सांगितलं होतं. या तुमच्या वागण्याला माझी मुळीच संमती नाही. तुम्हाला हवं आहे तरी काय? जखमींची काळजी घेणं सरकारचं कर्तव्य आहे. सरकारला ते चांगलं समजतं. समोर राहणाऱ्या लापुहिन-कुटुंबानं घरातील झाडून साऱ्या वस्तू नेल्या हे लक्षात घ्या. लोक कसे वागतात ते तरी पाहा. आम्हीच मात्र मूर्ख आहोत. तुम्हाला स्वतःची पर्वा नसली तर नसो, निदान मुलांची तरी थोडी काळजी घ्याल की नाही?'

काउंटने निराशेने हात उडवून काही न बोलता खोलीतून पाय काढला.

'पपा, असं का करता आहात?' त्याच्या मागोमाग आईच्या खोलीत आलेल्या नताशाने विचारले.

'काही करीत नाहीत. तुला काय करायचं आहे त्याच्याशी?'

'मी ऐकत होते. पपा, आई कबूल का होत नाही?'

'तुझा त्याच्याशी काही संबंध नाही.' काउंट ओरडला.

वैतागलेली काउंटेस आपल्या नवऱ्याला उद्देशून म्हणाली, 'नोकर काय करताहेत कळत नाही. कसलीच तयारी झाली नाही असं मला त्यांनी आत्ताच सांगितलं. कुणीतरी जाऊन त्यांच्याकडे लक्ष दिल्याखेरीज चालणार नाही. अशा वेळी मायटेङ्काची गैरहजेरी जाणवते. ह्या कटकटी संपता संपायच्या नाहीत.'

तसा थोरला काउंट ओरडला. 'तुम्ही सगळे नरकात जा–नरकात जा. माझं डोकं गरगरतं आहे.' असे म्हणून तो खोली बाहेर पडला. तेव्हा काउंटेसला रडू कोसळले.

'ममा, खरंच परिस्थिती भयंकर झाली आहे.'

नताशा आपल्या वडिलांमागून गेली. कसल्यातरी कठीण प्रश्नाबाबत निश्चय घेता येत नव्हता म्हणून की काय ती त्याच्या मागून गेली होती. पण ती तशीच मागे वळून वेगाने जिना उतरू लागली.

प्रवेशद्वाराशी उभा असलेला पेत्या मॉस्को सोडून जाणाऱ्या नोकरांना शस्त्रे देण्यात गुंतला होता. सामानाने भरलेल्या गाड्या अजूनही आवारात उभ्या होत्या. त्यांतील दोन गाड्यांच्या सामानावर बांधलेले दोर काढून टाकण्यात आले होते. त्यातील एका गाडीवर एक अधिकारी आपल्या ऑर्डर्लीच्या मदतीने चढण्याचा प्रयत्न करीत होता.

पेत्याने नताशाला विचारले, 'ते कशाबद्दल होतं ठाऊक आहे का?' (नताशाला पेत्या काय विचारत होता ते कळले. आईवडील कशासाठी भांडत होते ते त्याला सांगायचे होते.) तिने काही उत्तर दिले नाही.

'पपांना सगळ्या मालवाहू गाड्या जखमी सैनिकांना द्यायच्या होत्या म्हणून. व्हॅसिलीचनं सांगितलं मला. मला वाटतं की...' पेत्या म्हणाला.

तशी नताशा पेत्याकडे क्रुद्ध मुद्रा करून पाहात जवळजवळ किंचाळली. 'मला वाटतं की, मला वाटतं की तसं करणं नीच, घाणेरडं आहे. तिरस्कार वाटावा असं आहे...मी काय सांगणार? आम्ही क्षुद्र जर्मन लोक आहोत का?' हुंदक्यांनी तिचा कंठ थरथरत होता. आपण दुबळी ठरू, आपल्या रागाची शक्ती वाया जाईल याची तिला धास्ती पडली. ती तशीच वळली आणि विलक्षण वेगाने जिना चढू लागली.

काउंट हातात पाइप घेऊन खोलीत येरझारा घालत होता. अशा वेळी नताशा वादळासारखी खोलीत घुसली आणि ती आईसमोर उभी राहिली.

'किती नीचपणाचं! किती किळसवाणं! तुझा असा हुकूम असेल हे खरं वाटत नाही.' नताशा किंचाळली.

काउंटेस घाबरून आणि गोंधळून तिच्याकडे पाहातच राहिली. खिडकीशेजारी उभा असलेला काउंट स्तब्धपणे ऐकत राहिला.

नताशा ओरडत म्हणाली, 'ममा, हे अशक्य आहे. आवारात काय चाललं आहे पाहा तरी. त्या लोकांना इथंच टाकणार आहात?'

'अग झालं काय? कुणाला टाकतो आहोत? तुला हवं आहे तरी काय?'

'ती जखमी माणसं. ममा, तसं होणं अशक्य आहे. भयंकर जुलूम आहे. ममा, आपण घोर चूक करतो आहोत. क्षमा कर मला, ममा, क्षमा कर. आम्ही जे नेत आहोत ते एवढं का महत्त्वाचं, मोलाचं आहे? जरा डोकावून आवारात पाहा तरी...ममा...नाही. तसं घडता कामा नये.'

खिडकीत उभ्या असलेल्या काउंटने वळून पाहिले नाही. पण तो नताशाचे बोलणे ऐकत होता. एकाएकी त्याने आवंढा गिळला. आपला चेहरा खिडकीच्या आणखी जवळ नेला.

काउंटेसने आपल्या मुलीकडे पाहिले. तिला आपली शरम वाटत असल्याचे तिच्या मुद्रेवरून तिला कळले. तिची उत्कट भावना तिच्या लक्षात आली. आता आपला नवरा आपल्याकडे का पाहात नाही त्याचे कारण तिला जाणवले. अस्वस्थ बेचैन होऊन ती भोवती पाहू लागली.

'बाळ, तुला हवं तसं तू कर. मी कुणाला कशासाठी अडथळा केला आहे का ?' एकदम न नमता ती म्हणाली.

'ममा, गडे, मला क्षमा कर.'

पण काउंटेस आपल्या मुलीला दूर लोटून काउंटजवळ गेली. 'काउंट, तुमचा हुकूम रास्त होता... तुम्ही जाणता मला यातलं काही कळत नाही.' अपराधी भावनेने तिने नजर खाली वळवली.

'पिलं कोंबडीला शिकवताहेत.' काउंटच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. त्याने आपल्या पत्नीला छातीशी धरले. आपला शरमिंदा चेहरा त्याच्या मिठीत तिने आनंदाने लपवला.

'पपा, ममा, मी हुकूम देऊ का ? देऊ का ?' नताशाने विचारले आणि म्हटले, 'काही झालं तरी अगदी आवश्यक वस्तू आपण बरोबर घेऊच.'

काउंटने मान डोलावली. नताशा दिवाणखान्यातून प्रवेशद्वारात आणि तिथून जिन्यावरून खाली आवारात धावत गेली.

नोकर नताशाभोवती जमा झाले. तिने दिलेला हुकूम त्यांना चमत्कारिक वाटला. त्यावर त्यांचा विश्वास बसेना. मात्र काउंटेसच्या वतीने त्यांना जेव्हा काउंटने सांगितले, 'सर्व सामानवाहू गाड्या जखमी लोकांच्यासाठी द्या. त्यांतील पेट्या काढून कोठीत ठेवा.' तेव्हा मात्र त्यांना हुकूम खरा वाटला. मग ते मोठ्या आनंदाने नव्या कामाला लागले. आता त्यांना तो हुकूम मुळीच विचित्र वाटेना. उलट दुसरे काही करणे शक्य नाही हे त्यांना पटत असल्याचे दिसत होते. पंधरा मिनिटांपूर्वी जखमींना मागे टाकून फर्निचर घेऊन जाण्यात त्यांना काही गैर वाटले नव्हते. त्यांना त्या वेळी तोच एक मार्ग शक्य असल्याचे वाटत होते.

आता कुटुंबातील सगळी माणसे जास्तीत जास्त उत्साहाने जखमी लोकांना गाड्यांत चढण्यासाठी मदत करू लागली- काही वेळापूर्वी त्यांना त्यांनी मदत केली नव्हती. त्याची भरपाई जणू ते आता करीत होते. जखमी सैनिक खोल्याखोल्यांतून रांगत सरपटत येऊन सामानवाहू गाड्यांभोवती गर्दी करू लागले. त्यांचे फिकट चेहरे आनंदाने उजळून निघाले होते. आजूबाजूच्या घराघरांत बातमी पसरली. तशी त्या घराघरांतून जखमी माणसे आवारात येऊ लागली. कितीतरी जखमी सैनिक विनवू लागले, 'पेट्या काढून टाकू नका. आम्हाला त्यावर बसू द्या.' पण सामान काढण्याचे काम सुरू झाले ते काही संपेना. आता सगळ्या पेट्या मागे टाकल्या काय अगर अर्ध्या मागे टाकल्या काय त्यांच्या दृष्टीने कशालाच महत्त्व नव्हते.

चिनी मातीची भांडी, ब्राँझच्या वस्तू, चित्रे आणि आरसे ह्या वस्तू काल रात्री किती काळजी घेऊन पेट्यांत भरलेल्या होत्या त्या पेट्या आता आवारातच राहिल्या. तरीही ती माणसे जास्तीत जास्त पेट्या काढून जखमी सैनिकांना जातीत-जास्त जागा करता यावी यासाठी प्रयत्न करू लागली.

दोन वाजण्याच्या सुमारास रोस्तॉफकुटुंबाच्या सामानाने भरलेल्या चारही गाड्या निघण्याच्या तयारीत प्रवेशद्वाराशी उभ्या होत्या. जखमी सैनिकांनी भरलेल्या गाड्या आवारातून एकामागून एक अशा बाहेर पडत होत्या.

प्रिन्स आन्द्रेला नेणारी गाडी समोरच्या प्रवेशद्वारातून निघाली. मोठाल्या उंच गाडीतील काउंटेसचे आसन सुखावह व्हावे म्हणून दासीला मदत करीत असलेल्या सोन्याचे लक्ष त्या गाडीकडे गेले.

गाडीच्या खिडकीतून बाहेर डोकावत सोन्याने विचारले, 'कुणाची गाडी ?'

'तू ऐकलं नाहीस का ? ती जखमी प्रिन्सची गाडी आहे. रात्री इथंच मुक्काम होता. आता जात आहे.'

'कोण प्रिन्स ? नाव काय त्याचं ?'

'ज्याच्याशी वाङ्निश्चय झाला होता तो प्रिन्स बोलकॉन्स्की.' दासी उसासा टाकून म्हणाली, 'असं म्हणतात तो आता वाचत नाही.'

सोन्याने गाडीतून उडी मारली आणि ती काउंटेसकडे धावत गेली. काउंटेसने प्रवासाचा पोषाख केला होता. हॅट घालून अंगावर शाल घेऊन ती दिवाणखान्यात कंटाळून येरझाऱ्या घालीत होती. निघण्यापूर्वी दारे बंद करून मूक प्रार्थना करण्यासाठी घरातील इतर माणसे केव्हा येतात त्याची ती वाट पाहात होती. नताशा खोलीत नव्हती.

'ममा, प्रिन्स आन्द्रे इथंच आहे. जखमी झाला आहे. तो थोड्या वेळाचा सोबती आहे. तो आपल्या बरोबर येतो आहे.'

काउंटेसने भयचकित होऊन डोळे विस्फारले. सोन्याच्या दंडाला धरून तिने आजूबाजूला नजर फिरवली अन म्हटले, 'नताशा.'

सोन्या आणि काउंटेस या दोघींनाही प्रथमक्षणी त्या बातमीला महत्त्वपूर्ण अर्थ आहे असे वाटू लागले. त्या नताशाला चांगलेच ओळखत होत्या. त्यांना तो मनुष्य आवडत होता. तरीही त्या बातमीचा परिणाम नताशावर काय होईल या विचाराने त्या इतक्या घाबरल्या की तो आवडत असूनही त्याच्याबद्दल वाटणारी सहानुभूतीही मागे पडली.

'नताशाला अजून ठाऊक नाही. पण तो आपल्याबरोबरच येत आहे.' सोन्या म्हणाली.

'तो थोड्या वेळाचा सोबती आहे असं तू म्हणालीस ?'

सोन्याने मान हालवली.

काउंटेसने सोन्याला मिठीत घेतले आणि ती रडू लागली. 'परमेश्वराची लीला अगाध आहे.' आता घडत असलेल्या सर्व गोष्टींत आतापर्यंत अदृश्य असलेले परमेश्वरी अस्तित्व व्यक्त होत आहे असे तिला वाटू लागले.

'ममा, सर्व तयारी झाली. काय झालं ग?' उत्कंठित चेहऱ्याने खोलीत धावत आलेल्या नताशाने प्रश्न केला.

'काही नाही. तयारी झाली असेल तर आपण निघू या.' काउंटेस म्हणाली आणि आपली अस्वस्थ मुद्रा लपवण्यासाठी आपल्या जाळीदार पिशवीकडे वाकून पाहू लागली.

सोन्याने नताशाला मिठीत घेऊन तिचे चुंबन घेतले. नताशा तिच्याकडे चौकस नजरेने पाहू लागली.

'काय झालं? काय झालं सांग ना? काहीतरी माझ्याबाबत... काहीतरी वाईट घडलं आहे का? सांग ना काय ते?' नताशाने विचारले.

सोन्याने उसासा टाकला आणि ती गप्प राहिली. काउंट, पेत्या, स्कॉसबाई, मात्रा कुझिमनिश्ना आणि व्हॅसिलिच दिवाणखान्यात आले. दारे बंद करून सगळेजण कुणाकडे न पाहता बरेच क्षण शांतपणे बसून राहिले.

प्रथम काउंट उठला. ऐकू येईल असा दीर्घ उसासा टाकून त्याने पवित्र प्रतिमेसमोर राहून क्रॉसची खूण जुळवली. सर्वांनी त्याचे अनुकरण केले. मात्रा कुझमीनिश्ना आणि व्हॅसिलिच मॉस्कोत राहाणार होते. त्यांना काउंट आलिंगन देऊ लागला. ते त्याचे हात घेऊन त्याच्या खांद्याचे चुंबन घेत असताना काउंटने अस्पष्ट प्रेमळ व आश्वासक शब्द बोलत त्यांना पाठीवर थोपटले. काउंटेस प्रार्थनामंदिरात गेली. सोन्याने पाहिले तो भिंतीवर कुठे ना कुठे राहिलेल्या पवित्र प्रतिमांसमोर तिने गुडघे टेकले होते. कुटुंबाच्या परंपरांशी निगडित असल्याने अत्यंत मोलाच्या वाटणाऱ्या सर्व पवित्र तसबिरी ते बरोबर घेऊन जात होते.

पेत्याने मॉस्को सोडून जाणाऱ्या सर्व नोकरांना तलवारी व कट्यारी दिल्या होत्या. नोकरांनी त्या बुटांमध्ये वा विजारीत खोवल्या होत्या. कमरेला कातडी पट्टे नाहीतर रेशमी शेले गच्च आवळून बांधले होते. पोर्च आणि आवार यांमध्ये त्यांनी मॉस्कोलाच राहणाऱ्या नोकरांचा निरोप घेतला.

जो गाडी हाकायला असला तरच काउंटेस निःशंक असे तो म्हातारा एफिम पेटीवर बसला होता. आपल्या मागे काय चालले आहे हे त्याने एकदाही वळून पाहिले नाही. 'आता गाडी जाऊ दे.' असे त्यांनी म्हणायला बराच वेळ लागणार, विसरलेल्या वस्तू आणायला माणसे पाठवली जाणार, आपणाला तोपर्यंत थांबायला सांगतील, काउंटेस खिडकीतून डोकावून 'बाबारे कृपा करून हळूहळू गाडी हाक' असे सांगणार आणि आपणाला पुन्हा एकदा थांबावे लागणार, हे सगळे घडणार हे त्याला तीस वर्षांच्या अनुभवाने कळून चुकले होते. त्यामुळे तो जे जे घडत होते ते स्वस्थपणे पाहात होता. पण त्याच्या घोड्यात विशेषतः डावी-

कडच्या तांबूस पिंगट रंगाच्या फाल्कन नावाच्या घोड्यात तेवढी सहनशीलता नव्हती. तो सारखा खुरांनी जमीन उकरीत होता आणि काहीतरी चघळत होता. शेवटी सर्व मंडळी गाडीत बसली. गाडीच्या पायफळ्या वर ओढून घेण्यात आल्या. दरवाजा धाडदिशी लावण्यात आला. विसरून राहिलेली प्रवासी बॅग आणायला निरोप गेला. काउंटेसने खिडकीबाहेर डोकावून नेहमीचा हुकूम दिला. मग एफिम सावकाश आपली हॅट काढून क्रॉसची खूण जुळवू लागला. गाडीच्या घोडेस्वारांनी आणि नोकरांनी त्याचा कित्ता गिरवला.

एफिमने हॅट घालून म्हटले, ' परमेश्वर पाठीशी आहे, चला. ' घोडेस्वारांनी घोडे पिटाळले. उजव्या जोखडाचा घोडा ओढ घेऊ लागला. तशा उंच कमानी करकरू लागल्या. गाडीला हेलकावे मिळू लागले. गाडी चालू असतानाच नोकराने पेटीवर उडी मारली. आवारातून खडबडीत फुटपाथवरून जाताना गाडी हिसके खात होती. मागून येणाऱ्या इतर गाड्याही रस्त्याला पोचेपर्यंत तसेच हिसके खात होत्या. समोरील चर्चचे दर्शन होताच सर्व प्रकारच्या गाड्यांतील लोकांनी क्रॉसची खूण केली. मॉस्कोतच राहात असलेले नोकर प्रवाशांना निरोप देण्यासाठी गाडीच्या दोन्ही बाजूंनी चालू लागले.

नताशा गाडीमध्ये काउंटेसच्या शेजारी बसली होती. आपण सोडून जात असलेल्या अशांत मास्को शहराच्या भिंती हळूहळू तिच्या डोळ्यांपुढून मागे सरकत होत्या. त्या क्षणी तिला कधी नव्हे एवढा आनंद वाटत होता. मधूनमधून ती खिडकीतून बाहेर डोकावून पाही. मागे वळून पाही. मागाहून जखमी सैनिकांना घेऊन येणाऱ्या सामानवाहू गाड्यांची रांगच रांग तिला दिसू लागे, त्या सर्वांपुढे प्रिन्स आन्द्रेची बंदिस्त गाडी तिला दिसत होती. त्या गाडीत कोण आहे हे तिला माहीत नव्हते. जेव्हा जेव्हा ती त्या गाड्यांची रांग पाही तेव्हा तेव्हा ती विशिष्ट गाडी आहे की नाही ते पाहून घेई. ती सर्वांच्या पुढे असणार हे तिला ठाऊक होते. रोस्तॉफच्या गाड्यासारख्या अनेक गाड्या मार्गात चालू लागल्या होत्या. सॅदोव्हायला ते पोचेपर्यंत तर कितीतरी गाड्या व मालवाहू गाड्यांची रांग रस्त्यावर दूरवर पसरलेली होती.

सुहारेव्ह टॉवरला त्यांनी वळसा घातला. गाड्यांतून आणि चालत येणाऱ्या माणसांकडे चौकसपणे पाहात असलेली नताशा आनंदाने आणि आश्चर्याने ओरडली, ' ममा, सोन्या, बघा तोच आहे. '

' कोणाबद्दल बोलते आहेस ? '

' तिकडे बघा तरी. बेझुव्हॉव्ह. ' नताशाने गाडीच्या खिडकीतून बाहेर डोकावून गाडीवानाचा लांब कोट घातलेल्या एका उंच धिप्पाड माणसाकडे पाहात म्हटले. त्या माणसाच्या चालण्यावरून त्याने वेषांतर केल्याचे स्पष्ट दिसत होते. तो सुहारेव्ह टॉवरच्या कमानीखालून जात होता. तेव्हा त्याच्या जवळ सोबत पिवळट वर्णाचा, दाढी नसलेला, लहान बांध्याचा आणि नक्षीदार किनारीचा झगा घातलेला म्हातारा होता.

' आश्चर्यच आहे. बेझुहॉव्हने गाडीवानाचा कोट घातला आहे. त्याच्या बरोबर म्हातारा दिसणारा विचित्र मुलगा आहे. बघा तरी. ' नताशा म्हणाली.

'तो निश्चित नव्हे. उगाच मूर्खासारखी बोलू नकोस.'

तशी नताशा ओरडली, 'ममा, मला खात्रीनं वाटतं तो बेझुहॉव्हच आहे.' तिने गाडी-वानाला ओरडून थांबायला सांगितले. पण गाडीवान थांबू शकत नव्हता. कारण रस्त्यावरून अनेक प्रकारची वाहने येऊ लागली होती. रोस्तॉफमंडळीला लोक ओरडून सांगत होते— 'गाड्या हाकत राहा. बाकीच्या गाड्यांचा खोळंबा करू नका.'

'प्योत्र किरिलिच, इकडे या. आम्ही तुम्हाला ओळखलं बरं. मोठा चमत्कारच झाला आहे!' त्याच्यापुढे हात पसरवीत नताशा म्हणाली, 'हा काय प्रकार आहे? हे असं रूप का घेतलंत?'

पीएरने तिने पुढे केलेला हात धरला आणि गाडी चालत असताना कसेबसे तिच्या हाताचे चुंबन घेतले.

'काउंट, झालं तरी काय?' काउंटेसने चकित व दयार्द्र सुरात विचारले.

'अं? काही विचारू नका' पीएर म्हणाला. त्याने नताशाकडे पाहिले. तिच्याकडे न पाहताही तिच्या आनंदाने उजळलेल्या डोळ्यांनी तो मंत्रमुग्ध झाला होता.

'तू काय करतो आहेस? मॉस्कोमधे राहणार आहेस का?'

पीएर काही बोलला नाही.

'मॉस्कोमधे ना? हो मॉस्कोमधेच राहणार आहे. अच्छा – काही विचारू नकोस. माझं मलाच ठाऊक नाही ..उद्या....अच्छा येतो...' तो गाडीपासून दूर झाला आणि फूटपाथच्या दिशेने चालू लागला.

कितीतरी वेळ नताशाचे डोके गाडीच्या खिडकीच्या बाहेर होते. त्याच्याकडे पाहात असताना तिची मुद्रा काहीशी मिस्कील, प्रेमळ आणि प्रसन्न स्मिताने उजळली होती.

दोन दिवसांपूर्वी पीएर बेपत्ता झाला तेव्हापासून तो मरण पावलेल्या आपल्या उपकार-कर्त्याच्या–ऑसिप बॅझ्द्येवच्या रिकाम्या घरात राहात होता. घडले ते असे.

पीएर बराच वेळ पॅट्रिआर्क पॉण्ड्झकडे फिरकला नव्हता. तिथे पोचल्यावर तो ऑसिप बॅझ्द्येवचे घर शोधू लागला. तो बागेच्या छोट्या फाटकाजवळ गेला. त्याने फाटकावर केलेला टकटक आवाज ऐकून गेरॅसिन नावाचा पिवळट वर्णाचा म्हातारा आला. पाच वर्षांपूर्वी ऑसिप अलेक्स्येविचबरोबर टॉझॅकि येथे त्याला पीएरने पाहिले होते.

'घरी आहेत का?' पीएरने विचारले.

'महाराज, सद्यःस्थितीमुळं सोफ्या डॅनिलॉवना आणि तिची मुलं शहर सोडून खेड्यात गेली आहेत.'

'तरीसुद्धा मला आत यायला पाहिजे. मला पुस्तकं पाहायची आहेत.'

'जरूर या. तुमचं स्वागतच होईल. माझ्या मालकांचा भाऊ – (परमेश्वर, माझ्या मालकांना सुखात ठेवो.) मॅकार अलेक्स्येविच इथेच राहात आहे. त्यांची प्रकृती ठीक नाही. महाराज, तुम्हाला त्याची कल्पना असेलच.' म्हातारा नोकर म्हणाला.

ऑसिप अलेक्स्येविचचा भाऊ मॅकार अलेक्स्येविच अर्धवट होता आणि दारू पिऊन झिंगलेला असायचा हे पीएरला ठाऊक होते.

'मला कल्पना आहे. आपण घरात जाऊ.' असे म्हणत पीएर घरात शिरला. लाल नाकाचा, टक्कल पडलेला, पायात रबरी जोडे घातलेला आणि ड्रेसिंग गाऊन घातलेला एक उंच म्हातारा दिवाणखान्यालगतच्या छोट्या खोलीत होता, पीएर दृष्टीस पडताच रागारागाने काहीतरी पुटपुटत तो कॉरिडॉरमधे गेला.

पीएरने त्या उदास अभ्यासिकेत पाय ठेवला. त्याचा उपकारकर्ता जिवंत असताना त्याचा किती थरकाप उडायचा. ऑसिप अलेक्स्येविचच्या मृत्यूपासून कुणी तिथे फिरकले नव्हते. तिथे धूळ साचलेली होती. कधी नव्हे इतकी ती खोली उदास वाटत होती.

गेरॅसिम एका खिडकीचा पडदा बाजूला करून पावले न वाजवता बाहेर गेला. पीएर अभ्यासिकेत फिरला. हस्तलिखिते जिथे ठेवली होती त्या पुस्तकांच्या कपाटाकडे आला. तेथून त्याने एकाकाळी पंथाची पवित्र मानली गेलेली प्राचीन हस्तलिखिते घेतली. धुळीने माखलेल्या टेबलापाशी बसून त्याने आपल्यासमोर ती हस्तलिखिते ठेवली, उघडली, मिटली. ती बाजूला सारून तो विचारमग्न झाला.

गेरॅसिमने कितीदातरी सावधपणे अभ्यासिकेत डोकावून पाहिले. पीएर तशाच अवस्थेत कितीतरी वेळ बसून असल्याचे त्याला दिसले.

दोन तासांहून अधिक काळ लोटला. पीएरचे लक्ष वेधून घेण्यासाठी गेरॅसिमने काहीशा धिटाईने दारावर टकटक आवाज केला. पीएरला आवाज ऐकू आला नाही.

'महाराज, गाडीवानाला जायला सांगू का?'

'हो सांग.' पीएर तंद्रीतून जागा होऊन घाईघाईने उठत म्हणाला, 'हे बघ. तुला ठाऊक असेलच–उद्या लढाईला प्रारंभ होणार आहे.'

'असं लोक म्हणतात...' गेरॅसिम म्हणाला.

'कृपा करून कुणालाही माझी ओळख देऊ नकोस. मी सांगतो ते कर.'

'जरूर करीन, महाराज. आपल्याला काही खायला आणून देऊ का?'

'मला खायला नको आहे. मला दुसऱ्याच गोष्टी हव्या आहेत. मला हवा आहे शेतकऱ्याचा पोशाख आणि एक पिस्तूल.' असे बोलताना पीएर एकाएकी लालबुंद झाला.

'अगदी जरूर महाराज.' क्षणभर विचारमग्न होऊन गेरॅसिम म्हणाला.

उरलेला सगळा दिवस पीएरने एकट्याने आपल्या उपकारकर्त्याच्या अभ्यासिकेत घालवला. तो अस्वस्थपणे खोलीतल्या खोलीत येरझारा घालत होता. स्वतःशीच बोलत होता ते गेरॅसिमला ऐकू येत होते. तो रात्री तिथेच घालून दिलेल्या अंथरुणावर झोपी गेला.

पीएरने त्या ठिकाणीच मुक्काम केला. आयुष्यात अनेक चमत्कारिक गोष्टी पाहिलेल्या त्या नोकराला ते काहीच गैर वाटले नाही. तो शांत होता. कुणाची तरी आपल्याला सेवा करता आली म्हणून तो खूप समाधानात होता. पीएरने कोणत्या उद्देशाने वस्तू मागितल्या असा-

ब्यात याबद्दल त्याने मुळीच विचार केला नाही. त्या रात्रीच त्याने पीएरसाठी गाडीवानाचा कोट व टोपी पैदा करून आणली, त्याला हवे असलेले पिस्तूल दुसऱ्या दिवशी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्या रात्री दोन वेळा मॅकार अलेक्स्येविच रबरी बूट ओढीत दाराशी आला आणि आळ्या घालून पीएरकडे पाहात राहिला. पीएर त्याच्या दिशेने वळला की शरमिंधी रागीट मुद्रा करून तो ड्रेसिंग गाऊन स्वतःभोवती गुंडाळून घेई आणि घाईघाईने निघून जाई. गेरॅसिमने गाडीवानाचा कोट मिळवला. तो काळजीपूर्वक विस्तवावर धरून जंतुरहित केला. पीएरने तो कोट अंगावर चढवला. पिस्तूल खरेदी करण्यासाठी तो गेरॅसिमला घेऊन सुहारेव्ह टॉवर येथे गेला. त्या ठिकाणी त्याला रोस्तॉफमंडळी भेटली.

एक सप्टेंबरच्या रात्री कुटूझॉफने रशियन फौजांना हुकूम दिला—' माघार घेऊन मॉस्को-मधून रॅझान रोडला जा. '

त्या रात्री पहिल्या तुकड्या धीरेधीरे कूच करू लागल्या. माघार घेणाऱ्या तुकड्या पहाटेला डोरोगॉमिलॉव्ह पुलापाशी आल्या तेव्हा त्यांना-पलीकडे असंख्य सैनिकांनी गर्दी केलेली दिसली. पुलावरही दाटी झाली होती. पुलाच्या पलीकडचे रस्ते, बोळ कोंडून गेले होते. मागच्या गर्दीचा लोंढा त्यांना रेटीत होता. सगळ्या तुकड्यांत अकारण घबराट पसरली आणि धांदल उडाली. पुलाच्या दिशेने, पुलावरून जाण्यासाठी, नदीला जिथे उतार होता त्या ठिकाणाकडे आणि होड्यांकडे कुठेना कुठे सगळे सैनिक वेगाने घुसू लागले होते. स्वतः कुटूझॉफ दूरच्या रस्त्यावरून मॉस्कोच्या दुसऱ्या बाजूस गेला होता.

दोन सप्टेंबर रोजी दहा वाजता डोरोगॉमिलॉव्हच्या आसपासच्या भागात पिछाडीच्या रेजिमेंट फक्त राहिल्या होत्या आणि गर्दी ओसरली होती. सैन्याने जवळजवळ मॉस्को शहर सोडून पुढचा मार्ग धरला होता.

त्याच वेळी म्हणजे दोन सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता नेपोलिअन पॉक्लॉनी टेकडीवर सैन्यामधे राहून समोरील दृश्याकडे नजर लावून होता.

दोन सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता पडलेल्या सूर्यकिरणात यक्षभूमीचे लावण्य होते. पॉक्लॉनी टेकडीवरून खाली पाहिले की विस्तृत पसरलेले मॉस्कोशहर दिसत होते. ती नदी, त्या बागा, ती प्रार्थनामंदिरे, तारकांसारखे चमकणारे ते सूर्यप्रकाशातील छोटे घुमट...मॉस्को आपले एक खास जीवन जगत आहे असे वाटत होते.

' आशियातील हे पवित्र मॉस्को शहर–असंख्य प्रार्थनामंदिरे असलेले शहर. शेवटी मी एकदाचा ह्या प्रसिद्ध शहराजवळ अगदी योग्य वेळी आलो आहे. ' नेपोलिअन म्हणाला. घोड्यावरून खाली उतरून त्याने मॉस्को शहराचा नकाशा आपल्या समोर उघडून ठेवायला सांगितला. आणि योजना, नकाशा समजावून सांगणाऱ्या लेलॉर्म-द-इदेव्हिलला बोलावले.

' शत्रूच्या ताब्यात गेलेले शहर म्हणजे विनयभंग झालेली मुलगी ' त्याच्या मनात विचार आला. ( हे वाक्य त्याने स्मॉलेन्स्की येथे टुचकॉव्हशी बोलताना उच्चारले होते. ) त्या दृष्टिकोणातून तो प्रथमच समोर दिसलेल्या त्या पौर्वात्य सुंदरीकडे पाहू लागला.

इतके दिवस उराशी बाळगलेली आणि अशक्य वाटणारी इच्छा प्रत्यक्षात येत असल्याचे पाहून त्याला आश्चर्य वाटत होते. सकाळच्या स्वच्छ प्रकाशात त्याने शहराकडे टक लावून पाहिले. मग समोरील तपशीलवार योजना न्याहाळली. आपण शहर निश्चित काबीज करणार या विचाराने तो हादरून गेला.

' दुसरे काय होणार आहे ? ही समोर दिसणारी राजधानी आपल्या मरणाची प्रतीक्षा करीत माझ्या पायाशी पडली आहे. आता अलेक्झांडर कुठे आहे ? त्याच्या मनात काय विचार येत असतील ? ही अपरिचित, सुंदर आणि भव्य राजधानी ! हा अनोखा भव्य क्षण !'

आपल्या परिवाराकडे आणि शिस्तीत उभे राहणाऱ्या सैन्याकडे वळून पाहताना त्याच्या मनात विचार आले.

' मी एक शब्द उच्चारला, हाताने एकदाच इशारा केला, की ही झारची प्राचीन राजधानी नाहीशी होईल. माझं दयाळू मन पराभूतांसाठी नेहमी वाकायला तयार असतं. मला उदार हृदयी आणि खऱ्याखुऱ्या अर्थानं थोर बनलं पाहिजे. मी मॉस्कोमधे आहे हे खरं नसेल. ' त्याला एकाएकी वाटू लागले. ' ती राजधानी माझ्या पायाशी आहे. तिचे सोनेरी घुमट आणि क्रूस सूर्य किरणात चमकताहेत. पण मी तिला वाचवणार आहे. रानटीपणाच्या आणि जुलमाच्या प्राचीन स्मारकांवर मी न्यायाचे आणि करुणेचे महान शब्द कोरणार आहे. मी अलेक्झांडरला ओळखतो. दुसऱ्या कशानं नाही पण या गोष्टीनं त्याला अत्यंत वाईट वाटेल ? (घडलेल्या घटनांचे मुख्य सार आपल्या व अलेक्झांडरच्या व्यक्तिगत झगड्यात आहे असे नेपोलिअनला वाटत होते )

' जो किल्ला दिसतो आहे तो क्रेमलीनचा बालेकिल्ला आहे. त्या उंच क्रेमलीनवरून मी लोकांना न्याय्य कायदे ऐकवीन. मी त्यांना खऱ्या सुधारणेचा अर्थ शिकवीन. मी रशियन उमरावांच्या पिढ्यांना आपल्या विजेत्याचं नाव प्रेमपूर्वक अंतःकरणात धारण करायला सांगेन. मी भेटायला येणाऱ्या शिष्टमंडळाला सांगेन, ' मला कधीच युद्ध करायचं नव्हतं. आताही युद्ध करायचं नाही. मात्र मी दरबारच्या मूळ धोरणाविरुद्ध लढाई करीत आलो आहे. मला अलेक्झांडरबद्दल प्रेम वाटतं, आदर वाटतो. मॉस्कोमधे मला व माझ्या राष्ट्राला शोभतील अशाच अटींवर मी शांततेचा करार स्वीकारीन. युद्धात मिळालेल्या नशिबाचा फायदा घेऊन तुमच्या सन्मान्य सम्राटांचा अपमान करण्याची माझी इच्छा नाही. मी त्यांना सांगेन. ' मला युद्ध नको आहे. मला हवी आहे शांतता. माझ्या प्रजाजनांचं कल्याण व्हायला हवं आहे. त्यांची उपस्थिती मला प्रेरणा देईल. त्यांच्यापुढील माझं भाषण नेहमीप्रमाणं स्पष्ट प्रभावकारी आणि महान ठरेल याची मला खात्री आहे. पण मी मॉस्कोत आहे हे खरं आहे का ? मॉस्को शहर तर समोरच दिसतं आहे. '

आपल्या परिवारातील लोकांना उद्देशून नेपोलिअन म्हणाला, 'रशियन उमरावांना माझ्याकडे धाडून द्या.' त्या रशियन उमरावांना घेऊन येण्यासाठी एक जनरल चलाख ॲडज्युटंटांचा परिवार सोबत घेऊन घोडा फेकीत निघाला.

दोन तास उलटले. नेपोलिअनने जेवण घेतले. तो पुन्हा पॉल्कॉनी टेकडीवर पूर्वीच्या जागी उभा राहून शिष्टमंडळ कधी येते त्याची वाट पाहू लागला. रशियन उमरावांशी करावयाच्या भाषणाची रूपरेखा आता त्याच्या मनात पक्की झाली. नेपोलिअनच्या मते भाषण प्रतिष्ठा आणि महानता यांनी भरलेले होते. मॉस्कोमधे ज्या औदार्याने त्याने वागण्याचे ठरवले होते, त्या औदार्याने प्रत्यक्ष नेपोलिअन भारावून गेला. झारच्या राजवाड्यातील भेटीचे दिवस त्याने कल्पनेत ठरवून टाकले होते. त्या राजवाड्यात मोठमोठाले रशियन उमराव, सरदार फ्रेंच सम्राटांच्या दरबारी लोकांत मिसळणार होते. लोकांची अंतःकरणे जिंकणारा एक गव्हर्नरही त्याने कल्पनेनेच नेमून टाकला होता. मॉस्को शहरात अनेक धार्मिक संस्था असल्याचे ऐकून त्याने त्या संस्थांना मुक्तहस्ताने मदत करण्याचे मनाशी ठरवले. आफ्रिकेत असताना फणा असलेला झगा घालून मशिदीत त्याला बसावे लागले होते. इथे मॉस्कोत आपण झारप्रमाणेच दिमाखाने आणि औदार्याने वागले पाहिजे असे त्याने ठरवले. त्याच्या मनात विचार येत होता, 'शहराकडून येणाऱ्या शिष्टमंडळाने इतका उशीर का करावा?'

ह्या वेळी परिवारातील मागच्या बाजूस असलेले जनरल व मार्शल चिंताग्रस्त व हळू आवाजात कसलीतरी चर्चा करीत होते. शिष्टमंडळ आणण्यासाठी गेलेले ॲडज्युटंट परतले होते. मॉस्को रिकामे झाले आहे. प्रत्येक नागरिक सोडून जात आहे अगर गेला आहे अशी त्यांनी बातमी आणली होती. परिवारातील सर्व पांढरेफटक, अस्वस्थ झाले होते. मॉस्कोतील रहिवाशांनी मॉस्को शहराचा त्याग केला ही गोष्ट गंभीर होती पण त्या गोष्टीमुळे काही ते भयभीत झाले नव्हते. सम्राटांच्या कानांवर ही गोष्ट घालावी लागणार होती, म्हणून ते भयभीत झाले होते. सम्राटांची स्थिती भयंकर (फ्रेंचांच्या भाषेत हास्यास्पद) न करता त्यांना 'तुम्ही रशियन उमरावांची व्यर्थ प्रतीक्षा करीत होता. मॉस्कोमधे दारुड्यांच्या जमावाखेरीज माणसं नाहीत.' असे कसे सांगावे ते त्यांना कळेना. काही झाले तरी आपण कसल्याही प्रकारचे एक शिष्टमंडळ सम्राटांकडे पाठवलेच पाहिजे असा परिवारातील काहींनी आग्रह धरला. इतरांनी मात्र या सूचनेला विरोध केला. अगोदर सम्राटांच्या मनाची तयारी मोठ्या काळजीपूर्वक कुशलतेने करावी व मगच त्यांना सत्यस्थिती सांगावी असे काहींचे म्हणणे पडले.

परिवारातील काहीजण म्हणाले, 'काही झालं तरी सम्राटांना सत्य सांगावंच लागेल... पण...'

एवढा वेळ उगाच थांबल्याने नेपोलिअनला कंटाळा आला. खूप लांबणीवर टाकल्याने महान क्षण आपली भव्यता गमावून बसत आहे असे नटाची उपजत भावना असलेल्या सम्राटाला वाटले आणि त्याने हाताने खूण केली. एकाकी तोफेने इशारा दिला. मग आक्रमक सैन्य, प्रवेशद्वारातून मास्को शहरात कूच करू लागले. अधिकाधिक वेगाने एकमेकांशी स्पर्धा करीत, घोडे

पिटाळीत दुडक्या चालीने सैन्य जाऊ लागले. उडालेल्या धुळीत काही दिसेनासे होऊ लागले. वातावरण निनादून टाकणाऱ्या आरोळ्या देत सैनिक शिरू लागले.

सैन्य पुढे सरलेले पाहून नेपोलिअनला शहराच्या भिंतीपर्यंत घोडा नेण्याचा मोह झाला. पण तिथे गेल्यावर तो पुन्हा थांबला. घोड्यावरून उतरून तो बराच वेळ शहराच्या भिंती-भोवती शिष्टमंडळाची वाट पाहात थांबला.

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र/1922
2
ग्रंथालय.

योग्य ती सावधगिरी घेऊन नेपोलिअनला मॉस्कोतील रहिवासी मॉस्को सोडून गेल्याची वार्ता सांगण्यात आली. ती वार्ता सांगणाऱ्याकडे नेपोलिअनने क्रोधाने पाहिले. त्याच्याकडे पाठ फिरवून काही न बोलता तो येरझारा घालू लागला.

'गाडी तयार ठेवा.' तो म्हणाला. ड्यूटीवर असलेला अॅडज्युटंट त्याच्या शेजारी बसला. त्याची गाडी मॉस्कोबाहेर गेली.

'मॉस्को सोडून लोक गेले या घटनेवर विश्वास बसत नाही.' तो स्वतःशी म्हणाला.

तो गाडीने सरळ शहरात आला नाही. त्या रात्री उपनगरातील एका पथिकाश्रमात त्याने मुक्काम केला. तो नाट्यपूर्ण प्रवेश अखेर झालाच नाही.

काउंट रास्तोप्चिन कुटूझॉफची भेट घेऊन १ सप्टेंबर रोजी संध्याकाळी परत आला. त्याला युद्धमंडळात आमंत्रण मिळाले नव्हते. तो शहराच्या संरक्षणाचा वाटा उचलायला तयार असतानाही कुटूझॉफने त्याची दखल घेतली नव्हती. त्यामुळे तो अतिशय दुखावला गेला होता व अपमानित झाला होता. छावणीमधील लोकांचा नवा दृष्टिकोण पाहून तो विस्मित झाला होता. शहरातील शांतता आणि रहिवाशी यांची देशभक्ती ह्या गोष्टी त्यांना सर्वस्वी असंबद्ध आणि क्षुल्लक वाटत नसल्या तरी अगदी दुय्यम महत्त्वाच्या वाटत होत्या. ह्या सर्व गोष्टींनी अपमानित आणि विस्मित होऊन काउंट रास्तोप्चिन मॉस्कोला परतला होता. रात्री जेवण झाल्यानंतर कपडे न बदलताच तो सोफ्यावर पहुडला. कुटूझॉफकडून पत्र घेऊन आलेल्या निरोप्याने त्याला रात्री एक वाजता उठवले. कुटूझॉफने पत्रात लिहिले होते, 'फौजा मॉस्कोच्या पलीकडे रॅझान रोडकडे माघार घेत आहेत तरी त्यांना शहरातून जाताना पोलिस अधिकाऱ्यांचे संरक्षण द्या.' रास्तोप्चिनच्या दृष्टीने पत्रात नवीन काही नव्हते. पॉक्लॉनी हिलवर आदल्या दिवशी कुटूझॉफशी भेट झाली तेव्हाच नव्हे तर त्याहीपूर्वी बोरोदीनो लढाईच्यावेळी मॉस्को शहर सोडावे लागणार आहे हे त्याने ओळखले होते. मॉस्कोला जमलेल्या

सर्व जनरलांनी 'दुसरी लढाई अशक्य आहे' असे एका आवाजात सांगून टाकले होते. रास्तोप्चिनच्या संमतीने सरकारी मालमत्ता दर रात्री हलवली जात होती आणि अर्धे रहिवासी शहर सोडून गेले होते. तेव्हाच मॉस्को सोडून जावे लागणार हे त्याला कळले होते. ती गोष्ट साध्या चिठ्ठीतून त्याला कळवण्यात आली. त्या वार्तेबरोबर कुटूझॉफचा हुकूमही आला. त्याला चिठ्ठी रात्री मिळाली आणि पहिली झोप उडाली म्हणून तो विस्मित आणि त्रस्त झाला.

शत्रूने स्मॉलेन्स्कमधे प्रवेश केला. तेव्हापासून रास्तोप्चिनला लोकांच्या भावनेचे, रशियाच्या अंतःकरणाचे नेतृत्व आपण करीत आहोत असे वाटू लागले. अधिकार चालवणारा प्रत्येकजण समजतो तसा तोही आपण मॉस्कोतील रहिवाशांच्या बाह्यकृतीवर नियंत्रण ठेवीत आहोत असे समजू लागला. एवढेच नव्हे तर आवाहने आणि प्रचारपत्रके यांद्वारे आपण त्यांचा दृष्टिकोण घडवीत आहोत असे त्याला वाटू लागले. लोकांना आपापसात बोलायलाही जी नकोशी वाटे त्या ग्राम्य, अडाणी, हेंगाडया भाषेत ती पत्रके लिहिली गेली होती. उच्चपदस्थांनी वापरलेली भाषा लोकांना ती कळेनाशी होत होती. लोकभावनेचे नेतृत्व करणारी मूर्ती रास्तोप्चिनला अतिशय आवडत असे. तो मनोमन तशा नेतृत्वात इतका दंगून गेला होता की ते नेतृत्व सोडून देण्याची आणि कसलेही शूर कृत्य केल्याखेरीज मॉस्को शहर सोडून जाण्याची आवश्यकता पडली तेव्हा तो अगदी आश्चर्यचकित झाला. तो ज्या जमिनीवर उभा होता ती जमीनच पायाखालून घसरून जात असल्यासारखी दिसू लागली. आता काय करावे हे त्याला मुळीच कळेनासे झाले. मॉस्को सोडण्याचा क्षण येणार आहे हे त्याला ठाऊक होते तरीही त्याचा शेवटच्या क्षणापर्यंत त्यावर विश्वास बसत नव्हता. त्या दृष्टीने त्याने काहीच हालचाल केली नाही. त्याच्या इच्छेला न जुमानता रहिवाशी शहर सोडून जात होते. कचेऱ्या हालवल्या जात होत्या त्या केवळ अधिकाऱ्यांनी आग्रह धरला होता म्हणून. रॉस्तोप्चिनने नाखुषीने कचेऱ्या हलवायला संमती दिली होती.

कुटूझॉफने रूक्ष शब्दात निक्षून केलेल्या सूचना असलेली चिठ्ठी रास्तोप्चिनला झोपेतून उठवून वाचायला दिली गेली होती. तो जसजसा जास्त त्रस्त होत होता तसतसा स्वतःलाच दोष देत होता. त्याच्या ताब्यात असलेल्या सर्व गोष्टी मॉस्कोतच होत्या. त्याने जी सरकारी मालमत्ता सुरक्षित ठिकाणी हलवली होती ती सर्व मॉस्कोतच अजून होती. ती सर्व दूर नेणे शक्य नव्हते. 'या गोष्टीला जबाबदार कोण ? असं कोणी घडू दिलं ? हे काही मी केलं नाही. मी सर्व गोष्टी तयार ठेवल्या होत्या. मी मॉस्को शहर अगदी घट्ट मुठीत ठेवलं होतं. त्या लोकांनी कशी स्थिती आणली बघा.' तो म्हणत होता. हरामखोर आणि देशद्रोही कोण हे त्याला निश्चित सांगता येत नव्हते. पण कल्पनेत अंधुकपणे वावरणाऱ्या त्या देशद्रोह्यांचा द्वेष केला पाहिजे असे त्याला वाटू लागले. आपण फसवणुकीला आणि हास्यास्पद अवस्थेला कारणीभूत झालो म्हणून ह्या देशद्रोह्यांना दोष दिला पाहिजे असे त्याला वाटले.

त्या रात्री रास्तोप्चिन लोकांना सूचना देत होता. त्यासाठी मॉस्कोच्या सर्व भागांतून माणसे

सतत त्याच्याकडे येत होती. त्याच्या हाताखालील लोकांनी तो इतका उदास आणि चिडखोर झालेला कधीच पाहिला नव्हता.

सर्व चौकशांना त्याने रागारागाने तुटक, त्रोटक उत्तरे दिली. आता आपल्या सूचनांची काही गरज नाही, कुणीतरी आपली काळजीपूर्वक केलेली सगळी तयारी फुकट घालवली आहे आणि आता जे काही घडण्याचा संभव आहे, त्या सर्वांची जबाबदारी सर्वस्वी त्या कुणीतरी घेतली पाहिजे असा त्या सर्व उत्तरांचा रोख होता.

इस्टेटखात्याकडून झालेल्या विचारणेला त्याने उत्तर दिले. 'त्या मूर्खाला सांग. आहेस तिथं राहा आणि दस्तऐवजांवर चांगली नजर ठेव. फायर ब्रिगेडसंबंधी काय बरळतो आहेस? घोडे आहेत ते व्लादिमिरला जाऊ देत. फ्रेंचांसाठी ते सोडून जाऊ नका.'

'महाराज, वेड्यांच्या इस्पितळाचे सुपरिंटेंडंट आले आहेत...आपला काय हुकूम आहे?'

'माझा हुकूम? त्यांना जायला सांग...हाच हुकूम...आणि सगळ्या वेड्यांना शहरात सोडून द्या...आमच्या सैन्याचे नेतृत्व करणारे वेडे आहेत. तेव्हा त्यांनी मोकळे राहावे अशीच ईश्वराची इच्छा दिसते.'

'तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या गुन्हेगारांबाबत काय करावे?' असे विचारण्यात आले तेव्हा काउंट मुकादमाच्या अंगावर खेकसला. 'आमच्याकडे एकही बटालिअन शिल्लक नाही. अशा वेळी तुला मी त्यांच्या रक्षणासाठी दोन बटालिअन द्याव्यात अशी तुझी मागणी आहे काय? त्यांना जाऊ दे कुठंही. मग प्रश्न आपोआप सुटेल.

'महाराज, त्यात काही राजकीय कैदी आहेत. म्येरकॉव्ह व्हेरेशचागिन...'

'व्हेरेशचागिन? अजून त्याला फाशी दिलं नाही?' रास्तोप्चिन ओरडला. 'त्याला माझ्याकडे पाठवून दे.'

सकाळी नऊ वाजले त्या वेळी फौजा मॉस्कोमधून जात होत्या. आता लोक रास्तोप्चिनकडे सूचना घेण्यासाठी येईनासे झाले. ज्यांना जाता येणे शक्य होते ते परवानगी न घेताच निघाले. जे मागे राहिले होते ते आपण काय केले तर उपयुक्त होईल याचा विचार करू लागले.

सॉकोल्निकीला जाण्यासाठी घोडे तयार ठेवण्याचा हुकूम देऊन काउंट रास्तोप्चिन कपाळाला आठ्या घालून आणि हात दुमडून स्वस्थपणे आपल्या अभ्यासिकेत बसला. आपण असहाय्य, दुर्बल आणि निरुपयोगी आहोत हे जाणवताच रास्तोप्चिन चक्रावून गेला. गर्दीपासून दूर झालेला पोलिसप्रमुख त्याला भेटायला आला. त्याच वेळी घोडे तयार असल्याचे सांगण्यासाठी ॲडज्युटंट आत आला. दोघेही पांढरेफटक पडले होते. पोलिसप्रमुख म्हणाला, 'तुम्ही सांगितलेले काम मी केलं आहे. आवारामधे प्रचंड गर्दी तुम्हाला बघण्यासाठी जमली आहे.'

पुन्हा रास्तोप्चिन बाल्कनीच्या दाराशी गेला. त्याने पोलिसप्रमुखाला विचारले, ' त्यांना काय हवं आहे ? '

' महाराज, ते म्हणतात तुमच्या हुकुमानुसार आम्ही सगळे फ्रेंचांशी लढायला आलो आहोत. विश्वासघाताबद्दल ते काहीतरी तावातावानं बोलत होते. महाराज, जमाव चिडलेला आहे. मी मोठ्या मुष्किलीनं तिथून सटकलो महाराज. मला वाटतं तुम्ही. . .'

' माझं मी पाहून घेईन. तुझ्या मदतीशिवाय काय करायचं ते मला ठाऊक आहे.' रास्तोप्चिन रागाने म्हणाला. बाल्कनीच्या दारात उभा राहून तो जमावाकडे पाहू लागला. ' त्यांनी रशियाची अशी अवस्था केली आहे. त्यामुळे माझी अशी अवस्था झाली आहे, रास्तोप्चिनच्या मनात आले. घडत असलेल्या घटनांचा दोष ज्यांच्या माथी मारता येईल अशा कुणा अनामिकाबद्दल तीव्र संताप त्याच्या मनात उफाळून आला. क्षुब्ध होणाऱ्या माणसाप्रमाणे तो अतिशय क्रोधाविष्ट झाला. आपल्या क्रोधाला विषय शोधू लागला. जमावाकडे पाहताना त्याला वाटले, इथे खालच्या थरातील माणसे जमली आहेत. आपल्या मूर्खपणाने ती खवळून गेली आहेत. त्यांना बळी हवा आहे. जमावासमोर असलेल्या उंच माणसाचे हातवारे पाहून त्याच्या मनात असा विचार आला. आपला राग कोणावरतरी काढण्यासाठी त्यालाही एखादा बळी हवा होता.

' गाडी तयार आहे काय ? ' त्याने पुन्हा विचारले.

' होय महाराज. व्हेरेशचागिनच्याबाबत आपला काय विचार आहे ? तो पायऱ्यांशी थांबला आहे.' ॲडज्युटंट म्हणाला.

' अरे हो ! ' एकाएकी कसलीतरी आठवण झाल्यासारखा तो ओरडला. त्याने त्वरेने दरवाजा उघडला आणि निश्चयाने पावले टाकीत बाल्कनीत गेला. त्याच क्षणी कोलाहल शांत झाला. टोप्या आणि हॅट वर केल्या गेल्या. सर्वांचे डोळे वर उभ्या असलेल्या गव्हर्नरावर खिळले.

' तो खात्रीनं सगळ्या देशद्रोह्यांना कापून काढील. तुम्ही फ्रेंच माणसाबद्दल बोलता आहात. . .तो सगळ्यातील खरं खोटं आपल्याला दाखवून देईल. ' लोक बोलू लागले. विश्वास न ठेवल्याबद्दल ते परस्परांना आता जणू बोलू लागले. थोड्याच वेळाने मुख्य प्रवेशद्वारातून एक अधिकारी घाईघाईने बाहेर आला आणि त्याने काहीतरी हुकूम सोडले. तसे घोडेस्वार सैनिक अवघडून ताठ झाले. जमाव हावरेपणाने समोरच्या बाल्कनीपासून पायऱ्यांकडे वळला. तिथे रास्तोप्चिन घाईघाईने आणि रागाने पावले टाकीत आला. कुणाला तरी शोधण्यासाठी म्हणून की काय त्याने घाईघाईने सभोवार पाहिले.

' कोठे आहे तो ? ' त्याने विचारले. त्याच वेळी त्याला लांब बारीक मान असलेला, अर्ध्या डोक्याची हजामत केलेला, आखूड केसांचा तरुण मनुष्य घराच्या कोपऱ्यावरून येताना दिसला. दोन घोडेस्वार सैनिकांच्यामधे तो चालत होता. एकाकाळी नखरेल असलेला पण आता गबाळ दिसणारा निळा कोट त्याच्या अंगात होता. कैद्यांना देतात तसल्या जाड्या-

भरड्या कापडाची विजार त्याने घातली होती. ती त्याने घाणेरड्या आणि झिजून पातळ झालेल्या बुटात खोचली होती. बारीक दुर्बळ पायांत असलेल्या जड साखळ्यांमुळे तो अडखळत चालत होता.

रास्तोप्चिन खालच्या पायऱ्यांकडे बोट दाखवून म्हणाला, ' त्याला इथे ठेवा. '

त्याने दाखवलेल्या पायऱ्यांकडे तो मोठ्या कष्टाने जाऊ लागला. तेव्हा बेड्या खणखणल्या. आपल्या कोटाच्या कॉलरमधे गच्च बोटे घालून त्याने आपली लांब मान दोनदा वाकवली. उसासा टाकून नशिबावर हवाला ठेवून त्याने आपले कृश आणि नाजूक हात पुढे दुमडून घेतले.

तो तरुण मनुष्य पायरीवर राहात असताना कितीतरी क्षण संपूर्ण शांतता पसरली.

मग रास्तोप्चिन खणखणीत आवाजात म्हणाला, ' दोस्त हो, हाच तो दुष्ट व्हेरेशचागिन. याच्या करणीमुळेच मॉस्कोचा पाडाव झाला आहे. '

निळा कोट घातलेला तो तरुण मनुष्य नशिबावर हवाला ठेवून काहीसा पुढे झुकून उभा होता. त्या तरुण मनुष्याच्या खंगलेल्या चेहऱ्यावर असहायता दिसत होती. अर्धवट हजामतीमुळे त्याचे डोके भेसूर दिसत होते. तो आता खाली मान घालून उभा होता. काउंट बोलू लागताच तो सावकाश मान वर उचलून काउंटकडे पाहू लागला. पण रास्तोप्चिनने त्याच्याकडे पाहिले नाही. त्या तरुण माणसाची कानामागील कृश लांब मानेवरील शीर एखाद्या दोरीसारखी तटतटली आणि त्याचा चेहरा एकदम लालबुंद झाला.

सगळ्यांच्या नजरा त्याच्यावर खिळल्या. त्याने जमावाकडे पाहिले. जमावातील चेहऱ्यांचे भाव पाहून आशा निर्माण झाल्याप्रमाणे त्याने भित्रे आणि विषण्ण स्मित केले, पुन्हा खाली मान घातली आणि पायांची चाळवाचाळव केली.

' ह्याने झारचा आणि देशाचा द्रोह केला आहे. हा बोनापार्टला जाऊन मिळाला होता. रशियाच्या नावाला ह्या एकाच रशियन माणसाने काळिमा लावला आहे. ह्याच्यामुळेच मॉस्कोचा पाडाव झाला. ' एकसुरी कर्कश आवाजात रास्तोप्चिन बोलत होता. एकाएकी त्याने व्हेरेशचागिनवर भरकन दृष्टी टाकली. तो अजून तसाच दीनवाणा उभा होता. त्याला पाहिल्यावर उन्माद चढल्यासारखा हातवारे करीत तो जवळ जवळ ओरडून जमावाला म्हणाला, ' तुम्हाला योग्य वाटेल त्याप्रमाणे त्याचा समाचार घ्या. मी त्याला तुमच्या स्वाधीन करतो.'

लोक काही बोलले नाहीत. ते अधिकाधिक एकमेकांना रेटू लागले. त्या सर्वांना एकमेकांचा भार सोसावा लागत होता. त्यांना दूषित घाणेरड्या वातावरणात श्वास घ्यावा लागत होता. हालचाल करता येत नव्हती. काय घडणार हे कळत नव्हते. पण काहीतरी भयंकर घडणार असे वाटत होते. ह्या सगळ्या गोष्टी असह्य होत होत्या. जमावात अगदी पुढे असलेल्या माणसांनी आपल्या समोर घडलेल्या गोष्टी पाहिल्या होत्या. सगळे ऐकले होते. भीतीने डोळे विस्फारून आणि आ वासून ते पाठीवर येणाऱ्या गर्दीचा भार पेलण्याची पराकाष्ठा करीत

उभे होते.

'ठोका त्याला...देशद्रोह्याला नाहीसा करा...त्याला रशियाचे नाव बद्दू करू देऊ नका....' रास्तोप्चिन ओरडला, 'त्याला कापून काढा...माझा हुकूम आहे.' जमावाला रास्तोप्चिनचे शब्द ऐकू येत नव्हते. त्याचा रागीट आवाज तेवढा कानांत शिरत होता. जमाव हुंकारत पुढे लोटला आणि थबकला.

'काउंट!...' क्षणभर पसरलेली स्तब्धता व्हेरेशचागिनच्या भित्र्या पण नाट्यपूर्ण आवाजाने भेदून टाकली. 'काउंट, परमेश्वर सर्वसाक्षी आहे' मान वर करून व्हेरेशचागिनने हे शब्द उच्चारले आणि पुन्हा त्याच्या कृश मानेवर जाड शीर तटतटून फुगली. त्याचा चेहरा क्षणात लालबुंद झाला आणि पुन्हा पूर्वीसारखा झाला. त्याला पुरते बोलता आले नाही.

'त्याला कापून टाका. माझा हुकूम आहे.' रास्तोप्चिन ओरडला. तोही व्हेरेशचागिन प्रमाणे पांढरा फटक पडला होता.

'तलवारी उपसा.' स्वतः तलवार उपसून एका अधिकाऱ्याने घोडेस्वार सैनिकांना हुकूम सोडला.

मधाहून जोराची ऊर्मी जमावात आली. ती अगदी पुढच्या रांगांपर्यंत पसरली. पुढच्या रांगांतील लोक ढकलले गेले आणि ते कसेबसे पावले रोखण्याची धडपड करू लागले. व्हेरेशचागिनजवळ उभ्या असलेल्या त्या तरुण माणसाचा चेहरा कठोर झाला होता. त्याने वर केलेला हात अवघडून राहिला होता. त्या अधिकाऱ्याने त्या घोडेस्वारसैनिकांना जवळ-जवळ कुजबुजून हुकूम दिला 'हाणा त्याला.' त्यातल्या एका सैनिकाचा चेहरा एकाएकी क्रोधाने वेडावाकडा झाला आणि आपल्या तलवारीच्या सपाट बाजूने त्याने व्हेरेशचागिनच्या डोक्यावर तडाखा हाणला.

आपल्याला कशासाठी मारले हे न कळून की काय त्याने सभोवार धास्तीने पाहात 'हाय' एवढाच आश्चर्योद्गार काढला. तशाच तऱ्हेचा आश्चर्याचा आणि धास्तीचा हुंकार जमावातून उमटत गेला.

'परमेश्वरा!' कुणीतरी शोकपूर्ण उद्गार काढला. आश्चर्योद्गार उमटल्यानंतर व्हेरेशचागिनच्या मुखातून दुःखाची करुण किंकाळी बाहेर पडली. ती किंकाळी त्याच्या नाशाला कारणीभूत ठरली. जमावाला आतापर्यंत दूर ठेवणाऱ्या मानवी भावनेवर आता भलताच ताण पडला आणि ती भावना क्षणार्धात नष्ट झाली. गुन्ह्याला प्रारंभ झाला होता. तो पूर्ण करणे अपरिहार्य होते. धमकवणाऱ्या रागीट जमावाच्या आरडाओरडीत काहींनी दयेच्या पोटी केलेला निषेध विरून गेला. जहाजाचा चक्काचूर करणाऱ्या प्रचंड सातव्या लाटेप्रमाणे जमावाच्या मागच्या बाजूला थोपवता न येणारी शेवटची लाट उसळली. जमावाच्या पुढच्या रांगांपर्यंत जाऊन त्या लोकांना लोटून उचलून ती सर्वांना वेढून टाकती झाली. ज्या सैनिकाने व्हेरेशचागिनला तडाखा हाणला होता तो सैनिक पुन्हा तडाखा हाणणार होता. पण तेवढ्यात

भीतीने किंकाळी फोडून हात डोक्यावर धरीत व्हेरेशचागिन जमावात घुसला. तो अंगावर आदळताच एका उंच तरुण माणसाने त्याचा नाजूक गळा दोन्ही हातांनी पकडला. एक हिंस्र किंकाळी मारून तो व्हेरेशचागिनसह खाली पडला. आरडाओरडा करणाऱ्या जमावाच्या पायाखाली ते तुडवले गेले. काहींनी व्हेरेशचागिनला तर काहींनी त्या तरुणाला बडवून काढले. जमावात चिरडले गेलेल्यांना आणि तरुणाला वाचवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांच्या आरोळ्यांनी जमावाचे माथे आणखीन भडकले. घोडेस्वार सैनिकांना रक्ताने माखलेल्या आणि अर्धमेले झालेल्या कामगारांना तिथून किती तरी काळ हलवता येईना. सुरू झालेले ते कृत्य तडीस नेण्याचा प्रयत्न क्षुब्ध जमाव वेगाने करू लागला. तरीही व्हेरेशचागिनला गळा आवळून बडवणाऱ्या माणसांना त्याला ठार करता आले नाही. ती माणसे मध्ये होती. जमाव सर्व बाजूंनी त्यांना घेरीत होता. जमाव जणू एक माणूस होऊन त्यांना लोटीत होता. त्यामुळे त्यांना व्हेरेशचागिनला मारता येईना आणि सोडताही येईना.

' त्याने कुऱ्हाडीने मारले का ?–चिरडून टाकले आहे... विश्वासघातकी... खिस्ताला विकणारा... जिवंत आहे... मेला नाही... चोराला चांगले शासन करायला हवे... कांबीने हाणा... मेला नाही का अजून ?...'

त्यांच्या रागाला बळी पडलेला व्हेरेशचागिन धडपड करायचा थांबला. त्याच्या किंकाळ्या संपल्या. आणि बराच काळ मधेच थांबून थांबून तालबद्ध घरघर सुरू झाली. तेव्हा लोक जमिनीवर रक्ताच्या थारोळ्यात पडलेला प्रेतवत देह घाईघाईने बघून जाऊ लागले. प्रत्येकजण जवळ जाऊन काय झाले ते पाहत, भयभीत व चकित होऊन स्वतःला दोष देत मागे गर्दीत घुसत होता.

' किती तरुण आहे... तो खात्रीने व्यापाऱ्याचा मुलगा असणार... लोक म्हणतात खरा माणूस सापडला नाही... हा उगाच सापडला...' धुळीने आणि रक्ताने माखलेल्या निळ्या चेहऱ्याच्या आणि मोडलेल्या लांब नाजूक मानेच्या त्या मृत देहाकडे करुणेने पाहत तेच मघाचे लोक बोलत होते.

गव्हर्नराच्या आवारात तो मृत देह शोभत नाही असे एका अतिदक्ष पोलिस अधिकाऱ्याला वाटले. त्याने सैनिकांना तो मृत देह ओढून रस्त्यावर टाकण्याचा हुकूम केला. प्रेताच्या मोडलेल्या पायांना धरून दोन सैनिकांनी ते प्रेत ओढत नेले. नेताना त्या प्रेताचे रक्ताने व धुळीने माखलेले व हजामत केलेले डोके कधी ह्या, कधी त्या बाजूला होत होते. त्याची लांब मान लटलटत होती. जमाव दचकून प्रेतापासून दूर होत होता.

व्हेरेशचागिन खाली पडला आणि हिंस्र किंकाळी मारीत जमाव त्याच्यावर तुटून पडला. तेव्हा रास्तोप्चिन एकदम पांढरा फटफटीत पडला. मागच्या प्रवेशद्वाराशी त्याच्यासाठी घोडे तयार होते. परंतु तिकडे न वळता तो नजर जमिनीवर खिळवून खालच्या मजल्यावर जाणाऱ्या कॅरिडॉरमधून भरभर पावले टाकीत चालू लागला. आपण कुठे जात आहोत, कशासाठी जात आहोत, याचे भान त्याला उरले नाही. त्याचा चेहरा पांढरा-फटक झाला होता. खालचा

जबडा जोरजोराने थरथरत होता. तो काही केल्या आवरत नव्हता.

'महाराज, ह्या बाजूनं...तिकडे कुठं चाललात ?...ह्या बाजूनं या,' कुणाचे तरी थरथरते भयभीत शब्द मागून ऐकू आले. काउंट रास्तोप्चिनला काही उत्तर देता आले नाही. तो निमूटपणे मागे वळून दाखवलेल्या दिशेने चालू लागला. मागच्या दाराशी गाडी उभी होती. दूर असलेल्या लोकांच्या आरोळया तिथेदेखील कानांवर पडत होत्या. काउंट रास्तोप्चिन घाईघाईने गाडीत चढला. शहराबाहेर सॉव्होनिकी येथील आपल्या घरी गाडी न्यायला त्याने सांगितले.

गाडी मॅस्निट्स्की स्ट्रीटवर आली. जमावाच्या आरोळ्या ऐकू येईनातशा झाल्या तेव्हा रास्तोप्चिनला पश्चात्ताप होऊ लागला. आपल्या कनिष्ठासमोर आपण आपली क्षुब्ध व भयभीत मनःस्थिती प्रगट केली ते आठवून तो आता अतिशय बेचैन झाला. 'सामान्य लोक भयंकर असतात, त्यांचे वागणे उद्वेगकारक असते. मांस खाऊन शांत होणाऱ्या लांडग्यात आणि त्यांच्यात काही फरक नाही.' त्याला वाटले. 'काउंट, ईश्वर सर्व साक्षी आहे!' हे व्हेरेशचागिनचे शब्द त्याला एकाएकी आठवले आणि त्याच्या मणक्यातून एक सणक गेली. पण ती भावना क्षणभरच टिकली. काउंट रास्तोप्चिन स्वतःशीच तिरस्काराने हसला. 'मला इतर कामं होती. लोकांचं समाधान करणं भाग होतं. जनतेच्या कल्याणासाठी कितीतरी बळी गेले आहेत, जात आहेत.' आपले कुटुंब आणि आपल्या हवाली करण्यात आलेले शहर या संबंधीच्या आपल्या सामाजिक कर्तव्याबद्दल तो विचार करू लागला. जनतेच्या कल्याणासाठी फयॉदोर व्हॅसिल्येविच रास्तोप्चिन स्वतःचा त्याग करीत आहे असे त्याने गृहीत धरले. झारने दिलेल्या सपूर्ण अधिकाराचा, सत्तेचा प्रतिनिधी-मॉस्कोचा गव्हर्नर या नात्याने तो स्वतःबद्दल विचार करू लागला. 'मी केवळ फयॉदोर व्हॅसिल्येविच असतो तर माझं वागणं अगदी वेगळं झालं असतं. परंतु प्राप्त परिस्थितीत मला गव्हर्नरचं जीवन व प्रतिष्ठा यांचं रक्षण करणं भाग होतं.'

शहराबाहेर असलेल्या आपल्या घरी पोचल्यानंतर आपल्या कौटुंबिक बाबतीत गढल्यावर काउंट रास्तोचिनची मनःस्थिती पुन्हा शांत झाली.

अर्धा तास होण्याआधी पुन्हा सॉकोल्निकी मैदानावरून काउंटची गाडी भरधाव निघाली. आता त्याच्या मनात गतकाळाचे विचार येत नव्हते. भावी प्रसंगाला तोंड कसे द्यावे याचा बेत करू लागला. कुटूझॉफ यॉझ्स्की पुलाजवळ असल्याचे कळल्यावरून तो तिकडे निघाला होता. आपल्याला फसवल्याबद्दल कुटूझॉफची कानउघाडणी कशी करायची, भेदक आणि रागीट भाषण कसे करायचे याचा विचार तो मनातल्या मनात करीत होता. मॉस्को शहर ओस पडल्यानंतर येणारी संकटे आणि रशियाचा होणारा सर्वनाश यांना तुझा म्हातारचळ जबाबदार आहे अशी जाणीव त्या दरबारातल्या म्हाताऱ्या कोल्ह्याला करून देण्याचा बेत तो करीत होता. आपल्याला तो काय उत्तरे देईल याची कल्पना करीत रास्तोप्चिन गाडीतल्या गाडीत रागाने वळवळत होता, सभोवार दृष्टी टाकत होता.

सॉकोल्निकी मैदान निर्मनुष्य होते. मात्र त्याच्या एका टोकाला असलेल्या धर्मादायगृहाच्या आणि वेड्यांच्या इस्पितळाच्या जवळ पांढऱ्या पोषाखातील लोकांचे घोळके ओरडत हातवारे करीत फिरत होते.

त्यातला एकजण सरळ काउंट रास्तोप्चिनच्या गाडीच्या रोखाने धावू लागला. त्या मोकळ्या सुटलेल्या वेड्यांकडे आणि विशेषतः समोरून आपल्याकडे धावत येणाऱ्या त्या वेड्याकडे काउंट रास्तोप्चिन, त्याचा गाडीवान, ते घोडेस्वार सैनिक काहीशा भीतीने आणि जिज्ञासेने पाहात राहिले.

तो वेडा रास्तोप्चिनवर नजर रोखून वेगाने धावत येत होता. त्याचे लांब कृश पाय लट-पटत होते. त्याचा ड्रेसिंग गाऊन फडफडत होता. तो कर्कश आवाजात ओरडून रास्तोप्चिनला काहीतरी सांगत होता. हाताने थांबण्याची खूण करीत होता. दाढीचे छोटेमोठे पुंजके असलेल्या त्याच्या कृश पिवळट चेहऱ्यावर उदासीनता होती आणि विजयाची खुशी होती. त्याच्या गोमेदासारख्या काळ्या बाहुल्या सारख्या भिरभिरत होत्या. ' थांब, मी सांगतो आहे थांब ' तो कर्कश ओरडला. पुन्हा जोराचे हात वारे करीत आणि आवाज चढवीत दमछाट होईतो तो ओरडू लागला.

तो गाडीजवळ आला आणि गाडीबरोबर धावू लागला. धावता धावता ओरडू लागला. ' तीन वेळा मला ठार मारलं...तीन वेळा मी मृतातून जिवंत होऊन उठलो...त्यांनी मला दगडांनी ठेचलं, मला क्रूसावर चढवून खिळे मारले...मी पुन्हा जिवंत होऊन उठेन...पुन्हा माझं उत्थापन होईल...पुन्हा उत्थापन होईल...त्यांनी माझ्या देहाचे तुकडे केले...स्वर्गाचं साम्राज्य उलथून पडेल...मी तीन वेळा ते उलथून टाकीन आणि तीन वेळा ते उभारून देईन...' त्याचे ओरडणे अधिकाधिक कर्कश होत होते. काउंट रास्तोप्चिन एकदम पांढरा फटफटीत पडला. मघा जमाव व्हेरेशचागिनवर तुटून पडला तेव्हाही काउंट असाच पांढरा फटफटीत पडला होता. तो वळून थरथरत्या आवाजात गाडीवानाला अडखळत म्हणाला, ' गाडी आणखी वेगानं ने.'

गाडी भरधाव वेगाने निघाली. पण कितीतरी काळ रास्तोप्चिनला मागे दूर जाणाऱ्या क्रोधोन्मत्त आरोळ्या ऐकू येत होत्या. त्याच वेळी लोकरीच्या किनारीच्या कोटातील देशद्रोह्याचा चकित, भयभीत व रक्तबंबाळ चेहरा त्याच्या डोळ्यांसमोरून हालत नव्हता. तो चेहरा इतका जिवंत वाटत होता की तो आपल्या अंतःकरणात खोलवर ठसा उमटवून राहाणार आहे असे रास्तोप्चिनला वाटले. त्या आठवणीच्या रक्तमय ठशापासून आपली कधीच सुटका होणार नाही, आपण कितीही दूर गेलो तरी ती भयानक आठवण आपला सूड घेण्यासाठी अधिकाधिक निर्दयपणे आपले काळीज आपण मरेपर्यंत कुरतडत राहाणार याबद्दल त्याला मुळीच शंका उरली नाही. आपलेच शब्द आपण ऐकतो आहोत असा त्याला भास होऊ लागला. ' त्याच्या चिंधड्या उडवा. मी तुमच्या वतीनं जबाबदार राहीन. मी असं का म्हणालो ? का कोण जाणे मी म्हणालो खरं...माझा काही तसा उद्देश...मी तसं म्हणायला नको होतं. मग

काही घडलं नसतं...' त्याला वाटू लागले. ज्याने पहिला तडाखा हाणला होता त्या सैनिकाचा भयभीत आणि नंतर क्रुद्ध झालेला चेहरा त्याला दिसू लागला. मग लोकरीच्या किनारीच्या कोटातील त्या पोराने वळवलेली, निषेधाची भित्री, मूक नजर त्याला आठवली. 'जे घडलं त्याला मी कारण नव्हतो...मला तशा तऱ्हेनं वागणं भाग होतं...सामान्य जनता...लोकांचं कल्याण...' तो विचारमग्न झाला.

यॉझावरील पुलावर अजूनही फौजांनी गर्दी केली होती. हवेत उष्मा होता. चिंताग्रस्त झालेला आणि थकलेला कुटूझॉफ पुलाजवळ एका बाकड्यावर बसला होता. तो चाबूक वाळूवर ओढत असताना खडखडत एक गाडी त्याच्याजवळ येऊन थांबली. जनरलचा गणवेश आणि तुरेवाली हॅट घातलेला एकजण कुटूझॉफजवळ आला. तो कुटूझॉफशी फ्रेंच भाषेत बोलू लागला. त्याच्या अस्वस्थ डोळ्यांत कधी राग तर कधी भीती उमटत होती. तो काउंट रास्तोप्चिन होता. तो कुटूझॉफला म्हणाला, 'मॉस्को ओस पडलं आहे. केवळ सैन्य काय ते उरलं आहे. म्हणून मी इथं आलो आहे. महाराज, लढाई केल्याखेरीज मॉस्को शहर आपण सोडणार नाही असं तुम्ही मला सांगितलं नसतं तर परिस्थितीला अगदी वेगळी कलाटणी मिळाली असती. हे असं घडलं नसतं.'

आणि–अहो आश्चर्यम्! मॉस्कोच्या गव्हर्नराने–त्या गर्विष्ठ काउंट रास्तोप्चिनने घोड्याचा चाबूक उचलला. पुलावर जाऊन तो ओरडू लागला आणि माणसे भरलेल्या गाड्या हाकू लागला.

दुपारी चार वाजता म्युराच्या फौजा मॉस्कोत शिरल्या. अलग झालेली वर्टम्बर्ग घोडेस्वार सैनिकांची तुकडी आघाडीला होती. तिच्या मागून प्रचंड परिवारासह नेपल्सचा राजा घोड्यावरून चालला होता.

शहराचा बालेकिल्ला क्रेमलीन कशा स्थितीत आहे याची बातमी पुढे गेलेल्या अलग तुकडीकडून घेण्यासाठी निकोला याव्लेनीजवळ अरबटीच्या मध्यावर म्युराने तळ दिला.

मॉस्कोचे काही रहिवासी म्युराभोवती जमले होते. सोने व पिसे यांनी सजलेल्या लांब केसांच्या कमांडरचे विचित्र ध्यान सगळेजण सभय आश्चर्याने पाहात राहिले.

'हा त्यांचा झार असेल का? अगदी योग्य वाटतो आहे.' लोक कुजबुजत होते.

त्या टक लावून पाहाणाऱ्या लोकांजवळ दुभाषी आला.

'टोप्या काढून घ्या' त्या छोट्या जमावातील प्रत्येकजण दुसऱ्याला सांगू लागला. दुभाषी एका वृद्ध हमालाकडे गेला आणि त्याला त्याने विचारले. 'इथून क्रेमलीन दूर आहे का?' अपरिचित पोलिश भाषेतील आघात असलेले त्याचे बोलणे ऐकून तो हमाल आश्चर्यचकित झाला. तो दुभाषी रशियन भाषेत काय बोलतो आहे हे त्याला समजले नाही. तो इतरांच्या

मागे जाऊन उभा राहिला.

म्युरा दुभाष्याजवळ आला आणि म्हणाला, ' त्यांना रशियन फौजा कुठे आहेत ते विचार ' एका रशियन माणसाला तो प्रश्न समजला आणि मग कित्येकजण एकाचवेळी त्या दुभाष्याला उत्तर देऊ लागले. अगोदर पुढे गेलेल्या तुकडीतील एक फ्रेंच अधिकारी घोड्या-वरून म्युराकडे आला आणि त्याने माहिती दिली, ' वाले-किल्ल्यांचे दरवाजे उडवले आहेत. नाकेबंदी केलेली आहे. आणि बहुधा तिथे सैनिक दबा धरून बसले आहेत. '

' ठीक ' म्युरा म्हणाला. मग त्याने वळून आपल्या परिवारातील एका माणसाला म्हटले, ' चार छोट्या तोफा पुढे न्या आणि दरवाज्यांवर गोळे टाका !' म्युराच्या मागून येणाऱ्या रांगेतून तोफखाना ओढीत घोडे दुडक्या चालीने अरबटीमधून पुढे निघाले. व्हॉस्ड्विझेंकाच्या टोकाशी पोहोचल्यावर तोफखाना थांबला आणि तिथे त्यांनी कोट उभारला– कित्येक फ्रेंच अधिकाऱ्यांनी तोफा एकमेकांपासून दूर मांडल्या जात होत्या त्या कामावर देखरेख ठेवली. त्यांनी दुर्बिणीतून क्रेमलीनची पाहणी केली. क्रेमलीनमध्ये सायंप्रार्थनेसाठी घंटा वाजत होती. त्यामुळे फ्रेंच अस्वस्थ झाले. त्यांना ती युद्धाची इशारत वाटली. कितीतरी पायदळ सैनिक कुटाफयेव्ह दाराकडे धावत सुटले. वहालांनी आणि फळ्यांनी मेढेबंदी केलेली होती. एक अधिकारी काही सैनिकांना दरवाज्याच्या दिशेने घेऊन धावत जात असताना दरवाज्यांकडून बंदुकीच्या दोन गोळ्या सुटल्या. तोफांजवळ असलेल्या जनरलने अधिकाऱ्याला ओरडून काहीतरी हुकूम केला. तसा तो अधिकारी आपल्या सैनिकांसह मागे धावत आला.

दरवाज्याकडून आणखी तीनदा गोळीबार झालेला ऐकू आला. एक गोळी फ्रेंच सैनिकाच्या पायाला चाटून गेली. मेढेबंदीच्या मागून अनेकांच्या विचित्र आरोळ्या उठल्या. क्षणार्धात हुकूम मिळाल्याप्रमाणे फ्रेंच जनरल आणि सैनिक यांची प्रसन्न शांत मुद्रा पालटली आणि लढाई आणि यातना यांसाठी सज्ज होण्यासाठी त्यांनी चित्त एकाग्र केले. त्यांची मुद्रा करारी झाली. मार्शलपासून अगदी शेवटच्या दर्जाच्या सैनिकांपर्यंत सर्वांना आता नव्या रणक्षेत्रावर जावे लागणार होते. तिथे होणाऱ्या लढाईत रक्तपात होण्याचा संभव होता. सर्वजण संघर्षाला सज्ज होते. तोफा पुढे हलवण्यात आल्या. ' फायर ' एक अधिकारी ओरडला. तशी एका-मागून एक असा घराच्या दगडांवर, वहालांवर आणि फळ्यांवर बारीक गोळ्यांचा वर्षाव झाला. तोफांच्या कोटावर धुराचे दोन ढग तरंगू लागले.

तोफांच्या आवाजाचे प्रतिध्वनी क्रेमलीनच्या दगडी भिंतींवरून परतून विरल्यानंतर काही क्षणांतच फ्रेंचांच्या डोक्यांवर विचित्र आवाज सुरू झाला. डोमकावळ्यांचा प्रचंड थवा भिंतीवर आकाशात उडत होता. जोराने कावकाव करीत आणि हजारो पंखांची फडफड करीत झेपावत होता. ह्या आवाजाबरोबरच दरवाज्याशी असलेल्या एकाकी माणसाची आरोळी ऐकू आली. शेतकऱ्याचा लांब कोट घातलेल्या त्या उघड्या-बोडक्या माणसाची आकृती धुरामधून दिसू लागली. त्याने बंदूक उचलून ती फ्रेंचांच्या दिशेने रोखली. ' फायर ' पुन्हा तोफखान्याचा अधिकारी ओरडला. त्याचक्षणी बंदुकींचे व तोफांचे आवाज ऐकू आले. तो दरवाजा पुन्हा

धुरात दिसेनासा झाला.

मेढेबंदीच्या पलीकडील हालचाली थांबल्या. फ्रेंच पायदळाचे सैनिक अधिकाऱ्यांबरोबर त्या दरवाज्याशी गेले. दारात तीन जखमी व चार मृत माणसे पडली होती. शेतकऱ्याचा लांब कोट अंगात असलेली दोन माणसे भिंतीवरून ज्नामेंकाकडे पळत सुटली.

वहाले आणि प्रेते यांजकडे बोट दाखवीत अधिकारी म्हणाला, ' हे सगळं साफ कर.' फ्रेंच सैनिकांनी जखमी माणसांना ठार केले आणि सगळी प्रेते खाली कुंपणावर फेकून दिली.

मार्ग खुला झाल्याचे म्युराला कळवण्यात आले. फ्रेंच सैनिक दरवाज्यातून आत शिरले आणि सिनेटच्या सभागृहाच्या आवारात तळ ठोकू लागले. सैनिक सभागृहाच्या खिडक्यांतून खुर्च्या आवारात फेकू लागले आणि त्या पेटवून त्यांच्या शेकोट्या करू लागले.

इतर अलग अलग तुकड्यांनी क्रेमलीनमधून निघून मॅरोस्टीका, लुब्यांका आणि पॅाक-रॉव्का येथे तळ ठोकले. इतर तुकड्यांनी जवळपासच्या भागात तळ ठोकले. राहण्याची सोय करतील असे नागरिक त्यांना आढळले नाहीत तेव्हा घराघरांतून राहण्याऐवजी त्यांनी शहरात घराबाहेर तळ ठोकले.

फ्रेंच सैनिकांचे कपडे फाटले होते. ते भुकेले होते. थकून गेले होते. एक तृतीयांश सैनिक काय ते शिल्लक राहिले. तरीही मॉस्कोमधे त्यांनी शिस्तीत प्रवेश केला. सैन्य गांजलेले, थकलेले होते तरीही त्या सैन्यात उत्साह होता, दहशत बसवण्याचे सामर्थ्य होते. सैन्यातील सैनिक सर्व शहरभर पसरेपर्यंत काय ते सैन्य सैन्य म्हणून राहिले. ओस पडलेल्या संपन्न घराघरांतून सैनिक पांगू लागले तेव्हा लागलीच सैन्याचे स्वरूप कायमचे नाहीसे झाले. त्या सैन्याची जागा धड नागरिक नसलेल्या, धड सैनिक नसलेल्या, निश्चित वर्गीकरण करता न येणाऱ्या, या दोघां-मधे असणाऱ्या लुटारूंनी घेतली.

मॉस्को शहराच्या निरनिराळ्या विभागांत वेगवेगळ्या रेजिमेंटस विखुरल्या गेल्यानंतर त्यात एकही सैनिक अथवा अधिकारी असा उरला नाही. लष्करी कोट आणि हेशन बूट घातलेले सैनिक हसताना आणि खोल्याखोल्यांतून फिरताना घराघरांच्या खिडक्यांतून दिसत होते. तसलीच माणसे तळघरांतून, कोठारांतून काही खायला-प्यायला मिळते का शोधत होती. आवारामधील छोटी निवासस्थाने आणि तबेले ते कुलपे काढून नाहीतर दारे फोडून उघडू लागले. स्वयंपाकघरात विस्तव करून ते पीठ मळू लागले. रोट्या भाजू लागले. बायकामुलांना भिववू लागले. त्यांना खूष करण्याचा, त्यांची करमणूक करण्याचा प्रयत्न करू लागले. दुकाने, घरे या ठिकाणी पुष्कळ पुरुष होते, पण फौजा मात्र नव्हत्या.

त्या दिवशी फ्रेंच कमांडरांनी हुकमामागून हुकूम काढले. सैनिकांना शहरातून फिरायला मना करण्यात आले. कोणाही रहिवाशाला इजा होता कामा नये, लुटालूट करता कामा नये असे निक्षून बजावण्यात आले. त्या रात्री सगळ्यांची हजेरी घेतली जाईल असे जाहीर करण्यात आले. इतकी उपाययोजना करण्यात आली तरी फौजांतील सैनिक विलास व सुख-सोयींनी समृद्ध असलेल्या त्या श्रीमंत पण ओस पडलेल्या शहरात सारखे फिरू लागले.

मॉस्कोत रहिवासी उरले नव्हते. सैनिक प्रथम क्रेमलीनमधे शिरले तिथून ते वेगवेगळ्या दिशांनी शहरात शिरले. वाळूने पाणी शोषून घ्यावे त्याप्रमाणे त्या राजधानीने त्यांना आपल्यात शोषून घेतले. सर्व तऱ्हेने सज्ज असलेले आपले घर सोडून एक व्यापारी गेला होता. त्याच्या घरात घोडदळाचे सैनिक शिरले. तिथे त्यांना घोड्यासाठी तबेला मिळाला आणि हव्या त्या गोष्टी जरुरीहून अधिक होत्या. तरीही त्याहून शेजारचे घर अधिक चांगले वाटले म्हणून त्यांनी तिकडे मोर्चा वळवला. अनेकांनी अनेक घरे काबीज केली. त्यावर खडूने आपली नावे लिहिली. घराच्या मालकीसाठी ते दुसऱ्या तुकड्यांबरोबर भांडले, एवढेच नव्हे तर त्यांनी मारामाऱ्याही केल्या. निवासस्थान मिळताच सैनिक शहर पाहण्यासाठी रस्त्यारस्त्यांवरून भटकू लागले. लोक सगळे टाकून गेले आहेत हे कळताच ते जिथे फुकटात भारी वस्तू मिळतील अशा ठिकाणी धाव घेऊ लागले. सैनिकांना थांबवण्यासाठी अधिकारी त्यांच्यामागून गेले पण त्यांनाही त्यांचे अनुकरण करण्याचा मोह झाला. कॅरिजरो रस्त्यावर गाड्यांनी भरलेली दुकाने टाकून लोक गेले होते. आपल्यासाठी गाड्या निवडून घेण्यासाठी त्या ठिकाणी जनरल गर्दी करू लागले. शहरातून गेलेल्या थोड्या रहिवाशांनी अधिकाऱ्यांना आपल्या घरी बोलावले. असे केल्याने आपल्याला लुटले जाणार नाही अशी त्यांना आशा वाटू लागली. राजधानीत संपत्ती विपुल प्रमाणात होती. तिला काही अंत नव्हता. फ्रेंचांनी जे भाग व्यापले होते, त्या प्रत्येक भागाभोवती फ्रेंचांनी न शोधलेले, व्यापलेले असे क्षेत्र होते. त्या ठिकाणी अधिक संपत्ती सापडेल असे फ्रेंचांना वाटू लागले. मॉस्को शहर त्यांना अधिकाधिक आपल्यात गुंतवून टाकू लागले.

फ्रेंच सैनिक मॉस्को शहर सर्व दिशांना व्यापू लागले होते. पीएर ज्या भागात राहात होता त्या भागापर्यंत ते दोन सप्टेंबरच्या रात्रीपर्यंत पोचले नव्हते.

पीएरने दोन दिवस एकांतात आणि अतिशय विचित्र स्थितीत घालवले. त्यानंतर त्याला वेड लागायचे बाकी राहिले होते. एकाच कल्पनेने त्याला पुरते पछाडलेले होते. ती कल्पना आपल्याला कशी केव्हा सुचली ते त्याला सांगता आले नसते. पण त्या कल्पनेने त्याला इतके पछाडून टाकले होते की त्याला भूतकाळातील काहीही घटना आठवेनात आणि वर्तमानकाळातील कसल्याही गोष्टीचे आकलन होईना. सगळ्या गोष्टी स्वप्नात घडल्यासारख्या त्याला वाटू लागल्या.

ऑसिप अलेक्स्येविचच्या स्मशान-शांतता असलेल्या अभ्यासिकेत आपल्या मृत मित्राच्या धुळीने माखलेल्या टेबलावर कोपरे ठेवून तो बसला तेव्हा त्याच्या मनश्चक्षूंसमोरून गेल्या काही दिवसांची अर्थपूर्ण चित्रे संथपणे सरकू लागली. बोरोदीनों येथील लढाईचे दिवस त्याला दिसू लागले. ज्यांना त्याने तेव्हा मनानेच ' ते ' असे संबोधले होते त्या सैनिकांचा प्रांजळपणा,

साधेपणा आणि सामर्थ्य यांच्या तुलनेने स्वतःचा क्षुद्रपणा आणि खोटारडेपणा यांची जाणीव होऊन तो दडपून गेला. गेरॅसिमने त्याला दिवास्वप्नातून जागे केले तेव्हा आपण मॉस्कोच्या संरक्षणात लोकांच्या अपेक्षेप्रमाणे लोकांबरोबर सहभागी व्हावे अशी कल्पना त्याच्या मनात आली. त्या उद्देशाने त्याने गेरॅसिमला सांगितले होते, ' माझ्यासाठी शेतकऱ्याचा एक कोट आणि पिस्तूल मिळवून आण. मला माझं नाव प्रगट करायचं नाही. ऑसिप अलेकस्येविचच्या घरात राहण्याचा माझा बेत आहे. '

त्या सैनिकांच्यापेक्षा आपण परिश्रमात कमी पडू नये ह्या एकाच उद्देशाने तो दुसऱ्या-दिवशी थ्री हिल्सच्या तटाकडे गेला होता. तो परत आला तेव्हा मॉस्कोचे संरक्षण केले जाणार नाही याची त्याला खात्री पटली होती. जी गोष्ट त्याला पूर्वी संभवनीय वाटत होती ती आता आवश्यक व अटळ ठरलेली त्याला दिसली. आपण नाव लपवून मॉस्कोत राहून नेपोलिअनची गाठ घेतली पाहिजे आणि त्याला ठार मारले पाहिजे, त्यात आपला शेवट होईल नाहीतर युरोपच्या विपत्तीचा तरी शेवट होईल. असे त्याला वाटू लागले. ( युरोपच्या विपन्न अवस्थेला केवळ नेपोलिअन जबाबदार आहे असे पीएरला वाटे. )

पीएरची प्रकृती आणि त्याचे मन यांची अवस्था नेहमीच सारखी असे. सराव नसलेले जाडेभरडे अन्न, त्या दिवसांत त्याने घेतलेली व्होडका, मद्य आणि सिगारेट यांचा अभाव, न बदललेले घाणेरडे कपडे आणि बिछाना नसलेल्या आखूड सोफ्यावर झोपेशिवाय घालव-लेल्या दोन रात्री यांमुळे पीएरची मनःस्थिती इतकी चिडखोर झाली की तो वेडा होण्याच्या बेतात आला.

दुपारचे दोन वाजले. फ्रेंच शहरात केव्हाच शिरले होते, पीएरला हे कळले होते. पण काही कृती करण्याऐवजी तो आपल्या साहसी कृत्यांचा, त्यातील बारीक सारीक तपशिलांचा विचार करीत बसला. आपल्या मनोराज्यात पीएरला प्रत्यक्ष हल्ला अगर नेपोलियनचा मृत्यू स्पष्टपणे रंगवता आला नाही. मात्र स्वतःचा मृत्यू आणि स्वतःची शूर सोशिकता यांचे चित्र त्याने बिलक्षण जिवंतपणाने आणि विषण्ण आनंदाने मनात रंगवले.

' सर्वांसाठी मी एकट्यानंच धाडस करायला पाहिजे अगर नष्ट व्हायला पाहिजे... मी आता त्याच्याजवळ जाईन... मग वेळ न गमावता एकदम...पिस्तुलानं नाही तर कट्यारीनं ' पीएर बेत करू लागला. ' काय वापरीन याला महत्त्व नाही, अरे, मी तुला शिक्षा करीत नाही...नियतीच तुला शिक्षा करीत आहे...मी म्हणेन, ( नेपोलिअनला ठार करताना आपण काय बोलावे याचा विचार पीएर करू लागला. ) मला घेऊन जा, ठार कर ' पीएरची मुद्रा विषण्ण, निश्चयी झाली आणि तो मान झुकवून वरील शब्द स्वतःशीच हळू आवाजात म्हणाला.

अशा तऱ्हेने स्वतःशीच विचार करीत पीएर खोलीत मध्यभागी उभा असताना खोलीचे दार उघडले आणि आतापर्यंत नेहमीच मित्रेपणाने वावरणारा मॅकार अलेक्स्येविच दारात दिसला. आता तो पूर्णपणे बदलला होता.

त्याचा छातीवर उघडा असलेला ड्रेसिंग गाऊन लोंबत होता. तो निश्चितच प्यालेला

होता. पीएरला पाहताच तो प्रथम अस्वस्थ झाला. परंतु पीएरचीही मुद्रा त्रस्त पाहून त्याला एकदम धीर आला. आपल्या लटपटत्या कृश पायांनी चालत तो खोलीच्या मध्यभागी आला.

'ते घाबरून गेलेले आहेत.' तो खाजगी सुरात घोगऱ्या आवाजात बोलला, 'मी मात्र शरण जाणार नाही. कळलं ना?' तो थांबला. टेबलावरचे पिस्तुल एकाएकी दृष्टीस पडताच त्याने ते विलक्षण चपळाईने उचलले आणि कॉरिडॉरकडे धाव घेतली.

गेरॅसिमने आणि हमालाने मॅकार अलेक्स्येविचचा पाठलाग केला. त्याला लॉबीत पकडून त्यांनी त्याच्याकडील पिस्तुल काढून घेण्याचा प्रयत्न केला. पीएर अभ्यासिकेतून बाहेर आला त्या वेडसर म्हाताऱ्याला पाहाताच त्याला तिटकारा वाटला आणि करुणाही वाटली. कष्टाने नापसंती दाखवीत त्या म्हाताऱ्याने आपल्या हातातील पिस्तुल गच्च धरून ठेवले. तो घोगऱ्या आवाजात ओरडू लागला. कसल्यातरी साहसी प्रसंगाला आपण तोंड देत आहोत असे त्याला निश्चित वाटत होते.

'शस्त्रं घ्या. त्यांना थोपवून धरा. तुम्ही पिस्तुल घेऊ शकणार नाही.' तो ओरडत होता.

'थांबा. कृपा करून थांबा. कृपा करून शांत रहा. असं काय करता...' गेरॅसिम बोलत होता. बोलता बोलता तो आपल्या कोपरांनी मॅकार अलेक्स्येविचला दरवाज्याकडे वळवण्याचा सावधपूर्वक प्रयत्न करीत होता.

'कोण तू? बोनापार्टच आहेस?' मॅकार अलेक्स्येविच ओरडला.

'तसा काही प्रकार नाही महाराज. तुम्ही आपल्या खोलीत चला. थोडी विश्रांती घ्या. मला आता तुमचं पिस्तूल द्या बरं.'

'दूर हो हलकटा-यःकश्चित गुलाम! स्पर्श करू नकोस. पाहिलंस का काय आहे ते?' पिस्तूल फिरवीत मॅकार अलेक्स्येविच ओरडला आणि म्हणाला 'त्यांचा पाठलाग करून त्यांना पकडा.'

'त्याला पकडूया' गेरॅसिम हमालाला हळू आवाजात बोलला. त्यांनी मॅकार अलेक्स्येविचचे दंड पकडले आणि त्याला दाराच्या दिशेने ओढत नेले.

बाहेर लॉबी फरफटत जाणाऱ्या पावलांनी आणि घोगऱ्या आवाजातील धापांनी भरून गेली. मग एकाएकी पोर्चमधे नवीन आरोळी ऐकू आली. ती आरोळी कर्कश, बायकी अशी होती. स्वैंपाकीण लॉबीत धावत गेली.

'अरे देवा! वाचवा! चौघेजण आहेत. चौघे घोडेस्वार सैनिक' सैंपाकीणबाई ओरडली.

गेरॅसिम आणि हमाल यांनी मॅकार अलेक्स्येविचला जाऊ दिले. आता कॉरिडॉरमधे पसरलेल्या शांततेमुळे त्यांना कित्येकजण मुख्य दार ठोठावत असल्याचे स्पष्टपणे ऐकू येऊ लागले.

फ्रेंच अधिकारी आले तरीही पीएर दरवाज्यातून दूर झाला नाही. तीव्र जिज्ञासेने तो तेथेच राहिला.

त्यातील एकजण अधिकारी होता. तो उंच देखणा आणि उमदा दिसत होता. दुसरा निश्चितच सैनिक किंवा त्या अधिकाऱ्याचा नोकर होता. तो ठेंगू, कृश रापलेला होता. त्याचे

गाल बसलेले होते आणि मुद्रेवर मठ्ठपणा होता. प्रथम तो अधिकारी लंगडत काहीसा रेलत चालत आला. थोडीशी पावले चालल्यावर समोरची घरे राहायला चांगली आहेत असे त्याला वाटले. तो थांबला. मागे वळून त्याने दारात उभ्या असलेल्या सैनिकांना मोठ्याने ओरडून घोड्यांची व्यवस्था करायला सांगितले. त्यानंतर त्या अधिकाऱ्याने मोठ्या मजेने आपले कोपरे उंचावून आपल्या मिशा थोपटल्या आणि आपल्या हॅटला हात लावून भोवताली हसत पाहत मोठ्या खुशीत सर्वांना अभिवादन केले.

पण कुणीही प्रतिसाद दिला नाही.

' राहण्यासाठी जागा ' भेदरलेल्या आणि स्तब्ध झालेल्या गेरॅसिमचा खांदा थोपटीत तो बोलू लागला, ' इथे कोणी फ्रेंच बोलणारा नाही का ? ' सभोवार पाहात त्याने विचारले. त्याची नजरानजर झाली तेव्हा पीएर दरवाज्याआड झाला. त्या अधिकाऱ्याने पुन्हा गेरॅसिम-कडे वळून त्याला घर दाखवायला सांगितले.

' मालक इथं नाहीत...तुमचं बोलणं समजत नाही. ' गेरॅसिम उलटसुलट बोलून त्याला सांगण्याची धडपड करू लागला.

फ्रेंच अधिकाऱ्याने स्मित करून ' तुझे म्हणणे मलाही कळत नाही ' अशा अर्थाने गेरॅसिमच्या तोंडासमोर हातवारे केले. ज्या दारात पीएर उभा होता तिकडे तो लंगडत निघाला.

पीएर त्याच्यापासून लपून राहण्यासाठी वळला होता पण त्याच क्षणी त्याला मॅकार अलेक्स्येविच हातात पिस्तूल घेऊन स्वयंपाक घराच्या दारातून डोकावत असलेला दिसला. वेड्यांच्या धूर्ततेने मॅकार अलेक्स्येविचने फ्रेंचांना न्याहाळले होते. पिस्तूल उचलून त्याने नेम धरला. ' त्यांना पिटाळून लावा. ' चाप ओढीत तो दारुडा ओरडला. आरोळीसरशी तो फ्रेंच अधिकारी मागे वळला, त्याचक्षणी पीएर त्या दारुड्या माणसाकडे वेगाने धावला. पिस्तूल पकडून उडवून देण्याचा प्रयत्न पीएर करू लागला तोच मॅकार अलेक्स्येविचने चाप ओढलाच आणि कानठळ्या बसवणारा आवाज झाला. सगळेजण धुरात वेढले गेले. पांढरा फटक पडलेला फ्रेंच अधिकारी वेगाने दाराकडे धावला.

पीएर फ्रेंच ज्ञान लपवून ठेवण्याचा आपला बेत विसरून गेला. पिस्तूल काढून घेऊन ते जमिनीवर फेकून देत तो अधिकाऱ्याकडे धावला. त्याला फ्रेंचमध्ये त्याने विचारले, ' तुम्हाला जखम नाही ना झाली ? '

' मला वाटतं नसावी. ' फ्रेंच अधिकारी काहीसा सावरून म्हणाला, ' ह्यावेळी मी फार थोडक्यात वाचलो. ' भिंतीच्या निखळलेल्या प्लॅस्टरकडे बोट दाखवीत तो म्हणाला.

' कोण आहे हा मनुष्य ? ' पीएरकडे रोखून पाहात त्याने विचारले.

' झाल्या घटनेबद्दल मला अतिशय वाईट वाटतं. ' पीएर आपली पूर्वीची भूमिका विसरून एकदम बोलून गेला. ' तो वेडा मनुष्य आहे—अगदी दुर्दैवी जीव आहे. ' आपण काय करीत आहोत याची त्याला कल्पना नव्हती.

फ्रेंच अधिकाऱ्याने पुढे होऊन मॅकार अलेक्स्येविचची मानगूट पकडली.

मॅकार अलेक्स्येविचचे ओठ रागाने बाहेर आले. झोप लागल्यागत तो भिंतीशी रेलून मान हालवीत राहिला.

'हरामखोरा, तुला चांगलं शासन करतो.' त्याला सोडून देता देता तो फ्रेंच अधिकारी म्हणाला, 'विजय मिळाल्यानंतर आम्ही दया दाखवतो पण विश्वासघातक्यांना क्षमा करीत नाही.'

त्या अधिकाऱ्याने त्या दारुड्या माथेफिरूशी कठोर वागू नये म्हणून पीएरने त्याचे मन वळवण्याचा प्रयत्न केला पण त्याचा काही उपयोग झाला नाही. त्या अधिकाऱ्याने पीएरचे बोलणे शांतपणे ऐकून घेतले. त्याची उदास मनःस्थिती बदलली नाही. मग एकाएकी त्याने पीएरकडे पाहून स्मित केले. काही न बोलता तो कितीतरी क्षण पीएरकडे टक लावून पाहू लागला. त्याच्या देखण्या चेहऱ्यावर नाटकी भाव उमटले आणि त्याने आपला हात पुढे धरला.

'तू माझे प्राण वाचवलेस. तू फ्रेंच आहेस.' तो म्हणाला. त्या फ्रेंचांच्या मते त्याचा निष्कर्ष संशयातीत होता. फ्रेंच मनुष्यच केवळ शूर कृत्य करू शकेल. त्या अधिकाऱ्याचे म्हणजे तेराव्या लाइट ब्रिगेडच्या कॅप्टनचे– रॅम्बाल याचे– प्राण वाचवणे म्हणजे निःसंशय अत्यंत शूर कृत्य होते.

त्याचे हे तर्कशास्त्र कितीही संशयातीत असले आणि त्याचा विश्वास त्यावर कितीही भरभक्कमपणे आधारलेला असला तरीही त्या बाबत त्याचा भ्रम दूर करणे पीएरला योग्यच वाटले.

'मी फ्रेंच नाही.' तो लगेच म्हणाला.

स्मित करीत आपले बोट त्याच्या नाकासमोर फिरवीत तो अधिकारी म्हणाला, 'हे तू दुसऱ्यांना सांग. मला सर्व काही सरळ सांगून टाक. आपल्या देशबांधवांशी गाठ पडल्यानं मला आनंद झाला आहे. आम्ही ह्या माणसाचं काय करावं असं तुला वाटतं?'

त्याच्या शेवटच्या प्रश्नाला पीएरने उत्तर दिले. मॅकार अलेक्स्येविच कोण आहे ते त्याने त्याला सांगितले, 'तुम्ही येण्यापूर्वी अगदी थोडा वेळ त्या वेड्यानं भरलेलं पिस्तूल हस्तगत केलं होतं. त्याच्याकडून ते काढून घेण्याचा आम्ही प्रयत्न केला. पण प्रयत्न सफल झाला नव्हता. कृपा करून त्याला या कृत्याबद्दल शिक्षा देऊ नका.' अधिकाऱ्याने किंचित झुकून डौलाने हातवारे करीत म्हटले, 'तू माझे प्राण वाचवले आहेस. तू फ्रेंच आहेस. तू त्याला क्षमा करायला सांगत आहेस. मी तुझी विनंती मान्य करतो.' तो अधिकारी उत्साहाने आणि वेगाने बोलत होता. त्याने मॅकार अलेक्स्येविचला मोकळे करायला सांगितले. प्राण वाचवल्याबद्दल फ्रेंच मनुष्य म्हणून गौरवलेल्या पीएरचा दंड धरून तो दुसऱ्या खोलीत शिरला.

आतापर्यंत स्वयंपाक घरात वावरत असलेला ऑर्डर्ली अधिकाऱ्यासमोर येऊन म्हणाला, 'कॅप्टन, स्वयंपाकघरात सूप आणि मटण आहे. आणू का?'

'आण. आणि मद्यदेखील आण.' कॅप्टन म्हणाला.

फ्रेंच अधिकाऱ्याने पीएरला ओढीतच खोलीत नेले. आपण फ्रेंच नाही हे त्या अधिकाऱ्याला पुन्हा एकदा सांगणे आपले कर्तव्य आहे, तसे सांगितल्यानंतर तिथून निघून जायचे असे पीएरने ठरवले. पण तो अधिकारी काही ऐकून घेईना. पीएरने त्याचे प्राण वाचवले होते म्हणून तो त्याच्याशी इतक्या आदराने, सभ्यतेने, प्रसन्न वृत्तीने वागला की पीएरला नकार देणे शक्य झाले नाही. ज्या पहिल्याच खोलीत ते शिरले होते ती खोली भोजनगृह होते. तिथेच ते दोघेही बसले. पीएरने गंभीरपणे आपण फ्रेंच नसल्याचे सांगितले.

पीएरचा देखणेपणा, मळलेले कपडे आणि त्याच्या बोटातील अंगठी यांकडे पाहात तो फ्रेंच अधिकारी म्हणाला, ' तू फ्रेंच मनुष्य असशील अगर खोटे नाव धारण केलेला रशियन प्रिन्स असशील. तुझ्यामुळं माझे प्राण वाचले. मी तुझा ऋणी आहे. मी मैत्रीचा हात पुढे करीत आहे. फ्रेंच मनुष्य अपमान अगर मदत विसरत नसतो. मी एवढंच म्हणतो—मी मैत्रीसाठी सज्ज आहे. '

त्या अधिकाऱ्याच्या सुरात, त्याच्या मुद्रेवर आणि त्याच्या हातवाऱ्यांमधे इतके निष्कपट सौजन्य होते, इतकी सुसंस्कृतता होती की त्याने पुढे केलेला हात हातात घेताना पीएरने त्याच्या स्मिताला नकळत प्रतिस्मिताने उत्तर दिले.

' मी तेराव्या लाइट ब्रिगेडचा कॅप्टन. सात सप्टेंबरच्या कामाबद्दल पदके देऊन माझा गौरव करण्यात आला आहे. ' त्याने आपली ओळख करून दिली. तृप्तीचे न दडणारे स्मित त्याच्या मिशांमागे रेंगाळत होते. ' खरं तर यावेळी मी त्या माथेफिरूच्या गोळ्या शरीरात घेऊन दवाखान्यात पडून राहिलो असतो. त्या ऐवजी मी तुझ्याशी सुखानं चार शब्द बोलू शकतो आहे. तुझं नाव मला कळेल काय ? '

' मी माझं नाव काही सांगणार नाही. ' पीएर म्हणाला. मनातल्या मनात नवीन नाव शोधून काढीत असताना तो आपण नाव का सांगत नाही हे त्याला स्पष्ट करू लागला आणि लाजेने लालबुंद होऊ लागला. तेव्हा त्या फ्रेंच अधिकाऱ्याने त्याला घाईघाईने थांबवून म्हटले ' पुरे पुरे. तुझी कारणं माझ्या लक्षात आली. तू ऑफिसर–स्टाफ ऑफिसर—आहेस. तू आमच्या विरुद्ध लढलेला आहेस. पण मला त्याच्याशी काही कर्तव्य नाही. तू माझे प्राण वाचवले आहेस. तेवढं मला पुरेसं आहे. तू सांगशील ते मी ऐकेन. तू सरदार आहेस का ? ' त्याने चौकशी केली. पीएर उत्तरादाखल झुकला.

' तुझी हरकत नसेल तर तुझं बाप्तिस्म्यावेळचं नाव तरी सांगशील ? आणखी काही मला नको. तू पीएर का ? ठीक. तेवढंच मला जाणून घ्यायचं होतं. '

फ्रेंचांनी बरोबर आणलेल्या रशियन मद्याच्या पेटीतील मद्य, मटण, आम्लेट, चहा आणि व्होडका आणून ठेवली गेली. रँबालने पीएरला आपल्याबरोबर भोजन करण्याची विनंती केली. मग एखादा भुकेलेला धडधाकट मनुष्य घाईने आणि अधाशीपणाने अन्नावर तुटून पडावा तसा तो खाऊ लागला. आपल्या बळकट दातांनी तो चघळू लागला. ओठांनी सतत मचमच आवाज करीत उद्गारू लागला—' अप्रतिम ! उत्कृष्ट ! ' त्याचा चेहरा लालबुंद झाला. घामाने

भिजू लागला. पीएरला भूक लागलेली होती, म्हणून त्याला जेवणामुळे बरे वाटले. ऑर्डलीने गरम पाण्याचे भांडे आणले आणि लाल रंगाच्या मद्याची बाटली गरम करण्यासाठी त्या भांड्यात ठेवली.

कॅप्टनने त्या बाटली भोवती नॅपकीन गुंडाळून स्वतःसाठी व पीएरसाठी ते मद्य ओतले. त्या मद्यामुळे आणि भूक शांत झाल्यामुळे कॅप्टन कधी नव्हे इतका ताजातवाना झाला. जेवण संपेपर्यंत तो सतत गप्पा मारू लागला.

' गड्या पीएर, तू माझा जीव त्या माथेफिरूपासून वाचवलास. मी तुला नवसाच्या मेण-बत्त्या देणं लागतो. तुला ठाऊक नसेल. माझ्या शरीरात भरपूर गोळया आहेत. (आपल्या कुशीला हात लावून तो म्हणाला ) इथं वॅग्रामला लागली. ( गालावरचा वण दाखवीत तो म्हणाला ) दोन गोळया स्मॉलेन्स्कच्या आहेत. सात तारखेला मॉस्कोवा येथे झालेल्या घनघोर लढाईत हा पाय लंगडा झाला. देवाशपथ ती लढाई अप्रतिम होती. तू ती पाहायला हवी होतीस. आगीचा नुसता पूर आला होता. तुम्ही लोकांनी आमचं काम भलतंच अवघड केलं होतं. तुम्ही फुशारकी मारावी असं काम केलं होतं. मला खोकला झाला आहे ना? तरीदेखील पुन्हा तसली लढाई करावी असं मला वाटतं. ज्यांनी ती लढाई पाहिली नाही त्यांची कीव करायला पाहिजे. '

' मी त्या लढाईच्या वेळी होतो. पीएर म्हणाला.

' खरं म्हणतोस की काय? मग फारच छान. ' तो फ्रेंच अधिकारी बोलत होता. ' काही झालं तरी तुम्ही उत्कृष्ट शत्रू आहात. मोठा कोट फार चांगल्या तऱ्हेनं लढवलात. पीएर, खूप मजा आली! हातगोळे फेकणाऱ्या तुमच्या सैनिकांनी तर कमाल केली होती. अगदी अगदी विजेसारखे होते ते. मी त्यांना सहा वेळा एकत्र येऊन कवाईत असल्याप्रमाणं कूच करताना पाहिलं. शूर गडी वाटले. नेपल्सच्या राजांना तर हे सर्व ठाऊक आहे. तेव्हा ते उद्गारले.– ' वा. वा! आपल्यासारखेच शूर सैनिक आहेत· ' क्षणभर स्तब्ध राहून तो म्हणाला. ' पीएर, असं असेल तर चांगलंच म्हटलं पाहिजे...' आम्ही फ्रेंच...युद्धात भीषण...पण सुंदर स्त्रियांना दाक्षिण्य दाखवणारे...' ( त्याने स्मित करीत डोळे मिचकावले )–फ्रेंच माणसं अशी असतात, कळलं ना पीएर?'

कॅप्टन इतका निष्कपट, प्रसन्न, मंदबुद्धी आणि आत्मसंतुष्ट होता की त्याने जेव्हा पीएरकडे प्रसन्नपणे पाहिले तेव्हा पीएरने जवळ जवळ डोळे मिचकावून प्रतिसाद दिला. कदाचित ' दाक्षिण्य ' ह्या शब्दामुळे कॅप्टन मॉस्कोतील परिस्थितीचा विचार करू लागला.

' मॉस्कोमधील सर्व स्त्रिया शहर सोडून गेल्या हे खरं का? शहर सोडण्याची कल्पना किती चमत्कारिक! त्यांनी घाबरण्याचं काय कारण?'

' रशियन सैनिक पॅरिसमधे शिरू लागले तर तिथल्या फ्रेंच स्त्रिया शहर सोडणार नाहीत काय?'

मंद, प्रसन्न, स्मित करणारा फ्रेंच अधिकारी आता मोठ्याने हसला. पीएरचा खांदा थोपटत

म्हणाला, ' चांगलं उत्तर दिलंस. पॅरिस...पण पॅरिस...'

' पॅरिस ही जगाची राजधानी आहे.' पीएरने त्याचे वाक्य पुरे केले. कॅप्टनने पीएरकडे पाहिले...संभाषण मधेच थांबवून सवयीनुसार प्रसन्न हसऱ्या डोळ्यांनी सोत्सुक नजर लावली.

' तू रशियन आहेस हे मला सांगितलं नसतंस तर तू पॅरिसचा आहेस या गोष्टीवर मी पैज मारली असती. तुझ्यामध्ये अवर्णनीय असं काहीतरी...' पीएरची स्तुती करीत तो पुन्हा त्याच्याकडे काही न बोलता टक लावून पाहात राहिला.

' मी पॅरिसमधे कित्येक वर्षे घालवली आहेत.' पीएर म्हणाला.

' ते दिसतंच आहे. पॅरिस...पॅरिस माहीत नसलेला माणूस रानटी असला पाहिजे...पॅरिसचा रहिवासी तीन कोस अंतरावर असला तरी ओळखता येईल...पॅरिस म्हणजे ताल्मा, डुशेनाई, सॉर्बोन दुतर्फा झाडी असलेले रस्ते...' आपण गोंधळ करून फालतू गोष्ट शेवटी सांगितल्याची जाणीव होताच त्याने घाईघाईने म्हटले. ' जगात एकच एक पॅरिस आहे...तू पॅरिसमधे राहिला होतास आणि तरीही तू रशियन राहिलास.. तरीही मी तुला कमी लेखणार नाही. '

विषण्ण विचारात काही दिवस एकट्याने घालवलेल्या पीएरला मद्याचा कैफ चढू लागल्या-नंतर त्या सुस्वभावी आणि निष्कपट माणसाबरोबर संभाषण करताना आनंद वाटल्यावाचून राहिला नाही.

' तुमच्या स्त्रिया सुंदर आहेत असं म्हणतात. मॉस्कोत फ्रेंच फौजा आल्या म्हणून माळ-रानावर लपून राहण्यासाठी पळ काढणं हा निव्वळ मूर्खपणा आहे. केवढी चांगली संधी त्यांनी गमावली. तुमच्या शेतकऱ्यांची गोष्ट वेगळी. पण तुम्हा सुसंस्कृत लोकांना त्यांच्याहून अधिक कळायला हवं. व्हिएन्ना, बर्लिन, माद्रिद, नेपल्स, वॉर्सा अशा जगातील प्रमुख राजधान्या आम्ही काबीज केल्या. लोक आम्हाला घाबरतात. पण आमच्यावर प्रेमही करतात. ओळख करून घेण्याजोगी आम्ही माणसं आहोत. मग सम्राट...' तो आणखी काही बोलणार तोच पीएरने तोच शब्द उच्चारला ' सम्राट ' त्याची मुद्रा एकाएकी विषण्ण आणि संभ्रमित झाली. ' सम्राटाबद्दल काय सांगणार आहात? ' पीएरने विचारले.

' सम्राट म्हणजे औदार्य, करुणा, न्याय, शिस्त, प्रचंड प्रज्ञा ह्या शब्दांनीच त्याचे वर्णन होऊ शकेल. मी रँबाल तुला हे सांगतो आहे. आठ वर्षांपूर्वी मी त्याचा शत्रू होतो. माझे वडील देशत्याग केलेले काउंट होते. पण त्या-माणसानं मला जिंकलं. माझ्यावर ताबा मिळवला. फ्रान्समधे पसरत चाललेल्या त्याच्या मोठेपणाच्या आणि वैभवाच्या दर्शनाने माझ्यावर प्रभाव पडल्यावाचून राहिला नाही. त्याला काय हवं ते मला कळलं. तो आमच्या विजयासाठी धडपडत आहे हे मला उमगले आणि मी मनाशी म्हटले. ' हा खरा राजा आहे. ' मी त्याला वाहून घेतले. कित्येक शतके असा महान पुरुष झाला नाही आणि पुढेही होणार नाही. '

' तो अजून मॉस्कोतच आहे का? ' अपराधी दिसणाऱ्या पीएरने चाचरत विचारले.

पीएरची अपराधी मुद्रा पाहून त्याने दात विचकले.

' छे. उद्या सम्राट शहरात शिरणार आहे. ' तो पुढे बोलत राहिला.

त्याच्या संभाषणात बाहेर फाटकापाशी चाललेल्या आरडाओरडीने व्यत्यय आला. ऑर्डलींने येऊन कॅप्टनला सांगितले. ' वर्टम्बर्गचे घोडेस्वार सैनिक आले आहेत. तुमचे घोडे बांधले आहेत त्या आवारातच त्यांना आपले घोडे बांधायचे आहेत. '

प्रवेशद्वाराशी जाऊन कॅप्टनने मोठमोठ्याने काही हुकूम दिले.

तो परत खोलीत आला तेव्हा पूर्वीच्याच जागी पीएर हातात डोके धरून बसला होता. त्याची मुद्रा कष्टी दिसत होती. खरोखरच त्यावेळी त्याच्या मनाला यातना होत होत्या. कॅप्टन बाहेर गेला त्याचवेळी एकटा असलेला पीएर सावध झाला. आपल्या परिस्थितीची त्याला तीव्रतेने जाणीव झाली. शत्रूने मॉस्को घेतले होते. ते सुदैवी विजेते तिथे घरच्यासारखे वागू लागले होते आणि त्याच्याशी आश्रयदात्याच्या भावनेने वागू लागले होते. या गोष्टीमुळे त्याला यातना झाल्या नाहीत. त्याला यातना झाल्या त्या स्वतःच्या दुर्बलतेची जाणीव झाल्याने. त्याचे गेले कित्येक दिवस तीव्र विमनस्कतेत गेले होते. त्याने आखलेला बेत पार पाडण्यासाठी अशा मनोवस्थेची गरज होती.

परंतु त्या सुस्वभावी माणसाबरोबर घेतलेले काही पेले मद्य आणि त्याच्याबरोबर केलेले संभाषण यांमुळे त्याची तीव्र खिन्नता नाहीशी झाली. पिस्तूल, कट्यार आणि शेतकऱ्याचा कोट तयार होता. नेपोलिअन दुसऱ्या दिवशी शहरात शिरणार होता. त्या दुष्टाला ठार करणे म्हणजे स्तुत्य व हितकारक कृत्य आहे असे त्याला वाटले होते. पण आता त्याला ठार मारू नये असे पीएरला वाटू लागले. आपल्या दुर्बळपणाच्या जाणिवेविरुद्ध तो झगडू लागला. ह्या दुर्बलतेतून आपली सुटका नाही असे त्याला अंधुक अंधुक वाटू लागले. पहिल्याच माणसाच्या सहवासात आपले गतकाळातील सूड, खून, आत्मार्पण यासंबंधीचे उदास विचार कोठच्याकोठे धुळीसारखे उडून गेले आहेत असे त्याला वाटू लागले.

थोडासा लंगडत आणि शीळ घालत कॅप्टन खोलीत आला.

मघापर्यंत कॅप्टनच्या बडबडीने पीएरची करमणूक होत होती. त्या बडबडीचा आता त्याला वीट आला. पीएरला आता त्याची शीळ, त्याची चाल, मिशा पिळण्याची त्याची लकब सारे अपमानास्पद वाटू लागले.

' मी आता एकदम निघून जातो. त्याच्याशी एक शब्दही बोलणार नाही. ' पीएरने मनाशी ठरवले. तरीही तो त्याच जागी बसून राहिला. दुबळेपणाची कसलीतरी चमत्कारिक जाणीव त्याला एकाएकी खिळवून ठेवीत होती. तिथून उठून जावेसे त्याला वाटत होते पण त्याला जमत नव्हते.

उलट कॅप्टन भलत्याच प्रसन्न उत्साही मनःस्थितीत होता. त्याने खोलीत दोनतीनदा येरझारा घातल्या. कसल्यातरी गमतीदार विचाराने स्वतःशीच हसल्यागत त्याचे डोळे चमकत होते आणि मिशा किंचित हलत होत्या. तो पीएरला म्हणाला, ' आणखी या मॉस्कोच्या मद्याची एखादी बाटली घेशील ना? मॉरेल, आमच्यासाठी आणखी एक बाटली गरम कर.' कॅप्टनच्या ओरडण्यातून आनंद ओसंडत होता.

मॅरेलने एक मद्याची बाटली आणली. आपल्या दोस्ताची त्रस्त चर्या पाहून रँबालला साहजिकच आश्चर्य वाटले. त्याच्या मुद्रेवर खरेखुरे दुःख आणि सहानुभूती उमटली. पीएर-जवळ जाऊन झुकून रँबाल म्हणाला, ' तू दुःखी दिसतोस ? त्याच्या हाताला स्पर्श करून रँबाल म्हणाला, ' मी तुला दुखवलं तर नाही ना ? माझ्यावर तुझा राग आहे का ? कदाचित परिस्थिती-मुळं तुला दुःख होत असेल. '

पीएरने काही उत्तर न देता स्नेहपूर्ण नजरेने त्या फ्रेंच माणसाकडे पाहिले. त्याने दाखवलेल्या सहानुभूतीमुळे पीएरला बरे वाटले.

' मी शपथेवर सांगतो—तू मला आवडला आहेस. मी तुझा ऋणी आहे यात शंकाच नाही. मी तुझ्यासाठी काय करू सांग ? मी तुझ्या शब्दाबाहेर नाही. ' छातीवर हात ठेवीत तो म्हणाला, ' मी आजन्म–आमरण तुझा आहे असं समज. मी हे मनापासून सांगतो आहे. '

पीएरने त्याचे आभार मानले. ' निवारा ' या शब्दासाठी जर्मन प्रतिशब्द पीएरकडून त्याने ऐकला तेव्हा जसे पाहिले होते तसेच तो आता पाहू लागला. एकाएकी त्याचा चेहरा उजळला. ' तसं असेल तर मी आपल्या मैत्रीसाठी मद्यपान करतो. ' दोन्ही पेल्यांत मद्य ओतता ओतता तो आनंदाने ओरडला.

पीएरने पेला उचलून मद्य संपवून टाकले. रँबालनेही मद्य संपवले. त्याने पीएरचा हात पुन्हा एकदा दाबला. टेबलावर कोपर ठेवून तो उदास विचारात मग्न झाला.

' गड्या, दैवाची करणी किती विचित्र असते ! मी सैनिक होईन, नतर बोनापार्टची नोकरी करता करता घोडदलाचा कॅप्टन बनेन हे कोणाला स्वप्न पडलं होतं का ? पण मी आज इथं त्याच्याबरोबर मॉस्कोत आहे. मित्रा, तुला सांगितल्याखेरीज राहवत नाही. माझं घराणं फ्रान्स-मधील अति-प्राचीन घराण्यांपैकी आहे. ' लांबलचक कहाणी सांगू पाहाणाऱ्या आणि तोलून-मापून बोलणाऱ्या माणसासारखा त्याचा आवाज उदास झाला.

त्या निष्कपट मनाच्या कॅप्टनने पीएरला आपल्या वाडवडिलांचा इतिहास, आपले बाल-पण, आपले तारुण्य, आपले नातेवाईक, आपली संपत्ती आणि कौटुंबिक स्थिती यांबद्दल प्रांजळपणे सांगितले. त्याच्या सगळ्या सांगण्यात अर्थातच ' माझी गरीब बिचारी आई ' प्रामुख्याने येतच होती.

' पण ह्या गोष्टी जीवनाला केवळ कोंदणासारख्या. महत्त्वाची गोष्ट असते प्रेम. पीएर, तुझं काय मत ? ' उत्तेजित होत तो म्हणाला. ' आणखी एक पेला घे. '

पीएरने पेला रिकामा केला आणि तिसऱ्यांदा भरला.

' स्त्रियांबद्दल किती म्हणून बोलू ! ' पीएरवर आपले ओलसर डोळे रोखून तो प्रेमाबद्दल आणि स्त्रियांबद्दलच्या आपल्या अनुभवांबद्दल बोलू लागला. तो अहंमन्य, देखणा अधिकारी ज्या उत्कट उत्साहाने स्त्रियांबद्दल बोलत होता त्यावरून त्याच्या जीवनात अनेक स्त्रिया आल्या असाव्यात असे वाटत होते. ज्या ओंगळपणात फ्रेंचांना विलक्षण मोहिनी आणि प्रेमकाव्य आढळते तो ओंगळपणा रँबालच्या प्रेम-प्रकरणांच्या हकिकतीत होता. तरीही त्याने सांगितलेल्या

गोष्टी इतक्या अस्सल, प्रत्ययपूर्वक सांगितल्या की प्रीतीचे सर्व माधुर्य अनुभवलेला आणि जाणून घेतलेला हा एकमेव पुरुष आहे असे पीएरला वाटू लागले. परिचित स्त्रियांची वर्णने त्याने इतक्या आकर्षक शैलीने केली की पीएर त्याचे बोलणे कुतूहलाने ऐकू लागला.

एका काळी पीएरला आपल्या पत्नीबद्दल वाटत असलेले प्रेम क्षुद्र आणि साध्या प्रकारचे वाटत होते. नताशाबद्दल वाटलेले आणि त्याने कितीतरी पटीने अधिक मानलेले प्रेम रोमँटिक होते. त्या फ्रेंच माणसाला ज्या प्रेमाची आवड होती, ते प्रेम ह्या दोनही प्रकारच्या प्रेमांहून वेगळे होते यात वाद नव्हता. वर सांगितलेल्या दोन्ही प्रकारच्या प्रेमाबद्दल रँबालला तिरस्कार वाटत होता. एक गाडीवानांना आवडणारे प्रेम आणि दुसरे मूर्खांना आवडणारे प्रेम आहे असे तो मानी. प्रीती ही त्या फ्रेंच माणसाची कमकुवत बाजू होती. ही प्रीती मुख्यतः स्त्रियांशी अनैतिक संबंध आणि ह्या भावनेला खास गोडवा देणारी ओंगळ परिस्थिती यांनी बनलेली होती.

एका तीस-पस्तिशीच्या मोहक उमराव-पत्नीवर आणि त्याच वेळी तिच्या सतरा वर्षांच्या आकर्षक, निरागस मुलीवर आपले प्रेम कसे जडले ती हेलावून टाकणारी गोष्ट कॅप्टनने सांगितली. मायलेकींत मनाची थोरवी दाखवण्याची अहमहमिका लागली. शेवटी आईने त्याग केला आणि आपल्या मुलीचे आपल्या प्रियकराशी लग्न लावून दिले. ही खूप मागे घडलेली घटना सांगताना कॅप्टन त्या आठवणीने खूप हेलावून गेला. नवरा प्रियकराची आणि प्रियकर नवऱ्याची भूमिका कशी बजावीत असे ते सांगणारी एक घटना त्याने सांगितली. जिथे नवरे कोबीचे सूप घेतात, जिथे पिंगट केसांच्या तरुण मुली असतात त्या जर्मनीच्या आठवणी सांगताना त्याने कित्येक विनोदी किस्से ऐकवले.

शेवटचा किस्सा पोलंडमधील होता. कॅप्टनच्या स्मरणात तो अजून ताजा होता. तो सांग-ताना त्याने भरभर हातवारे केले आणि त्याची मुद्रा उजळली. त्याने एका पोलिश माणसाचा जीव वाचवला होता—त्याच्या गोष्टीत जीव वाचवण्याचा प्रसंग सारखा डोकावत असे.—त्या पोलिश गृहस्थाने भारून टाकणाऱ्या आणि मनाने पॅरिसला राहणाऱ्या आपल्या पत्नीची काळजी घ्यायला कॅप्टनला सांगितले आणि आपण फ्रेंच लष्करात दाखल झाला. त्या माया-विनीला कॅप्टनबरोबर पळून जाण्याची इच्छा झाली. कॅप्टन अतिशय आनंदात होता पण एकाएकी त्याला औदार्याचा झटका आला. त्याने तिला तिच्या नवऱ्याकडे पोचते केले आणि त्याला म्हटले, ' मी तुझा जीव वाचवला, आता तुझी कीर्ती वाचवतो आहे. '

पीएर कॅप्टनच्या आठवणी ऐकू लागला. तो सांगत असलेले सगळे त्याला समजू लागले. उत्तररात्री मद्याच्या प्रभावाखाली माणसाची नेहमीच जशी अवस्था होते तशी त्याची झाली. कशा कोण जाणे त्याच्या व्यक्तिगत आठवणी त्याच्या कल्पनेसमोरून सरकू लागल्या. कॅप्टनच्या प्रेमप्रकरणाची हकिकत ऐकता ऐकता एकाएकी त्याला आपले नताशावरील प्रेम आठवले. कल्पनेने ते सर्व प्रेमाचे क्षण अनुभवीत असताना तो त्यांची तुलना रँबालच्या प्रेमप्रसंगांशी करू लागला. प्रीती आणि कर्तव्य यांतील झगड्याची गोष्ट कानांवर पडत असताना पीएरच्या मनासमोर सुहारेव्ह टॉवर येथे झालेल्या प्रेयसीच्या भेटीतील सगळे तपशील साकार होऊ

लागले. त्या भेटीचा त्याच्या मनावर तेव्हा फारसा परिणाम झाला नव्हता. तेव्हापासून त्याला त्या भेटीची एकदाही आठवण झाली नव्हती. त्या भेटीत कसला तरी महान अर्थ आहे, अद्भुतरम्यता आहे असे आता मात्र त्याला वाटू लागले.

'प्योत्र किरिलीच, इकडे या. आम्ही तुम्हाला ओळखलं बरं' त्याला तिचे शब्द आता ऐकू येऊ लागले. तिचे डोळे, तिचे स्मित, तिची प्रवासी टोपी, टोपीखालून डोकावणाऱ्या बटा सारे सारे त्याला दिसू लागले. ह्या साऱ्यांमधे हेलावून टाकणारे काही आहे असे त्याला वाटू लागले.

कॅप्टनने त्या मायाविनी पोलिश बाईची गोष्ट संपवली. मग पीएरकडे वळून विचारले, 'प्रेमासाठी केलेल्या त्यागाचा नाहीतर नवऱ्याच्या मत्सराचा अशा प्रकारचा अनुभव तुला कधी आला आहे का?'

पीएर त्या प्रश्नाने एकदम तंद्रीतून जागा झाला. त्याने मान वर केली. मनातल्या कल्पना बोलून टाकाव्यात अशी अनिवार इच्छा त्याला झाली. तो कॅप्टनला सांगू लागला, 'मी स्त्रियांवरील प्रेमाकडे काहीशा वेगळ्या दृष्टीनं पाहतो. मी आयुष्यभर एकाच स्त्रीवर प्रेम केलं, अजूनही तिच्यावर प्रेम करतो आहे. मात्र ती स्त्री माझी कधीच होणार नाही.'

'खरंच!' कॅप्टन उद्गारला.

पीएर त्याला आपली प्रेमकथा सांगू लागला. 'मी ह्या स्त्रीवर अगदी ऐन तारुण्यात प्रेम केलं. ती अगदी लहान होती. मी स्वतः अनौरस पुत्र, माझं स्वतःचं नाव नसलेला तरुण. तिचा विचार मनात आणण्याचं मला धाडस झालं नाही. मला नाव मिळालं, संपत्ती मिळाली तरीही मी तिच्याबद्दलचे विचार मनातून काढून टाकले. कारण माझं तिच्यावर निरतिशय प्रेम आहे. जगातील कोठल्याही गोष्टीपेक्षा—माझ्यापेक्षाही ती–मला श्रेष्ठ वाटते.' पीएरने इथे थांबून कॅप्टनला विचारले, 'मी काय म्हणतो ते तुमच्या लक्षात येत आहे ना?'

कॅप्टनने 'मला कळो वा न कळो तुझे बोलणे थांबवू नको.' अशा अर्थाचे हातवारे केले. 'प्लॅटॉनिक लव्ह! विशुद्ध प्रेम! मूर्खांची बडबड!' तो पुटपुटला.

पीएरने मद्यपान केले म्हणून असेल अगर मोकळेपणाने बोलण्याची त्याला ऊर्मी आली म्हणून असेल अगर गोष्टीतील कोणतीही माणसे कॅप्टनला ठाऊक नाहीत आणि ठाऊक होणार नाहीत असे त्याला वाटले म्हणून असेल किंवा या सगळ्या कारणांमुळे असेल पीएर आपला बोलतच राहिला. थरथरत्या ओठांनी ओलसर डोळे दूरवर लावून त्याने आपली सगळी गोष्ट ऐकवली. आपले लग्न, नताशाचे आपल्या प्रियतम मित्रावरील प्रेम, तिने केलेला विश्वासघात, तिच्याशी असलेले आपले साधे सरळ नाते याबद्दल तो बोलला. रंबालने प्रश्न विचारल्यावर पहिल्यांदा गुप्त ठेवलेल्या गोष्टी–आपले समाजातील स्थान आणि आपले नाव–तो सांगता झाला.

बरीच रात्र झाल्यावर ते दोघेही रस्त्यावरून फिरायला बाहेर पडले. आकाश निरभ्र होते, हवा उबदार होती. डाव्या बाजूला मॉस्कोमधे पेट्रॉव्का येथे लागलेल्या पहिल्या आगीने आकाश उजळलेले दिसत होते. आकाशात वर उजव्या बाजूला चंद्रकोर होती. तिच्यासमोर आकाशात

चकचकीत धूमकेतू तरंगत होता. पीएरच्या मनाने त्याची सांगड प्रीतीशी घातली होती. आवाराच्या फाटकांजवळ गेरॅसिम, स्वैंपाकीण आणि दोन फ्रेंच गृहस्थ हसत उभे होते. परस्परांना न कळणाऱ्या भाषेत बोलत होते. शहरात पेटलेल्या आगीची झळाळी ते पाहात होते.

नक्षत्रांनी उजळलेले अनंत आकाश, चंद्रकोर, धूमकेतू आणि आगीची झळाळी यांकडे पाहताना पीएर आनंदी आणि हळुवार भावनांनी थरारून गेला. ' सारे सारे किती सुंदर आहे ! यापेक्षा आणखी काय हवं आहे ? ' त्याच्या मनात आले. आपल्या योजनेची आठवण येताच एकदम त्याला आपले मस्तक गरगरते आहे असे वाटू लागले. त्याला इतकी भोवळ आली की पडू नये म्हणून त्याला कुंपणाला रेलून राहावे लागले.

आपल्या मित्राचा निरोप न घेताच पीएर कसाबसा फाटकापासून दूर निघाला. खोलीवर गेल्यावर तो सोफ्यावर पडला आणि एकदम झोपी गेला.

मॉस्कोचे रहिवासी शहरातून निरनिराळ्या रस्त्यांनी धावत पळत अगर वाहनांतून जाऊ लागले. पळणाऱ्या प्रत्येक रहिवाशाची भावना एकच नव्हती. दोन सप्टेंबर रोजी शहरात लागलेल्या पहिल्या आगीची झळाळी माघार घेणाऱ्या फौजा पाहात राहिल्या.

मॉस्कोपासून चौदा पंधरा मैलांवर असलेल्या मायटिश्नी या ठिकाणी त्या रात्री रोस्तॉफ-कुटुंब आणि बरोबरीची मंडळी थांबली. एक सप्टेंबरला त्यांना निघायला फार उशीर झाला होता. मालवाहू गाड्या आणि फौजा यांनी रहदारी अडवली होती. कितीतरी विसरलेल्या वस्तू आणण्यासाठी नोकरांना मागे पाठवावे लागले होते. त्यामुळे मॉस्कोपासून तीनचार मैल अंतरावर पहिल्या रात्री त्यांनी थांबायचे ठरवले. दुसऱ्या दिवशी सकाळी ते उशिरा उठले. त्यांना निघायला नाना कारणांमुळे इतका उशीर झाला की ते फक्त पंधरा मैलांवर पोचले. रोस्तॉफकुटुंब आणि त्यांच्याबरोबर प्रवास करणारे जखमी सैनिक यांनी रात्री दहा वाजता त्या गावच्या झोपड्यांत आणि मोकळ्या जागांत मुक्काम केला. आपापल्या मालकांची सोय बघितल्यानंतर नोकर, रोस्तॉफचे गाडीवान, आणि जखमी अधिकाऱ्यांचे ऑर्डर्ली यांनी जेवण केले. घोड्यांना वैरण दिली आणि ते झोपडीबाहेर अंगणात आले.

प्रवेशद्वाराशी असलेल्या उंच गाडीवर काळोख्या आकाशात एका नोकराला आगीची दुसरी लहान झळाळी दिसली.

' गड्यांनो, ही दुसरी आग लागलेली दिसते ' तो नोकर म्हणाला. तसे सगळेजण त्या झळाळीकडे पाहू लागले.

' मला वाटतं ही मॉस्को शहराला आग लागली असावी. ' त्यांच्यापैकी दोघेजण अंगण सोडून गाडीकडे गेले.

एकजण म्हणाला, 'आग भडकत आहे. दोस्तहो, ही मॉस्कोमधील आग आहे.' यावर कोणीच काही बोललं नाही. दूर अंतरावर भडकणाऱ्या ह्या नव्या आगीच्या ज्वाळांकडे ही सगळी माणसे काही न बोलता बराच वेळ टक लावून पहात राहिली. डॅनिलो टेरेंटिच नावाचा काउंटचा वृद्ध नोकर जमावाकडे येऊन मिश्काला म्हणाला, 'आ वासून काय पाहतोयस? काउंट कदाचित तुला हाक मारील, तिथे ओ द्यायला कोणीच नसेल. जाऊन सगळे कपडे एकत्र कर.'

'मी पाण्यासाठी बाहेर पडलो होतो' मिश्का म्हणाला.

'डॅनिलो टेरेंटिच, ही जी आग दिसत आहे ती मॉस्कोला लागलेली असावी. तुला काय वाटतं?'

डॅनिलो टेरेंटिचने काही उत्तर दिले नाही. बराच वेळ सगळेजण स्तब्ध होते. आगीची झळाळी अधिकाधिक पसरू लागली. दूरदूरपर्यंत आग भडकू लागली.

'देवा, दया कर...हा वारा आणि ही कोरडी हवा...'आणखी एक आवाज बोलला.

'बघा. बघा आग कशी पसरते आहे ती. अरे देवा! डोमकावळे देखील उडालेले दिसताहेत. परमेश्वरा, आम्हा पामरांवर दया कर.'

'ते आग विझवून टाकतील. मुळीच घाबरू नका.'

आतापर्यंत शांत असलेला डॅनिलो टेरेंटिच ओरडला, 'कोण विझवून टाकणार आहे ही आग?' त्याचा आवाज शांत आणि सावध होता.

'दोस्त हो, मॉस्कोच ती आग विझवणार. मॉस्को—आपली माता—पवित्र राजधानी.' त्याचा आवाज रुद्ध झाला आणि तो हुंदके देऊ लागला. समोर दिसत असलेल्या आगीचा अर्थ सगळ्यांना कळावा म्हणून त्या क्षणाची जणू सगळेजण वाट पाहात होते असे दिसले. उसासे, हळू आवाजातील प्रार्थना आणि म्हाताऱ्या नोकरांचे हुंदके ऐकू येऊ लागले.

नोकराने आत येऊन काउंटला सांगितले, 'मॉस्कोला आग लागली आहे' काउंट ड्रेसिंग गाउन घालून आग बघण्यासाठी बाहेर पडला. सोन्याने कपडे उतरले नसल्याने ती काउंट-बरोबर निघाली. मादाम शॉस, नताशा आणि काउंटेस बाहेर पडल्या नाहीत. कुटुंबात पेत्या नव्हताच. रेजिमेंटमधून तो पुढे गेला होता.

मॉस्कोला आग लागल्याचे ऐकून काउंटेस रडू लागली. फिकट झालेली नताशा पवित्र प्रतिमांखाली एका बाकावर शून्य दृष्टी लावून बसली. आत आल्यावर तिने पहिल्यांदा त्याच जागी बसकण मारली होती. तिने वडिलांच्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही. दोनतीन झोपड्यां-पलीकडून सतत ऐकू येणारे ॲडज्युटंटचे घोरणे ती ऐकू लागली.

'किती भयंकर!' यार्डातून गारठून आणि भयभीत होऊन आलेली सोन्या ओरडली.

' मी निश्चित सांगते. संबंध मॉस्को शहर जळत आहे. किती भयंकर आग आहे! नताशा, बघतरी. इथून खिडकीतूनदेखील तुला दिसू शकेल.' आपल्या मैत्रिणीचे लक्ष दुसरीकडे वेधण्याचा ती प्रयत्न करीत होती. सांगितलेले काही न कळल्यागत नताशाने तिच्यावर आपली नजर रोखली. पुन्हा कोपऱ्यातील शेगडीकडे ती टक लावून पाहू लागली. त्या सकाळी का कोण जाणे सोन्याने नताशाला प्रिन्स आन्द्रेला जखम झाल्याचे आणि तो आपल्याबरोबर एका गाडीत असल्याचे सांगितले होते. काउंटेसला त्यामुळे अतिशय राग आला होता आणि ती विस्मित झाली होती. सकाळपासून नताशा अतिशय भयभीत झाली होती. काउंटेस क्वचितच रागावत असे. आज मात्र ती सोन्यावर रागावली. सोन्याने रडून तिची क्षमा मागितली. केलेल्या गुन्ह्याचे प्रायश्चित्त घेण्यासाठी म्हणून की काय ती आपल्या मैत्रिणीच्या सहवासातच राहिली.

' नताशा, बघ तरी किती भयंकर आग धडाडते आहे ती.' सोन्या म्हणाली.

' काय पेटतं आहे? खरंच, मॉस्को शहर पेटतं आहे?'

सोन्याची ब्याद टळावी आणि नकार देऊन तिला दुखवू नये म्हणून नताशाने खिडकीकडे डोके नेले. तिने अशा तऱ्हेने पाहिले की तिला बाहेरचे काही दिसले नाही हे स्पष्ट झाले. पुन्हा ती पूर्वीसारखीच बसून राहिली.

' पण तुला आग काही दिसली नाही?'

' खरंच. मला दिसली.' ती म्हणाली, ' मला आता एकटीला सोडाल तर बरे होईल असा विनवणीचा सूर तिच्या बोलण्यात होता.

काउंट पुन्हा पार्टीशनच्या मागे येऊन पहुडला. काउंटेस उठून नताशाकडे गेली. मुलगी आजारी असली म्हणजे ती हात तिच्या डोकीवर ठेवी. तसाच तिने आताही ठेवला. तिला ताप आहे हे बघण्यासाठी की काय तिने आपल्या ओठांनी तिच्या कपाळाला स्पर्श केला आणि तिचा मुका घेतला. ' तू गारठून गेली आहेस का? तुझं सगळं शरीर थरथरत आहे. तू स्वस्थ पडून राहा.'

' पडून राहू? बरं. बरं. पडून राहते. आता पडून राहते.' नताशा म्हणाली,

प्रिन्स आन्द्रेला गंभीर जखम झाली आहे आणि तो आपल्या बरोबरच प्रवास करीत आहे हे त्या दिवशी तिला कळले. तेव्हा तिने कितीतरी प्रश्न विचारले. ' तो कोठे जात होता? का जात होता? कसा जात होता? त्याला गंभीर जखम झाली आहे का? मला त्याची भेट घेता येईल का?' ' तो गंभीररीत्या जखमी झाला आहे. परंतु त्याच्या जिवाला धोका नाही. तुला त्याला भेटता येणार नाही.' असे तिला सांगण्यात आले तेव्हा तिचा त्यावर मुळीच विश्वास बसला नाही. मात्र काहीही विचारले तरी तीच उत्तरे मिळणार हे तिला समजले आणि तिने प्रश्न विचारण्याचे, इतरांशी बोलण्याचे टाळले. संबंध प्रवासात नताशा गाडीच्या कोपऱ्यात डोळे विस्फारून बसली होती. काउंटेसला तिची मुद्रा परिचित होती आणि तिची खूप भीती वाटे. आतासुद्धा नताशा तशीच झोपडीतील बाकावर बसली होती.

' नताशा, बेटा, कपडे उतरून माझ्या शेजारी पड. ' काउंटेस म्हणाली. फक्त काउंटेससाठी पलंगावर गादी टाकण्यात आली होती. मादाम शॉस आणि दोन मुली जमिनीवरील गवतावर झोपणार होत्या.

' नको ममा, मी इथं जमिनीवरच पडेन. ' नताशा त्रासून म्हणाली. तिने खिडकीकडे जाऊन खिडकी उघडली. उघड्या खिडकीतून ॲडज्युटंटचे घोरणे अधिक स्पष्टपणे ऐकू येऊ लागले. तिने खिडकीतून डोकावले. बाहेर हवा दमट होती. काउंटेसने पाहिले, तिची नाजूक मान हुंदक्यांमुळे थरथरत होती. खिडकीच्या चौकटीत मान वरखाली होताना दिसत होती. कण्हणारा प्रिन्स आन्द्रे नाही, तो इथल्याच कोठल्यातरी झोपडीत आहे, अंगणापलीकडच्या झोपडीत आहे हे तिला ठाऊक होते.

नताशाच्या खांद्याला हलकेच स्पर्श करीत काउंटेस म्हणाली. ' नताशा, बाळ आता झोपी जा बरं. '

' झोपते—आता झोपी जाते ' नताशा घाईघाईने कपडे उतरीत आणि परकराचे बंद सोडीत म्हणाली. आपला वेष उतरवून ड्रेसिंग जॅकेट चढवून ती जमिनीवरील गादीवर बसली. तिने पाय दुमडून घेतले. आपले छोटे सुंदर केस खांद्यावर पसरून ती वेणी घालू लागली. आपल्या सडपातळ सराईत कुशल बोटांनी तिचे भराभर केस बांधले. असे करीत असताना नेहमीप्रमाणे तिचे डोके उजव्या डाव्या बाजूला वळत होते पण तिचे विस्फारलेले अस्वस्थ डोळे समोर एका जागी खिळले होते. रात्रीची वेषभूषा झाल्यानंतर नताशा दरवाज्याजवळील गवतावर टाकलेल्या दुलईवर हलकेच आडवी झाली.

' नताशा, तू मध्ये झोप, ' सोन्या म्हणाली.

' मी इथं बरी आहे. इथं नक्की झोप येईल, नताशा त्रासून म्हणाली, तिने आपले तोंड उशीत खुपसले.

काउंटेस, मादाम शॉस आणि सोन्या घाईघाईने कपडे उतरवून झोपी गेल्या. पवित्र प्रतिमां-समोर असलेल्या दिव्याचा काय तो प्रकाश खोलीत होता. लिट्ल मायटिश्ची येथे लागलेल्या आगीने झोपड्यांच्या बाहेरील दीडदोन मैलांचा परिसर उजळून निघाला होता. रस्त्यापलीकडे असलेल्या गुत्त्यात मॅमनॉव्हचे कोसॅक घुसले होते. त्या गुत्त्यातून शेतकऱ्यांची आरडाओरड ऐकू येत होती. जखमी सैनिकांचे कण्हणे ऐकू येत होते.

बाहेरून येणारे आणि आतील आवाज ऐकत नताशा हालचाल न करता कितीतरी वेळ पडून राहिली होती. प्रथम तिला आपल्या आईची प्रार्थना आणि उसासे ऐकू आले. मग तिच्या पलंगाची करकर ऐकू आली. मादाम शॉसचे शीळ घातल्यासारखे ओळखीचे घोरणे कानांवर पडत होते. सोन्याचा संथ श्वास ऐकू येत होता. काउंटेसने केव्हातरी नताशाला हाक मारली पण नताशाने ओ दिली नाही.

' ममा, मला वाटतं ती झोपली असेल. ' सोन्या म्हणाली.

थोडा वेळ स्तब्धता पसरली. पुन्हा काउंटेस काहीतरी म्हणाली. पण कुणीच त्यावर काही

बोलले नाही.

यानंतर थोड्याच वेळात नताशाला आपल्या आईचा एका लयीतील श्वासोच्छ्वास ऐकू येऊ लागला. नताशाचे उघडे पाऊल दुलईखालून बाहेर राहून नुसत्या जमिनीवर पडून गारठून गेले होते. तरीही नताशा निश्चल राहिली.

कुठल्यातरी फटीत रातकिडा किरकिरत होता. जणू तो सगळ्या जगावर मिळवलेला विजय साजरा करीत होता. दूर कुठेतरी कोंबडा आरवला. मग जवळचा कोंबडा ओरडला. गुत्त्या-मधील आरडाओरड थांबली. नताशा उठून बसली.

' सोन्या जागी आहेस का ? ममा...' ती हलके बोलली. पण कुणीच उत्तर दिले नाही. नताशा सावकाश सावधपणे उठली. तिने क्रूसाची खूण जुळवली, आपली नाजूक, चपळ, उघडी पावले घाणेरड्या थंड जमिनीवर मोठ्या काळजीपूर्वक टाकली. जमिनीच्या फळ्या करकरल्या. तिने दरवाज्याची थंड मूठ पकडली.

तिला वाटले भिंतीवर कशाचे तरी जोराचे लयबद्ध तडाखे बसताहेत. ते तडाखे म्हणजे भीती, प्रीती आणि धास्ती यांनी ग्रस्त झालेल्या तिच्या काळजाची धडधड होती.

तिने दरवाजा उघडून उंबरठ्याच्या पलीकडील मार्गाच्या दमट, थंड मातीवर पाऊल ठेवले. भोवतालच्या थंडगार हवेने ती ताजीतवानी झाली. तिचे अनवाणी पाऊल झोपलेल्या माणसाला लागले. त्याला ओलांडून ती गेली आणि ज्या झोपडीत प्रिन्स आन्द्रे पडला होता त्या झोपडीचे दार तिने उघडले.

झोपडीत अंधार होता. समोरच्या कोपऱ्यातील बाकावर पलंगाजवळ धुमसणाऱ्या मोठ्या वातीची मेणबत्ती होती. पलंगावर कुणीतरी पहुडलेले होते.

जखमी प्रिन्स आन्द्रे आपल्या सोबत असल्याची बातमी तिला सकाळी मिळाली तेव्हा पासून तिने त्याला भेटण्याचा निश्चय केला होता. आपण त्याला का भेटणार आहोत हे तिला सांगता आले नसते. त्याच्या भेटीने आपणास अपार दुःख होईल याची तिला कल्पना होती. म्हणून की काय त्याची भेट घेणे अत्यंत आवश्यक आहे असे तिला वाटू लागले.

रात्री आपण त्याला भेटू या आशेवर तिने संबंध दिवस घालवला होता. पण भेटीचा क्षण जवळ आला तशी ती धास्तावून गेली.

कसल्यातरी अनावर प्रेरणेने ती पुढे झाली. तिने सावधगिरीने एक पाऊल टाकले, मग दुसरे टाकले. आता ती सामानाची दाटी असलेल्या एका छोट्या झोपडीच्या मध्यभागी उभी होती. पवित्र प्रतिमांखाली बाकावर दुसरा एकजण पहुडला होता. तो टिमॉहिन होता. जमिनीवर आणखी दोन व्यक्ती होत्या. त्यातील एक डॉक्टर होता, दुसरा नोकर होता.

धुमसणारी मेणबत्ती थोडीशी प्रकाशली. प्रिन्स आन्द्रे स्पष्टपणे तिच्या दृष्टीस पडला. दोन्ही हात दुलईवर ठेवून तो पडला होता. तो तिला पूर्वी नेहमी जसा दिसायचा तसाच दिसला.

तो तसाच होता हे खरे. पण त्याच्या चेहऱ्यावरील लाली, तिच्याकडे प्रेमळ टक लावणारे त्याचे चमकते डोळे आणि विशेषतः नाइट शर्टच्या कॉलरमधून उठून दिसणारी लहान मुला-

सारखी मुलायम मान यांमुळे त्याच्यात बालसदृश निरागसता दिसत होती. असा तो तिला पूर्वी कधीच वाटला नव्हता. त्याच्याकडे धावत जाऊन त्या तरुण मुलीने चपळाईने अलगद गुडघे टेकले.

त्याने स्मित करून आपला हात पुढे केला.

प्रिन्स आन्द्रे जेव्हा शुद्धीवर आला तेव्हा त्याला हाडामांसाची जिवंत नताशा समोरच गुडघे टेकून बसलेली दिसली. ज्या नवीन, विशुद्ध दैवी प्रेमाचा साक्षात्कार त्याला नुकताच झाला होता ते प्रेम जगातील फक्त एकाच व्यक्तीला–नताशाला देण्याची त्याला उत्कट इच्छा होती. शेजारी गुडघे टेकून बसलेली नताशा खरीखुरी आहे हे त्याला कळले तेव्हा त्याला आश्चर्य वाटले नाही. त्याचे मन आनंदित झाले, शांत झाले. गुडघ्यांवर बसलेली नताशा हालचाल न करता ( तिला हालचाल करताही आली नसती ) भयभीत होऊन हुंदके आवरून त्याच्याकडे टक लावून पाहात राहिली.

‘ तू ? केवढा आनंदाचा क्षण ! ’ तो म्हणाला.

सावध चपळ पावलांनी नताशा त्याच्याजवळ आली. अजूनही तिने गुडघे टेकलेले होते. तिने काळजीपूर्वक त्याचा हात हातात घेतला आणि आपला चेहरा झुकवून त्याच्या हाताची हळुवारपणे चुंबने घ्यायला प्रारंभ केला.

मान वर करून त्याच्याकडे पाहात ती हळू आवाजात म्हणाली, ‘ मला क्षमा कर. ’

‘ माझं प्रेम आहे तुझ्यावर, ’ प्रिन्स आन्द्रे म्हणाला.

‘ मला क्षमा कर… ’

‘ कशाबद्दल क्षमा मागते आहेस ? ’

‘ मी जे केलं त्याबद्दल मला क्षमा कर ’. ऐकू येईल न येईल इतक्या अस्फुट आवाजात नताशा कुजबुजली आणि ती पुन्हा हळुवारपणे आपले ओठ त्याच्या हातावर ठेवू लागली.

‘ मला तू आवडतेस. पूर्वीपेक्षा अधिक आवडतेस ’ तिच्या नजरेत नजर मिळवण्यासाठी प्रिन्स आन्द्रेने तिचे मुख दोन्ही हातांनी वर करीत म्हटले.

आनंदाश्रूंनी डबडबलेले तिचे डोळे त्याच्याकडे रोखून पाहू लागले.

त्याच वेळी कोणीतरी दरवाजा ठोठावला. मुलीला शोधण्यासाठी काउंटेसने दासीला पाठवले होते.

झोपेत चालणारी व्यक्ती तंद्रीतून सावध व्हावी तशी नताशा खोलीबाहेर पडली. आपल्या खोलीत जाताच हुंदके देत ती बिछान्यावर कोसळली.

रोस्तॉफमंडळी त्यानंतर प्रवासात ठिकठिकाणी थांबली. ठिकठिकाणी त्या लोकांनी मुक्काम केला. त्या दिवसापासून नताशा बोलकॉन्स्कीच्या सान्निध्यातून दूर झाली नाही. एखादी तरुण

मुलगी इतकी सोशिकता दाखवील आणि जखमी माणसाची इतक्या कुशलतेने सेवा करील असे आपल्याला वाटले नव्हते असे डॉक्टरांना कबूल करावे लागले.

प्रिन्स आन्द्रे प्रवासातच आपल्या प्रेयसीच्या मिठीत मरेल ( डॉक्टरांच्या मते तसा दाट संभव होता ) ह्या कल्पनेने काउंटेस अतिशय भयभीत झाली. प्रिन्स आन्द्रे आणि नताशा यांमध्ये पुन्हा नव्याने प्रीतीचे बंध निर्माण झाले. त्यामुळे तो जरा बरा झाला तर त्यांचा वाङ्‌निश्चय पुन्हा नव्याने होईल असे वाटू लागले. तरीही कुणीही त्याबद्दल बोलले नाही. नताशा आणि प्रिन्स आन्द्रे यांनी तर त्याबद्दल एक चकार शब्द काढला नाही.

तीन सप्टेंबर रोजी पीएर उशिरा उठला तेव्हा त्याचे डोके दुखत होते. झोपण्याच्या वेळी न उतरलेले कपडे आता खुपू लागले होते. आदल्या रात्री आपल्याकडून काही लाजिरवाणी गोष्ट घडली अशी अंधुक भावना मनात घर करून होती. ही लाजिरवाणी गोष्ट म्हणजे त्याचे कॅप्टन रँबालशी झालेले संभाषण.

त्याच्या घड्याळात अकरा वाजले होते. पण दिवस फारच अंधारलेला वाटत होता. पीएर उठला. त्याने डोळे चोळले. गेरॅसिमने टेबलावर ठेवलेले कोरलेल्या मुठीचे पिस्तूल दृष्टीस पडताच आपण कुठे आहोत आणि आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे याची त्याला आठवण झाली.

आपण आधीच उशीर केला आहे की काय हे त्याला कळेना.

पण उशीर होणार नाही. बहुतेककरून तो मॉस्कोमधे बारापूर्वी शिरणार नाही असे पीएरला वाटले. पुढे काय होणार आहे याचा विचार करणे त्याने टाळले. आता कृतीसाठी तो घाई करू लागला.

त्याने नीटनेटका पोषाख केला. पिस्तूल घेऊन तो बाहेर पडण्याच्या बेतात होता. पिस्तूल हातात घेता येणार नसल्याने ते कशा तऱ्हेने घेऊन रस्त्यातून जावे हा प्रश्न त्याला प्रथमच पडला. मोठ्या कोटाखाली घेतले तरी ते लपवणे कठीण जाणार होते. शेल्याखाली ठेवले अगर काखोटीला मारले तरीदेखील ते लपवता येणार नव्हते. खेरीज पिस्तूल आता रिकामे होते. ते योग्यवेळी तो भरू शकला नव्हता. ' ही कट्यार देखील चालेल ' पीएर स्वतःशीच म्हणाला.

सुहारॉव्ह टॉवर येथे त्याने अगोदर आणलेल्या हिरव्या म्यानात व्ही ( v ) आकाराची बोथट कट्यार आणि पिस्तूल घाईघाईने घातले. ते म्यान आपल्या जाकिटाखाली लपवून ठेवले.

त्याने कोटावर शेला गुंडाळला. आपली कॅप पुढे तोंडावर ओढली. आवाज न करता कॅप्टनला चुकवीत तो कॉरिडॉरमधून बाहेर रस्त्यावर आला.

झोपण्यापूर्वी त्याने ज्या आगीकडे बेफिकिरीने पाहिले होते ती आग रात्रभरात बरीच वाढली होती. मॉस्को शहरात कित्येक ठिकाणी आग लागली होती. एकाच वेळी कॅरिज रो, बाजारपेठ,

पोवार्स्की, डोरोगॉमिलॉव्ह, पुलाजवळील लाकडाच्या वखारी, नदीतील मचवे सर्वत्र—आग धडधडत होती.

पीएर आडरस्त्यावरून निघाला. तिथून तो ॲरबटीमधून निकोला याव्लेनीच्या चर्चकडे निघाला. फार पूर्वीपासून त्याच्या मनाने आपले कृत्य पार पाडण्यासाठी तेथील जागा ठरवून टाकली होती. तेथील बहुतेक सर्व घरांची फाटके आणि खिडक्या झडपा लावलेल्या होत्या. रस्त्यां-गल्ल्यांतून कुणी दिसत नव्हते. हवेमधे पेटणाऱ्या वस्तूचा वास आणि धूर रेंगाळत होता. मधूनमधून त्याला अस्वस्थ आणि भित्र्या मुद्रेची रशियन माणसे भेटत होती.

रस्त्याच्या मधून चालणारे फ्रेंच छावणीत असल्यागत वावरत होते.

स्वतः पीएरलाच आपला बेत चमत्कारिक आणि भयानक वाटू लागला. तो घाईघाईने जाऊ लागला. आदल्या रात्रीच्या अनुभवामुळे आपली योजना तडीस जाणार नाही अशी त्याला धास्ती वाटू लागली. ज्या जागेकडे पीएर चालला होता त्या जागी त्याच्या हातून ती योजना पार पडणार नव्हती. वाटेत त्याला थांबावे लागले नसते तरीही योजना तडीस गेली नसती. कारण नेपोलियन डोरोगॉमिलॉव्ह गाव सोडून ॲरबटीमधून क्रेमलीन येथे चार तासांपूर्वीच पोचला होता. त्याच वेळी तो क्रेमलीनच्या राजवाड्यातील शाही दालनात उदासवाणा बसला होता. पीएरला हे ठाऊक नव्हते. हाती घेतलेले काम पार पाडण्याच्या विचारात पीएर पूर्णपणे गढला होता. काही माणसे त्यांना अशक्य असणारे कार्य अंगावर घेतात, कामात मुळात असलेल्या अडचणीमुळे नव्हे तर त्यांचा स्वभाव त्या कामाशी जुळणारा नसल्यामुळे त्यांना मग भयंकर मनस्ताप होतो. पीएरची स्थिती अशीच झाली होती. निर्णायक क्षणी आपण दुबळेपणा करू आणि त्यामुळे आपणास आपल्याबद्दल आदर राहणार नाही या धास्तीने तो हैराण झाला होता.

तो जसजसा ठरवलेल्या ठिकाणाच्या जवळ जाऊ लागला तसतसा धूर आणखी दाट होऊ लागला. लागलेल्या आगीमुळे हवा निश्चितच उबदार वाटू लागली. घरांपलीकडून वर उठणाऱ्या ज्वाला दिसू लागल्या. त्याला रस्त्यात अधिकाधिक माणसे दिसू लागली, ही माणसे अतिशय अस्वस्थ झालेली दिसत होती. आपल्याभोवती काहीतरी विलक्षण वेगळे घडत आहे हे पीएरला जाणवले. तरीही आपण आगीच्या जवळ चाललो आहोत ही गोष्ट मात्र त्याच्या ध्यानात आली नाही. एका बाजूस पोवार्स्की स्ट्रीट आणि दुसऱ्या बाजूस प्रिन्स ग्रझिन्स्कि बाग असलेल्या एका मोठ्या मैदानातील वाटेवरून पीएर जात असताना त्याला जवळच एका स्त्रीचा आक्रोश ऐकू आला. स्वप्नातून जागा झाल्यासारखा तो थांबला आणि त्याने मान उंचावून पाहिले.

वाटेच्या एका बाजूला वाळलेल्या व धुळीने माखलेल्या गवतावर घरातील सामानाचे ढीग पडले होते. त्यात पिसांच्या गाद्या होत्या, चहादाणी होती, पवित्र प्रतिमा होत्या आणि पेट्या होत्या. पेट्यांजवळ जमिनीवर एक कृश स्त्री बसली होती. तिने तारुण्य कधीच ओलांडले होते. तिचे दात पुढे आलेले होते. तिने काळा झगा व काळी टोपी घातली होती. शरीर पुढे मागे झुकवीत ती स्त्री जोरजोराने रडत होती आणि काहीतरी पुटपुटत होती. घाणेरडे आखूड फ्रॉक

घातलेल्या दहा ते बाराच्या दरम्यानच्या दोन लहान मुली आपल्या आईकडे टक लावून पाहात होत्या. भयभीत फिकट मुद्रा असलेल्या अगदी गांगरून गेलेल्या त्या मुली होत्या. कोट आणि मोठीशी टोपी घातलेला एक सात वर्षांचा मुलगा–( बहुधा तो तिचा नसावा ) एका वृद्ध दासीने घेतला होता, तो रडत होता. कुणा नोकराची अनवाणी पायांची घाणेरडी मुलगी पेटीवर बसली होती. आपले पिंगट केस सोडून त्यातील जळलेले केस हुंगून उपटून काढीत होती. त्या रडणाऱ्या बाईच्या बाक आलेल्या ठेंगण्या नवऱ्याने गणवेष घातला होता. त्याची मिशी गोलाकार होती. डोकीत सरळ बसलेल्या टोपीखालून तुकतुकीत केसांची झुलपे दिसत होती. निर्विकार मुद्रेने तो पेट्यांची चाळवाचाळव करून कसलेतरी कपडे त्यातून काढत होता.

पीएरला पाहताच त्या बाईने त्याच्या पायांवर लोळण घेतली.

‘ दयाळू परमेश्वरा, ख्रिस्ताच्या भक्तांनो, मला वाचवा. मला मदत करा. ’ ती हुंदके देत देत बोलू लागली, ‘ माझी धाकटी मुलगी.. माझी धाकटी मुलगी मागेच राहिली...ती जळून गेली असेल...अरे देवा...याच साठी का मी तिला वाढवलं होतं ?...महाराज...

‘ मार्या निकोलीव्ना, शांत राहा. ’ तिचा नवरा हळू आवाजात बोलला होता. तिऱ्हाइता-समोर आपली बाजू मांडणे त्याला आवश्यक वाटले.

‘ बहिणीने तिला बहुतेक नेलं असणार. तिला काही झालेलं नाही. ’ तो म्हणाला.

‘ राक्षस आहेस. दुष्ट आहेस ’ ती स्त्री संतापाने किंचाळली. तिचे अश्रू एकाएकी थांबले होते. ‘ तुला काळीज नाही. तुला आपल्या मुलीबद्दल काही वाटत नाही. दुसऱ्या एखाद्यानं आपल्या मुलीला आगीतून बाहेर काढलं असतं. तू राक्षस आहेस, माणूस नव्हेस. ’ मग ती पीएरकडे वळून हुंदके देत भराभर बोलू लागली, ‘ सगळ्या आळीला आग लागली. लोक आम्हाला सांगायला धावत आले. ती मुलगी ‘ आग, आग ’ म्हणून ओरडली. सामान बाहेर काढण्यासाठी आम्ही धाव घेतली. आम्ही कसेबसे वाचलो...एवढं सामान काय ते आम्ही बाहेर आणू शकलो...पवित्र प्रतिमा...ही मुलं...लग्नात भेट मिळालेला हा पलंग...बाकी सगळं गेलं. कॅटिच्का अजून सापडली नाही. अरे देवा...काय झालं हे...’ पुन्हा ती हुंदके देऊ लागली. ‘ माझी लाडकी...जळली...जळली. ’

‘ तिला तुम्ही कुठं सोडलं होतं ? ’ पीएरने विचारले.

पीएरच्या चेहऱ्यावरील उत्सुकता पाहून हा आपल्याला मदत करील असे त्या बाईला वाटले. त्याचे पाय धरत ती ओरडली. ‘ तुम्ही दयाळू आहात. उपकार करा. काही करुन माझी काळजी दूर करा. ॲनिस्का, गाढवे जा. यांना ती जागा दाखव. ’ ती रागाने आपल्या मोलकरणीवर खेकसली. तेव्हा तिचे पुढे आलेले दात आणखीन पुढे आलेले दिसू लागले.

‘ मला जागा दाखवा...मी ... मी...काहीतरी करीन. ’

ती घाणेरडी मोलकरीण पेटीमागून पुढे झाली. तिने आपले केस नीट केले. एक उसासा टाकून ती अनवाणी राकट पायांची मुलगी पुढे होऊन चालू लागली.

भरभर पावले टाकीत त्याने त्या मुलीला गाठले आणि तो पोवास्की रस्त्यावर आला.

सगळा रस्ता काळ्या धुराच्या काळ्या ढगांनी भरून गेला होता. त्यातून मधून मधून ज्वाला उठत होत्या. आग पाहाण्यासाठी मोठा जमाव गोळा झाला होता. रस्त्याच्या मध्यभागी उभा असलेला फ्रेंच जनरल भोवताली असलेल्या माणसांना काहीतरी सांगत होता. फ्रेंच जनरल उभा होता तेथून पीएर त्या मोलकरणीला घेऊन जाऊ लागला. तशी फ्रेंच सैनिकांनी त्याला अडवले.

'इथून जाता येणार नाही.' कोणीतरी ओरडले.

'इकडून या.' ती पोरगी पीएरला उद्देशून म्हणाली. 'आपण गल्लीतून जाऊ.'

पीएर मागे वळला. तिच्याबरोबर राहण्यासाठी तो मधून मधून धावत होता. ती पोरगी रस्ता ओलांडून डावीकडच्या गल्लीत वळली. तीन घरे ओलांडून उजवीकडच्या फाटकाकडे आली.

'हीच ती जागा.' ती म्हणाली. मग अंगणातून धावत जाऊन तिने खुंटांच्या कुंपणातील छोटा दरवाजा खोलला. तिथेच थांबून तिने पीएरला धडाधडा पेटत असलेले छोटे घर दाखवले. त्याची एक बाजू कोसळली होती. दुसरी बाजू पेटत होती. खिडक्यांतून आणि छपराखालून ज्वाला बाहेर येत होत्या.

पीएर छोट्या फाटकाशी गेला. परंतु उष्णता एवढी प्रखर होती की तो तिथेच थांबला. त्याला घराजवळ जाता आले नाही. तो तसाच घराच्या बागेत शिरला तेथे फ्रेंच सैनिक काहीना काही वस्तू पळवीत होते.

एकाएकी त्याला मुलाच्या रडण्याचा आवाज ऐकू आला. बागेतील एका आसनाखाली गुलाबी फ्रॉक घातलेली एक मुलगी त्याला दिसली.

पीएरला आनंदाने श्वास घेता येईना. तो त्या मुलीकडे धावत गेला. तो तिला उचलून घेणार होता. पण परका माणूस पाहाताच गंडमाळा झाल्यासारखी दिसणारी अनाकर्षक आणि आईसारखीच असणारी ती लहान मुलगी किंचाळली आणि पळू लागली. पण पीएरने तिला उचलून जवळ घेतले. अतिशय रागाने ती ओरडू लागली. आपल्या चिमण्या हातांनी ती पीएरच्या हातातून सुटण्याची धडपड करू लागली. लाळ गळणाऱ्या घाणेरड्या तोंडाने ती त्याला चावण्याचा प्रयत्न करू लागली. एखादे लहान जनावर जवळ आल्याने वाटावी तशी भीती आणि किळस पीएरच्या मनात निर्माण झाली. पण त्याने त्या भावना विसरण्याचा प्रयत्न केला. मुलगी पडणार नाही याची काळजी घेत तो पुन्हा मोठ्या घराकडे धावत निघाला.

त्या मुलीला घेऊन पीएर आवारातून गल्ल्यांतून धावत पोवार्स्कीच्या कोपऱ्यावरील प्रिन्स ग्रझिन्स्की बागेकडे आला. त्या मुलीला शोधण्यासाठी तो जेथून निघाला होता ती जागा त्याला पहिल्यांदा ओळखता आली नाही. आता ती जागा लोकांनी आणि घरातून बाहेर काढलेल्या

सामानांनी खचून भरलेली होती. आगीतून वाचवलेली आणि चीजवस्तू घेऊन तिथे आलेली अनेक रशियन कुटुंबे होतीच, खेरीज तिथे गणवेषातील अनेक फ्रेंच सैनिक होते.

तो अधिकारी आणि त्याची पत्नी पूर्वीच्याजागी नव्हती. पीएर गर्दीतून भरभर फिरू लागला आणि समोर येतील ते चेहरे न्याहाळू लागला. जॉर्जियन किंवा आर्मेनियन कुटुंब त्याच्या दृष्टीस पडले. त्यातील म्हाताऱ्याचा चेहरा पौर्वात्य पुरुषासारखा देखणा होता. त्याने कापडाचे अस्तर लावलेले मेंढ्यांचे कातडे पांघरले होते, आणि नवे बूट घातलेले होते. तशाच प्रकारची म्हातारी त्या कुटुंबात होती. आणि एक तरुण स्त्रीही होती. पीएरला ती तरुण स्त्री पौर्वात्य लावण्याचा सर्वोत्कृष्ट नमुना वाटली.

तिच्या भुवया ठसठशीत, बाकदार आणि काळ्याभोर होत्या. तिची कांती विलक्षण मुलायम आणि सतेज होती. तिचा दीर्घवर्तुळाकार चेहरा सुंदर व निर्विकार होता. लोकांच्या गर्दीमधील हिरवळीच्या जागी फेकून दिलेल्या सामानांमध्ये उंची सॅटिनचा झगा घातलेली आणि डोक्याला चकचकीत पांढरा रुमाल गुंडाळलेली ती तरुणी हिमप्रदेशात टाकलेल्या उष्णप्रदेशातील एखाद्या नाजूक रोपासारखी दिसत होती. म्हातारीच्या थोडे मागे असलेल्या सामानावर ती बसली होती. लांब केसांच्या पापण्या असलेले आपले टपोरे काळेभोर आणि दीर्घ डोळे तिने जमिनीवर खिळवले होते. तिला आपल्या सौंदर्याची जाणीव होती त्यामुळे भीतीही वाटत असल्याचे स्पष्ट दिसत होते. पीएर तिचा चेहरा पाहून चकित झाला. कुंपणाजवळून घाईघाईने जाताना त्याने कितीदातरी तिच्याकडे वळून पाहून घेतले. तो कुंपणाकडे पोहोचला तरी त्याला हवी ती माणसे दिसली नाहीत. तशी त्याने उभे राहून सभोवार पाहिले.

मुलगी छातीशी घेतलेली पीएरची मूर्ती आता पूर्वीहून अधिक लक्षात भरत होती. कित्येक रशियन पुरुष आणि स्त्रिया त्याच्याभोवती गोळा झाल्या.

'कुणी हरवलं आहे का ? तुम्ही श्रीमंत समाजातील आहात काय ? ही मुलगी कोणाची ?' कोणी ना कोणी विचारत होते.

'ही मुलगी काळा झगा घातलेल्या एका बाईची आहे. ती स्त्री या ठिकाणीच आपल्या मुलांसह बसली होती. तुम्हाला कोणाला ती ठाऊक आहे का ? ती कोठे गेली ते सांगाल का ?'

'अरे मग ती ॲन्फेरॉव्स असणार' देवीचे वण असलेल्या चेहऱ्याच्या शेतकरी स्त्रीला उद्देशून डीकन म्हणाला. 'प्रभो, आमच्यावर दया दाखव. आमच्यावर करुणा असू दे' आपल्या व्यावसायिक गंभीर आवाजात तो म्हणाला.

'ॲन्फेरॉव्ह कुटुंब म्हणता ? ती माणसं तर केव्हाच सकाळी निघाली. ती मुलगी मार्या निकोलात्नाची असेल नाहीतर इव्हानॉव्हाची असेल.'

'तुला ती ठाऊक आहे तर. सडपातळ दात पुढे आलेली.' पीएर म्हणाला.

'मग ती खात्रीने मार्या निकोलीव्ना. ह्या लांडग्यांनी आमच्यावर हल्ला केला त्याचवेळी ती बागेत पळाली.' फ्रेंच सैनिकाकडे बोट करीत ती स्त्री म्हणाली.

'प्रभो आमच्यावर दया कर' डीकनने पुन्हा प्रार्थना केली.

'तुम्ही पलीकडे जा. ती माणसं तिथं आहेत. नक्की तीच असणार. ती बेभान होऊन आक्रोश करीत होती. तीच ती. तुम्ही ह्या वाटेनं जा.' त्या स्त्रीने पीएरला सांगितले.

पण पीएरचे त्या स्त्रीच्या बोलण्याकडे लक्ष नव्हते. त्याच्यापासून काही पावलांवर जे चालले होते त्याकडे तो काही क्षण टक लावून कुतूहलाने पाहत होता. आर्मेनियन कुटुंबाकडे आणि त्यांच्याकडे आलेल्या दोन फ्रेंच सैनिकांकडे तो पाहात होता.

एक अनवाणी पायाचा निळया कोटातील फ्रेंच सैनिक आर्मेनियन म्हाताऱ्याकडे गेला आणि काहीतरी बोलून त्याने त्या म्हाताऱ्याचे पाय पकडले. ताबडतोब तो म्हातारा घाईघाईने बूट काढू लागला. जाकिट घातलेला दुसरा सैनिक खिशात हात घालून काहीं न बोलता स्वस्थपणे त्या सुंदर आर्मेनियन मुलीसमोर उभा राहिला.

शेतकरी स्त्रीकडे मुलगी देत पीएर तिला निक्षून म्हणाला, 'ह्या मुलीला घे. मग त्यांच्याकडे पोचते कर. आधी घे तर खरी.' रडणाऱ्या मुलीला जमिनीवर ठेवून, वळून फ्रेंच सैनिकाकडे आणि आर्मेनियन कुटुंबाकडे पाहत तो जवळजवळ तिच्यावर ओरडला. एवढ्या वेळात तो म्हातारा अनवाणी होऊन बसला होता. त्या फ्रेंच सैनिकाने त्याच्याकडून नुकताच दुसरा बूट घेतला होता आणि आता तो दोन्ही बूट एकमेकांवर आपटू लागला. हुंदके देत म्हातारा काहीतरी सांगत होता. परंतु पीएरला ते ओझरतेच दिसले. पीएरचे सर्व लक्ष त्या जाकिट घातलेल्या फ्रेंच सैनिकावर खिळले होते. एवढ्या वेळात तो जाणूनबुजून शरीराला झोके देत त्या आर्मेनियन तरुणीकडे पोचला होता. खिशातील हात बाहेर काढून त्याने तिचा आता गळा धरला.

आतापर्यंत ती आर्मेनियन तरुणी मघासारखीच निश्चल बसली होती. तिच्या लांब पापण्या खाली वळल्या होत्या. तो सैनिक काय करतो आहे हे तिला दिसत नसावे, जाणवत नसावे असे वाटत होते.

फ्रेंच सैनिक आणि पीएर यांच्यामधे थोड्याफार पावलांचें अंतर होते. पीएर तेवढे अंतर धावत जाईपर्यंत त्या जाकिट घातलेल्या सैनिकाने त्या सुंदर आर्मेनियन तरुणीच्या गळयातील हार हिसकावून घेतला. त्या तरुणीने दोन्ही हातांनी गळा धरून कर्कश किंकाळी मारली.

'तिच्या वाटेला जाऊ नकोस.' रागाने घोगऱ्या झालेल्या आवाजात पीएर गरजला. त्या वाकलेल्या उंच सैनिकाचे खांदे धरून त्याने त्याला दूर ढकलले. तसा तो सैनिक खाली पडला तो तसाच उठून पळत सुटला. त्याच्या सोबत्याने बूट टाकले आणि तो तलवार उपसून पीएरच्या अंगावर आला.

'इकडे ये असा. मूर्खपणा करू नकोस.' तो ओरडला.

पीएर संतापाच्या इतक्या भरात होता की त्याला काही आठवले नाही. त्याची शक्ती दसपट वाढली. तो त्या अनवाणी फ्रेंच सैनिकाच्या अंगावर धुसला. त्याला आपली तलवार उपसायला त्याने वेळच दिला नाही. त्या आधीच त्याने त्याला खाली पाडले. आणि ठोशामागून ठोसे चढवायला सुरुवात केली. भोवतालच्या गर्दीतून पसंतीच्या आरोळ्या उठल्या.

तेवढ्यातच फ्रेंच घोडेस्वारांचे रक्षक-पथक कोपऱ्याशी आले. त्यांनी आपले घोडे पीएरजवळ नेऊन त्याला वेढले. त्यानंतर काय घडले ते पीएरला स्पष्ट आठवेना. आपण कोणाला तरी मारले होते. नंतर आपणाला मार मिळाला होता, शेवटी आपले हात बांधण्यात आले होते, काही फ्रेंच सैनिक आपल्याभोवती राहून आपली झडती घेत होते एवढेच त्याला आठवले.

'लेफ्टनंट, त्याच्याकडे कट्यार आहे.' पीएरला ज्याचा अर्थ कळला ते हे पहिले वाक्य होते.

'शस्त्र बाळगून आहेस तर!' अधिकारी म्हणाला. मग तो पीएरबरोबरच पकडून ठेवलेल्या अनवाणी पायांच्या फ्रेंच सैनिकाकडे वळून म्हणाला. 'ठीक आहे. कोर्ट-मार्शल होईल तेव्हा तू काय ते सांग' मग पीएरकडे वळून त्याने विचारले. 'तुला फ्रेंच भाषा समजते काय?'

पीएरने तांबारलेल्या डोळ्यांनी त्याच्याकडे पाहिले पण काही उत्तर दिले नाही.

अधिकाऱ्याने पीएरला मघाचाच प्रश्न पुन्हा विचारला. 'तुला फ्रेंच भ षा बोलता येते का?' मग त्याने दुभाष्याला बोलावले. तशी सामान्य शिपायांतून एक लहानखोर मनुष्य पुढे आला. त्याने नागरी रशियन पोषाख केलेला होता. त्याच्या कपड्यावरून आणि बोलण्यावरून पीएरने तो मनुष्य मॉस्कोतील कुठल्यातरी दुकानाचा फ्रेंच मालक असणार हे लागलीच ओळखले.

पीएरकडे बारकाईने पाहात तो दुभाष्या म्हणाला. 'हा सामान्य माणूस दिसत नाही.'

'छे छे! हा अगदी जाळपोळ करणारा दिसतो. त्याला विचार तू कोण आहेस?' अधिकारी म्हणाला.

दुभाष्याने फ्रेंचाळलेल्या रशियन भाषेत पीएरला प्रश्न केला. 'तू कोण आहेस? अधिकाऱ्यांना उत्तर हवं आहे.'

'मी कोण आहे ते सांगणार नाही. मी तुमचा कैदी आहे. मला घेऊन चला.' पीएर एकदम फ्रेंचमधे बोलला.

कपाळाला आठ्या घालीत अधिकारी म्हणाला, 'ठीक. ठीक. आता निघू या.'

■ ■

# भाग बारावा

## १८१२

बोरोदीनॉची लढाई झाली त्या दिवशी म्हणजेच सव्वीस ऑगस्ट रोजी ॲना पावलोवनाच्या घरी मेजवानी होती. एका बिशपने सैंट सर्जोची पवित्र प्रतिमा झारला पाठविली होती. त्याबरोबर झारला जे पत्र पाठविले होते त्या पत्राचे वाचन मेजवानीच्या वेळी होणार होते. ते पत्र मेजवानीचे प्रमुख आकर्षण होते. देशभक्तिपूर्ण धार्मिक वक्तृत्वाचा एक आदर्श म्हणून त्या पत्राकडे पाहिले जात होते. वक्तृत्वासाठी प्रसिद्ध असलेला प्रिन्स व्हॅसिली ते पत्र वाचणार होता.

ॲना पावलोवनाच्या कोणत्याही समारंभामागे नेहमीच राजकीय हेतू असे. तसा तो या वाचनामागेसुद्धा होता. मेजवानीला अनेक माणसे येणार होती. फ्रेंच नाटकांना आपण आश्रय देतो म्हणून त्यांना शरमिंदे करण्याचा आणि त्याच्यात देशभक्ती जागवण्याचा बेत ॲना पावलोवना करीत होती. बरीच माणसे मेजवानीला आली. दिवाणखान्यामध्ये ज्यांची उपस्थिती ॲनाच्या मते आवश्यक होती, ती माणसे आली नव्हती. वाचनाच्या कार्यक्रमास प्रारंभ होई-पर्यंत ती सर्वसामान्य विषयांवर बोलत राहिली.

काउंटेस बेझुहॉव्हचा आजार ही पीटर्सबर्गमधील महत्त्वाची बातमी होती. गेले काही दिवस ती आजारी होती. तिच्यामुळे अनेक समारंभांना शोभा येई. हल्ली ती कित्येक समारंभांना हजर नव्हती. ती कुणाची भेट घेत नाही, नेहमी उपचार करणाऱ्या पीटर्सबर्गमधील प्रसिद्ध डॉक्टरऐवजी ती कुण्या इटालियन डॉक्टरचे औषध घेत आहे, तो तिच्यावर नव्या आणि अलौकिक पद्धतीने उपचार करीत आहे असे बोलले जाऊ लागले.

काउंटेसने एकाच वेळी दोघांशी लग्न केल्याने जी गैरसोय झाली त्यामुळे ती आजारी पडली आहे आणि तशा प्रकारची गैरसोय नाहीशी करण्याचे काम इटालियन डॉक्टर करीत आहे

हे सर्वांना ठाऊक होते. परंतु ॲना पावलोनासमोर त्याबद्दल विचार प्रगट करण्याचे धैर्य कुणालाही झाले नाही.

'बिचारी काउंटेस अतिशय आजारी आहे असं म्हणतात. तिला हृदयविकार जडला आहे असं डॉक्टर म्हणतात.'

'हृदयविकार? फारच भयंकर आजार आहे तर!'

'दोन्ही प्रतिस्पर्ध्यांत सलोखा झाला आहे असं म्हणतात. ह्याबद्दल हृदयविकाराचे आभार मानले पाहिजेत—' लोक 'हृदयविकार हा शब्द मोठ्या चवीने उच्चारत होते.

'थोरल्या काउंटला धक्का बसला आहे असं ऐकते. आजार गंभीर असल्याचं कळताच तो लहान मुलासारखा रडला.'

'ती अति मोहक स्त्री आहे. ती गेली तर फार मोठी हानी होईल.'

तेवढ्यात ॲना पावलोवना म्हणाली, 'तुम्ही बिचाऱ्या काउंटेसबद्दल बोलता आहात का? मी इतरांकरवी तिची चौकशी केली. तिची प्रकृती सुधारत आहे, असं मला कळलं. ती जगातील अत्यंत सुंदर स्त्री आहे याबद्दल संशयच नाही.' आपल्या उत्साहाची जाणीव होऊन ॲना पावलोवनाने स्मित केले आणि म्हटले, 'तिचा गट वेगळा व माझा गट वेगळा. तरीही योग्य कारणासाठी तिचं कौतुक करायला मी मागंपुढं पाहाणार नही. ती सुखात नाही असं म्हणतात.'

ह्या शेवटच्या शब्दांनी ॲना पावलोवनाने काउंटेसच्या आजाराचे रहस्य उलगडले असे एका गाफील तरुणाला वाटले. तो म्हणाला, 'एखाद्या प्रसिद्ध डॉक्टरला त्यानं बोलावलं नाही याचं आश्चर्य वाटतं. कुणीतरी ढोंगी वैद्य तिच्यावर उपचार करीत आहे. तो कदाचित तिला घातक औषधं देईल.

'तुझी माहिती कदाचित माझ्या माहितीपेक्षा अधिक अचूक असेल.' ॲना पावलोवनाने त्या अनुनभवी तरुणावर एकदम निष्ठुर हल्ला चढविला. 'हा डॉक्टर अतिशय विद्वान आणि निष्णात आहे, अशी मला विश्वासनीय माहिती मिळाली आहे. तो स्पेनच्या राणीचा खाजगी डॉक्टर आहे.'

काही वेळ तेथे चमत्कारिक शांतता पसरली. तिचा भंग संशयास्पद देशभक्ती असलेल्या व्यक्तीच्या आगमनानें झाला. ॲना पावलोवना तिचीच वाट बघत होती. तिच्या मनाची सुधारणा घडवून आणण्यास ती उत्सुक होती. स्मित करून प्रिन्स इपॉलिटला तिने बोटाने खूण केली. प्रिन्स व्हॅसिलीला टेबलाशी बोलाविले. बसायला सांगितले. टेबलावर दोन मेणबत्त्या लावल्या. व्हॅसिलीसमोर हस्तलिखित ठेवून त्याला वाचण्याची विनंती केली. आता मात्र सगळीकडे शांतता पसरली.

'सर्वश्रेष्ठ दयाळू सम्राट आणि झार!' प्रिन्स व्हॅसिलीचा करारी आवाज घुमला. त्याने श्रोत्यांवरून नजर फिरविली. त्याची नजर जणू विचारीत होती...ह्या संबोधनाला कुणाचा आक्षेप आहे काय? पण कुणीही काही बोलले नाही. 'राजधानी मॉस्को—नवे जेरुसलेम—

आपल्या प्रेषिताचे स्वागत करीत आहे.' त्याने 'आपल्या' शब्दावर एकदम जोर दिला. 'आपल्या उत्साही उत्कंठित मुलांना उराशी घ्यावे तसे स्वागत करीत आहे. दाट धुक्यातून दिसणाऱ्या तुझ्या साम्राज्याचे दिपवून टाकणारे वैभव पाहून ती आनंदाने उच्च स्वराने गात आहे व स्वागत करीत आहे. नवागताचे स्वागत असो. परमेश्वराचे त्याला आशीर्वाद असोत!'

प्रिन्स व्हॅसिलीने शेवटचे शब्द अत्यंत आर्त स्वरात उच्चारिले.

बिलिबिन आपली नखे बारकाईने न्याहाळीत होता. पुष्कळच श्रोते दबल्यासारखे झाले होते. आपण जणू काय अपराध केला आहे असे त्यांना वाटत होते. भोजनसमारंभाच्या वेळी वृद्धस्त्रिया हळू आवाजात प्रार्थना म्हणतात, त्याचप्रमाणे ॲना पावलोवनाने हळू आवाजात शब्द अगोदरच उच्चारले. 'क्षुद्र आणि उद्धट गलिअथ...' प्रिन्स व्हॅसिली पुढे वाचू लागला.

'क्षुद्र आणि उद्धट गलिअथ फ्रान्सच्या सरहद्दीवरून येऊन अवघ्या रशियाला मरणाच्या भीतीने घेरून टाकू दे. रक्तासाठी हपापलेल्या त्याच्या गर्विष्ठ डोक्यावर रशियन डेव्हिडच्या नम्र श्रद्धेची गोफण चपळाईने आघात करील. आमच्या देशाच्या कल्याणाचा प्राचीन काळापासून कट्टर कैवार घेणाऱ्या वंदनीय सेंट सर्जीची पवित्र प्रतिमाच सम्राटाकडे येत आहे. माझी प्रकृती ठीक नसल्याने मी महाराजांच्या दर्शनाचा लाभ घेऊ शकत नाही. म्हणून मला अतिशय दुःख होते. मी देवाची कळकळीने प्रार्थना करीत आहे. सर्वशक्तिमान परमेश्वर निष्ठावंत भक्तांना सत्ता देईल. तो करुणानिधी महाराजांच्या आकांक्षा पुऱ्या करील.'

काय शैली आहे! श्रोत्यांमधून वाचणाराचे व लिहिणाराचे कौतुक होऊ लागले. ह्या आवाहनाने जागृत झालेले ॲना पावलोवनाचे पाहुणे कितीतरी वेळ देशाच्या स्थितीबद्दल बोलत राहिले. थोड्याच दिवसांत होणाऱ्या लढाईबद्दल ते निरनिराळे तर्क लढवू लागले.

ॲना पावलोवना म्हणाली, 'उद्या सम्राटांचा वाढदिवस आहे. त्या दिवशी आपल्याला कसलीतरी चांगली बातमी मिळेल, असं मला का कोण जाणे, वाटत आहे.'

खरोखरच ॲना पावलोवनाची अपेक्षा पुरी झाली. दुसऱ्या दिवशी झारचा वाढदिवस साजरा करण्यासाठी दरबारामध्ये खास प्रार्थना झाली. त्याच वेळी प्रिन्स व्हॉलकॉन्स्कीला चर्चच्या बाहेर बोलविण्यात आले आणि त्याला प्रिन्स कुटूझॉफने पाठविलेला खलिता देण्यात आला. लढाईच्या दिवशी तॅतारिनॉव्हो येथून कुटूझॉफने तो खलिता पाठविलेला होता. त्याने लिहिले होते, 'रशियन फौजा एक पाऊलदेखील मागे हटलेल्या नाहीत. फ्रेंच सैन्याची हानी आमच्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक झाली आहे. मी हे पत्र घाईघाईने रणांगणावरूनच लिहीत आहे. अगदी ताजी वार्ता अजून मिळावयाची आहे.' आपल्याला विजय मिळाला असे पत्रावरून वाटत होते. जमलेल्या दरबारी लोकांनी चर्चमधेच परमेश्वराचे मदत आणि विजय

दिल्याबद्दल आभार मानले.

ॲना पावलोवनाची अपेक्षा पुरी झाली होती. त्या सकाळी सबंध शहरात आनंदी वातावरण पसरले होते. हा विजय निर्णायक आहे असे प्रत्येकाला वाटू लागले. नेपोलियनला कैद केले आहे असे काही लोक बोलू लागले. नेपोलियनच्या सैन्याची अवस्था आणि फ्रान्सच्या नव्या सम्राटाची निवड यांबद्दलही लोक बोलू लागले.

कुटाइसॉव्हच्या मृत्यूच्या बातमीने नकळत पीटर्सबर्ग शहरावर दुःखाची छाया पसरली होती.

दुसऱ्या दिवशी सैन्याकडून काही बातमी आली नाही. लोकांचा सूर पूर्वीचा राहिला नाही. अनिश्चिततेमुळे झारला अतिशय मनस्ताप होऊ लागला. दरबारी लोकांनासुद्धा तसाच मनस्ताप होऊ लागला.

'सम्राटांची अवस्था लक्षात घ्या.' दरबारी म्हणू लागले. दोन दिवसांपूर्वी ते कुटूझॉफची स्तुती करीत होते. ती स्तुती आता थांबली. त्या दिवशी कुटूझॉफमुळे झारला मनस्ताप झाला म्हणून ते कुटूझॉफला दोष देऊ लागले. आपला आश्रित कुटूझॉफ याच्याबद्दल बढाया मारणे प्रिन्स व्हॅसिलीने थांबविले. कमांडर-इन-चीफ कुटूझॉफबद्दल बोलणे निघाले की प्रिन्स व्हॅसिली एक चकार शब्द बोलेनासा झाला. त्या दिवशी संध्याकाळी पीटर्सबर्गमधील लोकांना अस्वस्थ करण्याचा कट सर्व गोष्टींनी केला होता असे वाटत होते. अतिशय दुःखदायक बातमीने त्यांच्या धास्तीत आणखी भर पडली. जिच्या गंभीर आजाराबद्दल लोक चर्चा करून वेळ घालवीत ती काउंटेस एलन एकाएकी मरण पावली. खूप लोक एकत्र जमले म्हणजे प्रत्येक-जण काउंटेस बेझुहॉव्ह गंभीर हृदयविकाराने कशी मरण पावली याची अधिकृत वार्ता सांगू लागले. मात्र जवळची परिचित माणसे एकत्रित आली म्हणजे ती वेगळी गोष्ट सांगत. स्पेनच्या राणीच्या खाजगी डॉक्टराने तिच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी कसल्यातरी औषधाचे लहान डोस घ्यायला सांगितले होते. थोरल्या काउंटने शंका घेतल्यामुळे आणि नवऱ्याने पत्राला उत्तर न दिल्यामुळे एलनच्या मनाला अतिशय क्लेश झाले होते. म्हणून तिने डॉक्टराने दिलेल्या औषधाचा फार मोठा डोस घेतला. मरताना तिला अतिशय यातना झाल्या. कसलीही मदत मिळाली नाही. प्रिन्स व्हॅसिली व थोरला काउंट इटालिअन डॉक्टरवर खटला भरणार आहेत असे लोक बोलू लागले. त्या डॉक्टराच्या ताब्यात दुर्दैवी मयताने लिहिलेली काही पत्रे होती. ती त्याने सादर केली. ती अशा प्रकारची होती की त्या दोघांना त्याच्यावर खटला भरण्याचा विचार ताबडतोब सोडून द्यावा लागला.

झारसमोरील अनिश्चित अशी परिस्थिती, कुटाइसॉव्ह आणि एलन यांचे मृत्यू ह्या दुर्दैवी गोष्टींबद्दल लोक चर्चा करू लागले. कुटूझॉफचा खलिता आल्यानंतर तिसऱ्या दिवशी एक खेडूत मॉस्कोहून पीटर्सबर्गला आला. मॉस्को शहर फ्रेंचांना शरण गेल्याची बातमी सबंध शहरभर पसरली. ही वार्ता अतिशय भयानक होती. सम्राटांची स्थिती अतिशय चमत्कारिक झाली. कुटूझॉफ देशद्रोही होता. प्रिन्स व्हॅसिलीची मुलगी मरण पावल्यानंतर त्याचे सांत्वन करण्यासाठी सम्राट त्याला भेटले. पूर्वी ज्याची प्रिन्स व्हॅसिलीने स्तुती केली होती त्याच कुटूझॉफबद्दल तो

म्हणाला, 'त्या आंधळ्या आणि बदफैली म्हाताऱ्याकडून दुसऱ्या कशाचीच अपेक्षा करायला नको!' आपण पूर्वी काय बोलतो होतो याचा त्याला विसर पडला होता. तो दुःखात असल्यामुळे तसा विसर पडणे क्षम्य होते.

'अशा माणसावर रशियाचे भवितव्य कसे सोपवितात कळत नाही.'

मॉस्को सोडल्यानंतर नऊ दिवसांनी मॉस्कोच्या शरणागतीची अधिकृत वार्ता घेऊन कुटूझॉफ्चा एक मनुष्य पीटर्झबर्गला आला. निरोप घेऊन येणारा मनुष्य मिशॉद नावाचा फ्रेंच होता. त्याला रशियन भाषा येत नव्हती. 'मी परकीय असलो तरीही अंतःकरणाने रशियन आहे.' तो स्वतःच स्वतःबद्दल असे उद्गार काढी.

झारच्या भेटीला मिशॉदला नेण्यात आले तेव्हा त्याची मुद्रा इतकी दुःखी होती की झारने त्याला लागलीच विचारले, 'कर्नल, तुम्ही माझ्यासाठी दुःखी बातमी आणलीय काय?'

'होय महाराज. बातमी अतिशय दुःखाची आहे! मॉस्कोचा पाडाव झाला आहे.' मिशॉद उसासा टाकून खाली पाहात म्हणाला.

'लढाई न करताच माझ्या सैनिकांनी माझी प्राचीन राजधानी शत्रूच्या हवाली केली असेल का?' एकाएकी लालबुंद होत झारने त्वरित प्रश्न केला.

मग मिशॉदने कुटूझॉफने दिलेला निरोप आदरपूर्वक ऐकविला. 'मॉस्को शहर लढविण्याची शक्यता दिसत नाही. सैन्य आणि शहर गमावणे अगर केवळ शहर गमावणे याखेरीज तिसरा पर्याय नसल्याने कमांडर-इन-चीफ्ने मॉस्को शहर सोडून देण्याचे ठरविले आहे.' मिशॉदकडे न पाहता आणि काही न बोलता झार ऐकत होता.

'शत्रू शहरात शिरला काय?' त्याने विचारले.

'होय महाराज. एव्हाना शहराची राखरांगोळी झाली असेल मी निघालो तेव्हा सगळं शहर पेटत होतं.' मिशॉद ठामपणे म्हणाला. पण झारकडे पाहताच आपली चूक लक्षात येऊन तो अतिशय दचकला. झारचा श्वासोच्छ्वास जोराने सुरू झाला होता. त्याचा खालचा ओठ थरथर कापत होता. त्याच्या सुंदर व निळ्या रंगाच्या डोळ्यांत क्षणभर पाणी तरळत होते.

पण ही स्थिती क्षणात पालटली. आपल्या दुबळेपणावर चिडून की काय झारच्या कपाळाला आठ्या पडल्या. मान ताठ ठेवून तो मिशॉदला निश्चयी स्वरात म्हणाला :

'कर्नल, आपल्यावर जे प्रसंग येताहेत त्यावरून असं वाटतं की, आम्ही फार मोठा त्याग करायला पाहिजे असं देवाला वाटत असावं. परमेश्वरी इच्छेला शरण जाऊन सर्व काही करायला मी तयार आहे.'

बोरोदीनों येथील लढाईच्या काही दिवस आधी निकोलायला आवश्यक ती रक्कम आणि मुखत्यारपत्रे देण्यात आली. काही घोडेस्वारांना त्याने आपल्या अगोदर व्हॉरोनेश येथे रवाना केले आणि आपण टप्प्याटप्प्याला घोडे बदलीत तिकडे निघाला.

अन्नधान्य शोधणाऱ्या पथकाने व्यापलेल्या नाना सामग्रीच्या गाड्या, तसेच इस्पितळे असलेल्या प्रदेशातून निकोलाय जेव्हा बाहेर पडला तेव्हा त्याला अतिशय आनंद झाला. कित्येक महिने सतत रणांगणावर फौजेमध्ये घालविलेल्या माणसालाच त्याच्या आनंदाची कल्पना येईल. निकोलायला आता सैनिक, फौजेबरोबरच्या गाड्या आणि सैनिकांच्या तळावरील घाणेरडे वातावरण दिसेनासे झाले. आता शेतकरी आणि त्यांच्या बायका, खेड्यातील घरे, शेतात चरत असणारे बैल, विश्रांतिस्थाने, अर्धवट झोपेत असणारे तिथले व्यवस्थापक त्याच्या दृष्टीस पडू लागले. ह्या दृश्याने त्याला खूप आनंद झाला. जणू तो आयुष्यात प्रथमच त्या गोष्टी पाहात होता. तरुण आणि निरोगी अशा स्त्रिया त्याने पाहिल्या. त्यांच्यापैकी कुणाच्याही भोवती अधिकाऱ्यांचा घोळका नव्हता. त्यांच्या दर्शनाने त्याचे मन कितीतरी वेळ आनंदाने व आश्चर्याने भरून राहिले.

निकोलाय अत्यंत प्रसन्न मनःस्थितीत व्हॉरोनेश येथील हॉटेलमध्ये रात्री पोहोचला. फौजेमध्ये असताना कितीतरी काळ ज्या गोष्टी मिळालेल्या नव्हत्या, त्या त्याने मागविल्या. दुसऱ्या दिवशी उठून त्याने अतिशय काळजीपूर्वक दाढी केली. कित्येक दिवस न वापरलेला गणवेश अंगावर चढवून तो अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी गाडीतून निघाला.

त्या जिल्ह्याच्या शिबंदीचा कमांडर एक मुलकी जनरल होता. लष्करी काम व हुद्दा यात त्याला बरीच आवड वाटत असावी असे दिसत होते. त्याने निकोलायचे बेमुर्वतपणे स्वागत केले. ( त्याच्या मते ते लष्करी पद्धतीला अनुसरून होते ) मोठ्या आढ्यतेचा आव आणून त्याने निकोलायची उलटतपासणी केली. तसे करण्याचा आपल्याला हक्क आहे असे समजून तो वागत होता. युद्ध कसे चालले आहे याबद्दल कोणी मत विचारले आहे अशा भावनेने त्याने आपली पसंती-नापसंती व्यक्त केली. पण निकोलाय इतक्या उत्साहात होत की त्याची त्यामुळे करमणूकच झाली.

शिबंदीच्या कमांडरकडून तो नंतर गव्हर्नरकडे गेला. लहान बांध्याचा तो गव्हर्नर वागण्यात तरतरीत, प्रेमळ व निगर्वी होता. त्याने निकोलायला घोड्यांची पैदास करणाऱ्या केंद्राची माहिती दिली. तेथून घोडे घेता येतील असे सांगितले. शहरातील एका घोड्यांच्या व्यापाऱ्याची शिफारस केली. तसेच शहरापासून चौदा एक मैल अंतरावर राहणाऱ्या व उत्तमोत्तम घोडे बाळगणाऱ्या एका गृहस्थाचे नाव सुचविले. त्याने निकोलायला सर्व प्रकारची मदत देऊ केली.

' तू काउंट इल्या अँड्रीचचा मुलगा ना? माझी पत्नी तुझ्या आईची जिवलग मैत्रीण होती. आम्ही प्रत्येक गुरुवार आदरातिथ्यासाठी राखून ठेवतो. आज गुरुवार आहे. कसले उपचार न पाळता तू ये. हेच आग्रहाचं बोलावणं आहे असं समज ' त्याचा निरोप घेताना

गव्हर्नर म्हणाला.

निकोलाय क्वॉर्टरमास्टरला घेऊन गाडीत बसला आणि गव्हर्नरच्या घराकडून चौदा मैलांवर घोड्यांची पैदास करणारे केंद्र चालविणाऱ्या गृहस्थाकडे तो थेट निघाला.

व्हॉरॉनेश येथे निकोलायचे पहिले काही दिवस सुरळीत आणि आरामात गेले. मनुष्य प्रसन्न मनःस्थितीत असला म्हणजे सर्व गोष्टी चांगल्या तऱ्हेने पार पडतात याचा निकोलायला अनुभव आला.

खेड्यातील ज्या गृहस्थाकडे निकोलाय गेला होता तो गृहस्थ पूर्वी घोडदळात अधिकारी होता. तो अविवाहित होता. घोड्याबद्दल त्याला विलक्षण प्रेम होते आणि ज्ञानही होते. तो चांगला खेळाडू होता. त्याच्या मालकीचे एक हॉटेल होते. त्याच्यापाशी शंभर वर्षांचे जुने हंगेरीयन मद्य होते आणि उत्तम प्रकारचे घोडेही होते.

घासाघीस न करता निकोलायने सहा हजार रूबल्स देऊन सतरा घोडे खरेदी केले. त्याच्या मते प्रत्येक घोडा त्या जातीतील आदर्श आणि प्रेक्षणीय जनावर होते. त्या गृहस्थाशी रोस्तॉफची थोड्याच वेळात मैत्री झाली. त्याच्याबरोबर निकोलायने जेवण घेतले. यथेच्छ हंगेरियन मद्य घेतले. चुंबनाची देवाणघेवाण करून निरोप घेतला. भयंकर वाईट रस्त्यावरून त्याची गाडी जाऊ लागली. तरी तो अत्यंत प्रसन्न मनःस्थितीत होता. गव्हर्नरच्या घरी असलेल्या मेजवानीला योग्य वेळी त्याला पोचायचे होते. म्हणून तो गाडीवानाला गाडी भर-धाव हाकायला सतत सांगत होता.

थंड पाण्याचा फवारा डोक्यावर घेऊन कपडे करून, अंगावर अत्तर शिंपडून, निकोलाय बाहेर पडला. गव्हर्नरकडे यायला त्याला उशीर झाला होता.

त्या ठिकाणी नाचसमारंभ योजण्यात आला नव्हता. नाचाबद्दल त्याला काहीच सांगण्यात आले नव्हते. परंतु कॅटेरिना पेट्रोव्ना क्लॅव्हिकार्डवर वॉल्ट्स आणि एकॉसेज ही नृत्ये वाजविणार असल्याचे आणि त्या वेळी नृत्य होणार असल्याचे सगळ्यांना ठाऊक होते. ते लक्षात घेऊन प्रत्येकजण नृत्याला योग्य असा पोषाख करून आला होता.

राजधानीपासून दूर असलेल्या ठिकाणी १८१२ मध्ये अगदी पूर्वीसारखे जीवन चालू होते. मॉस्कोहून आलेल्या श्रीमंत कुटुंबाच्या अस्तित्वामुळे हे दूरचे गाव पूर्वीहून अधिक तरतरीत वाटत होते. त्या काळी रशियामध्ये सर्वच बाबतीत आढळणारी बेफिकिरीची वृत्ती तिथल्या आनंदी वातावरणात दिसत होती. तसेच लोकांमध्ये हवामान आणि परिचित माणसे याबद्दल ज्या गप्पा हटकून चालत त्या गप्पा मॉस्को, फौज आणि नेपोलियन यांबद्दल सुरू झाल्या.

गव्हर्नरच्या घरी व्हॉरॉनेशमधील निवडक उच्चभ्रू समाज गोळा झाला होता.

त्या ठिकाणी कित्येक स्त्रिया जमल्या होत्या. त्यांतील काही मॉस्को शहरातील होत्या आणि त्या निकोलायच्या ओळखीच्या होत्या. तिथे जमलेल्या पुरुषांमध्ये सुस्वभावी, सुसंस्कारसंपन्न आणि उमदा काउंट रोस्तॉफ याच्या तोडीचा कुणीही नव्हता.

घोडदळातील अधिकाऱ्याचा संपूर्ण गणवेश अंगावर असलेला निकोलाय आत आला तेव्हा

अत्तराचा आणि मद्याचा वास त्याच्याभोवती दरवळू लागला. 'मुलीच न येण्यापेक्षा उशिरा येणे बरे' हे शब्द त्याने उच्चारले. कितीतरी लोकांनीही त्याला उद्देशून हेच शब्द उच्चारले. त्याच्याभोवती लोक जमू लागले. सगळ्यांचे डोळे त्याच्यावर खिळले. आता निकोलायला हवा असलेला दर्जा प्राप्त झाला होता. बरेच दिवस न मिळालेले व हवेहवेसे वाटणारे मानसन्मान त्याला मिळू लागले. त्या गावामध्ये तो लोकप्रिय झाला त्यामुळे तो आनंदाने धुंद झाला. विश्रांतिस्थाने, दारूचे गुत्ते आणि घोड्यांची पैदास करणारी केंद्रे चालविणाऱ्या गृहस्थाचे हॉटेल या सर्वच ठिकाणी त्याच्या दृष्टिक्षेपाने सुखावणाऱ्या कामकरी मुली त्याला आढळल्या. एव्हढेच नव्हे तर गव्हर्नरकडे जमलेल्या मंडळींत कितीतरी विवाहित तरुण स्त्रिया आणि सुंदर मुली निकोलायने आपल्याकडे लक्ष द्यावे म्हणून खूप तळमळत होत्या. ( निदान निकोलायला तरी तसे वाटले. ) त्या त्याच्याशी सलगी करीत होत्या. ह्या तरुण, उमद्या आणि रंगेल सैनिकाचे लग्न करून त्याला गृहस्थ बनवावा म्हणून त्या पहिल्या रात्रीपासून वृद्ध माणसे हालचाल करू लागली. अशा माणसांत गव्हर्नरची पत्नीदेखील होती. एखाद्या नातेवाइकाचे स्वागत करावे तसे तिने त्याचे स्वागत केले.

कॅटेरिना पेट्रोव्नाने वॉल्ट्स आणि एकॉसेज ह्या नृत्यांसाठी वाजविण्यास सुरुवात केली. नृत्याला आरंभ झाला. निकोलायने आपल्या रुबाबदार नृत्याने तिथल्या मंडळींना कितीदा तरी आकर्षित केले. आपल्या नृत्याच्या सहजमुक्त अशा विशेष शैलीने त्याने सर्वांना आश्चर्यचकित केले. नृत्यसमारंभातील आपल्या शैलीने निकोलायलाही थोडे आश्चर्य वाटले. मॉस्कोमध्ये असताना त्याने अशा तऱ्हेने नृत्य केलेले नव्हते. त्या ठिकाणी त्याला नृत्याची ही अत्यंत मुक्त आणि सहजशैली निश्चितच चुकीची आणि वाईट वाटली असती. या ठिकाणी मात्र काहीतरी वेगळी गोष्ट करून लोकांना आश्चर्यचकित करणे आवश्यक आहे असे त्याला वाटले. ही गोष्ट राजधानीत नित्याची आहे, परंतु राजधानीच्या बाहेरच्या ठिकाणी नवीन आहे असे लोक खात्रीने समजतील असे त्याला वाटले.

त्या जिल्ह्यातील एका अधिकाऱ्याच्या निळ्या डोळयांच्या व स्थूलकाय सुरेख पत्नीशी निकोलाय लक्षात येईल इतक्या सलगीने त्या रात्री वागत होता. आनंद लुटत असणारे तरुण इतरांच्या बायका 'खास' आपल्या फायद्यासाठीच जन्मलेल्या आहेत अशी भाबडी समजूत करून घेतात. तशी समजूत करून घेतलेला रोस्तॉफ त्या स्त्रीची संगत सोडत नव्हता. जणू त्या दोघांत खाजगी करार झाला असावा, जणू त्या दोघांनी—रोस्ताफ आणि ती स्त्री यांनी किती चांगल्या तऱ्हेने एकमेकांशी वागावे हे आधीच ठरविले असावे अशा तऱ्हेने रोस्तॉफ तिच्या नवऱ्याशी अगदी मित्रत्वाने वागत होता. तिच्या नवऱ्याला मात्र रोस्तॉफचा हा समज मान्य होता असे दिसत नव्हते. तो रोस्तॉफशी वागताना त्रस्त दिसत होता. परंतु निकोलायची प्रसन्न, निष्कपट, भाबडी वृत्ती इतकी उत्कट होती की तिचा नवरा त्याच्या आनंदी वृत्तीपासून दूर राहू शकला नाही. मध्यरात्र जवळ येत चालली तसतशी त्याच्या पत्नीचा चेहरा अधिकाधिक लालबुंद झाला, अधिकाधिक उत्तेजित झाला आणि तिचा नवरा अधिक विषण्ण आणि

निर्जीव होऊ लागला. जणू त्या दोघांच्या वाट्याला उत्साहाचा थोडाफार वाटा आला होता. त्यामुळे पत्नीचा उल्हास वाढत असतानाच तिच्या नवऱ्यामधील उल्हास संपुष्टात येत होता.

निकोलाय किंचित पुढे झुकून बैठ्या खुर्चीत बसला होता. त्याच्या चेहऱ्यावरचे स्मित केव्हाही मावळत नव्हते. त्या सुंदर स्त्रीजवळ बसून तिच्याकडे झुकून तो तिची खूप स्तुती करीत होता.

गव्हर्नरची प्रेमळ पत्नी त्या ठिकाणी आली. तिच्या चेहऱ्यावर नाराजी दिसत होती. ती निकोलायला म्हणाली, ' निकोलाय, ॲना इग्नात्येवना तुझी भेट घेऊ इच्छिते ! ' तिने ते नाव अशा तऱ्हेने उच्चारले की, रोस्तॉफला ॲना इग्नात्येवना कुणीतरी बडे प्रस्थ आहे असे एकदम वाटले. ' मग येतोसना निकोलाय ? तुला निकोलाय म्हटलं तर चालेल ना ? '

' काही हरकत नाही. तिच्याबद्दल काही माहिती तर सांगशील. '

' तिचं नाव ॲना इग्नात्येवना माल्विन्त्सेव्ह. तिनं आपल्या भाचीकडून तुझ्याबद्दल ऐकलं आहे. तू संकटात कशी मदत केलीस ते तिला ठाऊक आहे. ही भाची कोण असेल याचा अंदाज तुला करता येईल का ? '

' मी अनेकांना संकटात मदत केलेली आहे. ' निकोलाय.

' त्या भाचीचं नाव प्रिन्सेस वोलकॉन्स्की. ती इथं व्हॉरॉनेशमध्ये आपल्या मावशीकडे राहात आहे. अरे, तुला असं लाजायला काय झालं ? '

' मी मुळीच लाजलो नाही. काहीतरी मूर्खासारखं बोलू नकोस. '

' बरं बाबा, राहिलं, काय पण मुलगा आहे ! '

मग गव्हर्नरच्या पत्नीने त्याला एका उंच धिप्पाडशा स्त्रीकडे नेले. तिने कडा नसलेली निळी हॅट घातलेली होती. गावातील प्रतिष्ठित व्यक्तीबरोबर तिने पत्त्यांचा डाव नुकताच संपविला होता. ह्या स्त्रीचे नाव होते मादाम माल्विन्त्सेव्ह. ती प्रिन्सेस मार्याची मावशी होती. ती श्रीमंत होती. ती विधवा असून तिला मूलबाळ काही नव्हते. ती नेहमीच व्हॉरॉनेश येथे राहात होती. रोस्तॉफ तिच्याकडे आला तेव्हा ती उभी राहून आपण किती पैसे गमावले ह्याचा हिशेब करीत होती. तिने आढ्यतेने आपली करारी नजर रोस्तॉफकडे वळविली आणि आपल्याला हरविणाऱ्या जनरलला ती टाकून बोलू लागली.

रोस्तॉफकडे आपला हात करीत ती म्हणाली, ' तुला बघून आनंद वाटला. ये इथं बैस. '

ती मादाम माल्विन्त्सेव्ह, प्रिन्सेस मार्या आणि तिचे मरण पावलेले वडील यांच्याबद्दल थोडा वेळ बोलली. त्यांच्याबद्दल तिला तिरस्कार वाटल्याचे दिसत होते. प्रिन्स आन्द्रेबद्दलही तिचे चांगले मत नव्हते. तिने निकोलायला त्याच्याविषयी विचारले. त्या प्रतिष्ठित वृद्धेने त्याला

पुन्हा भेटण्याचे आमंत्रण दिले आणि त्याचा निरोप घेतला.

निकोलायने पुन्हा येण्याचे कबूल केले. तिचा निरोप घेताना तो पुन्हा लाजला. प्रिन्सेस मार्याच्या नावाचा उल्लेख झाला तेव्हा लज्जेची आणि भीतीची भावना त्याच्या अंतःकरणात निर्माण झाली. आपल्या भावनेचे कारण त्याचे त्यालाच सांगता आले नसते.

मादाम माल्विन्त्सेव्हचा निरोप घेतल्यावर रोस्तॉफ पुन्हा नृत्य करायला जाणार होता, परंतु गव्हर्नरच्या पत्नीने आपला गुबगुबीत हात त्याच्या दंडावर ठेवला आणि म्हटले, 'मला तुझ्याशी थोडं बोलायचं आहे.' तिने त्याला दिवाणखान्यात नेले. त्यांच्या बोलण्यात व्यत्यय नको म्हणून तिथे असलेली माणसे बाहेर गेली.

गव्हर्नरच्या पत्नीचा प्रेमळ चेहरा गंभीर झाला. ती म्हणाली, 'माझ्या मते ती तुला अनुरूप आहे. तुला कबूल असेल तर मी प्रयत्न करीन आणि लग्न जुळवीन!'

'तुम्ही कोणाबद्दल बोलत आहात?' निकोलायने विचारले.

'तुझं आणि प्रिन्सेसचं लग्न व्हावं अशी मी खटपट करीन. कॅटेरिना पेट्रोव्नाने लिलीचं नाव सुचविलं होतं तेव्हा मी म्हणाले, त्यापेक्षा प्रिन्सेस योग्य आहे. तुझी इच्छा आहे का? तुझ्या आईला उपकार वाटतील याची मला खात्री आहे. ती खरोखर अतिशय सुरेख, मोहक मुलगी आहे. काही झालं तरी ती अगदी सामान्य मुलगी नाही.'

'निश्चितच नाही' निकोलाय म्हणाला. त्या कल्पनेने जणू तो चिडला होता. 'माझ्याविषयी म्हणाल तर मी सैनिक आहे. मी कुणावर सक्ती करीत नाही. जे मिळेल त्याला ना म्हणत नाही.'—आपण काय म्हणतो आहोत याचा विचार करण्यापूर्वीच तो बोलला.

'मग ही गोष्ट लक्षात ठेव. थट्टेवारी नेऊ नकोस.'

'पण हे कसं शक्य आहे?'

स्वतःशीच बोलल्यागत गव्हर्नरची पत्नी म्हणाली, 'तेही बरोबरच आहे. तुला एक सांगायचं आहे. त्या सुंदर बाईशी तू फारच सलगीनं वागत होतास. खरं तर मला तिच्या नवऱ्याची दया आली.'

'आम्ही दोघेही चांगले मित्र आहोत.' निकोलाय भाबडेपणाने म्हणाला. आपण मजेत वेळ घालवीत असताना दुसरा कोणी त्रस्त होत असेल याची त्याला कधीच कल्पना आली नव्हती.

जेवताना निकोलायच्या मनात आले, 'मी गव्हर्नरच्या पत्नीबरोबर किती मूर्खासारखा वरळत होतो! ती खरोखरच लग्न जुळवू लागेल. मग सोन्याचं काय?'

समारंभाच्या दुसऱ्या दिवशी गव्हर्नरची पत्नी मादाम माल्विन्त्सेव्हला भेटायला आली. आपल्या योजना तिला सांगून ती म्हणाली, 'प्राप्त परिस्थितीत औपचारिक वाङ्निश्चयाचा

विचार करायला नको. तरीसुद्धा आपण या दोन तरुण माणसांना एकत्र आणू म्हणजे ती एकमेकांचा परिचय करून घेतील. ' मावशीची त्या योजनेला संमती मिळताच गव्हर्नरची पत्नी प्रिन्सेस मार्याजवळ रोस्तॉफबद्दल बोलू लागली. त्याची स्तुती करू लागली. प्रिन्सेसचे नाव ऐकताच तो कसा लाजला ते सांगू लागली. तेव्हा प्रिन्सेस मार्याला आनंद न वाटता दुःख झाले. तिचा आंतरिक सुसंवाद नष्ट झाला. पुन्हा एकदा तिच्या अंतःकरणात आशा-आकांक्षा, संशय निर्माण झाले. ती स्वतःला दोष देऊ लागली.

रोस्तॉफने भेट दिली त्यापूर्वी दोन दिवस त्याच्याशी आपण कसे वागावयाचे याचा विचार प्रिन्सेस मार्या सारखा करीत होती. एकदा तिला वाटे तो मावशीला भेटायला आला म्हणजे आपण दिवाणखान्यात जाऊच नये. आपण सुतकात असताना पाहुण्यांची भेट घेणे योग्य होणार नाही. पण त्याने आपल्यावर केलेले उपकार लक्षात घेता असे वागणे उद्धटपणाचे होईल, आपली मावशी आणि गव्हर्नरची पत्नी ह्यांनी आपल्या आणि रोस्तॉफच्या विरुद्ध कसलातरी बेत आखला आहे अशी कल्पना तिच्या मनात येऊन जाई. त्यांचे शब्द ऐकल्यावर व दृष्टिक्षेप पाहिल्यावर हा संशय बळावे. आपण स्वतः दुराचरणी असल्याने त्यांच्याबाबत असा हा विचार करतो आहोत असे ती स्वतःला बजावू लागे. आपण अजूनही सुतकात आहोत अशा वेळी लग्न जुळविले तर आपला आणि आपल्या वडिलांच्या स्मृतीचा अपमान होईल याची जाणीव त्या दोघींना झाली नसेल असे तिला वाटत नसे. रोस्तॉफला भेटावे लागले तर आपले आणि त्याचे कोणते संभाषण होईल याची ती कल्पना करू लागली. कधी तिला आपल्या संभाषणातले शब्द अकारण तुसडे वाटू लागत तर दुसऱ्या क्षणीच त्या शब्दात वाजवीहून अधिक अर्थ व्यक्त होत आहे असे तिला वाटे. त्याला पाहताच आपण खात्रीने संकोचणार आणि आपल्या भावना अव्यक्त राहणार नाहीत या विचाराने ती धास्तावून गेली.

रविवारी सकाळी प्रार्थना आटोपल्यानंतर दिवाणखान्यात येऊन नोकराने काउंट रोस्तॉफ आल्याची वर्दी दिली, तेव्हा प्रिन्सेस जराही गोंधळली नाही. मात्र तिच्या गालावर सौम्य लाली चढली, डोळ्यांत वेगळेच तेज चमकले.

रोस्तॉफने दिवाणखान्यात प्रवेश केला तेव्हा त्याला मावशीची विचारपूस करायला वेळ द्यावा म्हणून की काय प्रिन्सेसने लागलीच नजर खाली वळवली. ज्या क्षणी तिला बघण्यासाठी निकोलायने मान वळवली त्याच क्षणी तिने मान उचलली. त्याच्या डोळ्यांना तिचे सुंदर चमकते डोळे मिळाले. आदबशीर, रुबाबदार, सुंदर हालचाल करीत ती उठली. तिच्या ओठावर मधुर स्मित होते. तिने आपला नाजूक मुलायम हात पुढे धरला.

दिवाणखान्यात असलेली बूरिअनबाई तिच्याकडे संभ्रमित, चकित होऊन पाहू लागली. बूरिअनबाई प्रणयचेष्टित करण्यात निष्णात होती. पण तिलादेखील इतक्या चांगल्या तऱ्हेने प्रियकराला भुलविता आले नसते.

' तिला काळा पोशाख फारच शोभून दिसत आहे. कदाचित ती खरोखरीच सुंदर दिसू

लागली असेल आणि माझ्या ते ध्यानात आले नसेल. या सौंदर्याखेरीज तिच्याकडे कौशल्य व सहजसुंदरतादेखील आहे' बूरिअनबाईला वाटले.

त्या क्षणी प्रिन्सेस मार्या विचार करू शकली असती तर तिला आपल्यात घडलेल्या बदलाचे आश्चर्य बूरिअनबाईहून अधिक वाटले असते. त्या प्रिय चेहऱ्यावर तिची नजर गेली त्या क्षणापासून तिचा ताबा नव्या जीवनोत्साहाने घेतला आणि तो तिला स्वतःच्या मनाविरुद्ध बोलायला आणि वागायला भाग पाडीत आहे असे वाटू लागले. रोस्तॉफने दिवाणखान्यात प्रवेश केला तेव्हापासून तिची मुद्रा बदलून गेली होती. चित्रे कोरलेल्या आणि रंगविलेल्या आकाशकंदिलामध्ये ज्योत पेटवली म्हणजे भरभरीत अंधाऱ्या आणि अर्थहीन जागेत मुलायम, गुंतागुंतीची कलाकुसर अनपेक्षितपणे दिसते आणि अलौकिक शोभा प्रत्ययास येते, तशी प्रिन्सेस मार्याची मुद्रा पालटून गेली. आतापर्यंत तिने अनुभवलेल्या सर्व विशुद्ध, पारमार्थिक, आंतरिक वेदना तिच्या मुद्रेवर उमटल्या. तिच्या अंतरात्म्याने केलेली सर्व साधना, तिने केलेली स्वतःची निंदा, तिच्या वेदना, सद्‌गुणांची जोपासना, तिची सोशिकता, प्रीतिभावना, आत्मसमर्पण ह्या सर्व गोष्टी आता तिच्या उजळलेल्या नेत्रांतून, मुलायम स्मितातून आणि मुद्रेवर झळाळून दिसत होत्या.

तिच्या सर्व आयुष्याचे ज्ञान असल्यागत रोस्तॉफला त्या सर्व गोष्टी कळून चुकल्या. आजवर भेटलेल्या कोणत्याही व्यक्तीपेक्षा सर्वस्वी वेगळ्या आणि त्याहून, एवढेच नव्हे तर आपल्याहूनही खूप श्रेष्ठ असलेल्या व्यक्तीच्या सहवासात आपण आहोत असे त्याला वाटले.

अतिशय साध्या क्षुल्लक विषयांवर ते बोलत होते. युद्धाबद्दल बोलताना इतरांप्रमाणे तेही नकळत युद्धातील दुःखाची अतिशयोक्ती करीत बोलू लागले. मग निकोलायने विषय बदण्याचा प्रयत्न केला. गव्हर्नरची दयाळू पत्नी निकोलाय आणि प्रिन्सेस मार्या यांचे नातेवाईक यांविषयी ते बोलू लागले.

प्रिन्सेस मार्या आपल्या भावाबद्दल काही बोलली नाही. तिच्या मावशीने प्रिन्स आन्द्रेचा उल्लेख करताच तिने विषय बदलला. रशियावरील संकटावर ती उसने अवसान आणून बोलू शकत होती. परंतु तिचा भाऊ तिला इतका प्रिय होता की त्याच्याविषयी वरवर बोलणे तिला शक्य नव्हते आणि ती बोललीही नाही. निकोलायचा सूक्ष्म निरीक्षणाबद्दल कधी लौकिक नव्हता पण त्याच्या ही गोष्ट लक्षात आली. प्रिन्सेस मार्याच्या स्वभावातील सर्व छटा त्याच्या ध्यानात आल्या. ती अलौकिक गुण असलेली स्त्री आहे याची त्याला खात्री पटली.

सुतकात असल्यामुळे प्रिन्सेस मार्या उच्चभ्रूंच्या बैठकीला जाणार नव्हती. त्या लोकांत पुनश्च मिसळणे योग्य नव्हे असे निकोलायला वाटले, परंतु गव्हर्नरच्या पत्नीने लग्न जमविण्याची चिकाटी सोडली नव्हती. प्रिन्सेस मार्याने निकोलायची स्तुती कशी केली होती ते तिने निकोलायला सांगितले. आणि प्रिन्सेस मार्याला निकोलायने काढलेले स्तुतिपर उद्‌गार ऐकविले. रोस्तॉफने स्वतः प्रिन्सेस मार्याशी लग्नासंबंधी बोलावे असा तिने आग्रह धरला. ह्या उद्देशाने तिने सकाळच्या प्रार्थनेनंतर बिशपच्या घरी त्या दोघांची भेट होईल अशी व्यवस्था केली.

आपण प्रिन्सेस मार्याला कसल्याही प्रकारचा शब्द देणार नाही असे रोस्तॉफने सांगितले तरीही त्याने तिथे येण्याचे मान्य केले. सोन्याला आपण वचन दिलेले असताना प्रिन्सेस मार्या-जवळ प्रेमभावना व्यक्त करणे नीचपणाचे होईल असे त्याला वाटू लागले.

बाह्यतः त्याचा जीवनक्रम पूर्वीसारखा राहिला तरीही प्रिन्सेस मर्याला भेटून आल्यानंतर त्याला पूर्वीच्या सुखाची ओढ राहिली नाही. तो आता सारखा तिचाच विचार करू लागला. शिष्ट समाजातील मुलींबद्दल त्याला जे वाटायचे ते त्याला प्रिन्सेस मार्याबद्दल मुळीच वाटत नव्हते. सोन्याच्या विचारासरशी कितीतरी काळ त्याच्या मनात उत्साह संचारत असे. तसेही आता घडत नसे. प्रांजल मनाच्या तरुणाला जवळजवळ प्रत्येक तरुण मुलगी आपली पत्नी होईल असे वाटते, तसे त्याला तेव्हा वाटायचे. तो मनोमन वैवाहिक जीवनातील तिची रूपे पाहायचा. सकाळी घातलेला पांढरा गाऊन, समोव्हारच्या मागे उभी असलेली पत्नी, तिची घोडागाडी, मुलेबाळे, ममा आणि पपा, त्याचा आवडत्या पत्नीबद्दल दृष्टिकोण, ह्या आणि अशा गोष्टी तो मनात आणायचा. भविष्यकाळाच्या ह्या स्वप्नांनी तो सुखावून जाई. जिच्याशी त्याचा आता वाङ्निश्चय ठरविण्याचा प्रयत्न होत होता त्या प्रिन्सेस मार्यासंबंधी विचार त्याच्या मनात आले तरी तो भावी वैवाहिक जीवनाचे चित्र रंगवू शकत नव्हता. त्याने तसा प्रयत्न केला तरी ते चित्र त्याला असंबद्ध आणि खोटे वाटू लागे. त्यामुळे तो भयभीत मात्र होई.

बोरोदीनो येथे लढाई होऊन आपली खूप मनुष्यहानी झाली आणि खूपजण घायाळ झाले ही भयंकर बातमी आणि मॉस्कोचा पाडाव झाला ही त्याहूनही भयंकर बातमी सप्टेंबरच्या मध्याला व्हॉरोनेश येथे पोचली. आपला भाऊ जखमी झाल्याचे प्रिन्सेस मार्याला वर्तमानपत्रा-तून कळले; त्यासंबंधी निश्चित बातमी काही कळली नाही. त्याला शोधण्यासाठी ती प्रवासाची तयारी करीत होती.

बोरोदीनोची लढाई आणि मॉस्कोचा पाडाव याबद्दलच्या वार्ता कळताच रोस्तॉफला निराशा वाटली नाही, संताप आला नाही, सूड घ्यावा असे वाटले नाही अगर अशा प्रकारची दुसरी कसलीही भावना त्याच्या मनात निर्माण झाली नाही. मात्र एकाएकी व्हॉरोनेश येथील सर्व गोष्टींबद्दल त्याला उदासीनता आणि उद्वेग वाटू लागला. त्याची विवेकबुद्धी त्याला टोचू लागली आणि तो अस्वस्थ झाला. आतापर्यंत ऐकलेले सर्व बोलणे अप्रामाणिक आहे असे त्याला वाटू लागले. सर्व घटनांचा अर्थ कसा लावावा हे त्याला कळेना. रेजिमेंटमधेच आता सर्व गोष्टी स्पष्ट होतील असे त्याला वाटले. घोडयांची खरेदी तो घाईघाईने संपवू लागला. काही कारण नसता तो नोकरांवर व क्वॉर्टरमास्टरवर चिडू लागला.

रशियन फौजांनी मिळवलेल्या विजयाप्रीत्यर्थ खास प्रार्थना-समारंभ चर्चमधे झाला. रोस्तॉफ तिथून निघण्यापूर्वी कितीतरी दिवस आधी झालेल्या त्या समारंभाला गेला होता. तो गव्हर्नरच्या

मागे थोड्या अंतरावर उभा होता. प्रार्थना संपत आली तेव्हा गव्हर्नरच्या पत्नीने त्याला खुणेने आपल्याकडे बोलावले.

गायकवृंदाच्या मागे काळ्या पोशाखातील एका स्त्रीच्याकडे हात करून ती म्हणाली, 'प्रिन्सेसला पाहिलंस का ?'

हॅट घातलेल्या प्रिन्सेस मार्याच्या एका बाजूने दिसलेल्या चेहऱ्याच्या दर्शनाने नव्हे तर त्याच्या अंतःकरणात एकाएकी उद्‌भवलेल्या लज्जा, उत्कंठा, विस्मय आणि करुणा या भावनांमुळे त्याला तिची ओळख पटली. स्वतःच्या विचारात मग्न झालेली प्रिन्सेस मार्या चर्चमधून जाण्यापूर्वी क्रूसाची खूण करीत होती.

निकोलाय चकित होऊन तिच्या चेहऱ्याकडे बघत राहिला. त्याने पूर्वी पाहिला होता तोच तो चेहरा होता. त्यावर पूर्वीसारखाच सुसंस्कृत, आंतरिक आध्यात्मिक वेदनेचा भाव उमटलेला होता. त्यावर उमटणारा दुःख, प्रार्थना आणि आशा यांचा भाव चटका लावणारा होता. त्याने गव्हर्नरच्या पत्नीच्या आग्रहाची वाट पाहिली नाही. चर्चमधे तिच्याशी बोलणे योग्य होईल का हेही त्याने स्वतःला विचारले नाही; तिच्याशी पूर्वी तो ज्या सहजतेने वागला होता त्याच सहजतेने तो तिच्याकडे गेला आणि म्हणाला, 'तुमच्यावर कोसळलेल्या संकटाबद्दल मी ऐकले. ते ऐकून मी अतिशय व्यथित झालो आहे.' त्याचे शब्द कानी पडताच तिची मुद्रा उजळली. तिचा आनंद आणि तिचे दुःख ही एकाच वेळी व्यक्त झाली.

रोस्तॉफ म्हणाला, 'प्रिन्सेस, मला तुला एक सांगायचं आहे. प्रिन्स आन्द्रे निकोलोविच हयात नसता तर, तो कर्नल असल्यानं, त्याचं नाव लागलीच गॅझेटमधे जाहीर झालं असतं.'

प्रिन्सेसला त्याचे शब्द कळले नाहीत. तिने त्याच्याकडे पाहिले आणि त्याच्या मुद्रेवरील सहानुभूतीने तिच्या मनाला दिलासा मिळाला.

'तुकडा उडून जखम झाली तर सैनिक लागलीच मरतो. नाहीतर ती जखम अगदी किरकोळ असते. मला अशी बरीच उदाहरणं माहीत आहेत. हातबॉम्बचे तुकडे उडाले होते असं वर्तमानपत्रात मी वाचलं होतं. चांगलं निष्पन्न होईल अशी आपण आशा करू या. मला खात्री आहे—'

प्रिन्सेस मार्याने त्याला पुढे बोलू न देता म्हटले, 'आमच्यावर इतका भयंकर...' उत्कट भावनेने पुढचे शब्द तिच्या तोंडून बाहेर पडले नाहीत. त्याच्याकडे कृतज्ञतापूर्वक कटाक्ष टाकून ती आपल्या मावशीच्या मागोमाग निघाली.

त्या संध्याकाळी निकोलाय कुठे बाहेर गेला नाही. घोडे विकणाऱ्यांचा हिशेब पुरा करण्यासाठी तो घरीच राहिला. त्याचे काम पुरे झाले तेव्हा कुठे बाहेर जायला उशीर झाला होता. झोपी जायला बराच वेळ असल्याने निकोलाय कितीतरी वेळ खोलीतल्या खोलीत येरझारा घालीत कधी नव्हे तो आपल्या जीवनाबद्दल विचार करू लागला.

बॉगुचेरॉव्हो येथे त्याने प्रिन्सेस मार्याला पाहिले होते तेव्हाच त्याचे मत तिच्याबद्दल फार चांगले झाले होते. त्या वेळी तो तिला किती चमत्कारिक परिस्थितीत भेटला होता. कधीतरी

त्याच्या आईने ती श्रीमंत वारस असल्याने तिला आपली सून म्हणून ठरवून ठेवली होती. ह्या दोन गोष्टींमुळे त्याला तिच्याबद्दल विशेष ओढ निर्माण होऊ लागली होती. व्होरोनेझला असताना तिच्याविषयी झालेल्या अनुकूल मताचे आता केवळ आनंददायीच नव्हे तर अत्युत्कट ओढीत रूपांतर झाले होते. आता तिच्या अंतःसौंदर्याने तो प्रभावित झाला.

त्या दिवशी सकाळी तो चर्चमधे प्रिन्सेस मार्याला भेटला तेव्हा तिची भेट आपल्याला वाटले होते त्यापेक्षा कितीतरी खोलवर अंतःकरणात जाऊन राहणार आहे आणि आपल्या मनःशांतीला आवश्यक आहे याची त्याला जाणीव झाली.

तिची फिकट, हळुवार आणि विषण्ण मुद्रा, तिचे उजळलेले डोळे, तिच्या नाजुक सहजसुंदर हालचाली, त्याहीपेक्षा तिच्या अंगप्रत्यंगांतून व्यक्त होणारे हळुवार खोल दुःख यांमुळे तो बेचैन झाला आणि त्याला तिच्याबद्दल सहानुभूती वाटू लागली.

तो स्वतःशीच म्हणू लागला, 'ही मोठी विलक्षण मुलगी असली पाहिजे. खरोखर देवदूत असली पाहिजे! मी स्वतंत्र असतो तर किती बरं झालं असतं. सोन्याला वचन देण्यात मी केवढी घाई केली.' नकळत त्याचे मन दोघींची तुलना करू लागले. आपण स्वतंत्र असतो तर काय घडले असते, आपण कशा तऱ्हेने तिला मागणी घातली असती आणि कशा तऱ्हेने ती आपली पत्नी झाली असती याबद्दलच्या कल्पना त्याच्या मनात येऊ लागल्या. छे छे, तो अशा कल्पना करू शकत नव्हता. त्याचे मन एकदम भयभीत झाले, त्याने रंगविलेले चित्र स्पष्ट आकार घेईना. त्याने यापूर्वीच सोन्याला पत्नी कल्पून भविष्याचे स्वप्न रेखाटले होते. ते स्वप्न अगदी सरळ साधे होते. याचे कारण त्याने स्वतःला फसविण्यासाठी ते स्वप्न बनवले होते आणि त्याला सोन्याची सगळी माहिती होती हे होय. प्रिन्सेस मार्यावर त्याचे केवळ प्रेम होते. तिला तो जाणू शकला नव्हता. म्हणून तो तिच्याबद्दलची भावी स्वप्ने रेखाटू शकत नव्हता.

त्याने सोन्यासंबंधी बाळगलेल्या स्वप्नात आनंद होता. परंतु प्रिन्सेस मार्यासंबंधी स्वप्ने बाळगणे नेहमीच कठीण होते, काहीसे भयावह होते. 'मला जे हवं आहे त्यासाठी मी का प्रार्थना करू नये? मला हवं आहे तरी काय? सोन्यापासून सुटका, स्वातंत्र्य, तिच्याशी लग्न केलं तर दुःखाखेरीज काही निष्पन्न होणार नाही...गुंतागुंत...शोकाकुल ममा...आमची परिस्थिती...आर्थिक संकट...भयानक गंडांतर...शिवाय माझं तिच्यावर प्रेमही नाही. खऱ्या अर्थानं मला ती आवडत नाही.' त्याचे डोळे अश्रूंनी भरलेले होते आणि गळ्यात आवंढा आला होता.

'गव्हर्नरचं पत्र घेऊन जासूद आला आहे.' लाव्रुश्काचा आवाज झोपेत असल्यासारखा होता.

निकोलायने दोन्ही पत्रे घेतली. एक त्याच्या आईने पाठवलेले होते, दुसरे सोन्याचे. हस्ताक्षरांवरून त्याने ती ओळखली. त्याने प्रथम सोन्याचे पत्र फोडले. त्याने थोड्याशा ओळी वाचल्या तोच त्याचा चेहरा पांढराफटक पडला. त्याचे डोळे निराशेने आणि आनंदाने विस्फारले.

आपले स्वातंत्र्य बद्ध करणारी गाठ सोडवता येणे अशक्य आहे असे त्याला वाटत होते पण ती गाठ सोन्याकडून आलेल्या अनपेक्षित आणि ( निकोलायच्या मते ) अनाहूत पत्राने तोडून टाकली होती.

तिने लिहिले होते, ' अलीकडे दुर्दैवी घटना घडल्या. मॉस्को येथील रोस्तॉफकुटुंबाची बहुतेक सगळी मालमत्ता नष्ट झाली. तू प्रिन्सेस बोलकॉन्स्कीशी लग्न करावंस अशी इच्छा काउंटेस वारंवार व्यक्त करीत असते. आताशा तू मौन पाळलं आहेस, उदासीन आहेस. ह्या सगळ्याचा विचार करून मी तुला तू मला दिलेल्या वचनातून मुक्त करण्याचे व :तुला पूर्ण स्वातंत्र्य देण्याचं ठरवलं आहे.

' ज्या कुटुंबाने मला अतिशय उपकृत केलं आहे. त्या कुटुंबाच्या दुःखाला आणि भांडणाला मी कारणीभूत झाले आहे ह्या विचाराने मला अत्यंत दुःख होईल. ज्यांच्यावर माझे प्रेम आहे ती माणसे सुखात राहावीत हा माझ्या प्रेमाचा एक उद्देश आहे. निकोलाय, म्हणून मी तुला विनंती करीत आहे. तू स्वतंत्र आहेस असे समज, काही असले तरी तुझ्यावर माझ्यापेक्षा कोणी अधिक प्रेम करणार नाही हे विसरू नकोस हीच तुला विनंती आहे.

तुझी

सोन्या. '

दुसरे पत्र काउंटेसने पाठविले होते. त्या पत्रात तिने मॉस्कोमधील अखेरचे दिवस, तिथून केलेले प्रयाण, जाळपोळ आणि सर्व मालमत्तेची झालेली हानी यांबद्दल लिहिले होते. आपल्या-बरोबर प्रवास करणाऱ्या अनेक जखमी सैनिकांमधे प्रिन्स आन्द्रे असल्याचेही तिने कळवले होते. अजून त्याचा आजार गंभीर होता पण आता डॉक्टरांना बरीच आशा वाटत होती. सोन्या आणि नताशा त्याची शुश्रूषा करीत होत्या.

हे पत्र घेऊन दुसऱ्या दिवशी निकोलाय प्रिन्सेस मार्याच्या भेटीला गेला. ' नताशा त्याची शुश्रूषा करीत आहे ' या शब्दातील अभिप्रेत अर्थाबद्दल निकोलायने अगर तिने एक चकार शब्द उच्चारला नाही. पण ह्या पत्रामुळे एक फायदा झाला. निकोलाय आणि प्रिन्सेस मार्या यांमधे नात्यातील माणसांत निर्माण होते तसे दृढ स्नेहबंधन एकाएकी निर्माण झाले.

सोन्याने निकोलायला लिहिलेले पत्र जणू त्याच्या प्रार्थनेला मिळालेला साद होता. सोन्याने ते पत्र ट्रॉइट्सा येथे लिहिले होते. ते पत्र लिहायला पुढीलप्रमाणे परिस्थिती कारणीभूत झाली. निकोलायचे लग्न एखाद्या श्रीमंत वारस कन्येशी करायचे या कल्पनेचा ध्यास थोरल्या काउंटेसने घेतला आणि तो वाढतच राहिला. ह्या अशा लग्नाच्या मार्गात सोन्याची मोठी अडचण आहे हे तिला ठाऊक होते. सोन्याचे जीवन आताशा–विशेषतः निकोलायने बॉगुचेरॉव्हो येथे आपली प्रिन्सेस मार्याशी भेट झाल्याचे लिहिल्यानंतर–थोरल्या काउंटेसच्या घरी

अधिकाधिक खडतर बनत होते. सोन्यासंबंधी निर्दय, अपमानकारक उल्लेख करण्याची एकही संधी थोरली काउंटेस सोडत नव्हती. भोवतालच्या घटनांमुळे निराश झालेल्या, शिणलेल्या थोरल्या काउंटेसने मॉस्कोहून बाहेर पडण्यापूर्वी काही दिवस आधी सोन्याला बोलावून घेतले. तिने सोन्याला कसला आग्रह केला नाही की छेडले नाही. डोळ्यांत अश्रू आणून तिने तिला विनविले, 'तुझ्यासाठी आम्ही जे केलं त्याची परतफेड तू त्यागानं कर. निकोलायशी ठरलेला वाङ्‌निश्चय मोडून टाक. तसं करण्याचं तू वचन देईपर्यंत माझ्या मनाला शांती मिळणार नाही.'

उन्मादवायू झाल्यागत सोन्याने हुंदके देत देत म्हटले, 'मी वाट्टेल ते करीन. कोणत्याही गोष्टीसाठी मी तयार आहे.' परंतु तिने उघड उघड वचन दिले नाही. थोरल्या काउंटेसने जे मागितले होते ते देण्यासाठी तिचे मन तयार होत नव्हते. ज्या कुटुंबाने तिला वाढवले, तिचे पालनपोषण केले त्या कुटुंबाच्या सुखासाठी तिला आत्मत्याग करावा लागणार होता. इतरांसाठी स्वार्थत्याग करणे सोन्याच्या प्रकृतीत होते. त्या कुटुंबातील तिचे स्थान असे होते की, ती केवळ त्याग करूनच आपले सद्‌गुण सिद्ध करू शकत होती. त्याग तिच्या अंगवळणी पडला होता, तिला त्यागात गोडी वाटत होती. आजपर्यंत केलेल्या प्रत्येक स्वार्थत्यागाच्या कृतीने इतरांच्या आणि आपल्या स्वतःच्या दृष्टीने आपली योग्यता आपण वाढवीत आहोत, ज्याच्यावर प्राणांपलीकडे आपले प्रेम आहे त्या निकोलायसाठी आपण अधिकाधिक पात्र ठरत आहोत अशी सुखद जाणीव तिला होत असे. आताचा तिचा त्याग म्हणजे आजवरच्या तिच्या स्वार्थत्यागाचे एकमेव बक्षीस आणि तिच्या जीवनाचा समग्र अर्थ यांचा त्याग ठरणारा होता. आपला केवळ छळ करण्यासाठी म्हणून ह्या माणसांनी आपल्यावर मेहेरबानी केली असे वाटून तिला आयुष्यात प्रथमच ती माणसे शत्रू वाटू लागली. अशा प्रकारचा अनुभव जिच्या वाट्याला आला नाही, जिला कधीही त्याग करण्याची गरज पडली नाही, जिने इतरांना आपल्यासाठी त्याग करायला लावले आणि तरीही प्रत्येकाला जी आवडत होती त्या नताशाबद्दल तिला मत्सर वाटू लागला. निकोलायवर असलेल्या आपल्या मूक, निर्मळ प्रीतीतून सर्व तत्त्वे, सद्‌गुण आणि धर्म यांहून उच्चतर असलेली एक उत्कट भावना वाढीला लागते आहे असे सोन्याला प्रथमच जाणवू लागले. परावलंबी जीवनाने नकळतच आतल्या गाठीची बनलेल्या सोन्याने त्या भावनेच्या प्रभावाखाली काउंटेसला अस्पष्ट, संदिग्ध उत्तरे दिली. तिच्याशी बोलायचे टाळले. निकोलायची भेट घेण्याचे तिने ठरवले आणि त्याला मोकळीक देण्याऐवजी कायमचा आपल्याशी जखडून ठेवण्याचा तिने निश्चय केला.

रोस्तॉफकुटुंबाचे मॉस्कोतील शेवटचे दिवस धामधुमीत व धास्तीत गेले होते. सोन्याच्या मनावर दडपण आणणारे उदास विचार त्यामुळे घुसमटून गेले होते. व्यावहारिक गोष्टींत गुंतून त्यापासून सुटका करता आली म्हणून तिला आनंद वाटला. आपल्या घरातच प्रिन्स आन्द्रेचा मुक्काम आहे हे तिला कळले. प्रिन्स आन्द्रे आणि नताशाबद्दल तिला खरोखरीच करुणा वाटली, तरीही निकोलायपासून आपली ताटातूट होऊ नये अशी ईश्वरेच्छा आहे अशा आनंदी आणि अंधश्रद्धाळू भावनेने तिच्या मनाचा कबजा घेतला.

नताशाचे प्रिन्स आन्द्रेखेरीज दुसऱ्या कुणावर प्रेम नाही आणि ते प्रेम कधीही कमी झालेले नाही हे तिला ठाऊक होते. आजच्या अशा भयंकर स्थितीत एकत्र आल्यावर ती दोघे एकमेकांवर पुन्हा प्रेम करू लागतील असे तिला वाटू लागले. रूढ ख्रिश्चन धर्ममतानुसार-त्यांच्यामधे असलेल्या नात्यानुसार त्यांना–म्हणजे निकोलाय व मार्या यांना–लग्न करता येणार नाही हेही तिला ठाऊक होते. मॉस्कोमधील मुक्कामाच्या शेवटच्या दोनतीन दिवसांत तसेच प्रवासाच्या आरंभीच्या दिवसांत खूप भयंकर घटना घडल्या. तरीदेखील आपल्या खाजगी गोष्टीत नियती ढवळाढवळ करीत आहे ह्या भावनेने, ह्या जाणिवेने सोन्या आनंदित झाली.

रोस्तॉफकुटुंबाने प्रवास थांबवून पहिला मुक्काम ट्रॉइट्सा येथील मठात ठोकला.

मठाच्या निवासगृहातील तीन मोठ्या खोल्या रोस्तॉफकुटुंबाला देण्यात आल्या. त्यांतील एक खोली प्रिन्स आन्द्रेला दिलेली होती. जखमी झालेला तो सैनिक आता खूपच सुधारला होता. नताशा त्याच्याजवळ बसून होती. पलीकडील खोलीत काउंट आणि काउंटेस आपल्या जुन्या परिचितांना आणि हितचिंतकांना भेटण्यासाठी आलेल्या प्रमुखाशी मोठ्या अदबीने बोलत होती. सोन्या त्यांच्यामध्ये बसली होती, परंतु प्रिन्स आन्द्रे आणि नताशा काय बोलत असतील या जिज्ञासेने ती हैराण झाली होती.

ती दोघे दरवाजातून येत असताना त्यांचा आवाज ऐकू आला.

प्रिन्स आन्द्रेच्या खोलीचा दरवाजा उघडला. नताशा बाहेर आली. तिच्या मुद्रेवर तिच्या अंतःकरणातील खळबळ उमटली होती. तिला भेटण्यासाठी भिक्षू उठला. त्याने आपल्या उजव्या हाताची रुंद बाही वर सारली. पण त्याच्याकडे लक्ष न देता नताशा सोन्याजवळ गेली आणि तिच्या दंडाला तिने पकडले.

'नताशा, काय चाललं आहे ? इकडे ये बरं,' काउंटेस म्हणाली.

नताशा आशीर्वाद घेण्यासाठी भिक्षूजवळ गेली. भिक्षूने म्हटले, 'मदतीसाठी देवाची आणि आपल्या संतांची प्रार्थना कर.'

भिक्षू तिथून गेल्यानंतर लागलीच नताशाने आपल्या मैत्रिणीचा हात पकडला आणि तिला तिसऱ्या रिकाम्या खोलीत नेले.

ती म्हणाली, 'सोन्या, आता तो वाचेल. सोन्या, मी किती सुखी आहे आणि किती दुर्दैवी! सोन्या, सगळ्या गोष्टी पूर्वीसारख्या आहेत. जर तो सुखरूप राहिला तर...त्याला तसं काही ...शक्य नाही.' नताशाला रडू कोसळले.

'मला माहीत आहे. ईश्वराच्या कृपेनं त्याला काही व्हायचं नाही,' सोन्या पुटपुटली.

आपल्या मैत्रिणीप्रमाणेच सोन्याच्या मनातही खळबळ माजली होती. मैत्रिणीला वाटणारे दुःख आणि भीती, त्याचप्रमाणे तिने आजवर कुणाकडे व्यक्त न केलेले तिचे मनोगत त्या खळबळीला कारणीभूत होते. हुंदके देत, चुंबन घेत तिने नताशाला धीर दिला. 'जर तो सुखरूप राहिला...' तिच्या मनात येत होते.

काही वेळाने प्रिन्स आन्द्रेने घंटा वाजवली. तशी नताशा त्याच्या खोलीत गेली. सोन्याच्या

अंतःकरणात अननुभूत भावनांचा कल्लोळ सुरू झाला. खिडकीशी उभी राहून ती विचित्र घटनेचा विचार करू लागली.

फौजेकडे पत्रे पाठवण्याचा तो दिवस होता. काउंटेसने आपल्या मुलाला पत्र लिहिले.

पत्र लिहिणाऱ्या काउंटेसने जवळून जाणाऱ्या आपल्या भाचीला पाहिले आणि मान वर करून तिला थरथरत्या आवाजात हाक मारली, 'सोन्या, तू निकोलेङ्काला पत्र लिहिणार आहेस ना?' चष्म्याआड असलेल्या तिच्या शिणलेल्या डोळ्यांत सोन्याला तिच्या शब्दाचा सगळा अर्थ उमगला. तिच्या डोळ्यांत विनवणी होती, सोन्याच्या नकाराची धास्ती होती, तिच्याकडे याचना करावी लागते आहे म्हणून शरम होती आणि तिने नकार दिला तर तिला क्षमा न करणाऱ्या द्वेषाची पूर्वतयारी होती.

सोन्याने काउंटेसकडे जाऊन तिच्या हातावर ओठ टेकवले. 'ममा, लिहिते मी पत्र.'

पीएरला चौकीत ठेवण्यात आले. तेथील अधिकारी आणि सैनिक यांनी त्याला शत्रुभावाने पण आदराने वागवले. पीएर कदाचित एखादी वजनदार आसामी असेल, असा त्यांना संशय वाटत होता.

दुसऱ्या दिवशी पहाऱ्याला आलेल्या माणसांना पीएरबद्दल मुळीच ठाऊक नव्हते. त्यांच्या हिशेबी पीएर म्हणजे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हुकमानुसार कसल्यातरी कारणासाठी स्थानबद्ध करण्यात येणाऱ्या रशियन कैद्यांपैकी एक सतरा नंबरचा कैदी. पीएरमधे काही वैशिष्ट्य असलेच तर ते त्याच्या धारदार विचारांच्या निर्भय थाटात होते, फ्रेंचांनाही चकित करणाऱ्या फ्रेंच भाषेवरील प्रभुत्वात होते. असे असूनही तो ज्या खोलीत होता ती खोली एका अधिकाऱ्याला द्यायची होती म्हणून त्याला तिथून काढून पकडून ठेवलेल्या इतर संशयास्पद व्यक्तींबरोबर कोंडून ठेवण्यात आले.

पीएरबरोबर डांबून ठेवण्यात आलेली सर्व रशियन माणसे खालच्या थरातील होती. पीएर वरिष्ठ वर्गातील असल्याचे ओळखून विशेष म्हणजे तो फ्रेंच भाषा बोलतो हे लक्षात घेऊन ती सगळी माणसे त्याच्यापासून दूर राहिली. ती सर्व माणसे आपली थट्टा करीत असल्याचे ध्यानात येऊन पीएर दुःखीकष्टी होई.

सगळ्या कैद्यांवर ( आणि बहुतेक आपल्यावरही ) जाळपोळीबद्दल खटला होणार आहे हे दुसऱ्या दिवशी संध्याकाळी पीएरला समजले. दुसऱ्या दिवशी पीएरला इतर कैद्यांबरोबर एका घरात नेण्यात आले. त्या ठिकाणी पांढऱ्या मिशांचा फ्रेंच जनरल, दोन कर्नल आणि खांद्यावर स्कार्फ टाकलेले इतर फ्रेंच बसले होते.

कैद्याची चौकशी करताना नेहमीच विशेष प्रकारच्या तंतोतंतपणावर व असंदिग्धतेवर भर दिला जातो, त्यामुळे सर्व मानवी कमकुवतपणांवर मात करता येते असे मानले जाते. ह्या

पद्धतीचा अवलंब करून पीएरला व इतरांना प्रश्न विचारले गेले. पीएरला 'तू कोण आहेस? कुठं होतास? कोणत्या उद्देशानं हे केलंस' इत्यादी प्रश्न विचारण्यात आले.

अशा प्रकारचे प्रश्न आपल्याला का विचारताहेत असा पीएरला प्रश्न पडला. आपणाला गुन्हेगार ठरवणे हे चौकशीचे उद्दिष्ट आहे हे पीएरने जाणले. 'तुला पकडलं त्या वेळी तू काय करीत होतास?' असे त्यांनी पीएरला विचारले. तेव्हा पीएरने शोकात्मिकेला अनुरूप शैलीत उत्तर दिले, 'आगीपासून वाचवलेलं मूल त्याच्या आईवडिलांकडे घेऊन जात होतो.' 'सैनिकांबरोबर तू का लढत होतास?' ह्या प्रश्नाला पीएरने उत्तर दिले, 'मी एका स्त्रीला संरक्षण देत होतो. स्त्रीचं अब्रूरक्षण करणं हे प्रत्येकाचं कर्तव्य आहे.' तो आणखी काही बोलू लागला तशी त्याला त्यांनी थांबवले. 'तुझ्या बोलण्याचा मुख्य विषयाशी संबंध नाही.' ते म्हणाले, 'तुला काहींनी पेटणाऱ्या घरात पाहिलं. कोणत्या उद्देशानं तू तिथं गेला होतास?' तो म्हणाला, 'मॉस्कोमधे काय चाललं आहे हे पाहण्यासाठी मी बाहेर पडलो होतो.' पुन्हा त्याला थांबवून ते म्हणाले, 'तू कुठं जात होतास हे आम्ही तुला विचारलं नाही. त्या जाळपोळीच्या ठिकाणी तू कोणत्या उद्देशानं गेला होतास? तू कोण आहेस?' पुन्हा पहिला प्रश्न त्याला विचारला, तशी तो म्हणाला, 'मला याचं उत्तर द्यायचं नाही.' तो पुन्हा एकदा म्हणाला, 'मी ह्या प्रश्नाचं उत्तर देऊ शकत नाही.'

पांढऱ्या मिशा असलेला लालबुंद चेहऱ्याचा जनरल करडेपणाने त्याला म्हणाला, 'तुझं हे वागणं योग्य नव्हे. फार वाईट. तू उत्तरं लिहून दे.'

चौथ्या दिवशी झुबॉव्स्की तटबंदीत आग लागली. क्रिमीडान फोर्डवरील एका व्यापाऱ्याच्या मालकीच्या गाडीच्या तबेल्यामध्ये पीएर व इतर तेरा कैदी यांना ठेवण्यात आले. रस्त्यावरून जाताना पीएरला धुरामुळे धड श्वासोच्छ्वास करता येईना. तो धूर सगळ्या शहराला आच्छादून राहिल्यासारखा दिसत होता. सर्व दिशांनी आगी लागलेल्या दिसत होत्या. मॉस्कोच्या आगीचा अर्थ तेव्हा पीएरच्या ध्यानात आला नाही. भयभीत होऊन तो आगी पाहात होता.

क्रिमिअन फोर्डमधील एका घरामागे असलेल्या तबेल्यात पीएरने आणखी चार दिवस घालवले. त्या चार दिवसांच्या कालावधीत फ्रेंच सैनिकांचे जे बोलणे झाले त्यावरून कैदेत असलेले सगळेजण मार्शल आपले काय करणार आहेत याची दररोज वाट पाहात आहेत हे त्याला कळून चुकले...कुठला मार्शल आपले भवितव्य घडवणार आहे हे त्याला सैनिकांच्या बोलण्यावरून ठरविता आले नाही. सैनिकांच्या दृष्टीने मार्शल म्हणजे सत्तेचे अत्युच्च आणि अद्भुत प्रतीक होता.

आठ सप्टेंबर रोजी कैद्यांच्या त्या तबेल्यात एक अधिकारी आला. सगळ्या कैद्यांवरून

त्याने सुस्त बेफिकीर नजर फिरविली. पहाऱ्यावरील अधिकाऱ्याला हुकूम दिला, ' या कैद्यांना चांगला पोशाख द्या. आणि व्यवस्थित तऱ्हेनं मार्शलसमोर हजर करा. ' तासाभरात सैनिकांची एक तुकडी आली. तेरा कैद्यांबरोबर पीएरला द्वेविची मैदानात नेण्यात आले. हवा सुरेख होती. पाऊस थांबून सूर्यप्रकाश पडला होता, आकाश कधी नव्हे ते निवळले होते. झुबॉव्स्की तट-बंदीतील चौकीतून पीएरला बाहेर काढण्यात आले होते त्या दिवशीप्रमाणे धूर अगदी शहरा-वर ओथंबला नव्हता. धुराचे लोट सरळ वर नितळ वातावरणात जात होते. ज्वालांचा मागमूस नव्हता. मात्र सर्व बाजूंनी वर जाणारे धुराचे लोट दिसत होते. पीएरला मॉस्को शहराचा जेवढा भाग दिसला तो सर्व जळून खाक झाला होता. सर्व ठिकाणे बेचिराख झाली होती, त्यामधे शेगड्या आणि धुराडी काय ती दिसत होती. मधून मधून इमारतीच्या कोळपलेल्या दगडी भिंती दिसत होत्या. मधूनच आगीच्या भक्ष्यस्थानी न पडलेली प्रार्थनामंदिरे दिसत होती.

इव्हान द ग्रेटचा घंटाबुरूज आणि मनोरे असलेली क्रेमलीनची शुभ्र इमारत दूर अंतरावर उठून दिसत होती. जवळ असलेल्या नॉव्हॉ-द्वेविची मठाचा घुमट चकाकत होता. प्रार्थनेसाठी त्या घंटांचा प्रसन्न निनाद होत होता. त्या घंटेमुळे पीएरला आज रविवार आहे, शिवाय कुमारी मातेचा जन्मदिनाचा उत्सव आहे याचे स्मरण झाले. हा सण साजरा करणारी कुणीच माणसे दिसली नाहीत. सर्व बाजूंनी आगीने उद्ध्वस्त झालेला प्रदेश दिसत होता. जी काही रशियन माणसे दिसली ती लक्करात होती, भयग्रस्त होती.

पीएरला इतर कैद्यांसह मठाच्या जवळ असलेल्या द्वेविची कुरणात उजव्या बाजूला नेण्यात आले. मग त्यांना विशाल उद्यान असलेल्या मोठ्या शुभ्र घरात ठेवण्यात आले. ते घर प्रिन्स श्चेर्बॅटॉव्हच्या मालकीचे होते. त्याला भेटण्यासाठी पीएर पूर्वी कितीतरी वेळ त्या घरात गेला होता. त्या घरात आता ड्यूक ऑफ एक्मुल हा मार्शल राहात असल्याचे त्याला सैनिकांच्या बोलण्यावरून कळले.

त्यांना सर्वांना प्रवेशद्वाराशी नेण्यात आले. मग एकेकाला घरात सोडण्यात आले. आत नेण्यात आलेला सहावा कैदी पीएर होता. पीएरला परिचित असलेल्या काचेच्या छपराची गॅलरी, दिवाणखान्याकडे जाणारी लॉबी आणि दिवाणखाना या मार्गाने लांब, बैठ्या खाजगी खोलीत नेले. त्या खोलीच्या दाराशी एक ॲडज्युटंट उभा होता.

दव्हॉउस्ट खोलीच्या एका टोकाला टेबलाशी बसला होता. पीएर त्याच्याजवळ आला. दव्हॉउस्टने नजर वर केली नाही. समोर असलेल्या कागदपत्रांत तो कशाचातरी शोध घेत होता. वर न पाहताच त्याने विचारले, ' कोण आपण ? '

पीएर काही बोलला नाही. पीएरच्या दृष्टीने दव्हॉउस्ट केवळ फ्रेंच जनरल नव्हता. त्याच्या मते दव्हॉउस्ट क्रूरपणासाठी कुप्रसिद्ध होता. प्रत्येक क्षणाला उशिराबद्दल आपले प्राण जातील असे त्याच्याकडे पाहताना पीएरला वाटले. काय उत्तर द्यावे हे त्याला समजेना. पहिल्या चौकशीच्या वेळी दिलेली उत्तरेच पुन्हा द्यायला त्याला धीर होईना. आपले नाव आणि हुद्दा आता प्रगट करण्यात त्याला धोका आणि शरम वाटू लागली. पण त्याला निर्णय घ्यायला

वेळ मिळण्याआधीच दव्हॉउस्टने मान वर केली, चष्मा कपाळावर सारला, डोळे किलकिले करून त्याने पीएरकडे साभिप्राय पाहिले.

'मला हा इसम ठाऊक आहे.' तो रूक्ष स्वरात मोजके शब्द बोलला. पीएरला घाबरवण्याचा त्याचा उद्देश होता. मणक्यातून शहारत गेलेली थंडी आपले डोके गच्च पकडून धरीत आहे असे पीएरला वाटू लागले.

'हा रशियाचा हेर आहे.' दव्हॉउस्टने मधेच खोलीत असलेल्या पण पीएरच्या दृष्टीस न पडलेल्या दुसऱ्या जनरलला उद्देशून मधेच म्हटले आणि पाठ फिरवली. पीएर एकाएकी भरभर बोलू लागला. तेव्हा अनपेक्षितपणे त्याच्या आवाजात कंप आला. 'महाराज,' दव्हॉउस्ट हा ड्यूक आहे याची आठवण एकदम येऊन तो म्हणाला, 'तुम्ही मला ओळखणं शक्य नाही. मी लष्करी अधिकारी आहे. मी मॉस्कोतून बाहेर गेलेलो नाही.'

'तुझं नाव काय?' दव्हॉउस्टने विचारले.

'बेझुहॉव्ह!'

'तू खोटं बोलत नाहीस याला पुरावा काय?'

'महाराज,' पीएरच्या बोलण्यात चीड नव्हती, विनवणी होती.

'तू जे सांगतो आहेस ते सत्य आहे असं तू कसं सिद्ध करणार आहेस?' दव्हाउस्टने थंडपणे विचारले.

पीएरला रॅम्बालची आठवण झाली. त्याने त्याच्या नावाचा, रेजिमेंटचा उल्लेख केला. तो ज्या ठिकाणी सापडेल तो रस्ता व त्या रस्त्यावरील त्याचे घर यांची माहिती दिली.

'तू जी व्यक्ती आपण आहोत म्हणून सांगतो आहेस, ती व्यक्ती तू नाहीस!' दव्हॉउस्ट पुन्हा म्हणाला.

आपण सांगितलेल्या गोष्टी विश्वसनीय असल्याचे पटवून देण्यासाठी पीएर थरथरत्या आवाजात पुरावा देऊ लागला.

तेवढ्यात ॲडज्युटंटने आत येऊन दव्हॉउस्टला काहीतरी सांगितले.

अडज्युटंटने सांगितलेल्या बातमीने दव्हॉउस्टचा चेहरा उजळला. तो आपल्या युनिफॉर्मची बटने लावू लागला. तो पीएरला सर्वस्वी विसरून गेल्याचे वरकरणी वाटत होते. ॲडज्युटंटने त्याला कैद्याची आठवण करून दिली. तेव्हा त्याने पीएरकडे पाहात कपाळाला आठ्या घातल्या, मान हलवली आणि त्याला तेथून घेऊन जायला सांगितले. ते आपल्याला कुठे नेणार आहेत याची पीएरला कल्पना नव्हती. द्येविची मैदानातून येताना बरोबरीच्यांनी पीएरला त्यांचे वधस्थल दाखवले होते. आपणास त्या ठिकाणी किंवा आपल्या पूर्वीच्या तबेल्याकडे नेणार आहेत हे त्याला कळेना.

प्रिन्स श्चेर्बटॉव्हच्या घरातून कैद्यांना बाहेर काढून द्येविची मैदानातून मठाच्या डाव्या

बाजूला नेण्यात आले. तेथून त्यांना बरामागील मळ्यात नेण्यात आले. त्या ठिकाणी एक खांब पुरलेला होता. खांबाजवळ एक मोठा खड्डा खणण्यात आला होता. नुकत्याच खणलेल्या मातीचा ढीग खांबाजवळच होता. खांब व खड्डा याभोवती अधवर्तुळ करून काही लोक उभे होते. त्यात थोडे रशियन व बाकीचे बरेचसे नेपोलिअनचे ड्यूटीवर नसलेले सैनिक होते; शिवाय भिन्न भिन्न गणवेषातील जर्मन, इटालिअन आणि फ्रेंच माणसे होती. त्यांनी निळे गणवेष चढविले होते. त्यांच्या खांद्यावर लाल फिती होत्या, त्यांचे बूट उंच होते आणि त्यांनी लष्करी उंच टोप्या घातल्या होत्या.

यादीत लिहिल्याप्रमाणे विशिष्ट क्रमाने कैद्यांना उभे करण्यात आले. ( पीएरचा क्रमांक सहावा होता ) नंतर त्यांना खांबाकडे नेण्यात आले. त्यांच्या दोन्ही बाजूला आता एकाएकी ड्रम वाजू लागले. त्यांच्या आवाजाने आपल्याकडून आपल्या आत्म्याचा लचका तोडून ओढून नेला जात आहे असे पीएरला वाटले. विचार करण्याची आणि काही समजून घेण्याची शक्तीच तो हरवून बसला. जे भयंकर कृत्य ते करणार आहेत ते त्यांनी जास्तीत जास्त लवकर संपवावे अशी एकच एक इच्छा आता त्याच्या मनात उरली.

स्कार्फ गुंडाळलेला एक फ्रेंच अधिकारी रांगेत असणाऱ्या कैद्यांच्या उजव्या बाजूस आला. त्याने त्यांना रशियन आणि फ्रेंच भाषेत शिक्षा मोठ्याने वाचून दाखविली.

मग अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार दोन फ्रेंच सैनिक कैद्यांजवळ आले. त्यांनी प्रारंभीच्या दोन गुन्हेगारांना धरले. ते दोन्ही गुन्हेगार खांबाजवळ जाऊन थांबले. अंगावर येणाऱ्या शिकाऱ्याकडे कोंडीत सापडलेले हिंस्र जनावर पाहते त्याप्रमाणे ते दोघे काही न बोलता भोवती पाहू लागले. एक क्रूसची खूण जुळवीत राहिला. दुसरा पाठ खाजवीत होता. त्याच्या ओठांच्या हालचालीमुळे तो हसतो आहे असे वाटू लागले. सैनिकांनी घाईघाईने त्यांच्या डोळ्यांवर पट्ट्या बांधल्या, त्यांच्या डोक्यात पोती घातली आणि त्यांना खांबाला बांधून टाकले.

अचूक नेमबाजी करणारे बारा सैनिक बंदुका घेऊन रांगेतून बाहेर आले. डौलात व्यवस्थित पावले टाकीत ते खांबापासून आठ पावलांवर थांबले. पुढे घडणारे बघवणार नव्हते म्हणून पीएरने पाठ फिरवली. एकाएकी धडाड्धूम आवाज झाला. तो पीएरला ढगांच्या गडगडाटापेक्षाही प्रचंड वाटला. त्याने वळून पाहिले. धुराचा लोट उठला होता. त्यामधे थरथरत्या हातांनी पांढऱ्याफटक चेहऱ्याचे फ्रेंच सैनिक काहीतरी करताना दिसले. दुसऱ्या दोन कैद्यांना नेण्यात आले ते दोघेही पूर्वीच्या कैद्यांप्रमाणे प्रत्येकाकडे मूकपणे पाहू लागले. त्यांच्या डोळ्यांत संरक्षणासाठी याचना होती पण तिचा उपयोग होत नव्हता. काय घडणार आहे हे त्यांना कळत नव्हते, त्यावर त्यांचा मुळीच विश्वास बसत नव्हता. त्यांचा विश्वास बसत नव्हता याचे कारण आपले जीवन आपणास किती मोलाचे आहे हे त्यांनाच फक्त ठाऊक होते. त्यामुळे आपले जीवन कोणी नष्ट करील हे त्यांच्या ध्यानात आले नव्हते आणि त्यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता.

पीएरने तिकडे न पाहण्याचा प्रयत्न केला आणि पुन्हा पाठ फिरवली, परंतु पुन्हा भयंकर

कानठळ्या बसवणारा आवाज झाला. आवाज ऐकल्यानंतर धूर, रक्त आणि खांबाजवळ काहीतरी करीत असलेले, एकमेकांच्या थरथरत्या हातांमुळे अडखळणारे, फिकट भयभीत मुद्रेचे सैनिक त्याला दिसू लागले. पीएरचा श्वासोच्छ्वास वेगाने होऊ लागला. भोवताली पाहणारा पीएर विचारू लागला. ह्या साऱ्याचा अर्थ काय? त्याला प्रत्येकाच्या नजरेत हाच प्रश्न दिसू लागला. रशियन, फ्रेंच सैनिक व अधिकारी ह्या सर्वांच्या मुद्रेवर त्याला आपल्या अंतःकरणाला हेलावून दुःख, भीती आणि संघर्ष यांचे दर्शन झाले. ' खरोखर हे सारे कोण घडवून आणीत आहे? माझ्याप्रमाणे ह्या सर्वांना वेदना होताहेत. कोण आहे यामागे? ' पीएरच्या मनात क्षणभर हे प्रश्न तरळून गेले.

' ८६ क्रमांकाच्या तुकडीतील नेमबाज सैनिक, पुढे कूच करा. ' कोणीतरी ओरडला. पीएरच्या शेजारी असलेल्या पाचव्या कैद्याला नेण्यात आले—एकट्यालाच नेण्यात आले. आपण वाचलो आहोत, आपणाला व बाकीच्या सगळ्यांना ह्या ठिकाणी केवळ देहान्तशिक्षेसाठी आणले आहे हे पीएरच्या ध्यानातच आले नाही. त्याला आनंद होत नव्हता, सुटकेचे सुख वाटत नव्हते, त्याच्या मनातली भीती सारखी वाढत होती आणि तशा अवस्थेत समोर जे चालले होते ते तो पाहात होता. पाचवा कैदी पायघोळ झगा घातलेला कारखान्यातला कामगार होता. सैनिकांनी त्याला स्पर्श करताच तो भयभीत होऊन पीएरच्या रोखाने धावला आणि त्याने पीएरला गच्च पकडले. (पीएरचा थरकाप झाला. त्याने त्याला आपल्यापासून दूर लोटले ) त्या कामगाराला चालता येईना. त्याच्या काखेखाली हात घालून त्याला सैनिक ओढीत नेत असता तो काहीतरी ओरडत होता. त्यांनी त्याला खांबाजवळ आणले तशी तो एकाएकी गप्प झाला. त्या कामगाराचा निर्जीव देह खाली कोसळला. एका सैनिकाने ते प्रेत खांबापासून कसेतरी ओढत नेऊन खड्ड्यात लोटून दिले.

पीएरने डोकावून खड्ड्यात पाहिले. खाली पडलेल्या कामगाराचे गुडघे डोक्याजवळ आले होते आणि एक खांदा दुसऱ्या खांद्यापेक्षा वर आला होता. त्या खांद्याची तालबद्ध अशी वर खाली तडफड होत होती. त्या देहावर फावड्याने माती ओढण्याचे काम कधीच सुरू झाले होते. एका सैनिकाने पीएरला दूर होण्यास सांगितले. त्याच्या आवाजात राग होता, उद्वेग होता आणि क्लेश होता. पीएरला त्याचे बोलणे समजले नाही. तो तसाच खांबाजवळ उभा राहिला. मग त्याला तिथून कोणीही हाकलले नाही.

खड्डा मातीने बुजला तेव्हा कोणाचा तरी हुकूम ऐकू आला. पीएरला त्याच्या पूर्वीच्या ठिकाणी नेण्यात आले. फ्रेंच सैनिकांनी खांबाच्या दोन्ही बाजूंना दोन रांगा केल्या, मागे वळून ते शिस्तीत पावले टाकीत खांबाजवळून कूच करीत निघाले. वर्तुळाच्या मध्यभागी उभे असलेले चोवीस नेमबाज सैनिक आपल्या कंपनीजवळून कूच करीत जाऊ लागले तेव्हा ते आपापल्या जागेकडे धावले.

दोघे दोघे नेमबाज सैनिक वर्तुळाबाहेर धावत जात होते. पीएर चकित नजरेने त्यांच्याकडे पाहात राहिला.

फ्रेंच आणि रशियन लोकांचा जमाव पांगू लागला. सगळे मान खाली घालून निघाले.

' जाळपोळ केल्यानंतर काय शिक्षा होते हे त्यांना कळेल !' फ्रेंच माणसांतील एक म्हणाला. पीएरने त्याच्याकडे पाहिले. जे घडले त्याबद्दल स्वतःच्या मनाचे सांत्वन करण्याचा तो व्यर्थ प्रयत्न करीत होता, हे पीएरच्या लक्षात आले. पुढे काही न बोलता खांदे उडवून तो चालू लागला.

देहान्त शिक्षेची अंमलबजावणी झाल्यानंतर पीएरला इतर कैद्यांपासून वेगळे करून एकट्यालाच एका छोट्या उद्ध्वस्त व घाणेरड्या चर्चमधे ठेवण्यात आले.

रात्रीच्या सुमारास दोन सैनिकांना घेऊन गस्त घालणारा सार्जंट चर्चमधे येऊन पीएरला म्हणाला, ' तुला शिक्षा माफ करण्यात आली आहे. युद्धकैद्यांच्या बराकीत तुझी रवानगी होत आहे. ' तो उठून सैनिकांबरोबर निघाला. मैदानाच्या वरच्या भागामधे अर्धवट जळलेल्या फळ्या, वहाले आणि रिफा घेऊन तात्पुरती शेड उभारली होती. त्यांपैकी एका शेडमधे त्याला नेण्यात आले. नानाप्रकारची वीस एक माणसे त्या शेडमधील अंधारात पीएरभोवती जमा झाली. पीएर टक लावून त्यांच्याकडे पाहात राहिला. ती माणसे कोण आहेत, ती कशासाठी जमली आहेत आणि त्यांना आपल्याकडून काय हवे आहे याची त्याला काहीच कल्पना येईना. त्या लोकांकडे त्यांच्या चेहऱ्याकडे तो पाहात होता. पण त्याला कशात काही अर्थ दिसत नव्हता.

आपल्या इच्छेविरुद्ध त्या लोकांनी ती भयंकर मानवी हत्या केलेली त्याने पाहिली आणि त्या क्षणापासून सर्व गोष्टींना एकत्रित करून जीवनसदृश स्वरूप देणारा त्याच्या अंतःकरणातील वसंत जणू उखडला गेला आणि साऱ्या गोष्टी कोसळून त्यांचा अर्थशून्य उकिरडा झाला आहे असे त्याला वाटू लागले. त्याला स्पष्टपणे उमगले नाही तरीही त्या हत्येच्या दर्शनाने त्याच्या अंतःकरणात असलेली विश्वाच्या सुयोग्य व्यवस्थेवरील, मानवतेवरील आणि परमेश्वरावरील श्रद्धा पार नाहीशी झाली. अशा प्रकारची मनःस्थिती पीएरच्या अनुभवाला पूर्वी आली होती, पण ती आताइतक्या तीव्रतेने आलेली नव्हती. अशा प्रकारचे विकल्प, संशय भूतकाळात निर्माण झाले होते पण तेव्हा त्यांचा उगम त्याच्या दुर्बलतेतून, अपराधातून झाला होता.

या निराशेतून आणि संशयातून मुक्त होणे आपल्या हाती आहे असे त्याचे अंतर्मन त्याला ग्वाही देत असे. आपल्या डोळ्यांसमोर साऱ्या जगाचा विध्वंस होत आहे यात आपला काही दोष नाही, केवळ अर्थशून्य अवशेषच राहिले आहेत असे आता त्याला वाटू लागले. पुन्हा जीवनावर श्रद्धा ठेवण्याचे सामर्थ्य आपणांत उरलेले नाही असे त्याला वाटले.

भिंतीला टेकून गवतात बसलेला पीएर काही बोलत नव्हता, काही हालचाल करीत नव्हता.

मधूनमधून डोळ्यांची उघडझाप तेवढी चालू होती. त्याने डोळे मिटताच त्याला त्या कामगाराचा चेहरा दिसू लागला, अनिच्छेने त्याला मारणाऱ्या मारेकऱ्यांचे चेहरे दिसू लागले. पीएरने डोळे उघडले आणि तो भोवतालच्या अंधारात शून्य दृष्टीने पाहात बसला.

त्याच्याजवळच एक लहानखुरा मनुष्य अंग दुमडून बसला होता. त्याच्या प्रत्येक हालचालीसरशी त्याच्या घामाचा दर्प सुटत असे. म्हणूनच पीएरला त्याच्या अस्तित्वाची जाणीव प्रथम झाली. तो अंधारात पायाशी काहीतरी चाळा करीत होता. पीएरला त्याचा चेहरा दिसत नव्हता तरीही तो आपल्याकडे मधूनमधून पाहात आहे हे पीएरला जाणवत होते.

' तुमच्यावर खूप संकटं आली असतील नाही ? ' त्या माणसाने एकदम प्रश्न केला. त्याच्या लयबद्ध आवाजात इतका प्रांजळपणा होता, इतका मैत्रीचा सूर होता की त्याला उत्तर द्यावे असे पीएरला वाटले. पण त्याचा जबडा थरथरू लागला. आपल्या डोळ्यांत अश्रू येणार असे त्याला वाटू लागले. पीएरची अस्वस्थ मनःस्थिती प्रकट होऊ नये म्हणून की काय त्याच वेळी तो मनुष्य पूर्वीच्याच सुरेल आवाजात उद्‌गारला, ' गड्या, शोक करू नकोस. ' वृद्ध रशियन शेतकरी स्त्रियांप्रमाणे तो हळुवार आश्वासक आणि लयबद्ध आवाजात म्हणाला, ' गड्या, शोक करू नकोस. संकट क्षणकाल टिकतं, जीवन अनंतकाळ असतं, हे लक्षात ठेव. परमेश्वरकृपेनं आपलं इथं बरं चाललं आहे. कोणी आपल्याला सतावीत नाही. तीदेखील माणसं आहेत. त्यांच्यातही काही बरी तर काही वाईट आहेत. ' बोलता बोलता तो चपळाईने उभा राहिला. खाकरून तो बाहेर पडला.

' तू आलीस का पुन्हा ? ' पीएरला तोच लयबद्ध सुरेल आवाज दूर झोपड्याच्या टोकाकडून आला. ' तुला माझी आठवण आहे तर ! बैस. तिकडे बैस.' अंगावर उड्या मारणाऱ्या त्या कुत्रीला खाली लोटून देऊन तो सैनिक आपल्या जागी येऊन बसला. त्याच्या हातात कापडात गुंडाळलेली काहीतरी वस्तू होती.

' हे थोडं खाऊन बघा ' सुरुवातीप्रमाणेच तो आदराने म्हणाला. भाजलेले बटाटे कापडातून बाहेर काढून त्याने पीएरला दिले. ' जेवणात आज सूप होतं. बटाट्याची चव अप्रतिम आहे.'

दिवसभर पीएरच्या पोटात काही गेले नव्हते. त्यामुळे त्याला बटाट्यांचा वास विलक्षण सुखदायक वाटला. त्या सैनिकाचे आभार मानून तो ते बटाटे खाऊ लागला.

' छे छे ! बटाटे असे खायचे नाहीत.' स्मित करीत तो सैनिक म्हणाला. ' अशा तऱ्हेनं खाऊन बघा.' त्याने मधाचा चाकू बाहेर काढला. बटाट्याचे दोन सारखे भाग केले. कपड्यातील मीठ त्यावर शिवरले आणि ते तुकडे पीएरला दिले.

' अगदी अप्रतिम आहेत. अशा तऱ्हेनं खाऊन बघा.' तो खातखात म्हणाला.

इतका चांगला पदार्थ आपण जन्मात खाल्ला नाही असे पीएरला वाटू लागले.

' मी अगदी ठीक आहे. ' पीएर म्हणाला. ' त्या बिचाऱ्यांना त्यांनी ठार का करावं ? त्यातील शेवटचा तर वीस एक वर्षांचा कोवळा पोरगा होता.'

‘छे ! छे ! केवढं पातक ! ’ तो मनुष्य म्हणाला. जणू त्याच्या तोंडात शब्द आधीच तयार होते. आणि ते योगायोगाने बाहेर पडत होते. तो बोलत राहिला ‘तुम्ही मॉस्कोमधेच कसे काय राहिला होतात ? ’

‘ ते इतक्या लवकर येतील अशी कल्पना नव्हती. मी योगायोगानंच राहिलो. ’ पीएरने उत्तर दिले.

‘ त्यांनी तुम्हाला कसं पकडलं ? तुमच्या घरातच पकडलं का ? ’

‘ नाही. मी आग बघायला गेलो होतो. तिथं त्यांनी मला पकडलं आणि माझ्यावर जाळ-पोळीचा आरोप ठेवला ’

‘ जिथं कायदा असतो तिथं खोटेपणा येतोच. ’ तो मनुष्य म्हणाला.

‘ इथं येऊन तुम्हाला खूप दिवस झाले असतील ? ’ शेवटचा बटाटा चघळता चघळता पीएरने विचारले.

‘ मला ना ? त्यांनी मला रविवारी मॉस्कोच्या इस्पितळातून बाहेर काढलं.’

‘ तुम्ही सैनिक आहात तर ? ’

‘ आम्ही अपृशरॉन् रेजिमेंटचे सैनिक. मी तापानं मरायला टेकलो होतो. आम्हाला काहीच सांगण्यात आलं नव्हतं. आमच्यातील आणखी वीसएक जण आजारी होते. आम्हाला कशाचीच काही कल्पना नव्हती.’

‘ इथं तुमचे दिवस कष्टात जात असतील ? ’ पीएरने विचारले.

‘ होय तर ! फार त्रास होतो इथं. माझं नाव प्लेटन, आडनाव कॅरॅटीव्ह.’ पीएरला आपले नाव घेऊन बोलणे सोपे जावे म्हणून त्याने माहिती दिली. ‘ रेजिमेंटमधे मला सगळेजण ‘ छोटा बहिरी ससाणा ’ म्हणायचे. मनस्ताप झाल्यावाचून कसा राहील ? मॉस्को राजधानी सगळ्या नगरींना आईच्या ठिकाणी आहे. तिच्या अवस्थेकडे पाहून दुःख न वाटणं कसं शक्य आहे ? ‘ अळी कोबी कुरतडते पण तीच कोबीच्या आधी मरून जाते.’ जुनी माणसं ही म्हण ऐकवायची ’ तो भरभर बोलला.

‘ काय, काय म्हणालात आता ? ’ पीएरने विचारले.

‘ मी ? ’ कॅरॅटीव्ह म्हणाला. ‘ आपल्याला वाटतं त्यानुसार घडत नाही. सगळं देवाच्या इच्छेवर अवलंबून असतं.’ आपण मघाशी जे म्हणालो तेच पुन्हा ऐकवतो आहोत अशा समजुतीने तो म्हणाला. मग तो भरभर बोलू लागला. ‘ मला वाटतं तुम्हाला वडिलांनी मालमत्ता ठेवली आहे. होय ना ? तुमचं स्वतःचं घर असेल ? तुमचे वृद्ध आईवडील हयात असतील ?’ तो विचारीत होता. पीएरला तो अंधारामुळे दिसत नव्हता. तरीही हे प्रश्न विचारताना तो सैनिक प्रयासाने सहानुभूतीचे स्मित आवरतो आहे असे पीएरला वाटले. पीएरला आईवडील नाहीत त्यातही त्याला आई नाही म्हणून त्याची निराशा झाल्याचे स्पष्ट दिसत होते.

‘ चांगला सल्ला मिळण्यासाठी पत्नी, चांगलं स्वागत होण्यासाठी सासू पण माणसाला आईसारखी प्रिय व्यक्ती दुसरी नाही.’ तो म्हणाला. ‘ तुम्हाला मुलं आहेत का ? ’ तो विचारतच

होता. पीएरच्या नकारार्थी उत्तराने तो पुन्हा निराश झाल्यासारखा दिसला. तो पुढे म्हणाला, ' काळजी नको. तुम्ही तरुण आहात. परमेश्वरकृपेनं तुम्हाला मुलं होतील. मात्र सुखा-समाधानानं नांदा.'

' त्यामुळं आता काही फरक पडणार नाही. ' पीएरला बोलल्यावाचून राहवले नाही.

' भल्या माणसा, ' प्लेटनने प्रत्युत्तर केले. 'आपल्या नशिबीची भिकेची झोळी अगर तुरुंग असे कोणालाच खात्रीने सांगता येणार नाही. ' पुन्हा अधिक आरामात त्याने बसून घेतले. मोठ्या गोष्टीची पूर्वतयारी म्हणून त्याने खाकरून घेतलं. ' मी जेव्हा घरीच होतो त्या वेळची ही गोष्ट आहे. आमच्याकडे खूप चांगली जमीन होती. शेतीचा व्यवसाय फार उत्तम चालला होता. दैवदयेनं घर चांगलं होतं. वडील कापणीसाठी आम्हा सहाजणांना घेऊन जात. एकंदरीत आमचं ठीक चाललं होतं. एके दिवशी मात्र... '

मग कॅरॅटीव्हने आपण लाकडासाठी दुसऱ्या माणसाच्या रानात कसे गेलो, रखवालदाराने आपणास कसे पकडले, मारहाण कशी केली, आपल्यावर खटला कसा झाला आणि शेवटी आपणास सैन्यात दाखल कसे करण्यात आले हे सारे विस्ताराने सांगितले.

' आणि गड्या ', चेहऱ्यावर स्मित उमटल्याने त्याचा आवाज बदलला. ' प्रथम आम्हाला ती दुर्दैवी घटना वाटली. पण खरं तर ते आमच्या सुखाखातर घडलं होतं. मी तसा अपराध केला नसता तर माझ्या भावाला सैन्यात जावं लागलं असतं. माझ्या भावाला पाच लहान मुलं होती. माझ्यामागं माझ्या बायकोखेरीज कुणी नव्हतं. मला एक छोटी मुलगी होती. पण मी सैन्यात जाण्यापूर्वीच ती देवाघरी गेली होती. मी रजा काढून सैन्यातून घरी आलो. सगळी माणसं पूर्वीहून अधिक चांगल्या स्थितीत होती. आवारात गुरंढोरं होती. स्त्रिया घरात वावरत होत्या. माझे दोन भाऊ मजुरीसाठी बाहेर गेले होते. सर्वांत धाकटा मिहाइलो काय तो घरी होता. वडील म्हणाले, ' मला सगळी मुलं सारखीच आहेत. ' कुठल्याही बोटाला जखम झाली तरी सारखंच दुखतं. प्लेटनला सैन्यात पाठवलं नसतं तर मिहाइलोला जावं लागलं असतं. तुम्हांला खरं वाटणार नाही, त्यांनी आम्हा सर्वांना बोलावून पवित्र प्रतिमेसमोर उभं केलं. मग त्यांनी मिहाइलोला म्हटलं, ' मिहाइलो, त्याच्या पाया पड.' त्यांनी स्त्रियांना मला नमस्कार करायला सांगितलं. नातवंडांनाही पाया पडायला लावलं. गड्या, कळलं ना तुला? नियती विचारपूर्वक वागत असते. हे योग्य नाही, हे मला योग्य वाटत नाही अशा प्रकारे आपण नेहमी तक्रार करतो, दोष हुडकतो. मित्रा, आपलं सुख मासेमारीच्या जाळ्यासारखं आहे. ते ओढत नेलं तर फुगीर होतं; ते बाहेर काढलं तर काऽही नसतं. ' प्लेटन गवतातच जागा बदलून बसला.

थोड्या वेळाने प्लेटन उठला. ' तुला झोप आली का? ' मग तो भरभर क्रूसची खूण जुळवून प्रार्थना पुटपुटू लागला.

' प्रभो ख्रिस्ता, पवित्र संत निकोला, फ्रॉला आणि लॅव्रा, प्रभो ख्रिस्ता, आमच्यावर दया कर. आमचं रक्षण कर...' प्रार्थना संपताच त्याने जमिनीवर टेकून प्रणाम केला, उठून

उसासा टाकला आणि तो गवतावर आपल्या जागी बसला. 'परमेश्वरा, मला एखाद्या दगडाप्रमाणं पडून राहू दे आणि नव्या भाकरीप्रमाणं वर उठू दे.' असे पुटपुटत तो आपला लष्करी कोट अंगावर ओढून घेऊन पडून राहिला.

'तुम्ही आता कोणती प्रार्थना म्हटलीत ?' पीएरने विचारले.

'अं ?' प्लेटन अर्धवट झोपेत होता. 'मी देवाची प्रार्थना केली. तू प्रार्थना करीत नाहीस ?'

'करतो तर. पण तुम्ही काय म्हणत होता ? फ्रॉला आणि लॅव्रा...?'

प्लेटन घाईघाईने म्हणाला, 'त्याचे असे आहे. ते दोघे घोड्यांचे संत आहेत. त्या गरीब बिचाऱ्या जनावरांचीही आपण काळजी घ्यायला पाहिजे. अरे, ह्या कुत्र्यानं चांगलीच गुंडाळी केली आहे. ऊबही चांगली आणली आहे.' पायाशी असलेल्या कुत्र्याला थोपटीत तो म्हणाला. पुन्हा कुशीवर वळून तो झोपी गेला.

ज्या झोपडीत पीएरने चार आठवडे घालवले त्या झोपडीत तेवीस सैनिक, तीन अधिकारी आणि दोन मुलकी अधिकारी यांना कैदेत ठेवले होते.

काही काळानंतर प्लेटन कॅरॅटीव्ह सोडल्यास बाकीच्या माणसांच्या स्मृती पीएरच्या मनातून पुसून गेल्या. पीएरच्या मते प्लेटन प्रेमळपणाचा, गरगरीतपणाचा आणि सगळ्या रशियन वैशिष्ट्यांचा प्रतिनिधी होता. प्लेटन म्हणजे गरगरीत वाटोळेपणा ही त्याच्याबद्दलची कल्पना पीएरने त्याला दुसऱ्या दिवशी पाहिले तेव्हा पक्की झाली. फ्रेंच लष्करी कोट घातलेल्या कमरेभोवती दोर पट्ट्यासारखा आवळलेल्या, सैनिकी टोपी आणि विणलेले जोडे घातलेल्या प्लेटनचा देह वाटोळा गरगरीत होता. त्याचे स्मित प्रेमळ होते आणि मोठे मुलायम पिंगट डोळे वाटोळे होते.

आपण भाग घेतलेल्या मोहिमांच्या तो गोष्टी सांगत होता. त्यावरून प्लेटन कॅरॅटीव्हने पन्नाशी ओलांडली असावी असे वाटत होते. आपले निश्चित वय त्याला सांगता येत नव्हते. तो नेहमीच हसत असे आणि हसताना दिसणाऱ्या दोन सलग अर्धवर्तुळांतील त्याचे सगळे दात चांगले आणि बळकट दिसत होते. त्याच्या दाढीत अगर डोकीवर एकही पांढरा केस नव्हता. त्याचे सगळे शरीर भलतेच चपळ व सोशिक वाटत होते.

चेहऱ्यावर सुरकुत्या असूनही त्याची मुद्रा निरागस आणि तरुण वाटत होती. त्याचा आवाज हवासा वाटणारा आणि तालबद्ध होता. स्वाभाविकता आणि हजरजबाबीपणा ही त्याच्या बोलण्याची सर्वांत मोठी वैशिष्ट्ये होती. आपण काय बोलत आहोत अगर आपणाला काय बोलायचे आहे याचा तो कधी विचार करीत नव्हता हे उघड होते. त्यामुळेच त्याच्या प्रांजळपणे भरभर उच्चारलेल्या शब्दांना मन वळवण्याची एक विशिष्ट अमोघ शक्ती प्राप्त होत होती.

कैदेच्या प्रारंभीच्या काळात त्याची तडफ आणि प्रकृती इतकी चांगली होती की, त्याला

थकवा आणि आजार माहीत नसावा असे वाटत होते. रात्री झोपी जाताना तो म्हणायचा, 'प्रभो, मला दगडासारखी विश्रांती घेऊ दे आणि मला ताज्या भाकरीप्रमाणे वर उठव.' सकाळी उठताना तो नेहमीप्रमाणे खांदे झटकून म्हणे, 'पहुडल्यावर अंग जवळ घे, उठल्यावर अंग झटकून टाक.' दगडाप्रमाणे शान्त निद्रा येण्यासाठी त्याला केवळ पडून राहावे लागे आणि उठल्यावर वेळ न गमावता काम करण्यासाठी तयार होण्यासाठी केवळ अंग झटकले की पुरे होई. मुले उठल्यावर एकदम खेळण्याशी खेळू लागतात तसा तो कामाला प्रारंभ करी. प्रत्येक गोष्ट चांगल्या तऱ्हेने करता आली नाही तरी निदान वाईट तऱ्हेने कशी करू नये हे त्याला ठाऊक होते. रोटी भाजणे, सैपाक करणे, शिवणे, रंधा मारणे, जोडे दुरुस्त करणे इत्यादी कामे तो करी. सारखे कामात असणे त्याला आवडे. संध्याकाळी तो संभाषणात भाग घेई. त्याच वेळी तो गाई. लोक आपले गाणे ऐकत आहेत या भावनेने गाणाऱ्या गायकांप्रमाणे तो गात नसे. पक्ष्यांनी गावे तसे गात असे. विश्रांतीसाठी हातपाय ताणणे अगर हिंडायला जाणे त्याला जसे आवश्यक होते, तसेच गीताचे सूर गुणगुणणे त्याला आवश्यक वाटत होते. ते सूर नेहमीच सौम्य, हळुवार, जवळजवळ बायकी आणि उदास असत. तो गुणगुणताना त्याची मुद्रा गंभीर होई.

तो तुरुंगात होता तेव्हा त्याने दाढी वाढवली होती. त्याने आता अस्वाभाविक अशी आणि त्याच्यावर लादलेली सैनिकी राहणी सोडून दिली. पुन्हा तो नकळत आपल्या शेतकरी राहणीकडे वळला.

सैन्यातून बाहेर पडलेला सैनिक हा विजारीतून बाहेर पडलेला शर्ट होय, असे तो म्हणायचा. तो कसल्या तक्रारी करीत नसे. सैन्यात आल्यापासून आपणाला कुणी कधी तडकावले नाही असे तो मोठ्या अभिमानाने सांगे. तरीही त्याला आपल्या सैन्यातील जीवनाबद्दल बोलायला आवडत नसे. त्याने जुन्या गोष्टी सांगितल्याच तर त्या त्याच्या ख्रिश्चन जीवनाच्या मूल्यवान स्मृतीबद्दल असत. स्वतःला तो क्रेस्टियानिन ( रशियन भाषेत शेतकरी ) म्हणवून घेई. त्याच्या बोलण्यात कितीतरी म्हणी येत. पण त्या सैनिकांत प्रचलित असणाऱ्या रांगड्या व असभ्य म्हणी नसत. अलग अलग पाहिल्यास फार थोडा अर्थ असणाऱ्या परंतु योग्य प्रसंगी वापरल्यावर फार मोठा शहाणपणा व्यक्त करणाऱ्या अशा शेतकऱ्यांच्या वापरातील म्हणी त्याच्या बोलण्यात येत.

थोड्या वेळापूर्वी त्याने जे म्हटलेले असे त्याच्या एकदम विरुद्ध असे तो बोलू लागे. परंतु त्याची दोन्ही विधाने सारखीच खरी असत. त्याला बोलण्याची आवड होती. तो आपले बोलणे वेधक विशेषणे आणि म्हणीवजा वाक्ये यांनी सजवी. त्याच्या बोलण्यातील विशेषणे व म्हणी त्याने स्वतःच शोधून काढल्या आहेत असे पुष्कळदा पीएरला वाटे. खुद्द पीएरचे खास लक्ष वेधून न घेणारे असे साधेसुधे प्रसंग असत. परंतु त्यांचे वर्णन तो करू लागला की, त्या प्रसंगांना सौंदर्य आणि गंभीर आशय प्राप्त होई. ह्यामुळे त्याचे बोलणे मोठे मोहक वाटू लागे. रात्रीच्या वेळी एक सैनिक त्याच त्या परीकथा पुन्हा पुन्हा सांगे. त्या ऐकण्यात पीएरला

गोडी वाटे. पण त्यापेक्षा त्याला जीवनातील सत्य घटना ऐकणे अधिक आवडे. अशा गोष्टी ऐकताना तो मधुर स्मित करी, मधूनमधून एखादादुसरा प्रश्न करी. सांगितल्या जाणाऱ्या गोष्टींतील सद्गुणांकडे लक्ष वेधणे हा त्याचा हेतू असे. पीएरच्या जीवनात बंधन, मैत्री व प्रेम यांना जे स्थान होते ते कॅरॅटीव्हच्या जीवनात नव्हते. परंतु ज्या ज्या माणसाशी जीवनात संबंध येई त्यांच्याशी तो प्रेमाने वागे आणि त्या प्रेमावरच जगे. हे त्याचे वागणे एका विशिष्ट माणसाबाबत नसून जी जी माणसे डोळ्यांसमोर असत त्या त्या सर्वांबाबत असे. आपला कुत्रा, आपले सहकारी, फ्रेंच माणसे, आपला शेजारी पीएर या सर्वांवर त्याचे प्रेम होते. कॅरॅटीव्ह आपल्याशी प्रेमाने वागत असला तरीही आपली ताटातूट झाल्यानंतर त्याला क्षणभरही दुःख होणार नाही असे पीएरला वाटले. आपणही असेच वागू असे त्याला वाटले.

इतर सैनिकांना प्लेटन कॅरॅटीव्ह अगदीच मामुली सैनिक वाटत होता. ते त्याला ' छोटा बहिरी ससाणा ' अगर ' प्लेटोशा ' म्हणत. त्याची थट्टामस्करी करीत. त्याला काहीना काही काम सांगत. पीएरला पहिल्या रात्री तो गूढ, वाटोळा गरगरीत, सत्याचे आणि प्रांजळपणाचे चिरंतन प्रतीक वाटला होता. त्याला शेवटपर्यंत तो तसाच वाटत राहिला.

आपला भाऊ यारॉस्लॉव्हल येथे रोस्तॉफकुटुंबात आहे हे प्रिन्सेस मार्याला निकोलायकडून कळले. तेव्हा तिने त्याच्याकडे एकटीनेच नव्हे तर आपल्या भाच्याला घेऊन जाण्याची तयारी केली. त्यापासून तिला परावृत्त करण्याचा तिच्या मावशीने व्यर्थ प्रयत्न केला.

थोड्याच दिवसांत प्रिन्सेस मार्या प्रवासाला सज्ज झाली. व्हॉरॉनेश इथे ती ज्या मोठ्या प्रवासी गाडीतून आली होती तीच गाडी तिने प्रवासासाठी घेतली. सोबत आच्छादून घेतलेले सामान-सुमान आणि मालवाहू गाडी होती. तिच्यासोबत बूरिअनवाई, निकोलुश्का, त्याची शिक्षिका, वृद्ध परिचारिका व तीन दासी होत्या. खेरीज तिहॉन नावाच्या हुजऱ्याला आणि एका जासुदाला तिच्या मावशीने सोबतीला दिले होते.

नेहमीच्या रस्त्याने मॉस्कोवरून प्रवास करण्यात अर्थ नव्हता. वळसे घेत जाणारा मार्ग प्रिन्सेस मार्याला पत्करावा लागला. तो खूप दूरचा होता. टप्प्याटप्प्याला घोडे बदलण्याची सोय नसल्याने अवघड होता. रॅझानच्या भोवताली फ्रेंच सैनिक दिसू लागल्याची बातमी होती. त्यामुळे त्या बाजूचा मार्गही धोक्याचा झाला होता.

दुसऱ्या आठवड्याच्या अखेरीस ती मंडळी यारॉस्लॉव्हलजवळ पोचली.

ती अवजड गाडी अडखळत, हिसके देत आणि हेलकावे खात थांबेपर्यंत तिने मान वर केली नाही. गाडीच्या पायफळ्या सोडताना खडखडाट झाला.

गाडीचा दरवाजा उघडण्यात आला. डाव्या बाजूस नदीचे विशाल पात्र होते. उजवीकडे प्रवेशद्वाराच्या पायऱ्या होत्या. प्रवेशद्वाराशी बरीच माणसे, नोकरचाकर आणि काळ्याभोर

केसांची बेटोलेदार रचना केलेली एक गुलाबी गालाची मुलगी होती. ती मुलगी आपल्याकडे पाहून नाराजीने कृत्रिम स्मित करीत आहे असे प्रिन्सेस मार्याला वाटले. ( ती सोन्या होती ) प्रिन्सेस पायऱ्या चढू लागली तशी ती मुलगी वरपांगी स्मित करीत म्हणाली, 'ह्या बाजूनं–ह्या बाजूनं'—तिला लॉबीमधे पौर्वात्य स्त्रीच्या चेहऱ्यासारखा चेहरा असणारी एक प्रौढ स्त्री आपल्याला भेटायला भरभर चालत येत असलेली दिसली. ती कसल्यातरी भावनेने हेलावून गेलेली दिसत होती. ती काउंटेस होती. तिने प्रिन्सेस मार्याला मिठीत घेऊन तिचे मुके घ्यायला सुरुवात केली.

'बाळ, मला तू आवडतेस. ती तुला कधीची ओळखते आहे!'

प्रिन्सेस मार्याच्या मनात खळबळ माजली. तरीही 'ही काउंटेस आहे, आणि आपण तिच्याशी काहीतरी बोलणे आवश्यक आहे' हे तिच्या लक्षात आले. कसे कोण जाणे पण लोक तिच्याशी बोलताना ज्या स्वरात विचारीत त्या स्वरात तिने नम्रतादर्शक फ्रेंच शब्द उच्चारले आणि विचारले, 'त्यांची प्रकृती कशी आहे?'

'काही धोका नाही असं डॉक्टर म्हणतात' काउंटेसने उत्तर दिले. पण असे म्हणताना तिने उसासा टाकला.

'कुठं आहे तो? मला त्याला पाहायचं आहे. भेटू ना मी त्याला?'

प्रिन्सेस मार्याने विचारले.

'जरा धीर धर, बाळ. हा त्याचा मुलगा का?' देसॅलेबरोबर आलेल्या निकोलुश्काकडे वळत काउंटेसने विचारले. 'सगळयांच्या राहण्याची सोय करू या. घर खूप मोठं आहे. किती गोड मुलगा आहे!'

काउंटेसने प्रिन्सेस मार्याला दिवाणखान्यात नेले. सोन्या बूरिअनबाईशी गोष्टी करू लागली. काउंटेसने मुलाचे मुके घेतले. प्रिन्सेस मार्याला भेटण्यासाठी थोरला काउंट तिथे आला. प्रिन्सेस मार्याने मागील खेपेस त्याला पाहिले होते तेव्हापासून त्याच्यामधे विलक्षण बदल झाला होता. त्या वेळी तो कसा तृप्त, आनंदी आणि आत्मविश्वास असलेला वृद्ध होता. आता मात्र तो केविलवाणा आणि गोंधळलेला दिसत होता. प्रिन्सेसशी बोलत असताना तो सारखा आजूबाजूला पाहात होता. तेव्हा तो 'मी करतो ते बरोबर आहे ना' असे विचारीत आहे की काय असे वाटत होते. मॉस्कोचा विध्वंस झाल्याबर आणि त्याची मालमत्ता गेल्यावर तो दैनंदिन चाकोरीबाहेर भिरकावला गेला आणि तो स्वप्रतिष्ठेची जाणीव गमावून बसला. आपणाला ह्या जीवनात स्थान नाही असे त्याच्या मनाने घेतले.

आपल्या भावाला लागलीच भेटण्याची तिची इच्छा होती. त्याला भेटण्याखेरीज तिला आणखी काही नको होते. अशा वेळी ती सर्व माणसे तिच्या भाच्याची प्रशंसा करून सांकेतिक तऱ्हेने तिची करमणूक करीत होती. म्हणून ती त्रस्त झाली. तरीही ती भोवताली चाललेले सारे पाहात राहिली. ज्या जगात आपण प्रवेश केला आहे त्या जगातील नव्या गोष्टींशी आपण जुळवून घेणे अपरिहार्य आहे हे तिला उमगले. तसे करणे तिला अवघड गेले. पण तिच्या

मनात कोणाबद्दल कटू भावना निर्माण झाली नाही.

'ही माझी भाची.' काउंटेस सोन्याला पुढे करीत म्हणाली. 'प्रिन्सेस, तू हिला ओळखतेस का?'

प्रिन्सेस मार्या तिच्याकडे वळली. त्या मुलीला पाहून मनात निर्माण झालेला वैरभाव दडपून टाकण्याचा प्रयत्न करीत तिने तिचे चुंबन घेतले. भोवताली असलेल्या प्रत्येकाची मनःस्थिती आणि आपल्या अंतःकरणाला व्यापणाऱ्या भावना यांत असलेली विलक्षण तफावत जाणून ती अतिशय व्यथित झाली.

'तो कुठं आहे?' तिने पुन्हा एकदा सर्वांना उद्देशून प्रश्न केला.

'तो खाली आहे. त्याच्या सोबतीला नताशा आहे.' सोन्या लाजून म्हणाली, 'त्याच्या भेटीची वेळ आता ठरेल. प्रिन्सेस, मला वाटतं तू थकली असशील. होय ना?'

वैतागलेल्या प्रिन्सेस मार्याच्या डोळयांत अश्रू आले. तिने त्यांच्याकडे पाठ फिरवली. त्याला कुठे भेटता येईल असे ती काउंटेसला पुन्हा विचारणार होती. तेवढ्यात तिला कुणाचीतरी भरभर पावले दाराशी ऐकू आली. त्या उत्सुक पावलात तिला आनंद जाणवला. तिने वळून पाहिले. तो नताशा जवळजवळ धावत येत होती. मॉस्कोमधे ही नताशा बऱ्याच दिवसांपूर्वी भेटली होती. तेव्हा तिला ती मुळीच आवडली नव्हती.

पण आता प्रिन्सेस मार्याने तिच्याकडे नजर टाकली न टाकली तोच आपल्या दुःखात मनापासून सहभागी होणारी म्हणून आपली मैत्रीण व्हायला पात्र असलेली अशी ही नताशा आहे हे तिला कळून चुकले. ती धावत जाऊन तिला भेटली. तिला मिठीत घेऊन ती तिच्य खांद्यावर अश्रू ढाळू लागली.

'चल, मारी, आपण त्याच्याकडे जाऊ.' नताशाने तिला जवळच्या खोलीत नेले.

प्रिन्सेस मार्याने मान वर केली, आपले डोळे पुसले आणि नताशाकडे पाहिले. हिच्याकडून आपणाला सर्व काही समजेल असे तिला वाटले. 'कशा तऱ्हेनं...' ती बोलायची थांबली. कुठलाही प्रश्न अगर कुठलेही उत्तर शब्दांतून व्यक्त करता येणार नाही हे तिला जाणवले. नताशाचा चेहरा आणि तिचे डोळे आपल्याला सर्व काही अधिक स्पष्टपणे सांगतील, त्या सर्वांचा अधिक खोल अर्थ सांगतील असे तिला वाटले.

नताशाने प्रिन्सेस मार्याकडे पाहिले. आपल्याला ठाऊक असलेले सर्व सांगावे की सांगू नये याचा तिला संशय पडलेला होता. म्हणून ती धास्तावलेली दिसली. आपल्या अंतःकरणाला पार भेदून जाणाऱ्या त्या चमकदार डोळ्यांसमोर राहून आपणास ठाऊक असलेले सत्य संपूर्णपणे न सांगणे आपणास शक्य नाही असे तिला वाटले. एकाएकी नताशाच्या ओठाची वेडीवाकडी हालचाल झाली. आपला चेहरा दोन्ही हातांनी झाकून ती ओक्साबोक्शी रडू लागली.

प्रिन्सेस मार्याच्या सर्व काही ध्यानात आले.

काही वेळाने नताशा म्हणाली, 'प्रारंभी त्याला खूप ताप आला आणि वेदनाही खूप होत्या.

तेव्हा त्याची अवस्था फार गंभीर होती. ट्रॉइट्सला आल्यावर धोका टळला. डॉक्टरला शरीराचा भाग सडून जाईल अशी धास्ती पडली होती. पण ते संकटही आता जवळजवळ टळले आहे. यारॉस्लॉव्हलला आल्यावर जखमेत पू होऊ लागला होता. (त्याबद्दल आणि नंतरच्या सर्व गोष्टींबद्दल तिला माहिती होती.) त्यानंतर आजार सामान्य स्थितीवर येईल असे डॉक्टर म्हणाले होते. त्यानंतर ताप यायला लागला. हा ताप काही गंभीर बाब नाही, असं डॉक्टरांना वाटलं. पण दोन दिवसांपूर्वी एकाएकी त्याच्यात हा बदल झाला.' ती मोठ्या कष्टाने हुंदके आवरत म्हणाली.

'मारी, अग, तो इतका चांगला आहे. तो वाचणं शक्य नाही. कारण...कारण...'

नताशाने सरावलेल्या हातांनी प्रिन्स आन्द्रेच्या खोलीचे दार उघडून प्रिन्सेस मार्याला आधी आत जाऊ दिले. तेव्हा प्रिन्सेस मार्याने मोठ्या प्रयासाने हुंदके आवरले. तिने मनाची खूप तयारी केली होती. मनावर ताबा ठेवण्याचा प्रयत्न केला तरीही त्याला पाहताच आपल्या डोळ्यांत अश्रू आल्याखेरीज राहणार नाहीत असे तिला वाटू लागले.

नताशाने म्हटले होते, 'दोन दिवसांत एकाएकी हा बदल घडला.' या शब्दांचा अर्थ आता तिला कळला. तो एकाएकी सौम्य, शान्त झाला आहे आणि त्याची नाजूक हळुवार अवस्था मरणाची सूचना देणारी आहे असा अर्थ तिने लावला होता. दाराशी जाताना तिला लहानग्या आन्द्रुशाचा सौम्य, शान्त नाजूक चेहरा आठवला. नंतर तो चेहरा तसा क्वचितच तिला आढळला होता. तसा चेहरा दिसला की ती किती प्रभावित व्हायची. मरणापूर्वी आपले वडील आपल्याशी जसे प्रेमळ हळुवार बोलले तसाच प्रिन्स आन्द्रेही आपल्याशी बोलेल आणि आपल्याला ते सहन न होऊन आपणाला नक्की रडे कोसळेल असे तिला वाटले. पण कधी ना कधी हे घडणारच आहे असा विचार करून ती खोलीत शिरली. तिच्या मंददृष्टीला त्याची आकृती जसजशी अधिकाधिक स्पष्ट दिसू लागली, तसतसे तिला हुंदके आवरेनासे झाले. त्याचा चेहरा दिसला तेव्हा त्याच्या नजरेला तिची नजर मिळाली.

तो कोचावर गाद्यांना रेलून पहुडला होता. त्याने खारीच्या पट्ट्यांचा पायघोळ झगा घातला होता. तो कृश आणि फिकट झाला होता. त्याच्या एका कृश, गोऱ्यापान हातात हातरुमाल होता. दुसऱ्या हाताने तो वाढलेल्या नाजूक मिशा गोंजारीत होता. त्या दोघी आत आल्या तेव्हा तो त्यांच्याकडे टक लावून पाहात राहिला.

त्याचा चेहरा दिसताच आणि त्याच्या नजरेला नजर मिळताच प्रिन्सेस मार्याने चाल एकाएकी मंद केली. आपले अश्रू आटले आहेत आणि हुंदके थांबले आहेत असे तिला वाटले. त्याच्या मुद्रेवरील भाव पाहताच तिला एकदम संकोच वाटला. अपराधी वाटले.

'माझा अपराध तरी काय?' तिने स्वतःला विचारले. 'कारण तू जिवंत आहेस आणि जिवंत

असलेल्याबद्दल विचार करते आहेस, ' त्याची रूक्ष, करडी नजर जणू म्हणत होती.

तो आपल्या वहिणीला आणि नताशाला बुद्धिपूर्वक बारकाईने पाहात होता. बाह्यगोष्टी-पलीकडे जाऊन खोलवर वेध घेणाऱ्या त्या नजरेत जवळजवळ वैरभाव होता.

' मारी खुशाल आहेस ना? इथे कशी येऊ शकलीस तू?' त्याच्या दृष्टीप्रमाणेच त्याचा आवाज स्थिर आणि अलिप्त होता. त्याने निराशेने किंकाळी फोडली असती तरीदेखील ती प्रिन्सेस मार्याला ह्या आवाजाइतकी भेसूर वाटली नसती.

' निकोलुश्काला घेऊन आली आहेस का?' त्याने संथ, विचारपूर्वक आवाजात विचारले. तो काहीतरी आठवण्याचा प्रयत्न करीत होता.

' कसं वाटतं आहे तुला?' प्रिन्सेस मार्याला आपल्या प्रश्नाचे आश्चर्य वाटले.

' अग, हा प्रश्न तू डॉक्टरांनाच विचारायला हवा!' तो म्हणाला. तो प्रेमळपणाने वागण्याचा पुन्हा एकदा प्रयत्न करीत असता त्याचे केवळ ओठ म्हणाले, ( आपण काय बोलतो आहोत ह्याचा तो विचार करीत नव्हता ह्यात संशय नाही) 'तू भेटायला आलीस. आभारी आहे तुझा.'

प्रिन्सेस मार्याने त्याचा हात दाबला. तिच्या हाताच्या दाबामुळे त्याच्या चेहऱ्यावर पुसट नाराजी उमटली. ती स्तब्ध होती. काय बोलावे ते तिला सुचत नव्हते. दोन दिवसांपूर्वी त्याच्यात कोणता बदल झाला आहे, हे तिला कळून चुकले. त्याच्या शब्दातून, त्याच्या सुरा-तून त्याच्या निर्जीव व वैऱ्यासारख्या नजरेतून जिवंत माणसाला भयानक वाटणारी सर्व ऐहिक गोष्टींबद्दलची अलिप्तता तिला जाणवू लागली.

सजीव सृष्टीतील गोष्टींचा त्याला महत्प्रयासाने बोध होत होता हे स्पष्ट दिसत होते. त्याचे कारण त्याची ज्ञानशक्ती नष्ट झाली होती, हे नव्हते. सजीवांना जे कळत नाही अगर कळणे शक्य नाही ते त्याला जाणवत होते. आणि त्यातच त्याचे सर्व लक्ष मग्न झाले होते हे त्याचे खरे कारण होते.

' नियती किती चमत्कारिक आहे. तिनं आम्हा दोघांना पुन्हा एकत्र आणलं आहे.' स्तब्धतेचा भंग करून नताशाकडे दृष्टी टाकीत तो म्हणाला, ' ती माझी शुश्रूषा करते आहे.'

प्रिन्सेस मार्याने त्याचे बोलणे ऐकले पण त्याचा अर्थ तिला उमगला नाही. जिचे प्रिन्स आन्द्रेवर प्रेम होते आणि जिच्यावर प्रिन्स आन्द्रेचे प्रेम होते, त्या मुलीच्यासमोर प्रिन्स आन्द्रेला असे बोलवले तरी कसे? जगण्याचा थोडा विचार त्याच्या मनात असता तर तो असे तुच्छतेने बोलला नसता. आपण मरणार आहोत याची त्याला कल्पना नसती तर तो तिच्याशी सहानुभूतीने वागला असता, तिच्यासमोर त्याने तसे उद्‌गार काढले नसते. त्याच्या वागण्याला एकच कारण होते...तो सर्व गोष्टींविषयी उदासीन आहे, तो उदासीन आहे याचे कारण ह्याहून अधिक महत्त्वाच्या गोष्टीचा त्याला साक्षात्कार झालेला आहे.

त्याचे संभाषण रूक्ष आणि असंबद्ध होऊ लागले. त्यात क्षणाक्षणाला खंड पडत होता.

' मारी रॅझानवरून आली.' नताशा म्हणाली.

नताशाने आपल्या वहिणीचा उल्लेख ' मारी ' या नावाने केला हे प्रिन्स आन्द्रेच्या लक्षात आले नाही. त्याच्यासमोर आपण तिचा ' मारी ' असा उल्लेख केला हे नताशाला प्रथमच जाणवले.

' खरं म्हणतेस ? ' त्याने विचारले.

' मॉस्को शहर पार जळून खाक झाल्याचं तिला कळलं. ' नताशा पुढे बोलली नाही. पुढे बोलणे शक्य नव्हते. तो लक्ष देण्याचा व्यर्थ प्रयत्न करीत होता हे स्पष्ट होते.

' शहर जळलं असं म्हणतात. फार वाईट झालं. ' असे म्हणून तो समोर टक लावून पाहात राहिला. तो नकळत मिशांवरून बोटे फिरवू लागला.

' मारी, तू काउंट निकोलायला भेटलीस तर ! ' त्यांना बरे वाटावे म्हणून प्रिन्स आन्द्रे काहीतरी विचारीत होता. ' त्यानं घरच्या पत्रात लिहिलं आहे. त्याला तू फार आवडली आहेस म्हणून. ' तो शांत स्वरात प्रांजळपणाने बोलत होता. आपल्या म्हणण्याचे अनेक अर्थ भोवतालची माणसे काढू शकतील ही गोष्ट त्याच्या डोक्यात आली नाही. ' तुला तो आवडला असेल तर—आणि तू त्याच्याशी लग्न करणार असशील तर—ती चांगली गोष्ट आहे. ' तो काहीसा घाईघाईने म्हणाला. मघापासून शोधीत असलेले शब्द सापडले म्हणून त्याला झालेला आनंद स्पष्ट दिसत होता प्रिन्स मार्याने त्याचे म्हणणे ऐकले. त्यावरून तो लौकिक जीवनापासून किती दूर गेला आहे याची तिला भयंकर जाणीव झाली एवढेच. एरव्ही तिच्या दृष्टीने त्याच्या शब्दांना आणखी अर्थ नव्हता.

' माझ्याबद्दल कशाला बोलू या ? ' ती शांतपणाने म्हणाली आणि तिने नताशाकडे पाहिले. ती आपल्याकडे पाहात आहे हे उमगून नताशाने तिच्या नजरेला नजर देणे टाळले. आता पुन्हा सगळेजण स्तब्ध झाले.

' आन्द्रे, तुझ्या भेटीला—' प्रिन्सेस मार्याने एकाएकी थरथरत्या आवाजात विचारले, ' तुझ्या भेटीला निकोलुश्काला आणलं तर चालेल ना ? तो तुझ्याबद्दल सतत बोलत असतो. '

प्रिन्स आन्द्रेने पहिल्यांदाच क्षीण स्मित केले. पण ते स्मित आनंदाचे नव्हते; वात्सल्याचेही स्मित नव्हते. आपल्या भावाच्या भावनांना आवाहन करण्याचा ती आपल्या मते शेवटचा उपाय योजण्याचा प्रयत्न करीत होती. त्याचा तो त्या मंद स्मिताने उपहास करीत होता. आजवर त्याचा चेहरा पूर्ण ठाऊक असल्याने प्रिन्सेस मार्याच्या हे लक्षात आले आणि ती भेदरून गेली.

' निकोलुश्का भेटला तर मला बरं वाटेल. त्याची प्रकृती ठीक आहे ना ? '

त्यांनी निकोलुश्काला आत आणला. वडिलांकडे तो भयभीत नजरेने पाहत राहिला. दुसरे कुणी रडत नव्हते म्हणून तो रडला नाही इतकेच. प्रिन्स आन्द्रेने त्याचे मुके घेतले. त्याच्याशी काय बोलावे ते त्याला कळेना.

मुलाला बाहेर नेण्यात आल्यावर प्रिन्सेस मार्या पुन्हा एकदा आपल्या भावाजवळ गेली. तिने त्याचे चुंबन घेतले. तिला शोकावेग असह्य होऊन ती रडू लागली.

त्याने तिच्याकडे लक्षपूर्वक पाहिले.

'तुला निकोलुश्काची काळजी वाटते आहे का?' त्याने विचारले तशी हुंदके देत प्रिन्सेस मार्यानि मान हालवली.

'मारी तुला गॉस्पेल...' तो एकदम स्तब्ध झाला.

'काय म्हणालास?'

'काही नाही. तू अशी रडू नकोस.' तिच्याकडे भावशून्य नजरेने पाहात तो म्हणाला.

प्रिन्सेस मार्या रडू लागली तेव्हा ती निकोलुश्का पोरका होणार म्हणून ती रडत आहे याची त्याला जाणीव झाली. मोठ्या प्रयासाने ऐहिक जीवनाकडे वळून तो त्याच्या दृष्टीने विचार करण्याचा प्रयत्न करू लागला.

'त्यांना दुःख अटळ आहे. पण हे सारं किती सरळ साधं आहे.' त्याला वाटू लागले.

'पक्षी पेरीत नाहीत, ते शेताची कापणीही करीत नाहीत. पण आपणा सर्वांचा पिता त्यांना खाऊ घालीत असतो.' तो स्वतःशी म्हणाला. आपल्या बहिणीला तो हे ऐकवणार होता. पण त्याला वाटले 'नको.' त्यांना ते कळणार नाही. ती आपापल्या परीने त्याचा अर्थ लावतील. ज्या भावनांना, ज्या विचारांना ती महत्त्व देत, त्या सर्वांना त्याच्या दृष्टीने काही किंमत नाही. पण त्यांना ते समजणार नाही या विचाराने तो स्तब्ध राहिला.

प्रिन्स आन्द्रेचा मुलगा सात वर्षांचा होता. तो अजून वाचायला शिकला नव्हता. त्याला काहीच कळत नव्हते. त्या दिवसानंतर माहिती, निरीक्षण, अनुभव यातून तो खूप शिकणार होता. त्यानंतर प्राप्त झालेली समजशक्ती जर का त्याच्या ठिकाणी त्या वेळी असती तर त्याचे वडील, प्रिन्सेस मार्या आणि नताशा यांमधे जे घडत होते त्या साऱ्याची खरीखुरी खोलवर जाणीव त्याला त्याच वेळी झाली असती. तितकी जाणीव त्याला त्यानंतरही कधी झाली नाही. तरीही त्याला सारे समजले आणि न रडता तो स्तब्धपणे खोलीबाहेर पडताच बरोबर आलेल्या नताशाला बिलगला. तिच्या अंगावर डोके ठेवून तो रडू लागला.

त्या दिवसापासून तो देसॅलेला टाळू लागला. काउंटेसने त्याला थोपटून शांत केले असते पण तिलाही तो टाळू लागला, आणि एकटाच स्तब्ध बसू लागला. तो प्रिन्सेस मार्या आणि नताशा यांच्या सहवासात काहीशा संकोचाने वेळ काढू लागला, त्यांना बिलगून राहू लागला.

आपल्या भावापासून प्रिन्सेस मार्या दूर झाली तेव्हा तिला नताशाच्या मुद्रेने सारे काही सांगितले. तिने तो वाचेल अशी आशा नताशाकडे व्यक्त केली नाही. नताशा आणि ती आलटून पालटून त्याच्याजवळ राहू लागल्या. प्रिन्सेस मार्या आता अश्रु गाळीनाशी झाली. मरणोन्मुख भावाच्या भोवती चिरंतन गूढ शक्तीचे अस्तित्व तिला आता जाणवू लागले. ती मनोभावे त्या शक्तीची प्रार्थना सारखी करीत राहिली.

प्रिन्स आन्द्रेला रात्री मृत्यू आला.

त्याला रात्री जेवणानंतर नेहमीप्रमाणे थोडासा ताप होता आणि कधी नव्हे ती त्याची विचारशक्ती शाबूत होती. मेणबत्तीचा उजेड त्याच्या डोळयांवर येणार नाही अशा बेताने नताशा बैठ्या खुर्चीत बसून पायमोजा विणू लागली. ('विणकाम करणाऱ्या वृद्ध नर्ससारखी चांगली शुश्रूषा कोणी करणार नाही.' असे एकदा सहज प्रिन्स आन्द्रे तिला म्हणाला होता. तेव्हापासून ती विणकाम शिकू लागली होती.) तिची नाजूक बोटे सुया बरखाली करीत होती. त्यांची मंद टिक टिक ऐकू येत होती. तिचा खाली झुकलेला स्वप्नाळू चेहरा त्याला एका बाजूने स्पष्ट दिसत होता. ती थोडीशी हालली तसा लोकरीचा गोळा मांडीवरून खाली घरंगळत गेला. तिने दचकून वळून याच्याकडे पाहिले. प्रकाश हाताने अडवून ती मोठ्या सावधगिरीने आणि चपळाईने आवश्यक तेवढी वाकली. गोळा उचलून पूर्वीसारखी बसली.

हालचाल न करता तिच्याकडे पाहात असताना आणि सुयांची मंद टिकटिक ऐकत असताना त्याच्या मनात येत होते, 'अशा विचित्रपणे नियतीनं आम्हां दोघांना एकत्र आणलं ते कशासाठी? केवळ मी मरावं म्हणून? माझं सगळं जीवन खोटं ठरवण्यासाठी का मला जीवनसत्याचा साक्षात्कार झाला? या जगात तिच्याइतकं मला काहीही प्रिय नाही. माझं तिच्यावर प्रेम आहे खरं पण मी तिच्यासाठी काय करू शकणार?' तो स्वतःशी म्हणाला. बऱ्याच काळच्या वेदनांनी झालेल्या सवयीमुळे तो एकाएकी नकळत कण्हू लागला.

त्याचे कण्हणे ऐकून नताशाने पायमोजा खाली ठेवला आणि ती त्याच्या दिशेने झुकली. एकाएकी त्याचे डोळे चमकलेले पाहून ती त्याच्याजवळ हलक्या पावलांनी जाऊन वाकून पाहू लागली.

'तुम्ही जागेच आहात?'

'होय, मी कितीतरी वेळ तुझ्याकडे पाहात होतो. तू आत आलीस ते मला कळलं. तूच केवळ मला हवीहवीशी मनःशांती देतेस, प्रसन्न प्रकाश देतेस. वाटतं आनंदानं रडत राहावं! नताशा, मला तू खूप आवडतेस. जगात मला दुसरं काही प्रिय नाही. मी जगेन असं तुला वाटतं का?'

'निश्चित. तुम्ही निश्चित जगणार आहात.' भावावेगाने त्याचे दोन्ही हात आपल्या हातात घेत ती जवळजवळ ओरडली.

तो काही वेळ स्तब्ध राहिला.

'तसं घडलं तर किती चांगलं होईल!' असे म्हणत त्याने तिचा हात हातात घेऊन त्यावर आपले ओठ टेकले.

त्याचे शेवटचे क्षण साध्या सामान्य तऱ्हेने चालले होते. त्याच्यासोबत सदैव असणाऱ्या प्रिन्सेस मार्या आणि नताशा यांना ते जाणवले. त्या रडल्या नाहीत अगर त्यांचा थरकापही

उडाला नाही. त्या दोघींच्याही भावना इतक्या प्रबळ होत्या की मृत्यूच्या भयानक बाह्य स्वरूपाचा त्यांच्यावर काही परिणाम झाला नाही.

तो आपल्यापासून संथपणे स्तब्धपणे दूरदूर निसटून जात आहे हे त्यांना दिसत होते. असे घडणे अटळ आहे आणि चांगले आहे हे त्यांनी जाणले. धर्मगुरूने येऊन त्याच्यासाठी पाप-मुक्ती आणि तैलाभ्यंजन हे धार्मिक विधी केले. त्याला निरोप देण्यासाठी सगळेजण आले.

त्याच्या मुलाला त्याच्या जवळ आणण्यात आले तेव्हा त्याने त्याचा मुका घेतला. स्वतःला यातना झाल्या म्हणून नव्हे तर आपण मुलाच्या बाबतचे आपले कर्तव्य पार पाडले असे त्याला वाटले म्हणून त्याने त्याच्याकडे पाठ फिरवली. 'मुलाला आशीर्वाद द्या.' असे कोणीतरी म्हटले तेव्हा त्याने आवश्यक तेवढे करून तो भोवती पाहू लागला. जणू त्याची नजर विचारीत होती, 'मला आणखी काही करायचं आहे का?'

आत्मा सोडून जात असताना चाललेली शरीराची शेवटची धडपड थांबली त्या वेळी प्रिन्सेस मार्या आणि नताशा त्याच्या शेजारी होत्या.

त्यांच्या डोळ्यांसमोरच त्याचे शरीर काही क्षणांत निश्चल झाले आणि गार पडू लागले. तशी प्रिन्सेस मार्या म्हणाली, 'संपलं सारं!' जवळ जाऊन नताशाने मृताच्या डोळ्यात निरखून पाहिले आणि घाईघाईने त्याचे डोळे मिटून ठेवले. पण त्यांवर ओठ टेकले नाहीत. त्याच्या अगदी जवळच्या आठवणीवर—त्याच्या शरीरावर ती झुकली 'कुठं गेलेत? कुठं असतील आता?'

त्याच्या मृत देहाला स्नान घालून त्यावर वस्त्रे चढवण्यात आली. टेबलावरील शवपेटिकेत मृतदेह ठेवण्यात आला. त्याचे अंत्यदर्शन घेण्यासाठी आलेल्या सगळ्यांना रडू कोसळले. प्रिन्स आन्द्रे मरण पावला म्हणून आणि नताशाबद्दल करुणा वाटून काउंटेस आणि सोन्या शोक करू लागल्या. लवकरच आपणही त्या भयंकर प्रदेशात प्रवेश करणार आहोत ह्या विचाराने काउंटला रडे कोसळले.

नताशा आणि प्रिन्सेस मार्यादेखील रडू लागल्या. पण त्या आपल्या व्यक्तिगत हानीसाठी रडत होत्या. त्यांच्या डोळ्यांसमोर मृत्यूचे साधे गंभीर रहस्य पूर्ण झाले होते.

■ ■

# भाग तेरावा

## १८१२

१८१२ च्या सबंध सप्टेंबर महिन्यात आणि ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात नेपोलिअनने आणि त्याच्या सैन्याने मॉस्को शहरात मुक्काम ठोकला होता. सैनिकांनी शहरात लुटालूट आरंभली. उन्मत्तपणे धावणाऱ्या गुरांच्या कळपांनी जीव वाचवू शकली असती अशी वैरण तुडवून टाकावी त्याप्रमाणे समृद्ध शहरात शिरणाऱ्या सैनिकांनी अन्न, कपडे आणि इतर सामग्री यांची नासधूस करून टाकली. वरिष्ठांचे हुकूम झुगारून देऊन सैनिकांनी नासधूस चालू ठेवली आणि प्रत्येक दिवसाला ते आपला विनाश जवळजवळ आणू लागले.

थंडीचा कडाका वाढू लागला. रशिया शरण येईल असे नेपोलिअनला सारखे वाटत राहिले. परंतु कुटूझॉफ आणि झार यांनी दाद दिली नाही. सबंध हिवाळा आपण इथे मुक्काम ठेवला तर आपला विनाश अटळ आहे हे लक्षात येताच नेपोलिअनचे सैन्य एकाएकी धास्तावले आणि त्याने पळ काढण्यास प्रारंभ केला. उत्तर दिशेला जाऊन पीटर्सबर्ग शहर जिंकण्याचा प्रयत्न त्याने केला नाही. दक्षिणेकडील समृद्ध प्रदेशही जिंकता आले असते पण तिकडेही ते फिरकले नाहीत. ज्या मार्गाने ते आले होते त्या स्मॉलेन्स्क व व्हिल्ना मधून जाणाऱ्या उजाड भगभगीत मार्गाने ते पुनश्च युरोपकडे जलदीने माघार घेऊ लागले.

सहा ऑक्टोबर रोजी अगदी सकाळी पीएर तुरुंगाच्या खोलीतून बाहेर पडला. मग मागे वळून दारात राहून त्याच्याभोवती उड्या मारणाऱ्या आखूड पायाच्या लांबोड्या कुत्रीशी तो

खेळू लागला. ही कुत्री तुरुंगातच राहात होती. कॅरॅटीव्हच्या शेजारी झोपायची. आपणहून एकटीच शहरात राहून पुन्हा यायची. ती कोणाच्या मालकीची नसावी. तिला मालक नव्हता तसेच नाव नव्हते, निश्चित जात नव्हती, त्या राखाडी कुत्रीला कशाची फिकीर नव्हती. तिचे मऊ लोकरीचे शेपूट तुऱ्यासारखे ताठ उभे होते. तिचे चारही आखूड पाय तिची सेवा इतकी चांगली करीत की त्या चारांचा एकदम उपयोग करणे न आवडून ती मागील एक पाय उचलून तीन पायांनी तरतरीतपणे भरभर चाले. प्रत्येक गोष्टीने तिचे समाधान होई, कधी ती आनंदाने भुंके. कधी स्वप्नात वा विचारात असल्यासारखी उन्हात बसे.

आता पीएरच्या अंगावर घाणेरडा, फाटलेला शर्ट होता. तो पूर्वी वापरत होता त्यांतील हा एकमेव शर्ट उरलेला होता. सैनिक वापरीत तसली विजार त्याने घातली होती. उबदार वाटावे म्हणून त्याने कॅरॅटीव्हच्या सूचनेप्रमाणे विजारीची टोके घोट्यांभोवती दोरा गुंडाळून बांधली होती. पीएरच्या अंगावर शेतकरी घालीत तसला कोट होता. ह्या काळात पीएरमधे खूप शारीरिक बदल झाला होता. आता तो पूर्वीसारखा दणकट, तगडा दिसत नव्हता. तरीही भरभक्कम कणखर प्रकृती हे बेझुहोव्ह कुटुंबाचे वैशिष्ट्य त्याच्यातही दिसत होते. त्याचा चेहरा दाढीमिशांनी झाकला गेला होता. त्याच्या डोक्यावर जटांचा टोप झाला होता त्यात उवा तरतरत होत्या. त्याचे पाय उघडे होते.

पीएरने कुरणावर दृष्टी टाकली. त्यावरून त्या सकाळी मालवाहू गाड्या आणि घोडेस्वार जात होते. मग त्याने दूर नदीपलीकडे पाहिले. मग त्याचा चावा घेण्याचे ढोंग करणाऱ्या कुत्रीकडे पाहिले. त्याने घाणेरड्या, मोठ्या आणि जाड बोटांची पावले आरामात इकडेतिकडे चाळवली. आपल्या उघड्या पावलांकडे दृष्टी गेली की त्याच्या चेहऱ्यावर समाधानाचे स्मित पसरे. ह्या काळात त्याने जे अनुभवले आणि तो जे शिकला त्यांची आठवण ती उघडी पावले त्याला करून देत. त्या आठवणींनी तो सुखावून जाई.

गेले चार आठवडे पीएर कैदेत होता. फ्रेंच अधिकारी पीएरला सामान्य कैद्यांच्या निवासातून अधिकाऱ्यांच्या निवासात न्यायला तयार होते; परंतु पीएर पूर्वीच्याच निवासात राहिला.

ह्याच काळात त्याच्या मनाला स्वस्थता आणि शांती लाभली. ह्यासाठी तो पूर्वी कितीतरी काळ व्यर्थ धडपडला होता. बोरोदीनॉ येथील सैनिकांमधे असताना आंतरिक सुसंवाद आणि मनःशांती यांची त्याला तीव्रतेने जाणीव झाली होती आणि त्याच्या प्राप्तीसाठी तो कितीतरी काळ नाना मार्गांनी धावत होता. दानधर्म, फ्रीमेसन पंथ, उच्चभ्रू वर्गाचे विलास, मद्यपान, आत्मसमर्पणाची शूर साहसी कृत्ये, नताशाबद्दलची रम्याद्भुत प्रीती, तत्त्वचिंतन यांतून त्या गोष्टी शोधण्याचा प्रयत्न केला. पण त्याचे सर्व प्रयत्न विफल झाले. आता काहीही चिंतन न करताही त्याला मनःशांतीचा आणि आंतरिक सुसंवादाचा लाभ झाला–तोही मृत्यूच्या धास्तीतून, हालअपेष्टांतून आणि त्याने जे कॅरॅटीव्हमध्ये पाहिले त्यातून झाला. फाशीच्या काळानंतर जे भयानक क्षण त्याने अनुभवले होते त्या क्षणांमुळे त्याला एका काळी महत्त्वाच्या वाटणाऱ्या,

अस्वस्थ करणाऱ्या कल्पना आणि विचार त्याच्या मनातून आणि स्मरणातून जणू हद्दपार झाले. आता त्याच्या मनात रशिया, युद्ध, राजकारण आणि नेपोलिअन यांच्यासंबंधीचे विचार येईनासे झाले. ह्या सर्व गोष्टींशी आपला काही संबंध नाही असे त्याला वाटू लागले; नेपोलिअनला ठार करण्याची योजना आता त्याला अगम्य आणि हास्यास्पद वाटू लागली; पत्नीचा राग आणि तिच्यामुळे आपला बदलौकिक होईल म्हणून वाटणारी धास्ती ह्या गोष्टी त्याला आता क्षुल्लक आणि रंजक वाटू लागल्या; कैद्याचे नाव काउंट बेझुहॉव्ह आहे हे त्यांना कळले काय अगर न कळले काय, कुणाचेच काही बिघडणार नाही–आपले तर काहीच बिघडणार नाही असे त्याला वाटू लागले.

घराबाहेर सूर्यकिरणांत उबदार वाटत होते. सकाळपर्यंत राहिलेल्या दवामुळे हवेत उत्साह-कारक गारवा असल्याने ती ऊन्ह विशेष सुखद वाटत होती.

नाईट कॅप घातलेला आणि कोटाची बटणे आरामात उघडी टाकलेला एक कार्परल खोलीच्या कोपऱ्याशी आला. त्याच्या तोंडात छोटा पाइप होता. प्रेमळपणे डोळे मिचकावीत तो पीएरजवळ आला. ' ऊन काय छान पडलं आहे ! एखाद्याला वाटेल वसंतऋतूच सुरू आहे ' मग तो दरवाजाशी रेलला. नेहमीप्रमाणे आताही त्याने पीएरला पाइप देऊ केला. ' कूच करायला अशी हवा असली तर...' तो म्हणाला.

' फ्रेंचांच्या जाण्याबद्दल काही ऐकलं का ? ' पीएरने विचारले.

' बहुतेक सगळं सैन्य बाहेर पडत आहे. कैद्यांच्या बाबतीतील सूचना आज मिळतील असं वाटतं. ' तो उत्तरला.

पीएर ज्या खोलीत राहात होता त्याच खोलीत सोकॉलॉव्ह नावाचा एक रशियन सैनिक अत्यवस्थ होता. पीएर कार्परलला म्हणाला, ' त्या सैनिकासाठी काहीतरी करायला हवं. '

कार्परल म्हणाला, ' त्याबद्दल तुम्ही निश्चित राहा. अशा लोकांसाठी आमच्याकडे प्रवासी आणि स्थिर अशी दोन्ही प्रकारची इस्पितळं आहेत. आजारी माणसाबाबत सूचना दिल्या जातील. कोणत्याही आकस्मित गोष्टीसाठी लागणारी व्यवस्था अधिकाऱ्यांनी करून ठेवलेली आहे. तुम्ही कॅप्टनला दोन शब्द बोललात तरी पुरे आहे. तो माणूस कधीच काहीही विसरत नाही. कॅप्टन इकडे येईल तेव्हा त्याला सांगा. तो तुमच्यासाठी वाटेल ते करील.'

ज्या कॅप्टनबद्दल कॉर्परल बोलला तो कॅप्टन पीएरशी कितीतरी वेळा बोलत असे आणि पीएरला सर्व प्रकारची मदत करीत असे. कॉर्परल त्याला म्हणाला, ' त्यादिवशी कॅप्टन मला म्हणाला, ' हे बघ, पीएर हा फ्रेंच बोलणारा सुशिक्षित माणूस आहे. बरेच दुःख भोगलेला तो रशियन जमीनदार आहे, पण भला माणूस आहे, त्याला चांगली समज आहे. त्याला काही हवं असलं तर त्याला मला सांगू दे. मी त्याला नकार देणार नाही. मनुष्य स्वतः विद्वान असला की त्याला शिक्षणाची थोडीफार कदर असते, सुसंस्कृत माणसं हवीशी वाटतात. ' पीएर मी तुमच्यासाठीच या संभाषणाचा उल्लेख करतो आहे.'

पीएर कॉर्परलशी बोलत होता ते कित्येक कैद्यांनी पाहिले होते. कॉर्परलने काय सांगितले हे

जाणून घेण्यासाठी ते लागलीच पीएरभोवती गोळा झाले. मॉस्कोतून बाहेर पडण्याबद्दल कॉर्पोरल काय म्हणाला ते पीएर आपल्या सोबत्यांना सांगत असताना एक फाटक्या कपड्यातील कृश, रोगट फ्रेंच सैनिक तुरुंगाच्या खोलीच्या दाराशी आला. प्रणामादाखल त्या बुजऱ्या सैनिकाने त्वरेने आपली बोटे आपल्या कपाळाकडे नेली आणि पीएरला उद्देशून म्हटले, 'प्लॅटोची नावाचा सैनिक माझ्यासाठी शर्ट तयार करीत होता. तो आत आहे काय ?

आठवड्यापूर्वी फ्रेंच सैनिकांना कापड आणि चामडे पुरवण्यात आले होते. त्या सैनिकांनी शर्ट आणि बूट करवून घेण्यासाठी त्या वस्तू रशियन कैद्यांकडे दिल्या होत्या.

'आहे, शर्ट तयार आहे.' काळजीपूर्वक घडी केलेला शर्ट घेऊन बाहेर येता येता कॅरॅटीव्ह म्हणाला. खूप उकाडा होत होता म्हणून शिवाय काम करताना जास्तीत जास्त सोयीचे पडावे म्हणून कॅरॅटीव्हने केवळ विजार चढवली होती आणि अंगात मातट मळकट फाटका शर्ट घातला होता. मजुरांप्रमाणे त्याने आपल्या केसांना दोर गुंडाळले होते. त्याचा चेहरा कधी नव्हे तो गोल–गरगरीत आणि प्रसन्न दिसत होता.

'वेळेवर काम केलं तर धंदा चांगला चालतो. मी शुक्रवारी देईन म्हणालो होतो त्याप्रमाणं आज शर्ट तयार आहे.' प्लॅटन कॅरॅटीव्हने शर्ट दाखवीत स्मित करीत म्हटले.

त्या फ्रेंच सैनिकाने अस्वस्थपणे भोवताली पाहिले. त्याचा निश्चय ठाम झाल्यासारखा दिसला. त्याने भरभर आपला गणवेष उतरला आणि शर्ट चढवला. गणवेषाखाली त्याच्या अंगावर शर्ट नव्हता. त्याच्या कृश पिवळट शरीराला चिकटून एक लांब, तेलकट व फुलांफुलांचे डिझाइन असलेले रेशमी जाकीट होते. आपल्याकडे पाहात असलेले कैदी आपल्याला हसतील याची त्याला भीती वाटत असल्याचे स्पष्ट दिसत होते. त्याने घाईघाईने शर्टमधे डोके घातले. कुणी कैदी चकार शब्द बोलला नाही. 'चांगला बसतो आहे की!' शर्ट खाली ओढता ओढता प्लॅटन म्हणाला. त्या फ्रेंच सैनिकाने डोके आणि हात बाहेर काढल्यावर शर्टवर नजर टाकली आणि नजर न फिरविता शिवण न्याहाळून घेतली.

'दोस्ता, शिंप्यानं हा शर्ट तयार केला नाही हे विसरू नकोस. माझ्याकडे योग्य असं शिवणसाहित्य नव्हतं. 'योग्य साधन नसेल तर तुम्हांला उवादेखील नीट मारता येणार नाहीत.' अशी म्हण आहे.' कॅरॅटीव्ह अजून आपल्या कलाकृतीचे कौतुक करीत होता.

'आभारी आहे. फार चांगला शर्ट शिवलात. पण तुमच्याकडे काही कापड उरलं असेलच. तो फ्रेंच सैनिक म्हणाला.

'तुमच्या अंगाला ठीक होत आहे, त्यामुळे तुम्हांला खूप आराम वाटेल' कॅरॅटीव्ह अजूनही आपल्या कामगिरीची भलावण करीत होता. 'तुम्हाला अगदी सुखाचा वाटेल.'

'आभारी आहे. पण गड्या, कापड किती उरलं आहे?' कॅरॅटीव्हला नोट देता देता फ्रेंचाने पुन्हा विचारले, 'उरलेले तुकडे मला देऊन टाक.'

फ्रेंचाचे म्हणणे प्लॅटनला समजून घ्यायला नको आहे हे पीएरच्या लक्षात आले. त्या दोघांमध्ये न पडता तो पाहात राहिला. कॅरॅटीव्हने रूबलबद्दल फ्रेंचाचे आभार मानले आणि

आपल्या कलेचे कौतुक करण्यास प्रारंभ केला. तो फ्रेंच इसम उरलेल्या कापडाची मागणी करीत राहिला. शेवटी त्याने पीएरला आपल्या म्हणण्याचे भाषांतर करून सांगण्याची विनंती केली.

'त्याला ते तुकडे कशाला हवे आहेत?' कॅरॅटीव्हने विचारले, 'मला पायाला गुंडाळण्यासाठी त्यांच्या छान पट्ट्या होतील. देव त्याचे भले करो!'

कॅरॅटीव्हचा चेहरा एकाएकी उतरलेला आणि कष्टी झालेला दिसला. त्याने छातीशी ठेवलेले उरलेल्या कापडाचे बंडल काढले आणि फ्रेंचाकडे न पाहता त्याला ते दिले. एक कष्टी उद्गार काढून फ्रेंचाकडे पाठ फिरवून तो जाऊ लागला. फ्रेंचाने कापडाकडे पाहिले. काय करावे ते त्याला क्षणभर सुचेना. त्याने प्रश्नार्थक मुद्रेने पीएरकडे पाहिले. जणू पीएरच्या डोळ्यांनी त्याला काहीतरी सांगितले. तो एकदम शरमिंधा होऊन कर्कश स्वरात ओरडला, 'प्लॅटॉची इकडे ये. हे कापड तुलाच घे.' उरलेले कापड कॅरॅटीव्हला देऊन तो फ्रेंच वळला आणि बाहेर पडला.

डोके हालवीत कॅरॅटीव्ह म्हणाला, 'बघा, बघा तर खरं. ती माणसं रानटी आहेत असं म्हणतात पण त्यांना देखील अंतःकरण आहे. 'घाम गाळणाऱ्याचे हात उघडे, उदार असतात पण कोरडे हात मिटलेले, कंजूष असतात.' असं म्हातारी माणसे म्हणतात ते खरं आहे. त्या फ्रेंचाचं स्वतःचं अंग उघडं आहे, तरीही त्यानं हे कापड मला देऊन टाकलं.' कापडाच्या कापलेल्या तुकड्यांकडे स्वप्नाळू नजरेने पाहात कॅरॅटीव्ह काही वेळ स्तब्ध राहिला. मग खोलीत शिरता शिरता तो म्हणाला, 'दोस्तहो, मला ह्या तुकड्यांपासून पायाला गुंडाळण्यासाठी अप्रतिम पट्ट्या मिळतील.

सहा ऑक्टोबरच्या रात्री फ्रेंच सैन्याने माघार घ्यायला प्रारंभ केला. स्वयंपाकघरे आणि झोपड्या पाडण्यात आल्या. सामान मालवाहू गाड्यांत भरण्यात आले आणि गाड्यांसह सैनिक निघाले.

संरक्षण देणारे फ्रेंच सैनिक सकाळी सात वाजता शिस्तीमध्ये निवासासमोर हजर झाले. त्यांनी टोकदार लष्करी टोप्या घातल्या होत्या, प्रत्येकाजवळ बंदूक, सामानासाठी पिशवी आणि भले मोठे पोते होते. ते तावातावाने फ्रेंच भाषेत बोलत होते, मधून मधून शिव्या देत होते.

कपडे घालून, पट्टे चढवून आणि बूट घालून ते निवासामध्ये बाहेर पडण्याच्या हुकमाची वाट बघत थांबले. आजारी सैनिक सॉकलॉव्ह कृश आणि फिकट झाला होता. त्याच्या डोळ्यांभोवती वर्तुळे तयार झाली होती. बूट आणि वरचे कपडे न घालता तो एकटाच आपल्या जागी बसून होता. चेहरा कृश झाल्याने त्याचे डोळे बाहेर आल्यासारखे दिसत होते. तो आपल्या सहकाऱ्यांकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहात होता आणि मधून मधून ठराविक काळाने कण्हत होता. तो आमांशाने आजारी होता पण शारीरिक वेदनांपेक्षा आपण एकटे पडणार

आहोत ह्या भीतीने आणि दुःखाने तो कण्हत होता.

पीएर आजारी सैनिकाजवळ जाऊन चवड्यांवर बसून म्हणाला, 'हे बघ, सॉकलॉव्ह, ते सगळे काही इथून जात नाहीत. त्यांच्यासाठी इथे इस्पितळ आहे, आम्हा सगळ्यांहून तू अधिक लवकर बरा होण्याचा संभव आहे.'

'अरे देवा! मी आता काही जगत नाही.' तो आणखी जोराने कण्हत राहिला.

'मी जाऊन त्यांना सरळ विचारून येतो.' असे म्हणून पीएर उठला आणि खोलीच्या दाराकडे निघाला. तेवढ्यात ज्याने पीएरला काल पाइप देऊ केला होता तो कॉर्पेरल दोन सैनिकांसह आत आला. ते तिघेही कूच करण्याच्या तयारीने आले होते. त्यांच्या पाठीवर सामानाच्या प्रवासी पिशव्या होत्या, त्यांनी उंच लष्करी टोप्या घातल्या होत्या, त्यांचे पट्टे हनुवटीखाली अडकवले होते त्यामुळे त्यांचे चेहरे अपरिचित वाटत होते.

मिळालेल्या हुकमाप्रमाणे दरवाजा बंद करण्यासाठी कॉर्पेरल तिथे आला होता. कैद्यांना बाहेर काढण्यापूर्वी त्याला कैदी मोजावे लागले.

'कॉर्पेरल, ह्या आजारी सैनिकाचं काय करणार आहात?' पीएर विचारू लागला तोच ज्याच्याशी आपण बोलत आहोत तो मघाचाच कॉर्पेरल आहे का याची त्याला शंका आली. त्यावेळी तो कॉर्पेरल कितीतरी वेगळा दिसत होता. शिवाय पीएर बोलू लागला तेवढ्यात एकाएकी दोन्ही बाजूचे ड्रम जोरजोराने वाजत असलेले ऐकू आले. पीएरचे शब्द ऐकताच कॉर्पेरलने कपाळाला आठ्या घातल्या, काहीतरी निरर्थक शिवी हासडून त्याने दार धाडकन बंद केले. आता खोलीत अंधुक प्रकाश होता. दोन्ही बाजूंनी ड्रम जोरजोराने वाजू लागले आणि त्या आवाजात आजारी सैनिकांचे कण्हणे ऐकू येईनासे झाले.

'पुन्हा सुरुवात झाली.' पीएर म्हणाला. त्याचे शरीर आपोआप शहारले. कॉर्पेरलच्या बदललेल्या चेहऱ्यात, त्याच्या सुरात, पडघमांच्या चेतवणाऱ्या आणि कानठळ्या बसवणाऱ्या आवाजात पीएरला माणसांना त्यांच्या इच्छेविरुद्ध आपल्या भाईबंदांना ठार मारण्यास भाग पाडणारी, रहस्यमय, सहानुभूतिशून्य शक्ती जाणवली. त्या शक्तीचा परिणाम कैद्यांना फाशी देताना त्याने पाहिला होता. त्या शक्तीची बाहुली बनून, नोकरी करणाऱ्यांची विनवणी करून अगर त्यांना उपदेश करून, त्या शक्तीला घाबरून अगर त्या शक्तीपासून दूर पळण्याचा प्रयत्न करून काही उपयोग होणार नव्हता. पीएरच्या आता हे ध्यानात आले. आता मुकाट्याने वाट पाहाण्याखेरीज गत्यंतर नव्हते. पीएर पुन्हा त्या आजारी सैनिकाकडे फिरकला नाही; त्याच्याकडे त्याने वळूनही पाहिले नाही. कपाळयाला आठ्या घालून तो दारात शांतपणे उभा राहिला.

त्या खोलीचा दरवाजा उघडला तेव्हा मेंढराप्रमाणे एकमेकांना चिरडीत कैद्यांनी दाराशी गर्दी केली. पीएर समोरून त्यांच्यामध्ये घुसला आणि सरळ कॅप्टनकडे गेला. 'कॅप्टन' तुझ्यासाठी काहीही करायला तयार आहे,' असे ज्याच्याबद्दल त्याला कॉर्पेरलने सांगितले होते तोच हा कॅप्टन होता. कॅप्टन कूच करण्याच्या पोषाखात होता. कॉर्पेरलच्या शब्दांत आणि

पडघमच्या आवाजात जाणवलेली शक्तीच पीएरला कॅप्टनच्या चेहऱ्यावर दिसू लागली.

'चला, निघा, निघा.' भोवताली गर्दी करणाऱ्या कैद्यांकडे पाहात, आठ्या घालत कॅप्टन दरडावीत होता.

आपल्या प्रयत्नाला यश येणार नाही हे पीएरला कळले तरीही तो कॅप्टनजवळ गेला.

'काय काम आहे?' त्याला बारकाईने निरखीत कॅप्टनने रूक्षपणे विचारले. त्याने पीएरला ओळखले नसावे. पीएरने आजारी सैनिकाबद्दल काही सांगितले.

'तो येईल चालत. नाहीतर खड्ड्यात पडू दे त्याला.' कॅप्टन म्हणाला. मग पीएरकडे दुर्लक्ष करीत तो हुकूम सोडू लागला, 'चला, निघा येथून.'

'ते सारं खरं. पण त्याला आता खूप वेदना...' पीएर बोलू लागला तोच कपाळाला आठ्या घालीत कॅप्टन त्याच्या अंगावर खेकसला, 'आता कृपा कर...'

आता पडघमांचा आवाज सुरू झाला. ती सगळी माणसे त्या रहस्यमय शक्तीच्या आहारी गेलेली आहेत आणि आता जास्त काही बोलून उपयोग होणार नाही हे पीएरच्या ध्यानात आले.

कैदी अधिकाऱ्यांना कैदी सैनिकांपासून दूर करण्यात आले. आणि त्यांना पुढे राहून कूच करण्याचा हुकूम देण्यात आला. कैदी अधिकारी एकूण तीस होते. पीएर त्यांपैकी एक होता. कैदी-सैनिक शंभर होते.

एक अधिकारी मॉस्कोला लागलेली आग दिसावी म्हणून इकडून तिकडे धावपळ करीत होता. शहराच्या कोणत्या भागात आग लागली आहे, काय काय जळते आहे ते इतरांना सांगत होता. दुसरा अधिकारी त्याच्याशी वाद घालीत होता, मॉस्कोचे विभाग ओळखण्यात त्याची कशी चूक होत आहे ते त्याला पटवून देण्याचा प्रयत्न करीत होता.

'बघा, बघा, काय चाललं आहे ते!' कैद्यांमधून सर्व बाजूंनी उद्गार उमटत होते. 'नदीच्या पलीकडे सर्व ठिकाणी...झुबॉव्हो येथे...क्रेमलीनमध्ये...निम्मा भागदेखील वाचला नाही. नदीच्या पलीकडचा सगळा भाग...मी नव्हतो का म्हणत?...'

मॉस्कोच्या काही थोड्या विभागांना आग लागली नव्हती. हॅमॉव्निकी भाग त्यांपैकी होता. त्या विभागातून जाताना सगळ्या कैद्यांचा जमाव चर्चजवळ एकदम थांबला. तिरस्काराने आणि भीतीने उद्गार उमटू लागले. दुष्ट कुठले...! सैतान आहेत...होय...मेलेलाच आहे तो...त्याच्या तोंडाला काहीतरी माखलेले आहे...'

पीएर देखील आता चर्चजवळ आला. जे पाहून भीतीचे, तिरस्काराचे उद्गार उमटले होते ते प्रेत चर्चच्या भोवतालच्या कुंपणाला रेलून ठेवल्याचे त्याला अंधुकसे दिसले. त्याच्यापेक्षा अधिक स्पष्टपणे पाहू शकणाऱ्या त्याच्या सहकाऱ्यांनी त्याला सांगितले–'कुणाचं तरी प्रेत कुंपणाला उभं करून ठेवण्यात आलं आहे. त्याच्या तोंडाला काजळ फासलेलं आहे.'

'चला पुढे. शिंच्यानो पुढे व्हा. तीस हजार पिशाच्चांनो, चला पुढे. थांबू नका.' बरोबरीचे सैनिक त्यांना शिव्या देऊ लागले. फ्रेंच सैनिकांना पुनश्च ऊर्मी आली. त्या मेलेल्या माणसाला पाहाण्यासाठी रेंगाळणाऱ्या कैद्यांना तलवारीच्या सपाट बाजूंनी बडवीत ते हाकलू लागले.

चिंचोळ्या रस्त्यांवरून कैदी सैनिकांच्या पहाऱ्यात कूच करीत होते. संरक्षक सैनिकांच्या गाड्या मागून येत होत्या. ते पुरवठा केंद्राजवळ आले तेव्हा मोठ्या कष्टाने सरकणाऱ्या तोफखान्याच्या लांबलचक रांगेत आणि तीतच मिसळलेल्या खासगी मालवाहू गाड्यांमध्ये सापडले.

पुलापाशी ते सगळेच थांबले. पुलावरून कैद्यांना पुढे सरकणाऱ्या आणि मागाहून येणाऱ्या मालवाहू गाड्यांची न संपणारी रांगच रांग दिसत होती. उजव्या बाजूसही दूरवर जाणारी सैनिकांची व मालगाड्यांची रांगच रांग दिसत होती. हे सगळे सैनिक सर्वांच्या आधी निघालेल्या बोआर्नेच्या पलटणीतील होते. मागच्या बाजूला नदीच्या काठाने आणि कॅमनी पुलावरून नेच्या नेतृत्वाखाली पलटणी आणि मालवाहू गाड्या चालल्या होत्या.

कैदी प्रत्येक वेळी थोडीशी वाटचाल करीत आणि मग थांबत. पुन्हा पुढे सरकत. सर्व-बाजूंनी वाहने आणि माणसे यांची गर्दी वाढतच होती. पूल आणि कॅलुगा रस्ता यांमधे पाच-सहाशे पावलांचे अंतर असेल नसेल पण ते ओलांडायला कैद्यांना एक तास लागला. मग ते कैदी ट्रान्समॉस्क्वा भागातील रस्ते आणि कॅलुगा रस्ता मिळून जेथे चौक बनतो त्या ठिकाणी पोचले. त्या ठिकाणी एवढी गर्दी झाली होती की त्यांना कित्येक तास थांबावे लागले. सर्व बाजूंनी समुद्राच्या गाजेसारखा सतत आवाज येत होता, चाके खडखडत होती, घोड्यांच्या टापा सुरू होत्या, माणसे सतत रागारागाने डाफरत होती, शिव्या देत होती. जळून गेलेल्या घराच्या भिंतीला रेलून उभा असलेला पीएर चिरडला जात होता. अधिक चांगल्या तऱ्हेने दिसावे म्हणून कितीतरी रशियन अधिकारी त्या घरावर चढले होते.

'काय ही गर्दी ! किती ही माणसं ! त्यांनी तोफांच्या गाड्यांवरही सामान चढवलं आहे. ते लोकरीचे कपडे बघ.' ते बोलत होते. 'हरामखोरांनी लूट केलेली आहे. त्या गाडीमागच्या माणसानं काय आणलं बघ ! अरे देवा ! त्या तर पवित्र प्रतिमा आहेत. ते जर्मन शेतकरी असावेत...तो रशियन शेतकरी आहे. छे छे ! सगळे हरामखोर आहेत...तो तो बघ ओझ्यानं कसा वाकला आहे, चालताच येत नाही आहे त्याला. त्या गाड्या बघा. त्यांना त्या कुठं सापडल्या देव जाणे तो बघ कसा पेट्यांवर बसला आहे...अरे देवा ! ते तर मारामारी करायला लागले आहेत. ठीक झालं. त्याला अगदी तोंडावर ठोसा बसला...अशानं आम्ही संध्याकाळपर्यंत काही पोचणार नाही. तिकडे पाहिलस का ? खात्रीनं तो नेपोलिअन असणार... ते घोडे दिसले का ? ते घर उचलून नेण्याजोगं आहे. त्याची पिशवी पडली पण त्याला ते कळलेलं दिसत नाही. पुन्हा मारामारीला सुरुवात झाली. ती बाई दिसली का ? बरोबर मूल घेतलं आहे ती ? चांगली दिसते आहे. शंकाच नाही. अशाच तऱ्हेनं ते तिला जाऊ देणार आहेत...अरे सारखी रीघ लागली आहे. मी खात्रीनं सांगतो त्या स्त्रिया रशियन आहेत.

त्या किती आरामात गाडीत बसल्या आहेत ! '

चर्चेजवळ येताच कैद्यांमध्ये जिज्ञासेची लाट पसरली. ते सगळे रस्त्याच्या दिशेने सरकू लागले. पीएरला आपल्या उंचीचा फायदा मिळाला. कैद्यांमधे कुतूहल निर्माण करणारी गोष्ट तो सर्वांच्या डोक्यांवरून पाहू लागला. दारूगोळा नेणाऱ्या गाड्यांतील तीन गाड्या अडकून राहिल्या होत्या. त्यामधे कितीतरी स्त्रिया होत्या. त्यांनी तोंडाला रूज लावला होता, भडक पोशाख केले होते, गाड्यांत त्या दाटीवाटीने बसल्या होत्या आणि कर्कश स्वरात ओरडून काहीतरी सांगत होत्या.

गूढ शक्तीचा साक्षात्कार झालेल्या क्षणापासून पीएरला गमतीखातर तोंडाला काळे फासून ठेवलेले प्रेत, घाईघाईने जाणाऱ्या ह्या बाया, मॉस्को शहराचे जळून गेलेले भाग यांपैकी कोणतीच गोष्ट विचित्र किंवा भयानक वाटेनाशी झाली. आता पीएरने जे सारे पाहिले त्याचा त्याच्या मनावर कसलाच ठसा उमटला नाही. जणू नव्या कष्टाची तयारी करू पाहाणारे त्याचे मन कमकुवत करणाऱ्या कोणत्याही संस्काराचें स्वागत करू इच्छीत नव्हते.

स्त्रिया असलेल्या गाड्या निघाल्या, त्यांच्यामागून सैनिक, मालवाहू गाड्या, घोडागाड्या, त्यांच्यामागून पुन्हा सैनिक, तोफखान्याच्या गाड्या, पुन्हा त्यांच्या मागून सैनिक आणि अधूनमधून स्त्रियांना नेणाऱ्या गाड्या निघाल्या.

तुकडीच्या प्रमुख अधिकाऱ्याने आपल्या सैनिकांना एकत्र केले. आरडाओरड करीत, भांडत त्याने मालवाहू गाड्यांमधून मार्ग काढला, सर्व बाजूंनी वेढलेले कैदी एकदाचे कॅलुगा रस्त्याला लागले तेव्हा रात्र पडली होती.

कुठे न थांबता ते भराभर कूच करीत होते. सूर्य मावळत असताना काय ते थांबले. मालवाहू गाड्या एकमेकींना जोडून ठेवण्यात आल्या, सैनिक रात्रीच्या मुक्कामाला सज्ज झाले. प्रत्येकजण वैतागलेला चिडलेला दिसत होता. कितीतरी वेळ सगळीकडे शिव्याशाप, आरडा-ओरड, मारामाऱ्या ऐकू येत होत्या. कैद्यांबरोबर असलेल्या तुकडीमागून एक गाडी येत होती. तिचा एक दांडा ह्या गाड्यांपैकी एका गाडीत घुसला. कित्येक सैनिक चारी बाजूंनी गाडीकडे धावले. घोड्यांना परतवत असताना काहींनी त्यांच्या डोक्यावर रट्टे हाणले. काहींची आपापसात मारामारी सुरू झाली. एका जर्मन सैनिकाच्या डोक्यावर तलवारीच्या चपट्या बाजूने गंभीर इजा केल्याचे पीएरला दिसले.

या मुक्कामात कैद्यांना प्रारंभापेक्षा अधिक वाईट वागणूक दिली गेली. त्यांना त्या दिवशी प्रथमच घोड्यांचे मांस खाण्यास देण्यात आले.

प्रारंभी संरक्षक पथकांतील अधिकाऱ्यांपासून सामान्य सैनिकापर्यंत प्रत्येकजण प्रत्येक कैद्याशी मित्रत्वाने वागे. आता मात्र प्रत्येकजण आश्चर्य वाटेल इतक्या द्वेषाने प्रत्येक कैद्याला वागवीत असल्याचे दिसत होते.

एक रशियन कैदी सैनिक रस्त्यापासून फार दूर गेला म्हणून एका फ्रेंच सैनिकाने त्याला निर्दयपणे बदडलेले पीएरने पाहिले. कैदी पळून गेला म्हणून आपल्या हाताखालील अधि-

काऱ्याला त्याचा मित्र कॅप्टन तडकावीत होता, कोर्ट मार्शलची धमकी देत होता ते पीएरच्या कानांवर पडले. ' कैदी आजारी होता, त्यामुळे चालू शकत नव्हता, ' असे त्या हाताखालील अधिकाऱ्याने उत्तर दिले तेव्हा कॅप्टन म्हणाला, ' जे मागं रेंगाळतील त्यांना गोळ्या घाला असा माझा हुकूम आहे. '

सूर्यास्त केव्हाच झाला होता. थोड्या काळापूर्वी पेटणाऱ्या काटक्यांच्या आणि गप्पा मारणाऱ्या सैनिकांच्या आवाजाने गजबजलेली तंबूशिवाय असलेली ती विशाल अमर्याद छावणी आता शांत, स्तब्ध झाली. शेकोटीचा लाल विस्तव आता मंद, अंधुक होऊ लागला. निरभ्र आकाशात माथ्यावर पूर्ण चंद्रबिंब होते. छावणीच्या पलीकडे दूरवर पसरलेली अरण्ये आणि मैदाने मघा दिसत नव्हती ती आता दिसू लागली. त्या अरण्यांच्या आणि मैदानांच्या पलीकडे थरथरते, उजळ, भुलवणारे अमर्याद क्षितिज पसरले होते. पीएरने आकाशाकडे, दूरवर चमकणाऱ्या ताऱ्यांकडे पाहिले. ' हे सारं माझं आहे. हे सारं माझ्यात आहे. हे सारं मीच आहे. ' पीएरला वाटू लागले. ' आणि हे सारं त्यांनी फळ्यांनी बंद केलेल्या कोठडीत कोंडून ठेवलं आहे ! ' विचारासरशी त्याने स्मित केले आणि तो आपल्या दोस्तांच्या शेजारी पडून झोप घेण्यासाठी तिथून निघाला.

गेले चार दिवस पाऊस पडत होता. दीड तासात दोन वेळा घोडे बदलून बोल्हॉविटिनॉव्हने वीस मैलांचा चिखलाचा निसरडा रस्ता पार केला. रात्री एक वाजता तो लेटशेव्कोला पोचला. एका झोपडीभोवतालच्या कुंपणावर ' जनरल स्टाफ ' अशी पाटी लटकावली होती. तिथे तो घोड्यावरून उतरला आणि घोडा सोडून अंधाऱ्या वाटेने आत शिरला.

' ड्यूटीवर असलेल्या जनरलना ताबडतोब भेटायचं आहे. अतिशय महत्त्वाचं काम आहे.' कोणालातरी त्याने ओरडून सांगितले. तेथे असलेल्या माणसाच्या घशाची घरघर अंधारात ऐकू येत होती. तो ताडकन उठला.

' संध्याकाळपासून जनरल साहेबांना बरं नाही. गेल्या तीन रात्री त्यांना झोप नाही.' ऑर्डर्लीनं हलक्या आवाजात सांगितले आणि सुचवले, ' आधी कॅप्टन साहेबांना उठवा, '

' जनरल डॉतुरॉव्ह यांजकडून महत्त्वाचा निरोप घेऊन मी आलो आहे. ' ' उघडलेल्या दारातून चाचपडत आत जाताना बोल्हॉविटिनॉव्हने म्हटले.

ऑर्डर्ली त्याच्या अगोदर आत जाऊन कोणाला तरी उठवू लागला होता. ' महाराज, महाराज, निरोप आला आहे.

' काय ? काय म्हणालास ? कोणाकडून ? ' अर्धवट झोपेतच कोणीतरी विचारू लागला.

' डॉतुरॉव्ह आणि अलेक्सी पेट्रॉविच यांच्याकडून. नेपोलिअन फॉमिन्स्कोला येऊन पोचला आहे. ' बोल्हॉविटिनॉव्हला अंधारात कोण बोलत होता ते दिसले नाही, परंतु आवाजावरून

ती व्यक्ती कानोव्हिनित्स्यिन नसावी असे गृहीत धरून त्याने उत्तर दिले.

त्या माणसाला उठवण्यात आले, त्याने जांभई दिली आणि आळोखेपिळोखे दिले. काहीतरी शोधीत तो म्हणाला, 'मी त्यांना काही उठवणार नाही. ते आजारी आहेत. कदाचित ही अफवा असेल.'

'हा रिपोर्ट घ्या. ड्यूटीवर असलेल्या जनरलांना रिपोर्ट त्वरित देण्याचा मला हुकूम आहे.' वोल्हॉविटिनॉव्ह म्हणाला.

'जरा थांबा. मी दिवा लावतो. हरामखोरानं वस्तू कुठं ठेवल्या आहेत कळत नाही.' ऑर्डर्लीला उद्देशून झोपाळू सुरात शब्द उच्चारले गेले. हे शब्द उच्चारणारी व्यक्ती होती कॉनॉव्हिनित्स्यिनचा ॲडज्युटंट श्चेर्बिनिन. 'मला सापडली एकदाची.' तो म्हणाला.

ऑर्डर्लीने काडी पेटवली. श्चेर्बिनिन मेणबत्ती शोधू लागला. त्याने वैतागाने ऑर्डर्लीला एक शिवी हासडली. काडीच्या प्रकाशात वोल्हॉविटिनॉव्हला तरुण श्चेर्बिनिनचा चेहरा ओझरता दिसला. कोपऱ्यात झोपी गेलेला दुसरा मनुष्य दिसला. तो होता कॉनोव्हिनित्स्यिन.

काडीची ज्योत प्रथम निळी, नंतर लाल झाली. श्चेर्बिनिनने मेणबत्ती पेटवली तशी मेणबत्ती कुरतडणारी झुरळे चारी दिशांना पांगली. श्चेर्बिनिनने हाताकडे पाहिले. वोल्हॉविटिनॉव्ह चिखलाने पुरता माखून निघाला होता. बाहीने चेहरा पुसताना त्याचा चेहराही माखून गेला होता.

लखोटा घेता घेता श्चेर्बिनिनने त्याला विचारले, 'ही बातमी कोणी पाठवली ?'

'बातमी विश्वसनीय आहे. कैदी, कोसॅक आणि हेर सर्वजण अशीच बातमी देताहेत.' वोल्हॉविटिनॉव्ह म्हणाला.

श्चेर्बिनिन उठला आणि नाइटकॅप घातलेल्या आणि मिलिटरी झगा पांघरून झोपलेल्या व्यक्तीकडे जाता जाता म्हणाला, 'आता उठवल्याखेरीज गत्यंतर नाही.'

'प्योत्र पेट्रॉनिच,' त्याने हाक मारली परंतु कोनॉव्हिनित्स्यिनने हालचाल केली नाही. 'हेड-क्वॉर्टर्सकडून निरोप आला आहे.' स्मित करीत तो म्हणाला. अशा शब्दांनी तो निश्चित उठेल याची त्याला खात्री होती. आणि खरेच. त्या शब्दांसरशी नाइटकॅप घातलेली ती व्यक्ती एकदम उठली.

कोनॉव्हिनित्स्यिनचे डोळे तापाने लाल झाले होते. त्याच्या निश्चयी देखण्या चेहऱ्यावर क्षणभर दूरस्थ, स्वप्नात असल्यासारखे भाव उमटून गेले, त्याची मुद्रा नेहमीसारखी शांत आणि निश्चयी झाली.

प्रकाशात डोळे किलकिले करीत त्याने संथपणे एकदम विचारले, 'काय आहे? कुणा-कडून आलात?' मग अधिकाऱ्याने सांगितलेले ऐकून कोनॉव्हिनित्स्यिनने लखोटा उघडला आणि वाचण्यास सुरुवात केली. पत्र वाचून होते न होते तोच त्याने लोकरी पायमोजे घातलेले पाय जमिनीवर ठेवून बूट चढवले. मग त्याने नाइटकॅप काढली आणि केस विंचरून साधी चपटी लष्करी कॅप चढवली.

' तुम्ही तावडतोब इकडे आलात काय ? चला, आपण आता कमांडर-इन्-चीफ्-कडे जाऊ.'

सर्व वृद्धांप्रमाणे कुटूझॉफही रात्री फार थोडा वेळ झोप घेई. दिवसा त्याला वारंवार एकदम डुलकी येई. रात्री तो कपडे न बदलताच अंथरुणावर पडे आणि त्यावेळी तो जागा राहून विचार करीत राही.

आतादेखील तो असाच पलंगावर पहुडला होता. एक डोळा सताड उघडा ठेवून अंधारात नजर लावून तो विचार करीत होता.

झारशी पत्रव्यवहार करणारा आणि स्टाफवरील सर्वांत वजनदार अधिकारी बेनिंग्सन त्याला टाळत होता त्यामुळे कुटूझॉफ बराच आरामात होता. त्याला आता कोणी निरुपयोगी चढाई करण्यासाठी सैन्याचे नेतृत्व करण्याला भाग पाडत नव्हता.

त्याच्या मनात येत होते, ' आम्ही चढाई केली तर आमचा पराभव होणार हे त्यांनी ओळखलं पाहिजे. योग्य काळ आणि चिकाटी यांना मी माझे समर्थ सहकारी मानतो.' सफरचंद कच्चे असताना तोडता नये हे कुटूझॉफला ठाऊक होते. पिकल्यावर ते आपोआप खाली पडेल. परंतु ते कच्चे असताना तुम्ही तोडले तर बिघडवून टाकाल, झाडाला इजा कराल आणि तुमचे दात आंबतील. जनावर जखमी झाले आहे— सबंध रशियन फौज जेवढी जखम करू शकेल तेवढी जखम फ्रेंच सैन्याला झाली आहे हे एखाद्या अनुभवी शिकाऱ्याप्रमाणे त्याने हेरले होते. मात्र ते जखमी जनावर मरेल की नाही ते त्याला एवढ्यात सांगता येत नव्हते. लॉरिस्टन आणि बर्टेमि यास त्याच्याकडे पाठवण्यात आले होते आणि गनिमी सैनिकांकडून वार्ता येत होत्या त्यांवरून झालेली जखम प्राणांतिक आहे अशी कुटूझॉफची पक्की खात्री झाली होती. पण त्याला अधिक पुरावा हवा होता. त्यासाठी तो थांबला होता.

' धावत जाऊन आपण त्याला कसं जखमी केलं हे त्यांना पाहायचं आहे. अरे, थोडा दम धरा. मग दिसणारच आहे. सारखे डावपेच, हल्ले, अरे कशासाठी ? स्वतःला प्रसिद्धी मिळवण्यासाठी ! यांना लढाई म्हणजे गंमत वाटते आहे. सगळे लहान पोरांसारखे आहेत. पोरांना परिस्थितीची अचूक कल्पना नसते, आपण किती चांगल्या तऱ्हेनं लढू शकतो एवढंच त्यांना दाखवायचं असतं. पण यावेळी ती गोष्ट महत्त्वाची नाही. हे सगळं किती कुशल डावपेच सुचवीत आहेत ! दोन अगर तीन आकस्मिक घटनांचा विचार केला आहे असं वाटू लागतं. खरं तर अशा आकस्मिक घटना अनंत असतात.'

बोरोदीनॉ येथे केलेली जखम प्राणांतिक ठरेल काय ? गेला महिनाभर त्याचे उत्तर मिळाले नव्हते. कुटूझॉफ अत्यंत बेचैन झाला होता. तिकडे फ्रेंचांनी मॉस्को शहर जिंकले होते. इकडे सर्व शक्तीनिशी सर्व रशियनांच्या मदतीने हाणलेला भीषण तडाखा निश्चितच प्राणांतिक ठरणार

असे कुटूझॉफला वाटत होते. पण काही झाले तरी पुरावा हवा होता. गेला महिनाभर तो त्याची वाट पाहात होता. जसजसा वेळ जाऊ लागला तसतशी त्याच्या जिवाची घालमेल होऊ लागली. आता रात्र रात्र तो अंथरुणावर झोपेवाचून तळमळू लागला. ज्या गोष्टीबद्दल तो तरुण जनरलांना दोष देत होता तीच गोष्ट तो स्वतः करू लागला. त्या तरुण जनरलां-प्रमाणे तोही शक्य त्या सर्व आकस्मिक घटना कल्पू लागला. मात्र त्यांच्याप्रमाणे त्याने गृहीत घटनांवर कसलेही निर्णय आधारले नाहीत. त्यांना सुचल्या नव्हत्या अशा हजारो घटना त्याच्या मनात येऊ लागल्या. तो जो जो जास्त विचार करी तो तो त्याला अधिकाधिक आकस्मिक घटना सुचू लागत. नेपोलिअनच्या फौजेच्या सर्व प्रकारच्या हालचालींची तो कल्पना करू लागला. नेपोलिअन सबंध फौज घुसवील नाहीतर त्याचा एकेक विभाग चढाई करील. तो कदाचित पीटर्झबर्गवर हल्ला करील, कदाचित आपल्यावर हल्ला करील, कदाचित त्याची फौज आपल्या छावण्यांपलीकडे पसरेल. (या विचाराने मात्र कुटूझॉफ भयभीत झाला) प्रत्यक्ष नेपोलिअन आपली युक्ती योजून आपल्याविरुद्ध लढेल म्हणजे आपल्या चढाईची वाट बघत मॉस्कोमध्येच तळ देऊन राहील. कुटूझॉफच्या डोक्यात नाना कल्पना येऊ लागल्या. नेपोलिअनच्या फौजा मिडिन आणि युनॉव्ह यांकडे मागे परततील असेही त्याला वाटे. पण प्रत्यक्षात जे घडले ते मात्र त्याला आधी ताडता आले नव्हते. मॉस्कोहून कूच केल्यानंतर पहिल्या अकरा दिवसांत नेपोलिअनचे सैनिक भ्रमिष्टासारखे पळत होते, त्यांची दाणादाण उडाली होती. या पळापळीमुळेच फ्रेंचांचा सर्वनाश ओढवला. परंतु असे होईल अशी कल्पना करण्याचे धाडस कुटूझॉफला झाले नव्हते. डॉरहॉव्हने ब्रुसिएच्या डिव्हिजनबद्दल केलेला रिपोर्ट, नेपोलिअनच्या सैन्याच्या हालअपेष्टांबाबत गनिमी सैनिकांनी आणलेली वार्ता, मॉस्को सोडण्यासाठी चाललेल्या तयारीबाबतच्या अफवा या सर्व गोष्टींमुळे फ्रेंच सैन्य पराभूत झाले असून पळण्याच्या बेतात आहे ह्या समजुतीला बळकटी मिळत होती. पण ही केवळ समजूत होती. तरुणांना ती खरी वाटत होती. पण कुटूझॉफला तिच्यात तथ्य वाटत नव्हते. अशा समजुतीला किती महत्त्व द्यावे हे साठ वर्षांचा अनुभव पदरी असल्याने त्याला चांगले ठाऊक होते. आपल्या इच्छेला पोषक असा पुरावा बदलून मांडायला लोक कसे तयार असतात, अशा वेळी ते विरुद्ध जाणाऱ्या गोष्टींकडे किती सहजतेने दुर्लक्ष करतात हे त्याला माहीत होते. आपला हा विचार बरोबर आहे असे त्याला वाटू लागले तसतसा त्याचा त्या समजुती-वरील विश्वास उडू लागला. त्याच्या मनाने त्या एकाच प्रश्नाचा ध्यास घेतला. बाकीच्या सर्व गोष्टी त्याच्या दृष्टीने दैनंदिन जीवनातील होत्या. दैनंदिन जीवनातील कामे सुरूच होती. स्टाफ अधिकाऱ्यांशी तो चर्चा करीत होता, फ्रेंच कादंबऱ्या वाचीत होता, बक्षिसे देत होता, पीटर्झबर्गशी पत्रव्यवहार ठेवीत होता आणि अशीच इतर दैनंदिन कामे पार पाडत होता. फ्रेंच सैन्याचा पाडाव होणार हे त्याने एकट्यानेच ताडले होते आणि त्याच्या अंतः-करणाला त्या एकाच गोष्टीचा ध्यास लागला.

अकरा ऑक्टोबरच्या रात्री तो हातांवर रेलून त्याच गोष्टीचा विचार करीत होता.

शेजारच्या खोलीत हालचाल झाली. त्याला टॉल, कोनॉव्नित्स्यिन आणि बोल्हॉविटिनॉव्ह यांची पावले ऐकू आली.

'कोण आहे तिकडे ? इकडे आत या. काही नवीन बातमी आहे का ?' कमांडर-इन्-चीफने विचारले.

नोकर मेणबत्ती लावीत असताना टॉलने थोडक्यात बातमी सांगितली.

'बातमी कोणी आणली ?' कुटूझॉफने विचारले. त्याचा चेहरा उग्र, करारी वाटत होता.

'बातमीबद्दल संशय नाही महाराज.'

'त्याला इकडे बोलाव.'

कुटूझॉफ एक पाय बिछान्याबाहेर सोडून बसला होता. त्याने दुमडून घेतलेल्या पायावर त्याचा जाडजूड ऐसपैस देह होता. निरोप घेऊन आलेला माणूस अधिक स्पष्टपणे दिसावा म्हणून ज्या डोळ्याने दिसत होते तो डोळा किलकिला करून पाहात होता. आपल्या प्रश्नाचे उत्तर मिळेल अशी आशा त्याच्या मुद्रेवर उमटली होती.

छातीशी उघडा असलेला शर्ट नीट करीत कुटूझॉफ क्षीण वृद्ध आवाजात बोल्हॉविटिनॉव्हला म्हणाला,

'गड्या, काय ते सांगून टाक. जवळ ये. आणखी जवळ ये. तू बातमी आणली आहेस तरी कोणती ? नेपोलिअन सैन्यासह मॉस्कोच्या बाहेर पडला आहे ? ही बातमी अगदी खरी आहे ? तुला खात्री आहे ?'

बोल्हॉविटिनॉव्हने सगळी बातमी सांगितली. आणि तो हुकमाची वाट पाहात थांबला. टॉल बोलू लागला पण कुटूझॉफने त्याला थांबवले. त्याने काहीतरी सांगण्याचा प्रयत्न केला पण एकाएकी त्याचा चेहरा वेडावाकडा झाला, त्यावर सुरकुत्या पडल्या. टॉलच्या दिशेने हात करीत तो झोपडीच्या एका कोपऱ्याकडे वळला. तो कोपरा पवित्र प्रतिमांमुळे काळा दिसत होता.

हात जोडीत थरथरत्या आवाजात तो उद्‌गारला, 'प्रभो, तू आमची प्रार्थना ऐकली आहेस. रशियाचा नाश टळला आहे. प्रभो, मी तुझा उतराई आहे.'

त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले.

त्यानंतर मोहीम संपेपर्यंत आपल्या सैन्याने नष्ट होऊ घातलेल्या शत्रुसैन्यावर व्यर्थ हल्ले करू नयेत वा त्यांच्याशी चकमकी करू नयेत म्हणून कुटुझॉफने आपल्या अधिकाराचा, डावपेचांचा आणि विनवण्यांचा उपयोग करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्याच्या काही सैन्याने फ्रेंचांचा पाठलाग केला. परंतु कुटूझॉफ मात्र सैन्याच्या मुख्य मोठ्या विभागाबरोबर रेंगाळत राहिला. असे असूनही फ्रेंच सैन्य धूम पळत होते.

एकाएकी ग्रँड आर्मीचे सैनिक असणारी माणसे आता आपल्या प्रमुखांसह वाट फुटेल तिकडे पळत होती. नेपोलियन काय—कोणताही सैनिक काय आपणाला शक्य तितक्या लवकर पळ कसा काढता येईल हे पाहात होता.

कुटूझॉफ सोडल्यास दुसऱ्या कोणत्याही रशियन जनरलच्या ध्यानात ही गोष्ट आली नाही. जेव्हा फ्रेंच सैन्याने स्मॉलेन्स्क रस्त्यावरून शेवटची माघार घ्यायला सुरुवात केली तेव्हा कुटूझॉफची भविष्यवाणी खरी ठरू लागली. माघार घेणाऱ्या शत्रुसैन्यावर हल्ला करावा, त्याला अडवावे, त्यातील काहींना कैद करावे आणि नाव कमवावे असे रशियन सैन्यातील सर्व अधिकाऱ्यांना वाटू लागले. सगळेजण लढाईच्या हुकमाची मागणी करू लागले.

हल्ला करण्याची ही ओढ कुटूझॉफने आपल्या सर्व शक्ती वापरून थोपवून धरली. सगळेजण त्याला हसू लागले, त्याबद्दल वाटेल ते बोलू लागले. माघार घेत असताना फ्रेंच सैन्य लढाई न करताच आपोआप नष्ट होत जाणार आहे, अशा वेळी त्यांचा रस्ता रोखून त्यांच्यावर हल्ले करून आपले सैनिक गमावून काही साधणार नाही हे त्या जनरलांना आणि इतर अधिकाऱ्यांना कळले नव्हते.

दीर्घ अनुभवाने शहाणपण आलेल्या कुटूझॉफला ते केव्हाच कळले होते.

■ ■

# भाग चौदावा

## १८१२

शत्रूने स्मॉलेन्स्कमध्ये प्रवेश केल्यापासून तथाकथित गनिमी काव्याच्या युद्धास प्रारंभ झाला. रशियाच्या सरकारने नियमबाह्य युद्धाला मान्यता देण्यापूर्वी कोसॅकांनी आणि शेतकऱ्यांनी शत्रूच्या लुटालूट करणाऱ्या, रस्ता सोडून पांगलेल्या आणि वैरणीसाठी हिंडणाऱ्या कित्येक सैनिकांना ठार मारले.

नियमबाह्य अशी पहिली तुकडी—ती डेव्हिडॉव्हची होती.—२४ ऑगस्ट रोजी तयार झाली. नंतर लवकरच इतर तुकड्या तयार झाल्या. मोहीम सुरू झाल्यावर अधिकाधिक तुकड्या उभ्या होऊ लागल्या.

ह्या अनधिकृत सैन्याने हप्त्याहप्त्याने नेपोलियनच्या सैन्याचा फडशा पाडला.

ऑक्टोबरच्या दरम्यान जेव्हा फ्रेंच सैन्य स्मॉलेन्स्कला पळ काढत होते, तेव्हा अशा शेकडो तुकड्या होत्या. त्यांच्या संख्येत आणि स्वरूपात खूप तफावत होती. काही तुकड्यांमध्ये फौजेमध्ये असणाऱ्या नित्याच्या गोष्टी म्हणजे पायदळ, तोफखाना, स्टाफ ऑफिसर आणि इतर आवश्यक त्या सोयी होत्या.

काही तुकड्यांत केवळ कोसॅक घोडदळाचे सैनिक होते. काही तुकड्या म्हणजे थोड्याफार सैनिकांची पथके होती, त्यातील काहींजवळ घोडे होते, काही घोड्यांवाचून होते. काही तुकड्यांमध्ये शेतकरी होते किंवा जमीनदार होते, आणि त्यांची कायम कुळे होती. ज्यांची नावे माहीत नव्हती. अशा पथकाचे नेतृत्व डीकन करीत होता. त्याने महिन्यामधे शेकडो सैनिकांना कैद केले. अशाच एका तुकडीत एका प्रमुख गावकऱ्याची पत्नी होती. तिने शेकडो फ्रेंच सैनिकांना ठार केले.

अनधिकृत तुकडीचा प्रमुख असलेला डेनिसॉव्ह बावीस ऑक्टोबर रोजी ह्या अनधिकृत युद्धातील एका खास कामगिरीत उल्हासाने भाग घेत होता. भल्या सकाळपासून तो राजरस्त्याला लागून असलेल्या जंगलातून आपल्या सैनिकांबरोबर फिरत होता, संरक्षक दलाबरोबर घोडदळाचे सामानसुमान व रशियन कैदी नेले जात होते. इतर फ्रेंच सैन्यापासून हा भाग मागे पडला होता. मजबूत संरक्षण दलाच्या मदतीने घोडदळ व रशियन कैदी स्मॉलेन्स्कला जात होते. ( टेहळे आणि रशियन कैदी यांच्याकडून त्यांना हे समजले होते. ) डेनिसॉव्हला आणि त्याच भागात हालचाली करणाऱ्या दुसऱ्या एका तुकडीचा प्रमुख असलेल्या डोलोहॉव्हलाच ह्या संरक्षण घेऊन जाणाऱ्या शत्रूची बातमी लागली होती असे नव्हे. स्टाफ ऑफिसर असलेल्या मोठ्या तुकड्यांच्या काही जनरलांना देखील ह्या संरक्षित दलाची खबर लागली होती. त्यामुळे डेनिसॉव्हच्या भाषेत, त्यांच्याही तोंडाला पाणी सुटले.

दोन जनरलांनी—त्यातला एक पोल होता, दुसरा जर्मन होता—जवळ जवळ एकाच वेळी डेनिसॉव्हला आपल्या तुकडीत येऊन शत्रूच्या तुकडीवर हल्ला करण्यास बोलाविले.

' दोस्त हो ! मी काही कालचा पोर नाही. ' कागदपत्रे वाचून डेनिसॉव्ह म्हणाला. त्याने जर्मन जनरलला लिहिले, ' तुमच्यासारख्या निष्णात व प्रख्यात जनरलच्या हाताखाली काम करण्याची उत्कट इच्छा होती. परंतु मी अगोदरच पोलिस जनरलच्या हाताखाली नोकरी करीत असल्यामुळं मला त्या सुखाला मुकावं लागलं आहे. ' त्याने पोलिश जनरलला तसेच कळवले. ' मी अगोदरपासून जर्मन जनरलच्या हाताखाली नोकरी करीत आहे.'

डेनिसॉव्हने अशा तऱ्हेने ती अडचण दूर केली. त्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांना याबद्दल काही कळवले नाही. डोलोहॉव्हच्या मदतीने आपल्या छोट्या सैन्याला घेऊन हल्ला करून शत्रूला लुटावे असा त्याने बेत केला. बावीस ऑक्टोबर रोजी शत्रूच्या मालवाहू गाड्या मिकुलिनॉ खेड्याकडून शॅमशेव्हा खेड्याकडे चालल्या होत्या. मिकुलिनॉ आणि शॅमशेव्हा यांमधील रस्त्याच्या डाव्या बाजूला मोठी अरण्ये होती. मधून मधून ती रस्त्याला भिडलेली होती. मधून मधून ती मैल, पाऊण मैल रस्त्यापासून दूर होती.

डेनिसॉव्ह आपली निवडक माणसे घेऊन ह्या अरण्यातून दिवसभर घोड्यावरून फिरत होता. कधी आत अरण्यात जात होता, कधी बाहेर कडेला जात होता. पण केव्हाही पुढे पुढे सरकणाऱ्या फ्रेंचांना डोळ्याआड होऊ देत नव्हता. मिकुलिनॉपासून जवळच जंगलाजवळून जाणाऱ्या, रस्त्यावर खोगिरे वाहून नेणाऱ्या दोन फ्रेंच गाड्या रुतून बसल्या होत्या. डेनिसॉव्हच्या तुकडीतील कोसॅकांनी त्यांच्यावर हल्ला केला आणि त्या गाड्या ते दूर अरण्यात घेऊन गेले. तेव्हापासून रात्रीपर्यंत त्यांनी हल्ला न करता फ्रेंचांच्या हालचालीवर पाळत ठेवली. त्यांना आता फ्रेंचांना घाबरवून टाकायचे नव्हते, त्यांना ते आता शॅमशेव्हापर्यंत शांतपणे जाऊ देणार होते. शॅमशेव्हापासून पाऊण मैलावरील पहारेकऱ्यांच्या झोपडीपाशी डोलोहॉव्ह त्या रात्री त्यांच्याबरोबर हल्ल्यात भाग घेण्यासाठी थांबला होता. त्याला घेऊन ते दोन्ही बाजूंनी वर्षाच्या कड्याप्रमाणे फ्रेंचांच्या डोक्यावर कोसळणार होते आणि त्या

सगळ्यांना पहिल्याच तडाख्यासरशी कैद करणार होते.

सहा कोसॅकांना मिकुलिनॉपासून सव्वा मैलावर अरण्य येऊन भिडते तिथे रस्त्यालगत ठेवण्यात आले. फ्रेंचांच्या सैन्याच्या आणखी तुकड्या दिसताक्षणीच ते खबर आणणार होते.

त्याच प्रकारे शॅमशेव्हॉच्या समोर रस्त्याची टेहळणी करून फ्रेंच सैन्य किती अंतरावर आहे ते डोलोहॉव्ह पाहणार होता. वाहतूक असणाऱ्या गाड्यांबरोबर संरक्षण देणारे पंधराशे सैनिक असावेत अशी कल्पना होती. डेनिसॉव्हकडे दोनशे सैनिक होते आणि डोलोहॉव्हपाशी तेवढेच किंवा थोडे अधिकच सैनिक होते. शत्रूचे सैनिक संख्येने जास्त होते. ही डेनिसॉव्हला अडचणीची गोष्ट नव्हती.

आता पाऊस पडत होता तरी हवेत गारवा नव्हता. आकाश व क्षितिज यांना एकच गढूळलेल्या पाण्याचा रंग आला होता. मधून मधून धुके पडल्यासारखे वाटे आणि मग पाऊस एकदम जोराने तिरप्या रेषेत पडू लागे.

डेनिसॉव्ह रोडावलेल्या चांगल्या जातीच्या घोड्यावर स्वार झाला होता. त्याचा लांब झगा आणि उंच फर–कॅप चिंब भिजून ठिबकत होती. त्याने आपली मान कलती केली होती. घोड्याप्रमाणे कान टवकारून तो जोराने पडणाऱ्या पावसाकडे आठ्या घालून पाहात होता. तो चिंतामग्न दिसत होता. त्याचा चेहरा कृश झाला होता. दाट छोट्या काळ्याभोर दाढीने झाकलेला त्याचा चेहरा चिडखोर दिसत होता.

डेनिसॉव्हच्या शेजारीच तुळतुळीत, कणखर डन घोड्यावर डेनिसॉव्हप्रमाणेच लांब झगा व टोपी घातलेला इसॉल ( कोसॅकांचा पोलिश कमांडर ) स्वार झाला होता. तो ह्या साहसात भाग घेणार होता.

त्यांच्यापुढे काही अंतरावर मार्गदर्शकाचे काम करणारा एक शेतकरी चालला होता. त्याचा राखी रंगाचा कोट आणि पांढरी टोपी पार भिजून गेली होती.

त्यांच्या मागे थोड्या अंतरावरून निळा फ्रेंच मिलिटरी कोट घातलेला एक तरुण ऑफिसर झुपकेदार शेपूट आणि आयाळ असलेल्या आणि रक्तबंबाळ तोंड झालेल्या हाडकुळ्या नाजूक किरगीज तट्टावरून येत होता. त्यांच्यामागून एक हुझार ( घोडदलाचा सैनिक ) येत होता. त्याच्या मागेच घोड्यावर फाटक्या फ्रेंच गणवेषातील एक मुलगा बसला होता. त्या मुलाने थंडीने लाल झालेल्या आपल्या हातांनी त्या हुझाराला पकडले होते आणि गरम राहण्यासाठी आपले उघडे पाय तो हलवीत होता. डोळे वर उचलून तो भोवताली आश्चर्याने पाहत होता. हा ड्रम वाजविणारा मुलगा फ्रेंच होता. सकाळीच त्याला कैद करण्यात आले होते. त्याला सैन्याबद्दल काही सांगता आले नाही.

अरण्यातील चिखल असलेल्या अरुंद वाटेवरून तीन किंवा चार हुझार एकाच वेळी येत

होते. त्यांच्या मागून कोसॅक येत होते. काहींनी लांब झगे घातले होते, काहींनी फ्रेंच झगे घातले होते, काहींनी घोड्यावर घालायचे कापडच डोक्यावर धरले होते. चिंब पावसात भिजल्यामुळे तांबूस पिंगट अथवा उदी रंगाचे घोडे काळेभोर दिसत होते. आयाळ भिजून चिंब झाल्यामुळे प्रत्येक घोड्याची बारीक झालेली मान विचित्र झाली होती. त्यांच्या अंगातून वाफाचे ढग निघत होते. कपडे, खोगिरे आणि लगाम जमिनीवर आणि रस्त्यावर पडलेल्या पाचोळ्याप्रमाणे ओले आणि निसरडे झाले होते. भिजलेले अंग उबदार ठेवावे व पावसाचे नवीन थंड पाणी घरंगळत आसनात, गुडघ्यावर किंवा मानेवर येऊ नये म्हणून ती मणासे खोंगी घातल्यागत बसली होती आणि हालचाल होऊ नये म्हणून प्रयत्न करीत होती. कोसकांच्या रांगांमधून फ्रेंच घोडे जुंपलेल्या दोन मालवाहू गाड्या झाडांच्या बुडख्यांवरून आणि फांद्यांवरून आवाज करीत आणि चाकोरीतील पाणी उडवीत हिसके देत जाऊ लागल्या.

डेनिसॉव्हच्या घोड्याने वाटेतील डबके चुकविण्याचा प्रयत्न केला तेव्हा डेनिसॉव्हचा गुडघा झाडाला आदळला.

'सैतान!' डेनिसॉव्ह रागाने ओरडला. दात विचकून त्याने तीन वेळा घोड्याला चाबकाने हाणले. त्याच्या आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या अंगावर चिखल उडाला. डेनिसॉव्ह पावसामुळे आणि भुकेमुळे चिडला होता. (सकाळपासून कोणाच्याही पोटात काही गेले नव्हते) डोलोहॉव्हची काही बातमी लागली नव्हती. एखादा फ्रेंच कैद झाला असता तर त्याच्याकडून खबर मिळाली असती पण कोणी कैद झाला नव्हता.

'वाहतुकीवर हल्ला चढवायची अशी संधी पुन्हा कधी मिळणार नाही, त्यांच्यावर हल्ला चढवणं धोक्याचं आहे. उद्यापर्यंत हल्ला लांबणीवर टाकला तर—कोणी बड्या पुढाऱ्यांपैकी एखादा आपल्या हातातील शिकार लुटून न्यायचा.' डेनिसॉव्हच्या मनात असे विचार चालले तरी त्याची नजर समोर होती. डोलोहॉव्हकडून येणारा निरोप्या आपणाला दिसेल असे त्याला वाटले.

डेनिसॉव्ह मग उघड्या जागेत गेला. तेथून उजव्या बाजूस दूर अंतरावरचे त्याला दिसू लागले.

'कोणीतरी येत आहे,' तो म्हणाला. डेनिसॉव्हने दाखविलेल्या दिशेने इसॉल (कोसॅकांचा प्रमुख कमांडर) पाहू लागला. 'दोन माणसं येत आहेत,' इसॉलने म्हटले टेकडीवरून खाली उतरणारे ते घोडेस्वार दिसेनातसे झाले, आणि थोड्या वेळाने पुन्हा दिसू लागले. अगदी पुढे असलेला घोडेस्वार ऑफिसर होता. तो पार भिजला होता. त्याने आपली विजार गुडघ्यावर दुमडून घेतली होती. घोड्याची दमछाट होईतो तो त्याला चाबकाने वडवीत होता. त्याच्यामागून एका कोसॅकचा घोडा दुडक्या चालीने येत होता. कोसॅक रिकिबीत पाय ठेवून उभा होता. त्या पोरसवदा ऑफिसरचा चेहरा रुंद गुलाबी होता. त्याची दृष्टी तीक्ष्ण व आनंदी होती. त्याने डेनिसॉव्हजवळ आपला घोडा आणून त्याला चिंब भिजलेले पाकिट दिले आणि तो म्हणाला, "जनरलसाहेबांकडून ते अगदी कोरड्या स्थितीत आणू शकलो नाही.

क्षमा करा. ”

आठ्या घालत डेनिसॉव्हने पाकिट फोडले. डेनिसॉव्ह पत्र वाचीत असताना अधिकारी इसॉलकडे वळून म्हणाला, “ वाट धोक्याची आहे असं प्रत्येकजण सांगत होता.” कोसॅककडे बोट दाखवीत तो पुढे म्हणाला, “ कोमरॉव्ह आणि मी तसे सज्ज होतो. आम्हा दोघांकडेही पिस्तुलं... ’ समोर ड्रम वाजवणारा फ्रेंच पोरगा दिसताच वाक्य अर्ध्यावर सोडून त्याने विचारले, ‘ हा कोण ? कैदी वाटतं ? तुम्ही आधीच लढाईला प्रारंभ केला तर ? मला त्याच्याशी बोलायची परवानगी द्या.’

पत्र वाचून संपविलेल्या डेनिसॉव्हने त्याचवेळी ओरडून म्हटले, ‘ रोस्ताफ ! पेत्या ! तू कोण ते का बरं सांगितलं नाहीस ? ’ स्मित करीत डेनिसॉव्हने त्या अधिकाऱ्यासमोर हस्तांदोलनासाठी हात पुढे धरला. त्या अधिकाऱ्याचे नाव होते पेत्या रोस्टॉफ. सबंध प्रवासात पेत्या डेनिसॉव्हशी प्रौढ व्यक्तीप्रमाणे, एखाद्या अधिकाऱ्याप्रमाणे वागायचे असे ठरवीत होता. तो पूर्वीच्या ओळखीचा उल्लेख करणार नव्हता. परंतु डेनिसॉव्हने स्मित करताच पेत्याचा चेहरा आनंदाने आणि संकोचाने उजळला. शिष्टाचार पाळण्याचा आतापर्यंतचा निश्चय कुठल्या कुठे गेला. तो डेनिसॉव्हला आपण फ्रेंच सैन्याजवळून घोड्यावरून कसे आलो, ही कामगिरी मिळाल्यामुळे आपणास किती आनंद झाला, व्हॅझमा येथील लढाईत आपण भाग कसा घेतला होता, त्या लढाईत कुणी एक हुझार कसा चमकला ते सांगू लागला.

‘ तू भेटलास म्हणून आनंद वाटला.’ डेनिसॉव्हने त्याला पुढे बोलू न देता म्हटले. डेनिसॉव्हचा चेहरा पुन्हा चिंताग्रस्त झाला.

तो इसॉलला म्हणाला, “ मिहाइल, हे पत्र पुन्हा जर्मन अधिकाऱ्यांकडून आलं आहे, हा ( म्हणजे पेत्या ) त्याच्या हाताखाली काम करतो आहे. ह्या पत्रात त्या जर्मन जनरलची विनंती पुन्हा लिहिली आहे. त्यांना वाहतूक करणाऱ्या गाड्यांवर होणाऱ्या हल्ल्यात आमच्या बरोबर भाग घ्यायचा आहे. उद्या आम्ही त्यांना गाठलं नाही तर जनरल आमच्या डोळ्यांदेखत त्यांना लुटणार आहे.’

डेनिसॉव्ह इसॉलशी बोलत असताना त्याच्या सुरातील कोरडेपणाने पेत्या अस्वस्थ झाला. आपल्या अव्यवस्थित विजारीमुळे डेनिसॉव्हचा सूर रूक्ष झाला असावा असे वाटून त्याने झग्याखालील विजार खाली ओढली. तसे करताना कोणी पाहात नाही याची खात्री करून घेतली आणि शक्य तेवढी लष्करी ऐट कायम ठेवली.

टोपीच्या टोकाला हात लावून ॲडज्युटंट व जनरलची सुखकर भूमिका पुन्हा वठवीत त्याने डेनिसॉव्हला विचारले, ‘ आपण काही आदेश देणार आहात काय ? मी आपल्या बरोबर उभा राहू का ? ’

डेनिसॉव्हने काहीशा विसराळूपणाने विचारले, ‘ आदेश ? कसले आदेश ?... हो तू उद्यापर्यंत राहायला हरकत नाही.’

‘ मी तुमच्या बरोबर राहू का ? पेत्याने जवळ जवळ ओरडून विचारले.

' तुझ्या जनरलनं तुला काय हुकूम दिला आहे ? तावडतोब परत फिरायला सांगितलं आहे, होय ना ? " डेनिसॉव्हने विचारले. पेत्या लाजला.

' त्यांनी तसं काही सांगितलं नाही. मी राहिलो तर चालेल ना ? '

" ठीक आहे. राहा तर. ' डेनिसॉव्ह म्हणाला. आपल्या हाताखालील सैनिकांकडे वळून त्याने त्यापैकी काहींना रानातील झोपडीकडे जायला सांगितले. ती झोपडी विश्रांतिस्थान म्हणून निश्चित केली होती. अॅडज्युटंटची कामे करणाऱ्या व किर्गिझ घोड्यावर स्वार झालेल्या अधिकाऱ्याला म्हटले, " डोलोहॉव्ह कुठं आहे ते पाहा. संध्याकाळपर्यंत तो येणार आहे का नाही त्याची चौकशी करा. "

इसॉल आणि पेत्या यांच्याबरोबर डेनिसॉव्हला शॅमशेव्हॉजवळील अरण्याच्या टोकापर्यंत घोड्यावरून रपेट मारायची होती व त्या प्रदेशाची पाहणी करायची होती. त्याच ठिकाणी दुसऱ्या दिवशी ते हल्ला करणार होते.

' चल बाबा, आता आम्हाला शॅमशेव्हाला घेऊन चल ' डेनिसॉव्ह वाटाड्याचे काम करणाऱ्याला म्हणाला.

काही कोसॅक आणि कैदी ताब्यात ठेवणारा हुझार सोबत घेऊन डेनिसॉव्ह, पेत्या आणि इसॉल डावीकडे वळले आणि खिंडीतून अरण्याच्या कडेला जायला निघाले.

पाऊस थांबला होता पण धुके पडतच होते. झाडांच्या फांद्या ठिबकत होत्या. टोकदार टोपी घातलेला शेतकरी मुळांवरून आणि ओल्या पाचोळ्यांवरून आपले विणलेले जोडे घातलेले पाय हलकेच आवाज न करता टाकीत चालला होता. त्याच्यामागून डेनिसॉव्ह, इसॉल व पेत्या मुकाट्याने रानाच्या कडेला जाऊ लागले.

रस्त्यावर आल्यावर शेतकऱ्याने थांबून पाहिले. मागाहून इशारा करणाऱ्यांना त्याने गूढ इशारा करून बोलाविले.

डेनिसॉव्ह व पेत्या यांनी आपले घोडे त्याच्याकडे नेले. शेतकरी उभा होता त्या जागेवरून फ्रेंच सैनिक दृष्टीस पडत होते. रानापलीकडे असलेल्या टेकडीच्या उतारावर शेत पसरले होते. उजव्या बाजूला खोल खोऱ्याच्या पलीकडे असलेले छोटे खेडे आणि कोसळलेल्या छपरांचा मांगर दिसत होता. त्या खेड्यात, त्या घरात बागेतील उंच जागांवर, विहिरींजवळ, डबक्यांजवळ, पुलापासून टेकडीवर गेलेल्या सर्व रस्त्यांवर हेलकावणाऱ्या धुक्यात माणसेच माणसे दिसत होती. ती पाचशे यार्डापेक्षा अधिक अंतरावर नव्हती. टेकडीवर सामानाच्या गाड्या ओढत नेणाऱ्या घोड्यांना उद्देशून ती माणसे ओरडत होती. एकमेकांना हाकारत होती. ते सर्व स्पष्टपणे ऐकू येत होते.

" त्या कैद्याला इकडे घेऊन या " फ्रेंचांवरून नजर न काढता डेनिसॉव्ह हळू आवाजात

बोलला.

कोसॅक आपल्या घोड्यावरून उतरला, त्या मुलाला त्याने खाली उतरविले, आणि त्याला घेऊन डेनिसॉव्हकडे आला. डेनिसॉव्हने फ्रेंच सैन्याकडे बोट दाखवून त्या मुलाकडे सैन्याबाबत चौकशी केली. त्या मुलाने गारठलेले हात खिशात सारले, आपल्या भिवया उंच केल्या, हताश होऊन डेनिसॉव्हकडे पाहिले. आपल्याला ठाऊक असलेले सांगण्याची त्याला इच्छा होती यात संशय नव्हता. तरीही तो उत्तरे देताना गोंधळून गेला आणि डेनिसॉव्हच्या प्रश्नांना केवळ होकारार्थी मान हालवू लागला. डेनिसॉव्हने कपाळाला आठ्या घातल्या. त्याच्याकडे पाठ फिरवली आणि इसॉलला आपला विचार सांगितला. "डोलोहॉव्ह येवो वा न येवो आपण त्यांना पकडू या..."

डेनिसॉव्हचे डोळे उत्साहाने चमकू लागले.

"ती अगदी सोयीची जागा आहे." इसॉल म्हणाला.

"आपण पायदळाला खालच्या वाटेनं दलदलीतून पाठवू" डेनिसॉव्ह बोलत राहिला, "बागेकडे पायदळाचे सैनिक सरपटत येतील. त्या तिथून तुम्ही कोसॅकांना घेऊन घुसा.' डेनिसॉव्हने खेड्यापलीकडील रानाकडे बोट दाखवीत म्हटले. 'आणि मी इथून माझ्या हुझारांना घेऊन निघतो. पहिल्याच धडकेत...'

फ्रेंच सैन्य अगदी जवळ असल्याचे पाहून त्याच्यावर दुसऱ्या दिवशी हल्ला करण्याचा निर्णय शेवटी डेनिसॉव्हने घेतला. त्याबद्दल तो इसॉलशी थोडा वेळ बोलत राहिला. मग घोडा वळवून तो मागे परतला.

'गड्या, आता जाऊन कपडे कोरडे करू या.' तो पेत्याला म्हणाला.

अरण्याधिकाऱ्याच्या झोपडीपाशी येताच डेनिसॉव्ह थांबला आणि समोरच्या झोपडीत पाहू लागला. आखूड जाकिट, विणलेले जोडे, आणि कझान हॅट घातलेला, खांद्यावर छोटी बंदूक ठेवलेला आणि कमरपट्टयात कुऱ्हाड लटकावलेला एक मनुष्य झाडीतून हलक्या पावलांनी येत होता. त्याचे लांब हातपाय तो चालताना हेलकावत होते. डेनिसॉव्हला पाहताच त्याने घाईघाईने झुडपात काहीतरी फेकून दिले. कडा खाली वळलेली, चिंब भिजलेली हॅट काढून घेऊन तो कमांडिंग ऑफिसर पुढे आला.

तो तिहॉन होता. देवीचे वण व सुरकुत्या असलेला त्याचा चेहरा आणि त्याचे किलकिले डोळे समाधानाने चमकत होते. त्याने मान ताठ धरली आणि हसू आवरल्यागत त्याने डेनिसॉव्हकडे सरळ नजरेने पाहिले.

'कुठं होतास तू?' डेनिसॉव्हने विचारले.

'कुठं म्हणजे काय? मी फ्रेंचांचा पाठलाग करीत होतो.'

तिहॉनने धिटाईने, घाईघाईने घोगऱ्या गंभीर आवाजात म्हटले,

' तू भर दिवसा रांगत सरपटत का होतास ? मूर्ख कुठला ? एकाला तरी पकडलास काय ? "

' एकाला पकडला की...'

' मग कुठं आहे तो ? '

' मी अगदी भल्या सकाळी एकाला पकडलं. ' विणलेल्या जोड्यातून बोटे बाहेर डोकावत आहेत अशा अवस्थेत पाय फाकून उभा राहून तिहॉन सांगू लागला, ' मी त्याला रानात पकडला. पण तो चांगला नाही हे लक्षात आलं. मग मी याच्याहून अधिक चांगला कैदी पकडून न्यायचा असं ठरवलं. '

' बघितलंस हरामखोर कसा आहे तो ? ' डेनिसॉव्हने इसॉलला म्हटले.

डेनिसॉव्हने तिहॉनला विचारले, ' मग त्याला का आणलं नाहीस ? '

' त्याला आणून काय फायदा ? ' तिहॉनने घाईघाईने आणि रागारागाने विचारले.

' अगदीच फालतू इसम होता तो. तुम्हाला कसल्या प्रकारचा कैदी पाहिजे हे मला ठाऊक नाही काय ? '

' अरे चोरा - पुढे बोल. '

तिहॉन सांगू लागला, " मी दुसरा फ्रेंच पकडायला गेलो. मी अशा तऱ्हेनं सरपटत रानात गेलो आणि पडून राहिलो. ' अगदी चपळाईने तिहॉनने लागलीच जमिनीवर पोटावर पडून प्रात्यक्षिक केले.

' शेवटी एक आला त्या बाजूला. मी त्याला अस्सा पकडला. ' तिहॉन लागलीच भरकन उठला. मी त्याला म्हणालो, ' चल आता कर्नल साहेबांकडे. ' तो खूप जोराने ओरडू लागला. मग मला चार जण दिसले. आपल्या छोट्या तलवारी उपसून ते माझ्या दिशेने धावू लागले. मीही कुऱ्हाड घेऊन त्यांना असा सामोरा गेलो. मी विचारले, ' तुम्ही काय चालवलं आहे ? ख्रिस्त तुमचं रक्षण करो.' आपले हात फिरवीत, डोळे वटारीत आणि छाती फुगवीत तिहॉन ओरडला.

आपले चमकते डोळे किलकिले करून इसॉल म्हणाला,

" तू डबक्यातून पळत त्यांना कसं चकवलंस ते आम्ही पाहिलं. "

पेत्याला हसण्याची उत्कट इच्छा झाली. पण इतर सर्वजण हसू आवरत आहेत हे त्याने पाहिले. तो सारखा तिहॉनच्या चेहऱ्याकडून इसॉल आणि डेनिसॉव्ह यांच्याकडे पाहू लागला. त्याला कशाचाच बोध होत नव्हता.

' मूर्खासारखा वागू नकोस ' रागाने खोकत डेनिसॉव्ह म्हणाला, ' त्या पहिल्या माणसाला का नाही घेऊन आलास ? '

तिहॉन एका हाताने आपली पाठ आणि दुसऱ्या हाताने आपले डोके खाजवू लागला. एकाएकी खुळचट हसू त्याच्या चेहऱ्यावर पसरले. त्याच्या पडलेल्या दाताची जागा दिसू लागली एक दात नसलेला अशा अर्थाने श्चेर्बॅटॉव्ह हे नाव त्याला मिळाले होते ते त्यामुळेच.

डेनिसॉव्ह हसला तशी पेत्या जोरजोराने हसू लागला. तिहॉनही त्याच्या हसण्यात सामील झाला.

" काय सांगू ? तो अगदी फालतू होता. त्याचा पोषाख इतका वाईट होता की मला त्याला आणावंसं वाटेना. तो अगदीच उर्मट होता. तो म्हणाला, ' मी जनरलचा मुलगा आहे. मी येणार नाही. '

' अरे गाढवा, मी त्याला प्रश्न विचारले असते ' डेनिसॉव्ह म्हणाला.

' मी विचारले की त्याला प्रश्न ! तेव्हा तो म्हणाला,' मला काही फारशी माहिती नाही. तशी इथं खूप फ्रेंच माणसं आहेत. पण ती सगळी माणसं गरीब आहेत एवढंच त्यांच्याबाबत म्हणता येईल. जोरानं ओरडलात तर तुम्ही सर्वांनाच घेऊन जाऊ शकाल. " असे म्हणत तिहॉनने डेनिसॉव्हकडे आनंदी व निश्चयी नजरेने पाहिले.

' असा मूर्खासारखा वागलास तर तुला शंभर फटके मारून चांगला धडा शिकवीन हे लक्षात ठेव. '

' मी तुम्हाला योग्य असा फ्रेंच सैनिक आणू शकलो नाही म्हणून का रागावता आहात ? रात्र पडली म्हणजे तुम्हाला हवा तसा सैनिक — एक का तीन सैनिक पकडून घेऊन येतो. '

' चल पुरे झालं. ' डेनिसॉव्ह म्हणाला. अरण्याधिकाऱ्याच्या झोपडीकडे जाताना डेनिसॉव्हच्या कपाळावर रागाने आठ्या पडल्या होत्या आणि तो काही बोलत नव्हता.

तिहॉन मागून येत होता. तिहॉनने झुडपात बूट फेकले होते, त्याबद्दल कोसॅक त्याची चेष्टा करीत होते, तिहॉन आणि ते हसत होते. ते पेत्याला ऐकू येत होते. तिहॉनच्या बोलण्याने निर्माण झालेले हसणे थांबले, आणि तिहानने एका फ्रेंचाला ठार केले होते हे जेव्हा पेत्याला एका क्षणात कळून चुकले तेव्हा तो अतिशय अस्वस्थ झाला. त्याने वळून त्या पोरगेल्या कैद्याकडे दृष्टी टाकली तेव्हा एकाएकी त्याचे अंतःकरण व्याकुळ झाले. पण त्याची बेचैनी केवळ क्षणभरच टिकली. ज्या सैनिकांत आपण वावरत आहोत त्यांच्यामध्ये आपण अयोग्य ठरता कामा नये, त्यासाठी मान ताठ ठेवून काम महत्त्वाचे आहे असे दाखवून धिटाईने उद्याच्या मोहिमेबद्दलचे प्रश्न इसॉलला विचारणे आपणास भाग आहे असे त्याच्या मनाने घेतले.

डेनिसॉव्हने डोलोव्हॉव्हकडून पाठविलेला अधिकारी त्याला वाटेतच भेटला. डोलोहॉव्हचे सारे ठीक चालले आहे आणि तो स्वतःच ताबडतोब येणार आहे अशी बातमी त्याने दिली.

डेनिसॉव्हला एकाएकी हुरूप वाटू लागला. त्याने पेत्याला खूण करून बोलावून म्हटले, ' आता तुझ्याबद्दल मला माहिती सांग.'

पेत्या आणि इसॉल यांना घेऊन डेनिसॉव्ह अरण्याधिकाऱ्याच्या झोपडीपाशी आला तेव्हा

अंधार पडला होता. संधिप्रकाशात खोगीर घातलेले घोडे त्यांना दिसले. उघड्या जागेत कोसॅक आणि हुझार तंबू उभारीत होते. फ्रेंचांना धूर दिसणार नाही अशा खोलगट जागेत त्यांनी विस्तव पेटवला होता. झोपडीच्या दाराशीच पडवीत बाह्या वर सारून एक कोसॅक मेंढरू कापीत होता. झोपडीमधे डेनिसॉव्हच्या विभागातील अधिकारी दारांच्या फळ्यांचे टेबल करीत होते. पेत्याने आपले भिजलेले कपडे काढून वाळवण्यासाठी दिले. जेवणासाठी टेबल उभे करणाऱ्या अधिकाऱ्यांना मदत करण्यासाठी तो लागलीच पुढे झाला.

दहा-एक मिनिटांत दरवाज्यांच्या फळ्यांचे टेबल तयार झाले. त्याच्यावर कापडही पसरण्यात आले. टेबलावर व्होडका, रम, पांढरा पाव आणि भाजलेले मांस मांडण्यात आले.

अधिकाऱ्याबरोबर पेत्या टेबलाशी बसून ओशट बोटांनी चविष्ट मटणाचे तुकडे काढू लागला. तेव्हा लहान उत्साही मुलाला सर्व मानव जातीबद्दल प्रेम वाटते आणि म्हणूनच इतर सर्वांनाही आपल्याबद्दल प्रेम वाटत आहे असे वाटते असे त्याला वाटू लागले.

त्याने डेनिसॉव्हला विचारले, ' व्हॅसिली फयॉदोरॉविच, मी तुमच्याबरोबर एक दिवस मुक्काम केला तर तुमची काही हरकत नाही ना ? ' डेनिसॉव्हला उत्तर देण्याची सवड न देता तोच पुढे म्हणाला, ' मला शोध करण्यास सांगण्यात आलं. इथं मी शोध घेत आहे . . . अगदी खऱ्याखुऱ्या लढाईत मला भाग घेऊ द्या. . .मला पदकं, बक्षिसं, मानचिन्हं काही नकोत. . . मात्र माझी एकच इच्छा आहे. . .' पेत्याने दात घट्ट मिटून सभोवार पाहत हातवारे करीत मान उडवीत म्हटले.

' अगदी खऱ्याखुऱ्या लढाईत. . .' डेनिसॉव्ह स्मित करून म्हणाला.

' कृपा करून माझ्या हातात एखादी तुकडी द्या — अगदी लहान तुकडीही चालेल म्हणजे मला खरोखरच हुकूम देता येतील. तसं केलंत तर काय फरक पडणार आहे ? ' मग मटणाचा तुकडा काढण्याच्या प्रयत्नात असलेल्या अधिकाऱ्याला म्हटले, ' तुम्हाला चाकू हवा आहे का ? ' असे म्हणून पेत्याने आपल्या खिशातील चाकू त्याला दिला.

अधिकारी चाकूची स्तुती करू लागला.

' तुमच्याकडेच राहू द्या. माझ्याकडे तसले खूप चाकू आहेत. ' पेत्या लाजत म्हणाला, मग तो एकदम ओरडला, ' अरे देवा, मी विसरून जात होतो. माझ्याकडे चांगले बेदाणे आहेत. बिलकुल बिनबियांचे बेदाणे. आमचा नवीन कॅन्टीन मालक अगदी उत्कृष्ट जिनसा मिळवीत असतो. मी दहा पौंड बेदाणे खरेदी केले. मला गोड खायला आवडतं. घ्या. . .तुम्ही . . .घ्या ' मग पेत्या धावतच पोर्चमध्ये असलेल्या कोसॅककडे गेला आणि त्याने काही टोपल्या आत आणल्या. त्यामध्ये पाच-एक पौंड बेदाणे होते. ' घ्या तुमच्यासाठी आणले आहेत. ' तो म्हणाला.

' तुम्हाला कॉफीच्या भांड्याची गरज आहे का ? एक नावाजलेलं भांडं मी कँटीनमालकाकडून खरेदी केलं. त्याच्याकडे उत्तमोत्तम वस्तू असतात. तो फार प्रामाणिक आहे ही मोलाची गोष्ट आहे. मी न विसरता भांडं पाठवून देईन, कदाचित तुमचे गारगोटीचे दगड झिजून

गेले असतील. काही वेळा असं घडतंच. मी माझ्या बरोबर काही आणले आहेत. इथं माझ्याकडे आहेत.' त्याने टोपल्याकडे बोट दाखवीत म्हटले, 'शंभर एक तरी दगड असतील. मला फार स्वस्तात मिळाले. तुम्हाला हवे तेवढे घेऊ शकता, सगळे घेतलेत तरी चालतील.' आपण फारच बडबडत होतो हे लक्षात येऊन अतिशय खजील होऊन पेत्या एकदम थांबला.

'आपण आणखी मूर्खासारखा वागलो का याचा तो विचार करू लागला. दिवसभराच्या सर्व आठवणी मनात आणत असताना त्याच्या डोळ्यांसमोर ड्रम वाजवणाऱ्या मुलाचे चित्र उभे राहिले.

आम्ही सगळे मजेत आहोत...त्याला काय वाटत असेल? त्यांनी त्याचं काय केलं असेल त्यांनी त्याला खायला तरी दिलं असेल का? त्यांनी त्याला वाईट वागणूक तर दिली नसेल ना?' तो विचार करू लागला. आपण गारगोटीच्या दगडाबद्दल फार बडबड केली असा विचार मनात येऊन आता तो बोलायला धजत नव्हता.

'मी त्याची माहिती विचारू का?' तो विचार करू लागला. तो स्वतः पोरसवदा असल्याने ह्याला त्या पोराची काळजी वाटते आहे असे ते म्हणतील. मी पोर आहे की काय ते उद्याच दाखवून देईन. त्यांना विचारताना मला शरम वाटेल का? अधिकारी आपल्याला हसतील की काय ह्या धास्तीने त्यांचे चेहरे न्याहाळीत आणि संकोचून तो स्वतःशीच एकदम म्हणाला 'तरी मी पर्वा करणार नाही.'

मग त्याने डेनिसॉव्हला विचारले, 'कैद केलेल्या त्या फ्रेंच पोराशी मी बोलू का? त्याला थोडं खायला दिलं तर...?' त्याने डेनिसॉव्हला अशी आठवण करून दिली पण डेनिसॉव्हला मुळीच शरम वाटण्याजोगे काही दिसले नाही. तो पेत्याला म्हणाला, 'गरीब बिचारा. त्याला इथं बोलावून घे. त्याचं नाव आहे व्हिन्सेन्ट बोसे. त्याला इथं घेऊन ये.'

'मी त्याला बोलावतो.' पेत्या म्हणाला.

'अवश्य बोलाव. गरीब बिचारा मुलगा.' डेनिसॉव्ह म्हणाला. डेनिसॉव्हने हे शब्द उच्चारले तेव्हा पेत्या दारात उभा होता. तो अधिकाऱ्याकडून वाट काढीत डेनिसॉव्हकडे गेला.

'तुम्ही किती दयाळू आहात, किती उदार आहात, मला फार चांगलं वाटलं.' असे म्हणून डेनिसॉव्हचे चुंबन घेऊन पेत्या बाहेर अंगणात धावला. दाराशी राहून तो ओरडला, 'बोसे! व्हिन्सेन्ट!'

'आपल्याला कोण हवं आहे?' अंधारातून प्रश्न उमटला. तशी पेत्या म्हणाला, 'आज ज्याला कैद केलं आहे तो फ्रेंच मुलगा हवा आहे.

'कोण? व्हेसनी का?' कोसॅकने विचारले. कोसॅकनी त्याच्या व्हिन्सेन्ट नावाचे केव्हाच व्हिसनी असे रूपांतर केले होते. दोन्ही नावे त्या मुलाच्या कोवळ्या वयाशी सुसंगती राखणाऱ्या वसंत ऋतूची होती. व्हेस्ना म्हणजे वसंतऋतू.

तो विस्तवाशी शेकत बसला आहे. 'व्हिसेन्या...व्हिसेन्या.' अंधारात एका मागून एक

हसत त्याला हाक मारीत होता. 'मोठा तल्लख पोरगा आहे.' पेत्याजवळ उभा असलेला हुझार म्हणाला, 'आताच आम्ही त्याला जेवण दिलं.' भलताच भुकेलेला होता. काळोखात पावले वाजलेली ऐकू आली आणि अनवाणी पावलांनी चिखल तुडवीत ड्रम वाजवणारा दाराच्या दिशेने येऊ लागला.

'अरे हा आलाच की.' पेत्या म्हणाला.

'तुला भूक लागली आहे का? घाबरू नकोस. तुला कोणी काही इजा करणार नाही.' लाजत प्रेमाने त्याच्या हाताला स्पर्श करीत पेत्या बोलू लागला, 'आत ये ना.'

डेनिसॉव्हने त्या ड्रमवादकाला थोडा व्होडका आणि मटण द्यायला सांगितले. त्याला इतर कैद्यांबरोबर पाठवायचे नव्हते, आपल्याच तुकडीबरोबर न्यायचे होते म्हणून डेनिसॉव्हने त्याला रशियन सैनिकाचे कपडे देण्याचा हुकूम दिला. डोलोहॉव्ह आल्यानंतर पेत्याचे लक्ष त्या मुलाकडून दुसरीकडे गेले. डोलोहॉव्हच्या असामान्य शौर्याबद्दल आणि फ्रेंच सैनिकांना तो देत असलेल्या निर्दय वागणुकीबद्दल सैन्यात खूप गोष्टी सांगितल्या जात त्या त्याने ऐकलेल्या होत्या. त्यामुळे डोलोहॉव्ह झोपडीत शिरल्यापासून पेत्याची नजर त्याच्यावर खिळून राहिली. डोलोहॉव्हसारख्या वीर पुरुषाच्या सहवासाला आपण अपात्र ठरू नये म्हणून तो मान ताठ ठेवून अधिकाधिक तोऱ्यात राहण्याची धडपड करू लागला.

पूर्वी डोलोहॉव्हने मॉस्कोत असताना पर्शियन पोषाख केला असेल, आता मात्र तो संरक्षकदलाचा अधिकारी वाटत होता. त्याने गुळगुळीत दाढी केलेली होती. त्याने संरक्षक दलातील ( गार्डस ) सैनिकांप्रमाणे मऊ जाड कोट घातला होता. त्यावर फितीत अडकवलेले सेंट जॉर्ज पदक रुळत होते. त्याने साधी बैठी लष्करी टोपी घातली होती. त्याने आपला भिजलेला झगा कोपऱ्यात जाऊन काढला. कुणालाही अभिवादन न करता सरळ डेनिसॉव्हकडे-जाऊन तो कामाच्या गोष्टीबद्दल विचारू लागला. आपल्या मोठ्या विभागाने शत्रूच्या वाह-तुकीबाबत काय योजना आखली आहे, पेत्याने कोणता निरोप आणला आहे, आणि दोन्ही जनरलांना आपण कोणती उत्तरे दिली आहेत याबद्दल डेनिसॉव्हने डोलोहॉव्हला माहिती दिली. मग त्याने डोलोहॉव्हला फ्रेंचांच्या हालचालींबद्दल आपणास ठाऊक असलेली माहिती पुरविली.

'ठीक आहे पण ते सैन्य कोणत्या प्रकारचं आहे, त्यांची संख्या किती आहे हे आपण शोधून काढले पाहिजे.' डोलोहॉव्ह म्हणाला, 'आपण स्वतः जाऊन पाहिलं पाहिजे. त्यांची संख्या किती आहे हे निश्चित समजल्याखेरीज आपण एकदम घुसू शकणार नाही. प्रत्येक गोष्ट योग्य तऱ्हेनं व्हावी असं मला वाटतं. तुमच्यापैकी एखादा माझ्याबरोबर येईल काय? म्हणजे आपण त्याच्या छावणीत जाऊन त्याची भेट घेऊन येऊ. माझ्याजवळ एक जादा गणवेष आहे.'

'मी...मी...यायला तयार आहे.' पेत्या जवळ जवळ ओरडला.

डेनिसॉव्ह डोलोहॉव्हला उद्देशून म्हणाला, 'तुम्ही तिकडे जाण्याची गरज नाही. ह्याच्या (म्हणजे पेत्याच्या) बाबतीत सांगायचं तर मी त्याला कोणत्याही परिस्थितीत जाऊ देणार नाही.'

'मला आवडेल जायला. मी का जाऊ नको?' पेत्याने ओरडून विचारले.

'जाण्याची गरज नाही म्हणून.'

'माफ करा...कारण...कारण मी जाणार. आणखी काही सांगायचं नाही' मग डोलोहॉव्हकडे वळून पेत्याने विचारले, 'तुम्ही नेणार ना मला बरोबर?'

'का नाही?' फ्रेंच मुलाकडे नजर लावीत हरवल्यागत डोलोहॉव्ह म्हणाला.

'कोसॅकला माझं सामान आणायला सांगा. माझ्याजवळ फ्रेंचांचे दोन गणवेष आहेत. तू येतोस का माझ्याबरोबर?' डोलोहॉव्हने पेत्याला विचारले.

'मी? मी येतो की' संकोचून डेनिसॉव्हकडे नजर टाकीत पेत्या ओरडला तेव्हा त्याच्या गालांवर अश्रू ओघळले.

डेनिसॉव्हने त्याला परावृत्त करण्याचा खूप प्रयत्न केला. पण पेत्याने त्याला सांगितले, 'मला देखील सर्व गोष्टी योग्य तऱ्हेनं घडाव्यात असं वाटतं. कशातरी झालेल्या आवडत नाहीत. मी संकटांचा कधी विचार करीत नाही. तिथं सैनिक किती आहेत याची संख्या नक्की कळली नाही तर शेकडो जिवांचे प्राण जातील, त्याऐवजी आम्हा दोघांचे प्राण गेले तर हरकत नाही. ही गोष्ट तुम्हाला कबूल करावी लागेल. माझी उत्कट इच्छा आहे आणि मी काहीही झालं तरी जाणार. अडवून काही उपयोग होणार नाही...'

पेत्या आणि डोलोहॉव्ह यांनी फ्रेंच गणवेष चढवले, टोकदार लष्करी टोप्या घातल्या. रानातल्या त्या उघड्या भागातून डेनिसॉव्हने फ्रेंचांची छावणी पाहिली होती, तिथे त्यांचे घोडे आले. रानातून बाहेर पडून ते किरं अंधारात असताना खोलगट प्रदेशात उतरले. टेकडी उतरत असताना बरोबर आलेल्या कोसॅकांना तिथे थांबण्यास सांगून डोलोहॉव्ह रस्त्यावरून पुलाच्या दिशेने वेगाने निघाला. पेत्या त्याच्याबरोबर घोडा पिटाळीत होता.

'मी पकडलो गेलो तर मी त्याच्या हाती जिवंत सापडणार नाही. माझ्याकडे पिस्तूल आहे.' पेत्या हळू आवाजात म्हणाला.

'रशियन भाषेत बोलू नकोस.' डोलोहॉव्हने त्याला भरभर हळू आवाजात सुनावले. त्याच वेळी त्यांना अंधारातून कुणीतरी हटकले, 'कोण आहे?' बंदुक रोखल्याचा आवाज ऐकू आला.

पेत्याचा चेहरा लालबुंद झाला. त्याने पिस्तूलाला हात घातला.

'सहाव्या रेजिमेंटचे ऊलान (भालाईत घोडेस्वार)' डोलोहॉव्हने आपल्या घोड्याची गती न वाढवता आणि कमीही न करता उत्तर दिले.

पुलावर उभी असलेली पहारेकऱ्यांची काळी आकृती दिसू लागली.

'परवलीचा शब्द सांगा.'

डोलोहॉव्हने आपल्या घोड्याचा लगाम खेचला आणि त्याच्या दिशेने सावकाश घोडा वळवला आणि विचारले, 'कर्नल जारार इथे आहेत का?'

'परवलीचा शब्द सांगा.' उत्तर न देता वाट अडवीत पहारेकरी म्हणाला.

जेव्हा एखादा अधिकारी फेरी टाकतो त्यावेळी पहारेकऱ्यांनी त्याला परवलीचा शब्द विचारायचा नसतो. पहारेकऱ्यांच्या दिशेने घोडा नेत डोलोहॉव्हने एकदम भडकून म्हटले. तशी पहारेकरी बाजूला झाला. त्याच्याकडून उत्तराची वाट न पाहता डोलोहॉव्हने घोडा हाकला. तो संथ गतीने टेकडी चढू लागला. रस्ता ओलांडणारी एक काळी आकृती दिसली तेव्हा डोलोहॉव्हने त्या माणसाला थांबवले आणि विचारले, 'कर्नल आणि अधिकारी कुठं आहेत?' खांद्यावर मोठी पिशवी टाकलेला तो सैनिक थांबला, डोलोहॉव्हच्या घोड्याकडे आला, त्या घोड्याला त्याने थोपटले आणि साध्या प्रेमळ भाषेत म्हटले, 'कर्नल आणि इतर अधिकारी वर टेकडीवर आहेत. ते उजव्या बाजूस असलेल्या मांगरात राहतात.'

रस्त्याने जाताना दोन्ही बाजूस शेकोट्यांभोवती असलेल्या फ्रेंचांचे बोलणे ऐकत डोलोहॉव्ह मांगराच्या अंगणात शिरला. फाटकाशी पोचताच तो घोड्यावरून उतरला. समोर मोठा विस्तव पेटला होता. त्या भोवती कित्येक माणसे मोठमोठ्याने बोलत होती. त्यांच्या दिशेने तो निघाला. एका बाजूला कढईसारख्या मोठ्या भांड्यात काहीतरी शिजत होते. टोकदार टोपी आणि निळा कोट घातलेला सैनिक गुडघे टेकून लोखंडी दांड्याने ते ढवळत असलेला विस्तवाच्या झगझगीत प्रकाशात दिसत होता.

डोलोहॉव्हने स्पष्ट शब्दात मोठ्याने अभिवादन केले. सावलीत असलेल्या अधिकाऱ्यांत खळबळ उडाली. लांब मानेचा एक उंच अधिकारी विस्तवाच्या बाजूने येऊन डोलोहॉव्हला सामोरा गेला.

'कोण? क्लेमंट, तू का?' त्याने म्हटले, 'हराम–'

त्याने शब्द पुरता उच्चारला नाही. त्याला आपली चूक कळून आली. किंचित आठ्या घालीत त्याने अपरिचित डोलोहॉव्हचे स्वागत करून म्हटले, 'बोला, मी आपल्यासाठी काय करू?' डोलोहॉव्ह म्हणाला, 'मी आणि माझा सहकारी आमची रेजिमेंट गाठण्याचा प्रयत्न करीत आहोत. तुमच्यापैकी कोणाला सहाव्या रेजिमेंटबद्दल काही माहिती आहे का?' त्याने सर्वांना उद्देशून हा प्रश्न केला. पण कुणी काही सांगू शकले नाही. सगळे अधिकारी आपल्याकडे संशयाने आणि वैरभावाने पाहात आहेत असे पेत्याला वाटू लागले.

काही वेळ कुणी बोलले नाही.

'तुम्ही सूप मिळेल या आशेनं आला असाल तर आता खूप उशीर झाला आहे.'

बिस्तवाकडून हसू दाबलेला आवाज उमटला.

डोलोहॉव्ह म्हणाला, ' आम्ही जेवण करून निघालो आहोत. आज रात्री आम्हाला मुक्काम गाठला पाहिजे. '

भांड्यात लोखंडी दांडा फिरवणाऱ्या सैनिकाजवळ आपले घोडे देऊन डोलोहॉव्ह लांब मानेच्या अधिकाऱ्याजवळ मांडी घालून बसला. आपली नजर मुळीच न काढता त्याने डोलोहॉव्हला पुन्हा विचारले, ' तुमची रेजिमेंट कोणती ? '

डोलोहॉव्हने न ऐकल्यासारखे केले. उत्तर न देता त्याने खिशातून छोटा फ्रेंच पाइप काढून पेटवला. आणि त्या अधिकाऱ्यांना विचारले, ' पुढच्या मार्गात कोसॅकांपासून काही धोका नाही ना ? '

' ते वाटमाऱ्ये सगळीकडे आहेत. ' विस्तवापलीकडून एक अधिकारी म्हणाला.

डोलोहॉव्ह म्हणाला, ' तुकडी पासून अलग पडलेल्या आमच्यासारख्या चुकार सैनिकानाच त्याचा धोका असतो. मला वाटतं मोठाल्या तुकड्यावर हल्ला करण्याचं धाडस त्यांना व्हायचं नाही. ' त्याने प्रश्नार्थक मुद्रा केली.

पण कुणीच प्रतिकार दिला नाही.

पेत्याला प्रत्येक क्षणाला डोलोहॉव्ह बाहेर पडेल असे वाटत होते. तो विस्तवाशी उभा राहून त्यांचे बोलणे ऐकत होता.

पण डोलोहॉव्हने खंड पडलेले संभाषण पुन्हा सुरू केले. आता त्याने त्याला सरळ सरळ विचारून त्यांच्या बटालियनमध्ये किती सैनिक आहेत, त्या बटालियन किती आहेत, कैदी किती आहेत, ही माहिती काढून घेतली.

रशियन कैद्यांबद्दल चौकशी करताना डोलोहॉव्ह म्हणाला, ' ही प्रेतं बरोबर ओढत नेणं म्हणजे अगदी घाणेरडं काम आहे. त्या किड्यांना त्यापेक्षा ठार करणं चांगलं. ' असे बोलून तो इतक्या जोरात आणि इतक्या विचित्रपणे हसला की आता त्याचे ढोंग फ्रेंचांच्या ध्यानी आल्यावाचून राहणार नाही असे पेत्याला वाटले. आणि तो आपोआपच विस्तवापासून मागे हटला. डोलोहॉव्हच्या शब्दाला प्रतिसाद मिळाला नाही. कोट गुंडाळून झोपलेला एक अधिकारी त्यांच्या दृष्टीस पडला नव्हता. तो आता उठला आणि सहकाऱ्यांच्या कानात काहीतरी कुजबुजला. डोलोहॉव्ह उठला आणि त्याने घोडे धरून राहिलेल्या माणसाला हाक मारली.

' ते आता आपले घोडे देतात की नाही कोण जाणे ? ' पेत्याला प्रश्न पडला. तो नकळत डोलोहॉव्हच्या जवळ सरकला. पण त्यांनी त्यांना घोडे दिले. डोलोहॉव्हने त्यांचा निरोप घेतला पेत्याने देखील निरोपादाखल ' बॉन्स्वार ' म्हणण्याचा प्रयत्न केला. पण त्याला ते शब्द उच्चारता आले नाहीत. अधिकारी एकत्र जमून काहीतरी कुजबुजत होते. डोलोहॉव्हचा घोडा एका जागी थांबत नव्हता, त्यामुळे त्याला घोड्यावर स्वार व्हायला बराच वेळ लागला. मग त्याने घोडा सावकाश फाटकाबाहेर नेला, पेत्याने त्याच्या मागून घोडा नेला. फ्रेंच सैनिक आपला पाठलाग करताहेत की काय हे बघण्याची इच्छा असूनही त्याला धाडस झाले नाही.

ते बाहेर येऊन रस्त्याला लागले. डोलोहॉव्ह उघड्या प्रदेशाकडे वळला नाही. त्याने घोडा तसाच पुढे गावाकडे नेला.

एका ठिकाणी तो स्तब्ध राहून कानोसा घेऊ लागला. त्याने पेत्याला विचारले, 'तुला काही ऐकू येतं का?' पेत्याला रशियन भाषेत बोलण्याचा आवाज ऐकू आला. विस्तवाभोवती असलेल्या रशियन कैद्यांच्या काळ्या आकृती दिसल्या. पेत्या आणि डोलोहाव्ह पुन्हा पुलावर आले, पहारेकऱ्याजवळून गेले तेव्हा तो काही न बोलता उदासपणे गस्त घालीत होता. मग ते खोलगट भागात आले. तिथे कोसॅक त्यांची वाट पहात होते.

'ठीक आहे. आता निरोप घेतो. डेनिसॉव्हला सांग. सूर्य उगवताच पहिल्याच धडक्याला.' डोलोहॉव्ह म्हणाला आणि घोडा वळवून अंधारात दिसेनासा झाला.

अरण्यातील झोपडीकडे जेव्हा पेत्या आला तेव्हा त्याला डेनिसॉव्ह पोर्चमधे आढळला. पेत्या कधी येतो याची काळजी करीत तो अस्वस्थ मनाने बसला होता. आपण पेत्याला जाऊ दिले म्हणून तो अत्यंत त्रस्त झाला होता.

पेत्याने सांगितलेली हकीकत ऐकून डेनिसॉव्ह म्हणाला, 'परमेश्वर दयाळू आहे. गाढवा, तू मात्र माझी झोप उडवलीस. देवानं कृपा केली. आता झोपी जा. सकाळपर्यंत एक झोप मिळेल.'

'झोपू म्हणता? नको. मला अजून झोप आलेली नाही. खेरीज मी चांगला ओळखून आहे. मी एकदा झोपी गेलो की साफ संपलोच म्हणून समजा. शिवाय लढाईपूर्वी झोपी जायची मला सवय नाही.'

पेत्या कितीतरी वेळ झोपडीत राहून आपल्या साहसाच्या आठवणी काढून आणि पुढे होणाऱ्या घटनांच्या कल्पनेने सुखावत होता. डेनिसॉव्ह झोपी गेलेला पाहून तो उठला आणि दाराबाहेर पडला.

बाहेर अजून गडद काळोख होता. पाऊस थांबला होता. परंतु अद्याप झाडे ठिबकत होती. झोपडीच्या जवळच कोसॅकांच्या झोपड्या आणि एकत्र बांधलेले घोडे यांच्या काळ्या आकृती दिसत होत्या. झोपडीमागे असलेल्या काळोखात दोन मालवाहू गाड्या उभ्या होत्या. जवळच त्यांचे घोडे होते. खोलगट भागात विझत चाललेल्या विस्तवाचा लाल प्रकाश दिसत होता. कोसॅक आणि हुझार मुळीच झोपले नव्हते. थेंबांच्या पडण्याच्या आणि घोड्यांच्या चघळण्याच्या आवाजात कुजबुजीसारखा वाटणारा हळू बोलण्याचा आवाज मिसळत होता.

पेत्या पडवीच्या बाहेर आला. त्याने भोवताली काळोखात पाहिले आणि तो मालवाहू गाड्यांजवळ गेला. गाड्याखाली कुणीतरी घोरत होता. खोगीर घातलेले घोडे ओट चघळीत गाड्यांभोवती उभे होते. अंधारात आपला घोडा ओळखून पेत्या त्याच्याजवळ गेला. त्या घोड्याचे नाव कॅरबाच होते.

'हे बघ कॅरबाच, उद्या आपण उत्तम कामगिरी पार पाडू.' आपल्या घोड्याच्या नाकपुड्या हुंगीत आणि त्याचा मुका घेत तो म्हणाला.

'तुम्ही अजून झोपला नाही का?' गाडीखाली बसलेल्या कोसॅकने विचारले.

'नाही...पण...लिहाचेव्ह...मला वाटतं असंच काहीतरी तुझं नाव आहे, होय ना? हे बघ, मी आताच परत आलो आहे. आम्ही फ्रेंचांच्या छावणीला भेट देऊन आलो.' मग पेत्याने कोसॅकला आपल्या साहसाची हकीकत सांगितली. एवढेच नव्हे तर आपण तिथे का गेलो तेही सांगितले. अव्यवस्थित तऱ्हेने गोष्टी करण्यापेक्षा जीव धोक्यात घालणे आपणास अधिक पसंत का वाटते हेही त्याला सांगितले.

'आता थोडी झोप घ्या.' कोसॅक म्हणाला. तशी पेत्या म्हणाला, 'काही नको. मला तशी जागरणाची सवय आहे. तुमच्या पिस्तुलातील गारगोटीचे दगड बरे आहेत ना? झिजलेले नाहीत ना? माझ्याकडे काही आहेत. तुम्हांला हवे आहेत का? घ्या ना काही'

पेत्याला आणखी जवळून पाहण्यासाठी त्या कोसॅकने गाडीखालून बाहेर डोके काढले.

'हे बघा, प्रत्येक गोष्ट मला काळजीपूर्वक करणं योग्य वाटतं. काही काही लोक योगायोगावर गोष्टी सोपवितात. अगोदर तयारी करावी असं त्यांना वाटत नाही. मग मात्र ते पस्तावतात. मला असं वागणं आवडत नाही.'

'अगदी खरं आहे.' कोसॅक म्हणाला

'दोस्ता, कृपा करून एक काम कर. माझ्या छोट्या तलवारीला धार लाव. माझी तलवार अगदी बोथट. (पण पेत्याला खोटे बोलवले नाही) तिला कधी धारच काढली गेली नव्हती. एवढं काम करशील ना?'

'नक्की करीन.'

लिहाचेव्ह उठला. त्याने सामानात शोधाशोध केली. लढाईत होतो तसा पोलाद आणि धार काढण्याचा दगड यांमुळे होणारा आवाज ऐकत पेत्या उभा राहिला.

पेत्या मालवाहू गाडीवर चढून टोकाशी बसला आणि डुलक्या घेऊ लागला. खाली कोसॅक त्याच्या तलवारीला धार लावू लागला.

लिहाचेव्हची प्रेमळ हाक ऐकून तो ह्या तंद्रीतून जागा झाला, 'महाराज, तलवार तयार झाली. आता एका घावात तुम्ही फ्रेंचांचे दोन तुकडे कराल.' पेत्या उठला.

'अरे, केव्हाच उजाडलं!' तो ओरडला. मघा न दिसणारे घोडे, त्यांच्या शेपट्याही आता दिसू लागल्या. पर्णहीन फांद्यांमधून फिकट प्रकाश दिसू लागला. पेत्याने अंग झटकले, उडी मारली. खिशातून एक रूबल काढून तो लिहाचेव्हला दिला. तलवार जरा फिरवून पाहिली आणि म्यानात सारली. कोसॅक आता घोड्यांची दावी सोडून खोगीरपट्टे चढवू लागले.

'कमांडरसाहेब आलेच की!' लिहाचेव्ह म्हणाला. डेनिसॉव्हने झोपडीच्या बाहेर येऊन पेत्याला हाक मारली आणि त्याला तयार राहायला सांगितले.

संधिप्रकाशात त्या सैनिकांनी भरभर आपले घोडे घेतले. त्यांना खोगिरे घातली आणि त्यांनी गट पाडले. झोपडीजवळ राहून डेनिसॉव्ह शेवटचे हुकूम सोडीत होता. त्याचे पायदळ रस्त्या-

वरून जाऊ लागले. शेकडो पावले चिखल उडवीत पुढे पुढे पडू लागली. पहाट होण्यापूर्वीच पायदळाचे सैनिक धुक्यातील झाडीत दिसेनासे झाले. इसॉलने कोसॅकांना काही हुकूम दिले.

'सगळी तयारी झाली ना? आमचे घोडे द्या.' डेनिसॉव्ह म्हणाला.

घोडे आणण्यात आले. खोगिराचे पट्टे सैल असल्याने डेनिसॉव्ह कोसॅकवर चिडला, आणि घोड्यावर स्वार होता होता त्याला शिव्या देऊ लागला. पेत्याने रिकिबीत पाय ठेवला. तशी घोडा सवयीनुसार त्याच्या पायाचा चावा घेतल्यासारखे करू लागला. पण पेत्या उडी मारून खोगिरावर बसला, त्याला आपल्या वजनाची जाणीव नव्हती. मागून अंधारातून येणाऱ्या हुझाराकडे वळून पाहात पेत्याने आपला घोडा डेनिसॉव्हजवळ नेला.

'व्हॅसिली फ्यादोरॉविच, माझ्यावर विश्वासानं एखादं काम सोपवाल ना? माझ्यावर कृपा करा...' पेत्या म्हणाला. डेनिसॉव्हला पेत्याच्या अस्तित्वाची जाणीव नसल्यासारखे दिसत होते. त्याने वळून पेत्याकडे पाहिले.

डेनिसॉव्हने त्याला बजावले, 'मी तुला एक विनंती करतो. माझ्या आज्ञेत राहा आणि पुढं घुसू नकोस.'

सबंध वाटभर डेनिसॉव्ह पेत्याशी आणखी काही न बोलता घोडा हाकीत होता.

जेव्हा ते रानाच्या कडेला पोचले तेव्हा उघड्या प्रदेशातील वस्तुजात दिसू लागावे इतके उजाडले होते. डेनिसॉव्हने इसॉलच्या कानात काहीतरी सांगितले. कोसॅकांचे घोडे पेत्या आणि डेनिसॉव्ह यांच्याजवळून जाऊ लागले. ते सगळे पुढे गेले तेव्हा डेनिसॉव्हने घोड्याला टाच मारली आणि तो टेकडी उतरू लागला. स्वारांना पाठीवर घेतलेले ते घोडे घसरत पुठ्ठ्यांवर कोसळत सखल प्रदेशात येऊन पोचले. पेत्या डेनिसॉव्ह बरोबर होता. डेनिसॉव्ह खाली पायथ्याशी पोचला तेव्हा त्याने वळून पाहून मागे असलेल्या कोसॅकला पाहून मान हालवली.

'इशारा दे.' तो म्हणाला. तशी कोसॅकने हात उंचावून गोळी झाडली. त्याच क्षणी आघाडीवरील घोड्यांच्या टापा ऐकू आल्या. निरनिराळ्या दिशांतून घोषणा उठल्या आणि आणखी गोळ्यांचे आवाज झाले.

टापांचा आवाज आणि आरोळ्या ऐकताच पेत्याने घोड्याचा लगाम सैल सोडला आणि त्याला फटके मारीत पिटाळले. डेनिसॉव्ह ओरडत होता तरी त्याच्याकडे लक्ष दिले नाही. पेत्याने गोळीचा आवाज ऐकला. तेव्हा त्याला दुपारचे ऊन पडल्यासारखे वाटले. त्याने पुलाकडे घोडा पिटाळला. त्याच्यापुढे कोसॅकांचे घोडे धावत होते. वाटेत पेत्याने पाठीमागे पडलेल्या कोसॅकला धक्का दिला आणि घोडा पुढे वेगाने नेला. समोर पेत्याला वेगळी माणसे दिसली. ती फ्रेंच माणसे असावीत असे त्याला वाटले. ती उजव्या बाजूकडून डाव्या बाजूकडे रस्ता ओलांडत धावत होती. त्यातील एकजण आपल्या घोड्याच्या टापांखाली चिखलात पडला.

कोसॅकांनी झोपडीच्या भोवती गर्दी केली होती. तिथे त्यांचे काही काम सुरू होते. त्या गर्दीतून भयानक किंकाळी उठली. पेत्याने आपला घोडा त्या गर्दीकडे पिटाळला. त्याच्या

पहिल्याप्रथम दृष्टीस पडला तो एका फ्रेंच माणसाचा पांढराफटक पडलेला चेहरा, त्याचा थरथरता जबडा. त्या माणसाने छातीशी रोखलेला भाला पकडून ठेवला होता.

'छान...दोस्तहो...छान...' पेत्या ओरडला. क्षुब्ध झालेल्या घोड्याचा लगाम त्याने सैल सोडला आणि खाली असलेल्या गावाला जाणाऱ्या रस्त्याच्या दिशेने घोड्याला पिटाळले.

त्याला आघाडीवरील गोळीबार ऐकू आला. कोसॅक, हुझार आणि फाटक्या कपड्यांतील रशियन कैदी रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी धावत मोठमोठ्याने ओरडत होते. ते काय ओरडत होते ते समजत नव्हते. निळा कोट घातलेला, डोकीला टोपी नसलेला, कपाळाला आठ्या घातलेला लालबुंद चेहऱ्याचा उमदा दिसणारा फ्रेंच मनुष्य खाली कोसळला होता. 'पुन्हाही उशीर झाला.' पेत्याच्या डोक्यात विचार चमकून गेला. जोराचा गोळीबार चालला होता तिकडे त्याने घोडा पिटाळला. काल रात्री तो ज्या मांगरात डोलोहॉव्हबरोबर गेला होता त्याच्या अंगणातून गोळ्या येत होत्या. फ्रेंच सैनिक बागेत दाट वाढलेल्या झुडपांत कुंपणाआड दबा धरून राहिले होते आणि फाटकाभोवती गर्दी करणाऱ्या कोसॅकांना गोळ्या मारीत होते फाटकाच्या दिशेने घोडा नेताना पेत्याला धुरातून डोलोहॉव्हचा फिकट हिरवट चेहरा दिसला. पेत्याचा घोडा जवळ आला तेव्हा डोलोहॉव्ह ओरडत होता, 'बाजूला व्हा, पायदळ येई-पर्यंत थांबा.'

'थांबा!'... पेत्या म्हणाला आणि उत्साहाने त्याने आरोळी दिली. मग क्षणभरही तिथे थांबला नाही. ज्या ठिकाणी त्याला गोळीबार ऐकू आला होता, आणि जेथून अगदी दाट धूर येत होता त्या दिशेने त्याने आपला घोडा पिटाळला. तिथे मग सूं सूं करत येऊन गोळ्या थाड् थाड् आदळू लागल्या. कोसॅक सैनिक आणि डोलोहॉव्ह पेत्यामागून घोडे पिटाळीत फाटकाशी आले. त्या दाट धुरात फ्रेंचांनी आपली शस्त्रे टाकली, कोसॅकांना सामोरे जाण्या-साठी काहीजण झुडपांतून बाहेर आले आणि काहीजण डबक्याच्या दिशेने टेकडीवरून खाली धावू लागले. पेत्या अंगणाभोवती आपला घोडा पिटाळीत होता, घोड्याचा लगाम खेचून धरण्याऐवजी तो दोन्ही हात चमत्कारिक तऱ्हेने उडवीत होता, एका बाजूला जास्त जास्त कलत होता. सकाळच्या प्रकाशात धुमसणाऱ्या राखेत घोड्याची पावले पडली आणि तो एकदम थांबला. पेत्या धाड्दिशी चिखलात पडला. कोसॅकांनी पाहिले—त्याचे हातपाय जोराने वळवळत होते. मात्र त्याचे डोके निश्चल होते. त्याच्या मेंदूतून गोळी आरपार गेली होती.

आपण शरण आलो आहोत हे जाहीर करण्यासाठी तलवारीवर हातरुमाल ठेवून वरिष्ठ फ्रेंच अधिकारी बाहेर आला. त्याच्याशी बोलणी झाल्यावर डोलोहॉव्ह घोड्यावरून उतरला आणि हात पसरून निश्चल पडलेल्या पेत्याजवळ आला.

'ठार झाला आहे.' तो रागाने म्हणाला आणि समोरून येणाऱ्या डेनिसॉव्हला भेटायला फाटकाकडे गेला.

'ठार झाला का?' डेनिसॉव्हने ओरडून विचारले. निष्प्राण होऊन पडलेल्या पेत्याची परिचित आकृती त्याने दूर अंतरावरूनही ओळखली होती.

'हाय, ठार झाला.' डोलोहॉव्ह उद्‌गारला. जणू त्या शब्दांनी त्याला समाधान मिळाले होते. कोसॅक घाईघाईने कैद्यांच्या भोवती जमा होत होते. त्या कैद्यांकडे डोलोहॉव्ह त्वरेने गेला. 'त्यांना मारू नका,' त्याने डेनिसॉव्हला ओरडून सांगितले. डेनिसॉव्ह काही बोलला नाही. तो पेत्याजवळ गेला, घोड्यावरून उतरला, रक्ताचे डाग असलेला चिखलाने माखलेला आणि केव्हाच पांढराफटक होत चाललेला पेत्याचा चेहरा त्याने थरथरत्या हातांनी आपल्या दिशेला वळवला.

'मला गोड खायला आवडतं. फार उत्तम बेदाणे आहेत. तुम्हाला सगळे घ्या.' पेत्याचे शब्द त्याच्या मनात उमटले.

डेनिसॉव्ह आणि डोलोहॉव्ह यांनी जे रशियन कैदी मुक्त केले त्यांतील एक कैदी होता पीएर बेझुहॉव्ह. कैद्यांच्या ज्या तुकडीत पीएर होता त्या तुकडीने सैन्य व वाहतूकविभागाबरोबर मॉस्को सोडले होते. जरी फ्रेंच अधिकाऱ्यांनी नवे हुकूम दिले नव्हते तरी २२ ऑक्टोबर रोजी कैद्यांची तुकडी अलग पडली होती. प्रारंभी बिस्किटांचा साठा नेणारा वाहतूकविभाग त्याच्यामागून येत होता. त्यातील अर्धा विभाग कोसॅकांनी लुटला आणि अर्धा विभाग पुढे गेला. कैद्यांच्या पुढे कूच करीत पायी जाणाऱ्या घोडदळ सैनिकांपैकी एकही राहिला नव्हता. ते सर्व नाहीसे झाले होते. प्रारंभी तोफखान्याचे लोक पुढे चालत असलेले कैद्यांना दिसले, पण आता त्या ठिकाणी त्यांना मार्शल ज्युनोचे सामान वाहणाऱ्या गाड्यांची प्रचंड रांग दिसली. त्यांच्या संरक्षणासाठी सोबत वेस्टफेल्यन सैनिक होते. कैद्यांच्या मागून घोडदळाच्या सैनिकांना कपडे, शस्त्रे यांखेरीज लागणाऱ्या सामानाची वाहतूक करणाऱ्या गाड्या चालल्या होत्या. प्रारंभी तिघातिघांची रांग धरून फ्रेंच सैनिक चालले होते. परंतु व्हॅझमाला आल्यापासून एकेरी रांगा करून चालले होते. आता तर बेशिस्तीने कळस गाठला होता.

ज्या रस्त्यावरून ते चालले होते त्याच्या दोन्ही बाजूंना घोड्यांच्या प्रेतांचा खच पडला होता. निरनिराळ्या रेजिमेंटांतून अलग झालेले, फाटक्या कपड्यातील सैनिक सतत जागा बदलत होते. कूच करणाऱ्या सैन्याच्या रांगेत शिरत होते. पुन्हा त्या सैन्याच्या मागे पडत होते, पुष्कळ वेळा हूल उठली. संरक्षक सैनिकांनी आपल्या बंदुका रोखून गोळ्या झाडल्या आणि एकमेकांस तुडवीत पळ काढला. जेव्हा ते पुन्हा एकत्र आले तेव्हा अकारण घबराट निर्माण केल्याबद्दल एकमेकांना शिव्या देऊ लागले.

घोडदळाच्या सामानाची वाहतूक करणाऱ्या गाड्यांचा विभाग, संरक्षक सैनिकांच्या पहाऱ्यातील कैद्यांचा विभाग आणि सामानाची वाहतूक करणाऱ्या गाड्यांचा विभाग हे तीनही विभाग जरी त्यांतील प्रत्येक विभाग वेगाने कोलमडत होता तरीही एक संपूर्ण विभाग होता.

घोडदळाच्या सामानाची वाहतूक करणाऱ्या गाड्या सुरुवातीला १२० होत्या. त्यांतील फक्त

६० शिल्लक राहिल्या. उरलेल्यांतील काही पळविण्यात आल्या. काही वाटेत टाकून द्याव्या लागल्या. झीनोचे सामान नेणाऱ्या कित्येक गाड्यांची हीच गत झाली होती. दव्हाउस्टच्या रेजिमेंटमधून बाहेर पडलेल्या सैनिकांनी तीन गाड्यांवर हल्ला करून त्या लुटल्या. ह्या सामानवाहू गाड्यांवर कैद्यावर नसेल इतका कडक पहारा ठेवला जात होता. एका जर्मन सैनिकाजवळ मार्शलचा चांदीचा चमचा आढळला म्हणून त्याला मार्शलच्या हुकमानुसार गोळी घालण्यात आली. जर्मन सैनिकांचे आपापसांतील बोलणे पीएरच्या कानावर पडले तेव्हा त्याला ह्या गोष्टी कळल्या.

इतर दोन विभागांच्या संरक्षक सैनिकांपेक्षा कैद्यांबरोबरच्या संरक्षक सैनिकांत अधिक घट होत होती. मॉस्कोहून तीनशेतीस सैनिक निघाले होते. त्यांतील आता शंभराहून कमी सैनिक शिल्लक होते. घोडदलाची पुरवठा सामग्री अगर झीनोचे सामान यापेक्षा कैद्यांचे ओझेच अधिक कटकटीचे वाटत होते. खोगिरांचा अगर झीनोच्या चमच्यांचा काही उपयोग होऊ शकेल हे त्यांना समजत होते. परंतु वाटेत सतत मरणाऱ्या, रस्त्यात टाकून द्यावे लागणाऱ्या, ज्यांना ठार मारून टाकण्याचे हुकूम होते अशा, गारठलेल्या आणि उपासमार होत असलेल्या रशियनांवर गारठलेल्या आणि उपासमार होत असलेल्या सैनिकांनी पहारा का करायचा हे त्यांना कळत नव्हते. एवढेच नव्हे तर त्यांनी त्यांना चीड येत होती. कैद्यांवर पहारा ठेवणारे सैनिक आपल्याच हालअपेष्टांनी गांजलेले होते. कैद्यांबद्दल करुणा वाटली तर शेवटी आपली अवस्था आणखी खडतर होईल याची त्यांना भीती वाटत होती म्हणून ते कैद्यांशी अत्यंत कटुतेने व कडकपणे वागत होते.

एका ठिकाणी तर कैद्यांना तबेल्याला कुलूप घालून कोंडून ठेवून संरक्षक सैनिकांनी स्वतःचाच पुरवठा लुटला. कित्येक कैद्यांनी भिंतीखाली भुयार खोदून पळ काढला. पण फ्रेंचांनी त्यांना गाठले आणि गोळ्या घातल्या. कैद्यांमधील अधिकाऱ्यांनी कैद्यांमधील सामान्य सैनिकांपासून अलग राहून कूच करावे अशी व्यवस्था प्रारंभी प्रारंभी मॉस्को सोडल्यावर केलेली होती. पण ती व्यवस्था कधीच रद्द झाली होती. ज्यांना चालता येत होते ते सगळे एकत्रच कूच करीत होते. तिसऱ्या मुक्कामाला पीएर कॅरॅटीव्हला येऊन मिळाला. कॅरॅटीव्हला मालक मानून त्याच्यामागून एक फेंगड्या पायाची भुऱ्या रंगाची कुत्री चालली होती.

मॉस्को सोडल्यानंतर तिसऱ्या दिवशी कॅरॅटीव्हच्या तापाने पुन्हा उचल खाल्ली. ह्या तापामुळे तो मॉस्कोतील इस्पितळात पडून होता. कॅरॅटीव्हची शक्ती क्षीण होऊ लागली तसतसा पीएर त्याच्यापासून दूर होऊ लागला. कॅरॅटीव्ह आजारी पडल्यानंतर पीएर अगदी प्रयासाने त्याच्याकडे वळत होता. असे का होत होते ते त्याला सांगता आले नसते. मुक्कामावर थांबल्यानंतर कॅरॅटीव्ह हळू आवाजात कण्हू लागे. जवळ पीएर त्याच्या गेलाच तर त्याच्या अंगाला आजाऱ्याच्या अंगाला येते तशी दुर्गंधी येऊ लागे. तसा पीएर त्याच्यापासून आणखी दूर होई. मग त्याच्याबद्दल विचार करीत नसे.

मागे रेंगाळणाऱ्या शेकडो कैद्यांना कशा तऱ्हेने गोळी घालून ठार केले गेले, ते पीएरने पाहिले नाही किंवा ऐकले नाही. सतत अशक्त होत जाणाऱ्या आणि ज्याच्या नशिबात निःसंशय त्याहून दुसरे काही लिहिले जाणार नव्हते त्या कॅरॅटीव्हचा त्याने विचार केला नाही. त्याने स्वतःचा विचार तर त्याहूनही कमी केला असेल. त्याची स्थिती जसजशी खडतर होत होती, त्याचे भवितव्य जसजसे अधिकाधिक भीषण होत होते तसतसे वर्तमानकालीन परिस्थितीपासून अधिकाधिक मुक्त असे आनंदाचे आणि सांत्वनाचे विचार, आठवणी आणि कल्पना त्याच्या मनात येत होत्या.

बावीस तारखेस दुपारी आपल्या पावलांकडे आणि ओबडधोबड रस्त्याकडे पाहात पीएर चिखल झालेला निसरडा रस्ता तुडवीत टेकडी चढत होता. मधूनमधून तो भोवतालच्या परिचित जमावाकडे पाहात होता आणि मग पुन्हा आपल्या पावलांकडे पाहात होता. पावलां-प्रमाणे जमावदेखील त्याला परिचित होता, त्याचाच भाग होता. भुऱ्या रंगाची, फेंगाड्या पायांची कुत्री मजेत रस्त्याच्या कडेकडेने धावत होती. मधूनमधून मागचा एक पाय उचलून आपल्या चपळाईची आणि समाधानाची खूण म्हणून की काय तीन पायांनी उड्या मारीत धावे, प्रेतावर बसलेल्या कावळ्यांवर भुंके. मॉस्कोत होती त्यापेक्षा ती इथे तुकतुकीत, मऊ आणि आनंदी होती. भोवताली मनुष्यांपासून घोड्यांपर्यंत नाना प्राण्यांची प्रेते कमीजास्त प्रमाणात सडत होती. सैनिक कूच करीत असल्याने लांडगे ह्यांच्याजवळ फिरकू शकत नसत. त्यामुळे त्या कुत्रीला पोटभर ताव मारता येत होता.

भल्या सकाळपासून पाऊस सारखा पडत होता. दुसऱ्या क्षणाला पाऊस थांबेल आणि आकाश निरभ्र होईल असे सारखे वाटत होते आणि थोड्याच वेळात पूर्वीपेक्षा जोराची वृष्टी होत होती.

रांगेत राहण्याचा हुकूम एकदम मोठ्या आवाजात दिला गेला. कैद्यांच्या आणि संरक्षक सैनिकांच्या हालचालीतून आनंद व्यक्त होत होता. काहीतरी मौजेचा आणि डामडौलाचा समारंभ होणार अशी प्रत्येकजण अपेक्षा करीत होता. सर्वत्र जोराने ओरडून दिले जाणारे हुकूम ऐकू येत होते. उत्तम घोड्यावर स्वार झालेल्या सुरेख पोषाख केलेल्या घोडदळ सैनिकांची तुकडी कैद्यांना वळसा घालून डाव्या बाजूने घोड्यांना दुडक्या चालीने हाकवीत आली. अधिकारीवर्ग आला म्हणजे सामान्य माणसाच्या चेहऱ्यावर पसरते तशी अस्वस्थता सर्वांच्या चेहऱ्यांवर पसरली. कैद्यांनी दाटी केली आणि मग त्यांना रस्त्यापासून दूर करण्यात

आले. संरक्षक सैनिक शिस्तीत रांगेत उभे राहिले.

'सम्राट! सम्राट येत आहेत! मार्शल...ड्यूक' तुकतुकीत घोडेस्वार घोडे पिटाळीत गेले न गेले तोच भुऱ्या रंगाच्या घोडयाची गाडी खडखडाट करीत पोचली. पीएरला शांत, देखण्या, गुबगुबीत आणि गोऱ्यापान चेहऱ्याचे ओझरते दर्शन घडले. तो अनेक मार्शलांपैकी एक मार्शल होता.

ज्याच्या ताब्यात सामानवाहू गाडया होत्या त्या जनरलने आपल्या हाडकुळ्या घोडयाला चाबकाने बडवले आणि तो गाडीमागून घोडा पिटाळीत असताना त्याचा चेहरा लालबुंद व भयभीत झाला होता. कित्येक अधिकारी एकत्र मिळून जात होते. सैनिक त्यांना रेटून पुढे जात होते. सर्वांच्या चेहऱ्यावर अंतःकरणातील खळबळ आणि अस्वस्थता दिसत होती.

'काय म्हणाला तो? काय म्हणाला?' पीएरच्या कानांवर शब्द पडत होते.

मार्शल गाडीतून जात असताना सगळ्या कैद्यांना दाटीवाटीने एकत्र करण्यात आले होते. कॅरॅटीव्ह पीएरच्या नजरेस पडला. आपला छोटासा लष्करी कोट अंगाभोवती लपेटून घेऊन तो बर्च वृक्षाला टेकून बसला होता.

कॅरॅटीव्हने अश्रूंमुळे उजळलेले दयार्द्र आणि टपोरे डोळे पीएरवर रोखले. त्या डोळ्यांत निश्चितच आवाहन होते. त्याला काहीतरी सांगायचे होते हे स्पष्ट होते. पण पीएर फार घाबरून गेला. कॅरॅटीव्हने आपल्याकडे पाहिलेले न कळल्यासारखे करून तो घाईघाईने तेथून निसटला! कैदी जेव्हा पुन्हा कूच करू लागले तेव्हा पीएरने मागे वळून पाहिले. रस्त्याच्या कडेला असलेल्या बर्च वृक्षाखाली कॅरॅटीव्ह बसला होता. दोन फ्रेंच माणसे वाकून त्याच्याशी बोलत होती. पीएरने पुन्हा वळून पाहिले नाही. तो लंगडत लंगडत टेकडी चढू लागला.

कॅरॅटीव्ह बसला होता तेथे गोळ्यांचा आवाज झालेला त्याने ऐकला, अगदी स्पष्टपणे ऐकला. त्याच वेळी स्मॉलेन्स्कला जायला किती अंतर उरले हे मोजायचे आपण विसरलो हे त्याच्या लक्षात आले. मार्शल जवळून गेला त्या अगोदर पूर्वीपासून तो अंतराचा हिशोब करीत होता. पुन्हा तो मोजू लागला. तेवढ्यात दोन फ्रेंच सैनिक त्याच्या जवळून धावत गेले. त्यांच्यापैकी एकाच्या हातात अद्याप धूर निघत असलेली बंदूक होती. त्या दोघांचेही चेहरे पांढरेफटक झाले होते. त्यातला एकजण भेदरून पीएरकडे पाहात होता. मॉस्कोला फाशीच्या प्रसंगी एका तरुण सैनिकाच्या चेहऱ्यावर दिसलेले भाव या दोघांच्या चेहऱ्यावर पीएरला दिसले.

कॅरॅटीव्ह बसला होता त्या ठिकाणी कुत्री भुंकत असल्याचे ऐकू आले. 'मूर्ख कुत्री! कशाला भुंकते आहे!' पीएर मनाशी म्हणाला.

त्याच्यासारखेच कैदी त्याच्याबरोबर कूच करीत होते. ज्या जागेवरून गोळीबाराचा आणि कुत्रीच्या भुंकण्याचा आवाज आला होता तिकडे ते वळून म्हणून पाहात नव्हते. त्या सर्वांची मुद्रा शुष्क, निवर झाली होती.

घोडदळाच्या सामानाची वाहतूक करणाऱ्या गाड्या, कैदी, मार्शलच्या सामानाच्या गाड्या शॅमशेव्हा खेड्यात मुक्कामासाठी थांबल्या. सगळेजण शेकोटीभोवती जमा झाले. पीएर शेकोटी-जवळ गेला. त्याने घोड्याचे भाजलेले मांस खाल्ले. आगीकडे पाठ करून तो पडला आणि तिथेच झोपी गेला. पुन्हा जीवनातील वास्तव घटना त्याच्या स्वप्नात मिसळू लागल्या. जीवन म्हणजे सर्व वस्तुजात. सर्व वस्तुजात बदलते आहे. गतिशील आहे. हालअपेष्टा सोसत असताना, त्याही आपला दोष नसताना सोसत असताना ह्या जीवनावर प्रेम राहणे अतिशय कठीण गोष्ट आहे आणि अतिशय भाग्याचीही गोष्ट आहे. पीएरला एकाएकी कॅरटीव्हची आठवण झाली. मग स्विट्झर्लंडमध्ये ज्यांनी भूगोल शिकवला होता त्या प्रेमळ वृद्ध शिक्षकांची त्याला एकाएकी आठवण झाली. कितीतरी दिवस तो त्यांना विसरून गेला होता, पण आता ते जिवंत असल्यागत त्यांची मूर्ती त्याच्या डोळ्यांसमोर उभी राहिली. ' जरा थांब ' ते वृद्ध शिक्षक म्हणायचे. मग ते पीएरला गोल दाखवायचे. हा गोल सारखा थरथरत राहणारा हालणारा गोल होता. त्याचा विस्तार निश्चित नव्हता. एकमेकांना भिडलेल्या असंख्य थेंबांनी त्याचा पृष्ठभाग बनलेला होता. त्या सगळ्या थेंबांना गती होती, ते सारखे बदलत होते. कधी अनेक थेंबांचा एक थेंब होत होता. कधी एका थेंबाचे अनेक थेंब होत होते. प्रत्येक थेंब विस्तारण्याचा, अधिकाधिक अवकाश व्यापण्याचा प्रयत्न करीत असल्यासारखा दिसत होता. परंतु बाजूचे थेंब त्यावर दाब देऊन कधी आपल्यात सामावून घेत, कधी ते त्या थेंबात मिसळून जात.

' जीवन हे असं आहे ' ते वृद्ध शिक्षक म्हणायचे. पीएरचे विचारचक्र सुरू झाले. ' किती सोपं आणि किती सरळ ! इतके दिवस मला कसं कळलं नाही ? परमेश्वर मध्यभागी आहे आणि त्याचं प्रतिबिंब जास्तीत जास्त मोठ्या प्रमाणावर आपल्यामध्ये उमटावं म्हणून प्रत्येक थेंब विस्तारण्याचा प्रयत्न करीत असतो. तो विस्तारतो, विलीन होतो, बाहेर फेकला जातो, पृष्ठभागावरून नाहीसा होतो, खोलवर जातो, पुन्हा वर उमटतो. कॅरटीव्हची अवस्था अशीच झाली. तो विलीन झाला आणि नाहीसा झाला. '

' तुला कळलं ना, बाळ ? ' शिक्षक म्हणाले.

' कळलं ना, हरामखोर कुठला ? ' कुणीतरी खेकसले आणि पीएर जागा झाला. त्याने मान उंचावून पाहिले आणि तो उठून बसला. एक फ्रेंच सैनिक आगीजवळ चवड्यांवर बसला होता. त्याने एका रशियन सैनिकाला नुकतेच लोटून दिले होते आणि आता तो सळीच्या टोकाला मांसाचा तुकडा लावून भाजत होता. निखाऱ्याच्या प्रकाशात त्याचा उदास, मलीन, उदी चेहरा आणि खिन्न भुवया स्पष्टपणे दिसत होत्या.

' त्याला कसली काळजी नाही. ' तो पुटपुटला. मागे उभ्या असलेल्या सैनिकाला म्हणाला,

‘ वाटमाऱ्या, जा इथून. ’

ज्याला ढकलून देण्यात आले होते तो रशियन सैनिक शेकोटीजवळ बसून काहीतरी डोक्याने थोपटीत होता. पीएरने अधिक जवळून पाहिले तो भुऱ्या रंगाची कुत्री शेपटी हालवीत सैनिकाजवळ बसली होती.

‘ ही आलीच की...’ पीएर म्हणाला, ‘ मग प्लॅटन...’ तो काही बोलणार होता पण थांबला. एकाएकी त्याला अनेक दृश्ये आठवू लागली. झाडाखाली बसलेल्या प्लॅटनची खाली वळलेली नजर, त्या ठिकाणाहून ऐकू आलेला गोळीबार, कुत्रीचा आक्रोश, धावत जाणाऱ्या सैनिकाची अपराधी मुद्रा, खाली वळवलेली धूर टाकणारी बंदूक...त्या मुक्कामाला त्याला कॅरॅटीव्हची गैरहजेरी जाणवली. कॅरॅटीव्ह ठार झाला ही जाणीव त्याला स्पष्टपणे होणार होती. पण त्याच क्षणी कसला तरी गूढ इशारा झाल्याप्रमाणे त्याला कीव्ह येथील आपल्या घरातील व्हरांड्यात एका सुंदर पोलिश बाईबरोबर घालवलेली वसंतातील संध्याकाळ आठवली. पीएरने त्या दिवशीच्या आठवणींची संगती लावण्याचा, त्यापासून काही निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला नाही. त्याने डोळे मिटून घेतले. खेड्यातील वसंतऋतूतील रात्रीची आठवण स्नानाच्या आणि थरथरत्या द्रवरूप गोलाच्या विचारात मिसळली. आता तो जणू खोल खोल पाण्यात बुडाला.

भरभर एकसारख्या होणाऱ्या गोळीबाराच्या प्रचंड आवाजाने आणि किंकाळ्यांनी तो उठला तेव्हा सूर्योदयाला अजून अवकाश होता. फ्रेंच सैनिक त्याच्याजवळून पळत होते.

‘ कोसॅक, ’ त्यांच्यापैकी एकजण ओरडला. क्षणभरात काही रशियनांनी पीएरला गराडा घातला. आपल्याला काय होते हे पीएरला काही वेळ उमगले नाही. त्याच्या भोवताली त्याचे सहकारी आनंदाने आरोळ्या मारीत होते.

‘ दोस्त हो ! आपली माणसे ! ’ कोसॅकांना आणि हुझारांना मिठ्या मारीत वृद्ध सैनिक रडत ओरडू लागले. हुझार आणि कोसॅक कैद्यांभोवती जमा झाले. त्यांना ते कपडे, बूट किंवा पाव देऊ लागले. त्यांच्यामध्ये बसलेला पीएर रडू लागला. त्याच्या तोंडून एक शब्दही फुटेना. त्याच्याजवळ आलेल्या पहिल्याच सैनिकाचे त्याने रडत रडत चुंबन घेतले.

पडलेल्या घराच्या फाटकापाशी डोलोहॉव्ह उभा होता आणि निःशस्त्र फ्रेंचांना जाऊ देत होता. जे घडले होते त्यामुळे फ्रेंचांच्या मनात खळबळ उडाली होती. ते आपापसात मोठमोठ्याने बोलत होते. आपल्या बुटावर चाबकाने फटकारे मारीत उभा असलेला डोलोहॉव्ह त्यांच्याकडे थंड नजरेने पाहात होता. त्याच्या काचेसारख्या डोळ्यांत त्यांना काही शुभ दिसत नव्हते. त्याच्या जवळून जाताना त्यांची तोंडे बंद होत. डोलोहॉव्हच्या हाताखालील एक कोसॅक दुसऱ्या बाजूला उभा राहून कैदी मोजीत होता. शंभर कैदी बाहेर पडले की फाटकावर खडूने रेघ मारीत होता.

‘ किती झाले ? ’ डोलोहॉव्हने विचारले.

‘ दोनशे झाले. ’ कोसॅकने उत्तर दिले.

' चला, चालते व्हा.'

फ्रेंचांकडून उचललेला शब्द डोलोहॉव्हने उच्चारला. तिथून जाणाऱ्या कैद्यांच्या नजरेशी नजर मिळाली की डोलोहॉव्हचे डोळे निर्दयपणे चमकत.

२८ ऑक्टोबरला हिम पडायला प्रारंभ झाला. तेव्हापासून माघार घेणाऱ्या फ्रेंच सैन्याची परिस्थिती आणखीन भयंकर झाली. सैनिक गारठून जात होते, नाहीतर शेकोटीने भाजून काढले जात होते. त्याच वेळी सम्राट, राजे आणि उमराव लुटलेली संपत्ती घेऊन लोकरीचे कपडे घालून बंदिस्त गाड्यांतून घराच्या दिशेने चालले होते. फ्रेंचांच्या पिछेहाटीला आरंभ झाला होता. त्यांच्या सैन्याची सारखी परवड सुरू झाली होती. ह्या क्रियांत तत्त्वतः काही बदल होत नव्हता.

मॉस्कोपासून व्हेझमापर्यंत च्याहत्तर हजार फ्रेंच सैनिकांपैकी (यात सबंध युद्धात केवळ लुटालूट करणाऱ्या संरक्षक दलाच्या सैनिकांचा अंतर्भाव केलेला नाही) केवळ छत्तीस हजार सैनिक शिल्लक उरले होते. फक्त पाच हजार काय ते लढाईत कामी आले होते.

लष्कर मोडले होते. रेजिमेंटचा चौथा हिस्सा सैनिक देखील तिच्या निशाणाखाली जमत नव्हते. बाकीचे सैनिक मन मानेल तसे अन्न शोधीत आणि शिस्त झुगारून देत भटकत होते. प्रत्येकजण स्मॉलेन्स्ककडे डोळे लावून होता. तिथे आपण सगळे जोर करू असे त्यांना वाटत होते. गेल्या काही दिवसांत कित्येक सैनिकांनी काडतुसे आणि बंदुका फेकून दिल्या होत्या.

फ्रेंच सैनिक एकदाचे धडपडत स्वप्नाची पूर्ती करणाऱ्या स्वर्गलोकाला म्हणजे स्मॉलेन्स्कला पोचले. मग अन्नासाठी भांडत त्यांनी एकमेकांचे मुडदे पाडले, आपलीच कोठारे लुटली, सगळे लुटून झाल्यावर ते पुढे धावत सुटले. आपण कुठे कोणत्या उद्देशाने धावत आहोत हे त्यांना ठाऊक नव्हते, तरीही ते वेगाने धावत होते. त्यांच्या त्या अलौकिक बुद्धिसत्तेच्या नैपोलिअनलादेखील कळत नव्हते, कारण त्याला हुकूम देणारा कुणीच नव्हता. पण तरीही तो आणि त्याच्या भोवतालचे लोक आपल्या जुन्या सवयीला चिकटून राहिले. त्यांनी हुकूम सोडले, पत्रे लिहिली, अहवाल तयार केले, दैनंदिन आज्ञा केल्या. ते एकमेकांना 'प्रिय बंधू', 'युवराज, 'नेपल्सचे राजे' ह्या आणि अशाच इतर शब्दांनी संबोधीत राहिले. मात्र हुकूम आणि वृत्तांत कागदावरच राहिले. हुकूम अमलात आणायला लावणे अशक्य असल्याने तसा प्रयत्नच झाला नाही. जरी ते परस्परांना ' महाराज, सरकार, प्रिय बंधू' अशा शब्दांनी हाक मारीत होते तरीही आपण फार मोठा अपराध करणारे, दयनीय, तुच्छ प्राणी आहोत आणि त्यासाठी आपणाला आता प्रायश्चित्त घ्यावे लागणार आहे याची त्यांना जाणीव होत होती. प्रत्येकजण आपणाला सैन्याची काळजी आहे असे जरी वरकरणी दाखवीत होता तरी प्रत्येक-जण आपला स्वतःचाच विचार करीत होता, शक्य तितक्या लवकर पळून सुखरूप कसे राहता

येईल याचा विचार करीत होता.

शत्रू मागाहून येईल, पुढे येणार नाही अशी फ्रेंचांची अपेक्षा होती. त्यामुळे कूच करणारे फ्रेंच सैनिक एकमेकांपासून चोवीस तासांच्या मुक्कामात विखुरले गेले. त्या सर्वांच्या पुढे सम्राट, नंतर राजे आणि इतर उमराव पळ काढीत होते.

नेपोलिअन शहाणपणा करून उजवीकडे वळून नीपरच्या पलीकडे जाईल असे रशियन फौजेला वाटले आणि रशियन फौजदेखील उजवीकडे वळली आणि क्रस्नू येथे मुख्य रस्त्याला येऊन पोचली. आणि इथे आंधळ्या कोशिंबिरीच्या खेळात घडावे तसे घडले. फ्रेंच सैन्य सरळ आमच्या सैन्याच्या आघाडीच्या फळीत घुसले. शत्रू अनपेक्षितपणे भेटताच फ्रेंच सैनिकांचा गोंधळ उडाला. एकाएकी भयभीत झाल्याने ते थबकले आणि मग आपल्या सहकाऱ्यांना पिछाडीला सोडून त्यांनी पळ काढला. नंतरचे तीन दिवस रशियन सैन्याचा मार खात फ्रेंचांच्या सैन्याचे अलग अलग विभाग पळ काढीत होते. पहिल्यांदा म्युराची, मग दव्हाउस्तची, मग नेची तुकडी पळाली. ह्या तुकड्यांनी एकमेकांना सोडले. आपले जड सामान टाकून दिले, तोफखाना टाकला, अर्धी माणसे सोडून दिली. रात्रीच्या वेळी रशियन सैन्याला वळसा घालून अर्धवर्तुळाकार मार्गाने त्यांनी पळ काढला.

सर्वांत शेवटी नेने पळ काढला. फ्रेंचांची दयनीय अवस्था झाली तरीही ( किंवा कदाचित म्हणूनही ) दुखापत करणाऱ्या जमिनीला मारणाऱ्या बालकाची वृत्ती धारण करणारा ने कुणालाही इजा न करणारे स्मॉलेन्स्कचे तट पाडण्यासाठी मागे थांबला. सर्वांच्या शेवटी दहा हजार सैनिकांची तुकडी घेऊन निघालेला ने ऑर्शा येथे नेपोलिअनजवळ आला तेव्हा त्याच्याजवळ केवळ दहा हजार सैनिक उरले होते. वाटेत त्याने बाकीचे सर्व सैनिक आणि आपल्या सर्व तोफा गमावल्या होत्या. रात्रीच्या वेळी गर्द झाडी असलेल्या ठिकाणी त्याने नीपर नदी चोरून पार केली होती.

ते ऑर्शाकडून व्हिल्नाकडे जाणाऱ्या रस्त्याने अजूनही पाठलाग करणाऱ्या सैन्याशी आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ खेळत निघाले. पुन्हा ते बेऱ्हेझिना येथे गोंधळून गेले. कित्येकजण बुडून मेले, कित्येकजण शरण गेले, जे नदी पार करून गेले ते मात्र पळत सुटले.

आपल्या सहकाऱ्यांना टाकून लोकरीचे कपडे अंगात घालून त्यांचा प्रमुख कमांडर नेपोलिअन घसरगाडीतून एकटाच पलायन करता झाला. ज्यांना पळता आले ते पळाले; जे पळू शकले नाहीत त्यातले काही शरण गेले; काही मरण पावले.

■ ■

# भाग पंधरावा

## १८१२ - १८१३

प्रिन्स आन्द्रेच्या मृत्यूनंतर नताशा आणि प्रिन्सेस मार्या खचून गेल्या. त्या दोघी भीषण मृत्यूच्या ढगाच्या सावटात डोळे मिटून होत्या, जीवनाकडे सरळ पाहायला धजत नव्हत्या. प्रत्येक राकट आणि क्लेशकारक स्पर्शापासून त्या आपल्या उघड्या जखमांचे काळजीपूर्वक रक्षण करीत होत्या. रस्त्यावरून जाणारी गाडी, भोजनासाठी केलेली बोलावणी, कोणता पोषाख तयार ठेवायचा अशी दासीने केलेली पृच्छा, यांहूनही वाईट म्हणजे कर्तव्यबुद्धी म्हणून उपचारादाखल उच्चारलेले खोट्या सहानुभूतीचे शब्द...या सगळ्या गोष्टी आपल्या अंतःकरणाची जखम दुखवीत आहेत, तिला अपमानित करताहेत असे त्यांना वाटत होते. त्या शांततेत त्या अजून कानात रेंगाळत राहाणाऱ्या उग्रभीषण शांतिप्रार्थना ऐकण्याचा आणि क्षणभर दर्शन देणाऱ्या अनंत गूढ प्रदेशात डोकावण्याचा प्रयत्न करीत होत्या; या सगळ्या गोष्टी त्यांना हव्या असलेल्या शांततेचा भंग करीत होत्या.

त्या दोघी एकत्र असल्या म्हणजेच अशा प्रकारच्या अपमानापासून आणि दुःखापासून सुरक्षित असायच्या. त्या एकमेकींशी क्वचितच बोलत. कधी बोलल्याच तर अतिशय क्षुल्लक बाबींसंबंधी बोलत. दोघींच्याही बोलण्यात भविष्यासंबंधीचे उल्लेख सारखेच टाळले जात.

भविष्याची शक्यता मान्य करणे म्हणजे त्याच्या स्मृतीचा अपमान करणे असे त्या दोघींनाही वाटे, तरीही त्या दोघी मृत व्यक्तीशी निगडित अशा कोणत्याही विषयांवर बोलण्याचे विचारपूर्वक टाळीत. आपण जे अनुभवले आणि आपणाला जे वाटले ते शब्दात व्यक्त करता येणार नाही असे त्यांना वाटू लागे.

शुद्ध, निर्भेळ आनंदाप्रमाणेच शुद्ध निर्भेळ दुःखही अशक्य असते. प्रिन्सेस मार्या आपल्या

भाच्याची दाई, पालक, सारे काही होती. ती स्वतःचा आयुष्यक्रम ठरवायला मुखत्यार होती. अशी स्थिती असल्यामुळे जीवनातील जरुरीच्या गोष्टींकडे लक्ष देणे तसेच गेले पंधरा दिवस ती ज्या शोक-विश्वात राहात होती ते सोडणे तिला भाग होते. तिला नातेवाइकांची पत्रे आली होती, त्यांना उत्तरे द्यायची होती. ज्या खोलीत निकोलुरकाला ठेवले होते तिथे ओल आली होती. त्याला खोकला सुरू झाला होता. अल्पाटिच हिशेबाचे कागद घेऊन यारॉस्लॉव्हलला काही सूचना करण्यासाठी आला होता. त्याने प्रिन्सेस मार्याला सल्ला दिला, 'तुम्ही आता मॉस्कोला येऊन व्हॉसूड्विझेङ्का येथील घरात राहा. ते घर चांगल्या स्थितीत आहे. थोड्याशा किरकोळ दुरुस्त्या कराव्या लागतील.' जीवनाचा प्रवाह कोणासाठी थांबत नसतो. तिला आयुष्य कंठणे भाग होते. आजवर प्रिन्सेस मार्या एकटीच चिंतनात दिवस घालवीत होती. त्यातून बाहेर पडणे तिच्या जीवावर आले. नताशाला एकटी सोडून जाताना तिला वाईट वाटले, मनाला टोचणी लागली. पण दैनंदिन जीवनातील कर्तव्ये करणे भाग होते. ती मनाविरुद्ध पार पाडण्याखेरीज गत्यंतर नव्हते. अल्पाटिचच्या मदतीने तिने हिशेब तपासले, आपल्या भाच्याबाबत देसॅलेचा सल्ला घेतला आणि ती मॉस्कोच्या प्रवासाची तयारी करू लागली.

नताशा आता एकटी पडली. प्रिन्सेस मार्या आपल्या प्रवासाची तयारी करण्यात मग्न झाली तेव्हापासून तिच्याकडेदेखील नताशा वळेनाशी झाली.

प्रिन्सेस मार्या काउंटेसला म्हणाली, 'नताशाला माझ्याबरोबर मॉस्कोला राहू द्या'. तिची सूचना आईवडिलांना पसंत पडली. आपल्या मुलीची तब्येत दिवसेंदिवस खालावत असल्याचे त्यांना दिसत होते. हवापालट झाला आणि मॉस्कोतील डॉक्टरांचा सल्ला मिळाला तर ती सुधारेल अशी आशा त्यांना वाटली.

नताशाला त्याबाबत विचारताच ती म्हणाली, 'मी कुठंच जाणार नाही. मला एकटीलाच राहू द्या. दुसरं काही नको.' असे बोलून ती खोलीच्या बाहेर धावत सुटली. तिला आपले अश्रू आवरता येत नव्हते. त्यांमागे दुःखापेक्षा संताप, वैताग अधिक होता.

डिसेंबरच्या अखेरीला एके दिवशी कृश, फिकट नताशा सोफ्याच्या टोकाला पाय दुमडून बसली होती. तिने काळा लोकरी गाउन घातला होता. केस निष्काळजीपणाने गुंडाळून बांधलेले होते. अस्वस्थपणे बोटांनी दुपट्ट्याची टोके चुरगाळीत आणि सपाट करीत ती दाराच्या कोपऱ्यात नजर खिळवून बसली होती.

तो जिथे पोचला होता त्या पैलतीरावर जणू तिची नजर लागली होती. ज्याचा तिने पूर्वी कधी विचार केला नव्हता, जे खूप दूर आहे असे तिला वाटायचे, ज्याच्या अस्तित्वाबद्दल तिला विश्वास वाटत नसायचा ते पैलतीर आता तिच्या अगदी समीप होते, अगदी तिचे झाले होते. जीवनातील शून्यता, ओसाडी, व्यथा आणि अपमान ह्यांनी युक्त असलेल्या ऐलतीरापेक्षा ते पैलतीर तिला अधिक आकलनीय वाटू लागले.

तो जिथे असेल असे तिला वाटत होते त्या जगाकडे ती टक लावून पाहात होती. तो इथे

पृथ्वीवर तिला जसा दिसला होता तसाच तिला दिसत होता, त्याहून वेगळा दिसत नव्हता.

नताशा पहिल्यांदाच पाहात असल्यासारखी त्याला पाहू लागली. प्रथम भेटीच्या वेळच्या भावनांचा अनुभव ती घेऊ लागली.

आता तिच्या मनाचा ताबा मधुर दुःखी वृत्ती घेऊ लागली. तिच्या डोळ्यांत अश्रू येऊ लागले. एकाएकी तिने स्वतःलाच विचारले, ' मी हे सारं कोणाला सांगते आहे ? तो आहे तरी कुठं ? त्याचं काय झालं असेल ? '

पुन्हा सारे काही क्लेशदायक गोंधळात झाकळले गेले. पुन्हा तिच्या मनात खळबळ उडाली आणि तो ज्या जगात पोचला होता त्या जगाकडे आठ्या घालीत ती टक लावून पाहात राहिली. आता कुठे आपणाला त्या गूढाचा वेध घेता येत आहे असे तिला वाटू लागले. अगम्याचे तिला दर्शन घडू लागले न लागले तोच दरवाज्याच्या मुठीचा खडखडाट झाला आणि तिच्या कानावर दुःखद आघात झाला. तिची दासी दुन्याशा एकदम वेगाने खोलीत घुसली, तिच्या डोळ्यांत भीती दाटली होती, नताशाकडे तिचे लक्ष नव्हते.

' आधी वडिलांकडे चला. वेळ गमावू नका. ' तिच्या अंतःकरणातील खळबळ शब्दांत आणि मुद्रेवर व्यक्त होत होती. ' दुर्दैव ओढवलं आहे. प्यॉत्र इलियच...पत्र आलं आहे. ' स्फुंदत स्फुंदत ती कशीबशी बोलली.

जेव्हा ती दिवाणखान्यात गेली तेव्हा तिचे वडील मोठ्या त्वरेने काउंटेसच्या खोलीतून बाहेर आले. त्यांचा सुरकुत्या पडलेला चेहरा आसवांनी भिजला होता. गुदमरवून टाकणाऱ्या हुंदक्यांना वाट देण्यासाठी ते बाहेर आले होते, हे उघड होते. नताशाला पाहून त्यांनी निराशेने हात हलवले आणि ते दुःखातिरेकाने हुंदके देऊ लागले.

' पेत...पेत्या...जा आत जा, ती बोलावते आहे...' ते लहान मुलासारखे स्फुंदत लटलट कापणाऱ्या कमजोर पायांनी खुर्चीकडे गेले आणि आपल्या हातांनी चेहरा झाकीत खुर्चीत जवळ जवळ कोसळले.

एकाएकी विजेचा धक्का बसल्यासारखे नताशाचे सर्वांग चमकून गेले. कसल्यातरी भयानक यातनेने तिचे हृदय जणू विदीर्ण झाले. तिला दारुण दुःख झाले. आपल्या अंतर्यामी कहीतरी विदीर्ण होत आहे आणि आपण मरत आहोत असे तिला वाटू लागले. परंतु त्या दुःखासरशी जीवनापासून दूर ठेवणाऱ्या अडसरापासून तिची मुक्तता झाली.

ती वडिलांकडे धावली पण त्यांनी तिला तिच्या आईकडे दारातून जाण्याचा कसाबसा इशारा केला. तेवढ्यात प्रिन्सेस मार्या बाहेर आली. तिचा चेहरा पांढराफटक पडला होता आणि तिचा खालचा जबडा थरथरत होता. काहीतरी सांगत तिने नताशाचा हात हाती घेतला. नताशाचे तिच्याकडे आणि तिच्या बोलण्याकडे लक्ष नव्हते. तिने दाराच्या दिशेने

भरभर पावले टाकली, स्वतःशीच झगडल्यागत ती क्षणभर थांबली आणि मग तिने आता आईकडे धाव घेतली.

काउंटेस बैठ्या खुर्चीत कशी तरी पडलेली होती. ती आपले डोके भिंतीवर आपटीत होती. सोन्याने आणि काही दासींनी तिचे हात धरून ठेवले होते.

'नताशा...नताशा...' काउंटेस किंचाळत होती. 'तुम्ही खोटं सांगता आहात...साफ खोटं...नताशा...' दासींना दूर लोटीत ती किंचाळत होती. 'तुम्ही सगळ्या इथून निघून जा. ते खरं नाही...ठार झाला!'...ती हसत सुटली. 'अगदी खोटं.'

बैठ्या खुर्चीत बसलेल्या आईला नताशाने झुकून आपल्या मिठीत घेतले, आश्चर्य वाटावे अशा ताकदीने तिला वर उचलले, तिचे तोंड आपल्याकडे वळवले आणि तिला उराशी घट्ट धरले.

'ममा,...माझी ममा...बघ ना, मी आहे तुझ्याजवळ.' कोमल आवाजात ती सारखी बोलत राहिली.

ती आपल्या आईला मिठीतून सोडीना. तिच्याशी तिची सौम्य झटापट झाली. तिने उशा आणि पाणी आणायला सांगितले. आपल्या आईच्या कपड्याची बटणे काढली, कपडे फाडून दूर केले. आईचे डोके, हात, तोंड यांवर चुंबनांचा वर्षाव करीत आणि तिच्या नाकावर आणि गालांवरून अप्रतिहत वाहणारे अश्रू चाचपीत ती सारखी हळू आवाजात बोलू लागली, 'माझी ममा...माझी आवडती ममा...'

काउंटेसने आपल्या मुलीचा हात पिळला, मग डोळे मिटून ती क्षणभर शांत राहिली. मग एकाएकी ती अस्वाभाविक चपळतेने उठून बसली. तिने भोवताली शून्य दृष्टी फिरवली. नताशा दृष्टीला पडताच तिने तिला सर्व शक्तीनिशी आपल्या उराशी कवटाळले. तिने नताशाचा चेहरा आपल्याकडे वळवला आणि कितीतरी वेळ तिच्याकडे रोखून पाहिले तेव्हा नताशाचा चेहरा आपोआपच दुःखीकष्टी झाला. नताशाला विश्वासात घेत काउंटेस हळुवार कुजबुजली, 'नताशा, तुला मी आवडते. तू नाहीना मला फसवणार? तू मला काय ते खरं खरं सांगून टाक.'

नताशाने अश्रूभरल्या डोळ्यांनी तिच्याकडे पाहिले. तिच्या मुद्रेवर क्षमेची आणि प्रेमाची याचना होती.

'ममा...माझी आवडती ममा,' नताशा पुन्हा पुन्हा बोलू लागली. आपल्या आईला चिरडून टाकणाऱ्या शोकाचे ओझे थोडेफार हलके करण्यासाठी ती आपले सर्व प्रेम पणास लावत होती.

काउंटेसचा वास्तवाशी व्यर्थ झगडा सुरू झाला. ऐन तारुण्यात असलेला मुलगा मरण पावल्यानंतर आपण जिवंत राहू असे तिला वाटेना. वास्तवापासून दूर जाऊ पाहणाऱ्या तिच्या चित्ताला भ्रम झाला.

नंतरचे दोन दिवस, दोन रात्री आपण कशा घालवल्या ते नताशाला कळले नाही. त्या

काळात ती झोपली नाही, आपल्या आईला सोडून कुठे गेली नाही. सहनशील नताशाचे अतूट प्रेम जणू प्रत्येक क्षणाला तिला सर्व बाजूंनी वेढीत होते, कसली समजूत न घालता किंवा सांत्वन न करता तिला पुन्हा जीवनोन्मुख करीत होते.

तिसऱ्या रात्री काही वेळ काउंटेस शांत होती. खुर्चीच्या हातावर डोके ठेवून नताशाने डोळे मिटले होते. तेवढ्यात पलंग करकरला. नताशाने पाहिले. काउंटेस बिछान्यात बसून हलके पुटपुटत होती.

' नताशा, तो गेला, कायमचा गेला ! ' आपल्या मुलीला मिठीत घेऊन काउंटेस पहिल्यांदाच रडू लागली.

प्रिन्सेस मार्याने आपले जाणे लांबणीवर टाकले. सोन्या आणि काउंट यांनी नताशाची जागा घेण्याचा व्यर्थ प्रयत्न केला. काउंटेसला आत्यंतिक निराशेपासून वाचवणे तिलाच शक्य होते हे त्यांनी पाहिले. नताशा तीन आठवडे आईला सोडून गेली नाही. तिच्या खोलीतील सोफ्यावर ती झोपे, तिला खायला प्यायला लावी आणि तिच्याशी सारखी बोलत राही. कारण तिच्या हळुवार प्रेमळ आवाजानेच काय ती काउंटेस शांत होई.

तिच्या आईच्या अंतःकरणाला झालेली जखम कधीच भरून येईना. पेत्याच्या मृत्यूने तिचे अर्धे जीवन कोसळले. पेत्याच्या मृत्यूची बातमी आली तेव्हा पन्नाशीतील ती स्त्री जोमदार टवटवीत होती. महिन्यानंतर खोलीबाहेर आली तेव्हा ती जीवनात रस नसलेली प्रेतवत वृद्धा बनली होती. काउंटेसचे जीवन उन्मळून टाकणाऱ्या ह्या नव्या धक्क्याने नताशाला पुनर्जन्म दिला.

आपले जीवन संपले असे तिला वाटले होते. आईवरील आपल्या प्रेमामुळे तिला एकाएकी कळून चुकले की, जीवनाचा गाभा असलेला प्रीतिभाव अजून आपल्यामध्ये जागृत आहे. प्रीतिभावाला जाग आली तशी जीवनालाही जाग आली.

प्रिन्स आन्द्रेच्या अखेरच्या दिवसांत नताशाची आणि प्रिन्सेस मार्याची गाढ मैत्री जमली. ह्या नव्या आपत्तीमुळे त्या आणखीन जवळ आल्या. प्रिन्सेस मार्याने आपले जाणे लांबणीवर टाकले. गेले तीन आठवडे ती लहान मुलांची शुश्रूषा करावी तशी नताशाची काळजी घेत होती. तीन आठवडे आपल्या आईच्या खोलीत काढल्यामुळे नताशाची प्रकृती पार ढासळली होती.

नताशा आता फिकट, कृश होऊ लागली. ती इतकी अशक्त झाली होती की, प्रत्येकजण सतत तिच्या प्रकृतीबद्दल बोलू लागे. त्यामुळे ती सुखावून जाई. मधून मधून ती केवळ मरणाच्या धास्तीनेच नव्हे तर आपण आजारी पडून आपले रूप बिघडले तर काय होईल या भीतीने एकाएकी दचकून जाई. केव्हा केव्हा ती स्वतःला नकळत आपले उघडे हात आरशात

पाही, ते कृश कसे झाले याचे नवल करी, कधी सकाळीच आरशात आपला खप्पड केविलवाणा चेहरा पाहून तिचे मन हेलावून जाई, हे असेच घडायचे होते असे तिला वाटे. तरीही आपला चेहरा पाहून ती भयभीत होई, शोकाकुल होई.

जानेवारीच्या अखेरीस प्रिन्सेस मार्या मॉस्कोला जायला निघाली. डॉक्टरांचा सल्ला घेण्यासाठी तिच्याबरोबर नताशाने जावे असा काउंटने आग्रह धरला.

पाच नोव्हेंबर हा क्रस्नूच्या तथाकथित लढाईचा पहिला दिवस होता. शत्रू सर्वत्र पलायन करीत आहे आणि लढाई होणार नाही, लढाई होणे शक्यही नाही हे संध्याकाळच्या सुमारास स्पष्ट झाले.

आकाश निरभ्र होते, दव पडले होते. कुटूझॉफ पांढऱ्या, लठ्ठ लहानशा घोड्यावरून डॉब्रला निघाला होता. त्याच्यामागून भला मोठा जनरलांचा परिवार निघाला होता. त्याच्या पाठीमागे जनरलांची कुरकूर चालली होती. त्या दिवशी सात हजार फ्रेंचांना कैद करण्यात आले होते. वाटेत ठिकठिकाणी जाताना त्यांना त्यांचे घोळके शेकोट्यांभोवती गर्दी करीत असलेले आढळले. डॉब्र थोड्या अंतरावर राहिले होते तेवढ्यात त्यांना असंख्य कैद्यांचा प्रचंड कोलाहल ऐकू आला. त्या कैद्यांच्या जखमांवर पट्ट्या बांधल्या होत्या, नाना तऱ्हेची लक्तरे त्यांच्या अंगावर होती. तोफखान्याच्या घोडे सोडून ठेवलेल्या गाड्यांच्या रांगांशेजारीच रस्त्याजवळ ते उभे होते. कमांडर–इन–चीफ जवळ येताच त्यांचा कोलाहल थांबला. सर्वांचे डोळे कुटूझॉफवर खिळले. कुटूझॉफने लालपट्टी असलेली पांढरी कॅप घातली होती. कापसाच्या गादीचा ओव्हरकोट घातल्यामुळे त्याच्या पुष्ट खांद्यांवर कुबड आल्यासारखे दिसत होते. कैदी आणि तोफा कोठे पकडल्या त्याबद्दलची माहिती एक जनरल कुटूझॉफला सांगत होता.

कुटूझॉफ चिंतामग्न दिसत होता. जनरलचे शब्द त्याला ऐकू आले नाहीत. त्याने नाखुषीने आपले डोळे किलकिले केले आणि तो केविलवाण्या चेहऱ्याच्या कैद्यांकडे पाहू लागला. हिमबाधेचा परिणाम नाकावर, गालांवर झाल्याने बहुतेक सर्व सैनिक विद्रूप दिसत होते. बहुसंख्य सैनिकांचे डोळे सुजून लाल झाले होते. अगदी रस्त्याच्या कडेला काही फ्रेंच घोळक्याने उभे होते. जे दोघे सैनिक हातांनीच कच्च्या मांसाचे लचके काढीत होते, त्यांतील एकाच्या चेहऱ्यावर खूप जखमा झाल्या होत्या. जवळून जाणाऱ्या घोडेस्वारांवर त्यांनी जी ओझरती नजर टाकली तीत काहीतरी निर्दय, दुष्ट व भयंकर होते. अशाच प्रकारे ओझरती नजर टाकून जखमा झालेल्या चेहऱ्याच्या सैनिकाने पाठ वळवली आणि आपले काम पुन्हा सुरू केले.

त्या दोन सैनिकांकडे कुटूझॉफ किती तरी वेळ उत्सुकतेने पाहात राहिला. त्याच्या कपाळाला आणखी आठ्या पडल्या, त्याने अर्धवट डोळे मिटले आणि काहीतरी विचार करीत डोके हलवले. काही अंतर गेल्यावर त्याने पाहिले. एक रशियन सैनिक एका फ्रेंच कैद्याशी काहीतरी

प्रेमाने बोलत हसत त्याच्या खांद्यावर थोपटत होता. कुटूझॉफने पुन्हा डोके हलवले तेव्हा त्याच्या मुद्रेवर मघाचाच भाव होता. प्रिओब्रॅझेन्स्की रेजिमेंटसमोर फ्रेंच निशाणे रोवलेली होती. त्याकडे कमांडर-इन्-चीफचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न एक जनरल करीत होता. त्याला कुटूझॉफने विचारले, 'काय म्हणता आहात? ती निशाणे होय?' मोठ्या कष्टाने मनात चाललेले विचार थांबवून त्याने विचारले. त्याने भोवताली पाहिले, पण त्याचे कुठेच धड लक्ष नव्हते. सर्व बाजूंनी हजारो सैनिक त्याच्यावर नजर लावून होते. त्याच्या भाषणाची वाट बघत होते.

प्रिओब्रॅझेन्स्की रेजिमेंट समोर आल्यावर कुटूझॉफ थांबला. त्याने दीर्घ उसासा टाकून डोळे मिटले. परिवारातील एका जनरलने निशाणे धरणाऱ्या सैनिकांना पुढे होऊन कमांडर-इन्-चीफच्या भोवती निशाणे उभी करण्यास सांगितले. काही क्षण कुटूझॉफ स्तब्ध होता. कमांडर-इन्-चीफ म्हणून त्याला आपले कर्तव्य करणे भाग होते. त्याबद्दलची नाखुषी त्याच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत होती. मान उंच करून तो बोलू लागला. ऑफिसरांनी आता त्याच्या-भोवती गर्दी केली. त्याच्याकडे त्याने संथ दृष्टी टाकली, काहींना त्याने ओळखले.

सैनिकांना उद्देशून आणि नंतर ऑफिसरांकडे वळून तो म्हणाला, 'मी तुम्हा सर्वांचा आभारी आहे.' आता सर्वत्र शांतता पसरली. त्याने सावकाश उच्चारलेला शब्दन् शब्द स्पष्ट ऐकू येत होता. 'तुम्ही इमानाने कठीण कामगिरी पार पाडलीत म्हणून मी तुमचा आभारी आहे. आपणाला पुरा विजय प्राप्त झाला आहे. रशिया तुम्हाला कधीही विसरणार नाही. तुम्हाला सन्मान आणि वैभव सतत मिळत राहो.' असे म्हणून भोवताली पाहात तो थांबला.

गरुडाचे चिन्ह असलेला फ्रेंचांचा ध्वज धरून एकजण उभा होता. त्याने यदृच्छया तो ध्वज प्रिओब्रॅझेन्स्की रेजिमेंटच्या ध्वजासमोर झुकवून धरला होता. त्या सैनिकाला कुटूझॉफ म्हणाला, 'आणखी झुकवून धर, आणखी झुकव.'

तशी हजारो सैनिकांनी आनंदाने आरोळ्या मारल्या.

सैनिक आरोळ्या मारीत असता कुटूझॉफने घोड्यावर बसल्याबसल्या मान झुकवली. त्याचे डोळे सौम्य आणि उपरोधिक प्रकाशाने चमकले.

'आणि बंधूंनो,...' आरोळ्या थांबल्या तसा तो बोलू लागला. एकाएकी त्याची मुद्रा पालटली. आता जो बोलत होता तो कमांडर-इन्-चीफ नव्हता. त्याला आपल्या सहकाऱ्यांना अत्यंत महत्त्वाची गोष्ट सांगायची होती असा साधा सरळ वृद्ध माणूस बोलत होता.

'बंधूंनो, तुम्हाला फार कष्ट पडले याची मला कल्पना आहे. परंतु त्याला काही उपाय नव्हता. थोडीशी कळ सोसा. आता ही परिस्थिती जास्त काळ टिकणार नाही. आपण आमच्या ह्या पाहुण्यांना निरोप देऊ या आणि मगच विश्रांती घेऊ या. तुम्ही बजावलेली सेवा झार विसरणार नाहीत. तुम्हाला हाल-अपेष्टा सोसाव्या लागताहेत. पण तरीही तुम्ही आपल्या घरी-मायदेशीच आहात. ते मात्र' कैद्यांकडे बोट करून तो म्हणाला, 'त्यांची काय स्थिती झाली ते पाहातच आहात. अगदी कंगाल भिकाऱ्यांहून वाईट अवस्थेत ते आहेत. जेव्हा ते प्रबळ

होते तेव्हा आम्ही त्यांना दयामाया दाखवली नाही. आता मात्र आपण त्यांना दयेने वागवू शकू. शेवटी ती देखील माणसेच आहेत.'

त्याने भोवती पाहिले. त्याच्याकडे आश्चर्याने आणि आदराने पाहत असलेल्या अनिमिष नेत्रांत त्याच्या शब्दासरशी करुणा उमटलेली त्याला दिसली. प्रेमळ स्मिताने त्या वृद्धाचा चेहरा अधिकाधिक उजळू लागला आणि त्याच्या ओठांच्या आणि डोळ्यांच्या कोपऱ्याजवळ सुरकुत्या उमटल्या. त्याने बोलणे थांबवले आणि संभ्रमात असल्यागत मान झुकवली.

'काही का असेना, त्यांना काही इथे कोणी बोलावले नव्हते. त्यांना चांगलीच अद्दल घडली. हराम...' मान उंचावून तो एकदम म्हणाला. त्याने चाबूक उगारून वेगाने घोडा पिटाळला. रांगांमधून बाहेर पडणाऱ्या सैनिकांनी या मोहिमेत प्रथमच आनंदाने आरोळ्या देऊन त्याला निरोप दिला.

विजयाबद्दल कृतार्थ भावना, शत्रूबद्दल करुणा आणि अंगीकृत कार्य न्याय्य असल्याची जाणीव कुटूझॉफने रांगड्या शब्दांत व्यक्त केली होती.

·

फ्रेंच सैनिकांची झुंड सतत वाढत्या वेगाने पळ काढीत होती. त्यांच्या सर्व शक्ती त्याच ध्येयासाठी एकवटल्या होत्या. त्यांचे ते पलायन जखमी जनावराच्या पलायनासारखे होते. त्यांना मार्गावर थांबवणे अशक्य होते.

त्यांच्या मागे विनाश ठरलेला होता, पुढे आशेला जागा होती. त्यांच्या साऱ्या वाटा बंद झाल्या होत्या. एकत्र राहिल्याशिवाय आणि पलायन केल्याशिवाय ते सुरक्षित राहणे शक्य नव्हते. एकत्र राहून पलायन करण्याकडेच फ्रेंचांनी सर्व शक्ती आता लावली होती. फ्रेंच सैनिक ज्या घाईने पळ काढत होते त्या प्रमाणात रशियन जनरल एकमेकांवर आणि त्याहूनही अधिक कुटूझॉफवर जोराचे आरोप करीत होते. पीटर्झबर्ग योजनेच्या अपयशाचे खापर कुटूझॉफच्या माथ्यावर फोडता येईल असे समजून त्याच्याबद्दलचे असमाधान, त्याच्याबद्दलचा तिरस्कार आणि त्याची टवाळी ते अधिकाधिक प्रगट करू लागले. त्याच्याबद्दलचा तिरस्कार आणि टवाळी ते इतक्या आदरपूर्वक व्यक्त करीत की आपल्यावर कसला आरोप आहे हेही कुटूझॉफला विचारता येत नसे. ते त्याच्याशी गंभीरपणे बोलत नसत. एखादा शोकसमारंभ पार पाडावा अशा थाटात ते आपल्या कामाचा अहवाल सादर करून त्याचे निर्णय विचारीत. त्याच्या पाठीमागे डोळे मिचकावीत, प्रत्येक वेळेला त्याला फसवण्याचा प्रयत्न करीत. त्यांना त्याची मते कळत नसत. त्यामुळे त्या म्हाताऱ्याशी बोलणे व्यर्थ आहे असे त्या सर्वांनाच वाटे. आपल्या योजनांमागील खोल अर्थ त्याला उमगणार नाही, तो नेहमी उत्तरादाखल काही शब्दप्रयोग ( त्यांच्या कल्पनेनुसार केवळ अर्थशून्य शब्दप्रयोग ) वापरणार— सोनेरी पुलाबद्दल आणि अनवाणी भिकाऱ्यांबरोबर सरहद्द ओलांडणे किती अशक्य आहे

याबद्दल तो बोलणार हे त्यांनी गृहीत धरले होते. तो जे जे बोलत असे ( उदा. पुरवठ्यासाठी आपणास थांबणे भाग आहे किंवा सैनिकांना बूट नाहीत ) ते किती साधे असे. मात्र आपण केलेल्या सूचना फार गुंतागुंतीच्या आणि चातुर्याच्या असतात असे त्यांना वाटे. कुटूझॉफ मठ्ठ आहे, त्याला म्हातारचळ लागला आहे याबद्दल त्यांना शंका नव्हती, आपण लष्करी विषयातील जाणकार असूनही आपणाकडे कसलेच अधिकार नाहीत असे त्यांना वाटे. पीटर्सबर्गचा लाडका वीर पुरुष आणि तेजस्वी ॲड्मिरल विटजेन्स्टीन सैन्यात दाखल झाल्यापासून स्टाफमधील लोकांच्या असमाधानाला आणि दुष्ट अफवांना ऊत आला. कुटूझॉफच्या ते लक्षात आले. त्याने केवळ उसासा टाकून खांदे उडविले. बेरेझिना येथील प्रसंगानंतर फक्त एकदाच तो भडकला आणि झारबरोबर खाजगी पत्रव्यवहार करणाऱ्या बेनिंग्झनला त्याने लिहिले :

' आपली प्रकृती सारखी बिघडते म्हणून हे पत्र मिळताच आपण कॅलुगाला जावे अशी मी आपणास विनंती करीत आहे. सम्राटाकडून त्यापुढे तुम्ही काय करावे या संबंधीचे हुकूम तिथे मिळतील, त्यांची प्रतीक्षा करीत असावे. '

बेनिंग्झनच्या बडतर्फीनंतर आला ग्रँड ड्यूक कॉन्स्टन्टिन पावलॉविच. मोहिमेच्या सुरुवातीस त्याने भाग घेतला होता. नंतर कुटूझॉफने त्याला सैन्यातून काढून टाकले होते. सैन्यात दाखल होताच ग्रँड ड्यूकने कुटूझॉफला माहिती दिली, ' आपल्या सैन्याने मिळवलेल्या दरिद्री यशाबद्दल व मंद प्रगतीबद्दल झारना मुळीच समाधान वाटत नाही. स्वतः सैन्याबरोबर राहायचा झार यांचा बेत आहे. ते लवकरच येतील. '

त्या वर्षीच्या ऑगस्ट महिन्यात झारच्या इच्छेविरुद्ध कुटूझॉफची कमांडर–इन्–चीफ म्हणून नेमणूक झाली होती. त्यानेच भावी वारसदाराला–ग्रँड ड्यूकला–सैन्यातून काढून टाकले होते. झारच्या इच्छेला न जुमानता त्याने स्वतःच्या अधिकारात मॉस्को सोडण्याचा हुकूम दिला होता. वृद्ध कुटूझॉफला युद्धाप्रमाणेच राजपरिवारातील रीतीभातींचा चांगला अनुभव होता. ग्रँड ड्यूकचे बोलणे ऐकताच आपले दिवस भरले आहेत, आपली भूमिका संपली आहे आणि आपली मानवी सत्ता संपुष्टात आली आहे हे त्याने लागलीच ओळखले. ह्यामागे केवळ राजपरिवाराचा दृष्टिकोण नव्हता. ज्या युद्धात त्याने भाग घेतला होता ते युद्ध संपत आल्याने आपले कार्य संपल्याचे त्याला जाणवले. उलट आपले वृद्ध शरीर थकत असल्याची विश्रांतीची आवश्यकता असल्याची जाणीव त्याला त्याच क्षणी होऊ लागली.

एकोणतीस नोव्हेंबर रोजी कुटूझॉफ विल्ना येथे ( ज्या गावाचा उल्लेख तो ' माझा प्रिय विल्ना ' अशा शब्दात करी तेथे ) पोचला. लष्करात शिरल्यापासूनच्या आयुष्यात तो दोन वेळा विल्नाचा गव्हर्नर झाला होता.

युद्धापासून बचावलेल्या त्या समृद्ध गावात कुटूझॉफला जुने मित्र आणि जुने सहकारी भेटले. आजवर न मिळालेला आराम मिळाला. त्याने लष्करी आणि राजकीय विषयाची चिंता करणे सोडून दिले. भोवतालच्या वादळी मनोविकारांच्या जगापासून शक्य तितके दूर राहून तो दैनंदिन जीवन शांतपणे व्यतीत करू लागला. आजूबाजूला जो इतिहास घडत होता

आणि घडणार होता त्याच्याशी त्याचा जणू सुतराम संबंध उरला नव्हता.

झारच्या इच्छेला न जुमानता कुटूझॉफने अर्धे अधिक सैन्य व्हिल्नामध्ये ठेवले. त्याच्या भोवतालची माणसे म्हणू लागली, 'व्हिल्ना येथील मुक्कामात तुम्ही अधिकाधिक अशक्त होत आहात, तुमची प्रकृती ढासळत चालली आहे.' कुटूझॉफ आता सैन्याच्या व्यवस्थेत लक्ष घालीनासा झाला. सगळ्या गोष्टी जनरलांवर सोपवू लागला. झारची प्रतीक्षा करीत तो आपला वेळ ख्याली-खुशालीत घालवू लागला.

काउंट टॉलस्टॉय, प्रिन्स व्हॉएकॉन्स्की, अरॉक्चीव्ह आणि इतर अधिकाऱ्यांसह झारने सात डिसेंबर रोजी पीटर्झबर्ग सोडले, अकरा डिसेंबरला तो व्हिल्नाला पोचला. आपल्या प्रवासी घसरगाडीतून तो थेट किल्ल्यावर आला. अतिशय कडाक्याची थंडी पडली होती. तरीही शेकडो जनरल आणि स्टाफ ऑफिसर परेडच्या पुऱ्या युनिफॉर्ममध्ये होते व सेम्यॉनॉव्स्की रेजिमेंट मानवंदना देण्यासाठी किल्ल्यासमोर खडी होती.

झार येण्याआधीच एक जासूद तोंडाला फेस आलेल्या घोड्याला पिटाळीत किल्ल्याकडे पोचला आणि ओरडला, 'झार येताहेत!'

ॲडज्युटंट कुटूझॉफला सांगायला बाहेरच्या दालनात घुसला. त्यावेळी कुटूझॉफ नोकराच्या छोट्या खोलीत बसला होता.

त्या थोराड वृद्ध माणसाने पुरा गणवेष चढवला. छातीवर हुद्दा दाखवणारे बिल्ले लटकावले. पोटाभोवती स्कार्फ गच्च आवळून बांधला. मिनिटा-दोन मिनिटांनी तो बाहेर पडून संथपणे डुलत डुलत चालू लागला. त्याने रुंद काठावर दुमडलेली हॅट सपाट बाजू पुढे येईल अशा तऱ्हेने घातली. हातमोजे हातात धरले, दोन्ही बाजूंना झुकत मोठ्या कष्टाने तो पायऱ्या उतरला आणि झारला देण्यासाठी तयार करण्यात आलेला रिपोर्ट त्याने हातात घेतला.

सगळ्यांच्या नजरा घसरगाडीवर खिळल्या. तीत बसलेले झार आणि व्हॉल्कॉन्स्की स्पष्टपणे दिसत होते.

पन्नास वर्षांच्या सवयीमुळे ह्या सगळ्या गोष्टींचा परिणाम वृद्ध कुटूझॉफचे शरीर थरथरण्यात झाला. त्याने अस्वस्थपणे आपला हात पोटावरून फिरवला. आपली हॅट सरळ केली. घसरगाडीतून उतरून झारने त्याच्याकडे नजर टाकली. त्याच वेळी त्याने स्वतःला सावरून ताठ उभे राहून झारला रिपोर्ट दिला. मग मर्जी संपादन करू पाहणाऱ्या तालबद्ध स्वरात तो बोलू लागला.

झारने कुटूझॉफला भर्रकन आपाद-मस्तक न्याहाळले. क्षणभर कपाळाला आठी घातली पण एकदम स्वतःच्या भावना आवरून तो पुढे आला आणि त्याने बाहू पसरून वृद्ध जनरलला आलिंगन दिले. जुन्या सरावाच्या कल्पना चाळवल्या गेल्या. आलिंगनाने त्याच्या अंतःकरणातील उत्कट भावना जागृत झाल्या. आलिंगनाचा त्याच्यावर नेहमीचा परिणाम झाला. त्याने हुंदका दिला.

झारने ऑफिसरांचे आणि मानवंदना देणाऱ्या रेजिमेंटचे स्वागत केले. पुन्हा वृद्ध कुटू-

झॉफशी हस्तांदोलन करून झार त्याच्या बरोबर किल्ल्यात शिरला. कमांडर-इन्-चीफ एकटा सापडल्यावर झारने शत्रूचा पाठलाग फार मंद गतीने होत असल्याबद्दल तसेच कुटूझॉफने क्रस्नू आणि बेरेझिना या ठिकाणी केलेल्या चुकांबद्दल नाराजी प्रकट केली. सरहद्दीपलीकडे लवकरच सुरू होणाऱ्या मोहिमेबद्दलही झार बोलला. कुटूझॉफने काही भाष्य केले नाही अगर कसले स्पष्टीकरण दिले नाही. सात वर्षांपूर्वी ऑस्टरलिट्सच्या रणांगणावर झारचे हुकूम ऐकरे ताना त्याची दृष्टी जशी दीनवाणी झाली होती तशी आताही झाली.

कुटूझॉफ खोलीच्या बाहेर पडला. खाली मान घालून संथ पावले टाकीत डुलत डुलत तो बैठकीच्या खोलीतून जात असताना कोणीतरी हाक मारली, 'महाराज.' तसा तो थांबला.

त्याने मान वर करून पाहिले तो त्याला काउंट टॉलस्टॉय दिसला. चांदीच्या तबकात काहीतरी घेऊन तो त्याच्याकडे पाहत उभा होता. आपल्याकडून त्याची काय अपेक्षा आहे हे कुटूझॉफला काही काळ कळेना.

मग एकाएकी तो भानावर आला. त्याचा गुबगुबीत चेहरा स्मिताने उजळला. आदराने झुकून त्याने तबकातील वस्तू उचलली. ती वस्तू म्हणजे सेंट जॉर्जच्या नावाने दिले जाणारे प्रथमश्रेणीचे मानचिह्न होते.

दुसऱ्या दिवशी झारच्या सन्मानार्थ कमांडर-इन-चीफने भोजन आणि नृत्यसमारंभ योजला. झार त्या समारंभाला उपस्थित होता.

कुटूझॉफला सेंट जॉर्जच्या नावाने येणारे आलेले प्रथम श्रेणीचे मानचिन्ह देण्यात आले होते. झारने त्याचा जास्तीत जास्त गौरव केला. पण झारची कुटूझॉफवर नाराजी झाल्याचे प्रत्येक जण ओळखून होता. शिष्टाचाराचे पालन करण्यात आले. झारने याबाबतीत पहिले उदाहरण घालून दिले, परंतु म्हातारा दोषी आहे आणि त्याची अकार्यक्षमता दिसून आली आहे हे प्रत्येकजण जाणून होता. सम्राटाने नृत्याच्या दालनात प्रवेश केला तेव्हा हस्तगत केलेली निशाणे त्याच्या पायांशी झुकवण्याची आज्ञा कुटूझॉफने केली तेव्हा त्रस्त होऊन झारने कपाळाला आठ्या घातल्या. 'म्हातारा विदूषक' असे शब्द झार पुटपुटला ते काहींनी ऐकले.

सुरू होणाऱ्या मोहिमेचे महत्त्व कळण्याची कुटूझॉफमध्ये कुवत नव्हती अगर त्याला ते कळून घ्यायची इच्छा नव्हती म्हणून विहल्ना येथे झार त्याच्यावर अधिकच नाराज झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी भोवताली जमलेल्या ऑफिसरांना झार म्हणाला, 'तुम्ही केवळ रशियाला वाचवलेलं नाही, तुम्ही युरोपलाही वाचवलं आहे.' तेव्हा युद्ध संपलेले नाही ही जाणीव प्रत्येकाला लागलीच झाली.

एकट्या कुटूझॉफने मात्र तिकडे दुर्लक्ष केले. त्याने मोकळेपणाने आपले मत मांडले,

'नव्याने युद्ध सुरू करून रशियाची स्थिती सुधारणार नाही अगर त्याच्या गौरवात भर पडणार नाही. उलट आपण दुर्बल होऊ. आज रशिया ज्या वैभवशाली शिखरावर आहे तेथून आपण फेकले जाऊ.' नवीन सैन्यभरती होणे कसे अशक्य आहे, सैनिकांच्या किती हाल-अपेष्टा होत आहेत, पराभव होण्याचा संभव कसा आहे इ. इ. गोष्टी त्याने झारला ऐकवण्याचा प्रयत्न केला.

नव्या मोहिमेबद्दल त्याची अशी दृष्टी असल्याने साहजिकच कमांडर-इन्-चीफ् मोहिमेच्या प्रगतीतील अडथळा आहे असे सर्वांना वाटू लागले. म्हाताऱ्याशी संघर्ष टाळायला एकच उपाय होता ( ऑस्टरलिट्सला त्याच्याबाबत आणि युद्धाच्या सुरुवातीला बार्क्लीच्या बाबतीत अशीच उपाययोजना केलेली होती. )—उघड स्पष्टीकरण देऊन कमांडर-इन्-चीफ्‌ला अस्वस्थ न करता त्याचे वास्तविक अधिकार काढून घेऊन ते झारच्या हाती सोपवणे. हा उद्देश समोर ठेवून स्टाफ हळू हळू बदलण्यात आला. कुटूझॉफच्या स्टाफचे सर्व वास्तविक अधिकार काढून घेण्यात आले आणि ते झारला देण्यात आले. त्याची जागा नवीन व्यक्तीला देता येणे शक्य व्हावे म्हणून त्याने आजारी पडणे आवश्यक होते आणि त्याची प्रकृती खरोखरच ढासळू लागली होती.

कुटूझॉफ तुर्कस्थानातून पीटर्सबर्ग येथील ट्रेझरीकडे शिबंदी उभारण्यासाठी आला होता. आणि नंतर गरज भासली तेव्हाच सैन्याचे नेतृत्व करण्यासाठी पुढे सरला होता. त्याची भूमिका संपली तेव्हा त्याची जागा घेण्यासाठी नवा कमांडर पुढे झाला. ह्या दोन्ही घटना सारख्याच स्वाभाविकपणे, साधेपणाने आणि क्रमशः घडल्या.

रशियाच्या मुक्तीसाठी आणि गौरवासाठी जशी कुटूझॉफची आवश्यकता होती तशीच अलेक्झांडरची आवश्यकता होती. युरोप सत्तेचा समतोल आणि नेपोलिअन या शब्दांचे अर्थ कुटूझॉफला उमगले नाहीत.

शत्रूचा नाश झाल्यानंतर रशिया मुक्त झाला, वैभवाच्या उच्च शिखरावर विराजमान झाला. त्यानंतर रशियन जनतेच्या प्रतिनिधीला रशियन या नात्याने काही करायचे राहिले नाही. राष्ट्रीय युद्धाचे प्रतिनिधित्व करणाऱ्याला आता मरणाखेरीज दुसरे काम उरले नाही आणि त्याने ते काम बजावले. तो मरण पावला.

कैदेत असताना पीएरने ज्या हालअपेष्टा सोसल्या होत्या त्या संपताच त्याला त्यांचा पुरता ताण जाणवू लागला. कैदेतून मुक्त झाल्यावर ओरेल येथे गेला. तिथे जाऊन दोन दिवस लोटले असताना कीव्ह येथे जाण्याची तो तयारी करीत होता त्या वेळी तो आजारी पडला आणि तीन महिने ओरेल येथे अंथरुणाला खिळून होता. डॉक्टरांच्या मते त्याला पित्तप्रकोप झाला होता.

तुरुंगातून सुटका झाल्यापासून आजारी पडेपर्यंत त्याच्या बाबतीत जे जे काही घडले त्याचा ठसा काही त्याच्या मनावर उमटला नाही. कुंद अंधारे वातावरण, कधीमधी पडणारा पाऊस, कधी कधी पडणारे ऊन, शारीरिक वेदना, पायातील आणि कुशीतील वेदना एवढ्याच गोष्टी काय त्या त्याला आठवत होत्या. माणसांच्या दुःखाची आणि वेदनांची त्याला अंधुक आठवण होत होती. तुरुंगवासाबद्दल प्रश्न विचारून छळणारी ऑफिसरांची आणि जनरलांची जिज्ञासा; घोडे आणि वाहने मिळवताना झालेला त्रास त्याला आठवत होता. या सर्वांहून त्याला सबंध काळात आपले विचार आणि आपल्या भावना बोथट झाल्या होत्या याची आठवण होत होती.

ज्या दिवशी तो कैदेतून सुटला त्या दिवशी त्याला पेत्या रोस्तॉफचे प्रेत दिसले. बोरोदीनोच्या लढाईनंतर महिन्याहून अधिक काळ जिवंत राहिलेला प्रिन्स आन्द्रे काही दिवसांपूर्वीच यारॉस्लॉव्हल येथे रोस्तॉफच्या घरात मरण पावला होता ही बातमी देखील त्याला त्याच दिवशी कळली. ही बातमी सांगणाऱ्या डेनिसॉव्हने पीएरला अगोदरच ठाऊक असेल अशा समजुतीने संभाषणात एलनच्या मृत्यूचा उल्लेख त्याच दिवशी केला होता. त्यावेळी पीएरला सगळे विचित्र वाटले. ह्या सगळ्या घटनांनी आपले मन सावरणार नाही असे त्याला वाटले. जिथे माणसे एकमेकांची कत्तल करीत होती, तेथून त्वरित दूर जावे असे त्याला त्याच वेळी वाटू लागले. जिथे विश्रांती घेता येईल, जिथे आपले मन स्वस्थ होईल आणि ह्या साऱ्या विचित्र गोष्टींबद्दल विचार करता येईल अशा शांत ठिकाणाची त्याला ओढ लागली.

परंतु ओरेलला पोचताच तो आजारी पडला. आजारातून शुद्धीवर आल्यावर त्याला भोवतालच्या माणसांची ओळख पटली. त्याचे दोन नोकर टेरन्टी आणि व्हॅस्का मॉस्कोहून आले होते, ते त्याची शुश्रूषा करीत होते. तो तुरुंगातून सुटला आहे आणि आजारी पडला आहे हे ऐकताच इलेट्स येथील त्याच्या वाडीवर राहाणारी त्याची सर्वांत वडील बहीण त्याच्या सेवेसाठी आली होती.

आजारातून उठून तो हिंडूफिरू लागला. गेल्या काही महिन्यांत त्याच्या मनावर झालेले आघात आता हळूहळू पुसट होऊ लागले. उद्या आपणास कोणी हाकलून देणारा नाही, आपला उबदार बिछाना कोणी हिसकावून घेणार नाही, दोन वेळचे जेवण आणि चहा आपणास निश्चित मिळणार आहे हे विचार हळूहळू त्याच्या अंगवळणी पडू लागले, परंतु कितीतरी दिवस त्याला स्वप्नामध्ये आपण कैदी असल्याचा भास होत होता.

कैदेतून सुटल्यावर त्याने प्रिन्स आन्द्रेचा मृत्यू, आपल्या पत्नीचा मृत्यू आणि फ्रेंचांचा पाडाव ह्या घटना ऐकल्या होत्या. आता त्या घटनांचा अर्थ त्याला ह्याच प्रकारे हळूहळू कळू लागला.

मॉस्को सोडल्यावर केलेल्या पहिल्या मुक्कामात त्याला मनुष्याच्या जन्मसिद्ध अविच्छेद्य आणि अनन्यहार्य पूर्ण स्वातंत्र्याची प्रथम जाणीव झाली होती. त्याच जाणिवेने स्वातंत्र्याच्या त्या काळात त्याचा अंतरात्मा आनंदाने भरून गेला. बाह्य परिस्थितीवर अवलंबून नसताही

आपल्या आंतरिक स्वातंत्र्याला बाह्य स्वातंत्र्याची अनावश्यक चौकट लाभलेली पाहून त्याला आश्चर्य वाटले.

त्या गावात तो एकटाच होता. त्याच्या ओळखीचे कुणी नव्हते. त्याच्याकडून कोणी कसल्या कामाची अपेक्षा करीत नव्हते. त्याला त्याच्या इच्छेविरुद्ध कोणी कुठे पाठवीत नव्हते. त्याला हवे ते सारे मिळाले होते. पूर्वीच्या काळी सतत छळ करणारी पत्नी मरण पावली होती, त्यामुळे तिच्याबद्दलचे विचार आता त्याच्या मनात येत नव्हते.

जीवनाचे ध्येय काय ह्या प्रश्नाने त्याला पूर्वीच्या काळी भंडावून सोडले होते, ह्या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा तो सतत प्रयत्न करीत असायचा. आता त्याच्या दृष्टीने तो प्रश्नच अस्तित्वात नव्हता. जीवित-ध्येयाचा शोध त्याच्या बाबतीत आता संपला होता. तोही योगायोगाने वा तात्पुरता संपला नव्हता. अशा प्रकारचे ध्येय नाही, अशा प्रकारचे ध्येय अस्तित्वात असणे शक्य नाही, असे त्याला वाटले. ध्येयाच्या ह्या अभावामुळेच त्याला मुक्ततेचा पूर्ण आनंद होत होता. त्यामुळेच ह्या क्षणी तो सुखात होता.

विस्करून पडलेल्या वारुळाकडे मुंग्या धाव का घेत असतात, त्यातल्या काही वारुळातून कचऱ्याचे, अंड्यांचे अथवा मेलेल्या प्राण्यांचे तुकडे का ओढत नेतात, काही परत मागे का धावतात, दाटीवाटी करण्यात, एकमेकींना मागे टाकण्यात एकमेकींशी लढण्यात त्यांचा हेतू काय असतो ह्या प्रश्नांची उत्तरे देणे जेवढे कठीण आहे तेवढेच फ्रेंच निघून गेल्यानंतर कोणत्या कारणांमुळे एका काळी मॉस्को या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जागेकडे रशियन गर्दी करू लागले या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे. कोसळलेल्या वारुळाभोवती धावपळ करणाऱ्या मुंग्या, त्यांचा चिवटपणा, त्यांची शक्ती आणि उद्योगरत अशा त्या कीटकांचा प्रचंड समूह पाहून जरी बाकी साऱ्यांचा विनाश झालेला असला तरी त्या वसाहतीची संपूर्ण शक्ती असलेले अविनाशी आणि अनाकलनीय असे काही तरी शिल्लक असल्याचे लक्षात येते. अगदी त्याचप्रमाणे ऑक्टोबर महिन्यातील मॉस्को शहर जरी कारभार बघणारे प्रशासक, प्रार्थना मंदिरे, पवित्र प्रतिमा, संपत्ती आणि घरे या गोष्टी नव्हत्या तरीदेखील ऑगस्टमध्ये जसे होते तसेच होते. शक्तिमान आणि अविनाशी पण क्षुल्लक असे काही सोडले तर बाकी साऱ्याचा विध्वंस झाला होता.

मॉस्कोमध्ये एका आठवड्यात पंधरा हजार लोकसंख्या झाली, एका पंधरवड्यात ती पंचवीस हजारांवर गेली आणि अशा रीतीने ती वाढतच राहिली. १८१२ मध्ये मॉस्को शहर जळले त्यापूर्वी जी लोकसंख्या होती त्यापेक्षा १८१३ च्या ऑक्टोबरात ती कितीतरी वाढली. विंझेंरोडच्या सैन्यातील कोसॅक, अगदी जवळच्या खेड्यातील शेतकरी आणि मॉस्कोतून पळून जवळपासच्या प्रदेशात लपून राहिलेले रहिवाशी ही मॉस्कोत प्रथम

प्रवेश करणारी रशियन माणसे होती. विध्वंस झालेल्या शहरात आल्यावर तिथे लुटालूट झालेली दिसताच ती रशियन माणसेही लुटालूट करू लागली. फ्रेंचांनी सुरू केलेले काम त्यांनी चालू ठेवले. उद्ध्वस्त मॉस्को शहरातील घरांतील आणि रस्त्यावर पडलेली मालमत्ता जवळपासच्या खेडयात पळवून नेण्यासाठी शेतकऱ्यांच्या गाड्यामागून गाड्या मॉस्को शहरात येऊ लागल्या. कोसॅक सैनिक शक्य असतील त्या चिजा आपल्या तंबूत नेऊ लागले. घरमालक इतरांच्या घरातील वस्तू आपल्याच आहेत, असा बहाणा करीत आपली घरे भरू लागले.

मॉस्को शहरातून लोक निघून गेलेले फ्रेंचांना आढळले, तरीही शहरी जीवनाची यंत्रणा पद्धतशीर चालू होती. व्यापार, कारागीर, त्यांच्या सर्व शाखा, चैनीच्या वस्तूंची दुकाने, शासनसंस्था आणि धर्मसंस्था ह्यात खंड नव्हता. त्या निर्जीव झाल्या होत्या पण अस्तित्वात होत्या. बाजार, दुकाने, भांडारे, अडत्यांचे व्यवहार, सारे चालू होते. कुठेच मालाची कमतरता नव्हती. कारखाने होते. तसेच व्यापारी संस्था होत्या. मोठाले शाही वाडे होते, चैनीच्या वस्तूंनी भरलेली संपन्न घरे होती, इस्पितळे, तुरुंग, न्यायालये, छोटीमोठी प्रार्थनामंदिरे चालू होती, फ्रेंच सैन्य जसजसे जास्त काळ तेथे राहू लागले, तसतसे शहरी जीवनाची ही अंगे नष्ट होऊ लागली, शेवटी साऱ्यांचा शेवट लुटालुटीच्या गोंधळ उडवणाऱ्या निर्जीव दृश्यात झाला.

फ्रेंचांनी जो जो जास्त काळ लूट चालवली तो तो मॉस्कोची मालमत्ता आणि लुटारूंचा जोर पुरता नष्ट होऊ लागला. राजधानीत पहिल्यांदाच परत आलेल्या रशियनांनी सुरू केलेली लुटालूट जसजशी जास्त काळ राहिली आणि त्यात भाग घेणाऱ्यांची संख्या जसजशी वाढू लागली तसतशी मॉस्कोची मालमत्ता आणि शहरातील नेहमीचे जीवन पूर्वस्थितीला येऊ लागले.

शहरात लुटालूट करणारे लोक जमू लागलेच. पण घरमालक, धर्मगुरू, कनिष्ठ, वरिष्ठ अधिकारी, व्यापारी कारागीर—सर्व प्रकारचे लोक कोणी जिज्ञासेने, कोणी कर्तव्य बजावण्यासाठी, कोणी स्वार्थी हेतूने हृदयात रक्त प्रवेश करते तसे सर्व भागांतून शहरात फिरू लागले.

आठवडा-भरातच शहरातला माल लंपास करण्यासाठी रिकाम्या गाड्या घेऊन आलेल्या शेतकऱ्यांना अधिकाऱ्यांनी थांबवले आणि त्यांना गाडयांतून प्रेते शहराबाहेर न्यायला भाग पाडले. आपल्या बरोबरीच्या गाडीवानांची दाणादाण उडालेली ऐकून इतर शेतकऱ्यांनी गाडयांतून गहू, ओट आणि गवत आणले. एकमेकांशी चढाओढ करीत त्यांनी वस्तूंच्या किमती पूर्वीहून खाली आणल्या. चांगली मजुरी मिळेल या आशेने सुतारांचे जथे दररोज मॉस्कोत फिरू लागले. आता सर्वत्र नवी घरे बांधली जाऊ लागली नाहीतर जळक्या पडक्या घरांची दुरुस्ती होऊ लागली. तात्पुरती दुकाने उभारून दुकानदारांनी विक्री सुरू केली. जळक्या घरांतून उपहारगृहे आणि खानावळी सुरू झाल्या. आगीपासून वाचावलेल्या प्रार्थना मंदिरातून प्रार्थना प्रवचने सुरू झाली. प्रार्थना मंदिराची चोरीला गेलेली मालमत्ता देणगी म्हणून परत दिली जाऊ लागली. सरकारी कारकुनांनी छोट्या छोट्या

खोल्यांत लोकरीच्या खडबडीत कपड्यांनी आच्छादिलेली टेबले आणि कागदपत्रे ठेवायला छोटे छोटे खण असलेली कपाटे मांडली. वरिष्ठ अधिकारी आणि पोलिस यांनी फ्रेंचांनी मागे टाकलेल्या मालाचे वाटप करण्यास प्रारंभ केला. ज्यांच्या घरांत इतर घरांतला माल लुटून आणून ठेवण्यात आला होता त्यांच्याकडील सगळा माल ग्रॅनॉव्हिटा या राजवाड्यात नेला गेला. तेव्हा त्या त्या घरांचे मालक आपल्यावर अन्याय होत आहे अशी तक्रार करू लागले. फ्रेंचांनी अनेक ठिकाणांहून माल गोळा करून एका ठिकाणी ठेवला होता म्हणून त्या ठिकाणी सापडलेला सगळा माल त्या ठिकाणच्या मालकास परत देणे हे योग्य नव्हे असे काहीजण सांगू लागले. पोलिसांना शिव्या मिळू लागल्या आणि लाच मिळू लागली. जळून गेलेल्या सरकारी इमारतींच्या किमती दसपट ठरवण्यात आल्या आणि मदतीसाठी लोकांना आवाहने केली जाऊ लागली. काउंट रास्तोप्चिनने पुन्हा जाहीरनामे लिहिले.

जानेवारीच्या अखेरीस पीएर मॉस्कोला आला. आगीपासून बचावलेल्या आपल्या घराच्या एका भागात राहू लागला. परत मॉस्कोत आलेल्या रास्तोप्चिनला आणि इतर परिचितांना भेटला. दोन तीन दिवसांत पीटर्झबर्गला निघण्याच्या तयारीला लागला.

प्रत्येकाचा विजयोत्सव उतू जात होता. पीएरला पाहून सर्वांना आनंद होत होता. प्रत्येक-जण त्याच्या भेटीला व त्याने जे अनुभवले त्याबद्दल विचारायला उत्सुक होता. भेटलेल्या प्रत्येक व्यक्तीशी पीएरच्या मनात मैत्रीची भावना होती. कोणत्याही तऱ्हेने आपले स्वातंत्र्य जाऊ नये म्हणून तो नकळतच सावधपणे वागत होता. लोक त्याला महत्त्वाच्या तसेच क्षुल्लक बाबींबद्दल नाना प्रश्न विचारीत होते. 'तुझा यापुढं कुठं राहाण्याचा विचार आहे ? तू घर बांधायला घेणार आहेस का ? पीटर्झबर्गला कधी निघणार आहेस ? तिथल्या एखाद्याला द्यायची भेट तू घेऊन जाशील का ?' सगळ्या प्रश्नांना तो 'शक्य आहे, कदाचित जाईनही' अशा तऱ्हेची उत्तरे देत होता.

कॉस्ट्रॉमा येथे रोस्तॉफकुटुंब असल्याचे त्याने ऐकले. नताशाबद्दल त्याच्या मनात क्वचि-तच विचार येई. तिच्याबद्दल विचार आलाच तर तो गतकाळातील मधुर स्मृतीसारखा असे. दैनंदिन जीवनातील विवंचनांपासून नव्हे तर आपण स्वतःच आपल्यावर ओढवून घेतलेल्या भावनेपासूनही मुक्त झालो आहोत असे त्याला वाटले.

मॉस्कोत आल्यानंतर तिसऱ्या दिवशी त्याला प्रिन्सेस मार्या शहरात असल्याचे द्रबेत्स्कॉय कुटुंबाकडून कळले. प्रिन्स आन्द्रेचा मृत्यू, त्याला झालेल्या यातना आणि त्याचे अखेरचे दिवस या गोष्टी पीएरच्या मनात नेहमीच होत्या. आज त्या उत्कटपणे त्याला जाणवू लागल्या. प्रिन्सेस मार्या मॉस्कोतच असून ती आगीपासून सुरक्षित राहिलेल्या आपल्या स्वतःच्या घरात राहात असल्याचे त्याला रात्रीच्या भोजनाच्या वेळी कळले. त्याच रात्री तिला भेटण्यासाठी

तो निघाला.

पीएर प्रिन्सेस मार्याच्या घराच्या दिशेने चालला असताना त्याच्या मनात प्रिन्स आन्द्रे, त्याचे आपल्यावरील प्रेम, निरनिराळ्या वेळी झालेल्या भेटी, विशेषतः बोरोदीनों येथील शेवटची भेट ह्या आठवणी दाटत होत्या.

थोरल्या काउंटच्या घरी पीएर येऊन पोचला ते घर आगीपासून बचावलेले होते. नुकसानीच्या खुणा तशा दिसत असल्या तरी सर्वसाधारणपणे घराचे रूप बदलले नव्हते. वृद्ध नोकर पीएरला भेटला तेव्हाचा त्याचा करारी चेहरा, थोरला काउंट गेला तरी इथल्या घरच्या कडक शिस्तीत फरक पडलेला नाही असे जणू सांगू इच्छीत होता. त्याने पीएरला सांगितले, ' प्रिन्सेस आपल्या खोलीत गेली आहे. ती दर शनिवारी लोकांना भेटत असते,

' माझं नाव सांग. म्हणजे कदाचित मला भेटीला बोलावतील. ' पीएर म्हणाला.

' जशी आज्ञा, महाराज. कृपा करून चित्रांच्या दालनात या ! नोकर म्हणाला.

थोड्या वेळात नोकर देसॅलेला घेऊन परतला. देसॅलेने प्रिन्सेसचा निरोप सांगितला, ' तुमची भेट होणार म्हणून बाईसाहेबांना आनंद झाला आहे. आदरसत्कारात कमतरता होईल. त्याबद्दल क्षमा मागून त्यांनी तुम्हांला वर भेटीला या अशी विनंती केली आहे. '

पीएरला एकच मेणबत्ती पेटत असलेल्या त्या बैठ्या खोलीत प्रिन्सेस आणि तिच्याजवळ काळी वस्त्रे अंगावर असलेली कुणीतरी स्त्री आढळली.

त्याच्या स्वागतार्थ प्रिन्सेस त्वरित उभी राहिली. तिने आपला हात त्याच्या समोर धरला.

तो तिच्या हाताचे चुंबन घेत असताना तिने त्याचा चेहरा न्याहाळला आणि म्हटले, ' आपण अशा स्थितीत पुन्हा भेटतो आहोत. शेवटी तो तुमच्याबद्दल सारखा बोलायचा ' असे बोलताना तिने पीएरवरील दृष्टी काढून आपल्या सखीकडे लावली. ते पीएरला खटकले.

'तुम्ही सुरक्षित असल्याचं ऐकून मला आनंद झाला. खूप दिवसांत एवढी एकच सुवार्ता ऐकली.

पुन्हा प्रिन्सेसने पूर्वीहून अधिक अस्वस्थ होत आपल्या सखीकडे दृष्टी टाकली. प्रिन्सेस आणखी काही बोलणार होती तोच पीएरने म्हटले, ' तुला आश्चर्य वाटेल. मला त्याच्याबद्दल काहीही ठाऊक नव्हते. तो युद्धात कामी आला असेल अशी माझी कल्पना होती. त्याच्याबद्दल कळायचं ते ऐकीव माहितीतून. रोस्तॉफकुटुंबाशी भेट झाली होती एवढंच मला ठाऊक आहे. . नियतीची करणी किती विचित्र असते ! '

पीएर अधीरतेने भराभर बोलला. त्याने एकदम प्रिन्सेस मार्याच्या सखीच्या चेहऱ्याकडे नजर टाकली. तिची स्नेहपूर्ण नजर आपल्यावर खिळलेली त्याच्या लक्षात आली. संभाषण चालू असताना पुष्कळदा वाटते तसे त्यालाही वाटले. काळ्या पोषाखातील ही सखी प्रिन्सेसची प्रेमळ, सुशील मैत्रीण आहे आणि प्रिन्सेस मार्याशी मोकळेपणाने बोलायला काही हरकत नाही असे समजून तो बोलत होता.

रोस्तॉफकुटुंबाबद्दल त्याने शेवटचे वाक्य उच्चारले तेव्हा प्रिन्सेस मार्याची गोंधळलेली मुद्रा त्याच्या चांगलीच नजरेत भरली. प्रिन्सेस मार्याने पीएरच्या चेहऱ्यावरील नजर पुन्हा काळ्या

वस्त्रातील सखीकडे वळवली आणि पीएरला म्हटले, ' तुम्ही हिला ओळखलं नाही का ? '

पीएरने पुन्हा एकदा तिच्या सखीच्या फिकट कृश चेहऱ्यावर काळ्या डोळ्यांवर आणि गोंधळलेल्या ओठांवर दृष्टी लावली. त्या उत्सुक डोळ्यांतून कधीकाळी विस्मृतीत गेलेली, त्याला मधुर व प्रिय असलेली व्यक्ती त्याच्याकडे टक लावून पाहात होती.

' नाही. ते शक्य नाही. ' तो स्वतःशी म्हणाला, ' तो करारी कृश, फिकट चेहरा इतका म्हातारा कसा दिसतो आहे ? नाही, ही ती नाही. मला तिची फक्त आठवण होते एवढंच. '

तेवढ्यात प्रिन्सेस मार्या म्हणाली, ' नताशा. ' एकाग्र चित्ताने पाहत असलेल्या नताशाने, गंजलेला दरवाजा उघडावा त्याप्रमाणे कष्टाने, प्रयासाने स्मित केले. उघड्या दारातून जोराची सुगंधी झुळूक आली आणि किती तरी काळ विस्मृतीत गेलेल्या आणि आताही त्याने ज्याचा मुळी विचारच केला नव्हता अशा परमसुखाने त्याचे मन भरून गेले. ती झुळूक त्याच्यावर वाहात राहिली, तिने त्याला वेढून पार बुडवून टाकले. तिने स्मित केले तेव्हा त्याला मुळी संशय उरला नाही. ती नताशाच होती आणि त्याला ती आवडली. ते रहस्य त्याने नताशाला सांगितले.

■ ■

# उपसंहार

## १८१३–१८२०

१८१३ मध्ये बेझुहॉव्हचे नताशाबरोबर झालेले लग्न रोस्तॉफकुटुंबातील वडीलधाऱ्या मंडळींना शेवटचा सुखाचा प्रसंग होय. त्याच वर्षी काउंट इल्या अँड्रीच मरण पावला. कुटुंब-प्रमुख मरण पावल्यानंतर जगरहाटीप्रमाणे कुटुंब विस्कळित झाले.

मॉस्कोला लागलेली आग व शहरातून लोकांनी काढलेला पळ, प्रिन्स आन्द्रेचा मृत्यू व नताशाची निराशा, पेत्याचा मृत्यू आणि काउंटेसचा शोक ह्या गतवर्षी घडलेल्या घटनांनी वृद्ध काउंटवर एकामागून एक आघात केले. ह्या सगळ्या घटनांचा अर्थ आपणास कळत नाही आणि ती कळण्याची कुवतही आपल्यात उरली नाही असे त्याला वाटू लागले. आलंकारिक भाषेत बोलायचे तर त्या वृद्ध मनुष्याने आपला अंत ओढवून घेण्यासाठी आघातांची अपेक्षा करीत आणि त्यांना आवाहन करीत वादळासमोर आपले शिर झुकवले. तो आलटून-पालटून केव्हा भयभीत, अस्वस्थ तर केव्हा दक्ष, उत्साही दिसे.

काही वेळ तो नताशाच्या लग्नाच्या व्यवस्थेत मग्न राहिला. भोजना–मेजवान्यांची व्यवस्था त्याने पाहिली आणि उत्साही राहाण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा उत्साह गतकाळाप्रमाणे इतर लोकांना उत्साहित करीत नव्हता. उलट त्याला ओळखणाऱ्यांना आणि त्याच्या चाहत्यांना त्याच्याबद्दल दया वाटू लागली.

पीएर आणि त्याची पत्नी सोडून गेल्यानंतर तो अगदी खचून गेला आणि औदासिन्याची तक्रार करू लागला. काही दिवसांनी तो आजारी पडून अंथरुणाला खिळला. डॉक्टरांनी धीर दिला. तरीही आपण आता बरे होणार नाही असे त्याला आजाराच्या सुरुवातीपासून वाटू लागले. काउंटेस सलग पंधरा दिवस त्याच्या उशीजवळ बैठ्या खुर्चीत बसून राहिली. तिने

आपले कपडेही बदलले नाहीत. ती औषध देऊ लागली की प्रत्येकवेळी तो तिच्या हाताचे चुंबन घेऊन रडू लागे. त्याने कुटुंबाची सगळी संपत्ती उधळून टाकली होती. ह्या मुख्य पापाचा भार त्याच्या विवेकबुद्धीला पेलत नव्हता. त्या पापाबद्दल त्याने शेवटच्या दिवशी रडत रडत आपल्या पत्नीची आणि आपल्या उपस्थित नसलेल्या मुलाची क्षमा मागितली. पापमुक्ती आणि तैलाभ्यंजनाचे धार्मिक संस्कार पार पडल्यानंतर तो शांतपणे मरण पावला. दुसऱ्या दिवशी मृताचे अंत्यदर्शन घेण्यासाठी अनेक परिचित आले. रोस्तॉफकुटुंबाने भाड्याने घेतलेली घरे भरून गेली. त्या सगळ्या परिचितांनी रोस्तॉफच्या घरात कितीदातरी भोजन केले होते, कितीदातरी नृत्यसमारंभात भाग घेतला होता. कितीदातरी त्याच्या खर्चिकपणाची टर उडवली होती. आता सगळेजण जणू आपल्या वागणुकीचे समर्थन करण्यासाठी एकाच दुःखाच्या आणि आत्मभर्त्सनेच्या भावनेने म्हणू लागले, 'काही झालं तरी तो अगदी भला माणूस होता. आताशा अशी माणसं दुर्मिळ झाली आहेत. तसं प्रत्येक माणसात काही दोष असायचेच.'

निकोलाय पॅरिसमध्ये रशियन फौजेबरोबर असताना त्याला आपल्या वडिलांच्या मृत्यूची वार्ता कळली. त्याने तावडतोब राजीनामा दिला. राजीनामा मंजूर होण्याची वाट न पाहता रजा घेऊन तो मॉस्कोला गेला. काउंटच्या मृत्यूनंतर महिन्याच्या आत आर्थिक परिस्थितीचे चित्र स्पष्ट झाले. छोट्या छोट्या कर्जांची प्रचंड रक्कम समजल्यावर सर्वजण हबकून गेले. इतके कर्ज असेल असे कोणालाही वाटले नव्हते. प्रत्यक्ष मालमत्तेच्या किमतीच्या दुपटीहून अधिक किंमतीची कर्जे होती.

निकोलायच्या मित्रांनी आणि आप्तांनी त्याला वारसाहक्क नाकारण्याचा सल्ला दिला. अशा तऱ्हेने वारसा नाकारणे म्हणजे आपल्या पित्याच्या पवित्र स्मृतीला काळिमा लावणे आहे असे निकोलायला वाटले. त्याने अशा मार्गाचा अवलंब करण्याचे मान्य केले नाही. कर्ज फेडण्याच्या बंधनांसह त्याने वारसा स्वीकारला.

काउंट जिवंत होता तोपर्यंत त्याच्या निष्काळजी आणि सुस्वभावी वृत्तीच्या जबरदस्त अनामिक प्रभावामुळे धनको गप्प होते. आता ते सगळे एकदम निकोलायला सतावू लागले. कोणाला पैसे आधी मिळावे ह्या प्रश्नावर त्या धनकोंत नेहमीसारखी स्पर्धा सुरू झाली. कर्ज न देता केवळ देणगी म्हणून ज्यांना प्रॉमिसरी नोटा मिळाल्या होत्या ते मायटेङ्कासारखे लोक तर सर्वांत जास्त तगादा लावू लागले. ते निकोलायला स्वस्थता आणि शांतता म्हणून लाभू देईनात. खरें तर वृद्ध काउंटच आपल्या आर्थिक हानीला—खरोखरच जर झाली असली तर तिला—जबाबदार होता. त्याला त्यांनी सहानुभूती दाखवली होती. त्याच्या संदर्भात निरपराधी असणाऱ्या आणि आपणहून कर्जफेडीस तयार झालेल्या त्याच्या वारसाला निकोलायला ते आता मात्र निर्दयपणे छळू लागले.

निकोलायची एकही योजना यशस्वी झाली नाही. इस्टेट लिलावात अर्ध्या किमतीस विकली गेली. अर्धे कर्ज फेडायचे राहिले. त्याचा मेहुणा बेझुहॉव्ह याने कर्जाऊ दिलेले तीस हजार

रूबल त्याने घेतले आणि विश्वसनीय लेखी करार असलेले काही कर्ज फेडून टाकले. उरलेल्या कर्जाची फेड झाली नाही तर तुरुंगात पाठवू अशा धनकोंनी धमक्या दिल्या. तेव्हा तुरुंगवास चुकवण्यासाठी तो पुन्हा सरकारी नोकरीत शिरला.

तो लष्करात शिरला असता तर बढती मिळून तो कर्नल झाला असता. पण त्याचा विचारही करावयाला नको होता. कारण त्याची आई त्याच्याकडे शेवटचा आशातंतू म्हणून पाहात होती. पूर्वीच्या काळातही जे आपल्याला ओळखत होते त्यांच्या सहवासात मॉस्कोमधे राहावे असे निकोलायला वाटत नव्हते, मुलकी खात्यातील नोकरीची त्याला मुळीच आवड नव्हती तरीही त्याने मॉस्कोमध्ये तसल्या खात्यातच नोकरी स्वीकारली. त्याने प्रिय असा गणवेष उतरून ठेवला आणि आपली आई व सोन्या यांसह तो एका छोट्या घरात राहू लागला.

ह्या काळात नताशा आणि पीएर पीटर्सबर्गमध्ये राहात होते. त्यांना निकोलायच्या परिस्थितीची स्पष्ट कल्पना नव्हती. आपल्या मेहुण्याकडून कर्जाऊ पैसे घेतल्यावर निकोलायने आपले दारिद्र्य त्याच्यापासून लपवण्याची शिकस्त केली. बाराशे रूबल पगारात त्याला आपला आईचा आणि सोन्याचा चरितार्थ चालवावा लागे, एवढेच नव्हे तर आईला दारिद्र्याची जाणीव होणार नाही अशा रीतीने ठेवावे लागे. यामुळे तो आणखीनच मेटाकुटीला येई. बालपणापासून ऐषआरामाची सवय लागलेली असल्याने त्याशिवाय जगणे शक्य आहे हा विचारही काउंटेसच्या मनात येत नसे. आपल्या मुलाला परवडेल की नाही याचा मुळीच विचार न करता काउंटेस गाडी नसतानाही कुणा मैत्रिणीला बोलवायचे असले की गाडीचा आग्रह धरी, स्वत:साठी एखादे महागडे मिष्टान्न आणि मद्य आपल्या मुलाला आणायला लावी; नताशाला, सोन्याला, किंवा खुद्द निकोलायला चकित करण्यासाठी एखादी भेट देण्याकरिता पैसे मागून घेई.

सोन्या घर सांभाळी, काउंटेसची सेवा करी, तिला काही ना काही वाचून दाखवी, तिच्या लहरी आणि तिच्या मनात दबून असलेला आकस ती सहन करी. हलाखीची स्थिती तिला जाणवू नये म्हणून ती निकोलायला मदत करी. सोन्या आपल्या आईसाठी इतकी झटते आहे की तिच्या ऋणातून आपण कधीच मुक्त होणार नाही असे निकोलायला वाटू लागले. तिच्या सहनशीलतेचे, चिकाटीचे आणि भक्तीचे त्याला कौतुक वाटे. पण तो तिच्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न करी.

ती गुणांनी अगदी परिपूर्ण होती आणि तिच्यात त्याला एकही दोष दिसत नव्हता त्यामुळे की काय त्याच्या मनात तिच्याबद्दल काहीशी अढी निर्माण झाली होती. माणसाचे ज्यामुळे मोल वाटावे असे सगळे गुण तिच्यात होते, पण तिच्यावर जीव जडावा असे फार थोडे गुण होते. तिचे मोल आपल्याला जेवढे अधिक वाटते आहे तेवढे तिच्यावरील प्रेम कमी होत आहे असे त्याला वाटू लागले. तिने पत्रात त्याला 'तुला पूर्ण स्वातंत्र्य देत आहे' असे लिहिले होते, ते त्याने शब्दश: खरे मानले होते. त्यांच्यामध्ये जे घडले होते ते जणू दीर्घकाळापूर्वीच विस्मृतीत गेले होते आणि कुठल्याही परिस्थितीत ते संबंध नव्याने निर्माण होणार नाहीत असे

मानून तो तिच्याशी वागू लागला होता.

हिवाळ्याच्या प्रारंभी प्रिन्सेस मार्या मॉस्कोत येऊन पोचली. रोस्तॉफकुटुंबाची परिस्थिती कशी आहे याची कल्पना तिला लोकांच्या बोलण्यावरून आली. 'आपल्या आईसाठी मुलगा कसा त्याग करीत आहे' हेही तिने ऐकले. त्याच्यावरील आपल्या प्रेमाला पुष्टी मिळालेली पाहून प्रिन्सेस मार्या आनंदित झाली. 'मी त्याच्याकडून अशीच अपेक्षा केली होती' ती स्वतःशी म्हणाली. तिचे त्या कुटुंबाशी अगदी जिव्हाळ्याचे नाते होते; ती त्यांच्यातीलच एक होती हे आठवून तिने त्यांना भेटण्याचे ठरवले. परंतु व्हॉरॉनेश येथे असतानाचे आपले निकोलाय बरोबरचे संबंध आठवताच तिला तसे करण्याचे धाडस होईना. तरीही मॉस्कोला आल्यानंतर काही आठवड्यानंतर तिने मनाची तयारी केली आणि ती रोस्तॉफकुटुंबाला भेटायला गेली.

निकोलायच्या खोलीतून गेल्याशिवाय काउंटेसच्या खोलीत शिरणे अशक्य होते त्यामुळे पहिल्यांदा तिला निकोलाय भेटला. आपल्याकडे पहिला दृष्टिक्षेप टाकताच त्याचा चेहरा आनंदाने उजळून जाईल असे प्रिन्सेस मार्याला वाटले होते. परंतु तिला पाहताच त्याची दृष्टी विमनस्क, हेकेखोर आणि गर्विष्ठ बनली. त्याची अशी दृष्टी तिला पूर्वी कधीच दिसली नव्हती. निकोलायने तिच्या प्रकृतीची चौकशी केली, आपल्या आईकडे तिला नेले, तिथे चारपाच मिनिटे थांबल्यावर तो खोलीबाहेर पडला.

प्रिन्सेसमार्याची गाडी घरापासून दूर गेली तेव्हा त्याला आपली त्रस्तता लपवणे शक्य झाले नाही. तो उद्वेगाने सोन्याला म्हणाला, 'ती इथे भटकत कशाला आली होती? ह्या बायकांचा आणि त्यांच्या सौजन्याचा मला वैताग येतो!'

निकोलाय आणखी काही बोलला नाही. तिच्याबद्दल काही न बोलणेच त्याने पसंत केले असते. परंतु ती निघून गेल्यावर वृद्ध काउंटेस तिच्याबद्दल प्रत्येक दिवशी कैक वेळा बोलू लागली.

ती प्रिन्सेस मार्याची स्तुती करी. निकोलायने जाऊन तिला भेटले पाहिजे असे आग्रहाने सांगे. तिची पुन्हा भेट झाली पाहिजे अशी इच्छा प्रकट करी. तरी तिच्याबद्दल बोलताना ती नेहमीच संतापलेली असे.

काउंटेस प्रिन्सेसबद्दल बोलू लागली की निकोलाय काही न बोलण्याचा प्रयत्न करी. त्याच्या मौनामुळे ती त्रस्त होई. 'ती अतिशय सुस्वभावी, नेक मुलगी आहे.' ती म्हणायची, 'तू जाऊन तिला भेटच. तसा तू कोणालाही जाऊन भेटशील. पण आमचा मात्र तुला कंटाळा येत असतो. मी तुला काही अप्रिय गोष्ट तर करायला सांगत नाही ना? गाडी घेऊन तिच्या भेटीला जा एवढेच सांगते आहे. अरे बाबा हा शिष्टाचार आहे. सौजन्य आहे. मला वाटतं मी तुला एकदा

विनंती केली आहे. मी यापुढं काही तुझ्या वागण्यात व्यत्यय आणणार नाही. कारण तू आपल्या आईपासून खूप गोष्टी लपवून ठेवतो आहेस.'

दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्याही दिवशी पुन्हा पुन्हा तेच संभाषण झाले.

हिवाळ्याच्या मध्याला प्रिन्सेस मार्या आपल्या भाच्याच्या खोलीत त्याच्या अभ्यासावर लक्ष ठेवीत बसली होती. एवढ्यात नोकराने येऊन रोस्तॉफ आल्याची वर्दी दिली. आपल्या गूढ भावना आणि आपली अस्वस्थता दिसू न देण्याचा तिने पक्का निर्धार केला. तिने बूरिअन बाईला बोलावून घेतले. तिला बरोबर घेऊन तिने दिवाणखान्यात प्रवेश केला.

निकोलायकडे दृष्टी टाकताच तो केवळ शिष्टाचार पाळण्यासाठी आला आहे हे तिने ओळखले. आपणही त्याच्याशी तशाच तऱ्हेने वागायचे असा तिने निश्चय केला.

काउंटेसची प्रकृती, दोघांच्याही परिचयाची माणसे, युद्धाच्या अगदी अलीकडील वार्ता अशा विषयांवर ती दोघे बोलली, शिष्टाचार-पालनाला आवश्यक तेवढी दहा मिनिटे झाली तेव्हा निरोप घेण्यासाठी निकोलाय उठला.

बूरिअनबाईच्या मदतीने प्रिन्सेस मार्याने संभाषण चांगल्या तऱ्हेने चालू ठेवले होते. आस्था नसलेल्या विषयांवर बोलून ती इतकी कंटाळली होती व आपल्याच वाट्याला फार थोडे सुख का यावे याचा विचार करण्यात इतकी मग्न झाली होती की शेवटच्या क्षणी जेव्हा तो उठू लागला तेव्हा कसल्यातरी तंद्रीत असल्यागत ती आपल्या उजळ डोळ्यांनी कुठेतरी सरळ पाहतच निश्चल बसून राहिली; तो उठत आहे याचे भान तिला राहिले नाही.

निकोलायने तिच्याकडे पाहिले. तिचा प्रेमळ चेहरा व्यथित दिसत होता. त्याला एकाएकी तिची दया आली. आपण कदाचित तिच्या दुःखाचे कारण असू असे अंधुक वाटून त्याने तिचा चेहरा न्याहाळला. तिला मदत करावी, तिच्याशी काहीतरी प्रिय असे बोलावे असे त्याला फार फार वाटले पण त्याला शब्द सुचेनात. 'प्रिन्सेस, येतो मी' तो म्हणाला तशी तिने दचकून लाजून दीर्घ उसासा टाकला. 'मला क्षमा करा' झोपेतून उठल्यासारखी ती म्हणाली, 'तुम्ही निघालात तर काउंट ? बरं या. हे काय, काउंटेसना उशी घेऊन या.'

'थांबा, मी एक मिनिटात देऊन येते.' 'अगबाई ! काउंटेसना तक्क्या द्यायचा राहिला !'

आता ती दोघेही मधूनमधून एकमेकांकडे दृष्टिक्षेप टाकीत स्तब्ध होती.

विषण्ण स्मित करीत शेवटी एकदाचा निकोलाय म्हणाला, 'प्रिन्सेस, बॉगुचेरॉव्होला आपण भेटलो. त्याला फार काळ झाला नाही पण तेवढ्या काळात कितीतरी घटना घडल्या नाही ? त्या वेळी आम्ही खूप संकटात आहोत असं वाटायचं. परंतु तो काळ परत यावा यासाठी मी वाटेल ती किंमत देईन. तो काळ परत येणं शक्यच नाही.'

तो बोलत असताना प्रिन्सेस मार्या त्याच्याकडे आपल्या पाणीदार डोळ्यांनी उत्सुकतेने पाहत होती. त्याच्या बोलण्याचा गूढ अर्थ समजून घेण्याचा, त्यातून आपल्याबद्दल उघड होणारी त्याची भावना समजून घेण्याचा ती प्रयत्न करू लागली.

'ते खरं आहे.' ती म्हणाली, 'पण काउंट, भूतकाळाबद्दल तुम्ही खंत करण्याची जरुरी

नाही. तुमचं जीवन मला माहीत आहे. त्यावरून तुम्ही नेहमीच जीवनात तृप्त असाल असं वाटतं. कारण तुम्ही जो त्याग करीत आहात...'

निकोलाय मध्येच घाईघाईने म्हणाला, 'तुमच्या स्तुतीला मी अपात्र आहे. उलट मी स्वतःलाच दोष देत असतो. पण जाऊ दे हा कंटाळवाणा, नीरस विषय.'

पुन्हा त्याची मुद्रा रूक्ष व निर्विकार झाली. परंतु प्रिन्सेस मार्याला त्याच्या ठिकाणी पुन्हा तिला परिचित आणि प्रिय असलेला पूर्वीचा निकोलाय दिसत होता आणि ती केवळ त्यालाच उद्देशून आता बोलत होती.

'तसं बोललं तर तुम्ही मनावर घेणार नाही असं वाटलं होतं.' तुमच्याशी आणि तुमच्या कुटुंबियांशी माझं किती जिव्हाळ्याचं नातं आहे. माझी सहानुभूती तुम्हाला मर्यादातिक्रम वाटणार नाही अशी माझी कल्पना होती. पण माझा अंदाज चुकला.' तिचा आवाज एकाएकी थरथरला पण ती स्वतःला सावरीत म्हणाली 'तुम्ही पूर्वी किती वेगळे होता'...

'त्याला हजारो कारणं आहेत' तो 'त्याला' या शब्दावर जोर देत म्हणाला. नंतर हळुवारपणे म्हणाला, 'तुझा आभारी आहे मी, प्रिन्सेस. पुष्कळदा किती अवघड जातं...'

'हजारो कारणं! हजारो कारणं!' प्रिन्सेसचा अंतरात्मा आक्रोशू लागला.' मी काही केवळ उत्साही, प्रेमळ आणि मनमोकळ्या नजरेच्या त्या देखण्या माणसावर प्रेम केलं नव्हतं, ह्याच्या उदार, निश्चयी आणि त्यागी मनाचं भाकीत मी केव्हाच केलं होतं.' ती स्वतःशी म्हणाली. 'आता तो गरीब आहे. मी श्रीमंत झाले आहे म्हणूनच असेल...तसी नसते तर.' तिला त्याचा पूर्वीचा प्रेमळ स्वभाव आठवला आणि आताचा प्रेमळ उदास चेहरा पाहताच त्याच्या रूक्षपणाची कारणे एकदम तिच्या ध्यानात आली.

'काउंट, का का म्हणून?' नकळत त्याच्याकडे जात ती किंचाळली. 'सांगा, काउंट असं का? तुमची कारणं मला समजत नाहीत.' ती बोलत राहिली 'मी दुःखी आहे. तुमच्याकडेच हे मी कबूल करते आहे. तुम्ही कोणत्यातरी कारणासाठी आपली जुनी मैत्री नाहीशी करीत आहात. त्याचं मला दुःख होतं आहे!' तिच्या डोळ्यांत आसवे आली. तिचा आवाज कापू लागला. 'मला आयुष्यात इतकं अल्प सौख्य मिळालं आहे की प्रत्येक हानी मला दुःसह होत आहे. माफ करा मला. येते मी.' एकाएकी तिला रडू कोसळले. ती बाहेर जाऊ लागली.

'प्रिन्सेस, कृपा करून थांब' तिला अडवीत तो ओरडला. तिने वळून पाहिले. काही क्षण त्या दोघांनी काही न बोलता नजरेला नजर भिडवली आणि मग दूरस्थ, अशक्य, एकाएकी असे काही अगदी सुलभ, शक्य आणि अपरिहार्य ठरले.

याबद्दल तो बोलणार हे त्यांनी गृहीत धरले होते. तो जे जे बोलत असे ( उदा. पुरवठ्यासाठी आपणास थांबणे भाग आहे किंवा सैनिकांना बूट नाहीत ) ते किती साधे असे. मात्र आपण केलेल्या सूचना फार गुंतागुंतीच्या आणि चातुर्याच्या असतात असे त्यांना वाटे. कुटूझॉफ मठ्ठ आहे, त्याला म्हातारचळ लागला आहे याबद्दल त्यांना शंका नव्हती, आपण लष्करी विषयातील जाणकार असूनही आपणाकडे कसलेच अधिकार नाहीत असे त्यांना वाटे. पीटर्सबर्गचा लाडका वीर पुरुष आणि तेजस्वी अॅड्मिरल विटझेन्स्टीन सैन्यात दाखल झाल्यापासून स्टाफमधील लोकांच्या असमाधानाला आणि दुष्ट अफवांना ऊत आला. कुटूझॉफच्या ते लक्षात आले. त्याने केवळ उसासा टाकून खांदे उडविले. बेरेझिना येथील प्रसंगानंतर फक्त एकदाच तो भडकला आणि झारबरोबर खाजगी पत्रव्यवहार करणाऱ्या बेनिग्झनला त्याने लिहिले :

'आपली प्रकृती सारखी बिघडते म्हणून हे पत्र मिळताच आपण कॅलुगाला जावे अशी मी आपणास विनंती करीत आहे. सम्राटाकडून त्यापुढे तुम्ही काय करावे या संबंधीचे हुकूम तिथे मिळतील, त्यांची प्रतीक्षा करीत असावे.'

बेनिग्झनच्या बडतर्फीनंतर आला ग्रँड ड्यूक कॉन्स्टन्टिन पावलॉविच. मोहिमेच्या सुरुवातीस त्याने भाग घेतला होता. नंतर कुटूझॉफने त्याला सैन्यातून काढून टाकले होते. सैन्यात दाखल होताच ग्रँड ड्यूकने कुटूझॉफला माहिती दिली, 'आपल्या सैन्याने मिळवलेल्या दरिद्री यशाबद्दल व मंद प्रगतीबद्दल झारना मुळीच समाधान वाटत नाही. स्वतः सैन्याबरोबर राहायचा झार यांचा बेत आहे. ते लवकरच येतील.'

त्या वर्षाच्या ऑगस्ट महिन्यात झारच्या इच्छेविरुद्ध कुटूझॉफची कमांडर–इन्–चीफ म्हणून नेमणूक झाली होती. त्यानेच भावी वारसदाराला–ग्रँड ड्यूकला–सैन्यातून काढून टाकले होते. झारच्या इच्छेला न जुमानता त्याने स्वतःच्या अधिकारात मॉस्को सोडण्याचा हुकूम दिला होता. वृद्ध कुटूझॉफला युद्धाप्रमाणेच राजपरिवारातील रीतीभातींचा चांगला अनुभव होता. ग्रँड ड्यूकचे बोलणे ऐकताच आपले दिवस भरले आहेत, आपली भूमिका संपली आहे आणि आपली मानवी सत्ता संपुष्टात आली आहे हे त्याने लागलीच ओळखले. ह्यामागे केवळ राजपरिवाराचा दृष्टिकोण नव्हता. ज्या युद्धात त्याने भाग घेतला होता ते युद्ध संपत आल्याने आपले कार्य संपल्याचे त्याला जाणवले. उलट आपले वृद्ध शरीर थकत असल्याची विश्रांतीची आवश्यकता असल्याची जाणीव त्याला त्याच क्षणी होऊ लागली.

एकोणतीस नोव्हेंबर रोजी कुटूझॉफ विल्ना येथे ( ज्या गावाचा उल्लेख तो 'माझा प्रिय विल्ना' अशा शब्दात करी तेथे ) पोचला. लष्करात शिरल्यापासूनच्या आयुष्यात तो दोन वेळा विल्नाचा गव्हर्नर झाला होता.

युद्धापासून बचावलेल्या त्या समृद्ध गावात कुटूझॉफला जुने मित्र आणि जुने सहकारी भेटले. आजवर न मिळालेला आराम मिळाला. त्याने लष्करी आणि राजकीय विषयाची चिंता करणे सोडून दिले. भोवतालच्या वादळी मनोविकारांच्या जगापासून शक्य तितके दूर राहून तो दैनंदिन जीवन शांतपणे व्यतीत करू लागला. आजूबाजूला जो इतिहास घडत होता

आणि घडणार होता त्याच्याशी त्याचा जणू मुतराम संबंध उरला नव्हता.

झारच्या इच्छेला न जुमानता कुटूझॉफने अर्धे अधिक सैन्य व्हिल्नामध्ये ठेवले. त्याच्या भोवतालची माणसे म्हणू लागली, 'व्हिल्ना येथील मुक्कामात तुम्ही अधिकाधिक अशक्त होत आहात, तुमची प्रकृती ढासळत चालली आहे.' कुटूझॉफ आता सैन्याच्या व्यवस्थेत लक्ष घालीनासा झाला. सगळ्या गोष्टी जनरलांवर सोपवू लागला. झारची प्रतीक्षा करीत तो आपला वेळ ख्याली-खुशालीत घालवू लागला.

काउंट टॉलस्टॉय, प्रिन्स व्हॉएकॉन्स्की, अरॉक्चीव्ह आणि इतर अधिकाऱ्यांसह झारने सात डिसेंबर रोजी पीटर्सबर्ग सोडले, अकरा डिसेंबरला तो व्हिल्नाला पोचला. आपल्या प्रवासी घसरगाडीतून तो थेट किल्ल्यावर आला. अतिशय कडाक्याची थंडी पडली होती. तरीही शेकडो जनरल आणि स्टाफ ऑफिसर परेडच्या पुऱ्या युनिफॉर्ममध्ये होते व सेम्यॉनॉव्स्की रेजिमेंट मानवंदना देण्यासाठी किल्ल्यासमोर खडी होती.

झार येण्याआधीच एक जासूद तोंडाला फेस आलेल्या घोड्याला पिटाळीत किल्ल्याकडे पोचला आणि ओरडला, 'झार येताहेत!'

ॲडज्युटंट कुटूझॉफला सांगायला बाहेरच्या दालनात घुसला. त्यावेळी कुटूझॉफ नोकराच्या छोट्या खोलीत बसला होता.

त्या थोराड वृद्ध माणसाने पुरा गणवेष चढवला. छातीवर हुद्दा दाखवणारे बिल्ले लटकावले. पोटाभोवती स्कार्फ गच्च आवळून बांधला. मिनिटा-दोन मिनिटांनी तो बाहेर पडून संथपणे डुलत डुलत चालू लागला. त्याने रुंद काठावर दुमडलेली हॅट सपाट बाजू पुढे येईल अशा तऱ्हेने घातली. हातमोजे हातात धरले, दोन्ही बाजूंना झुकत मोठ्या कष्टाने तो पायऱ्या उतरला आणि झारला देण्यासाठी तयार करण्यात आलेला रिपोर्ट त्याने हातात घेतला.

सगळ्यांच्या नजरा घसरगाडीवर खिळल्या. तीत बसलेले झार आणि व्हॉल्कॉन्स्की स्पष्टपणे दिसत होते.

पन्नास वर्षांच्या सवयीमुळे ह्या सगळ्या गोष्टींचा परिणाम वृद्ध कुटूझॉफचे शरीर थरथरण्यात झाला. त्याने अस्वस्थपणे आपला हात पोटावरून फिरवला. आपली हॅट सरळ केली. घसरगाडीतून उतरून झारने त्याच्याकडे नजर टाकली. त्याच वेळी त्याने स्वतःला सावरून ताठ उभे राहून झारला रिपोर्ट दिला. मग मर्जी संपादन करू पाहणाऱ्या तालबद्ध स्वरात तो बोलू लागला.

झारने कुटूझॉफला भरकन आपाद-मस्तक न्याहाळले. क्षणभर कपाळाला आठी घातली पण एकदम स्वतःच्या भावना आवरून तो पुढे आला आणि त्याने बाहू पसरून वृद्ध जनरलला आलिंगन दिले. जुन्या सरावाच्या कल्पना चाळवल्या गेल्या. आलिंगनाने त्याच्या अंतःकरणातील उत्कट भावना जागृत झाल्या. आलिंगनाचा त्याच्यावर नेहमीचा परिणाम झाला. त्याने हुंदका दिला.

झारने ऑफिसरांचे आणि मानवंदना देणाऱ्या रेजिमेंटचे स्वागत केले. पुन्हा वृद्ध कुटू-

झॉफशी हस्तांदोलन करून झार त्याच्या बरोबर किल्ल्यात शिरला. कमांडर-इन्-चीफ एकटा सापडल्यावर झारने शत्रूचा पाठलाग फार मंद गतीने होत असल्याबद्दल तसेच कुटूझॉफने क्रस्नू आणि बेरेझिना या ठिकाणी केलेल्या चुकांबद्दल नाराजी प्रकट केली. सरहद्दीपलीकडे लवकरच सुरू होणाऱ्या मोहिमेबद्दलही झार बोलला. कुटूझॉफने काही भाष्य केले नाही अगर कसले स्पष्टीकरण दिले नाही. सात वर्षांपूर्वी ऑस्टरलिट्सच्या रणांगणावर झारचे हुकूम ऐकरे ताना त्याची दृष्टी जशी दीनवाणी झाली होती तशी आताही झाली.

कुटूझॉफ खोलीच्या बाहेर पडला. खाली मान घालून संथ पावले टाकीत डुलत डुलत तो बैठकीच्या खोलीतून जात असताना कोणीतरी हाक मारली, ' महाराज. ' तसा तो थांबला.

त्याने मान वर करून पाहिले तो त्याला काउंट टॉलस्टॉय दिसला. चांदीच्या तबकात काहीतरी घेऊन तो त्याच्याकडे पाहत उभा होता. आपल्याकडून त्याची काय अपेक्षा आहे हे कुटूझॉफला काही काळ कळेना.

मग एकाएकी तो भानावर आला. त्याचा गुबगुबीत चेहरा स्मिताने उजळला. आदराने झुकून त्याने तबकातील वस्तू उचलली. ती वस्तू म्हणजे सेंट जॉर्जच्या नावाने दिले जाणारे प्रथमश्रेणीचे मानचिह्न होते.

दुसऱ्या दिवशी झारच्या सन्मानार्थ कमांडर-इन-चीफने भोजन आणि नृत्यसमारंभ योजला. झार त्या समारंभाला उपस्थित होता.

कुटूझॉफला सेंट जॉर्जच्या नावाने येणारे आलेले प्रथम श्रेणीचे मानचिन्ह देण्यात आले होते. झारने त्याचा जास्तीत जास्त गौरव केला. पण झारची कुटूझॉफवर नाराजी झाल्याचे प्रत्येक जण ओळखून होता. शिष्टाचाराचे पालन करण्यात आले. झारने याबाबतीत पहिले उदाहरण घालून दिले, परंतु म्हातारा दोषी आहे आणि त्याची अकार्यक्षमता दिसून आली आहे हे प्रत्येकजण जाणून होता. सम्राटाने नृत्याच्या दालनात प्रवेश केला तेव्हा हस्तगत केलेली निशाणे त्याच्या पायांशी झुकवण्याची आज्ञा कुटूझॉफने केली तेव्हा त्रस्त होऊन झारने कपाळाला आठ्या घातल्या. ' म्हातारा विदूषक ' असे शब्द झार पुटपुटला ते काहींनी ऐकले.

सुरू होणाऱ्या मोहिमेचे महत्त्व कळण्याची कुटूझॉफमध्ये कुवत नव्हती अगर त्याला ते कळून घ्यायची इच्छा नव्हती म्हणून व्हिल्ना येथे झार त्याच्यावर अधिकच नाराज झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी भोवताली जमलेल्या ऑफिसरांना झार म्हणाला, ' तुम्ही केवळ रशियाला वाचवलेलं नाही, तुम्ही युरोपलाही वाचवलं आहे. ' तेव्हा युद्ध संपलेले नाही ही जाणीव प्रत्येकाला लागलीच झाली.

एकट्या कुटूझॉफने मात्र तिकडे दुर्लक्ष केले. त्याने मोकळेपणाने आपले मत मांडले,

'नव्याने युद्ध सुरू करून रशियाची स्थिती सुधारणार नाही अगर त्याच्या गौरवात भर पडणार नाही. उलट आपण दुर्बल होऊ. आज रशिया ज्या वैभवशाली शिखरावर आहे तेथून आपण फेकले जाऊ.' नवीन सैन्यभरती होणे कसे अशक्य आहे, सैनिकांच्या किती हालअपेष्टा होत आहेत, पराभव होण्याचा संभव कसा आहे इ. इ. गोष्टी त्याने झारला ऐकवण्याचा प्रयत्न केला.

नव्या मोहिमेबद्दल त्याची अशी दृष्टी असल्याने साहजिकच कमांडर-इन्-चीफ् मोहिमेच्या प्रगतीतील अडथळा आहे असे सर्वांना वाटू लागले. म्हाताऱ्याशी संघर्ष टाळायला एकच उपाय होता ( ऑस्टरलिट्सला त्याच्याबाबत आणि युद्धाच्या सुरुवातीला बार्क्लीच्या बाबतीत अशीच उपाययोजना केलेली होती. )—उघड स्पष्टीकरण देऊन कमांडर-इन्-चीफ्ला अस्वस्थ न करता त्याचे वास्तविक अधिकार काढून घेऊन ते झारच्या हाती सोपवणे. हा उद्देश समोर ठेवून स्टाफ हळू हळू बदलण्यात आला. कुटूझॉफच्या स्टाफचे सर्व वास्तविक अधिकार काढून घेण्यात आले आणि ते झारला देण्यात आले. त्याची जागा नवीन व्यक्तीला देता येणे शक्य व्हावे म्हणून त्याने आजारी पडणे आवश्यक होते आणि त्याची प्रकृती खरोखरच ढासळू लागली होती.

कुटूझॉफ तुर्कस्थानातून पीटर्सबर्ग येथील ट्रेझरीकडे शिबंदी उभारण्यासाठी आला होता. आणि नंतर गरज भासली तेव्हाच सैन्याचे नेतृत्व करण्यासाठी पुढे सरला होता. त्याची भूमिका संपली तेव्हा त्याची जागा घेण्यासाठी नवा कमांडर पुढे झाला. ह्या दोन्ही घटना सारख्याच स्वाभाविकपणे, साधेपणाने आणि क्रमशः घडल्या.

रशियाच्या मुक्तीसाठी आणि गौरवासाठी जशी कुटूझॉफची आवश्यकता होती तशीच अलेक्झांडरची आवश्यकता होती. युरोप सत्तेचा समतोल आणि नेपोलिअन या शब्दांचे अर्थ कुटूझॉफला उमगले नाहीत.

शत्रूचा नाश झाल्यानंतर रशिया मुक्त झाला, वैभवाच्या उच्च शिखरावर विराजमान झाला. त्यानंतर रशियन जनतेच्या प्रतिनिधीला रशियन या नात्याने काही करायचे राहिले नाही. राष्ट्रीय युद्धाचे प्रतिनिधित्व करणाऱ्याला आता मरणाखेरीज दुसरे काम उरले नाही आणि त्याने ते काम बजावले. तो मरण पावला.

कैदेत असताना पीएरने ज्या हालअपेष्टा सोसल्या होत्या त्या संपताच त्याला त्यांचा पुरता ताण जाणवू लागला. कैदेतून मुक्त झाल्यावर ओरेल येथे गेला. तिथे जाऊन दोन दिवस लोटले असताना कीव्ह येथे जाण्याची तो तयारी करीत होता त्या वेळी तो आजारी पडला आणि तीन महिने ओरेल येथे अंथरुणाला खिळून होता. डॉक्टरांच्या मते त्याला पित्तप्रकोप झाला होता.

तुरुंगातून सुटका झाल्यापासून आजारी पडेपर्यंत त्याच्या बाबतीत जे जे काही घडले त्याचा ठसा काही त्याच्या मनावर उमटला नाही. कुंद अंधारे वातावरण, कधीमधी पडणारा पाऊस, कधी कधी पडणारे ऊन, शारीरिक वेदना, पायातील आणि कुशीतील वेदना एवढ्याच गोष्टी काय त्या त्याला आठवत होत्या. माणसांच्या दुःखाची आणि वेदनांची त्याला अंधुक आठवण होत होती. तुरुंगवासाबद्दल प्रश्न विचारून छळणारी ऑफिसरांची आणि जनरलांची जिज्ञासा; घोडे आणि वाहने मिळवताना झालेला त्रास त्याला आठवत होता. या सर्वांहून त्याला सबंध काळात आपले विचार आणि आपल्या भावना बोथट झाल्या होत्या याची आठवण होत होती.

ज्या दिवशी तो कैदेतून सुटला त्या दिवशी त्याला पेत्या रोस्तॉफचे प्रेत दिसले. बोरोदीनॉच्या लढाईनंतर महिन्याहून अधिक काळ जिवंत राहिलेला प्रिन्स आन्द्रे काही दिवसांपूर्वीच यारॉस्लॉव्हल येथे रोस्तॉफच्या घरात मरण पावला होता ही बातमी देखील त्याला त्याच दिवशी कळली. ही बातमी सांगणाऱ्या डेनिसॉव्हने पीएरला अगोदरच ठाऊक असेल अशा समजुतीने संभाषणात एलनच्या मृत्यूचा उल्लेख त्याच दिवशी केला होता. त्यावेळी पीएरला सगळे विचित्र वाटले. ह्या सगळ्या घटनांनी आपले मन सावरणार नाही असे त्याला वाटले. जिथे माणसे एकमेकांची कत्तल करीत होती, तेथून त्वरित दूर जावे असे त्याला त्याच वेळी वाटू लागले. जिथे विश्रांती घेता येईल, जिथे आपले मन स्वस्थ होईल आणि ह्या साऱ्या विचित्र गोष्टींबद्दल विचार करता येईल अशा शांत ठिकाणाची त्याला ओढ लागली.

परंतु ओरेलला पोचताच तो आजारी पडला. आजारातून शुद्धीवर आल्यावर त्याला भोवतालच्या माणसांची ओळख पटली. त्याचे दोन नोकर टेरन्टी आणि व्हॅस्का मॉस्कोहून आले होते, ते त्याची शुश्रूषा करीत होते. तो तुरुंगातून सुटला आहे आणि आजारी पडला आहे हे ऐकताच इलेट्स येथील त्याच्या वाडीवर राहाणारी त्याची सर्वांत वडील बहीण त्याच्या सेवेसाठी आली होती.

आजारातून उठून तो हिंडूफिरू लागला. गेल्या काही महिन्यांत त्याच्या मनावर झालेले आघात आता हळूहळू पुसट होऊ लागले. उद्या आपणास कोणी हाकलून देणार नाही, आपला उबदार बिछाना कोणी हिसकावून घेणार नाही, दोन वेळचे जेवण आणि चहा आपणास निश्चित मिळणार आहे हे विचार हळूहळू त्याच्या अंगवळणी पडू लागले, परंतु कितीतरी दिवस त्याला स्वप्नामध्ये आपण कैदी असल्याचा भास होत होता.

कैदेतून सुटल्यावर त्याने प्रिन्स आन्द्रेचा मृत्यू, आपल्या पत्नीचा मृत्यू आणि फ्रेंचांचा पाडाव ह्या घटना ऐकल्या होत्या. आता त्या घटनांचा अर्थ त्याला ह्याच प्रकारे हळूहळू कळू लागला.

मॉस्को सोडल्यावर केलेल्या पहिल्या मुक्कामात त्याला मनुष्याच्या जन्मसिद्ध अविच्छेद्य आणि अनन्यहार्य पूर्ण स्वातंत्र्याची प्रथम जाणीव झाली होती. त्याच जाणिवेने स्वातंत्र्याच्या त्या काळात त्याचा अंतरात्मा आनंदाने भरून गेला. बाह्य परिस्थितीवर अवलंबून नसताही

आपल्या आंतरिक स्वातंत्र्याला बाह्य स्वातंत्र्याची अनावश्यक चौकट लाभलेली पाहून त्याला आश्चर्य वाटले.

त्या गावात तो एकटाच होता. त्याच्या ओळखीचे कुणी नव्हते. त्याच्याकडून कोणी कसल्या कामाची अपेक्षा करीत नव्हते. त्याला त्याच्या इच्छेविरुद्ध कोणी कुठे पाठवीत नव्हते. त्याला हवे ते सारे मिळाले होते. पूर्वीच्या काळी सतत छळ करणारी पत्नी मरण पावली होती, त्यामुळे तिच्याबद्दलचे विचार आता त्याच्या मनात येत नव्हते.

जीवनाचे ध्येय काय ह्या प्रश्नाने त्याला पूर्वीच्या काळी भंडावून सोडले होते, ह्या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा तो सतत प्रयत्न करीत असायचा. आता त्याच्या दृष्टीने तो प्रश्नच अस्तित्वात नव्हता. जीवित-ध्येयाचा शोध त्याच्या बाबतीत आता संपला होता. तोही योगायोगाने वा तात्पुरता संपला नव्हता. अशा प्रकारचे ध्येय नाही, अशा प्रकारचे ध्येय अस्तित्वात असणे शक्य नाही, असे त्याला वाटले. ध्येयाच्या ह्या अभावामुळेच त्याला मुक्ततेचा पूर्ण आनंद होत होता. त्यामुळेच ह्या क्षणी तो सुखात होता.

विखरून पडलेल्या वारुळाकडे मुंग्या धाव का घेत असतात, त्यातल्या काही वारुळातून कचऱ्याचे, अंड्यांचे अथवा मेलेल्या प्राण्यांचे तुकडे का ओढत नेतात, काही परत मागे का धावतात, दाटीवाटी करण्यात, एकमेकींना मागे टाकण्यात एकमेकींशी लढण्यात त्यांचा हेतू काय असतो ह्या प्रश्नांची उत्तरे देणे जेवढे कठीण आहे तेवढेच फ्रेंच निघून गेल्यानंतर कोणत्या कारणांमुळे एका काळी मॉस्को या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जागेकडे रशियन गर्दी करू लागले या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे. कोसळलेल्या वारुळाभोवती धावपळ करणाऱ्या मुंग्या, त्यांचा चिवटपणा, त्यांची शक्ती आणि उद्योगरत अशा त्या कीटकांचा प्रचंड समूह पाहून जरी बाकी साऱ्यांचा विनाश झालेला असला तरी त्या वसाहतीची संपूर्ण शक्ती असलेले अविनाशी आणि अनाकलनीय असे काही तरी शिल्लक असल्याचे लक्षात येते. अगदी त्याचप्रमाणे ऑक्टोबर महिन्यातील मॉस्को शहर जरी कारभार बघणारे प्रशासक, प्रार्थना मंदिरे, पवित्र प्रतिमा, संपत्ती आणि घरे या गोष्टी नव्हत्या तरीदेखील ऑगस्टमध्ये जसे होते तसेच होते. शक्तिमान आणि अविनाशी पण क्षुल्लक असे काही सोडले तर बाकी साऱ्याचा विध्वंस झाला होता.

मॉस्कोमध्ये एका आठवड्यात पंधरा हजार लोकसंख्या झाली, एका पंधरवड्यात ती पंचवीस हजारांवर गेली आणि अशा रीतीने ती वाढतच राहिली. १८१२ मध्ये मॉस्को शहर जळले त्यापूर्वी जी लोकसंख्या होती त्यापेक्षा १८१३ च्या ऑक्टोबरात ती कितीतरी वाढली. विटझेंगेरोडच्या सैन्यातील कोसॅक, अगदी जवळच्या खेड्यातील शेतकरी आणि मॉस्कोतून पळून जवळपासच्या प्रदेशात लपून राहिलेले रहिवाशी ही मॉस्कोत प्रथम

प्रवेश करणारी रशियन माणसे होती. विध्वंस झालेल्या शहरात आल्यावर तिथे लुटालूट झालेली दिसताच ती रशियन माणसेही लुटालूट करू लागली. फ्रेंचांनी सुरू केलेले काम त्यांनी चालू ठेवले. उद्ध्वस्त मॉस्को शहरातील घरांतील आणि रस्त्यावर पडलेली मालमत्ता जवळपासच्या खेड्यात पळवून नेण्यासाठी शेतकऱ्यांच्या गाड्यामागून गाड्या मॉस्को शहरात येऊ लागल्या. कोसॅक सैनिक शक्य असतील त्या चिजा आपल्या तंबूत नेऊ लागले. घरमालक इतरांच्या घरातील वस्तू आपल्याच आहेत, असा बहाणा करीत आपली घरे भरू लागले.

मॉस्को शहरातून लोक निघून गेलेले फ्रेंचांना आढळले, तरीही शहरी जीवनाची यंत्रणा पद्धतशीर चालू होती. व्यापार, कारागीर, त्यांच्या सर्व शाखा, चैनीच्या वस्तूंची दुकाने, शासनसंस्था आणि धर्मसंस्था ह्यात खंड नव्हता. त्या निर्जीव झाल्या होत्या पण अस्तित्वात होत्या. बाजार, दुकाने, भांडारे, अडत्यांचे व्यवहार, सारे चालू होते. कुठेच मालाची कमतरता नव्हती. कारखाने होते. तसेच व्यापारी संस्था होत्या. मोठाले शाही वाडे होते, चैनीच्या वस्तूंनी भरलेली संपन्न घरे होती, इस्पितळे, तुरुंग, न्यायालये, छोटीमोठी प्रार्थनामंदिरे चालू होती, फ्रेंच सैन्य जसजसे जास्त काळ तेथे राहू लागले, तसतसे शहरी जीवनाची ही अंगे नष्ट होऊ लागली, शेवटी साऱ्यांचा शेवट लुटालुटीच्या गोंधळ उडवणाऱ्या निर्जीव दृश्यात झाला.

फ्रेंचांनी जो जो जास्त काळ लूट चालवली तो तो मॉस्कोची मालमत्ता आणि लुटारूंचा जोर पुरता नष्ट होऊ लागला. राजधानीत पहिल्यांदाच परत आलेल्या रशियनांनी सुरू केलेली लुटालूट जसजशी जास्त काळ राहिली आणि त्यात भाग घेणाऱ्यांची संख्या जसजशी वाढू लागली तसतशी मॉस्कोची मालमत्ता आणि शहरातील नेहमीचे जीवन पूर्वस्थितीला येऊ लागले.

शहरात लुटालूट करणारे लोक जमू लागलेच. पण घरमालक, धर्मगुरू, कनिष्ठ, वरिष्ठ अधिकारी, व्यापारी कारागीर–सर्व प्रकारचे लोक कोणी जिज्ञासेने, कोणी कर्तव्य बजावण्यासाठी, कोणी स्वार्थी हेतूने हृदयात रक्त प्रवेश करते तसे सर्व भागांतून शहरात फिरू लागले.

आठवडा-भरातच शहरातला माल लंपास करण्यासाठी रिकाम्या गाड्या घेऊन आलेल्या शेतकऱ्यांना अधिकाऱ्यांनी थांबवले आणि त्यांना गाड्यांतून प्रेते शहराबाहेर न्यायला भाग पाडले. आपल्या बरोबरीच्या गाडीवानांची दाणादाण उडालेली ऐकून इतर शेतकऱ्यांनी गाड्यांतून गहू, ओट आणि गवत आणले. एकमेकांशी चढाओढ करीत त्यांनी वस्तूंच्या किमती पूर्वीहून खाली आणल्या. चांगली मजुरी मिळेल या आशेने सुतारांचे जथे दररोज मॉस्कोत फिरू लागले. आता सर्वत्र नवी घरे बांधली जाऊ लागली नाहीतर जळक्या पडक्या घरांची दुरुस्ती होऊ लागली. तात्पुरती दुकाने उभारून दुकानदारांनी विक्री सुरू केली. जळक्या घरांतून उपहारगृहे आणि खानावळी सुरु झाल्या. आगीपासून बचावलेल्या प्रार्थना मंदिरातून प्रार्थना प्रवचने सुरू झाली. प्रार्थना मंदिराची चोरीला गेलेली मालमत्ता देणगी म्हणून परत दिली जाऊ लागली. सरकारी कारकुनांनी छोट्या छोट्या

खोल्यांत लोकरीच्या खडबडीत कपड्यांनी आच्छादिलेली टेबले आणि कागदपत्रे ठेवायला छोटे छोटे खण असलेली कपाटे मांडली. वरिष्ठ अधिकारी आणि पोलिस यांनी फ्रेंचांनी मागे टाकलेल्या मालाचे वाटप करण्यास प्रारंभ केला. ज्यांच्या घरांत इतर घरांतला माल लुटून आणून ठेवण्यात आला होता त्यांच्याकडील सगळा माल ग्रॅनॉव्हिटा या राजवाड्यात नेला गेला. तेव्हा त्या त्या घरांचे मालक आपल्यावर अन्याय होत आहे अशी तक्रार करू लागले. फ्रेंचांनी अनेक ठिकाणांहून माल गोळा करून एका ठिकाणी ठेवला होता म्हणून त्या ठिकाणी सापडलेला सगळा माल त्या ठिकाणच्या मालकास परत देणे हे योग्य नव्हे असे काहीजण सांगू लागले. पोलिसांना शिव्या मिळू लागल्या आणि लाच मिळू लागली. जळून गेलेल्या सरकारी इमारतींच्या किमती दसपट ठरवण्यात आल्या आणि मदतीसाठी लोकांना आवाहने केली जाऊ लागली. काउंट रास्तोप्चिनने पुन्हा जाहीरनामे लिहिले.

जानेवारीच्या अखेरीस पीएर मॉस्कोला आला. आगीपासून बचावलेल्या आपल्या घराच्या एका भागात राहू लागला. परत मॉस्कोत आलेल्या रास्तोप्चिनला आणि इतर परिचितांना भेटला. दोन तीन दिवसांत पीटर्सबर्गला निघण्याच्या तयारीला लागला.

प्रत्येकाचा विजयोत्सव उतू जात होता. पीएरला पाहून सर्वांना आनंद होत होता. प्रत्येकजण त्याच्या भेटीला व त्याने जे अनुभवले त्याबद्दल विचारायला उत्सुक होता. भेटलेल्या प्रत्येक व्यक्तीशी पीएरच्या मनात मैत्रीची भावना होती. कोणत्याही तऱ्हेने आपले स्वातंत्र्य जाऊ नये म्हणून तो नकळतच सावधपणे वागत होता. लोक त्याला महत्त्वाच्या तसेच क्षुल्लक बाबींबद्दल नाना प्रश्न विचारीत होते. 'तुझा यापुढं कुठं राहाण्याचा विचार आहे ? तू घर बांधायला घेणार आहेस का ? पीटर्सबर्गला कधी निघणार आहेस ? तिथल्या एखाद्याला द्यायची भेट तू घेऊन जाशील का ?' सगळ्या प्रश्नांना तो 'शक्य आहे, कदाचित जाईनही' अशा तऱ्हेची उत्तरे देत होता.

कॉस्ट्रॉमा येथे रोस्तॉफकुटुंब असल्याचे त्याने ऐकले. नताशाबद्दल त्याच्या मनात क्वचितच विचार येई. तिच्याबद्दल विचार आलाच तर तो गतकाळातील मधुर स्मृतीसारखा असे. दैनंदिन जीवनातील विवंचनांपासून नव्हे तर आपण स्वतःच आपल्यावर ओढवून घेतलेल्या भावनेपासूनही मुक्त झालो आहोत असे त्याला वाटले.

मॉस्कोत आल्यानंतर तिसऱ्या दिवशी त्याला प्रिन्सेस मार्या शहरात असल्याचे द्रबेत्स्कॉय कुटुंबाकडून कळले. प्रिन्स आन्द्रेचा मृत्यू, त्याला झालेल्या यातना आणि त्याचे अखेरचे दिवस या गोष्टी पीएरच्या मनात नेहमीच होत्या. आज त्या उत्कटपणे त्याला जाणवू लागल्या. प्रिन्सेस मार्या मॉस्कोतच असून ती आगीपासून सुरक्षित राहिलेल्या आपल्या स्वतःच्या घरात राहात असल्याचे त्याला रात्रीच्या भोजनाच्या वेळी कळले. त्याच रात्री तिला भेटण्यासाठी

तो निघाला.

पीएर प्रिन्सेस मार्यांच्या घराच्या दिशेने चालला असताना त्याच्या मनात प्रिन्स आन्द्रे, त्याचे आपल्यावरील प्रेम, निरनिराळ्या वेळी झालेल्या भेटी, विशेषतः बोरोदीनो येथील शेवटची भेट ह्या आठवणी दाटत होत्या.

थोरल्या काउंटच्या घरी पीएर येऊन पोचला ते घर आगीपासून बचावलेले होते. नुकसानीच्या खुणा तशा दिसत असल्या तरी सर्वसाधारणपणे घराचे रूप बदलले नव्हते. वृद्ध नोकर पीएरला भेटला तेव्हाचा त्याचा करारी चेहरा, थोरला काउंट गेला तरी इथल्या घरच्या कडक शिस्तीत फरक पडलेला नाही असे जणू सांगू इच्छीत होता. त्याने पीएरला सांगितले, ' प्रिन्सेस आपल्या खोलीत गेली आहे. ती दर शनिवारी लोकांना भेटत असते,

' माझं नाव सांग. म्हणजे कदाचित मला भेटीला बोलावतील. ' पीएर म्हणाला.

' जशी आज्ञा, महाराज. कृपा करून चित्रांच्या दालनात या! नोकर म्हणाला.

थोड्या वेळात नोकर देसॅलेला घेऊन परतला. देसॅलेने प्रिन्सेसचा निरोप सांगितला, ' तुमची भेट होणार म्हणून बाईसाहेबांना आनंद झाला आहे. आदरसत्कारात कमतरता होईल. त्याबद्दल क्षमा मागून त्यांनी तुम्हांला वर भेटीला या अशी विनंती केली आहे. '

पीएरला एकच मेणबत्ती पेटत असलेल्या त्या बैठ्या खोलीत प्रिन्सेस आणि तिच्याजवळ काळी वस्त्रे अंगावर असलेली कुणीतरी स्त्री आढळली.

त्याच्या स्वागतार्थ प्रिन्सेस त्वरित उभी राहिली. तिने आपला हात त्याच्या समोर धरला. तो तिच्या हाताचे चुंबन घेत असताना तिने त्याचा चेहरा न्याहाळला आणि म्हटले, ' आपण अशा स्थितीत पुन्हा भेटतो आहोत. शेवटी तो तुमच्याबद्दल सारखा बोलायचा ' असे बोलताना तिने पीएरवरील दृष्टी काढून आपल्या सखीकडे लावली. ते पीएरला खटकले.

'तुम्ही सुरक्षित असल्याचं ऐकून मला आनंद झाला. खूप दिवसांत एवढी एकच सुवार्ता ऐकली.

पुन्हा प्रिन्सेसने पूर्वांहून अधिक अस्वस्थ होत आपल्या सखीकडे दृष्टी टाकली. प्रिन्सेस आणखी काही बोलणार होती तोच पीएरने म्हटले, ' तुला आश्चर्य वाटेल. मला त्याच्याबद्दल काहीही ठाऊक नव्हते. तो युद्धात कामी आला असेल अशी माझी कल्पना होती. त्याच्याबद्दल कळायचं ते ऐकीव माहितीतून. रोस्तॉफकुटुंबाशी भेट झाली होती एवढंच मला ठाऊक आहे...नियतीची करणी किती विचित्र असते ! '

पीएर अधीरतेने भराभर बोलला. त्याने एकदम प्रिन्सेस मार्याच्या सखीच्या चेहऱ्याकडे नजर टाकली. तिची स्नेहपूर्ण नजर आपल्यावर खिळलेली त्याच्या लक्षात आली. संभाषण चालू असताना पुष्कळदा वाटते तसे त्यालाही वाटले. काळ्या पोषाखातील ही सखी प्रिन्सेसची प्रेमळ, सुशील मैत्रीण आहे आणि प्रिन्सेस मार्याशी मोकळेपणाने बोलायला काही हरकत नाही असे समजून तो बोलत होता.

रोस्तॉफकुटुंबाबद्दल त्याने शेवटचे वाक्य उच्चारले तेव्हा प्रिन्सेस मार्याची गोंधळलेली मुद्रा त्याच्या चांगलीच नजरेत भरली. प्रिन्सेस मार्याने पीएरच्या चेहऱ्यावरील नजर पुन्हा काळ्या

वस्त्रातील सखीकडे वळवली आणि पीएरला म्हटले, ' तुम्ही हिला ओळखलं नाही का ? '

पीएरने पुन्हा एकदा तिच्या सखीच्या फिकट कृश चेहऱ्यावर काळ्या डोळ्यांवर आणि गोंधळलेल्या ओठांवर दृष्टी लावली. त्या उत्सुक डोळ्यांतून कधीकाळी विस्मृतीत गेलेली, त्याला मधुर व प्रिय असलेली व्यक्ती त्याच्याकडे टक लावून पाहात होती.

' नाही. ते शक्य नाही. ' तो स्वतःशी म्हणाला, ' तो करारी कृश, फिकट चेहरा इतका म्हातारा कसा दिसतो आहे ? नाही, ही ती नाही. मला तिची फक्त आठवण होते एवढंच. '

तेवढ्यात प्रिन्सेस मार्या म्हणाली, ' नताशा. ' एकाग्र चित्ताने पाहत असलेल्या नताशाने, गंजलेला दरवाजा उघडावा त्याप्रमाणे कष्टाने, प्रयासाने स्मित केले. उघडया दारातून जोराची सुगंधी झुळूक आली आणि किती तरी काळ विस्मृतीत गेलेल्या आणि आताही त्याने ज्याचा मुळी विचारच केला नव्हता अशा परमसुखाने त्याचे मन भरून गेले. ती झुळूक त्याच्यावर वाहात राहिली, तिने त्याला वेढून पार बुडवून टाकले. तिने स्मित केले तेव्हा त्याला मुळी संशय उरला नाही. ती नताशाच होती आणि त्याला ती आवडली. ते रहस्य त्याने नताशाला सांगितले.

■ ■

# उपसंहार

## १८१३–१८२०

१८१३ मध्ये बेझुहॉव्हचे नताशाबरोबर झालेले लग्न रोस्तॉफकुटुंबातील वडीलधाऱ्या मंडळींना शेवटचा सुखाचा प्रसंग होय. त्याच वर्षी काउंट इल्या अँड्रीच मरण पावला. कुटुंब-प्रमुख मरण पावल्यानंतर जगरहाटीप्रमाणे कुटुंब विस्कळित झाले.

मॉस्कोला लागलेली आग व शहरातून लोकांनी काढलेला पळ, प्रिन्स आन्द्रेचा मृत्यू व नताशाची निराशा, पेत्याचा मृत्यू आणि काउंटेसचा शोक ह्या गतवर्षी घडलेल्या घटनांनी वृद्ध काउंटवर एकामागून एक आघात केले. ह्या सगळ्या घटनांचा अर्थ आपणास कळत नाही आणि ती कळण्याची कुवतही आपल्यात उरली नाही असे त्याला वाटू लागले. आलंकारिक भाषेत बोलायचे तर त्या वृद्ध मनुष्याने आपला अंत ओढवून घेण्यासाठी आघातांची अपेक्षा करीत आणि त्यांना आवाहन करीत वादळासमोर आपले शिर झुकवले. तो आलटून-पालटून केव्हा भयभीत, अस्वस्थ तर केव्हा दक्ष, उत्साही दिसे.

काही वेळ तो नताशाच्या लग्नाच्या व्यवस्थेत मग्न राहिला. भोजना–मेजवान्यांची व्यवस्था त्याने पाहिली आणि उत्साही राहाण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा उत्साह गतकाळाप्रमाणे इतर लोकांना उत्साहित करीत नव्हता. उलट त्याला ओळखणाऱ्यांना आणि त्याच्या चाहत्यांना त्याच्याबद्दल दया वाटू लागली.

पीएर आणि त्याची पत्नी सोडून गेल्यानंतर तो अगदी खचून गेला आणि औदासिन्याची तक्रार करू लागला. काही दिवसांनी तो आजारी पडून अंथरुणाला खिळला. डॉक्टरांनी धीर दिला. तरीही आपण आता बरे होणार नाही असे त्याला आजाराच्या सुरुवातीपासून वाटू लागले. काउंटेस सलग पंधरा दिवस त्याच्या उशीजवळ बैठ्या खुर्चीत बसून राहिली. तिने

आपले कपडेही बदलले नाहीत. ती औषध देऊ लागली की प्रत्येकवेळी तो तिच्या हाताचे चुंबन घेऊन रडू लागे. त्याने कुटुंबाची सगळी संपत्ती उधळून टाकली होती. ह्या मुख्य पापाचा भार त्याच्या विवेकबुद्धीला पेलत नव्हता. त्या पापाबद्दल त्याने शेवटच्या दिवशी रडत रडत आपल्या पत्नीची आणि आपल्या उपस्थित नसलेल्या मुलाची क्षमा मागितली. पापमुक्ती आणि तैलाभ्यंजनाचे धार्मिक संस्कार पार पडल्यानंतर तो शांतपणे मरण पावला. दुसऱ्या दिवशी मृताचे अंत्यदर्शन घेण्यासाठी अनेक परिचित आले. रोस्तॉफकुटुंबाने भाड्याने घेतलेली घरे भरून गेली. त्या सगळ्या परिचितांनी रोस्तॉफच्या घरात कितीदातरी भोजन केले होते, कितीदातरी नृत्यसमारंभात भाग घेतला होता. कितीदातरी त्याच्या खर्चिकपणाची टर उडवली होती. आता सगळेजण जणू आपल्या वागणुकीचे समर्थन करण्यासाठी एकाच दुःखाच्या आणि आत्मभर्त्सनेच्या भावनेने म्हणू लागले, 'काही झालं तरी तो अगदी भला माणूस होता. आताशा अशी माणसं दुर्मिळ झाली आहेत. तसं प्रत्येक माणसात काही दोष असायचेच.'

निकोलाय पॅरिसमध्ये रशियन फौजेबरोबर असताना त्याला आपल्या वडिलांच्या मृत्यूची वार्ता कळली. त्याने ताबडतोब राजीनामा दिला. राजीनामा मंजूर होण्याची वाट न पाहता रजा घेऊन तो मॉस्कोला गेला. काउंटच्या मृत्यूनंतर महिन्याच्या आत आर्थिक परिस्थितीचे चित्र स्पष्ट झाले. छोट्या छोट्या कर्जांची प्रचंड रक्कम समजल्यावर सर्वजण हबकून गेले. इतके कर्ज असेल असे कोणालाही वाटले नव्हते. प्रत्यक्ष मालमत्तेच्या किमतीच्या दुपटीहून अधिक किंमतीची कर्जे होती.

निकोलायच्या मित्रांनी आणि आप्तांनी त्याला वारसाहक्क नाकारण्याचा सल्ला दिला. अशा तऱ्हेने वारसा नाकारणे म्हणजे आपल्या पित्याच्या पवित्र स्मृतीला कालिमा लावणे आहे असे निकोलायला वाटले. त्याने अशा मार्गाचा अवलंब करण्याचे मान्य केले नाही. कर्ज फेडण्याच्या बंधनांसह त्याने वारसा स्वीकारला.

काउंट जिवंत होता तोपर्यंत त्याच्या निष्काळजी आणि सुस्वभावी वृत्तीच्या जबरदस्त अनामिक प्रभावामुळे धनको गप्प होते. आता ते सगळे एकदम निकोलायला सतावू लागले. कोणाला पैसे आधी मिळावे ह्या प्रश्नावर त्या धनकोंत नेहमीसारखी स्पर्धा सुरू झाली. कर्ज न देता केवळ देणगी म्हणून ज्यांना प्रॉमिसरी नोटा मिळाल्या होत्या ते मायटेङ्कासारखे लोक तर सर्वांत जास्त तगादा लावू लागले. ते निकोलायला स्वस्थता आणि शांतता म्हणून लाभू देईनात. खरें तर वृद्ध काउंटच आपल्या आर्थिक हानीला—खरोखरच जर झाली असली तर तिला—जबाबदार होता. त्याला त्यांनी सहानुभूती दाखवली होती. त्याच्या संदर्भात निरपराधी असणाऱ्या आणि आपणहून कर्जफेडीस तयार झालेल्या त्याच्या वारसाला निकोलायला ते आता मात्र निर्दयपणे छळू लागले.

निकोलायची एकही योजना यशस्वी झाली नाही. इस्टेट लिलावात अर्ध्या किमतीस विकली गेली. अर्धे कर्ज फेडायचे राहिले. त्याचा मेहुणा बेझुहॉव्ह याने कर्जाऊ दिलेले तीस हजार

रूबल त्याने घेतले आणि विश्वसनीय लेखी करार असलेले काही कर्ज फेडून टाकले. उरलेल्या कर्जाची फेड झाली नाही तर तुरुंगात पाठवू अशा धनकोंनी धमक्या दिल्या. तेव्हा तुरुंगवास चुकवण्यासाठी तो पुन्हा सरकारी नोकरीत शिरला.

तो लष्करात शिरला असता तर बढती मिळून तो कर्नल झाला असता. पण त्याचा विचारही करावयाला नको होता. कारण त्याची आई त्याच्याकडे शेवटचा आशातंतू म्हणून पाहात होती. पूर्वीच्या काळातही जे आपल्याला ओळखत होते त्यांच्या सहवासात मॉस्कोमधे राहावे असे निकोलायला वाटत नव्हते, मुलकी खात्यातील नोकरीची त्याला मुळीच आवड नव्हती तरीही त्याने मॉस्कोमध्ये तसल्या खात्यातच नोकरी स्वीकारली. त्याने प्रिय असा गणवेष उतरून ठेवला आणि आपली आई व सोन्या यांसह तो एका छोट्या घरात राहू लागला.

ह्या काळात नताशा आणि पीएर पीटर्सबर्गमध्ये राहात होते. त्यांना निकोलायच्या परिस्थितीची स्पष्ट कल्पना नव्हती. आपल्या मेहुण्याकडून कर्जाऊ पैसे घेतल्यावर निकोलायने आपले दारिद्र्य त्याच्यापासून लपवण्याची शिकस्त केली. बाराशे रूबल पगारात त्याला आपला आईचा आणि सोन्याचा चरितार्थ चालवावा लागे, एवढेच नव्हे तर आईला दारिद्र्याची जाणीव होणार नाही अशा रीतीने ठेवावे लागे. यामुळे तो आणखीनच मेटाकुटीला येई. बालपणापासून ऐषआरामाची सवय लागलेली असल्याने त्याशिवाय जगणे शक्य आहे हा विचारही काउंटेसच्या मनात येत नसे. आपल्या मुलाला परवडेल की नाही याचा मुळीच विचार न करता काउंटेस गाडी नसतानाही कुणा मैत्रिणीला बोलवायचे असले की गाडीचा आग्रह धरी, स्वतःसाठी एखादे महागडे मिष्टान्न आणि मद्य आपल्या मुलाला आणायला लावी; नताशाला, सोन्याला, किंवा खुद्द निकोलायला चकित करण्यासाठी एखादी भेट देण्याकरिता पैसे मागून घेई.

सोन्या घर सांभाळी, काउंटेसची सेवा करी, तिला काही ना काही वाचून दाखवी, तिच्या लहरी आणि तिच्या मनात दबून असलेला आकस ती सहन करी. हलाखीची स्थिती तिला जाणवू नये म्हणून ती निकोलायला मदत करी. सोन्या आपल्या आईसाठी इतकी झटते आहे की तिच्या ऋणातून आपण कधीच मुक्त होणार नाही असे निकोलायला वाटू लागले. तिच्या सहनशीलतेचे, चिकाटीचे आणि भक्तीचे त्याला कौतुक वाटे. पण तो तिच्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न करी.

ती गुणांनी अगदी परिपूर्ण होती आणि तिच्यात त्याला एकही दोष दिसत नव्हता त्यामुळे की काय त्याच्या मनात तिच्याबद्दल काहीशी अढी निर्माण झाली होती. माणसाचे ज्यामुळे मोल वाटावे असे सगळे गुण तिच्यात होते, पण तिच्यावर जीव जडावा असे फार थोडे गुण होते. तिचे मोल आपल्याला जेवढे अधिक वाटते आहे तेवढे तिच्यावरील प्रेम कमी होत आहे असे त्याला वाटू लागले. तिने पत्रात त्याला 'तुला पूर्ण स्वातंत्र्य देत आहे' असे लिहिले होते, ते त्याने शब्दशः खरे मानले होते. त्यांच्यामध्ये जे घडले होते ते जणू दीर्घकाळापूर्वीच विस्मृतीत गेले होते आणि कुठल्याही परिस्थितीत ते संबंध नव्याने निर्माण होणार नाहीत असे

मानून तो तिच्याशी वागू लागला होता.

हिवाळ्याच्या प्रारंभी प्रिन्सेस मार्या मॉस्कोत येऊन पोचली. रोस्तॉफकुटुंबाची परिस्थिती कशी आहे याची कल्पना तिला लोकांच्या बोलण्यावरून आली. ‘आपल्या आईसाठी मुलगा कसा त्याग करीत आहे’ हेही तिने ऐकले. त्याच्यावरील आपल्या प्रेमाला पुष्टी मिळालेली पाहून प्रिन्सेस मार्या आनंदित झाली. ‘मी त्याच्याकडून अशीच अपेक्षा केली होती’ ती स्वतःशी म्हणाली. तिचे त्या कुटुंबाशी अगदी जिव्हाळ्याचे नाते होते; ती त्यांच्यातीलच एक होती हे आठवून तिने त्यांना भेटण्याचे ठरवले. परंतु व्हॉरोनेश येथे असतानाचे आपले निकोलाय बरोबरचे संबंध आठवताच तिला तसे करण्याचे धाडस होईना. तरीही मॉस्कोला आल्यानंतर काही आठवड्यानंतर तिने मनाची तयारी केली आणि ती रोस्तॉफकुटुंबाला भेटायला गेली.

निकोलायच्या खोलीतून गेल्याशिवाय काउंटेसच्या खोलीत शिरणे अशक्य होते त्यामुळे पहिल्यांदा तिला निकोलाय भेटला. आपल्याकडे पहिला दृष्टिक्षेप टाकताच त्याचा चेहरा आनंदाने उजळून जाईल असे प्रिन्सेस मार्याला वाटले होते. परंतु तिला पाहताच त्याची दृष्टी विमनस्क, हेकेखोर आणि गर्विष्ठ बनली. त्याची अशी दृष्टी तिला पूर्वी कधीच दिसली नव्हती. निकोलायने तिच्या प्रकृतीची चौकशी केली, आपल्या आईकडे तिला नेले, तिथे चारपाच मिनिटे थांबल्यावर तो खोलीबाहेर पडला.

प्रिन्सेसमार्याची गाडी घरापासून दूर गेली तेव्हा त्याला आपली त्रस्तता लपवणे शक्य झाले नाही. तो उद्वेगाने सोन्याला म्हणाला, ‘ती इथे भटकत कशाला आली होती? ह्या बायकांचा आणि त्यांच्या सौजन्याचा मला वैताग येतो!’

निकोलाय आणखी काही बोलला नाही. तिच्याबद्दल काही न बोलणेच त्याने पसंत केले असते. परंतु ती निघून गेल्यावर वृद्ध काउंटेस तिच्याबद्दल प्रत्येक दिवशी कैक वेळा बोलू लागली.

ती प्रिन्सेस मार्याची स्तुती करी. निकोलायने जाऊन तिला भेटले पाहिजे असे आग्रहाने सांगे. तिची पुन्हा भेट झाली पाहिजे अशी इच्छा प्रकट करी. तरी तिच्याबद्दल बोलताना ती नेहमीच संतापलेली असे.

काउंटेस प्रिन्सेसबद्दल बोलू लागली की निकोलाय काही न बोलण्याचा प्रयत्न करी. त्याच्या मौनामुळे ती त्रस्त होई. ‘ती अतिशय सुस्वभावी, नेक मुलगी आहे.’ ती म्हणायची, ‘तू जाऊन तिला भेटच. तसा तू कोणालाही जाऊन भेटशील. पण आमचा मात्र तुला कंटाळा येत असतो. मी तुला काही अप्रिय गोष्ट तर करायला सांगत नाही ना? गाडी घेऊन तिच्या भेटीला जा एवढेच सांगते आहे. अरे बाबा हा शिष्टाचार आहे. सौजन्य आहे. मला वाटतं मी तुला एकदा

विनंती केली आहे. मी यापुढं काही तुझ्या वागण्यात व्यत्यय आणणार नाही. कारण तू आपल्या आईपासून खूप गोष्टी लपवून ठेवतो आहेस.'

दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्याही दिवशी पुन्हा पुन्हा तेच संभाषण झाले.

हिवाळ्याच्या मध्याला प्रिन्सेस मार्या आपल्या भाच्याच्या खोलीत त्याच्या अभ्यासावर लक्ष ठेवीत बसली होती. एवढ्यात नोकराने येऊन रोस्तॉफ आल्याची वर्दी दिली. आपल्या गूढ भावना आणि आपली अस्वस्थता दिसू न देण्याचा तिने पक्का निर्धार केला. तिने बूरिअन बाईला बोलावून घेतले. तिला बरोबर घेऊन तिने दिवाणखान्यात प्रवेश केला.

निकोलायकडे दृष्टी टाकताच तो केवळ शिष्टाचार पाळण्यासाठी आला आहे हे तिने ओळखले. आपणही त्याच्याशी तशाच तऱ्हेने वागायचे असा तिने निश्चय केला.

काउंटेसची प्रकृती, दोघांच्याही परिचयाची माणसे, युद्धाच्या अगदी अलीकडील वार्ता अशा विषयांवर ती दोघे बोलली, शिष्टाचार-पालनाला आवश्यक तेवढी दहा मिनिटे झाली तेव्हा निरोप घेण्यासाठी निकोलाय उठला.

बूरिअनबाईच्या मदतीने प्रिन्सेस मार्याने संभाषण चांगल्या तऱ्हेने चालू ठेवले होते. आस्था नसलेल्या विषयांवर बोलून ती इतकी कंटाळली होती व आपल्याच वाट्याला फार थोडे सुख का यावे याचा विचार करण्यात इतकी मग्न झाली होती की शेवटच्या क्षणी जेव्हा तो उठू लागला तेव्हा कसल्यातरी तंद्रीत असल्यागत ती आपल्या उजळ डोळ्यांनी कुठेतरी सरळ पाहतच निश्चल बसून राहिली; तो उठत आहे याचे भान तिला राहिले नाही.

निकोलायने तिच्याकडे पाहिले. तिचा प्रेमळ चेहरा व्यथित दिसत होता. त्याला एकाएकी तिची दया आली. आपण कदाचित तिच्या दुःखाचे कारण असू असे अंधुक वाटून त्याने तिचा चेहरा न्याहाळला. तिला मदत करावी, तिच्याशी काहीतरी प्रिय असे बोलावे असे त्याला फार फार वाटले पण त्याला शब्द सुचेनात. 'प्रिन्सेस, येतो मी' तो म्हणाला तशी तिने दचकून लाजून दीर्घ उसासा टाकला. 'मला क्षमा करा' झोपेतून उठल्यासारखी ती म्हणाली, 'तुम्ही निघालात तर काउंट ? बरं या. हे काय, काउंटेसना उशी घेऊन या.'

'थांबा, मी एक मिनिटात देऊन येते.' 'अगबाई! काउंटेसना तक्क्या द्यायचा राहिला!'

आता ती दोघेही मधूनमधून एकमेकांकडे दृष्टिक्षेप टाकीत स्तब्ध होती. विषण्ण स्मित करीत शेवटी एकदाचा निकोलाय म्हणाला, 'प्रिन्सेस, बोगुचेरॉव्होला आपण भेटलो. त्याला फार काळ झाला नाही पण तेवढ्या काळात कितीतरी घटना घडल्या नाही? त्या वेळी आम्ही खूप संकटात आहोत असं वाटायचं. परंतु तो काळ परत यावा यासाठी मी वाटेल ती किंमत देईन. तो काळ परत येणं शक्यच नाही.'

तो बोलत असताना प्रिन्सेस मार्या त्याच्याकडे आपल्या पाणीदार डोळ्यांनी उत्सुकतेने पाहत होती. त्याच्या बोलण्याचा गूढ अर्थ समजून घेण्याचा, त्यातून आपल्याबद्दल उघड होणारी त्याची भावना समजून घेण्याचा ती प्रयत्न करू लागली.

'ते खरं आहे.' ती म्हणाली, 'पण काउंट, भूतकाळाबद्दल तुम्ही खंत करण्याची जरुरी

नाही. तुमचं जीवन मला माहीत आहे. त्यावरून तुम्ही नेहमीच जीवनात तृप्त असाल असं वाटतं. कारण तुम्ही जो त्याग करीत आहात...'

निकोलाय मध्येच घाईघाईने म्हणाला, ' तुमच्या स्तुतीला मी अपात्र आहे. उलट मी स्वतःलाच दोष देत असतो. पण जाऊ दे हा कंटाळवाणा, नीरस विषय. '

पुन्हा त्याची मुद्रा रूक्ष व निर्विकार झाली. परंतु प्रिन्सेस मार्याला त्याच्या ठिकाणी पुन्हा तिला परिचित आणि प्रिय असलेला पूर्वीचा निकोलाय दिसत होता आणि ती केवळ त्यालाच उद्देशून आता बोलत होती.

' तसं बोललं तर तुम्ही मनावर घेणार नाही असं वाटलं होतं.' तुमच्याशी आणि तुमच्या कुटुंबियांशी माझं किती जिव्हाळ्याचं नातं आहे. माझी सहानुभूती तुम्हाला मर्यादातिक्रम वाटणार नाही अशी माझी कल्पना होती. पण माझा अंदाज चुकला. ' तिचा आवाज एकाएकी थरथरला पण ती स्वतःला सावरीत म्हणाली ' तुम्ही पूर्वी किती वेगळे होता '...

' त्याला हजारो कारणं आहेत ' तो ' त्याला ' या शब्दावर जोर देत म्हणाला. नंतर हळुवारपणे म्हणाला, ' तुझा आभारी आहे मी, प्रिन्सेस. पुष्कळदा किती अवघड जातं...'

' हजारो कारणं ! हजारो कारणं !' प्रिन्सेसचा अंतरात्मा आक्रोशू लागला. ' मी काही केवळ उत्साही, प्रेमळ आणि मनमोकळ्या नजरेच्या त्या देखण्या माणसावर प्रेम केलं नव्हतं, ह्याच्या उदार, निश्चयी आणि त्यागी मनाचं माकीत मी केव्हाच केलं होतं. ' ती स्वतःशी म्हणाली. ' आता तो गरीब आहे. मी श्रीमंत झाले आहे म्हणूनच असेल...तशी नसते तर.' तिला त्याचा पूर्वीचा प्रेमळ स्वभाव आठवला आणि आताचा प्रेमळ उदास चेहरा पाहताच त्याच्या रूक्षपणाची कारणे एकदम तिच्या ध्यानात आली.

' काउंट, का का म्हणून ? ' नकळत त्याच्याकडे जात ती किंचाळली. ' सांगा, काउंट असं का ? तुमची कारणं मला समजत नाहीत.' ती बोलत राहिली ' मी दुःखी आहे. तुमच्याकडेच हे मी कबूल करते आहे. तुम्ही कोणत्यातरी कारणासाठी आपली जुनी मैत्री नाहीशी करीत आहात. त्याचं मला दुःख होतं आहे !' तिच्या डोळ्यांत आसवे आली. तिचा आवाज कापू लागला. ' मला आयुष्यात इतकं अल्प सौख्य मिळालं आहे की प्रत्येक हानी मला दुःसह होत आहे. माफ करा मला. येते मी. ' एकाएकी तिला रडू कोसळले. ती बाहेर जाऊ लागली.

' प्रिन्सेस, कृपा करून थांब ' तिला अडवीत तो ओरडला. तिने वळून पाहिले. काही क्षण त्या दोघांनी काही न बोलता नजरेला नजर भिडवली आणि मग दूरस्थ, अशक्य, एकाएकी असे काही अगदी सुलभ, शक्य आणि अपरिहार्य ठरले.

१८१३ च्या ऑक्टोबरात निकोलायने प्रिन्सेस मार्याशी लग्न केले. आपली आई, पत्नी आणि सोन्या यांना घेऊन तो ब्लीक हिल्स येथील घरात राहू लागला.

आपल्या पत्नीची शेतवाडी न विकता नंतरच्या चार वर्षांत त्याने राहिलेले कर्ज फेडून टाकले. चुलत बहिणीच्या मृत्यूनंतर तिचा वारसा मिळाल्यानंतर त्याने पीएरकडून घेतलेले कर्जदेखील फेडून टाकले.

निकोलायने आपले आर्थिक व्यवहार इतक्या उत्तम तऱ्हेने हाताळले की नंतरच्या तीन वर्षांत म्हणजे १८२० च्या दरम्यान ब्लीक हिल्सला लागून असलेली एक छोटीशी शेतवाडी तो खरेदी करू शकला. आपल्या वाडवडिलांची ऑट्रॅड्नू येथील शेतीवाडी विकत घेण्याचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी त्याने बोलणी सुरू केली.

प्रारंभी जरी गरज म्हणून त्याने शेतीची व्यवस्था बघायला सुरुवात केली तरी त्याला लवकरच शेतीची इतकी आवड निर्माण झाली की शेती हीच त्याच्या आवडीची एकमेव गोष्ट बनली.

आपल्या नवऱ्याची शेतीबद्दल असलेली उत्कट ओढ पाहून प्रिन्सेस मार्याला हेवा वाटे. त्याच्या भावनेत आपण सहभागी होऊ शकत नाही म्हणून तिला खंत वाटे. तिच्यापासून कितीतरी दूर असलेल्या त्या परक्या जगात तो ज्या सुखाचा आणि निराशेचा अनुभव घेई त्याची तिला कल्पनाही येणे शक्य नव्हते. तो अगदी पहाटे उठे आणि सबंध सकाळ शेतावर नाहीतर मळणीच्या जागी घालवी. पेरणी, कापणी इ. कामे आटोपून तो तिच्याबरोबर चहा घ्यायला येई. त्यावेळी तर तो अतिशय उत्सुक आणि प्रसन्न दिसे. पण त्याचे कारण तिला कळू शकत नसे. मॅट्व्ही अर्मिशीन ह्या सुस्थितीत असलेल्या फाटकसरी शेतकऱ्याने आपल्या कुटुंबियांच्या मदतीने रात्रभर जागून गाड्यांत लोंब्या भरल्या आणि इतर कुणी धान्य न्यायला लागण्याआधी कापणी पुरी केली होती. ही गोष्ट त्याने इतक्या उत्साहाने आणि आनंदाने आपणाला का सांगितली हे प्रिन्सेस मार्याला कळत नसे. अवर्षणामुळे शुष्क झालेल्या आणि तहानेलेल्या ओटच्या रोपांवर जेव्हा नामी उबदार पाऊस पडू लागे तेव्हा खिडकीतून उडी टाकून निकोलाय बाल्कनीत उभा राही आणि केवढ्या तरी आनंदाने स्मित करीत डोळे मिचकावी पण त्याच्या आनंदाचे कारण तिला कळत नसे. कापणीच्या मोसमात गडगडाट करणाऱ्या ढगांना वाऱ्याने पिटाळले की तो कोठारातून बाहेर येई. तेव्हा तो लालबुंद झालेला असे, उन्हाने रापलेले त्याचे अंग घामाने निथळे, त्याच्या केसांना कडू दवण्याचा वास येई. अशा अवस्थेत कोठारातून बाहेर आल्यावर तो आपले हात एकमेकांवर घासत म्हणे, 'असा आणखी एक दिवस गेला की माझं आणि शेतकऱ्यांचं धान्य एकदाचं सुखरूप कोठारात ठेवता येईल.' त्याच्या अशा आनंदाचे कारण तिला कळत नसे.

काही वेळा शेतकरी नाहीतर त्यांच्या बायका कसल्या ना कसल्या कष्टदायक कामातून सुटका व्हावी म्हणून प्रिन्सेस मार्याकडे येत. ती त्यांच्या वतीने रदबदली करू लागली की तो वैतागून जाई, निराश होई आणि हट्टाने नकार देई. 'माझ्या कामात तू ढवळाढवळ करू नकोस'

असे विनवून सांगे. आपल्या इच्छा तत्परतेने आधीच जाणणारा आपला नवरा असा का वागतो याचे तिला कोडे पडे. त्याचे एक वेगळे जग आहे, ते त्याला अत्यंत प्रिय आहे, आपल्याला न समजणाऱ्या नियमांनी ते नियंत्रित आहे असे तिला वाटू लागे.

कधीकधी त्याला समजून घेण्याचा प्रयत्न करीत ती त्याच्या कामाची स्तुती करी, घर, नोकरांच्या कल्याणासाठी तो किती धडपडतो याबद्दल बोलू लागे. अशा वेळी तो रागावून म्हणे ' असं बिलकुल नाही. असं माझ्या डोक्यात कधीच शिरलं नव्हतं. त्या गड्यांच्या कल्याणासाठी मी एक श्वाससुद्धा टाकणार नाही. आपल्या शेजाऱ्याचं भलं करण्याच्या योजना अद्भुतरम्य आणि मूर्खांच्या बडबडीसारख्या आहेत. मला माझी मुलं भिकारी व्हायला नको आहेत. मला माझ्या आयुष्यातच सर्वांसाठी चांगली कमाई करायची आहे. एवढंच माझं ध्येय आहे आणि ते करण्यासाठी शिस्त हवी, कडकपणा हवा, ' मग आशावादीपणाने आपली मूठ वळवीत तो म्हणे, ' आणि न्यायही हवा. कारण शेतकरी कपड्याशिवाय आणि अन्नाशिवाय असला, त्याच्याकडे केवळ एक भिकार खोपटंच असलं तर तो माझं काय–स्वतःचं काय–कोणाचंच कल्याण करू शकणार नाही.'

१८२० च्या हेमंताच्या प्रारंभापासून आपला नवरा आणि मुले यांच्यासह नताशा ब्लीकहिल्स येथे राहत होती. पीएर पीटर्झबर्ग येथे गेला होता. काही खाजगी कामासाठी तिथे तीन चार आठवडे राहावे लागेल असे तो म्हणाला होता. सहा आठवडे झाले तरी तो परतला नव्हता. आता कोणत्याही क्षणी तो घरी यायची शक्यता होती.

पाच डिसेंबर रोजी रोस्तॉफच्या कुटुंबात आणखी एक व्यक्ती राहात होती. ती म्हणजे निकोलायचा जुना मित्र-निवृत्त झालेला जनरल डेनिसॉव्ह.

आता नताशा अंगाने चांगलीच भरली होती. ती स्थूलकाय माता म्हणजेच पूर्वीची सडपातळ नताशा होय हे कोणालाही ओळखता आले नसते. तिचा चेहरा अधिक रेखीव झाला होता, चेहऱ्यावरील भाव प्रेमळ, शांत होते. एकाकाळी आकर्षकतेचे प्रमुख कारण असलेली उत्साहाची झळाळी आता चेहऱ्यावर उरली नव्हती. आता तिचा चेहरा, तिचे शारीरिक अस्तित्व तेवढे दृष्टीस पडत होते, त्यामागील आत्म्याची जाणीव मुळीच होत नव्हती. निकोप देखणे मातृत्व काय ते दृष्टीस पडत होते. अगदी क्वचितच ते जुने तेज झळाळून उठत असे. नवरा प्रवासातून परत आला की नाहीतर मूल आजारातून उठले की किंवा ती प्रिन्सेस मार्याशी प्रिन्स आन्द्रेबद्दल बोलू लागली की ( नवऱ्याला मत्सर वाटेल म्हणून ती कधी त्याच्याकडे प्रिन्स आन्द्रेबद्दल बोलत नसे ) किंवा कधी क्वचित प्रसंगी लग्नानंतर सोडलेले

गाणे गावे असे वाटायला लावणारे काही घडले की तिच्या चेहऱ्यावर पूर्वीची झळाळी उमटू लागे. मग तिचे पूर्ण विकसित सुंदर शरीर पूर्वीहून अधिक सुंदर दिसू लागे.

लग्न झाल्यानंतर नताशा आणि तिचा नवरा ही कधी मॉस्कोमध्ये, कधी पीटर्सबर्ग येथे कधी मॉस्कोजवळील शेतवाडीवर, कधी नताशाच्या आईच्या घरी म्हणजे निकोलायच्या घरी राहात असायची. धाकटी काउंटेस बेझुहॉव्ह समाजात क्वचितच मिसळे. ती तशी मिसळली तरीही कुणाला काही ती आवडत नसे. ती मोहक नव्हती आणि मनमिळाऊही नव्हती. नताशाला एकटे राहण्याची आवड होती असे नव्हे. (आपल्याला तसे राहणे आवडते की नाही हे ती सांगू शकली नसती. मात्र आपल्याला एकटे राहणे आवडत नाही अशी तिने कल्पना करून घेतली होती.) बाळंतपणे, मुलांची शुश्रूषा आणि नवऱ्याच्या जीवनात प्रत्येक क्षणाला करावी लागणारी सोबत यात तिचा इतका वेळ जात असे की तिला अजूबाजूच्या लोकांत मिसळणे अशक्य होई. लग्नापूर्वीपासून नताशाला ओळखणारी माणसे तिच्यातील बदल पाहून आश्चर्य प्रकट करीत. त्यांच्या मते तिच्यात झालेला बदल अगदी विलक्षण होता. मातेचे मन असलेल्या थोरल्या काउंटेसला मात्र नताशाच्या स्वच्छंदपणाच्या मुळाशी आपले कुटुंब आणि तिचा नवरा यांची आवश्यकता आहे हे पटले होते. नताशाने ऑट्रॅड्नू येथे असताना अशा अर्थाचे उद्‌गार काढले होते त्यामागे थट्टेपेक्षा प्रामाणिकपणाच अधिक होता.

'लग्न झाल्यानंतर स्त्रीने स्वतःकडे दुर्लक्ष करू नये, आपले नैपुण्य कायम ठेवावे, तारुण्यात दिले होते त्याहून अधिक लक्ष आपल्या सौंदर्याकडे द्यावे, लग्नापूर्वी नवऱ्याला आकर्षित केले होते तसेच पुन्हा करण्याचा प्रयत्न करावा' असा सदुपदेश दूरदृष्टीची माणसे-विशेषतः फ्रेंच माणसे करीत असतात. नताशाने असा उपदेश काही आचरणात आणला नाही.

आपल्याला नवऱ्याशी बांधून टाकणारे नाते अद्‌भुतरम्य भावनांवर अवलंबून नाही असे तिला वाटू लागले. ते नाते शब्दात व्यक्त करता येणार नाही अशा–शरीराला आत्मा बांधून टाकणाऱ्या बंधनासारख्या–दृढ बंधनावर अवलंबून आहे असे तिला वाटू लागले.

केसांची वळणे पाडणे, फॅशनेबल झगे परिधान करणे अगर नवऱ्याला आकर्षित करण्यासाठी गाणे ह्या गोष्टी नवऱ्याला आकर्षित करण्यासाठी साजशृंगार करण्यासारख्याच तिला चमत्कारिक वाटू लागल्या. दुसऱ्यांना बरे वाटावे म्हणून वेशभूषा करणे कदाचित तिला आवडले असते. का ते तिला निश्चित सांगता आले नसते. पण तसे करायला तिला मुळीच सवड नव्हती. गायन, वेषभूषा अगर शब्दांची चोखंदळ निवड यांकडे ती लक्ष देऊ शकत नव्हती याचे मुख्य कारण म्हणजे त्यांबद्दल विचार करायला तिला वेळच सापडत नव्हता.

नताशाने आपल्या कुटुंबाला सर्वस्वी वाहून घेतले होते. आपला नवरा आपला, घराचा आणि मुलांचा राहावा म्हणून तिने त्याच्यावर ताबा ठेवला होता. मुलांना जन्म देण्यात, वाढवण्यात, त्यांची शुश्रूषा करण्यात आणि त्यांना शिकवण्यात तिने स्वतःला वाहून घेतले होते.

पीएर आपल्या बायकोच्या फार आहारी गेला आहे असे सर्वांचे मत होते आणि ते खरेही

होते. लग्न झाल्यापासून नताशा हक्क बजावू लागली होती. पीएरच्या जीवनातील प्रत्येक क्षणावर आपली, आपल्या घराची मालकी आहे असे नताशाला वाटे. पीएरला अर्थातच तिचे हे मत एकदम नवीन होते, विस्मित करणारे होते. तरीही तिच्या ह्या मताने फुशारून जाऊन तो तिच्या मागण्यांपुढे मान तुकवू लागला.

नताशाचा पीएरवर इतका प्रभाव पडला होता की तो कुठल्याही स्त्रीकडे लक्ष देत नसे किंवा स्मित करून बोलत नसे. तसे खास कारण असल्याशिवाय तो केवळ करमणुकीसाठी क्लबमधे जेवायला जात नसे. लहरीखातर पैसा खर्च करायला त्याला धीर होत नसे. तसेच काही काम असल्याखेरीज घर सोडून राहायला तो धजावत नसे. ह्या कामामध्ये त्याच्या बायकोने त्याच्या शास्त्रीय अभ्यासाचा समावेश केला होता. त्याबाबत तिला काही समजत नसे. तरीही ती त्याच्या शास्त्रीय अभ्यासाला खूप महत्त्व देई. ह्याची भरपाई करण्यासाठी म्हणून की काय पीएरला घरातील स्वतःचे आणि इतरांचे जीवन हवे तसे वळवायला पूर्ण सत्ता होती. आपल्या घरात नताशा नवऱ्याची अगदी गुलामाप्रमाणे सेवा-चाकरी करी. अभ्यासिकेत पीएर लिहीत-वाचत असला तर घरातील प्रत्येकाला पाय न वाजवता फिरावे लागे. पीएरने एखाद्या इच्छेचा ओझरता उल्लेख केला की ती इच्छा लागलीच पुरी होई. नताशा लागलीच त्याला हव्या असलेल्या गोष्टीसाठी धावपळ करू लागे.

धन्याच्या म्हणजे पीएरच्या इच्छेनुसार घरचे सगळे व्यवहार होत आहेत असे मानले जाई. खरे तर पीएरच्या इच्छेची अटकळ बांधून नताशा सगळ्या गोष्टी करवून घेई. पीएरच्या इच्छांमागील महत्त्वाचे मुद्दे तिला अचूक ताडता येत. एकदा ते तिला कळले की ती त्यांचा निष्ठेने पाठपुरावा करी. पीएरचा बेत फिरला तरीही ती त्याला त्याच्याच हत्यारांनी विरोध केल्याशिवाय राहत नसे.

सात वर्षांच्या वैवाहिक जीवनानंतर स्वतःचें प्रतिबिंब पत्नीमधे पाहून पीएरला आपण अगदीच वाईट नाही असा सुखद विश्वास वाटू लागला. आपल्यामधे बऱ्यावाइटाचे अभेद्य मिश्रण झाले आहे असे त्याला वाटे. मात्र त्याला आपल्या पत्नीमधे आपल्यातील चांगुलपणा तेवढा प्रतिबिंबित झालेला दिसे, चांगले नसलेले इतर सारे काही तिने अव्हेरिलेले दिसे; त्याच्या ह्या निष्कर्षामागे काही तार्किक विचार होता असे नव्हे. पण त्यामागे कसली तरी गूढ आंतरिक प्रेरणा होती.

पीएर रोस्तॉफकडे असताना दोन महिन्यांपूर्वी त्याला कुण्या प्रिन्स फ्यॉदॉरचे पत्र आले. पीएर ज्या संस्थेचा प्रमुख संस्थापक होता त्या संस्थेच्या पीटर्सबर्ग येथील शाखेतील सदस्यांना जे अनेक प्रश्न सतावीत होते त्याबद्दल चर्चा करण्यासाठी त्याला आग्रहाचे आमंत्रण होते.

नताशा आपल्या नवऱ्याची सगळी पत्रे वाचीत असे. तिने हेही पत्र वाचले. तो घरी

नसला की ती अतिशय दुःखी होई. तरीही तिने त्याला पीटर्सबर्गला जाण्याचा आग्रह केला. ती नवऱ्याच्या बौद्धिक आणि पारमार्थिक जीवनातील प्रत्येक बाबीला अतिशय महत्त्व देई. अशा बाबतीत आपण त्याला धोंड तर ठरणार नाही ना अशी तिला सतत धास्ती वाटे. तिने त्याला जाण्याचा आग्रह केला, मात्र त्याने परतण्याचा दिवस अगदी नक्की ठरवून टाकावा असा हट्ट धरला.

त्याला परत यायला पंधरा दिवस होते तरीही त्या अवधीत नताशा सतत भयभीत, निराश व त्रस्त झाली होती. पीएरला परतायला उशीर व्हायला काही ना काही कारणे सुचवून तिची आई, तिचा भाऊ, सोन्या आणि काउंटेस मार्या तिला धीर देण्याचा प्रयत्न करीत होती. त्या सबंध पंधरवड्यात नताशा विषण्ण आणि चिडखोर बनलेली होती.

'सगळा मूर्खपणा आहे. त्याच्या सगळ्या योजना फुकट जाताहेत. संस्थेचे सगळे सभासद मूर्ख आहेत.' नताशा सारखी म्हणायची. ज्यावर तिचा ठाम विश्वास होता त्याच विषयांबाबत ती असे म्हणायची. आणि आपल्या एकुलत्या एक बाळाचे संगोपन करण्यासाठी ती त्याच्या खोलीत जायची.

तो तीन महिन्यांचा मुलगा तिच्या छातीशी असे. त्याच्या ओठांचा आणि श्वासोच्छ्वास करणाऱ्या नाकपुड्यांचा स्पर्श झाला की तिच्या मनाला कधी नव्हे इतके शांत, तृप्त वाटे.

ती बाळाचे संगोपन करत असतानाच पीएरची गाडी खडखडत प्रवेशद्वाराशी आली. आपल्या मालकिणीला खूष करण्याची कला अवगत असलेली दासी हलक्या पावलांनी लागलीच दाराशी आली तेव्हा तिची मुद्रा उजळलेली होती.

'ते आले का?' झोपी गेलेला बाळ उठू नये म्हणून नताशाने घाईघाईने हळू आवाजात विचारले. नताशाची मुद्रा लालबुंद झाली. तिची पावले आपसूकच हालली. परंतु उडी मारून धाव घेणे अशक्य होते. बाळाने आपले चिमणे डोळे उघडले. जणू त्याला विचारायचे होते–' 'तू आहेस ना इथं!' त्याने आळसावून ओठांची चाळवाचाळव केली.

नताशाने बाळाच्या तोंडातून स्तन सावधपूर्वक काढून घेतला. बाळाला हातावर जोजवून दासीकडे दिला आणि ती त्वरेने दाराकडे धावली. आपण अशा घाईने आणि आनंदाने बाळाला टाकून जात आहोत याची टोचणी लागून की काय ती दाराशी थबकली आणि तिने मागे वळून पाहिले.

ती बाहेरच्या दिवाणखान्यात धावत गेली तेव्हा तिला फरचा झगा घातलेला पीएर स्कार्फ काढताना दिसला. पुढे वेगाने घुसून तिने आपले डोके त्याच्या छातीवर दाबले. मग मागे सरकून ती त्याच्या बर्फ उडालेल्या लालबुंद आनंदी चेहऱ्याकडे पाहात राहिली.

एकाएकी तिला गेल्या पंधरवड्यामधे भोगलेल्या विलक्षण विरहयातनांची आठवण झाली. तशी तिच्या मुद्रेवर उजळणारा आनंद पार लोप पावला. तिच्या कपाळावर आठ्या उमटल्या. ती रागारागाने पीएरला बोल लावू लागली.

'तुम्ही तर अगदी खुशाल आहात...अगदी मजेत राहिला असाल...चैन केली असेल... पण माझं काय? निदान आपल्या मुलाचा तरी विचार करायचा होता...मी मुलाची शुश्रूषा करते आहे. तुमच्यामुळं माझं दूध धाकट्याला बाधलं. पेत्या तर अगदी मरणातून वाचला. आणि तुम्ही तिकडे मौजमजा करीत होता.'

पीएर याआधी येऊ शकत नव्हता. त्यामुळे त्याला अपराधी वाटत नव्हते. नताशा आपल्यावर नाहक भडकली आहे ती थोड्या वेळाने शांत होईल असे त्याला वाटले. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याला स्वतःला आनंद झाला होता. खरे तर त्याला स्मित करायला आवडले असते. परंतु तो विचारही मनात आणण्याचे धाडस त्याला झाले नाही. त्याचा चेहरा दीनवाणा भयभीत झाला. त्याने वादळापुढे शरणागती पतकरली.

'अगदी खरं सांगतो. लवकर येणं शक्य झालं नाही. आता पेत्या कसा आहे?'

'आता बरा आहे. चला दाखवते. तुमच्या मनाला काही वाटत नाही का? तुमच्यावाचून माझी काय अवस्था होते, मी किती दुःखात असते याची तुम्हाला थोडी कल्पना असती तर ...'

'तुझी प्रकृती ठीक आहे ना?'

'चला तिकडे चला.' तिने त्याचा हात काही सोडला नाही. मग ती दोघे आपल्या खोलीत गेली. निकोलाय आपल्या पत्नीसह पीएरच्या भेटीला आला तेव्हा त्या दोघांना पीएर आपल्या बाळाला हातावर जोजवीत असलेला दिसला. एकही दात न आलेल्या त्या बाळाचा चेहरा आनंदाने फुलला होता. वादळ केव्हाच ओसरले होते. मुलाकडे व नवऱ्याकडे प्रेमळ नजरेने पाहणाऱ्या नताशाची मुद्रा उजळली होती.

निकोलाय आपल्या पत्नीबरोबर आत आला तेव्हा पीएरने आपल्या मुलाला खाली न ठेवताच त्याची चुंबने घेऊन त्यांच्या प्रश्नाला उत्तरे दिली. ते बऱ्याच गोष्टी आवडीने बोलू लागले तरी पीएरचे सर्व लक्ष मुलाने वेधून घेतले होते हे स्पष्ट दिसत होते.

'हे मुलाची शुश्रूषा फार चांगल्या तऱ्हेनं करतात. मुलांना तोलण्यासाठीच माझे हात आहेत असं ते म्हणतात.' नताशा म्हणाली.

'खरं आहे ते. पण ह्या मुलासाठी नव्हत.' पीएरने हसत म्हटले आणि मुलाला घाईघाईने घेऊन दासीकडे दिले.

ब्लीक हिल्सच्या वाड्यात प्रत्येक खऱ्याखुऱ्या कुटुंबात असतात त्याप्रमाणेच अगदी स्वतंत्र अशी अनेक जगे एकत्र नांदत होती. ती एकमेकांना उदारवृत्तीने सांभाळून घेत होती. त्या सगळ्यांना एकसंधता प्राप्त झाली होती. त्या वाड्यात घडणारी प्रत्येक घटना त्या जगातील लोकांना सारखीच महत्त्वाची, आनंदाची वा दुःखाची वाटे. परंतु प्रत्येक जगाला आनंद वा दुःख मानण्यासाठी वेगळी अशी खास कारणेही असतात.

पीएरचे आगमन सर्वांच्या दृष्टीने आनंदाची आणि महत्त्वाची घटना होती. बेझुहॉव्ह आल्याने मुलांना आणि त्यांच्या शिक्षिकांना आनंद झाला. कारण पीएरप्रमाणे दुसरा कोणीही त्यांना

कौटुंबिक जीवनात सहभागी करून घेत नसे. क्लव्हिकॉर्डवर एक्सेझ् संगीत तोच वाजवायचा. ह्या संगीतावर सर्व नृत्ये बसवणे शक्य आहे असे तो म्हणायचा. त्याने सर्वांसाठी भेटी आणल्या असतील याबद्दल कोणाला संशय नव्हता.

पंधरा वर्षांच्या, सडसडीत नाजूक बांध्याच्या, पिंगट केसांच्या सुंदर डोळ्यांच्या निकोलिङ्का बॉलकॉन्स्कीची पीएरकाकावर उत्कट भक्ती होती. त्यामुळे काका येणार म्हणून तो आनंदित झाला. निकोलिङ्काच्या मनात पीएरबद्दल खास प्रेम कोणी निर्माण केले नव्हते. त्यांच्या गाठीभेटी क्वचितच होत. काउंटेस मार्याने त्याचे संगोपन केले होते. आपल्याप्रमाणेच त्याने आपल्या नवऱ्यावर प्रेम करावे म्हणून तिने शिकस्त केली होती. पण त्याची पीएरवर अधिक भक्ती होती. निकोलायकाकाप्रमाणे त्याला हुसार अथवा सेंट जॉर्ज घोडदलातील सैनिक व्हायचे नव्हते. त्याला पीएरप्रमाणे विद्वान, हुषार आणि सहृदय व्हायचे होते. पीएरच्या सान्निध्यात त्याची मुद्रा आनंदाने उजळलेली असे. पीएरने उच्चारलेला शब्द न् शब्द तो साठवी. एकटा असताना नाहीतर बरोबर देसॅले असताना पीएरचा प्रत्येक शब्दसमूह आठवीत राही. त्याचा अचूक अर्थ काय असेल याचा विचार करीत राही. पीएरचे गतजीवन, १८१२ पूर्वीचे त्याचे दुःखी जीवन ( त्याबद्दल त्याने थोडेसेच ऐकले होते त्यावरून त्याने अंधुक अद्भुतरम्य कल्पना करून घेतली होती ), त्याचे मॉस्कोमधील साहसीजीवन, त्याचे फ्रेंचांच्या तुरुंगातील दिवस, पीएर ज्याच्याबद्दल बोलत असे तो प्लॅटन कॅरॅटीव्ह, जिच्याबद्दल त्याला खास भक्ती होती त्या नताशावरील पीएरचे प्रेम, सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याला आता आठवत नसलेल्या वडिलांशी असलेली पीएरची दोस्ती ह्या साऱ्या गोष्टींमुळे निकोलिङ्काला पीएर वीरपुरुष आणि संत वाटू लागला.

पीएर आला की तो दैनंदिन व्यवहार अधिक सुकर, सुरळीत करी. त्यामुळे त्याच्या येण्याने प्रौढ माणसांना आनंद झाला. त्याने सर्वांना भेटी आणल्या होत्या. नताशाही आता नेहमीसारखी वागू लागली त्यामुळे वृद्ध बायांनी समाधानाचे सुस्कारे टाकले. निरनिराळ्या प्रकारची माणसे आपल्याबद्दल निरनिराळी दृष्टी बाळगताहेत याची पीएरला जाणीव झाली. त्या सर्वांच्या अपेक्षा लवकरात लवकर पूर्ण करण्यास तो सज्ज झाला.

पीएर अत्यंत विसरभोळा होता. परंतु त्याने आपल्या पत्नीच्या मदतीने यादी करून नेली होती. त्यामुळे त्याने सगळ्या वस्तू आणल्या. सासूने आणि मेहुण्याने सांगितलेल्या वस्तू तो विसरला नाही. त्याने भेटीदाखल मादाम ब्येलॉव्हला पोषाख आणि भाच्यांना खेळणी आणली होती.

थोरल्या काउंटेसने आता साठी ओलांडली होती. तिचे केस आता पार पिकले होते. वाटोळ्या टोपीच्या झालरीने तिचा चेहरा वेढलेला असे. तिच्या चेहऱ्याला सुरकुत्या पडल्या होत्या. तिचा वरचा ओठ काहीसा लोंबत होता आणि तिची दृष्टी मंद झाली होती.

तिचा मुलगा मरण पावला होता, थोड्याच दिवसांत तिचा नवराही मरण पावला होता. हे सर्व एवढ्या वेगाने घडले होते की आपण योगायोगाने विसरून राहिलो आहोत असे तिला

वाटू लागले. आता तिला जीवनात काही ध्येय उरले नव्हते, कशात रस उरला नव्हता. खाणेपिणे, झोपणे, उठणे ह्या क्रिया सुरू होत्या पण तिचे अस्तित्व जगणे ह्या संज्ञेला पात्र नव्हते. तिला आता कसल्या जाणिवाच राहिल्या नव्हत्या. जीवनाकडून तिला आता शांतते-खेरीज काही नको होते. ती शांतता तिला फक्त मरणातच मिळणे शक्य होते. मरण येईपर्यंत तिला जीवन व्यतीत करणे म्हणजे आपल्या शक्ती उपयोगात आणणे भाग होते.

अगदी लहान मुले आणि अत्यंत वृद्ध माणसे यांत आढळून येणारी गोष्ट तिच्यामध्ये अतिशय मोठ्या प्रमाणात दिसत होती. तिच्या अस्तित्वाला दृश्य असे उद्दिष्टच नव्हते. आपल्या विविध मनःशक्तींचा आणि स्वाभाविक प्रवृत्तींचा उपयोग करण्याची आवश्यकता तेवढी तिच्यामधे दिसत होती. तिला जठर, मेंदू, स्नायू, मज्जातंतू आणि प्लीहा ही होती म्हणूनच खाणेपिणे, झोपणे, बोलणे, रडणे, काम करणे, रागावणे इ. क्रिया करणे भाग पडत होते. त्यांमागे कुठल्या बाह्य प्रेरणा नव्हत्या. आपली फुफ्फुसे, आपली जीभ यांचा उपयोग करण्याची तिला आवश्यकता होती म्हणूनच ती बोलत होती. अश्रूंना वाट देऊन शरीराला विश्रांती मिळ-ण्याची आवश्यकता होती म्हणून ती मुलासारखी रडत होती. पूर्ण जोमात जीवन जगणाऱ्यांना जे प्रेरक कारण असते ते तिच्या हिशेबी केवळ निमित्त होते.

सकाळच्या वेळी–खास करून रात्री–तिने अतिशय जडान्न घेतले असले तर ती कोणावर-तरी राग काढू पाही. मादाम ब्येलॉव्हच्या बहिरेपणाचे निमित्त तिला पुरेसे होई.

खोलीच्या दुसऱ्या टोकाला राहून ती तिला काहीतरी हळू आवाजात सांगण्यास सुरुवात करी.

' मला वाटते आज हवेत उष्मा वाढला आहे.' ती कुजबुजे. मग मादाम ब्येलॉव्ह ' खात्रीने ते आलेले असणार ' असे उत्तरली की थोरली काउंटेस रागारागाने पुटपुटे. ' बाई ! बाई ! किती मूर्ख आणि बहिरी आहे ही ! '

तिला राग काढायला जे दुसरे निमित्त पुरेसे होई ते म्हणजे तपकीर होय. तिला ती कधी कोरडी वाटे, कधी फार दमट वाटे, कधी वाईट तऱ्हेने कुटलेली वाटे. रागाच्या अशा उद्रेकां-नंतर तिचा चेहरा पिवळट होई. मादाम ब्येलॉव्ह पुन्हा कधी बहिरी होईल, काउंटेसची तपकीर पुन्हा केव्हा दमट होईल आणि तिचा चेहरा कोणत्या वेळी पिवळट बनेल ह्या गोष्टी दासी अचूक लक्षणांवरून ओळखू लागल्या.

तिला आपल्या प्लीहेचा उपयोग करावा लागे, त्याचप्रमाणे इतर शारीरिक आणि मानसिक शक्तीही उपयोगात आणाव्या लागत. पेशन्सच्या डावाचे निमित्त करून ती विचारशक्ती उपयोगात आणू पाही. जेव्हा तिला रडावेसे वाटे तेव्हा तिच्या रडण्याचा विषय मरण पावलेला थोरला काउंट असे. तिला भावनांची खळबळ हवी असली की ती निकोलायच्या प्रकृतीची काळजी करू लागे. जेव्हा तिला आकसाने काही बोलायचे असे तेव्हा तिला काउंट मार्याचे निमित्त पुरेसे होई. तिला आपल्या बोलण्याच्या इंद्रियांना जेव्हा व्यायामाची गरज लागे– अंधाऱ्या खोलीत भोजनोत्तर विश्रांती घेऊन झाल्यानंतर बहुधा सात वाजता अशी गरज लागे

तेव्हा ती त्याच त्याच आख्यायिका त्याच त्याच लोकांना पुन्हा पुन्हा सांगण्याचे निमित्त शोधीत राही.

थोरल्या काउंटेसची स्थिती घरातील सार्‍यांना कळून चुकली होती. मात्र कुणी तीबद्दल काही बोलत नव्हते. तिच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रत्येकजण शिकस्त करू लागे. क्वचित प्रसंगी निकोलाय, पीएर, नताशा आणि काउंटेस मार्या अस्फुट खिन्न स्मित करून एक-मेकांकडे पाहात. त्यावेळी सर्वांना तिच्या स्थितीची जाणीव असल्याचे दिसून येई.

पण त्यांच्या नजरा आणखीही काही सांगत. 'तिनं आपल्या जीवनातील कर्तव्य केव्हाच बजावलं आहे. आता आपण पाहात आहोत ते तिचं संपूर्ण दर्शन नव्हे. आम्हा सर्वांना हाच शेवट गाठणं भाग आहे. एकाकाळी आमच्यासारखंच जीवन जगणार्‍या आणि अतिशय प्रिय असणार्‍या ह्या गरीब जिवासाठी आम्हाला मनावर ताबा ठेवायला, तिला शरण जायला आनंद वाटत आहे. प्रत्येकाला मरण अटळ आहे हे विसरता कामा नये.'

*

पीएर पत्नीसह दिवाणखान्यात आला त्यावेळी काउंटेसच्या मनाला नेहमीप्रमाणे पेशन्सच्या डावाची जरुरी वाटू लागली होती. बर्‍याच दिवसांनी पीएर किंवा तिचा मुलगा भेटीला आला म्हणजे ती जे शब्द उच्चारी तेच शब्द आता तिने केवळ सवयीपोटी उच्चारले. 'किती उशिरानं येतो आहेस. बाळा, किती वेळ तुझी वाट पाहात आहोत. परमेश्वराची कृपा म्हणून तू आलास.' भेटी मिळाल्यानंतर तिने नेहमीची ठरलेली वाक्ये उच्चारली. 'बाळा, ह्या भेटी काही मोलाच्या नाहीत. म्हातारीची आठवण ठेवलीस म्हणून आभारी आहे मी.' त्यावेळी पीएर आला हे तिला बरे वाटत नसल्याचे स्पष्ट दिसत होते. कारण तिच्या पत्त्याच्या डावात व्यत्यय आला होता. तिने पेशन्सचा डाव संपवला आणि त्याने आणलेल्या भेटी पाहिल्या. त्या भेटींमध्ये सुरेख कलाकुसर केलेली पत्त्यांची पेटी होती, सेव्र येथे घडवलेला, धनगर स्त्रीचे चित्र असलेला आणि झाकण असलेला पेला त्याने आणला होता. तसेच तपकीर ठेवण्यासाठी सोन्याची पेटी आणली होती. त्या पेटीवर काउंटचे चित्र खोदण्यात आले होते. अशा पेटीची इच्छा काउंटेस कैक दिवस बाळगून होती. आता ती शोक करण्याच्या मनःस्थितीत नव्हती म्हणून तिने काहीशा अलिप्ततेनेच काउंटच्या तसबिरीकडे पाहिले आणि मग ती पत्त्यांची पेटी जास्त लक्षपूर्वक पाहू लागली.

'बाळ, किती सुखात ठेवतो आहेस तू मला. कसे आभार मानू तुझे?' ती नेहमीसारखी बोलू लागली. 'तू सुखरूप परत आलास ही सर्वांत चांगली गोष्ट झाली बघ. तू तुझ्या बायकोची चांगली कानउघाडणी कर. तू नव्हतास तर तिचं डोकं अगदी फिरून गेलं होतं तिला काही सुचत नव्हतं, काही रुचत नव्हतं.' ती नेहमीसारखी बोलत राहिली. मग ती ॲना तिमॉफ्येव्नाला म्हणाली, 'ॲना, माझ्या मुलानं किती चांगली पेटी आणली आहे बघ.' मादाम

ब्येलॉव्हने भेटीचे कौतुक केले. पोषाखाचे कापड पाहून ती भारावून गेली.

पीएर, नताशा, निकोलाय, काउंटेस मार्या आणि डेनिसॉव्ह यांना खूप खूप बोलायचे होते पण थोरल्या काउंटेससमोर बोलता येत नव्हते. त्यांना तिच्यापासून काही लपवून ठेवायचे होते असे नव्हे. पण तिचा बऱ्याच गोष्टींशी संबंध तुटला होता त्यामुळे ते जर मोकळेपणाने तिच्या-समोर बोलू लागले असते तर तिने त्यांना वाटेल ते प्रश्न विचारले असते आणि त्यांना पूर्वी दिलेली उत्तरे पुन्हा पुन्हा द्यावी लागली असती. अमका मरण पावला, अमक्याचे लग्न झाले असल्या गोष्टी तिच्या लक्षात राहात नसल्याने तिला पुन्हा पुन्हा सांगाव्या लागल्या असत्या. तरीही ते सगळे नेहमीप्रमाणे चहा घेत दिवाणखान्यात बसले. पीएर काउंटेसच्या क्षुल्लक प्रश्नांना उत्तरे देत होता. खरे तर काउंटेसलाही त्या प्रश्नात गोडी नव्हती. प्रिन्स व्हॅसिली म्हातारा दिसू लागला, काउंटेस मार्या अलेक्स्येव्नाने विचारपूस केली आहे इ० इ० पीएर सांगत होता.

अशा संभाषणात कुणाला रस नव्हता तरी ते चहापान संपेपर्यंत चालू होते. सॅमोवार असलेल्या टेबलाभोवती कुटुंबातील प्रौढ माणसे जमली. सोन्या चहाची व्यवस्था पाहात होती. मुलांचा आणि त्यांच्या शिक्षिकांचा चहा आधीच झाला होता. चहाच्या वेळी सर्वजण आपापल्या जागी बसले. निकोलाय जरा दूर शेगडीजवळ छोट्या टेबलाशी बसला. तिथे त्याला चहा देण्यात आला. पूर्वीच्या मिल्का कुत्रीपासून झालेली एक भुऱ्या तोंडाची कुत्री त्याच्याजवळच्या खुर्चीत बसली. काउंटेस मार्याच्या शेजारी डेनिसॉव्ह बसला होता. त्याने जनरलचा कोट अंगात घातला होता. त्याची सर्व बटणे लावलेली नव्हती. त्याच्या कुरळ्या केसांतून, मिशांतून, कल्ल्यांतून पांढरे केस मधून मधून डोकावत होते. थोरली काउंटेस आणि आपली पत्नी यांमधे पीएर बसला होता. म्हातारीला आवडेल आणि कळेल असे काही ना काही तो सांगू लागला. एकेकाळी काउंटेसच्या संगतीत असलेल्या आणि तिला खरीखुरी सोबत केलेल्या पण आता काउंटेसप्रमाणेच उरलेले दिवस पूर्वी पेरलेल्या धान्याच्या कणसांची केसरे वेचण्यात घालवीत असलेल्या व्यक्तींबद्दल आणि किरकोळ सामाजिक घटनांबद्दल तो बोलला. परंतु हे समकालीन लोकांचे जग काय ते खरे विचार करण्याजोगे जग आहे असे थोरल्या काउंटेसला वाटत होते. नताशाने पीएरचा उत्साह पाहिला. त्याचा प्रवास चांगला झाला असला पाहिजे, त्याबद्दल त्याला बोलायचे आहे परंतु काउंटेससमोर त्याला मोकळेपणाने बोलता येत नाही हे नताशाने ओळखले.

डेनिसॉव्ह त्या कुटुंबातील नसल्याने त्याला पीएरचे सावध मौन कळले नाही. प्रचलित घटनांबाबत तो नाराज असल्याने पीटर्सबर्गला काय चालले आहे हे जाणून घेण्याची त्याला तीव्र उत्सुकता होती. म्हणून त्याने विचारले, ' गॉस्नर आणि मादाम नॅतारिनॉव्ह–या खुळाचं काय झालं ? '

' चाललंच आहे पूर्वीहून वाईट तऱ्हेनं. बायबल सोसायटी म्हणजेच सगळं सरकार अशी अवस्था आहे. ' पीएर उत्तरला.

'काय म्हणालास बाळ?' थोरल्या काउंटेसने विचारले. तिचा चहा आला होता. भोजनोत्तर थोडे चिडण्यासाठी ती काहीतरी निमित्त शोधीत होती. 'तू सरकारबद्दल काही बोललास काय? मला काही कळलं नाही.'

आईच्या भाषेतल्या गोष्टी कशा सांगायच्या ते निकोलायला माहीत होते. तो म्हणाला, 'आई, प्रिन्स अलेक्झांडर निकोलीविच गॉलिट्सिननं सोसायटी स्थापन केली आहे ती तुला ठाऊक असेल. त्यामुळं त्याचं वजन आहे असं म्हणतात.'

त्यावर पीएर गैरसावधपणे बोलून गेला, 'अराक्चीव्ह आणि गॉलिट्सीन हेच प्रत्यक्षात सरकार आहे आताशा. आणि हे सरकार अजब आहे. त्याला प्रत्येक ठिकाणी कटकारस्थान दिसतं. प्रत्येक गोष्टीला ते घाबरतं.'

'काय? प्रिन्स अलेक्झांडर निकोलीविचमध्येदेखील तुम्हाला दोष दिसतात? तो अत्यंत प्रशंसनीय कामगिरी करीत आहे. मी पूर्वी मार्या अन्तोनॉव्हनाच्या घरी त्याला भेटायची.' थोरली काउंटेस दुखावलेल्या सुरात म्हणाली. कुणीच काही बोलले नाही तेव्हा ती आणखी दुखावलेल्या सुरात म्हणाली, 'आताशा लोक प्रत्येकावर टीका करताहेत. गॉस्पेल सोसायटीत वाईट काय आहे?' असे बोलून ती उठली (तेव्हा सगळेजण उठले) आणि रूक्ष करड्या मुद्रेने ती संथपणे जवळच्या बैठकीच्या खोलीतील आपल्या टेबलाकडे वळली.

काही काळ उदास शांतता पसरली. मग शेजारच्या खोलीतून मुलांचे बोलणे हसणे ऐकू आले. मुलांमधे कसलीतरी गंमत चालली होती यात संशय नव्हता.

'पुरा झाला! पुरा झाला!' धाकट्या नताशाने आनंदाने मारलेली आरोळी सगळ्या आवाजांना बुडवून ऐकू आली.

पीएरने काउंटेस मार्या आणि निकोलाय यांच्याकडे पाहिले आणि प्रसन्न स्मित करीत म्हटले, 'किती गोड संगीत!'

'ॲना मॅकरॉव्नानं पायमोजे विणून पुरे केले.' काउंटेस मार्या म्हणाली.

'अरे वा! मग पाहायला जायला पाहिजे.' पीएर चट्दिशी उठून म्हणाला.

'मी तिकडे येणार नाही. ते मोजे मला अनपेक्षित भेट म्हणून मिळायचे आहेत.' निकोलाय म्हणाला.

पीएर मुलांत मिसळला तेव्हा त्यांच्या आरोळ्या आणि हसणे कितीतरी पटींनी वाढले. पीएर ओरडला, 'ॲना मॅकरॉव्ना, ह्या ठिकाणी खोलीच्या मध्यभागी राहायचं. मी इषारा करीन. एक...दोन...आता सुरू...एक...दोन...' आता पूर्ण शांतता पसरली तशी तो म्हणला, 'तीन.' तेव्हा उत्साही मुलांनी जोराने आरोळी दिली. 'दोन...दोन...'

दोन म्हणजे दोन मोजे असे त्यांना म्हणायचे होते. ॲना मॅकरॉव्ना आपल्या सुयांवर एकाचवेळी दोन मोजे विणीत असे. ते गुपित तिचे तिलाच ठाऊक असे. जोडी विणून झाली म्हणजे मुलांच्या समोर ती नेहमी एका मोज्यातून आणखी एक मोजा मोठ्या गंभीरपणे बाहेर ओढून काढायची.

ह्यानंतर थोड्याच वेळाने झोपी जाण्याआधी प्रणाम करायला मुले आली. त्यांनी सर्वांची चुंबने घेतली, शिक्षकांचा निरोप घेऊन ती सर्व बाहेर पडली.

देसॅले फक्त आपल्या मुलाबरोबर राहिला. त्याने हलकेच त्याला ' खाली चल ' असे म्हटले तशी निकोलिङ्काने त्याला हळू आवाजात उत्तर दिले, 'मी आतेकडे इथं राहू द्यायची परवानगी मागणार आहे. ' आत्याकडे जाऊन निकोलिङ्काने विचारले, ' आत्या, मी इथं राहू का ? ' त्याच्या मुद्रेवर विनवणी, खळबळ आणि उत्साह ओसंडत होता.

त्याच्याकडे पाहून काउंटेस मार्या पीएरकडे वळून म्हणाली, ' तुम्ही इथं असला म्हणजे त्याला इथून घालवणे महाकर्म आहे.'

' मिस्टर देसॅले, मी त्याला थेट तुमच्याकडे आणून पोचवीन.' पीएरने त्या स्विस शिक्षकाला निरोप दिला. त्याने निकोलिङ्काकडे पाहून स्मित केले. मग काउंटेस मार्याकडे वळून म्हटले, ' आमची अजून भेटच झाली नाही. मारी, हा अगदी थेट त्याच्यासारखाच होतो आहे.'

' म्हणजे माझ्या वडिलांसारखा ? ' लाजेने लाल झालेल्या त्या मुलाने पीएरकडे आनंदाने ओसंडणारे चमकदार डोळे वळवीत विचारले.

पीएरने होकारार्थी मान हालवली आणि आता त्याने मुलांमुळे खंडित झालेले बोलणे सुरू केले. काउंटेस मार्या कॅन्व्हासचे भरतकाम घेऊन बसली होती. नताशा आपल्या नवऱ्यावर नजर खिळवून बसली होती. सोन्या थकली होती. निकोलाय व डेनिसॉव्ह उठून पाइप मागून घेऊन ओढू लागले. मग सोन्याने दिलेले चहाचे कप घेऊन पीएरला प्रश्न विचारू लागले.

कुरळ्या केसांचा, नाजूक बांध्याचा आणि चमकत्या डोळयांचा मुलगा कोपऱ्यात बसून होता. त्याच्याकडे कुणाचे लक्ष नव्हते.

बहुसंख्य लोकांना स्वतःच्या देशाच्या राजकारणातील ज्या गोष्टींची प्रामुख्याने आवड असते असा विषय— सरकारातील उच्च गोटाबद्दल त्यावेळी चालू असलेले प्रवाद— हा त्यांच्या संभाषणाचा विषय होता. डेनिसॉव्ह नोकरीत निराश झाल्याने सरकारवर नाराज होता. पीटर्झबर्ग-मधे जे चालले होते ते सारे त्याच्या मते मूर्खपणाचे होते. तो मूर्खपणा ऐकताना त्याला खूप आनंद होत होता. तो पीएरच्या शब्दांवर कडक ताशेरे ओढत होता.

' पूर्वीच्या काळात प्रतिष्ठा मिळवायची असेल तर जर्मन असणं आवश्यक होतं. आता तुम्ही तॅतारिनॉव्ह स्त्रीबरोबर आणि मादाम क्रुडनरबरोबर नाचायला हवं... छे छे ! मला वाटतं बोनापार्ट पुन्हा एकदा मोकळा सुटला पाहिजे. तो ह्या सगळ्या मूर्खांची टाळकी जाग्यावर आणील. सेम्यानॉव्स्की रेजिमेंट त्या श्वार्ट्झच्या हवाली करणारे शुद्धीवर आहेत का नाहीत ? ' तो ओरडत होता.

डेनिसॉव्हप्रमाणे प्रत्येक गोष्ट चुकीची ठरवण्याकडे निकोलायचा कल नव्हता. तरीही त्याला

सरकारवर टीका करण्यात भूषण वाटू लागले. 'अ'ची नेमणूक अमुक विभागाचा मंत्री म्हणून झाली, 'ब'ला तमुक प्रांताचा गव्हर्नर नेमण्यात आले, झारने अमुक अमुक उद्गार काढले आणि कुण्या मंत्र्याने अमुक अमुक म्हटले ह्या सर्व गोष्टी त्याला आता अतिशय महत्त्वाच्या वाटू लागल्या. ह्या विषयात आपण रस घेतला पाहिजे आणि त्यासंबंधी पीएरला प्रश्न विचारले पाहिजेत असे त्याला तीव्रतेने वाटू लागले. निकोलाय आणि डेनिसॉव्ह प्रश्न विचारीत राहिल्याने त्यांच्या संभाषणाला सरकारातील उच्च गोटासंबंधी चाललेल्या अफवांचे स्वरूप प्राप्त झाले.

नताशा नवऱ्याचा प्रत्येक विचार, प्रत्येक भाव ओळखी. आपल्या नवऱ्याला मघापासून संभाषणाचा ओघ दुसऱ्या दिशेला न्यायचा आहे हे तिला समजले. ज्या कल्पनेबद्दल चर्चा करण्यासाठी तो आपला मित्र प्रिन्स फ्यॉदॉर याच्याकडे पीटर्झबर्गला गेला होता, त्या कल्पनेसंबंधी त्याला आपले मन मोकळे करायचे आहे पण त्याला त्या दिशेला संभाषण वळवता येत नाही हे तिला समजले. एक प्रश्न विचारून ती त्याच्या मदतीला धावली.

तिने विचारले, 'प्रिन्स फ्यॉदॉरबरोबर झालेल्या चर्चेत शेवटी काय निष्पन्न झालं?'

'कसली चर्चा?' निकोलायने विचारले.

पीएरने आजूबाजूस पाहात म्हटले, 'त्याच त्याच गोष्टींची उजळणी, दुसरं काय? परिस्थिती इतकी बिघडलेली आहे की ती सहन करणं अशक्य आहे असं प्रत्येकाला वाटतं आहे. आपली शिकस्त करून परिस्थितीला तोंड देणं प्रत्येक प्रामाणिक व्यक्तीचं कर्तव्य आहे.'

'पण प्रामाणिक व्यक्ती तरी काय करू शकणार?' निकोलायने कपाळाला आठ्या घालीत विचारले, 'तिला काय करता येण्याजोगं आहे?'

'प्रत्येक व्यक्तीनं...'

'आपण आतल्या खोलीत जाऊ.' निकोलाय म्हणाला.

कुणीतरी आपले तान्हे मूल आपणाकडे आणून देईल म्हणून मघापासून वाट पाहात असलेल्या नताशाला दाईची हाक ऐकू आली. तशी ती बाळाच्या खोलीकडे धावली. तिच्याबरोबर काउंटेस मार्याही निघाली. पुरुषमंडळी आतल्या खोलीत गेली. निकोलिङ्का बोलकॉन्स्की निकोलायची नजर चुकवून आत शिरला आणि अंधारात खिडकीजवळ टेबलाशी बसला.

'काय करावं असं तुमचं मत आहे?' डेनिसॉव्हने विचारले.

'काहीतरी नेहमीच्या अव्यवहार्य योजना असतील', निकोलाय म्हणाला.

पीएर खोलीत येरझारा घालीत, मधून मधून भरभर पुटपुटत, हातवारे करीत बोलू लागला, 'पीटर्झबर्गमधे एकूण परिस्थिती अशी आहे. झारचं कशावर नियंत्रण नाही. तो आता ह्या गूढवादात पुरता अडकला आहे; त्याला आता केवळ शांतता हवी आहे. ज्यांना श्रद्धा नाही, ज्यांना सद्सद्विवेकबुद्धी नाही, जे सर्व गोष्टींचा नाश करीत आहेत अशा मॅग्निट्स्की, अराक्चीव्हसारख्या लोकांपासूनच काय ती त्याला शांतता मिळेल.' निकोलायकडे वळून तो म्हणाला, 'तुम्ही आपल्या मालमत्तेची नीट काळजी घेतली नाही तर कारभारी

जितका निर्दय असेल तेवढे तुमचे उद्देश साध्य होतील हे तुम्हाला मान्य करावे लागेल.'

'तुमच्या ह्या म्हणण्याचा रोख कशावर आहे?' निकोलायने विचारले.

'आता लवकरच सर्वनाश ओढवणार आहे. न्यायालयात लाचलुचपत बोकाळली आहे. सैन्यात शिक्षा आणि कवायत यांखेरीज काही चालू नाही. हद्दपार केलेल्यांचा छळ होत आहे. नवे विचार दडपले जात आहेत. नव्या आणि सामान्य गोष्टी चिरडल्या जात आहेत. अशा प्रकारची परिस्थिती टिकणार नाही हे सर्वांना कळत आहे. ताण इतका असह्य होत आहे की परिस्थिती खात्रीनं चिघळणार आहे. मी पीटर्सबर्गमधे त्यांना एक गोष्ट ऐकवली.' पीएर म्हणाला.

'त्यांना म्हणजे कोणाला?' डेनिसॉव्हने विचारले.

अर्थपूर्ण दृष्टी टाकीत पीएर म्हणाला, 'कोणाला ते तुम्हाला माहीत असेल. प्रिन्स फ्यॉदोरला आणि तिथे असलेल्या इतर सर्वांना....शैक्षणिक आणि लोककल्याणाच्या कार्यात उत्साह असणं तसं चांगलंच. त्यांचा उद्देश इत्यादी ठीक आहेत. पण सद्यःस्थितीत दुसऱ्याच कसल्यातरी गोष्टींची जरुरी आहे.'

त्याच क्षणी निकोलायचे निकोलिङ्काकडे लक्ष गेले. त्याचा चेहरा पडला. तो मुलाजवळ जाऊन म्हणाला, 'तू इथं का आलास?'

'असू दे त्याला.' पीएरने निकोलायचा हात धरीत म्हटले आणि बोलणे सुरू केले. 'तेवढंच पुरेसं नाही हे मी त्यांना सांगितलं. आणखी काहीतरी हवं आहे. ताणलेली दोरी कोणत्याही क्षणाला तुटेल याची तुम्ही वाट पाहात असताना आणि प्रत्येकजण अटळ अशा क्रांतीची प्रतीक्षा करीत असताना सार्वत्रिक संकटाला तोंड देण्यासाठी शक्य तेवढ्या सर्वांनी एक झालं पाहिजे. राष्ट्रातील समर्थ आणि तरुण वर्गाला कसली तरी भुरळ पडून तो ऱ्हास पावत आहे. कोणाला बाईचा लोभ आहे, कोणी मानसन्मानामागे आहे, कोणी भपका–पैसा यामागं आहे—सगळेजण चुकीच्या मार्गानं जात आहेत. तुझ्या-माझ्यासारखी स्वतंत्र आणि प्रामाणिक माणसं आता उरलेली नाहीत. आपल्या समाजाचे कार्यक्षेत्र विस्तृत करा. आता निष्ठा हा एकच शब्द नको. त्याच्या जोडीला स्वातंत्र्य आणि कृती हे शब्द असू द्या.'

निकोलायने मुलाला तिथेच सोडले आणि रागारागाने तो खुर्ची ओढून बसला. पीएरचे बोलणे ऐकताना नाराजी दाखवण्यासाठी खोकू लागला. त्याच्या कपाळावर आठ्यांचे जाळे पसरू लागले.

'कृती करायची खरी? पण कृतीमागं उद्देश कोणता असला पाहिजे? सरकारबद्दल तुमचा दृष्टीकोण काय?'

'सरकारला आपण पाठिंबा द्यायचा. सरकारनं परवानगी दिली तर मंडळ गुप्त राहाणार नाही. सरकारशी आमचं काही वैर नाही. आम्ही खरं तर स्थितिप्रिय आहोत. आमचं मंडळ अगदी खऱ्या अर्थानं सभ्य गृहस्थाचं मंडळ आहे. आम्ही एक होत आहोत ते सर्वांच्या कल्याणासाठी, सर्वांच्या सुरक्षिततेसाठी. आमच्या मुलांची कत्तल करण्यासाठी पुगचॉव्ह येऊ

नये. म्हणून, अराक्चीव्हने मला सैनिकी वसाहतीत नेऊ नये म्हणून विरोध करण्यासाठी आम्ही एक होत आहोत.'

'ते ठीक आहे. पण तुमचं मंडळ गुप्त मंडळ आहे. म्हणूनच ते वैर आणि उपद्व्याप करणारं मंडळ आहे. त्याच्याकडून वाईट घडण्याची शक्यता आहे.'

'कशावरून ? युरोप वाचवणाऱ्या टुजेन्डबन्ड (सद्गुणी लोकांची संघटना) नं काय वाईट केलं ? टुजेन्डबन्ड म्हणजे प्रेम आणि परस्पर मदत होय. क्रॉसवर येशू खिस्तानं हीच शिकवण दिली होती...'

संभाषण चालू असतानाच नताशा खोलीत आली. तिने आपल्या नवऱ्याकडे प्रसन्न मुद्रेने पाहिले. त्याच्या बोलण्याने तिला आनंद झाला होता असे नव्हे. खरे तर त्याच्या संभाषणात तिला रस वाटत नसे. त्याचे सगळेच बोलणे इतके साधे होते आणि तिला कित्येक दिवसांपासून माहीत होते. पीएरच्या अंतःकरणातून सारे बाहेर पडत आहे याची तिला पुरेपूर कल्पना होती. त्याची उत्सुक उत्साही मुद्रा पाहून ती आनंदित झाली होती.

बैठी कॉलर असलेला नाजूक मानेचा मुलगा बाजूस बसला होता. सगळे त्याला विसरून गेले होते. पण तो पीएरकडे अधिक आनंदाने पाहत होता. पीएरच्या प्रत्येक शब्दासरशी त्याचे अंतःकरण उजळत होते. त्याच्या बोटांची अस्वस्थपणे चाळवाचाळव होत होती. त्याने काकाच्या टेबलावरील सील करण्याचे मेण आणि लेखणी घेतली आणि नकळत त्यांचे तुकडे केले.

'तुला जे वाटतं तेवढंच सर्व नव्हे. पण जर्मन टुजेन्डबन्डचं स्वरूप अशा प्रकारचं होतं. तसलेच एक सद्गुणी लोकांचं मंडळ स्थापावं अशी माझी सूचना होती.'

'मित्रा, कबाब खाणाऱ्यांना तुझी ही सूचना ठीक आहे. 'टुजेन्डबन्ड !' मला काही ती कळत नाही आणि उच्चारताही येत नाही.' डेनिसॉव्ह मोठ्याने ठामपणे म्हणाला. 'सगळं कुजलं सडलं आहे यात वाद नाही. फक्त तुझी ती 'टुजेन्डबन्ड'ची कल्पना काही मला कळत नाही. जर माणसं असंतुष्ट असतील तर बंडच हवं. मी तुमचं ऐकेन. मला तुमच्यातीलच समजा.'

तशी पीएरने स्मित केले. नताशा हसायला लागली. परंतु निकोलायने आणखी आठ्या घातल्या आणि तो वाद घालू लागला 'अशानं क्रांतीची अपेक्षा करू नका. तुम्ही ज्या संकटांबद्दल बोलत आहात ती संकटं अस्तित्वात नाहीत, असलीच तर ती तुमच्या कल्पनेत आहेत.'

पीएरने आपले म्हणणे सोडले नाही. त्याची बुद्धिमत्ता अधिक तीव्र असल्याने आणि ती अधिक प्रत्युत्पन्नमती असल्याने निकोलाय लवकरच निरुत्तर झाला. त्यामुळे तो आणखीन चिडला. कारण त्याला विचारशक्तीमुळे नव्हे तर त्याहून प्रबळ अशा अनामिक शक्तीमुळे आपला दृष्टिकोण निर्विवादपणे बरोबर आहे असे मनातल्या मनात वाटू लागले होते.

'मी सांगू ?' निकोलाय असे म्हणत उठला. अस्वस्थ बोटांनी कोपऱ्यात पाइप ठेवीत, मग दूर भिरकावून देऊन तो म्हणाला, 'मला तुला पटवून देता यायचं नाही. सर्व सडून

कुजून गेलं आहे आणि क्रांती होणार आहे असं तू म्हणतोस. मला तसं वाटत नाही. एकनिष्ठेची शपथ घेण्याची अट तुम्ही घातलेली आहे. त्याबद्दल माझं म्हणणं असं–तू माझा जिवाभावाचा मित्र आहेस हे सांगायला नको. तुम्ही गुप्त संस्था स्थापन करता, सरकारच्या विरुद्ध चळवळ करता. काहीका असेना सरकारचं हुकूम पाळणं मी माझं कर्तव्य मानतो. सैन्याची तुकडी घेऊन तुमच्यावर चाल करून तुम्हांला कापून काढण्याचा आदेश जर अराक्चीव्हनं दिला तर मी क्षणभरही कां-कू करणार नाही. मी हुकूम अमलात आणीन. अशा वेळी तुला काय वाटेल ? विचार कर.'

त्यानंतर चमत्कारिक स्तब्धता पसरली. मग प्रथम नताशा बोलली. तिने आपल्या नवऱ्याची बाजू घेऊन भावावर हल्ला चढवला. तिला काही नीटपणे बचाव करता आला नाही तरीही तिचा उद्देश साध्य झाला. पुन्हा संभाषण सुरू झाले. आताच्या संभाषणात निकोलायची मघाची कडवटपणाची व वैराची भावना राहिली नाही.

भोजन घेण्यासाठी ते आत जायला उठले तेव्हा निकोलिङ्का बोलकॉन्स्की पीएरजवळ गेला. त्याचा चेहरा फिकट होता परंतु त्याचे डोळे तेजस्वी होते.

'पीएरकाका, मला सांगा...पपा असते तर...त्यांनी तुमची बाजू घेतली असती का ?' त्याने विचारले.

संभाषणाच्या काळात ह्या मुलाच्या मनात भावनांचा आणि विचारांचा गुंतागुंतीचा, जोरदार आणि स्वतंत्र असा प्रवाह चालू झाला आहे ह्याची पीएरला क्षणार्धात कल्पना आली. त्याला आपले सर्व बोलणे आठवले. त्यावेळी हा मुलगा हजर होता ह्या विचाराने तो अस्वस्थ झाला. खरे तर त्याच्याकडे काही उत्तर नव्हते.

'मला वाटतं त्यांनी माझी बाजू घेतली असती.' नाखुषीने उत्तर देऊन तो खोलीच्या बाहेर पडला.

त्या मुलाने खाली पाहिले तेव्हा कुठे त्याला मघापासून आपण टेबलावर काय गोंधळ माजवून ठेवीत होतो याची कल्पना आली. निकोलायजवळ जाऊन सील करण्याचे मेण आणि लेखण्या यांचे तुकडे दाखवत तो म्हणाला, 'काका, मला क्षमा करा. मी मुद्दाम नाही केलं.'

निकोलाय भडकून म्हणाला, 'फार छान. फार छान उद्योग केलास.' बोलता बोलता त्याने ते तुकडे टेबलाखाली टाकले, आपला राग आवरण्याचा तो प्रयत्न करीत असल्याचे स्पष्ट दिसत होते. निकोलिङ्काकडे पाठ फिरवीत तो म्हणाला, 'खरं तर तू इथं मुळीच यायला नको होतंस.'

जेवणाच्या वेळी राजकारण आणि उच्चभ्रू वर्ग यांवर टीका झाली नाही. मंडळी १८१२ च्या आठवणी काढू लागली. निकोलायला अगदी हवाहवासा विषय सुरू झाला. डेनिसॉव्हने

बोलण्याचा आरंभ केला. मनमिळाऊ पीएरच्या संगतीत लोकांचा वेळ आनंदात गेला. कुटुंबातील व्यक्तींनी प्रसन्न वृत्तीने एकमेकांचा निरोप घेतला. निकोलायने बैठकीच्या खोलीत जाऊन कपडे बदलले. वाट बघत बसलेल्या कारभाऱ्याला सूचना केल्या. मग ड्रेसिंग गाउन घालून तो झोपण्याच्या खोलीत गेला. त्या वेळी त्याची पत्नी टेबलाशी बसून काही तरी लिहीत होती.

तो तिला म्हणाला, ' आज मी फार वाईट वागलो. तू बैठकीच्या खोलीत नव्हतीस. पीएर आणि मी वाद घालीत होतो. मला माझा राग आवरता आला नाही. पीएर तर अजून मूलच आहे. नताशाचा त्याला धाक नसेल तर तो काय करील सांगता येणार नाही. तो पीटर्झबर्गला कशासाठी गेला असेल याचा तुला अंदाज करता येईल का ? त्या ठिकाणी त्यांनी एक संघटना...'

' ठाऊक आहे मला. नताशा बोलली होती. ' काउंटेस मार्या म्हणाली.

' आपलं कर्तव्य आणि शपथ घेतलेली निष्ठा यांना अग्रक्रम दिला पाहिजे असं मी सांगितलं तेव्हा तो वाद घालू लागला. तो काय बोलला देव जाणे. तू तिथं नव्हतीस म्हणून मला हळहळ वाटली. तू काय सांगितलं असतंस ? '

' माझ्या मते तुमचं म्हणणं बरोबर आहे. मी नताशालाही हेच सांगितलं. प्रत्येकजण दुःखी आहे. प्रत्येकाला वाईट वागणूक मिळते आहे, प्रत्येकजण भ्रष्ट होत आहे आणि आपल्या शेजाऱ्यांना मदत करणं आपलं कर्तव्य आहे हे पीएरचं म्हणणं चूक नाही. स्वतः परमेश्वरानं नेमून दिलेली त्याहून जवळची कौटुंबिक कर्तव्यं आहेत आणि आम्ही आमच्या-साठी धोका पतकरला तरी आमच्या मुलांसाठी आम्ही तसं करू शकणार नाही हे पीएरच्या लक्षात येत नाही. '

' अगदी हेच मी त्याला सांगितलं. ' आपण अगदी तसेच म्हटले अशी कल्पना करून घेऊन निकोलाय म्हणाला. तो पुढे म्हणाला, ' नजर चुकवून निकोलिङ्का तिथे आला होता. त्याच्यासमोर त्यांनी मला शेजारधर्म, ख्रिस्तीधर्म तत्त्वं इ. इ. गोष्टी ऐकवल्या. '

' निकोलाय, तुला कल्पना नसेल पण मला निकोलिङ्काची फार काळजी वाटते. ' काउंटेस मार्या म्हणाली. ' तो तसा विलक्षण पोरगा आहे. मी माझ्या मुलांकडे जास्त लक्ष देऊन त्याच्याकडे दुर्लक्ष करते आहे की काय असं मला वाटतं. आम्हाला आमची मुलं आहेत, आमचे आप्त आहेत पण त्याला कोणी नातेवाईक नाहीत. त्याच्या विचारांखेरीज त्याच्या सोबतीला कुणी नाही. '

' यासाठी तू स्वतःला दोष द्यायला हवास असं मला काही वाटत नाही. मुलाचे अतिशय लाड करणाऱ्या आईने केलं असतं तेवढं सारं तू केलं आहेस आणि आता करीतही आहेस. '

' तरीपण मी काही आईची जागा भरून काढू शकणार नाही. ह्या विचारानं मी अस्वस्थ होते. तो तसा विलक्षण मुलगा आहे. मला त्याची भयंकर धास्ती वाटते. त्याला कोणी मित्र मिळाले तर बरं होईल. ' काउंटेस मार्या म्हणाली.

'मिळतील लवकरच. येत्या उन्हाळ्यात मी त्याला पीटर्सबर्गला नेणार आहे.' निकोलाय म्हणाला. 'पीएर हा नेहमीच स्वप्नात वावरला, तसाच तो वावरत राहील,' तो पुन्हा बैठकीच्या खोलीत झालेल्या चर्चेकडे वळला. त्या चर्चेमुळे त्याच्या मनावर बराच ताण पडल्याचे दिसत होते. 'माझ्या लग्नाच्या वेळी मला एवढं कर्ज होतं की मला सावकार तुरुंगात टाकण्यास निघाले होते. आणि आईला ते दिसलं नव्हतं आणि समजलंही नव्हतं. अशी परिस्थिती असताना अराक्चीव्हच्या अगर इतरांच्या दुष्कृत्यांबद्दल मी चिंता करीत का बसू? तुझा, मुलांचा आणि माझ्या कामाचा विचार करायला हवा. सकाळपासून रात्रीपर्यंत मी शेतीवाडीवर आणि ऑफिसात काम करतो ते काय माझ्या सुखासाठी? छे छे! आईला सुख देण्यासाठी, तुला पैसे देण्यासाठी आणि मी लहानपणी होतो तशी माझी मुलं दारिद्र्यात राहू नयेत यासाठी मला काम करणं भाग आहे.'

काउंटेस मार्याला वाटले, नवऱ्याला सांगावे, 'माणूस केवळ भाकरीवर जगत नाही. तुम्ही आपल्या कामाला अवास्तव महत्त्व देत आहात.' आपण असे बोलता नये, बोलण्याचा काही उपयोग होणार नाही हे तिला ठाऊक होते. तिने त्याचा हात फक्त हाती घेऊन त्याचे चुंबन घेतले.

नताशा आणि तिचा नवरा ही एकटी असली की ती अगदी पति-पत्नींनी बोलावे तसे बोलू लागत. पूर्वपक्ष, अनुमान आणि सिद्धांत यांची मदत न घेता, तर्कशास्त्राचे सारे नियम धुडकावून आपल्या खास पद्धतीने ती परस्परांना आपले विचार समजावून देत व समजावून घेत. आणि हे किती जलद, सहज घडे.

जेव्हा फक्त तीच दोघे असत तेव्हा विस्फारलेल्या प्रसन्न डोळ्यांची नताशा हळुवारपणे त्याच्याजवळ सरके. चपळाईने त्याचे डोके आपल्या छातीशी दाबून म्हणे, 'आता तुम्ही माझेच—सर्वस्वी माझेच आहात. तुम्ही आता कुठं जाऊ शकणार नाही,' ती कित्येक भिन्न विषयासंबंधी बोलू लागत म्हणून की काय त्याच क्षणी त्यांचे संभाषण तर्कशास्त्राच्या सर्व नियमांना झुगारून सुरू होई. ती एकाच वेळी नाना विषयांची चर्चा करीत. त्यामुळे त्यांना परस्परांस समजून घेण्यात अडचण पडत नसे. उलट त्यांची चर्चा ती परस्परांस पूर्णपणे समजून घेत असल्याची निश्चित खूण होती.

आपल्या भावाच्या घरी आपला रोजचा कार्यक्रम काय असे ते नताशा पीएरला सांगे. पूर्वीपेक्षा मारी आपणास अधिक कशी आवडू लागली आणि ती प्रत्येक बाबतीत आपल्याहून श्रेष्ठ कशी आहे ते ती सांगू लागे. दुसऱ्या कोणत्याही स्त्रीपेक्षा आपण अधिक प्रिय आहोत असे त्याने सांगावे असे तिला वाटे.

तिच्या बोलण्याला प्रतिसाद म्हणून की काय पीएर म्हणे, 'पीटर्सबर्ग शहरातील उच्चभ्रू

चायकांच्या सहवासातील मेजवान्या आणि समारंभ यांचा मला पुरता वीट आला होता. स्त्रियांशी संभाषण करण्याची कला मी पुरता विसरून गेलो आहे. त्यांचा मला भयंकर वैताग येई. विशेषतः मी कामात गढलेलो असलो की असं वाटायचंच.'

एकदा नताशा त्याच्याकडे पाहाताना स्वतःला विसरून बोलू लागली, 'मारी असामान्य स्त्री आहे. मुलांचं अंतःकरण ती किती उत्तम जाणते. कालचीच गोष्ट. मायटेङ्का खट्याळ-पणा करीत होता...'

'तो बापाच्या वळणावर गेला आहे, नाही?' पीएरने मधेच विचारले.

मायटेङ्का आणि त्याचे वडील यांमधील साम्याचा उल्लेख त्याने का केला असावा ते नताशाच्या ध्यानात आले. आपल्या मेहुण्याबरोबर आपण वाद घातला होता ते त्याला बोचत असावे. त्याबद्दल तिचे मत त्याला जाणून घ्यायचे होते.

'निकोलायच्या स्वभावात एक दोष आहे. एखादं मत सर्वमान्य नसेल तर तो त्याच्याशी सहमत व्हायचा नाही.'

'तसं नव्हे. खरी गोष्ट अशी आहे-' पीएर बोलू लागला, 'विचार आणि कल्पना ह्या गोष्टी निकोलायच्या दृष्टीने करमणुकीसारख्या– फुरसतीच्या वेळासारख्या आहेत. तो आपलं ग्रंथालय उभारीत आहे. सिस्मॉंडी, रूसो, मॉन्टेस्क्यू यांची अलीकडे खरेदी केलेली पुस्तकं वाचून पुरी झाल्याखेरीज नवं पुस्तक आणायचं नाही असा त्याने नियम केला आहे. तुला माहीत आहे मी तर' पीएर स्मित करीत म्हणाला. तो आपली टीका आणखी सौम्य करणार होता पण त्याची काही आवश्यकता नसल्याचे दर्शवण्यासाठी नताशा मध्येच बोलली. 'म्हणजे तुमच्या मते तो विचाराकडे गंभीरपणानं पाहत नाही?'

'होय. मला विचाराइतकी गंभीर गोष्ट दुसरी आहे असं वाटत नाही. मी पीटर्सबर्गमधे असताना सर्वांना स्वप्नात भेटल्यासारखा भेटत होतो. एखाद्या कल्पनेनं माझा ताबा घेतला की मला इतर कोणतीही गोष्ट महत्त्वाची वाटत नाही. आपण विचार करू नये असे निकोला-यला वाटतं. पण मला तरी ते शक्य नाही. तुला सांगितल्यावाचून राहवत नाही. पीटर्सबर्ग-मधे असताना मला वाटलं माझ्यावाचून सर्व योजना कोलमडून पडेल. प्रत्येकजण आपापल्या दिशेनं चालला होता. पण मी सर्वांना एकत्र आणण्यात यशस्वी झालो. माझा विचार तसा किती सरळ, स्पष्ट आहे. अमक्यातमक्या विरुद्ध कार्य करायचं आहे असं मी म्हणत नाही. आम्ही चुकतही असू कदाचित. माझं म्हणणं एवढंच: न्याय्य गोष्टींची चाड असणाऱ्यांनी एकत्र यावं. कृतिशीलता आणि निष्ठा ह्यांच्या निशाणाखाली जमावं. प्रिन्स सेर्जी हा फार चांगला आणि हुषार इसम आहे.'

'माझ्या मनात आता काय आलं सांगू? प्लॅटन कॅरॅटीव्ह यांनी याबाबत काय म्हटलं असतं? तुमच्या विचाराशी ते सहमत झाले असते?' नताशाने विचारले.

तिच्या प्रश्नामुळे पीएर बिलकुल आश्चर्यचकित झाला नाही. त्याला आपल्या पत्नीच्या विचारांची दिशा समजली 'प्लॅटन कॅरॅटीव्ह' एवढेच बोलून तो विचारमग्न झाला. ह्या विषया-

बाबत त्याची काय प्रतिक्रिया झाली असती याचे तो प्रामाणिकपणे चित्र रेखाटू लागला. 'कदाचित त्याला हे विचार समजले नसते. कदाचित त्यानं त्यांचा स्वीकार केला असता.'

' मला तुम्ही इतके आवडता—इतके आवडता. ' नताशा एकदम उद्गारली.

' छे ! त्याला पसंत पडले नसते. ' पीएर विचार करीत म्हणाला, ' त्याला आवडली असती अशी एकच गोष्ट. ती म्हणजे कौटुंबिक जीवन. त्याला प्रत्येक ठिकाणी सौंदर्य, सौख्य आणि शांतता यांचं दर्शन घेणं फार प्रिय असे. मी त्याला आम्हा सर्वांकडे पाहायला मोठ्या अभिमानानं सांगितलं असतं. तू विरहाच्या गोष्टी करतेस. विरहानंतर तुझ्याबद्दल माझ्या मनात ज्या विलक्षण भावना उसळतात त्यांची तुला कल्पनाही यायची नाही. '

' मला म्हणायचं होतं...' नताशा बोलू लागली.

' तसं नाही. तुझ्यावरील माझं प्रेम कधीच सरणार नाही. प्रत्येकाच्या प्रेम करण्याला मर्यादा असतात. पण ही गोष्ट खास आहे. खरं तर तू जाणतेस...' त्याने वाक्य पुरे केले नाही. त्यांच्या दृष्टीभेटीने अर्थ पुरा झाला.

काही क्षण स्तब्धतेत गेले. मग दोघेही परस्परांकडे वळून बोलू लागली. पीएरच्या बोलण्यात आत्मतृप्ती आणि उत्साह ओसंडत होता. नताशा हळुवार प्रसन्न स्मित करीत होती. दुसऱ्याने बोलावे म्हणून ती दोघेही बोलायची थांबली.

' सांग ना. काय सांगत होतीस ? '

' मी ? नाही. तुम्हीच सांगा. मला काही सांगायचं नाही. उगीच आपली वेड्यासारखी काहीतरी बोलत होते. '

पीएरने आपणास काय सांगायचे होते ते सांगितले. पीटर्सबर्ग येथे यश मिळवून समाधानी वृत्तीत असलेल्या पीएरने नंतरच्या भागाबद्दल बोलण्यास प्रारंभ केला होता. रशियन समाजाच्या एवढेच नव्हे तर अवघ्या जगाच्या प्रगतीला नवी दिशा देण्यासाठी दैवाने आपली योजना केली आहे असे त्याला त्याक्षणी वाटत होते.

' भव्य परिणाम घडवून आणणाऱ्या सगळ्या कल्पना नेहमीच सरळ साध्या असतात असं मला म्हणायचं होतं. जर दुष्ट लोक एकत्र येऊन सत्ता बळकावू शकतात तर मग प्रामाणिक माणसांनीही तसंच केलं पाहिजे, हे माझ्या विचारांचं सार आहे. ते किती सरळ आहे हे लक्षात घे,

' खरं आहे. '

त्याच वेळी तिकडे निकोलिंका वोलकॉन्स्कीच्या खोलीत नेहमीप्रमाणे दिवा जळत होता. मुलाला अंधाराची भीती वाटे ती काही घालवता आली नव्हती. चार उशांवर डोके टेवून देसॅले झोपी गेला होता, आता त्याच्या घोरण्याचा तालबद्ध आवाज येत होता. निकोलिंका नुकताच जागा झाला होता. त्याला दरदरून घाम सुटला होता. डोळे विस्फारून समोर पाहात तो

प्र/१२२२
१

बिछान्यावर बसला होता. तो भयंकर स्वप्नातून जागा झाला होता.

प्ल्यूटार्कच्या चरित्रांत असलेल्या चित्रातील शिरस्त्राणासारखी शिरस्त्राणे घालून आपण आणि पीएरकाका प्रचंड सैन्याच्या अग्रभागी आहोत असे त्याला स्वप्नात दिसले. हे सैन्य वातावरण भरून टाकणाऱ्या तिरप्या धाग्यांनी बनलेले होते. हे धागे शरदृतूत कोळ्यांच्या तरंगणाऱ्या जाळ्यांसारखे होते. त्यांच्या पलीकडे कीर्ती होती ती काहीशी त्या धाग्यांसारखीच पण त्याहून अधिक अपारदर्शक होती. पीएर आणि तो स्वतः मोठ्या मजेत आपल्या उद्दिष्टांकडे उड्डाण करीत चालले होते. आता त्यांच्या हालचालींना कारणीभूत असलेले दोरे एकाएकी कमजोर होऊ लागले, मग ते एकमेकात गुंतून गेले. मग सगळीकडे अंधार पसरला, गोंधळ माजला. निकोलायकाका त्यांच्यासमोर उभा राहिला. त्याची मुद्रा उग्र आणि धास्ती निर्माण करणारी होती.

'तू केलंस का हे?' मोडलेल्या लेखण्यांकडे आणि सीलच्या मेणाच्या तुकड्यांकडे बोट करीत त्याने विचारले, 'माझं तुझ्यावर प्रेम होतं हे खरं. पण अराक्चीव्हने मला हुकूम केला आहे त्याप्रमाणं जो आधी पुढं सरेल त्याला मी ठार करणार आहे.'

निकोलाय पीएरला शोधू लागला. पण पीएर कुठे दिसेना. पीएरच्याऐवजी त्याचे वडील– प्रिन्स आन्द्रे तेथे होते. त्यांना रूप नव्हते, आकार नव्हता पण ते तेथे होते. त्यांना पाहून तो प्रेमाने मूर्च्छित झाला. आपण शक्तिहीन आहोत, विरघळून जात आहोत, विरळ होत आहोत असे त्याला वाटू लागले. त्याच्या वडिलांना त्याची दया आली. त्याला त्यांनी पोटाशी धरले. परंतु निकोलायकाका त्यांच्यावर चाल करून येऊ लागला. तशी निकोलिङ्का भयभीत होऊन स्वप्नातून उठला.

घरामधे प्रिन्स आन्द्रेच्या दोन फार चांगल्या तसबिरी होत्या. परंतु निकोलिङ्काने आपल्या वडिलांच्या मानवी रूपाचा कधी विचारच केला नव्हता. त्याच्या मनात येऊ लागले, 'माझ्या वडिलांनी मला जवळ घेतलं, मला पोटाशी धरलं. माझ्यावर आणखी पीएरकाकांवर त्यांची मर्जी दिसली. आता पीएरकाकांच्या सांगण्याप्रमाणं मी वागणार आहे. मी अभ्यास करावा अशी अपेक्षा करतात. आता मी अभ्यास करीन. कधीतरी अभ्यास पुरा झाला की मी माझ्या कार्याला लागेन. देवा, माझी एकच प्रार्थना आहे—प्ल्यूटार्कच्या वीर पुरुषांचं जीवन माझ्या वाट्याला येऊ दे. त्यांच्यासारखं कार्य माझ्याकडून होऊ दे. त्याहून अधिकही कार्य मी करीन. मग प्रत्येकाला माझं नाव ठाऊक होईल, प्रत्येकाला माझ्याबद्दल प्रेम, आदर वाटू लागेल.'

एकाएकी निकोलिङ्काची छाती हुंदक्यांनी धपापू लागली. तो ओक्साबोक्शी रडू लागला. 'तुला बरं वाटत नाही का?' त्याने देसॅलेचा आवाज ऐकला. 'नाही.' त्याने उत्तर दिले. तो तसाच उशीवर डोके ठेवून राहिला. 'देसॅले किती दयाळू, सुस्वभावी आहेत! मला आवडतात ते.' त्याच्या मनात विचार आला. मग तो पीएरकाकाबद्दल विचार करू लागला. 'पीएरकाकांची गोष्टच निराळी. ते असामान्य आहेत. आणि माझे वडील. बाबा! बाबा! तुम्हालादेखील अभिमान वाटेल असं कार्य मी करीन.'